
अंगारवाटा...
शोध
शरद जोशींचा
भानू काळे

# अंगारवाटा...

## शोध शरद जोशींचा

# अंगारवाटा...
## शोध शरद जोशींचा

भानू काळे

ऊर्मी प्रकाशन, पुणे

**अंगारवाटा... शोध शरद जोशींचा**

**लेखक**
भानू काळे
चलभाष : ९८५०८१००९१
इमेल : bhanukale@gmail.com
■
**प्रकाशक**
ऊर्मी प्रकाशन
सी २, गार्डन इस्टेट,
नागरस रस्ता, औंध,
पुणे ४११ ०६७
स्थिरभाष : (०२०) २५८८३७२६
■
**मुद्रक**
कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि.
■
**अक्षरजुळणी**
अमोघ आर्ट्स
■
**मुखपृष्ठ**
श्याम देशपांडे
■
**सर्व हक्क सुरक्षित**
© भानू काळे
■
आवृत्ती पहिली : ५ डिसेंबर २०१६
आवृत्ती दुसरी : ३ सप्टेंबर २०१७
■
किंमत : ६०० रुपये

या पुस्तकासाठी प्राज फाउंडेशनकडून आंशिक अर्थसहाय्य मिळाले आहे.

या पुस्तकाच्या प्रती मागवण्यासाठी कृपया पुढील पत्त्यावर संपर्क साधावा :
**प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे**
शेतकरी संघटना, मध्यवर्ती कार्यालय,
अंगारमळा, आंबेठाण,
तालुका खेड, जिल्हा पुणे ४१०५०१
चलभाष : ९८२२३००३४८
*अथवा*
**श्री. अनंतराव देशपांडे**
चलभाष : ९४०३५४१८४१,
८६६८३२६९६२

शेतकरी संघटनेच्या वेगवेगळ्या आंदोलनांत
जिवाची बाजी लावून लढलेल्या
असंख्य ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांस कृतज्ञतापूर्वक

जगातील पहिला व्यवसाय शेती हाच आहे. प्रकृती आणि मनुष्य एकत्र आल्यानंतर तो निर्माण झाला.

पंचमहाभूतांच्या लक्षावधी वर्षांच्या साठलेल्या ऊर्जा माणसाच्या श्रमांचा स्पर्श होताच गुणाकार करीत फळाला येतात. एका दाण्यातून शंभर दाणे तयार होण्याचा चमत्कार शेतीतच होतो.

ज्या दिवशी हे लक्षात आले, त्या दिवसापासून शेतीमध्ये तयार झालेली ही बचत लुटून न्यायला सुरुवात झाली. आजपर्यंतच्या इतिहासाची खरी प्रेरणा ही शेतीमध्ये होणारा गुणाकार लुटण्याची आहे.

– **शरद जोशी**

प्रास्ताविक ........................................................................ ११

१. **शिक्षणयात्रा** ........................................................................ १७
सातारा येथे ३ सप्टेंबर १९३५ रोजी जन्म... वडील व त्यांची पोस्टातील नोकरी... आईचे व्यक्तिमत्त्व... बेळगाव, नाशिक, मुंबई... भावंडे... संस्कृतची आवड... सिडनम कॉलेजात प्रवेश... 'हरियाली' सोडून 'पथरीला' रस्ता निवडणे... तेथील प्राध्यापक... एमकॉम उत्तीर्ण... दोन स्वभाववैशिष्ट्ये.

२. **व्यावसायिक जगात** ........................................................................ ४०
कोल्हापूरच्या कॉलेजातील अध्यापन... स्पर्धापरीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी यश... ऑगस्ट १९५८, पोस्टात नोकरी सुरू... २५ जून १९६१, लीला कोनकर यांच्याशी लग्न... श्रेया व गौरी यांचा जन्म... फ्रान्सला जायची शिष्यवृत्ती... सरकारी नोकरीचा राजीनामा... १ मे १९६८, स्वित्झर्लंड येथील नोकरी सुरू.

३. **डोंगरकुशीतल्या नंदनवनात** ........................................................................ ५९
स्वित्झर्लंडमधील ऐश्वर्यपूर्ण जीवन... शेजारी व कार्यालयातील सहकारी टोनी डेर होवसेपियां... तेथील दिनक्रम... युपीयुमधील आठ वर्षांच्या नोकरीतले अनुभव व एकूण असमाधान... युएनच्या कामातील वैयर्थ्य... स्वित्झर्लंडचे संस्कार... भारतात परतायचा निर्धार.

४. **मातीत पाय रोवताना** ........................................................................ ८४
१ मे १९७६. भारतात परत... पुण्यात घर... चाकणजवळ कोरडवाहू शेतीला सुरुवात... अकरा भूमीपुत्र संघटना... काकडीची पहिली शेती... 'उलटी पट्टी'चा अनुभव... सगळी पुंजी पणाला... शेतीमालाला अत्यल्प भाव... लीला जोशींची पोल्ट्री... असंख्य अडचणी... इंडिया विरुद्ध भारत.

५. **चाकणचा कांदेबाजार : पहिली ठिणगी** ........................................................................ १११
बाजारपेठेचा अभ्यास... कांद्याचा भाव कोसळला... चिडलेले शेतकरी... नाफेडतर्फे खरेदी सुरू... ८ ऑगस्ट १९७९, शेतकरी संघटना सुरू... वारकरी साप्ताहिक... चाकण ते वांद्रे रस्त्यासाठी २६ जानेवारीचा मोर्चा... पहिले रास्ता रोको... पहिले उपोषण... पहिली अटक... कांदा आंदोलनाचे महत्त्व.

६. **उसाचे रणकंदन** ........................................................ १४२
आळंदी शिबिर... मोरे-कराड-जोशी, ऊस आंदोलनातील त्रिमूर्ती... १० नोव्हेंबर १९८०, रास्ता रोको सुरू... रेल रोको... पोलिसांचा अघोरी लाठीमार... खेरवाडी गोळीबार... तीनशेचा भाव मंजूर... घुमरेवकिलांचे सहाय्य... एकूण ३१,००० शेतकऱ्यांना अटक... एक ऐतिहासिक विक्रम.

७. **धुमसता तंबाखू** ........................................................ १६६
निपाणीतील तंबाखू लागवड... व्यापाऱ्यांची दहशत... महिला कामगार... शरद जोशी निपाणीत... बीबीसीची टीम दाखल... रास्ता रोको सुरू... आंदोलननगरी... गुढी पाडवा साजरा... ६ एप्रिल १९८१... पोलिसांचा गोळीबार... मराठी-कानडी शेतकऱ्यांची एकजूट... महाराष्ट्राबाहेर प्रथमच.

८. **पांढरे सोने, लाल कापूस** ................................................ १८९
कापसाची विदर्भातील शेती... १९८१मधला विदर्भातील पहिला दौरा... एकाधिकार योजना... राजीवस्त्रविरोधी आंदोलन... सुरेगाव गोळीबार... १२ डिसेंबर १९८६, सेवाग्राम रेल रोको... १४ डिसेंबर १९९५, कापूस झोन बंदीविरुद्ध आंदोलन... शेतकरी आत्महत्या... संघटनेला भरपूर पाठिंबा.

९. **शेतकरी संघटना : तत्त्वज्ञान आणि उभारणी** .......................... २१८
आळंदी, वर्धा व अंबाजोगाई येथील प्रशिक्षण शिबिरे... पूर्वसुरींचे ऋण... शेतीचा इतिहास... रामदेवरायाचे कोडे... औद्योगिक क्रांती... वसाहती स्वतंत्र. पण लूट चालूच... एक-कलमी कार्यक्रम... क्षुद्रवाद नको... प्रतिष्ठेसाठी आंदोलन नाही... भीक नको, हवे घामाचे दाम... भक्कम विचार हा पाया.

१०. **अटकेपार** ................................................................ २५१
शरद पवारांच्या हस्ते मुंबईतील सत्कार... पंजाबमधील लोकप्रियता... भूपिंदर सिंग मान... हरित क्रांतीच्या मर्यादा... खन्ना येथील बैठक... १२ मार्च १९८४, चंडीगढ आंदोलन... हिंदू-शीख ऐक्य...राजभवनला घातलेला वेढा... स्वामिनाथन अय्यर... अटकेपार घेतलेली उडी.

११. **किसानांच्या बाया आम्ही...** ........................................ २७९
स्त्री-प्रश्नाचा शोध... १९८६ चांदवड अधिवेशन... तीन लाख स्त्रिया हजर... दारूदुकानबंदी आंदोलन... स्थानिक निवडणुकांमध्ये १००% महिला पॅनेल... लक्ष्मीमुक्ती अभियान... सीता मंदिर... दोन लाख महिलांचे नाव सात बाराच्या उताऱ्यावर प्रथमच... विचारवंतांनी फारशी दखल न घेतलेले यश.

१२. **राजकारणाच्या पटावर**................................................ ३१३
राजकारणविरहितता... भूमिकेत हळूहळू फरक... टेहेरे सभा... राजकीय भूमिकेची पाच सूत्रे.... पुणे बैठक... शरद पवार यांना पाठिंबा... पण पुढे ते काँग्रेसमध्ये... दत्ता सामंत... प्रकाश आंबेडकर... व्ही. पी. सिंग यांच्याशी मैत्री... १९९० निवडणुका, पाच उमेदवार विजयी... पराभवाचे विश्लेषण.

१३. **राष्ट्रीय मंचावर जाताना** ............................................. ३४६
भारतीय किसान युनियन... महेंद्र सिंग टिकैत. २ ऑक्टोबर १९८९, बोट क्लबवरचा मेळावा... गुजरातमधील काम... शेतकरीनेते एकत्र येण्यातल्या अडचणी... कृषी सल्लागार समिती.... कर्जमुक्ती आंदोलन... कृषी कार्य बलाचे अध्यक्षपद... राज्यसभा सदस्यत्व...जागतिक कृषी मंच.

१४. **सहकारी आणि टीकाकार** ............................................ ३७४
चाकण... उस आंदोलन... निपाणी... कापूस आंदोलन... महिला आंदोलन... लीलाताई जोशींचे निधन... शेवटच्या दिवसांतील सहकारी ... टीकाकार... वेगळी मांडणी नाही... वैयक्तिक चारित्र्य अविवाद्य... 'साहेबांनी आम्हाला त्यांचे अर्जुन मानले नाही, पण आम्ही त्यांचे एकलव्य जरूर आहोत.'

१५. **अंगाराकडून ज्योतीकडे : शोध नव्या दिशांचा** ...................... ४०८
जुलै १९९१... डंकेल प्रस्ताव... खुल्या अर्थव्यवस्थेला पाठिंबा... खुंटलेल्या जुन्या वाटा... ठिणगीने काम केले, आता ज्योत हवी... चतुरंग शेती... शेतकरी सॉल्व्हंट... शिवार ॲग्रो... भामा कन्स्ट्रक्शन... ६.११.१९९४ स्वतंत्र भारत पक्ष स्थापन... जाहीरनाम्यातील मूलगामी मांडणी... घरातला राजाजींचा फोटो.

१६. **साहित्य आणि विचार** ........................................ ४३२
वाचनाची आवड... स्वतःच्या वेगळेपणाची जाणीव... वाचनाला चिंतनाची जोड... शेतीचे उदात्तीकरण नाही... जग बदलणारी पुस्तके... अंगारमळा... विचारविश्व ... पाच वैशिष्ट्ये... जातिधर्मप्रांतनिरपेक्षता... अर्थवाद, शेती एक व्यवसाय... खुल्या अर्थव्यवस्थेचे समर्थन ... तंत्रज्ञानस्वीकार... स्वाभिमान.

१७. **सांजपर्व** ........................................ ४६२
नर्मदा परिक्रमा... या चरित्रात रुची कशामुळे होती... 'संघटक'मध्ये मदतीचे आवाहन... सिंहावलोकन करताना... सत्तेच्या फायद्यांपासून वंचित... 'सलगी दाखवणे मला कधीच जमले नाही.'... श्रेयविहीनतेचे भान... मूलतः विचारवंत... १२ डिसेंबरला २०१५ रोजी निधन... स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वाधिक लोकसहभाग लाभलेले आंदोलन... जोशींनी आम्हांला काय दिले?

परिशिष्ट १ : शरद जोशी जीवनपट : शंभर प्रमुख घटना ........................ ४९७

परिशिष्ट २ : शेतकरी संघटनेची अधिवेशने व इतर ठळक कार्यक्रम ................ ५०३

परिशिष्ट ३ : शरद जोशी यांची ग्रंथसंपदा ........................................ ५०५

परिशिष्ट ४ : शेतकरी आंदोलनातील हुतात्मे ........................................ ५०७

परिशिष्ट ५ : शेतकरी संघटनेची शपथ ........................................ ५०९

# प्रास्ताविक

शरद जोशी आणि त्यांनी उभारलेली शेतकरी चळवळ हा एक अभूतपूर्व झंझावात होता.

१९८० सालच्या ऊस आंदोलनात एकट्या नाशिक जिल्ह्यात ३०,००० शेतकरी एका वेळी तुरुंगात होते, तर १९८६ सालच्या कापूस आंदोलनात विदर्भ व मराठवाड्यात मिळून ९०,००० शेतकरी एका वेळी तुरुंगात होते. लोकांचा इतका प्रचंड सहभाग लाभलेली चळवळ स्वातंत्र्योत्तर भारतात दुसरी कुठलीच झालेली नाही.

असे असूनही ह्या झंझावाताची योग्य ती नोंद बुद्धिजीवींच्या वर्तुळात घेतली गेलेली नाही. जोशींचे समग्र असे जीवनचरित्रही उपलब्ध नाही. ती उणीव भरून काढण्याचा यथाशक्ती प्रयत्न करणे ही ह्या चरित्रामागची पहिली प्रेरणा आहे.

त्याचबरोबर जोशींनी मांडणी केलेले अनेक प्रश्न आजही आपल्यासमोर उभे आहेत; मग तो प्रश्न शेतीच्या भवितव्याचा प्रश्न असो अथवा समाजातील वाढती विषमता अधोरेखित करणाऱ्या 'इंडिया' विरुद्ध 'भारत' या द्वंद्वाचा असो. जोशींचा वैचारिक वारसा आणि त्यांचा एकूणच जीवनसंघर्ष या प्रश्नांना सामोरे जाताना आपल्याला खूप उपयुक्त ठरू शकेल व म्हणून तो वाचकांपुढे आणणे ही ह्या चरित्रलेखनामागची दुसरी प्रेरणा आहे.

शरद जोशी व त्यांचे शेतकरी आंदोलन यांच्याशी माझा परिचय तसा उशिरा झाला. आयुष्यातील पहिली ४१ वर्षे माझे वास्तव्य मुंबईत झाले आणि आचार्य अत्रे, जॉर्ज फर्नांडिस किंवा बाळासाहेब ठाकरे हे ज्या अर्थाने मुंबईकरांचे 'हिरो' बनले, त्या अर्थाने कधी मुंबईने जोशींची कदर केली नव्हती. जेव्हा *माणूस* साप्ताहिकामधून विजय परुळकरांची *योद्धा शेतकरी* ही मालिका प्रकाशित होत होती, तेव्हा ती आम्ही वाचत असू, नाही असे नाही; पण त्यापूर्वी काही वर्षे वि. ग. कानिटकर यांची *नाझी भस्मासुराचा उदयास्त* ही मालिका जेव्हा 'माणूस'मधून प्रकाशित होत होती, तेव्हा तिची आम्ही जशी विलक्षण आतुरतेने वाट बघायचो, तसे 'योद्धा शेतकरी'च्या बाबतीत होत नव्हते. जवळच्या जोशींपेक्षा दूरचा हिटलर शहरी मध्यमवर्गाला अधिक रोचक वाटत होता हे दुर्दैवी असले तरी सत्य होते. वृत्तपत्रे वाचून मनावर ठसणारी जोशींची अधीमुर्धी प्रतिमाही ते बड्या शेतकऱ्यांचे, म्हणजेच कुलक या वर्गाचे नेते आहेत अशी व म्हणून बव्हंशी नकारात्मकच होती.

पुढे पुण्यात आल्यावर आणि अंतर्नाद मासिक सुरू केल्यावर आमची पहिली भेट झाली व तेव्हाच ती प्रतिमा हळूहळू बदलू लागली. त्या भेटीचे कारण होते १९९९च्या अंतर्नाद दिवाळी अंकातील *बस करा हे समाजसेवेचे ढोंग!* हा त्यांचा प्रक्षोभक ठरलेला प्रदीर्घ लेख.

पुण्यातल्या सेनापती बापट रोडवरील 'बिना अपार्टमेंट्स'मध्ये ते तेव्हा राहत होते. तिथेच आमच्या दोन-तीन प्रदीर्घ मुलाखती झाल्या. त्यांच्या आधारे, व त्यांनी दिलेल्या त्यांच्या इतर साहित्याच्या आधारे, मी त्या लेखाचे शब्दांकन केले होते – विचार अर्थातच त्यांचेच होते व लेख छापण्यापूर्वी त्यांनी तो तपासून आणि थोडाफार बदलूनही दिला होता. पुढे फेब्रुवारी २००७च्या अंतर्नादमध्ये 'समाजसेवेची दुकानदारी नको!' या शीर्षकाखाली, त्यांनी केलेल्या आणखी काही बदलांसह व टीका थोडीशी सौम्य करून, तो पुनर्मुद्रितही झाला.

त्यानंतरही आमच्या भेटी अधूनमधून होत राहिल्या – प्रत्येक भेट पुनर्भेटीची ओढ लावणारी होती. त्यांच्यावर काहीतरी लिहावे असे खूपदा वाटले; पण प्रत्येक वेळी जाणवले, की हा तर एखाद्या कादंबरीचा विषय आहे; लेखात तो कसा हाताळणार? पण एखाद्या जीवित व्यक्तीवर कादंबरी लिहिणे तसे अवघडच! चरित्र लिहावे म्हटले तर त्यासाठी पुरेसा वेळ देऊ शकेन असे वाटत नव्हते. ३ सप्टेंबर २००९ रोजी ते पंच्याहत्तराव्या वर्षात पदार्पण करणार होते व त्याचा उल्लेख त्यांच्या काही सहकाऱ्यांच्या बोलण्यात झाला होता. त्या निमित्ताने मग त्यांच्यावर अंतर्नादचा एखादा विशेषांकच काढावा असे ठरले व मग त्या अंकासाठी मीही एक लेख लिहायचे ठरवले.

त्या अंकाच्या पूर्वतयारीसाठी म्हणून मुद्दाम आंबेठाण येथील अंगारमळ्यात जाऊन आलो. ते जोशींचे अधिकृत निवासस्थान आणि शेतकरी संघटनेचे मुख्य कार्यालय. तिथे जायचा तो पहिलाच प्रसंग. आंबेठाणला जाण्यासाठी चाकण बसस्टँडवर उतरावे लागते. संघटनेचे पहिले आंदोलन तीस वर्षांपूवी इथेच लढवले गेले. त्या दिवशी मात्र त्या क्रांतिकारी आंदोलनाची कुठलीही खूण त्या परिसरात दिसली नाही.

अंगारमळ्यात पोहोचल्यावर बघितले तर अगदी शुकशुकाट होता – जिथे शूटिंग होणे केव्हाच बंद झाले आहे अशा एखाद्या मुंबईतल्या जुनाट स्टुडिओत असावा तसा. राज्यसभा सदस्य असल्याने जोशींचा मुक्काम तेव्हा बहुतेक वेळ दिल्लीतच असायचा. त्यांचे एक निकटचे सहकारी प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे तिथेच एका खोलीत राहत होते; आजही तीच परिस्थिती आहे. बबन शेलार हे जोशींचे सारथी-सचिव-सहकारीदेखील तिथेच एका आउटहाउससारख्या जागेत आपल्या कुटुंबीयांसह राहत होते; पण मी गेलो तेव्हा ते तिथे नव्हते. एका नि:शब्द उदासीचे सावट अंगारमळ्यावर जाणवत होते. एकेकाळी इथून सुरू झालेल्या आणि बघता बघता लक्षावधी लोकांना आपल्या कवेत घेणाऱ्या शरद जोशी नामक वादळाचे ते विस्मृतीच्या अथांग पोकळीत विरून जायच्या आत शब्दांकन व्हायला हवे, ही जाणीव त्या क्षणी मला प्रकर्षाने झाली.

आंदोलनाच्या साऱ्या मंतरलेल्या दिवसांचे म्हात्रे साक्षीदार होते व जोशींची निवासाची खोली, त्यांचा ग्रंथसंग्रह, एकेकाळच्या लीलाताईंच्या पोल्ट्रीत थाटलेली प्रबोधिनीची शिबिरे घ्यायची जागा, भिंतींवरची पोस्टर्स, फोटो वगैरे सगळा इतिहास – खरे तर अवशेष – ते दाखवत होते; भूतकाळ जिवंत करत होते. अंतर्नादसाठी कोणाकोणाकडून लेख मागवावे याचीही नंतर चर्चा झाली. म्हात्रेंनी सुचवलेली नावेच नक्की केली. विद्युत भागवत आणि

इंद्रजित भालेराव यांनी लगेच होकार दिला व त्यांचे लेखही लौकरच मिळाले. विनय हर्डीकर यांनी मात्र नकार दिला; स्वतःऐवजी राजीव बसर्गेकर यांचे नाव त्यांनी सुचवले व पुढे बसर्गेकरांचा लेख मिळालाही.

२७ जून २००९ रोजी त्या लेखाला अंतिम रूप देण्यापूर्वी काही शंकांचे निरसन करावे, म्हणून जोशींची एक विशेष भेट घेतली. माझ्याच विनंतीला मान देऊन ते आमच्या घरी आले होते. सकाळी त्यांच्या एका शाळकरी मित्राच्या घरचे लग्नकार्य होते आणि संध्याकाळी डॉक्टरची अपॉइंटमेंट. ''आता हे मधले पाच-सहा तास मी अगदी पूर्ण मोकळा आहे. विचारा काय ते,'' औपचारिक गप्पा संपताच त्यांनी सुरुवात केली. त्या प्रदीर्घ भेटीत आम्ही खरे जवळ आलो. परिणामतः *तो राजहंस एक* या शीर्षकाचा तो लेख बराच मोठा झाला.

ऑक्टोबर २००९च्या त्या शरद जोशी विशेषांकाचे प्रकाशन २५ सप्टेंबर रोजी पुण्यातल्या एसेम जोशी हॉलमध्ये पार पडले. सभागृह तुडुंब भरले होते. त्या प्रसंगी रावसाहेब शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कारही केला गेला. (आमचे शेजारी बद्रीनाथ देवकर म्हणजे रावसाहेब शिंदे यांचे जावई आणि शरद जोशींचे अगदी राम-हनुमान शोभावे इतके परमभक्त – ह्या दोन मोठ्या व्यक्तींशी आम्हांला जोडणारा हा दुवा.) समारंभाच्या शेवटी शेतकरी आंदोलनाचे प्रथमपासून साक्षीदार असलेले व 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक म्हणून नुकतेच निवृत्त झालेले सदा डुंबरे यांनी त्यांची प्रकट मुलाखतही घेतली. मुलाखतीच्या शेवटी जोशींनी काहीसा दुःखद सूर लावला होता. त्यांचे शेवटचे वाक्य होते – "This is my private hell. But I must tell you, I am so proud of my private hell." त्या एका प्रसिद्ध अमेरिकन गाण्यातील ओळींत त्यांची त्यावेळची एकूण मनःस्थिती प्रतिबिंबित झाली असावी. मुलाखतीचा तो शेवट मनाला चटका लावून गेला.

अंतर्नादने काढलेल्या विशेषांकाबद्दल जोशींना समाधान वाटले होते. अंकाबद्दलच्या अनेक चांगल्या प्रतिक्रिया त्यांच्यापाशी येत होत्या. ''यामुळे मी चांगल्या वाचकांच्या एका वर्तुळात गेलो. तुमच्यासारख्या राजवाड्यांची आम्ही वाटच पाहत होतो,'' असे ते मला म्हणाले. ते ऐकून खरे तर मला धक्काच बसला. कारण त्यापूर्वी कधीही त्यांनी माझी किंवा अंतर्नादची एका शब्दानेही स्तुती केली नव्हती; कधीच काही कुतूहलही दाखवले नव्हते. योगायोगाने त्याच वर्षी त्यांच्या *अंगारमळा* पुस्तकाला राज्यशासनाचा आत्मकथन विभागासाठीचा प्रथम पुरस्कार मिळाला. इतरही काही पुरस्कार लगोलग मिळाले. पुढच्याच वर्षी त्यांना चतुरंग ह्या मुंबईतील प्रख्यात सांस्कृतिक संस्थेचा जीवनगौरव पुरस्कारही मिळाला.

दरम्यान त्यांचे चरित्र लिहायचा विचार पिच्छा सोडेना. त्यांच्या स्वतःच्या लेखनात त्यांचे अथपासून इतिपर्यंतचे चरित्र असे कुठेच उभे राहत नव्हते; इतरही कोणी तसे चरित्र लिहिलेले नसल्याचे माझ्या लक्षात आले. त्यांनी जे कार्य केले, ते खूप ऐतिहासिक महत्त्वाचे आहे याची एव्हाना खात्री पटली होती, पण तरीही त्यांच्याविषयी पुरेशी माहिती अनेक विचारवंतांना नाही हेही जाणवत होते.

*Everybody loves a good drought* हे मॅगसेसे पुरस्कारप्राप्त पी. साईनाथ यांचे गाजलेले पुस्तक मुख्यतः भारतीय शेतकऱ्याच्या दुर्दशेबद्दल आहे. पण १९९६ साली प्रकाशित झालेल्या या ४७० पानी पुस्तकात याच क्षेत्रात आपले सर्वस्व ओतून अनेक वर्षे काम करणारे शरद जोशी आणि शेतकरी आंदोलन यांच्याविषयी काहीही नाही. *India after Gandhi* या रामचंद्र गुहा यांच्या सुप्रसिद्ध पुस्तकातही जोशी व त्यांचे शेतकरी आंदोलन यांची अवघ्या आठ ओळींत बोळवण केलेली आहे व तीही महेंद्रसिंग टिकैत यांच्यासह त्यांना एकत्र गुंफून. ती अगदी अन्यायकारक आहे असे मला वाटले. आपल्या या बहुचर्चित ८९८ पानी ग्रंथात गुहांनी काढलेला निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे : जोशी आणि टिकैत या दोघांचाही आपण ग्रामीण जनतेसाठी बोलत आहोत असा दावा होता. वस्तुतः ते दोघेही ट्रॅक्टर आणि विजेचे पंप वापरणाऱ्या मध्यम व सधन शेतकऱ्यांचे प्रतिनिधी होते. गरीब शेतकरी त्यांच्या कक्षेत नव्हतेच. (*गांधींनंतरचा भारत,* मराठी अनुवाद : शारदा साठे, मॅजेस्टिक प्रकाशन, मार्च २०११, पृष्ठ ६८४) शेतकरी आंदोलनात सहभागी झालेल्या असंख्य शेतकऱ्यांना मी स्वतः भेटलो होतो, त्यांच्यापैकी अगदी क्वचितच कोणी ट्रॅक्टर बाळगणारे होते. गुहांच्या पुस्तकातील मजकूर उघड उघड चुकीचा होता. अशाच स्वरूपाच्या उल्लेखांनी, किंवा अनुल्लेखांनी, जर भावी पिढ्यांसाठी इतिहास लिहिला जाणार असेल, तर तो सत्याचा मोठा विपर्यास असणार होता.

अशा गैरसमजांची कारणे अनेक असणार, पण त्यांतील एक मोठे कारण म्हणजे शरद जोशींच्या जीवनाचे व एकूणच शेतकरी संघटनेच्या इतिहासाचे समग्र व विश्वासार्ह दस्तावेजीकरण करणाऱ्या पुस्तकाचा अभाव. त्यांचे चरित्र जाणून घ्यावे असे ज्यांना वाटेल त्यांच्यासाठी तो पर्याय उपलब्ध व्हायला हवा या भूमिकेतून मी हे चरित्र लिहायला प्रवृत्त झालो.

यावर चार-पाच वेळा झालेल्या चर्चेत जोशींनी सुचवल्याप्रमाणे मी त्यांना २१ मे २०१२ रोजी चरित्रलेखनाचा एक तीन-पानी प्रस्ताव दिला व त्यावर विस्ताराने चर्चा करण्यासाठी त्यांनी त्यांच्या देवी ऑर्किडमधल्या फ्लॅटवर प्रमुख सहकाऱ्यांची बैठकही बोलावली. सकाळी अकरा वाजता सुरू झालेली बैठक जेवणानंतर संपली. शैलजा देशपांडे, गुणवंत पाटील हंगरगेकर, अजित नरदे, श्रीकांत अनंत उमरीकर, डॉ. मानवेंद्र काचोळे, अनंत गणेश देशपांडे, संजय सुरेंद्र कोले, वामनराव चटप, रवी देवांग, जगदीश ज. बोंडे, अनिल ज. धनवट, सुरेशचंद्र म्हात्रे, दर्शिनी भट्टजी, बद्रीनाथ देवकर (ज्यांचे नाव पुढे प्रकल्प समन्वयक म्हणून छापले गेले) आणि इतरही काही प्रमुख सहकारी हजर होते. जोशींच्या सांगण्याप्रमाणे प्रत्येकाला प्रस्तावाची प्रत दिली व बैठकीत चर्चाही झाली. ह्या प्रकल्पात त्या सगळ्यांचा सहभाग जोशींना हवा होता. जोशींनी आणखी एक केले. *शेतकरी संघटक* या संघटनेच्या मुखपत्राच्या पुढच्याच, म्हणजे, ६ जून २०१२च्या अंकात ह्या संकल्पित चरित्राविषयी एक पूर्ण पान निवेदन त्यांनी प्रसिद्ध करवले. त्यात एकूण चरित्रप्रकल्पाची माहिती होती व सर्वांनी त्यात सहकार्य द्यावे असे कार्यकारिणीसदस्यांच्या नावाने एक आवाहनही होते. त्यामुळे

उपरोक्त सहकाऱ्यांप्रमाणे जागोजागी विखुरलेल्या त्यांच्या इतरही सहकाऱ्यांचे हार्दिक सहकार्य मिळाले. अनेकांनी त्यानंतर माझ्याशी संपर्क साधला व स्वतःजवळची शक्य ती माहिती पुरवली.

ह्या चरित्रासाठी जोशींनी खूप वेळदेखील दिला. यापूर्वीच्या धावपळीच्या आयुष्यात ते जमले असते असे वाटत नाही. त्या काळात शेतकरी लढ्यांमध्ये जोशींचा प्रत्यक्ष सहभाग असा फारसा राहिला नव्हता; महत्त्वाच्या सभांना ते हजर राहत, आपले विचार मांडत, मार्गदर्शन करत, एवढेच. बहुधा त्यामुळेच ते चरित्रासाठी पुरेसा वेळ देऊ शकले, न कंटाळता निवांतपणे जुन्या आठवणी सांगू शकले, शक्य तेव्हा मी बरोबर प्रवासात यावे अशी व्यवस्था करू शकले. तसे करताना शेतकरी चळवळीच्या बाहेरचा एक माणूस म्हणून मला खूपदा अवघडल्यासारखे वाटे, कारण आमच्यातील तशा प्रकारच्या जवळीकीमुळे त्यांच्या जुन्या निष्ठावान सहकाऱ्यांना काय वाटू शकेल असा विचार मनात यायचा; पण जोशींचे आमंत्रण आग्रहाचे असे.

दर शुक्रवारी सकाळी दहा वाजता आम्ही भेटायचो. दोन-तीन तास बोलणे व्हायचे. प्रत्यक्षात काम खूपच लांबत गेले. एक मुख्य कारण म्हणजे त्यांच्याकडे फारशी काही मूळ कागदपत्रे नव्हती आणि पूर्ण शहानिशा करून घेतल्याशिवाय कुठलाही मजकूर मला चरित्रात घ्यायचा नव्हता. 'एकदा उद्वेगाच्या भरात त्यांनी त्यांचे बरेचसे व्यक्तिगत कागदपत्र नष्ट केले,' असे नंतर मला म्हात्रेंनी सांगितले. अशा परिस्थितीत चाकणपासून स्वित्झर्लंडपर्यंत आणि निपाणीपासून चंडीगढपर्यंत विखुरलेल्या त्यांच्या असंख्य सहकाऱ्यांनी माझे आपल्या घरात आणि भावविश्वात स्वागत केले, आपला किमती वेळ दिला, आपल्याजवळचे कागदपत्र दिले, कडूगोड आठवणी सांगितल्या व या साऱ्या अमूल्य सहकार्यामुळेच पूर्वी कधीच लोकांसमोर न आलेली बरीच माहिती उजेडात आली आणि एकूणच ह्या लेखनाला स्मरणरंजनाच्या पलीकडे जाणाऱ्या दस्तावेजाचे स्वरूप देता आले.

हे चरित्र लिहिताना ज्यांच्याकडून वेगवेगळी माहिती उपलब्ध झाली, त्यांचा उल्लेख शक्यतो प्रत्यक्ष लेखनात त्या-त्या जागी केलेला आहे; वेगवेगळ्या उद्धृतांचे मूळ स्रोतही नोंदवलेले आहेत. *वारकरी, आठवड्याचा ग्यानबा* आणि *शेतकरी संघटक* या अधिकृत मुखपत्रांचे जुने अंक आणि शरद जोशींचे पूर्वप्रकाशित साहित्य हा अर्थातच एक महत्त्वाचा स्रोत होता. पुस्तकात वापरलेली अनेक छायाचित्रे सरोजा परुळकर यांनी पुरवली व स्वतंत्र श्रेय नोंदवलेले नाही ती छायाचित्रे सुरेशचंद्र म्हात्रे यांच्या सौजन्याने प्राप्त झाली. त्यांचे आभार मानतो. जेव्हा जेव्हा मी जोशींना भेटायला त्यांच्याकडे जात असे, तेव्हा तेव्हा ज्यांनी माझा कधीही न कंटाळता मनापासून पाहुणचार केला, त्या दर्शिनी भट्टजी ऊर्फ दीदी यांचे आभार मानतो. सुरेशचंद्र म्हात्रे यांचे सहकार्य तर अगदी शब्दातीत आहे. गेल्या पाच वर्षांत असा एकही आठवडा गेला नसेल, जेव्हा मी काही ना काही माहितीसाठी त्यांना फोन केला नाही वा भेटलो नाही. सर्व लेखन पूर्ण झाल्यानंतर शेतकरी संघटनेच्या वतीने म्हणून त्यांनीच प्रत्येक पान नीट तपासून दिले ह्याबद्दलही त्यांचे आभार मानायला हवेत.

शरद जोशींनी ज्यांना ह्या चरित्रासाठी प्रकल्प समन्वयक म्हणून नेमले होते त्या बद्रीनाथ देवकर यांचाही उल्लेख इथे करणे अपरिहार्य आहे; त्यांच्याबरोबर इतक्या ठिकाणी फिरलो आणि इतक्या साऱ्या लोकांशी त्यांनी माझी भेट घडवून आणली, की त्या साऱ्यांचा उल्लेख करणेही अवघड आहे. आपली सगळी इतर व्यक्तिगत कामे बाजूला सारून त्यांनी यासाठी वेळ दिला. अनंतराव देशपांडे यांचेही इथे आभार मानायला हवेत; अनेक भेटींचे आयोजन त्यांनी केले होते. महाराष्ट्राबाहेरील सहकाऱ्यांबद्दल लिहायचे तर स्वित्झर्लंड येथील बर्नमधले जोशींचे एकेकाळचे शेजारी आणि कार्यालयातील सहकारी टोनी डेर होवसेपियां, पंजाबातील बटाला येथील शेतकरीनेते व जोशींचे निकटचे स्नेही भूपिंदर सिंग मान, कर्नाटकातल्या निपाणी येथील तंबाखू आंदोलनातील सहकारी प्रा. सुभाष जोशी, कर्नाटक रयत संघाचे बंगलोरस्थित हेमंत कुमार पांचाल आणि सुरतमधील बांधकाम व्यावसायिक, शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्ते परिमल देसाई यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. शरद जोशी यांच्या कॅनडास्थित कन्या सौ. श्रेया शहाणे यांचेही आभार. आमच्या दोन भेटींमध्ये त्यांनी दिलेली माहिती बरीच उपयुक्त होती. पुस्तकासाठी ज्यांनी आर्थिक सहाय्य दिले त्या प्रमोद चौधरी यांचे व त्यांच्या प्राज फाऊंडेशनचे आभार मानतो.

पुस्तकाची सर्व मुद्रिते, वयपरत्वे येणाऱ्या अडचणींवर मात करून, ज्यांनी खूप आपुलकीने तपासून दिली त्या अंतर्नादच्या व्याकरण सल्लागार प्रा. यास्मिन शेख यांनाही मनापासून धन्यवाद. अक्षरजुळणीकार हरिश घाटपांडे, मुखपृष्ठकार श्याम देशपांडे, मुद्रक आनंद लाटकर आणि या साऱ्यांचे कुशल सहकारी यांचेही आभार मानायला हवेत.

ऋणनिर्देशाची ही यादी खरे तर खूपच लांब होईल. कितीही नावे घेतली तरी काही वगळली जायची शक्यता आहेच. प्रत्यक्ष नामोल्लेख केला नाही तरीही त्या साऱ्यांविषयी मनात कृतज्ञभाव आहेच. त्यांच्याविना हे चरित्र लिहूनच झाले नसते असे म्हटले, तरी त्यात अतिशयोक्ती होणार नाही.

वाचकांच्या हाती हे चरित्र देताना लेखकाची मनःस्थिती काहीशी संमिश्र आहे. हे काम व्हावे अशी ज्यांची खूप इच्छा होती, ते चरित्रनायक शरद जोशी आज आपल्यात नाहीत याची बोचरी खंत मनात आहे आणि त्याचबरोबर गेल्या पाच वर्षांतील बहुतेक वेळ ज्या प्रकल्पासाठी दिला त्याला मूर्त रूप लाभले याचे समाधानही आहे.

शरद जोशींसारखा एक अनन्यसाधारण कृतिशील विचारवंत आपल्यात होऊन गेला. त्यांचा जीवनपट आणि त्यांचा वैचारिक वारसा ह्या चरित्रातून वाचकांपुढे अल्पस्वल्प जरी साकार झाला तरी हे श्रम सार्थकी लागले असे म्हणता येईल. आपल्या टेबलावरचे रोजचे जेवणाचे ताट ज्याच्या श्रमांतून येते त्या शेतकऱ्याचे विश्व, त्याच्या अडचणी, त्याचे संघर्ष, त्याच्या आशा, त्याच्या निराशा ह्यांची थोडीफार ओळख ह्या चरित्रलेखनातून लेखकाला झाली आणि तशीच ती या चरित्रवाचनातून वाचकालाही व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करून थांबतो.

**– भानू काळे**

■

# १

# शिक्षणयात्रा

'शेतकऱ्यांचे पंचप्राण' म्हणून ज्यांची पुढे ख्याती झाली त्या शरद अनंत जोशी यांचा जन्म ३ सप्टेंबर १९३५ रोजी झाला. शनिवार पेठ, सातारा येथे. पण एक आश्चर्य म्हणजे त्यांच्या, किंवा त्यांच्याविषयीच्या, प्रकाशित लेखनात ते सातारा येथे जन्मले ह्याची कुठेच नोंद नाही. खूप वर्षांनंतर, ९ जानेवारी २०१० रोजी, त्यांना तेथील रा. ना. गोडबोले चॅरिटेबल ट्रस्टतर्फे साताऱ्यात जन्मलेल्या व लोकोत्तर कार्य केलेल्या एखाद्या व्यक्तीला दिला जाणारा साताराभूषण पुरस्कार मिळाला, तेव्हाच बहुतेकांना कळले, की साताऱ्याशी त्यांचे असे काही जवळचे नाते आहे. याचे एक कारण कदाचित हे असावे, की त्यांचे वडील अनंत नारायण जोशी हे पोस्टात नोकरीला होते व त्यामुळे त्यांच्या बऱ्याच बदल्या होत असत. विशेषतः सुरुवातीच्या काळात. पुढे ह्या बदल्यांची वारंवारिता कमी झाली.

अनंतरावांचा जन्म १९०५ सालचा. ते चार-पाच वर्षांचे असतानाच त्यांचे आईवडील वारले. घरची आत्यंतिक गरिबी होतीच, त्यात आता आणखी अनाथाचे जिणे नशिबी आले. आधार कोणाचाच नव्हता. माधुकरी मागून आणि घरोघर वारावर जेवूनच त्यांचे शिक्षण झाले. कोल्हापूर येथील एका ख्रिश्चन मिशनरी शाळेत. त्यामुळे त्यांच्या मनावर ख्रिस्ती शिकवणुकीचा बराच प्रभाव पडला होता. पुढे शरद जोशी यांच्या एका कथेवर त्यांनी जी प्रतिक्रिया व्यक्त केली होती, तिच्यावरून त्यांच्या स्वभावावर थोडासा प्रकाश पडतो.

कॉलेजात शिकत असताना शरद जोशींनी ती कथा लिहिली होती व त्यावेळच्या एका चांगल्या मासिकात ती प्रसिद्धही झाली होती. त्या कथेत मुंबईतला एक तरुण लोकल गाडीखाली सापडून मरतो व त्याचे प्रेत त्याच्या घरी आणले जाते. चाळीतली सर्व मंडळी अवतीभवती गोळा होतात. त्यांच्यात एक विधवा असते. त्या तरुणाच्या शेजारीच राहणारी. प्रेत बघितल्यावर लोकांच्या चेहऱ्यावर काय काय प्रतिक्रिया उमटल्या व विशेषतः त्या विधवेच्या चेहऱ्यावर काय भाव उमटला याचे वर्णन करताना त्यांनी लिहिले होते, की एखाद्या विधवा बाईला दुसऱ्या बाईचा नवरा मेल्यावर जे समाधान वाटेल, तसे समाधान तिच्या चेहऱ्यावर दिसत होते! 'हे मी माझ्या खवचट स्वभावाने लिहिले होते' असेही त्यांनी नंतर नमूद केले आहे. सॉमरसेट मॉम हा त्यांचा त्यावेळचा आणि नंतरचाही आवडता लेखक. त्यावेळी जोशींनी नुकतीच कथा लिहायला सुरुवात केली होती व मॉमच्या काही कथांचा त्यांनी अनुवादही केला होता. मॉम त्याच्या इतर वैशिष्ट्यांबरोबरच मनुष्यस्वभावातील विसंगतीच्या

चित्रणासाठी, चर्च व मिशनऱ्यांच्या थट्टेसाठी आणि एकूणच तुच्छतावादासाठी (सिनिसिझमसाठी) प्रसिद्ध. त्याच्याच प्रभावाखाली लिहिलेले हे वाक्य असावे. वडलांच्या वाचनात ती कथा आली व ते वाक्य त्यांना अजिबात आवडले नाही. त्यांच्या त्या वेळच्या प्रतिक्रियेविषयी जोशींनी बऱ्याच वर्षांनी (*अंगारमळा,* पृष्ठ ११४) लिहिले आहे,

> माझे वडील अगदीच वेगळ्या पठडीतले. राग आला तर दुष्ट, कपटी, अभद्रेश्वर व राक्षस यापलीकडे पाचवी शिवी त्यांना माहीत नव्हती. माझी गोष्ट वाचून ते रागाने म्हणाले, 'मनुष्य जितका दुष्ट आहे, तितकं सगळं कागदावर लिहिण्याची काही आवश्यकता नाही.' मी मोठ्या पंचायतीत सापडलो. जे आहे, जे मला दिसतंय ते लिहायचं नाही, म्हणजे मग काय लिहायचं? मग मी हळूहळू साहित्यापासून दूर जायला लागलो.

अनंतराव पोस्टात साधे कारकून म्हणूनच लागले होते. 'एकदा माणूस पोस्टात लागला की निवृत्त होईपर्यंत तिथेच चिकटतो' असे गमतीने म्हटले जाई. अनंतरावांच्या बाबतीतही ते खरेच ठरले. ह्या नोकरीत पगार तसा बेताचाच असायचा; शिवाय पदरी चार मुलगे व दोन मुली. त्यामुळे तसा ओढाताणीचाच संसार. वडलांना खास आवडीनिवडी अशा फारशा नव्हत्या. सामाजिक जीवनातही त्यांचा काही सहभाग नसे. त्या काळातील बहुसंख्य सरकारी नोकरांप्रमाणे आपण बरे की आपली नोकरी बरी अशीच एकूण त्यांची वृत्ती असावी.

जोशींच्या आईचे नाव इंदिरा. त्यांचा जन्म १ जुलै १९११ रोजी झाला. त्या मूळच्या पंढरपूरच्या. माहेरच्या आपटे. वर देशस्थ-वधू कोकणस्थ असा, आज काहीच विशेष नसलेला पण पाऊणशे वर्षांपूर्वीच्या ग्रामीण महाराष्ट्रात 'पुरोगामी' मानला जाणारा त्यांचा विवाह. वडलांना मुले 'काका' म्हणत, तर आईला 'माई'.

आपल्या वडलांबद्दल जोशींनी फारसे कुठे लिहिलेले नाही, ते वारलेही तसे लौकर; पण आईबद्दल मात्र त्यांनी काही ठिकाणी उत्कटतेने लिहिले आहे. त्या पंढरपूरच्या असूनही त्यांच्या घरची मंडळी वागण्यात फारशी धार्मिक वा कर्मकांड पाळणारी नव्हती. शिवाय, इंदिराबाई कायम तेथील बडव्यांच्या विरोधात असत. ते बडवे अनीतीने वागतात, भाविकांना लुटतात, आणि विशेष म्हणजे गावात येणाऱ्या परित्यक्तांशी गैरवर्तन करतात असे बोलले जाई व त्याचा इंदिराबाईंना खूप राग असायचा. त्यांचे वडील विष्णुपंत विठ्ठल आपटे समाजसुधारक होते. १९१४ साली त्यांनी पंढरपुरात आपटे प्रशाला सुरू केली होती. पुढे उपलब हे पंढरपुरातील प्रसिद्ध उद्योजक कुटुंबही तिच्यात सहभागी झाले व आपटे-उपलब प्रशाला ह्या नावाने आजही ती शाळा चालू आहे.

आश्चर्य म्हणजे घरची शाळा असूनही इंदिराबाईंचे औपचारिक असे शालेय शिक्षण झाले नव्हते. दोन बालविधवा बहिणी घरात; त्यामुळे घरकाम खूप. घरच्या सुसंस्कृत वातावरणामुळे इंदिराबाईंना लहानपणापासूनच वाचनाचे वेड मात्र होते. अनेक कविता त्यांना पाठ होत्या.

संगीताचीही आवड होती व पाठ केलेल्या कविता त्या नेहमी सुरेल आवाजात मोठ्याने म्हणत असत. पेटीही छान वाजवायच्या. त्यांची दृष्टी लहानपणापासून अधू होती; एका डोळ्याने काहीच दिसत नसे व पुढे पुढे तर दुसऱ्या डोळ्यानेही खूप पुसट दिसायला लागले. त्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करावी व त्यामुळे कदाचित अधिक चांगले दिसू लागेल, असे अनेकांनी सुचवूनही त्या तयार झाल्या नाहीत. ''शस्त्रक्रिया करायचीच तर लहानपणीच आंधळ्या झालेल्या डोळ्यावर करा. सुधारला तर तो सुधारेल. नाहीतर मी दोन्ही डोळ्यांनी आंधळी होईन,'' त्या म्हणत.

हो-नाही करता करता अनेक वर्षे गेली. पुढे वय झाल्यावर मग शेवटी डॉक्टरांचेही मत 'ह्या वयात आता ऑपरेशनचा धोका नकोच' असे झाले. त्यामुळे मग ऑपरेशन टळले, पण जवळजवळ काहीच दिसेनासेही झाले. तशाही परिस्थितीत त्यांची वाचनाची आवड कायम होती. रोजचे वर्तमानपत्र अगदी डोळ्याशी नेऊन वाचायला लागले तरीही त्या वाचत. त्यांनी दोन नाटके आणि काही कथाही लिहिल्या होत्या; वृत्तपत्रांकडे त्या पत्रेही पाठवत.

अधूनमधून त्यांना कविता स्फुरायच्या व जे कोणी मूल जवळपास असेल त्याला ती कविता सुवाच्य अक्षरात लिहून द्यायचा त्या आग्रह करायच्या. बालसुलभ वृत्तीनुसार मुले ती लिहून घेण्यात टंगळमंगळ करत असत. तरीही त्या मुलांना पुनःपुन्हा विनंती करत, मुलांच्या मागे लागत. त्यांच्या काही कविता कुठे कुठे छापूनही आल्या होत्या. आपल्या कवितांचे पुस्तक निघावे अशी त्यांची इच्छा होती. 'माझं एखादं पुस्तक प्रसिद्ध कर,' असा लकडा त्यांनी नंतर जोशींचे एक निकटचे सहकारी प्रा. सुरेशचंद्र म्हात्रे यांच्यामागे लावला होता. आपल्या अखेरच्या दुखण्याच्या वेळी इस्पितळात असतानासुद्धा त्यांनी म्हात्रेंना त्याची आठवण करून दिली होती. पण काही ना काही कारणांनी योग येत नव्हता. त्यांच्या निधनानंतर अनेक वर्षांनी म्हात्रे यांच्या पुढाकारातून ती इच्छा पूर्ण झाली; त्यांच्या कवितांचा एक संग्रह ३ सप्टेंबर २०१५ रोजी, शरद जोशी यांच्या ऐंशीव्या वाढदिवशी, श्रीकांत उमरीकर यांच्या औरंगाबाद येथील जनशक्ती वाचक चळवळीने *माईंच्या कविता* या नावाने प्रसिद्ध केला. एक वेगळेपण म्हणजे त्या वृत्तबद्ध आहेत व त्यांतील अनेकांना इंदिराबाईंनी त्यावेळच्या प्रसिद्ध गीतांनुसार चालीही लावल्या होत्या.

१९८२ ते १९९२ या कालावधीत म्हात्रेंनी इंदिराबाईंशी शक्य तेवढा संपर्क ठेवला. त्या काळात चळवळीमुळे जोशी बहुतांशी प्रवासात असत, पुण्यात येणे कारणपरत्वेच होई. म्हात्रे अधिक वरचेवर येत. *आई, कशाला ग पुनः दुष्ट पावसाळा आला?* या शीर्षकाची इंदिराबाईंची एक कविता कित्येक वर्षांपूर्वी *साधना* साप्ताहिकात प्रकाशित झाली होती. जोराच्या पावसामुळे गरिबाच्या घरात पाणी कसे शिरते, सगळ्यांचे किती हाल होतात, तो प्रश्न विचारणाऱ्या मुलाचे वडीलही अशाच पावसाळ्यात कसे वारलेले असतात वगैरे अनेक आठवणींचे चित्रण करणारी. म्हात्रेंनी ती त्याचवेळी वाचली होती व प्रत्यक्ष भेट झाल्यावर त्यांनी एकदा इंदिराबाईंना तिची आठवण करून दिली. इंदिराबाईंना त्याचे फार कौतुक वाटले होते. म्हात्रे पेटीही चांगली वाजवत. दोघांना जोडणारा तो आणखी एक दुवा. म्हात्रेंना त्या

आपला मुलगाच मानत. म्हात्रे सांगत होते, ''आपल्या शरदला हा सांभाळेल, असा विश्वास बहुधा त्यांना वाटत होता.''

इंदिराबाई खूप कर्तृत्ववान व कामसू होत्या; सतत काही ना काही चालूच असायचे. बागेतला पालापाचोळा गोळा करणे, घरचे केरवारे, भांडी-धुणी, स्वैपाक वगैरे सगळी कामे त्या स्वतःच करायच्या. लहानसहान दुरुस्तीची कामेही. अधूनमधून मोलकरीण मिळायची, पण त्यांच्या कडक शिस्तीला कंटाळून ती लगेचच काम सोडून द्यायची. त्यामुळेही कदाचित त्यांना सर्व कामे स्वतः करायची सवय लागली असेल. शिवाय कुठलेही काम कसे करायचे ह्याची त्यांची एक पद्धत ठरलेली असायची व तीच पद्धत सर्वोत्तम आहे याविषयी त्यांची खात्री असायची. तसे त्या इतरांना पटवूनही द्यायच्या. कुठलेही काम दुसऱ्या कुठल्या पद्धतीने केलेले त्यांना पसंत पडत नसे. साहजिकच त्यांच्याकडे कोणी नोकर टिकत नसत. पुढे जोशींनी लिहिले आहे, ''तिच्याकडे कामाला राहिलेल्या बाया, मोलकरणी यांच्याच कथा लिहायच्या म्हटल्या, तरी तो एक वाचनीय ग्रंथ होऊन जाईल.''

त्यांचे आणखी एक वेगळेपण म्हणजे त्या अगदी करारी व स्वतंत्र बाण्याच्या होत्या. ''शिकली असती तर माझी आई एखाद्या कंपनीची मॅनेजिंग डायरेक्टरही सहज झाली असती,'' असे त्यांचे सध्या नाशिकला राहणारे एक चिरंजीव प्रभाकर ऊर्फ येशू प्रस्तुत लेखकाला म्हणाले होते.

यजमान वारल्यानंतरही कुठल्याच मुलाकडे न जाता त्यांनी स्वतःच्या घरात एकट्याने राहणेच पसंत केले होते. पुण्यात प्रभात रोडवर, आताच्या आयकर कार्यालयाजवळ पतीने बांधलेल्या 'सदिच्छा' ह्या छोट्या बंगल्यात. आपल्या खासगीपणाची (पर्सनल स्पेसची) कटाक्षाने केलेली जपणूक हे एकूणच जोशी कुटुंबीयांचे एक वेगळेपण असल्याचे जाणवते. जोशी जेव्हा स्वित्झर्लंडहून सहकुटुंब भारतात परतले, तेव्हादेखील स्वतःचे वेगळे घर विकत घेईपर्यंतचे सहाएक आठवडे आईकडे न राहता ते सहकुटुंब डेक्कनवर श्रेयस हॉटेलात राहिले होते. थोरल्या भगिनी नमाताई पुढे म्हातारपणी जबलपूरहून महाराष्ट्रात स्थायिक झाल्या, तेव्हा त्यांनीही चाकणला आपले स्वतंत्र बिऱ्हाड थाटले; त्या पुण्यात भावाकडे म्हणजे शरदकडे राहायला आल्या नाहीत.

१९७० साली अनंतराव वारले. वयाच्या पासष्टाव्या वर्षी. त्यावेळी सुट्टी घेऊन जोशी स्वित्झर्लंडहून पुण्याला आले होते. परत गेल्यावर त्यांनी आईला एका पत्रात लिहिले होते : ''काका गेले म्हणजे आता उरलेले आयुष्य कसेबसे काढून संपवायचे आहे, असा विचारही मनात आणू नकोस. अशातही जिद्दीने उभे राहून आयुष्याला एक नवा अर्थ दिला पाहिजे.'' नंतर या संदर्भात लिहिताना ''मी तिला असे लिहिण्याची गरज होती असे नाही; मी न लिहिताही तिचा निर्णय असाच झाला असता,'' असेही जोशींनी लिहिले आहे. परंतु माई मात्र त्या पत्राचा वरचेवर उल्लेख करत. पतिपश्चात आपल्या आयुष्याची घडी त्यांनी पुन्हा एकदा बसवली; पण तरीही पतीमागे तब्बल बावीस वर्षे एकट्याने राहण्याची वेळ येईल अशी त्यांची अपेक्षा नसावी. ''मला घेऊन जायचं देव विसरून गेला,'' त्या कधीकधी म्हणत.

दिवस जात राहिले; त्या ब्याऐंशी वर्षाच्या झाल्या. डॉक्टरकडे त्या अगदी क्वचितच जात. लिंबाचे सरबत किंवा आल्याचे पाचक किंवा एखादे आयुर्वेदातले चूर्ण यावर त्यांचे दुखणे बहुतेकदा बरे होई. पण एक दिवस अगदी गंभीर प्रसंग ओढवला. घरी स्वयंपाक करता करता पदर पेटून भाजल्याने त्यांना पुण्यात जवळच असलेल्या जोशी हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. हॉस्पिटलमध्ये असतानाच माई गेल्या. तो दिवस होता ३ मार्च १९९२.

शरदचा जन्म पंचांगाप्रमाणे ऋषिपंचमीचा. शरद हे नाव मोठ्या बहिणीने, नमाताईने, ठेवले. शरद इतर भावंडांच्या तुलनेत सावळा पण अंगाने गुटगुटीत होता. 'सुदृढ बालक स्पर्धेत त्याला नक्की बक्षीस मिळालं असतं,' असे आई म्हणायची. घरी सगळे त्याला गबदुलशेठ म्हणत. बोलणे थोडे बोबडे; त्यामुळे बोबडकांदा म्हणूनही चिडवत. साताऱ्यात दोन-तीनदा वडलांनी घरे बदलली व पुढे लवकरच त्यांची बेळगावला बदली झाली.

बेळगावात ठळकवाडीत लोकूर म्हणून एका डॉक्टरांचा बंगला होता. त्याच्या आउटहाउसमध्ये जोशी परिवार राहू लागला. जवळच एक शाळा होती. 'रजपूत बंधूंची शाळा' असेच तिला म्हणत. इथले माध्यम कन्नड नव्हते, तर मराठीच होते. ह्या खासगी शाळेत महिन्याला एक रुपया फी होती, इतर सरकारी शाळा फुकट होत्या; पण घरच्यांना शिक्षणाचे महत्त्व असल्याने सगळी मुले ह्याच शाळेत जाऊ लागली. 'आपण सरकारी शाळेत नव्हे, तर खासगी शाळेत जातो' ह्याचा आजच्याप्रमाणे त्या काळीही काहीसा अभिमान बाळगला जाई. मास्तरांनी घेतलेल्या प्रवेशपूर्व चाचणीत चांगली उत्तरे दिल्यामुळे धाकट्या शरदला एकदम दुसरीत प्रवेश दिला गेला. लहानपणापासून शरद खूप हुशार. पाठांतर उत्तम. मोठा भाऊ बाळ एक यत्ता पुढे होता, पण त्याच्याबरोबरच वावरत असल्याने ऐकून ऐकून त्याचेही धडे शरदला पाठ असत. त्यामुळे खरेतर शरदला एकदम तिसरीत बसवायलाही रजपूत मास्तर तयार होते. पण 'शरदला माझ्याच वर्गात बसवलं तर मी शाळा सोडून देईन' अशी धमकी बाळने दिल्यामुळे नाइलाजाने शरदला दुसरीतच बसावे लागले. त्याची जीभ थोडीशी जड होती; तरीही कष्टपूर्वक त्याने आपले उच्चार सुधारले. बऱ्याच वर्षांनी बेळगाव येथील एका जाहीर सभेत जोशींनी केलेल्या अस्खलित भाषणाचे रजपूत मास्तरांना त्यामुळे खूपच कौतुक वाटले होते.

बेळगावचा एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. पाटकर नावाच्या एका शिक्षकांची शिकवणी आईने बाळला ठेवली व 'त्याच्याबरोबर तूही बसत जा' असे शरदला सांगितले. शरदला तो अपमान वाटला. शिकवणी लावणे म्हणजे कुठेतरी आपण अभ्यासात कमी आहोत, मठ्ठ आहोत, हे मान्य करणे असे त्याला वाटले. त्याची समजूत घालताना आई म्हणाली,

''गरीब बिचारे पाटकर मास्तर! महिना एक रुपयात रोज तासभर घरी येऊन शिकवणी घ्यायला तयार आहेत आणि तुम्ही दोघंही बसणार असलात तर ते आपल्यालाही परवडेल. तुला शिकवणीची कदाचित गरज नसेल, पण बाळला तिचा उपयोग होणार आहे. त्याच्याशेजारी नुसतं बसायला तुला काय एवढा त्रास आहे? तेवढंच काही कानावर पडेल. पुढच्या वर्षी तुला कदाचित बाळबरोबर एकदम चौथीतच बसवू. शिवाय ह्या एक रुपयाची

पाटकर मास्तरांना मोठी मदत होणार आहे. अरे, तुझ्या वडलांना महिना चाळीस रुपये पगार आहे आणि तरी त्यात भागवताना आपली किती ओढाताण होते तुला ठाऊकच आहे. पाटकर मास्तरांना तर फक्त महिना आठ रुपये पगार आहे! त्यांची किती ओढाताण होत असेल?''

त्यानंतर शरद शिकवणीला बसायला तयार झाला. कदाचित मोठ्या भावाबरोबर एकदम चौथीत बसायच्या आमिषाने! शिकवणीचा त्याला किती फायदा झाला असेल कोण जाणे, पण आईने ज्या प्रकारे त्याची समजूत काढली, त्याची मात्र त्याला आयुष्यभर आठवण राहिली. आपली परिस्थिती चांगली नसली, तरी आपण आपल्यापेक्षाही दुर्बळ अशा कोणालातरी मदत करू शकतो ही शिकवण फार महत्त्वाची होती. 'लहानपणी आम्ही गरीब असतानाही आमच्याकडे कायम कोणीतरी विद्यार्थी वारकरी म्हणून रोज जेवायला असायचा,' याचा उल्लेख त्यांनी एकदा काहीशा अभिमानाने केला होता. गरजू विद्यार्थ्याला वारावर जेवायला घालून मदत करायची, तर गरजू मास्तरांना शिकवणी देऊन मदत करायची, हा इंदिराबाईंचा मनोदय त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल बरेच काही सांगणारा आहे.

बेळगावची जोशींनी सांगितलेली आणखी एक आठवण म्हणजे ते तिथे जिन्यावरून खाली पडले होते ती. ते म्हणाले,

''मला फ्लॅट फूटचा, सपाट तळपायाचा, थोडा त्रास होता. साहजिकच तोल सांभाळणं इतर सर्वसामान्य मुलांपेक्षा मला किंचित अवघड व्हायचं. अशा मुलांना लष्करात प्रवेश मिळत नसे. साताऱ्याला असताना एकदा मी व बाळ डोंबाऱ्याचा खेळ खेळत होतो व तेव्हाही मी असाच दोरीवरून पडलो होतो आणि पायही मुरगळला होता.''

पुढील आयुष्यात जोशी भरपूर चालत, अगदी गिर्यारोहणही करू लागले. बोबडेपणाप्रमाणे ह्या फ्लॅट फूटवरही त्यांनी मात केली. या सगळ्यामागे, जन्मजात शारीरिक कमतरतेवर मात करण्यामागे, त्यांची जिद्द दिसून येते.

त्यांची आणखीही एक लहानपणची साताऱ्यातली आठवण ह्या गिर्यारोहणप्रेमाशी असलेला बालपणाचा संबंध सुचवणारी आहे. ते सांगत होते,

''लहानपणी मला प्लुरसी झाली होती – फुफ्फुसांचा हा एक न्युमोनियासारखा विकार. त्याचा परिणाम म्हणून कदाचित असेल, पण मला बंदिस्त जागेत खूप कोंदटल्यासारखं (claustrophobic) होई. डोंगरावर फिरायला गेलं, की मात्र तिथल्या मोकळ्या हवेमुळे बरं वाटायचं. साताऱ्याला अजिंक्यतारा किल्ल्यामागे खूप डोंगर होते. आमच्या गड्याच्या किंवा कधी वडलांच्या खांद्यावर मी बसलेला असायचो. तिथून लांबवरचं दृश्य दिसायचं. ते बघणं मला खूप आवडायचं. पुढे मला डोंगर चढायची जी आवड लागली, तिचं मूळ कुठेतरी ह्या शारीरिक कमतरतेत असावं.''

१९४२च्या फेब्रुवारीत वडलांची नाशिकला बदली झाली. यावेळी बढतीही मिळाली होती. पोस्टाच्या एका खात्यांतर्गत परीक्षेत पहिला क्रमांक मिळाल्याने त्यांना इन्स्पेक्टर म्हणून नेमले गेले. पगारही थोडा वाढला. गंगापूर रोडवर कुलकर्णी नावाच्या एका गृहस्थांच्या

बंगल्यात ते राहू लागले. तिसरी व चौथी यत्ता शरदने इथल्या प्राथमिक विद्यामंदिर ह्या शाळेत काढल्या व नंतर पाचवी ते नववी त्याच शाळेशी संबधित असलेल्या रुंगठा हायस्कूलमध्ये. तेच सध्याचे न्यू हायस्कूल. इथे असताना शरदला वाचनाचे जे वेड लागले ते पुढे आयुष्यभरासाठी. त्या दिवसांविषयी बोलताना जोशी म्हणत होते,

''मला वाचनाकडे वळवण्यात मोठा सहभाग होता तो तेथील एक शिक्षक अकोलकर ह्यांचा. त्याच सुमारास मी शेजारपाजारच्या इतर मुलांबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेतही जाऊ लागलो. संघात जाण्यामागे फारसं काही वैचारिक कारण होतं असं नाही, पण संध्याकाळचे शाखेतले मैदानी खेळ मला आवडायचे. त्यावेळी टीव्ही वगैरे नव्हते. आमच्या घरासमोरच्या रस्त्यावरून कधी कधी संघाची संचलनं होत. गणवेषातले ते सगळे शिस्तीत चालणारे तरुण बघायला मजा यायची. आम्ही मुलंही मग घरातल्या घरात जमिनीवर चिंचोके मांडून संचलनाचा असा एक खेळ खेळायचो. संघाप्रमाणेच राष्ट्रसेवादलातही आम्ही जायचो. तेही मला आवडायचं. सानेगुरुजी त्यावेळी सेवादलात येत. सुंदर, भावुक गाणी तालासुरात म्हणत व त्यांच्यामागे आम्हालाही मोठ्याने म्हणायला लावत. त्यावेळचे सानेगुरुजी खूप ओजस्वी अशी भाषणंही करत. आमचा ते अगदी आदर्श होते.''

१९४२चा ऑगस्ट महिना. गांधीजींच्या आदेशानुसार *चले जाव* आंदोलन सुरू झाले. प्रभातफेऱ्या वगैरे सुरू झाल्या होत्या. शरद तेव्हा सात-आठ वर्षांचाच होता, त्यामुळे प्रत्यक्ष आंदोलनात तो सहभागी व्हायचा प्रश्नच नव्हता. पण विशेष म्हणजे सेवादलातील अन्य मुलांना होती त्याप्रमाणे त्याला किंवा घरच्यांना एकूण त्या आंदोलनाबद्दल फारशी सहानुभूतीदेखील नव्हती. ह्याचे कारण सांगताना जोशी म्हणाले,

''सरकारी नोकरीत असल्याने वडलांना चळवळीत कुठल्याही प्रकारे सहभागी होणं शक्य नव्हतं. दुसरं म्हणजे, गांधीजी जरी अहिंसेचे पाठीराखे होते, तरी प्रत्यक्षातलं आंदोलन अहिंसक नव्हतं. आंदोलक खूपदा जाळपोळदेखील करत. माझे वडील तेव्हा देवळाली पोस्ट ऑफिसात होते. पत्राची एक पेटी आंदोलकांनी जाळली होती. वडलांनी ती कशीबशी उघडली व आतली अर्धवट जळलेली पत्रं ते घरी घेऊन आले. घरीच मग आम्ही सगळ्यांनी त्यांचं सॉर्टिंग केलं व ती योग्य त्या ठिकाणी रवाना केली. त्यातली अनेक पत्रं महत्त्वाची असू शकतील. अहिंसात्मक मानल्या गेलेल्या चळवळीची ही दुसरीही बाजू होती हे त्या लहान वयातही माझ्या लक्षात आलं. त्या विशिष्ट दिवशी एक अमेरिकन लष्करी अधिकारी आमच्या घरी आला होता. असे अनेक अमेरिकन तेव्हा इतर इंग्रज अधिकाऱ्यांबरोबर भारतात होते. दुसरं महायुद्ध चालू असल्याने. सॉर्टिंगच्या वेळी आम्हाला सापडलेली काही महत्त्वाची पत्रं ताब्यात घेण्यासाठी तो आला होता. तो गेला तेव्हा आईने सगळं घर पाण्याने धुऊन काढलं होतं. तसं आमच्याकडे कोणीच कसली अस्पृश्यता पाळत नव्हतं, पण ह्या गोऱ्या सोजिरामुळे मात्र आपलं घर बाटलं असं तिला वाटलं असावं; किंवा कदाचित त्याच्या बुटाला माती लागलेली असेल व बुटांबरोबर तीही घरात आली असेल.''

'बेचाळीसचे गौडबंगाल' या त्यांनी बऱ्याच वर्षांनी लिहिलेल्या लेखाला (*शेतकरी संघटक*, २१ नोव्हेंबर १९९३) नाशिकमधील त्यावेळच्या अनुभवाची पार्श्वभूमी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाने बेचाळीसच्या आंदोलनाचे सर्व श्रेय आवर्जून स्वतःकडे घेतले आहे; पण प्रत्यक्षात जोशींच्या मते त्या आंदोलनात गांधी-नेहरूंचा विरोध असलेला हिंसाचारही खूप झाला होता. टपाल कचेऱ्या जाळणे, विजेच्या व संदेश वाहतुकीच्या तारा तोडणे, रेल्वेचे रूळ उखडणे, सरकारच्या साऱ्या नाड्याच आखडल्या जातील व सेनेच्या हालचालींमध्ये अडचणी येतील असे संप जागोजाग घडवून आणणे; हे सारे झाले होते. 'बेचाळीसच्या चळवळीतील काँग्रेसची जबाबदारी' या विषयावर लंडन येथे एक श्वेतपत्रिका प्रकाशित करण्यात आली होती व या हिंसाचारातील काँग्रेसच्या सहभागाचे अनेक पुरावे त्यात देण्यात आले होते.

तशी इंग्रज सरकारला बेचाळीसच्या आंदोलनाची फारशी फिकीर नव्हती; त्यांनी ते पोलिसांचे बळ वापरून महिन्याभरातच दाबूनही टाकले होते. त्याचप्रमाणे महायुद्ध चालू असताना व स्वतःचे सगळे सैन्य तिथे गुंतलेले असतानाच भारतात झालेल्या या आंदोलनामुळे ते दबले व म्हणून त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिले, या म्हणण्यातही जोशींच्या मते काही तथ्य नव्हते; कारण अमेरिका युद्धात उतरल्यावर दुसरे महायुद्ध आपण जिंकणार ह्याविषयी इंग्रजांना कधीच शंका नव्हती; पण जर्मनीवर आपण निर्णायक प्रतिहल्ला करण्यापूर्वी रशियावर स्वारी करून गेलेल्या जर्मन फौजांनी साम्यवादी रशियाचे जास्तीत जास्त नुकसान केले, तर ते त्यांना हवेच होते. म्हणूनच केवळ ते जर्मनीवर घणाघाती हल्ला करणे शक्य तितके लांबणीवर टाकत होते. पण रशियाने हिटलरला अनपेक्षितपणे जबरदस्त प्रतिकार केला व शेवटी जर्मनीला रशियातून काढता पाय घ्यावा लागला; उलट्या रशियन फौजा जर्मनीच्या रोखाने पुढे सरकू लागल्या. आता हिटलरच्या पाडावाचे सारे श्रेय रशियालाच मिळेल अशी धास्ती वाटून, शेवटी इंग्रजांनी ६ जून १९४४ रोजी फ्रान्समधल्या नॉर्मंडी इथे सर्वशक्तीनिशी दोस्तांची मोठी फौज अंतिम हल्ल्यासाठी उतरवली. लेखाच्या शेवटी जोशी या साऱ्या निवेदनाला एक अगदी आगळे असे वळण देतात. ते लिहितात,

> १९४४-४५च्या सुमारास भारतातील तरुणांवर जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन यांचा मोठा प्रभाव होता. युद्ध संपले, स्वातंत्र्यदानाची प्रक्रिया सुरू झाली. स्वातंत्र्य जर लवकर आले नाही, तर अहिंसावादी स्वराज्य आंदोलन संपून बेचाळीसच्या जहालांच्या हाती आंदोलनाचे नेतृत्व जाईल, अशी धास्ती नेहरू-पटेल यांनासुद्धा पडली होती. घाईत त्यांनी फाळणीदेखील कबूल करून टाकली. त्याचे एक कारण बेचाळीसच्या क्रांतिकारकांबद्दलची काँग्रेसनेतृत्वाची धास्ती, हे उघड आहे.

काँग्रेसनेत्यांनी फाळणीला शेवटी पाठिंबा का दिला, याची अनेक संभाव्य कारणे पूर्वी वाचनात आली होती; पण चळवळीचे नेतृत्व आपल्या हातून निसटेल व ते जहालांच्या हाती

जाईल, आणि पर्यायाने हातातोंडाशी आलेला स्वातंत्र्योत्तर सत्तेचा आपला घासही हिरावला जाईल ही काँग्रेसनेत्यांची भीती हे एक कारण होते, हे मात्र कधी वाचनात आले नव्हते. एखाद्या घटनेचे इतरांपेक्षा अगदी वेगळे असे विश्लेषण जोशी कसे करू शकायचे याचे हे एक चांगले उदाहरण आहे.

अनंतरावांचे नाशिकनंतरचे पोस्टिंग मुंबई इथे होते. राहायला त्यांनी भाड्याने घर घेतले होते. (६०, लक्ष्मी निवास, अंधेरी पूर्व) त्यावेळी वाजवी भाड्याने मुंबईत सर्वत्र जागा उपलब्ध होत्या. त्यावेळचा पार्ले-अंधेरी परिसर आतासारखा गजबजलेला नव्हता. खूप मोकळी जागा असायची, झाडे मुबलक होती, लोकवस्ती अगदी तुरळक व बरीचशी माणसे एकमेकांना ओळखतही असत. पुढे अनंतरावांची बदली प्रमोशनवर बडोद्याला झाली, पण कुटुंब मात्र त्यांनी याच घरात ठेवले.

इथे जोशींच्या अन्य भावंडांविषयी लिहायला हवे. एकूण ती सहा भावंडे. सगळ्यात मोठ्या निर्मला ऊर्फ नमाताई. यांचा जन्म १९३०चा. म्हणजे शरदहून पाच वर्षांनी मोठ्या. त्यांचे यजमान चंद्रकांत देशपांडे जबलपूरला सरकारच्या दारूगोळा कारखान्यात होते व आयुष्याची पन्नास वर्षे त्या तिथेच राहिल्या. नंतर सिंधूताई वसंतराव जोशी. मुंबईत गोवंडीला राहायच्या. त्या रसायनशास्त्र विषय घेऊन एम्.एस्सी. झाल्या होत्या व टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये नोकरी करत. त्यांचे यजमान वसंतराव टेक्स्टाइल इंजिनिअर होते. आता दोघेही हयात नाहीत. त्यांचे जवळचे वर्गमित्र गोपाळराव परांजपे यांनी दिलेल्या माहितीनुसार वसंतराव मुंबईच्या व्हीजेटीआयमधून पदवी मिळवणाऱ्या पहिल्याच बॅचचे विद्यार्थी; तत्पूर्वी तिथून फक्त डिप्लोमा मिळायची सोय होती. पुढे ते एका कापडगिरणीत मॅनेजिंग डायरेक्टरही बनले. त्यांच्या व सिंधूताईंच्या लग्नात परांजपेंचा बराच पुढाकार होता. तिसरा क्रमांक मनोहर ऊर्फ बाळासाहेब जोशी यांचा. त्यांनी आधी बी.एस्सी. केले व नंतर इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा घेतला. पुढे त्यांनी दिल्लीजवळ फरीदाबाद येथे इलेक्ट्रिक स्विचेस बनवायचा कारखाना सुरू केला. २०१३ मध्ये ते वारले. चौथे भावंड म्हणजे शरद. पाचवे प्रभाकर ऊर्फ येशू. ते मेकॅनिकल इंजिनिअर होते व पुढे जर्मनीत जाऊन त्यांनी उच्चशिक्षणही घेतले होते. हुबळी, अहमदाबाद, मुंबई, पुणे वगैरे ठिकाणी नोकरी करून शेवटी त्यांनी कर्नाटकात स्वतःचा कारखानाही काढला होता. पुढे वृद्धापकाळी सेवानिवृत्ती घेऊन शेवटची दोन वर्षे ते सपत्नीक नाशिकला राहत होते. १ नोव्हेंबर २०१६ मध्ये ते निवर्तले. सहावे व सर्वांत धाकटे भावंड म्हणजे मधुकर जोशी. त्यांनीही टेक्स्टाइल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा घेतला होता. ते नोकरीसाठी अमेरिकेत गेले व नंतर तिथेच स्थायिक झाले; आता हयात नाहीत. आता फक्त निर्मला ऊर्फ नमाताई हयात आहेत.

वडलांची नोकरी बदलीची असल्याने या सर्वच सहा भावंडांना मुख्यतः माईंनी वाढवले. आईचे संगीतप्रेम पुढे सर्व सहा मुलांमधेही आले. त्यांच्यातला तो एक समान धागा. शाळेत असतानाच नमा व सिंधू गाणे शिकल्या, तर बाळ तबला शिकला. सर्वांत मोठ्या नमाताई

जबलपूरला हार्मोनियम व तबल्याचे क्लासेसदेखील घ्यायच्या, तर त्यानंतरच्या मुंबईत स्थायिक झालेल्या सिंधूताई व्हायोलिन शिकवायच्या. शरद जोशींनी संगीतात प्रावीण्य असे मिळवले नाही; पण त्यांची गाण्यांची आवड कायम राहिली; मोठेपणीही फावल्या वेळात सैगल व मुकेश यांची अनेक गाणी ते गुणगुणत असत. विशेषतः दर्दभरी. प्रवासात गाण्याच्या भेंड्या सुरू झाल्या, तर त्यातही उत्साहाने भाग घेत. त्यांना कविता आवडत आणि त्या मोठ्याने चालीवर म्हणायलाही आवडे. ही आईकडूनच आलेली आवड.

शाळेची दहावी व अकरावी (त्यावेळचे मॅट्रिक) ही शेवटची दोन वर्षे शरदने जवळच असलेल्या विलेपार्ले पूर्व येथील पार्ले टिळक विद्यालयातून केली. इथे काही विषय इंग्रजी माध्यमातून होते.

शाळेत शिकत असतानाच मुंबई सरकारतर्फे घेण्यात येणाऱ्या चित्रकलेच्या एलेमेंटरी व इंटरमिजिएट या दोन परीक्षाही शरदने १९४७ व १९४८ साली यशस्वीपणे दिल्या होत्या. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या हिंदीच्या, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संस्कृतच्या व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मराठीच्या परीक्षाही तो उत्तीर्ण झाला होता.

शाळेत असताना शरदने 'मौजे अकरावी' नावाचे एक हस्तलिखित काही दिवस चालवले होते. पेंढारकर नावाचे एक कर्तबगार शिक्षक तेव्हा शाळेचे मुख्याध्यापक होते. त्यांच्याशी कशावरून तरी शरदचा एकदा वाद झाला. त्यावेळी ह्या हस्तलिखितातून त्याने शिक्षकांवर टीका केली होती. ह्यावर मुख्याध्यापकांनी त्याला आपल्या कार्यालयात बोलावून घेतले व त्याची चांगलीच हजेरी घेतली. शिवाय, त्या हस्तलिखितावर बंदीही घातली. शरद खूप नाराज झाला, पण त्याचे काही चालले नाही. ह्या सगळ्या घडामोडी होत असताना आपल्या अभ्यासाकडे मात्र शरदने दुर्लक्ष केले नव्हते. ६ जून १९५१ रोजी अकरावीच्या परीक्षेचा निकाल लागला. ८००पैकी ५६२, म्हणजे सत्तर टक्के गुण मिळवून तो उत्तीर्ण झाला. त्याकाळी आजच्याइतकी गुणांची खैरात केली जात नसे.

शरद जोशी आता सोळा वर्षांचे झाले होते. हा आयुष्यातला एक महत्त्वाचा टप्पा. ह्या टप्प्यावर घ्यायचा सर्वांत मोठा निर्णय म्हणजे अकरावीनंतर काय करायचे. इतर मित्रांप्रमाणे सायन्स वा आर्ट्सला न जाता जोशींनी मुंबईतील सिडनम (Sydenham, सिडनेहम हा उच्चारही आपल्याकडे रूढ आहे) ह्या वाणिज्य (कॉमर्स) कॉलेजात प्रवेश घेतला.

त्यामागेही रोचक पार्श्वभूमी आहे. खरे तर जोशी कॉमर्सला जातील असे कोणालाच कधी वाटले नव्हते; त्यांना स्वतःलाही नाही. शाळेत असताना संस्कृत हा त्यांचा आवडता विषय होता. असंख्य श्लोक, स्तोत्रे, सुभाषिते; रघुवंश-मेघदूतसारखी काव्येही त्यांना तोंडपाठ होती. भावी आयुष्यात लिहिलेल्या त्यांच्या अनेक उत्तम लेखांची शीर्षके संस्कृत आहेत. उदाहरणार्थ, *इति एकाध्याय, मुहुर्तम् ज्वलितम् श्रेयम्* वगैरे. "लहानपणी मला कधी अस्वस्थ वाटू लागलं, की मी गीता म्हणायचो," असे ते एकदा म्हणाले होते. त्या वयात गीतेचा अर्थ

कितपत उलगडत होता, हा भाग वेगळा; पण बरीचशी भगवद्‌गीता त्यांना तोंडपाठ होती हे नक्की. गीताधर्म मंडळ, पुणे, या संस्थेने घेतलेली *गीतासार* परीक्षा ते डिसेंबर १९४८मध्ये प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले होते. सुदैवाने संस्कृतसाठी त्यांना सतत चांगले शिक्षकदेखील लाभले. नाशिकच्या शाळेतील गुरुजी विषय सोपा करून शिकवत. पाठांतराऐवजी प्रत्यक्ष बोलण्यावर त्यांचा भर होता. वर्गात ते सर्वांना संस्कृतातच बोलायला लावत. ही आवड मुंबईला आल्यावर अधिकच वाढली. स्वतः मुख्याध्यापक पेंढारकर संस्कृतच शिकवायचे.

आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे नारायण अभ्यंकर नावाचे शिक्षक. अभ्यंकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. संस्कृत, गणित, संगीत व कुंडली ज्योतिष ह्या चारही विभिन्न क्षेत्रांत त्यांनी असामान्य प्रावीण्य मिळवले होते. लोकमान्य टिळकांच्या प्रभावामुळे इतर उत्तम नोकऱ्या मिळत असूनही त्यांनी शिक्षकाचा पेशा पत्करला होता. गिरगावच्या विल्सन स्कूलमध्ये ते संस्कृत व गणित शिकवत. राहायचे शिवाजी पार्कला. दिसायला ते काहीसे जे. कृष्णमूर्तींसारखे दिसत. मूळचे ते कोल्हापूरचे व म्हणून अनंतरावांच्या लहानपणापासून ओळखीचे. ते भविष्य सांगत व ते बहुतेकदा खरे ठरते, असा त्यांचा लौकिक होता. अनंतराव अनेकदा त्यांच्याकडे पत्रिका दाखवायला, मुहूर्त काढायला वगैरे जात असत. वडलांच्या सांगण्यानुसार जोशी अभ्यंकरांकडे संस्कृतच्या शिकवणीसाठी जाऊ लागले. मोठे बंधू बाळासाहेबदेखील त्यांच्याकडे यायचे; पण ते गणिताच्या शिकवणीसाठी. त्यांच्या घरी जेव्हा जोशी प्रथम गेले, तेव्हा त्यांची जणू परीक्षा घेण्यासाठी अभ्यंकरांनी त्यांना एका इंग्लिश परिच्छेदाचे संस्कृतात भाषांतर करायला सांगितले व ते जरा वेळासाठी म्हणून घराबाहेर गेले. ते परत आले तेव्हा जोशींचे भाषांतर पूर्ण झाले होते. विशेष म्हणजे गद्यापेक्षा पद्यातले संस्कृत अधिक गोड वाटते, म्हणून जोशींनी त्या उताऱ्याचा चक्क पद्यात अनुवाद केला होता. अभ्यंकर खूष झाले व जोशींना त्यांनी आपला शिष्य म्हणून स्वीकारले.

आपल्या शिष्यांच्या जीवनात अभ्यंकर अगदी समरस होऊन जात. एकदा त्यांनी बाळासाहेबांना भूमितीच्या एका पुस्तकातील एक अवघड प्रमेय घातले होते व आश्चर्य म्हणजे ते दोघांनाही तासभर खटपट करूनही सोडवता येईना. दिवसभर अभ्यंकर अगदी बैचेन होते. संध्याकाळी अचानक त्यांना उत्तर सापडले. त्यांना इतका आनंद झाला, की लगेच त्यांनी आपल्या घरून लांब अंधेरीला जोशींच्या घरी धाव घेतली व बाळासाहेबांना ते प्रमेय कसे सोडवायचे ते सांगितले! जोशींना अभ्यंकरांविषयी फार आदर वाटायचा. अभ्यंकरांच्या शिकवणीचा शालेय अभ्यासातही फायदा होतच होता. त्यामुळे जेव्हा 'अकरावीनंतर पुढे काय करायचं?' ह्याची चर्चा मुलांमध्ये सुरू झाली तेव्हा जोशी संस्कृतच घेणार व पुढे संस्कृतचे प्राध्यापक होणार हे साऱ्यांनी गृहीतच धरले होते.

मित्रांमधल्या त्या चर्चेच्या संदर्भात पुढे जोशींनी लिहिले आहे,

> आकंठ जेवून तृप्त झालेल्याला रस्त्याकाठी बसलेल्या माणसाच्या पोटातील भुकेची जाणीव नसावी तसा, काहीशा आढ्यतेने मी मित्रांना म्हणालो, 'यात एवढा विचार

करण्यासारखं काय आहे? कोणताही शिक्षणक्रम घेतला तरी फरक काहीच पडत नाही.' चिंतामणराव देशमुख, त्यावेळचे आमचे दुसरे चरित्रनायक म्हणत, आवडणारी गोष्ट कोणीही करेल; पण करावी लागणारी गोष्ट आवडीने करणे यात पुरुषार्थ आहे. आपल्या लोकोत्तरतेच्या धुंदीत, आपल्या हातानेच आपले आयुष्य कडू करून घेण्यात गोडी मानणारे कितीतरी खांडेकरी नायक डोक्यात बिळे करून बसले होते.

(*अंगारमळा,* पृष्ठ ५१)

जोशींना त्यांचा एक जवळचा मित्र म्हणाला, ''तुझ्या बाबतीत काही प्रश्नच नाही रे. तू संस्कृत घेणार हे आम्हाला ठाऊकच आहे.''

खरे तर ह्यात जोशींनी नाराज व्हावे असे काहीच नव्हते, कारण शेवटी तो त्यांचा एक जवळचा मित्रच होता; पण कुठल्यातरी एका सर्वसामान्य विद्यार्थ्याने आपण भविष्यात काय करणार हे ठामपणे सांगावे हे त्यांना अजिबात आवडले नाही. काहीशा रागाने व त्याचे म्हणणे खोडून काढत ''मी कॉमर्सला जाऊन अर्थशास्त्राचा अभ्यास करणार,'' असे जोशींनी जाहीर केले.

घरी आल्यावर जोशींनी आपला निर्णय घरच्यांनाही सांगितला. सगळ्यांना आश्चर्य वाटले. शरदने प्राध्यापक बनावे आणि ते करायचे नसेल, तर इतर सगळ्या भावांप्रमाणे सायन्सला तरी जावे व इंजिनिअर बनावे असे घरच्यांचे म्हणणे पडले. कॉमर्सला जाऊन हा मुलगा पुढे करणार काय, हाच घरच्यांना प्रश्न पडला होता. स्वतः जोशींनाही आपण असे करणे कदाचित चुकीचे ठरेल हे विचारांती जाणवलेदेखील; पण एकदा सगळ्यांसमोर आपला निर्णय जाहीर केल्यानंतर आता तो फिरवणे त्यांना कमीपणाचे वाटले. जिद्दीने त्यांनी कॉमर्सला प्रवेश घेतला. तोही पुन्हा सिडनम कॉलेजात.

त्याकाळी महाराष्ट्रात अगदी थोडी वाणिज्य महाविद्यालये होती. मुंबईत बोरीबंदरचे सिडनम व माटुंग्याचे पोद्दार होते. बहुतेक मराठी विद्यार्थी पोद्दार कॉलेजात जात. तिथले एकूण वातावरणही मध्यमवर्गीय होते. ह्याउलट सिडनममध्ये उच्चभ्रू विद्यार्थ्यांचा भरणा होता. पारशी, गुजराती, मारवाडी मुले तिथे बहुसंख्य होती. साहजिकच जोशी पोद्दारमध्ये अधिक सहजगत्या सामावून जाऊ शकले असते. घरापासून ते तुलनेने जवळही होते. मोठे बंधू बाळासाहेबही पोद्दारलगतच असलेल्या रुइयामध्ये सायन्सला होते. पण का कोण जाणे, नेहमी इतरांपेक्षा वेगळे काहीतरी करायचे, त्यांना अवघड वाटणारी वाटच आपण स्वीकारायची असा जणू त्यांनी निश्चयच केला होता!

१९१३ साली स्थापन झालेले सिडनम हे केवळ मुंबईतच नव्हे तर संपूर्ण भारतात, किंबहुना परदेशातही नामांकित होते. आशिया खंडातील हे सर्वांत पहिले वाणिज्य महाविद्यालय. त्यावर्षी, म्हणजे १९५१ साली, महाविद्यालयाच्या वार्षिकदिनी प्रमुख पाहुणे म्हणून रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर (व नंतरचे केंद्रीय अर्थमंत्री) चिंतामणराव ऊर्फ

सी. डी. देशमुख आले होते. आपल्या भाषणात ते म्हणाले होते, ''देशात जमा होणाऱ्या एकूण आयकरापैकी २५% आयकर हा सिडनममधील विद्यार्थ्यांच्या पालकांकडून जमा होतो.'' आपण ज्या कॉलेजात प्रवेश घेतला आहे, ते किती प्रतिष्ठित आहे ह्याची त्या क्षणी जोशींना कल्पना आली. अनेक बड्या उद्योगपतींची मुले इथेच शिकायला येत. कांतीकुमार पोद्दार तर जोशींच्या वर्गातच होते. बिर्ला उद्योगसमूहाचे कुमारमंगलम बिर्ला, एच.डी.एफ.सी.चे दीपक पारेख, लंडनमधील ऐतिहासिक इस्ट इंडिया कंपनी ज्यांनी मध्यंतरी विकत घेतली ते संजीव मेहता वगैरे उद्योगक्षेत्रातील आजची अनेक बडी मंडळी एकेकाळी ह्याच कॉलेजात शिकलेली आहेत. अनेक मुले स्वतःच्या मोटारीतून कॉलेजात येत. पदवीनंतर पुढे काय हा त्यांच्यापुढे प्रश्नच नसायचा. आजवर ज्या मराठमोळ्या वातावरणात जोशी वाढले होते त्यापेक्षा इथले वातावरण अगदी वेगळे होते. इथे मराठी विद्यार्थ्याला 'घाटी' म्हणून हिणवले जाई. कपडे, बोलणे, वागणे ह्या सर्वच बाबतींत मराठी विद्यार्थी मागासलेला दिसायचा. वर्गात मराठी मुले जेमतेम दहाबारा होती. सुरुवातीला हे सगळे जोशींना जडच गेले, पण हळूहळू या अवघडलेपणावर त्यांनी मात केली.

इथले प्राध्यापक कॉलेजच्या लौकिकाला शोभेल असेच नावाजलेले होते. त्यातील ग. र. ऊर्फ जी. आर. दीक्षित यांच्याशी जोशींचा पुढेही बराच संबंध आला. पण जोशींवर सर्वाधिक प्रभाव पडला तो कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुमंत ऊर्फ एस. के. मुरंजन यांचा. एक नाणेतज्ज्ञ म्हणून ते विख्यात होते. नुकतेच अमेरिकेहून परतले होते. त्यांनी नाणेव्यवस्थेवर दोन उत्तम पुस्तके लिहिली होती व विशेष म्हणजे दोन्ही मराठीत लिहिली होती. ती इंग्रजीत लिहायला हवी होती असे म्हणणाऱ्या टीकाकारांना उद्देशून ते म्हणत, ''ज्याला या विषयाचा खोलात जाऊन अभ्यास करायचा आहे आणि ह्या विषयावर मला काय म्हणायचे आहे हे जाणून घ्यायचे आहे, त्याला त्यासाठी मराठी शिकायला काय हरकत आहे?'' ह्यापूर्वी बरीच वर्षे सुप्रसिद्ध इतिहासकार राजवाडे यांनी असेच फक्त मराठीतच लेखन केले होते व त्याच्या समर्थनार्थ असेच काहीसे उत्तर दिले होते. स्वतः जोशींना पुढे एका-दोघांनी 'मराठीत लिहिण्याऐवजी तुम्ही इंग्रजीत लिहा, म्हणजे सगळीकडे पोचाल' अशी सूचना केली होती, तेव्हा त्यांनीही असेच उत्तर दिले होते.

प्राचार्यांबद्दल जोशी लिहितात,

> बस्स! या एकाच उत्तरावर आम्ही लट्टू होतो. त्या एकाच वाक्याने पदोपदी जाणवणारे, टोचणारे मराठी माणसाचे दैन्य धुतले गेल्यासारखे वाटत होते. मुरंजन यांनी आम्हाला बँकिंगमधले काही शिकवल्याचे मला आठवत नाही. पण त्यांनी कान्टशी ओळख करून दिली. 'I think, therefore, I am.' या कान्टच्या उक्तीतील सगळा उल्हास आणि आवेग आम्ही मुरंजनांच्या चेहऱ्यावर अनुभवला.
> (*अंगारमळा,* पृष्ठ ५९)

गंगाधर गाडगीळ यांनी आपल्या *एका मुंगीचे महाभारत* ह्या आत्मकथनात डॉ. मुरंजन

यांचे सुरेख व्यक्तिचित्र रेखाटले आहे. भारताच्या नियोजन मंडळाने नेमलेल्या अर्थशास्त्र्यांच्या सल्लागार मंडळात डॉ. मुरंजन यांचाही समावेश होता. प्राचार्यांनी आपल्याला मदत करण्यासाठी एक रिसर्च ग्रुप स्थापन केला होता व त्यात घेतल्या गेलेल्या दोन विद्यार्थ्यांमधले एक जोशी होते. १९५५-५६ सालात 'बेरोजगारीचा अंदाज' (एस्टिमेट ऑफ अनएम्प्लॉयमेंट) ह्या विषयाच्या नियोजन मंडळासाठी केलेल्या अभ्यासासाठी जोशींनी बरेच संख्याशास्त्रीय काम केले होते व त्याचे प्राचार्यांनी कौतुक केले होते.

सुप्रसिद्ध कवी व कादंबरीकार पु. शि. रेगे त्यांना वाहतुकीचे अर्थशास्त्र शिकवायचे. मुंबईतील साहित्यिक वर्तुळात त्यावेळी रेगे यांना मानाचे स्थान होते. पण तरीही साहित्याची खूप आवड असलेल्या जोशींनी त्यांच्याविषयी काही लिहिलेले नाही. मराठी साहित्यापासून जोशी त्यावेळी बरेच दूर गेले होते, असा याचा अर्थ लावायचा का? रेगे यांचा जोशींनी निदान नामोल्लेखतरी केला आहे, पण गंगाधर गाडगीळ ह्यांच्या बाबतीत तसा नामोल्लेखही झालेला नाही. गाडगीळ त्यांना अर्थशास्त्र शिकवत असत. ते 'मराठी नवकथेचे प्रवर्तक' म्हणून त्यावेळी ऐन भरात होते. विशेष म्हणजे पुढे जोशी यांच्याचप्रमाणे गाडगीळांनीही मुक्त अर्थव्यवस्थेचा जोरदार पुरस्कार केला होता; त्यांच्यात तो समान असा एक वैचारिक दुवाही होता. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे असे असूनही जोशींच्या लेखनात गाडगीळांचा उल्लेख कुठेच आढळत नाही. किंबहुना पुढे एकदा मी त्यांच्यापाशी गाडगीळांबद्दल विचारणा केली असताना त्यांची एकही आठवण जोशी सांगू शकले नाहीत. खरेतर नंतरच्या आयुष्यात एक-दोनदा हे दोघे एकाच व्यासपीठावर वक्ते म्हणून हजरही होते, पण त्यातलेही काही जोशींना त्यावेळीतरी आठवत नव्हते.

इथल्या विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व जोशींपेक्षा कसे वेगळे होते त्याची ही एक झलक. केंद्रीय अर्थमंत्री टी. टी. कृष्णम्माचारी यांच्यावर आयुर्विमा महामंडळाचे पैसे एका भ्रष्ट उद्योगात गुंतवून स्वतः कमिशन मिळवल्याचा एक गंभीर आरोप त्यावेळी केला गेला होता व त्याची चर्चा एकदा कॉलेजात सुरू होती. त्यावेळी जोशी म्हणाले, ''सुदैवाने आपली न्याययंत्रणातरी अजून प्रामाणिक राहिली आहे. त्यामुळे गुन्हेगारांना शासन होऊ शकतं.'' त्यावर एक उद्योगपतिपुत्र फटकन म्हणाला, ''घाटी लोकांची भाषा सोडून दे! कोर्टाचा निर्णय आपल्या बाजूने फिरवायचा असेल, तर कोणाला काय काय पुरवावं लागतं ते मला विचार!'' आणि हे बोलताना त्याने असे काही डोळे मिचकावले, की हा करावा लागणारा पुरवठा वस्तूंचा नाही हे उघड व्हावे!

गर्भश्रीमंत विद्यार्थ्यांप्रमाणे इथे काही अतिशय बुद्धिमान विद्यार्थीदेखील होते. त्यांतील एक म्हणजे जगदीश भगवती. भगवती जोशींच्या एक वर्ष पुढे होते. दोघेही संस्कृतप्रेमी व योगायोगाने दोघेही अभ्यंकरांचे विद्यार्थी. तिथेच त्यांचा प्रथम परिचय झाला होता. अर्थात दोघांमधले साम्य बहुधा इथेच संपत होते. भगवतींचे वडील सुप्रीम कोर्टात एक नामांकित वकील होते. रोज सकाळी चिरंजीवांना कॉलेजात सोडायला एक मोटार येई व संध्याकाळी

दुसऱ्या एका मोटारीतून ते घरी परतत. सगळा वेळ कॉलेज आणि ग्रंथालय ह्यातच घालवत. सगळीकडे त्यांचा दबदबा असे. एसएससीला ते संपूर्ण बोर्डात काही लाख विद्यार्थ्यांमध्ये पहिले आले होते. भगवती नंतर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये मास्टर्स करायला गेले. तिथले शिक्षण पूर्ण करून अमेरिकेत गेले. आज ते अर्थशास्त्रासाठी जगप्रसिद्ध अशा कोलंबिया विद्यापीठात शिकवतात. बहुतेक सर्व बड्या आंतरराष्ट्रीय संस्थांचे सल्लागार म्हणून त्यांनी काम केले आहे व भारत सरकारनेही २००० साली पद्मविभूषण हा सन्मान देऊन त्यांचा गौरव केला आहे. आज ना उद्या त्यांना नोबेल पुरस्कारही मिळेल असे म्हटले जाते. त्यांचे एक बंधू प्रफुल्लचंद्र ऊर्फ पी. एन. भगवती हेही वडलांप्रमाणेच नामांकित वकील होते व पुढे भारताचे सरन्यायाधीशही बनले. जनहितयाचिका (Public Interest Litigation) हा प्रकार सुरू करण्याचे श्रेय त्यांचेच. त्यांनाही पद्मविभूषण मिळाले आहे. दोन भावांनी पद्मविभूषण मिळवायचे हे बहुधा एकमेव उदाहरण असावे. जगदीश भगवती हा त्या काळात जोशी यांचा आदर्श होता.

रोज सकाळी शक्य तितक्या लवकर अंधेरीतील आपल्या घरून जोशी निघत व आगगाडीने मरीन लाइन्सला येत. तिथून पुढे चालत बोरीबंदरला कॉलेजात. एकदा कॉलेजात आले की दिवसभर तिथेच. आधी लेक्चर्स आणि ती संपल्यावर मग ग्रंथालय. सगळा अभ्यास, सगळे वाचन तिथेच. घरी रात्री उशिरा, फक्त झोपायला. नाशिकला असताना त्यांना क्रिकेट खेळायची गोडी लागली होती; पण इथे क्रिकेट अगदी पूर्ण बंद. इतर मित्र असेही त्यांना इथे फारसे नव्हते; त्यावेळी तरी ते बऱ्यापैकी एकांतप्रिय होते. इतर मुलांप्रमाणे त्यांच्याकडे चित्रपट बघायला, हॉटेलात उडवायला पैसेही नसत. घरून जो काही चार-पाच रुपये पॉकेटमनी मिळायचा तो आठवड्याहून जास्त टिकायचा नाही. त्यामुळे सगळा वेळ फक्त अभ्यास एके अभ्यास. त्यांची पहिली चार वर्षे, म्हणजे १९५५ साली ते बी.कॉम. होईपर्यंत, सिडनम कॉलेज बोरीबंदरला व्हीटी स्टेशनसमोर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या आवारातच होते, पण त्यानंतर ते स्वतःच्या आधुनिक इमारतीत, चर्चगेट स्टेशनलगतच्या बी रोडवर गेले. ह्या इमारतीतील सर्वच सोयी अधिक प्रशस्त होत्या. विशेषतः ग्रंथालय. अर्थशास्त्राशी संबंधित जगातील बहुतेक सारी महत्त्वाची पुस्तके कॉलेजच्या ग्रंथालयात होती, जगभरची आर्थिक नियतकालिकेदेखील येत. जमेल तेवढे सगळे जोशी बारकाईने वाचून काढत, टिपणे काढत.

१९५४मध्ये *दि न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्युन* या जगप्रसिद्ध अमेरिकन वृत्तपत्राने आयोजित केलेल्या एका देशव्यापी निबंधस्पर्धेत जोशींनी भाग घेतला होता. मुंबई विद्यापीठाकडे आलेल्या सर्व निबंधांत तो सर्वोत्कृष्ट ठरल्याने पुढे तो दिल्लीला शिक्षण मंत्रालयाकडे पाठवला गेला. कारण हेच मंत्रालय स्पर्धेचे व्यवस्थापन करत होते. ही स्पर्धा खूप प्रतिष्ठेची होती व विजेत्याला त्याकाळी अप्रूप असलेल्या अमेरिकेलाही पाठवले जाणार होते. देशभरातील वेगवेगळ्या विद्यापीठांकडून सादर केल्या गेलेल्या निबंधांची छाननी झाल्यावर जोशींचा अंतिम फेरीत समावेश केला गेला. त्यासाठी द्यायच्या एका चाचणीसाठी व प्रत्यक्ष मुलाखतीसाठी

त्यांना दिल्लीला यायचे आमंत्रण दिले गेले. जायचे-यायचे इंटर क्लासचे भाडेही मिळणार होते. येताना अमेरिकेला जाण्यासाठी त्याकाळी आवश्यक असलेले वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्रही घेऊन यावे असे आमंत्रणपत्रात लिहिले होते. देशभरातील अगदी मूठभर विद्यार्थ्यांनाच ही संधी मिळाली होती. जोशींना खूप आनंद झाला, कारण ह्या निबंधासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली होती. सगळी पूर्वतयारी करून ते उत्साहाने दिल्लीला गेले; त्या काळी दिल्लीही खूप दूरची समजली जाई व दिल्लीला जाणारे घरातले ते पहिलेच होते. सगळ्यांनी कौतुकाने त्यांना निरोप दिला. पण दुर्दैवाने तेथील चाचणीत व मुलाखतीत त्यांची पुरेशी छाप पडली नाही. दिल्लीतील सेंट स्टीफन कॉलेजातील एका विद्यार्थ्याची अंतिम फेरीत निवड झाली. जोशी अगदी निराश झाले. आपल्या हातातोंडाशी आलेला यशाचा घास शेवटच्या क्षणी गेला असे त्यांना वाटले; शिवाय, घरच्यांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही याचा अपमानही वाटलाच.

पुढे १९५६ मध्ये मुंबई विद्यापीठाने घेतलेल्या एका महत्त्वाच्या शोधनिबंधस्पर्धेत त्यांनी भाग घेतला. त्यासाठी कसून मेहनत केली व एक बराच मोठा शोधनिबंध लिहिला. शीर्षक होते, *River Valley Projects and their Role in the Agricultural Development of India* (नदी खोरे प्रकल्प आणि भारतीय शेतीच्या विकासातील त्यांचे योगदान). त्याला मात्र यश मिळाले. होमजी कुरसेटजी डॅडी यांच्या नावे असलेला प्रथम पुरस्कार मिळाला. ह्या पुरस्काराची रक्कम ३०० रुपये होती; त्या काळाच्या मानाने बरीच जास्त. जोशींना खूप आनंद झाला. निबंधलेखनाच्या निमित्ताने वेगवेगळ्या खोरे प्रकल्पांचा देशातील शेतकऱ्यांना प्रत्यक्षात किती आर्थिक लाभ झाला याचा त्यांनी संख्याशास्त्रीय अभ्यास केला. या अभ्यासात खडकवासला वॉटर अँड पॉवर रीसर्च सेंटरचे अच्युतराव आपटे, त्यावेळी पुण्यात असलेले सुपरिंटेंडिंग इंजिनिअर एन. एस. जोशी आणि साखरवाडीत इस्टेट मॅनेजर असलेले त्यांच्या मोठ्या बहिणीचे सासरे श्रीधर गोपाळ देशपांडे यांची खूप मदत झाली होती. मोठी धरणे उभारताना धरणक्षेत्रातील पावसाचे जास्तीत जास्त प्रमाण नियोजनासाठी पकडले जाते, दरवर्षी तसा पाऊस पडेल व धरण पूर्ण भरेल असे गृहीत धरून प्रस्तावित बागायती क्षेत्राचे अतिशयोक्त आकडे कागदोपत्री दाखवले जातात; प्रत्यक्षात मात्र ते चुकीचेच ठरतात; ह्या मोठ्या प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांचा फारसा आर्थिक लाभ झालेला नाही; उलट जे शेतकरी त्या पाण्यावर शेती करत राहिले त्यांच्यापेक्षा जे विस्थापित होऊन मुंबईसारख्या मोठ्या शहरात येऊन स्थायिक झाले व अन्य काही व्यवसाय करू लागले त्यांची आर्थिक स्थिती अधिक सुधारली असा त्यांचा निष्कर्ष होता.

पुढे ज्या शेतीक्षेत्रात त्यांनी मोठे योगदान दिले त्या क्षेत्रातील त्यांचे हे पहिले वैचारिक पदार्पण होते. इतर कुठल्याही शेतीविषयक सुधारणेपेक्षा, शेतीमालाला चांगला भाव मिळणे हे शेतकऱ्यांसाठी अधिक गरजेचे आहे, ह्या त्यांनी भविष्यात केलेल्या मांडणीची सुरुवातही कुठेतरी ह्या अभ्यासात होती असेही म्हणता येईल. व्यक्तिशः जोशींना हा अभ्यास महत्त्वाचा वाटला होता. १ मार्च १९७६ रोजी स्वित्झर्लंडला असताना जोशींनी आपला एक बायोडेटा

तयार केला होता व त्यात ह्या निबंधाचा त्यांनी उल्लेख केला आहे.

या निबंधस्पर्धेतील जोशींच्या यशालाही एक गालबोट लागले होते. विद्यापीठाचे कामकाज कसे चालायचे ह्याचे निदर्शक अशी ह्या स्पर्धेबाबत घडलेली ती घटना इथे नमूद करायला हरकत नाही. पूर्वी जाहीर झालेले पारितोषिकाचे तीनशे रुपये प्रत्यक्षात जोशींच्या हाती पडले नव्हते. नेमकी काय अडचण होती ते कळायला आज काही मार्ग नाही, पण जोशींच्या कागदपत्रांत मुंबई विद्यापीठाच्या रजिस्ट्रारच्या सहीचे एक पत्र म्हात्रे यांना सापडले. त्या पत्रात 'जोशी यांनी पुरस्काराच्या रकमेएवढी, म्हणजे तीनशे रुपयांची, पुस्तके खरेदी करावीत' असे लिहिले आहे. त्यातही तीन अटी आहेत! एक म्हणजे, ही पुस्तके एकाच दुकानातून व एकाच वेळी खरेदी केलेली असावीत; दोन, त्यांच्यावर विद्यापीठाचे नामांकन करण्यासाठी ('for stamping the University Coat of Arms in gold') ती सर्व पुस्तके पुस्तकविक्रेत्याने आपल्या बिलासकट विद्यापीठाकडे पाठवावीत; आणि तीन, त्या नामांकनाचा खर्च म्हणून प्रत्येक पुस्तकामागे सहा आणे विद्यापीठ कापेल व तीनशे रुपयांतून ती रक्कम वजा करून उर्वरित रकमेच्या बिलाचे पैसे विद्यापीठाकडून दिले जातील! हा निबंध प्रकाशित करण्यासाठी विद्यापीठाने अनुमती द्यावी अशी विनंती जोशींनी तीन वर्षांपूर्वी विद्यापीठाकडे केली होती. उपरोक्त पत्रातच त्या अर्जाला उद्देशून रजिस्ट्रारसाहेबांनी कळवले आहे की, ''तुमची विनंती विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांसमोर विचारार्थ ठेवली जाईल व त्यांचा निर्णय जेव्हा होईल तेव्हा तुम्हाला कळवण्यात येईल.''

हे पत्र जोशींना मिळाले तेव्हा ते पोस्टखात्यात नोकरीलाही लागले होते व बडोदा येथे कार्यरत होते! प्रत्यक्षात त्या रकमेची पुस्तके जोशींनी घेतली का, त्यांचे अपेक्षित तेवढे पैसे मिळाले का याची कुठेच नोंद नाही. दुर्दैवाने आज त्या निबंधाचीही प्रत उपलब्ध नाही. सर्वांत आश्चर्यजनक भाग म्हणजे या पत्रावरची तारीख आहे, २३ जानेवारी, १९५९. म्हणजेच निबंधस्पर्धेचा निकाल लागला त्याला तब्बल तीन वर्षे उलटून गेल्यानंतरची! या अविश्वसनीय विलंबाचे कारण काय असू शकेल? नोकरशाहीतील दिरंगाई की आणखी काही?

जोशींच्या कॉलेजजीवनातील एका वेधक प्रसंगाची माहिती जी. आर. दीक्षित या त्यांच्या प्राध्यापकांनी त्यांना १९ जानेवारी २००२ रोजी लिहिलेल्या एका पत्रात वाचायला मिळाली. प्रा. दीक्षित पुढे स्टेट बँकेत खूप वरच्या पदावर गेले व बँकिंग क्षेत्रातले मोठे तज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध झाले. हे सहा पानी स्वहस्ते लिहिलेले पत्र अतिशय वाचनीय असून जोशींचे कागदपत्र चाळताना ते मिळाले. त्यात प्रा. दीक्षित लिहितात,

> सिडनम कॉलेजच्या दिवसांत तुमचं माझं जे काही बोलणं होत असे, त्याचे तुकडे तुकडे मला अजून आठवतात. त्याच्या गोड आठवणी मनात रेंगाळतात. अशीच एक आठवण. तुम्ही आणि मी चायनीज कॉन्स्युलेटमध्ये हो चि मिन्हला भेटायला गेलो होतो त्याची. मुंबईतल्या काही तरुण प्राध्यापकांना भेटायची इच्छा हो चि

> मिन्हने प्रदर्शित केली होती. आम्हा सगळ्यांना बोलावणं केलेलं होतं पण प्रा. रणदिवे, प्रा. गाडगीळ वगैरे कोणी आले नाहीत. त्यांना असा सल्ला दिला गेला होता की 'तुम्ही जर हो चि मिन्हला भेटलात, तर सरकारदप्तरी त्याची नोंद होईल व मग तुम्हाला अमेरिका किंवा इंग्लंडला जायची स्कॉलरशिप मिळणं अडचणीचं होईल.' मला अमेरिका किंवा इंग्लंड या देशांच्या वारीचं इतकं कौतुक नव्हतं. मी मनाशी म्हटलं, की हो चि मिन्हसारखा जगविख्यात माणूस आपल्याला भेटू इच्छितो आहे, तेव्हा ही संघी काही आपण सोडायची नाही. त्याची ती मूर्ती व राहणी पाहून मला खूपच बरं वाटलं. बोटीवरच्या वेटरचा ड्रेसच त्याने घातला होता व बोलताना तो म्हणाला, की अशा कपड्यांचाही फक्त एकच जोड त्याच्याकडे आहे. तो असंही म्हणाला, 'आमचा देश गरीब आहे. त्यामुळे आमच्या हातात राजसत्ता जरी असली, तरी आम्ही गरिबीतच राहिलं पाहिजे. तसं राहिलो, तरच आम्ही त्यांच्यातले आहोत असं लोकांना वाटेल.' 'Acceptance through identification' या मूलतत्त्वाचाच त्याने पुनरुच्चार केला होता. त्यानी गांधी व औरंगझेब यांच्या साधेपणे राहण्याची वाखाणणी केली. उठता उठता तो म्हणाला, 'माझ्या आयुष्याची सुरुवात मी बोटीवरचा वेटर म्हणून केली व नंतर बरीच वर्षं मी तीच नोकरी केली. त्यामुळे माझी राहण्याची पद्धत ठरून गेली आहे. त्यात बदल करावा असं मला कधी वाटलं नाही.' पुढच्या आयुष्यात अनेक नामवंत लोकांना मी भेटलो; पण हो चि मिन्हची ही आठवण माझ्या मनात चिरंतन राहिलेली आहे.

व्हिएतनामच्या या क्रांतिकारक भाग्यविधात्याला भेटणे, विशेषतः त्या काळात, हा नक्कीच एक रोमांचकारक अनुभव असला पाहिजे. जोशींच्या लेखनात किंवा बोलण्यात या भेटीचा कुठेच कसा उल्लेख झाला नाही, याचे काहीसे नवल वाटते.

हो चि मिन्ह यांचे बलाढ्य अमेरिकेविरुद्ध जिद्दीने उभे ठाकलेले एक कडवे साम्यवादी म्हणून दीक्षित यांना खूप कौतुक वाटले होते, पण वैचारिक पातळीवर दीक्षित कायमच खुल्या अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. याच पत्रात त्यांनी विद्यार्थिदशेत असतानापासूनच जोशींवर ॲडम स्मिथ वगैरे अभिजात (क्लासिकल) अर्थशास्त्र्यांचा प्रभाव कसा होता व तेव्हापासूनच जोशीही मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थक कसे होते याचाही कौतुकाने उल्लेख केला आहे. जगदीश भगवती व अशोक देसाई यांच्यासारख्या मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थक राहिलेल्या त्यांच्या काही इतर विद्यार्थ्यांचाही ते उल्लेख करतात. हा सगळा १९५२ ते १९५८ हा कालखंड आहे; जेव्हा उदारीकरण वगैरे शब्दही भारतात फारसे वापरात नव्हते व सोव्हिएतप्रणीत समाजवादी विचारांचा पगडा सर्वव्यापी होता. पण नवल म्हणजे त्या विद्यार्थिदशेपासूनच जोशी यांच्यावर खुल्या (लिबरल) विचारसरणीचा प्रभाव होता. त्या पत्रात दीक्षित लिहितात,

''आज जेव्हा मी माझे बहुसंख्य विद्यार्थी लिबरलायझेशन, प्रायव्हेटायझेशन व

ग्लोबलायझेशनचा पुरस्कार करताना बघतो, तेव्हा मी जे काही त्या काळात आग्रहाने शिकवलं, त्याचं फळ मिळाल्याचं समाधान मला मिळतं.

''जास्त काय लिहू? पुन्हा काही लिहायची वेळ येणार नाही. आता माझे डोळे पैलतीरी लागले आहेत. वैतरणा नदीत घोट्याइतक्या पाण्यात उभा आहे, नदी केव्हा पार होते आहे याची मला उत्कंठा लागलेली आहे, घाई लागली आहे.''

असा या आठ-पानी हस्तलिखित पत्राचा शेवट आहे. दीक्षित यांचे हे जणू अखेरचे पत्र असावे असे वाटते व म्हणूनच त्याचे मोल अधिक वाटते.

१९५२-५३ या वर्षात जोशी कॉलेजातल्या मराठी वाङ्मय मंडळाचे सदस्य होते; १९५३-५४ या वर्षात *विकास* या कॉलेजात निघणाऱ्या भित्तिपत्रकाचे संपादक होते. १९५४-५५ सालात कॉलेजातील जनरल बँकिंग असोसिएशनचे ते सरचिटणीस होते. मात्र त्या सहा वर्षांत कॉलेजबाहेरच्या जीवनात त्यांनी काय काय केले, कुठल्या उपक्रमांत भाग घेतला, कुठले सिनेमे बघितले, कुठले छंद जोपासले, कोणाशी त्यांची मैत्री झाली वगैरेबद्दलच्या काही आठवणी उपलब्ध नाहीत. ना त्यांनी स्वतः त्याबद्दल काही लिहिले आहे, ना संभाषणात कधी त्यांनी त्याचा उल्लेख केला. अपवाद म्हणजे आपल्या कॉलेजात एकदा त्यांनी दुर्गाबाई भागवत यांना कसे आमंत्रित केले होते याविषयी त्यांनी लिहिले आहे. दुर्गाबाईंविषयी ते बरेच ऐकून होते. फोर्टमधील प्रसिद्ध एशियाटिक लायब्ररीत कधी जाणे झाले तर तिथे आपल्या व्यासंगात कायम गढलेल्या दुर्गाबाई दिसत; पण त्यांच्या समाधीचा भंग करून त्यांच्याशी काही बोलायचा जोशींना धीर होत नसे. एकदा मात्र त्यांनी दुर्गाबाईंना आपल्या कॉलेजात व्याख्यानासाठी बोलावले होते. मध्यप्रदेशच्या एका जिल्ह्यातील आदिवासींचे जीवन, इतिहास, संस्कृती, राहणीमान यांविषयी त्या बोलल्या. बहुसंख्य विद्यार्थ्यांना आदिवासी जीवनाचा काहीच परिचय नव्हता व दुर्गाबाईंच्या भाषणाने एक नवेच जग त्यांना दिसले. सारे सभागृह भारावून गेले होते.

बऱ्याच वर्षांनी आणीबाणीविरुद्ध ज्या धाडसाने दुर्गाबाईंनी आवाज उठवला त्याचे जोशींनी कौतुक केले होते. पण त्यांना त्याहूनही अधिक कौतुक होते ते आणीबाणीच्या काळात मिळालेल्या तेजोवलयाचा आणि लोकप्रियतेचा हव्यास दुर्गाबाईंनी जराही ठेवला नाही; निवडणुका संपताच त्या साऱ्यातून निःसंगपणे मोकळ्या झाल्या, आपल्या व्यासंगाच्या विषयाकडे वळल्या आणि अगदी आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यातच रमल्या; या गोष्टीचे.

मे १९५५ मध्ये जोशी बीकॉम झाले. १००० पैकी ५२८ गुण मिळवून; म्हणजे द्वितीय वर्गात. कॉमर्समधील गुणांची टक्केवारी त्याकाळी कमीच असे. पुढील दोन वर्षे त्यांना विद्यापीठातर्फे दिली जाणारी महिना रुपये तीसची मेरिट स्कॉलरशिप मिळाली. ॲडव्हॉन्स्ड बँकिंग या विषयात कॉलेजात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला सी. ई. रँडल (Randle) सुवर्णपदक कॉलेजतर्फे दिले जाई. त्यावर्षी ते जोशींना मिळाले.

त्या सुवर्णपदकाचीही एक गंमत आहे. हे सुवर्णपदक मिळाल्याचे कळवणाऱ्या

प्राचार्यांच्या २८ नोव्हेंबर १९५५च्या इंग्रजी पत्रातले शेवटचे वाक्य आहे, ''सोन्याचा भाव अतिशय वाढलेला असल्याने ह्या पदकाच्या मूल्याइतकी रक्कम जोशी यांना रोख दिली जाईल.'' त्याप्रमाणे त्यांना सुवर्णपदकाऐवजी रुपये १०५ रोख दिले गेले!

१९५७ साली जोशी एमकॉम झाले. पुन्हा द्वितीय वर्गात; ८०० पैकी ४१३ गुण मिळवून. इंटरनॅशनल बँकिंग व स्टॅटिस्टिक्स हे विषय घेऊन. सहा वर्षांपूर्वी अनपेक्षितरीत्या सुरू केलेली व त्यावेळी खूप अवघड वाटलेली कॉमर्स कॉलेजची यात्रा सुफळ संपूर्ण झाली.

जडणघडणीच्या ह्या कालखंडाकडे आज मागे वळून बघताना जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वातील दोन वैशिष्ट्ये त्या काळातही प्रकर्षाने जाणवतात.

एक म्हणजे त्यांची प्रखर बुद्धिनिष्ठा – प्रत्येक गोष्ट आपल्या बुद्धीच्या निकषावर पडताळून पाहायची आणि पटली तरच स्वीकारायची वृत्ती. दुसऱ्याने सांगितले म्हणून त्यांनी ऐकले, मानले असे सहसा कधी होत नसे.

ते बारा-तेरा वर्षांचे असतानाचा एक प्रसंग. बसल्याबसल्या त्यांच्या मनात एक विचार आला. 'आपण किती नशीबवान आहोत! भारतासारख्या श्रेष्ठ देशात जन्मलो, त्यात पुन्हा शिवरायांच्या आणि ज्ञानेश्वरांच्या महाराष्ट्रात जन्मलो, त्यातही सर्वश्रेष्ठ अशा हिंदू धर्मात आणि त्याहून विशेष म्हणजे ब्राह्मण कुलात जन्मलो! जन्मतःच ह्या साऱ्या दुर्लभ गोष्टी आपल्याला लाभल्या; किती आपण भाग्यवान!'

पण मग लगेच त्यांनी त्या विचाराचे स्वतःच्याच मनाशी विश्लेषण करायला सुरुवात केली. अनेक प्रश्न मग त्यांच्या मनात निर्माण झाले. 'भारत देश सर्वश्रेष्ठ कसा? जगातील अत्यंत गरीब, दुष्काळाने गांजलेल्या देशांत भारत मोडतो. मग असे राष्ट्र सर्वश्रेष्ठ कसे असेल? महाराष्ट्रात शिवराय आणि ज्ञानेश्वर जन्मले, पण इतर प्रांतांतही अशी नररत्ने जन्मलीच आहेत व त्या-त्या प्रदेशातील लोकांना त्यांच्या-त्यांच्या प्रदेशात जन्मलेल्या नररत्नांचा अभिमान असतोच. आपणही त्या प्रदेशात जन्मलो असतो तर आपल्यालाही त्यांच्याविषयी तेवढाच अभिमान वाटला असता. हिंदू धर्मातही सर्वश्रेष्ठ असे काय आहे? जगात जास्तीत जास्त उपासक असलेले धर्म बुद्ध आणि ख्रिस्त यांचे आहेत. इस्लामही अनेक देशांत पसरला आहे. मग एकाच भूखंडात मर्यादित असलेल्या या हिंदू धर्माला सर्वोत्तम म्हणणे म्हणजे खोट्या अभिमानाचे लक्षण नाही का? आणि ब्राह्मण श्रेष्ठ मानणे तर किती मूर्खपणाचे! ब्राह्मणांत काय सगळे महापुरुषच जन्मले? अपकृत्य करणारे कुणी झालेच नाहीत? आणि इतर जातींत जन्मूनही अलौकिक कृत्ये करणारेही अनेक असतातच!'

या कठोर उलटतपासणीने ते अगदी हादरून गेले. जन्माच्या अपघाताने मिळालेल्या गोष्टींचा वृथा अभिमान बाळगण्याची आपल्यात प्रवृत्ती आहे आणि ती मोडून काढली पाहिजे, याची त्यांना मोठ्या प्रकर्षाने जाणीव झाली. त्या दिवसापासून त्यांनी एक निश्चय केला. जन्माच्या अपघाताने आपल्याला जे जे मिळाले असेल, ते अती कनिष्ठ आहे, असे समजून विचाराची सुरुवात करायची आणि जेथे सज्जड पुरावा मिळेल, तेथेच आणि त्या पुराव्याने सिद्ध होईल तेवढेच, जन्मसिद्ध

गोष्टींचे बरेपण मान्य करायचे. अशी शिस्त त्यांनी आयुष्यभरासाठी बाणवून घेतली.

रूढ अर्थाने त्यांचे परीक्षेतील गुणांच्या स्वरूपात प्रकट झालेले यश फारसे नेत्रदीपक नसेल; पण त्या चाकोरीच्या पलीकडे जाऊन विचार करताना त्यांची प्रखर बुद्धिमत्ता आणि बुद्धिप्रामाण्य सतत जाणवते. स्वतःच्या वागण्याचे, स्वतःच्या स्वभावाचे ते पुनःपुन्हा विश्लेषण करताना आढळतात. जे ऐकले किंवा बघितले तेही सारे त्यांनी जसेच्या तसे कधीच स्वीकारले नाही, तर प्रत्येक गोष्टीचा स्वतः विचार करून त्यातून काय बोध घ्यायचा तो ते घेत गेले.

तीव्र आत्मभान हा जोशी ह्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बालपणापासून ठळकपणे जाणवणारा दुसरा विशेष म्हणता येईल. तसे हे आत्मभान किंवा स्वत्वाची जाणीव प्रत्येकातच असते, पण जोशींमधे त्याची तीव्रता खूप अधिक असल्याचे जाणवते.

ह्या तीव्र आत्मभानाचे अनेक तरल पदर ह्या कालखंडात आढळतात. इतरांच्या तुलनेतले आपले वेगळेपण (exclusivity) अधोरेखित करण्याची प्रवृत्ती किंवा मानसिक गरज, महत्त्वाकांक्षा, मनस्वीपणा, मानीपणा, अहंकार, आत्मविश्वास, आत्मकेंद्रितता, हेकटपणा, आत्मभानाला धक्का पोहोचल्यास उफाळून येणारी असुरक्षिततेची भावना इत्यादी – पण मूलतः हे त्या आत्मभानाचे विविध आविष्कार असावेत.

पूर्वी लिहिल्याप्रमाणे काही शारीरिक कमतरतांमुळे न्यूनगंड निर्माण होऊ न देता त्यांच्यावर मात करायची जिद्दही ह्या आत्मभानातूनच आली असावी. शिकवणीला असलेला विरोधही तसाच.

विलेपार्ल्याला शिकत असताना मोठ्या भावाशी, म्हणजे बाळशी, धाकट्या शरदचे एकदा कशावरून तरी जोरदार भांडण झाले. त्यावेळी माईंना मधे पडावे लागले. चूक शरदची आहे असे बहुधा त्यांना वाटले. शब्दाने शब्द वाढत गेला. रागाच्या भरात त्या शरदला खूप रागावल्या, थोडे मारलेही. आपण काहीच चूक केलेली नाही असे शरदचे म्हणणे; ते काही त्याने शेवटपर्यंत सोडले नाही. तरीही आई आपल्यालाच ओरडली व आपल्याला तिने मारलेही, यात आपला मोठा अपमान झाला असे वाटून शरद रागाने घरातून निघून गेला. कुठे जायचे काहीच नक्की नव्हते. खिशात फारसे पैसे नाहीत, वय अवघे १३-१४. रात्र झाली तरी तो घरी परतला नाही, तशी घरची सगळी मंडळी प्रचंड काळजीत पडली. त्याचे जोशी याच आडनावाचे एक मावसभाऊ पोलीस इन्स्पेक्टर होते, त्यांची यात खूप मदत झाली. त्यांच्याच संपर्कातल्या कोणीतरी तब्बल दहा दिवसांनी शरदला इगतपुरीला बघितले व मग तिथे जाऊन वडलांनी त्याला ताब्यात घेतले. पायीच चालत चालत, इकडे तिकडे भ्रमंती करत तो इतक्या लांबवर पोचला होता.

त्यांच्या मोठ्या भगिनी सिंधूताई जोशींनी एके ठिकाणी लिहिले आहे, ''तो प्रसंग आठवला, की हृदयात अजून कालवाकालव होते.'' हाही एक जोशींच्या आत्मभानाचा किंवा मनस्वीपणाचा नमुना.

या आत्मभानाचाच एक आविष्कार म्हणजे आपले वेगळेपण अधोरेखित करत राहणे.

उपरोक्त लेखातच सिंधूताई लिहितात,

> शरदचे एक वैशिष्ट्य असे, की इतरांपेक्षा आपले काही वेगळे असावे असे त्याला वाटते. नमाताई व मी गाणे शिकू लागलो व बाळ तबला शिकू लागला. शरदनेही काही शिकावे अशी आईची इच्छा होती. आईला पेटी वाजवता येई. शरदचा आवाज गोड. म्हणून आईने एकदा पेटी वाजवून 'शुभं करोति' म्हणायचे म्हटले, तर शरदने नकार दिला. तेच शिक्षणाचे. 'सर्वांनी काय सायन्स आणि आर्ट्स करायचे, मी कॉमर्स घेणार' असे म्हणून त्याने एमकॉम केले.
>
> (*चतुरंग,* दैनंदिनी २०१२, पृष्ठ ७५)

इतरांना खूप अवघड व भावी करिअरच्या दृष्टीने अनुपयुक्त वाटणारा संस्कृत विषय त्यांनी घेतला, ज्यांचा अर्थही सगळ्यांना नीट समजत नाही अशा संस्कृत साहित्यात त्यांनी रस घेतला, या साऱ्या संस्कृतप्रेमामागेही निखळ आवडीपेक्षा इतरांपासून काहीतरी हटके, काहीतरी वेगळे करायची इच्छा असावी. ''ती एक धुंदीच होती, मस्ती होती. इतरांना ज्या क्षेत्रात रस नाही, त्या क्षेत्रात आपण आकंठ आनंदात बुडून जात आहोत याचा अहंकारही मोठा असावा,'' असे त्यांनीही स्वतःच्या संस्कृतप्रेमाच्या संदर्भात लिहिले आहे.

''तू काय, संस्कृतचा प्राध्यापक बनणार,'' असे एका जवळच्या मित्राने सुचवल्यानंतरची त्यांची प्रतिक्रिया खूप तीव्र होती. ते लिहितात,

> मी? विश्वाच्या निर्मितीतील एक प्रमुख प्रमेय असलेले माझे आयुष्य आणि हा कसेबसे ५४ टक्के मार्क मिळालेला मित्र मला माझी वाट सांगतो आहे? शब्दाशब्दाने वाद वाढला... मी वाणिज्य शाखेत प्रवेश घेण्याचा निश्चय जाहीर केला. केला म्हणजे केला. 'शेंडी तुटो वा पारंबी तुटो', आता माघार घेणे नाही. तोंडातून निघालेला शब्द मागे घेणे भाग पडून, होणाऱ्या अपमानाने मलिन झालेले जीवन जगण्यात तरी काय अर्थ आहे?

आपण पुढे काय करणार हे त्या मित्राने गृहीत धरावे याचा त्यांना राग आला होता. पुढे मोठेपणीही आपल्याला गृहीत धरले जाणे (being taken for granted) त्यांना मुळीच आवडत नसे.

दुसरे विशेष नोंद घेण्याजोगे म्हणजे, आपला निर्णय चुकीचा आहे हे जाणवूनसुद्धा त्यांनी आपल्या निवडीचा पुनर्विचार केला नाही. त्यातही पुन्हा पोद्दार कॉलेजसारखे सर्वसामान्य मराठी मुलाने निवडले असते ते कॉलेज न निवडता, त्यांनी सिडनमसारखे उच्चभ्रू व आपल्या घरापासून दुप्पट अंतरावर असलेले कॉलेज निवडले. ह्या साऱ्यातील हेकटपणा हाही त्या आत्मभानाचा किंवा आत्मविश्वासाचा एक आविष्कार वाटतो.

पुढे कॉमर्स कॉलेजचे वर्ग सुरू झाले आणि, त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, 'हरियाली' सोडून 'पथरीला' रस्ता स्वीकारणाऱ्याच्या वेदना क्षणाक्षणाला जाणवू लागल्या. पण तरीही

ते त्याच वाटेने पुढे जात राहिले. आपण जे करायचे ठरवतो, त्यासाठी वाटेल तेवढे कष्ट उपसायची त्यांची तयारी असायची असेही दिसते. 'की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने' ही सावरकरांची ओळ त्यांची आवडती होती. ही कष्ट सहन करण्याची आत्यंतिक क्षमता हीदेखील त्या तीव्र आत्मभानातून किंवा मनस्वीपणातून येत असावी.

बऱ्याच वर्षांनी ह्या निर्णयाबद्दल जोशींनी लिहिले आहे,

> प्राणापेक्षा प्रिय असलेल्या सीतेचाही, राजधर्माचे परिपालन करण्याकरिता, त्याग करायला मी मागेपुढे पाहणार नाही, अशा रामचंद्री अभिनिवेशात मी संस्कृत अभ्यासक्रम न घेण्याचा निर्णय जाहीर करून टाकला. वर्षानुवर्षे ज्या आयुष्यक्रमाची तयारी केली, तो क्षणार्धात हेकटपणे लाथाडला. आता पुढे काय? आईवर रागावलेले बाळ हट्ट करून जेवायला नकार देते; त्यामुळे आईचे हृदय पिळवटते आहे, या जाणिवेत त्याला काय आनंद होतो? लव-कुशांनी रामाच्या साऱ्या सैन्याचा पराभव केला, सीतेचे निष्कलंकत्व सिद्ध झाले. तिला कोणी पतिता म्हटले असते, तर लव-कुशांचे पराक्रमसिद्ध धनुष्यबाण आकर्ण ताणून सिद्ध झाले असते. तरीही 'सीतेने पुन्हा एकदा अग्निदिव्य करावे' असा आग्रह धरून रामाने मनातल्या मनात कोणत्या असीम कडूजहर सुखाचा अनुभव घेतला?
>
> (*अंगारमळा,* पृष्ठ ५१)

हा परिच्छेद जोशींच्या मनस्वी स्वभावाची व असामान्य भाषाप्रभुत्वाची साक्ष पटवतोच; पण त्यातील अर्थबाहुल्य त्यापलीकडे जाणारे आहे असे जाणवते. 'आईचे हृदय पिळवटते आहे, या जाणीवेत त्याला काय आनंद होतो?' किंवा 'कोणत्या असीम कडूजहर सुखाचा अनुभव घेतला?' यांसारख्या शब्दरचना काहीशा गूढ वाटतात. 'आपल्या लोकत्तरतेच्या धुंदीत, आपल्या हातानेच आपले आयुष्य कडू करून घेण्यात गोडी मानणारे' हे पृष्ठ २८वर उद्धृत केलेले त्यांचे शब्दही काहीतरी वेगळे सूचित करत आहेत असे जाणवते. पण जोशींनी स्वतः त्याचे नेमके स्पष्टीकरण त्यांच्या लेखनात कुठेच दिलेले नाही.

प्रखर बुद्धिनिष्ठा आणि तीव्र आत्मभान ही पूर्वायुष्यात जाणवणारी जोशींची दोन व्यक्तिवैशिष्ट्ये व त्यांचे विविधांगी आविष्कार भावी वाटचालीचा मागोवा घेतानाही आपल्याला पुनःपुन्हा जाणवत राहतात.

■

# २

# व्यावसायिक जगात

संस्कृतकडे पाठ फिरवून शरद जोशी कॉमर्सला गेले व जिद्दीने अभ्यास करून जून १९५७मध्ये चांगल्या प्रकारे एमकॉम झाले, अर्थशास्त्राची त्यांना खूप गोडीही वाटू लागली हे खरे, पण ते शिक्षण चालू असतानाच 'एमकॉमनंतर पुढे काय' हा प्रश्न समोर उभा राहिला होता. कॉलेजात त्यांना दोन वर्षांसाठी मिळालेली महिना तीस रुपयांची स्कॉलरशिप सोडली तर बाकी काहीच कमाई नव्हती. आजवर वडलांनीच राहण्याचा, प्रवासाचा, पुस्तकांचा व शिक्षणाचा सारा खर्च केला होता, त्यासाठी त्यांनी मुलाला अर्धवेळ नोकरी वा शिकवणी करून वा अन्य कुठल्याही प्रकारे घरखर्चाचा भार उचलायला लावले नव्हते हे खरे; पण त्याचबरोबर वडलांच्या व नुकत्याच नोकरीला लागलेल्या मोठ्या भावाच्या पगारात आपले आठ जणांचे कुटुंब कसेबसे गुजराण करत आहे ह्याची जाणीव जोशींना होती. त्यामुळे शिकत असतानाच एकीकडे त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची पूर्वतयारी सुरू केली होती. ज्यांचा तत्कालीन आर्थिक विश्वात खूप दबदबा होता ते डॉ. सी. डी. देशमुखदेखील मूळचे आयसीएस होते. जोशींचे वडील सरकारी नोकरीत असल्याने तशा पदाचे त्यांना, नाही म्हटले तरी, लहानपणापासून थोडेफार आकर्षण होतेच. त्याकाळी ही स्पर्धापरीक्षा देणे, तिचा निकाल जाहीर होणे, त्यानंतर मुलाखत, तिचा निकाल आणि हे सगळे सोपस्कार यशस्वीरीत्या पार पाडल्यानंतर प्रत्यक्ष नेमणूक होणे ह्यात वर्षभराहून अधिक काळ सहज जात असे. दरम्यानच्या या कालावधीत अर्थार्जन करणे आणि निदान स्वतःचा खर्चतरी भागवणे बावीस वर्षांच्या जोशींच्या दृष्टीने अपरिहार्यच होते.

त्या दृष्टीने त्यांनी मुंबई विद्यापीठाकडे व्याख्यातेपदासाठी अर्ज केला. तत्कालीन नियमांनुसार हे अर्ज त्या-त्या विषयासाठी स्वतंत्ररीत्या करावे लागत असत; म्हणून अर्थशास्त्र, संख्याशास्त्र व व्यापार अशा तीन विषयांसाठी तीन स्वतंत्र अर्ज त्यांनी केले होते. पण बरेच दिवस थांबूनही विद्यापीठाकडून काहीच उत्तर आले नाही. दरम्यान त्यांना एक आमंत्रण आले; कोल्हापूरला एका नव्या कॉमर्स कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून दाखल व्हायचे.

त्याकाळी मुंबई आणि पुण्यापलीकडच्या ग्रामीण महाराष्ट्रात उच्चशिक्षणाचे प्रमाण कमीच होते; वाणिज्य शाखेला तसाही वाव कमीच असायचा. त्यामुळे कोल्हापूरसारख्या ठिकाणी एखादे कॉमर्स कॉलेज सुरू करणे ही कल्पनाच जोशींना हास्यास्पद वाटली. पण ज्यांनी हे आमंत्रण दिले होते ते प्रा. भालचंद्र शंकर भणगे स्वतःच पूर्वी सिडनममध्ये शिकवत होते व

जोशी त्यांचेच एक विद्यार्थी होते. केवळ हे नवे कॉलेज सुरू करण्यासाठी म्हणून प्रा. भणगे यांनी सिडनममधील मानाची नोकरी सोडली होती. आपल्या ह्या गुरूंबद्दल, त्यांच्या ज्ञानाबद्दल जोशींना बराच आदर होता. आता ह्या नव्या कॉलेजच्या उपक्रमात त्यांना जोशींसारख्या त्यांच्या हुशार विद्यार्थ्यांचा सहभाग हवा होता. त्यांना नकार देणे जोशींना जड झाले. शिवाय, प्रत्यक्ष भेटीत चर्चा करताना भणगे यांनी अगदी गळच घातली. त्यांचा मुद्दा असा होता, की नाहीतरी जोशी काही व्याख्याता म्हणून कायम नोकरी करणार नाहीएत, स्पर्धापरीक्षा व नंतरच्या मुलाखती पार पडेस्तोवरच त्यांना अध्यापन करायचे आहे; तेव्हा ते मुंबईत केले काय किंवा कोल्हापुरात केले काय, काहीच फरक पडणार नाही. याशिवाय, अतिरिक्त आकर्षण म्हणून तीन वर्षांनंतर मिळू शकणारे वेतन भणगे यांनी जोशींना पहिल्या महिन्यापासूनच द्यायचे कबूल केले. त्या दिवसापर्यंत मुंबई विद्यापीठाकडून काहीच उत्तर आलेले नसल्याने व कॉलेज सुरू व्हायची वेळ अगदी जवळ येऊन ठेपल्यामुळे जोशींनाही नोकरीची घाई होती. शेवटी जोशींनी भणगे यांना होकार दिला व लगेचच ते कामावर हजर झाले.

कोल्हापूर येथील एक प्रसिद्ध काँग्रेसनेते रत्नाप्पाअण्णा कुंभार यांच्या आधिपत्याखालील लीगल एज्युकेशन सोसायटीने हे महाविद्यालय सुरू केले होते. रत्नाप्पा कुंभार यांनी कॉलेज सुरू करण्याची सर्व व्यावहारिक जबाबदारी प्राचार्य या नात्याने भणगे यांच्यावर सोपवली होती. जो कोणी येईल त्या विद्यार्थ्याला प्रवेश दिला गेला. कारण कॉमर्स कॉलेज हा प्रकारच कोल्हापुरात प्रथम सुरू होत होता. साधारण शे-सव्वाशे विद्यार्थी दाखल झाले होते. त्यातले काही वयाने बरेच मोठे व बारीकसारीक नोकऱ्या करणारे होते. त्या सगळ्यांना सोयीचे व्हावे म्हणून कॉलेजची वेळ सकाळी साडेसात ते साडेदहा अशी ठेवली गेली. कॉलेज प्रत्यक्ष सुरू होईस्तोवर ऑगस्ट महिना उजाडला. कोल्हापुरातील बिंदू चौकात तोफखाना बिल्डिंग नावाची एक जुनाट लांबलचक कौलारू इमारत होती. तिथेच हे कॉलेज भरू लागले. इमारतीच्या आवारातच एक भले मोठे, डेरेदार वडाचे झाड होते व त्याची सावली सगळे कॉलेज कवेत घेणारी होती. त्या भव्य वृक्षामुळे एखाद्या प्राचीन आश्रमाप्रमाणे तेथील वातावरण वाटायचे.

अशा नव्या कॉलेजसाठी कोल्हापुरात प्राध्यापक मिळणे अवघड होते. कशीबशी भणगे यांनी सगळी जुळवाजुळव केली. एन. व्ही. शिवांगी नावाचे एक बेळगावला व्यवसाय करणारे चार्टर्ड अकौंटंट त्याच कॉलेजात लागले होते. विद्यापीठाच्या नियमानुसार अकाउंटिंग व ऑडिटिंग हा विषय शिकवणारी व्यक्ती स्वतः चार्टर्ड अकौंटंट असणे आवश्यक होते; पण तशी कोणी व्यक्ती कोल्हापुरात उपलब्ध होईना. त्यामुळे मग खास सवलत म्हणून शिवांगी यांना बेळगावहून कोल्हापूरला यायचे-जायचे टॅक्सीभाडे द्यायचे कॉलेजने कबूल केले व त्यानंतरच शिवांगी प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तेही स्वतः पूर्वी सिडनमचेच विद्यार्थी होते. त्यांनी लिहिलेल्या *In the making of a personality* या आत्मचरित्रानुसार पहिल्या वर्षी ते स्वतः, प्राचार्य भणगे, शरद जोशी व एम. व्ही. कुलकर्णी असे चारच जण ह्या कॉलेजात शिकवत. शेवटचे दोघे भणगे यांचेच माजी विद्यार्थी होते. त्यातले कुलकर्णी पुढे अलाहाबाद

बँकेचे जनरल मॅनेजर बनले. भणगे स्वतः पुढे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू झाले.

एक निष्णात प्राध्यापक म्हणून भणगेंचा लौकिक मोठा होता आणि म्हणूनच रत्नाप्पाअण्णांनी सगळी भिस्त त्यांच्यावर सोपवली होती. होते ते तसे काहीसे बुटके व स्थूल; पण त्यांचा आत्मविश्वास, त्यांचा ध्येयवाद, टापटीप यांमुळे त्यांची एकदम छाप पडत असे. नेहमी ते सुटाबुटात वावरत. कोल्हापुरात कॉमर्स कॉलेज काढणे म्हणजे मोठे आव्हान आहे ह्याची त्यांना जाणीव होती; किंबहुना म्हणूनच त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली होती. त्यामुळे शिक्षणाचे माध्यम त्याकाळी इंग्रजी असूनही वर्गात ते अधूनमधून मराठीतही बोलत; विद्यार्थ्यांना सगळे नीट समजावे म्हणून. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही ते आपलेसे वाटत. त्यांचा स्वभाव सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याचा, सहकाऱ्यांना प्रेरित करण्याचा होता. शिवाय, संस्थाप्रमुख रत्नाप्पा कुंभार हेदेखील सदैव त्यांच्या मदतीला तयार असत. कोल्हापुरात कॉमर्स कॉलेज सुरू करणे हा त्यांच्या दृष्टीनेही प्रतिष्ठेचा प्रश्न होता.

स्वतः जोशींच्या बाबतीत सुरुवातीलाच एक पेच निर्माण झाला. इथले कॉलेज सुरू होऊन जेमतेम तीन दिवस झाले आणि अचानक मुंबई विद्यापीठातील तीनही व्याख्यातेपदांसाठी निवड झाल्याच्या तीन तारा त्यांना एकाच दिवशी मिळाल्या! कुठले पद स्वीकारायचे हा निर्णय विद्यापीठाने त्यांच्यावरच सोपवला होता. जोशी ह्यांची पुन्हा एकदा द्विधा मनःस्थिती झाली. भणगे यांना सोडून जायचा बराच मोह झाला; पण भणगेंनी पुन्हा काकुळतीने मनधरणी केली. 'मुंबई विद्यापीठाला तुमच्यासारखे इतर अनेक व्याख्याते मिळतील, पण आम्हाला इथे माणसं मिळवणं खूप अवघड आहे. एकदा तुम्ही इथे यायचं कबूल केल्यावर व त्या भरवश्यावर आम्ही कॉलेज सुरू केल्यावर तुम्ही आम्हाला असं मध्येच सोडून जाणं अन्यायाचं होईल,' वगैरे ते सांगू लागले. नैतिकदृष्ट्या त्यांचे म्हणणे बरोबरही होते. शेवटी जोशींनी कोल्हापुरातच राहायचा निर्णय कायम केला. इथे राहूनच ते लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देणार होते.

कोल्हापूर येथील पद्मा गेस्टहाउसमध्ये जोशी राहू लागले. मुंबईतील कॉलेजात इतर सर्व धनिक मुलांमध्ये त्यांची गणना गरीब विद्यार्थ्यांमध्येच होत होती; इथे मात्र ते एकदम धनवानांत गणले जाऊ लागले. त्याकाळी त्यांचा मासिक पगार प्राचार्यांच्या औदार्यामुळे महिना २१० रुपये होता व त्या परिस्थितीत एकट्या माणसासाठी तो खूप वाटत होता. कोल्हापुरातल्या अगदी सर्वोत्तम लॉजमध्येही महिन्याभराच्या शाकाहारी जेवणाचे फक्त तीस रुपये होत होते; मांसाहारी जेवणाचे पाच रुपये जास्त.

जोशींचे व्यक्तिमत्त्व रुबाबदार होते. सहा फूट एक इंच उंची, भरदार शरीरयष्टी, चेहऱ्यावर बुद्धीचे तेज आणि मुंबईतील वास्तव्यात अंगी बाणलेला चटपटीतपणा याचे नाही म्हटले तरी ग्रामीण विद्यार्थ्यांवर एक दडपण यायचे. कॉलेजात इंग्रजीतून शिकवताना जोशी एकही मराठी शब्द वापरत नसत. इतर कॉलेजांतील मुलेही केवळ जोशींचे इंग्रजी ऐकण्यासाठी म्हणून वर्गात येऊन बसायची. पण इतक्या अस्खलित इंग्रजीची तिथल्या मुलांना अजिबात सवय नव्हती. ती सगळी मराठी माध्यमातली; अगदी अचंबित होऊन 'अजि म्यां ब्रह्म पाहिले'

असा चेहरा करून नुसते ऐकत राहायची. जोशींची एकूण देहबोलीही अशी असायची, की हात वर करून काही शंका विचारायचीदेखील मुलांना भीती वाटायची. कधी कोणी धाडस करून काही विचारलेच तर जोशी 'एवढं कसं कळत नाही तुम्हाला?' असेच जणू सुचवणाऱ्या नजरेने बघायचे.

कधी कधी जोशींना वाटायचेदेखील, की मुलांना सगळे समजेल अशा सोप्या भाषेत शिकवावे. पण मग सिडनममधले प्राध्यापक त्यांच्या डोळ्यापुढे येत – मुरंजन, दीक्षित वगैरे. आपण शिकवतो ते सारे विद्यार्थ्यांना समजते आहे की नाही ह्याची काळजी तेही करत नसत. आपल्याच नादात, आपल्याच गतीने ते शिकवत जायचे. जोशींसारखे विद्यार्थी जीव मुठीत धरून त्यांच्यामागे धावायचे; पुरती दमछाक व्हायची; पण मग हळूहळू जोशींचा दम वाढत गेला, स्वतःच झेप घ्यायची ताकद आली आणि काही दिवसांनी सगळे प्रयत्नांती समजू लागले. 'मग मीतरी विद्यार्थ्यांच्याच गतीने कशासाठी जायचे? त्यांचे त्यांनाच नाही का हळूहळू समजू लागणार?' – जोशी स्वतःला विचारत.

त्याचबरोबर आणखीही एक होते; आपल्या इंग्रजीवरील प्रभुत्वाचा व सिडनमसारख्या कॉलेजातील उच्चभ्रू वातावरणात सहा वर्षे काढल्याचा जोशींना, नाही म्हटले तरी, अभिमान होताच. त्यांच्या शिकवण्यातही त्यामुळे थोडासा डामडौल, थोडासा मिरवण्याचा भाग यायचा. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, ''मोराने आपलाच पिसारा खुलवून नाचावं आणि त्यातच समाधान मानावं तसा हा प्रकार होता.''

त्यांचे त्यावेळचे एक विद्यार्थी शरद देशपांडे लिहितात,

> जोशीसर अतिशय कमी बोलायचे. एकूण प्रकृती गंभीर. त्यामुळे त्यांच्याविषयी जास्त भीती वाटायची. विद्यार्थ्यांत मिसळणं, त्यांच्याशी गप्पा मारणं वगैरे दूरची बात. एकच वर्ष ते आम्हाला शिकवायला होते. निरोप समारंभात ते म्हणाले, 'माझ्या पहिल्या प्रयोगाचे बेडूक तुम्ही झालात.' आज मी म्हणेन – तुमच्या प्रयोगातून एकतरी बेडूक आज सुखरूप सुटला आहे; तो महासागर तरून गेला आहे. महाविद्यालयीन शिक्षणापेक्षा त्याने फार काही मिळवलंय. तुम्ही शिकवलेल्या विषयातच – सेल्समनशिप आणि पब्लिसिटी. मराठी जाहिराती वाचायच्या असतात हे पुणेकरांना त्याने दाखवून दिलंय. कोल्हापूरच्या तांबड्या मातीत बीज पेरलं, पण पुण्याच्या सुपीक भूमीत ते बीज रुजलंय.
>
> (*चतुरंग दैनंदिनी २०१२*, पृष्ठ ८७-८८)

शरद देशपांडे यांनी पुढे पुण्यात सेतू नावाची एक जाहिरात एजन्सी काढली, ती उत्तमप्रकारे वाढवली व अनेक वर्षांनी शेतकरी संघटनेशी त्यांचा व्यावसायिक पातळीवरही संबंध आला. याच लेखात त्याबद्दल देशपांडे लिहितात,

पहिल्यांदा शरद जोशींना मी पत्र लिहिलं. 'मी नोकरी सोडली आहे. शेतकरी संघटनेच्या जाहिराती प्रसिद्ध करण्याचा पहिला हक्क, तुमचा एक विद्यार्थी म्हणून, माझा आहे. मला तो द्यावा ही आग्रहाची विनंती.' लगेच चार-पाचदा त्यांचा मला फोन आला. फोन दुसरीकडे असल्याने मला निरोप मिळायला उशीर झाला. जेव्हा मिळाला तेव्हा धावतपळत त्यांच्याकडे गेलो. ते म्हणाले, 'अरे, तू मोठा झालास. तीन-चार निरोप पाठवायला लागतात.' मी सत्य परिस्थिती सांगितली. जाहिरातींचं एस्टिमेट दिलं आणि सांगितलं, 'मी नुकतीच एजन्सी सुरू केली आहे, त्यामुळे काही ठिकाणी आधी पैसे द्यावे लागतील.' तेव्हा ते म्हणाले, 'जर आम्ही तुला पैसे दिले नाहीत, तर आम्ही सगळे तुझ्या घरी भांडी घासायला येऊ.' मी म्हणालो, 'पण सर, माझ्या घरी घासायला भांडी असली पाहिजेत ना!' त्यावर ते मंदसं हसले आणि त्यांनी मला आपल्या वैयक्तिक खात्यातून काही रकमेचा चेक दिला. माझ्या डोळ्यात पाणी तरारलं.

सुरुवातीला वर्गात शिकवण्यापलीकडे जोशींनी आपल्या विद्यार्थ्यांच्या जीवनात फारसे कधी डोकावून बघितले नव्हते. दुसऱ्याच्या जीवनात फार दखल घेण्याचा त्यांचा स्वभावही नव्हता. पण नंतरच्या एका अनुभवाने त्यांना एक वेगळी दृष्टी दिली.

एकदा गेस्टहाउसवर रात्रीचे जेवताना त्यांना वाढणाऱ्या मुलाने चाचरत चाचरत विचारले, ''सर, मला ओळखलंत का?'' त्यांनी मुलाकडे नीट मान वर करून बघितले, पण त्यांना काहीच ओळख पटेना. त्यांच्या कोऱ्या चेहऱ्याकडे बघून मुलानेच खुलासा केला. म्हणाला, ''सर, मी तुमच्या वर्गातलाच एक विद्यार्थी आहे. खांडेकर माझं नाव.'' आपल्याच कॉलेजातला एक गरीब विद्यार्थी इथे चक्क वाढप्याचे काम करतो आहे, हे लक्षात येताच जोशी काहीसे हादरलेच. त्यांना एकदम आपल्या वडलांची आठवण झाली. एकेकाळी तेही ह्याच कोल्हापुरात वाढले होते; एक अनाथ विद्यार्थी म्हणून. कसेबसे माधुकरी मागून, वार लावून इकडेतिकडे जेवत. लहानपणी वडलांकडून ऐकलेले ते दिवस अचानक आठवले आणि जेवता जेवता जोशींना गलबलून आले, घासही गिळवेना. आपल्या वर्गातल्या इतर मुलांचे चेहरे त्यांच्या डोळ्यांपुढे उभे राहिले. त्यांचीही परिस्थिती काही फारशी वेगळी असणार नव्हती. ते म्हणतात,

''मी, माझी परीक्षा, माझे भविष्य, माझी स्वप्ने यांच्यापलीकडे असलेल्या एका जगाचा पडदा खांडेकरने उघडून दाखवला होता.''

यानंतर काही दिवसांनी ते कॉलेजच्या वसतिगृहावरच राहू लागले; कारण वसतिगृह सांभाळणे ही अतिरिक्त जबाबदारी त्यांच्यावर सोपवली गेली. त्याकाळी ग्रामीण तरुणांनी शहरातील कॉलेजात शिकायला यायचे प्रमाण तसे कमी होते; पुढे सरकारने सर्वांच्या फीची व्यवस्था केल्यावर व इतरही सवलती उपलब्ध झाल्यावर ते वाढले. त्यावेळी जी मुले शहरात शिकायला येत, त्यांना वसतिगृहात किंवा अशीच कुठेतरी स्वतःची सोय करावी लागे. आता

संपूर्ण दिवस जोशी या विद्यार्थ्याबरोबरच घालवू लागले; त्यांचे वागणे-बोलणे, उठणे-बसणे जवळून पाहू लागले.

वर्गातील बहुतेक विद्यार्थी छोट्या छोट्या गावांतील शेतकरी कुटुंबातील होते. ते बहुसंख्य विद्यार्थी आणि सुशिक्षित कुटुंबातील मूठभर शहरी विद्यार्थी यांच्यातली दरी अनुल्लंघनीय वाटावी इतकी प्रचंड होती. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या घरी शिक्षणाची काहीच परंपरा नव्हती, इंग्रजीचा गंधही नव्हता, आर्थिक ऐपतही नव्हती. ते कुपोषित आहेत हे त्यांच्याकडे बघितल्याबरोबरच कळत असे. ग्रामपंचायतीच्या शाळेत शिकून ती मुले आता एकदम कोल्हापूरच्या कॉलेजात दाखल झाली होती. अत्यंत मागासलेले त्यांचे कुठलेतरी आडगाव आणि कोल्हापूरसारखे तुलनेने समृद्ध असलेले शहर यांच्यातील फरकच इतका होता, की हे विद्यार्थी अतिशय बुजरे, न्यूनगंडाने ग्रस्त, आपसातच कोंडाळे करून राहणारे असे बनले होते. इतके दिवस कधी जोशींनी त्यांच्याबद्दल असा बारकाईने विचारच केला नव्हता. पण त्या दिवशी खांडेकरबरोबर भेट झाल्यावर त्यांचे डोळे एकाएकी उघडल्यासारखे झाले. दिवसभरात जेव्हा कधी मोकळा वेळ मिळे, तेव्हा जोशी आपल्या विद्यार्थ्यांशी गप्पागोष्टी करू लागले. शहरात आल्यावर कुठल्या कुठल्या अडचणींशी त्यांना झगडावे लागते, कुठले विचार त्यांच्या मनात घोळत असतात ह्याची जोशींना चांगलीच कल्पना आली.

जोशी लिहितात,

> त्यावेळी माझ्या लक्षात आले नव्हते, की माझ्याबरोबरचे विद्यार्थी आणि माझे विद्यार्थी यांत महदंतर होते. आर्थिक चणचण असली तरी, सिडनममधला विद्यार्थी जात्याच आणि संस्काराने सर्वांगपरिपूर्ण होता. त्याच्या अवयवांत दोष नव्हता; व्यायाम केल्यास आणि खुराक मिळाल्यास तो बलभीम बनू शकत होता. पण कोल्हापुरात माझ्यासमोर भक्तिभावाने ऐकणारे विद्यार्थी अपंग होते. एका अर्थाने मतिमंद होते. प्राध्यापकाला उड्डाण करताना पाहता पाहता स्वतःही पंख उभारून उडण्याचा प्रयत्न करण्याचेही सामर्थ्य त्यांच्यात नव्हते. पिढ्यान्‌पिढ्यांची गरिबी आणि निरक्षरता यांनी त्यांना सर्वार्थाने खच्ची केले होते. तसे ते शिक्षणासाठीही आलेले नव्हते. महाविद्यालयाचा परीस अंगाला लागला तर शेतीच्या खातेऱ्यातून सुटू या आशेने ते आलेले होते. महाविद्यालय, शिक्षण, प्राध्यापक ही त्यांच्या दृष्टीने प्रगतीची साधने नव्हती, अपरिहार्यपणे उल्लंघण्याचे अडथळे होते. आणि हे अडथळे ओलांडत खेड्याच्या जीवनातून जिवंत कसे सुटता येईल हे ते घाबऱ्या डोळ्यांनी निरखत होते.

पुढे अनेक वर्षांनंतर जोशींनी लिहिलेल्या 'महाविद्यालयातील विद्यार्थ्यास पत्र' ह्या हृदयस्पर्शी लेखात त्यांचे स्वतःचे त्यावेळचे निरीक्षण व त्यातून स्फुरलेले चिंतन उत्तम प्रतिबिंबित झाले आहे. त्यात जोशी लिहितात :

... एखाद्या पुढाऱ्याची मुलं सोडल्यास वसतिगृहात मुलांना ठेवण्याची शेतकरी आईबापांची परिस्थिती कधीच नसते. बिचारे इकडेतिकडे उसनवार करून आणि अक्षरशः आपलं पोट आवळून घेऊन पोरांना वसतिगृहात ठेवतात; पण त्यांच्या मुलांची वसतिगृहात काही कमी कुचंबणा होत नाही. पुढाऱ्यांच्या आणि शहरातल्या मुलांच्या सामानाचा झगमगाट पाहून त्यांचे डोळे दिपूनच जातात. थंडी वाजू नये, म्हणून आईने बळेच दोन गोधड्या दिलेल्या असतात; घरी एक कमी पडत असूनसुद्धा. पण इतर पोरांच्या रंगीबेरंगी फुलांची नक्षी असलेल्या गाद्या, उशा, चादरी पाहिल्या म्हणजे आईची प्रेमाची गोधडीसुद्धा लपवून ठेवावीशी वाटते.

या भाग्यशाली, झुळझुळीत कपड्यांत फिरणाऱ्या, दररोज नवीन घडीच्या रुमालावर सुगंध शिंपडणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर राहावं, त्यांच्यासारखं वागावं-दिसावं, मित्र-मैत्रिणींच्या नजरेतील कौतुकाचा नजराणा गोळा करत फिरावं असं वाटणं अगदी नैसर्गिक आहे. विडी-सिगरेट पिणं, प्रसंगी अपेयपान करणं, सिनेमा, नाटक, तमाशा पाहणं हे सगळं वाईट असं हजारदा मनावर ठसवलेलं असलं, तरी नव्या मित्रांना ह्या भानगडी करताना पाहून राग तर येत नाहीच; पण आजपर्यंतची सर्व मूल्यं आणि कल्पना भुरूभुरू उडून जातात आणि एकदा का होईना त्यांच्यासारखं करावं, मग त्यासाठी लागेल त्या मार्गाने पैसे उभे करावे, आवश्यक तर खऱ्याखोट्या सबबी सांगून आणखी पैसे मागवून घ्यावे असं वाटणं साहजिकच आहे....

महाविद्यालयातील, वर्गातील, वसतिगृहातील विद्यार्थिमित्रांचं वैभव हे मन पोळणारं. याउलट, शहरात बाजारपेठेत फिरताना होणाऱ्या वैभवाच्या दर्शनाने काहीच क्लेश वाटत नाहीत. दुकानांतील वस्तूंची विविधता, आकर्षक मांडणी, ग्राहकांची गर्दी, सुबक डौलदार घरांत राहणारी गोंडस कुटुंबं, आखीव बागबगीचे, त्यात आनंदाने विहरणारे तरुणतरुणी, हे सारं पाहिल्यानंतर खेड्यातून आलेल्या विद्यार्थ्याला आश्चर्य वाटतं. हे सर्व आपल्या डोळ्यांनी पाहायला मिळालं याचा आनंद वाटतो आणि आता गावातील ते भयानक आयुष्य मागे टाकून या नवीन विश्वात सुखी होऊन जाऊ, या कल्पनेने उत्साह उसळू लागतो....

पण या नवीन जगात स्थान मिळवणं सोपं नाही. अपरिमित कष्ट करूनही ते जमेल किंवा नाही, शंकाच आहे. शहरातली पोरं आणि पुढाऱ्यांची पोरं नुसतीच श्रीमंत नाहीत; इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून आली आहेत. एकमेकांतसुद्धा फाडफाड इंग्रजी बोलतात. आपल्याला इंग्रजी बोलणं तर सोडूनच द्या, बोललेलं समजणंसुद्धा कठीण. त्या पोरांना इंगजी सिनेमाच्या नायिकासुद्धा काय बोलतात ते समजतं, आपल्याला प्राध्यापक काय बोलतात तेसुद्धा कळणं मुश्किल! अभ्यास करायचा कसा? आणि पास व्हायचं तरी कसं?...

हे कठीण आहे. महाकठीण आहे. आज शहराच्या नवलाईच्या दर्शनाने आपण सुखावलो आहोत; आपल्या विद्येकरिता गावाकडे मायबाप काय उस्तवारी करत आहेत, याचासुद्धा विसर पडतो. त्यांची इच्छा एकच – पोराने परीक्षा द्यावी, पास व्हावं, नोकरी धरावी, घरशेती कर्जातून सोडवावी आणि हे पाहून त्यांनी सुखानं डोळे मिटावेत. पण शेतकऱ्यांच्या पोरांना शहरातील परीक्षा द्यायला सांगणं म्हणजे हत्तीला दोरीवरच्या उड्या मारायला सांगणं आहे. जमावं कसं?...

लाखात एखाद्याच शेतकऱ्याच्या पोराला मिळणारी विचार करण्याची, अभ्यास करण्याची संधी तुला मिळाली आहे. ती किमान या एका प्रश्नाचं उत्तर शोधून काढण्यासाठी वापर. 'माझ्या आईबापांनी असं कोणतं पाप केलं होतं, की त्यांना असं चिखलात झिजत राबावं लागतं? त्यांच्या श्रमाचं मोल त्यांना का मिळालं नाही? त्यांच्या घामाचं दाम कोणत्या हरामानं हिरावून नेलं?'...

मोहनदास करमचंद गांधी इंग्लंडच्या ऐश्वर्याला भुलून काही काळ साहेब बनण्याच्या प्रयत्नाला लागले; पण त्यांनी स्वतःला सावरलं आणि स्वातंत्र्याचे प्रणेते, राष्ट्रपिता झाले. ते स्वतः इंग्लंडमधल्या सुखात रममाण झाले नाहीत. तुझ्या मायबापांना लुटणाऱ्यांच्या वैभवात बोटं घालून त्यात धन्यता मानण्याचा मोह पडू देऊ नकोस.... आजची तुझी स्थिती सीतेच्या शोधासाठी गेलेल्या हनुमानासारखी आहे. लंकेचे वैभव, प्रासाद, तलाव, बागबगीचे पाहून हनुमानही विस्मयचकित झाला. पण त्या भिकारड्या रामाची कसली भक्ती करता; या अजिंक्य, महाबलाढ्य रावणाच्या ऐश्वर्याचा उपभोग घेऊ, असा विचार त्याच्या मनाला शिवलाही नाही. अशोकवनातील विरहदुःखी सीतेचा शोध त्याने चालू ठेवला म्हणून रामायण घडले.

आज भूमिकन्या सीता पुन्हा वनवासात आहे. आम्ही भूमिपुत्र तिच्या विमोचनाच्या कामाला लागणार, का लंकेश्वर रावणाच्या वैभवाचे वाटेकरी व्हायला बघणार, हा प्रश्न तुझ्यापुढे ठेवण्यासाठी हा पत्राचा प्रपंच.

*(प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश, भाग – २,*
*प्रथमावृत्ती, डिसेंबर १९८५, पृष्ठ ११४-१२०)*

शेतकरी संघटनेच्या उभारणीच्या दिवसांत ग्रामीण भागातील नव्याने शिकू लागलेला तरुणवर्ग ह्या पत्ररूपी लेखाने अक्षरशः भारावून गेला होता. अनेकांनी आपापल्या खोलीच्या भिंतीवर पत्राची प्रत चिकटवली होती. हे संपूर्ण पत्र वाचल्यानंतर गावोगावी शिकणाऱ्या हजारो शेतकरी कुटुंबातील मुलांच्या डोळ्यात पाणी उभे राहायचे; पण त्याचवेळी त्यांची मनेही आपल्यावर पिढ्यान्‌पिढ्या होत असलेल्या अन्यायाच्या जाणिवेने पेटून उठायची. पुढे शेतकरी संघटनेचा विचार एखाद्या वणव्याप्रमाणे ग्रामीण तरुणांमध्ये पसरला, ह्याचे थोडेफार श्रेय ह्या काळजाला हात घालणाऱ्या पत्रालाही नक्कीच द्यावे लागेल.

जसजसे दिवस जात गेले, तसतसा जोशींचा या ग्रामीण विद्यार्थ्यांकडे पाहायचा दृष्टिकोन बदलत गेला. 'पिढ्यान्‌पिढ्यांची गरिबी आणि निरक्षरता यांनी त्यांना सर्वार्थाने खच्ची केले होते.' किंवा 'शेतकऱ्यांच्या पोरांना शहरातील परीक्षा द्यायला सांगणं म्हणजे हत्तीला दोरीवरच्या उड्या मारायला सांगणं आहे.' यांसारख्या उपरोक्त वाक्यांवरून त्यांची प्रगल्भ झालेली जाण स्पष्ट होते.

त्यांच्या अध्यापनावरही त्यांच्या या बदललेल्या दृष्टिकोनाचा परिणाम होत गेला. आपण जे शिकवतो आहोत, ते विद्यार्थ्यांना नीट समजेल अशा प्रकारे ते शिकवू लागले. अध्यापनाचा हा अनुभव पुढे त्यांच्या खूप उपयोगी पडणारा होता. क्लिष्ट अशी अर्थशास्त्रीय तत्त्वे ते सर्वसामान्य शेतकऱ्यालाही सहज समजेल अशा भाषेत कशी मांडतात, अगदी निरक्षर ग्रामीण बायकांनाही त्यांचे क्रांतिकारक विचार कसे समजतात, डंकेल प्रस्तावासारख्या विषयावरही संघटनेचा सामान्य कार्यकर्ता मोठ्या मोठ्या अर्थशास्त्र्यांना व पत्रकारांना निरुत्तर कसा करू शकतो, याचे एक रहस्य कोल्हापुरातील अनुभवात दडलेले असावे.

इथल्या वास्तव्यात वेळात वेळ काढून प्राचार्य भणगे यांच्याबरोबर जोशींनी एका प्रकल्पासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी प्रवास करून एक सर्वेक्षण करायचे कामही केले. 'ग्रामीण विद्युतीकरणाचा कोल्हापूर जिल्ह्यात झालेला परिणाम' ह्या विषयावरचा हा अभ्यासप्रकल्प होता. विजेसारख्या वैज्ञानिक शोधांमुळे समाजात फार मोठे बदल कसे घडून येतात, हे मनावर ठसवणारा हा अभ्यास होता. विदेशात असताना तयार केलेल्या आपल्या बायोडेटात जोशींनी या प्रकल्पाचा उल्लेख केला आहे.

ह्या सगळ्या घडामोडींत स्वतःच्या स्पर्धापरीक्षेच्या अभ्यासासाठी मात्र जोशींना अजिबात वेळ मिळेना. त्यातच लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या तारखा जाहीर झाल्या. लेखी परीक्षेसाठी एकूण पाच पेपर्स होते. सगळ्या परीक्षा मुंबईतच द्यायच्या होत्या. परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी सलग पंधरा-वीस दिवस रजा सोडाच, प्रत्यक्ष परीक्षेसाठीसुद्धा एका दिवसाहून जास्त रजा घेणे शक्य झाले नाही. प्रत्येक पेपराच्या वेळी अतोनात धावपळ झाली. कोल्हापूरला कॉलेज संपल्यावर संध्याकाळची एसटी पकडायची, पुण्याला यायचे, त्याच रात्रीची पुण्याहून मुंबईला जाणारी पॅसेंजर पकडायची, पहाटे कुर्ल्याला उतरायचे, सकाळी सहापर्यंत अंधेरीला त्या काळी मोठा भाऊ राहत असलेल्या घरी जायचे, तिथे अंघोळ वगैरे उरकून दहा वाजेपर्यंत फोर्टमध्ये असलेल्या परीक्षा केंद्रावर जायचे, परीक्षा झाली, की तसेच बोरीबंदर स्टेशनवर जाऊन रात्रीची कोल्हापूरला जाणारी ट्रेन पकडायची, कोल्हापूरला भल्या सकाळी पोचायचे आणि अंघोळ उरकून पुन्हा नेहमीसारखे साडेसातपर्यंत कॉलेजवर शिकवण्यासाठी हजर राहायचे, असा सगळा द्राविडी प्राणायाम करावा लागला. पाचही पेपरांच्या बाबतीत अगदी हाच प्रकार घडला.

परिणामतः सगळे पेपर्स अगदी भिकार गेले. जोशी खचून गेले. आपले उच्च सनदी नोकर बनण्याचे स्वप्न इथे कोल्हापुरात आल्याने धुळीला मिळाले, ह्या विचाराने खूप घालमेल होऊ लागली. मुंबईतच मिळालेली नोकरी स्वीकारली असती, तर दोन-तीन लेक्चर्स घेतल्यानंतर

उरलेला सगळा दिवस अभ्यासासाठी मिळाला असता आणि शिवाय, ऐन परीक्षेच्या वेळची ही सगळी धावपळ टळली असती, पेपर्स उत्तम गेले असते; उगाचच आपण भणगेंच्या विनंतीला बळी पडलो असे त्यांना वाटू लागले. शेवटी त्यांनी ठरवले, की भणगे यांच्या स्नेहापोटी एक वर्ष गेले असे समजायचे, परीक्षा संपल्या, की ही नोकरी सोडायची, पूर्ण वेळ झटून अभ्यास करायचा आणि पुढच्या वर्षी पुन्हा ही स्पर्धापरीक्षा द्यायची.

पण प्रत्यक्षात तसे घडायचे नव्हते. जोशींना अगदी कमी गुण मिळाले असले, तरी ते उत्तीर्ण झाले असल्याने नियमानुसार त्यांना तोंडी परीक्षेचे आमंत्रण आले. तोंडी परीक्षेत त्यांना घवघवीत यश मिळाले, पहिल्या तिघांत क्रमांक लागला. शासकीय सेवेत निवड करताना तोंडी व लेखी अशा दोन्ही परीक्षांतील गुणांचा एकत्रित विचार केला जातो. सर्वसामान्यतः प्राधान्याने निवडले जाणारे इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस (IAS), इंडियन पोलीस सर्व्हिस (IPS) अथवा इंडियन फॉरिन सर्व्हिस (IFS) हे तीन पर्याय त्यांना उपलब्ध होऊ शकले नाहीत. ('IAS झालेले' हा त्यांचा खूपदा करून दिला गेलेला परिचय तितकासा बरोबर नव्हता; पण त्या काळी या आयोगाच्या परीक्षेला 'आयएएसची परीक्षा' असेच म्हटले जाई.) त्यांना उपलब्ध झालेल्या पर्यायांमधील ऑडिट अँड अकाउंट्स ही त्यांची पहिली पसंती होती; पण ते क्षेत्रही त्यांना मिळाले नाही. तोंडी परीक्षेत ज्याचा पहिला क्रमांक आला होता, त्याला ती जागा मिळाली. शेवटी इंडियन पोस्टल सर्व्हिसमधली (IPoS) जागा जोशींना स्वीकारावी लागली.

दरम्यान आणखी एक शक्यता निर्माण झाली होती. पुण्यातील सुप्रसिद्ध गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स या संस्थेमध्ये त्यांना संशोधन करण्यासाठी शिष्यवृत्ती मिळत होती. तो पर्याय तसा मोहात पाडणारा होता. अर्थशास्त्राशी संबंधित काही संशोधन करणे त्यांच्या वृत्तीला भावणारे होते. पण त्याबद्दल अधिक चर्चा करताना संस्थाप्रमुख डॉक्टर धनंजयराव गाडगीळ त्यांना म्हणाले, "इथे असं संशोधन करून शेवटी तुम्ही एक प्राध्यापकच बनणार. पण प्राध्यापकापेक्षा उच्च सनदी नोकरीचं महत्त्व अधिक आहे. प्रत्यक्ष धोरणं आखणं, त्यांची अंमलबजावणी करणं हे सारं शेवटी सनदी नोकरांच्याच हातात असतं. शासन हे परिवर्तन घडवून आणण्याचं खूप प्रभावी माध्यम आहे. तुम्ही सनदी नोकर बनून त्या प्रत्यक्ष परिवर्तनात सहभागी व्हा." गाडगीळांचा सल्ला जोशींना पटला; किंवा कदाचित असेही असेल की जोशींना स्वतःलाही विचारान्ती हेच करावेसे वाटले असेल.

मागे वळून बघताना या संदर्भात काही प्रश्न मनात येतात.

कॉलेजात शिकवण्यासाठी कोल्हापूरला गेल्याचा पश्चात्ताप होतो, असे जोशी यांनी लिहिले आहे; पण त्या पश्चात्तापाचे नेमके कारण त्यांनी स्पष्ट केलेले नाही. तिथे राहून मुंबईतल्या स्पर्धापरीक्षा दिल्यामुळे अभ्यास नीट झाला नाही एवढे ते लिहितात, पण त्यामुळे आयएएसला आपली निवड झाली नाही, ही त्यांची नेमकी खंत होती का? पोस्टल सर्व्हिससारख्या तुलनेने दुय्यम पर्यायाऐवजी आयएएसमध्ये किंवा आयएफएसमध्ये नोकरी करणे त्यांना अधिक अर्थपूर्ण वाटले असते का? पोस्टाचा पर्याय नाकारून पुढच्या वर्षी पुन्हा

एकदा स्पर्धापरीक्षा देण्याचा स्वतःचा आधीचा विचार त्यांनी का अमलात आणला नाही? आईवडलांवर आणखी वर्षभर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःच्या पायावर शक्य तितक्या लौकर उभे राहणे त्यांना व्यक्तिशः प्राधान्याचे वाटत होते का?

आणखी एक प्रश्न म्हणजे, सरकारी नोकरीत जाण्याऐवजी, इंग्लंड-अमेरिकेत जाऊन पीएच.डी. केली असती, तर ते भविष्यात अधिक श्रेयस्कर ठरले असते का? जगदीश भगवतीप्रमाणे? नाही म्हटले तरी, परदेशी विद्यापीठातल्या डॉक्टरेटला भारतीय विद्वानांच्या वर्तुळात कायम सर्वोच्च स्थान होते; जोशींना तर कुठलीच डॉक्टरेट नव्हती. आणि एकदा ते परदेशी उच्चशिक्षण घेतले, तोच प्रबंध इंग्रजी पुस्तकाच्या रूपात प्रसिद्ध केला, की मग आयुष्यभरासाठी तो एक मानबिंदू ठरला असता; व्यावसायिक प्रगतीचे अनेक दरवाजे त्यामुळे उघडले गेले असते. कदाचित भगवतीप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताही मिळाली असती. त्यात त्यांना अधिक सार्थकता वाटली असती का?

यावर आमची फक्त एकदाच चर्चा होऊ शकली. त्यावेळी जोशी म्हणाले होते,

''तसं झालं असतं, तर पुढे बर्नमधल्या नोकरीत मला जे अनुभवता आलं, त्याला मी मुकलो असतो. शेतीतही पडलो नसतो आणि हा सगळा आंदोलनाचा अविस्मरणीय अनुभवही मिळाला नसता. जर-तरचा विचार आपण आज करू शकतो, पण त्यावेळी जे काही घडायचं होतं ते घडून गेलं. कोठल्या अपघाताने कोणाच्या आयुष्याला कसं वळण लागेल, हे कोणालाही सांगता येणं शक्य नाही. 'माझ्या टर्म्सवरच मी जगेन,' असा माझा कायम आग्रह असायचा व तसं जगायचा मी आयुष्यभर प्रयत्नही केला; पण नियती म्हणूनही काही प्रकार आहे हे मला आज पटतं. ज्यावर माझं काहीच कंट्रोल नव्हतं, अशाही काही गोष्टी माझ्या आयुष्यात घडत गेल्या.''

आपल्या पोस्टातील नोकरीबद्दल जोशी सांगतात,

''पोस्टखात्यातील जागा खरं तर मला स्वीकारायची नव्हती. पण मला तिथे नोकरी मिळाली ह्याचा माझ्या वडलांना इतका आनंद झाला, की विचारायची सोय नाही. साध्या कारकुनापासून सुरुवात करून ते इतक्या वर्षांनी सुपरिंटेंडंट ह्या पदावर पोचले होते व आता नुकताच नोकरीला लागणारा त्यांचा मुलगा एकदम त्याच पदावर रुजू होणार होता. त्यांना होणारा तो आनंद बघून मग शेवटी मी पोस्टखात्यातील पद स्वीकारायचं ठरवलं.''

जोशी यांच्या ज्येष्ठ भगिनी नमाताई यांनीही साधारण अशीच आठवण प्रस्तुत लेखकाला सांगितली आहे. त्या म्हणाल्या,

''शरद रुजू झाला, त्याच कचेरीत माझ्या वडलांचे मराठे नावाचे एक मित्र काम करत होते. त्यांनी लगेच वडलांना फोन करून 'तुमचा मुलगा आता ह्या खुर्चीत बसतो आहे' ही बातमी कौतुकाने सांगितली. वडलांना अत्यानंद झाला. घरी आल्या आल्या त्यांनी ही बातमी आम्हाला दिली. आम्हा सगळ्यांनाच त्यावेळी शरदचा खूप अभिमान वाटला.'' ही घटना ऑगस्ट १९५८मधली.

पोस्टाच्या कार्यपद्धतीनुसार पहिली दोन वर्षे ते प्रोबेशनवर होते. ह्या दोन वर्षांत त्यांनी गुजरातेत बडोदे व सुरेंद्रनगर येथे, उत्तर प्रदेशात सहरनपूर येथे आणि महाराष्ट्रात रत्नागिरी व मुंबई येथे काम केले. प्रत्येक ठिकाणी साधारण चार-पाच महिने. पत्रांचे वितरण करणे हा पोस्टाच्या कामाचा केवळ एक भाग झाला. पण पोस्टखाते इतरही अनेक गोष्टी सांभाळत असते. मनीऑर्डरद्वारे देशभरात कुठेही पैसे पोचवणे, अल्पबचत विभाग, बचतखाते, खूप मोठा कर्मचारी वर्ग, जागोजागी असलेली प्रॉपर्टी. त्याकाळी तार (टेलेग्राफ) खातेही महत्त्वाचे होते व तेही पोस्टखात्याचाच भाग असायचे. एकूणच पोस्टाचा व्याप अफाट असतो. इथल्या कामाशी त्यांचा तसा साधारण परिचय होताच, पण प्रोबेशनवर असताना अधिक बारकाईने ओळख झाली. विशेष म्हणजे, एकूण देशाचीही व्यापक ओळख झाली.

प्रोबेशन संपल्यावर जुलै १९६० मध्ये त्यांची पहिली नेमणूक झाली ती मुंबईत डेप्युटी डायरेक्टर, फॉरिन पोस्ट या पदावर. डॉकयार्ड रोड येथे त्यांचे हे पहिले ऑफिस होते. नोकरीत रुबाब खूप होता. मोठे थोरले ऑफिस. पहिल्या नेमणुकीतच हाताखाली ५०० कर्मचारी. बेल दाबली की कोणीतरी लगेच हजर होणार. मर्जी सांभाळण्यासाठी सगळे कनिष्ठ अहमहमिकेने झटणार. आपल्या देशात उच्च शासकीय सत्तेचे एक वलय असतेच; त्या काळात तर ते खूपच अधिक होते. ते वलयांकित अस्तित्व कोणालाही त्या तरुण, उमेदीच्या वयात सुखावणारे होते.

सर्वसामान्य कुटुंबीयांप्रमाणे त्यांच्याही घरी नोकरीपश्चात लग्नाचा विषय आपोआपच निघू लागला. २५ जून १९६१ रोजी त्यांचे लग्न झाले. १९४३मध्ये जन्मलेल्या लीला कोनकर दिसायला देखण्या, सडपातळ, हुशार होत्या. दाखवण्याचा पारंपरिक कार्यक्रम झाला त्याचवेळी जोशींनी त्यांना पसंत केले होते; पण तेव्हा त्यांचे वय अवघे १७ होते. त्यामुळे एक वर्ष थांबायचे ठरले. प्रत्यक्ष लग्नाच्या वेळी त्या ज्युनिअर बीएच्या वर्गात होत्या. पतीपेक्षा आठ वर्षांनी लहान, म्हणजे जेमतेम अठरा वर्षांच्या. मुंबईत शिवाजीपार्क-माहीम येथील लेडी जमशेदजी रोडवरच्या रामबागमध्ये आईवडलांसह राहत होत्या. कॅम्लिन ह्या शाई, रंग व इतर स्टेशनरी बनवणाऱ्या प्रख्यात कंपनीचे मालक दांडेकर ह्यांच्यामुळे प्रसिद्ध असलेली ती इमारत. जोशी म्हणतात, ''चारचौघांप्रमाणेच रीतसर दाखवून, ठरवून झालेले हे लग्न. माझ्या निरीश्वरवादामुळे विवाह कोणताही धार्मिक विधी न करता झाला एवढेच काय ते तत्कालीन समाजापेक्षा वेगळेपण.''

दोघांनी मधुचंद्र उत्तर प्रदेशात मसूरी येथे साजरा केला. तिथून जोशी पुण्याला परत आले व कामावर रुजू झाले. मार्च महिन्यातच त्यांची इथे बदली झाली होती. सिनिअर सुपरिंटेंडंट ऑफ रेल्वे मेल सर्व्हिस, बी डिव्हिजन, पुणे, या पदावर. ते मसूरीहून परतले आणि लगेचच १२ जुलै १९६१ रोजी, पुण्यात पानशेत धरण फुटून प्रचंड हाहाकार उडाला. पोस्टखातेही त्याला अपवाद नव्हते. अनेक पोस्ट ऑफिसेसमध्ये पाणी घुसले होते, हजारो पत्रे भिजून त्यांचा लगदा झाला होता. बहुतेक ठिकाणी कर्मचारी कामावर यायच्या परिस्थितीतही नव्हते. जोशी आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी अतिशय जिद्दीने सगळ्याला तोंड दिले.

ही सुरुवातीची आपत्तिग्रस्त परिस्थिती सोडली तर एरव्ही त्यांचे पुण्यातील वास्तव्य सुखकर होते. लग्नानंतरचे हे गुलाबी दिवस. जीपीओच्या निवांत परिसरातील ज्या बंगल्यात दोघांचे वास्तव्य होते, त्या बंगल्याच्या बागेतही २८ प्रकारचे गुलाब फुलले होते.

पुण्यानंतर नोव्हेंबर १९६१ ते मार्च १९६५ ते मुंबईत होते. आधी सिनिअर सुपरिंटेंडंट ऑफ पोस्टल सर्व्हिसेस, बाँबे वेस्ट म्हणून आणि मग सिनिअर सुपरिंटेंडंट, बाँबे सॉर्टिंग डिव्हिजन म्हणून.

मार्च १९६५ मध्ये बढती मिळून जोशींची दिल्लीला बदली झाली; असिस्टंट डायरेक्टर जनरल, पोस्ट अँड टेलिग्राफ डायरेक्टोरेट या पदावर. ही दोन्ही खाती तशी एकाच मंत्रालयात असत. इथे टेलेग्राफ खाते प्रथमच त्यांच्या हाताखाली आले. त्याकाळी बिनतारी संदेशवहन फार महत्त्वाचे मानले जाई. टेलेप्रिंटर, संगणक, सॅटेलाइट वगैरेच्या आधीचे हे दिवस. परदेशात टपाल व बिनतारी संदेशवहन ह्या क्षेत्रात जे जे अभ्यास केले जातात, त्यांचे संकलन करायचे, त्यातील काय काय आपल्या देशासाठी योग्य असू शकेल ह्याची छाननी करायची व त्या अनुषंगाने टिपणे करून वरिष्ठांकडे पाठवायची असे ह्या कामाचे स्वरूप होते.

लाल बहादूर शास्त्री यांचे ताश्कंद येथील अकल्पित निधन याच काळातले. त्यानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. शपथविधीनंतरचा त्यांचा पहिलाच सार्वजनिक कार्यक्रम जोशींचे कार्यालय ज्या इमारतीत होते तिथे झाला. शास्त्रीजींच्या स्मरणार्थ काढलेल्या टपाल तिकिटाचे तेव्हा अनावरण झाले. त्यावेळी इंदिराजींना काहीसे जवळून पाहण्याची संधी मिळाली. पुढे जोशी यांनी लिहिले आहे,

> इंदिराबाई माझ्या आदराचा विषय कधीच नव्हत्या. पैतृक वारशाने अंगावर आलेले प्रचंड जबाबदारीचे ओझे सावरण्याची आपली कुवत आहे किंवा नाही याबद्दल त्यांच्या मनात असलेली जबरदस्त शंका आणि त्यातून निघणारी असुरक्षिततेची भावना यांतून देशाला मोठा धोका संभवतो याची जाणीव त्यांच्या त्या वेळच्या भाषणातूनच झाली.
>
> (*अन्वयार्थ – २*, पृष्ठ ५५)

ह्या कालखंडाविषयी बोलताना जोशी म्हणाले,

''माझ्या सर्वांत जास्त स्मरणात राहिले आहेत ते म्हणजे श्री. भि. वेलणकर. त्यांच्यासारखा बॉस मला लाभला हे नशीबच म्हणायचं. ते डायरेक्टर, पोस्टल सर्व्हिसेस ह्या वरिष्ठ पदावर होते. देशातील प्रत्येक भागाला एक विशिष्ट पिनकोड द्यायचा खूप मोठा प्रकल्प त्या काळात पोस्टखात्याने राबवला. त्यासाठी प्रत्येक राज्याचं जिल्ह्यानुसार, तालुक्यानुसार वर्गीकरण करायचं होतं. सारखी नावं असलेली अनेक गावं देशात असतात. अशा प्रत्येक गावाला वेगळे वेगळे पिनकोड मिळतील ह्याची दक्षता घ्यायची होती. भावी काळात त्या परिसरात किती पोस्ट ऑफिसेस निघू शकतील, ह्याचाही ह्या प्रकल्पासाठी अंदाज बांधणं आवश्यक होतं. कारण जसा

जसा शहरांचा विकास होतो, तसे तसे नवे विभाग विकसित होत जातात व त्यांना नवे पिनकोड द्यावे लागतात; पण त्यांची तजवीज मूळ नियोजनातच करून ठेवावी लागते. प्रत्येक विभागाला किती कर्मचारी लागतील, याचाही अंदाज घ्यायचा असतो. असे मोठे देशव्यापी प्रकल्प कधीच एखाददुसऱ्या व्यक्तीच्या हातात नसतात, त्यामुळे त्यांचं श्रेय कोणाही एका व्यक्तीला देणं चुकीचं ठरेल; पण यात वेलणकरांचा नक्कीच मोठा हिस्सा होता व मी त्यांच्या हाताखाली काम करत होतो. माझे ते दिवस आनंदात गेले. त्या काळातलं माझं एक निरीक्षण मला पुढे खूप महत्त्वाचं वाटलं होतं. शहरातील वेगवेगळ्या टपाल पेट्यांमध्ये टाकली जाणारी बहुतेक पत्रं त्या किंवा अन्य मोठ्या शहरातच जायची; जेमतेम १०% पत्रं ग्रामीण भागात जात. अन्य विकसित जगापेक्षा भारताचं हे एक वेगळेपण होतं. ग्रामीण भारताचं तुटलेपण दाखवणारं. वेलणकर एक उत्तम बॉस होते. कामाव्यतिरिक्तही आम्ही दोघं खूप गप्पा मारायचो. ते संस्कृतचे जाणकार होते. माझाही तो आवडीचा विषय. एकूणच आम्हा दोघांचं चांगलं जुळायचं. माझ्या नोकरीच्या काळात भेटलेल्या ज्या फार थोड्या व्यक्तींविषयी माझ्या मनात आदर आहे, त्यांच्यापैकी ते एक आहेत.''

दिल्लीतील नेमणुकीचा एक फायदा म्हणजे अनेकदा विदेशप्रवास करायची जोशींना संधी मिळाली. युनिव्हर्सल पोस्टल युनियन (ऊर्फ युपीयु) ही युनायटेड नेशन्सची (संयुक्त राष्ट्रसंघाची) एक घटकसंस्था. भारतही अर्थातच युपीयुचा एक सदस्य आहे. युपीयुच्या परिषदांसाठी दोन-तीन वेळा ते परदेशी गेले. इतरही दोन-तीन विदेशफेऱ्या झाल्या. सरकारी अधिकारी म्हणून परदेशी जाणे म्हणजे तशी चैनच असायची. पंचतारांकित हॉटेल्स. मेजवान्या. बड्या लोकांशी ओळखी. हा सगळा भाग म्हणजे अशा नोकरीतील 'पर्क्स'. शिवाय हे विदेशभ्रमण वैचारिक क्षितिज रुंदावणारेही होते.

ह्या पोस्टिंगमध्ये २० ऑगस्ट १९६७ ते ३० मार्च १९६८ अशा सात महिन्यांसाठी त्यांना फ्रान्सला जायची संधी मिळाली. तेथील टपालयंत्रणेचा अभ्यास करण्यासाठी. त्यासाठी फ्रान्स सरकारने त्यांना स्कॉलरशिप दिली होती. ते एकटेच गेले होते की सहकुटुंब गेले होते याची नोंद मात्र उपलब्ध कागदपत्रांत दिसली नाही.

पहिले चौदा आठवडे फक्त फ्रेंच भाषा शिकण्यासाठी विशी येथील जगप्रसिद्ध फ्रेंच भाषा अध्ययन केंद्रात ते जात होते. त्यांच्या बॅचमध्ये एकूण २१ देशांतील ४२ प्रशिक्षणार्थी होते व सगळ्यांचेच त्या प्रशिक्षणाबद्दल अतिशय चांगले मत झाले. ह्या फ्रेंचचा पुढे त्यांना खूप उपयोग होणार होता. त्यापूर्वी भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयातर्फे दिल्लीत चालवल्या जाणाऱ्या स्कूल ऑफ फॉरिन लँग्वेजेस या संस्थेत जोशी एक वर्ष रोज संध्याकाळी जात होते, पण तिथे वर्षभर जाऊनही त्यांचे फ्रेंचचे ज्ञान अगदीच तकलादू होते. याउलट विशीतल्या संस्थेत मात्र चौदा आठवड्यांत ते उत्तम फ्रेंच बोलू लागले. त्यानंतर आयुष्यात कधीच त्यांना फ्रेंच भाषेत आपले विचार व्यक्त करण्यात अडचण आली नाही. त्यांच्या मते याचे कारण म्हणजे विशी येथे वापरात असलेली प्रशिक्षणाची दृक्-श्राव्य (audio-visual) यंत्रणा. खरे

तर ऑलियान्स फ्रान्सेज् या फ्रेंच संस्थेमध्ये दिल्लीतही ती सोय होती, पण भारत सरकार तिचा उपयोग न करता स्वतःचेच धेडगुजरी प्रशिक्षण देत असे. त्यात सरकारचा पैसा व शिकणाऱ्यांचा वेळ अक्षरशः फुकट जात असे, पण कोणालाच त्याची काही पर्वा नव्हती. जेव्हा गरज पडेल, तेव्हा फ्रेंच दुभाषी मागवायची सरकारी सोय होतीच!

नंतरचे चार महिने जोशींनी प्रत्यक्ष फ्रेंच पोस्टात अभ्यास करण्यासाठी घालवला. अभ्यासासाठी त्यांना पुढील चार क्षेत्रे दिली गेली होती :

१. टपाल वर्गीकरणाचे यांत्रिकीकरण (Mechanization of sorting)
२. पोस्ट ऑफिसातील खिडक्यांमधून होणाऱ्या कामाचे यांत्रिकीकरण (Mechanization of Window operations)
३. टपालाची एका विभागातून दुसऱ्या विभागात देवाणघेवाण होते अशा कार्यालयांचे कामकाज (Working of exchange offices)
४. संख्याशास्त्रीय सेवा. (Statistical services)

फ्रेंच पोस्ट खात्यातील ह्या प्रशिक्षणात त्यांची अनेक वैशिष्ट्ये जोशींना जाणवली व भारतात परतल्यावर वरिष्ठांना दिलेल्या आपल्या ३२-पानी अहवालात त्यांनी ती नमूद केली आहेत. उदाहरणार्थ, फ्रान्सची लोकवस्ती भारताच्या एक दशांश असूनही त्यांचे सेवेचे जाळे भारतापेक्षा अधिक विस्तृत आहे. एकूण तीन लाख कर्मचारी तिथे नोकरी करतात. प्रत्येक फ्रेंच नागरिकाला दरवर्षी सरासरी २०० पत्रे पोचवली जातात. हा आकडा भारतापेक्षा खूपच अधिक आहे. फ्रेंच पोस्ट खात्याच्या स्वतःच्या मालकीच्या ५,५०० इमारती असून अतिरिक्त १३,६०० इमारती त्यांनी भाड्याने घेतलेल्या आहेत. टपाल वितरणासाठी सुमारे ३०,००० वाहने व २० विमाने वापरली जातात. सेवेचा दर्जा सतत उच्च राखला जातो. पॅरिस शहरात सकाळी दहा वाजता टाकलेले स्थानिक पत्र संध्याकाळी सहाच्या आत पोचले पाहिजे हे बंधन पाळले जाते. देशात इतरत्र जाणारे पत्र असेल, तर तेही दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सहापर्यंत पोचवणे टपालखात्याला बंधनकारक आहे. एक कर्मचारी एका तासाला २४०० पत्रांचे वर्गीकरण (सॉर्टिंग) करतो. (भारतात हेच प्रमाण एका तासाला सुमारे १००० पत्रे आहे.)

एके ठिकाणी जोशी नमूद करतात, ''त्यांच्या वितरणातील कमालीचा नियमितपणा हा आश्चर्यकारक आहे. एखाद्या विशिष्ट इमारतीत पोस्टमनने जायची वेळ ही ठरलेली असते व ती नेहमीच पाळली जाते. मी पॅरिसमध्ये ज्या हॉटेलात राहत होतो तिथे रोज सकाळी बरोबर आठ वाजायला तीन मिनिटे असताना पोस्टमन प्रवेश करायचा व माझ्या तेथील संपूर्ण चार महिन्यांच्या वास्तव्यात त्याने यायची ही वेळ एकदाही चुकली नाही.''

त्यांनी पॅरिस सोडले त्याच्या पुढच्याच महिन्यात, एप्रिल १९६८ मध्ये, लोकांमधील धुमसत असलेल्या असंतोषाचा स्फोट झाला होता; ज्याला 'पॅरिस स्प्रिंग' म्हटले जाते. विद्यार्थी, कामगार आणि शेतकरी रस्त्यावर उतरले होते. आधीचे काही महिनेही सतत निदर्शने होतच होती. जोशी तिथे होते तो कालखंड त्यामुळे फ्रान्सच्या इतिहासात बराच धामधुमीचा

मानला जातो. या सगळ्याचे पडसाद जोशींसारख्या विचारी स्वभावाच्या व्यक्तीवर नक्कीच उमटले असणार, पण त्याची नोंद अशी आपल्याला कुठे सापडत नाही.

तत्कालीन निदर्शनांचा एक भाग म्हणजे फ्रान्समधील शेतकरी आपल्या मागण्या रेटण्यासाठी वारंवार करत असलेले 'रास्ता रोको' आंदोलन. प्रा. जी. आर. दीक्षित यांच्या एका पत्राचा उल्लेख मागील प्रकरणात झाला आहे. शरद जोशींनी आपल्या आंदोलनात ज्या 'रास्ता रोको' तंत्राचा वापर केला याचा उल्लेख करताना ते लिहितात, ''कधी कधी मला असं वाटतं, की तुम्ही शेतकऱ्यांच्या चळवळीचा 'रास्ता रोको' पद्धतीचा जो अनुभव घेतला, तो तुमच्या फ्रान्समधील वास्तव्यात.''

ह्यात थोडेफार तथ्य असावे. कारण अशा प्रकारचे 'रास्ता रोको' हे फ्रान्समधील शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे एक वैशिष्ट्य होते. जोशींच्या भावी आयुष्यातील काही कृत्यांचा धागा फ्रान्समधील त्या वास्तव्यात बघितलेल्या अशा काही प्रसंगांशी जोडलेला असणे अशक्य नाही. किंबहुना, अन्यथा त्यांच्यासारखा एखादा माजी सनदी अधिकारी, विदेशात उच्चपदी राहिलेला विचारवंत, एकाएकी एका छोट्या गावातील, छोट्या आंदोलनात भर रस्त्यावर मांडी ठोकून वाहने अडवायला बसतो हे समजून घेणे तसे अवघडच आहे.

एक लक्षणीय बाब म्हणजे, त्यांनी पॅरिसमध्ये असताना हिरव्या शाईत लिहिलेली सोळा A4 आकाराची हस्तलिखित पाने उपलब्ध आहेत. डाव्या कोपऱ्यात 'पॅरिस, १९६७, फेब्रुवारी' असे लिहिलेले आहे. म्हणजे ह्या भेटीच्या आधी पॅरिसला दिलेल्या एखाद्या भेटीत हे लेखन केलेले असावे. पहिल्याच पानावरील मजकुरात 'Theory of Revolutions' हे शब्द आहेत. म्हणजे बहुधा ह्याच शीर्षकाचे जे एक पुस्तक त्यांना लिहायचे होते व सोळाव्या प्रकरणात ज्या पुस्तकाचा उल्लेख आहे त्याचीच हे लेखन म्हणजे सुरुवात असावी. वाचताना हा मजकूर खूप मूलगामी स्वरूपाचा आहे हे जाणवते. त्यात जोशी लिहितात :

> इतिहासात वेगवेगळ्या क्रांत्या झाल्या, अनेक प्रकारे उत्क्रांती होत गेली, अनेक संस्था निर्माण झाल्या. हे सारे बदल कोणा महापुरुषांमुळे घडून आले, की कुठल्यातरी अनाकलनीय अशा वैश्विक प्रेरणांमुळे?
> विशिष्ट कालखंडात एखादा बुद्ध, एखादा जिझस, एखादा ॲडम स्मिथ, एखादा मार्क्स, एखादा फोर्ड, एखादा गांधी का निर्माण होतो? हे महापुरुषांचे जन्म हा केवळ एक ऐतिहासिक अपघात असतो का? त्यांच्यामुळे परिस्थिती बदलते, का त्यांचा जन्म त्या परिस्थितीत अपरिहार्य असतो?
> या साऱ्यांना जोडणारे एखादे मूलतत्त्व असेल का?
> सगळेच मूलतत्त्ववादी (fanatics) म्हणजे फसलेले प्रेषित (prophets) असतात का? आणि सगळेच प्रेषित हे फसलेले मूलतत्त्ववादी असतात का?
> एखाद्या महात्म्याला समाजमान्यता मिळते आणि एखाद्याला ती मिळत नाही, हे कशामुळे घडते?

पहिला मानव परग्रहावरून आला असेल का?
पिंड आणि ब्रह्मांड यांचे नाते काय आहे? त्यांची रचना इतकी सारखी कशी काय?
विचार करण्याचे सामर्थ्य फक्त एकेका व्यक्तीलाच का असते; समूहाला का नसते? जडामध्येसुद्धा चैतन्य असते व चैतन्यालाही जडाचे स्वरूप धारण करावेच लागते. मग त्यातले आधी काय आले? जड आणि चैतन्य यांचे नाते काय आहे?
व्यक्तीला जसे संवेदनापटल असते, तसे वैश्विक संवेदनापटल म्हणून काही प्रकार असतो का?'

या व अशा अनेक गहन प्रश्नांवरील चर्चेची ही सोळा पाने म्हणजे केवळ सुरुवात आहे. पण हे लेखन जोशींनी पुढे केलेले नाही व त्यामुळे त्यातून त्यांना नेमके काय सांगायचे आहे हे कुतूहल शमत नाही.

३० मार्च १९६८ रोजी प्रशिक्षण संपवून जोशी भारतात परतले.

हे सारे घडत असताना एकीकडे वैवाहिक जीवनाची वाटचालही चालूच होती. लग्नानंतरच लीलाताईंनी बीएचे द्वितीय वर्ष पूर्ण केले. मोठी मुलगी श्रेया जन्मली ७ एप्रिल १९६२ रोजी; म्हणजे लग्नानंतर लगेचच. मुंबई येथे. धाकट्या गौरीचा जन्म २३ नोव्हेंबर १९६३ रोजी झाला.

जोशी म्हणत होते, ''गौरीची जन्मतारीख माझ्या चांगली लक्षात आहे, कारण तेव्हाच अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी ह्यांची डलास येथे हत्या झाल्याची बातमी मुंबईत आली होती. अर्थात प्रत्यक्ष हत्या अमेरिकन वेळेप्रमाणे २२ नोव्हेंबर रोजी झाली होती. शिवाय त्याच दिवशी भारतीय सेनेचे चार अधिकारी एका दुर्दैवी विमानअपघातात दगावले होते.''

जोशी पुढे सांगत होते, ''गौरीचा आपल्या आईवर फार जीव होता; पण तिला झोपवताना मीच लागायचो. मी वेगवेगळ्या कविता तालासुरात म्हणायचो आणि त्या ऐकता ऐकता ती झोपी जायची.''

जोशींच्या कविताप्रेमाचे एक द्योतक म्हणजे मोठ्या मुलीचे श्रेया हे नाव 'जेथे ओढे वनराई, तेथे वृत्ती रमे माझी, कारण काही साक्ष तिथे, मज त्या श्रेयाची पटते' या केशवसुतांच्या ओळींवरून सुचले आहे. धाकट्या मुलीचे नाव 'गौरी' ठेवण्यापूर्वीही त्यांनी बरीच चर्चा केली होती असे त्यांच्या बोलण्यात आले होते, पण ते नेमके कसे सुचले, हे सांगायचे गप्पांच्या ओघात राहूनच गेले होते.

इथे एक स्पष्ट करायला हवे. आपल्या वैवाहिक जीवनाविषयी, तसेच देशातील व विदेशातील नोकरीविषयी, जोशींनी फारसे काही लिहिलेले नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनाची १९५८ ते १९६८ ही दहा वर्षे व नंतरची स्वित्झर्लंडमधली आठ वर्षे असा एकूण अठरा वर्षांचा प्रदीर्घ कालखंड हा काहीसा गुलदस्त्यात राहिल्यासारखा झाला आहे. ह्याविषयी त्यांना विचारले असताना सुरुवातीला ते मला म्हणाले,

''आपल्या भूतकाळाचा फारसा कधी कुठे उल्लेख करायचा नाही, असं मी भारतात परतल्यावर जाणीवपूर्वकच ठरवलं होतं. नव्यानेच जगायला आपण आता सुरुवात केली आहे, तेव्हा उगाच त्या जुन्या आयुष्याची आठवण तरी कशाला? नाहीतरी ऋषीचं कूळ आणि नदीचं मूळ पाहू नये असं आपल्याकडे म्हणतातच. मागे परतायचे सगळे दोर आपण कापूनच टाकले आहेत. तेव्हा यापुढे विचार करायचा तो फक्त भविष्याचाच. There is nothing sweeter than the smell of the burnt bridges (जाळून टाकलेल्या पुलांच्या वासापेक्षा अधिक मधुर काहीच नसतं) असं मी अनेकदा म्हणालो आहे व त्या विधानाचा आनंद मी आयुष्यभर उपभोगत आलो आहे!''

''हे सगळं तसं ऐकायला छान वाटतं, पण तुमचं चरित्र लिहिताना एवढा मोठा कालखंड एखाद्या अंधाऱ्या बोगद्याप्रमाणे सोडून कसा द्यायचा? आयुष्यातील वेगवेगळे टप्पे एकातून दुसरा, दुसऱ्यातून तिसरा असेच उलगडत जातात ना? पूर्णतः कोऱ्या पाटीवरून अशी आपण कधीच सुरुवात करू शकत नाही; एकत्रितरीत्याच व्यक्ती समजून घेता येते,'' असे त्यावरचे माझे मत काहीशा विस्ताराने मी मांडले.

त्यांना त्यात थोडेफार तथ्य जाणवले. बऱ्याच गोष्टी तशा विस्मरणात गेल्या होत्या, पण त्यानंतरच्या चार-पाच भेटींत त्यांनी ह्या कालखंडाबद्दल आठवेल तेवढी माहिती दिली आणि तिच्याच आधारे ह्या चरित्रातला संदर्भित भाग लिहिता आला.

लौकिकदृष्ट्या सगळे काही उत्तम चाललेले असूनही कुठेतरी जोशी पोस्टातल्या नोकरीत खूप असमाधानी होते. 'आहे मनोहर तरी गमते उदास...' अशीच काहीशी त्यांची मनःस्थिती होती.

व्यावसायिक पातळीवर विचार केला तर पोस्टातील व एकूणच सरकारी कार्यसंस्कृती त्यांनी दहा वर्षांत खूप जवळून बघितली. इथे मनुष्यबळ अतिरिक्त आहे, आपल्याला नोकरीवरून कोणीही काढून टाकू शकणार नाही याची त्यांना पूर्ण कल्पना आहे, परिवर्तनाची तीव्र आस इथे कोणालाच नाही व त्यामुळे तसे परिवर्तन भविष्यात घडून यायची काही शक्यताही नाही असे काहीसे त्यांचे मत बनले होते. १९९६ साली भारतातील पोस्ट कर्मचाऱ्यांचा एक देशव्यापी संप झाला होता. त्यावेळी त्यांनी 'शेतकरी संघटक'च्या अंकात (२१ डिसेंबर १९९६) लिहिले होते,

> आजच्या तुलनेत फक्त निम्मा नोकरवर्ग घेऊन आणि आजच्या तुलनेने त्यांना निम्मा पगार देऊन मी टपालखाते चालवायला घ्यायला तयार आहे. आज कोणत्याही महत्त्वाच्या शहरामध्ये पाच दिवसांच्या आत टपाल पोहोचत नाही, तेथे चोवीस तासांच्या आत बटवड्याची हमी द्यायला मी तयार आहे. पण असले आव्हान सरकारच्याही कानी पडत नाही आणि नोकरदारांनाही त्याची नोंद घेण्याची गरज वाटत नाही. नोकर मालक बनले, की मूळ धन्याची अवस्था अशीच होणार.

ह्या उताऱ्यावरूनही त्यांचे एकूण पोस्टाबद्दलचे मत स्पष्ट होते.

व्यक्तिगत पातळीवर विचार केला तर, या नोकरीत सुरक्षा होती, पगार व सर्व सोयी चांगल्या होत्या, हाती अधिकार होता, समाजात मान होता; पण तरीही अधिकारपदाची नवलाई सुरुवातीच्या तीन-चार वर्षांत ओसरल्यानंतर ह्या नोकरीत त्यांचा जीव रमेनासा झाला होता. एक प्रकारचे साचलेपण जाणवू लागले होते. आपल्या हातून काहीतरी भव्यदिव्य व्हावे, ही लहानपणापासूनची तीव्र आस अपुरीच राहिली होती; भविष्यातही ती पूर्ण व्हायची इथे काही शक्यतादेखील दिसत नव्हती. ह्या नोकरीचा राजीनामा द्यावा असा विचार त्यांच्या मनात साधारण १९६४-६५नंतर येऊ लागला; पण समोरचा रस्ता दिसत नव्हता.

तो रस्ता सात महिन्यांच्या पॅरिसभेटीत दिसू लागला. भारत सोडून परदेशात कुठेतरी नोकरी धरावी, तिथल्या नोकरीत कदाचित आपल्याला काहीतरी आव्हानात्मक जाणवेल, आपल्या कर्तृत्वाला काही नवे धुमारे फुटतील असे वाटू लागले.

या काळात जगभरच्या पोस्टखात्यांतील इतरही अनेक अधिकारी जोशींना भेटले. त्यांच्यातल्याच एकाकडून त्यांच्या बर्न येथील मुख्य कार्यालयात एक नवीन पोस्ट तयार होते आहे व ती आपल्याला मिळण्यासारखी आहे असे त्यांना कळले. त्यासाठी जोशींनी तिथे असतानाच प्रयत्न केला व ती नोकरी त्यांना मिळेल हे साधारण ठरले.

हे आयटीच्या खूप आधीचे दिवस होते. परदेशात नोकरी करणे तितकेसे सोपे वा रूढ नव्हते. त्याचबरोबर भारतातली कायमस्वरूपी, दहा वर्षे पूर्ण झालेली, उत्तम सरकारी नोकरी सोडणे धाडसाचेच होते. आत्ता राजीनामा दिला तर फंड व ग्रॅच्युइटी मिळेल, पण पेन्शनवर पाणी सोडावे लागेल, तसेच या सरकारी नोकरीत क्लेमदेखील राहणार नाही, हे त्यांना ठाऊक होते. शिवाय आधी भारतातल्या नोकरीचा राजीनामा दिल्याशिवाय तिथली नोकरी मिळणार नाही हेही त्यांना स्पष्ट सांगण्यात आले होते.

पण 'बिकट वाट हीच वहिवाट' बनवण्याचे धाडस जोशींनी पूर्वीही आपल्या आयुष्यात केले होतेच. त्यांचे ते पराकोटीचे आत्मभान – मनात येईल ते बिनदिक्कत कुठल्याही अडचणींवर मात करून आपण करू शकतो ही जिद्द, पुन्हा एकदा उसळी खाऊ लागली.

भारतात ते परतले त्याच आठवड्यात त्यांनी इथल्या सरकारी नोकरीचा तडकाफडकी राजीनामा देऊनही टाकला. सगळी कार्यालयीन औपचारिकता पूर्ण होईस्तोवर महिना गेला. त्यांचा राजीनामा हा तसा धक्कादायकच होता; पण जोशींचा निर्धार पक्का होता.

३० एप्रिल १९६८ हा त्यांच्या भारतातील नोकरीचा शेवटचा दिवस. त्याच रात्री युपीयुमधील नोकरी स्वीकारण्यासाठी त्यांनी स्वित्झर्लंडला प्रयाण केले.

■

# ३

# डोंगरकुशीतल्या नंदनवनात

१ मे, १९६८.

स्वित्झर्लंडच्या जिनिव्हा इंटरनॅशनल विमानतळावर ३३ वर्षांच्या शरद जोशींनी पाऊल ठेवले. तसे ते पूर्वी दोन वेळा ह्या देशात आले होते, पण ते भारतीय पोस्टखात्यातील एक अधिकारी म्हणून – चारआठ दिवसांसाठी आणि अधिकृत कामासाठी. इथेच नोकरी पत्करून सहकुटुंब वास्तव्यासाठी येणे उत्कंठा वाढवणारे होते आणि रोमांचकही. सोबत २५ वर्षांची पत्नी लीला व अनुक्रमे सहा व साडेचार वर्षांच्या श्रेया व गौरी ह्या दोन मुली. लगेचच स्वित्झर्लंडची राजधानी बर्न येथील युनिव्हर्सल पोस्टल युनियन ऊर्फ युपीयुच्या मुख्यालयात ते दाखल झाले.

आंतरराष्ट्रीय पोस्टव्यवहाराचे नियमन करणारी संस्था म्हणजे युनिव्हर्सल पोस्टल युनियन (युपीयु). १८७४मध्ये ही स्थापन झाली. जगातली ही दुसरी आंतरराष्ट्रीय संस्था. पहिली आंतरराष्ट्रीय संस्था म्हणजे इंटरनॅशनल टेलेग्राफ युनियन. ती १८६५मध्ये स्थापन झाली. परस्परांतील संदेशवहन हा परस्परसंबंधांचा पायाच आहे आणि त्यासाठी आधी पोस्ट व नंतर टेलेग्राफ ही दोनच साधने त्या काळात उपलब्ध होती; साहजिकच त्यांचे महत्त्व खूप होते. सुरुवातीची अनेक वर्षे दोन्ही संस्थांचे मुख्य कार्यालय बर्न हेच होते.

पुढे १९४७ साली ह्या युनायटेड नेशन्सच्या (संयुक्त राष्ट्रसंघाच्या) घटक संस्था बनल्या. त्यानंतर इंटरनॅशनल टेलेग्राफ युनियनचे नाव बदलून इंटरनॅशनल टेलेकम्युनिकेशन्स युनियन ठेवले गेले व तिचे मुख्यालय बर्नहून जिनिव्हा येथे नेण्यात आले; युपीयु मात्र बर्नमध्येच राहिली.

युपीयुमध्ये एक संख्याशास्त्राचा विभाग असावा अशी कल्पना मांडण्यात आली होती. जोशी यांची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि भारतातील दहा वर्षांचा अनुभव ही पात्रता ह्या पदासाठी अगदी योग्य अशीच होती. त्यामुळे पूर्वी ओळख झालेल्या युपीयुच्या एका असिस्टंट डायरेक्टर जनरलने 'ह्या संस्थेत तुम्ही नोकरी स्वीकाराल का?' अशी विचारणा जोशी यांच्याकडे ते प्रशिक्षणार्थ फ्रान्समध्ये गेले असताना केली होती.

जोशी यांनाही त्यावेळी असा बदल अगदी हवाच होता. त्यांनी लगेच होकार दिला. मागील प्रकरणात हा भाग आलाच आहे.

"Please sit down. Be comfortable. What drink can I offer you?" आपल्या कार्यालयात त्यांचे हस्तांदोलन करून स्वागत करताना असिस्टंट डायरेक्टर जनरलनी आपुलकीने विचारले आणि त्या पहिल्या प्रश्नातच आपण आता एका अगदी नव्या विश्वात प्रवेश केला आहे हे जोशींना जाणवले. भारतीय पोस्टखात्यातील दहा वर्षांच्या नोकरीत कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्याने त्यांचे असे मित्रत्वाच्या व बरोबरीच्या नात्याने स्वागत केले नव्हते.

समोरासमोर असलेल्या कोचांवर बसून दोघांच्या गप्पा सुरू झाल्या. सुरुवातीला अनौपचारिक पण दोन-चार मिनिटांतच प्रत्यक्ष कामाच्या स्वरूपाविषयी.

त्याच दिवशी जोशींनी कामाला सुरुवात केली. राहायला घर घेणे, मुलींसाठी शाळेत प्रवेश घेणे वगैरे सर्व सोपस्कारही थोड्याच दिवसांत पार पडले.

इंटरनॅशनल ब्युरो (आयबी) हा युपीयुचा एक विभाग होता व ह्याच विभागात जोशींची नेमणूक झाली होती. त्यांचे अधिकृत पद होते 'थर्ड सेक्रेटरी'. आपण वापरतो त्या अर्थाने इथे सेक्रेटरी हा शब्द नाही. युपीयुतील अधिकाऱ्यांच्या एकूण सात श्रेणी होत्या – सुरुवातीची श्रेणी 'थर्ड सेक्रेटरी', मग 'सेकंड सेक्रेटरी', त्यानंतर 'सेक्रेटरी', त्यानंतर 'काउन्सेलर', त्यानंतर 'डायरेक्टर' व त्यानंतर 'असिस्टंट डायरेक्टर जनरल'. शेवटी मग अशा वेगवेगळ्या विभागांच्या असिस्टंट डायरेक्टर जनरल्समधून एकाची नेमणूक डायरेक्टर जनरल म्हणून होत असे. एकूण कर्मचाऱ्यांचा विचार केला तर अर्थातच स्विस नागरिक हे तिथे बहुसंख्य होते, पण अधिकारीवर्ग मात्र जगातल्या वेगवेगळ्या देशांतून आलेला असे.

आल्प्स पर्वतरांगांच्या कुशीत वसलेला स्वित्झर्लंड हा छोटासा देश पृथ्वीतलावरील नंदनवन म्हणूनच जगभर ओळखला जातो. लांबवर पसरत गेलेल्या गगनस्पर्शी बर्फाच्छादित पर्वतरांगा, उंच उंच वृक्ष, हिरवीगार कुरणे, त्यात मनसोक्त चरणाऱ्या धष्टपुष्ट गायी, त्यांच्या गळ्यातील घंटांचा खुळावून टाकणारा मंजूळ नाद, निळेभोर आकाश, स्वच्छ गुळगुळीत रस्ते, प्रत्येक घरासमोर व गॅलरीत बहरलेली रंगीबेरंगी फुले. सगळे अगदी एखाद्या पिक्चर पोस्टकार्डाप्रमाणे!

पण निसर्गसौंदर्यापलीकडेही ह्या देशात खूप काही आहे. दरडोई उत्पन्नामध्ये ह्या देशाचा क्रमांक सातत्याने जगात जवळजवळ पहिला असतो. ही संपत्तीदेखील हक्काने शोषण करायला उपलब्ध होईल अशी स्वतःची कुठलीही वसाहत नसताना. रोश वा नोव्हार्तिस यांसारख्या जगातील सर्वांत मोठ्या औषधकंपन्या इथल्याच. खते-रसायने बनवणाऱ्या सिन्जेन्टा वा सिबा, घड्याळे बनवणाऱ्या रोलेक्स वा फावर लुबा, कापडगिरण्यांना लागणारी यंत्रे बनवणारी सुलत्झर, एलेव्हेटर बनवणारी शिंडलर, सिमेंट बनवणारी होल्सिम, वीजनिर्मिती व पुरवठा करणारी एबीबी, कच्च्या मालाचा घाऊक व्यापार करणारी ग्लेनकोर, दुग्धपदार्थ वा चॉकलेट बनवणारी नेसले अशा अनेक आघाडीच्या बहुराष्ट्रीय कंपन्या स्वीस आहेत. युबीएससारख्या इथल्या बँका आपल्या संपूर्ण सुरक्षित व्यवहारासाठी जगभर विश्वासार्ह म्हणून

प्रसिद्ध आहेत; जगभरातून त्यांच्याकडे सोन्याचा व पैशाचा ओघ वाहत असतो.

पण ह्या उद्योगांपुरती व संपत्तीपुरती ह्या देशाची ख्याती सीमित नाही. गेली सात-आठशे वर्षे ह्या देशात लोकशाही अखंड टिकून आहे. ह्या देशावर त्या प्रदीर्घ कालावधीत अन्य कुठल्याही देशाने राज्य केलेले नाही. इथला सर्वसामान्य नागरिकही कमालीचा लढवय्या व स्वातंत्र्याचा भोक्ता आहे. अठरा वर्षांवरील प्रत्येकाला लष्करी शिक्षण घेणे व किमान दोन वर्षे लष्करात काम करणे सक्तीचे आहे. शिवाय, आवश्यक ती शस्त्रे त्याच्या घरीच असतात व अवघ्या चोवीस तासांच्या अवधीत तो लष्करी कामासाठी सुसज्ज होऊ शकतो. सगळा युरोप पादाक्रांत करणाऱ्या हिटलरलाही ह्या टीचभर देशावर आक्रमण करायची कधी हिंमत झाली नव्हती. स्वित्झर्लंड देश बहुतांशी डोंगराळ. त्यात पुन्हा थंडी कडाक्याची. स्वतःकडे खनिजसंपत्ती अशी जवळजवळ अजिबात नाही. असे असूनही आज हा देश इतका समृद्ध बनला आहे कारण काटक कष्टाळू समाज व प्रगतिपूरक शासकीय धोरणे. विशेष म्हणजे जनता शस्त्रसुसज्ज असूनही या देशाने कधीच अन्य कुठल्या देशावर आक्रमण केलेले नाही.

आपली अलिप्ततादेखील ह्या देशाने कटाक्षाने जपली आहे. त्यामुळेच युनायटेड नेशन्सच्या रेड क्रॉस, इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन वगैरे तब्बल २५ संस्थांची मुख्यालये आज ह्या देशात आहेत. लीग ऑफ नेशन्स ही पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेली संस्था म्हणजे आजच्या युएनचे मूळ रूप; तिचेही मुख्यालय जिनिव्हा हेच होते. जिनिव्हा हे स्वित्झर्लंडमधील सर्वांत आंतरराष्ट्रीय शहर मानले जाते; पण देशाची राजधानी मात्र बर्न ही आहे.

स्वित्झर्लंडची विभागणी वेगवेगळ्या २६ कँटोन्समध्ये झालेली आहे व प्रत्येक कँटोन बऱ्यापैकी स्वायत्त आहे. देशात ६४ टक्के जर्मनभाषक व सुमारे २३ टक्के फ्रेंचभाषक आहेत. ह्याशिवाय छोट्या प्रमाणात ८ टक्के इटालियन व अगदी छोट्या प्रमाणात रोमांश ह्या दोन भाषाही बोलल्या जातात. जिनिव्हा फ्रेंचभाषक आहे, तर राजधानी बर्नमध्ये जर्मन भाषा बोलली जाते. पण आश्चर्य म्हणजे, सर्व युएन संस्थांमध्ये दैनंदिन व्यवहाराची भाषा फ्रेंच हीच त्यावेळी होती. जोशींना फ्रेंच चांगले येत होते व ही नोकरी त्यांना मिळण्यामागे ती एक जमेची बाजू मानली गेली होती.

१९६८ ते १९७६ ही आठ वर्षे जोशींनी इथे काढली. पण त्या काळाबद्दल अनेकदा प्रश्न विचारूनही जोशी विशेष काही माहिती पुरवू शकले नव्हते. तो सारा काळ जणू आता त्यांच्या विस्मृतीतच गेला होता. 'त्याकाळातील तुमचा कोणी सहकारी आज मला भेटू शकेल का?' ह्या प्रश्नालाही त्यांचे उत्तर सुरुवातीला नकारार्थीच होते.

तेवढ्यात एक अनपेक्षित घटना घडली. त्यांची मोठी मुलगी श्रेया सहकुटुंब स्वित्झर्लंडला जाणार होती व त्या भेटीत ते सर्व जोशी यांच्या तेथील एका जुन्या सहकाऱ्याकडे व शेजाऱ्याकडे राहणार होते. ह्या सहकाऱ्याबरोबर सर्व जोशी कुटुंबीयांचेच एकेकाळी खूप जवळचे संबंध होते, असेही त्यांच्या बोलण्यात आले. ''मी त्या सहकाऱ्यांना

भेटू शकतो का?'' मी विचारले. कारण योगायोगाने एका सामाजिक संस्थेच्या परिषदेसाठी मला त्यानंतर महिन्याभरातच स्वित्झर्लंडमध्ये जायचे होते. जोशींना ती कल्पना आवडली व त्यानुसार त्याच दिवशी जोशींनी आपल्या त्या एकेकाळच्या सहकाऱ्याला इमेलवरून कळवले व चरित्रलेखनासाठी मला शक्य ती माहिती देण्याची विनंती केली.

नंतर त्यांच्याशी माझा इमेलवर संपर्क झाला व भेटीचे नक्की झाले. ते बर्न येथे राहत होते. आमचे बाझलजवळ राहणारे एक स्नेही डॉ. अविनाश जगताप हेही मी व माझी पत्नी वर्षा यांच्याबरोबर आले. आपल्या सँडोझमधील नोकरीमुळे ते स्वित्झर्लंडमध्येच स्थायिक झाले असले, तरी जगताप मूळचे पुण्याचे. बहुजनसमाजात शिक्षणप्रसाराचे मोठे काम करणारे त्यांचे वडील प्राचार्य बाबुराव जगताप एकेकाळी पुण्याचे महापौरदेखील होते. आम्ही तिघेही एकत्रच बर्नला गेलो. तिथे जोशी यांच्या त्या माजी सहकाऱ्याला भेटणे ह्या लेखनासाठी महत्त्वाचे ठरले. कारण ह्या आठ वर्षांच्या कालखंडाबद्दल त्यांनी भरपूर माहिती दिली व ती त्यांच्याइतकी खात्रीपूर्वक दुसरा कोणीच देऊ शकला नसता. त्यांचे नाव टोनी डेर होवसेपियां (Tony Der Hovesepian). सोयीसाठी म्हणून यापुढे त्यांचा उल्लेख टोनी असा करत आहे.

गुरुवार, १२ जुलै २०१२. साधारण सकाळची नऊची वेळ.

बर्न रेल्वेस्टेशनवरून आम्ही ट्राम पकडली व Weltpost ह्या स्टॉपवर उतरलो. ह्या जर्मन शब्दाचा अर्थ जागतिक पोस्टऑफिस. ठरल्याप्रमाणे टोनी आमची तिथे वाटच पाहत होते. पुढला सगळा प्रवास आम्ही त्यांच्याच मोटारीने केला.

इथेच युपीयुचे प्रचंड मुख्यालय आहे. ते आम्ही आधी बघितले. युपीयुचे व पूर्वी बर्नमध्येच असलेल्या इंटरनॅशनल टेलेकम्युनिकेशन्स युनियनचे प्रतीक म्हणून स्विस सरकारने सुमारे शंभर वर्षांपूर्वी उभारलेली धातूची दोन अप्रतिम शिल्पे बघितली. ही दोन्ही शिल्पे दोन स्वतंत्र चौकांत असून आपल्या मुंबईतील हुतात्मा स्मारकाच्या साधारण चौपट आकाराची आहेत. त्यानंतर आम्ही नॉयेनेग (Neuenegg) ह्या बर्नचे उपनगर म्हणता येईल अशा छोट्या गावात गेलो. इथेच टुल्पेनवेग (Tulpenweg) या रस्त्यावर असलेल्या एका प्रशस्त व सुंदर इमारतीत जोशी आपल्या आठ वर्षांच्या वास्तव्यापैकी सुमारे सात वर्षे राहिले. टोनी यांचा फ्लॅटदेखील त्यांच्या शेजारीच होता. जोशींचा फ्लॅट क्रमांक होता 3C, तर टोनी ह्यांचा 3D. तीही जागा आम्ही बघितली.

टोनी साधारण जोशी यांच्याच वयाचे; कदाचित दोन-चार वर्षांनी लहान असू शकतील. शिडशिडीत आणि उंच. मूळचे आर्मेनिया ह्या युरोप व आशिया यांच्या सीमेवरच्या प्राचीन व पुढे सोविएत संघराज्याचा एक भाग बनलेल्या देशातले. अधिकृत धर्म म्हणून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करणारे हे जगातले पहिलेच राष्ट्र. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला, म्हणजे सुमारे शंभर वर्षांपूर्वी, तुर्की आक्रमकांनी, जवळ जवळ १५ लाख आर्मेनिअन लोकांची अत्यंत क्रूरपणे कत्तल केली. बायका-मुलांनाही त्यांनी सोडले नाही. कसाबसा जीव मुठीत

धरून टोनी ह्यांचे आई-वडील लेबनॉनला पळाले. तिथेच टोनी ह्यांचा जन्म झाला. तिथून ते कुवेतला गेले व तेथील पोस्टात नोकरीला लागले. कुवेत त्यावेळी ब्रिटिश नियंत्रणाखाली होता व तेथील पोस्टखाते ब्रिटिश पोस्टखात्याशी जोडलेले होते. तिथूनच त्यांना युपीयुमध्ये १९६५ साली नोकरी लागली. शरद जोशी तिथे यायच्या आधी तीन वर्षे. दोघेही 'थर्ड सेक्रेटरी' ह्याच श्रेणीत होते. आपल्या पत्नीसह टोनी आजही त्याच घरात राहतात; जिथे सात वर्षे जोशी त्यांचे शेजारी होते. टोनी म्हणत होते,

''आम्ही दोघेही पहिल्या-दुसऱ्या दिवसापासूनच एकमेकांना पहिल्या नावाने हाक मारू लागलो. शरद कामावर रुजू झाला तेव्हा त्याची बसायची केबिन व माझी केबिन शेजारीशेजारीच होती. मी ह्या नव्या इमारतीत फ्लॅट घेतल्याचं ऐकल्यावर त्यानेही ह्याच इमारतीत फ्लॅट घ्यायचं ठरवलं. अगदी शेजारचाच फ्लॅट. आम्ही साधारण एकाच वेळी तिथे शिफ्ट झालो.

''शरद अतिशय हुशार व कर्तबगार होता. सुमार बुद्धिमत्तेची माणसं त्याला आवडत नाहीत असा साधारण समज ऑफिसात रूढ होता. शिष्ट म्हणूनच त्याची ख्याती होती. याचं कारण थोड्या दिवसांतच मला समजलं. युपीयुमधले अनेक कर्मचारी निम्नस्तरीय श्रेणीतून चढत चढत वर आले होते तर, शरद मात्र इंडिअन पोस्टल सर्विस ह्या उच्च श्रेणीतच प्रथमपासून राहिला होता. साहजिकच तो इतर सहकाऱ्यांच्या तुलनेत उठून दिसे. पण सुदैवाने आमचे राहायचे फ्लॅट शेजारी शेजारी व कामावर बसायची जागाही शेजारी म्हटल्यावर साहजिकच आमच्यात चांगली मैत्री झाली. आमचं घर ऑफिसपासून मोटारने जेमतेम पंधरा मिनिटांच्या अंतरावर होतं. ऑफिसात जाता-येताना व दुपारी जेवायला जाता-येताना आम्ही एकत्र जात असू. कधी त्याच्या मोटारीने तर कधी माझ्या मोटारीने.

''शरद जॉईन झाला त्याच वर्षी आमच्या ऑफिसात एक स्टाफ असोसिएशन सुरू झाली. मी तिचा एक कमिटी मेंबर होतो. बरेच उपक्रम आम्ही राबवत असू. त्या कमिटीत यायची शरदची फार इच्छा होती. पुढल्या वर्षी कमिटीच्या निवडणुकीला तो व मी असे दोन उमेदवार उभे होतो. पडणाऱ्या मतांनुसार पॉइंट्स मोजले जात. एकूण शंभर पॉइंट्स असत. गंमत म्हणजे दोघांनाही सारखी मतं पडली. नियमानुसार पुन्हा एकदा मतदान घेतलं गेलं. त्यावेळी त्याला ५१ व मला ४९ पॉइंट्स मिळाले; कारण माझं स्वतःचं मत मी त्याला दिलं होतं!

''ऑफिसात आम्ही ब्रेकमध्ये टेबल टेनिस खेळायचो. मला हा गेम खूप आवडायचा व चांगला यायचाही. १९७४च्या सुरुवातीला लोझान येथे युनिव्हर्सल पोस्टल काँग्रेस भरली होती. तिला मोठं चायनीज डेलेगेशन आलं होतं. प्रथमच. त्यांच्यात व आमच्या आयबी खात्यात शरदने एक टेबल टेनिस स्पर्धा आयोजित केली होती. आम्ही ती जिंकावी अशी त्याची फार इच्छा होती. किसिंजरच्या चायनाभेटीतील पिंगपाँग डिप्लोमसीमुळे त्यावेळी टेबल टेनिस खूप लोकप्रिय झालं होतं. आम्ही स्वतःला चांगलं खेळणारे समजत होतो व आम्ही बऱ्यापैकी प्रॅक्टिसही केली होती, पण चायनीज प्रतिनिधींपुढे आमचा अगदी धुव्वा उडाला! शरद खट्टू झाला होता; त्याला हरणं आवडत नसे.''

जोशींचे कौटुंबिक जीवन कसे होते, हे विचारल्यावर टोनी सांगू लागले,

''माझी पत्नी थेरेसा व लीला चांगल्या मैत्रिणी झाल्या. थेरेसा ४८ सालची, म्हणजे दोघींचं वयही साधारण सारखं होतं. थेरेसा एका लहान मुलांच्या शाळेत शिकवायची व पुढे तिने स्वतःच एक शाळा सुरू केली. आजही ती तेच काम करते. मुख्यतः वेगवेगळ्या कॉन्स्युलेट्समध्ये काम करणाऱ्यांची मुलं तिथे येतात. लीला मात्र घरीच असे. दोन मुलींना सांभाळणं हेच तिचं पूर्णवेळचं काम होतं. कधी कधी तिला घरी बसून कंटाळा यायचा हे खरं आहे, पण संस्थेच्या नियमानुसार तिला कुठल्याही प्रकारची नोकरी वा व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. माझी पूर्वीची नोकरी ब्रिटिश पोस्टखात्यातली होती व मी मूळचा आर्मेनियाचा; ह्या देशात अधिकृत निर्वासित मानला गेलेला. त्यामुळे आम्हाला स्विस नागरिकत्व लगेचच मिळून गेलं व साहजिकच थेरेसाला अर्थार्जन करायची मुभा मिळाली होती. शरदचं नागरिकत्व मात्र भारतीयच होतं. अर्थात युएन संस्थांमध्ये पगार उत्तम मिळायचे; इतर स्विस कंपन्यांपेक्षा व सरकारपेक्षा आमचा पगार निदान ३० टक्के अधिक होता. शिवाय इतरही फायदे खूप मिळत. त्यामुळे एकाच्याच पगारात घर चालवणं कठीण नव्हतं.

''जोशींना दोन मुली होत्या, तर आम्हाला लौकरच आमचा पहिला मुलगा झाला. एप्रिल ६९मध्ये झालेला पॅट्रिक. पुढे जोशींच्या दोन मुली व आमचा मुलगा अशी तिघं एकत्र खेळू लागली, एकत्र शाळेत जाऊ लागली. सगळ्यांची शाळा एकच – तेथील इंटरनॅशनल स्कूल. त्यांना शाळेत सोडायचं कामदेखील आम्ही वाटून घ्यायचो; कधी आम्ही तर कधी ते सोडायचे. फिरायला, नाटक-सिनेमा बघायला आम्ही एकत्रच जायचो.

''शरद ऑफिसात खूप गंभीर व अबोल असे, पण लहान मुलांशी खेळताना तो अगदी लहान होऊन जाई. ऑक्टोबर ७०मधला एक प्रसंग मला आठवतो. आमचे डायरेक्टर जनरल त्यावेळी एक इजिप्शिअन गृहस्थ होते. त्यांनी एकदा मला व थेरेसाला त्यांच्या घरी जेवायला बोलावलं होतं. शरद व लीलाला मात्र आमंत्रण नव्हतं. कदाचित मी आर्मेनियन असल्याने, म्हणजे त्यांच्या एकेकाळच्या शेजारी देशातील असल्याने, मला इजिप्शिअन जेवण आवडेल असं त्यांना वाटलं असावं. तेव्हा आमचा पॅट्रिक दीड वर्षांचा होता. डिनरपार्टीला त्याला कुठे नेणार, म्हणून आम्ही त्याला जोशींच्या घरी ठेवायचं ठरवलं. अर्थात त्यांच्या संमतीने. आधी तो खूप रडत होता, त्यामुळे जावं की जाऊ नये अशा संभ्रमात थेरेसा होती. पण शरद व लीला 'अगदी खुशाल जा' असं दोन-तीनदा म्हणाल्यामुळे आम्ही त्याला त्यांच्या घरी ठेवून गेलो. तो राहील की नाही ह्याविषयी आम्हाला खूप धास्ती होती; त्याला असं सोडून जायची ही पहिलीच वेळ. रात्री उशिरा घरी परतलो व काहीशा धाकधुकीतच शेजारच्या फ्लॅटची बेल वाजवली. आधी वाटलं होतं, पॅट्रिक झोपला असेल, मग वाटलं तो रडून रडून बेजार झाला असेल आणि शरद-लीलालादेखील त्याने खूप त्रास दिला असेल. पण प्रत्यक्षात लीलाने दार उघडलं, तेव्हा पॅट्रिक चक्क जागा होता व शरद त्याच्याशी अगदी मजेत, हसत हसत खेळत होता. खूप रात्र झाली होती तरी दोघं खेळण्यात इतके दंग झाले होते, पॅट्रिकला त्याने इतका लळा लावला होता, की नंतर आमच्या फ्लॅटमध्ये त्याला परत नेताना तो रडू लागला! शरदचं

एक वेगळंच रूप त्या दिवशी मला दिसलं!

“खूप मजेत गेली ती वर्षं. आमच्या इमारतीतली इतरही बहुतेक सर्व कुटुंबं युएनबरोबरच काम करणारी होती. बऱ्यापैकी समवयस्क होती. आमची छान गट्टी जमली. संध्याकाळी तळमजल्यावरच्या पार्किंग लॉटवर आम्ही एक बॅडमिंटन कोर्ट तयार केलं होतं. टेबलटेनिसचीपण सोय होती. जवळ जवळ रोजच संध्याकाळी जेवल्यानंतर सगळे एकत्र खेळायचो. तिथेच एका कोपऱ्यात बार्बेक्यू होता व दुसऱ्या कोपऱ्यात बार. शरद स्वतः बहुतांशी शाकाहारी होता, पण लीला व मुली मात्र सगळं खात. शरदला ड्रिंक घेणं आवडायचं. खूपदा आम्ही एकत्र जेवायला जायचो, पण त्याला ड्रिंक चढलं आहे असं मात्र इतक्या वर्षांत मी कधीही पाहिलं नाही. तसं त्याचं वागणं अगदी संयमी होतं. पाश्चात्त्य रीतीरिवाज, खाणंपिणं, कपडे हे सारं इथे आल्यावर अगदी थोड्याच दिवसांत जोशी कुटुंबीयांच्या पूर्ण अंगवळणी पडलं होतं. ते सारे उत्तम फ्रेंच बोलत. आमच्या घरापासून जवळच प्रसिद्ध गानटू (Gäntu) डोंगराची सुरुवात होती. बहुतेक रविवारी आम्ही डोंगरावर जायचो. स्कीइंग आणि डोंगर चढणं हे आमचे जणू राष्ट्रीय खेळच आहेत. पुढे शरदलाही डोंगरांमधून मनसोक्त भटकणं आवडू लागलं. बाहेर खूप थंडी व पाऊस असेल तर मात्र घरात राहावं लागे.

“अशावेळी शरदला बुद्धिबळ खेळायला आवडायचं. अर्थात मला स्वतःला बुद्धिबळ फारसं येत नसे. त्यामुळे प्रत्येक वेळी तोच जिंकायचा. एकदा दुपारी मी त्यांच्या घरी गेलो असताना समोर टेबलावर ठेवलेलं *How to play Chess* नावाचं एक पुस्तक मला दिसलं. सहज म्हणून मी ते वाचायला लागलो. आवडलं म्हणून घरी घेऊन गेलो व पूर्ण वाचून काढलं. योगायोग म्हणजे त्या रात्री आम्ही बुद्धिबळ खेळायला बसल्यावर सगळे डाव तो हरला! हे मोठंच आश्चर्य होतं. ‘टोनीने तुला चेकमेट करणं म्हणजे अगदी नवलच आहे! असं कसं झालं?’ लीलाने विचारलं. ‘कारण तो माझ्यापेक्षा चांगला खेळला म्हणून’ एवढंच त्यावर शरद म्हणाला. मला स्वतःलाही मी कसा जिंकू शकलो ह्याचं नवल वाटलं. कदाचित त्या पुस्तकाचा तो परिणाम असेल! पण त्यानंतर एक गोष्ट घडली, जिचं स्पष्टीकरण मी आजही देऊ शकणार नाही. ती म्हणजे त्या रात्रीनंतर शरदने माझ्याशी बुद्धिबळ खेळणं पूर्ण बंद केलं. दोन-तीनदा ‘चल, एक डाव टाकू’ असं मी सुचवलं, पण त्याने स्पष्ट नकार दिला. न खेळण्याचं कारणही त्याने काहीच सांगितलं नाही.”

आपले ऑफिसमधील काम सुरुवातीला जोशी यांना खूप आवडत होते. अर्थात त्यात प्रत्यक्ष कामापेक्षा ऑफिसातील अत्याधुनिक सुखसोयी, आंतरराष्ट्रीय वातावरण, कार्यसंस्कृती ह्यांचा वाटा अधिक होता. कामात कसलाही ताण नसे. शनिवार-रविवार सुट्टी असे. त्यामुळे वाचनासाठी भरपूर वेळ उपलब्ध असे. युपीयुचे सुसज्ज ग्रंथालय होते व शिवाय स्वतःच्या कामाला उपयुक्त अशी पुस्तके विकत घेण्याची अधिकाऱ्यांना मुभा होती. कामाच्या निमित्ताने जिनिव्हाला सारखे जावे लागे. तिथे पुस्तकांची मोठी मोठी दुकाने होती. जिनिव्हातले अधिकृत काम आटोपले, की तासन्तास या दुकानांत जोशी रमत. “किंमत किती आहे ह्याचा जराही

विचार न करता पुस्तकं विकत घेण्यातला आनंद मी तिथे भरपूर उपभोगला. प्रचंड वाचन केलं,'' ते एकदा सांगत होते.

''इतकी वर्षं तुम्ही दोघांनी एकत्र काम केलं; ह्या कालावधीतील ऑफिसमधल्या काही आठवणी तुम्ही सांगू शकाल का?'' ह्या प्रश्नाला उत्तर देताना टोनी म्हणाले,

''आठवायला लागलं तर अशा बऱ्याच आठवणी आहेत. आपल्या कामात शरद खूप हुशार होता. एका परिषदेतील त्याच्या सादरीकरणाने प्रभावित होऊन युनायटेड नेशन्स डेव्हेलपमेंट प्रोग्रॅम (UNDP) ह्या एजन्सीने ती युपीयुच्या टेक्निकल असिस्टन्स प्रोग्रॅमला देत असलेल्या निधीत लगेचच मोठी वाढ केली होती. अनेकांनी शरदची त्यावेळी स्तुती केली, पण तेवढ्यापुरतीच; नंतर सगळे त्याला विसरून गेले! त्याला अपेक्षित होती ती नोकरीतली बढती काही शरदला मिळत नव्हती. एकूणच आपल्याला आपल्या कामाचं उचित श्रेय कधी मिळत नाही असं त्याला नेहमीच वाटत असे व हा त्याच्या कमनशिबाचाच एक भाग आहे असं तो म्हणायचा. मला आठवतं, एकदा एका खात्यात चांगली सिस्टिम लावून देण्यासाठी त्याने खूप मेहनत घेतली. तिथून त्याची लौकरच दुसऱ्या खात्यात बदली होणार होती हे त्याला ठाऊक होतं, पण तरीसुद्धा त्याने हे परिश्रम घेतले होते. मी त्याला विचारलं, 'तू तर आता इथून जाणार. मग ह्या सगळ्याचा तुला काय फायदा होणार? कशासाठी हे श्रम घेतलेस तू?' त्याचं उत्तर माझ्या आजही लक्षात आहे. तो म्हणाला होता, 'आपण लावलेल्या झाडाची फळं आपल्याला खायला मिळणं हे प्रत्येकाच्या नशिबात नसतं.'

''मग त्याने मला येशू ख्रिस्ताच्या चौथ्या शिष्याची एक गोष्ट सांगितली होती. ती साधारण अशी होती. बेथलेहेममध्ये ज्या दिवशी ख्रिस्तजन्म झाला त्या दिवशी आकाशात एक खूप तेजस्वी तारा दिसला होता – ज्याचं प्रतीक म्हणून आम्ही ताऱ्याचा आकार असलेले कंदील नाताळच्या दिवशी लावतो. त्यावेळी असे तीन संत होते, ज्यांना तो तारा बघून कळलं, की येशूचा, देवाच्या मुलाचा जन्म होतो आहे व ते तिघे जण येशूचं स्वागत करायला बेथलेहेमकडे निघाले. यथावकाश ते तिथे पोहोचले व त्यांनी लहानग्या येशूचं कोडकौतुक केलं. तीन संतांची ही कथा प्रसिद्ध आहे, पण दुसरा एक भाग त्यात आलेला नाही. तो म्हणजे सामिरतान (सर्मॅरिटन) नावाच्या तशाच एका चौथ्या संताची कथा. पुढे कुठल्यातरी एका इंग्रजी लेखकाने ती लिहिली होती व शरदच्या वाचनात आली होती म्हणे. हा संतदेखील तो तारा पाहून इतर तीन संतांच्या आधीच युरोपातून मध्यपूर्वेत बेथलेहेमला यायला निघाला होता; पण वाटेतल्या एका जंगलात काही लुटारूंनी त्याला पकडलं. त्याचं सगळं सामान लुटलं; अगदी त्याचे कपडेसुद्धा काढून घेतले आणि समुद्रकिनाऱ्यावर एका गुलामांचा व्यापार करणाऱ्याला विकलं. ख्रिस्ताचा पहिला संत बनण्यासाठी जो निघाला होता, तो अशाप्रकारे गुलाम बनला. त्या व्यापाऱ्याने सामिरतानला बोटीत भरलं व आफ्रिकेला नेऊन गुलाम म्हणून विकलं. गुलामगिरीच्या नरकयातना सोसत, चाबकाचे फटके खातखात त्याने अनेक वर्षं कशीबशी काढली. एक दिवस अचानक कशीतरी संधी मिळाली व तो मालकाच्या घरून पळाला. मनात

ख्रिस्ताची भक्ती होतीच. पुन्हा त्याने बेथलेहेमची वाट पकडली. ख्रिस्तजन्माच्या वेळी आपण बेथलेहेमला पोचू शकलो नाही, पण आतातरी आपण तिथे जाऊ व त्याचं दर्शन घेऊ, ह्या आशेवर. शेवटी एकदाचा तो बेथलेहेमला पोचला. पण नेमक्या त्याच दिवशी ख्रिस्ताला सुळावर चढवण्यात आलं होतं. ख्रिस्ताचा पहिला शिष्य बनण्याऐवजी सुळी दिलेल्या ख्रिस्ताला सुळावरून उतरवण्याचं काम त्याच्या नशिबी आलं! 'मी ख्रिस्ताच्या त्या चौथ्या शिष्याप्रमाणे आहे, माझ्या कष्टांचं फळ मला कधीच मिळणार नाही आणि लहानपणापासूनच मी हे ओळखून आहे,' असं शरद तेव्हा म्हणाला होता.''

श्रेयविहीनतेची ही जाणीव जोशींच्या भावी आयुष्यातही पुनःपुन्हा डोकावते.

शरद जोशी यांनी नंतर केलेल्या लेखनात स्वित्झर्लंडबद्दल तुरळक असे काही उल्लेख आहेत. एकूणच तो देश इतका समृद्ध आणि विशेष म्हणजे सुशासित असा आहे, की अडचणी अशा फारशा काहीच येत नाहीत; क्वचित कधी एखादी अडचण आली, तर किती तत्परतेने शासन आपत्तिनियोजन करते हे सांगताना जोशी लिहितात :

> एकदा स्वित्झर्लंडमध्ये भर उन्हाळ्यात तीन आठवडे (या मोसमात एरव्ही तिथे पडणारा) पाऊस पडला नाही. लगेच सगळ्या माध्यमांतून धोक्याच्या सूचना खणखणू लागल्या – 'जंगलाजंगलातील गवत सुकेसुके, कोरडे झाले आहे; आगीचा धोका आहे. सिगारेटचे थोटूक प्रवासात इकडेतिकडे टाकू नका.' एकदा आल्प्समधील एक शिखर सर करण्यासाठी आठ लोकांची टोळी गेली होती. बर्फाच्या वर्षावामुळे ती अडकून पडली. त्यांना सोडविण्यासाठी अवघ्या तासाभरात helicopters अपघातस्थळी जाऊन पोचली. अडकलेल्या गिर्यारोहकांच्या सुटकेचा तो सारा प्रचंड खटाटोप घरोघर लोकांनी टेलेव्हिजनवर प्रत्यक्ष पाहिला. असेच एकदा लष्करी सुरुंग पेरण्याच्या प्रदेशात एकदा एक छोटेसे कुत्र्याचे पिल्लू चुकून शिरले, तर त्याच्या सुटकेच्या प्रयत्नांवर सगळ्या देशाचे लक्ष वेधले गेले.
>
> (*शेतकरी संघटक*, २१ ऑक्टोबर १९९३)

तेथील सरकार किती संवेदनशील व तत्पर आहे हे ह्यातून जाणवते.

ह्याच लेखात पुढे जोशी यांनी केलेले एका भेटीचे वर्णन वाचनीय आहे. बर्न शहरातील एका नागरी सुरक्षेच्या केंद्रास त्यांनी दिलेली ही भेट होती. सर्वसामान्य प्रवासी अशा गोष्टी सहसा कधी बघू शकणार नाही; पण युनायटेड नेशन्समध्ये काम करताना ज्या सवलती मिळतात, त्याचा बहुधा हा फायदा होता.

कधीकाळी कोणा शत्रूचे आक्रमण झालेच, तर त्याला रोखण्यासाठी अनेक मार्ग सरकारने तयार ठेवले होते. त्यांतला एक महामार्गांचे पट्टेच्या पट्टे बाजूला काढण्याचा व शत्रूची वाहतूकच अशक्य करून सोडायचा होता. महामार्गांचा वापर लष्करी विमानांसाठी धावपट्टीसारखा करण्याचीही एक आपत्कालीन योजना होती. हे सारे ठाऊक असूनही त्या

दिवशी जे पाहिले, त्यावर त्यांचा विश्वासही बसेना. बर्नच्या एक लाख लोकवस्तीसाठी हजारो लोकांना पुरेसा असा अवाढव्य सुरक्षा निवारा जमिनीखाली १०० मीटर इतक्या खोलीवर एका प्रचंड बोगद्यात केला होता. एखादा अणुबॉम्ब ह्या बोगद्याच्या डोक्यावरच पडला तर गोष्ट वेगळी; अन्यथा हे आश्रयस्थान अगदी पक्के सुरक्षित राहिले असते. जमिनीच्या इतक्या खोलवरही हवा खेळती राहण्याची व्यवस्था होती. लोकांकरिता झोपण्याची व्यवस्था होती. कोणत्याही संकटकाळी जेमतेम तासाभराच्या सूचनेवरून ही सारी यंत्रणा मदतीसाठी उपलब्ध होऊ शकत होती. मोठे सुसज्ज हॉस्पिटल कायम चकचकीत अवस्थेत तयार असते. कोठे संकट आले, तर सगळी तयारी सुसज्जपणे वाट पाहते आहे.

इथे लीला जोशी यांनी लिहिलेल्या एका विस्तृत लेखातील थोडा भाग उद्धृत करावासा वाटतो. स्वित्झर्लंडबद्दलची काही मार्मिक निरीक्षणे त्यांनी नोंदलेली आहेत. त्यांनी लिहिलेला व प्रकाशित झालेला हा एकमेव लेख आहे. आधी तो अंबाजोगाई येथून श्रीरंगनाना मोरे प्रसिद्ध करत असलेल्या 'भूमिसेवक' ह्या पाक्षिकात प्रसिद्ध झाला. पुढे तो अलिबागहून अरविंद वामन कुळकर्णी प्रसिद्ध करत असलेल्या 'राष्ट्रतेज' ह्या साप्ताहिकात पुनर्मुद्रित केला गेला. आणि त्यानंतर तो 'शेतकरी संघटक'च्या २१ ऑक्टोबर १९८३च्या अंकात पुनर्मुद्रित केला गेला. लीलाताईंच्या प्रथम स्मृतिदिनी त्यांना श्रद्धांजली म्हणून. पण 'वारकरी' ह्या शेतकरी संघटनेच्या पहिल्या मुखपत्रात मात्र तो प्रकाशित झाला नव्हता; तसेच कुठल्या पुस्तकातही तो समाविष्ट झालेला नाही व त्यामुळे फारशा वाचकांपर्यंत पोचला नसावा. लेखात त्या लिहितात :

> ह्या देशाने जी सधनता प्राप्त करून घेतली त्यामागचे कारण काय? आम्ही स्वित्झर्लंडमध्ये असताना भारतातले एक उद्योगपती आमच्याकडे आले होते. भारतातील उच्चमध्यमवर्गीयाइतके असलेले तेथील सामान्य कामगारांचे राहणीमान पाहून ते म्हणाले – 'त्यांच्याकडे पैसा आहे ना, म्हणून ते एवढं वेतन देऊ शकतात.' हे अनुमान साफ चूक! त्यांनी पैसा निर्माण केला. साठ वर्षांपूर्वी शेतीप्रधान, पस्तीस वर्षांपूर्वीपर्यंत ग्रामोद्योग व शेती आणि आज एक औद्योगिक राष्ट्र अशी ह्या देशाची वाटचाल आहे.

त्यांना स्वतःला स्वित्झर्लंडमध्ये गेल्यावर सर्वांत पहिली गोष्ट जाणवली, ती म्हणजे तेथील 'अन्नक्रांती'. सुपरमार्केटमध्ये खाण्यापिण्याच्या पदार्थांची लयलूट होती. नुसता दुग्धजन्य पदार्थांचा विभाग बघितला तरी माणूस थक्क होऊन जाई. असंख्य प्रकारचे चीज. विविध कंपन्यांचे, विविध स्वादांचे, चवींचे दही. चक्का, लोणी व त्यांपासून केलेले असंख्य पदार्थ. विशेष म्हणजे खाण्यापिण्याच्या बाबतीत कुठली असमानता नाही; तुम्ही गरीब असा वा श्रीमंत, सर्व लोक सर्व खाद्यपदार्थांचा मनसोक्त आस्वाद घेऊ शकतात. असमानता चालू होते ती स्थावर व जंगम मालमत्ता आणि तशा बाबतीत. औद्योगिक मालाकडे पाहिले तरी तेच. कपडे, खेळणी यांपासून ते टीव्ही, फ्रीज, मोटार ह्या सर्व वस्तू सर्वांच्या आवाक्यात

येतात; अशा बाबतीत आपल्यासारखी कमालीची विषमता तिथे नाही. अगदी सामान्य शेतकऱ्यालाही या सर्व गोष्टी परवडतात.

हे कशामुळे घडते याचा त्यांनी अभ्यास केला तेव्हा त्यांच्या लक्षात आले, की याचे कारण म्हणजे शेतकऱ्याला शेतीमालाच्या विक्रीतून चांगले पैसे मिळतात व त्यामुळे तो विकून औद्योगिक माल विकत घेणे त्याला परवडते. पुढे त्यांनी शेतीमाल व औद्योगिक माल यांच्या दोन्ही देशांतील किमतींचा तुलनात्मक आढावा घेतला आहे.

उदाहरणार्थ, तिथे एक लिटर दुधाची किंमत १ फ्रँक तर एका रेफ्रिजरेटरची किंमत ५०० फ्रँक आहे; याउलट भारतात मात्र एक लिटर दुधाची किंमत २ रुपये तर एका रेफ्रिजरेटरची किंमत मात्र तब्बल ५००० रुपये आहे. ह्याचाच अर्थ, एक रेफ्रिजरेटर विकत घेण्यासाठी स्वित्झर्लंडमध्ये ५०० लिटर दूध विकावे लागते, तर त्यासाठी भारतात मात्र त्यासाठी २५०० लिटर दूध विकावे लागते. याचाच अर्थ भारतात एक रेफ्रिजरेटर विकत घेण्यासाठी स्वित्झर्लंडपेक्षा पाचपट शेतमाल विकावा लागतो. अशीच तुलना पुढे लेखात टीव्ही, मोटार ह्या गोष्टी विकत घेण्यासाठी स्वित्झर्लंडमध्ये व भारतात किती गहू वा तांदूळ विकावा लागेल ह्याबाबत केली आहे.

शेतीमालाला उत्तम किंमत मिळत असल्यानेच स्विस शेतकरी भारतीय शेतकऱ्यापेक्षा खूप अधिक सहजगत्या औद्योगिक माल घेऊ शकतो हे त्यावरून स्पष्ट होत होते.

स्वित्झर्लंडचा जास्तीत जास्त भू-प्रदेश शेतीखाली आणायचा म्हटला, तरी केवळ तीन पंचमांश लोकसंख्येला तो स्वतः अन्नधान्य पुरवू शकतो. उरलेले धान्य, तसेच मांस, मासे, अंडी त्यांना आयात करावी लागतात. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे स्थानिक शेतकऱ्यांना परदेशातील स्वस्त खाद्यपदार्थांशी प्रचंड सामना करावा लागतो. त्याचवेळी डोंगरावरची शेती, लहान जमीनधारणा व छोटे गोठे यांमुळे स्वीस शेतीमालाचा उत्पादनखर्च मात्र जास्त असतो. यावर तेथे तोडगा कसा काढला याविषयी पुढे लीला जोशी यांनी लिहिले आहे,

> औद्योगिक प्रसारामुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी व लढाईच्या वेळेस काही अंशाने तरी खाद्यपदार्थांच्या बाबतीत स्वयंपूर्णता असावी म्हणून शेती जगवलीच पाहिजे व शेतीखालील क्षेत्र कमी होता कामा नये असे स्वीस सरकारचे धोरण आहे. त्यामुळे १९३० सालापासूनच स्वीस सरकारने शेतकऱ्यांचा माल उत्पादनखर्चावर आधारित उत्तम किमती देऊन विकत घेण्याचा निर्णय घेतला व तो माल बाजारात आयात केलेल्या खाद्यपदार्थांच्या स्पर्धेत तोंड देईल एवढ्या कमी किमतीत ते विकू लागले. याचे पुढील २५ वर्षांत खालीलप्रमाणे फायदे झाले :
>
> १. मिळालेल्या नफ्यातून प्रत्येक शेतकऱ्याने शेतीचे यांत्रिकीकरण केले.
> २. भाज्या, फळे व धान्य शक्यतो प्रक्रिया करून व हवाबंद डब्यांतच विकण्यासाठी पाठवले जाऊ लागले.
> ३. प्रक्रियायुक्त खाद्यपदार्थांच्या ग्रामोद्योगाचे एक प्रचंड जाळे तयार झाले.

अशा उपायांतून काही वर्षांतच स्विस शेतकरी स्वयंपूर्ण झाले व त्यामुळे गेल्या दोन पिढ्या सरकारी खरेदीची आवश्यकता तेथे राहिलेली नाही. तरीसुद्धा शेतकऱ्यांच्या हिताकडे सरकार डोळ्यांत तेल घालून पाहत असते. भाव खूप पडले व शेतकऱ्याचे नुकसान होईल असे वाटले, तर पुन्हा बाजारात उतरून स्वतः मालाची खरेदी करायचे व मागणी वाढवून भावही वाढवायचे सरकारचे धोरण कायम आहे.

स्वित्झर्लंडमध्ये असताना तेथील एका मोठ्या सहकारी संस्थेचे जोशी सदस्य बनले होते. त्या निमित्ताने तेथील सहकारी संस्था कशा काम करतात हे त्यांना नीट बघता आले. त्या संस्थेची किरकोळ विक्री करणाऱ्या शेकडो दुकानांची साखळी होती. शेतकऱ्याकडून थेट माल विकत घ्यायचा व ग्राहकाला या साखळीमार्फत विकायचा. अशा अनेक संस्था तिथे आहेत. यांतून शेतकऱ्याचीही सोय व्हायची व ग्राहकाचीही. शिवाय त्या सहकारी संस्थेलाही नफा व्हायचा व एक भागधारक या नात्याने लाभांशाच्या स्वरूपात तो जोशींनाही मिळायचा. अनेक वर्षांनी भारतात आल्यावर 'शिवार ॲग्रो' नावाने अशीच एक साखळी उभारायचा जोशींनी प्रयत्न केला होता; पण तो यशस्वी झाला नाही. त्याबद्दल पंधराव्या प्रकरणात येणारच आहे.

चाकण परिसरात जेव्हा जोशींनी स्वतःच्या शेतीला प्रारंभ केला, तेव्हा त्यांच्या लक्षात आले, की तिथे भुईमुगाचे पीक भरपूर यायचे; पण त्याला भाव मात्र अगदी कमी मिळायचा. भुईमुगाचा दर्जाही खूप कमी होता व तो सुधारण्याचा फारसा प्रयत्नही कोणी करत नव्हते. जे काही पीक निघेल, ते तेथील तेलाच्या घाणी अगदी स्वस्त दरात विकत घेत व त्याचे तेल काढून ते भरपूर भावाने विकून स्वतः गब्बर होत. उरणारी पेंडदेखील चांगल्या किमतीला जाई. त्याऐवजी शेतकऱ्यांनी शेंगदाण्यापासून स्वतःच तेल काढले किंवा लोणी, खारवलेले दाणे, तळलेले दाणे वा इतर स्नॅक फूड तयार केले, तर त्यात खूप फायदा होता. पण तसा प्रक्रियाउद्योग त्या परिसरात उभारणे बरीच पाहणी करूनही जोशींना जमण्यातले दिसेना.

दुसरा पर्याय होता, निर्यातीचा. परदेशातही शेंगदाण्याला भरपूर मागणी होती हे जोशींना ठाऊक होते. स्विस मार्केटमध्ये जोशींनी आपल्या ओळखीत एके ठिकाणी चौकशी केली. हा माणूस मदत मागत नाहीये, तर व्यापाराबद्दल बोलतो आहे, हे लक्षात आल्यावर त्यांनीही मनापासून बोलणी करून सहकार्य दिले. त्यांची वार्षिक मागणी तब्बल तीनशे टनांची होती! पण त्यात एक अडचण होती; जगभरच्या भुईमुगाच्या शेतीचा त्यांनी अभ्यास केला होता व चाकण परिसरात होणाऱ्या शेंगदाण्यात अफ्लाटॉक्सिन (Aflatoxin) नावाचा एक विषारी पदार्थ खूप असतो हे त्यांच्या लक्षात आले होते.

खरे तर, हे अफ्लाटॉक्सिन सर्वच शेंगदाण्यांत असते; ज्याला आपण खवटपणा म्हणतो, तो ह्याच अफ्लाटॉक्सिनमुळे येतो. पण भारतातील त्याचे प्रमाण आंतरराष्ट्रीय मानकापेक्षा पाच ते दहा पट अधिक असते. या विषामुळे यकृताचा व पोटाचा कॅन्सर होतो असे सिद्ध झाले आहे. आपल्या शरीराला कदाचित अशा जंतूंची व विषाची सवय झाली असल्याने आपल्या

देशात आपण असल्या बाबींचा फारसा विचार करत नाही, पण तेथे शुद्धतेचे निकष खूप काटेकोरपणे पाळले जातात. म्हणूनच त्यांनी इस्राएल व दक्षिण आफ्रिकेतून हे शेंगदाणे मागवायला सुरुवात केली होती. ''पण तुम्ही जर हे (अफ्लाटॉक्सिनचे) प्रमाण आंतरराष्ट्रीय मानकाएवढे कमी केलेत, तर आम्ही तुमच्याकडूनही माल घ्यायचा विचार करू,'' असे आश्वासन त्यांनी दिले.

हे प्रमाण कमी करता येईल का, याविषयी जोशींनी खूप शेतकऱ्यांशी व तज्ज्ञांशी चर्चा केली; पण ते जमेना. शेतकऱ्यांनाही पारंपारिक पद्धतीने पीक काढणे व येईल त्या भावात तेलाच्या घाणींना विकून टाकणे, याचीच सवय झाली होती. आपण पिकाची गुणवत्ता सुधारली तर आपले उत्पन्न खूप वाढू शकेल, हा जोशींचा मुद्दा काही स्थानिक मंडळींना फारसा पटला नाही; किंवा पेलला नाही असे म्हणू या. हे अफ्लाटॉक्सिनचे प्रमाण आंतरराष्ट्रीय मानकापेक्षाही खूप कमी असलेल्या भुईमुगाचे बियाणे तयार करण्यात पुढे बऱ्याच वर्षांनी, दोन हजार सालानंतर, कच्छमधील भूज जिल्ह्यातील शेतकऱ्यांना यश आले. असो.

अशा समृद्ध देशात राहत असतानाही भारतात परतायचे की परदेशातच कायम राहायचे ह्याविषयी जोशींची मन:स्थिती सारखी दोलायमान होत असे. सुरुवातीचे वर्षभर ते तिथे रमले तरी केव्हातरी भारतात परत जावे हा विचारही त्यांच्या मनाच्या एका कोपऱ्यात कुठेतरी असायचाच. १९७०मध्ये त्यांचे वडील वारले. त्यावेळी तीन महिन्यांची रजा काढून ते भारतात सहकुटुंब आले होते. भारतात परत जाण्याच्या दृष्टीने थोडी चाचपणी करायचाही त्यांचा उद्देश होता. त्या अनुभवाबद्दल जोशींनी लिहिले आहे. प्रत्यक्ष भेटीतही ते त्याबद्दल बोलले होते. ते म्हणाले,

''आधी आम्ही साहजिकच पुण्याला गेलो. कारण वडील सेवानिवृत्त झाल्यानंतर पुण्यातच सेटल झाले होते आणि तिथेच वारले होते. वडलांचे सगळे दिवसवार वगैरे उरकल्यावर आम्ही प्रवासाला बाहेर पडलो. मुलींना जरा भारत दाखवावा व त्यातून भारताबद्दल त्यांचं चांगलं मत व्हावं, अशी आमची इच्छा होती. कारण कधीतरी भारतात परतायचं अशीच त्यावेळी आमची कल्पना होती. पण मुलींना भारत अजिबात आवडला नाही. दिल्ली, सिमला, आग्रा असा दौरा आम्ही आखला होता. ओळखीच्या एका लष्करी अधिकाऱ्यामुळे राहायची उत्तम सोयदेखील करून ठेवली होती. दिल्लीहून सिमल्याला जाताना आम्ही खास डिलक्स बस घेतली होती. पण वाटेत जोराचा पाऊस सुरू झाला व त्या बसचं छत गळू लागलं. वरून अगदी धो धो पाणी पडू लागलं. थेट अंगावर. आम्ही सगळे भिजून चिंब झालो. थंडी जोराची. अगदी काकडून गेलो. चंडीगढची तेव्हा खूप चर्चा होती. नवी वसवलेली राजधानी. तीही कोर्बुसिए ह्या प्रख्यात फ्रेंच-स्विस आर्किटेक्टने. चंडीगढ मुलींना आवडेल अशी आमची कल्पना. पण प्रत्यक्षात त्यांना ते अजिबात आवडलं नाही. एक-दोनदा तेथील बसस्टॉपवरचं टॉयलेट वापरायचा प्रसंग आला. ते इतकं गलिच्छ होतं, की काही बोलून सोय नाही. ते स्वच्छतागृह मुलींनी पाहिलं आणि त्यांचा जीव घाबरा झाल्याचं

मला जाणवलं. शक्य असतं, तर त्याच दिवशी विमान पकडून त्या परत बर्नला गेल्या असत्या.''

१९७० साली त्या दौऱ्यावर असताना स्वित्झर्लंडची व भारताची जोशी यांच्या मनात सतत तुलना होत असे, कुटुंबीयांशीदेखील सतत ह्या विषयावर चर्चा होत असे. भारतात परतावे हे जोशींच्या मनात अधिक असे, पत्नी व मुलींचा मात्र त्याला प्रथमपासूनच कडवा विरोध होता. शेवटी सहकुटुंब जेव्हा ते बर्नला परतले, तेव्हा यापुढे स्वित्झर्लंडमध्येच राहायचा निर्णय त्यांनी काहीशा नाइलाजाने घेतला.

बघता बघता आणखी दोन वर्षे गेली. मुली तेथील फ्रेंच शाळेत रमल्या होत्या, नोकरी उत्तम होती, स्वतःचे घर झाले होते; कमी असे काही नव्हतेच. पण तरीही पुन्हा एकदा मनात असमाधान खदखदू लागले.

ह्या असमाधानामागे काय कारणे होती? त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांना त्यांच्या वागण्यात तसे काही जाणवत होते का? ह्याबद्दलची आपली निरीक्षणे मांडताना टोनी म्हणाले –

''असं नेमकं काही सांगणं अवघड आहे, कारण दुसऱ्याच्या मनात काय चाललं आहे ह्याची कल्पना बाहेरून बघणाऱ्याला कशी येणार? पण एक-दोन गोष्टींचा उल्लेख करायला हरकत नाही.

''एक म्हणजे, आपल्या नोकरीत शरदची स्थिती काहीशी साचलेल्या पाण्यासारखी झाली होती. आपल्याला प्रमोशन मिळायला हवं, आपली नक्कीच ती पात्रता आहे असं त्याला सतत वाटत होतं आणि ते प्रमोशन काही त्याला मिळत नव्हतं. ह्यावरून एकदा तो माझ्यावरही चिडला होता. आम्ही ऑफिसमधून घरी परतत होतो. ह्यावेळी गाडी त्याची होती. मी शेजारी बसलो होतो. गाडी चालवताना नेहमीप्रमाणे तो गप्पा मारत नव्हता. काहीसा घुश्श्यातच दिसत होता. मी त्याबद्दल काहीतरी बोललो. त्यासरशी माझ्याकडे कटाक्ष टाकत तो म्हणाला, 'लोकांनी तुझ्या घरावर दगड मारायला नको असतील, तर तूही दुसऱ्यांच्या घरावर दगड मारणं थांबव.' नंतरच्या बोलण्यात उलगडलं, की त्याला प्रमोशन मिळू नये म्हणून, मी त्याच्या बॉसपाशी काही कागाळ्या केल्या होत्या, असं त्याला वाटत होतं. हे सगळं त्याच्या मनात कोणी भरवलं होतं कोण जाणे, पण ते अर्थातच खोटं होतं. नंतर मी खुलासा केल्यावर मात्र त्याला तो पटला आणि आमच्यातला तो दुरावा दूर झाला.

''आपल्याला अपेक्षित ते प्रमोशन मिळत नाही ह्याबद्दलचा शरदचा राग वाढायला आणखी एक कारण घडलं. आमचे डायरेक्टर जनरल त्यावेळी एक इजिप्शियन मुस्लिम गृहस्थ होते व जोशींना डावलून त्यांनी काँगो देशातील दुसऱ्या एका मुस्लिम कर्मचाऱ्याला ते प्रमोशन दिलं. त्यामुळे चिडलेला शरद मला म्हणाला, 'आपल्या या इंटरनॅशनल ब्युरोत आता कामातल्या हुशारीला काहीच स्थान उरलेलं नाही. पूर्वी बढती देताना ती व्यक्ती कुठल्या

खंडातून आलेली आहे याचा विचार व्हायचा. मग देशाचा विचार व्हायचा. मग राष्ट्रीयत्वाचा विचार व्हायचा. मग वर्णाचा विचार व्हायचा. आणि आता आणखी एका गुणाचा विचार होतो – तो म्हणजे त्या व्यक्तीच्या धर्माचा!' ह्याविरुद्ध तक्रार करायचं त्याने ठरवलं.

''जिनिव्हाला इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनचं एक ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रायब्युनल आहे. युएनच्या कुठल्याही शाखेतील कर्मचाऱ्यावर काही अन्याय होत असेल तर तो तिथे दाद मागू शकतो. आपल्याला पात्रता असूनही प्रमोशनसाठी डावललं जात आहे अशा प्रकारचं निवेदन त्याने ह्या ट्रायब्युनलपाशी दिलं होतं. त्या संदर्भात त्याला ट्रायब्युनलने त्याची बाजू ऐकून घ्यायला बोलावलंही होतं. पण दुर्दैवाने त्याची बाजू ट्रायब्युनलला पटली नाही व ती केस डिसमिस केली गेली.

''आज मागे वळून बघताना मला वाटतं, की त्याने जर अजून थोडा धीर धरला असता, तर त्याला प्रमोशन नक्की मिळालं असतं; जसं ते रुटीनमध्ये मलाही मिळत गेलं. इथे राहिला असता, तर तो माझ्याही वर, अगदी असिस्टंट डायरेक्टर जनरलच्या लेव्हलपर्यंत गेला असता. पण त्याने नोकरी सोडायचाच निर्णय घेतला.

''दुसरी एक घटना इथे नमूद करावीशी वाटते. शरद काही खूप चांगला ड्रायव्हर नव्हता; मी म्हणेन तो ॲव्हरेज ड्रायव्हर होता. एकदा गाडी चालवत असताना त्याच्या गाडीला गंभीर अपघात झाला होता. सुदैवाने त्याला स्वतःला काही दुखापत झाली नव्हती, पण त्याच्या मोटारीचं जबरदस्त नुकसान झालं होतं. माझ्या आठवणीप्रमाणे ती दुरुस्त करायचं गराजचं बिल ७००० स्विस फ्रँक्स की असंच काहीतरी आलं होतं. तेवढे पैसे इन्शुरन्स कंपनी देणं शक्यच नव्हतं. 'माझं सगळं सेव्हिंग ह्यात गेलं' असं तो मला म्हणाल्याचं आठवतं. ह्या अपघातामुळे तो चांगलाच हादरला होता आणि ते तसं स्वाभाविकच होतं.

''एकूणच युएनच्या कामाबद्दल तो असमाधानी होता. आमचं बरचसं बजेट हे आमचे पगार, सल्लागारांचा मेहेनताना, प्रवास, हॉटेल, भव्य कार्यालय, डामडौल वगैरेवरच खर्च होतं; त्यातून गरीब देशांचं काहीच कल्याण होत नाही, अशी त्याची धारणा बनत चालली होती व त्यात तथ्यही होतंच.

''तरीही त्याने ही नोकरी सोडून भारतात जाऊ नये, इथेच त्याचा व त्याच्या कुटुंबीयांचाही उत्तम व्यक्तिगत विकास होऊ शकेल असं त्याला मी समजावलं. युएनमधील नोकरीमुळे काळाच्या ओघात त्याला स्वीस नागरिकत्वदेखील मिळू शकलं असतं. पण तसा तो निश्चयाचा पक्का होता व शेवटी त्याच्या मनाप्रमाणेच तो भारतात परत गेला.''

जोशींच्या बर्नमधील कामाचे स्वरूप जुलै १९६९नंतर अधिक व्यापक झाले होते. युपीयुमधील नेहमीचे काम होतेच; पण त्याशिवाय युएनच्या विविध शाखा विकासासाठी जे कार्यक्रम जगभर राबवत होत्या, त्या कार्यक्रमांच्या आखणीसाठी आवश्यक त्या सामाजिक-आर्थिक पाहण्या करणे, त्यांना संख्याशास्त्रीय मदत करणे हाही आता त्यांच्या कामाचा एक भाग होता. त्यासाठी जगभर प्रवासही करावा लागे. हे सारे करताना जे त्यांच्या लक्षात येत

होते ते युएनविषयी असलेल्या सर्वसामान्य कल्पनांना मुळापासूनच आव्हान देणारे होते.

ह्या साऱ्याची थोडी पार्श्वभूमी समजून घेणे जरुरीचे आहे. जगातील वाढत्या विषमतेची खंत पाश्चात्त्य जगातील अनेक नेत्यांना व जनतेलाही वाटत असे. त्यांच्या भावना प्रामाणिक होत्या. वसाहतवादातून आपल्यापैकी अनेक राष्ट्रांनी तिसऱ्या जगातील देशांचे शोषण केले आहे व त्याची काहीतरी भरपाई म्हणून आपण त्यांना मदत केली पाहिजे ही त्यांची धारणा होती. युएनच्या सर्वच संस्थांचा भर त्यावेळी गरीब-श्रीमंत राष्ट्रांमधली अनुल्लंघनीय वाटणारी दरी कशी मिटवता येईल ह्यावर होता. जोशींच्या ऑफिसमध्येही गरीब देशांमधील पोस्टल सेवा कशी सुधारता येईल, त्यासाठी श्रीमंत देश कुठल्या स्वरूपात साहाय्य करू शकतील ह्याची चर्चा सतत होत असे.

डिसेंबर १९६१मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या न्यूयॉर्क येथे भरलेल्या अधिवेशनात अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी यांनी 'साठचे दशक हे विकासाचे दशक असेल' असे जाहीर केले. जगातील विषमता कमी व्हावी हा त्यामागचा उद्देश. त्याला 'फर्स्ट डेव्हेलपमेंट डिकेड' असे म्हटले गेले. त्या दशकात अविकसित देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी ५% वाढ व्हावी असे ठरवले गेले. मात्र प्रत्यक्षात ही वाढ अवघी २% एवढीच झाल्याचे १९७०मध्ये लक्षात आले. त्याचवेळी विकसित देशांचे उत्पन्न मात्र ह्याच्यापेक्षा खूपच अधिक वेगाने वाढले होते; म्हणजेच विषमता कमी होण्याऐवजी वाढलेली होती.

त्यानंतर १९७०मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने आपल्या पंचविसाव्या अधिवेशनात ही विषमता कमी करण्याच्या दृष्टीने सत्तरचे दशक हे 'सेकंड डेव्हेलपमेंट डिकेड' म्हणून जाहीर केले. त्या दरम्यान अविकसित देशांचे उत्पन्न पाचऐवजी सहा टक्क्यांनी दरवर्षी वाढावे असे लक्ष्य ठरवण्यात आले. हे शक्य व्हावे, म्हणून सर्व विकसित देशांनी आपल्या उत्पन्नाचा एक टक्का इतका भाग हा अविकसित देशांना मदत म्हणून द्यावा असाही एक ठराव त्याच अधिवेशनात संयुक्त राष्ट्र संघाने संमत केला. गरीब देशच फार मोठ्या बहुसंख्येने असल्याने अधिवेशनातील मतदानात तो संमत होणे अगदी सोपे होते. अर्थात श्रीमंत (म्हणजेच मुख्यतः पाश्चात्त्य) राष्ट्रांचाही त्याला विरोध नव्हता.

पण तरीही विषमता कमी होण्याऐवजी सतत वाढतच होती. १९७५ साली विकसित देशांचे दरडोई उत्पन्न अविकसित देशांच्या उत्पन्नापेक्षा वीस पट झाले होते!

ह्या सुमारास जेव्हा 'मदत विरुद्ध व्यापार' ('aid versus trade') ह्याबद्दल जागतिक स्वरूपाची चर्चा सुरू झाली, तेव्हा 'मदत देण्यामागच्या अटी' आणि अविकसित देशांना नुकसान पोचवणाऱ्या 'व्यापाराच्या अटी' यांमागचे भयानक सत्य प्रकाशात येऊ लागले. जोशींच्या लक्षात आले, की मदत म्हणून जेव्हा काही निधी श्रीमंत राष्ट्रे देत, तेव्हा त्यासोबत अनेक अटीही असत. उदाहरणार्थ, ह्या रकमेतून तुम्ही आम्ही बनवलेला अमुकअमुक इतका माल खरेदी केला पाहिजे. म्हणजे प्रत्यक्षात श्रीमंत राष्ट्रांची बाजारपेठ वाढवण्यासाठीच ह्या

तथाकथित मदतीचा उपयोग होत होता. हे काही प्रमाणात अपरिहार्यही होते. कारण मुळात कुठल्याही राष्ट्राला विकास करण्यासाठी ज्या प्रकारच्या इन्फ्रास्ट्रक्चरची गरज होती व नंतर ज्या प्रकारच्या उद्योगांची गरज होती, ते उभारण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री व तंत्रज्ञान हे श्रीमंत राष्ट्रांकडेच उपलब्ध होते. गरीब देशांतून येणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती कायम कमी व श्रीमंत देशांतून निर्यात होणाऱ्या पक्क्या मालाच्या किमती कायम जास्त हे व्यापारातले वास्तव विदारक होते. 'मदत' या शब्दाला त्यामुळे काही अर्थच उरत नव्हता.

याचवेळी आपण देत असलेल्या मदतीची रक्कम अविकसित देशांतील अभिजनवर्ग स्वतःच खाऊन टाकतो व खऱ्या गरजू लोकांना काहीच मिळत नाही हे मत त्यावेळी अनेक पाश्चात्त्य वृत्तपत्रांमधून अधोरेखित होत असे. एखाद्या आफ्रिकन देशातील राजा आपल्या अल्सेशिअन कुत्र्याला चिकन भरवतो आहे व त्याचवेळी त्याच्या देशातील हजारो सामान्य लोक उपाशी मरत आहेत अशा प्रकारची व्यंग्यचित्रे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत होती. पाश्चात्त्य समाजात त्यामुळे गरीब देशांना 'मदत' द्यायला विरोध वाढू लागला.

स्वतः जोशी यांचा अनुभवही या मताला दुजोरा देणारा होता. ते जेव्हा आपल्या कामाचा भाग म्हणून वेगवेगळ्या अविकसित देशांमध्ये जात, त्यावेळी त्यांनीही त्या देशांतील वाढती अंतर्गत विषमता बघितली होती व जागतिक पातळीवरील गरीब व श्रीमंत राष्ट्रांमधील विषमतेपेक्षा ती अधिक भयावह होती. विशेषतः आफ्रिकेतील नायजेर ह्या देशामधील अनुभव त्यांना बराच अंतर्मुख करून गेला. तिथे त्यांनी बघितले, की देशाच्या राजधानीचा थोडासा भाग खूप श्रीमंत दिसतो, तिथे बडी बडी हॉटेल्स आहेत, विदेशी मोटारी, सौंदर्यप्रसाधने, अत्याधुनिक उपकरणे, कपडे हे सर्व काही ठरावीक दुकानांतून उपलब्ध आहे व एकूणच राज्यकर्ता वर्ग व इतर सत्ताधारी ऐषारामात जगत आहेत. अगदी युरोपातील उच्चवर्गीयांप्रमाणेच त्यांची जीवनशैली आहे. पण त्याचवेळी त्या देशातील बहुसंख्य जनता मात्र भीषण दारिद्र्यात सडत आहे.

जोशींनी हेही बघितले होते, की वेगवेगळ्या अविकसित देशांची मोठी मोठी शिष्टमंडळे युएनच्या परिषदांसाठी वा अन्य कार्यक्रमांसाठी युरोप-अमेरिकेत जातात तेव्हा त्यांचा एकूण दृष्टिकोन हा केवळ सरकारी पैशावर परदेशात मजा मारणे हाच असतो; प्रत्यक्षात संयुक्त राष्ट्रांकडे भीक मागण्याच्या पलीकडे ती काहीच करत नाहीत आणि मुख्य म्हणजे आपल्या देशाचा विकास व्हावा अशी तळमळही ह्या बड्या मंडळींना नसते; ते केवळ स्वतःची चैन आणि स्वार्थ एवढेच पाहत असतात.

त्यांचे एक निरीक्षण असे होते, की ह्या गरीब देशांतील नेते एखाद्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी न्यूयॉर्कसारख्या ठिकाणी गेले, की नेहमी आलिशान गाड्यांमधूनच फिरायचे व त्याउलट श्रीमंत देशांतील नेते मात्र तुलनेने साध्या गाड्या वापरत. हाच फरक कपडे, खाणेपिणे, दैनंदिन राहणी ह्या सगळ्यातच उघड दिसायचा. म्हणजे बोलताना आपण गरीब देशांच्या जनतेचा आवाज उठवतो आहोत असा आविर्भाव आणायचा, पण स्वतःच्या दैनंदिन

जगण्यात मात्र अगदी चैनीत राहायचे! ह्या सर्व ढोंगबाजीची जोशींना घृणा वाटू लागली.

सुरुवातीला खूप मानाच्या आणि महत्त्वाच्या वाटलेल्या युएनमधील नोकरीत पुढे आपल्याला वैयर्थ्य का जाणवू लागले याची काही कारणे स्वतः जोशी यांनी *योद्धा शेतकरी* या पुस्तकात उद्धृत केलेल्या संभाषणात व इतरत्रही नमूद केली आहेत. त्यांच्या मते बाहेरून पाहणाऱ्याला असे वाटत असते, की या संयुक्त राष्ट्रसंघात फार महत्त्वाचे असे काही काम चालले आहे. पगारवगैरे उत्तमच असतो. पण संयुक्त राष्ट्रसंघाला प्रत्यक्ष अधिकार असे फारसे नसतात. वेगवेगळ्या देशांचे धोरण शेवटी ते ते देशच ठरवत असतात. संयुक्त राष्ट्रांमध्ये जेव्हा 'सेकंड डेव्हेलपमेंट डिकेड'चे काम सुरू झाले – म्हणजे 'विकासाच्या दुसऱ्या दशकाची' आखणी सुरू झाली – तेव्हा ह्या संघटनेतून बाहेर पडावे, असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. 'विकासाचे दुसरे दशक' म्हणजे नेमके काय? 'विकासाचे पहिले दशक' तरी कुठे नीट पार पडले आहे? मग लगेच हे दुसरे दशक सुरू करायची भाषा कुठून आली? – असे प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले.

युएनतर्फे राबवला जाणारा 'विश्वव्यापी तांत्रिक साहाय्य' किंवा 'टेक्निकल असिस्टन्स' नावाचा जो कार्यक्रम आहे, तो म्हणजे एक फार मोठी बनवाबनवी आहे, खोटेपणा आहे हेही त्यांना कळून चुकले. ह्या 'तांत्रिक' साहाय्यातील फार मोठी रक्कम ह्या सल्लागारांच्या भरमसाट पगारातच जाते, आणि प्रत्यक्षात ज्यांना फायदा व्हावा म्हणून हा निधी उभा केला जातो, त्यांना जे हवे ते कधीच मिळत नाही.

ह्याशिवाय, आणखीही एक भयानक गोष्ट त्यांच्या लक्षात आली. ती म्हणजे हे सारे वास्तव उघडउघड दिसत असूनही गरीब देशांतले सारे अर्थतज्ज्ञ, राज्यकर्ते, विचारवंत त्याकडे पूर्ण डोळेझाक करतात व जी भूमिका घेण्याने स्वतःचा फायदा होईल, स्वतःला आंतरराष्ट्रीय परिषदांचे आमंत्रण येईल, पुरस्कार मिळतील तीच भूमिका घेतात. स्वार्थापोटी आपली बुद्धी त्यांनी चक्क गहाण टाकलेली असते. आपली सध्याची नोकरी म्हणजेदेखील अप्रत्यक्षरीत्या ह्याच सगळ्या भ्रष्ट यंत्रणेचा एक भाग आहे, असेही त्यांना वाटू लागले.

एकीकडे त्यांचे वाचन व चिंतन सतत चालूच होते; भारतातील गरिबीचा प्रश्न हा शेतीमालाला मिळणाऱ्या अत्यंत अपुऱ्या किमतीशी निगडित आहे हे त्यांच्या लक्षात आले होते; पण त्यावर युएनमध्ये काहीच चर्चा होत नव्हती. ह्या सगळ्याचा जोशींना अगदी उबग आला. जोशी म्हणतात,

''दारिद्र्याच्या प्रश्नावर उत्तर शोधण्याचा खराखुरा प्रयत्न कुणी केलेलाच नाही, हेदेखील माझ्या ध्यानात यायला लागलं! मी वेगवेगळे अहवाल आणि ग्रंथ वाचू लागलो, तेव्हा ह्या दारिद्र्याच्या प्रश्नाचं मूळ टाळून development techniques, linear programming equations वगैरे जडजंबाल शब्दांमध्ये जे काही लिहिलं जायचं, वाचायला मिळायचं, ते अगदी खोटं आहे हे प्रकर्षाने जाणवू लागलं. असे अहवाल आणि पुस्तकं लिहिणारे विशेषज्ञ हे दारिद्र्याच्या मढ्यावर चरणारे लोक आहेत, ह्याबद्दल माझ्या मनात काहीही शंका उरली नाही!

१९७२च्या सुमारास माझ्या मनात भारतामध्ये परतायचं हा विचार पक्का झाला आणि भारतात जाऊन काय करायचं, तर कोरडवाहू शेती – हेदेखील मी पक्कं ठरवलं! सगळ्या देशातील दारिद्र्याचं मूळ हे ह्या कोरडवाहू शेतीमध्ये आहे, अशी माझ्या मनाची खात्री पटली होती.''

हळूहळू व्यक्तिगत पातळीवरही जोशींच्या मनात बरीच कटुता जमा होत होती. याची काही कल्पना टोनी यांच्या बोलण्यावरून येते. शिवाय जोशींचा युपीयुमधील स्टाफ असोसिएशनचा व एकूण सामाजिक वर्तुळाचा अनुभवही फारसा चांगला नव्हता. ते एकदा म्हणत होते,

''तिथल्या बहुतेक लोकांच्या मनात भारतीय माणूस म्हटल्यावर एक विशिष्ट प्रतिमा असते. देवभोळा, हिंदू परंपरा पाळणारा वगैरे. किंवा मग भांडवलदारांवर, उद्योगक्षेत्रावर, आधुनिक तंत्रज्ञानावर सतत टीका करणारा वगैरे. मी या दोन्ही प्रकारांत बसणारा कधीच नव्हतो. भारतीय म्हणून एखाद्याने जी भूमिका घ्यावी असं त्यांना वाटायचं, तसं वागणारे, किंवा वरकरणी तशीच भूमिका घेणारे, इतर अनेक उच्चभ्रू भारतीय तिथे यायचे. ह्या उच्चभ्रूंचं ते प्रतिमा जपणं मला ढोंगीपणाचं वाटे. मी कधीच तो प्रकार केला नाही. दुसरं म्हणजे, भारतासारख्या मागासलेल्या देशातील माणसाला परदेशी खरी प्रतिष्ठा, खरं बरोबरीचं स्थान हे कधीच मिळत नाही.

म्हणजे वरकरणी सगळं नॉर्मल असतं, तुमचा अपमान वगैरे कोणी करत नाही, कायदेही सगळे सर्वांना समान असतात; पण त्यांच्या मनात एक दुरावा कायम असतोच. त्यांच्या समाजाचा एक घटक म्हणून ते तुमचा कधीच स्वीकार करत नाहीत. शिवाय तुम्ही व्यक्तिशः कितीही कर्तबगार असला, तरी तुमच्या देशाच्या एकूण मागासलेपणाचं ओझं तुमच्या खांद्यावर असतंच. तुमचं मूल्यमापन करताना तुम्ही शेवटी एक भारतीय आहात, मागासलेल्या देशातले आहात, ह्याचा त्यांना सहसा कधी विसर पडत नाही.''

जोशींसारख्या मानी माणसाला हे सारे सहन होत नसे.

बांगलादेशातील यादवी युद्ध, भारतात आलेल्या बांगला निर्वासितांच्या छावण्या, भारतातील दुष्काळ, उपासमार, भ्रष्टाचार आणि त्याचवेळी काही जण मात्र श्रीमंत राष्ट्रांतील श्रीमंत वर्गानेही हेवा करावा अशा विलासी थाटात मजा मारत आहेत अशी चित्रे त्यावेळी पाश्चात्त्य टीव्हीवरून जवळजवळ रोजच दाखवली जात होती. साधारण त्याच काळात सिक्कीमचे भारतात विलीनीकरण करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. त्या प्रकरणातदेखील भारत सरकार एका छोट्या पण स्वायत्त देशाशी दांडगाई करत आहे असे मानणारा एक मोठा वर्ग पाश्चात्त्य जगात होता. ''हे सारं तुमच्या देशात होत असताना तुमच्यासारख्या कर्तृत्ववान भारतीयाने इथे युरोपात राहावं हे तुमच्या सरकारला परवडतं तरी कसं काय?'' असा प्रश्न जोशींना एका इंग्रज अधिकाऱ्याने विचारलाही होता.

प्रश्नाचा गर्भितार्थ अगदी स्पष्ट होता; त्यांना असे म्हणायचे होते की – तुम्ही तुमच्या देशात जाऊन तिथले प्रश्न सोडवायच्याऐवजी इथे युरोपात काय मजा मारत बसला आहात?

व्यक्तिगत पातळीवरील आणखी एक निरीक्षण त्यांना चीड आणत असे. आपल्या इतर युरोपियन सहकाऱ्यांपेक्षा आपण अधिक कर्तबगार आहोत अशी जोशी यांची खात्री होती. पण त्याचवेळी भारतीय म्हणजे गरीब लोक, हा मागासलेला देश, आपण ह्यांना मदत केली पाहिजे, त्यांचा विकास करायला पाहिजे अशा प्रकारची एक वडिलकीची (patronizing) भावना पाश्चात्त्य समाजात त्यांना खूपदा आढळायची. व्यक्तिशः आपल्याकडे बघण्याची पाश्चात्त्यांची दृष्टीही तशीच अहंगंडातून आलेली आहे असे त्यांना जाणवायचे. ह्या भावनेतून येणारा पाश्चात्त्यांचा दातृत्वाचा आविर्भाव त्यांना चीड आणायचा; त्यांच्यातील प्रखर आत्मभानाला म्हणा किंवा अस्मितेला म्हणा तो कुठेतरी डंख करणारा होता.

मागे लिहिल्याप्रमाणे आपण कोणीतरी मोठे व्हावे, जगावेगळे काहीतरी करून दाखवावे अशी एक महत्त्वाकांक्षा जोशी ह्यांच्या मनात लहानपणापासून होतीच. भारतातील पोस्टखात्यात उच्चपदी असतानाही ह्या महत्त्वाकांक्षेने त्यांची पाठ सोडली नव्हती. स्वित्झर्लंडमध्ये राहताना बाकी सगळे असूनही ह्या मूलगामी महत्त्वाकांक्षेच्या पूर्ततेच्या दृष्टीने काहीच घडत नव्हते, घडणे शक्यही वाटत नव्हते. शेवटी भारत हीच आपली कर्मभूमी असायला हवी, इथे आपले आयुष्य फुकट चालले आहे, ही जाणीव त्यांच्या मनात त्यावेळी निर्माण झाली असणे सहजशक्य आहे.

टोनी म्हणाले,

''एक दिवस आपला मालकीचा फ्लॅट विकून टाकायचा व बर्नमध्ये भाड्याचं घर घेऊन राहायचा निर्णय त्याने घेतला. हे त्याने जेव्हा मला सांगितलं, तेव्हाच भारतात परतायचा त्याचा निर्णय पक्का झाला आहे, हे माझ्या लक्षात आलं. आणि एकदा त्याच्या मनानं एखादी गोष्ट घेतली, की त्याचं मन वळवणं अवघड नव्हे तर अशक्य आहे, हे आठ वर्षांच्या सहवासात मला कळून चुकलं होतं.''

भारतात प्रत्यक्ष परतायच्या काही वर्षे पूर्वीच तसे करायचा सुस्पष्ट विचार जोशी यांच्या मनात आकाराला आला होता हे स्पष्ट करणारी काही कागदपत्रे उपलब्ध आहेत.

उदाहरणार्थ, मार्च १९७४ मध्ये हैद्राबाद येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिटी डेव्हेलपमेंट या संस्थेच्या संचालकांबरोबर झालेला त्यांचा पत्रव्यवहार उपलब्ध आहे. त्यानुसार त्या संस्थेने स्वतःच्या जर्नलच्या वर्गणीचे म्हणून पाठवलेले सहा पौंडांचे बिलही उपलब्ध आहे. आपल्या पत्रात १५ जुलै ते ३१ डिसेंबर १९७४ या कालावधीत संस्थेचा कोर्स करायची इच्छाही जोशींनी व्यक्त केली आहे.

राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एम. एस. ऊर्फ नानासाहेब पवार यांना जोशींनी लिहिलेले पत्र व त्याला नानासाहेब पवार यांनी दिलेले उत्तरही उपलब्ध आहे. त्या पत्रात भारतातील शेतीचा अभ्यास करायची इच्छा जोशींनी व्यक्त केली आहे व उत्तरात पवार यांनी त्यांना मार्गदर्शनही केलेले आहे. ''आमचे एक प्राध्यापक डॉ एस. एस. थोरात पुणे कृषी महाविद्यालयात आहेत व त्यांच्याबरोबर १५ जुलै ते ३१ डिसेंबर या

कालावधीत तुम्ही काम करू शकता. ते तुम्हाला पुण्याभोवतीच्या खेड्यांमधून घेऊन जातील, तेथील शेतकऱ्यांमधील आमचे काम तुम्ही पाहू शकाल,'' असेही त्यात लिहिले आहे.

त्यानंतर दोन वर्षांनी, २६ मार्च १९७६ रोजी, दिल्लीत प्रधानमंत्री कार्यालयातील सचिवांना जोशींनी बर्नहून एक महत्त्वाचे पत्र लिहिले आहे. त्या पत्रात भारतात परतायचा व शेतीविषयक काम करायचा आपला निर्णय त्यांनी कळवला आहे. सोबत आपल्या मनातील प्रकल्पाचा आराखडाही पाठवला आहे. त्यासाठी 'शासनाकडून पडीक जमीन उपलब्ध होईल का' अशी विचारणा केली आहे. असेच पत्र आपण महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांना पाठवले असल्याचा पत्रात उल्लेख आहे. ''ही जमीन मी रोख पैसे देऊन विकत घेईन. शासनाकडून कुठल्याही प्रकारच्या साहाय्याची मला अपेक्षा नाही,'' हेही पत्रात स्पष्ट केलेले आहे हे मुद्दाम नमूद करण्यासारखे आहे.

प्रस्तुत पत्राला सहसचिव, प्रधानमंत्री सचिवालय, यांनी लिहिलेले ५ एप्रिल १९७६ तारखेचे उत्तर उपलब्ध आहे. त्यात लिहिले आहे,

''तुमचे पत्र व सोबतचा तुम्ही बनवलेला कमीत कमी भांडवल वापरून शेती करायच्या पायलट प्रोजेक्टचा आराखडा मिळाला. या महत्त्वाच्या विषयात तुम्ही स्वारस्य घेत आहात याचे कौतुक वाटते. आपल्याला हे पटेलच की केवळ कच्च्या आराखड्याच्या आधारावर विस्ताराने काही प्रतिसाद देणे आम्हाला अवघड आहे, पण महाराष्ट्रात परतल्यावर तुम्ही तेथील शासनाशी चर्चा करणार असल्याचे तुम्ही पत्रात लिहिलेच आहे. महाराष्ट्र शासनाकडून तुम्हाला नक्कीच सर्व अपेक्षित उत्तरे मिळतील.''

पत्रासोबत आपल्या योजनेचा कच्चा आराखडा जोडला असल्याचा उल्लेख जोशींनी केला आहे, व तो मिळाल्याचा उल्लेख सहसचिवांच्या उत्तरात आहे, पण दुर्दैवाने त्या आराखड्याची प्रत मात्र जोशी यांच्या कागदपत्रांत उपलब्ध झाली नाही. ती उपलब्ध असती, तर तो एक महत्त्वाचा दस्तावेज ठरला असता.

या सर्व पत्रव्यवहारावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे भारतात प्रत्यक्ष परतायच्या निदान दोन वर्षे आधी भारतात परतायचे व परतल्यावर कोरडवाहू शेतीविषयक प्रयोग करायचे जोशी यांचे ठरले होते व त्यादृष्टीने बरेचसे नियोजनही त्यांनी केले होते.

१ मे १९७६ रोजी, म्हणजे युपीयुमध्ये दाखल झाल्यानंतर बरोबर आठ वर्षांनी, जोशी भारतात परतले. तिथेच राहिले असते तर २००१पर्यंत त्यांना नोकरी करता आली असती पण त्यांचा निश्चय अविचल होता. टोनी म्हणाले,

''त्यानंतर त्याचा व माझा काहीच संबंध राहिला नाही. आमच्यात पत्रव्यवहारदेखील कधी झाला नाही. तो भारतात शेतकऱ्यांना वाजवी भाव मिळावा यासाठी काही काम करतो, एवढं फक्त मला कुठूनतरी ऐकून कळलं होतं. अशीच जवळजवळ दोन वर्षं गेली. मग साधारण १९७८च्या सुमारास अचानक त्याचं मला पत्र आलं. त्याला झुरिकजवळ स्प्रायटेनबाख (Spritenbach) नावाच्या गावी असलेली झ्वीबाख (Zwibach) पोटॅटो

चिप्स फॅक्टरी नावाची एक वेफर्स बनवायची फॅक्टरी बघायची होती. त्यानुसार तो स्वित्झर्लंडला आला, ठरल्याप्रमाणे बर्नला माझ्याच घरी राहिला. मी त्यापूर्वीच तिथल्या मॅनेजमेंटला फोन करून अपॉइंटमेंट घेऊन ठेवली होती. दुसऱ्या दिवशी मीच त्याला त्या फॅक्टरीत घेऊन गेलो. पूर्ण दिवस आम्ही त्या फॅक्टरीमध्ये घालवला. सगळं बघण्यात आणि चर्चा करण्यात. तिथल्या अधिकाऱ्यांनी आमचं चांगलं स्वागत केलं. विशिष्ट प्रकारचे बटाटे कसे व कुठून मिळवले जातात, ते भरपूर पाण्याने कसे धुतले जातात, नंतर ते कसे सोलले व कापले जातात, कसे तळले जातात, त्यांची चव कशी तपासली जाते, दर्जा कसा कायम राखला जातो, तयार वेफर्सचं पॅकिंग कसं केलं जातं, त्यावरचा मजकूर कसा छापला जातो, तो तयार माल कसा वितरीत केला जातो हे सगळं त्यांनी आम्हाला दाखवलं. शरदला असं काहीतरी भारतात सुरू करायचं होतं. पण प्रत्यक्षात असं काही करणं त्याच्या परिस्थितीत अशक्य आहे असा निष्कर्ष त्याने शेवटी काढला.''

पुढे टोनी म्हणाले,

''१९७८ सालातील त्याच्या त्या भेटीनंतर पुन्हा पुढली ३४ वर्षं आमचा काहीच संबंध आला नाही. त्याच्या मुली मात्र अधूनमधून आमच्या संपर्कात होत्या. मग गेल्या महिन्यात अगदी अचानक त्याची इमेल आली व तुम्ही त्याचं चरित्र लिहीत आहात व त्या संदर्भात मला भेटू इच्छिता हे त्यानी कळवलं. तुमच्याशी झालेल्या ह्या चर्चेमुळे आज इतक्या वर्षांनी त्या सगळ्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. एका उमद्या, बुद्धिमान मित्राबरोबर आठ वर्षं मी काम केलं, त्यांतील सात वर्षंतर त्याचा अगदी जवळचा शेजारी म्हणूनही राहिलो, त्याचा व त्याच्या सगळ्या कुटुंबाचा भरपूर सहवास मिळाला ह्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो.''

ह्या भेटीच्या वेळी व नंतरदेखील टोनी यांनी जे मनःपूर्वक सहकार्य दिले, त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच होतील. आमच्या भेटीची मी लिहिलेली टिपणांची १८ पानेदेखील त्यांनी कंटाळा न करता व्यवस्थित तपासून दिली. शरद जोशी यांच्या जीवनातील हे बहुतांशी अज्ञात राहिलेले पर्व त्यांच्यामुळेच माझ्यापुढे साकार झाले.

आयुष्याच्या ऐन उमेदीत स्वित्झर्लंडसारख्या एखाद्या देशात आठ वर्षे सहकुटुंब राहताना, वरिष्ठपदी काम करताना जोशींच्या संवेदनशील मनावर अनेक संस्कार होणे अगदी स्वाभाविक आहे. असे कुठले वैचारिक संस्कार ह्या कालावधीत त्यांच्यावर झाले असतील, ह्याचा विचार करताना व त्यांचा भावी जीवनातील वाटचालीशी संबंध जोडताना चार मुद्दे सर्वाधिक महत्त्वाचे वाटतात.

इथल्या वास्तव्यात पटलेला व भावी जीवनावर प्रभाव टाकणारा पहिला मुद्दा म्हणजे आर्थिक समृद्धीचे मानवी जीवनातील सर्वस्पर्शी महत्त्व.

इथली डोळे दिपवणारी समृद्धी ही केवळ आर्थिक नव्हती; तिचे पडसाद जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत उमटताना दिसत होते. शिस्तबद्ध वाहतूक, लोकांचे एकमेकांशी असलेले समंजस

वागणे, कसलाच तुटवडा नसल्याने आणि म्हातारपणाची उत्तम सोय सरकारने केलेली असल्यामुळे वागण्यात सहजतःच आलेले औदार्य, व्यक्तिस्वातंत्र्याची पराकोटीची जपणूक, लोकांचे निसर्गप्रेम, त्यांचे क्रीडाप्रेम, सर्व सोयींनी युक्त अशी मैदाने, प्रशस्त तरणतलाव, घराघरातून फुललेली रंगीबेरंगी फुले, सुदृढ व टवटवीत चेहऱ्यांचे नागरिक हे सारेच खूप आनंददायी होते. इथे आठ वर्षे काढल्यावर आर्थिक समृद्धीचे सर्वंकष महत्त्व त्यांना पूर्ण पटले. उर्वरित आयुष्यात व्यक्तिगत पातळीवर ते बहुतेकदा साधेपणेच राहिले; पण त्यांनी अर्थवादाचे महत्त्व कायम अधोरेखित केले व कधीही दारिद्र्याचे उदात्तीकरण केले नाही.

मनावर ठसलेला दुसरा मुद्दा म्हणजे देशाच्या या एकूण समृद्धीत समृद्ध शेतीचे असलेले पायाभूत महत्त्व.

स्वित्झर्लंडच्या समृद्धीमागे अनेक घटक आहेत हे नक्की, पण शेतीतील समृद्धी हा त्यांतील सर्वाधिक महत्त्वाचा घटक आहे. शेतीतील फायद्यातूनच तिथे आधी शेतमालावर प्रक्रिया करणारे छोटे कारखाने उभे राहिले, त्यातून इतर ग्रामोद्योग, विकसित अशी ग्रामीण बाजारपेठ, ग्रामीण समृद्धी व त्यातून मग मोठाले उद्योग असा तेथील विकासाचा क्रम आहे. त्याच्या मुळाशी आजही शेती हीच आहे. ह्याची स्पष्ट कल्पना असल्यामुळेच तेथील सरकार शेतीला सर्व प्रकारे उत्तेजन देते. शेतीत वापरता येतील अशी अत्याधुनिक उपकरणे शेतकऱ्याला उपलब्ध असतात. शेतीमालाची साठवणूक करण्यासाठी गुदामे, शीतगृहे, वाहतूक करण्यासाठी वाहने व रस्ते, विक्रीसाठी सुसज्ज बाजारपेठ, भांडवली खर्चासाठी अत्यल्प व्याजदरात कर्जाची उपलब्धता, वीज व पाणी ह्यांचा अनिर्बंध पुरवठा या व अशा इतरही अनेक कारणांमुळे तेथील शेती आजही अतिशय किफायतशीर आहे – विशेषतः दूध शेती (Dairy Farming). या छोट्याशा देशामध्ये, ज्याची लोकवस्ती जेमतेम ८० लाख, म्हणजे आपल्या मुंबईच्या निम्म्याहून कमी आहे अशा देशात, आज २६,००० सहकारी दूध संस्था आहेत व त्यातील बहुतेक सर्व चांगल्या चालतात. इथे गायींना कोणीही गोमाता म्हणून पूजत नाही, पण इथल्या गायी धष्टपुष्ट असतात, उत्तम काळजी घेऊन निरोगी राखल्या जातात आणि रोज सरासरी तीस-चाळीस लिटर दूध देतात. ह्या दुधापासून दही, लोणी, चीज, दूध पावडर वगैरे अनेक उत्पादने मोठ्या प्रमाणावर तयार होतात व त्याला जगभरातून प्रचंड मागणी आहे. ह्या समृद्ध शेतीतूनच पुढे त्यांनी देशाचा औद्योगिक विकासदेखील केला; पण औद्योगिकीकरण करताना त्यांनी शेतीकडे कधीच दुर्लक्ष केले नाही. हे सारे जोशी यांना तिथे जवळून बघता आले, अभ्यासता आले.

तिसरा मुद्दा म्हणजे तंत्रज्ञानाचे मानवी विकासातील पायाभूत महत्त्व.

इथल्या वास्तव्यात जोशी यांना स्वतःला तंत्रज्ञानाची आवड निर्माण झाली. कदाचित ती उपजतदेखील असू शकेल, पण इथे तिला भरपूर वाव मिळाला असेही म्हणता येईल. टोनी सांगत होते,

''ऑफिसात कुठलंही नवं उपकरण आलं, की ते कसं वापरायचं हे शिकून घेण्यात तो आघाडीवर असायचा. कॉम्प्युटरचा वापर त्यावेळी बराच मर्यादित होता, पण तरीही

जिनिव्हाला जाऊन कॉम्प्युटर व टेलेकम्युनिकेशन्स शिक्षणाचा एक तीन महिन्यांचा कोर्स करायची त्याची इच्छा होती. त्यासाठी बरीच धडपड करून त्याने ऑफिसची परवानगी मिळवली व तो कोर्स पूर्णही केला. हा कोर्स करणारे त्यावेळी आमच्या ऑफिसात अगदी थोडे लोक होते. संध्याकाळी घरी गेल्यावरदेखील तो वेगवेगळे पार्ट्स जोडून इलेक्ट्रॉनिकची ट्रेन तयार करायचा खेळ खेळण्यात रंगून जायचा. त्यासाठी त्याने बरीच महागडी साधनंही खरेदी केली होती.''

जोशींची तंत्रज्ञानाची ही आवड पुढे आयुष्यभर कायम राहिली. म्हातारपणी ज्यावेळी हात कापत असल्यामुळे संगणकावर अक्षरलेखन करणे त्यांना जमेना त्यावेळी नुकतेच बाजारात आलेले Dragon Naturally Speaking या नावाचे एक आवाज ओळखून कळफलक वापरणारे सॉफ्टवेअर त्यांनी कुठूनतरी मिळवले, ते आत्मसात केले व पुढची तीन-चार वर्षे त्याचा वापर करून आपले इंग्रजी लेखन केले. पुढे पुढे मात्र अर्धांगवायूच्या झटक्यानंतर त्यांच्या आवाजात संदिग्धता आली व त्यानंतर मात्र त्यांना इंग्रजी लेखनासाठीही लेखनिकावर अवलंबून राहावे लागले.

१९७२-७३ या कालावधीत लोझान ह्या मोठ्या स्विस शैक्षणिक शहरात शनिवार-रविवार जाऊन-येऊन त्यांनी एक कोर्सही केला होता – Diploma in Data Processing, Computer Programming and Systems Analysis. यानंतर ऑफिसात 'हेड, डेटा प्रोसेसिंग सेंटर' या पदावर त्यांची नेमणूक झाली. नोकरी सोडली, तेव्हा ते ह्याच पदावर होते.

जिनिव्हा येथे राहणारे मोरेश्वर ऊर्फ बाळ संत नावाचे एक इंजिनिअर मला तिथे भेटले. जोशींना ते चांगले ओळखत होते. इंटरनॅशनल टेलेकम्युनिकेशन्स युनियन ह्या युएनच्या घटकसंस्थेत ते नोकरी करत होते. जोशी यांनी जिनिव्हाला जाऊन जो कोर्स केला होता, तो संत ह्यांच्या संस्थेनेच युएनच्या कर्मचाऱ्यांसाठी म्हणून खास तयार केला होता. जोशी तो कोर्स करण्यात किती रमले होते, बाजारात येणाऱ्या कुठल्याही नव्या संशोधनाबद्दल ते किती उत्साहाने चौकशी करत ह्याबद्दल संतदेखील सांगत होते. ''मी पुण्याच्या कॉलेज ऑफ इंजिनियरिंगचा विद्यार्थी, जोशी मात्र अर्थशास्त्राचे विद्यार्थी; पण आमच्या गप्पा नेहेमी तंत्रज्ञानाबद्दल असत,'' ते म्हणाले. युपीयुच्या कामासाठी जोशी यांना जिनिव्हाला वारंवार यावे लागे व त्यामुळे दोघांच्या भेटीही वरचेवर होत.

तंत्रज्ञानाचे व्यापक सामाजिक महत्त्व कोणाच्याही सहज लक्षात यावे अशीच स्वित्झर्लंडमधली परिस्थिती होती. उदाहरणार्थ, वर उल्लेख केलेल्या दूधशेतीत तंत्रज्ञानाचा वापर पावलोपावली होत होता. एका प्लॅटफॉर्मवर गाय उभी राहायची, तिच्या आचळांभोवती यांत्रिक दुग्धशोषक (suckers) जोडले जायचे, ठराविक वेळात दूध काढले गेले की ते आपोआप मोकळे व्हायचे, सरकत्या प्लॅटफॉर्मवरून ती गाय पुढे जायची व तिच्या जागी पुढची गाय यायची. पुढे हे दूध पाइपलाइनीतून एकत्र करणे, ह्या दुधावर प्रक्रिया करणे, त्याचे गुणवत्तेनुसार वर्गीकरण करणे, ते साठवणे, त्याचे पॅकिंग, वितरण इत्यादी सर्व प्रक्रियांमध्ये मानवी हस्तस्पर्श अजिबात नाही.

शेती, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यांची उत्तम सांगड स्वित्झर्लंडने कशी घातली आहे ह्याचे तेथील नेसले (Nestle) कंपनी हे उत्तम उदाहरण आहे. शेतकरी भरणा करत असलेल्या दुधाला त्यांनी उत्तम भाव दिला, त्याच्या समृद्धीला हातभार लावला. त्याशिवाय नुसते दूध वा दुधापासून तयार होणारे लोणी, दही वा चीज तुम्ही किती विकू शकता ह्याला मर्यादा आहे, हे ओळखून नेसले कंपनीने बेबीफूड, चॉकोलेट्स व 'मॅगी'सारखे 'फास्ट फूड' बनवायला सुरुवात केली, त्यांची निर्यात सुरू केली आणि आज त्या क्षेत्रांत ती जगातील एक अग्रगण्य कंपनी मानली जाते.

इतक्या मोठ्या मल्टिनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यालय जिनिव्हा, झुरिक, बर्न अथवा बाझल यांसारख्या कुठल्याच मोठ्या स्वीस शहरात नाही, तर वेवेसारख्या एका अगदी छोट्या गावात आहे हे आपण लक्षात घेणेही खूप महत्त्वाचे आहे.

चौथा मुद्दा म्हणजे मानवी जीवनातील स्वातंत्र्य ह्या मूल्याचे पायाभूत महत्त्व.

स्वीस लोकांनी व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक इतर कोणत्याही देशापेक्षा अधिक जागरूकतेने केली आहे. ह्या देशात सार्वजनिक बसेसचा रंग कोणता असावा यावरसुद्धा सार्वमत (referendum) घेतले गेले आहे! खऱ्या अर्थाने लोकशाहीचे जतन केलेला हा देश आहे. आपापला कारभार चालवण्यात प्रत्येक काउंटीला भरपूर स्वातंत्र्य आहे व तेच स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीलाही दिले गेले आहे. ह्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेभोवतीच ह्या देशाचे अस्तित्व गुंफलेले आहे.

आपल्या सर्व भावी आयुष्यात स्वातंत्र्य हे मूल्य जोशींनी कायम सर्वाधिक महत्त्वाचे मानले. एक गंमत म्हणजे डोंगर चढण्याचा छंद हाही कुठेतरी ह्या स्वातंत्र्यप्रेमाशी जोडलेला असावा. स्वित्झर्लंडमध्ये हे डोंगरांचे प्रेम सार्वत्रिक आहे. हा देश डोंगरांचाच बनलेला आहे; देशात कुठेही जा, डोंगर तुमच्यापासून लांब नसतात. जोशींना लहानपणापासून डोंगरांचे आकर्षण होतेच, पण भारतात डोंगर चढायला फारसा वाव नव्हता; नोकरी मुख्यतः शहरांतच होती. स्वित्झर्लंडमध्ये मात्र ह्या गिर्यारोहणाला भरपूर वाव मिळाला. आपली बरीचशी बंधने ही भूमीशी निगडित असतात व डोंगर चढताना माणूस जसजसा वर चढत जातो, तसतसा मानसिक पातळीवरतरी तो ह्या बंधनांपासून दूर होत जातो. 'As we elevate ourselves, we become freer and freer' असे कोणीसे म्हटले आहे. जोशींचे स्वातंत्र्यप्रेम हा आयन रँडसारख्यांचा प्रभाव असेल, इतरही काही संस्कारांचा प्रभाव असेल, पण हा कुठेतरी स्वित्झर्लंडचाही एक वारसा असू शकेल.

आर्थिक समृद्धीचे जीवनातील महत्त्व, देशात ती यावी यासाठी शेतीला द्यावयाची प्राथमिकता, तंत्रज्ञानाचा परिपूर्ण वापर आणि स्वातंत्र्याची दुर्दम्य लालसा ह्या चतुःसूत्रीला जोशींच्या भावी जीवनातही बरेच महत्त्व आहे व या चतुःसूत्रीचा पाया बळकट व्हायला स्वित्झर्लंडमधली आठ वर्षे बऱ्यापैकी कारणीभूत झाली असावीत.

■

# ४

# मातीत पाय रोवताना

शरद जोशी स्वित्झर्लंड सोडून सहकुटुंब भारतात परतले १ मे १९७६ रोजी.

ते आणीबाणीचे दिवस होते. २५ जून १९७५मध्ये पुकारलेल्या आणीबाणीला सुरुवातीला झालेला थोडाफार विरोध थोड्याच दिवसांत मावळला होता. काही लोकशाहीप्रेमी सरकारविरुद्ध लढा देत होते, पण तो बहुतांशी छुप्या स्वरूपातला होता; जाहीररीत्या सरकारविरुद्ध कारवाया अशा होत नव्हत्या. 'गाड्या बघा आता कशा अगदी वेळेवर धावतात!' हे कौतुक सारखे कानावर पडायचे.

योगायोग म्हणजे त्या दिवशी जोशींनी पुण्याला जाण्यासाठी डेक्कन क्वीन पकडली, तेव्हा ती नेमकी अर्धातास उशिरा सुटली होती! आणीबाणीसमर्थकांचा निदान एक दावा तरी चुकीचा होता ह्याचा त्यांना प्रत्यय आला!

आपले बहुतेक घरगुती सामान त्यांनी युरोपातून बोटीने मागवले होते व ते येण्यास अजून काही दिवस लागणार होते. कपडे वगैरे आवश्यक तेवढ्या सामानाच्या चार बॅगा घेऊन, पत्नी लीला आणि गौरी व श्रेया ह्या दोन मुली यांच्यासह ते टॅक्सीने विमानतळावरून दादर स्टेशनवर आले होते व तिथेच त्यांनी व्हीटीहून नेहमी संध्याकाळी पाच दहाला निघणारी डेक्कन क्वीन पकडली होती. प्रथम वर्गाची तिकिटे असल्याने गाडीत जागा तर मिळाली, पण पूर्वीप्रमाणे गाडीत कुठेच कोणाच्या गप्पा रंगल्या नव्हत्या. सगळा शुकशुकाट.

''कधीच लेट न सुटणारी गाडी आज चक्क अर्धा तास लेट सुटली!'' शेजारच्या माणसाला ते सहज काहीतरी गप्पा सुरू करायच्या म्हणून म्हणाले, तशी त्याने व आजूबाजूच्या दोन-तीन जणांनी चमकून त्यांच्याकडे पाहिले. सगळ्यांचेच चेहरे सावध दिसत होते. भारतात सध्या प्रचंड सरकारी दहशत आहे हे त्यांनी स्वित्झर्लंडमध्ये असताना वाचले होते व ते खरेच असावे हे त्या पहिल्याच संध्याकाळी जाणवले. पुढचा प्रवास जोशी कुटुंबीयांनी आपापसातच वरवरच्या गप्पा मारत पार पाडला.

त्यांच्यासारख्या कमालीच्या स्वातंत्र्यप्रेमी आणि त्यातही पुन्हा स्वित्झर्लंडसारख्या देशात आठ वर्षे राहून परत येणाऱ्या गृहस्थाला ही दहशत बोचणारी होती. पण त्याचवेळी कसाही असला, तरी हाच आपला देश आहे आणि यापुढे आपण इथेच राहायचा निर्णय स्वखुशीने घेतला आहे ह्याची जाणीव त्यांना होती. सगळ्या राजकीय घडामोडींपासून आपण अगदी अलिप्त राहायचे आहे व फक्त शेतीवरच आपले सर्व लक्ष केंद्रित करायचे आहे, ह्याची

खूणगाठ त्या पहिल्या संध्याकाळीच त्यांनी मनाशी पक्की बांधली.

पुण्याला पोचल्यावर रेल्वेस्टेशनवरून ते सहकुटुंब डेक्कनवर *श्रेयस* हॉटेलात गेले. इथल्या दोन खोल्या त्यांनी पूर्वीच आरक्षित करून ठेवल्या होत्या. आईसमवेत सदिच्छा बंगल्यात न राहता स्वतःचे वेगळे घरच विकत घ्यायचे व ते सापडेस्तोवरदेखील हॉटेलातच राहायचे जोशींनी ठरवले होते. त्यादृष्टीने थोडीफार चौकशी त्यांनी स्वित्झर्लंडमध्ये असतानाच करून ठेवली होती.

त्याप्रमाणे ते लगेच कामाला लागले. सहाएक आठवड्यांतच एक बंगला त्यांनी खरेदी केला. औंध येथील सिंध सोसायटीत ७०५ क्रमांकाचा. तीन बेडरूम्स असलेला. शिवाय पुढे-मागे थोडी बाग होती. परिसर निवांत होता. मालक एक शाळामास्तर होते. त्याकाळी पुण्यापासून लांब समजल्या जाणाऱ्या औंधसारख्या ठिकाणी घरे बऱ्यापैकी स्वस्तात उपलब्ध होती. घराचे नाव त्यांनी *मृद्गंध* ठेवले. त्या नावाचा विंदा करंदीकर यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध होता व शिवाय त्या शब्दातच काव्यात्मकता होती. जोशींसारख्या कविताप्रेमीला तो शब्द भावला. त्यांनी बंगला घेतला त्यावेळी पावसाळा नुकताच सुरू झाला होता व औंध परिसरात तेव्हा बऱ्याच शेतजमिनी असल्याने खूपदा हवेत हवाहवासा वाटणारा मृद्गंध दाटून येई, हेदेखील त्यामागचे कदाचित एक कारण असू शकेल.

पुढच्या काही दिवसांत बोटीने येणारे त्यांचे सामानही येऊन पोचले. ते नीट लावण्यात बराच वेळ गेला. 'बर्नमधल्या माझ्या खोलीत जे सामान आहे, ते सगळंच्या सगळं पुण्यातल्या माझ्या खोलीत असलं, तरच मी पुण्याला येईन,' अशी धाकट्या गौरीची अटच होती. नव्या जागी वास्तव्य सुरू करायचे म्हणजे धावपळ तर अपरिहार्यच होती. शहरापासून इतक्या लांब त्यावेळी सार्वजनिक वाहनव्यवस्था नव्हती; दिवसभरात जेमतेम सात-आठ बसेस औंधमार्गे पिंपरी-चिंचवडकडे जायच्या. शिवाय बहुतेक सगळ्या खरेदीकरिता डेक्कनला जावे लागे. त्यामुळे त्यांनी लगेचच स्वतःसाठी एक लॅम्ब्रेटा स्कूटर घेतली व सहकुटुंब कुठे जाता यावे म्हणून काही दिवसांनी एक सेकंडहँड जीप गाडीही खरेदी केली.

घर शोधत असतानाच मुलींसाठी चांगली शाळा कुठे मिळेल याचाही शोध चालूच होता. कारण ते अगदी शाळा सुरू व्हायचेच दिवस होते. स्वित्झर्लंडमध्ये दोन्ही मुलींना इतर विषयांबरोबरच फ्रेंच, जर्मन व लॅटिन हे तीन विषय होते; इथे पुण्यात मात्र त्याऐवजी इंग्रजी, हिंदी व मराठी हे विषय होते. पाचगणीला एका मुलींच्या प्रख्यात निवासी शाळेत फ्रेंच हा विषय अभ्यासक्रमात आहे असे त्यांनी ऐकले होते व नव्या शाळेतला एकतरी विषय मुलींना चांगला येणारा असावा म्हणून एकदा सगळे पाचगणीला जाऊनही आले. शाळेला मैदान वगैरे उत्तम होते, इमारत प्रशस्त होती, पण निवासव्यवस्था दाटीवाटीची व अस्वच्छ होती – निदान नुकतेच स्वित्झर्लंडहून आलेल्यांच्या दृष्टीनेतरी. 'आम्ही ह्या असल्या डॉर्मिटरीमध्ये चार दिवससुद्धा राहू शकणार नाही' असे दोन्ही मुलींनी स्पष्ट सांगितले. मुळात भारतात परत यायचा वडलांचा निर्णय मुलींना मनापासून मान्य नव्हताच; कशीबशी वडलांच्या आग्रहापुढे त्यांनी

मान तुकवली होती. अशा परिस्थितीत त्यांना अमान्य असलेल्या शाळेत घालून अधिक नाराज करणे वडलांना परवडणारे नव्हते. पाचगणीच्या शाळेत मुलींना घालायचा इरादा त्यांना सोडून द्यावा लागला.

पुण्याला परतल्यावर दुसऱ्याच दिवशी पाषाण भागात असलेली सेंट जोसेफ ही जुनी कॉन्व्हेंट शाळा ते बघायला गेले व ती त्यांना चांगली वाटली. शिक्षणखात्याच्या कार्यालयात तीन चार चकरा टाकल्यावर इथे प्रवेश मिळू शकेल हे तेथील अधिकाऱ्यांकडून कळले. शाळेच्या स्वतःच्या बसेस होत्या व कधी गरज पडली तर घरापासून पायीसुद्धा पंधरा-वीस मिनिटांत जाता येईल इतकी ती जवळ होती. विशेष म्हणजे तिथे फ्रेंच हा विषय होता. त्याच शाळेत मग मुलींचे नाव घातले गेले.

हे सगळे होत असतानाच एकीकडे त्यांनी शेतीसाठी जमिनीचा शोधही सुरू केला होता. पूर्णतः पावसावर अवलंबून असलेली कोरडवाहू जमीनच घ्यायची हे त्यांनी परदेशात असतानाच नक्की केले होते. त्यांची आई व अन्य भावंडे ह्यांना जोशी करत होते तो कमालीचा विक्षिप्तपणा वाटत होता. मुळात त्यांच्या खानदानात कधी कोणी शेती केलीच नव्हती. पण त्यांनी 'तुला काय योग्य वाटेल ते कर' अशीच भूमिका घेतली. एकदा आपल्या शरदने एखादी गोष्ट ठरवली, की ती केल्याशिवाय तो कधीच राहणार नाही हे घरच्यांना चांगले ठाऊक होते. आश्चर्य म्हणजे, अन्य जवळ जवळ कोणीच त्यांच्या उपक्रमाबद्दल फारसे कुतूहल दाखवलेच नाही! म्हणजे उत्तेजनही दिले नाही आणि टीकाही केली नाही. हा शहरी मध्यमवर्गीय अलिप्तपणा म्हणायचा की काय कोण जाणे!

नात्यागोत्यांतल्या बहुतेकांनी दाखवलेल्या या अलिप्ततेच्या अगदी उलट अनुभव म्हणजे रावसाहेब शेंबेकर यांच्याशी झालेली भेट. तशी त्यांची काहीच पूर्वओळख नव्हती. कोणाकडून तरी त्यांनी जोशींविषयी ऐकले व कुतूहल वाटून ते खास त्यांना भेटायला म्हणून पुण्याला आले. शेंबेकर यांची स्वतःचीही उसाची बरीच शेती होती. ते म्हणाले, ''बागायती शेतीतूनही शेवटी शेतकऱ्याच्या पदरी तोटाच येतो. हे मी माझ्या अनुभवातून सांगतोय. नाहीतरी तुम्हाला प्रयोगच करायचा आहे ना? मग त्यासाठी बागायती शेती का नाही घेत? हवं तर मीच माझ्या जमिनीचा एक चांगला तुकडा तुम्हाला प्रयोगासाठी देतो. त्याचे तुम्ही मला काहीही पैसे देऊ नका.'' खरेतर ह्या भल्या गृहस्थाने आपणहून दिलेला सल्ला अगदी योग्य असाच होता. शिवाय सोबत प्रत्यक्ष मदतीचे अत्यंत दुर्मिळ व ठोस असे आश्वासनही होते; पण जोशींनी तो जुमानला नाही; आपला कोरडवाहू शेतीचा आग्रह सोडला नाही. बऱ्याच वर्षांनी, २० जून २००१ रोजी, 'दैनिक लोकमत'मध्ये लिहिलेल्या आपल्या एका लेखात ते म्हणतात,

> शक्य तितक्या सौजन्याने मी रावसाहेब शेंबेकरांना काढून लावले. कोरडवाहू कातळात पाणी शोधण्याच्या आणि शेती फुलवण्याच्या कामात गढून गेलो.

शेंबेकरांच्या मनात किती सच्चाई आणि कळकळ होती ते कळायला मला दहा वर्षे लागली. त्यांचा तेवढा एक अपवाद सोडला तर शेतीच्या प्रयोगात मला सल्ला देण्याचा किंवा मी काय करतो आहे ते समजून घेण्याचा उपद्‌व्याप करणारे इतर कोणीच आले नाहीत.

आल्याआल्याच जोशींनी किर्लोस्कर कन्सल्टंट्स या प्रसिद्ध कंपनीला सल्लागार म्हणून नेमले होते; योग्य ती शेतजमीन शोधून देण्यासाठी. उगाच इकडच्या तिकडच्या ओळखीवर अवलंबून राहण्यापेक्षा प्रत्येक गोष्ट व्यावसायिक तत्त्वावर करण्याची त्यांची इच्छा होती. कंपनीच्या वतीने एका अधिकाऱ्यावर हे काम सोपवले गेले. पण त्या सल्लागाराचाही फारसा उपयोग होत नव्हता. यवत व उरळीकांचन येथे काही सुपीक विकाऊ जमिनी त्यांनी दाखवल्या; जोशींनी त्यांतली एखादी जमीन खरेदी करावी असा त्यांचा सल्ला होता. अशा भेटींच्या वेळी बहुतेकदा लीलाताईदेखील बरोबर असत. 'उसाच्या शेतीतदेखील हवे ते प्रयोग आपण करू शकू. शिवाय, त्यात धोका कमी आहे. आपल्याला आता केवळ शेतीवरच उदरनिर्वाह करायचा आहे, तेव्हा जिथे चार पैसे सुटायची थोडीतरी शक्यता आहे, तीच जमीन का खरेदी करू नये?' असे त्यांचे म्हणणे. पण जोशी आपल्या निर्णयापासून जराही हटायला तयार नव्हते.

शेवटी एकदाची हवी होती तशी कोरडवाहू शेतजमीन जोशींना मिळाली. त्या मागेही एक योगायोगच होता. एक निवृत्त पोलीस इन्स्पेक्टर जोशींच्या ओळखीचे झाले होते. त्यांनी त्यांच्या एका मित्राची जोशींबरोबर ओळख करून दिली. पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील चाकण ह्या गावापासून सात किलोमीटरवर आंबेठाण नावाचे एक छोटे खेडे होते. ह्या मित्राची तिथे जमीन होती, पण त्यांनी वेळोवेळी बँकेकडून घेतलेल्या कर्जापोटी ती गहाण पडली होती. खूप तगादा लावूनही त्यांच्याकडून कर्ज फेडले जात नसल्याने शेवटी बँकेने जमिनीचा लिलाव करायचे ठरवले होते. या परिस्थितीत काही मार्ग निघतो का, हे बघायला ते जोशींकडे आले होते.

जोशींची ती जमीन प्रत्यक्ष बघायची इच्छा होती व त्यानुसार दुसऱ्याच दिवशी दोघे तिथे गेले. वाटेत त्यांच्या बऱ्याच गप्पा होतच होत्या. त्यांचा मोकळाढाकळा स्वभाव जोशींना आवडला व त्याच दिवशी बँकेचे एकूण जितके कर्ज थकले होते, तेवढे पैसे जोशींनी त्यांच्या बँकेत रोख भरले व त्यांची जमीन लिलावापासून वाचवली.

पण तेवढ्याने त्यांची पैशाची गरज भागणार नव्हती. कारण आता दुसऱ्या काही कामासाठी त्यांना पुन्हा पैशांची गरज होती. पुन्हा एकदा जोशींनी त्यांना रोख पैसे कर्जाऊ दिले. असे दोन-तीनदा झाले. ते शेतकरी बँकेच्या कर्जातून मुक्त झाले, तरी आता जोशींचे बरेच पैसे त्यांच्याकडे थकले होते व ते परत मिळायची काही लक्षणे दिसेनात. जोशींच्या कर्जातून मुक्त होण्यासाठी म्हणून शेवटी त्यांनी आपली ती जमीनच जोशींना विकायचे ठरवले.

प्रत्यक्ष व्यवहार करण्यापूर्वी एकदा ती जमीन नीट पारखून बघावी, ह्या उद्देशाने जोशी

पतिपत्नी त्यांच्याबरोबर पुन्हा आंबेठाणला गेले. त्या जमिनीच्या बरोबर समोर तुकाराम महाराजांचा भामचंद्राचा डोंगर होता – जिथे ते चिंतन करायला एकांतात बसत. त्या डोंगराला एक विशिष्ट उंचवटा आहे. योगायोग म्हणजे बर्नमधल्या जोशींच्या घराजवळ जो गानटू नावाच्या डोंगराचा भाग होता, अगदी तसाच तो उंचवटा दिसत होता. जोशींना एकदम ती जागा आवडली. या डोंगराच्या गानटूशी असलेल्या साधर्म्यामुळे इथेच शेती करायचा योग आपल्या आयुष्यात आहे असे काहीतरी त्यांना वाटले. लगेचच त्या शेतकऱ्याने सांगितलेली किंमत जोशींनी चुकती केली व ती शेतजमीन विकत घेतली. १ जानेवारी १९७७ रोजी.

ही एकूण साडेतेवीस एकर जमीन होती. त्या जागेचे नाव जोशींनी 'अंगारमळा' असे ठेवले. 'क्रांतीचा जयजयकार' ही कुसुमाग्रजांची कविता जोशींच्या खूप आवडीची. त्याच कवितेतील 'एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार, होता पायतळी अंगार' ह्या ओळीवरून हे नाव त्यांना सुचले. पुढील आयुष्यात त्या जागी जोशींची जी वाटचाल झाली त्यातील दाहकता विचारात घेता हे नाव अगदी समर्पक ठरले असेच म्हणावे लागेल.

सरकारी नियमानुसार जो शेतकरी नाही त्याला शेतजमीन विकत घेता येणे आजच्याप्रमाणे त्याकाळीही अतिशय अवघड होते. पण प्रत्येक कायद्याला काही ना काही पळवाटा असतातच. ५ जुलै २००१ रोजी 'दैनिक लोकमत'मधील आपल्या एका लेखात त्यांनी लिहिले आहे,

> मी सरकारी नोकरीत असताना रिझर्व्ह बँकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांशी ओळख झाली होती. त्यांचे चिरंजीव आयएएस पास होऊन प्रांत म्हणून काम बघत होते. त्यांच्या मदतीने मार्ग सापडला.

कोकणातला रायगड जिल्हा आणि पुणे जिल्हा यांच्या सीमेवरच्या खेड तालुक्यातील चाकण हे गाव. शिवाजी महाराजांनी बारा मावळांपासून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. चाकण हे या मावळ मुलुखाचे प्रवेशद्वार. इथलेच लढवय्ये मावळे त्यांचे जिवाभावाचे सोबती.

असे ऐतिहासिक महत्त्वाचे गाव असूनही इथला सामान्य शेतकरी मात्र कमालीचा गांजलेला होता. दुष्काळातील त्याच्या दुःखाचे हृदयस्पर्शी वर्णन तुकाराम महाराजांनी केलेले आहे; पण दुष्काळ नसतानाही त्याची परिस्थिती फारशी काही वेगळी नसायची.

इथे सतत लढाया चालू असत. कधी दिल्लीचे मोगल आक्रमण करत तर कधी विजापूरच्या अदिलशहाचे सरदार, कधी सिद्धी जोहरचे सैनिक तर कधी पेंढाऱ्यांचे लहानमोठे हल्ले. प्रत्येक स्वारीत उभी पिके कापली जात, गावे लुटली जात, अगदी बेचिराख केली जात. आक्रमक कोणीही असला तरी शेतकऱ्याचे हाल सर्वाधिक असत. त्याचे घरदार, बैलनांगर, बी-बियाणे, पाण्याची व्यवस्था सारे नष्ट होऊन जाई. पुन्हा त्याला शून्यातून सुरुवात करावी लागे आणि जे नव्याने उभारायचे तेही कधी लुटले जाईल ह्याचा काहीच नेम नसायचा. स्थैर्याच्या पूर्ण अभावामुळे मोठे असे काही उभारायची, भविष्यासाठी बचत करायची, संपत्ती निर्माण करायची सारी प्रेरणाच नाहीशी होऊन जायची. राजेमहाराजांच्या स्वाऱ्या, त्यांच्या

आपापसातील लढाया, त्यांचे पराक्रम ह्या सगळ्यांनी भरलेल्या इतिहासात त्या सामान्य शेतकऱ्याची काहीच नोंद होत नव्हती, होणारही नव्हती. माणसाचा स्वतःच्या प्रयत्नावरचा सगळा विश्वास उडून जावा व अपरिहार्यपणे, केवळ जगण्यापुरते तरी बळ मिळावे म्हणून त्याने दैववादी बनावे, 'ठेविले अनंते तैसेची राहावे' हाच आदर्श समोर ठेवून गेला दिवस तो आपला समजत जगावे, अशीच एकूण परिस्थिती होती. पिढ्यानुपिढ्या हे असेच चालत आले होते व त्या संचितातूनच शेतकऱ्याची विशिष्ट मानसिकता घडत गेली होती.

भामा ही इथली प्रमुख नदी. वांद्रे गावाजवळ ती उगम पावते व पुढे भीमा नदीला मिळते. भामा नदीवर जवळच आसखेड धरण आहे. चाकण हे एक टोक पकडले तर वांद्रे गाव हे दुसरे टोक. वांद्र्याच्या पलीकडे रायगड जिल्हा सुरू होतो. वांद्रे व चाकण या दोन टोकांमधले अंतर ६४ किलोमीटर. ह्या भागाला भामनहरचे (किंवा भामनेरचे) खोरे असे म्हटले जाते व याच रस्त्यावर चाकणपासून सात किलोमीटरवरचे आंबेठाण हे एक छोटेसे गाव. इथला सगळा परिसर डोंगराळ. कांदे, बटाटे, ज्वारी आणि भुईमूग ही मुख्य पिके; खोऱ्याचा वांद्र्याजवळचा जो भाग आहे तिथे पाऊस जास्त पडत असल्याने भाताचे पीक घेतले जायचे.

रोज सकाळी सहा वाजता औंधमधील आपल्या घरून जोशी स्कूटरवरून निघायचे आणि ४० किलोमीटरवर असलेल्या आंबेठाणला सकाळी सातपर्यंत पोचायचे. कधी कधी लीलाताईदेखील सोबत येत. अशावेळी ते आपली महिंद्रची पांढरी जीप गाडी आणत. संध्याकाळी काळोख पडला की औंधला परतत. दिवसभर शेतीचे काम करता करता जमेल तेव्हा इतर गावकऱ्यांशी संवाद साधत, त्यांची शेती अभ्यासत.

आधी त्यांनी जमिनीला कंपाऊंड घालायचे काम हाती घेतले. दोन बाजूंना भिंत, तिसऱ्या बाजूला तार व चौथ्या बाजूला घायपात. घायपात म्हणजे निवडुंगासारखी बांधावर लावली जाणारी झाडे. ह्याची पाने शेळ्या-बकऱ्या खात नसल्याने ती दीर्घकाळ टिकतात व त्यांच्यापासून भाजीच्या जुड्या वगैरे बांधायला लागणारा जाडसर धागा मिळतो. हे असले ज्ञान प्रत्यक्ष शेतीत उतरल्यावरच जोशींना मिळाले. इथली बहुतेक जमीन उंचसखल, खडकांनी भरलेली अशी होती; किंबहुना म्हणूनच ती त्यांना स्वस्तात मिळू शकली होती. कित्येक वर्षे तिथे कुठलेच पीक घेतले गेले नव्हते. शेतीसाठी ती सर्वप्रथम नीट सपाट (लेव्हल) करून घेणे आवश्यक होते. पाणी उपलब्ध व्हावे म्हणून त्यांनी दोन विहिरीही खणायला घेतल्या. सुदैवाने पाणी चांगले लागले. पाइपाने पाणी सगळीकडे खेळवायचीही व्यवस्था केली. जमिनीवर दोन खोल्यांचे स्वतःसाठी एक घर बांधले. घराशिवाय एक सामानाची खोली होती, शेतीची अवजारे, खते व तयार शेतमाल ठेवायला मोठी शेड होती. म्हशी पाळायचा त्यांचा विचार होता व त्यासाठी गोठाही बांधायला घेतला. वीज महामंडळाकडे अनेक चकरा टाकून विजेची जोडणी करवली. अडचणीच्या वेळी अत्यावश्यक म्हणून टेलिफोनचीही सोय करून घेतली. त्या परिसरातले ते पहिले टेलिफोन कनेक्शन. शून्यातूनच सगळी सुरुवात करायची म्हटल्यावर एकूण प्रकरण तसे अवघडच होते; विशेषतः यावेळी जोशींची चाळिशी उलटलेली

असल्यामुळे. पण ते चिकाटीने एकेक करत कामे मार्गी लावू लागले.

सुरुंग लावणे, मोठाले खडक उकरून बाहेर काढणे, पिकांसाठी प्लॉट पाडणे, बांध घालणे, पाइप लाइन्स टाकणे, अंतर्गत कच्चे रस्ते तयार करणे, कुंपण घालणे, अशी अगणित कामे होती. सर्वांत आधी गरज कामगारांची होती. निदान शे-दीडशे माणसे रोज कामाला लागणार होती. मोठे मोठे खडक उकरून जमीन सारखी करताना आणि विहिरी खणताना त्या खडकांखाली दडलेले लांब लांब, मनगटाएवढे जाड साप चवताळून बाहेर पडत. त्यांच्या पुरातन घरांवरतीच इथे आक्रमण होत होते. साप सापडला नाही असा एक दिवस जात नसे. मजुरांना काम करताना सापांची भीती वाटायची. नाथा भेगडे नावाचा एक माणूस जोशींनी शेतीकामासाठी मुकादम म्हणून नेमला होता. तो रोज फटाफट साप मारत असे.

शक्यतो पुढच्या चार-पाच महिन्यांत जास्तीत जास्त कामे संपवावीत असे जोशींनी ठरवले होते, कारण नंतर मजुरीला माणसे मिळतीलच अशी खात्री नव्हती. खुद्द आंबेठाणमध्ये भूमिहीन मजूर असे जवळजवळ कोणीच नव्हते; प्रत्येकाची थोडीफार तरी शेती होतीच. पण तरीही स्वतःचे शेतीकाम संपल्यावर अधिकच्या कमाईसाठी सगळेच कुठे ना कुठे मजुरीवर जात. पण आपल्याला गरज असेल तेव्हा ते मजुरीसाठी उपलब्ध असतील याची शाश्वती नव्हती. सुदैवाने रब्बी पिकांचे काम झाल्यावर बहुतेक गावकऱ्यांना फारसे काही काम नसायचेच व त्यामुळे त्या कालावधीत पुरेसे मजूर उपलब्ध झाले. बरेचसे लांब लांब राहणारे कातकरी होते.

त्यावेळी मुक्काम करता येईल असा शेतावर आडोसा नव्हता. स्वित्झर्लंडहून आणलेली एक स्लिपिंग बॅग जोशींनी इथे आणून ठेवली होती; तशीच वेळ आली तर काहीतरी सोय असावी म्हणून. पण पुण्यातही कामे असायचीच; त्यामुळे जोशी शक्यतो झोपायला औंधला जात. अर्थात रोज न चुकता सकाळी सातच्या आत शेतावर हजर असत. वीजजोडणी, प्लंबिंग, सुतारकाम, गवंडीकाम अशी काही कामे कंत्राटावर दिलेली होती. ती मंडळी आपापले सामान घेऊन येत, आपापले काम करत; पण त्यांच्यावरही लक्ष ठेवावे लागे. बाकी कामे जोशी स्वतःच सांभाळत. एकाच वेळी चारपाच ठिकाणी कामे सुरू असत. जोशी जरा वेळ एका कामावर जायचे, तर जरा वेळाने दुसऱ्या कामावर. प्रत्येक ठिकाणी पाळीपाळीने स्वतः रांगेत उभे राहत, घमेली उचलत, दगडगोटे इकडून तिकडे टाकायचे काम करत. विहीर खणण्याच्या कष्टाच्या कामातही ते हाफ पँट घालून स्वतः खड्ड्यात, चिखलात उतरत. इतरांनाही कामाला हुरूप यावा, ही भावना त्यामागे होतीच; पण आठ वर्षे युरोपात काढल्यावर स्वतःच्या हाताने काम करायची तशी त्यांना सवयही झाली होती. इतर अनेक शहरी सुशिक्षित भारतीयांना वाटते तशी शरीरश्रमांची त्यांना लाज वाटत नसे; आणि शिवाय एकदा एखादे काम स्वतःच्या इच्छेने अंगावर घेतल्यावर सर्व ताकदीनिशी त्याला भिडायचे हा त्यांचा स्वभावच होता. स्वतः मजुरांच्या बरोबरीने काम करण्यात त्यांचा आणखीही एक उद्देश होता. तो म्हणजे त्यांच्याशी गप्पा मारणे व त्यातून गावकऱ्यांचे जगणे अधिक चांगले समजून घेणे.

सुरुवातीला गावकऱ्यांशी जोशींचा जरा वाद झाला. बाहेरून येणाऱ्या या कातकऱ्यांना मजुरी म्हणून किमान वेतन कायद्याप्रमाणे रोजचे तीन रुपये द्यायचे आणि स्त्री व पुरुष दोघांनाही सारखेच पैसे द्यायचे असे जोशींनी ठरवले होते. त्यांना स्वतःला ही मजुरी अगदी नगण्य वाटत होती. परदेशात काही वर्षे राहिलेल्या व तिथल्या किमतींची सवय झालेल्या माणसाला भारतात आल्यावर इथल्या सर्वच किमती, विशेषतः मानवी श्रमांचे इथले मूल्य, अगदीच नगण्य वाटते, तसाच हा प्रकार होता. पण मजुरीच्या ह्या दरामुळे गावकऱ्यांमध्ये मात्र खळबळ माजली, कारण ते स्वतः त्यांच्या शेतीच्या कामासाठी रोजी फक्त दीड रुपया मजुरी देत होते. ''तुम्ही लोकांना इतकी मजुरी देऊन लाडावून ठेवलं, तर आम्हाला आमच्या कामासाठी मजूर कसे मिळणार? तुम्हाला ते परवडत असेल; पण आम्हाला नाही ना परवडणार!'' असे त्यांचे म्हणणे होते.

''मी बाहेरून आलेला माणूस आहे. कायद्याने ठरवून दिली आहे त्यापेक्षा कमी मजुरी मी दिली तर तो गुन्हा होईल. मला ते करणं कसं शक्य आहे?'' जोशी त्यांना समजावू लागले.

गावकऱ्यांना ते पटले नाही, पण त्यांनीही मग तो मुद्दा फारसा रेटून धरला नाही. कारण त्यांच्यातले जे जोशींच्या शेतावर मजुरीला जायचे, त्यांना स्वतःलाही ही वाढीव मजुरी मिळतच होती व हवीच होती. जोशींचे काम संपले, की पुन्हा मजुरीचे दर आपोआपच खाली येतील, अशीही त्यांची अटकळ असावी.

इथे एक मुद्दा स्पष्ट करायला हवा – शेतकरी व शेतमजूर असा काहीच भेद त्या मजुरांमध्ये नव्हता. ते स्वतः शेतकरीही होते व त्याचवेळी अधिकचे चार पैसे हाती पडावेत म्हणून शेतमजुरीही करत होते. जे फक्त मजुरी करत तेही एकेकाळी शेतकरी होतेच; पुढे कधीतरी त्यांच्या जमिनी कर्जापोटी गहाण तरी पडल्या होत्या किंवा विकल्या गेल्या होत्या. आयुष्यात पुढे जेव्हा काही विचारवंत 'तुम्ही फक्त शेतकऱ्यांचा विचार करता, शेतमजुरांचा नाही' असा आरोप करत, तेव्हा आपल्या शेतावरचे हे मजूर त्यांच्या डोळ्यांपुढे उभे राहत व असल्या निव्वळ पुस्तकी आरोपातील स्वानुभवावरून कळलेला फोलपणा त्यांना प्रकर्षाने जाणवे.

गावकऱ्यांना मजुरीचे इतके कमी असलेले दरही परवडत नव्हते ह्याचे कारणही अर्थातच जोशींना साधारण ठाऊक होते आणि येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष अनुभवानेही ते अधिक चांगले कळणार होते – ते कारण म्हणजे गावकरी विकत असलेल्या ज्वारीचा त्यांच्या हाती पडणारा दर त्यावेळी क्विंटलला (१०० किलोंना) फक्त सत्तर रुपये होता आणि कांद्याचा भाव फक्त वीस रुपये होता!

ह्या मजुरांचे, विशेषतः कातकरी मजुरांचे दारिद्र्य हृदय हेलावून टाकणारे होते. इथल्या आदिवासींत कातकरी व ठाकर असे दोन समाज मुख्य होते. सगळे तसे विस्थापित. वेगवेगळ्या धरणयोजनांमुळे कोकणातून बाहेर पडून वांद्रेमार्गे इथे आलेले. साधारण निम्मे मजूर पुरुष होते तर निम्म्या बायका. सगळ्यांचीच शरीरयष्टी कृश. लहानपणापासून आबाळ

झालेली. पुरेसा पोषक आहार न मिळाल्याने मुळातच अवयवांची नीट वाढ न झालेली. (आदिवासी स्त्रिया व पुरुष यांच्या आकारमानात फारसा फरक का नसतो, हा भविष्यात जोशींच्या एका अभ्यासाचा विषय होता.) अंगारमळ्यात येण्यासाठी यांतल्या अनेकांना पाच-पाच, दहा-दहा किलोमीटर चालावे लागे. रणरणत्या उन्हात. काट्याकुट्यांतून. जवळजवळ कोणाच्याही पायात चपला नसायच्या. संध्याकाळी घरी जाताना पुन्हा तोच प्रकार. जोशी लिहितात,

> निसर्गाने बुडवलेल्या, चोरांनी लुटलेल्या, सावकारांनी नाडलेल्या, सुलतानांनी पिडलेल्या, धर्मजातींनी गांजलेल्या या मंडळींच्या जवळ जाण्याचा मी प्रयत्न करीत होतो; पण कुणी खुलेपणाने बोलत नव्हते. त्यांच्यात माझ्यात अंतर किती? ते उल्लंघावे कसे? पुढे पुढे मला एक युक्ती कळली – निबंधवार उत्तरे द्यावी लागतील असे प्रश्न विचारायचेच नाहीत. वस्तुनिष्ठ प्रश्न विचारायचे. उत्तरे आपण सुचवायची. उत्तर काय दिले जाते, यापेक्षा उत्तर देतानाची चेहऱ्यावरची मुद्रा बारकाईने न्याहाळायची.

दुपारी जोशी दोन तास सुट्टी देत. ज्या गावकऱ्यांना घरी जाऊन जेवायचे असेल, इतर काही कामे उरकायची असतील त्यांना पुरेसा वेळ मिळावा म्हणून. लांब राहणारे मजूर अर्थात तिथेच थांबत. पण बरेच गाववासी मजूरही शेतावरच थांबत, सावलीत बसून बरोबर आणलेला भाकरतुकडा खात. ''दुपारची आपण भजनं म्हटली तर?'' एक दिवस जोशींनी सुचवले. सर्वांनाच ती कल्पना आवडली. भजने म्हणणे हा तिथल्या लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग होता.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी मजूर मृदुंग-झांजा घेऊन हजर झाले. जेवण उरकल्यावर भजनांना सुरुवात करायचे ठरले होते. जोशींनी भजनाचे सुचवले त्यामागे दोन कारणे होती. एक म्हणजे, मजुरांच्या अधिक जवळ जायचा हा एक मार्ग होता. दुसरे कारण अधिक व्यक्तिगत होते. काही महिने शेतीकामात काढल्यावर जोशी स्वतःही, नाही म्हटले तरी, काहीसे उदास झाले होते. 'परवापरवापर्यंत जिनिव्हा-न्यूयॉर्कमधल्या आलिशान सभागृहांत चर्चा करणारा मी, आज कुठे इथल्या वैराण, ओसाड कातळावर दगडांचे ढीग टाकण्याचे काम करत बसलोय? आपण धरलेला हा रस्ता योग्य आहे ना? आपण स्वतःचीच फसवणूक तर नाही ना करत आहोत?' अशा प्रकारचे विचार अलीकडे त्यांच्या मनात येत असत. विशेषतः दुपारची निवांत वेळ त्यांना अधिक अस्वस्थ करणारी वाटे. एकत्र भजने म्हटल्याने आपल्यालाही थोडेसे उल्हसित वाटेल, असा त्यांनी विचार केला होता.

गावातली भजने नेहमीच 'केशवा, माधवा, तुझ्या नामात रे गोडवा...' ह्या भजनाने सुरू होत. पण त्या दिवशी मजुरांनी सुरुवात केली ते भजन होते, ''हरिश्चंद्र राजा, तारामती राणी... डोंबाघरी भरी पाणी, डोंबाघरी पाणी...'' जोशी दाम्पत्याची मनःस्थिती त्या मजुरांनी अगदी अचूक ओळखली होती, विशेषतः जोशींच्या मनातील विचार त्यांना नेमके कळले होते व

त्यांना चपखल लागू पडेल, असेच भजन त्यांनी फारशी चर्चा न करताच निवडले होते. जोशी लिहितात,

> या निरक्षर अडाण्यांनी, मी त्यांच्या चेहऱ्यावर वाचले नव्हते इतके भाव माझ्या चेहऱ्यावर वाचले होते. मृदुंग-झांजांचा कल्लोळ आणि गाणाऱ्यांची सामूहिक बेसूरता ओलांडून भजनाचा अर्थ असा काही भिडला, की गळ्यातला आवंढा गिळवेना.

या प्रसंगानंतर ह्या गरीब बिचाऱ्या मजुरांसाठी आपण ठोस काहीतरी केलेच पाहिजे असे त्यांनी ठरवले. भोवतालच्या सामाजिक परिस्थितीचा अधिक बारकाईने शोध घ्यायला सुरुवात केली. त्यांची निरीक्षणे अतिशय अस्वस्थ करणारी होती. पुण्यासारख्या महाराष्ट्राच्या तथाकथित सांस्कृतिक राजधानीपासून आणि झपाट्याने वाढत चाललेल्या उद्योगनगरीपासून अवघ्या चाळीस किलोमीटरवर असलेल्या आंबेठाणसारख्या गावात अशी परिस्थिती असावी, देश स्वतंत्र होऊन तीस वर्षे उलटल्यावरही ती तशीच राहिलेली असावी, हे खूप विषण्ण करणारे होते.

आंबेठाण गावात वीज जवळ जवळ कुठेच नव्हती आणि जिथे होती तिथेही ती वरचेवर खंडित व्हायची. त्यामुळे सूर्यास्तानंतर सगळे व्यवहार ठप्प व्हायचे. घरातही एखाददुसरा मिणमिणता कंदील. करमणूक अशी कुठलीच नाही. शिवाय, वीज नसली की शेतीला पाणी कुठून आणणार? जिथे विहीर असायची तिथे पंप चालवले जात. शेतीला पाणी मिळावे म्हणून. पण डिझेलचाही प्रचंड तुटवडा. खुल्या बाजारात ते कधीच उपलब्ध नसे. मामलेदाराकडे जाऊन खूप खटपट केल्यावर परवाना मिळायचा पण तोही महिन्याला फक्त वीस लिटरचा. म्हणजे रोजचे साधारण ७०० मिलीलिटर. पंप धुवायलाही ते अपुरे पडायचे! मग त्यात रॉकेलची भेसळ करणे आलेच. खरे तर तेही पुरेसे कधीच मिळत नसे; त्यालाही रेशन कार्ड लागायचे. फारच थोड्या जणांकडे ते असायचे. बाकीच्यांना जादा पैसे देऊन ते मिळेल तिथून खरेदी करावे लागे. या भेसळीत इंजिनची नासाडी व्हायची; दुरुस्तीचा खर्च बोकांडी बसायचा. पण पंप चालवला नाही तर कांद्याला पाणी देणे अशक्य आणि मग तयार पीकही जळून जायची भीती.

गावात एकाच्याही घरी संडास नव्हता; बायाबापड्यांनाही उघड्यावरच बसावे लागे. कुठल्याच घरात नळ नव्हते. पिण्यासाठी साधारण शुद्ध असेही पाणी उपलब्ध नव्हते. कुठूनतरी घमेल्यातून मिळेल ते पाणी आणायचे, तोंडाला पदर लावून तेच प्यायचे; त्यातून गाळले जाईल तेवढे जाईल. त्यामुळे रोगराई प्रचंड. खरे तर बरेचसे रोग हे स्वच्छतेच्या साध्यासुध्या सवयी लावल्या तरी दूर होऊ शकणारे. जेवणापूर्वी हातपाय स्वच्छ धुणे, धुतलेले कपडे घालणे, रोज अंघोळ करणे, भांडीकुंडी नीट घासून घेणे, केरकचरा व्यवस्थित गोळा करून त्याची विल्हेवाट लावणे ह्या सगळ्या, म्हटले तर अगदी साध्या गोष्टी. पण इथे कोणीही यांतले काहीच करत नसे. त्यामुळे गावात बहुतेक सर्वांना खरूज झालेली असे. कॉलरा,

हगवण, नायटा हे रोगही घरोघर. बहुतेक सर्व आजार अशुद्ध पाणी, अपुरा आहार आणि जंतांमुळे होणारे.

गावात शाळा एकच. चावडीवर भरणारी. शिक्षक हजर असला तर ती भरणार. गळके छप्पर, भेगाळलेल्या भिंती. तुटकी दारे. पावसाळ्यात खूपदा ती बंदच असे. एकूण मुलांचा शाळेत जाण्यापेक्षा न जाण्याकडे कल अधिक. 'शिकून काय करायचं?' ही आईवडलांची भूमिका. ते स्वतःही निरक्षरच. त्यामुळे एकूण अनास्था खूप. शेतावर काम असले तर मुले ते नाखुशीने का होईना पण थोडेफार करायची; नाहीतर दिवसभर अशीच उनाडक्या करत भटकायची.

ह्या एकूण मागासलेपणाला कंटाळून अनेक तरुण मग शेती सोडून एमआयडीसीसारख्या जागी नोकरी शोधायला जात. असाच एक तरुण एकदा जोशींना भेटायला आला. म्हणाला,

''साहेब, पूर्वी मी तुमच्या शेतावर मजुरी करायचो. दिवसभर उन्हातान्हात घाम गाळल्यावर मला संध्याकाळी तीन रुपये भेटायचे. आज एका कारखान्यात लागलो आहे. मशिनच्या मागे आरामात उभं राहून विड्या फुंकत काम करतो. पण गेल्या महिन्यात मला नऊशे रुपये पगार मिळाला. रोजचे तीस रुपये. शेतीकामात मिळत होते त्याच्या दसपट! तेही भरपूर आरामाचं काम करून!''

हे सांगताना त्या तरुणाचे डोळे जुन्या श्रमांच्या आठवणीने पाणावले होते. शेतातील श्रम व कारखान्यातील श्रम यांचे बाजारात जे मोल केले जाते, त्यातील ही जबरदस्त तफावत जोशींनाही अस्वस्थ करून गेली. अर्थात कारखान्यात अशी नोकरी मिळायचे भाग्यही शंभरात एखाद्यालाच लाभणार.

स्वतःची शेती सुरू करता करता जेवढे शक्य होते तेवढे ग्रामविकासाचे प्रयत्न त्या सुरुवातीच्या काळात जोशींनी केले. रोगराई कमी व्हावी म्हणून स्वच्छता मोहिमा काढल्या. गाव हागणदारीमुक्त व्हावे म्हणून चराचे संडास खणले. श्रमदानाने कच्चे का होईना पण रस्ते बांधले. विहिरींत साठलेला गाळ उपसून काढायची योजना राबवली. शाळेचा दर्जा सुधारावा म्हणून ग्रामपंचायतीकडे साकडे घातले. साक्षरता वर्ग चालवले. वेगवेगळ्या सरकारी योजनांची माहिती गावकऱ्यांना व्हावी म्हणून अधिकाऱ्यांना गावात बोलावून आणले. पारंपरिक समाजसेवेच्या सगळ्या वाटा चोखाळून झाल्या; पण असल्या प्रयत्नांच्या मर्यादाही हळूहळू त्यांच्या लक्षात येत गेल्या. मागासलेपणाचे सर्वांत मोठे कारण गरिबी हे आहे, ती जोवर दूर होत नाही तोवर इतर कुठल्याच उपायांना अपेक्षित ते यश मिळणार नाही, आणि त्यासाठी शेतीमालाला अधिक भाव मिळायला हवा हे उघड होत गेले.

जोशी सांगत होते,

''एक साधं उदाहरण देतो. आंबेठाणमध्ये सुरुवातीच्या काळात साफसफाईचं खूप काम मी केलं, पण तरीही आमच्या आंबेठाणपेक्षा शेजारचं भोसे गाव अधिक स्वच्छ होतं. तिथली जमीन खडकाळ नव्हती व अधिक सुपीक होती, फळं व भाजीपाला तिथे खूप यायचा, हे खरंच आहे. पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे त्या गावचा कांदा अधिक चांगल्या दर्ज्याचा होता

व त्याला अधिक चांगला भाव मिळत असे. हाती चार पैसे शिल्लक राहू लागले की माणसाला आपोआपच टापटीपीने राहावं असं वाटू लागतं. आर्थिक प्रगती झाल्यानंतरच इतर प्रगती शक्य होती.''

गावातील स्थिती सुधारावी म्हणून जोशींनी अगदी सुरुवातीच्या काळात केलेल्या एका गंभीर प्रयत्नाविषयी थोडे विस्ताराने लिहिले पाहिजे. स्वतः जोशींनीही त्याविषयी लिहिले आहे.

सर्व भूमिहीनांना प्रत्येकी दोन-अडीच एकर जमीन मिळावी अशी एक सरकारी योजना होती. आंबेठाणच्या आजूबाजूलादेखील काही जणांना तशा जमिनी मिळाल्या होत्या. पण त्या नुसत्याच पडून होत्या. म्हाळुंगे गावातील शिवळे पाटील यांच्या जमिनीचा बराच भागही कित्येक आदिवासींना वाटला गेला होता. पण त्या जमिनीही तशाच पडून होत्या. कॉलेजात शिकलेल्या पुस्तकांत आणि अनेक पुरोगामी विचारवंतांच्या लेखनात बड्या जमीनदारांकडून अतिरिक्त जमिनी सरकारने ताब्यात घ्यायला हव्यात, भूमिहीनांना त्यांचे वाटप व्हायला हवे, तसे झाले, की मग ते ती जमीन कसायला लागतील, स्वतःचे पोट भरू शकतील आणि त्यातूनच ग्रामीण दारिद्र्याचा प्रश्न मिटेल अशी मांडणी केल्याचे जोशींनी वाचले होते; त्यांचेही मत पूर्वी साधारण तसेच होते.

पण इथे त्यांच्या डोळ्यांसमोर मात्र वेगळेच काहीतरी घडत होते. जमीन हातात येऊनसुद्धा त्यांच्यापैकी कोणीही हातपाय हलवत नव्हते. प्रत्येकाची काही ना काही अडचण होती; नुसती जमीन मिळून त्यांचे भागणार नव्हते. कोणाला अवजारे हवी होती, कोणाला बैल हवे होते, कोणाला बियाणे हवे होते, खते हवी होती. त्याशिवाय ते काहीच करू शकत नव्हते, किंवा करायला तयार नव्हते.

खेडमधील प्रांत अधिकाऱ्यांशी एक दिवस जोशींनी विस्तृत चर्चा केली. सामूहिक शेती करण्याबद्दल. तो एक उत्तम तोडगा असल्याचे जाणवत होते. सुदैवाने अधिकारी सज्जन होते, त्यांनी दावडी गावातील काही नवभूधारकांशी गाठ घालून दिली. जमिनीचा जुना मालक थोडा कटकट करत होता, पण सरकारपुढे त्याचे काहीच चालणार नव्हते. शिवाय, आणीबाणीच्या त्या दिवसांत सरकारी अधिकाऱ्यांची खेड्यापाड्यांतून बरीच भीतीदेखील होती. मामलेदार स्वतः दावडीला आले व त्यांनी जमिनीच्या सीमा आखून दिल्या. एकूण अकरा भूमिहीनांना तिथे सलग अशा जमिनी मिळाल्या. शेती सामूहिक करायचे ठरले. नाहीतर ज्याच्या जमिनीच्या तुकड्यात विहीर लागेल तो इतरांना पाणी देणारच नाही! सगळ्यांना ती अट मान्य होती. त्या सामूहिक शेतीला 'अकरा भूमिपुत्र' असे नाव दिले गेले.

जसजसे दिवस जात गेले तसतशा एकेक गोष्टी जोशींच्या लक्षात यायला लागल्या. एकतर त्यांपैकी खरे भूमिहीन असे फक्त तिघे होते. त्यांच्या घरची माणसे पुण्या-मुंबईत नोकरीला होती व त्यावर त्यांचे घर चालत होते. आपल्या नावावर शेती व्हावी ह्याच्यात त्यांना खचितच आनंद होता, त्यासाठी वेगवेगळ्या पुढाऱ्यांना भेटून त्यांनी थोडाफार पैसाही खर्च केला होता; पण प्रत्यक्ष जमीन कसण्यात मात्र त्यांना जराही उत्साह नव्हता. जोशींसमोर आणि

सरकारी अधिकाऱ्यांसमोर ते उत्साहाचे केवळ नाटक व तेही अगदी अहमहमिकेने करत होते. बँकेकडून कर्ज मिळावे म्हणून स्वतः जोशी यांनीच खेड या तालुक्याच्या गावी अनेक खेटे घातले. त्यांच्याबरोबर अकरापैकी फक्त एकच भूमिपुत्र सोबत म्हणून बँकेत आला; बाकीच्या सगळ्यांनी घरी काही ना काही काम आहे अशी सबब सांगून स्वतः येणे टाळले. पण तरीही जोशींनी मनात कटुता येऊ दिली नाही. 'आपल्यावर त्यांनी विश्वास ठेवावा असे आपण प्रत्यक्षात काय करून दाखवले आहे? त्यांचा निरुत्साह अगदी समजण्यासारखा आहे. जसजसे काम उभे राहील तसतसा त्यांचा विश्वास वाढेल' – असे जोशी स्वतःला समजावत राहिले. त्यांनी लिहिले आहे, एकोणिसाव्या शतकातील मिशनऱ्यांच्या धाटणीवर मी स्वतःलाच धीर देत होतो.'' (मिशनऱ्यांच्या मनोभूमिकेचे त्यांनी इतके चपखल बसणारे उदाहरण द्यावे हे नवलच आहे. कदाचित त्यांनी केलेल्या सॉमरसेट मॉमच्या वाचनाचा हा प्रभाव असावा.)

जमीन डोंगरकपारीत उतारावर होती; त्यामुळे बांधबंदिस्तीचे बरेच काम करणे आवश्यक होते. त्यासाठी ह्या भूमिहीनांकडे पैसे नव्हते. ह्या प्रकरणात जोशी घेत असलेल्या पुढाकारामुळे स्थानिक सरकारी अधिकारी बरेच प्रभावित झाले होते. एव्हाना जोशी यांची पार्श्वभूमी त्यांच्याही कानावर आली होती. ते म्हणाले, ''सामानाचा सगळा खर्च कुठल्यातरी शासकीय योजनेखाली आम्ही करू. पण आमची एक अट आहे. मजुरीचा बंदोबस्त मात्र नवभूधारकांनी केला पाहिजे.''

जोशी आनंदाने तयार झाले. लगेच दावडीला आले. सगळ्यांना गोळा केले व त्यांच्यापुढे त्यांनी ही योजना मांडली – 'तीन दिवसांनी सगळ्यांनी शेतीवर राहायलाच जायचे. बांधबंदिस्तीचे काम पूर्ण होईस्तोवर तिथेच राहायचे. प्रत्येक घरातून निदान दोन जण तरी आले पाहिजेत. आपले महत्त्वाचे काम त्यामुळे होऊन जाईल. प्रारंभीची एक मोठी अडचण दूर होईल. शिवाय, विशेष इन्सेंटिव्ह म्हणून, जे हजर राहतील त्यांना सध्याच्या दराप्रमाणे मजुरीही मिळेल. आणि जे गैरहजर राहतील त्यांना मात्र दंड केला जाईल.'

व्यवस्थापनशास्त्राप्रमाणे ह्यात 'चांगले काम करणाऱ्याला गाजर आणि कामात हयगय करणाऱ्याला छडी' अशी तजवीज जोशींनी केली होती. सगळ्यांनी होकारार्थी माना डोलावल्या.

ठरलेल्या दिवशी सकाळी उजाडता उजाडताच जोशी पुण्याहून निघून दावडीला गेले. तिथे एकही व्यक्ती हजर नव्हती! तास-दोन तास बरीच खटपट केल्यावर आणि निरोपानिरोपी केल्यावर चार घरांमधली मिळून एकूण नऊ माणसे हाती लागली. त्यांना आपल्या जीपमध्ये घालून जोशी शेतावर घेऊन गेले. मिळतील तेवढे दगडगोटे गोळा करून रात्रीच्या आडोशासाठी भिंती उभ्या करायला सुरुवात केली. जोशी स्वतःही अंग मोडून कामाला लागले. संध्याकाळी सगळ्यांनी कंदिलाच्या उजेडात भाकऱ्या खाल्ल्या.

तो सगळाच अनुभव जोशींना विलक्षण रोमांचक वाटत होता. भारतात परतल्यावर प्रथमच आपण थोडेफार अर्थपूर्ण जगतो आहोत असे वाटत होते. जेवण झाल्यावर दोघे जण काहीतरी अडचण सांगून आपल्या घरी निघून गेले. दुसरे दोघे ''आम्ही आत्ता गावात जातो,

प्रत्येक घरात फिरतो आणि उद्या सकाळी घरटी दोन जण तरी शंभर टक्के घेऊन येतो'' असे वचन देत आपल्या गावी गेले. उरलेले पाच जण आणि जोशी स्वतः अशा सहा जणांनी दगड रचून तयार केलेल्या भिंतींच्या आडोशाला, डोंगरातून वाहणारे भणभणते वारे अंगावर झेलत, कुडकुडत कशीबशी ती रात्र काढली.

सकाळी उठून जोशी पुन्हा कामाला लागले. या सहा जणांसह. इतर जण येतील तेव्हा येतील, असा विचार करत. पण प्रत्यक्षात दुपारपर्यंत एकही नवा माणूस आला नाही. गावात कोणीतरी मेल्याची बातमी तेवढ्यात कानावर आली आणि उरलेले पाच भूमिपुत्रही लगबगा गावाला निघून गेले. त्यांच्या त्या सामूहिक शेतावर आता घाम गाळायला एकटे जोशीच उरले!

असा प्रकार वरचेवर घडू लागला. एक दिवस जोशींनी सगळ्यांना स्पष्टच विचारले,

''तुमची अडचण काय आहे? तुम्हाला शेती करायची आहे की नाही? नसेल करायची तर तसं सरळ सांगून टाका आणि मला याच्यातून मोकळं करा.''

त्यांच्या या स्पष्टोक्तीनंतर सगळे जरा गांगरले. ''असं नका हो करू. तुम्ही गेलात तर सगळंच कोसळेल. आमचं नाक कापलं जाईल आणि तो मूळ जमीन मालक आम्हाला जगूही देणार नाही. जरा बेताबेताने घेऊ या.'' वगैरे म्हणत सारवासारव करू लागले. पण त्यात फारसा काही अर्थ नव्हता हे एव्हाना जोशींना कळून चुकले होते. या प्रकरणात त्यांच्या स्वतःच्या पदरचे दोन हजार रुपये खर्च करून झाले होते. ते बुडीत खाती गेले आहेत हे स्पष्ट होते.

या अकरा जणांपैकी एकालाही जमीन कसण्याची आणि कष्ट करण्याची इच्छा नव्हती. बिगरशेती उत्पन्नाचे साधन असतानाही भूमिहीन म्हणून नावे नोंदवून त्यांनी जमीन मिळवली होती. जोशींसारख्या शहरी माणसापुढे भूमिहीनतेचे करुण नाटक त्यांनी उत्तम वठवले होते; पण गावकऱ्यांसमोर त्यांचे नाटक चालत नव्हते.

मुळात त्यांना स्वतः कष्ट करून जमीन कसायचीच नव्हती; पुढेमागे एखादा खरीददार सापडला तर त्या जमिनी विकून दोन पैसे करायचे एवढेच त्यांचे उद्दिष्ट होते. तसे केल्यानंतर पुन्हा नव्याने एखाद्या सरकारी योजनेत जमीन मिळवायला ते मोकळे होणार होते! ह्या कहाणीचा समारोप करताना जोशी लिहितात,

> पण ह्यात त्यांचे कुठेच चुकत नव्हते. चुकत माझेच होते. बँकेच्या कर्जाचे प्रकरण करतानाच माझ्या लक्षात आले होते, की विहिरीचा खर्च करून, पाण्याची सोय करून, शेती करायची म्हटले, तर कोणतेही पीक काढले तरी बँकेच्या कर्जाची परतफेड यावज्जन्म शक्य नव्हती. दरवर्षी चांगले पीक येईल असा हिशेब केला, तरी खर्च फिटत नव्हता. ही काय गंमत आहे याचा उलगडा मला त्यावेळी झाला नव्हता. गावकऱ्यांना ते कळले होते, भूमिपुत्रांनाही ते कळले होते; पण ते मला सांगत नव्हते. हे सर्व समाजव्यवस्थेचे गुह्यतम गुह्य आणखी उग्र तपस्येने माझे मलाच शोधावे लागणार होते.

'तुमची सगळ्यांची जमिनीवर राहायला जायची तयारी झाली, म्हणजे मला निरोप द्या,' असे म्हणून मी भूमिपुत्रांचा निरोप घेतला. एक धडा शिकून. यापुढे लोकांचे भले करण्याचे प्रयत्न बंद. भिकेच्या आणि मदतीच्या प्रकल्पांतून गरिबीचा प्रश्न सुटत नाही. वर्षानुवर्षे गावागावातील गरिबी संपवण्याबद्दल जो मार्ग मनात शंकासुद्धा न आणता मी मानला होता, त्याबद्दलच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पुन्हा एकदा शून्यावर आलो होतो. स्वित्झर्लंडला परत जाण्याचा मोह मी कसा टाळला कुणास ठाऊक!

(*अंगारमळा,* पृष्ठ १४-५)

ग्रामविकासाचे हे प्रयत्न चालू असतानाच दुसरीकडे जोशींची शेतीदेखील चालूच होती. भारतातील शेती बव्हंशी कोरडवाहू आहे; पण अशा कोरडवाहू शेतीतही पुरेसा पैसा गुंतवला, उपलब्ध तंत्रज्ञान वापरले, आपल्या शिक्षणाचा उपयोग करून चांगले व्यवस्थापन केले तर ती शेती फायदेशीर होऊ शकते का ह्याचा त्यांना शोध घ्यायचा होता. किंबहुना, शेतीत पडण्यामागे त्यांचा तोच खरा उद्देश होता. त्या दृष्टीने सतत काही ना काही नवे प्रयोग ते करत असत. शेतीतील कामाबद्दल जे काही वाचनात यायचे, कानावर पडायचे त्याचा अवलंब स्वतःच्या शेतीत करून बघत. कधी हे बियाणे वापर, कधी त्या कंपनीचे बियाणे घे; कधी हे खत, कधी ते औषध. कधी असे पाणी द्या, कधी तसे द्या. सारखे काहीतरी नवे करून बघायचे, आपला अनुभव हाच आपला गुरू मानायचा असे त्यांनी ठरवले होते.

लौकर येणारे आणि रोख पैसे देऊ शकणारे पीक म्हणून खरिपाच्या पहिल्याच हंगामात जोशींनी खीरा जातीच्या काकडीचे पीक घेतले. तीन-एक महिन्यांत पाच-सहा पोती काकडी निघाली, ती अडत्याकडे पाठवून दिली. विक्रीचा खर्च वजा जाता १८३ रुपये मिळाले. शेतीतली ती पहिली कमाई. नाही म्हटले तरी जोशींना आनंद झाला. दुसऱ्या वेळीही असेच काहीतरी दीड-दोनशे रुपये आले. पण तिसऱ्या वेळी त्यांना वेगळाच अनुभव आला. ह्यावेळी त्यांनी लागवडीचे क्षेत्र वाढवले होते. दहा पोती काकडी आली, ती पुण्याला अडत्याकडे पाठवून दिली. तीन-चार दिवसांनी, आता यात निदान तीनशे रुपये तरी फायदा होईल या अपेक्षेने ते पुण्यातील अडत्याच्या (दलालाच्या) ऑफिसात गेले. जरा वेळाने तेथील कारकुनाने त्यांच्या हातात एक लिफाफा कोंबला आणि ३२ रुपयांची मागणी केली. ''हे कसले पैसे द्यायचे?'' त्यांनी आश्चर्याने विचारले.

''लिफाफा उघडा म्हणजे कळेल.'' कारकुनाने उत्तर दिले.

उभ्याउभ्याच जोशींनी लिफाफा उघडला व आतला कागद बाहेर काढला. त्यावर जो हिशेब खरडला होता, त्याचा सारांश होता : 'वाहतूक, हमाली, दलाली, वजनकाटा, मार्केट कमिटीचा चार्ज आणि मुख्यमंत्री फंडाला द्यायचे पैसे हे पकडून एकूण खर्च इतका इतका; काकडी विकून आलेले पैसे इतके इतके; तुमच्याकडून येणे रुपये ३२.'

जोशींनी कपाळावर हात मारून घेतला. शेतावर तीन महिने राबून काढलेल्या काकडीचे

बाजारमूल्य, माल तयार झाल्यापासून विकला जाईपर्यंतचा (पोस्ट-हार्वेस्ट) खर्च भरून निघेल इतकेदेखील नव्हते. ती तूट भरून काढायलाच खिशातले ३२ रुपये द्यावे लागणार होते! शेतकऱ्यांच्या परिभाषेत यालाच 'उलटी पट्टी' म्हणतात. बियाणे, मजुरी, खते, औषधे, पाणी वगैरे (प्री-हार्वेस्ट) खर्चाचा यात कुठे समावेशही नव्हता! जमिनीवरील इतर खर्च, बँकेचे व्याज, स्वतःच्या श्रमाचे मूल्य व इतर ओव्हरहेड्स यांची गोष्ट तर दूरच राहिली! या सर्व व्यवहारात बियाणे विकणारा, खते-औषधे विकणारा, टेम्पोवाला, दलाल, वजन करणारा मापारी, हमाल, मार्केट कमिटी आणि अगदी मुख्यमंत्री फंड या इतर सर्व घटकांना आपापला वाटा मिळाला होता; नागवला गेला होता तो फक्त मालाचा प्रत्यक्ष उत्पादक, म्हणजेच शेतकरी.

सगळीच व्यवस्था (सिस्टिम) शेतकऱ्याच्या विरोधात काम करत होती. कुठल्याही विद्यापीठात न शिकवला जाणारा, किंवा कुठल्याही पुस्तकात न नोंदवलेला हा महत्त्वाचा धडा स्वतःचा घाम शेतात जिरवून जोशी शिकत होते.

असाच दुसरा अनुभव होता परावलंबित्वाचा; बेभरवशी निसर्गावर शेतकरी किती अवलंबून असतो याचा. तो आला बटाट्याच्या पिकाबाबत. भामनेरच्या खोऱ्यात बटाट्याचे पीक मुबलक येते. बटाट्यासाठी चाकणची बाजारपेठ खूप प्रसिद्ध आहे. 'तळेगाव बटाटा' या नावाने जो बटाटा बाजारात विकला जातो, तो बराचसा ह्याच परिसरात तयार होतो. जोशींनी लावलेले सुरुवातीचे बटाट्याचे पीक उत्तम आले. सगळीकडे खूप कौतुक झाले. खेड येथील सरकारच्या बटाटा संशोधन केंद्रातील अधिकाऱ्यांनी मुद्दाम येऊन त्या शेतीची पाहणी केली. जोशी खूष झाले. शेतीवर आतापर्यंत गुंतवलेले चार लाख रुपये अशा किती हंगामांत सुटतील याची गणिते मांडू लागले. पुढच्या वेळी हौसेने पुन्हा बटाटा लावला. पण नेमका त्यावर्षी कसलातरी रोग आला आणि बटाट्याचे सगळे पीक नष्ट झाले! ही अस्मानी सुलतानी सर्वसामान्य भारतीय शेतकऱ्याच्या पाचवीलाच पुजलेली असते; पण जोशींना हा अनुभव नवाच होता. बऱ्याच वर्षांनी ह्या अनुभवाकडे वळून पाहताना जोशी म्हणाले,

''मी बटाटा लावला होता ती जमीन आदली अनेक वर्षे पडीक होती व म्हणूनच केवळ पहिले पीक उत्तम आले होते! त्यात माझ्या प्रयत्नाचा भाग नगण्यच होता. माती, पाऊस अशा वेगवेगळ्या नैसर्गिक घटकांवर आपला शेतकरी इतका अवलंबून असतो, की कशामुळे काय घडले असेल हे सांगणे त्यालाही शक्य नसते. हळूहळू माझे शेतीतले सगळेच नियोजन अयशस्वी ठरू लागले.''

पण तरीही जेव्हा इतर शेतकऱ्यांबरोबर ते बाजारपेठेत वा चावडीवर गप्पा मारायला बसत तेव्हा बाकीच्या शेतकऱ्यांना मात्र नफा होतो आहे असे संभाषणात कानावर पडत असे. हे काय गौडबंगाल आहे त्यांना कळेना. एकदा त्यांनी इतर गावकऱ्यांना गप्पा मारता मारता विचारले,

''मघापासून मी ऐकतोय, कोणी म्हणतात, यंदा ज्वारी चांगली दहा-बारा पोती आली,

कोणी म्हणतात, इतका इतका मूग आला, इतका कांदा आला. म्हणजे सगळ्यांचंच एकूण चांगलं चाललेलं दिसतंय. मग मला हे समजत नाही की मी इतका शिकलेला असूनही आणि सगळा वेळ ह्या शेतीतच राबत असूनही मला का प्रत्येक वेळी तोटा येतोय? माझं नेमकं कुठे चुकतंय?''

गप्पा संपल्यावर त्यांना बाजूला घेऊन एक म्हातारा सांगू लागला, ''साहेब, हे सगळे लोक थापा मारताहेत. हे जर असं काही सगळ्यांसमोर बोलले नाहीत, तर ह्यांच्या घरच्या मुलींची लग्नं होणार कशी? तुमचा अनुभव हाच खरा अनुभव आहे. आपण सगळेच शेतकरी तोट्यातच आहोत.''

शेतकऱ्यांची आत्मवंचना किती भयाण आहे हे त्यादिवशी जोशींच्या लक्षात आले. सरकार शेतकऱ्याकडून लेव्हीची ज्वारी फक्त सत्तर पैसे किलो दराने खरेदी करत असतानाही, हे शेतकरी दीड रुपये किलो दराने खुल्या बाजारातून ज्वारी खरेदी करतात आणि ती बैलगाडीवर लादून सरकारी गोदामात आपली अपुरी भरलेली लेव्ही पूर्ण करायला जातात तेव्हा मात्र बँडबाजा लावून, वाजतगाजत जातात, ह्या मूर्खपणाचे कोडे त्यांना उलगडले. मुळात फारच थोडे शेतकरी आपला नेमका उत्पादनखर्च काढतात, त्यात काय काय पकडायचे ते खूपदा त्यांच्या लक्षातही येत नाही हा एक भाग होताच; पण शिवाय, आपली इभ्रत कायम राहावी म्हणून इतरांपुढे करायचे नाटकही त्यात होते.

शेतीमालावर प्रक्रिया केल्याशिवाय त्याची बाजारातील किंमत वाढणार नाही हे त्यांच्यातील अर्थतज्ज्ञाला सहज समजण्यासारखे होते. त्या दृष्टीनेही जोशींनी वेगवेगळे प्रयोग करून बघितले. चाकण परिसरात पूर्वी कोणीतरी बटाट्याचे वेफर्स करायचा छोटा कारखाना सुरू केला होता, पण लौकरच तो बंद पडला होता. त्याचे आपण पुनरुज्जीवन करू शकू का, किंवा तसाच एखादा कारखाना आपण उत्तमप्रकारे नव्याने उभारू शकू का, ह्याचा त्यांनी खोलात जाऊन विचार केला होता. बरीच आकडेमोड केली होती. त्यासाठी त्यांनी एकदा स्वित्झर्लंडला भेटही दिली होती. शेंगदाण्यावर आधारित प्रक्रियाउद्योग सुरू करण्याचा आणि चांगल्या दर्ज्याचे शेंगदाणे पिकवून ते परदेशी निर्यात करायचा प्रयत्नही त्यांनी केला होता. कारण त्या भागात भुईमुगाचे पीक भरपूर यायचे. ह्या दोन्ही पुढाकारांबद्दल मागील प्रकरणात लिहिलेच आहे.

अशा वेगवेगळ्या प्रयोगांसाठी जोशींनी स्वतःची सारी पुंजी पणाला लावली होती. युपीयुमधील नोकरी सोडून ते भारतात परतले तेव्हा त्यांना पाच-सहा लाख रुपये फंड, ग्रॅच्युइटी वगैरेचे मिळाले होते, ते सर्व घर आणि शेती घेण्यात आणि नंतर ती शेती सुधारण्यात जवळजवळ संपले. त्याशिवाय त्यांनी कर्जही काढले होते. 'इथे शेती करणं म्हणजे वाळूत मुतल्यासारखं आहे. सगळे पैसे संपवून लौकरच हा भिकारी बनणार,' असे एकदोघांनी म्हटले होते, पण त्याकडे दुर्लक्ष करून जोशींनी आपले काम अगदी निष्ठेने चालू ठेवले. जोशी सांगत होते,

''हा एवढा सगळा पैसा शेतीत गुंतवण्यामागे आणखी एक विचार होता – तो म्हणजे शेतीतून बाहेर पडायचा आपल्याला कधीच मोह होऊ नये!''

हे सारे करत असताना भोवतालच्या इतर स्थानिक मंडळींशी जोशींचे संबंध कसे होते? सुरुवातीला ते अर्थातच अगदी परके होते, पण जसजसे दिवस जात होते, तसतसे त्यांचे स्थानिक परिचितांचे वर्तुळ वाढू लागले.

७ ऑगस्ट २०१५ रोजी सुरेशचंद्र म्हात्रे ह्यांच्या सौजन्याने चाकण येथे एक सुखद योग घडून आला. म्हाळुंगे येथील एक हॉटेलमालक श्याम पवार, चाकणमधील एक जुने डॉक्टर अविनाश अरगडे, मांडव काँट्रॅक्टर गोपालशेठ मारुती जगनाडे (संत तुकारामांच्या अभंगांचे लेखनिक म्हणून ज्यांनी एकेकाळी काम केले होते त्या संताजी महाराजांचे हे वंशज), राष्ट्र सेवा दलाचे शाखाप्रमुख रामराव मिंडे, ऑइल इंजिन दुरुस्ती करणारे मधुकर रघुनाथ शेटे, आप्पासाहेब ऊर्फ प्रल्हाद रंगनाथ देशमुख, मामा शिंदे वगैरे जोशींच्या त्यावेळच्या काही निवडक सहकाऱ्यांबरोबर त्यादिवशी प्रस्तुत लेखकाला मनसोक्त गप्पा मारता आल्या आणि त्यावेळचे जोशींच्या सहकारी वर्तुळाचे चित्र डोळ्यापुढे आपोआपच उभे राहत गेले.

आप्पासाहेब ऊर्फ प्रल्हाद रंगनाथ देशमुख आणि बाबुभाई शहा यांच्यापासून बहुधा ह्या स्थानिक वर्तुळाची सुरुवात झाली. ह्या दोघांचीही त्याकाळी चाकण परिसरात सायकल दुरुस्त करायची दुकाने होती. ग्रामीण भागात त्यावेळी सायकल हेच वाहतुकीचे प्रमुख साधन होते. दोघांच्याही व्यावसायिक जीवनाची ती सुरुवात होती. अप्पा देशमुखांनी पुढे डिझेल पंपाची निर्मिती व दुरुस्ती करायचे केंद्र काढले. ते स्वतः कुशल फिटर होते व देशमुख फिटर म्हणूनच त्यांना सगळे हाक मारत. जोशींच्या शेतातील विहिरीवर बसवलेला पहिला डिझेल पंप त्यांनी देशमुखांकडूनच खरेदी केला होता. पुढे फॅब्रिकेशनचा व्यवसायदेखील ते उत्तम करू लागले. शेतातील गोबर गॅस प्लांट, शेड हे सारेही त्यांनीच उभारून दिले होते. बाबुभाईंनीतर पुढे आणखी व्यावसायिक प्रगती केली. एक पेट्रोल पंप काढला आणि मोटर गाड्यांचे सर्व्हिसिंग सेंटरही काढले. शेतीमालाच्या साठवणुकीसाठी त्यांनी एक हिमराज कोल्ड स्टोरेजदेखील काढले. पुढे जोशींनी बटाट्याचे पीक काढायला सुरुवात केली तेव्हा आपल्या शेतातले बटाटे विक्री होईस्तोवर ते हिमराज कोल्ड स्टोरेजमध्येच ठेवत असत.

अशाप्रकारेच पुढे एकेक करत उपरोक्त सगळ्या स्थानिक मंडळींशी जोशींचे संबंध जडले. सुरुवातीला ते व्यावसायिक संबंध होते, पण पुढे त्याचे स्नेहात रूपांतर झाले. ही मंडळी नंतर त्यांच्या शेतकरी आंदोलनातही यथाशक्ति सामील झाली. जगनाडे यांनी पंढरपूर येथील मेळाव्याचा तसेच परभणी अधिवेशनाच्या वेळचा सगळा मांडव अत्यल्प खर्चात उभारून दिला होता. श्याम पवार, डॉ. अविनाश अरगडे वगैरे सगळेही आंदोलनात जमेल तसा सहयोग देत राहिले. त्र्याण्णव वर्षांचे मधुकर शेटे प्रस्तुत लेखकाला सांगत होते,

''आम्ही तशी आपापला छोटा व्यवसाय करणारी माणसं. चळवळ वगैरे आमचं क्षेत्र कधीच नव्हतं. पण जोशीसाहेबांचा प्रभाव आमच्यावर असा काही पडला, की आम्ही

आपोआपच त्यांच्या आंदोलनात खेचले गेलो. खरं तर पूर्वी आम्हाला शेतकऱ्यांबद्दल काहीच प्रेम वगैरे नव्हतं. आमचं गिऱ्हाईक म्हणूनच आम्ही या शेतकऱ्यांकडे बघायचो; खूपदा त्यांच्याशी भांडायचोही. पण जोशीसाहेबांमुळे आमची त्यांच्याकडे बघायची सगळी दृष्टीच बदलून गेली. त्यांच्यावर किती अन्याय होत आहे याची आम्हाला प्रथमच जाणीव झाली. मी स्वतः तीन वेळा शेतकरी आंदोलनात तुरुंगात गेलो. दोनदा येरवडा तुरुंगात व एकदा औरंगाबाद तुरुंगात.''

बाबुभाई शहा यांनी जोशींची दुसऱ्या एका महत्त्वाच्या व्यक्तीबरोबर ओळख करून दिली. शेतीच्या काही कामासाठी जोशी शहांकडे गेले होते. त्यांच्या चाकणमधील कार्यालयात. काम झाल्यावर ते जाण्यासाठी उठले तशी, ''थांबा दोन मिनिटं. तुमची एका भल्या माणसाबरोबर ओळख करून देतो,'' असे म्हणत शहांनी त्यांना थांबवून घेतले. तेवढ्यातच हे भले गृहस्थ त्या दुकानात आले. कदाचित जोशींबरोबर परिचय करून देण्याच्या उद्देशाने शहांनीच त्यांना तिथे बोलावून घेतले असेल. ते होते दत्तात्रेय भिकोबा ऊर्फ मामा शिंदे. त्यांनी जोशींच्या चाकणमधील सुरुवातीच्या दिवसांत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्याविषयी इथे थोडे विस्ताराने लिहायला हवे.

'दुसरे सानेगुरुजी' म्हणूनच चाकण परिसरात आजही मामा ओळखले जातात. हे साम्य केवळ दिसण्यापुरते नव्हते, तर वृत्तीतही होते. राष्ट्र सेवा दलाचे ते प्रथमपासून निष्ठावान सेवक. १९४७ साली देश स्वतंत्र झाला तेव्हा सर्व पोलीस स्टेशनांनी आपापल्या आवारात झेंडावंदन करावे असे सरकारचे आदेश निघाले. पण चाकण पोलिसांना झेंडावंदन कसे करतात तेच ठाऊक नव्हते. मामा राष्ट्र सेवा दलाची शाखा गावात चालवतात हे मात्र त्यांना ठाऊक होते. त्यांनी मामांनाच पोलीस ठाण्यात पाचारण केले. खांब उभारणे, झेंड्याला दोरी लावून तो वर सरकवणे व मग तो फडकवणे या सगळ्याची रंगीत तालीम केली आणि मग १५ ऑगस्टला त्यांच्याच मार्गदर्शनाखाली स्थानिक पोलिसांनी पहिले झेंडावंदन केले.

बाबुभाई पक्के काँग्रेसवाले असूनही मामांना इतके मानतात याचे जोशींना कौतुक वाटले. विरोधी पक्षातील लोकांनाही आपले मोठेपण मान्य असणे हे आपल्याकडे तसे दुर्मिळच. लौकरच जोशींना कळले, की चाकणमध्ये सर्वच नेत्यांना मामांचे मोठेपण मान्य आहे.

जोशींनी शेतीला सुरुवात केली त्याच महिन्यात, २३ जानेवारी १९७७ रोजी, दिल्लीत एक अगदी अनपेक्षित घटना घडली. कोणाच्याही ध्यानीमनी नसताना इंदिरा गांधींनी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर केल्या. ठरल्याप्रमाणे २० मार्चच्या संध्याकाळी निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. काँग्रेसचा अभूतपूर्व असा पराभव करून केंद्रात जनता पक्षाचे राज्य आले. काँग्रेसेतर सरकार केंद्रात सत्तेवर यायचा हा देशाच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग. जोशी तसे प्रत्यक्ष राजकारणापासून दूरच होते, पण भोवताली काय चालले आहे हे बारकाईने पाहत असत. आणीबाणीची दहशत असल्याने लोक तसे शांत आहेत हे

ठाऊक असले, तरी विरोधी पक्षनेत्यांना तुरुंगात डांबणे, त्यांचा छळ करणे, विशेषतः सक्तीची नसबंदी वगैरेबाबत लोकांत खूप असंतोष आहे हे त्यांनी हेरले होते. इंदिराजी हरल्या ह्याचा त्यांनाही इतरांप्रमाणेच आनंद झाला होता. त्या आधीच्या १८ महिन्यांत आणीबाणीमुळे राजकीय मंचावर सारे कसे शांत शांत होते. आता एकदम सगळीकडे राजकारणाची चर्चा सुरू झाली. लोक जणू आपल्या दबलेल्या भावनांना वाट मोकळी करून देत होते.

त्यानंतर पुढल्याच वर्षी, मार्च १९७८मध्ये, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होणार असल्याचे जाहीर झाले. मामा खेड मतदारसंघातून जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणुका लढवणार व जिंकणार ह्याविषयी सगळ्या चाकणची खात्री होती. पण अचानक कुठेतरी चावी फिरली आणि जनता पक्षाने मामा शिंदे यांना तिकीट नाकारले. त्यांना मानणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे शेवटी त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवायचे ठरवले. त्यांचे चिन्ह होते सायकल.

आपल्या लढतीची पूर्वतयारी साधारण ७८च्या जानेवारी महिन्यातच मामांनी सुरू केली व त्याचवेळी जोशी आपण होऊन त्यांना म्हणाले, ''मामा, ह्या संपूर्ण प्रचारात मी माझ्या डिझेल भरलेल्या जीप गाडीसह तुमच्या सेवेला हजर राहीन. तुम्ही जिथे जिथे जाल, तिथे तिथे मी तुमच्याबरोबर येईन.'' मामांना ह्या अनपेक्षित ऑफरचे खूप अप्रूप वाटले. गाडी, डिझेल आणि ड्रायव्हर ह्या सगळ्याचीच एकदम सोय झाली होती! शिवाय त्या काळात जोशींच्या भोवतीचे आयएएसचे व स्वित्झर्लंडचे वलय कायम होते. गावात कुठेही गेले तरी ते आपली छाप हमखास पाडत. अशी व्यक्ती दिमतीला असणे ही मामांच्या दृष्टीने मोठीच जमेची बाजू होती.

जोशी म्हणतात,

''मामांच्या निवडणूक प्रचाराच्या काळात मी रोज माझी मोडकीतोडकी जीप गाडी घेऊन, त्यात डिझेल भरून, मामांच्या घरासमोर उभा राहत असे. आमची निघण्याची वेळ अगदी पक्की ठरलेली असे. ते निवडून आले, तर त्यांच्या मतदारसंघात काय काय करता येईल याची आखणी आम्ही प्रवासात करत असू.''

अपक्ष असूनही मामांनी चांगलीच लढत दिली. तालुक्यातील प्रत्येक गावात 'ही सायकल कोणाची, गरीब आपल्या मामांची' ही घोषणा दुमदुमत होती. ते निवडून येतील असे जोशींसकट सगळ्यांनाच वाटले होते, पण प्रत्यक्षात त्यांना सुमारे १२,००० मते पडली व आणीबाणीची पार्श्वभूमी असतानाही त्यांच्यापेक्षा दुप्पट म्हणजे २३,००० मते मिळवून काँग्रेसचे राम जनार्दन कांडगे निवडून आले. तसे व्यक्तिशः तेही मामांना गुरुस्थानी मानत. लोकभावना ओळखण्यात आपण कसे चुकतो व प्रत्यक्षात निवडणुकांची गणिते किती वेगळी असतात याची जोशींना ह्या काळात थोडीफार जाणीव झाली.

अर्थात, जोशींच्या दृष्टीने निवडणुकीतील हारजीत तशी कमी महत्वाची होती. मामांच्या प्रचाराच्या पलीकडे जाऊन काहीतरी साधायचे त्यांचे उद्दिष्ट होते. किंबहुना ते उद्दिष्ट समोर

ठेवूनच ते ह्या प्रचारकार्यात सामील झाले होते. मतदारसंघातील जवळ जवळ प्रत्येक गावात ते गेले. शेतकरी प्रश्न समजून घेण्यासाठी व पुढे सोडवण्याच्या दृष्टीने उपयुक्त असे संपर्क जोशी साधत होते. मामांचे भाषण चालू असताना मागे उभे राहून वा गर्दीत मिसळून ते सगळे निरखून पाहत. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांचे अनुभव, अपेक्षा व अडचणी ऐकून घेत. 'हा माणूस इतर शहरी सुशिक्षित लोकांपेक्षा वेगळा आहे' असे त्या भागातील शेतकऱ्यांच्या मनावर ठसू लागले. त्यावेळी मामा म्हणत, ''आम्ही राजकारणी चाकणहून दिल्लीला जाण्यासाठी धडपडतो आणि शरद जोशी मात्र परदेशातून येतात आणि चाकणहून टोकाच्या वांद्रे गावाला जाण्याचा ध्यास धरतात.''

जोशी म्हणतात, ''या त्यांच्या शेऱ्यामध्ये माझ्या पुढच्या सगळ्या शेतकरी चळवळीच्या इतिहासाचे बीज आहे.''

पुढे कांदा आंदोलनात मामा शिंदे सर्व ताकदीनिशी सामील झाले. ते स्वतः आयुष्यभर समाजवादी पक्षाचे काम करत आलेले; त्या पक्षाच्या विचारसरणीला जोशी यांचा अगदी मूलभूत असा विरोध. तरीही दोघे एकत्र काम कसे करू शकतात याचे अनेकांना आश्चर्य वाटे. पण ''शरद जोशींचा विचार शेतकऱ्यांच्या हिताचा विचार आहे व आजवर तो तसा कोणीही मांडला नव्हता. अशा वेळी त्यांना साथ देणं हे माझं एक शेतकरी म्हणून कर्तव्य आहे,'' असे मामा म्हणत. आपल्या पक्षाचे राष्ट्रीय नेते एसेम जोशी व नानासाहेब गोरे यांनी आणि शरद जोशी यांनी व्यापक शेतकरीहित विचारात घेऊन एकत्रितपणे काही कृती करावी अशी त्यांची फार इच्छा होती व त्यादृष्टीने त्यांनी खूपदा प्रयत्नही केले होते. त्यांच्याच प्रयत्नांमुळे शेतकरी संघटनेच्या चाकणमधील एक-दोन सभांना नानासाहेब गोरे व जॉर्ज फर्नांडीस हजर राहिले होते. पण जोशींबरोबर समाजवाद्यांचे, किंवा खरे तर कुठल्याच पक्षाचे, फारसे कधी जुळले नाही.

प्रचारसभांच्या धामधुमीतून मोकळे झाल्यावर एप्रिल १९७८पासून जोशी पुन्हा एकदा आपल्या शेतीवर लक्ष केंद्रित करू लागले. एकूण परिस्थिती आता खूप गंभीर झाली होती. आर्थिक टंचाई होतीच, काही कौटुंबिक ताणतणावही होते. जोशी आपल्या शेतीतील प्रयोगांत पूर्ण रमले असतानाच लीलाताईंनी गुलाबाची रोपे विकणारी रोपवाटिका सुरू केली होती. मुख्य म्हणजे स्वतःची एक पोल्ट्री सुरू केली होती. काहीतरी स्वतंत्र व्यवसाय उभा करण्याची त्यांची जिद्द होती. त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण त्यांनी खडकी येथील शासकीय कुक्कुटपालन प्रशिक्षण केंद्रातून घेतले होते. खूप मनापासून त्या हा व्यवसाय करत होत्या. अंड्यांचे आहारातील वाढते महत्त्व म्हणजे मोठीच व्यावसायिक संधी होती. पुणे-तळेगाव हे कुक्कुटपालनाचे एक मोठे केंद्र म्हणून विकसित होत होते. सुरुवात त्यांनी मृद्गंध बंगल्यातूनच केली होती, पण नंतर व्याप वाढू लागल्यावर व त्या निवासी जागेत व्यवसाय वाढवणे शक्य नसल्याने त्यांनी कोंबड्यांचे सगळे पिंजरे अंगारमळ्यात नेले. चाकणच्या अप्पा देशमुखांनीच हे पिंजरे तयार केले होते व ते ठेवण्यासाठी पत्र्याच्या शेडदेखील त्यांनीच उभारून दिल्या होत्या.

पण दुर्दैवाने प्रथमपासूनच पोल्ट्रीच्या या व्यवसायात अनेक अडचणी येत गेल्या. एकदा वीज गेल्यामुळे शीतगृह बंद पडले व त्यात साठवून ठेवलेला माल नष्ट झाला. शीतगृहमालकाने वस्तुरूपात थोडी भरपाई दिली, पण तरीही नुकसान बरेच झाले. एकदा मुंगुसांनी कसातरी पिंजऱ्यात प्रवेश केला आणि दोन-अडीच हजार कोंबड्यांपैकी पाचेकशे खाऊन फस्त केल्या. असे एकापाठोपाठ एक धक्के बसत गेले. दरम्यान कर्जाचा बोजा वाढतच चालला. शेतीतही कर्ज साठत होते आणि पोल्ट्रीतही साठत होते.

साधारण ह्याच सुमाराची एक घटना. जोशी यांच्या वैचारिक प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा त्यांनी त्या दिवशी गाठला.

पुण्यातील पाषाण विभाग, आणि विशेषतः आज ज्याला नेकलेस रोड म्हणतात तो त्यातला भाग, त्या काळी आत्तापेक्षाही अधिक निवांत होता. स्वच्छ रस्ते, ओळीनी लावलेले वृक्ष, मागे दिसणाऱ्या डोंगररांगा. नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, डीआरडीओ यांसारख्या काही नामांकित संस्थांची भव्य आवारे इथेच आहेत. त्यांच्याआधीच लागते सेंट जोसेफ शाळा. शाळेच्या प्रशस्त आवारात जोशींची गाडी शिरली, तेव्हा दुपारचे साधारण तीन वाजले होते. सोबत लीलाताई आणि श्रेया व गौरीही होत्या. दोघी ह्याच शाळेत शिकत होत्या आणि शाळेच्याच वार्षिक स्नेहसंमेलनासाठी म्हणून जोशी कुटुंब तिथे आले होते. ही शाळा मुलींची. त्याच मिशनची मुलांसाठीची शाळा, लॉयोला हायस्कूल, शेजारीच आहे.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी कोणे एके काळी गरीब विद्यार्थ्यांसाठी म्हणून अनेक देशांत शाळा सुरू केल्या. जगभरातून देणग्या मिळवून उत्कृष्ट इमारती उभारल्या. ग्रंथालये, प्रयोगशाळा, क्रीडांगणे, वसतिगृहे, भरपूर मोकळी जागा यांची तजवीज केली. देशोदेशींच्या मिशनरी स्त्रिया व पुरुष अतिशय कळकळीने व सेवावृत्तीने शिकवण्याचे काम करीत. साहजिकच बघता बघता या शाळांचा खूप दर्जेदार म्हणून सर्वत्र लौकिक पसरला. पण म्हणूनच अहमहमिकेने अभिजनवर्ग आपली मुले इथेच घालू लागला आणि त्यामुळे मूळ गरिबांसाठीच्या या शाळा काळाच्या ओघात उच्चभ्रूंच्या शाळा म्हणूनच स्थिरावल्या. विशिष्ट परिस्थितीमुळे संस्थांना मूळ उद्देशापासून अगदी वेगळे स्वरूप कसे प्राप्त होत जाते ह्याचे हे एक ठळक उदाहरण आहे.

शाळेच्या आवारात पार्किंगसाठी भरपूर जागा असूनही गाड्यांची गचडी झाली होती. इथल्या बहुतेक विद्यार्थिनी गाडीवाल्या! त्यात पुन्हा आज खास दिवस. कशीबशी आपली गाडी पार्क करून जोशी कुटुंब सजवलेल्या मांडवात शिरले. सगळीकडे अगदी सणासुदीचे वातावरण होते. सगळ्या मुली फॅशनेबल कपड्यांत आलेल्या. त्यांचे पालक तसेच नटूनथटून आलेले. त्यांनी तसे यावे, हा आग्रह प्रत्येक मुलीचा असायचाच! आपल्या आईवडलांमुळे इतर मुलींसमोर आपली 'पोझिशन डाऊन' होऊ नये यासाठीची ही त्यांची खबरदारी! सगळीकडे पताका, झिरमिळ्या, फुगे. नाच, गाणी, करमणुकीचे कार्यक्रम. बाजूला ओळीने उभारलेले वेगवेगळे खाद्यपदार्थ व इतर वस्तू विकणाऱ्यांचे स्टॉल्स. त्यांच्याभोवती उडालेली मुलींची झुंबड. आपल्याला हवे ते विकत घेण्यासाठी त्या पर्समधून वा खिशातून पन्नास-

शंभरच्या नोटा अगदी सहज काढत होत्या. त्यांच्या गोंगाटाने आणि हसण्याखिदळण्याने, इकडेतिकडे बागडण्याने तो सगळा परिसर भरून गेला होता. एरव्ही अशा शाळांमधली शिस्त मोठी कडक. पण आज तिथल्या शिक्षकांनी मुलींना पूर्ण स्वातंत्र्य दिलेले. वातावरणात उत्साह, उल्हास दाटलेला. पालकही गप्पांमध्ये रंगलेले.

जोशी स्वतः त्या सगळ्यापासून अलिप्त होते, नुसतेच आजूबाजूला पाहत होते. तसे सरकारी नोकरीत व परदेशात त्यांनी वैभव भरपूर उपभोगले होते; पैशाचे त्यांना अप्रूप नव्हते. पण आज मात्र त्यांना हे सारे बघताना वैषम्य वाटत होते. वाटले, 'ह्या सगळ्या मंडळींमध्ये बहुधा आपणच सर्वांत गरीब असू. आपल्या मुली म्हणजे श्रीमंत शाळेतल्या गरीब मुली!'

त्यांना असे वाटण्याचे बरेच प्रसंग गेल्या काही दिवसांत आले होते. नुकतेच मोठ्या श्रेयाला काश्मीरला ट्रीपला जायचे होते, वर्गातल्या सगळ्याच मुली जाणार होत्या. पण त्यासाठी लागणारे पाचशे रुपये त्यावेळी जोशींकडे नव्हते. 'तुला यंदा ट्रीपला पाठवणं नाही झेपणार मला' असे तिला सांगताना त्यांच्या हृदयाला जणू सहस्र इंगळ्या डसल्या होत्या. स्वित्झर्लंडमध्ये असताना असा प्रसंग कधीच आला नव्हता; मुलींची प्रत्येक हौस पुरी करणे तिथल्या पगारात त्यांना सहज शक्य झाले होते.

वडलांच्या हट्टामुळे मुलींना भारतात यावे लागले होते आणि मग त्यांचे सगळे जीवनच एकदम बदलून गेले होते. इथली शाळा, शिक्षक, मैत्रिणी, शेजारी, हवापाणी, रस्ते, रहदारी, इथले एकूण सामाजिक वातावरण सगळे तिथल्यापेक्षा खूप वेगळे होते. बर्नमध्ये शिकत असताना दोन वर्षांपूर्वीच श्रेयाने कोपर्निकसवर फ्रेंचमध्ये निबंध लिहिला होता; इथल्या शाळेत मात्र तिला गमभन गिरवायला लागले होते! होणाऱ्या खर्चावरून, वाढणाऱ्या कर्जावरून घरी खूपदा भांडणे व्हायची. तशा दोघीही मुली समजूतदार होत्या, आईवडलांची परिस्थिती त्यांना समजत होती. शक्यतो त्या काही मागतच नसत. त्यांच्या चेहऱ्यावर अकालीच उमटलेल्या त्या गांभीर्याच्या छटा जोशींना अधिकच बोचायच्या. घरातल्या प्रत्येकालाच खरे तर वातावरणातला तणाव जाणवत होता. आपला अनेक वर्षे कष्ट घेऊन केलेला स्टॅम्प्स्‌चा संग्रहही त्यांना विकावा लागला होता व ते तर जोशींना खूपच जिव्हारी लागले होते. लीलाताईंची स्थिती काही वेगळी नव्हती. त्याही बदललेल्या प्रापंचिक परिस्थितीशी जुळवून घ्यायचा आटोकाट प्रयत्न करत होत्या. पण सगळे तसे जडच होते. आपल्या तत्कालीन मानसिकतेचे नेमके वर्णन जोशींनी केले आहे. ते लिहितात :

> तिच्या मनात खरोखरच काय चाललं होतं कोण जाणे! माझी ही उडी खरं म्हटलं तर तिच्यावरही अन्यायच होता. आयएएस पास झालेल्या, हुशार, कर्तबगार समजल्या जाणाऱ्या नवऱ्याच्या हाती तिने हात दिला, तो सुखासमाधानाच्या चौकोनी कुटुंबाच्या राज्यात चिरकाल राज्य करण्यासाठी. पुढे हे असं काही घडेल याची तिला तरी काय कल्पना होती? ... झोपी जाताना चिंतांची तोटी बंद करून झोपी जायचं, ही माझी फार जुनी कला आहे. झोप लागताना सगळ्या चिंतांचा आणि तणावांचा काही त्रास व्हायचा

> नाही. रात्री अडीचतीन वाजता मात्र झोप खाडकन खुले. पुढे झोपणंच अशक्य होई. कपाळाला हात लावून मी स्वतःलाच विचारी, 'मी पाहतो आहे ते खरं की स्वप्न?' आसपास शांतपणे झोपलेल्या लीला, श्रेया, गौरीकडे पाहून पोटात गलबलून यायचं. यांचं जीवन उद्ध्वस्त करण्याचा मला काय अधिकार होता?
>
> (*अंगारमळा,* पृष्ठ ८-१०)

शाळेतील तो कार्यक्रम संपवून घरी परतेस्तोवर रात्र झाली होती. तिथेच इतके सगळे खाणेपिणे झाले होते, की आता घरी गेल्यावर जेवायचा काही प्रश्नच नव्हता. आज कधी नव्हे ती मुलींची बडबड सारखी चालू होती; संध्याकाळच्या आठवणी काढून त्या सारख्या खिदळत होत्या. खूप दिवसांनी त्यांचा असा चिवचिवाट ऐकताना, त्यांचे असे फुललेले चेहरे पाहताना आईवडलांनाही खूप आनंद होत होता. जोशींना तर वाटत होते, ह्यांना इतक्या आनंदात असलेले आपण भारतात परतल्यावर आज प्रथमच पाहतो आहोत! आज इतक्या दिवसांनी प्रथमच त्यांना एक वडील म्हणून इतके समाधान वाटत होते.

एका तृप्तीतच ते पलंगावर आडवे झाले, शेजारचा बेडलँप मालवला. जरा वेळ त्यांना पेंग आली, पण मग अचानक खडबडून जाग आल्यासारखे झाले. डोळ्यासमोर कालची ती लहान मुलगी उभी राहिली. शेतमजुराची मुलगी. अलीकडे शेतीच्या कामामुळे त्यांना खूपदा आंबेठाणला अंगारमळ्यात रात्रीही मुक्काम करावा लागे. तिथल्या त्या छोट्या तकलादू घरात. घरासमोरच्या पडवीत आपल्या शेतावर काम करणाऱ्या शेतमजुरांच्या मुलांसाठी ते रात्री सगळी कामे उरकल्यावर शिकवणी घेत. त्यांना लिहायला वाचायला शिकवत. खरेतर दिवसभराच्या श्रमांमुळे ते तोवर अगदी गळून गेलेले असत, पण तरीही ह्या मुलांनी शिकले पाहिजे असे त्यांना खूप वाटे. म्हणूनच त्यांची ही धडपड असे. त्या मुलीच्या हातात पाटी व पेन्सील होती. जोशींनी भिंतीवरच्या फळ्यावर काढलेली अक्षरे ती आपल्या पाटीवर अलगद लिहीत होती, पुन्हा पुन्हा गिरवत होती. तिची एकाग्रता, तन्मयता, शिकण्याची हौस ह्या सगळ्याचे प्रतिबिंब तिच्या चेहऱ्यावर उमटले होते. ते पाहून जोशींना अगदी गहिवरून आले. खूप वेळ ते तिच्याकडे रोखून पाहत होते.

आत्ता पुन्हा एकदा तिचा तो चेहरा त्यांच्या डोळ्यांपुढे उभा राहिला. बघता बघता मनात विचारचक्र फिरू लागले. आंबेठाणमधले ते शेतमजुरांचे जग आणि इथले जग यांची मन तुलना करू लागले.

इथली गुटगुटीत, गोरीगोमटी, नवेकोरे कपडे घातलेली, बोर्नव्हीटा-हॉर्लिक्सच्या जाहिरातीतल्यासारखी दिसणारी गोंडस मुले आणि तिथली रोगजर्जर, किडकिडीत, खरजेने भरलेली, ढगळ फाटकेतुटके कपडे घातलेली मुले.

इथली ती सेंट जोसेफसारखी भव्य शाळा आणि तिथली ती अर्धमोडल्या भिंतींची, गळकी, एकमास्तरी चावडीवरची शाळा.

इथल्या शाळेतला तो मोठा थोरला स्विमिंग पूल आणि तिथल्या कोरड्या पडलेल्या विहिरी.

इथला तो शाळेसमोरचा रस्ता; विद्यापीठ चौकापासून थेट एनडीएपर्यंत गेलेला वीसएक किलोमीटरचा रस्ता. गेल्याच वर्षी केवळ एक दिवसाकरिता राष्ट्रपती येणार होते, म्हणून तो उत्तम असतानाही पुन्हा एकदा डांबर ओतून, काही लाख रुपये खर्चून अधिक गुळगुळीत करण्यात आला होता. आणि गावातला तो दहा-बारा वर्षांपूर्वी दुष्काळाच्या वेळी श्रमदानाने बांधलेला खडीचा कच्चा रस्ता; ज्याच्यावरून चालताना घोटे बुडतील इतका चिखल प्रत्येक मोठ्या पावसानंतर हमखास साचायचा.

वाटले, पुणे आणि आंबेठाण म्हणजे जणू दोन वेगवेगळे देश आहेत – एकमेकांपासून इतके वेगळे, की त्यांच्यात काही नातेच नसावे.

स्वित्झर्लंडसारख्या अत्यंत प्रगत देशात राहून भारतात परतल्यावर आपला देश आणि तो देश यांच्यातील तफावत किती प्रचंड आहे, याची जोशींना कल्पना होतीच, पण आंबेठाणसारख्या ग्रामीण भागात गेले वर्षभर शेती केल्यानंतर, तिथली परिस्थिती प्रत्यक्ष अनुभवल्यानंतर, जोशींच्या लक्षात आले, की पुण्यासारखा शहरी भारत आणि तिथून अवघ्या चाळीस किलोमीटरवरचा आंबेठाणसारखा ग्रामीण भारत यांच्यातील दरी ही स्वित्झर्लंड आणि भारत यांच्यातल्या दरीपेक्षाही कितीतरी जास्त भीषण आहे.

झेंडा एकच आहे, राष्ट्रपती एकच आहेत, राष्ट्रगीत एकच आहे – वरवरच्या खुणा सगळ्या एकच आहेत; परंतु आर्थिकदृष्ट्या ह्या देशाचे दोन भाग पडले आहेत. एक भाग हा दुसऱ्या भागाच्या शोषणावरच जगतो आहे, आणि सतत जास्तीतजास्त शोषण करत चालला आहे आणि दुसऱ्या भागाचे मात्र शोषणच होत आहे.

शोषक म्हणजे 'इंडिया' आणि शोषित म्हणजे 'भारत'.

'इंडिया' आणि 'भारत' यांच्यातील या जमीनअस्मानाच्या फरकाचे मूळ कारणही त्यांच्या लक्षात आले होते. किंबहुना, ते सतत मनात सलतच होते. ते होते त्यांची आणि त्यांच्यासारख्या सर्वच शेतकऱ्यांची नुकसानीतली शेती. महिन्यापूर्वीच त्यांनी स्वतःच्या शेतात पिकवलेला कांदा विकला होता. अवघ्या २० रुपये क्विंटल या भावाने. त्यांच्या चार-पाच महिन्यांच्या घामाचा बाजारपेठेतला भाव तेवढाच होता – २० पैसे किलो! आणि इथल्या आजच्या समारंभात तर केवळ खाण्यापिण्यावर शंभराची नोट उडाली होती!

तसे पाहिले तर भारतातल्या आत्यंतिक विषमतेची असली मांडणी त्यांना अपरिचित नव्हती. कम्युनिस्ट विचारवंत ती वर्षानुवर्षे करत आले होते. मुंबईत मलबारहिलवर १९६५च्या सुमारास जेव्हा उषाकिरण ही भारतातील पहिली सव्वीस मजली गगनचुंबी इमारत बांधली गेली, तेव्हा ते मुंबईतच नोकरी करत होते आणि उषाकिरण बिल्डिंग आणि शेजारीच मलबारहिलच्या डोंगरउतारावर असलेल्या झोपड्या ह्यांची एकत्रित छायाचित्रे अनेक ठिकाणी प्रकाशित झालेली त्यांनी पाहिली होती. पण जोशींना त्यावेळी तो केवळ एक 'प्रचार'

(प्रपोगंडा) वाटला होता. त्यानंतर कोल्हापूर येथे एक वर्ष शिकवत असताना सिडनममधले आपले सहाध्यायी आणि कोल्हापूरमधले आपले विद्यार्थी यांच्यातील फरकही त्यांनी बघितला होता. पण त्यावेळीही ते द्वंद्व त्यांच्या मनाला तितकेसे भिडले नव्हते; किंबहुना त्यांच्यात काही द्वंद्व आहे हे बुद्धीला तितकेसे पटलेही नव्हते.

याचे कारण त्यावेळी ते स्वतः त्या 'इंडिया'चाच एक भाग होते आणि जे मत आपल्याला फायदेशीर आहे, तेच मत आपोआपच मनोमन ग्राह्य मानणे आणि जे मत आपल्या हितसंबंधांना बाधा आणणारे आहे, ते दुर्लक्षित करणे हे एकूणच मनुष्यस्वभावाला धरून होते.

पण आताची परिस्थिती अगदी वेगळी होती. स्वतःच घेतलेल्या निर्णयामुळे ते पूर्वीच्या सुखासीन अशा 'इंडिया'तून दरिद्री 'भारता'त फेकले गेले होते. आपल्या आताच्या दुःखाला दुसरा कोणीतरी 'शोषक' इंडिया जबाबदार आहे, ही जाणीव त्यांच्या हृदयात काट्याप्रमाणे सलत होती. शहरात आहे तो 'त्यांचा इंडिया' आणि गावात आहे तो 'आपला भारत'.

देशातील एकूण गरिबीचे मूळ शेतकऱ्याला मिळणाऱ्या अत्यल्प भावातच आहे हेही उघडच होते. शहरात झोपड्यांमधून राहणारे ते दुर्दैवी जीव – किंवा त्यांचे पूर्वज – हेही एकेकाळी आपल्यासारखेच शेतकरी असले पाहिजेत आणि शेतीत होणारी उपासमार टाळण्यासाठी त्यांना शहरात स्थलांतर करावे लागले असले पाहिजे हेही स्पष्टच होते.

'इंडिया विरुद्ध भारत' या त्यांच्या मनात घोळू लागलेल्या द्वंद्वाला आणखीही एक महत्त्वाचा व्यक्तिगत पदर असणे शक्य होते. गेल्या दीड वर्षात पदोपदी त्यांना अगदी किरकोळ लोकांपुढे बाबापुता करावे लागले होते, अगदी क्षुल्लक कारणासाठी तासन्‌तास रांगेत उभे राहावे लागले होते, समोरच्या माणसाशी अजिजीने बोलावे लागले होते. घर घेणे, जमीन घेणे, त्यासाठी लागणारे असंख्य कागदपत्र मिळवणे, गॅस-टेलिफोनचे कनेक्शन मिळवणे, विजेचे मीटर स्वतःच्या नावावर करून घेणे, मुलींसाठी शाळेत प्रवेश मिळवणे, त्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे दाखले मिळवणे – एक ना दोन, अशा असंख्य प्रसंगी गेल्या दीड वर्षात त्यांच्या वाट्याला असे अपमान आले होते. आपल्या शेतातले कांदे, बटाटे, काकड्या विकण्यासाठी जेव्हा ते चाकणच्या बाजारसमितीत जात होते, तेव्हा तिथल्या कर्मचाऱ्यांच्याकडून, व्यापाऱ्यांकडून, अगदी हमालांकडूनही त्यांच्या आत्मसन्मानाला प्रत्येक वेळी अशीच ठेच पोचत होती. आपल्या मालाची किंमत किंवा आपल्या श्रमाचे मूल्य हा समोरचा फालतू माणूस ठरवणार आणि ते मुकाटपणे मान्य केल्याशिवाय आपल्याला गत्यंतर नाही, ही जाणीव त्यांचे विलक्षण संवेदनशील मन पोळणारी होती.

त्यांच्यासारख्या उच्च शासकीय सेवेत दहा वर्षे काढलेल्या व्यक्तीला ह्यातला प्रत्येक प्रसंग अगदी जिवावर धोंडा ठेवून निभवावा लागला होता. आत्मसन्मानाची अतिशय प्रखर जाणीव असलेल्या त्यांच्यासारख्या व्यक्तीच्या दृष्टीनेतर यांतल्या प्रत्येक प्रसंगाची दाहकता अधिकच असह्य होती.

'इंडिया विरुद्ध भारत' या संकल्पनेत त्यांना उमगलेले तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब तर होतेच, पण त्यांच्या स्वतःच्या तत्कालीन मानसिक संघर्षाचे प्रतिबिंबही त्या

संकल्पनेत नेमके उतरले होते. त्यात केवळ वैचारिक पातळीवरचे आकलन नव्हते; भावनांचे उत्कट गहिरेपणही होते. त्यात व्यक्तिशः आपल्या होत असलेल्या अवहेलनेचा दंशही होता; त्या 'इंडिया'वासींमुळे आपल्यासारख्या 'भारत'वासींना सोसाव्या लागणाऱ्या लाचारीविषयीचा संतापही होता.

म्हणूनच त्यांची नेहमीची हुकमी झोप आज त्यांना सोडून गेली होती. 'इंडिया विरुद्ध भारत'चे वादळ डोक्यात सतत घोंघावू लागले होते.

■

५

# चाकणचा कांदेबाजार : पहिली ठिणगी

कांद्याची महती प्राचीन काळापासून माणसाला ज्ञात आहे. कांदेनवमी अनेक ठिकाणी साजरी केली जाते; असे भाग्य अन्य कुठल्या भाजीला लाभलेले नाही! कांद्याची भजी लोकप्रिय आहेत. त्याची भाजीही अनेक प्रकारे केली जाते; तो नुसताही चवीने खाल्ला जातो. विशेष म्हणजे अन्य पदार्थांची चवही तो वाढवतो. त्यामुळे देशभर सगळीकडेच रोजच्या जेवणात कांद्याचा समावेश केला जातो. पण कांद्याचे सर्वाधिक उत्पन्न मात्र महाराष्ट्रातच होते. त्यातही पुन्हा पुणे व नाशिक जिल्ह्यांत तो जास्त पिकतो. इथून मग तो देशभर पाठवला जातो.

कांदा हे बहात्तर रोगांवर औषध आहे असे म्हटले जाते. पण तो पिकवणाऱ्या शेतकऱ्यापुढे 'आता पुढे काय होणार?' हा त्याला रडवणारा प्रश्न कायम 'आ' वासून असतो. का, ते १९७७ साली शरद जोशींनी शेतीला सुरुवात केल्यानंतर लगेचच त्यांच्या लक्षात आले.

अल्पकाळासाठी लावलेला बटाटा व काकडी सोडली, तर कांदा हेच त्यांचे मुख्य पीक होते. कांद्याचे पीक तयार व्हायला साधारण पाच महिने लागतात. त्या काळातला त्याचा उत्पादनखर्च एका क्विंटलला (१०० किलोंना) साधारण ४५ ते ६० रुपये असायचा, पण त्यांना बाजारपेठेत मिळणारा भाव हा कधीच तेवढा नसायचा; खूपदा तर तो अगदी १५ रुपये इतका कमी असायचा. मिळणाऱ्या भावातून शेतातला कांदा तोडणे व बाजारात विक्रीसाठी नेणे हेही शक्य होत नसे. एकदा तर ते इतके निराश झाले होते, की त्यांनी 'ज्याला कांदा हवा असेल त्याने माझ्या शेतातून तो फुकट न्यावा' अशी जाहिरातही पुण्यातील एका पेपरात दिली होती! लवकरच कांद्याबद्दलच्या अनेक अडचणी त्यांच्या पूर्ण लक्षात आल्या.

पहिली मोठी अडचण म्हणजे, कांदा हे नाशवंत पीक आहे. तो शेतावर दीर्घकाळ साठवून ठेवता येत नाही. पैशासाठी सदैव गांजलेल्या शेतकऱ्याला तेवढा धीर धरणेही शक्य नसते. कधी एकदा तो विकला जातो व पैसे हाती येतात असे त्याला होऊन जाते. त्यामुळे येईल त्या भावाला तो कांदा विकून टाकतो.

दुसरी मोठी अडचण वाहतुकीची असायची. ट्रकमध्ये तो पोत्यातून न भरता सुटा भरला जाई. कारण एका ट्रकलोडमध्ये समजा आठ टन कांदा जाणार असेल, तर एका पोत्यात ५० किलो ह्या हिशेबाने त्यासाठी १६० पोती लागतील व एका पोत्याला चार रुपये ह्या दराने तोच

खर्च ६४० रुपये येणार. तो परवडत नाही म्हणून शेतकरी कांदा सुटाच भरत. त्यात नासाडी बरीच होई. डिझेलच्या भरमसाट दरवाढीमुळे एका ट्रकचे भाडे निदान हजार रुपये होते. (सर्व आकडे १९७८ सालातील.) तोही खर्च न परवडणारा. कसाबसा तो कांदा शेतातून चाकणच्या कृषी उत्पन्न बाजार समितीत नेला जाई व रस्त्याच्या कडेलाच त्याचे ढीग लावले जात. बाजार समितीचा माणूस किंवा व्यापाऱ्याचा माणूस तिथे येऊन मालाचा दर्जा तपासणार व भाव ठरवणार. हेदेखील लवकर होणे गरजेचे असे. कारण चाकण भागातला कांदा साधारण फेब्रुवारी, मार्च व एप्रिल ह्या तीन महिन्यांत विक्रीला येतो व नेमक्या ह्याच काळात तिथे वळवाचा पाऊस पडतो. दुपारी उन्ह खूप तापले आणि संध्याकाळी पाऊस पडला, असे खूपदा घडते. बाजार समितीत कांदा नेऊन टाकला, की तो खपायला जितका वेळ लागेल तितका वेळ शेतकरी सारखा वर उन्हाकडे बघतो आणि ढगांकडे बघतो. कारण दुपारी कांदा उन्हात तापला आणि संध्याकाळी त्यावर वळवाचा पाऊस पडला, तर सगळ्याच कांद्याचा चिखल व्हायची भीती असते.

तिसरी मोठी अडचण भावाच्या अनिश्चिततेची. बाजारातील कांद्याच्या भावात प्रचंड चढउतार व्हायचे. ह्यात निरक्षर शेतकऱ्याचे हमखास नुकसान व्हायचे व दलालाचा फायदा. 'शेतकरी संघटक'च्या १३ जुलै १९८४च्या अंकात प्रकाशित झालेले भगवान अहिरे नावाच्या एका बागलाणच्या शेतकऱ्याचे पत्र ह्याचे उत्तम निदर्शक आहे. ते लिहितात,

> उन्हाळी कांदे विकण्यासाठी मी ते मनमाड मार्केटवर घेऊन गेलो. माझा एक ट्रक व दोन ट्रॅक्टर भरतील एवढाच माल होता. भाव मिळाला, क्विंटलला ४४ रुपये. माल लवकर विकला गेला व मी मोकळा झालो ह्याचा मला आनंद झाला. त्यावेळी उत्पादनखर्च काढणे वगैरे काहीच माहिती नव्हते. पैसे घेऊन जाण्यासाठी दलालाने आठ दिवसांनी बोलावले. त्याप्रमाणे मी आठ दिवसांनी मनमाडला गेलो. त्यावेळी ८५ ते ९० रुपये भाव चालू होता. म्हणजे आठ दिवसांत तो दुप्पट झाला होता! मी अगदी नाराज झालो. वाटले, काय पाप केले होते मी! आठ दिवस थांबलो असतो तर! मला माझे शेतातले कष्ट आठवू लागले. दिवसभर उन्हात उभे राहून पाणी भरणे, ऑइल इंजिनच्या धुराड्यामुळे कपडे, शरीर काळे-पिवळे होणे. माझे कांदे तसेच त्याच्याकडे पडून होते. म्हणजे भाववाढीचा सगळा फायदा त्यालाच मिळणार होता. ४४ रुपयांनी माझ्याकडून घेतलेले तेच कांदे, फक्त आठ दिवसांत, दुप्पट पैसे घेऊन तो विकणार होता. जणू मी त्याच्यासाठीच सगळे कष्ट घेतले होते!

चौथी मोठी अडचण केंद्र सरकारच्या निर्यात धोरणाची होती. परदेशात, विशेषतः आखाती देशांत, भारतीय कांद्याला प्रचंड मागणी आहे. त्यामुळे जेव्हा निर्यात खुली केली जाते, तेव्हा कांद्याचे भाव एकदम चढतात. त्यात शेतकऱ्याला अधिक भाव मिळू शकतो; पण तसे झाले तर स्थानिक बाजारपेठेतील ग्राहकाला जास्त पैसे मोजावे लागतात. त्याबरोबर तो शहरी ग्राहक खवळून उठतो. विरोधी पक्षांची सर्वांत जास्त आंदोलने शेतीमालाच्या

भाववाढीच्या मुद्द्यावरून होतात. टूथपेस्टपासून मोटारीपर्यंत आणि शर्टापासून पेट्रोलपर्यंत बाकी सगळ्या गोष्टी महाग झाल्या तरी कुरकुर न करणाऱ्या शहरी लोकांना शेतीमालाची भाववाढ मात्र अजिबात सहन होत नाही, लगेच त्याविरुद्ध काहूर उठवले जाते. त्यामुळे शेतीमालाची भाववाढ होऊ नये यासाठी सरकार नेहमीच दक्ष असते. म्हणूनच कांदा हे राजकीयदृष्ट्या तसे खूप संवेदनशील पीक आहे. शहरातून आरडाओरड सुरू झाली, पेपरांतून टीका सुरू झाली, की सरकार घाईघाईने निर्यातबंदी करते. त्यामुळे मग भाव एकदम कोसळतात. शेतकऱ्याला उत्पादनखर्च भरून निघेल एवढाही भाव मिळत नाही. तसे पाहिले तर शहरी ग्राहकांची संख्या शेतकऱ्यांपेक्षा कमी असते, पण त्यांचे उपद्रवमूल्य खूप असते. ते सुशिक्षित असल्याने आपला विरोध लगेचच व्यक्त करतात. राज्यकर्ते व नोकरशहा, पत्रकार व विचारवंत वगैरे मंडळीही बहुतांशी शहरातच राहत असतात. त्यांच्यापर्यंत ग्राहकाचा असंतोष तत्काळ पोचतो. दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीच्या बाबतीत तर हे अधिकच खरे आहे. दिल्लीतल्या बारीकशा घडामोडीचीही दखल शासनाला प्राधान्याने घ्यावी लागते कारण त्या घटनेचे पडसाद देशभर उमटत असतात.

याउलट शेतकरी सगळा ग्रामीण भागात असतो. सरकारी धोरणामुळे त्याला प्रचंड त्रास झाला तरी जे होईल ते सहन करायची त्याची एक सवयच असते; गैरसोयी त्याच्या अंगवळणीच पडलेल्या असतात. त्यातून त्याने कधी असंतोष व्यक्त केला तरी त्याचा आवाज इतका क्षीण असतो, की राजधानीपर्यंत तो पोचतच नाही! कांद्याच्या बाबतीत जोशींना हे वरचेवर जाणवायचे.

ह्याबाबतचा एक विदारक आणि हृदयाला हात घालणारा पुढील अनुभव आपल्या भाषणात जोशी सुरुवातीच्या दिवसांत खूपदा सांगत असत.

> १९७८ साली पावसाळ्यात दिल्लीच्या भाजी मंडीत प्रथमच कांद्याचा भाव सव्वा रुपया किलो झाला. कांद्यावर लगेचच निर्यातबंदी घालण्यात आली. ताबडतोब चाकणच्या बाजारात कांद्याचा भाव क्विंटलला १७ रुपयापर्यंत घसरला. त्यावेळी चाकणच्या बाजारात घडलेलं एक उदाहरण सांगतो.
>
> एका शेतकऱ्याकडे चार गाड्या कांदा निघाला होता. आदल्या वर्षी त्याचं कांद्याचं पीक धुईमुळे संपूर्ण बुडालं होतं. पीक बुडाल्यामुळे त्याला बायकोला लुगडं घेता आलं नव्हतं. तो कांद्याच्या गाड्या घेऊन बाजाराला निघाला, तेव्हा बायकोनं सांगितलं, 'माझ्या लुगड्याच्या पार दशा झाल्या आहेत. तर येताना फार खर्चाचं नको, पण एक धडसं लुगडं आणा. आणि पोराची चड्डी फाटली आहे; त्याला मास्तर वर्गात बसू देत नाही, म्हणून घरी पळून येतो. त्याला एक चड्डी आणा.'
>
> शेतकऱ्याने चार बैलगाड्या भरून कांदा बाजारात नेला. पण १७ पैसे किलोने कांदा विकून झाल्यावर व मग कर्ज, हमाली, दलाली वगैरे देऊन झाल्यावर त्याच्या असं

> लक्षात आलं, की यंदाही काही बायकोला लुगडं घेता यायचं नाही. आणि पोराला चड्डी घेता यायची नाही. तो तसाच घरी गेला. त्याचा चेहरा पाहिल्यावर बायकोच्या लक्षात सगळी परिस्थिती आली. तीच त्याला म्हणाली, 'जाऊन द्या, काही वाईट वाटून घेऊ नका. काढीन एवढ्याच लुगड्यावर आणखी एक वर्ष.'
>
> दिल्लीत जी माणसं सात रुपयाचं सिनेमा तिकीट वेळ आल्यास पंचवीस रुपयांनादेखील खरेदी करतात, ती माणसं त्यांच्या जेवण्यातला कांदा सव्वा रुपये झाला, की लगेच आरडाओरडा करतात. आणि त्यांना ती भाववाढ टोचू नये, म्हणून शेतकऱ्याच्या घरी काय परिस्थिती असेल याचा जराही विचार न करता सरकार निर्यातबंदी घालतं.
>
> (*शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती,* पृष्ठ ५०-१, पहिली आवृत्ती, नोव्हेंबर १९८२)

कांद्याचे पीक शेतकऱ्याच्या हाती आले, की निर्यातीवर बंदी घालायची, जेणेकरून शेतकऱ्याला मिळणारा भाव कमीत कमी असेल व व्यापाऱ्यांना तो अगदी स्वस्तात खरेदी करता येईल आणि व्यापाऱ्यांची खरेदी संपली, कांदा त्यांच्या गोदामात गेला, की निर्यातबंदी उठवायची; जेणेकरून तोच कमी भावात घेतलेला कांदा आता व्यापाऱ्यांना वाढीव भावात विकता येईल. १९७८, १९७९, १९८० ह्या तिन्ही वर्षांत हे घडले.

बऱ्याच वर्षांनंतर, म्हणजे सुमारे २०१४ साली, एका मुलाखतीत जोशींनी ह्या संदर्भात म्हटले होते,

''कांद्याचा भाव जेव्हा पुण्यात डेक्कन जिमखान्यावर एक रुपया किलो होता, तेव्हा तिथे सिनेमाचे तिकीट एक रुपया होते. आज सिनेमाचे तिकीट किमान शंभर रुपये झाले आहे व तरीही लोक ते तिकीट बिनदिक्कत खरेदी करतातच. मग कांद्याचा भाव १०० रुपये किलो झाला, तर एवढा आरडाओरडा करायचे काय कारण आहे?''

ह्या सततच्या समस्येचा दोन वर्षे अभ्यास केल्यावर व अनेक कटू अनुभव पदरी जमा झाल्यावर जोशींनी कांद्याला उत्पादनखर्चावर आधारित क्विंटलला किमान ४५ ते ६० रुपये भाव मिळालाच पाहिजे असे सर्व शेतकऱ्यांना सांगायला सुरुवात केली. जवळ जवळ रोजच ते चाकणच्या बाजारपेठेत जात. जमेल तेवढ्या शेतकऱ्यांशी संपर्क साधत. त्यांना मानणारे काही व्यावसायिक संबंधित होते, ज्यांच्याबद्दल मागील प्रकरणात लिहिलेच आहे. शेतकऱ्यांशी संपर्क साधण्यात त्या मंडळींचा उपयोग व्हायचाच. पण त्याशिवाय केवळ कांदा आंदोलनामुळे जोडले गेलेले असेही त्यांचे दोन स्थानिक सहकारी होते. एकेकाळी चाकणचे सरपंच राहिलेले व दुकानदारीसह अनेक व्यवसाय केलेले शंकरराव वाघ आणि कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध असलेले व गावात छापखाना चालवणारे बाबूलाल परदेशी.

वाघ, परदेशी आणि जोशी अशा या त्रिकुटाने भामनेर खोऱ्यात असंख्य वेळा एकत्र

प्रवास केला. आधी एखादा सहकारी बॅटरीवर चालणाऱ्या लाउडस्पीकरवर निवेदन करायचा, 'जगप्रसिद्ध शेतकरीनेते श्री. शरद जोशी आज आपल्या गावात आले आहेत व शेतीप्रश्नावर बोलणार आहेत. तरी सर्व गावकऱ्यांनी त्यांच्या भाषणाचा फायदा घ्यावा' अशा स्वरूपाचे ते निवेदन असे. गावभर फिरून ते पुन्हा पुन्हा ऐकवले जाई. हळूहळू गर्दी जमू लागे. आधी बाकीचे बोलत व पुरेशी गर्दी जमली, की जोशी बोलायला उभे राहत. हा प्रकार त्यांनी सातत्याने वर्षभर शे-दीडशे ठिकाणी तरी केला. त्यावेळी कांद्याचा भाव पार कोसळला होता; अगदी क्विंटलला २०-२५ रुपयांपर्यंत.

आता आपले काही खरे नाही याची जाणीव सर्वच कांदा शेतकऱ्यांना झाली. चाकण बाजारसमितीसमोर जोशींनी शेतकऱ्यांचा एक मेळावा घेतला व एकूण परिस्थिती सगळ्यांना समजावून सांगितली. कांद्याला क्विंटलमागे ४५ ते ६० रुपये भाव मिळालाच पाहिजे हे जोशींचे म्हणणे सगळ्यांनाच पटले व ती मागणी समोर ठेवून त्यांनी चाकणच्या बाजारपेठेत त्वेषाने घोषणा द्यायला सुरुवात केली. हे पहिले कांदा आंदोलन. शनिवार २५ मार्च १९७८ची ही घटना.

हे भाव त्यावेळी इतके पडले होते, याचे कारण म्हणजे केंद्र सरकारचे धोरण. मोहन धारिया त्यावेळी केंद्रात व्यापारमंत्री होते. कांद्याच्या भाववाढीमुळे असंतोष पसरतो आहे हे लक्षात घेऊन १९७७ साली कामाची सूत्रे हाती घेतल्याघेतल्याच त्यांनी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली व त्यामुळे एकाएकी कांद्याचे भाव कोसळले. शेतकऱ्यांची दैना उडाली. उत्पादनखर्च तर सोडाच, कांदा शेतातून काढणे व बाजारात आणणे यातला मजुरीचा व वाहतुकीचा खर्चही भरून निघेना. 'या भावात कुठल्याही परिस्थितीत कांदा विकायचा नाही' असे आवाहन जोशींनी केले. चिडलेल्या शेतकऱ्यांचा प्रतिसाद उत्स्फूर्त होता. आपला कांदा त्यांनी बाजारात आणलाच नाही. बाजारपेठ ओस पडली. 'सरकारने ४५ ते ६० रुपये क्विंटल हा वाढीव भाव बांधून दिला नाही, तर एक एप्रिलपासून शेतकरी रास्ता रोको करतील' असा इशारा लागोपाठ तीन दिवस भरलेल्या शेतकरी मेळाव्यांत तीन वेळा जोशींनी दिला.

चाकणला काहीतरी गडबड होणार आहे, ह्याची साधारण पूर्वकल्पना स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांनी कलेक्टरना दिली होती. चर्चेसाठी २९ मार्च रोजी दुपारी कलेक्टरनी एक तातडीची बैठक बोलावली. आपल्या काही साथीदारांसह जोशी पुण्याला कलेक्टरच्या कार्यालयात गेले. चाकणमधले वेगवेगळे राजकीय पक्षांचे पुढारी व बाजारसमितीचे पदाधिकारी पूर्वीच कार्यालयात येऊन पोचले होते. सगळ्या खुर्च्या त्यांनीच अडवल्या होत्या. जोशींना बसायलाच कुठली खुर्ची रिकामी नव्हती. सगळ्यांचे म्हणणे मांडून झाल्यावर शंकरराव वाघ यांनी 'जोशीसाहेबांनी आता बोलावे' अशी जाहीर घोषणा केली. तोपर्यंत जोशी नुसतेच एका कोपऱ्यात उभे राहून सगळे ऐकत होते.

सगळ्या माना चपापून त्यांच्या दिशने वळल्या. कलेक्टरही काहीसे गडबडल्यासारखे झाले. जोशींच्या पार्श्वभूमीची त्यांना थोडीफार कल्पना होती. जरासे उठल्यासारखे करत जोशींसाठी व त्यांच्या दोन सहकाऱ्यांसाठी त्यांनी खुर्च्या मागवल्या. जोशींनी मग पुढे

सर्वांसमोर येऊन उभ्याने बोलायला सुरुवात केली. इतका वेळ ज्यांनी त्यांना अनुल्लेखाने मारले होते ते इतर नेतेही आता कान टवकारून त्यांचे म्हणणे ऐकू लागले. कलेक्टर स्वतःच जोशींना इतके महत्त्व देतो आहे म्हटल्यावर त्यांचाही नाइलाज होता!

''माल जेव्हा शेतकऱ्याच्या हाती येतो व मालाला मागणी असल्याने शेतकऱ्याला चार पैसे अधिक मिळायची शक्यता असते, तेव्हाच निर्यातबंदी करून भाव पाडायचे, आणि माल व्यापाऱ्याकडे गेला, की मात्र निर्यात खुली करून टाकायची, हे सरकारी धोरण शेतकऱ्याच्या जिवावर उठलं आहे. ते बदललंच पाहिजे,'' हे जोशींचे मुख्य प्रतिपादन होते. ते त्यांनी अनेक उदाहरणे देऊन उत्तम प्रकारे सिद्ध केले. शेवटी ते म्हणाले, ''दुष्काळ पडला, की जे सरकार स्वत:च ठरवलेल्या अत्यल्प भावात शेतकऱ्याकडचा शेतीमाल लेव्हीच्या स्वरूपात जबरदस्तीने काढून घेतं, ते सरकार अशा अडचणीच्या वेळी शेतकऱ्याच्या मदतीला का येत नाही? फायदा बाजूला राहू द्या, पण त्याचा उत्पादनखर्च तरी भरून निघेल एवढा भाव सरकार त्याला का मिळवून देत नाही? शेतकऱ्याने जगावं असं सरकारला वाटत नाही का?''

काही क्षण कार्यालयात सगळे स्तब्ध होते. आपली भूमिका सरकारपुढे जाहीररीत्या मांडणारे जोशींचे हे आयुष्यातील पहिले प्रतिपादन. स्वतः कलेक्टरनी त्यांचे जवळ जवळ दहा मिनिटांचे भाषण लक्षपूर्वक ऐकले. मग स्वतःच पुढाकार घेऊन कांद्यासाठी वाढीव दराची शिफारस करायचे त्यांनी कबूल केले व त्याच दिवशी तसे प्रत्यक्षात केलेही. शेवटी सरकारने नाफेड (National Agricultural Cooperative Marketing Federation of India) या शासकीय संस्थेला ४५ ते ५० रुपये क्विंटल या भावाने कांदा खरेदी करायचा तातडीचा आदेश दिला. त्यानंतरच बाजारपेठेत नाफेडकडे आपला कांदा द्यायला शेतकऱ्यांनी सुरुवात केली. अशा प्रकारे 'रास्ता रोको'च्या नुसत्या इशाऱ्याने व जोशी यांनी आपली बाजू कलेक्टरकडे प्रभावीपणे मांडल्याने काम झाले; प्रत्यक्ष संघर्ष असा या वेळी करावा लागला नाही.

ह्या प्रसंगानंतर राजकीय नेते जोशींना अगदी पाण्यात पाहू लागले. आजवर ह्या आंदोलनापासून ते कटाक्षाने दूर राहिले होते. किंबहुना जोशींची त्यांनी कुचेष्टाच केली होती. कदाचित असले शेतकऱ्यांचे आंदोलन कधीच यशस्वी होणार नाही अशी त्यांची अटकळ होती. शिवाय, ज्यात आपले नेतृत्व नाही, ज्याचे श्रेय आपल्याला मिळणार नाही, अशा आंदोलनात सहभागी होण्यात कुठल्याच राजकारण्याला स्वारस्य नव्हते. त्यांनी आजवर फक्त मतांसाठी व गर्दी जमवण्यासाठी शेतकऱ्यांचा वापर केला होता. जोशींचा विजय हा त्यांना स्वतःचा पराजय वाटला.

राजकारण्यांप्रमाणेच व्यापाऱ्यांनाही मिळालेला हा मोठाच धक्का होता. त्यापूर्वी कधीच नाफेडने कांदाखरेदी केली नव्हती; कांद्याचा सर्व व्यापार खासगी व्यापाऱ्यांच्याच हातात होता.

शेतकऱ्यांचे हे यश खूप मोठे होते. आपल्या ताकदीचा त्यांना आलेला हा पहिला प्रत्यय होता. या आंदोलनाचा एक परिणाम म्हणून २५ एप्रिल १९७८ रोजी केंद्र सरकारने निर्यातबंदी रद्द केली. चाकणसारख्या छोट्या गावातील आंदोलनाची थेट दिल्लीने दखल घेतली होती.

एक दुर्दैव म्हणजे, महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी मात्र ह्या शेतकरीविजयाला काहीच महत्त्व दिले नाही. बहुतेक ठिकाणी ही बातमीसुद्धा छापून आली नाही.

प्रत्यक्ष आंदोलन संपल्यावरही आणि नाफेडमार्फत वाढीव दराने कांदा खरेदी करायचे नक्की झाल्यावरही, नेमक्या त्याच दराने खरेदी होते आहे, का त्यापेक्षा कमी दर शेतकऱ्याला दिला जात आहे, हे तपासण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीत रोज हजर असणे आवश्यक होते.

इथे शहरी वाचकाच्या दृष्टीने कृषी उत्पन्न बाजार समिती ह्या व्यवस्थेबद्दल थोडे लिहायला हवे. बाजारपेठ हा शब्द तसा खूप व्यापक आहे; त्यातील शेतकऱ्याशी सर्वाधिक संबंध येणारा विशिष्ट भाग म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समिती. शेती हा जगातला सगळ्यांत पहिला व्यवसाय असल्याने शेतीचा व्यापार हाही अगदी पहिल्यापासून सुरू झालेला व्यवहार आहे. शतकानुशतके हा व्यापार खासगी क्षेत्रातच चालू होता. हे व्यापारी अनेक प्रकारे अशिक्षित व गरीब शेतकऱ्यांना फसवत असत. त्या फसवणुकीला आळा बसावा म्हणून पुढे शासनाने कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन केल्या. अशा समित्या देशभर सगळ्याच राज्यांत आहेत. महाराष्ट्रात सुमारे ३०० आहेत. जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती, वेगवेगळ्या सहकारी संस्था वगैरेंप्रमाणे या बाजार सामित्यांचेही नियंत्रण लोकनियुक्त सदस्य करतात. प्रत्यक्षात मात्र अन्य ठिकाणी होते तेच इथेही होते. सर्व समाजाच्या नावाखाली प्रत्यक्षात काही मूठभर मंडळीच सगळी सूत्रे आपल्या हाती ठेवतात. सरकारी कायद्यानुसार शेतीमालाचा सर्व व्यापार ह्या समित्यांमध्येच होऊ शकतो; आपला माल इतर कुठेही वा कोणालाही विकायचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला नसते. पुन्हा कुठलाही व्यापारी बाजार समित्यांमध्ये येऊन खरेदी-विक्री करू शकत नाही; त्यासाठी बाजार समितीकडून विशिष्ट परवाना घ्यावा लागतो व परवानाधारक व्यापाऱ्यांनाच इथे प्रवेश करता येतो. म्हणजे शेतकऱ्यांच्या नाड्या या समितीच्या हातात असतात तसेच व्यापाऱ्यांच्या नाड्याही. साहजिकच या समित्यांच्या हाती प्रचंड सत्ता एकवटलेली असते. उद्योगक्षेत्रावरील सरकारी बंधनांची सर्वसामान्य नागरिकालाही बऱ्यापैकी माहिती असते, त्यांतून तयार झालेल्या लायसन्स-परमिट राजवर भरपूर चर्चाही होत असते; पण त्याहूनही कितीतरी अधिक जाचक बंधने शेतीक्षेत्रावर आहेत व यांची काहीच चर्चा शहरी वर्गात होत नाही.

चांगल्या उद्देशाने सुरू झालेल्या असंख्य सरकारी योजनांप्रमाणे या बाजार समित्यांनाही काळाच्या ओघात शोषणकर्त्यांचे विकृत स्वरूप प्राप्त झाले. आजारापेक्षा औषध अधिक घातक ठरले. सर्व शेतीमालाच्या व्यापारात त्यांची एकाधिकारशाही (मोनोपॉली) असल्याने, कोणाचीच स्पर्धा नसल्याने, आपण काहीही केले तरी शेतकऱ्याला आपल्याकडे येण्याशिवाय काही पर्यायच नाही हे त्यांना ठाऊक होते. इथे होणाऱ्या प्रत्येक खरेदी-विक्रीवर बाजार समिती स्वतःचा कर लावते व त्यातून येणाऱ्या उत्पन्नातून त्यांनी माल ठेवायला मोकळी जागा, तो साठवायला गुदामे, शीतगृहे, पुरेसे वाहनतळ, अचूक वजनकाटे, बसायची-जेवायची सोय,

स्वच्छतागृहे, प्रत्यक्ष व्यापारासाठी प्रशस्त जागा, मालाच्या कुठल्या ढिगासाठी कुठल्या व्यापाऱ्याने किती रुपयांची बोली लावली आहे याची नेमकी नोंद ठेवणारी यंत्रणा, संगणक वगैरे सुविधा, विकल्या गेलेल्या मालाचा त्वरित हिशेब होऊन शेतकऱ्याच्या हाती त्याचे पैसे द्यायची व्यवस्था वगैरे सोयी शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्याव्यात अशी मुळात योजना होती.

प्रत्यक्षात यातले फारसे काही झाले नाही. फक्त सरकारी जमिनीवर, सरकारी पैशाने मोठी मोठी मार्केट यार्ड्स उभी राहिली, तिथे समिती सदस्यांची सुसज्ज कार्यालये तयार झाली आणि शेतकऱ्याचे हित सांभाळले जाण्याऐवजी त्याचे अधिकाधिक शोषण करणारी एक साखळीच तयार झाली. आर्थिक गैरव्यवहार प्रचंड प्रमाणावर होऊ लागला. सगळा मनमानीचा कारभार. समितीसदस्यांशी संगनमत करून व्यापारी आपला स्वार्थ साधू लागले. आलेल्या शेतीमालाचे वजन करणारे मापारी, तो माल इकडून तिकडे हलवणारे हमाल, मालाची गुणवत्ता ठरवणारे निरीक्षक, पैशाचा हिशेब ठेवणारे कर्मचारी हे सगळेच शेतकऱ्याला नाडू लागले. एकाधिकारशाहीमुळे लाचार बनलेल्या शेतकऱ्यापुढे त्यांची मर्जी राखल्याशिवाय दुसरा काही मार्गच नव्हता.

ह्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणावी म्हणून बऱ्याच नंतर, म्हणजे २००४ साली, राज्य सरकारने एक तज्ज्ञांची समिती नेमून विस्तृत अहवाल तयार करवला. पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी कधी झालीच नाही. कारण बाजार समिती सदस्यांच्या हितसंबंधांना आळा घालणे व त्यातून त्यांना दुखावणे हे कोणालाच परवडणारे नव्हते. शेवटी सत्तेवरील राजकीय पक्षाला निवडणुका जिंकणे आवश्यक होते व या निवडणुकांवर स्थानिक बाजार समिती सदस्यांची पकड असायची; बहुतेकदा ते सगळे सत्ताधारी पक्षाचेच असत. एकगठ्ठा मते त्यांच्या हाती असत. अगदी कालपरवापर्यंत कुठलेच सरकार त्यामुळे या बाजार समित्यांना धक्का लावू शकले नव्हते. अगदी अलीकडे, म्हणजे २०१६ साली, प्रथमच राज्य सरकारने ह्या बाजार समित्यांची एकाधिकारशाही बंद केली. म्हणजे या समित्या बरखास्त केल्या गेल्या नाहीत, पण इथेच मालाची खरेदी-विक्री झाली पाहिजे ही अट काढून टाकून खासगी क्षेत्रासाठीही आता हा व्यापार खुला करण्यात आला आहे. याचा काय परिणाम होतो ते कळायला अजून काही कालावधी जावा लागेल. असो.

जोशी व त्यांचे सहकारी रोज सकाळी या बाजार समितीत येत असत. नाफेडच्या खरेदीबरोबरच सर्व बाजारात फिरून एकूण व्यवहारावर लक्ष ठेवत. नाफेडची खरेदी होत असली तरी त्यावेळी इतर व्यापारीदेखील आपापली खरेदी चालूच ठेवत. त्यांचेही अनेक शेतकऱ्यांशी जुने संबंध असत, ते नाते टिकवून ठेवणे शेतकऱ्यांच्यादेखील फायद्याचे असे. कारण हेच व्यापारी वेळप्रसंगी शेतकऱ्याला कर्जदेखील देत असत. प्रत्येक शेतकऱ्याला अशा कर्जाचीदेखील कायम गरज असे. अशा व्यापाऱ्यांकडूनदेखील खरेदी नियत दरातच होणे आवश्यक होते. शिवाय, मालाचा दर्जा नीट तपासला जातो आहे की नाही ह्याकडेही लक्ष ठेवावे लागे. इतर कुठल्याही मालाप्रमाणे कांद्याच्या बाबतीतही गुणवत्तेनुसार दर कमी-जास्त

होत असत. कांद्याचे पुरुष-पुरुष उंचीचे ढीग यार्डाच्या बाहेरही रस्त्याकडेला रचलेले असत. त्यांच्यामधून वाट काढत पुढे जावे लागे. एखाद्या वेळी भाव घसरले आणि लिलावात कोणी अधिकची बोली लावायलाच तयार होत नसेल, तर अशावेळी मग एखादा शेतकरी स्वतःच जोशींकडे येई. त्यांची मदत घेई. यातूनच मग एखाद्या कायमस्वरूपी संघटनेची गरज सर्वांना पटू लागली.

या गरजेपोटीच मग १९७९ सालच्या क्रांतिदिनी, म्हणजे ८ ऑगस्ट रोजी, शेतकरी संघटना स्थापन करण्यात आली. चाकण बाजारपेठेसमोरच एक तकलादू ऑफिस थाटले गेले. बाबूलाल यांच्या छापखान्यातच. जागा अगदी छोटी असली तरी मोक्याच्या जागी होती. दोन टेबले, चार खुर्च्या आणि दोन बाकडी मावत होती. दारावरच 'शेतकरी संघटना' अशी पाटी लावली होती. त्या नावाने लेटरहेड छापून घेतली.

बाजारपेठेचे गाव परिसरातील शेतकऱ्याच्या दृष्टीने फार महत्वाचे असते. बहुतेक ठिकाणी 'आठवडी बाजार' भरतो व कुठलाही शेतकरी त्याला येतोच येतो. त्याचवेळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डात जाऊन शेतीमालाचे प्रत्यक्षात काय भाव सुरू आहेत हे बघतो. त्याला स्वतःच्या कुटुंबासाठीदेखील अनेक गोष्टींची खरेदी करायची असते. आज इंटरनेट व संगणक आल्यामुळे ही परिस्थिती निदान काही प्रगत शेतकऱ्यांसाठी तरी पालटली आहे; जगभरातले बाजारभाव शेतकरी आपल्या घरी बसल्याबसल्या शोधू शकतो; पण १९७९ सालची परिस्थिती फार वेगळी होती.

संघटना उभारण्याच्या दृष्टीने शेतकऱ्याशी संपर्क साधायचा असेल तर बाजाराच्या गावी त्याला गाठणे हा एकमेव मार्ग होता. बाजाराच्या दिवशी तिथे येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याने आपले काम संपल्यावर थोडा वेळ तरी संघटनेच्या ऑफिसात डोकवावे, आपल्या गाऱ्हाण्यांची चर्चा करावी ही अपेक्षा असायची. फक्त शेतीविषयक चर्चा नाही, तर एकूणच विकासविषयक चर्चा करण्यासाठी. अशा चर्चेतून शेतकऱ्यांशी जवळीक साधणे, आपल्यापुढील समस्यांची त्यांना जाणीव करून देणे, त्या सोडवण्यासाठी त्यांना एकत्र आणणे हा संघटनेमागचा मुख्य उद्देश.

स्वतः शरद जोशी रोज ऑफिसात येऊन बसत. आपल्या स्वतःच्या शेतीकडे आता ते कमी कमी लक्ष देऊ लागले होते. शेती करणे हा जोशींच्या दृष्टीने एक प्रयोग होता व तो करताना त्यांच्यासमोर काही सुस्पष्ट उद्दिष्टे होती. दोन तृतीयांश भारतीय शेती करतात व साहजिकच भारताच्या दारिद्र्याचे मूळ शेतीत आहे हे त्यांना पटले होते; पण ती शेती किफायतशीर का होत नाही हे त्यांना शोधून काढायचे होते. ती किफायतशीर न व्हायची काही कारणे अनेकांनी वेळोवेळी मांडली होती. उदाहरणार्थ, शेतीचे क्षेत्र कमी असणे. भांडवलाची कमतरता. पुरेसे पाणी उपलब्ध नसणे. चांगल्या अवजारांचा अभाव. खते, औषधे व प्रगत बियाणे यांचा पुरेसा वापर न करणे. आणि मुख्य म्हणजे शेतकरी अशिक्षित असल्याने आधुनिक व्यवस्थापनतंत्रांचा व तंत्रज्ञानाचा त्याला फायदा न मिळणे. स्वतःच्या शेतीत त्यांनी ह्यातील प्रत्येक अडचणीला उत्तर उपलब्ध करून दिले होते. त्यांचे शेतीचे क्षेत्र पुरेसे होते,

भांडवल भरपूर गुंतवले होते, विहिरींचे पाणी होते, अवजारे-खते-बियाणे इत्यादी सर्व आधुनिक गोष्टींचा वापर त्यांनी केला होता.

पण हे सगळे करूनही त्यांची शेती किफायतशीर नव्हती. ह्याचे मुख्य कारण म्हणजे आपण जे-जे काही पिकवतो त्याला बाजारात मिळणारा भाव इतका कमालीचा अपुरा आहे, की त्यातून ही शेती किफायतशीर होणे कधीच शक्य नाही, आणि परिस्थिती अशी आहे हा केवळ एखादा अपघात नसून, देशाने स्वीकारलेल्या अत्यंत चुकीच्या व शेतीला मारक अशा तथाकथित सोव्हिएत धर्तीच्या समाजवादी धोरणाचा तो परिणाम आहे; त्या विकृत व्यवस्थेत देशातील अभिजनवर्गाचे हित गुंतलेले आहे व म्हणूनच ते धोरण चालू राहिले आहे, ह्या निष्कर्षाप्रत आता जोशी आले होते. खंडीभर भले थोरले ग्रंथ वाचून आणि असंख्य परिसंवादांत भाग घेऊन जे सत्य कधीच उमजले नसते, ते आता त्यांना अनुभवांतून नेमके उमजले होते. ही भ्रष्ट यंत्रणा बदलण्यासाठी लढा उभारायचा त्यांनी पक्का निर्धार केला होता. म्हणूनच जवळ जवळ सगळा वेळ संघटना उभारण्यासाठीच द्यायचा असे त्यांनी ठरवले होते.

परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांकडून कसलाच प्रतिसाद मिळेना. दिवसभर जोशी आणि त्यांचे काही निवडक सहकारी अगदी आतुरतेने इतर कोणी शेतकरी बांधव येतात का, याची वाट पाहत असत. पण फारसे कोणी येतच नसत. त्यातूनही कोणी आलेच तरी ते खूप घाईत असायचे, चाकणमधली आपली इतर कामे करता करता ते केवळ ‘शेतकरी संघटना हा प्रकार तरी काय आहे?’ एवढे बघण्यापुरतेच डोकावून जायचे; नंतर पुन्हा ते तोंड दाखवत नसत. संघटना बांधणे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे नसे. कधीकधी तासन्‌तास तिथे बसून वेळ अगदी फुकट गेला असे जोशींना वाटायचे. शेतकऱ्यांना एकत्र आणणे फारच अवघड आहे; त्यामानाने कामगारांची एकजूट उभारणे तुलनेने सोपे असते, असे कार्ल मार्क्स म्हणाला होता ते जोशींना अशा वेळी आठवू लागे.

शेवटी मग पर्वत महमदाकडे आला नाही, तर महमदाने पर्वताकडे जावे, ह्या न्यायाने, शेतकरी कार्यालयात यायची वाट न बघता पूर्वीप्रमाणेच पुन्हा एकदा आपणच स्वतः गावोगावी जायचे, त्यांना भेटायचे, आपल्यावरील अन्यायाची त्यांना जाणीव करून द्यायची, त्याच्या निवारणार्थ एकत्र येण्यातले फायदे त्यांना पटवायचे व संघटनेचा प्रसार करायचा असे त्यांनी ठरवले. त्या दृष्टीने सकाळी थोडा वेळ ऑफिस व नंतर दिवसभर भटकंती हा प्रकार सुरू झाला.

सुरुवातीपासून आंदोलनात असलेले चाकणजवळच्या म्हाळुंगे गावचे श्याम पवार म्हणतात,

‘‘संघटनाबांधणीच्या सुरुवातीच्या त्या काळात जोशी आपल्याजवळचे तीन-चार सहकारी घेऊन भामनेर खोऱ्यातील एखाद्या गावात जात. आमच्यासोबतच झाडाखाली बसून पिठलं, भाकरी, कांदा खात. कधी आम्हाला एखाद्या धाब्यावर घेऊन जात. बिल तेच देत. कधी जीपने येत, पण कधी रस्ता नसला तर बरेच अंतर पायीदेखील जावे लागे. त्यासाठी स्थानिक जत्रा, यात्रा किंवा बाजाराचा दिवस ते पकडत. बरोबरचे सहकारी पारावर किंवा

देवळाशेजारी गाणी वा पोवाडे म्हणू लागत. थोडेफार लोक जमले, की जोशी बोलायला सुरुवात करत. शेतकऱ्यांच्या समस्या कुठल्या आहेत, त्यावर काय इलाज करता येईल वगैरे विचार मांडत. एक अनाकलनीय ऊर्जा जणू या कामासाठी त्यांना प्रवृत्त करत असावी. शेतीमालाचा उत्पादनखर्च कसा काढायचा, ह्या पहिल्या धड्यापासून सुरुवात करून आंतरराष्ट्रीय घडामोडींचा शेतकऱ्यावर काय परिणाम राहील इथपर्यंत अनेक मूलभूत मुद्दे ते मांडत. अगदी सोप्या भाषेत बोलत.''

पण अशा फिरण्यालाही अंत होता. अख्खा जन्म जरी असे फिरण्यात घालवला तरी हजारभर शेतकऱ्यांच्या पलीकडे आपण पोचू शकणार नाही हे उघड होते. काय करावे याचा विचार करत असतानाच संघटनेचे एक साप्ताहिक काढावे ही कल्पना पुढे आली. त्याचबरोबर साप्ताहिकाचे नाव काय ठेवायचे, ते रजिस्टर कुठून करून घ्यायचे, साप्ताहिकासाठी कुठून कुठून परवाने घ्यावे लागतात, टपालखात्याची परवानगी कशी मिळवायची, प्रत्यक्ष छपाई कोण करणार, कागद कुठून मिळवायचा, एकूण खर्च किती येतो वगैरे अनेक प्रश्न उभे राहिले. ही साधारण ऑक्टोबर १९७९मधली गोष्ट आहे.

अशा वेळी बाबूलाल परदेशी मोठ्या धडाडीने पुढे झाले. ते वारकरी पंथाचे होते व कीर्तनेही करायचे. ते म्हणाले,

''मला स्वतःला भक्तिमार्गाचा प्रचार करण्यासाठी एक साप्ताहिक काढायचं आहे व त्यासाठी मी *वारकरी* हे नाव दिल्लीहून मंजूर करून घेतलं आहे. तुम्ही म्हणालात तर तेच आपण संघटनेचं मुखपत्र म्हणून सुरू करू शकतो. माझा स्वतःचा छापखाना आहे. मनात आणलं तर दोन-तीन आठवड्यातच आपण ते सुरू करू शकू.''

सुरुवातीला जोशींना ह्या प्रस्तावाबद्दल जरा साशंकता होती. मुख्यतः नावाबद्दल. त्यांच्या मनातील लढाऊ अशा शेतकरी संघटनेचे मुखपत्र म्हणायचे आणि नाव मात्र वारकरी, हे खूप विसंगत वाटत होते. पण दुसरे कुठले नाव मंजूर करून घ्यायचे म्हणजे त्यात पाच-सहा महिने सहज जाणार होते. तेवढा वेळ आता त्यांच्यापाशी नव्हता. भामनेरच्या रस्त्यासाठी एक मोठे आंदोलन उभारायचा गेले काही महिने ते प्रयत्न करत होते. फेब्रुवारी महिन्यात सुरू होणाऱ्या पुढच्या हंगामात कांदाप्रश्नही पुन्हा एकदा भडकणार हे उघड दिसत होते. आता अधिक न थांबता आहे ते वारकरी नाव घेऊनच साप्ताहिक काढणे श्रेयस्कर होते. त्यानुसार मग त्यांनी साप्ताहिकाची कसून तयारी सुरू केली. कुणाचीतरी ओळख काढून पुण्यातील एका दैनिकाकडून कागद मिळवला, मजकूर तयार केला आणि लवकरच वारकरीचा पहिला अंक छापून तयार झाला. तो शनिवार होता व अंकावरची तारीख होती ३ नोव्हेंबर १९७९.

पहिल्या अंकाच्या पहिल्या पानावर संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांचे चित्र छापले होते. खालच्या भागात संत रामदासांचे चित्रही आहे. कारण या तिघांचे ब्लॉक्स छापखान्यात तयारच होते! 'ओम नमो जी आद्या' या ज्ञानेश्वरीतील पहिल्या ओवीच्या आधाराने जोशींनी पहिले संपादकीय लिहिले. ''देश नासला नासला, उठे तोच कुटी, पिके होताची होताची, होते

लुटालुटी'' ह्या रामदासस्वामींच्या अगदी समर्पक अशा ओळींनी संपादकीय सुरू झाले होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापले त्यावेळची परिस्थिती आणि महाराष्ट्रातील सध्याची परिस्थिती यांचे वर्णन करून दोन्हीमधील साधर्म्य त्यात दाखवले होते.

शेतकरी संघटनेचा प्रवास कसा सुरू झाला हे वारकरीच्या सुरुवातीच्या अंकांवरून अभ्यासकांना जाणवेल. उदाहरणार्थ, पहिला अंक :

'शेतकऱ्यांच्या प्रश्नांची निर्भीड चर्चा करणारे शेतकरी संघटनेचे मुखपत्र' हे पहिल्याच पानावर शीर्षस्थानी ठळक अक्षरांत छापले आहे. शेतकरी संघटनेचा १९७९-१९८०चा दोन-कलमी कार्यक्रमही ठळक अक्षरांत पहिल्याच पानावर छापला आहे. तो आहे :

१) चाकण व संबंधित बाजारपेठांत कांदा, बटाटा व भुईमूग यांचे भाव क्विंटलमागे रुपये ५०, रुपये १०० व रुपये २५०च्या खाली जाऊ न देणे.
२) गावोगावी संघटना बांधून पुढील लढ्याची तयारी करणे.

दुसऱ्या पानावर शेतकरी संघटनेच्या तीन घोषणा छापल्या आहेत –

- शेतकरी तितुका एक एक!
- जय किसान! जय जवान!
- भारत झिंदाबाद!

त्याच पानावर आसखेड धरण आणि भामनहर रस्ता यांसाठी संघटनेतर्फे डिसेंबर महिन्यात भरवल्या जाणाऱ्या एका परिषदेची माहिती देणारी चौकट आहे. शेतकऱ्यांनी काय करावे म्हणून 'सहा मार्गदर्शक तत्त्वे' ह्याच पानावर आहेत. शेतकरी संघटनेचा मुख्य भर शेतीमालास रास्त भाव मिळवून देण्यावर आहे व म्हणून संघटनेने ठरवून दिलेल्या किमान किमतीच्या खाली आपला शेतीमाल विकू नका हे त्यातील प्रमुख तत्त्व आहे.

याच पानावर ते सेवादलाच्या शाखेत जायचे तेव्हापासून ज्यांच्याविषयी जोशींना कायम आदर होता, त्या सानेगुरुजींचे किसानांना उद्देशून लिहिलेले एक चार कडव्यांचे गीत संपूर्ण छापले आहे. 'शेतकरी संघटनेचे गीत' म्हणून स्वीकारण्यात आलेल्या या गीताची सुरुवात होती : उठू दे देश, पेटू दे देश; येथून तेथून सारा, पेटू दे देश.

या गीतातील विचार शेतकरी संघटनेच्या एकूण विचारांशी इतके जुळणारे आहेत, की आज इतक्या वर्षांनी ते वाचताना या साम्याचे खूप आश्चर्य वाटते. विशेषतः 'घाम गळे तुमचा, हरामाला दाम' ह्या ओळीत 'भीक नको, हवे घामाचे दाम' ह्या शेतकरी संघटनेच्या प्रसिद्ध घोषणेचे बीज दडलेले आहे हे कोणालाही जाणवावे. गीताच्यावर सानेगुरुजींचे छायाचित्र छापलेले आहे व संपूर्ण अंकातील समकालीन व्यक्तीचे असे ते एकमेव छायाचित्र आहे.

याच पानावर कवितेखाली 'कलावंत शेतकऱ्यांना आवाहन' या मथळ्याखाली एक चौकट आहे व तिच्यात संघटनेला प्रचारासाठी एक शाहीर पथक लगेच तयार करायचे आहे आणि त्यासाठी गायक, वादक, कवी यांची, तसेच नट व चित्रकार यांचीही गरज असल्याचे छापले आहे. संघटनेच्या प्रसारासाठी जोशी यांनी सुरुवातीपासूनच वेगवेगळ्या माध्यमांचा

विचार केला होता हे त्यातून जाणवते.

या पहिल्या अंकाच्या तिसऱ्या पानावर 'कांद्याचा लढा' हा स्वतः शरद जोशींनी लिहिलेला लेख आहे. संपूर्ण अंकातला हा एकमेव मोठा लेख आहे व तो त्यांचा आहे. पुढे 'शेतकरी संघटक' नावाने जे पाक्षिक संघटनेचे मुखपत्र म्हणून बरीच वर्षे चालवले गेले, त्यातही मुख्य लेखन हे बहुतेकदा जोशी यांचेच होते व मुखपत्राचे आणि संघटनेचेही हे एकचालकानुवर्तीय स्वरूप पहिल्यापासूनचेच आहे हेही हा अंक वाचताना लक्षात येते.

या पहिल्याच चार-पानी अंकाचे चौथे संपूर्ण पान आठ छोट्या जाहिरातींनी भरलेले आहे व ह्या सर्व जाहिराती त्यांच्या संपर्कात आलेल्या चाकणमधील लहान लहान व्यावसायिकांच्या व व्यापाऱ्यांच्या आहेत. त्यांच्या शुभेच्छा त्यावेळी व नंतरही शेतकरी संघटनेला व शरद जोशी यांना होत्या; जोशींनीही कधी उद्योजकतेला विरोध केलेला नाही हे लक्षात येते.

किरकोळ अंकाची किंमत ३० पैसे, तसेच वार्षिक वर्गणी रुपये १५ ह्याच्याबरोबरच तहहयात वर्गणी रुपये १५० हेदेखील छापलेले आहे. याचाच अर्थ हे केवळ तात्कालिक गरजा भागवणारे साप्ताहिक नसून ते वर्षानुवर्षे चालू राहावे, अशी जोशी यांची त्यावेळी तरी कल्पना होती हे जाणवते. जिथे वितरक व प्रतिनिधी नेमणे आहे अशा दहा गावांची यादीही अंकात आहे. संपादक म्हणून शरद जोशी यांचे तर कार्यकारी संपादक म्हणून बाबूलाल परदेशी यांचे नाव शेवटी छापले आहे. पत्तादेखील परदेशी यांच्या चाकण प्रिंटींग प्रेसचाच आहे.

''माझ्यासारख्या नास्तिकाला वारकरी हे नाव पसंत नव्हते,'' असे जोशी यांनी म्हटले आहे. पुढच्याच वर्षी जोशी यांचा ज्या विजय परुळकर यांच्याशी निकटचा संबंध आला, त्यांनी ''वारकरी म्हणजे 'वार'करी; अन्याय करणाऱ्यावर वार करणारा'' अशी त्याची फोड केली होती व ते जोशींना खूप आवडले होते; मनात काहीशी डाचणारी अप्रस्तुत नावाबद्दलची खंत त्यामुळे दूर झाली!

अंकाची जुळणी चालू असतानाच एकीकडे प्रकाशन समारंभाची तयारी सुरू झाली. एव्हाना ऑक्टोबरचा शेवटचा आठवडादेखील संपत आला होता. जेमतेम चार दिवस हातात होते. चाकण बाजारात एक लहानसा मांडव घातला गेला. बाबूलालनी आपल्या छापखान्यात घाईघाईने काही पत्रिका छापल्या, वाटल्या. पोस्टर्स छापली. एक अशी कल्पना निघाली, की समारंभात जे सामील होतील त्यांना लावायला एखादा बिल्ला तयार करावा, म्हणजे मग भविष्यात संघटनेचे कार्यकर्ते कोण आहेत हे ओळखणे कोणालाही सुलभ होईल. बिल्ला कसा असावा ह्याविषयी काही कल्पना मनात स्पष्ट होत्या. लाल रंगाचा गोल बिल्ला व त्यावर पांढऱ्या अक्षरात शेतकरी संघटना' ही अक्षरे. (लाल पार्श्वभूमी व त्यावर पांढरा क्रॉस ह्या स्वित्झर्लंडच्या राष्ट्रध्वजाच्या डिझाइनशी असलेले ह्याचे साम्य लक्षणीय आहे.) पण अल्पावधीत असे बिल्ले कोण करून देणार हा प्रश्नच होता. बाबूलाल ह्यांचे डॉ. रमेशचंद्र नावाचे एक पुण्यात राहणारे मित्र होते. समाजवादी पक्षाचे ते स्थानिक संघटक होते. बिल्ले कुठे मिळतील ह्याची चौकशी करायला मंडळी त्यांच्या घरी गेली. दुर्दैवाने ते घरी नव्हते. निराश होऊन जोशी व बाबूलाल बाहेर पडले तेव्हा फाटकातच रमेशचंद्रांचे भाऊ भेटले. 'काय

काम होतं?' असे त्यांनी विचारल्यावर जोशींनी आपली गरज त्यांना सांगितली. ''माझा प्लास्टिक मोल्डिंगचा एक छोटा कारखाना आहे. मी तुम्हाला चोवीस तासांत तसे प्लास्टिकचे बिल्ले बनवून देतो,'' ते म्हणाले.

'चला, प्लास्टिक तर प्लास्टिक, पण आपली आत्ताची गरज तर भागली,' म्हणत जोशींनी सुटकेचा सुस्कारा सोडला. एक अडचण तरी दूर झाली. सांगितल्याप्रमाणे दुसऱ्याच दिवशी त्यांनी बिल्ले दिलेदेखील हे विशेष. पुढे प्लास्टिकचे हे बिल्ले बदलून पत्र्याचे बिल्ले तयार केले गेले, पण डिझाइन तेच राहिले. हा बिल्ला पुढे शेतकरी संघटनेची निशाणी म्हणून देशभर प्रसिद्ध पावला.

दोन नोव्हेंबरपर्यंत खुर्च्या, टेबल, बॅनर्स, हारतुरे ह्याची व्यवस्था झाली. कार्यक्रमाची रूपरेखा ठरली. ओळखीतून कोणीतरी एक लाउडस्पीकर मिळवला. अध्यक्ष कोणाला बोलवायचे हा प्रश्नच होता. कारण संघटना त्यावेळी अगदी नगण्य होती आणि राजकारण्यांशी फटकूनच राहिली होती. त्यामुळे खासदार, आमदार वगैरे मंडळी सोडाच, साधा ग्रामपंचायतीचा सभापतीदेखील प्रकाशनासाठी यायची शक्यता नव्हती.

शेवटी भामनेर खोऱ्यातील एका गावाच्या पंचायत समितीचा एक सदस्य अध्यक्ष म्हणून नक्की केला. 'आगामी भामनेर सडकेच्या आंदोलनात तो उपयोगी पडेल' ही जोशींची कल्पना. बाबूलाल अधिक व्यवहारी होते. 'तो निदान वारकरीचा आजीव सदस्यतर होईल' ही त्यांची कल्पना. प्रत्यक्षात त्याने आजीव सदस्य व्हायचे कबूलदेखील केले; पण दिले मात्र फक्त रुपये ५०! उरलेले १०० राहूनच गेले!

'वारकरी'चे प्रकाशन झाले आणि योगायोगाने त्याच आठवड्यात आंदोलनाचा परत एक प्रसंग आला. आधीचे काही महिने नाफेडने खरेदी थांबवली होती व सर्व व्यवहार व्यापाऱ्यांच्याच हातात पुन्हा गेला होता. त्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये असंतोष होता. त्यांच्या सभा-निदर्शने सुरू झाली. शेवटी ७ नोव्हेंबरपासून नाफेडने पुन्हा एकदा खरेदी सुरू केली. असे नेहमीच होत असे – नाफेड कधी खरेदी करायचे, मध्येच ती थांबवायचे. ह्यावेळी त्यांनी खरेदी सुरू करताना कांद्याचा भाव क्विंटलमागे पूर्वी ४५ ते ६० असा होता, तो कमी करून सरसकट ४०वर आणला.

त्यामुळे चिडलेल्या शेतकऱ्यांची बाजारसमितीसमोर निदर्शने सुरू झाली. शेवटी १४ नोव्हेंबर रोजी नाफेडतर्फे भाव पूर्ववत केले गेले. संघटनेच्या कार्यालयात ह्या निमिताने अनेक शेतकरी येत गेले व त्यांना वारकरीचे अंकदेखील वाटले गेले. वारकरीची गरज लोकांच्या मनावर ठसवण्यासाठी ह्या आंदोलनाची मदत झाली.

शेतकऱ्यांना रुची वाटेल अशा बातम्या अंकात असायच्या. उदाहरणार्थ, तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार त्याच सुमारास अरब देशांचा दौरा करून आले होते. त्याविषयीच्या बातमीत म्हटले आहे,

पवार यांनी अगदी मुक्त कंठाने चाकणच्या कांद्याची प्रशंसा केली. ते म्हणाले, 'चाकणच्या कांद्याला दुबई व कुवेत येथील मार्केटमध्ये ७०० रुपये क्विंटल भाव मिळत आहे. मी त्यांना ३२ कोटी रुपयाचा कांदा व इतर भाजीपाला पुरवायचा करार केला आहे. तुम्ही भरपूर कांदा पिकवा. तुम्हाला किमान ७० रुपये क्विंटल भाव नक्की मिळेल.' शेतकऱ्याच्या जीवनातील ह्या महत्त्वाच्या प्रश्नावर शरद पवार योग्य निर्णय घेतील अशी खात्री बाळगू या.

अरबी मुलुखात क्विंटलला ७०० रुपये भाव मिळत असताना चाकणच्या बाजारात इथल्या शेतकऱ्याला मात्र नाफेडतर्फे क्विंटलला जेमतेम ४५ ते ६० रुपयेच भाव मिळत होता, व तोही प्रत्येक वेळी संघर्ष करून मिळवावा लागत होता हे लक्षात घेण्यासारखे आहे.

तिसऱ्या अंकापासूनच 'इंडिया विरुद्ध भारत' ही शब्दरचना अंकाच्या शीर्षस्थानी आली. 'भारत झिंदाबाद, इंडिया मुर्दाबाद' ही घोषणाही लगेचच पहिल्या पानावर आली. पहिल्या अंकात फक्त 'भारत झिंदाबाद' होते, त्याच्याखाली आता 'इंडिया मुर्दाबाद' आले. ह्या वाढत्या संघर्षाचे प्रतिबिंब अंकातील मजकुरावरही पडत गेल्याचे जाणवते. वर्गणीदारांची व आजीव वर्गणीदारांची यादीही अधूनमधून प्रसिद्ध होत होती. हळूहळू वारकरीचा थोडाफार विस्तार होऊ लागला. चौथ्या अंकात पहिल्याच पानावर २२ आजीव सदस्यांची व ४२ वार्षिक वर्गणीदारांची यादी प्रसिद्ध झाली आहे. ही संख्या तशी अत्यल्प वाटते, पण शेतकरीवर्गातून वाचक मिळणे सोपे नव्हते.

अंकात व्यावसायिक माहितीही असायची. कांद्याचा उत्पादनखर्च कसा काढायचा, पिकांना होणारे वेगवेगळे रोग व त्यावरील उपाय वगैरे माहिती असायची. ग्रामविकासाच्या योजनांची माहितीदेखील असायची. बरीच पत्रे त्याबाबत असत. वाचकपत्रांना अंकात आवर्जून अर्धाएक पान स्थान दिले जायचे. संपूर्ण भामनेर खोऱ्याच्या पंचवार्षिक विकासाचा एक विस्तृत आराखडाही एका अंकात प्रसिद्ध झाला होता. संघटनेतर्फे तरुण शेतकऱ्यांसाठी व्हॉलीबॉलस्पर्धादेखील आयोजित केल्या गेल्या होत्या व त्याचेही वृत्त अंकात आले होते. शेतकरी एकत्र आणण्यासाठी सर्वच मार्गांचा अवलंब केला जात होता, वावडे असे कशाचेच नव्हते.

अंकातील एक वेधक वृत्त म्हणजे मुंबईतील 'जेवण डबे वाहतूक मंडळ' यांनी मुंबईला २० डिसेंबर १९८० रोजी केलेल्या सत्काराचे. भामनेर खोऱ्यातील अनेक तरुण मुंबईला डबेवाला म्हणून नोकरी करत. ते फारसे शिकलेले नसत, पण त्यांचे काम वक्तशीरपणा व शिस्त यांसाठी खूप वाखाणले जाई. लांब लांब राहणाऱ्या मुंबईकर कुटुंबांतून सकाळी नऊ-दहाच्या सुमारास जेवणाचे डबे गोळा करायचे व दुपारी बरोबर बारा-एकच्या आत ते फोर्टसारख्या लांबच्या भागातील ज्याच्या-त्याच्या कार्यालयात पोचवायचे काम ते करत. संध्याकाळी ते डबे घरोघर परतही पोचवत. ह्या कामात कधीही हयगय होत नसे व घरचे सात्त्विक अन्न खायला मिळाल्यामुळे मुंबईकर त्यांच्यावर खूष असत. बड्या

व्यवस्थापनतज्ज्ञांनीदेखील या डबेवाल्यांवर पुढे अभ्यासलेख लिहिले आहेत. मंडळाने मुंबईत त्या दिवशी संध्याकाळी सात वाजता सत्यनारायणाची पूजा आयोजित केली होती. बातमीत म्हटले होते,

> पूजेपूर्वी शरद जोशी यांची ढोल-ताशे वाजवत मुंबईत मिरवणूक काढली गेली. त्यानंतर पूजेला जोडूनच जाहीर सभाही झाली व त्या सभेत जोशी यांचा जाहीर सत्कार केला गेला. जोशी यांनी सुमारे तासभर भाषण केले. डबेवाहतूक मंडळाशी असलेल्या आपल्या ऋणानुबंधांचा जोशी यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला व शेतकरी संघटनेबद्दल माहिती दिली. नंतर मंडळाने साप्ताहिक वारकरीला रुपये ५०१ देणगीदाखल दिले. सभेनंतर रात्री भजनी भारुडाचा कार्यक्रम झाला.
>
> (*वारकरी,* ३ जानेवारी १९८१)

पुढे पुढे मात्र दर आठवड्याला वारकरी काढायचा जोशींना त्रास होऊ लागला. बाबूलालना ठरलेल्या वेळेत काम करायची फारशी सवय नव्हती. ह्याचे एक कारण म्हणजे गावात त्यांचा छापखाना हा एकमेव छापखाना होता; म्हणजे त्यांची मक्तेदारीच होती. छापखान्यात पत्रिका छापायला उशीर होत आहे, म्हणून लग्नाची तारीख पुढे ढकलली गेल्याचीही उदाहरणे होती! पण साप्ताहिक म्हटले की पोस्टाच्या नियमानुसार ठरलेली तारीख पाळावीच लागे. त्यामुळे शनिवारी दुपारी अंक बाहेर पडणे आवश्यक असायचे. दर बुधवारी रात्री जागून जोशी सगळा मजकूर तयार करायचे, हाताने लिहून काढायचे. गुरुवारी सकाळी सकाळी तो बाबूलालकडे द्यायचे, जेणेकरून त्यांना छपाईसाठी निदान दोन दिवस मिळावेत. पण बाबूलाल यांची आणखी एक सवय म्हणजे रात्री तीन वाजेपर्यंत गावातल्या मारुतीच्या देवळात गप्पा छाटत बसायचे आणि सकाळी पार दहा वाजेपर्यंत ताणून द्यायची. त्यांचा छापखाना व घर जवळजवळ होते. सकाळी जोशी मजकूर घेऊन त्यांच्याकडे जात, तेव्हा ते झोपलेलेच असत. बाबूलाल ह्यांच्या पत्नी सुषमा "अहो, तुमचा सासरा आला आहे बघा!" असे म्हणून गदागदा हलवत पतीला उठवायच्या. मग दुपारपर्यंत जुळारी शोधण्यात वेळ जायचा. कधी तो मिळायचा, कधी नाही. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी पुन्हा हाच प्रकार. शेवटी कसाबसा अंक शनिवारी सकाळी तयार व्हायचा. खूपदा चाकणला अर्धवट तयार झालेला मजकूराचा कंपोझ पुण्याला नेऊन तिथे अंक पुरा करावा लागे. जोशी म्हणतात,

> बाबूलाल घड्याळ काय, पण कॅलेंडरकडेसुद्धा लक्ष देणे म्हणजे, विलायतेतून आलेल्या लोकांचे फॅड समजायचा! साप्ताहिक वारकरीचा प्रत्येक अंक म्हणजे जुळारी, छापखाना, बाबूलाल आणि वेळ ह्यांच्याशी घेतलेली निकराची झुंज व्हायची. छपाईकामाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रचंड प्रमाणावर राहून जाणारे मुद्रणदोष. मला स्वतःला मीच लिहिलेला मजकूर छापील स्वरूपात तपासता येत नाही. लिहिलेली वाक्ये मनात इतकी पक्की बसलेली असतात, की मुद्रणातल्या

चुका लक्षातच येत नाहीत. आणि बाबूलालला कुठल्याच चुका चुका वाटत नाहीत. असा सगळा आनंद! भावी काळातले राजवाडे वारकरीचे अंक घेऊन बसतील, तेव्हा मुद्रणदोष ओलांडत ओलांडत वाचताना त्यांच्या डोक्याला मुंग्या आल्याखेरीज राहणार नाहीत.

(वारकरीची जन्मकथा, *आठवड्याचा ग्यानबा,* १ ते ८ मार्च १९८८, पृष्ठ ९)

चळवळ वाढत गेली तसतसा जोशींना स्वतःला त्यासाठी पुरेसा वेळ देता येईना. आधी काही अंक नियमित दर आठवड्याला निघाले, मग मात्र ते अनियमित स्वरूपात निघू लागले. सुमारे सव्वा वर्षाने वारकरी बंदच पडले. १७ जानेवारी १९८१चा अंक हा वारकरीचा शेवटचा अंक. पण त्याने त्या मर्यादित काळात महत्त्वाची भूमिका बजावली. भामनेर खोऱ्यात, पुणे जिल्ह्यात आणि खरे तर इतरही अनेक जिल्ह्यांत शेतकरी संघटनेची त्यामुळे तोंडओळखतरी झाली. अनुयायांशी संपर्क साधण्याचे ते एकमेव साधन होते. शरद जोशींचा थेट सहभाग असलेलेही हे एकमेव नियतकालिक. संघटनेची म्हणून त्यानंतर 'आठवड्याचा ग्यानबा' व 'शेतकरी संघटक' ही दोन मुखपत्रे निघाली व त्यांतून जोशींचे लेखन प्रसिद्धही होत गेले, पण त्यांच्या व्यवस्थापनात जोशींचा थेट सहभाग नसायचा.

लोकांनी जर आपल्याबरोबर यावे असे वाटत असेल, तर त्यांच्या जिव्हाळ्याचे जे विषय आहेत त्यात तुम्हालाही स्वारस्य असावे लागते. म्हणूनच आंबेठाणमध्ये आल्यापासून जोशींनी दोन गोष्टींवर बरेच लक्ष केंद्रित केले होते. पहिली म्हणजे गावातले आरोग्य.


आरोग्याचा प्रश्न जोशींना फारच गंभीर वाटत होता. मुळातच कुपोषित असलेले गावकरी कुठल्याही रोगाला सहज बळी पडत असत. त्यांची एकूण कार्यक्षमताही कुपोषणामुळे खूप कमी झालेली असायची. भामनेरच्या त्या खोऱ्यात चाकण सोडले तर कुठे एकही डॉक्टर नव्हता. एखादा पोरगा खूप आजारी पडला तर शेतकरी नाइलाजाने त्याला बाजाराच्या दिवशी थेट चाकणला घेऊन जायचा. चाकणला सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्र होते. पण तिथे कोणीच डॉक्टर हजर नसतो असे त्यांना स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले होते. गावकऱ्यांच्या मते तिथे औषधेही उपलब्ध नसत. तिथले सरकारी कर्मचारी खेडूतांशी इतक्या मग्रुरीने वागत की पुन्हा त्या दवाखान्याची पायरीही चढू नये असे त्या शेतकऱ्याला वाटायचे. मग खासगी डॉक्टरकडे जाणे हाच एक रस्ता असायचा. तो खासगी डॉक्टर रुग्णाला तपासून काहीतरी औषधे लिहून द्यायचा. पण औषधांच्या दुकानात गेले आणि औषधांची किंमत ऐकली की तो शेतकरी पोराला घेऊन तसाच गावी परत जायचा. कारण तेवढे पैसे खर्च करणे त्याला परवडायचे नाही. हे सारे नेहमीचेच होते.

डॉ. शाम अष्टेकर यांच्याविषयी आणि डॉ. रत्ना पाटणकर यांच्याविषयी इथे लिहायला हवे. पुढे या दोघांनी विवाह केला पण सुरुवातीला ते एकेकटेच चाकणच्या सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत होते. ऑक्टोबर १९७८मध्ये पुण्याहून एमडी केल्यावर डॉ. अष्टेकर


इथे लागले होते. एक दिवस एका रुग्णाला घेऊन जोशी आरोग्य केंद्रात आले व त्यावेळी त्यांचा व अष्टेकरांचा प्रथम परिचय झाला. परिसरातील आरोग्याबद्दल दोघांची खूप चर्चा व्हायची. डॉ. रत्ना पाटणकर यांनी जोशींनी आयोजित केलेल्या एका भव्य मोर्च्यातही मोलाचे वैद्यकीय साहाय्य दिले होते. पुढे त्याबद्दल येणारच आहे. १९८३पर्यंत डॉ. अष्टेकर या केंद्रात कार्यरत होते. त्यानंतरही ह्या ध्येयवादी जोडप्याने अनेक वर्षे ग्रामीण भागातच रुग्णसेवा केली. आता ते नाशिक येथे स्थायिक झाले आहेत. दोघांनीही शेतकरी संघटनेत अगदी झोकून देऊन काम केले. शरद जोशींच्या प्रत्येक आजारपणात डॉ. अष्टेकर त्यांच्यासोबत असत.

आंबेठाणला आल्यावर जोशींनी बराच पुढाकार घेतलेली दुसरी सामाजिक समस्या म्हणजे पक्क्या रस्त्याचा अभाव. आपल्या दैनंदिन गरजा पुऱ्या करण्यासाठी, आजारपणात त्वरित उपचार मिळावेत म्हणून, शेतीमाल कमीत कमी वेळात बाजारात पोचवण्यासाठी चांगला रस्ता अत्यावश्यक होता. इथल्या एकूण मागासलेपणाचे रस्ते नसणे हे एक मोठेच कारण होते. आंबेठाणवरून जाणाऱ्या चाकण ते वांद्रे ह्या ६४ किलोमीटर रस्त्यापैकी फक्त चाकण ते आंबेठाण हा सात किलोमीटरचा रस्ता त्यातल्या त्यात नीट असायचा. बऱ्याच वर्षांपूर्वी, आधी १९६७ साली व नंतर १९७३ साली, दुष्काळात शेतकऱ्यांना रोजगार मिळावा म्हणून काढलेल्या कामांचा एक भाग म्हणून तो सरकारने तयार करवला होता. स्थानिक शेतकऱ्यांनी त्यासाठी श्रमदान केले होते. पण नंतरच्या काही वर्षांत त्याची पुरती दुर्दशा झाली होती. खोऱ्यात एकूण २७ गावे होती व त्यांपैकी २४ गावे अशी होती, की एकदा पावसाळा सुरू झाल्यावर पुढचे निदान सहा महिने त्या गावांचा बाहेरच्या जगाशी काहीही संबंध राहायचा नाही; कारण मोडका-तोडका जो रस्ता असायचा, तो पहिल्या दोन-चार पावसांतच वाहून जायचा. गावातली माणसे मग गावातच अडकून पडायची. भाजीपाला वगैरे अक्षरशः कवडीमोलाने विकून टाकावा लागायचा; किंवा कधीकधी चक्क फेकून दिला जायचा. कोणी आजारी पडले तरी चाकणला जायची काही सोय नाही; रुग्णाला डोली करून नेणे हा एकमेव पर्याय असायचा. पण तेही फार अवघड असायचे कारण ह्या भागातील बरेचसे तरुण मुंबईला डबेवाला म्हणून नोकरी करायचे; उरलेली वस्ती मुख्यतः बायका, मुले व वृद्ध यांची. गावातली एखादी बाळंतीण अडली आणि घरच्यांसमोर तडफडून मेली, असे दर पावसाळ्यात एकदातरी घडायचेच. हा रस्ता पक्का व्हावा अशी मागणी समस्त गावकऱ्यांच्या वतीने जोशींनी केली होती. शेतकऱ्यांची संघटना बांधायचे ठरवल्यावर त्यांनी लोकजागृतीसाठी हाती घेतलेला हा पहिला प्रकल्प होता. ह्या आंदोलनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे जोशींनी आयोजित केलेला मोठा मोर्चा; चीनच्या माओ त्से तुंगच्या शब्दांत सांगायचे तर – लाँग मार्च.

वांद्रे येथून २४ जानेवारी १९८० रोजी हा मोर्चा सुरू होणार होता व ६४ किलोमीटर चालून २६ जानेवारीला चाकणला पोचणार होता. त्याच्या तयारीसाठी म्हणून आधीचे दोन महिनेतरी जोशींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कसून प्रयत्न केले होते. 'घरातल्या जनावरांच्या



(डावीकडून) वसंत बाळकृष्ण जोशी (मेहुणे), सौ सिंधु वसंत जोशी (भगिनी), वडील अनंत नारायण जोशी, आई इंदिराबाई, मागे उभे शरद जोशी, सौ निर्मला चंद्रकांत देशपांडे (भगिनी), मागे प्रभाकर जोशी, चंद्रकांत देशपांडे (मेहुणे). स्थळ: अंधेरी पूर्व, मुंबई, येथील निवासस्थान. (सौजन्य: सौ. नीता प्रभाकर जोशी)




शरद व लीला जोशी, विवाहप्रसंगी, मुंबई, २५ जून १९६१




पोस्टातील एका प्रशिक्षण वर्गातील सहकारी, पहिल्या रांगेत मध्यभागी जोशी, १९६१



शरद जोशी यांचे स्वित्झर्लंडमधील निवासस्थान. तळमजल्यावरील उजवीकडचा फ्लॅट त्यांचा. शेजारचाच फ्लॅट टोनी डेर होवसेपियां यांचा.




इमारतीतील क्लब हाउसमध्ये टेबलटेनिस खेळताना. ''त्याला हरणे आवडत नसे.'' – टोनी डेर होवसेपियां




युनिव्हर्सल पोस्टल युनियनच्या मुख्यालयासमोर अविनाश जगताप, टोनी डेर होवसेपियां व भानू काळे, १२ जुलै २०१२.

युपीयुची
टोकियो येथील
आंतरराष्ट्रीय परिषद,
१९६८
(जोशी
पहिल्या रांगेत
डावीकडून दुसरे)





बर्न येथील
एका
स्नेहसंमेलनातील
भारतीय संगीताची
मैफल.
उजवीकडे तानपुरा
जुळवताना
लीला जोशी



श्रेया व गौरी या आपल्या दोन मुलींसमवेत,
सदिच्छा बंगला, पुणे, २ सप्टेंबर १९८४



मातोश्री इंदिराबाई यांच्यासमवेत
शरद जोशी व सोबत दोन्ही मुली,
सदिच्छा बंगला, पुणे २ सप्टेंबर १९८४



आंबेठाण गाव, १९७७ मध्ये जसे होते



अंगारमळा : जोशी यांचे घर, १९८३




नाशिक येथील
ऊस आंदोलन.
१० नोव्हेंबर १९८०,
आडगाव फाटा,
रास्ता रोकोची
सुरुवात.
(सौजन्य :
सरोजा परुळकर)



१० नोव्हेंबर १९८०, रेल रोको, खेरवाडी.
येथील पोलीस गोळीबारात
दोन शेतकरी हुतात्मा झाले.
(सौजन्य : सरोजा परुळकर)



ऊस आंदोलनातील
त्रिमूर्ती (उजवीकडून)
प्रल्हाद कराड पाटील,
शरद जोशी व
माधवराव मोरे,
मागे बसलेल्या
लीलाताई जोशी.
सटाणा अधिवेशन,
२ जानेवारी १९८२.



चाकण येथील अगदी सुरुवातीचे साथीदार. (डावीकडून) श्याम पवार, अप्पा देशमुख, शरद जोशी, मामा शिंदे व गोपाळ जगनाडे. श्याम पवार यांचे म्हाळुंगे येथील हॉटेल, ९ नोव्हेंबर २०१४.

जोशींची मुलाखत घेताना इंग्लंडहून निपाणीला आलेली बीबीसी टेलिव्हिजनची टीम, ३० जानेवारी १९८१. (सौजन्य : सरोजा परुळकर)





सुभाष जोशी आंदोलनातील तंबाखू कामगार महिलांना काही सूचना देताना, मार्च-एप्रिल १९८१. शेजारी त्यांच्या पत्नी सुनीता. (सौजन्य : सरोजा परुळकर)




रात्रंदिवस रास्ता रोको करणारे तंबाखू शेतकरी चार घास खाताना (सौजन्य : सरोजा परुळकर)



पोलीस गाड्यांमधून नेले जाणारे सत्याग्रही, ६ एप्रिल १९८१ (सौजन्य : सरोजा परुळकर)



... आणि पोलीस गोळीबारानंतर उद्ध्वस्त झालेली आंदोलननगरी, ६ एप्रिल १९८१



शरद-लीला-श्रेया-गौरी जोशी, मृद्गंध, पुणे, २७ ऑक्टोबर १९८२



पुणे, ६ जून १९८६. श्रेया जोशी व सुनील शहाणे यांच्या विवाहप्रसंगी जामात सुनील यांची प्रमोद महाजन यांच्याबरोबर ओळख करून देताना. मधे प्रकाश जावडेकर.

व आजारी माणसांच्या देखभालीसाठी आवश्यक असतील तेवढ्याच माणसांनी आपापल्या घरात थांबावे व बाकीच्या सर्वांनी मोर्च्यात सहभागी व्हावे' असे आवाहन प्रत्येक गावात जाहीर सभा घेऊन करण्यात आले होते. 'शक्य असूनही जे शेतकरी मोर्च्यात सहभागी होणार नाहीत, त्यांना आपल्या शेतकरीबांधवांशी द्रोह केल्याचा दोष लागेल,' असेही भावपूर्ण आवाहन प्रत्येक सभेत केले गेले होते. २३ जानेवारीलाच स्वतः जोशी व त्यांचे सहकारी वांद्रे येथे जाऊन राहिले.

रात्री जेवणे झाल्यावर कुतूहलाने काही तरुण गावकरी त्यांना भेटायला आले होते. त्यांच्यात भोसले नावाचा एक जण होता. बोलता बोलता तो म्हणाला, ''ज्या समाजाची प्रगती खुंटलेली आहे, त्याची स्थिती साचलेल्या डबक्याप्रमाणे होते.'' ते ऐकून जोशी एकदम चमकले. कारण संघटनेविषयी ते वारकरीमध्ये लिहीत असलेल्या लेखमालेतील ते वाक्य होते. ''हे वाक्य तू कुठं वाचलंस?'' जोशींनी विचारले. तो उत्तरला, ''साहेब, तुमच्याच लेखातलं आहे हे वाक्य.'' ''तुम्ही वाचता हे लेख?'' जोशींचा प्रश्न. त्याचे उत्तर होते,

''आमच्या गावात तुमच्या लेखांचं आम्ही सार्वजनिक वाचन करतो. माझी तर त्यातली वाक्यंच्या वाक्यं पाठ आहेत,'' असे म्हणत त्यानी लेखांतली अनेक वाक्ये घडाघडा म्हणून दाखवली. ते ऐकून जोशींना खूप आनंद झाला. कारण त्यापूर्वी आपण इतक्या कष्टाने हे साप्ताहिक चालवत आहोत, पण प्रत्यक्षात ते कोणी वाचत असेल का, ह्याविषयी त्यांना काहीशी शंका होती. जोशी यांनी लिहिले आहे, ''इतक्या उपद्व्यापाने फेकलेले बियाणे, मावळातील सगळ्या डोंगरमाथ्यात एका ठिकाणी जरी रुजत असेल, तरी सगळ्या कष्टांचे चीज झाले असे वाटून गेले.''

दुसऱ्या दिवशी सकाळी मोर्च्याला सुरुवात झाली. सुरुवातीला सुमारे शंभर पुरुष व स्त्रिया मोर्च्यात सामील होत्या. पण जसजसा तो पुढे सरकू लागला, तसतशी त्यांची संख्या वाढू लागली. रात्रीच्या मुक्कामासाठी शिवे गावी मोर्चा आला, तेव्हा त्यात दोन हजार माणसे सामील झालेली होती. शिवेकरांनी त्या सर्वांना जेवण घातले. दुपारच्या एकूण तीन जेवणांसाठी प्रत्येकाने आपापल्या भाकऱ्या बांधून आणल्या होत्या व रात्रीच्या जेवणांची वाटेतल्या गावकऱ्यांनी एकत्रित व्यवस्था केली होती. २४ तारखेच्या रात्री संघटनेच्या कलापथकाने कार्यक्रम सादर केला. त्यानंतर बाहेर शिवारातच सगळे झोपले. २५ जानेवारीला सकाळी मोर्चा शिवे गावाहून पुढे सरकला. मोर्च्याचे वाढते स्वरूप पाहून सर्वांनाच उत्साहाचे भरते आले होते. पण तरीही मोर्च्यातली शिस्त विलक्षण होती. त्याचे एक उदाहरण सांगण्यासारखे आहे.

साधारण दुपारी तीन वाजेपर्यंत मोर्चा भांबोली गावात पोचला. रणरणत्या उन्हात चालून चालून सगळ्यांचे गळे सुकले होते. गावच्या विहिरीवर मामा शिंदे यांनी सगळ्यांसाठी प्यायच्या पाण्याची व्यवस्था केली होती. पण भांडी-लोटे खूप कमी होते. गडबड होऊ नये म्हणून सगळ्या मोर्चेकऱ्यांना रस्त्यावरच बसण्यास सांगण्यात आले. आयोजकांनी घोषणा केली की, ''एकेका गावाचे नाव पुकारताच फक्त त्या गावच्या मोर्चेकऱ्यांनी विहिरीपाशी यावे.

त्यांचे पाणी पिऊन झाले, की मग पुढील गावाचे नाव पुकारले जाईल. तेव्हा त्यांनी पुढे यावे. अशा प्रकारे सगळ्यांना काहीही गोंधळ न होता पाणी प्यायला मिळेल.'' हा कार्यक्रम जवळ जवळ तासभर चालला, पण एकही जण आपली रांग सोडून पुढे घुसला नाही. ''हा साधासुधा मोर्चा नसून शिस्तबद्ध अशी फौज आहे,'' असे उद्‌गार हे अभूतपूर्व दृश्य पाहणारे अनेक लोक काढत होते.

असेच आणखी एक उदाहरण म्हणजे मोर्चेकऱ्यांसाठी आयोजित केलेल्या वैद्यकसेवेचे. मोर्च्यात अनेक बायकामुलेदेखील सामील होणार, त्यामुळे कोणाचे काही दुखलेखुपले तर लगेच औषधपाणी करता यावे यासाठी संघटनेच्या निकटच्या हितचिंतक डॉ. रत्ना पाटणकर आणि डॉ. दाक्षायणी देशपांडे २३ जानेवारीलाच चाकणहून वांद्र्याला दाखल झाल्या. २४ तारखेपासून मोर्च्याबरोबर त्याही संपूर्ण अंतर पायी चालल्या. वाटेत गावोगावी त्यांनी वैद्यकीय तपासण्या केल्या, औषधपाणी केले. मोर्च्यातील स्त्रियांना त्या इतक्या जवळच्या वाटल्या, की दुपारी जेवणाच्या वेळेला, ''पोरींनो, जेवलात की नाही? बसा आमच्याबरोबर,'' असे आग्रहाने त्यांतल्या अनेक जणी या दोघींना सांगत असत. पुढे २६ जानेवारीला मोर्चा चाकणला पोचला तो दिवस सुट्टीचा होता. गावातील प्राथमिक आरोग्यकेंद्र बंद होते. पण तरीही ह्या दोघींनी आरोग्यकेंद्रात मुक्काम ठोकला आणि अनेक स्त्रियांवर औषधोपचार केले. या दोघींमुळे सगळ्याच मोर्चेवाल्यांची मोठी सोय झाली.

संध्याकाळपर्यंत मोर्चा आंबेठाण गावाला पोचला. ग्रामस्थांनी मोर्चेवाल्यांचे प्रेमाने स्वागत केले. रात्रीच्या जेवणासाठी आंबेठाणमध्ये साडेतीन हजार माणसे होती. रात्री पुन्हा भजन व भारुडाचा कार्यक्रम झाला, उशिरापर्यंत रंगला.

पुढल्या दिवशी २६ जानेवारी रोजी सकाळी आंबेठाणमध्ये झेंडावंदन करून मोर्चा चाकणकडे जाऊ लागला. आता इतर अनेक गावांतून शेतकरी बांधव व भगिनी मोर्च्यात सामील होत होत्या. ढोल, लेझीम, झांजा यांनी वातावरण दुमदुमून गेले होते. प्रत्येक गावाचे मोर्चेकरी एकत्र चालत होते, त्यांच्यापुढे त्यांच्या गावाच्या नावाचे फलक घेतलेले स्वयंसेवक होते, तसेच प्रत्येक गावाचे स्वतंत्र कलापथकही होते. मोर्चा आता इतका लांब झाला होता, की एका टोकापासून मोर्च्याचे दुसरे टोक दिसत नव्हते. प्रत्येकाच्या छातीवर शेतकरी संघटनेचा लाल बिल्ला लावलेला होता. प्रत्येकी दोन रुपये देऊन सगळ्यांनी तो विकत घेतला होता व तीच रक्कम संघटनेची वर्गणी म्हणून जमा करण्यात आली होती; तशी पावतीही प्रत्येकाला दिली जात होती.

दुपारी बाराच्या सुमारास चाकण बाजारपेठेसमोरच्या मोकळ्या पटांगणात मोर्चा पोचला, तेव्हा तिथे जमलेल्या दोन हजार लोकांनी त्याचे स्वागत केले. 'चाकण-वांद्रे रस्ता झालाच पाहिजे', 'शेतकरी संघटनेचा विजय असो', 'मोर्चा आला पायी पायी, रस्ता करा घाई घाई', 'तुम्ही रस्ता करत नाही, आम्ही सारा भरत नाही' अशा घोषणांनी वातावरण भारून गेले होते. प्रत्यक्ष सभा सुरू झाली तेव्हा आठ हजारांचा जनसमुदाय तिथे हजर होता. एवढा मोठा जनसमुदाय चाकणमध्ये पूर्वी कधीच कुठल्या कार्यक्रमासाठी एकत्र आला नव्हता. ऐतिहासिक

अशीच ती घटना होती.

कार्यक्रमाची सुरुवात शेतकरी संघटनेच्या कलापथकाने सादर केलेल्या 'किसानांच्या बाया, आम्ही शेतकरी बाया' आणि 'येथून तेथून सारा, पेटू दे देश' या दोन प्रेरणादायी गीतांनी झाली. आपल्या भाषणात जोशींनी 'रस्ता होईस्तोवर शेतकऱ्यांनी सारा भरू नये' असे आवाहन केले. ते म्हणाले,

''मघाशी आपण ऐकलेले गीत ज्या सानेगुरुजींनी लिहिले, त्यांच्या आत्म्याला आनंद होईल व समाधान लाभेल असाच आजचा हा शेतकरी जागृतीचा क्षण आहे. चाकण ते वांद्रे हा रस्ता बारमाही करण्यासाठी गेली बावीस वर्षं अनेक अर्ज-विनंत्या करण्यात आल्या. अनेक आश्वासनंही देण्यात आली. पण प्रत्यक्षात काहीही प्रगती झाली नाही. पावसाळ्यात सहा-सात महिने रस्ता बंद असल्याने औषधपाणी, शाळा, वाहतूक, बाजारपेठ ह्या साऱ्या मूलभूत सोयींपासून आम्ही वंचित राहतो. माणूस म्हणून आम्हाला जगणंही असह्य झालं आहे.''

यानंतर शेवटी त्यांनी सर्व शेतकऱ्यांना शपथ घातली. आधी जोशी बोलणार आणि मग उपस्थित त्यांचे शब्द मागोमाग पुन्हा उच्चारणार असा प्रकार होता. ती शपथ अशी होती,

''आमची आणखी एक पिढी अशा हलाखीत पिचू नये म्हणून, मी, श्री भीमाशंकर महाराज यांच्या पायाच्या शपथेने प्रतिज्ञा करतो, की भामानहर रस्ता हा वर्षभर उघडा राहून एसटी बस बारा महिने वांद्रेपर्यंत जाऊ लागेपर्यंत, मी शासनाला एक पैसाही शेतसारा भरणार नाही. त्यासाठी मला जो त्रास होईल, तो मी सहन करीन. कोणत्याही परिस्थितीत इतर शेतकरी बांधवांबरोबर द्रोह करणार नाही.''

शेवटी सामुदायिकरीत्या घेतली जाणारी अशी शपथ हे पुढे शेतकरी संघटनेच्या प्रत्येक सभेचे एक वैशिष्ट्य बनले व त्याची सुरुवात अशी ह्या मोर्च्यात झाली होती. अतिशय भावपूर्ण वातावरणात व घोषणांच्या गजरात सभा संपली.

अनेक वर्षांपूर्वी स्वातंत्र्यआंदोलनात गुजरातेत सरदार वल्लभभाई पटेल यांनी बारडोली येथे असाच एक साराबंदी सत्याग्रह केला होता. त्यामुळेच त्यांना सरदार ही पदवी लोकांनी बहाल केली होती. त्यांची आठवण करून देणारा हा चाकणमधला मोर्चा होता.

एक लक्षणीय घटना इथे नमूद करायला हवी. आधी निषेधाचा एक मार्ग म्हणून राष्ट्रध्वज जाळायचा काही मोर्चेकऱ्यांचा विचार होता. त्याला विरोध करणारे एक पत्र चाकणच्या मामा शिंदे यांनी लिहिले होते व ते संपूर्ण पत्र वारकरीच्या पहिल्याच पानावर १५ डिसेंबर १९७९ रोजी प्रकाशितही करण्यात आले होते. त्याचा आशय संक्षेपात सांगायचा तर असा होता :

'जो राष्ट्रध्वज अनेक देशभक्तांच्या त्यागातून आणि रक्तातून निर्माण झाला, ज्याच्यासाठी कितीतरी ज्ञात आणि अज्ञात देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्या राष्ट्रध्वजाचे रक्षण करणे हेच आपले ब्रीद आहे. आमच्या सरकारचा राग आम्ही त्या राष्ट्रध्वजावर का काढणार? राष्ट्रध्वज जाळून सत्याग्रह करू नका. अन्य कोणत्याही सत्याग्रही

मार्गाचा अवलंब व्हावा. त्यात सर्व जण तुमच्या पाठीशी उभे राहतील.'

मामा शिंदे स्वतः ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक होते व मागे लिहिल्याप्रमाणे चाकणमधले पहिले झेंडावंदन त्यांच्याच मार्गदर्शनाखाली झाले होते. पत्रातील त्यांची भावना समजण्यासारखी होती. परंतु त्यांच्या पत्राखालीच स्वतः जोशींनी आपली प्रतिक्रिया प्रसिद्ध केली होती. त्यात त्यांनी लिहिले होते,

> इंग्रजांना देशातून काढून लावल्यानंतर ज्यांच्या हाती सत्ता आली, ते भारतीयांच्या सुखदुःखाबद्दल इंग्रजांपेक्षाही अधिक बेपर्वा राहिले. कच्चा माल स्वस्तात स्वस्त विकत घेऊन, कारखानदारी माल महागात महाग विकणे, हे इंग्रजांचेच वसाहतवादी तंत्र नवीन राज्यकर्त्यांनी चालू ठेवले. भारतावरचे इंग्रजांचे राज्य गेले, पण इंडियाची जुलमी राजवट चालू झाली... काँग्रेसच्या स्थापनेनंतरच्या काळात मवाळपक्षीय लोकांना इंग्रज राणीचे राज्य मान्य होते. इंग्रजांच्या 'युनियन जॅक' झेंड्याला ते भारताचाच ध्वज मानीत. स्वतंत्र भारताची स्वप्ने पाहणाऱ्यांना जहाल, अराजकवादी अशी नावे ठेवत. मामा शिंदे यांची मनःस्थिती त्या काळच्या मवाळांप्रमाणे आहे... सत्याग्रहाच्या तंत्राबद्दल महात्मा गांधींच्या हयातीतही अनेक वादविवाद होते. सत्याग्रहात नेमके काय करता येते आणि काय करता येत नाही हे ठरवणारे कोणतेही धर्मपीठ नाही. मोर्चे, मिरवणुका ही जुनी साधने आज निरुपयोगी झाली आहेत. मामलेदार, कलेक्टर यांच्या कचेरीसमोर दररोज आठ-दहा मोर्चे येतात, पोलीस त्यांना योग्य वाटेल ती कारवाई करतात, ती झाली की संपली चळवळ. अशा मार्गांनी जनतेचा उत्साहभंग होतो, अवसानघात होतो... राष्ट्रध्वजावर काव्य म्हणणे सोपे आहे, पण ज्यांच्या जीवनात काव्य कधी शिरलेच नाही, त्या शेतकऱ्यांना त्याचे काय हो! दररोज शेकड्यांनी होणाऱ्या तथाकथित सत्याग्रहांतला हा आणखी एक नाही. हा गंभीर कायदेभंग आहे. त्याचे परिणाम भोगण्याची सत्याग्रहींची तयारी आहे. त्यांची वेदनाही तितकीच मोठी आहे.

कुठल्याही प्रकारचा संघर्ष करायची त्या काळात जोशींची कशी तयारी झाली होती याचे ही प्रतिक्रिया म्हणजे एक द्योतक आहे.

पुढे नेमके काय झाले ते स्पष्ट नव्हते. अगदी अलीकडेच माझ्या चाकणच्या एका भेटीत याबद्दल मी मामा शिंदे यांच्याकडे चौकशी केली असताना, ''सुदैवाने मोर्च्यात राष्ट्रध्वज जाळण्यात आला नाही. माझ्या प्रखर विरोधामुळे तो बेत बारगळला,'' असे त्यांनी सांगितले.

मोर्च्याला मिळालेला प्रतिसाद अभूतपूर्व होता. 'ह्या बामणाच्या मागे कोण जातंय!' अशीच सुरुवातीची प्रतिक्रिया होती. एक वरिष्ठ पक्षनेते म्हणाले होते, ''भामनेर हा माझा भाग आहे. तेथून शेतकरी संघटनेच्या मोर्च्याला दहा लोकसुद्धा जमायचे जाहीत. जमले तर मी राजीनामा देईन.'' पण प्रत्यक्षात ६,००० लोक मोर्च्यात व २,००० नंतरच्या सभेत सामील

झाले! विशेष म्हणजे त्यात १,००० महिलादेखील होत्या. तसे पाहिले तर कांदा शेतकरी ह्या मोर्च्यात थोडे होते; मुख्यतः भातशेती करणारे व आदिवासी जास्त होते. बहुधा त्यांनाच रस्ता नीट नसल्याची सर्वाधिक झळ पोचत होती. पण एकूण प्रतिसाद थक्क करणारा होता.

पुढे सरकारने हे काम हाती घेतले व संघटनेनेही साराबंदी तहकूब केली. शासनाच्या नेहमीच्या कूर्मगतीने केव्हातरी काम पूर्णही झाले. अर्थात आज इतक्या वर्षांनीसुद्धा चाकण-वांद्रे ह्या रस्त्याचा दर्जा अगदीच सुमार आहे.

रूढ अर्थाने विधायक कार्य म्हणता येईल असे जोशींचे हे शेवटचेच काम ठरले. एकूणच प्रचलित स्वरूपाच्या ग्रामविकासाच्या कार्याविषयी त्यांचे मत खूप प्रतिकूल बनत गेले होते. यानंतर त्यांनी शेतकरी आंदोलन हाच आपला एक-कलमी कार्यक्रम ठरवला व आयुष्यभर तो निर्णय कायम ठेवला.

जानेवारी १९८०पासून निर्यातबंदीमुळे पुन्हा एकदा भाव घसरू लागले. कांद्याला त्याच्या दर्ज्याप्रमाणे क्विंटलमागे रुपये ५० ते ७० असा किमान भाव मिळावा ह्या मागणीला चाकण बाजार समितीतील व्यापाऱ्यांनीसुद्धा पाठिंबा दिला होता. 'विक्रीसाठी कांद्याचा जेव्हा बाजारात लिलाव केला जाईल, तेव्हा ह्या भावापेक्षा कमी बोली असेल, तर आम्ही स्वतःच ती स्वीकारणार नाही,' असे त्यांनी जाहीर केले. वारकरीच्या ९ फेब्रुवारी १९८०च्या अंकात त्यांनी तसे एक पत्रकच प्रसिद्ध केले होते.

यावेळी आंदोलनाचे स्वरूप काय असावे ह्याबद्दल जोशींनी बऱ्याच विस्ताराने मांडणी केली होती. सुरुवातीलाच त्यांनी म्हटले होते की सध्या शेतकऱ्यांनी कांदा बाजारात आणूच नये; कारण एकदा तो बाजारात आणला, की मग परत तो आपल्या शेतावर नेता येत नाही, मिळेल त्या भावाला विकावा लागतो. त्याऐवजी आपल्या शेतावरच जिथे सावली असेल किंवा कोरडी जमीन आणि वर छप्पर असेल अशा जागी शेतकऱ्यांनी कांदा साठवून ठेवावा; २०% खाद (कांद्यातील पाण्याचे खताच्या वापरामुळे वाढलेले प्रमाण) असेल तर किमान ५० रुपये क्विंटल भाव मिळावा, व अजिबात खाद नसेल, म्हणजेच कांद्याचे ढीग उत्तम असतील, तर किमान ७० रुपये भाव मिळाला पाहिजे. तसा भाव मिळेल, तेव्हाच तो कांदा बाजारात आणावा.

अनेक शेतकऱ्यांना घेतलेली कर्जे फेडण्याची निकड लागलेली असते आणि त्यामुळे कांदा बाजारात आणण्याची ते घाई करतात. शेतकऱ्यांना कर्जाबद्दल सवलती देण्याच्या अनेक घोषणा झालेल्या आहेत. तेव्हा येत्या दोन-तीन महिन्यांत भांडीकुंडी उचलण्याच्या घटना घडणार नाहीत अशी अपेक्षा आहे. पण जर भांडीकुंडी जप्त करण्याचे वा जमिनीचे लिलाव पुकारण्याचे प्रयत्न झालेच, तर गावातील सर्व शेतकऱ्यांनी तोट्यात कांदा विकणे भाग पाडू नका अशी विनंती त्या अधिकाऱ्यास करावी. एवढे करूनही त्यानी आपला हेका कायमच ठेवला, तर सर्व शेतकऱ्यांनी आलेल्या अधिकाऱ्यास शांतपणे व संपूर्ण अहिंसात्मक मार्गाने 'घेराव' घालावा. अशा तऱ्हेने सत्याग्रह करून शेतकऱ्यांनी आपला निर्धार दाखवला पाहिजे.

निर्यातबंदी हटवावी म्हणून १ मार्च १९८०पासून शेतकऱ्यांनी चाकणमध्ये 'रास्ता रोको' सुरू केले. प्रत्यक्ष रस्ता अडवायचा प्रकार ह्या वेळी आंदोलनात प्रथमच घडला. तसे पाहिले तर ह्यापूर्वी अनेकदा बाजारात सतत पडणारे भाव पाहून जोशी बाजारपेठेसमोर भाषणे करत, कमी भावात कांदा न विकण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करत. काही जण त्यांचे म्हणणे मानत, काहींना आपल्या गरजेपोटी येईल त्या भावाने कांदा विकणे भाग पडे. आपल्या भाषणांचा काही परिणाम होत नाही हे पुन्हा पुन्हा पाहिल्यावर वैतागलेले जोशी म्हणत, ''आपण सगळे चाकणवरून जाणारा पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग अडवून धरू. तसे केले की सगळीकडे खळबळ माजेल व आपल्या मागणीची दखल घेणे सरकारला भाग पडेल. चला, तुम्ही सगळे या माझ्या मागे.''

एवढे बोलून जोशी स्वतः चालू लागत. सुरुवातीला उत्साहाने ६०-७० शेतकरी त्यांच्या मागोमाग बाजारपेठेपासून हमरस्त्यापर्यंत यायला निघत. पण मग एकेक करत ते गळून पडत. कोणाला घरी जायची घाई असायची, कोणाला गावात उरकायचे दुसरे काही काम आठवायचे. खरे म्हणजे बहुतेकांना अशा काही आंदोलनाची सवयच नव्हती. ते शासनाबरोबरच्या कुठल्याही प्रकारच्या संघर्षाला घाबरत. त्यापेक्षा आपल्या अडचणी सहन करणे व कसेतरी दिवस रेटून नेणे हेच पिढ्यानुपिढ्या त्यांच्या अंगवळणी पडले होते. जेव्हा महामार्गापर्यंत जोशी पोचत, तेव्हा जेमतेम सात-आठ जण जोशींसोबत उरलेले असत व इतक्या कमी जणांनी रस्ता रोखून धरण्याचा प्रयत्न करणे शक्यच नसायचे.

असे पूर्वी खूपदा झाले होते व त्यामुळे ह्या वेळेला तरी शेतकरी कितपत प्रतिसाद देतील ह्याविषयी साशंकता होती. पण गेल्या काही महिन्यांत शेतकरी संघटनेने बऱ्यापैकी जागृती केली होती. त्यामुळे त्या १ मार्चला चांगले चार-पाचशे शेतकरी घोषणा देत देत त्यांच्यामागे जाऊ लागले. सगळ्यांनी महामार्गावर येऊन रस्त्यावर बैठक मारली. दोन्ही बाजूंनी जाणारी-येणारी वाहने थांबली. जोरजोरात घोषणा सुरू झाल्या होत्या. वातावरण तंग झाले.

जवळ मोठ्या प्रमाणावर पोलीस फौजफाटा तयारच होता. वरून हुकूम येताच पोलिसांनी भराभर रस्त्यावर बसलेल्या शेतकऱ्यांना ओढत ओढत वाहनांमध्ये कोंबले. जे प्रतिकार करत होते त्यांना लाठ्यांचे तडाखे खावे लागले. पंधरा-वीस मिनिटांत रस्ता मोकळा झाला. एकूण ३६३ शेतकरी पकडले गेले; दुसऱ्या दिवशी त्यांना जामीनावर सोडण्यात आले. अर्थात आंदोलनाची तीव्रता कमी झाली नाही. ५ मार्चच्या आत शासनाने कांदाखरेदीच्या भावाबाबत योग्य तो निर्णय न घेतल्यास ५ मार्चपासून आपण आमरण उपोषण सुरू करू असे जोशींनी जाहीर केले.

शेवटी ५ मार्चच्या सकाळी सरकारने ५० ते ७० रुपये भावाने कांदा खरेदी करायचे जाहीर केले; पण प्रत्यक्षात मात्र त्या आश्वासनाची पूर्तता केली नाही. नाइलाजाने ८ मार्च रोजी जोशींनी आपले आयुष्यातले पहिले बेमुदत उपोषण सुरू केले.

लीलाताईंनाही त्यांनी त्याबद्दल काहीच कळवले नव्हते. त्यांना ते उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी पेपरात वाचल्यावर कळले. लीलाताई त्यामुळे खूपच नाराज झाल्या. त्यांनी लगोलग

चाकणला धाव घेतली. 'मला न विचारता, न सांगता तुम्ही असं एकदम उपोषण सुरू करताच कसे?' हा त्यांचा स्वाभाविक प्रश्न होता. कशीबशी जोशींनी पत्नीची समजूत काढली. बऱ्याच वर्षांनंतर ह्या घटनेकडे मागे वळून बघताना जोशी म्हणाले,

''सेनापती स्वतः जेव्हा रणांगणात उतरतो, आपला स्वतःचा जीव पणाला लावतो, तेव्हाच त्याचे सैनिक स्वतः लढायला तयार होतात. त्या वेळी माझ्या पोटातली तिडीकच अशी होती, की तिथे बाजारात बसल्याबसल्याच मी बेमुदत उपोषण करायचं ठरवलं. हा काही खूप साधकबाधक विचार करून घेतलेला निर्णय नव्हता. त्यापूर्वी मी आयुष्यात कधीही उपोषण वगैरे काही केलं नव्हतं. घरातही मी एकदाही उपास वगैरे केलेला नाही. एका तिरीमिरीतच मी तो निर्णय घेतला व लगेच उपोषणाला बसलोसुद्धा. एका अर्थाने माझी ती सत्त्वपरीक्षा होती. स्वतःच्या जिवाची काहीही पर्वा न करता मी ह्या आंदोलनात पडलो आहे, ह्याची त्यामुळे माझ्या कार्यकर्त्यांची खात्री झाली. त्यानंतरही मी स्वतः जो धोका पत्करायला तयार नव्हतो, तो धोका पत्करायला मी माझ्या कार्यकर्त्यांना कधीही भरीस घातलं नाही. त्यांनी जे भोगलं ते सर्व मी स्वतःही त्यांच्याआधी भोगलं. त्यामुळेच हे शेतकरी आंदोलन उभं राहू शकलं.''

जोशी यांचे उपोषण चालू असताना १० मार्च ते १६ मार्च निघोजे गावच्या शेतकऱ्यांनी एक अभिनव प्रकार केला. गावचे सरपंच वसंतराव येळवंडे यांचा त्यात पुढाकार होता. गावातले शंभरएक शेतकरी आपापल्या बैलगाड्या घेऊन छोट्या छोट्या गटांनी निघाले. साधारण दोन-तीन किलोमीटरचा तो रस्ता होता. वाटेत त्यांचे भजन-कीर्तन सारखे चालूच होते. आपण कुठल्यातरी लग्नाला वऱ्हाड घेऊन चाललो आहोत, असे त्यांनी इतरांना व पोलिसांना भासवले. रात्रीच्या काळोखात आपापल्या बैलगाड्या त्यांनी पुणे-नाशिक रस्त्यावर आणून उभ्या केल्या, त्या बैलगाड्यांना मारके बैल बांधले व 'रास्ता रोको' सुरू केले. ह्या शेतकऱ्यांचा उत्साह खूप मोठा होता. ह्या वृषभदलापुढे पोलिसांची चांगलीच पंचाईत झाली. त्यांना कसे हटवायचे व रस्ता मोकळा करायचा हे पोलिसांना कळेना. ह्या निघोजेकर मंडळींची आणखी एक भन्नाट कल्पना होती. हजार बैलगाड्या घेऊन असेच भल्या पहाटे पुण्यात शिरायचे आणि पुण्यातला सगळ्यात गर्दीचा असा अख्खा लक्ष्मी रोड बंद करून टाकायचा! त्याप्रमाणे आसपासचे शेतकरी चारेकशे बैलगाड्या घेऊन चाकणला दाखलदेखील झाले होते. पण आंदोलनात आणखी कटकटी निर्माण व्हायला नकोत, म्हणून कुणीतरी निघोजेकरांची कशीबशी समजूत घातली आणि हा अतिप्रसंग टाळला.

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग बंद पडल्यामुळे सगळीकडे खळबळ माजली. हजारो ट्रक अडकून पडले होते. आंदोलनाचे पडसाद पार दिल्लीपर्यंत उमटले. १५ मार्च रोजी लोकसभेत शासनातर्फे निवेदन करण्यात आले, की नाफेडला रुपये ४५ ते ७० प्रती क्विंटल ह्या दराने कांदा खरेदी करायचे आदेश देण्यात आले आहेत. संघटनेची मागणी बहुतांशी मंजूर झाली आहे म्हणून जोशींनी आंदोलन मागे घेतले. १६ मार्च रोजी अशा प्रकारे रस्ता रोकोची यशस्वी सांगता झाली व त्याचदिवशी जोशींनी आपले आदले आठ दिवस चालू असलेले उपोषण सोडले.

ह्या आंदोलनाची वृत्तपत्रांनी बऱ्यापैकी दाखल घेतली; आधीच्या दोन आंदोलनांकडे त्यांनी तसे दुर्लक्षच केले होते. त्यामुळे शेतकरी आंदोलनाची प्रथमच राज्यभर चर्चा सुरू झाली.

'आम्ही कांदा खरेदी ३० जूनपर्यंत चालू ठेवणार आहोत, त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला कांदा बाजारपेठेत आणण्याची घाई करू नये. आपल्या घरीच तो नीट साठवावा, निवडावा आणि सोयीनुसार बाजारपेठेत आणावा,' असे एक निवेदन नाफेडने काढले होते. किंबहुना वारकरीमध्ये अर्धे पान जाहिरात म्हणून ते प्रसिद्धही केले गेले होते. पण प्रत्यक्षात २३ एप्रिल रोजीच नाफेडने कांदाखरेदी बंद केली व त्याविरुद्ध जोशींनी आपले दुसरे बेमुदत उपोषण सुरू केले. ही घटना १ मेची.

३ मे रोजी आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा आरोप ठेवून जोशींना पोलिसांनी पकडले व पुण्याला ससून हॉस्पिटलला हलवले. जोशी यांच्या आठवणीप्रमाणे अजित निंबाळकर हे तेव्हा पुण्याचे कलेक्टर होते व आंदोलनात त्यांनी बरेच लक्ष घातले होते. हॉस्पिटलमध्ये जोशींना चांगली सेवा मिळेल याची त्यांनी तजवीज केली होती. पण वैद्यकीय उपचारांना जोशींनी साफ नकार दिला. ''माझे उपोषण म्हणजे आत्महत्येचा प्रयत्न नाही. त्यामुळे ज्या आरोपावरून मला पकडले गेले आहे, तो आरोप मुळातच अगदी चुकीचा आहे,'' असे त्यांनी कोर्टात सांगितले. त्या मुद्द्यावर पुढे बरेच महिने चर्चा होत राहिली.

यावेळी बरेच शेतकरी आपापल्या मालासह चाकणच्या बाजारसमितीसमोर ठिय्या देऊन होते, जोशींच्या आदेशाप्रमाणे त्यांनी माल विकला मात्र नव्हता. एक दिवस दुपारी अचानक हवा पावसाळी झाली. पाऊस सुरू झाला तर कांदा भिजेल, त्याचा चिखल होईल व सगळा माल अक्षरशः पाण्यात जाईल अशी भीती साहजिकच काही शेतकऱ्यांना वाटली. आंदोलन फोडायला उत्सुक असलेले काही फितूर होतेच. त्यांनी 'कशाला या जोशींच्या नादी लागता! आत्ताची वेळ येईल त्या भावाला कांदा विकून टाकू, मग पुढच्या वेळेला बघू आंदोलनाचं काय करायचं ते,' अशी कुजबुज सुरू केली. बरेच शेतकरी गोंधळात पडले. सच्चे कार्यकर्ते जोशींच्या मागे होते, पण मालाचे नुकसान होईल ही भीती त्यांनादेखील होतीच. शेतकरी संघटनेच्या दृष्टीने हा अगदी कसोटीचा क्षण होता.

अशावेळी लीलाताई आंदोलनाच्या स्थळी आल्या. आल्या-आल्या अनेक शेतकऱ्यांनी त्यांना विनंती केली की, ''एवढा आजचा दिवस आम्हाला आमचा कांदा विकून टाकायची परवानगी द्या. पुढच्या वेळेला आम्ही शेवटपर्यंत कळ काढू.''

त्यावेळी चाकण बाजारपेठेत जमलेल्या शेतकऱ्यांसमोर लीलाताईंनी खूप झुंझार भाषण केले. त्या म्हणाल्या,

''ज्या कोणाला आपला कांदा विकावा असं वाटत असेल, त्याने तो खुशाल विकावा. पण सर्वच्या सर्व शेतकऱ्यांनी जरी हे आंदोलन सोडायचं ठरवलं, तरी ह्या कामासाठी माझ्या नवऱ्याने सुरू केलेलं उपोषण त्याने सोडावं असं मी मुळीच म्हणणार नाही! माझ्या कुंकवाचा बळी पडला तरी चालेल, पण मी आता माघार घेणार नाही. इतकंच नव्हे तर माझा नवरा,

मी, आमची गाडी, आमचे दोन बैल, आणि आमचा डॅश कुत्रा ह्या रस्त्यावर बसू आणि आम्ही हे आंदोलन असंच पुढे चालवू.''

लीलाताई जेव्हा आंदोलनस्थळी आल्या व त्यांनी भाषण करावे अशी काही जणांनी त्यांना विनंती केली, तेव्हा त्या मंडळींची अपेक्षा अशी होती, की त्या साहेबांचा जीव वाचावा म्हणून, तात्पुरती का होईना पण, आंदोलनाला स्थगिती देतील आणि मग आपला कांदा आपण येईल त्या भावाला नेहमीप्रमाणे विकून मोकळे होऊ. पुढचे पुढे. प्रत्यक्षात उलटेच काहीतरी घडले. समोर शेकडो शेतकरी स्त्रियाही उपस्थित होत्या व लीलाताईंच्या भाषणाने त्या अगदी पेटून उठल्या. त्यांतील एक उत्स्फूर्तपणे उभी राहिली व म्हणाली,

'''माझं कुंकू पुसलं गेलं तरी हरकत नाही, पण आता मी माघार घेणार नाही,' असं आत्ता साहेबांच्या बाई म्हणाल्या. त्या जर एवढया मोठ्या त्यागाला तयार असतील, तर मग मीही आता मागे हटणार नाही. बाकी पुरुष शेतकरी भले पळून जावोत, आम्ही शेतकऱ्यांच्या बाया आता हे रास्ता रोको चालूच ठेवू. ही लढाई आम्ही लढतच राहू. आमचं जे काय व्हायचं असेल ते होऊन जाऊ दे.''

बायकांनी घेतलेला हा अनपेक्षित पुढाकार पाहून मग सगळेच शेतकरी पुन्हा एकदा रास्ता रोको करायला पुढे झाले. सगळेच वातावरण एकदम बदलून गेले. त्वेषाने जोरजोरात घोषणा सुरू झाल्या. नाफेडच्या अधिकाऱ्यांना सगळ्यांनी बाजार समितीतल्या त्यांच्या कार्यालयातच कोंडले. आंदोलनाची तीव्रता एकदम वाढली. सरकारी अधिकारी व हजर असलेले पोलीसही गांगरून गेले. शेतकऱ्यांच्या निर्धारापुढे मग सरकारी यंत्रणेला झुकावे लागले.

लीलाताईंचे ते वीरश्रीपूर्ण भाषण म्हणजे कांदा आंदोलनातील एक नाट्यपूर्ण व निर्णायक क्षण होता. शिवकाळात कोंढाणा किल्ला सर करताना शेलारमामाने जी भूमिका बजावली होती व आपल्या पळून जाणाऱ्या मावळ्यांना चेतवून पुन्हा एकदा लढाईसाठी सज्ज केले होते, तशीच काहीशी भूमिका ह्या वेळी लीलाताईंनी बजावली होती. मामा शिंदे व त्या रोमांचक क्षणाचे साक्षीदार असलेले त्यावेळचे चाकणमधील इतरही काही कार्यकर्ते आजही ही आठवण पाणावलेल्या डोळ्यांनी सांगतात.

शेवटी नाफेडचे पाटील नावाचे एक अधिकारी चाकणला आले व त्यांनी वाटाघाटी करून क्विंटलला ५० ते ६० रुपये हा भाव मान्य केला. हा विजय मोठा होता; कारण त्या वेळी कांद्याचा भाव १५ रुपये क्विंटलपर्यंत कोसळला होता. त्यामुळे मग ६ मे रोजी, सहाव्या दिवशी, जोशींनी आपले हे दुसरे उपोषण सोडले.

निर्यातबंदी घालणे व आंदोलन तीव्र झाले तर ती तेवढ्यापुरती उठवणे हे एक दुष्टचक्रच सुरू झाले होते. ह्याचीच पुनरावृत्ती पंधरा दिवसांनी झाली. २८ मे १९८० रोजी खेड तालुक्यातील विधानसभेची निवडणूक होणार होती. सगळीकडे धामधुमीचे वातावरण होते. पण त्याचवेळी चाकणच्या बाजारपेठेत मात्र शेतकरी खूप काळजीत होते. ह्यावेळी नाफेडने वरकरणी खरेदी चालू ठेवली होती, पण प्रत्यक्षात ते कांदा खरेदी करत नव्हते; काही ना काही

कारण दाखवून आलेला कांदा परत पाठवत होते.

शनिवार, २४ मेची दुपार. मोठ्या संख्येने कांद्याचे ढीग लिलावासाठी बाजारसमितीच्या आवारात पडून होते पण नाफेडतर्फे त्यातले फक्त दहा टक्के ढीग खरेदी केले गेले; बाकीचे 'रिजेक्ट' म्हणून तसेच पाडून ठेवले गेले. त्या 'रिजेक्ट' ढिगांचे काय करायचे ह्या काळजीने शेतकरी हवालदिल झाले होते.

दिवसभरात जोशी यांनी नाफेडच्या अधिकाऱ्यांशी वारंवार चर्चा केली, पुण्याला जाऊन ते मुद्दाम कलेक्टरनाही भेटून आले. 'उद्या रविवार असूनही खरेदी चालू ठेवू व उद्या व्यवस्थित व्यवहार होईल' असे आश्वासन त्यांनी मिळवले.

त्यानुसार रविवारी पुन्हा खरेदी चालू झाली. पण ढीग नाकारण्याचे प्रमाण तेच कायम होते. उदाहरणार्थ, बाजीराव शिंदे या दलालाच्या गाळ्यासमोर कांद्याचे ४२ ढीग होते, पण त्यांपैकी नाफेडने फक्त एक ढीग खरेदी केला. इतर दलालांच्या गाळ्यांसमोरही साधारण हेच प्रमाण होते. शंकरराव वाघ, बाबूलाल परदेशी व जोशी सतत बाजारपेठेत फिरत होते. शेतकरी त्यांच्यापाशी मोठ्या प्रमाणावर तक्रारी घेऊन येऊ लागले. नाकारलेले ढीग का नाकारले गेले याची माहिती व्यवस्थित भरून घेण्यासाठी शेतकरी संघटनेने काही फॉर्म छापून घेतले होते. त्यात ती माहिती भरली जात होती. एकूण २०० अर्ज छापून घेतले होते व ते सर्व भरले गेले. शेवटी कोऱ्या कागदावर ही माहिती भरून घ्यायला संघटनेने सुरुवात केली. तसे कोऱ्या कागदावरचेही ४५० अर्ज भरले गेले, पण तरी तक्रार करणाऱ्या शेतकऱ्यांची गर्दी एवढी होती, की त्यांचे आता काय करायचे हा प्रश्नच होता.

लांबलांबचे शेतकरी इथली कांद्याची बाजारपेठ मोठी, म्हणून मुद्दाम आपला माल इथे घेऊन येत. असेच अहमदनगरमधील पारनेर तालुक्यातील काही शेतकरी २५ दिवसांपूर्वी आले होते, पण अजूनही त्यांचा कांदा विकत घेतला गेला नव्हता. ते शेतकरीही रस्त्यावरच मुक्काम ठेवून होते. एव्हाना त्यांचा धीर पार खचला होता. बाजारसमितीत येऊन ते अक्षरशः रडायलाच लागले. ते म्हणत होते, ''आमच्या कांद्याकडे कोणीच ढुंकून पाहत नाही. तीन आठवडे झाले आम्ही इथे बसून आहोत. आम्हाला कोणीच वाली नाही. काहीही करा पण आता आमचा निर्णय लावा.''

पण नाफेडच्या अधिकाऱ्यांवर त्याचा काहीही परिणाम होत नव्हता. 'उद्यापासून व्यवस्थित व्यवहार होईल' हे त्यांचे आश्वासन फक्त तोंडदेखलेच होते. एक ढीग असा होता, की त्याची खरेदी ६० रुपये क्विंटल दराने व्हायला हवी होती. पण तो ढीगही नाफेडच्या अधिकाऱ्यांनी नामंजूर केला. जोशी स्वतः त्यावेळी ढिगाजवळ उभे होते व त्यांनी स्वतः तपासून तो ढीग उत्तम असल्याचे सांगितले. पण अधिकारी ऐकेनात. ही म्हणजे जणू उंटाच्या पाठीवरची शेवटची काडी होती. संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी संघटनेच्या बाजूने व नाफेडच्या विरोधात घोषणा द्यायला सुरुवात केली व लिलाव बंद पाडला. शेतकरी तसेच पुणे-नाशिक महामार्गावर आले, मोठ्या प्रमाणावर रस्त्यालगतचे दगड गोळा करून त्यांनी ते रस्त्यात ठेवले व त्यांनी स्वतःही तिथेच बसकण मारली. पुन्हा एकदा रास्ता रोको सुरू झाले.

आता कुठलेच वाहन आरपार जाणे शक्य नव्हते. एव्हाना आंदोलकांची संख्या चार-पाच हजाराच्यावर गेली होती. गंमत म्हणजे अडकलेल्या वाहनांमध्ये एक वाहन होते मुंबईचे झुंजार कामगारनेते व आमदार डॉ. दत्ता सामंत यांचे. एका प्रचारसभेसाठी त्यांना मंचरला जायचे होते, पण त्यांना पुढे जाता येईना. चालत चालत ते आंदोलकांपाशी गेले व तिथला माइक घेऊन त्यांनी ''कामगारवर्ग लढणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहील'' असे ठणकावून सांगितले. त्यानंतर जोशींच्या सांगण्यावरून त्यांच्या वाहनाला तेवढी वाट मोकळी करून दिली गेली. दोन दिवसांनंतर होणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार घालायचे सभेत ठरले. बघता बघता संध्याकाळचे पाच वाजले.

महामार्ग बंद पडल्याने वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली होती. दरम्यान बराच मोठा फौजफाटा घेऊन पोलीस घटनास्थळी हजर झाले. आंदोलकांना त्यांनी चारी बाजूंनी वेढले. बाबूलाल परदेशी त्यावेळी भाषण करत होते. एक इन्स्पेक्टर पुढे झाला व त्याने त्यांच्या हातातला माइक हिसकावून घेतला. पण तेवढ्यात जोशींनी तो ओढून आपल्या हातात घेतला व ते बोलायचा प्रयत्न करू लागले. समोर जमलेल्या शेतकऱ्यांना उद्देशून त्यांना काहीतरी आवाहन करायचे होते. पण ते काही बोलायच्या आतच त्या इन्स्पेक्टरने त्यांच्याही हातातला माइक हिसकावून घेतला व 'सर्व आंदोलकांना अटक करण्यात येत आहे' असे जाहीर केले. 'आम्ही इथून हलणारच नाही, तुम्ही काय वाट्टेल ते करा,' असे म्हणत जोशींनी व इतर कार्यकर्त्यांनी रस्त्यातच बसकण मारली. ते ऐकेनात म्हणून शेवटी एकेक करत त्यांना चार-चार पोलिसांनी उचलले व एका पोलीस गाडीत कोंबले. आंदोलकांना पकडण्यासाठी पोलिसांनी पाच एसटी बसेस व दोन मोठ्या पोलीस गाड्या तयार ठेवल्या होत्या. त्यात सगळ्यांना कोंबण्यात आले व गाड्या तिथून निघाल्या. पोलिसांनी जोशींना व त्यांच्याबरोबर एकूण ३१६ आंदोलनकर्त्यांना अटक केली.

रात्री दहा वाजता चाकणमध्येच त्यांना मॅजिस्ट्रेटसमोर उभे केले गेले. आधी असे वाटले होते, की त्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून दुसऱ्या दिवशी सोडून दिले जाईल. पण ह्यावेळी शासनाने ताठर भूमिका घेतली होती. १७ फेब्रुवारीपासूनच राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली होती. सगळ्यांना १० दिवसांचा रिमांड दिला गेला. जोशींना इतर सात कार्यकर्त्यांसह औरंगाबाद येथील तुरुंगात डांबण्यात आले. इतरांची रवानगी वेगवेगळ्या तुरुंगांत केली गेली. त्या कारावासातील अनुभवावर आधारित 'सजा-ए-औरंगाबाद' नावाची एक रसाळ लेखमाला वारकरीमध्ये (१२ जुलै ते १३ सप्टेंबर १९८०) बाबूलाल परदेशी यांनी लिहिली होती.

आंदोलकांना ह्यावेळी पोलिसांचा चांगला अनुभव आला. बरेचसे पोलीस म्हणजे स्वतः शेतकऱ्यांची मुले होती. शेतकऱ्यांच्या मागण्या अगदी न्याय्य आहेत, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे कदाचित त्यांच्या मनात आंदोलनकर्त्यांविषयी काहीशी सहानुभूती होती. सर्वांत चांगला अनुभव आला तो औरंगाबाद जेलच्या प्रमुख जेलरचा. त्यांनी सुरुवातीलाच सगळ्यांना सांगितले,

''तुम्ही शेतकऱ्यांच्या हिताचं काम करत आहात. कैद्यांच्या दृष्टिकोनातून आम्ही तुम्हाला वागवणार नाही. ह्या जेलमध्ये ए किंवा बी दर्ज्याच्या कैद्यांची सोय नाही, त्यामुळे तुम्हाला सर्वसाधारण कैद्यांप्रमाणेच राहावं लागेल. परंतु आमच्याकडून शक्य होतील तितक्या सगळ्या सोयी आम्ही तुम्हाला उपलब्ध करून देऊ.'' त्यानंतर जेलरसाहेब म्हणाले, ''माझ्या स्वतःच्या तीन एकर शेतातला कांदा अजून शेतात पडून आहे. कांद्याला असाच कमी भाव मिळत राहिला तर मलाही खरोखरच ही शेती परवडणार नाही.''

जेलरसाहेबही समदुःखीच निघाले!

पण असा अनुभव यायचा हा शेवटचाच प्रकार; त्यानंतर मात्र प्रत्येक आंदोलनाच्या वेळी पोलीस शेतकऱ्यांना खूप क्रूरपणे झोडपून काढत.

३ जून रोजी रिमांडचे दहा दिवस पूर्ण होत होते. सगळ्यांना खेड तालुका कोर्टात हजर केले गेले. आंदोलकांच्या वतीने ॲडव्होकेट साहेबराव बुटे व दोन-तीन सहकारी वकिलांनी काम पाहिले. आमदार राम कांडगे हेदेखील काही मदत लागली तर ती करायला तिथे हजर होते. संध्याकाळी पाचच्या सुमारास दहा दिवसांच्या रिमांडमधून सगळ्यांची जामिनावर सुटका झाली.

कांदा आंदोलन चालू असताना जोशी नेहमी शिवकाळाचा संदर्भ देत. तीनशे वर्षांपूर्वी जगाच्या दृष्टीने नगण्य असलेल्या मावळ्यांनी चाकणला इतिहास घडवला. स्वराज्याची लढाई झाली नसती तर कित्येक तानाजी, बाजीप्रभू, येसाजी आणि सावळ्या तांडेल जगाला अज्ञात राहिले असते. त्याचप्रमाणे शेतकरी आंदोलन झाले नसते तर इथले बाबूलाल परदेशी किंवा शंकरराव वाघ यांच्यासारखे हिरे समुद्राच्या तळातल्या रत्नांप्रमाणे अज्ञातच राहिले असते. ह्या सर्व कालखंडात हे दोघे जोशींचे जणू दोन हातच बनले होते. पुढेही अनेक वर्षे त्यांनी आंदोलनात अत्यंत इमानी अशी आणि सन्मानाची कुठलीही अपेक्षा न ठेवता जिवाभावाची साथ दिली. या काळात मामा शिंदे यांचीही खूप मदत झाली. बाकीचे तुरुंगात असताना शेतकऱ्यांचे मनोधैर्य टिकवून ठेवायचे मोठे काम त्यांनी केले.

शेतकरी संघटनेने आंदोलनासाठी प्रथम कांदा हे पीक निवडले हा कदाचित धोरणपूर्वक घेतलेला निर्णय नसेल व त्यामागे मुख्यतः परिस्थितीचाच रेटा असेल, पण ती निवड अगदी अचूक ठरली हे नक्की. सबंध देशामध्ये त्यावेळी कांद्याचे जे पीक येई, त्यापैकी ६० ते ७० टक्के कांदा एकट्या महाराष्ट्रात व्हायचा व त्यापैकी ५० टक्के कांदा हा नाशिक व पुणे जिल्ह्यांच्या फक्त पाच तालुक्यांत व्हायचा. म्हणजे देशातला जवळजवळ एक तृतीयांश कांदा ह्या पाच तालुक्यांत होत होता. एवढ्या सीमित भूभागात इतक्या मोठ्या प्रमाणावर एखाद्या पिकाचे उत्पादन एकवटले आहे, असे एरव्ही दिसत नाही. बाजारपेठेवर नियंत्रण ठेवण्याचे आंदोलकांचे सामर्थ्य उघड होते. कुठल्या शेतीमालाचे आंदोलन कुठे परिणामकारक होऊ शकते ह्याचेही एक भान ह्या आंदोलनाने दिले. जोशींच्या मते विशिष्ट किमतीखाली कांदा विकायचाच नाही हा निर्धार इथल्या शेतकऱ्यांनी केला, तर देशभरच्या ग्राहकांना कांदा अधिक

पैसे देऊन खरेदी करावा लागेल, आंदोलनाचे पडसाद देशभर उमटतील; इतरही शेतकरी असेच आंदोलन उभारू शकतील आणि कांद्याचा लढा ही देशभरातील शेतकरी क्रांतीची सुरुवात ठरू शकेल.

व्यक्तिगत पातळीवर विचार केला तर, आपला 'शेतीमालाला रास्त दाम' हा एक-कलमी कार्यक्रम शतकानुशतके विस्कळित राहिलेल्या, दबलेल्या, पिचलेल्या शेतकरी समाजाला एकत्र आणू शकतो, त्यांनाही आंदोलनासाठी उभे करू शकतो ह्याचा आत्मविश्वासदेखील जोशींना या कांदा आंदोलनाने दिला. शेतकरी संघटनेचे हे पहिलेच आंदोलन. संघटनेचे सामर्थ्य या आंदोलनात सिद्ध झाले.

ह्या आंदोलनात प्रथमच जोशी यांनी रास्ता रोको किंवा उपोषण ह्यांसारखी हत्यारे वापरली. अशा प्रकारचे आंदोलन हा त्यांच्यासारख्या एकेकाळच्या वरिष्ठ सनदी नोकराचा पिंडच नव्हता. शिवाय ते एक अभ्यासकही होते व अशा प्रकारचे आंदोलन हा एखाद्या अभ्यासकाचाही पिंड नव्हे. जोशी यांच्या पूर्वायुष्याकडे पाहता असे काही त्यांच्या भावी आयुष्यात घडू शकेल ह्याचा अदमास कुणीच बांधू शकले नसते, इतके हे आंदोलन त्यांच्या व्यक्तित्वाशी विसंगत होते. 'शेतकरी संघटना हा माझ्या आयुष्यातील एक अपघात आहे,' असे स्वतः जोशी पुढे अनेकदा म्हणाले.

पण हे घडून आले खरे. त्यांच्यासारखा एक गंभीर विचारवंत एक कडवा आंदोलक बनला तो ह्याच काळात. त्यांच्या भावी कार्याची ही नांदी होती. याच पहिल्या ठिणगीतून बघता बघता एक वणवा भडकणार होता.

स्वातंत्र्योत्तर काळाचा विचार केला तर इतके यशस्वी शेतकरी आंदोलन दुसरे कुठले झाल्याचे दिसत नाही. कांदा आंदोलनाचे हे ऐतिहासिक महत्त्व मोठे आहे.

■

# ६

# उसाचे रणकंदन

"Journey of a thousand miles begins with the first step" (हजार मैलांच्या प्रवासाची सुरुवात एका पहिल्या पावलाने होते) हे रशियन क्रांतिकारक लेनिनचे उद्गार प्रसिद्ध आहेत. चाकण येथील कांदा आंदोलन हेदेखील एक मोठ्या प्रवासाचे केवळ पहिले पाऊल आहे ह्याची शरद जोशी यांना हळूहळू जाणीव होत गेली. कारण सगळ्याच शेतकऱ्यांची दुःखे इथूनतिथून सारखीच आहेत हे उघड होत गेले.

ठिकठिकाणचे शेतकरी 'वारकरी'कडे पाठवत असलेल्या पत्रांवरूनदेखील ही गोष्ट अगदी स्पष्ट होत होती. वेळात वेळ काढून जोशी त्यांतील निवडक पत्रांना उत्तरेही लिहीत असत. त्यासाठी रात्रीची झोप त्यांनी शक्य तितकी कमी केली होती. कारण पत्रव्यवहार सांभाळायला त्यांच्याकडे दुसरा कोणी कर्मचारी नव्हता. कार्यकर्ते होते, पण ते तसे लिखापढी करणारे नव्हते. सगळी पत्रे जोशी स्वतःच लिहीत व तीही हाताने. पण त्यात ते कधी कंटाळा करत नसत, कारण ह्या साध्या साध्या पत्रांतूनच अंगारमळ्यातील अंगार इतर ठिकाणीही जाऊन पोचणार होता याची त्यांना खात्री होती. असेच एक पत्र त्यांनी एका सकाळी पत्रपेटीत टाकले. ते होते, निफाडचे एक तरुण तुकाराम निरगुडे पाटील यांना. त्यांच्या त्याच दिवशी आलेल्या एका पत्राचे उत्तर म्हणून. त्या पत्रामागची उत्कटता कुठेतरी जोशी यांना स्पर्शून गेली होती.

चाकण परिसरातील कांद्याइतकाच शेजारीच असलेल्या नाशिक जिल्ह्याच्या निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत बाजारपेठेतला कांदाही खूप प्रसिद्ध होता. तेथील शेतकरीही मोठ्या प्रमाणावर कांदा पिकवत आणि साहजिकच चाकणच्या आंदोलनाकडे तेही डोळे लावून बसले होते. त्यांच्यापैकीच एक होते निरगुडे. निफाड सहकारी साखर कारखान्यात ते कारकुनी करत. शेतीवाडी गावाला होती. राहायला कारखान्याच्या कॉलनीतच जागा होती. संध्याकाळी खोलीवर आल्यावर मिळतील तेवढे सगळे रोजचे पेपर वाचायचा त्यांचा प्रघात होता. असेच एका संध्याकाळी त्यांनी चाकणच्या कांदा आंदोलनाबद्दलचा एक सविस्तर वृत्तान्त वाचला. वाचून ते अगदी भारावून गेले. 'कसेही करून ह्या शरद जोशींना भेटले पाहिजे,' त्यांच्या मनाने घेतले. पण भेटणार कसे? ओळखपाळख काहीच नव्हती.

पण भेटायचा विचार पिच्छा सोडेना. झोपही येईना. शेवटी न राहवून रात्री बारानंतर ते उठले. कोणाकडून तरी आंतर्देशीय मिळवून त्यांनी एक पत्र लिहिले – 'मी तुम्हाला भेटायला येऊ इच्छितो.' अंदाजानेच शरद जोशी, शेतकरी संघटना, चाकण' असा पत्ता लिहिला आणि

सकाळी ते पत्र टपाल पेटीत टाकले. आश्चर्य म्हणजे लगोलगच उत्तरही आले! 'प्रत्यक्ष येऊन भेटावे व चर्चा करावी.'

दुसऱ्याच दिवशी निरगुडे बरोबर भाकऱ्या बांधून नाशिकला गेले व पुण्याच्या एसटीत बसले. 'भेट वादळाशी' ह्या शीर्षकाखालील एका लेखात त्यांनी ह्या पहिल्या भेटीचे रसाळ वर्णन केले आहे. (मा. शरद जोशी अमृतमहोत्सव स्मरणिका, २००९, पृष्ठ १२५)

कारखाना व घर हा परिसर सोडून त्यापूर्वी निरगुडे कुठेच गेले नव्हते; अगदी चाकणलाही नाही. बस कंडक्टरला 'चाकण आले की मला नक्की सांगा' असे सांगून, बस तिथे पोचल्यावरही दोन-चार जणांना विचारून खात्री करून घेत ते उतरले आणि बरीच विचारपूस करत कसेबसे संघटनेच्या कार्यालयात पोचले. आत बाबूलाल परदेशी एकटेच होते. त्यांचे जोशींबरोबर पूर्वीच बोलणे झाले असावे. थोड्याच वेळात जोशी आले. त्यांना पाहताच निरगुडे गांगरले, पण जोशींनी हसतमुखाने त्यांच्याशी बोलून त्यांना आश्वस्त केले. 'चला माझ्याबरोबर,' जरा वेळाने जोशी म्हणाले. कुठे, कशाला काही नाही.

लगेच निरगुडे उठले. बरोबर बांधून आणलेली भाकऱ्यांची पुरचुंडीदेखील घाईघाईत ते बसलेल्या बाकड्याखालीच विसरले! जोशींनी झटक्यासरशी आपली बुलेट सुरू केली. निरगुडे मागे बसले. त्या काळात जोशी खूप वेगात गाडी हाकत. बघताबघता गाडी हायवेला लागली. निरगुडे लिहितात, ''माझ्या आयुष्यात इतक्या वेगाने मोटार सायकल चालवणारा अद्यापतरी कोणी भेटलेला नाही.''

दोघे सरळ पुण्याला जोशींच्या औंधमधील घरी गेले. गप्पा सुरू झाल्या. आपल्या आंदोलनात ह्या पोरसवदा तरुणाचा उपयोग होऊ शकेल, ह्याच्यात काहीतरी वेगळी चमक आहे, हे जोशींना बहुधा जाणवले होते. किंबहुना म्हणूनच त्यांनी तत्परतेने पत्रोत्तर पाठवून निरगुडेंना बोलवून घेतले होते. त्या दृष्टीने त्यांची जुळणी सुरू होती. ते नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्यांची नेमकी माहिती काढू पाहत होते. निरगुडे त्या रात्री जोशी परिवाराबरोबरच जेवले व राहिलेही. ते लिहितात,

> सर्व कुटुंबासह आणि डायनिंग टेबलावर असा मी आयुष्यात प्रथमच जेवत होतो. आग्रह होत होता. मी नको नको म्हणत कसबसा घाबरतच जेवत होतो...त्या रात्री झोप येणं शक्य नव्हतं. मनात विचार चालू होते. ही मोठी माणसं, त्यांच्या सहवासात आपण चुकून आलो. त्यांचं जग वेगळं, आपलं वेगळं. उद्या सकाळी उठून चहा न घेताच इथून एकदाचं पलायन करायचं.

पण प्रत्यक्षात पुढले तीन दिवस जोशींनी त्यांना स्वतःबरोबरच आपल्या प्रवासात सतत ठेवून घेतले. संघटनेच्या आळंदी येथील सभेला निरगुडे त्यांच्याबरोबरच हजर राहिले. किंबहुना त्यांनी स्टेजवर बसावे असा जोशी यांचा आग्रह होता; पण संकोचाने निरगुडेंनी तो मानला नाही. जोशी यांच्या तेथील भाषणाविषयी निरगुडे लिहितात,

मी समोर प्रेक्षकांत बसून एकाग्रतेने तल्लीन होऊन ऐकत होतो. त्यांनी शेतकरी महिलांवर बोलायला सुरुवात केली. मी भान विसरून ऐकत होतो. मला एकाएकी भरून आलं. इतकंच नाही तर अक्षरशः दुःखाश्रू आवरेनासे झाले. कारण साहेब माझ्या आईच्या भोगाचं दुःखच सांगत असल्याचा मला भास होत होता. माझ्या आईने पाठीशी पोर बांधून, डोक्यावर पाटी घेऊन, शेतामातीत व चुलीजवळ कष्टाचे जे कढ सोसले तेच साहेब सांगत होते. जगात सुख काय असतं हे माहीत न होताच आई देवाघरी गेली होती. त्या भाषणाने मी व्याकूळ झालो.

निरगुडेंनी पाहिलेली संघटनेची ही पहिलीच सभा होती. दुसऱ्या दिवशी नारायणगाव येथे व तिसऱ्या दिवशी मंचर येथे झालेल्या संघटनेच्या सभांनाही जोशी त्यांना बरोबर घेऊन गेले. संघटनेचे काम म्हणजे नेमके काय आहे हे निरगुडेंच्या आता पूर्ण लक्षात आले होते. त्या तीन रात्री त्यांचा मुक्काम चाकणजवळील शंकरराव वाघांच्या मळ्यातील घरी होता. जोशींना फक्त एकदा थोड्या वेळासाठी भेटावे ह्या माफक अपेक्षेने, राहण्याचे काहीही सामान बरोबर न घेता आलेले निरगुडे शेवटी चौथ्या दिवशी निफाडला परतले! त्यांना निरोप द्यायला शंकरराव व जोशी स्वतः एसटी स्टँडवर आले होते. ह्या तीन दिवसांत नाशिकला संघटनेचा कार्यक्रम घेण्याविषयी जोशी त्यांच्याशी चर्चा करत होते. त्याविषयी निरगुडे स्वतः खूपच साशंक होते. कारण आपण खूप छोटे आहोत, आपले कोण ऐकणार, असे त्यांना वाटत होते. तरीही त्यांनी 'आपण नक्की नाशिकला कार्यक्रम करू' असे आश्वासन दिले.

जोशी यांचे आडाखे अचूक होते; त्यांची पेरणी फुकट गेली नाही. पुढे निरगुडेंनी आंदोलनात महत्त्वाचे योगदान दिले. ते काम करत होते त्या निफाड साखर कारखान्याचे चेअरमन माधवराव बोरास्ते ह्यांची, तसेच, पुढे शेतकरी संघटनेत खूप प्रभावी नेतृत्व दिलेले माधवराव खंडेराव मोरे ह्यांची जोशींबरोबरची पहिली भेट त्यांनीच घडवून आणली. एका अर्थाने ऊस आंदोलनात ते संप्रेरक (catalyst) ठरले. त्यांच्यात एक कलावंतही दडलेला होता. जोशींवर चित्रपट काढायची त्यांची योजना होती व त्यासाठी पटकथाही त्यांनी लिहिली होती. शेतकरी संघटनेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले.

पण हा सारा नंतरचा भाग झाला; जोशी यांनी सुरुवातीच्या काळात चाकण परिसरापलीकडे जाऊन माणसे कशी जोडली, त्यासाठी किती कष्ट घेतले, किती विचारपूर्वक नियोजन केले ह्याचे हे एक उदाहरण.

संघटनेच्या आळंदी येथील शिबिराविषयी इथे लिहायला हवे. कारण शेतकरी संघटनेचे हे पहिलेच शिबिर असल्याने त्याला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. रविवार, ६ एप्रिल १९८० रोजी सकाळी सुरू झालेले हे शिबिर सोमवार, ७ एप्रिलच्या रात्री संपले. नंतरच्या संघटनेच्या शिबिरांमध्ये बाहेरच्या तज्ज्ञांना फारसे स्थान कधी मिळू शकले नाही; पण हे पहिले शिबिर मात्र त्या बाबतीत वेगळे होते.

पहिल्या सकाळी आपल्या प्रास्ताविक भाषणात जोशींनी शेतकरी संघटनेचा पुढील अष्टसूत्री कार्यक्रम स्पष्ट केला :

१. देशातील दारिद्र्य हे सर्वप्रथम ग्रामीण भागातील शेतकऱ्याचे दारिद्र्य आहे. शहरातील गरिबी हा केवळ ग्रामीण दारिद्र्याचा एक परिणाम आहे.
२. शेतकऱ्याचे दारिद्र्य हे सर्वस्वी कोरडवाहू शेतकऱ्याचे दारिद्र्य आहे.
३. कोरडवाहू शेतकऱ्याचे दारिद्र्य सतत वाढत आहे. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यापासून त्याची परिस्थिती खूपच खालावली आहे.
४. ह्या दारिद्र्याचे कारण हे, की शेतीमालाला नेहमीच अपुरा भाव मिळतो व शेतकऱ्याचा उत्पादनखर्चसुद्धा भरून निघत नाही.
५. कोरडवाहू शेतीचा खर्च पावसाच्या अनिश्चिततेमुळे फार वाढतो. उलटपक्षी हंगामी पावसावर काढलेली सर्व पिके एकदम बाजारात येतात आणि सुगीनंतर सर्व शेतीमालाचे भाव कोसळतात.
६. या परिस्थितीचा फायदा घेऊन इंग्रजांनी देशाचे शोषण केले. 'कच्चा माल स्वस्तात स्वस्त, पक्का माल महागात महाग' हे त्यांचे वसाहतवादी सूत्र. स्वातंत्र्यानंतरच्या काळात राज्यकर्त्यांनी हीच पद्धत चालू ठेवली. भारतावर इंडियाने अंमल बसवला.
७. शेतीमालाचे विविधीकरण, त्याच्या साठवणाची व्यवस्था, शेतीमालावरच्या प्रक्रियेचे उद्योगधंदे, शेतीमालाच्या किमान भावाची हमी अशा कार्यक्रमांऐवजी शहरी नोकरशाहीचा लाभ करून देणारे कार्यक्रम सरकारने राबवले.
८. दीन शेतकऱ्याची आज तथाकथित विधायक मार्गाने जाण्याची ताकद नाही. त्याला तेवढा अवसरही नाही. संघटित लढा हा एकच मार्ग आज त्याला उघडा आहे.

जोशींनंतर सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ वि. मा. कुलकर्णी बोलले. पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात ते 'विकास पत्रकारिता' हा विषय शिकवत. मूळचे ते चाकण परिसरातील कडूस ह्या गावचे. त्यांनी *पायवाट* नावाचे एक साप्ताहिक सुरू केले होते व अतिशय निष्ठेने जवळजवळ एकहाती ते चालवले होते. ग्रामीण भागाकडे कायम होणारे दुर्लक्ष व ग्रामीण अर्थव्यवस्थेची हेळसांड ह्यावर त्यांचा भर होता.

डॉ. मो. वि. भाटवडेकर हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ स्वतःहून अगत्याने शिबिराला हजर राहिले होते. कुलकर्णी यांच्यानंतर ते बोलले. 'अर्थविकास आणि जागृती' हा विषय त्यांनी घेतला होता. उत्पादन वाढले म्हणजे शेतकऱ्याची स्थिती सुधारते का, ग्रामीण भारताची हेळसांड हेतूतः झाली की अजाणतेपणी आणि विकास आधी की जागृती आधी ह्या तीन प्रश्नांचा त्यांनी ऊहापोह केला. हे तिन्ही मुद्दे तसे नावीन्यपूर्ण होते व त्यांवर भाषणानंतर बरीच चर्चा रंगली.

दुपारी शेतकरी संघटनेने चालवलेल्या सध्याच्या लढ्याविषयी व संघटना उभारण्याविषयी चर्चा झाली. प्रत्यक्ष व्यवहारातील बाबींवर त्यात भर होता. रात्री जेवण झाल्यानंतर राष्ट्रीय

समता मंचाच्या कार्यकर्त्यांनी गाण्याचा रसाळ कार्यक्रम सादर केला व तो सर्वांचीच दाद मिळवून गेला.

दुसऱ्या दिवशी विषय होता – सरकारी कामाचा शेतकऱ्यांना येणारा अनुभव. सर्वांचा बोलण्याचा सूर एकच होता – सरकारी कामात भ्रष्टाचार फार आणि कार्यक्षमता शून्य. अपेक्षेप्रमाणे ह्या चर्चेत बऱ्याचशा शिबिरार्थींनी आपले अनुभव सांगितले. शेतकऱ्यांच्या साचलेल्या कर्जाविषयीही ह्या सत्रात सखोल चर्चा झाली.

जेवणानंतरच्या सत्रात ख्यातकीर्त अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी 'शेतीमालाचे भाव' ह्या विषयावर भाषण केले. शेतीमालाची मागणी व त्याचा पुरवठा ह्यांत सुसूत्रता आणणे आणि पक्क्या मालाची मागणी व त्याचा पुरवठा ह्यांतही सुसूत्रता आणणे कसे गरजेचे आहे ह्यावर ते बोलले. संघटित कामगारवर्ग व शेतकरी यांच्यात एकजूट निर्माण करायची असेल, तर त्यासाठी संघटित कामगारांनी आपली स्वार्थी वृत्ती कमी केली पाहिजे असे ते म्हणाले.

शेवटचे सत्र १९८०-८१ साली संघटनेचा कार्यक्रम काय असावा ह्यावर होते. काही महत्त्वाच्या शेतमालाचे किमान भाव ठरवून मागावेत हा मुख्य कार्यक्रम ठरला. पण त्याखेरीज दारिद्र्य हटवण्यासाठी गावातील दारूवरील खर्च तसेच वेगवेगळे उरूस-सण ह्यांवरील खर्च ह्यांनाही आळा घालायची गरज अनेकांनी व्यक्त केली. शिबिराच्या शेवटी आळंदीच्या ग्रामस्थांची एक सभा झाली व त्यात ग्रामस्थांना संघटनेच्या कार्याची माहिती दिली गेली.

शिबिराला एकूण शंभरावर शेतकरी हजर होते. आळंदी येथील *डबेवाला धर्मशाळा* येथे सर्वांची राहायची-जेवायची व सभांची व्यवस्था केली होती. चाकणच्या काही प्रथमपासूनच्या सहकाऱ्यांनी शिबिराची सर्व व्यवस्था चोख ठेवली होती.

संघटनेच्या भावी शिबिरांसाठी दैनंदिन कार्यक्रमाचा व एकूण व्यवस्थापनाचा एक ढाचा ह्या शिबिराने घालून दिला.

पाच धरणांचे पाणी मिळणारा नाशिक जिल्ह्यातील निफाड हा खूप सुपीक तालुका. पिंपळगाव बसवंत ही येथील एक प्रमुख बाजारपेठ. ऊस व कांदा ह्यांचे इथे उत्तम पीक येई. देशात जेव्हा कृषी संशोधन केंद्रे स्थापन करायला सरकारने सुरुवात केली, तेव्हा अगदी सुरुवातीच्या टप्प्यात इथे एक केंद्र स्थापन झाले होते. चाकण आंदोलनाचे पडसाद इथेही उमटले होतेच. फेब्रुवारी १९८०मध्ये कांद्याच्या भावाची घसरगुंडी सुरू झाली व ती थांबण्याचे काहीही चिन्ह दिसेना. त्यामुळे शेतकरी खूप चिडलेले होते. ज्या गाड्या व ट्रेलर्समधून शेतकऱ्यांनी विक्रीसाठी कांदा आणला होता, त्या त्यांनी रस्त्यावर वेड्यावाकड्या सोडून दिल्या व मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग रोखला. ही घटना १९ मार्च १९८०ची. त्यावेळी जोशींचे ह्या भागात आगमन झाले नव्हते; आंदोलनाचे नेतृत्व पिंपळगाव येथील माधवराव खंडेराव मोरे करत होते.

महामार्ग मोकळा करण्यासाठी आंदोलकांशी कोणताही विचारविनिमय न करता शासनाने कडक कारवाई करायचे ठरवले. वायरलेसवरून एसआरपीच्या एका गटाला तातडीचा हुकूम

गेला. हे जवान खरेतर दुसऱ्याच कुठल्यातरी मोहिमेवर चालले होते, पण त्यांना अचानक मुंबई-आग्रा महामार्गावर पाठवले गेले. त्यांनी शिरवाडे (कुसुमाग्रज ऊर्फ वि. वा. शिरवाडकर यांचे गाव) येथे रस्ता रोखून धरलेल्या शेतकऱ्यांवर जबरदस्त लाठीमार केला. एवढेच नव्हे तर दुपारी पावणेदोन वाजता गोळीबारदेखील केला. दोन शेतकरी ठार झाले. माधवराव मोरे यांच्यासह आठ आंदोलक जबर जखमी झाले. शेतकरी संघटनेने ह्या घटनेचा तीव्र निषेध केला व जोशी स्वतः तातडीने पिंपळगाव येथे परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी गेले.

ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर शरद जोशी यांचे निफाडमध्ये आगमन झाले. १५ एप्रिल १९८० रोजी निफाड सहकारी साखर कारखान्याच्या आवारात असलेल्या के. के. वाघ विद्याभवनात दुपारी दोन वाजता जोशी यांची सभा आयोजित करण्यात आली. ह्या सभेत जोशींनी दीड तास भाषण केले. नाशिक जिल्ह्यातील त्यांची ही पहिली सभा. एका अर्थाने शेतकरी संघटनेचे हे नाशिक जिल्ह्यातील बीजारोपण म्हणता येईल.

त्यानंतर झालेल्या चर्चेत १५ ऑगस्ट रोजी निफाडला मोठी सभा घ्यायचे ठरले. त्यासाठी जोशी आणि मोरे यांची एकत्र भेट घडवून आणायचे निरगुडेंनी ठरवले व १२ ऑगस्टला तशी भेट घडवूनही आणली. ''माधवराव, ह्या मुलांनी उद्या तुमच्या तालुक्यात माझा दौरा आखला आहे. तुम्हीही आमच्याबरोबर यावं अशी माझी इच्छा आहे,'' भेटीत जोशी म्हणाले. मोरे यांचा प्रतिसाद उत्स्फूर्त होता. ते म्हणाले, ''साहेब! तुम्ही आमच्या तालुक्यात येऊन आम्हालाच कार्यक्रमाला यायचं आमंत्रण देता? हे पाहा, उद्यापासून मी तुमच्या गाडीचा ड्रायव्हर. आपण हुकूम करायचा.''

यापूर्वी या दोघांनी एकमेकांविषयी ऐकले होते, वाचले होते, मात्र प्रत्यक्ष भेट प्रथमच होत होती. पण अवघ्या दहा मिनिटांच्या चर्चेतच दोघांची मने जुळली. कारखान्याचे व्हाइस चेअरमन प्रल्हाद कराड पाटील हेही लौकरच त्यांना येऊन मिळाले. यावेळच्या आंदोलनातच नव्हे तर त्यानंतरही शेतकरी संघटनेच्या वाटचालीत ही त्रिमूर्ती अनेक वर्षे अग्रस्थानी राहिली.

चाकण आंदोलनात जोशी यांना शंकरराव वाघ, बाबूलाल परदेशी यांच्यासारखे जे जिवाभावाचे सहकारी लाभले, त्यांच्यापेक्षा हे दोन सहकारी अनेकदृष्ट्या वेगळे होते. दोघेही आपापल्या परीने समाजात नामांकित होते. दोघांचीही स्वतःची मोठी शेती होती. दोघांमध्येही स्वतःचे असे नेतृत्वगुण आंदोलनात येण्यापूर्वीही होते. दोघांनीही जोशी ह्यांचे प्रथम स्थान निर्विवादपणे मान्य केले होते यात शंका नाही, पण त्यांच्यापासूनही जोशी यांना काही ना काही शिकायला मिळत होते. उदाहरणार्थ, उसाची शेती बरीच फायदेशीर असते असे जोशींना वाटायचे, ते खूप चुकीचे होते हे या दोघांनी दाखवून दिले. ऊसशेतीतल्या अडचणी, खतांच्या आणि औषधांच्या भडकलेल्या किमती, कारखान्यांमधील भ्रष्टाचाराच्या नाना तऱ्हा, साखरनिर्मितीच्या प्रत्येक पावलावर असलेले सरकारचे व पर्यायाने राजकारण्यांचे जाचक नियंत्रण वगैरे अनेक गोष्टी या दोघांमुळे जोशींच्या लक्षात आल्या.

असे असूनही ऊस शेतकरी रुबाबात कसे काय राहू शकतात, ह्याचे उत्तर देताना प्रल्हाद

कराड पाटील प्रांजळपणे म्हणाले,

"आमच्या ह्या बाह्य रूपावर जाऊ नका. हे सारं फसवं आहे. सगळे कर्जात डुबलेले आहेत. आम्हा शेतकऱ्याचं धोतर एका बँकेचं असतं, सदरा दुसऱ्या बँकेचा असतो, तर टोपी तिसऱ्या बँकेची असते!"

हे त्यांचे उद्‌गार जोशींच्या स्मरणात कोरले गेले होते व पुढे अनेक ठिकाणी त्यांनी ते उद्‌धृत केले.

पुढील काही दिवस ह्या त्रिमूर्तीने केवळ निफाड तालुका नव्हे तर संपूर्ण नाशिक जिल्हा पालथा घातला. धुळे आणि नगर जिल्ह्यांतही सभा घेतल्या. आंदोलनाचे लोण गावागावातून पोचवले. एकेका दिवसात आठ-आठ, दहा-दहा सभा होत. याच दरम्यान बागलाणचे एक शेतकरी रामचंद्रबापू पाटील त्यांना येऊन मिळाले. इतरही साथी मिळत गेले. मुख्य म्हणजे निफाड साखर कारखान्याचे चेअरमन माधवराव बोरास्ते हेदेखील त्यांच्या बाजूने उभे राहिले. खरे तर त्यांनी सुरुवातीला संघटनेला खूप विरोध केला होता, जोशींना निफाडमध्ये आणल्याबद्दल निरगुडेंना बराच दमदेखील भरला होता. पण पुढे मोरे यांनी त्यांचे मन वळवले; १५ एप्रिल रोजी जोशी यांच्याशी झालेल्या प्रत्यक्ष भेटीचाही बराच परिणाम झाला. जोशींनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी ऊस पिकवण्याचा व पुढे कारखान्यात त्याची साखर बनेस्तोवरचा सगळा खर्च काळजीपूर्वक काढला व जोशी यांची मागणी अगदी न्याय्य आहे ह्याविषयी त्यांची खात्री पटली. त्यांच्याच पाठबळाने भरलेली निफाडची १५ ऑगस्ट १९८०ची सभा महत्त्वाची ठरली.

'शंभरखाली कांदा नाही, तीनशेखाली ऊस नाही' ह्या घोषणेने सभेची सांगता झाली. कांद्याला दुसऱ्या एका शेतीमालाची इथे प्रथमच जोड मिळाली.

माधवराव बोरास्ते यांनीही जाहीररीत्या या मागणीला पूर्ण पाठिंबा दिला. ती मान्य होईस्तोवर निफाड तालुक्यातील शेतकरी येत्या गळीत हंगामात साखर कारखान्यात ऊस देणार नाहीत असेही त्यांनी जाहीर केले व लगोलग ९ ऑक्टोबर १९८० रोजी भरलेल्या आपल्या कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत ५,५०० भागधारक शेतकऱ्यांसमोर तसा ठराव मांडला, त्याच्या समर्थनार्थ स्वतः मोठे भाषण केले व तो ठराव एकमताने संमतही झाला.

साखर कारखान्याने स्वतः असा ठराव करणे ही एक ऐतिहासिक घटना होती. बोरास्ते यांचा पुढाकार साखर कारखानदारांच्या वर्तुळात मोठीच खळबळ माजवणारा होता. कारण महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे बोरास्ते अध्यक्ष होते. या धाडसाबद्दल बोरास्ते यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल, कारण ते करताना त्यांनी केवळ आपली व्यक्तिगत प्रतिष्ठाच नव्हे, तर सहकारक्षेत्रातील सारे भविष्यच पणाला लावले होते. सहकारक्षेत्र हा महाराष्ट्रातील काँग्रेसनेत्यांचा बालेकिल्ला होता व त्या सर्व नेत्यांचा रोष आता बोरास्तेंनी ओढवून घेतला होता. याची मोठी किंमत त्यांना चुकवावी लागली; प्रचंड मानसिक तणावाला तोंड द्यावे लागले. पुढे त्यांचे अकालीच ओढवलेले मरण हा ऊस आंदोलकांना मिळालेला मोठाच धक्का होता. तीनशे रुपये भावाची मागणी न्याय्य आहे व तो भाव

मिळालाच पाहिजे असे त्यांनी जाहीररीत्या मान्य केल्यावर तो भाव नाकारणे इतर कारखान्यांना आता अशक्य होऊन बसले.

टनाला तीनशे रुपयांच्या मागणीमागची थोडी पार्श्वभूमी इथे लक्षात घ्यायला हवी. उसाला त्यावेळी सरासरी फक्त १४५ रुपये भाव कारखाने देत होते (आकडेवारी १९८० सालची) व त्यातून शेतकऱ्याचा किमान २९० रुपये हा उत्पादनखर्चही भरून निघणारा नव्हता. शिवाय शेतकऱ्याला इतका कमी भाव देऊनही ग्राहकाला मात्र ती साखर खुल्या बाजारात दहा रुपये किलो भावाने विकली जात होती. आता शेतकरी ३०० रुपये भाव मागत होते. पण तो भाव देऊनही ग्राहकाला सध्या इतक्याच भावाने साखर मिळणे सहज शक्य होते असे शेतकरी संघटनेचे म्हणणे होते. यासाठी संघटनेने आपले हिशेब जाहीरपणे मांडलेही होते.

साखरेचा उत्पादनखर्च काढणे हे तसे किचकट काम आहे, कारण उसाचा दर्जा, कारखान्याची क्षमता वगैरे अनेक घटकांवर हा खर्च अवलंबून असतो. पण सामान्य वाचकाच्या दृष्टीने एक टन उसात साधारण १०० किलो साखर होते असे गृहीत धरता येईल. उसापासून साखर बनवायच्या प्रक्रियेचा खर्च टनामागे साधारण सव्वाशे रुपये धरता येईल. म्हणजेच एक टन उसामागे शेतकऱ्याला ३०० रुपये भाव दिल्यावरही १०० किलो साखरेचा उत्पादनखर्च ३०० + १२५ म्हणजे सुमारे ४२५ रुपये असाच येणार होता; म्हणजेच एका किलोला सव्वा चार रुपये. कारखान्याची कार्यक्षमता वाढवली व उसाचा दर्जा वाढवला तर हा खर्च अर्थातच याहूनही कमी करता आला असता, पण तो भाग नंतरचा. म्हणजेच ही साखर सध्याच्या परिस्थितीतही दहा रुपये किलो भावानेच ग्राहकाला विकणे, शेतकऱ्याला वाढीव भाव दिल्यावरही, सहज शक्य होते. शेतकऱ्याला कमी भाव देऊन साखर कारखाने किती अतिरिक्त नफा मिळवत होते व त्यामुळे साखर कारखान्यांकडून किती मोठ्या प्रमाणावर पैसा राजकारणासाठी उपलब्ध होत होता ह्याचा अंदाज आपण यावरून बांधू शकतो.

एकूणच महाराष्ट्राच्या राजकारणातील सहकारी साखर कारखानदारीचे स्थान समजून घेतले तर जोशींच्या या ऊस आंदोलनाचे नेमके महत्त्व लक्षात येते. महाराष्ट्रात प्रवरानगरचा वा माळीनगरचा कारखाना हे खूप पूर्वीच उत्तम प्रकारे उभे राहिले होते. धनंजयराव गाडगीळ व वैकुंठलाल मेहता यांनी सहकारी कारखानदारीला भक्कम तात्त्विक पाया घालून दिला होता. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची चर्चा देशभर होत होती. स्वतः पंडित नेहरूंसारख्यांनीही तिचे कौतुक केले होते. साहजिकच ग्रामीण भागात समृद्धी यावी म्हणून, आपल्या कार्यकर्त्यांना स्थानिक पातळीवर छोटी-मोठी सत्तास्थाने देता यावी व त्यातून आपली सत्ता अधिक बळकट व्हावी म्हणून आणि इतरही अनेक कारणांनी सहकारी कारखानदारीला महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर काँग्रेस सरकारने खूप प्राधान्य दिले. शेतकऱ्यांनी जेमतेम दहा टक्के भाग भांडवल उभे केल्यावर सरकार उरलेले ९० टक्के भांडवल पुरवत होते. दैनंदिन कामकाजासाठी पैसा उभा राहावा म्हणून सरकार बँकांना स्वतः हमी देत होते. एखादा कारखाना डबघाईला आला तर त्याला मदत करायलाही सरकार पुढे येत होते. साहजिकच

जागोजागी सहकारी साखर कारखाने उभे राहू लागले. बघता बघता त्यांची संख्या दोनशेवर पोचली.

हे कारखाने तत्त्वशः सहकारी मालकीचे असले तरी प्रत्यक्षात स्थानिक पुढाऱ्यांचीच सत्ता तिथे चालत होती. साखर कारखान्याच्या जोडीने दूधसंघ, सूत गिरण्या, सहकारी बँका, पतपेढ्या, कृषी उत्पन्न बाजार समित्या व पुढे पुढे शिक्षणसंस्थाही उभ्या राहिल्या. प्रत्येक सहकारी साखर कारखाना म्हणजे त्या परिसरातील सर्वांत मोठे सत्ताकेंद्रही बनले. कमिशन घेऊन मजूर पुरवायची वा वाहतुकीची कंत्राटे देणे, मालमत्ता खरेदी करणे वा विकणे, आपल्या मर्जीतल्या व्यक्तींना रोजगार देणे अशा अनेक मार्गांतून प्रचंड पैसा हाती येऊ लागला व सत्ताकेंद्राप्रमाणे हे कारखाने आर्थिक केंद्रेही बनली. ह्याच वर्गाकडे राज्याचे राजकीय नेतृत्वही होते. शासनाचा बराचसा विकासनिधीही ह्यांच्यामार्फतच वापरला जाई. ग्रामीण राजकारणावर, अर्थकारणावर आणि समाजकारणावर या सहकारी साखर कारखान्यांची इतकी पकड का होती व प्रत्येक राजकीय नेत्याला स्वतःच्या नियंत्रणाखाली एखादा साखर कारखानातरी असावा असे का वाटत होते, व आजही का वाटते, हे यावरून स्पष्ट होते.

नेमक्या याच सत्ताकेंद्राला शेतकरी संघटनेने आव्हान दिले होते. तेही सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आंदोलनातूनच. जो शेतकरी वर्ग सत्ताधाऱ्यांचा पारंपरिक आधार होता, तो आता जोशींकडे वळू लागला होता. सत्ताधाऱ्यांनी इतकी वर्षे शेतकऱ्यांना कशा प्रकारे लुटले हे शेतकरी संघटनेच्या सतत होणाऱ्या सभांमधून शेतकऱ्यांपुढे येत होते, अगदी त्यांना सहज समजेल अशा भाषेत येत होते. त्यांच्या असंतोषाचा आज जो स्फोट होत होता त्यामागे हीच आपल्यावर वर्षानुवर्षे होत गेलेल्या अन्यायाची काळीजभेदी जाणीव होती. म्हणूनच सत्ताधारी राजकारणी जोशींच्या इतक्या विरोधात होते.

निफाडपाठोपाठ इतरही ठिकाणच्या शेतकऱ्यांनी तीनशेपेक्षा कमी भावात कारखान्यांना ऊस द्यायचा नाही असा निर्धार केला. ११ सप्टेंबर १९८० रोजी पिंपळगाव बसवंत येथे शेतकऱ्यांचा एक मोठा निर्धार मेळावा भरला होता. आजवरचा सर्वांत मोठा. पन्नास हजार शेतकरी ह्या मेळाव्याला हजर होते. शेतकऱ्यांचा हा भव्य प्रतिसाद खुद्द त्रिमूर्तीलाही थक्क करणारा होता. १० नोव्हेंबरपर्यंत जर शासनाने उसाला ३०० रुपये भाव मंजूर केला नाही, तर शेतकरी रास्ता रोको करतील व रेल रोकोदेखील करतील असे जाहीर करण्यात आले.

मोरे यांनी आपल्या भाषणात एक महत्त्वाचा मुद्दा मांडला होता. 'या बामनाचं काय ऐकता! त्याला काय कळतं शेतीतलं?' अशी टीका जोशींवर खूपदा होत असे. जोशींच्या ब्राह्मण्याचा कुचेष्टेने उल्लेख केला जाई. त्यांचे ब्राह्मण्य अधोरेखित करून शेतकऱ्यांना त्यांच्यापासून तोडायचा हा डाव होता. त्याचा संदर्भ देत मोरे म्हणाले,

''आम्हाला असं बनवायचे दिवस आता गेले! हे जोशी बामण आहेत आणि ह्या बामणाचं काय ऐकता, असलं काही आता आम्हाला शिकवू नका. हे असलं ऐकून घेण्याइतके आता

शेतकरी मूर्ख राहिलेले नाहीत.''

शेतकऱ्यांच्या भावनांकडे पूर्ण दुर्लक्ष करत शासनाने '२३ ऑक्टोबरपासून सर्व साखर कारखान्यांनी उसाचे गळीत सुरू करावे' असा आदेश काढला. गळिताचा आरंभ हा सहकारी साखर कारखान्यांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा सोहळा असतो. कोणातरी मंत्र्याच्या वा अन्य बड्या नेत्याच्या हस्ते बॉयलर पेटवून मोठ्या थाटामाटात तो पार पडतो. जनसंपर्काची ती मोठी संधी असते. पण ह्यावेळेला तो शासननियुक्त दिवस उलटून गेला तरीही बहुतेक कारखाने थंड होते. अर्थात ज्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा असते ते अशा वेळी आपले महत्त्व श्रेष्ठींपुढे दाखवण्याचा प्रयत्न करतातच; पण सामान्य शेतकऱ्यांनी ह्या स्थानिक 'ताकदवान' मंडळींना अजिबात दाद दिली नाही.

उदाहरणार्थ, नाशिक जिल्ह्यातील दाभाडी येथे असलेल्या गिरणा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने काहीही करून २३ ऑक्टोबरला कारखाना सुरू करायचाच असे ठरवले होते. पण ते कळताच त्या भागातील दोनशे तरुणांनी प्रतिज्ञा केली, की शेतकऱ्यांचा विश्वासघात करून जर संचालकांनी कारखाना सुरू करायचा प्रयत्न केला, तर गव्हाणीत उसाच्या मोळीच्या आधी आम्ही उड्या घेऊ. ह्या प्रतिज्ञेने संचालक मंडळी घाबरून गेली आणि त्यांचा कारखाना सुरू करायचा बेत बारगळला. श्रीगोंदा येथे एक दुर्दैवी घटना घडली. २७ ऑक्टोबर रोजी संचालकांनी कारखाना सुरू करायचा प्रयत्न करताच तिथे आजूबाजूचे शेतकरी मोठ्या प्रमाणावर गोळा झाले व त्यांनी निदर्शने सुरू केली. संचालकांनी पोलीस बोलावले. पण निदर्शक पांगले नाहीत. शेवटी पोलिसांनी तिथे गोळीबार केला व त्यात नाना दगडू चौधरी हा शिरसगाव बोडके (तालुका श्रीगोंदा) येथील एक साठ वर्षांचा शेतकरी बळी पडला. ऊस आंदोलनातील नगर जिल्ह्यातला हा पहिला हुतात्मा.

अब्दुल रेहमान अंतुले हे त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री होते. राज्यातील शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी लोकशाही दलाचे सरकार केंद्र सरकारने १७ फेब्रुवारी १९८० रोजी बरखास्त केले होते व त्यानंतर सुमारे चार महिने राज्यात राष्ट्रपती राजवट होती. ९ जून १९८० रोजी अंतुले मुख्यमंत्री बनले. त्यांनी आंदोलकांना जराही महत्त्व द्यायचे नाही अशी भूमिका घेतली. शासनाने आपली भूमिका अधिकच ताठर केली. ऊस शेतकऱ्यांना नमवण्यासाठी अनेक ठिकाणी उसाचे पाणी बंद केले गेले किंवा ते पुरवण्यासाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा खंडित केला गेला.

वर्ष-सव्वा वर्ष पोटच्या पोराप्रमाणे शेतावर जपलेला ऊस अगदी अखेरच्या क्षणी असा पाण्याविना वाळून जाताना पाहून शेतकऱ्याचा जीव तुटू लागला; पण त्याचवेळी तीनशेच्या खाली ऊस द्यायचा नाही हा निर्धार कायम होता. इतके दिवस बांधावर बसून असलेला शेतकरी शेवटी नाइलाजाने रस्त्यावर उतरला. जागोजागी मोर्चे-निदर्शने सुरू झाली. सगळ्यांचे डोळे आता १० नोव्हेंबरकडे लागले होते. रेल रोको आणि रास्ता रोको त्या दिवशी सुरू होणार होते.

इथे प्रतिभावान पत्रकार व लेखक विजय परुळकर यांच्याविषयी लिहायला हवे. पाच वर्षे जर्मन टेलिव्हिजनबरोबर आणि दहा वर्षे संयुक्त राष्ट्रसंघाच्या युएनडीपी या संस्थेचे एशिया खंडासाठीचे प्रसारप्रमुख म्हणून व्हिएतनाम, कंबोडिया वगैरे ठिकाणी नोकरी केल्यानंतर, स्वेच्छेने ती सोडून परुळकर व त्यांच्या पत्नी सरोजा सप्टेंबर १९७७मध्ये भारतात परतले व पुण्यात प्रभात रोडवर स्थायिक झाले. अनेक स्वयंसेवी संस्थांच्या प्रचारार्थ यांनी आपले लेखणीचे व छायाचित्रणाचे कौशल्य वापरले. 'माणूस' साप्ताहिकाचे श्री. ग. ऊर्फ श्रीभाऊ माजगावकर यांच्या संपर्कात ते आले व 'माणूस'मधून लिहीत गेले. वेगवेगळ्या विकासयोजनांचा अभ्यास करत महाराष्ट्रभर भटकत असताना त्यांची सप्टेंबर १९८०मध्ये शरद जोशींशी गाठ पडली. जोशींचे कार्य आणि विचार यांनी ते अगदी भारावून गेले. हातातील सर्व व्यावसायिक कामे बाजूला सारून विजय व सरोजा परुळकर सप्टेंबर १९८० ते मे १९८१ असे सलग नऊ महिने जोशी यांच्याबरोबर फिरले. स्वतःच्या खर्चाने. त्या काळात त्यांनी जे पाहिले, ऐकले, अनुभवले त्यावर आधारित 'योद्धा शेतकरी' ही लेखमाला त्यांनी 'माणूस'मध्ये लिहिली. तिचा पहिला प्रदीर्घ भाग 'माणूस'च्या १९८० सालच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला. ही लेखमाला त्यांनी खूप ओघवत्या शैलीत लिहिली होती आणि तिला मोठा वाचकवर्ग लाभला. पुढे ती 'राजहंस प्रकाशन'तर्फे १० जून १९८१ रोजी पुस्तकरूपातही प्रसिद्ध झाली.

जोशी अनेक भाषणांत 'शेतकरी संघटनेचा विचार पसरवण्याचे निम्मे काम योद्धा शेतकरीने केले आहे' असे सांगत असत. पुस्तकाची दुसरी आवृत्ती पुण्यातील न्यू सुप्रीम कॅलेंडर्सच्या नाना आठवले यांनी मुख्यतः शेतकरी संघटनेचे एक नेते पाशा पटेल ह्यांच्या आग्रहापोटी प्रकाशित केली. या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत परुळकरांनी लिहिलेली पहिली दोन वाक्ये अशी आहेत :

> प्रस्तावना 'अर्पण' करण्याची पद्धत नाही, तरीपण मी हे दोन शब्द श्री. माधवराव खंडेराव मोरे ह्या बहाद्दर शेतकऱ्याला अर्पण करू इच्छितो. शेतकरी संघटनेच्या चळवळीतून 'पुढारी'पण मिळवलेल्या मंडळींना माधवराव खंडेराव मोरेंची जरी विस्मृती झाली असली, तरी त्यांनी संघटना 'उभी' करण्यासाठी जे अथक परिश्रम घेतले आणि जो प्रचंड त्याग केला त्याचे मी आणि सरोजा साक्षीदार आहोत.

शरद आणि लीला जोशी यांच्याप्रमाणेच विजय आणि सरोजा परुळकर यांनाही दोन मुली. दोन्ही कुटुंबे काही वर्षे परदेशात राहून नंतर पुण्यात स्थिरावलेली. साहजिकच त्यांच्यात बरीच कौटुंबिक जवळीक निर्माण झाली. पुढे काळाच्या ओघात व्यक्तिशः जोशी व परुळकर यांच्यात पूर्वीसारखा संपर्क राहिला नाही; काहीसा दुरावा निर्माण झाला असेही म्हणता येईल. लीलाताई ३१ ऑक्टोबर १९८२ रोजी गेल्या. परुळकर ३ जून २००० रोजी गेले. पण जोशी यांच्या मुली मात्र परदेशात स्थायिक झाल्यावरही परुळकर दांपत्याशी व नंतर सरोजा परुळकरांशी जवळचा संपर्क ठेवून होत्या. ह्या चरित्राच्या संदर्भात सरोजाताईंनी प्रस्तुत

लेखकाला भरपूर वेळ दिला व दुर्मिळ अशी माहिती पुरवली, जी शरद जोशी यांना एक व्यक्ती म्हणून समजून घेताना उपयुक्त वाटली; पुस्तकासाठी अनेक छायाचित्रेही त्यांनी दिली.

ज्याची सगळ्यांना प्रतीक्षा होती तो दिवस एकदाचा उजाडला. दहा नोव्हेंबरच्या सकाळीच हजारो शेतकऱ्यांच्या मोर्च्याने आंदोलनाला सुरुवात झाली. निफाड-नाशिक रस्त्यावरच्या आडगावजवळ मोर्चा येताच पोलिसांनी तो अडवला व जोशी, मोरे आणि बोरास्ते यांना अटक केली. प्रल्हाद पाटील त्यांच्या हाती लागले नाहीत, नियोजनपूर्वक भूमिगत राहून त्यांनी आंदोलनाचे यज्ञकुंड धगधगते ठेवले.

प्रमुख नेते तुरुंगात गेल्यामुळे आंदोलन आपोआपच निर्नायकी बनेल व बारगळेल असा शासनाचा कयास होता. पण सर्वसामान्य शेतकरीदेखील आता इतका पेटून उठला होता, की त्याच्या अंतःप्रेरणेनेच तो रस्त्यावर उतरला. 'दामाशिवाय घाम नाही, तीनशेशिवाय ऊस नाही' अशा जोरदार घोषणा देत गावोगावी शेतकरी रस्त्यावर येत होते आणि स्वतःला अटक करवून घेत होते. पहिल्याच दिवशी पंचवीस हजार शेतकरी मुंबई-आग्रा रस्त्यावर उतरले. नाशिकच्या आडगावपासून ते मालेगावपुढील झोडगे गावापर्यंत आग्रा रोड बंद पडला. पिंपळगाव, मंगरूळफाटा, सौंदाणे वगैरे अनेक गावांमधील शेतकरी आपापल्या बैलगाड्यांसह अंथरूण-पांघरूण व भाकऱ्या घेऊन महामार्गावर ठिय्या देऊन बसले व त्यांनी महामार्ग अडवून धरला. पुढल्या तीन-चार दिवसांतच त्यांची संख्या दीड-दोन लाखांवर पोचली. पुढले सलग १९ दिवस ही गर्दी कायम होती. सुमारे शंभर ते सव्वाशे किलोमीटरचा रस्ता आंदोलकांनी अडवून धरला होता.

ही अगदी अकल्पित अशीच घटना होती. मुंबई-आग्रा महामार्ग १० ते १४ नोव्हेंबर असे सलग चार दिवस व पुढेही ठिकठिकाणी २९ नोव्हेंबरपर्यंत बंद राहिला. ह्या महामार्गाला इतकी विश्रांती तो बनला तेव्हापासून कधीच मिळाली नव्हती! आंदोलनाची तीव्रता सर्वांत जास्त बागलाण तालुक्यात होती. त्याच्याच जोडीने कोपरगाव, सिन्नर, नाशिक, निफाड, कळवण, चांदवड, मालेगाव व साक्री इथले आंदोलन विशेष तीव्र होते. आंदोलनात एकूण ३१,००० शेतकरी तुरुंगात गेले. इतक्या मोठ्या प्रमाणावर आजवर ह्या देशात कुठेच शेतकरी आंदोलन झाले नव्हते.

हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी पोलिसांनी बळाचा अतिरेकी वापर केला. तो उघड करणारे एक दृश्य चितारताना 'योद्धा शेतकरी'मध्ये (पृष्ठ १३२-३) परुळकर लिहितात,

> पहाटे सहा वाजता मी शरद जोशींच्याबरोबर पिंपळगाव बसवंतहून निघालो. सोग्रसमार्गे आम्ही मंगरूळफाट्याच्या दिशेने चाललो होतो. फाट्याच्या अर्धा-पाऊण किलोमीटर अलीकडेच एक भयानक दृश्य नजरेस पडलं. एसआरपींकडून काठ्यांनी झोडपले गेलेले, बुटांनी तुडवले गेलेले चार-पाच हजार शेतकरी गुरांप्रमाणे ओरडत रानोमाळ धावत सुटले होते. मी युद्धाचे अनेक प्रसंग पाहिले आहेत; पण

असा अमानुष प्रकार कधीच पाहिलेला नाही. हा तर उघड उघड अत्याचार होता. युद्धामध्ये दोन्ही बाजूंच्या सैनिकांच्या हाती शस्त्र असतं. इथे तर सगळा एकतर्फी मामला होता. निःशस्त्र किसान विरुद्ध शस्त्रधारी पोलीस! मुकाट्याने मार खाणं आणि असह्य झालं की गुराढोरांप्रमाणे ओरडत जीव घेऊन सैरावैरा पळणं ह्यापलीकडे शेतकरी दुसरं काय करणार?

सोग्रसच्या बाजूनं आमची जीप येताना पाहून रानोमाळ धावणारे शेतकरी क्षणभर थांबले. जीपमधून शरद जोशी उतरताच, त्यांची निळी पँट आणि पांढरा बुशशर्ट हा ओळखीचा पोशाख नजरेस पडताच, क्षणार्धात सर्व शेतकऱ्यांच्यात नवचैतन्य पसरलं. ह्या एकतर्फी चालू असलेल्या निर्घृण हल्ल्याच्या समरप्रसंगी एकाएकी आपल्या सेनापतीला पाहून सारा किसान वेदना विसरून गर्जून उठला!

शरद जोशी जीपच्या बॉनेटवर चढून उभे राहिले. पाहता पाहता माळरानावर पाच हजार शेतकरी घोषणा देत जमले. शरद जोशींनी त्यांना शांत राहण्याची सूचना दिली. सारा समुदाय एकदम सावधान झाला आणि कानात प्राण ओतून आपल्या नेत्याचे शब्द ऐकू लागला. लाठ्याकाठ्यांनी बडवली गेलेली, काही क्षणांपूर्वीच गुराढोरांप्रमाणे ओरडणारी, नेत्याला पाहून भान हरपून घोषणा देणारी, पाच हजार माणसं क्षणार्धात शांत झालेली पाहून मी विस्मयचकित झालो. असं विलक्षण नाट्य मी ह्यापूर्वी कधीच पाहिलं नव्हतं किंवा अनुभवलं नव्हतं.

आंदोलनाच्या काळात शरद जोशींची शेतकऱ्यांवर किती जबरदस्त पकड होती हेही ह्या प्रसंगावरून दिसते.

आंदोलन चिरडण्यासाठी मारझोड करणे हा तसा पोलिसांचा नेहमीचाच मार्ग, पण ह्यावेळी पोलिसांनी एक वेगळाच मार्गही वापरला. आधी पोलिसांनी नाशिक जिल्ह्यात जिथे जिथे शक्य होते, तिथे तिथे लाठीमार करून सत्याग्रहींना हटवले व रस्त्याचा थोडा थोडा भाग मोकळा केला. त्यासाठी रस्त्यावर झोपलेल्या शेतकऱ्यांवरही त्यांनी जबरी लाठीमार केला. रस्ता बंद असल्यामुळे नाशिक जिल्ह्याच्या बाहेर महामार्गावर वेगवेगळ्या ठिकाणी हजाराहजारांनी गाड्या अडकून पडल्या होत्या. त्या गाड्या पोलिसांनी नाशिक जिल्ह्यात मोकळ्या केलेल्या महामार्गाच्या पट्ट्यांवर आणून उभ्या केल्या. पण पुढे मंगरूळफाट्यावर चाळीस हजार शेतकरी रस्त्यावर बसून होते. इतक्या मोठ्या जमावावर लाठीमार करणे पोलिसांना शक्य नव्हते. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात आणून उभ्या केलेल्या गाड्या तिथेच अडकून पडल्या; त्यांना पुढे जाता येईना.

अशा प्रकारे अडकून पडलेल्या ट्रक्सच्या ड्रायव्हर्सना पोलिसांनी बाजूला नेऊन चिथवले की 'तुमच्या ह्या गाड्या समोर रस्ता अडवून बसलेल्या शेतकऱ्यांमुळे अडल्या आहेत.

त्यांच्यामुळे तुमचं हे नुकसान होतंय.' चिडलेल्या काही ट्रकड्रायव्हर्सनी आजूबाजूच्या गावांत काही ठिकाणी आगी लावल्या. अनेकांनी बैलांच्या शेपट्या कापल्या, डोळे फोडले. गवताच्या गंज्यांना आग लावून त्यांना भाजण्याचे प्रकार घडले. ट्रकवरचे बहुतेक ड्रायव्हर्स हे पंजाबी शीख होते. अशा प्रकारांनी महाराष्ट्र व पंजाब ह्यांच्यात वैमनस्य निर्माण होईल, ह्याचीही तमा कोणी बाळगली नाही.

सुदैवाने एक अगदी अनपेक्षित असे घडले. जेव्हा हे संतापलेले ड्रायव्हर्स प्रत्यक्ष शेतकऱ्यांना भेटले व त्यांच्यात थोडेफार बोलणे झाले तेव्हा ह्या ड्रायव्हर्सना कळले, की हे आंदोलन नेमके कशासाठी आहे. त्यांच्यापैकी बहुतेक सगळे शेतकरी कुटुंबातीलच होते व अनेकांनी तर आपापल्या गावी ऊसही लावलेला होता. शेतीमालाला कमी भाव मिळत असल्याने शेतकरी किती हवालदिल झाले आहेत ह्याची त्यांना चांगलीच कल्पना होती. उसाला तीनशे रुपये भाव मागणे हे अगदी योग्यच आहे असे त्यांचेही मत होतेच. त्यामुळे ह्या रस्ता अडवणाऱ्या शेतकऱ्यांविषयी पंजाबी ट्रक ड्रायव्हर्सना शेवटी सहानुभूतीच वाटू लागली!

एक उंचेपुरे ट्रक ड्रायव्हर त्यातल्या त्यात सुशिक्षित व नेत्यांमध्ये गणना होईल असे दिसत होते. त्यांचे नाव सरदार जगजितसिंग. पंजाबातील किसान संघटनेचे ते पूर्वी सेक्रेटरीही होते. अन्य ड्रायव्हर्सना समजावण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दहिवेल येथील शाळेच्या पटांगणात ट्रक ड्रायव्हर्स व शेतकरी यांची एक संयुक्त सभाही आयोजित केली गेली व त्या सभेत जोशींनी हिंदीतून भाषणही केले. ड्रायव्हर्सच्या वतीने जगजितसिंग यांनी समारोप केला. ते म्हणाले,

''खतं, बियाणं, डिझेल, औषधं यांच्या अफाट किमतींनी आम्हीही अगदी हैराण झालो आहोत. आम्हालाही शेतीत काहीच सुटत नाही. तुमचं दुखणं आणि आमचं दुखणं एकच आहे. तुम्ही पंजाबातदेखील या आणि उसाप्रमाणे गव्हाच्या किमतीसाठीदेखील असंच आंदोलन आपण एकत्र लढवू या.''

पुढे शेतकरी संघटना पंजाबात गेलीदेखील, पण त्यापूर्वीच ह्या ड्रायव्हर्सनी शरद जोशींचे विचार आपापल्या मुलुखात पोचवले होते. हा या आंदोलनाचा अगदी अनपेक्षित असा मोठा फायदा.

रास्ता रोकोच्या जोडीनेच रेल रोकोही सुरू झाले होते. नाशिक ते मनमाड हा रेल्वे मार्ग सर्वांत आधी बंद पडला. नाशिक रोड स्टेशनवर नागपूर एक्स्प्रेस आठ तास अडकून पडली होती; इतरही अनेक गाड्या अशाच रखडल्या होत्या. अडकलेल्या प्रवाशांना शेतकऱ्यांनी भाजी-भाकरी व दूध आवर्जून पुरवले. खरेतर रेल्वे अधिकाऱ्यांना ह्या आंदोलनाची पूर्वकल्पना दिली होती, पण ते बेपर्वा राहिले. ज्या आंदोलनामागे एकही राजकीय नेता नाही, त्या आंदोलनाला इतका प्रतिसाद मिळेल असे मुळात कुठल्याच सरकारी अधिकाऱ्यांना वाटले नव्हते.

पहिल्याच दिवशी एक दुर्दैवी घटना घडली. निफाड तालुक्यातील खेरवाडी येथील रेल्वे स्टेशनवर काही हजार शेतकरी रुळांवर बसून होते, शांतपणे भजने म्हणत होते. एसआरपी पोलिसांची एक मोठी पलटण तिथे आली व त्यांनी शेतकऱ्यांना हुसकावून लावायचा प्रयत्न केला. शेतकरी अर्थातच हलले नाहीत. ते हाताची घडी घालून बसले होते. 'कुठल्याही परिस्थितीत कायदा हाती घ्यायचा नाही. संयम सोडायचा नाही. हात उचलायचा नाही. आंदोलनात मुडदा पडला, तरी तो हाताची घडी घातलेल्या अवस्थेतच सापडला पाहिजे.' असा जोशींनी स्पष्ट आदेश दिला होता. रूळ अडवून बसलेल्या आंदोलकांवर पोलिसांनी आधी लाठीमार केला, मग अश्रुधूर सोडला आणि तरीही शेतकरी तिथून हलेनात हे बघितल्यावर त्यांनी गोळीबार केला. त्यात खेरवाडी येथे राहणारे ३५ वर्षांचे बाबुराव पांडुरंग रत्ने आणि म्हाळसा कोरे येथे राहणारे १९ वर्षांचे भास्कर धोंडीराम जाधव हे दोन आंदोलक मारले गेले.

पोलीस कस्टडीत बंद असलेल्या जोशींनी १३ नोव्हेंबरला ४८ तासांकरिता आंदोलन स्थगित केले. साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू करण्यासही संघटनेने परवानगी दिली. तरीही वातावरण अतिशय तंग होते. आंदोलनामुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळण्यासाठी जे. एफ. ऊर्फ ज्युलिओ रिबेरो ह्या कर्तबगार अधिकाऱ्याची शासनाने खास नियुक्ती केली होती. बऱ्याच वर्षांनंतर हेच रिबेरो पंजाबमध्ये राज्यपालांचे खास सल्लागार म्हणून नियुक्त केले गेले व तेथील अतिरेकींचा बंदोबस्त करण्यात त्यांनी मोठे योगदान दिले. परिस्थिती निवळावी म्हणून जोशींची मदत घ्यायचा निर्णय त्यांनी घेतला. जोशींनीही पूर्ण सहकार्य दिले. महामार्गावर तुंबलेला ट्रॅफिक मोकळा करून देण्यासाठी त्यांनी पोलिसांबरोबर महामार्गावर एक फेरीही मारली. त्यावेळी तसे ते अटकेतच होते; पण पुढे-मागे पोलिसांच्या गाड्या ठेवून त्यांना ही फेरी मारता यावी अशी व्यवस्था पोलिसांनी केली. ह्याला 'गुडविल मिशन' असे नाव पोलिसांनी दिले होते.

आंदोलन असेच चिघळत राहिले तर खूप गंभीर प्रश्न उभा राहील ह्याची जोशींना पूर्ण कल्पना होती. खेरवाडी गोळीबार ही घटना त्यांनादेखील काळजीत टाकणारी होती. परिस्थिती हाताबाहेर गेली, तर अतिशय क्रूरपणे शासन हे आंदोलन चिरडून टाकू शकेल व त्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे प्राण जाऊ शकतात हे त्यांना ठाऊक होते. तुटेस्तोवर ताणण्यात फारसे काही हाती लागणार नव्हते. अनेक धंदेवाईक राजकारणी आंदोलन असेच चालू राहावे ह्या मताचे होते; पण जोशींना मात्र शेतकऱ्यांच्या भल्याची काळजी जास्त होती. स्वतःची प्रतिष्ठा जपण्यापेक्षा संघटना उभारणे, शेतकऱ्याला भावी लढ्यासाठी तयार ठेवणे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटले.

पण आंदोलन स्थगित करूनही आणि अशाप्रकारे सहकार्य देऊनही शासनाची दडपशाही चालूच राहिली; उलट वाढत गेली.

१६ नोव्हेंबरला कस्टडीची मुदत संपल्यामुळे जोशी, मोरे व बोरास्ते यांना नाशिक

कोर्टात उभे केले गेले, पण तिथे पोलिसांच्या आग्रहामुळे त्यांची कस्टडी २४ नोव्हेंबरपर्यंत वाढवली गेली व त्यांना पुन्हा नाशिक कारागृहात पाठवले गेले.

शांततामय शेतकरी आंदोलन जबरदस्तीने दडपण्याच्या सरकारी प्रयत्नांचा निषेध म्हणून त्याच दिवसापासून कारागृहात जोशींनी बेमुदत उपोषण सुरू केले व शेतकऱ्यांना आपले आंदोलन शांततेने पण नेटाने पुढे चालू ठेवण्याचा आदेश दिला. उपोषण करताना ते फक्त लिंबूपाणी पीत असत हेही नमूद करायला हवे. मागे चाकणच्या कांदा आंदोलनात जोशींनी तीन वेळा उपोषण केले होते व त्याचा परिणाम होऊन त्यांची एक किडनी खराब झाली होती. 'आणखी तीन वर्षे तरी तुम्ही अशा कुठल्या उपोषणाच्या फंदात पडू नका' असा स्पष्ट सल्ला डॉक्टरांनी दिला होता. पण त्याकडे दुर्लक्ष करून जोशींनी आपले हे नाशिकचे उपोषण सुरू केले होते. साहजिकच त्यांची तब्येत १७ नोव्हेंबरनंतर झपाट्याने खालावू लागली. पण जोशी मरणाला घाबरत नव्हते. 'बाहेर माझे सारे शेतकरी बांधव पोलिसी अत्याचार सहन करत आहेत, त्यांच्या दुःखात मलाही थोडेफार सहभागी व्हायला पाहिजे,' हाच विचार त्यांच्या मनात होता. 'या उपोषणात माझे प्राण गेले, तर मरणोत्तर नेत्रदान करायची माझी इच्छा आहे' असेही त्यांनी बोलून दाखवले होते.

२२ नोव्हेंबरला, उपोषणाच्या सातव्या दिवशी, त्यांचे वजन चार किलोंनी घटले, नाडीचे ठोके ६४वर आले, पण कुठलेही औषध घ्यायला त्यांनी स्पष्ट नकार दिला; ठरल्याप्रमाणे ह्या वेळच्या कस्टडीची मुदत संपल्यामुळे २४ नोव्हेंबरला तिघा नेत्यांना पुन्हा कोर्टात हजर केले गेले. त्यावेळी पोलिसांच्या मागणीनुसार पुन्हा त्यांचा रिमांड एकदम २७ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आला. त्याचवेळी बाहेर राहून आंदोलनाला मार्गदर्शन करणारे प्रल्हाद कराड पाटील ह्यांनाही मंगरूळपीर फाट्यावर अटक केली गेली होती व त्यांनाही नाशिक कोर्टात उभे केले गेले होते. त्यांनाही इतर नेत्यांप्रमाणे २७ डिसेंबरपर्यंतचा रिमांड दिला गेला.

जोशी व मोरे यांची रवानगी ठाणे येथील तुरुंगात व बोरास्ते व कराड पाटील यांची रवानगी येरवडा येथील तुरुंगात करण्याचा आदेश दिला गेला. त्याचवेळी त्यांना नाशिकहून हलवण्यापूर्वी सक्तीने आहार दिला जावा, असाही आदेश न्यायालयाने काढला. तुरुंगाधिकाऱ्यांनी ताबडतोब त्यांना सलाइन लावायची आणि तिच्यातून ग्लुकोज द्यायची व्यवस्था केली. अशा परिस्थितीत उपोषण करण्यात अर्थ नाही, हे प्रामाणिकपणे मान्य करून जोशींनी उपोषण सोडायचा निर्णय घेतला आणि २४ नोव्हेंबर १९८० रोजी मुरलीधर ढिकले या वयोवृद्ध शेतकऱ्यांच्या हस्ते मोसंब्याचा रस घेतला. नऊ दिवस चाललेल्या ह्या उपोषणाची अशी सांगता झाली. त्यानंतर त्यांची ठाणे तुरुंगात रवानगी झाली.

राजकीय पुढाऱ्यांचा ह्या आंदोलनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा होता? त्यांच्या अस्तित्वालाच आव्हान देणारा हा विचार मूलतःच त्यांना पेलणारा नव्हता. सुरुवातीला कांदा आंदोलनाप्रमाणेच ऊस आंदोलनाकडेही त्यांनी दुर्लक्षच केले. कारण इतक्या मोठ्या प्रमाणावर शेतकरी जोशींच्या मागे उभे राहतील याची त्यांनी कधी कल्पनाच केली नव्हती. पण जेव्हा

लाखोंच्या संख्येने शेतकरी ह्या माणसाच्या मागे उभे राहत आहेत हे त्यांच्या लक्षात आले, तेव्हा मात्र त्यांचे धाबे दणाणले. जोशी आपल्या प्रत्येक भाषणात राजकारण्यांनी शेतकऱ्यांना इतकी वर्षे कसे फसवले, स्वार्थासाठी शेतकऱ्यांचा कसा वापर केला व प्रत्यक्षात त्यांची लूटच कशी केली आणि मुख्य म्हणजे पक्ष कोणताही असो, सगळ्या पक्षांचे धोरण हेच असते असे सांगत असत.

राष्ट्रीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष (अध्यक्ष हे पंतप्रधान स्वतःच होते) व्ही. टी. कृष्णमाचारी यांनी २८ एप्रिल १९५६ साली तयार केलेल्या एका मसुद्यात 'शेतीमालाचे उत्पादन ४० टक्क्यांनी वाढवावे व शेतीमालाची किंमत २० टक्क्यांनी कमी करावी' असे एक मार्गदर्शक तत्त्व नमूद केले आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यातच 'सारा उत्पादनखर्च लक्षात घेऊन शेतीमालाचा भाव ठरवला जाऊ नये' असे एक मार्गदर्शक तत्त्व असल्याचेही जोशी प्रत्येक सभेत सांगत. १९६५ साली पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी स्थापन केलेला कृषिमूल्य आयोग (Agriculture Prices Commission) शेतीमालाचे भाव ठरवतो; त्याच्या १९७१ सालच्या एका अहवालात नमूद केलेले पुढील धोरण जोशी नेहमी उदधृत करत –

> शेतकऱ्यांना त्यांचा संपूर्ण उत्पादनखर्च भरून निघेल अशा किमती देणे अव्यवहार्य होईल. घरच्या माणसांनी केलेल्या कामाच्या मजुरीचा किमान वेतन दराप्रमाणे हिशेब केल्यास शेतीमालाच्या किमती अवास्तव वाढतील. त्यामुळे कारखान्यांना लागणारा कच्चा माल महाग होईल आणि त्याशिवाय कामगारांनाही त्यामुळे त्यांचा रोजगार वाढवून द्यावा लागेल.

यातून शेतकऱ्याला त्याचा सर्व उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव द्यायचा नाही हे सरकारचे धोरणच आहे, हा मुद्दा उघड होई. विशेष म्हणजे त्यांचे हे म्हणणे सरकारच्या कुठल्याही अधिकाऱ्याने तेव्हा किंवा त्यानंतरही कधी खोडून काढलेले नाही.

जोशींना टाळणे आता सत्तारूढ व विरोधी पक्षांच्या नेत्यांनाही अशक्य झाले. लोकदलचे जॉर्ज फर्नांडिस, जनता पार्टीचे हरिभाऊ महाले, अर्स काँग्रेसचे सूर्यभान गडाख, शेतकरी कामकरी पक्षाचे विठ्ठलराव हांडे ह्यांसारखे विरोधी पक्षांचे नेते आणि सत्तारूढ पक्षाचे तत्कालीन शिक्षणमंत्री बळीराम हिरे ह्यांसारखे नेते आपणहून जोशींशी संपर्क साधू लागले. जोशींचा प्रभाव असाच वाढू दिला तर लवकरच एक दिवस ते आपल्या डोक्यावर मिऱ्या वाटतील अशी भीती सर्वच राजकीय नेत्यांना वाटत होती; विशेषतः काँग्रेस नेत्यांना. म्हणूनच एकीकडे जोशींना फार महत्त्व द्यायला ते तयार नव्हते, पण त्याचबरोबर शेतकरी विलक्षण भक्तिभावाने जोशींच्या मागे आहेत हेही त्यांना उघड दिसत होते. त्यामुळे संघटनेबरोबर कसे धोरण ठेवावे हेच त्यांना कळेनासे झाले होते.

'उसासाठी टनाला तीनशे रुपये भाव मागणे हास्यास्पद आहे' असे कालपरवापर्यंत म्हणणाऱ्या आणि तसा भाव मागणाऱ्या जोशींची कुचेष्टा करणाऱ्या महसूलमंत्री शालिनीताई

पाटील ह्यांच्यासारख्या नेत्या स्वतःच पुढे 'उसाला तीनशेचा भाव मिळालाच पाहिजे' असे म्हणू लागल्या. नरेन्द्र तिडके, रामकृष्ण मोरे यांसारखे इंदिरा काँग्रेसचे नेते उघड उघड शेतकऱ्यांची बाजू घेऊ लागले. शंकरराव कोल्हे, यशवंतराव मोहिते यांसारखे स्वतः कारखान्यांशी संबंधित असलेले नेते तीनशेची मागणी अगदी योग्य आहे असेच म्हणत होते. मोहिते यांनी जाहीर सभेत सांगितले की ''तीनशे रुपये भाव मागणाऱ्यांना तुरुंगात घालू असे कोणी म्हणत असेल, तर सर्वांत आधी मी तुरुंगात जायला तयार आहे. मी तर म्हणेन, की शेतकरी तीनशे रुपये मागतात हेच मुळात कमी आहे. उसाचा उत्पादनखर्च ४४८ रुपये आहे व शेतकऱ्यांनी तेवढा भाव मागायला हवा.'' इतरांपेक्षा ह्या प्रश्नाबाबतचे त्यांचे ज्ञान अधिक होते. इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस वसंतदादा पाटील तर इंदिरा काँग्रेसच्या २५ खासदारांसह केंद्रीय शेतीमंत्री राव बिरेंद्र सिंग यांना दिल्लीत जाऊन भेटले व त्यांनी संघटनेने केलेल्या मागण्याच स्वतःच्या म्हणून सादर केल्या. 'उसाला तीनशे रुपये भाव दिला तर सगळे साखर कारखाने मोडीत काढावे लागतील' असे अवघ्या दोन महिन्यांपूर्वी म्हणणारे व त्यावेळी विरोधी पक्षात असलेले शरद पवार नोव्हेंबरमध्ये संघटनेला मिळणारा पाठिंबा बघून 'उसाला तीनशेच काय, साडेतीनशे रुपये भाव मिळायला हवा' असे म्हणू लागले व त्यासाठी त्यांनी नागपूरला शेतकऱ्यांची एक दिंडीही काढली.

अगदी अल्प काळात झालेल्या ह्या मतपरिवर्तनामागचे कारण उघड होते. प्रत्येकाला आपापला मतदारसंघ जपायचा होता व त्यासाठी शेतकऱ्यांची ही एकमुखी मागणी उचलून धरणे त्यांना भाग होते. शिवाय, एवीतेवी शेतकऱ्यांची ही मागणी सरकारला मंजूर करावीच लागणार आहे, तेव्हा आपल्या प्रयत्नामुळेच हा भाव मंजूर झाला असे सगळ्यांना दाखवायचे, त्याचे श्रेय स्वतःच लाटायचे हा विचारही त्यामागे होता. अर्थात जोशींना आता शेतकऱ्यांच्या हृदयात असे काही स्थान प्राप्त झाले होते, की तिथून त्यांना हटवणे आता केवळ अशक्य होते.

राजकीय मंचावर घडणाऱ्या अशा सगळ्या हालचालींचा परिणाम सरकारवर होणे स्वाभाविक होते. शेतकऱ्यांच्या मागण्या न्याय्य आहेत असे बहुतेक नेत्यांचे म्हणणे होते व ते मुख्यमंत्र्यांच्या कानावर सारखे जातच होते. दिल्लीहूनही सतत हा लढा लवकर मिटवावा असा दबाव येत होता. कारण इतर राज्यांमधील शेतकरीही ह्या आंदोलनाकडे डोळे लावून बसले होते. अंतुले हे केंद्र सरकारच्या मर्जीतले मुख्यमंत्री होते. केंद्राकडून येणारा दबाव त्यांनाही अस्वस्थ करत होता. 'कुठल्याही परिस्थितीत आम्ही संघटनेच्या मागण्या मान्य करणार नाही, त्यांचे हे आंदोलन कठोर पावले उचलून आम्ही मोडून काढू' असे पुन्हा पुन्हा म्हणणाऱ्या अंतुलेंना शेवटी ह्या मागण्या मान्य कराव्याच लागल्या. २६ नोव्हेंबर रोजी अंतुले यांनी कुलाबा जिल्ह्याचे 'रायगड' असे नामांतर केले व त्यानंतर दोनच दिवसांनी, म्हणजे २८ नोव्हेंबर रोजी, ते शिवाजी महाराजांची भवानी तलवार परत मिळवून आणण्यासाठी लंडनला रवाना झाले. पण मधल्या एका दिवसात, २७ नोव्हेंबर रोजी, वेळात वेळ काढून त्यांनी उसाला प्रती टन ३०० रुपये आणि कांद्याला प्रती क्विंटल ५५ ते ७० रुपये भाव देण्याचे घोषित केले. सर्व नेत्यांची व शेतकऱ्यांची तुरुंगातून सुटका करायचेही आदेश दिले. त्यानुसार २८

डिसेंबरपर्यंत तुरुंगात राहायची तयारी केलेल्या जोशींचीही २८ नोव्हेंबरला मुक्तता झाली. अर्थात त्यांच्यावरील व इतर सर्वांवरील खटले मात्र पुढे प्रदीर्घ काळ चालूच राहिले.

हे न्याय्य भाव आधीच दिले असते तर शेतकऱ्यांना ना तुरुंगात जावे लागले असते, ना लाठ्या-गोळ्या झेलाव्या लागल्या असत्या. मग अंतुलेंनी हा निर्णय पूर्वीच का नाही घेतला? खरे तर ह्याचे कारण एकच होते – शेतकरी आंदोलनापुढे आपण झुकलो असे चित्र त्यांना निर्माण होऊ द्यायचे नव्हते. हा केवळ त्यांचा अहंकार होता. शिवाय शेतकऱ्यांचे एकमेव नेते म्हणून जोशींनी समाजात उभे राहावे हे त्यांना किंवा अन्य कुठल्याच राजकीय नेत्याला कधीच परवडणारे नव्हते!

नाशिकचे प्रसिद्ध वकील ॲडव्होकेट दौलतराव घुमरे ह्यांच्याविषयी इथे आवर्जून लिहायला हवे. एकेकाळचे हे साम्यवादी. अडीच वर्षे तुरुंगवास भोगलेले. इगतपुरी भागात भात पिकवणाऱ्या गोरगरीब शेतकऱ्यांची संघटना उभारण्यात त्यांचा मोठा सहभाग होता. कॉम्रेड गोदावरी आणि कॉम्रेड श्यामराव परुळेकर ह्यांच्याबरोबर आदिवासींसाठी त्यांनी लढा दिला होता. पुढे त्यांनी मराठा विद्या प्रसारक संघात अनेक वर्षे काम केले. अशी पार्श्वभूमी असलेली व्यक्ती शेतकरी आंदोलनाकडे आकर्षित झाली नसती तरच नवल.

अर्थात जोशींना त्यांच्या पार्श्वभूमीची काहीच पूर्वकल्पना नव्हती; दोघांचा संबंध आला तो केवळ एक वकील आणि एक अशील म्हणून. नाशिक कोर्टात जोशींना त्यांच्या सहकाऱ्यांसह हजर केले गेले तेव्हा. पुढे त्यांची चांगली मैत्री झाली. स्वतंत्र भारत पक्षाचे उमेदवार म्हणून त्यांनी १९९६ साली नाशिक मतदारसंघातून लोकसभेची निवडणूकही लढवली. आपल्या *Lawyer* ह्या इंग्रजी आत्मचरित्रात त्यांनी जोशी ह्यांच्याविषयी व संघटनेविषयी बरेच लिहिले आहे. त्या आत्मचरित्राला शरद जोशी यांची प्रस्तावना आहे व त्याचे प्रकाशन ज्येष्ठ विधिज्ञ राम जेठमलानी ह्यांच्या हस्ते झाले होते. आत्मचरित्राचा मराठी अनुवादही मे २००६ मध्ये प्रसिद्ध झाला आहे.

१० नोव्हेंबर रोजी जोशी यांना अटक झाल्यानंतर ती रात्र त्यांनी पोलीस कोठडीतच काढली होती. त्यानंतर ११ तारखेला त्यांना नाशिक कोर्टात हजर केले गेले. आदल्या दिवशी नाशिक जिल्ह्यातल्या सुमारे ३१,००० शेतकऱ्यांना अटक झाली होती. त्याशिवाय, रोज नवे नवे शेतकरी पकडून कोर्टात हजर केले जात होते. ह्या सर्वांची बाजू कोर्टापुढे मांडणे हे एक अशक्यप्राय काम समोर उभे ठाकले होते. अटक झालेल्या काही पुढाऱ्यांकडे थोडेफार पैसे होते, पण शेतकरी संघटनेकडे काहीच पैसे नव्हते; स्वतः जोशींकडे जेमतेम शंभर रुपये होते. फाटक्या तुटक्या कपड्यात असलेल्या बहुसंख्य शेतकऱ्यांकडे पाच-दहा रुपयेदेखील नव्हते. नुसत्या कोर्ट फीची रक्कमच प्रचंड होत होती. अशा प्रसंगी घुमरे यांनी सगळी जबाबदारी स्वतःच्या अंगावर घेतली. ते अतिशय उत्साहाने कामाला लागले. त्यांच्याच प्रयत्नांमुळे कुठल्याही वकिलाने ह्या केसेस लढवायचा एक पैसाही घेतला नाही. उलट, कोर्ट फीदेखील त्यांनीच भरली व इतर सर्व खर्चही स्वतःच केला. आपल्या उपरोक्त आत्मचरित्रात ॲड.

घुमरेंनी याविषयी विस्ताराने लिहिले आहे (पृष्ठ १४६-७) :

आम्ही नाशिकच्या बार असोसिएशनची बैठक घेऊन शेतकरी आंदोलनास पाठिंबा देण्याचा व न्यायालयीन कामात शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करायचा ठराव एकमताने मंजूर केला. मला सांगायला अभिमान वाटतो, की सर्व वकिलांनी शेतकऱ्यांच्या साहाय्यासाठी सक्रिय भाग घेतला. न्यायालयीन कर्मचारीवर्गानेही सर्व मदत केली. न्यायाधीश मंडळींनीसुद्धा पूर्ण सहकार्य देऊ केले. सहीसुद्धा करू न शकणाऱ्या असंख्य शेतकऱ्यांनी वकीलपत्रावर स्वतःचा अंगठा उमटवला.

अटक झालेल्या शेतकऱ्यांच्या संख्येमुळे न्यायालयातील जागा अपुरी पडू लागली, म्हणून मी माझ्या वकीलमित्रांना सल्ला दिला, की त्यांनी न्यायाधीशांना तुरुंगात नेऊन तिथेच न्यायालयाचे कामकाज करावे. बऱ्याच न्यायाधीशांनी तसे केले. मी स्वतः नाशिक रोड मध्यवर्ती तुरुंगात जाऊन काही प्रकरणे हाताळली. जाधव नासिक रोडचे पोलीस अभियोक्ते होते. त्यांनी कर्तव्याचा भाग म्हणून शेतकऱ्यांविरुद्ध कामकाज पाहिले. त्यांची पत्नी खेडेगावातून आलेली असल्याने, तिने जामिनावर सुटका झालेल्या शेतकऱ्यांना भोजन देण्याच्या कार्यात सहभाग घेतला. तिचा कामातला उत्साह पाहून मीही आश्चर्यचकित झालो. एरव्ही त्या महिलेला घराबाहेर पडलेले कोणी पाहिले नव्हते. एका अर्थाने खेडेगावातील महिलांमध्ये एक प्रकारचे स्थित्यंतर घडून आले होते.

ॲड. घुमरे यांनी व एकूणच नाशिकमधील वकिलांनी जे सहकार्य शेतकरी आंदोलकांना दिले, ते भारतातील सामाजिक चळवळीच्या इतिहासात खूप उल्लेखनीय मानले जाईल.

१४ डिसेंबर १९८० रोजी आंदोलन यशस्वी झाल्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी पिंपळगाव बसवंत येथे शेतकऱ्यांचा प्रचंड मेळावा झाला. एक लाखाहून अधिक शेतकरी मेळाव्याला हजर होते.

पहिले वक्ते होते माधवराव मोरे. ते म्हणाले,

''जी किंमत मोजून तुम्ही एवढ्या मोठ्या संख्येने इथे जमलात, त्याला हिशेब नाही. पण एवढ्यानं भागणार नाही हे ध्यानात ठेवा. आपल्या रामायणातील राम आत्ता कुठं नुसता अयोध्येच्या बाहेर पडला आहे. त्याचा वनवास इथून पुढं सुरू व्हायचा आहे. म्हणून सांगतो, हुरळून जाऊ नका, सावध राहा!''

नंतर प्रल्हाद कराड पाटील म्हणाले,

''स्वातंत्र्यानंतर आज प्रथमच शेतकऱ्यांना पक्षविरहित आणि सत्तेची अभिलाषा न बाळगणारं, संपूर्णपणे प्रामाणिक आणि निःस्वार्थी असं नेतृत्व शरद जोशींच्या रूपानं मिळालं आहे. सारा शेतकरी समाज आज त्याच्यामागे उभा आहे, ह्याचं राजकारण्यांना फार मोठं दुःख

होऊन राहिलंय! आपलं आंदोलन सुरू झालं तेव्हापासून हे राजकारणी आपली कुचेष्टा करत आहेत. आपण त्यांच्या बडबडीकडे लक्ष देत नाही, ह्याचादेखील त्यांना राग येतो! आपले चालू मुख्यमंत्री विचारतात – हा शरद जोशी कोण? आम्ही त्याच्याशी काय म्हणून बोलणी करायची? ह्या सरकारला आम्ही सांगू इच्छितो, की शरद जोशी आम्हा शेतकऱ्यांचा नेता आहे आणि त्याच्याशीच तुम्हाला बोलणी करावी लागतील!... आणि शेवटी माझं भाषण संपवण्याअगोदर मी अत्यंत आनंदानं एक सांगू इच्छितो. ह्या सभेच्या एकच तास अगोदर सरकारची मुंबईहून तार आली आहे – शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी ह्यांच्याशी बोलणी करायला मंत्रिमंडळ तयार आहे!''

ह्यानंतर 'शरद जोशी झिंदाबाद'च्या घोषणांनी पिंपळगाव बसवंतचं ते मैदान थरारून उठले. टाळ्यांचा प्रचंड गजर सुरू झाला. त्या जयघोषातच जोशी उठले. माइकपाशी गेले. नेहमीप्रमाणे हात जोडून त्यांनी सगळ्यांना नमस्कार केला. क्षणार्धात सभेत गंभीर शांतता पसरली आणि तितक्याच गंभीर आणि शांत आवाजात जोशी बोलू लागले :

''माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो! शेतकऱ्यांचा हा जो प्रचंड मेळावा भरला आहे, त्या मेळाव्यानं सर्व टीकाकारांना उत्तर दिलं आहे. जे टीकाकार म्हणत होते, की आंदोलन एकदा बंद केलं, की पुन्हा चालू करता येत नाही, त्यांना तुम्ही सर्वांनी आपोआपच उत्तर दिलं आहे.''

आंदोलन ऐन भरात असताना जोशींनी ते ४८ तासांकरिता स्थगित केले, ह्याबद्दल अनेकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. वेळोवेळी जोशींनी त्यांना समर्पक उत्तरही दिले होते – आमच्या आंदोलनाची गाडी अशी नाही, की जी धक्का दिल्याशिवाय सुरूच होत नाही आणि एकदा सुरू झाली की थांबवताच येत नाही! किल्ली फिरवली, की आमचे इंजिन सुरू होते व गाडी पळू लागते, पुन्हा किल्ली फिरवली, की आम्ही इंजिन थांबवूही शकतो व गाडीही थांबवता येते! पण ह्या सभेत त्यांनी ह्या आंदोलनस्थगितीचे आणखीही एक व्यावहारिक स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले,

''शेतकरी ज्याची आतुरतेने वाट पाहत होते, तो पाऊस १२ नोव्हेंबरच्या सुमारास झाला. पेरणीसाठी शेतकऱ्यांना त्यावेळी आंदोलनातून मोकळं करणं जरुरीचं होतं ह्याची जाणीव किती राजकीय पुढाऱ्यांना होती? एक डिसेंबरपर्यंत गव्हाची पेरणी झाली नाही, तर नाशिक आणि इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची काय स्थिती होते, ह्याची जाणीव किती राजकीय पुढाऱ्यांना आहे? म्हणूनच ही मंडळी जेव्हा तापलेलं आंदोलन आम्ही स्थगित केलं, म्हणून आमच्यावर वेडीवाकडी टीका करतात, तेव्हा त्यांना काय उत्तर द्यावं हेच आम्हाला कळत नाही.

''हे आंदोलन आता केवळ नाशिक किंवा अहमदनगर-धुळे जिल्ह्यांपुरतं मर्यादित राहिलेलं नाही. आजच्या ह्या मेळाव्याला महाराष्ट्रातील बहुतेक सर्व जिल्ह्यांमधील शेतकरी प्रतिनिधी हजर आहेत. नाशिक जिल्ह्यात सत्याग्रह करणाऱ्या शेतकऱ्यांना आता इतर जिल्ह्यांतील तुरुंगांत पाठवणं सरकारला शक्य होणार नाही. कारण प्रत्येक जिल्ह्यातील तुरुंग त्या त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनीच भरलेले असतील!''

जोशींच्या ह्या विधानाचे सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट करून स्वागत केले.

नाशिक, धुळे, पुणे व नगर ह्या जिल्ह्यांव्यतिरिक्त इतर जिल्ह्यांमधील शेतकरीही ह्या मेळाव्यात आपणहून सहभागी झाले होते. विशेष म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा तसेच पार कर्नाटकाहूनही शेतकरी आवर्जून आले होते. आंदोलनाची माहिती किती झपाट्याने पसरत होती ह्याचे हे द्योतक होते.

आंदोलनाबाबतचा जोशींचा एक अनुभव इथे नमूद करायला हवा.

या ऊस आंदोलनाला मिळालेला एकूण प्रतिसाद कोणाच्याही अपेक्षेपेक्षा खूपच अधिक होता यात शंकाच नाही; परंतु प्रत्यक्ष तो दिवस उजाडेपर्यंत जोशी यांनाही प्रतिसादाविषयी मनातून शंका होती. बऱ्याचनंतर, म्हणजे १० डिसेंबर २००५ रोजी, परभणी येथे भरलेल्या शेतकरी संघटनेच्या रौप्यमहोत्सव मेळाव्यातील भाषणात आपल्या त्या वेळच्या मनःस्थितीचे वर्णन जोशींनी केले आहे. ते म्हणाले होते,

> १० नोव्हेंबर १९८०ला नाशिकचं उसाचं आंदोलन बांधावरून रस्त्यावर आणि रेल्वे रुळांवर आणायचं ठरलं. त्याआधी जवळजवळ पंधरा दिवस संपूर्ण नाशिक जिल्हा आम्ही पिंजून काढला होता. पण तरीही, ९ नोव्हेंबरला दुसऱ्या दिवसापासूनच्या 'रेल रोको'ची घोषणा केल्या केल्या मनात धाकधूक सुरू झाली. आपण इतकं सर्वस्व पणाला लावून हा जुगार खेळलो आहोत; पण ही माणसं आपलं ऐकतील की नाही कुणास ठाऊक. माझ्या पोटात मोठा गोळा आला, की घरातल्या सगळ्या लोकांना – बायकोला, मुलींना – दुखवून मी घराबाहेर पडलो आहे; अशा परिस्थितीत उद्या शेतकऱ्यांनी खरंच साथ दिली नाही, तर आयुष्याला काय अर्थ राहणार आहे? रेल्वेच्या गाड्या थांबवण्याकरिता जर शेतकरी आले नाहीत, तर त्याच गाडीच्या पुढे पडून मला आयुष्य संपवावं लागेल. या विचाराने झोप येईना. शेवटी रात्री तीन वाजता एक फोन आला. आमच्या एका मोठ्या सहकाऱ्यांचा फोन होता. ते म्हणाले, 'आम्ही पंचवीस बैलगाड्या घेऊन रेल्वे रुळांच्या बाजूला येऊन थांबलेलो आहोत; आत्ताच बसायची परवानगी दिलीत तर आम्ही आताही रुळांवर बसायला तयार आहोत.' हा फोन आला आणि मी निश्चिंत झोपी गेलो.
>
> (*माझ्या शेतकरी भावांनो, मायबहिणींनो...*, पृष्ठ २१४)

ऊस आंदोलनाची तीव्रता बागलाण परिसरात सर्वाधिक होती व त्यामुळे रामचंद्रबापू पाटील यांचा उल्लेख इथे करायला हवा. या तालुक्यातील मुळाणे हे बापूंचे गाव. तेथून पाच किलोमीटरवर सटाणा. तसे बापू दिसायला सौम्य, समंजस; घरचे खाऊन-पिऊन सुखी. पण लढण्याचा क्षण आला की तेवढेच खंबीर. 'बापू नावाचे वादळ' हे त्यांच्यावरती शरद जोशींनी लिहिलेल्या लेखाचे शीर्षक होते. लहानपणापासूनच सामाजिक कार्याची आवड. लौकरच ते काँग्रेसवासी झाले; पण सक्रिय राजकारणापासून दूरच राहिले. १९७२ सालीच त्यांनी

बागलाण तालुका शेतकरी संघटना स्थापन केली होती. सटाणा, कळवण, मालेगाव, साक्री, टेहेरे हे यांचे कार्यक्षेत्र आणि हाच पुढे ऊस आंदोलनाचा बालेकिल्ला ठरला. इथे त्यांच्यात आणि अंबाजोगाईजवळच्या मोरेवाडीचे श्रीरंगनाना मोरे यांच्यात बरेच साम्य आढळते. दोघेही शरद जोशींच्या पूर्वीपासूनच शेतकऱ्यांसाठी स्वतंत्ररीत्या काम करत होते आणि दोघांनीही पुढे अत्यंत निरलस भावनेने आपापले काम शरद जोशी यांनी सुरू केलेल्या शेतकरी संघटनेच्या कामात विसर्जित केले. हा त्याग फार मोठा होता. ६ नोव्हेंबर १९८० रोजी बापूंची जोशींबरोबर प्रथम भेट झाली आणि त्या दिवसापासून त्यांनी स्वतःला ह्या कामासाठी वाहूनच घेतले. सटाणा येथे भरलेल्या शेतकरी संघटनेच्या पहिल्या अधिवेशनाचे ते स्वागताध्यक्ष होते, तर १९८४ सालच्या परभणी येथील दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

अनेकदृष्ट्या उसाचे हे आंदोलन खूप महत्त्वाचे ठरले.

मुंबई-आग्रा हा देशातील एक प्रमुख महामार्ग आहे व तो निदान चार दिवस पूर्ण बंद पडल्यामुळे साहजिकच ह्या आंदोलनाची बातमी वाऱ्यासारखी देशभर पसरली. महाराष्ट्र विधानसभेप्रमाणे लोकसभेतही ऊस आंदोलनावर चर्चा झाली.

या आंदोलनाची सर्वच राजकीय पक्षांना दखल घ्यावी लागली. शेतकरी आंदोलनामुळे नाशिकमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीचा अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आपल्या पॉलिट ब्युरोचे एक सदस्य कॉम्रेड झेड. ए. अहमद यांना पाठवले होते. घुमरे यांनी त्यांची व शरद जोशींची भेटही घालून दिली होती. अर्थात अहमद यांनी शेवटी पक्षाकडे काय अहवाल पाठवला हे मात्र ज्ञात नाही.

शेतकरी आंदोलनाला आपला पाठिंबा जाहीर करण्यासाठी जॉर्ज फर्नांडिस नाशिकला आले होते. काही समाजवादी तरुणांना बरोबर घेऊन त्यांनी कलेक्टर कचेरीवर मोर्चा काढला होता. तिथे त्यांना अटक होऊन त्यांच्यावर खटलाही भरला गेला होता. त्यावेळी जामीन नाकारून त्यांनी कोठडीत जाणे पसंत केले होते. पण त्यांना ह्या खेपेला जनतेकडून फारसा पाठिंबा मिळाला नाही. आपल्या आंदोलनाचा स्वतःची राजकीय प्रतिमा अधिक उजळ करण्यासाठी ते वापर करून घेत आहेत ह्या भावनेने आणि राजकीय नेत्यांपासून आपण दूरच राहायचे ह्या आपल्या धोरणामुळे शेतकरी संघटनेनेदेखील त्यांची फारशी दखल घेतली नाही.

विशेष म्हणजे जगातील अनेक देशांत ह्या आंदोलनाची बातमी पोचली. कारण अशा प्रकारचे व ह्या प्रमाणावरचे एखादे अर्थवादी शेतकरी आंदोलन भारतात प्रथमच होत होते. ॲड. दौलतराव घुमरे यांनी आपल्या उपरोक्त आत्मचरित्रात (पृष्ठ १५१) लिहिले आहे,

''नाशिकचे कॉम्रेड एल. एम. पाटील त्यावेळी रशियात होते. मॉस्कोत ही बातमी धडकल्यावर तिथल्या पुढाऱ्यांत त्याविषयी चर्चा झाल्याचे त्यांनी मला नंतर सांगितले.''

चाकणच्या कांदा आंदोलनापेक्षा हे ऊस आंदोलन अधिक व्यापक होते. कांदा आंदोलनात तुरुंगात गेलेल्यांची संख्या तीनशे-साडेतीनशे होती, ऊस आंदोलनात तुरुंगात गेलेल्यांची संख्या ३१,०००हून अधिक, म्हणजे कांदा आंदोलनापेक्षा सुमारे शंभरपट अधिक

होती. ही आकडेवारी तशी बोलकी आहे.

महाराष्ट्राचे तर सारे राजकारण त्यावेळी तरी साखरेभोवती व म्हणून उसाभोवती फिरत होते. देशभरातील उसाचे प्रभावक्षेत्रही खूप मोठे होते.

उसातील आर्थिक उलाढाल कांद्यातील आर्थिक उलाढालीपेक्षा कित्येक पट अधिक होती.

ह्या आंदोलनाचे पडसाद पंजाबपर्यंत कसे पोचले ते लिहिलेच आहे.

ह्या आंदोलनातून नव्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची एक मोठी फौजच तयार झाली.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, सर्वसामान्य शेतकरी ह्या आंदोलनानंतर खूपच अधिक धीट झाला. आपण पोलिसांच्या लाठ्या खाऊ शकतो, तुरुंगात जाऊ शकतो आणि अंतिमतः आपल्या मागण्या मान्य करून घेऊ शकतो, हा आत्मविश्वास त्याच्या मनात आता जागा झाला. 'घाला आम्हाला तुरुंगात. तुमचे सगळे तुरुंगही त्यासाठी अपुरे पडतील. आमच्यानंतर आमची बायका-मुलेही तुरुंगात जायला तयार आहेत. एवढे करून नाही भागले, तर आमची शेतीची गुरेढोरेही आम्ही सत्याग्रहासाठी रस्त्यावर आणू' अशी भावना शेतकऱ्यांच्या बोलण्यात व्यक्त होत होती, त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. 'दम है कितना दामन में तेरे, देख लिया है, देखेंगे' असेच जणू आता तो शेतकरी सरकारच्या डोळ्याला डोळा भिडवून म्हणत होता.

अर्थात, ऊस आंदोलन हे काही सर्वस्व नव्हे, आपला खरा लढा खूप लांबच्या पल्ल्याचा आहे, ही केवळ सुरुवात आहे, ह्याची शरद जोशींना एव्हाना स्पष्ट कल्पना आली होती.

■

# ७

# धुमसता तंबाखू

तंबाखू हे कुठल्याही अर्थाने जीवनावश्यक पीक नाही; चैन म्हणून केवळ त्याचा वापर होतो. एकदा तंबाखूची चटक लागली, की ती सुटणे अवघड; निकोटिनचे सगळे दुष्परिणाम ठाऊक असूनही. दरवर्षी सरकार सिगरेटवर अधिकाधिक कर लादत असते आणि तरीही सिगरेटचा खप काही कमी होत नाही. सिगरेट हे मजेचे, ऐष करण्याचे, तसेच मर्दानगीचे एक प्रतीक म्हणून जगभरच्या जाहिराततज्ज्ञांनी समाजमनात वर्षानुवर्षे स्थिर केले आहे. 'Live Life King Size' यासारख्या जाहिराती वर्षानुवर्षे बड्या नटांना घेऊन जगभरच्या नामांकित नियतकालिकांतून झळकत असत; आता सरकारने बंदी घातल्यामुळे त्या थांबल्या आहेत एवढेच; पण बंदी आहे म्हणून, किंवा सिगरेट ओढल्याने कॅन्सर होतो हे सिद्ध झाले आहे म्हणून सिगरेटसेवनाचे प्रमाण कमी झाले आहे असे नव्हे. अशा सिगरेट्स बनवणाऱ्या कंपन्या चित्रप्रदर्शनापासून नाट्यमहोत्सवापर्यंत अनेक सांस्कृतिक उपक्रमांच्या बड्या प्रायोजक असतात हा एक मोठाच विरोधाभास म्हणायचा.

तंबाखूसेवनाचा सिगरेट हा एकमेव प्रकार नव्हे. भारतात सिगरेटपेक्षा विडी पिणाऱ्यांचे प्रमाण अधिकच असेल आणि गुटखा-जर्दा खाणाऱ्यांचे प्रमाणही तेवढेच किंवा कदाचित त्याहून जास्तही असू शकेल. तपकीर ह्या स्वरूपात किंवा नुसताच तंबाखू खाणाऱ्यांची संख्याही भरपूर आहे. सुमारे तीन-चारशे वर्षांपूर्वी युरोपियन व्यापाऱ्यांनी लॅटिन अमेरिकेतून हे पीक भारतात आणले असे म्हणतात. आज तंबाखूच्या उत्पादनात भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो. सुमारे चाळीस लाख शेतकरी कुटुंबांचे पोट आजही ह्या पिकावर अवलंबून आहे; त्यांमध्ये विड्या वळण्याचे काम करणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे.

पूर्वीच्या काळी तर विडी उद्योगाचे महत्त्व खूपच होते. जिथे शेती पूर्णतः पावसाच्या पाण्यावरच अवलंबून आहे त्या भागात पाऊस कमी झाला, तर शेतकऱ्यांची अगदी अन्नान्नदशा होते. अशा वेळी विडी उद्योग हाच त्यांचा आधार असायचा; ग्रामीण भागात इतर उद्योगधंदे जवळजवळ नव्हतेच. विड्या वळण्याचे काम कोणालाही, कुठेही करता येते, अगदी घरीही. त्यासाठी शिक्षणाची काही पूर्वअट नाही. महिलाही हे काम करू शकतात; किंबहुना, विडीकामगार बव्हंशी महिलाच असतात. ह्या उद्योगाची रोजगारक्षमता खूप असल्याने त्याची वाढही देशात अनेक ठिकाणी झाली. 'गरिबाचे व्यसन' म्हणून विड्यांचा प्रसारही खूप झाला. अनेक समाजांत महिलाही विडी ओढत असत; हे प्रमाण पूर्वी तर अधिकच होते. ग्रामीण

भागात जेव्हा साम्यवाद्यांनी कामगार संघटना उभारायला सुरुवात केली, तेव्हा बहुतेकदा ही सुरुवात विडीकामगारांपासूनच होत असे.

मुख्यतः गुजरात, कर्नाटक व महाराष्ट्रात तंबाखूचे पीक निघते. कर्नाटकातील तंबाखू सर्वोत्तम मानला जातो. बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी, हुक्केरी आणि गोकाक हे तीन तालुके म्हणजे या दर्जेदार तंबाखूचे आगर. कर्नाटकात होणाऱ्या एकूण तंबाखूपैकी सुमारे ८० टक्के ह्याच तीन तालुक्यांत होतो. निपाणी शहर चिकोडी तालुक्यात आहे. हे इथले व्यापाराचे मुख्य केंद्र. देशभरातले व्यापारी निपाणीला हजेरी लावतात.

निपाणी परिसरातील जमीन खूप सुपीक आहे. कोणतेही पीक इथे उत्तम येऊ शकते. पण ऊस व तंबाखू हीच दोन पिके इथे प्रमुख आहेत. त्यातही उसापेक्षा तंबाखूच अधिक. ऑगस्ट ते फेब्रुवारी ह्या कालावधीत साधारण पाच महिन्यांत हे पीक येते.

निपाणीत पूर्वी ज्वारी, हरभरा, उडीद, भुईमूग ही पिके घेतली जात. पुढे सरकारनेच स्वतःला कराच्या स्वरूपात अधिक प्राप्ती व्हावी म्हणून तंबाखूसारख्या व्यापारी पिकाची लागवड करायला उत्तेजन दिले. आश्चर्य म्हणजे महाराष्ट्रातदेखील उसाच्या बाबतीत हाच प्रकार घडला होता. आज जरी अपुऱ्या पाण्यामुळे 'साखर की भाकर' असा प्रश्न अनेक विचारवंत उपस्थित करत असले, तरी एकेकाळी नाशिक-नगर भागात भंडारदरा धरणाचे पाणी वापरले जावे व पाणीपट्टीतून धरणाचा खर्च थोडाफार तरी भरून निघावा, ह्या उद्देशाने तत्कालीन ब्रिटिश सरकारनेच अधिक पाणी लागणाऱ्या उसाची लागवड करायला तेथील शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले होते! निपाणी येथेही असाच प्रकार झालेला दिसतो. सरकारी प्रोत्साहनाने सुमारे १८९०च्या आसपास इथे तंबाखूची लागवड सुरू झाली.

निपाणीपुरता विचार केला, तर देवचंद शहा ह्यांचे पूर्वज इथले तंबाखूचे पहिले व्यापारी. सर्वांत मोठे आणि प्रतिष्ठित. मूळचे अकोळ गावचे. १९८०च्या सुमारास 'टोबॅको किंग' म्हणूनच देवचंद शेट ओळखले जात. अनेक घरांमधून त्यांच्या फोटोची पूजाही होत असे; आपले अन्नदाता म्हणूनच सामान्य शेतकरी ह्या कुटुंबाकडे पाहत असे.

व्यापारी देतील तेवढे पैसे गुपचूप घ्यायचे आणि त्यातच भागवायचे हे शेतकऱ्याच्या अगदी अंगवळणी पडले होते. व्यापारी सांगतील त्या कागदावर, कधी कधी तर कोऱ्या कागदावरही, आपला अंगठा उमटवायचा हे इथे सर्रास व्हायचे. व्यापाऱ्यांची दहशत प्रचंड असे. इतकी, की व्यापाऱ्यांच्या पेढ्यांसमोरून वा बंगल्यांसमोरून जाताना शेतकरी आपल्या चपला उचलून डोक्यावर घेत व मग पुढे चालू लागत.

शेतकरी जेव्हा तंबाखू विकायला बाजारपेठेत घेऊन यायचा, तेव्हा तंबाखूच्या एकूण वजनातून अनेक प्रकारची घट (जिला इथे 'सूट' म्हटले जाई) वजा करून उरलेल्या वजनाचेच पैसे शेतकऱ्याला दिले जात.

तंबाखूत पानांचे देठ, बारीक काड्या, शेतातील माती आलेली आहे असे कारण सांगून काडीमाती सूट घेतली जाई. ही पहिली सूट. हवेचा तंबाखूच्या वजनावर परिणाम होतो, असे

सांगून हवा सूट घेतली जाई. तंबाखू पोत्यांत भरून आणला जाई. त्या पोत्याला बोद म्हणत. एका बोदामध्ये साधारण साठ किलो तंबाखू असायचा. ह्या पोत्याचे वजन एकूण वजनातून वजा केले जाई. त्याला बारदान सूट म्हणत. खूपदा वजन करायचा काटा नीट नाही, म्हणून काटा सूट घेतली जाई. सूट म्हणून नेमके किती वजन कमी पकडायचे ह्याचे काही गणित नव्हते – व्यापारी ठरवेल, तोच आकडा स्वीकारण्यावाचून शेतकऱ्याला गत्यंतरच नसे. सरासरी एक बोद तंबाखूमागे सुमारे दहा किलो सूट म्हणून वजनातून कमी केले जात. म्हणजे शेतकऱ्याचे साधारण एक षष्ठांश किवा १६% नुकसान हे या पहिल्या पायरीतच व्हायचे.

विक्रीचा कागदोपत्री काहीच पुरावा शेतकऱ्याकडे नसे, व्यापारी आपल्या वहीत लिहून ठेवत तोच हिशेब गृहीत धरला जाई. विक्रीचे पैसेही शेतकऱ्याला लगेच कधी मिळत नसत; त्यासाठी निदान सहा महिने थांबावे लागे आणि चार-पाच चकरा माराव्या लागत. त्याआधी जर शेतकऱ्याला पैसे हवे असतील, तर ते त्याचेच पैसे व्यापारी त्याला व्याजावर देई; म्हणजे शेतकऱ्याला देय असलेल्या व मुळातच खूप तुटपुंज्या असलेल्या रकमेवरही त्यालाच व्याज द्यावे लागे! अर्थात सगळेच व्यापारी तसे होते असे म्हणणे गैर ठरेल; काही व्यापारी सरळ मार्गाने व्यवहार करणारेही असत.

तंबाखूच्या व्यापाऱ्यांच्या वखारी असत. तंबाखू नीट जमा करून घेणे, तो साठवणे, नंतर ठरलेल्या जागी रवाना करणे वगैरे कामांसाठी ह्या वखारी असत. तिथे मुख्यतः महिला काम करत. तंबाखूवर प्रक्रिया करून जर्दा बनवण्याचे कामही महिला कामगारच करत. त्यांची परिस्थिती अतिशय वाईट होती. कोंदट, अपुरी, अस्वच्छ जागा, कामासाठी बसायचीदेखील गैरसोय, तरीही एकाच जागी तासन्तास बसायची सक्ती, सर्वत्र दरवळणारा तंबाखूचा वास, अंगावर अगदी नखशिखान्त जाऊन बसणारा बारीक तंबाखूचा थर. मग्रूर मालक. सकाळी नऊ वाजता महिला कामाला आल्या, की वखारीचा दरवाजा बंद केला जाई. दुपारी दोन वाजता त्यांना अर्धा तास जेवणाची सुट्टी असायची. त्यानंतर पुन्हा कामाला सुरुवात, ते अगदी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत. त्या दरम्यान अगदी देहविधीसाठीदेखील बाहेर पडायची परवानगी नसायची. त्यातून मजुरी अत्यंत कमी. कोणी फार आवाज उठवला तर त्याला सरळ करायला वखारमालकांनी पोसलेले गुंडही सज्ज असत.

निपाणी व आसपासच्या भागात अशा पंधरा-वीस हजार तरी महिला तंबाखू कामगार होत्या. त्याशिवाय प्रत्यक्ष विडी बनवणारे कारखाने असत. आश्चर्य म्हणजे इतकी मोठी कामगारसंख्या असूनही निपाणीत सरकारी लेबर ऑफिस नव्हते. कुठलीही तक्रार करायची म्हटली तर चिकोडी ह्या तालुक्याच्या गावी जावे लागे. तिथे जायचे म्हणजे कामगारांचा त्या दिवसाचा रोजगार बुडायचा. शिवाय, गेल्यावरदेखील तो विशिष्ट ऑफिसर भेटेलच अशी खात्री नसायची. तो नसला तर दुसरे कोणीही कामगारांचे काम करत नसे. त्यामुळे अन्यायाविरुद्ध दाद मागायची तरी कशी आणि कोणापुढे?

सुभाष जोशी हे निपाणीच्या तंबाखू आंदोलनातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व. मध्यम बांधा,

शांत चेहरा, विचारी वृत्ती आणि तरीही कृतिशील असलेले जोशी व्यवसायाने प्राध्यापक होते, पण अध्यापनाच्या जोडीनेच सामाजिक कार्यात त्यांचा खूप सहभाग असे. आपल्या समाजकार्यामुळे एकदा त्यांना नोकरीही गमवावी लागली होती, पण संघर्ष करून त्यांनी ती परत मिळवली. १९७३-७४च्या सुमारास त्यांनी अकोळ युवक संघ नावाची स्थानिक तरुणांची एक संघटना उभी केली व तिच्यामार्फत वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवायला सुरुवात केली. पत्नी सुनीताअक्का याही सर्व कामात पतीला पुरेपूर साथ देणाऱ्या होत्या. 'सहते चरामि' हे व्रत खऱ्या अर्थाने जपणाऱ्या. घर हेच जोशींचे कार्यालयदेखील असल्याने माणसांचा राबता सतत असे. कधी कधी वीस-वीस लोकांचे जेवणखाणही सुनीताअक्कांना करावे लागे; पण त्यांची कधीही तक्रार नसे. त्यांच्याप्रमाणेच संध्या व शमा या त्यांच्या दोन धाकट्या बहिणीदेखील सुभाष जोशींना त्यांच्या कामात जास्तीत जास्त मदत करत.

२४ ऑक्टोबर २०१२ रोजी निपाणीतील त्यांच्या घरी प्रस्तुत लेखकाची व त्यांची प्रथम भेट झाली. सोबत बद्रीनाथ देवकर हेही होते. आमच्या भेटीपूर्वी काही वर्षे त्यांचा शरद जोशींशी व शेतकरी संघटनेशी फारसा संबंध राहिला नव्हता; पण तरीही संयत शब्दांत, जराही आवाज चढू न देता, त्यांनी सर्व कहाणी ऐकवली.

पूर्वी सुभाष जोशी समाजवादी पक्षात होते. पण त्या पक्षाच्या अनेक मोठ्या नेत्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात आल्यानंतर नाव मोठे आणि लक्षण खोटे असाच अनुभव त्यांना आला. 'एक गाव, एक पाणवठा' आंदोलनाच्या वेळी कोकणात मालवण येथे भरलेल्या एका अधिवेशनाला ते मुद्दाम रजा काढून हजर राहिले होते. त्या अधिवेशनातील भाषणात एका वरिष्ठ नेत्यांनी जाहीर केले की, 'एक गाव, एक पाणवठा कार्यक्रमाला आपण संपूर्ण एक वर्ष वाहून घेणार.' पण प्रत्यक्षात त्यानंतर ते ह्या आंदोलनात कुठेच दिसेनात, म्हणून जोशींनी त्यांना पत्र लिहिले की, 'अधिवेशन संपून सहा महिने झाले, पण तुम्ही आश्वासन पूर्ण केलेले दिसत नाही. तुम्ही एकाही पाणवठ्यावर गेल्याचं ऐकिवात नाही.' अपेक्षेप्रमाणे पत्राला काहीच उत्तर आले नाही!

इतरही अनेक मोठ्या समाजवादी नेत्यांच्या बाबतीत हाच अनुभव आला. भाषणे मोठी मोठी करायची, पण प्रत्यक्ष कृती शून्य. इतर लोहियावादी, मार्क्सवादी नेत्यांचाही असाच अनुभव त्यांना आला. मोहन धारियांचे बंधू गोपीनाथ धारिया ऊर्फ भाई हेही सुभाष जोशींच्या नियमित संपर्कात होते. त्यांची स्वतःची निपाणीजवळ मोठी वडिलोपार्जित शेती होती. १९७७ साली केंद्रातील जनता पक्षाच्या राजवटीत मोहन धारिया व्यापारमंत्री बनले. पण इथल्या तंबाखू कामगारांचे प्रश्न सोडवण्यात त्यांची काहीच मदत झाली नाही. ज्यांना आपण 'आपले' समजतो तेही सत्तेवर आल्यावर मात्र 'आपले' राहत नाहीत हा पुन्हा पुन्हा येणारा अनुभव कुठल्याही ध्येयवादी कार्यकर्त्याचा भ्रमनिरास होईल असाच होता. मग त्यांनी ठरवले, कुठल्याच मोठ्या नावाला भुलायचे नाही; आंधळेपणे कोणाच्या पाठीमागे जायचे नाही.

निपाणीतील तंबाखू कामगार स्त्रिया कुठल्या नरकयातना भोगत असतात, कशा परिस्थितीत काम करत असतात ह्याची पूर्ण कल्पना असल्याने सुभाष जोशींनी लौकरच या

तंबाखू कामगार स्त्रियांना संघटित करायला सुरुवात केली. सुरुवातीला ते मदतीसाठी मुंबई-पुण्याहून काही लेखकांना, पत्रकारांना, पुढाऱ्यांना आवर्जून आमंत्रित करत असत. त्यांना या महिलांची केविलवाणी परिस्थिती दाखवत. त्यांच्या भेटीगाठी, आसपासच्या खेड्यांतील दौरे वगैरे आयोजित करत. काहींनी तिथल्या प्रश्नांबद्दल लेखन वगैरे केले, भाषणे दिली. त्यामुळे बड्या शहरांतील सुशिक्षितांच्या वर्तुळात निपाणीतील महिला तंबाखू कामगारांचे शोषण हा काही दिवस चर्चेचा विषय झालाही; पण त्यामुळे प्रत्यक्षात निपाणीतील शोषणावर काहीही परिणाम झाला नाही.

पुण्याच्या एक समाजकार्यकर्त्या बाई निपाणीत आल्या होत्या. त्यांना देवदासींची एक सभा तिथे घ्यायची होती. त्यांच्या विनंतीवरून सुभाष जोशींनी सभा आयोजित केली; पण 'मला सभेत बोलायचा आग्रह करू नका' असे त्यांनी ह्या विदुषीना वारंवार बजावले होते. बाईंना मात्र ते भाषण करत आहेत आणि अध्यक्षस्थानी त्या स्वतः आहेत असा फोटो काढून घ्यायची फार हौस होती. त्यासाठी त्यांनी एक फोटोग्राफरदेखील मुक्रर केला होता. जोशी तसे स्पष्टवक्ते होते. आपल्या भाषणात ते म्हणाले,

''वर्षाकाठी एक-दोनदा इथे येऊन आणि मग मुंबई-पुण्यात भाषणं देऊन देवदासींची मुक्ती होणार नाही, देवदासींचा कुठलाच प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी इथे येऊन दीर्घकाळासाठी काम करावं लागेल. यल्लम्माच्या यात्रेला एकदातरी स्वतः जावं लागेल, पाच घरी जोगवा मागत फिरावं लागेल, स्वतः जोगतीण बनून त्यांच्या वाट्याला काय येतं ते अनुभवावं लागेल. तरच त्यांना हा प्रश्न किमान समजेल तरी.''

पण ह्या सगळ्या स्पष्टवक्तेपणाचा त्या बाईंवर काहीही परिणाम झाला नाही! आपल्या अध्यक्षीय भाषणात त्या म्हणाल्या, ''मी आता पुण्याला जाऊन एक पत्रकार परिषद घेते, मुंबईला जाऊनही एक पत्रकार परिषद घेते, बंगलोरलाही मी जाणार आहे,'' वगैरे वगैरे. अशा बोलघेवड्या आणि प्रत्यक्ष कामापेक्षा स्वतःच्या प्रसिद्धीतच रस असलेल्या विद्वानांचाही सुभाष जोशींना राजकारण्यांइतकाच तिटकारा होता. हे त्यांचे शरद जोशींबरोबर असलेले एक साम्य म्हणता येईल.

सुभाष जोशी व त्यांचे तरुण सहकारी सायकलवरून सर्व खेड्यांमधून हिंडत, शेतकऱ्यांना मार्गदर्शक अशी पत्रके वाटत, लहान लहान सभा घेऊन शेतकऱ्यांना एकत्र आणायचा प्रयत्न करत; पण त्या साऱ्या प्रयत्नांना म्हणावे तसे यश येत नव्हते. तंबाखू शेतकऱ्यांच्या मनातील व्यापाऱ्यांची दहशत कमी होत नव्हती. तशातच राजकारणी मंडळी वरचेवर कर्नाटक-महाराष्ट्र सीमाप्रश्न उपस्थित करून व कानडी-मराठी वाद निर्माण करून आपापले नेतृत्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करत व त्यामुळे तंबाखूचा प्रश्न मात्र प्रत्येक वेळी मागे पडत असे. या साऱ्या परिस्थितीवर मात करून चालू असलेल्या सुभाष जोशी यांच्या अविरत प्रयत्नांमुळे निपाणीत एका अर्थाने जमीन नांगरून तयार होती, पण लढ्याचे बीज मात्र अजून पडले नव्हते.

तो क्षणही लौकरच आला. नाशिकच्या ऊस आंदोलनावर 'योद्धा शेतकरी' लिहिणारे विजय परुळकर हे त्यासाठी निमित्त ठरले.

एका स्वयंसेवी संस्थेच्या विनंतीवरून निपाणीत देवदासींच्या मुलींसाठी एखादे वसतिगृह उभारता येईल का याची पाहणी करण्यासाठी परुळकर इथे आले होते. देवदासींचे हे माहेरघरच. तंबाखू कामगार स्त्रियांमध्येही अनेक देवदासी असतात. यल्लम्मा देवीच्या यात्रेला हजारो देवदासी व काही इतर महिलाही इथे देशभरातून येत. वसतिगृह स्थापन करण्यासाठीची आवश्यक ती माहिती त्यांनी तीन-चार दिवसांत मिळवलीदेखील. त्याचदरम्यान सुभाष जोशी त्यांना भेटले व तंबाखूप्रश्नाशी परुळकरांचा परिचय झाला. दोघांमध्ये नाशिकच्या ऊस आंदोलनाबद्दलही बरीच चर्चा झाली. भाई धारियाही तिथे हजर होते. शरद जोशींची कीर्ती त्यांच्यापर्यंत पूर्वीच पोचली होती. त्यांचे नेतृत्व इथल्या मरगळलेल्या शेतकऱ्याला एक नवे चैतन्य देईल हे जाणवले होते, पण शरद जोशींशी त्यांनी पूर्वी कधी थेट असा संपर्कही साधला नव्हता. परुळकरांमुळे आता त्यांना तो मार्ग उपलब्ध झाला. 'निपाणीला या' हे एका जोशींचे आमंत्रण परुळकरांनीच दुसऱ्या जोशींपर्यंत पोचवले.

त्यानंतर अनेकदा परुळकर निपाणीला आले व इथल्या आंदोलनावर 'रक्तसूट' ह्या नावाने त्यांनी 'माणूस' साप्ताहिकात मे-जून-जुलै १९८१मध्ये एक उत्कृष्ट लेखमाला लिहिली. पण का कोण जाणे, 'योद्धा शेतकरी'इतकी ही लेखमाला गाजली नाही आणि पुढे पुस्तकरूपात प्रकाशितही झाली नाही.

परुळकरांनी आपले काम चोख बजावले. पुण्याला परतताच त्यांनी शरद जोशींची भेट घेतली. सुभाष जोशी आणि गोपीनाथ धारिया ह्यांचे आमंत्रण त्यांच्यापर्यंत पोचवले. तंबाखू कामगार व शेतकरी ह्यांच्या एकूण परिस्थितीबद्दल सगळी माहिती दिली. निपाणीत घेतलेल्या काही मुलाखतींच्या टेप्स ऐकवल्या. परिणामस्वरूप शरद जोशी विजय व सरोजा परुळकर ह्यांच्यासह ३० जानेवारी १९८१ रोजी पुण्याहून निपाणीला आले. लीलाताईंचे काही नातेवाईक बेळगावात राहात, पण यापूर्वी कधी शरद जोशी निपाणीला आले नव्हते.

आल्या आल्या सगळे सुभाष जोशी ह्यांच्याच घरी गेले. कार्यकर्त्यांची मोठीच गर्दी तिथे उसळली होती. निपाणीत शरद जोशी दाखल झाल्यामुळे सर्वांनाच एकदम नवा उत्साह आला होता. रात्री उशिरापर्यंत सर्वांची चर्चा झाली, काय काय करता येईल याची प्राथमिक आखणीही झाली.

निपाणीत शरद जोशींची प्रतिमा उजळवणारी एक घटना योगायोगाने त्याच दिवशी घडली. शेतकरी संघटनेच्या नाशिक येथील आंदोलनाला इंग्लंडच्या बीबीसी टेलेव्हिजनने बरेच कव्हरेज दिले होते व शरद जोशींची प्रत्यक्ष मुलाखत घ्यायची त्यांची इच्छा होती. भारतीय शेतकऱ्यांचा अन्यायाविरुद्ध उठाव ही त्यांच्या दृष्टीने खूप मोठी घटना होती. त्या दृष्टीने त्यांनी जोशींशी पुण्यात संपर्कदेखील साधला होता. त्यावेळी बीबीसी टेलेव्हिजनची तीन-चार इंग्रज छायाचित्रणकारांची व पत्रकारांची टीम दिल्लीत आली होती; राजीव गांधी ह्यांची मुलाखत घेण्यासाठी. ती संपवून ही टीम पुण्याला येणार होती. पण जोशी निपाणीत असणार म्हटल्यावर

तेही इथे आले होते. जोशी आणि परुळकरांच्या पाठोपाठ दोन-तीन तासांतच बीबीसी टेलेव्हिजनची व्हॅन तिथे पोचली. जोशींनी फोनवर सांगितल्यानुसार सरळ सुभाष जोशींच्या घरी ती इंग्रज टीम आली. शरद जोशींच्या पाठोपाठ हा परदेशी टेलेव्हिजनवाल्यांचा ताफा आलेला पाहून निपाणीतील प्रतिष्ठित मंडळी चांगलीच अवाक् झाली होती! त्यांच्या नजरेत शरद जोशींचा भाव त्यामुळे वधारला होता! या टीमने शरद जोशींची तिथेच मुलाखत घेतली व नंतर तिचा समावेश असलेला एक माहितीपटही बीबीसी टेलेव्हिजनवर दाखवला गेला.

दुसऱ्याच दिवशी, म्हणजे १ फेब्रुवारी १९८१ रोजी, निपाणीतल्या नेहरू चौकात शरद जोशींची निपाणीमधली पहिली जाहीर सभा झाली. तुडुंब गर्दी झाली होती. आठ-दहा हजार विडी व तंबाखू कामगार स्त्रिया हजर होत्या व सुमारे दोन हजार तंबाखू शेतकरीदेखील.

आपल्या निपाणीतल्या त्या पहिल्या भाषणात शरद जोशी म्हणाले :

''शेतकरी आंदोलनाचं किंवा तुमच्या येथील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचं मी नेतृत्व करावं असा माझा अट्टहास मुळीच नाही. ह्याउलट मी तुम्हाला असं सांगू इच्छितो, की कुणी जर अशा प्रकारे नेतृत्व करतो म्हणू लागला, तर सर्वप्रथम त्याला नीट तपासून खात्री करून घ्या व ती पटल्यावर मगच त्याच्यावर विश्वास ठेवा.''

ह्यानंतर नेहमीप्रमाणे गरिबीचे मूळ शेतीमालाच्या अपुऱ्या किमतीत कसे आहे, शेतीमालाला योग्य किंमत मिळाली की बाकीचे प्रश्न कसे सुटतील, उत्पादनखर्च कसा काढायचा, इंडिया विरुद्ध भारत, दारिद्र्यामुळे त्याच्या आयुष्यात येणारी लाचारी वगैरे आपले मुद्दे त्यांनी मांडले. सगळे श्रोते अगदी मंत्रमुग्ध होऊन त्यांचा शब्दन्‌शब्द कानात साठवत होते. टाळ्यांच्या प्रचंड गजराने श्रोत्यांनी त्यांना अभिवादन केले व एकप्रकारे त्यांच्या नेतृत्वावर ह्या पहिल्या सभेतच शिक्कामोर्तब झाले.

सुभाष जोशींना निपाणीत किती आदराचे स्थान आहे हे निपाणीत पाऊल टाकल्यापासूनच शरद जोशींना जाणवले होते. म्हणूनच आपण सुभाष जोशींना त्यांच्या स्थानावरून दूर करून शेतकऱ्यांचे नेतृत्व स्वतःकडे घेत आहोत, ती आपली महत्त्वाकांक्षा आहे हे चित्र त्यांना निर्माण होऊ द्यायचे नव्हते. त्यामुळेच त्यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच नेतृत्वाचा मुद्दा विस्ताराने स्पष्ट केला होता.

पण तरीही ह्या पहिल्या सभेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद शरद जोशींना सुखावून गेला व मुख्य म्हणजे स्वतः सुभाष जोशींनीसुद्धा त्यांचा वडील भाऊ म्हणूनच जणू स्वीकार केला. अनौपचारिक गप्पांमध्ये दोघांना एकमेकांची अधिक जवळून ओळख पटत गेली, कौटुंबिक पातळीवरचा परिचयही दृढ होत गेला.

नंतरचे काही दिवस शरद जोशींचा मुक्काम सुभाष जोशींच्या घरीच होता. दोघांनी एकत्रित सगळ्या परिसरात दौरे केले. चिकोडी तालुक्यातील ५१ खेड्यांमध्ये तसेच हुक्केरी व गोकाक ह्या तालुक्यांमध्ये, आणि बेळगाव व कोल्हापूर ह्या शहरांमध्येही त्यांनी शेतकरी व शेतमजूर यांचे अनेक मेळावे घेतले.

ह्या सगळ्यामागे शरद जोशींचा हेतू अगदी स्वच्छ होता – आपल्या नेहमीच्या पद्धतीनुसार प्रत्यक्ष आंदोलन सुरू करण्यापूर्वी ह्या पिकाचा त्यांना शास्त्रशुद्ध अभ्यास करायचा होता. तंबाखूवर ब्रिटिश काळापासून, म्हणजे साधारण १९४३ सालापासून, अबकारी कर (एक्साइज) लागू आहे व त्यामुळे तंबाखू पिकाची विस्तृत नोंद अबकारी खाते करत असते. एकूण किती जमिनीवर तंबाखू लावला आहे व विशिष्ट शेतात एकूण किती तंबाखूची झाडे आहेत, ह्याची नेमकी नोंद तलाठ्याकडे करावी लागते. एकूण किती किलो तंबाखू पिकला ह्याचीही नोंद होते. इतर पिके शेतकरी कितीही काळ स्वतःकडे ठेवू शकतो, पण तंबाखूचे पीक ठराविक काळापेक्षा अधिक तो स्वतःकडे ठेवू शकत नाही, ते बाजारात आणून विकावेच लागते. एकूण किती तंबाखू विकला ह्याचीही नोंद होई. अबकारी खात्याकडील व तलाठ्यांकडील या नोंदींचाही जोशींना उपयोग झाला. त्यांच्या अभ्यासानुसार चिकोडी तालुक्यातील सुमारे साठ हजार एकर जमीन तंबाखूखाली होती व तेथील ९५ टक्क्यांहून अधिक भूधारक पाच एकरांहून कमी जमिनीचे मालक होते. म्हणजेच अनेकांना वाटायचे त्याप्रमाणे तंबाखूचा शेतकरी हा बडा शेतकरी आहे हा भ्रमच होता, प्रत्यक्षात ९५ टक्के शेतकरी हे अल्पभूधारकच होते.

जोशींनी प्रथम शेतीवरील खर्चाचा व्यवस्थित हिशेब काढला. एका एकरात सरासरी २७० किलो तंबाखू निघत होता व त्यावर एकूण सरासरी खर्च रुपये ३०८० इतका होता. म्हणजेच किलोमागे उत्पादनखर्च होता अकरा रुपये चाळीस पैसे. त्याच्या विक्रीचे मात्र सध्या किलोमागे सरासरी साडेसहा रुपये ह्या दराने जेमतेम रुपये १७५५ मिळत होते. म्हणजेच त्याला प्रत्येक किलोच्या विक्रीमागे चार रुपये नव्वद पैसे किंवा एका एकरामागे रुपये १३२५ नुकसान होत होते. तो कायमच कर्जबाजारी असण्याचे तेच प्रमुख कारण होते. पण उत्पादनखर्च कसा काढायचा ह्याची त्या शेतकऱ्याला कल्पनाच नसल्याने आपण प्रत्यक्षात ह्या सौद्यात किती नुकसानीत जातो आहोत ह्याची त्याला जाणीवच नव्हती. जोशी यांनी उत्पादनखर्च कसा काढायचा हे आधी शेतकऱ्यांना दाखवून दिले.

याहूनही अधिक भाव देणे व्यापाऱ्यांना अगदी सहज परवडण्यासारखे होते हेही त्यांच्या लक्षात आले होते. एक किलो तंबाखूपासून ५००० विड्या तयार होत होत्या व दर एक हजार विड्यांमागे एक रुपया अबकारी कर होता. म्हणजेच एक किलो तंबाखूपासून सरकारला पाच रुपये अबकारी कर म्हणून मिळत, तर शेतकऱ्याला मात्र ह्या एक किलो तंबाखूच्या विक्रीतून फक्त साडेसहा रुपये मिळत. पुढे तर सरकारने विडीवरचा अबकारी कर दुप्पट केला, म्हणजेच एक हजार विड्यांमागे दोन रुपये एवढा केला. त्यामुळे सरकारला दर किलो तंबाखूमागे दहा रुपये मिळू लागले! शेतकऱ्याला मिळणारा तंबाखूचा भाव मात्र तेवढाच, म्हणजे किलोला साडेसहा रुपये, राहिला! म्हणजेच तंबाखू शेतीचा खरा फायदा राबणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा अबकारी कर गोळा करणाऱ्या सरकारलाच होत होता!

केंद्र सरकारला १९७९-८० या सालात एक्साइज ड्युटी म्हणून ह्या भागातून २१ कोटी रुपये उत्पन्न प्राप्त झाले होते व शेतकऱ्यांना मात्र उत्पादनखर्चापेक्षाही खूप कमी भाव मिळत

असल्याने त्यांचे त्या वर्षी बारा कोटी रुपये नुकसान झाले होते.

जोशींनी केलेले एकूण हिशेब हे इतके शास्त्रशुद्ध होते, की व्यापाऱ्यांनी व सरकारी अधिकाऱ्यांनी वा अन्य कोणीही त्याला आंदोलनापूर्वी वा नंतरही कधी आक्षेप घेतला नव्हता. आपली वैचारिक बैठक अशा प्रकारे पक्की झाल्यानंतर २४ फेब्रुवारी रोजी निपाणीला तंबाखू शेतकरी व कामगार यांचा एक मोठा संयुक्त मेळावा शरद जोशींनी घेतला. त्याच्या पूर्वतयारीसाठी म्हणून २१, २२ व २३ फेब्रुवारी ह्या तीन दिवसांत त्यांनी बेळगाव व कोल्हापूर ह्या जिल्ह्यांचाही दौरा केला होता; एकूण १५ सभा घेतल्या होत्या. त्यात एका स्थानिक कृतिसमितीची स्थापना केली गेली. कृतिसमितीचे अध्यक्ष होते कर्नाटकचे वरिष्ठ गांधीवादी नेते अण्णू गुरुजी. इतर सदस्य होते कोल्हापूरचे एस. के. पाटील, संकेश्वरचे बसगौंडा पाटील, अकोळचे आय. एन. बेग आणि सातप्पा शेटके, गळतग्याचे एस. टी. चौगुले, एकसंब्याचे दत्ता पांगम, कापशीचे शामराव देसाई, निपाणीचे गोपीनाथ धारिया ऊर्फ भाई आणि आयेशा दिवाण ऊर्फ चाची.

जोशींनी सर्वांच्या वतीने शासनाला पुढील मागण्या सादर केल्या :

१. तंबाखूला सध्या दिला जाणारा किलोमागे सहा ते सात रुपये हा दर अत्यंत कमी असून त्यात शेतकऱ्याचे वर्षानुवर्षे प्रचंड नुकसान होत आले आहे. तंबाखूच्या दर्ज्यानुसार एका किलोमागे किमान १० रुपये, १२ रुपये किंवा १५ रुपये एवढा उत्पादनखर्चावर आधारित असा भाव मिळायलाच हवा. हा भावदेखील खूप कमीच आहे, पण त्यामुळे फायदा नाही झाला तरी निदान त्याचा उत्पादनखर्चतरी बव्हंशी भरून निघेल. तो भाव द्यायलाही जर व्यापारी तयार झाले नाहीत, तर सरकारने तंबाखूची खरेदी करावी व एवढा भाव तरी शेतकऱ्याला मिळवून द्यावा.
२. सूट म्हणून वेगवेगळ्या प्रकारांनी वजनात कपात न करता एक बोद (म्हणजे ६० किलो) तंबाखूमागे फक्त दोन किलो सूट पकडावी.
३. मार्केट सेस व एन्ट्री फी मार्केट ॲक्टनुसार व्यापाऱ्यांनीच भरायची असते. पण सध्या शेतकऱ्याकडून ती जुलमाने वसूल केली जाते. तसे न करता यापुढे तो कर व्यापाऱ्यांनीच भरावा.
४. वाहतुकीचा खर्च शेतकऱ्याकडून वसूल केला जाऊ नये. साखर कारखाने ज्याप्रमाणे उसाच्या वाहतुकीचा खर्च स्वतः उचलतात, त्याचप्रमाणे इथेही वाहतुकीचा खर्च तंबाखू विकत घेणाऱ्या विडी कारखानदारांनी उचलावा.
५. खरेदी-विक्रीचा करार लेखी व्हावा व त्याची एक प्रत शेतकऱ्यालाही दिली जावी.
६. माल बाजारात आणल्यानंतर सात दिवसांच्या आत त्याचे वजन केले जावे.
७. झालेल्या हिशेबाचे पैसे वजन केल्यानंतर लगेचच शेतकऱ्याला दिले जावेत व ते शक्य नसेल तर निदान पुढील सात दिवसांच्या आत ते हमखास दिले जावेत.

या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर तीन आठवड्यांनी, म्हणजे १४ मार्चपासून, पुणे-बंगलोर हा महामार्ग रोखून धरायचा निर्धारही या सभेत जाहीर केला गेला.

सभेत एकमताने मंजूर झालेल्या ह्या मागणीपत्राची प्रत त्याच दिवशी पंतप्रधान इंदिरा गांधी, अन्नमंत्री राव बिरेंद्र सिंग, व्यापारमंत्री प्रणवकुमार मुखर्जी, कर्नाटकचे मुख्यमंत्री गुंडू राव व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अब्दुल रेहमान अंतुले यांना रजिस्टर्ड पोस्टाने रवाना केली गेली.

खरे तर ह्यांतील कुठलीच मागणी अवास्तव अशी नव्हती, पण तरीही सरकारी यंत्रणा इतकी मुर्दाड बनली होती, की १४ मार्चपर्यंत ह्यांपैकी एकाकडूनही त्या पत्राची साधी पोचसुद्धा आली नाही; काही कृती करणे तर दूरच राहिले.

सरकारकडून ठोस असे काहीच घडत नाहीए हे बघितल्यावर शेवटी ठरल्याप्रमाणे १४ मार्च १९८१ रोजी दुपारी तीन वाजता रास्ता रोकोला सुरुवात झाली. पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्ग चारवर निपाणीला वळसा घालून जाणारा बायपास आणि निपाणी गावात जाणारा रस्ता ह्यांच्या नाक्यावर शेतकरी ठिय्या देऊन बसले. हे स्थळ निपाणीपासून साधारण तीन किलोमीटर अंतरावर होते.

'शेतकरी संघटनेचा विजय असो', 'शरद जोशी झिंदाबाद' अशा घोषणा तारस्वरात दिल्या जात होत्या. हळूहळू चिकोडी तालुक्यातील ५१ छोट्यामोठ्या खेड्यांतील शेतकरी वेगवेगळ्या मिरवणुकांनी रास्ता रोको चालू होते तिथे येऊ लागले. त्यांच्यासोबत सातशे बैलगाड्यादेखील होत्या. हुक्केरी व गोकाक तालुक्यांतील गावांमधील शेतकरी, तसेच निपाणीतील तंबाखू कामगार व विडी कामगार हेदेखील रास्ता रोकोत सामील झाले. त्यांची एकूण संख्या पहिल्याच दिवशी पंधरा हजारावर गेली. महामार्गावर या साऱ्यांनी आपापल्या राहुट्या उभारल्या. तिथे कदाचित अनेक दिवस राहावे लागेल ह्या बेताने आपापले सामानसुमान घेऊनच हे सगळे आले होते. त्याशिवाय, दिवसभर आंदोलनात सहभागी होणारे, पण रात्री झोपायला तेवढे आपापल्या घरी जाणारे, असेही अनेक लोक तिथे येऊन दाखल होऊ लागले.

ही सर्व मंडळी आपापली शेतीची कामे सोडून इथे आली होती. त्यात जे शेतमजूर होते ते आपली रोजची पाच रुपयांची मजुरी बुडवून आंदोलनात सामील झाले होते. पैसे देऊन एखाद्या आंदोलनासाठी माणसे गोळा करायची प्रथा त्यावेळीही होतीच; स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन लोक आंदोलनात येत आहेत हे दृश्य खूप दुर्मिळच होते.

त्याच दिवशी रात्री कृतिसमितीचे अध्यक्ष अण्णू गुरुजी ह्यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ बंगलोरला मुख्यमंत्री गुंडू राव यांच्याशी वाटाघाटी करण्यासाठी रवाना झाले. दुसऱ्या दिवशी गुंडू राव त्यांना भेटले. ''तुम्ही अतिशय शांतपणे हे आंदोलन सुरू केले आहे ही फार चांगली गोष्ट आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे. मी ह्याबद्दल केंद्र सरकारशी बोलतो, कारण ह्याबाबतचे निर्णय शेवटी केंद्र सरकारच घेऊ शकते,'' असे मुख्यमंत्री शिष्टमंडळाला म्हणाले. पण प्रत्यक्षात मात्र त्यांनी तसे काहीच केले नाही.

इकडे ‘रास्ता रोको’तील वातावरण तापत गेले होते. पुढल्या तीन-चार दिवसांत दिवसभरच्या आंदोलनात सामील होणाऱ्यांची संख्या चाळीस हजारांवर जाऊन पोचली. ह्या परिसराला ‘आंदोलन नगरी’ असेच सार्थ नाव पडले होते. काही शेतकरीतर अगदी वाजत गाजत आणि हत्तीने मिरवणूक काढून आंदोलन नगरीत येऊन पोचले होते. शेतकरी आंदोलनात हत्तींचा सहभाग हा प्रकार इथे प्रथमच बघायला मिळाला! महामार्गाचा दोन-तीन किलोमीटर लांबीचा पट्टा या जनसमुदायाने व्यापला होता.

शरद जोशींचा रात्री झोपण्यापुरता मुक्काम तसा निपाणीत सुभाष जोशी यांच्या घरी होता, पण प्रत्यक्षात जवळजवळ सगळा दिवस ते ह्याच महामार्गावर स्वतःसाठी उभारलेल्या एक छोट्या झोपडीतच राहत होते; कधी कधी रात्रीही त्यांचा मुक्काम ह्या झोपडीतच असे. आपला नेता आपल्याबरोबरच राहतो आहे हे दृश्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने अगदी अपरिचित व मनोधैर्य वाढवणारे होते. अधूनमधून सभांसाठी इतर गावांमध्ये जोशी जात, पण एरव्ही मात्र ते आंदोलनाचे पुढले सर्व तेवीस दिवस इथेच होते. रोज सकाळ-संध्याकाळ ते महामार्गावर फेऱ्या मारत, अधिकाधिक शेतकऱ्यांशी स्वतः बोलत, त्यांना धीर देत.

सकाळी लौकर उठून आंदोलक प्रातर्विधी उरकत. त्यासाठी बऱ्यापैकी सोय महामार्गाच्या दुतर्फा केली होती. आंघोळीचीही सोय होती. शेतकऱ्यांनी स्वतःच अंतराअंतरावर आडोसे उभे करून शौचकूप व न्हाणीघरांची तात्पुरती सोय केली होती. रस्त्यात कुठेही खरकट्या पत्रावळ्यांचे ढीग, कागदाचे बोळे वा माणसांची विष्ठा दिसत नव्हती; कुठेही माशा घोंघावत नव्हत्या. ही स्वच्छता म्हणजे मोठे नवलच होते; एरव्ही आपापल्या घरांतही कदाचित ते गरीब शेतकरी इतकी स्वच्छता पाळू शकत नसतील.

जरा उजाडले की आसपासच्या गावांतील लोकही आंदोलनात सामील होण्यासाठी तिथे दाखल होत. आपल्याबरोबर ते महामार्गावरील राहुट्यांत राहणाऱ्या अन्य आंदोलकांसाठी भाकऱ्या-चटणी-कांदा-पिठले वगैरे पदार्थ गाड्या भरभरून घेऊन येत. शिवाय पिंपेच्या पिंपे भरून आंबील आणली जाई. ज्वारी अथवा नाचणीच्या पिठात ठेचलेली लसूण घालून बनवलेले हे पेय ह्या भागात खूप लोकप्रिय. आंदोलननगरीत पाण्याचे काही नळही आले होते व काही ठिकाणी विजेची कनेक्शन्सदेखील मिळवली गेली होती; त्यामुळे काही ठिकाणी झाडांना ट्यूब लाइट्स लटकत होत्या.

सुरुवातीला आंदोलकांना वाटले होते, की आपली एकजूट बघून दोन-तीन दिवसांत सरकार नरम येईल व आपल्या मागण्या मान्य करेल; तशाही त्या अगदी न्याय्य व साध्याच आहेत. पण प्रत्यक्षात सरकार इतके कोडगे बनले होते, की त्याच्याकडून काहीच हालचाल होत नव्हती. महात्मा गांधी सत्याग्रह हे अस्त्र प्रभावीपणे ब्रिटिश सरकारविरुद्ध वापरू शकले, कारण ते सरकार अधिक जनताभिमुख होते व जनतेतील असंतोषाची लगेच दखल घेण्याइतके संवेदनशील होते. पण इथले सरकार मुळातच जनताभिमुख व संवेदनशील नसल्याने सत्याग्रहाचे तेच हत्यार इथे मात्र अगदीच बोथट ठरत होते; किंबहुना गेंड्याच्या कातडीच्या सरकारवर त्या अस्त्राचा काहीच परिणाम होताना दिसत नव्हता.

अशा स्थितीत आंदोलनकर्त्यांचा उत्साह कायम टिकवणे हे नेत्यांपुढचे एक मोठे आव्हान होते. त्यासाठी रोज काही ना काही उपक्रम राबवले जात. उदाहरणार्थ, १८ मार्च रोजी आंदोलन नगरीत ३००० शेतकऱ्यांनी एक दिवसाचे सांघिक उपोषण केले. इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेले उपोषण ह्यापूर्वी कधी कोणी बघितले नसेल. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास खूप वाढवणारी ही घटना होती.

त्याशिवाय नेत्यांची, मुख्यतः शरद जोशींची, रोज संध्याकाळी होणारी भाषणे हेही एक मोठे आकर्षण असे. एका ट्रेलरवर पाण्याची रिकामी टाकी ठेवून स्टेज बनवले जाई. त्या टाकीवर उभे राहून, हातात माइक घेऊन जोशी भाषण करत. निपाणीतील एक व्यापारी म्हणाले होते, ''या जोश्यांचे भाषण रोज ऐकावेसे वाटते. कधी कंटाळा म्हणून येत नाही.'' रोज संध्याकाळी पाचच्या सुमारास ते आपले दुकान बंद करत व स्वतःतर भाषणाला येऊन बसतच, पण शिवाय आपल्या सर्व नोकरांनाही भाषण ऐकायला पाठवत. निपाणीतील अनेक दुकानदारांच्या बाबतीत हे खरे होते.

बहुसंख्य आंदोलक हे कानडीभाषक होते, पण अल्पसंख्य असलेल्या मराठी शेतकऱ्यांबरोबर ते अतिशय खेळीमेळीने वागत होते. आंदोलकांमध्ये स्त्रियांचे प्रमाणही भरपूर होते. रात्री जेवणानंतर तर एखाद्या जत्रेसारखे आनंदाचे वातावरण तिथे तयार होई. सुरुवातीला एखादा वक्ता आज संध्याकाळी भाषणांत कोण काय बोलले ते थोडक्यात कानडीत सांगे. त्यानंतर सगळे आंदोलक रात्री उशिरापर्यंत चांदण्यांच्या उजेडात तालासुरात भजने म्हणत. गौळणी व भारुडेही म्हणत. आपापली वाद्ये त्यांच्याकडे होती. अशी भजने म्हणण्याची परंपरा उत्तर कर्नाटकात पूर्वापार चालत आलेली आहे. अर्थात मराठी भजनेही होत. कानडी शेतकरीदेखील उत्साहाने मराठी भजने म्हणत व मराठी शेतकरीही तितक्याच उत्साहाने कानडी भजने म्हणत. भाषेची अडचण जराही जाणवत नसे. सर्व शेतकऱ्यांच्या छातीवरील बिल्ले, तसेच राहुट्यांवरील फलक हे मराठीतच होते व शरद जोशींची आंदोलन नगरीत रोज संध्याकाळी होणारी भाषणेही मराठीतच होत होती. पण त्याला कोणाही कानडी बोलणाऱ्याचा विरोध नव्हता.

आपल्या एका जाहीर भाषणात जोशी म्हणाले, ''आमच्या शेतीमालाला योग्य भाव द्यायला जर गुंडू राव तयार असतील, तर अख्खा महाराष्ट्र कर्नाटकात घालायला शेतकऱ्यांच्या वतीने मी तयार आहे आणि तसा भाव जर अंतुले देणार असतील, तर अख्खा कर्नाटक महाराष्ट्रात घालायलाही मी तयार आहे.'' हे उद्गार त्यांनी निपाणीतल्याच नव्हे, तर हसन येथील भाषणातही काढले होते व सर्व उपस्थित शेतकऱ्यांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत केले होते. राजकारण्यांनी ज्याचे वर्षानुवर्षे इतके भांडवल केले होते, तो महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद किंवा मराठी-कन्नड भाषावाद ह्यांचा ह्या आंदोलनात मागमूसही नव्हता.

आंदोलननगरीत एक सामुदायिक उपाहारगृह चालवले जात होते व नाममात्र किमतीत तिथे खाद्यपदार्थ उपलब्ध होते. त्याशिवाय निपाणीतील असंख्य फेरीवालेही तिथे लोकांच्या गरजा

भागवायला हजर झाले होते. निपाणीतील छोट्या छोट्या दुकानदारांनीही आपापले स्टॉल्स तिथे उभारले होते. प्रत्येक गोष्ट स्वस्तात उपलब्ध होती. निपाणीत एक कप चहाला पंचवीस पैसे पडत, तर इथे वीस पैसे. कलिंगडाची फोड निपाणीत तीस पैसे, तर इथे दहा पैसे. सगळे स्टॉल्स स्वच्छ होते, मालातही भेसळ अजिबात नव्हती. चोरीमारीचा तर एकही प्रकार संपूर्ण आंदोलनकाळात एकदाही घडला नाही. किसान मेळावे हा प्रकार आता देशात नवीन राहिलेला नाही. खूपदा राजकीय पक्ष आपल्या शक्तिप्रदर्शनासाठी असे मेळावे भरवत असतात. त्यासाठी पैसे देऊन ट्रक भरभरून शेतकरी आणले जातात. दिल्ली हे तर अशा किसान मेळाव्यांचे प्रथम पसंतीचे शहर असते. शेतकरी आणि खाद्यपदार्थ विकणारे स्थानिक फेरीवाले यांच्यात अशा सर्वच किसान मेळाव्यांत नेहमीच हाणामाऱ्या होत असतात. किसान मेळावा कोणत्याही पक्षाचा असो, स्टॉल्स हमखास लुटले जातात. रेल्वे प्लॅटफॉर्मवरच्या विक्रेत्यांना तर हा अनुभव नेहमीच येतो. म्हणूनच किसान मेळावा म्हटले की फेरीवाले तिथे फिरकतच नाहीत. पण इथला अनुभव मात्र अगदी वेगळा होता. इथे जवळ जवळ दीडशे स्टॉल्स होते व सर्व उत्तम चालले होते.

१८ मार्चला सांघिक उपोषणाच्या आदल्या रात्री सगळे फेरीवाले म्हणाले, ''उद्या तुमचे उपोषण असल्याने आमचे काहीच पदार्थ विकले जाणार नाहीत. तेव्हा आमचे स्टॉल्स आम्ही उद्या बंद ठेवतो व मालही इथेच ठेवून आम्ही निपाणीला जातो. कारण तो निपाणीला परत नेणे ह्या गर्दीत अशक्य आहे.'' त्यावर आंदोलक म्हणाले, ''पण मालाची जबाबदारी आम्ही कशी घेणार?'' ह्यावर फेरीवाल्यांचे म्हणणे होते, ''आमचा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे.'' आणि त्याप्रमाणे सगळे स्टॉल्स १८ मार्चला बंद होते; त्यांच्यातील माल तिथेच होता, फेरीवाले मात्र सगळे तसेच ठेवून एक दिवसासाठी निपाणीला गेले होते.

आश्चर्य म्हणजे दुसऱ्या दिवशी फेरीवाले परत आले, तेव्हा एकाही फेरीवाल्याचा स्टॉल लुटला गेला नव्हता, कोणाच्याही मालाला शेतकऱ्यांनी हातसुद्धा लावला नव्हता! आंदोलन नगरीत हे जे घडले, ते कुठल्याही गावात घडणे अशक्य होते. परुळकरांना एक फेरीवाला म्हणाला,

''यल्लमाच्या जत्रेत आम्ही जेव्हा दुकान उघडतो, तेव्हा देवीच्या दर्शनाला आलेली अनेक माणसे आमचे पैसे बुडवतात, माल पळवतात. पण इथे तंबाखूदेवीच्या यात्रेला जमलेल्या ह्या शेतकऱ्यांनी आमची एक पैसुद्धा बुडवली नाही.''

चाकणच्या कांदा आंदोलनाप्रमाणे इथेही जोशींनी आंदोलकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली होती. निपाणीच्या डॉक्टरांनी एक खास तंबू उभारला होता व तिथे ते औषधोपचार करत असत. भोज ह्या गावचे तरुण सरपंच डॉ. अद्गौंडा पाटील आपला गावात जोरात चालणारा दवाखाना सोडून इथे १४ मार्चपासून संपूर्ण वेळ हजर होते. त्याच गावचे डॉ. माने व डॉ. सदलगे यांचीही त्यांना मदत होत होती. डॉ. ध्रुव मंकड हा मुंबईतील एक उमदा तरुण डॉक्टर संपूर्ण आंदोलनकाळात तिथेच तळ ठोकून होता. दुर्गम व कुठलाच डॉक्टर नसलेल्या खेड्यांत राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही विनामूल्य वैद्यकसेवा म्हणजे एक पर्वणीच होती.

गुरुवार, दोन एप्रिलला आंदोलन नगरीपासून निपाणी शहरापर्यंत, तिथून शहराची मुख्य बाजारपेठ व इतर महत्त्वाचा भाग, आणि तिथून मग परत आंदोलन नगरीत असा एक भव्य मोर्चा शेतकऱ्यांनी काढला. मोर्च्यात सुमारे ४०,००० शेतकरी हजर होते; पण सगळा मोर्चा इतका शिस्तबद्ध होता, की आपल्या लाठ्या हलवत रस्त्याच्या कडेला उभे राहण्यापलीकडे पोलिसांना काहीच काम नव्हते. एरव्ही मोर्चा म्हणजे काही ना काही गडबड व्हायचीच, पण हा मोर्चा इतका मोठा असूनही इतका सुनियोजित व शांत कसा, ह्याचे पोलिसांनाच नव्हे तर सगळ्या निपाणी गावालाच खूप आश्चर्य वाटले होते. ज्याच्यात्याच्या तोंडी त्यादिवशी तोच एक विषय होता.

वयोवृद्ध गोपीनाथ धारिया ऊर्फ भाई हेही ह्या मोर्च्यात आवर्जून सामील झाले होते. चालताना एकदा ठेच लागून ते पडले. हातापायाला जबर मार लागला, डोके दगडावर आपटून रक्त येऊ लागले. 'भाई, तुम्ही एखाद्या खुर्चीत बाजूला बसून राहिलात तरी चालेल,' असे सांगत अनेक नेत्यांनी त्यांना थोडा आराम घ्यायचा सल्ला दिला. पण भाईंचा उत्साह कायम होता. तशाही परिस्थितीत ते शेवटपर्यंत त्या सुमारे आठ किलोमीटरच्या मोर्च्यात कडक उन्हाची पर्वा न करता चालत होते. खरेतर ते एक बडे बागाइतदार होते, प्रतिष्ठित कुटुंबातले होते; पण एखाद्या सामान्य कार्यकर्त्याप्रमाणेच वावरत होते. स्वतःसाठी कुठलीही खास सवलत त्यांना नको होती.

पुण्याच्या *माणूस* साप्ताहिकाचे संपादक श्रीभाऊ माजगावकर त्या दिवशी निपाणीत हजर झाले. नाशिक आंदोलनाच्या वेळीही ते हजर होते. त्यांच्याच आग्रहावरून परुळकरांनी 'योद्धा शेतकरी' व पुढे 'रक्तसूट' या लेखमाला लिहिल्या. मोर्चा पाहून ते अतिशय प्रभावित झाले होते. म्हणाले, ''हा विराट मोर्चा म्हणजे सत्याग्रही शेतकऱ्यांचा अजस्र आणि पवित्र असा जणू गंगौघ. नुसत्या दर्शनानेदेखील पावन व्हावे अशी ही आगळी गंगा!''

योगायोग म्हणजे 'सोबत'कार ग. वा. बेहेरे हेही त्या दिवशी निपाणीला येऊन आंदोलनाची पाहणी करून गेले.

शुक्रवार, तीन एप्रिलला निपाणी गावात मूठभर व्यापारी आणि त्यांच्या चेल्यांनी एक मोर्चा काढला होता. आदल्या दिवशीच्या शेतकऱ्यांच्या मोर्च्याला उत्तर म्हणून. निपाणीतील गावकऱ्यांचा ह्या शेतकरी आंदोलनाला पाठिंबा नाहीए हे दाखवणे हा त्यामागचा उद्देश. मोर्च्यात तशी दीड-दोनशेच माणसे होती, पण त्यांनी जाता जाता सुभाष जोशी यांच्या गावातील घरावर दगडफेक केली, घरासमोर उभ्या असलेल्या त्यांच्या मोटार सायकलची व रस्त्यात उभ्या केलेल्या इतरही अनेक मोटार सायकलींची नासधूस केली. शेतकरीनेत्यांच्याविरुद्ध नालस्ती करणाऱ्या घोषणा दिल्या. अनेक घरांवर दगडफेक केली. गोपीनाथभाईंच्या घराच्या तर सगळ्याच खिडक्या दगडफेक करून फोडल्या गेल्या. नंतर गावात मोर्च्याचे रूपांतर एका सभेत झाले. सभेत मात्र काही स्थानिक नेत्यांनी अनपेक्षितपणे शेतकरी आंदोलनाला आपला

पाठिंबा जाहीर केला. व्यापाऱ्यांची तशी थोडीशी फजितीच झाली.

दगडफेकीची व मोटार सायकलींची नासधूस केल्याची बातमी आंदोलननगरीत पोचताच अकोळ व निपाणीमधले दीड-दोन हजार चिडलेले तरुण शेतकरी लगेच प्रतिमोर्चा घेऊन निपाणीत जायला निघाले. प्रत्येकाच्या हातात झेंडे लावलेल्या लाठ्या होत्या. व्यापाऱ्यांच्या चेल्यांना चांगला धडा शिकवायचा त्यांचा निर्धार होता. काही स्थानिक नेत्यांनी उत्साहाच्या भरात त्यांना तसे करायला प्रोत्साहनही दिले, पण जोशींनी आपल्या भाषणात त्यांना थोपवले. 'कुठल्याही प्रकारे आपण दुसऱ्यांवर हात उगारायचा नाही. एकही काठी आंदोलनात दिसता कामा नये. समोरचा कसाही वागो, आपण मात्र संयम, शिस्त आणि शांतता पाळायची.' असा जोशींचा आदेश होता. त्याचबरोबर आजच्या निपाणीतील हिंसक मोर्चाला जबाबदार असलेल्या वीस व्यापाऱ्यांची व त्यांच्या सहकाऱ्यांची एक यादीही त्यांनी आपल्या भाषणात दोन वेळा वाचून दाखवली व सहा एप्रिलपर्यंत त्यांना पोलिसांनी अटक केली नाही, तर त्यानंतर ५०,००० शेतकरी सत्याग्रहासाठी निपाणी गावात प्रवेश करतील असेही त्यांनी जाहीर केले.

'सहा एप्रिलच्या दुपारपर्यंत सगळ्या आंदोलकांना आम्ही इथून हुसकावून लावणार आहोत,' असे आश्वासन एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने व्यापाऱ्यांना दिल्याची बातमी शेतकरीनेत्यांच्या कानावर आली होती, पण त्यांनी त्याची फारशा गांभीर्याने दखल घेतली नाही.

अलिबागचे एक प्राध्यापक व समीक्षक अरविंद वामन कुळकर्णी यांच्याविषयी इथे लिहायला हवे. साहित्यक्षेत्रातील ज्या फार थोड्या व्यक्तींनी त्या काळात शरद जोशींच्या आंदोलनाची आस्थेने दखल घेतली त्यांच्यातले हे एक. त्याआधी पाच महिने, गेल्या नोव्हेंबरमध्ये, त्यांनी ऊस आंदोलन जवळून पाहण्यासाठी नाशिकचा दौराही केला होता; पण त्यावेळी जोशी तुरुंगात असल्याने दोघांची गाठ पडली नव्हती. पुढे कुळकर्णींनी शेतकरी आंदोलनासंबंधात लिहिलेला एक लेख निपाणीत आंदोलन सुरू असताना शरद जोशींच्या वाचनात आला. तो त्यांना आवडला आणि ते म्हणून गेले की, 'या माणसाला भेटायला पाहिजे.' आंदोलकांच्या गर्दीत उभे असलेले विश्वासराव भोजकर ओरडले, 'अहो, तो माझा लाडका पुतण्या आहे.' त्यावर शरद जोशी म्हणाले, 'तार करून बोलवा त्यांना.' विश्वासरावांनी त्वरित अलिबागला तार करून कळवले की, 'शरद जोशी तुला भेटू इच्छितात, लगेच ये.' त्यानुसार नाशिकप्रमाणेच ते सुरेशचंद्र म्हात्रे ह्या आपल्या प्राध्यापक स्नेह्यांसोबत त्यांच्याच याझदी मोटरसायकलवरून ३ एप्रिल १९८१ रोजी सकाळी आठ वाजता अलिबागहून निघाले. साधारण बारा तासांचा प्रवास करून रात्री आठच्या सुमारास निपाणीला पोचले.

त्याच रात्री उशिरा त्यांची शरद जोशींबरोबर गाठ पडली. जोशींना प्रत्यक्ष भेटण्याचा त्यांचा तो पहिलाच प्रसंग. ''मुख्यमंत्र्यांच्या गावचे तुम्ही! आम्हाला वाटलं हेलिकॉप्टरनेच याल!'' असे म्हणत, थट्टामस्करी करतच जोशींनी दोघांचे स्वागत केले. प्रत्यक्ष रास्ता रोको जिथे चालू होते तिथेच एका छोट्या झोपडीत स्वतः जोशी यांनीही त्या रात्री मुक्काम केला

होता. हे अगदी अनपेक्षित होते. बहुतेकदा नेते मंडळी दूर कुठेतरी सरकारी डाक बंगल्यात किंवा एखाद्या चांगल्या हॉटेलात मुक्काम करत असत. जोशींचा साधेपणा सर्वांनाच भावणारा होता. ज्या अनौपचारिकपणे जोशी सगळ्या कार्यकर्त्यांबरोबर मिळूनमिसळून वागत होते त्याचेही दोघांना खूप आश्चर्य वाटले.

आपली मोटरसायकल ह्या दोघांनी शरद जोशींच्या झोपडीच्या बाहेर ठेवली होती व पुढले जवळजवळ चार तास गप्पांच्या ओघात ते तिथे फिरकलेही नाहीत. मोटरसायकलवर आपल्या दोघांचे सामान ठेवलेले आहे हे ते पार विसरूनही गेले होते. पण त्यांनी ठेवलेले त्यांचे सर्व सामान तसेच्या तसे सुरक्षित राहिले होते, ही गोष्ट कुळकर्णी यांनी नंतर आपल्या लेखात आवर्जून नमूद केली होती. रात्री अकरा वाजता सगळ्यांचे एकत्रच जेवण झाले. पिठले, भाकरी, चटणी, आंबील व शेवटी दहीबुत्ती. हजारो आंदोलक शेतकऱ्यांसोबत उघड्यावरती एकत्र जेवणे हा खूप रोमांचक अनुभव होता. जेवताना दिवसभर काय घडले व उद्या काय करायचे आहे ह्याचीच चर्चा सुरू होती.

ह्या आंदोलनात कुळकर्णी व म्हात्रे यांना जोशी यांचे व शेतकरी संघटनेचे जे दर्शन घडले त्यामुळे दोघेही अतिशय प्रभावित झाले. दोघांनीही पुढे आंदोलनात सक्रिय भाग घेतला. आंदोलनाविषयी कुळकर्णींनी सोबत साप्ताहिकात व इतरत्रही बरेच लेखन केले. म्हात्रे यांनीतर त्यानंतर आपले सगळे जीवनच शेतकरी संघटनेला अर्पण केले.

दोन आणि तीन एप्रिलच्या सभा विशेष महत्त्वाच्या होत्या. कारण निपाणीतील शेतकऱ्यांनी काढलेल्या व नंतरच्या व्यापाऱ्यांनी प्रायोजित केलेल्या प्रतिमोर्च्यामुळे वातावरण बरेच तंग झाले होते. इतके दिवस रास्ता रोको करून शेतकरीही आता काहीसे इरेस पेटले होते. संयम कमी होत चालला होता. ह्या सभांमधून वेगवेगळ्या नेत्यांनी मांडलेले काही विचार इथे संक्षेपाने मांडणे उपयुक्त ठरेल. परुळकर यांनी आपल्या लेखमालेत उद्धृत केलेल्या भाषणांमधील हे अंश आहेत.

तंबाखू कामगार महिलांच्या नेत्या अक्काताई कांबळे म्हणाल्या :

''माझ्या शेतकरी बांधवांनो, डीएसपी काय, पण त्याचा बाप आला तरी तुम्ही रस्त्यावरून उठू नका! ज्यावेळेला हे दलाल शेतकऱ्यांच्या पाया पडतील, तेव्हाच हे आंदोलन संपणार, त्याआधी नाही. आमच्या तंबाखूला योग्य भाव मिळाल्याशिवाय आम्ही हलणार नाही, आम्हाला खुशाल अटक कर, असं डीएसपीला सांगायचं.... तुमच्यासाठी आम्ही आमच्या रोजगाराची, मुला-बाळांचीसुद्धा फिकीर करायची नाही असं ठरवलंय. वखारीतील आमचं काम बंद पडलं तर आम्ही दगड फोडून पोट भरू, पण आता ह्या दलालांना सोडणार नाही. आम्ही आमच्या नवऱ्यांनापण सांगितलंय, की जरी आम्ही तुमच्या लग्नाच्या बायका असलो, तरी आंदोलन चालू आहे तोपर्यंत आम्ही तुमच्या कोणी नव्हेत. आम्ही फक्त आंदोलनातल्या सत्याग्रही आहोत!''

अकोळ युवक संघाचे नेते आय. एन. बेग म्हणाले :

''सगळ्या तंबाखू शेतकऱ्यांच्या वतीने आमच्या ह्या वाघिणींना, ह्या कामगारभगिनींना मी सर्वांत प्रथम लवून मानाचा मुजरा करतो. शेतकऱ्यांना त्यांनी जो अभूतपूर्व पाठिंबा दिला आहे, त्याला इतिहासात तोड नाही.... काल संध्याकाळपासून निपाणीमध्ये जाणूनबुजून दहशतीचं वातावरण निर्माण करण्यात येत आहे. तंबाखू व्यापाऱ्यांनी व त्यांच्या पैशावर निवडून आलेल्या आमच्या आमदार मंडळींनी इथून पुढं सत्याग्रही शेतकऱ्यांना निपाणीत पाय ठेवू द्यायचा नाही असा चंग बांधला होता. पण त्यांचा हा प्रयत्न कामगार स्त्रियांनी उधळून लावला... आमच्या निपाणीमध्ये मुसलमानांचे पाच मोहल्ले आहेत; त्यांतील बागवानांचा मोहल्ला व्यापाऱ्यांच्या बाजूला आणि इतर चार मोहल्ले सर्वसामान्य जनतेच्या बाजूला, असं चित्र आहे. ह्या बागवान मुसलमानांच्यातील काही व्यापारी आहेत, काहींचा ट्रकचा व्यवसाय आहे. माझ्या ह्या बागवान बांधवांना मी एक इशारा देऊ इच्छितो – त्यांनी वेळीच सावध होऊन व्यापाऱ्यांचा नाद सोडावा आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहावं. ... आज सकाळपासून निपाणीत 'शरद जोशी ब्राह्मण आहेत, सुभाष जोशी ब्राह्मण आहेत, ह्या ब्राह्मणांच्या नेतृत्वाखाली जनसंघाचे एजंट घुसले आहेत' वगैरे अतिशय खालच्या पातळीवरचा प्रचार व्यापाऱ्यांच्या चमच्यांनी सुरू केला आहे. शेतकऱ्यांच्या वतीने मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो, की हा लढा कुणा ब्राह्मणासाठी, हरिजनासाठी, मराठ्यासाठी, लिंगायतासाठी किंवा मुसलमानासाठी चाललेला नाही. इथं जातीचा, धर्माचा, भाषेचा कुठलाच प्रश्न निर्माण होऊ शकत नाही. मी स्वतः मुसलमान आहे. ह्या भागातील मुसलमान शेतकऱ्यांच्या वतीनं मी सांगतो, की शरद जोशी हे आम्हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने किसानांच्या क्रांतीचे पैगंबर आहेत!''

ह्यानंतर सुभाष जोशी ह्यांचेही भाषण झाले. आंदोलन काळातील त्यांचे हे एकमेव भाषण. स्वतः प्रसिद्धीपासून दूर राहून शांतपणे आंदोलनाचे सूत्रसंचालन करणारे हे हाडाचे कार्यकर्ते भाषणबाजीसाठी कधीच प्रसिद्ध नव्हते. पण त्यांची कळकळ त्यांच्या देहबोलीतूनच व्यक्त व्हायची. आज सगळ्यांनी खूपच आग्रह धरला म्हणून केवळ ते भाषणासाठी उभे राहिले. ते उभे राहताच सर्व शेतकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले :

''शेतकऱ्यांनी मोर्चा काढला, तेव्हा निपाणीतील घराघरातील भगिनींनी बाहेर येऊन शरद जोशींच्या पायावर घागरीने पाणी घातलं. याउलट आज व्यापाऱ्यांचा मोर्चा घरावरून जाताना ह्याच भगिनींनी दारंखिडक्या बंद करून घेतल्या! शेतकऱ्यांचा मोर्चा आणि व्यापाऱ्यांचा मोर्चा ह्याला निपाणीच्या नागरिकांनी दिलेला हा वेगवेगळा प्रतिसाद फार अर्थपूर्ण आहे. आज ह्या व्यापाऱ्यांनी एक डाव रचला होता. त्यांना वाटलं होतं, की धारियांच्या आणि माझ्या घरावर दगडफेक केली, की आंदोलन नगरीतले शेतकरी चिडून गावात घुसतील; त्यांची आणि भाडोत्री गुंडांची मारामारी सुरू होईल. तसं झालं की पोलीस त्याचं निमित्त करून बळाचा वापर करतील व आंदोलन नगरी उधळून रस्ता खुला करतील. पण सत्याग्रही शेतकऱ्यांनी संयम पाळला. व्यापाऱ्यांच्या ह्या कारस्थानाला ते बळी पडले नाहीत... इथं आलेला प्रत्येक शेतकरी घरातून

येताना बायकोचा आणि मुलाबाळांचा निरोप घेऊन आला आहे. प्राण गेला तरी बेहत्तर, तुरुंगात जावं लागलं तरी हरकत नाही; पण दर मिळाल्याशिवाय स्वस्थ बसायचं नाही अशी प्रत्येक शेतकऱ्यानं शपथ घेतली आहे.''

ह्या सर्वच भाषणांना जोरदार प्रतिसाद मिळत होता. आंदोलकांमधील जिगर इतके दिवस थांबूनही कायम होती. सरकारला वाटले होते, आपण दुर्लक्ष करत राहिलो तर एक दिवस सगळे शेतकरी थकून जातील, आपापली घरची व शेतावरची तुंबलेली कामे करायला आपापल्या गावी परत जातील. पण प्रत्यक्षात तसे घडले नव्हते.

शनिवार, चार एप्रिलला वातावरण बरेच तापू लागल्याचे जाणवत होते. त्या दिवशी शरद जोशींच्या आदेशानुसार निपाणीतील सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली होती. सोमवार, सहा एप्रिलपासून निपाणीतील सर्व बँका बंद ठेवायचा आदेश शरद जोशींनी दिला होता. त्यामुळे सामान्य माणसाचीही काही गैरसोय नक्कीच होणार होती, पण खरी गैरसोय होणार होती ती रोज लाखोंचे व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांची व तोच आंदोलकांचा उद्देश होता.

सोमवारपासून आंदोलननगरीला समांतर असलेल्या एका पर्यायी मार्गावरही रास्ता रोको करायचा निर्णय शरद जोशींनी शनिवारीच जाहीर केला होता. चिकोडीमार्गे जाणारा हा रस्ता महामार्गाला पर्याय म्हणून वाहने वापरत असत व ते आवश्यकही होते, कारण अन्यथा सगळा पुणे-बंगलोर महामार्गच ठप्प झाला असता. सगळ्यांचीच फार गैरसोय होऊ नये म्हणून हेतुतःच जोशींनी हा पर्यायी रस्ता चालू ठेवला होता. पण आता तीन आठवडे शांततापूर्ण सत्याग्रह करूनही सरकार अजिबात दाद देत नाहीए, हे बघितल्यावर नाइलाजाने सोमवारपासून तो पर्यायी रस्ताही बंद ठेवायचे ठरले होते. बहुधा त्यामुळेच त्या रात्री पोलिसांच्या हालचाली एकाएकी खूप वाढल्याचे दिसत होते. संकेश्वर, बेळगाव, चिकोडी इथून बऱ्याच एसटी बसेस मागवल्या गेल्या होत्या. एसआरपींच्या अनेक पलटणीदेखील आंदोलन नगरीच्या आसपास येऊन दाखल झाल्या होत्या. स्वतः डीएसपी निपाणीच्या डाकबंगल्यात मुक्काम ठोकून होते.

रविवार, पाच एप्रिलचा दिवस उजाडला.

त्या दिवशी गुढी पाडव्याचा सण होता. आंदोलन नगरी उत्साहाने वाहून निघाली होती. गुढी पाडवा म्हणजे हिंदू नववर्षाचा पहिला दिवस. तसा कर्नाटकच्या ग्रामीण भागात सणांचा प्रभाव जास्तच असतो; आंदोलनाच्या ह्या वातावरणात तो अधिकच होता. खूप लौकर उठून सर्वांनी मोठ्या हौसेने आपापल्या राहुट्या झाडून काढल्या. भोवताली पाण्याचा शिडकावा केला. दारावर आंब्याच्या पानांची तोरणे लटकवली. स्वच्छ धुतलेल्या काठीवर आकर्षक अशा इरकली किंवा धारवाडी खणाची कुंची चढवून लख्ख धुतलेला पितळी गडू त्यावर उलटा ठेवला. सकाळच्या कोवळ्या उन्हात त्या सगळ्या ओळीने उभारलेल्या गुढ्या मोठ्या सुरेख दिसत होत्या, सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होत्या. सगळे शेतकरी आणि त्यांच्या बायका

अंघोळी उरकून, ठेवणीतले कपडे घालून इकडेतिकडे वावरत होते. आंदोलनाचा उन्माद आणि सणासुदीचा उल्हास ह्यांचे हे मिश्रण अगदी वेधक दिसत होते. तो सगळा दिवस आंदोलन नगरीत चैतन्य अगदी ओसंडून वाहत होते.

त्या दिवशी सकाळी शरद जोशी यांनी कृश शरीराचे पण लढवय्ये म्हणून प्रख्यात असलेले दत्ता पांगम व इतर शेतकरीनेते यांच्यासमवेत पर्यायी रस्ता जिथून जायचा त्या परिसराची पाहणी केली. विजय आणि सरोजा परुळकर हेही त्यांच्यासोबत होते. त्यांना असे दिसले, की ह्या रास्ता रोकोला तेथील स्थानिक मंडळी फारशी तयार नाहीत. तेथील कार्यकर्त्यांमध्ये ह्या प्रश्नावर बरेच मतभेद होते व एक प्रकारची भीतीही होती. अशा परिस्थितीत पर्यायी रस्ता बंद करणे अशक्य होते. आपला निर्णय स्थानिक लोकांवर बळजबरीने लादायची शरद जोशींची मुळीच इच्छा नव्हती. दुपारी तीनच्या सुमारास ही मंडळी आंदोलन नगरीत परतली. त्यानंतर संध्याकाळच्या सभेत त्यांनी उद्यापासून पर्यायी रस्ता बंद करायचा बेत स्थगित केल्याचे जाहीर केले. आंदोलकांचा काहीसा अपेक्षाभंग झाला, पण आपले नेते आपल्या हिताचाच निर्णय घेतील ह्यावर सगळ्यांची श्रद्धा होती. त्यामुळे सगळे पुन्हा आपापल्या जागी बसायला गेले. महामार्गावरचा हा सत्याग्रह चालूच राहणार होता. पुन्हा एकदा घोषणा सुरू झाल्या. दुसऱ्याच दिवशी काय भयानक प्रकार घडणार आहे याची कुठल्याच आंदोलकाला त्यावेळी काही कल्पना नव्हती.

पुढला दिवस उजाडला. सोमवार, सहा एप्रिल.

भल्या सकाळी साधारण सहाच्या सुमारास, अगदी अनपेक्षितपणे पोलिसांच्या धडाकेबंद कारवाईला सुरुवात झाली. मोठ्या संख्येने पोलीस आंदोलन नगरीत घुसले. रस्त्यावर उभारलेल्या राहुट्या त्यांनी धडाधड पाडून टाकायला सुरुवात केली. सुरुवातीला आंदोलकांना धक्काच बसला. त्यांची स्वाभाविक भावना पोलिसांना प्रतिकार करायची होती; पण शरद जोशींनी त्यांना तत्काळ थोपवले. त्यांच्या आदेशानुसार मग आंदोलकांनी पोलिसांना विरोध केला नाही. कसलाही वावगा प्रकार होऊ देऊ नका, असे जोशींचे निक्षून सांगणे होते. ''आधी बाकी साऱ्यांना अटक करा व नंतर अर्थात मलाही अटक करा, पण मी बाहेर असलो तर आंदोलकांना नक्की शांत ठेवेन,'' असे त्यांनी पोलिसांना सांगितले.

पण त्यांचा कुठलाही सल्ला ऐकायच्या मनःस्थितीत पोलीस नव्हते. त्यांनी सर्वप्रथम शरद जोशी, सुभाष जोशी, रमेश शिपुरकर व शुभा शिपुरकर ह्या चौघांना अटक केली आणि त्यांना तत्काळ जीपमध्ये बसवून आंदोलनस्थळापासून दूर नेले. आधी खडकलाट येथील पाऊणशे वर्षांच्या मामी दिवाण, शिर्प्याची वाडी येथील मालतीबाई शिंदे, निपाणीच्या अक्काताई कांबळे वगैरे महिलानेत्यांनी व त्यांच्यापाठोपाठ लगेचच सुमारे दोन-अडीचशे स्त्रियांनी स्वतःला अटक करवून घेतली. साडेसातपर्यंत सत्तरएक बसगाड्या भरून आंदोलक तेथून दूरवर कुठेतरी रवाना झाले होते. पण त्याच्या अनेक पट आंदोलक अटकेची वाट पाहत शांतपणे रस्त्यावर बसून होते.

दहा वाजेपर्यंत अटक झालेल्यांच्या दीडशे गाड्या तिथून रवाना झाल्या होत्या. डॉक्टर ध्रुव मंकड स्टेथोस्कोप व पांढरा ॲप्रन बाजूला ठेवून टेलिफोन सांभाळत होते, ठिकठिकाणचे निरोप घेत होते. आंदोलन नगरीत सतत घोषणा चालूच होत्या व त्याचवेळी एकेक बस येत होती, आंदोलकांना घेऊन दूर कुठेतरी रवाना होत होती. मॅजिस्ट्रेट सर्वांना सरसकट १४ दिवसांची कस्टडी देत होते, पण त्यामुळे आंदोलकांचे मनोधैर्य कणभरही कमी झाले नव्हते. पुरुषांना बेल्लारी व गुलबर्गा येथील तुरुंगात व स्त्रियांना विजापूर येथील तुरुंगात रवाना केले जात असल्याची बातमीही नंतर आली.

दहा-साडेदहाच्या सुमारास रोजच्याप्रमाणे आजूबाजूच्या खेड्यांतून पिठले-भाकऱ्या-आंबील भरलेल्या बैलगाड्या घेऊन आसपासचे शेतकरी आंदोलन नगरीत येऊ लागले. एकूण परिस्थिती पाहून तेही लगोलग ह्या सत्याग्रहात सामील होऊ लागले.

आंदोलक दबत नाही आहेत हे बघून मग शेवटी पोलिसांनी पूर्वीच ठरवलेले आपले अस्त्र बाहेर काढले. अनुचित असे एकही कृत्य शेतकऱ्यांनी केले नसताना व साधी बोलाचालीही कुठे झाली नसताना पोलिसांनी एकदम आक्रमक भूमिका घेतली. सर्व शेतकरी अटक करण्यासाठी येणाऱ्या बसेसची वाट पाहत रांगेत उभे असताना काही पोलीस पुढे झाले आणि त्यांनी त्या शेतकऱ्यांना लाठ्यांनी मारायला सुरुवात केली. 'बस खाली, बस खाली,' असे ते मारताना कानडीत म्हणत होते. त्यामुळे बावरलेले शेतकरी खाली बसू लागले. पण खाली बसलेल्या शेतकऱ्यांनाही पुन्हा मारायला पोलिसांनी सुरुवात केली. मारताना 'गप बस, गप बस' असे पोलीस म्हणत होते. काही शेतकऱ्यांनी उभे राहून पोलिसांना 'आम्ही तुमच्याच आदेशांचे पालन करत आहोत' असे सांगायचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांच्या तोंडावरच पोलिसी लाठ्यांचे तडाखे बसू लागले. हा लाठीमार इतका जोरदार होता, की अनेक शेतकरी अक्षरशः रक्तबंबाळ झाले. त्यातलेच एक होते मालतीबाई शिंदे ह्यांचे वृद्ध पती. तिथेच हजर असलेल्या एका सेवाभावी डॉक्टरांनी तातडीचे उपचार करून रक्तस्राव तात्पुरता थांबवला, पण कवटीला टाके घालणे अत्यावश्यक होते व त्यासाठी निपाणीतल्या एखाद्या हॉस्पिटलमध्ये त्यांना नेण्यासाठी धावपळ सुरू झाली.

हे सगळे काय चालले आहे, एकाएकी पोलीस आपल्यावर असे तुटून का पडले आहेत आणि आपला गुन्हा तरी काय आहे हेच शेतकऱ्यांना कळेना. इतका वेळ पोलिसांचा बराच मार निमूटपणे खाल्लेले काही तरुण शेतकरी आता मात्र खूपच चिडले व काहीतरी प्रतिकार करण्याची स्वाभाविक प्रेरणा म्हणून त्यांच्यातील काही जणांनी रस्त्याकडेला पडलेले काही दगड पोलिसांवर फेकून मारले.

नेमक्या ह्याच क्षणाची जणू पोलीस वाट पाहत होते. 'जमाव हाताबाहेर चालला आहे' असे जाहीर करत त्यांनी अश्रुधुराची नळकांडी फोडायला सुरुवात केली. पण वारा जोराचा असल्याने शेतकरी तो अश्रुधूर सहन करू शकले. आजूबाजूच्या शेतात पडणाऱ्या नळकांड्यांवर खेड्यांतल्या बायकांनी ओंजळीने माती टाकायला सुरुवात केली व ती नळकांडी त्यांनी निष्प्रभ करून टाकली. हे तंत्रही त्यांचे त्यांनीच, कोणीही न शिकवता,

शोधले. मग तीनएकशे पोलिसांच्या नव्या तुकडीने पुन्हा एकदा जोरदार लाठीमार करायला सुरुवात केली. जमावातील काही जणांनी चिडून त्यांच्यावर दगडफेक केली. काही पोलिसांना ते दगड लागले. त्याबरोबर पोलिसांची ती तुकडी मागे हटली व बंदूकधारी पोलिसांची एक तुकडी पुढे झाली. त्यांनी सरळ गोळीबारच सुरू केला. फटाफट अनेक शेतकरी घायाळ होऊन जमिनीवर कोसळू लागले.

आता मात्र शेतकऱ्यांचा धीर सुटला. जीव वाचवण्यासाठी ते दुतर्फा असलेल्या शेतांमधून पळू लागले. लाठीधारी पोलिसांनी त्या निःशस्त्र शेतकऱ्यांचा पाठलाग सुरू केला व एकेक करत शेतकऱ्याला पकडून झोडपायला सुरुवात केली! आंदोलन नगरीच्या परिसरात चार-पाच मैलांपर्यंत असा पाठलाग व लाठीमार सुरू होता.

बाहेरून आलेल्या काही सत्याग्रहींनी चिडून गावाबाहेर असलेली एक वखार पेटवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याकडे कोणाकडेच आग लावायची काही साधने नव्हती; हे काही धंदेवाईक आंदोलक नव्हतेच. बहुतेकांच्या आयुष्यातील अशा प्रकारच्या आंदोलनाचा हा पहिलाच प्रसंग होता. साध्या काडीपेटीचा वापर करून त्यांनी जमा केलेला थोडासा कडबा पेटवला आणि तो त्या वखारीवर टाकला. झाले! पोलिसांना जणू आणखी एक निमित्तच मिळाले! खरेतर वखारीचे नुकसान काहीच झाले नव्हते, कारण घमेलेभर कडबा घेऊन फारशी आग भडकणे शक्यही नव्हते. पण त्याचा फायदा घेऊन पोलिसांनी जीव वाचवण्यासाठी पळणाऱ्या शेतकऱ्यांवरही सरळ गोळीबार सुरू केला व त्यात दोन शेतकऱ्यांचा जीव गेला. अनेक जण गोळ्या लागून जखमीही झाले. आंदोलकांपैकी स्त्रियांनाही जबरदस्त लाठीमार झेलावा लागला.

थोड्याच वेळात संपूर्ण आंदोलन नगरी उद्ध्वस्त झाली. सोमवार, सहा एप्रिलच्या त्या गोळीबारात एकूण बारा शेतकरी हुतात्मा झाले होते. जखमींची संख्या तर खूपच जास्त होती.

निपाणीत ह्या सगळ्या बातम्या पोचत होत्या व गावामध्ये एकच हलकल्लोळ माजला होता. निपाणीतील सर्वसामान्य नागरिकांची सहानुभूती उघडउघड आंदोलकांना होती; कारण आंदोलकांच्या मागण्या अगदी न्याय्य आहेत आणि सरकारने केवळ दुष्टपणे त्यांच्याकडे दुर्लक्ष केले आहे, सरकार त्यांचा अगदी अंतच पाहत आहे आणि गरीब शेतकऱ्यांना असे क्रूरपणे वागवणे कुठल्याच लोकशाही शासनाला शोभणारे नाही असेच नागरिकांचे मत होते. स्वतः व्यापारीदेखील पोलीस कारवाईने स्तंभित झाले होते; ती इतकी कठोर असेल अशी त्यांना कल्पना नव्हती.

अटक केलेल्या सत्याग्रहींना पुढचे बारा दिवस तुरुंगात डांबून ठेवले गेले. स्वतः शरद जोशी बेल्लारी येथील तुरुंगात होते. तिथे डांबलेल्या इतर शेतकऱ्यांपुढे रोज जोशी प्रबोधनपर भाषणे करत. एका अर्थाने त्यांना मिळणारी ही सक्तीची विश्रांतीच होती व तिचा त्यांनी आंदोलनाच्या दृष्टीने पूर्ण उपयोग करून घेतला. आधी त्यांचे भाषण व मग त्यावर उपस्थितांमध्ये चर्चा असे काहीसे प्रशिक्षणात्मक स्वरूप ह्या सभांना लाभले. इथल्याच एका सभेत 'भीक नको, हवे घामाचे दाम' ह्या शेतकरी संघटनेच्या सुप्रसिद्ध घोषणेचा जन्म झाला.

बारा दिवसांच्या कारावासानंतर शेतकऱ्यांना सोडून देण्यात आले, पण सर्व नेत्यांना मात्र

आणखी सात दिवस हिंडलगा येथील तुरुंगात डांबण्यात आले. शेवटी २५ एप्रिल रोजी शरद जोशींची व इतर नेत्यांची सुटका झाली.

या आंदोलनाचे फलित म्हणजे २० एप्रिल १९८१ रोजी कर्नाटक शासनाने तंबाखूच्या खरेदी-विक्रीसाठी एक सहकारी संस्था स्थापन करायची घोषणा केली. तंबाखू व्यापाऱ्यांचे महत्त्व त्यामुळे अगदी नाहीसे झाले असे म्हणता येणार नाही, पण शेतकऱ्यांच्या जीवनावरची त्यांची घट्ट व जाचक अशी पकड त्यामुळे थोडीफार सैल झाली.

यानंतरचा एक प्रसंग नोंदवण्याजोगा आहे. १ मे हा विजयदिन म्हणून साजरा करायचे सर्व स्थानिक शेतकऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी ठरवले. शरद जोशींची उपस्थिती साहजिकच अपरिहार्य होती, पण इथेच शासनाने खोडा घातला; शरद जोशींनी तालुक्यात येण्यावरच सरकारने बंदी घातली. विजयसभा घ्यायची तरी कुठे, असा आता प्रश्न उभा राहिला. बराच खल केल्यावर त्यावर एक तोडगा काढला गेला. निपाणीच्या अर्जुन नगर भागात एक कॉलेज होते व ते नेमके महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर होते. कॉलेजची इमारत महाराष्ट्रात तर कंपाउंडची भिंत कर्नाटकात! त्याच जागी एका शेतात मग ही विजयसभा झाली! कर्नाटकच्या हद्दीत प्रचंड पोलीस बंदोबस्त होता, पण शरद जोशी भाषण करत होते ते व्यासपीठ महाराष्ट्रात असल्याने कर्नाटक पोलीस त्यांना अटक करू शकले नाहीत! शरद जोशी महाराष्ट्रात तर श्रोते कर्नाटकात! प्रसंग म्हटले तर गमतीदार आणि म्हटले तर राज्या-राज्यांतील सीमा किती तकलादू आहेत हेही दाखवणारा.

केवळ शेतकरी संघटनेच्याच नव्हे तर एकूणच भारतातील सामाजिक चळवळीच्या इतिहासात निपाणीच्या ह्या तंबाखू आंदोलनाचे खूप महत्त्व आहे. तेवीस दिवस शेतकरी शांततापूर्वक एका जागी बसून सत्याग्रह करू शकतात ही घटनाच अगदी आगळी होती.

या आंदोलनातील दोन हजाराहून अधिक तंबाखू कामगार स्त्रियांचा रोजचा सहभाग खूप उल्लेखनीय होता. त्यांची पूर्वीची अगतिक आणि लाचार अशी अवस्था ज्यांनी पहिली होती, त्यांच्या दृष्टीने तर ह्या स्त्रियांनी असे धीटपणे पुढे येणे, आंदोलनात सहभागी होणे हा एक चमत्कारच होता.

शेतकरी आणि कामगार इथे एकत्र लढा देत होते हेही एक अनोखेपण होते.

शेतकरी आंदोलन हे बड्या बागाइतदारांचे आंदोलन नक्की नाही हेही इथे पुन्हा एकदा अधोरेखित झाले होते; कारण ९५ टक्के तंबाखू शेतकरी हे अल्पभूधारकच होते.

प्रांतवाद, सीमावाद हे सगळे राजकीय नेत्यांनी स्वतःच्या प्रतिमानिर्मितिसाठी निर्माण केलेले क्षुद्रवाद आहेत; खरा प्रश्न हा आर्थिक आहे, शेतकऱ्याच्या व म्हणून एकूण देशाच्या दारिद्र्याचा आहे; सामान्य माणसाच्या मनात हे भेदभाव नसतात, ते हेतुतः निर्माण केले जातात हे शरद जोशींचे मत इथे पुन्हा एकदा सिद्ध झाले होते.

एक शेतकरी सांगत होते, ''पूर्वी आम्ही निपाणीला एखाद्या हॉटेलात किंवा सलूनमध्ये किंवा दुकानात गेलो, तर मालक आमच्याकडे ढुंकूनसुद्धा बघत नसे. पण आता लाल बिल्ला

लावलेला कोणी शेतकरी आला तर मालक लगेच अदबीने त्याचं स्वागत करतो, त्याला काय हवं-नको ते विचारतो.''

'तंबाखूला भाव मिळो वा न मिळो, निदान शेतकऱ्याला तरी ह्या आंदोलनामुळे भाव मिळायला लागला' ही एक सार्वत्रिक प्रतिक्रिया होती. शेतकऱ्यांचा आत्मसन्मान जागवणे हे ह्या आंदोलनाचे एक महत्त्वाचे फलित होते.

आंतरराष्ट्रीय पातळीवर ऊस व कांदा आंदोलनापेक्षा या आंदोलनाला अधिक प्रसिद्धी मिळाली होती. बीबीसीचा उल्लेख मागे केलेलाच आहे. शरद जोशी यांनी नंतर निपाणीत पोलिसांनी केलेल्या अत्याचाराची माहिती देणारे एक पत्र आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस संघटनेलादेखील लिहिले होते.

त्या मानाने भारतीय वृत्तपत्रांनी मात्र ह्या अभूतपूर्व आंदोलनाची फारशी दखल घेतली नाही; मुंबईच्या झुंजार पत्रकार ओल्गा टेलिस ह्या एक सन्माननीय अपवाद. त्यांनी निपाणीला येऊन मुक्कामच केला होता व आंदोलनाविषयी लिहिलेही.

शरद जोशींचा आत्मविश्वास ह्या आंदोलनानंतर बराच वाढला. कांदा व ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणे तंबाखू पिकवणारा शेतकरीदेखील पिढ्यानुपिढ्यांची लाचारी दूर करून अन्यायाविरुद्ध उभा राहू शकतो, पोलिसांना न घाबरता आंदोलन करू शकतो हे आता सिद्ध झाले होते. तेवीस दिवस आंदोलनाची तीव्रता कायम ठेवणे सोपे नव्हते.

शिवाय या खेपेला महाराष्ट्राच्या सीमेबाहेर प्रथमच त्यांनी आंदोलन केले होते. चाकण व नाशिक ह्यांच्यापुढची ही पायरी होती. आंदोलनाने घेतलेली ही एक मोठीच झेप होती.

■

# ८

# पांढरे सोने, लाल कापूस

काही जागतिक घटनांचे अगदी अनपेक्षित आणि दूरगामी असे परिणाम समाजावर होत असतात. अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध ही अशीच एक घटना.

तसे भारतातील हातांनी विणलेले कापड ऐतिहासिक काळापासून जगभर जात होते; एखाद्या अंगठीतून संपूर्ण धोतर बाहेर काढता येईल इतकी तलम अशी बंगालची मलमल युरोपातील उच्चभ्रू वर्गात खूप लोकप्रिय होती. पण पुढे इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली व तिथे यंत्रमागावर प्रचंड प्रमाणावर कापडाचे उत्पादन होऊ लागले. भारतातून त्यांच्याकडे कापड जाण्याऐवजी त्यांनीच बनवलेले कापड भारतात येऊ लागले. त्या कापडाच्या उत्पादनासाठी इंग्लंडला लागणारा कापूस त्यांच्या देशात अजिबात पिकत नव्हता; सुमारे २० टक्के कापूस ते भारतातून व ८० टक्के कापूस अमेरिकेतून घेत होते. १८६१ ते १८६५ ह्या चार वर्षांतील अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात अमेरिकेतून होणारा पुरवठा एकाएकी पूर्ण थांबला; त्यादरम्यान ९० टक्के कापूस ते भारतातूनच घेऊ लागले. हा सर्व कापूस मुंबई बंदरातून रवाना होई.

साहजिकच भारतातील व मुख्यतः मुंबईतील कापूस व्यापाराला त्यामुळे प्रचंड चालना मिळाली. वाट्टेल तेवढा भाव देऊन इंग्लंडमधील कापडगिरण्या मुंबईहून कापूस खरेदी करू लागल्या. मुंबईतील व्यापाऱ्यांनी अभूतपूर्व असा फायदा मिळवला. कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्यांपर्यंत त्यातील किती पैसा पोचला ठाऊक नाही; पण कापसाचे मुंबईतील सर्वांत मोठे व्यापारी प्रेमचंद रायचंद ह्यांनी त्याच नफ्यातून बॅकबे रेक्लमेशन उभारले व बाँबे स्टॉक एक्सचेंज सुरू केले आणि दानशूरपणे मुंबई विद्यापीठाचा राजाबाई टॉवर विनामूल्य बांधून दिला. 'एक गाडी कापूस विकायचा आणि एक तोळा सोने घ्यायचे' असे म्हटले जाई. कापसाला 'पांढरे सोने' म्हणायला सुरुवात झाली ती ह्याच काळात.

या कापसाचे क्षेत्र महाराष्ट्रात बरेच मोठे आहे; मुख्यतः विदर्भात व त्या खालोखाल मराठवाड्यात. तसे पाहिले तर विदर्भ हा एकेकाळी खूप समृद्ध इलाखा म्हणून प्रसिद्ध होता. विदर्भात मुलगी दिली म्हणजे ती चांगल्या घरात पडली असे मानले जाई. विदर्भात निसर्गसंपत्ती भरपूर. कोळसा, मँगनीज, लोखंड यांच्या खाणी. मोठी मोठी वीजनिर्मिती केंद्रे. घनदाट जंगले. लाकडाचा व म्हणून पेपराचा मोठा व्यवसाय. इथले शेतकरीही अन्य महाराष्ट्राच्या तुलनेत

संपन्न गणले जात. एकेकाळी पाच-पाचशे एकर शेती असणारे अनेक शेतकरी इथे होते. अशा मोठ्या शेतकऱ्यांसाठी विदर्भातला यवतमाळ जिल्हा विशेष प्रसिद्ध होता. (हाच जिल्हा आज मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसाठी प्रसिद्ध आहे.) तिथला कापूस प्रसिद्ध. ब्रिटिशांनी त्या काळात इथल्या कापसाच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र मीटर गेज रेल्वे मार्गाचे, वळणावळणाने जाणारे, सगळा जिल्हा व्यापणारे जाळे उभारले होते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र विदर्भाची आर्थिक स्थिती खालावत गेली. इथल्या शेतीतही तसेच स्खलन झाले.

भारतातील कापसाच्या एकूण क्षेत्रापैकी ३६ टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे, परंतु कापसाच्या एकूण उत्पादनात मात्र महाराष्ट्राचा वाटा फक्त १७ टक्के आहे. याचे मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्रात कापसाखाली असलेल्या एकूण जमिनीपैकी फक्त ४ टक्के जमीन बागायती आहे, उर्वरित ९६ टक्के पूर्णतः कोरडवाहू आहे. पावसाने दगा दिला, की कापूस उत्पादन कोसळते. महाराष्ट्रातील कापसाचे दर एकरी उत्पादनही अन्य राज्यांच्या तुलनेत खूप कमी आहे. महाराष्ट्रात एका एकरात एक क्विंटलपेक्षा कमी कापूस निघतो, तर देशातील कापसाचे सरासरी एकरी उत्पादन दोन क्विंटल आहे; महाराष्ट्राच्या दुप्पट.

कापसाचे एकूण क्षेत्र अधिक असल्यामुळे साहजिकच कापसावर अवलंबून असलेल्यांची संख्याही महाराष्ट्रात बरीच मोठी आहे. परंपरेने हा शेतकरी कापूस लावत आला आहे व त्याला अन्य कुठल्या कोरडवाहू पिकांकडे वळवणे, सोयाबीनसारखा अपवाद वगळता, आजवर तरी फारसे जमलेले नाही. दरवर्षी साधारण ऑक्टोबर महिन्यात विदर्भातील कापसाचे पीक बाहेर पडते आणि दरवर्षी हा शेतकरी कर्जाच्या गाळात अधिकाधिक रुतत जातो.

कांदा, ऊस, तंबाखू यांच्यानंतर शेतकरी संघटनेने उभारलेले महत्त्वाचे आंदोलन म्हणजे कापूस आंदोलन. ऊस आंदोलनानंतर लगेचच, १९८०-८१च्या सुमारास, शरद जोशींनी विदर्भाचा दहा दिवसांचा दौरा केला होता. पुण्यातील एक पत्रकार सतीश कामत हे त्यावेळी त्यांच्यासोबत होते. विदर्भात जायचा जोशींचा हा पहिलाच प्रसंग होता. कामत यांनी प्रस्तुत लेखकाला दिलेल्या माहितीनुसार विजय जावंधिया आणि रवी काशीकर यांनी या दौऱ्याचे आयोजन केले होते. जावंधिया जोशींच्या आधीपासूनच शेतकऱ्यांच्या चळवळीत होते; अगदी आणीबाणीच्या काळातही त्यांनी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याविरुद्ध कापसाच्या भावावरून निदर्शने केली होती. काशीकरही सामाजिक कामात सहभाग घेणारे होते; शरद पवार यांच्याशी त्यांची व्यक्तिगत मैत्रीही होती. या दोघांनी विदर्भात दहा दिवसांत दहा जिल्ह्यांमध्ये जोशींसाठी जाहीर सभा आयोजित केल्या होत्या. कामत म्हणतात,

''या सर्वच सभांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आम्ही सगळीकडे मोटारीतून फिरलो. वाटेत ठिकठिकाणी बैठका होत असत. जोशींचे विचार पारंपरिक नेत्यांपेक्षा अतिशय वेगळे होते व सर्वांना अगदी भारावून टाकत असत. या पहिल्याच दौऱ्यात जोशींनी अनेक माणसे विदर्भात जोडली व पुढे पश्चिम महाराष्ट्र किंवा मराठवाडा या भागांपेक्षा विदर्भातील कार्यकर्त्यांनीच जोशींना सर्वाधिक साथ दिली.''

पश्चिम महाराष्ट्रात जे स्थान उसाला आहे तेच विदर्भात कापसाला आहे आणि उसाच्या संदर्भात सहकारी साखर कारखान्यांचे जे महत्त्व आहे तेच कापसाच्या संदर्भात एकाधिकार कापूस खरेदीला आहे. ऐंशीच्या दशकात शेतकरी संघटनेने कापूस आंदोलन सुरू केले त्यावेळी महाराष्ट्रातील कापूस उत्पादकांची परिस्थिती काय होती व त्यांच्यापुढील प्रश्नांचे नेमके स्वरूप काय होते हे समजून घेताना एकाधिकार कापूस खरेदी हा प्रकार समजून घेणे आवश्यक आहे. आज ती खरेदी बंद झाली आहे, पण त्या काळात कापूस शेतकऱ्यापुढे तो एकमेव पर्याय होता.

एकाधिकारात मुख्यतः तीन कामे अंतर्भूत होती : कापसाची खरेदी, कापसातील सरकी काढून टाकून तो सारखा करण्याची (जिला इंग्रजीत जिनिंग म्हणतात ती) प्रक्रिया आणि अशा प्रकारे साफ केलेल्या कापसाची, म्हणजेच रुईची विक्री. खासगी व्यापाऱ्यांच्या नफेखोरीने शेतकऱ्यांचा बळी घेऊ नये अशा उदात्त उद्देशाने साधारण १९७१च्या सुमारास ही एकाधिकार खरेदी पद्धत सुरू झाली. तेव्हा बँकांचे राष्ट्रीयीकरण पूर्ण झाले होते, देश समाजवादी असल्याचे सतत जाहीर केले जात होते. ज्या काळात समाजवादाचा देशाच्या प्रत्येक धोरणावर जबरदस्त पगडा होता, त्या काळाचे हे अपत्य आहे. व्यापारी शोषण करतात, सरकार मात्र जनतेचे असल्याने ते शेतकऱ्यांचे खरेखुरे हित पाहील, ही विचारसरणी एकाधिकार खरेदी पद्धतीच्या उगमाशी होती.

पूर्वी कापूस खरेदी महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन करत असे; पुढे त्यासाठी हे स्वतंत्र महामंडळ तयार करण्यात आले. महामंडळाची रचना सहकारी तत्त्वावर आधारित होती. महामंडळाकडे शेतकऱ्याने कापूस दिला, की काहीएक रक्कम पहिला हप्ता म्हणून शेतकऱ्याला दिली जाई. साखर कारखाने शेतकऱ्याला ऊस खरेदी केला की देत असत त्याप्रमाणे. वर्षाच्या शेवटी जो नफा होई तो शेतकऱ्यांना वाटून दिला जाई. त्याशिवाय शेअर भांडवल म्हणून, शेतकऱ्याला देय असलेल्या रकमेच्या तीन टक्के रक्कम एक स्वतंत्र भांडवल निधी म्हणून कापून घेतली जाई. कापसाच्या भावात चढउतार होतात व त्यामुळे होणाऱ्या संभाव्य तोट्यासाठी तरतूद म्हणून स्वतंत्र चढउतार निधी गोळा केला जाई. शेतकऱ्याला कापसापोटी प्रत्यक्ष द्यायची अंतिम किंमत (जी जास्त असणार ही अपेक्षा) व सरकारने पूर्वीच ठरवलेली कापसाची हमी किंमत (जी कमी असणार ही अपेक्षा) यांच्यातील तफावतीचा, म्हणजेच फायद्याचा, २५ टक्के हिस्सा हा चढउतार निधी म्हणून महामंडळ वेगळा राखून ठेवी. हा सर्व भाग सहकारी तत्त्वांशी मिळताजुळता होता.

विदर्भातील अनेक नेते या यंत्रणेवर खूष होते, कारण ह्या महामंडळावर आता त्यांची थेट सत्ता चालणार होती. खरे तर अशा एखाद्या एकाधिकार योजनेची त्यांची प्रथमपासूनची मागणी होती. पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांना शेतकऱ्यांवर सत्ता गाजवायला व स्वतःची तुंबडी भरायला साखर कारखान्यासारखे हत्यार आहे, आपल्या हाती मात्र असे कुठलेच हत्यार नाही याची खंत त्यांना वर्षानुवर्षे सतावत होती. 'त्यांच्याप्रमाणे आमच्याही वरकमाईची काहीतरी सोय करा,' हीच त्यांची खरी मागणी होती. महामंडळामुळे ती पूर्ण झाली.

विदर्भातील काही नेत्यांनी एकाधिकारशाहीचा असा काही उदोउदो केला, की तिच्या विरोधात बोलणे म्हणजे जणू काही देशद्रोहच होता! पश्चिम महाराष्ट्रातील पुढाऱ्यांना त्यांच्या सहकारी साखर कारखान्यांचा जसा अभिमान आहे, तसाच विदर्भातील पुढाऱ्यांना कापूस एकाधिकार खरेदीबद्दल असे. विदर्भाची 'अस्मिता'देखील ह्या एकाधिकार पद्धतीशी जोडून ह्या पुढाऱ्यांनी दहशतीचे वातावरण तयार केले होते.

शरद जोशींचा ह्या योजनेच्या गाभ्याशी असलेल्या तथाकथित समाजवादी विचारसरणीला तत्त्वशःच विरोध होता. पण त्यांची भूमिका कुठच्याही इझमपेक्षा शेतकरीहिताला प्राधान्य देणारी होती. १९८०-८१च्या सुमारास, म्हणजे कापूस आंदोलन प्रत्यक्ष सुरू व्हायच्या आधीच, ते म्हणाले होते,

''खरेदीव्यवस्था कोणतीही असो; सरकारी असो, सहकारी असो, की व्यापाऱ्यांची असो, परमेश्वराची असो की सैतानाची असो, शेतकऱ्याला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव मिळणे हे सर्वांत महत्त्वाचे.''

१९७०च्या दशकात चीनचे सर्वेसर्वा डेंग झियाओ पिंग ह्यांनी जेव्हा साम्यवादी विचारसरणीचा त्याग करत मुक्त अर्थव्यवस्थेचा अंगीकार केला आणि विकासाच्या मार्गाने आपल्या देशाची घोडदौड सुरू केली, त्यावेळी त्यांचे एक वाक्य खूप चर्चेत आले होते. आपल्या विचारवंतांनी त्याची काहीच दखल घेतली नव्हती, कारण त्यात त्यांच्या पारंपरिक पोथीनिष्ठेला अगदी मुळावर घाव घालणारे आव्हान होते; पण पाश्चात्त्य जगात मात्र ते विधान निर्णायक महत्त्वाचे व दिशादर्शक मानले गेले होते. डेंग म्हणाले होते,

"It does not matter whether a cat is black or white, so long as it catches mice!" (''मांजर काळे आहे की पांढरे, ह्याला काही महत्त्व नाही, ते उंदीर पकडते आहे की नाही हेच महत्त्वाचे!'')

एखादे धोरण साम्यवादी चौकटीत बसते की नाही ह्याचा विचार करत न बसता, ज्यातून देशाचा विकास होईल ते धोरण स्वीकारायचे, हा त्याचा प्रत्यक्षातील अर्थ होता; त्यामुळेच त्यांना राजकीय पटावर स्वतःच्या हाती सगळी सत्ता देणारा साम्यवाद कायम ठेवून आर्थिक पटावर मात्र संपत्तीचे सर्वाधिक निर्माण करणारी मुक्त अर्थव्यवस्था आणता आली. जोशी यांचे उपरोक्त विधानदेखील साधारण ह्याच धाटणीचे आहे.

पुढे कापूस आंदोलन सुरू केल्यावर त्यांनी हे विधान अनेक ठिकाणी पुनःपुन्हा केले; त्यांची ती अगदी प्रामाणिक अशीच भूमिका होती. पण तसे त्यांनी म्हटल्याबरोबर विदर्भात चारी बाजूंनी त्यांच्याविरुद्ध आरडाओरडा सुरू झाला. शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकार राबवत असलेल्या योजनेच्या ते विरोधात आहेत असे मानले जाऊ लागले.

ह्या एकाधिकार योजनेबद्दलची जोशींची, त्या काळात त्यांनी वेळोवेळी मांडलेली भूमिका साधारण अशी होती :

प्रत्यक्षात ही योजना सपशेल फसलेली आहे. विदर्भातील कापूस उत्पादकासाठी अधिक

भाव मिळवून देणे तिला कधीच जमलेले नाही. उलट ती शेतकऱ्यांचे नुकसानच करत राहिली. शेजारच्या मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश वा गुजरात यांसारख्या ज्या राज्यांमध्ये अशी काही योजना नव्हती व जिथे कापसाचा व्यापार खासगी क्षेत्रातच होता, तिथे शेतकऱ्याला कापसाचा नेहमीच अधिक भाव मिळत होता.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्याला अधिक भाव देऊनही ते व्यापारी स्वतःसाठी गडगंज नफा कमवू शकत होते; याउलट शेतकऱ्याला कमी भाव देणाऱ्या महाराष्ट्रातील या योजनेला सतत प्रचंड तोटाच होत होता.

भांडवल निधी म्हणून जी तीन टक्के कपात वर्षानुवर्षे केली गेली, त्या निधीतून कुठल्याही सूत गिरण्या काढल्या गेल्या नाहीत किंवा इतरही काही भांडवली खर्च करण्यात आला नाही. ह्या निधीचे प्रत्यक्षात काय झाले हे एक गूढच आहे. त्या निधीवरचे व्याजही अनेक वर्षे शेतकऱ्याला दिले गेले नाही.

ही योजना महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिली व ही भौगोलिक मर्यादा हेही ह्या योजनेच्या अपयशाचे एक मोठे कारण होते. शेतीमालाच्या व्यापारावर केंद्राने घातलेल्या झोनबंदीमुळे अन्य राज्यांत होत असलेल्या कापसाच्या भावातील वाढीचा ह्या योजनेला काहीच फायदा झाला नाही; तिथे जाऊन ते आपला कापूस विकूच शकत नव्हते.

१९८५मध्ये एकाधिकार योजनेला मुदतवाढ देताना केंद्र सरकारने एक अट घातली – या योजनेतील कापसाची हमी किंमत केंद्र सरकारने ठरवलेल्या आधारभूत किमतीपेक्षा अधिक असता कामा नये. म्हणजेच उत्पादनखर्च काहीही असला, तरी केंद्राने ठरवलेल्या किमतीपेक्षा अधिक किंमत एकाधिकार योजनेत कधीच देता येणार नाही. या कलमामुळे केंद्र सरकारने चढउतार निधीलाही सुरुंग लावला. शेतकऱ्याला एकाधिकारात दिली जाणारी हमी किंमत ही केंद्र सरकारने ठरवलेल्या आधारभूत किंमतीपेक्षा जास्त असूच शकत नाही असे केंद्राने ठरवल्यावर ह्या चढउतार निधीला काही अर्थच उरला नाही.

या अन्याय्य अटीविरुद्ध शेतकरी संघटनेने सतत चार वर्षे आंदोलन केले; ह्या बाबतीत महाराष्ट्र शासन संघटनेशी सहमतही होते. पण दुर्दैव म्हणजे महाराष्ट्रातील एकाही मुख्यमंत्र्याने ह्याबाबत कधी केंद्र सरकारपाशी आग्रह धरला नाही किंवा आपला निषेध व्यक्त केला नाही. सगळेच मुख्यमंत्री केंद्रापुढे शेपूट घालणारे निघाले. ह्या बाबतीत महाराष्ट्र सरकारने कधी संघटनेलाही उघडपणे पाठबळ दिले नाही; कारण तसे केले, तर संघटना शिरजोर होईल व आपली किंमत कमी होईल अशी भीती सरकारला वाटत असावी! कापसाची निर्यात केव्हा करायची, किती करायची याचेही निर्णय नेहमी केंद्र सरकारच घेत असे व ते शेतकरीहित विचारात घेऊन कधीच घेतले जात नसत. त्यांत गिरणी मालकांचा फायदा मुख्यतः विचारात घेतला जाई.

जोशी यांच्या मते ह्या योजनेच्या अपयशाचे एक कारण केंद्र सरकारचे वस्त्रोद्योग धोरण हे नक्कीच होते; पण एकाधिकारातील अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार हीदेखील तेवढीच मोठी कारणे होती.

एकाधिकारातले पहिले पाऊल म्हणजे कापसाची खरेदी. तेथूनच भ्रष्टाचाराला सुरुवात होई. शेतकऱ्याने आणलेल्या कापसाचे वजन कागदोपत्री जास्त दाखवायचे व जास्तीच्या पेमेंटमधील पैसे वाटून खायचे. स्टॉक-टेकिंग करताना कागदोपत्री दाखवलेला कापूस व प्रत्यक्षात जमा झालेला कापूस यांत त्यामुळे फरक पडायचा; काहीतरी कारण दाखवून हा फरक मिटवून टाकणे भाग पडायचे. स्थानिक शेतकरी चेष्टेने असे म्हणत, की दरवर्षी प्रत्येक विभागात एकतरी आग लागल्याशिवाय कापूस खरेदीचा हिशेब पुरा होऊच शकत नाही!

एकाधिकारातले दुसरे पाऊल होते प्रक्रिया – कापूस साफ करणे. शेतातून गोळा केलेल्या कापसापासून साफ केलेला कापूस, म्हणजेच रुई बनवणे. हे काम वेगवेगळ्या जिनिंग कंपन्यांकडून करून घेतले जाई. त्याचे कंत्राट देताना सर्रास पैसे खाल्ले जात. ही रुई बनेपर्यंत खासगी व्यापारात साधारण दीड टक्का वजनातील नैसर्गिक घट होते. एकाधिकार खरेदीत शेतकऱ्याने जमा केलेल्या कापसाचे वजन (वजन करून घेणाऱ्या अधिकाऱ्याशी संगनमत करून तो शेतकरी अधिकाऱ्यांना लाच द्यायला तयार असला तर) मुळातच जास्त दाखवले जाई व मग त्याचा हिशेब शेवटी नीट लागत नसे, तेव्हा ही वजनातील 'नैसर्गिक' घट फुगवून सर्रास आठ ते नऊ टक्के धरली जाई व कसाबसा ताळेबंद मांडला जाई. खासगी व्यापारी जेवढी घट पकडत त्यापेक्षा ही घट सहापट अधिक असे!

ह्या रुई बनवून घ्यायच्या प्रक्रियेत आस्थापनेचा व व्यवस्थापनाचा मोठा भाग असे. सर्व सरकारी उपक्रमांप्रमाणे इथेही नोकरदारांची मजाच असे. कापूस खरेदीचे काम खरे तर हंगामी; पण खरेदीसाठी कापूस येवो वा न येवो, इतर सरकारी खात्यांप्रमाणे अधिकाऱ्यांची फौज, त्यांचे सेवक, त्यांचे पगार, त्यांच्या गाड्या हे सगळे बारा महिने कायमच असायचे. सगळे बसून पगार खाऊ शकत होते. मुळात ह्या नोकरदारांची संख्या प्रचंड; त्यांतले बहुतेक कुठल्या ना कुठल्या नेत्याच्या शिफारशीवरून लागलेले. वर्षातले सहा महिने काम व बाकी वेळ आराम असेच त्यांच्या कामाचे स्वरूप. तत्कालीन अकार्यक्षम यंत्रणा तशीच चालू राहण्यात त्यांचा फायदाच होता. स्वतःच्या कामाचे स्वरूप बदलायला वा आपली संख्या कमी करून घ्यायला त्यांचा विरोध असणार हे उघडच होते. तरीही त्यांना सांभाळून घ्यावेच लागे. त्या सगळ्याचा खर्च अफाट असायचा व अंतिमतः तो शेतकऱ्याला कापसापोटी कमी किंमत देऊनच वसूल केला जाई. खासगी व्यापारात एक क्विंटल रुईमागे हा व्यवस्थापन व आस्थापना खर्च सुमारे ७० ते ८० रुपये असे, तर एकाधिकार खरेदीत हाच खर्च एक क्विंटल रुईमागे सरासरी १५० रुपये, म्हणजे दुप्पट, असे.

एकाधिकारातले तिसरे आणि शेवटचे पाऊल म्हणजे रुईची विक्री. इथे खरा फायदा व्हायचा तो कापड गिरण्यांचा. पूर्वी गिरणीमालक दोन-तीन महिन्यांचा साफ केलेला कापूस आपला स्टॉक म्हणून ठेवत असत. कारण रुईचा पुरवठा खंडित झाला, तर पुढे धागा बनवायचे व कापड विणायचे त्यांचे काम खंडित व्हायची भीती असे. एकाधिकार पद्धतीत त्याची गरजच राहिली नाही. कधीही जावे आणि महामंडळाकडच्या तयार साठ्यातून हवा तेवढा कापूस उचलावा. इन्व्हेंटरीचा खर्च शून्य! शिवाय बाजारपेठेतील मुरब्बी व्यापाऱ्यांपेक्षा सरकारी

बाबूंकडून गिरणी मालक तो कापूस एका खंडीमागे चाळीस ते पन्नास रुपये कमी भावात मिळवत; अर्थात त्यासाठी आवश्यक तिथे हात ओले करून.

अशा प्रकारे आपल्या नियत कामाच्या तिन्ही पायऱ्यांवर नुकसानीत चालणारी ही यंत्रणा शेतकऱ्यांच्या भल्याची असूच शकणार नव्हती. हट्टाने ती चालू ठेवण्यात सरकारचे दरसाल कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत होते. त्यात फायदा झाला तो केवळ पुढाऱ्यांचा, नोकरदारांचा व गिरणी मालकांचा.

काळाच्या ओघात पुढे महाराष्ट्र शासनाच्या कापूस एकाधिकार खरेदीचा अंत झाला. इतर राज्यांप्रमाणे कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फतच सर्व कापूस व्यवहार होऊ लागले. तिचे स्वरूपही पूर्वी मक्तेदारीचेच होते, पण खुली अर्थव्यवस्था जसजसी लागू होत गेली, तसतशी ही मक्तेदारी कमी होऊन खासगी व्यापाराचा वाटा वाढत गेला.

पण संघटनेचे कापूस आंदोलन ज्या काळात झाले त्या काळाचा विचार करताना ह्या एकाधिकार खरेदीमुळे चाळीस वर्षे शेतकऱ्यांचे जे प्रचंड नुकसान झाले त्या नुकसानीचा विचार व्हायलाच हवा. शेतकऱ्याच्या आजच्या कर्जबाजारीपणात ह्या अत्यंत चुकीच्या पण सरकारने दुराग्रहाने राबवलेल्या योजनेचा मोठा वाटा आहे; पण त्या नुकसानीचे उत्तरदायित्व कोणीच घेत नाही वा त्याची कोणी चर्चाही करत नाही.

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी नाशिक जिल्ह्यातील टेहेरे येथे शेतकरी संघटनेने एक विराट सभा आयोजित केली होती. तिच्याविषयी पुढे येणारच आहे. त्या सभेच्या पूर्वतयारीसाठी काढलेल्या प्रचारयात्रेच्या दरम्यान जे वेगवेगळे कार्यक्रम घेतले गेले त्यातलाच एक म्हणजे १८ ऑक्टोबर ८४ रोजी विदर्भात हिंगणघाट येथे भरलेले पहिले कपास किसान संमेलन. कापूस उत्पादकांपुढे काय काय अडचणी आहेत ह्याचा विस्तृत विचार त्या संमेलनात झाला. एकाधिकार खरेदी योजनेमुळे शेतकऱ्यांचे होत असलेले प्रचंड नुकसान, झोनबंदी व निर्यातबंदी यांसारखी जुलमी सरकारी धोरणे यांचा ऊहापोह ह्या संमेलनात झाला. त्याशिवाय, जगभर कृत्रिम बनावटीचे कापड अधिकाधिक लोक वापरत आहेत व त्यामुळे कापूस उत्पादकांवर काय संकटे येऊ घातली आहेत याचीही चर्चा ह्या संमेलनात झाली. दुर्दैवाने टेहेरे सभेच्या वेळीच झालेल्या इंदिराहत्येमुळे संकल्पित आंदोलन जोशी जाहीर करू शकले नव्हते.

नंतर सत्तेवर आलेल्या पंतप्रधान राजीव गांधी यांनी ६ जून १९८५ रोजी नवे वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले. हे धोरण कृत्रिम वस्त्रांना प्रोत्साहन देणारे, पण त्याचवेळी देशातील कापूसउत्पादक शेतकऱ्यांवर मात्र अन्याय करणारे आहे, असे जोशी यांनी जाहीर केले व त्या धोरणाविरुद्ध त्यांनी २ ऑक्टोबर १९८५पासून आंदोलन पुकारले. ही कापूस आंदोलनाची औपचारिक सुरुवात मानता येईल.

'राजीवस्त्रविरोधी आंदोलन' असे त्या आंदोलनाचे नामकरण केले गेले. एका अनौपचारिक बैठकीत पुण्याचे राम डिंबळे यांनी हा शब्द सुचवला व तो सर्वांना आवडला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रेगन यांच्या आर्थिक धोरणाला जसे 'रेगनॉमिक्स' हे नाव दिले गेले,

तसाच काहीसा 'राजीवस्त्र' हा गमतीदार शब्द तयार झाला होता.

या आंदोलनासाठी जोशी यांनी व्यक्तिशः प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गावागावात प्रचार केला. कृत्रिम बनावटीच्या कापडावर म्हणजेच राजीवस्त्रांवर बहिष्कार टाकायचा व त्याची ठिकठिकाणी होळी करायची असे त्या आंदोलनाचे स्वरूप ठरले. ती कल्पना त्यांचीच होती. जोशी स्वतः नेहमीच कॉटनचे कपडे वापरत. आंदोलनाचा प्रचार करण्यासाठी तऱ्हेतऱ्हेची पोस्टर्स तयार करणे, घोषणा तयार करणे, वेगवेगळ्या संघटनाशी चर्चा करून त्यांनीही सहभागी व्हावे म्हणून प्रयत्न करणे ह्यासाठी ते तासन्‌तास, दिवसेंदिवस स्वतः खपत होते. आताच्या परिस्थितीत राजीव गांधी यांच्याविरोधात काही भूमिका घेणे म्हणजे प्रवाहाविरुद्ध पोहणे आहे याची त्यांना पूर्ण कल्पना होती. आपल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ त्यांनी म्हटले होते,

> आपल्या देशाच्या स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासात कापड उद्योगाला मोठे स्थान आहे. ब्रिटिशांची आर्थिक नीती स्पष्ट करताना कापूस स्वस्तात स्वस्त विकत घेऊन कापड महागात महाग विकणे हे उदाहरण सांगितले गेले; स्वदेशी कापडाचा वापर, परदेशी कापडावर बहिष्कार हे कार्यक्रम राबवले गेले. चरखा हे स्वातंत्र्यचळवळीचे चिन्हच झाले. राजीव गांधींचे कापड धोरण म्हणजे महात्मा गांधींच्या कल्पनेतील स्वतंत्र भारताच्या चित्राच्या विरुद्धचे टोक आहे. महात्मा गांधींचे अपुरे राहिलेले स्वातंत्र्यआंदोलन शेतकरी संघटनाच पुढे चालवत आहे असे मी म्हणतो, त्याचे आगामी आंदोलन हे सर्वस्पष्ट उदाहरण आहे. पूर्वी बनावट धाग्यांवर बंधने होती, गिरण्यांनी ८० टक्के धागे कापसाचेच वापरावेत हे बंधन होते. तरीही कापसाला भाव मिळत नव्हता. जेवढ्या काळात कापडाच्या किमतीत ३०० टक्के वाढ झाली, तेवढ्याच काळात कापसाच्या भावात मात्र फक्त ६० टक्के वाढ झाली. आणि आता तर गिरण्यांनी कापूस वापरला नाही तरी चालणार आहे. मग कापसाला योग्य भाव कसे मिळतील?
>
> (*शेतकरी संघटक*, २० सप्टेंबर १९८५)

आंदोलनाचा प्रारंभ साहजिकच कापसाचे मोठे पीक जिथे निघते त्या विदर्भात केला गेला; त्यातही पुन्हा तो वर्धा येथे केला गेला, जेथील सेवाग्राममध्ये गांधीजींचे बराच काळ वास्तव्य होते. दिवस होता २ ऑक्टोबर, म्हणजे गांधी जयंतीचा.

ह्या सगळ्याच आयोजनात एक कल्पकता दिसून येते व आंदोलनाची तयारी किती विचारपूर्वक केली होती हे जाणवते. त्या दिवशी सकाळी जोशींच्या उपस्थितीत बाराशे बैलगाड्यांची एक मिरवणूक काढली गेली व त्यानंतर ४०,००० शेतकऱ्यांचा तिथे मेळावा भरवण्यात आला. मेळाव्यात राजीवस्त्रांची भली मोठी होळी करण्यात आली. त्या दिवशी महाराष्ट्रभर एकूण अडीचशे ठिकाणी अशा होळ्या पेटवण्यात आल्या. आंदोलनाची चर्चा त्यामुळे सर्वतोमुखी झाली.

रविवार, ६ ऑक्टोबरला नगर जिल्ह्यात राहुरी येथे ऊसउत्पादकांची एक परिषद आयोजित केली होती. संघटनेने सर्व राजकीय पक्षांना परिषदेचे आमंत्रण दिले होते. सत्तारूढ काँग्रेस पक्षाचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी आधी यायचे कबूल केले होते; पण मग त्यांनी ते रहित केले. 'तुमच्या रस्ता रोको ह्या प्रकाराला माझा विरोध आहे' असे म्हणत. आपली भूमिका त्यांना समजावून सांगण्यासाठी मुंबईला त्यांच्या घरी जाऊन स्वतः शरद जोशी त्यांना भेटले, पण वसंतदादा तयार झाले नाहीत. बहुधा दिल्लीहून त्यांना ताकीद मिळाली असावी. इतर सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी मात्र परिषदेला हजर होते.

याही कार्यक्रमात सुरुवातीला राजीवस्त्रांची होळी करण्यात आली. त्यानंतर दुपारी सभा सुरू असताना अचानक पावसाला सुरुवात झाली. अगदी धो धो पाऊस पडू लागला. शेतकरी संघटनेच्या नेत्यांप्रमाणेच शरद पवार, प्रमोद महाजन व माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग हे नेतेही व्यासपीठावर हजर होते. पावसामुळे सभा आटोपती घ्यावी लागते की काय, अशी भीती काही जणांनी व्यक्त केली. अशा वेळी शरद जोशी माइकपाशी गेले. ''सभा चालू राहणार आहे, कोणीही उठू नये,'' असे त्यांनी जाहीर केले. आश्चर्य म्हणजे समोर बसलेल्या जवळपास दोन लाख श्रोत्यांपैकी एकही जण उठला नाही! मुसळधार पावसातच ती सभा उत्तम पार पडली. शेतकऱ्यांवरील जोशींची पकड किती अभेद्य होती ह्याचे एक प्रात्यक्षिकच सर्वांना पाहायला मिळाले. ''हम ने काफी सारी मीटिंग्स देखी है, मगर ऐसा जबरदस्त माहोल कभी नही देखा था'' असे उद्‍गार ह्या सभेनंतर चरणसिंगांनी काढले होते.

ह्या सभेत एक आगळा उपक्रम जाहीर केला गेला. पारंपरिक 'रास्ता रोको' करण्याऐवजी १० नोव्हेंबरला सर्वांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहावे, प्रत्येक वाहन थांबवून चालकाला एखादे फूल व पान द्यावे आणि त्याचवेळी शेतकरी संघटनेचे आंदोलन कशासाठी आहे हे सांगणारे एक पत्रक द्यावे; त्यातून वाहतूक हळू झाली तरी 'रास्ता रोको' होणार नाही, व शिवाय लोकांचे आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधले जाईल अशी त्यामागची भूमिका होती. 'फूल-पान आंदोलन' असे ह्या आगळ्या आंदोलनाला नाव देण्यात आले व पुढे त्याला चांगला प्रतिसादही मिळाला. माहितीपत्रकाबरोबरच नामवंत व्यंग्यचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी चितारलेल्या चार खास व्यंग्यचित्रांचे एक पत्रकही वाहनचालकांना दिले गेले. त्या पत्रकाच्या दहा लाख प्रती संघटनेने छापून घेतल्या होत्या.

कापूस आंदोलनाच्या दरम्यान असाच एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम ७ ऑक्टोबरला पुण्यात आयोजित करण्यात आला. बरोबर ८० वर्षांपूर्वी, म्हणजे ७ ऑक्टोबर १९०५ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी पुण्यात लकडी पुलाजवळ नदीकाठी विदेशी कपड्यांची एक होळी लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. पतितपावन ही संघटना दरवर्षी त्याच जागी सावरकरांचे स्मरण म्हणून तशीच एक होळी साजरी करत असे. या वर्षी त्या संस्थेसोबत शेतकरी संघटनादेखील ह्या कार्यक्रमात सामील झाली. दुसऱ्या एखाद्या संस्थेबरोबर अशा कार्यक्रमात शेतकरी संघटनेने सामील व्हायचा हा पहिलाच प्रसंग. ज्येष्ठ

समाजवादी नेते नानासाहेब गोरे ह्याच्या हस्ते ही होळी लावली जाणार होती. पण पतितपावन संघटनेला (ती जातीयवादी आहे या भूमिकेतून) असलेल्या विरोधामुळे ते आले नाहीत. दिल्लीतील वेठबिगार मुक्तिमोर्चा संस्थेचे नेते स्वामी अग्निवेश यांनी शेवटी ही होळी पेटवली. त्यानंतर झालेल्या सभेत पतितपावन संघटनेचे अध्यक्ष सोपानराव देशमुख, स्वामी अग्निवेश, विजय जावंधिया व शरद जोशी यांची भाषणे झाली. एकूणच पुणे शहरात शेतकरी संघटनेचे जाहीर कार्यक्रम असे फारच थोडे झाले; त्यांतला हा एक.

१२ डिसेंबर हा हुतात्मा बाबू गेनू सैद ह्याचा स्मृतिदिन. याच दिवशी, १९२९ साली, मुंबईतील मुळजी जेठा ह्या कापडाच्या मोठ्या घाऊक मार्केटसमोर, विदेशी कापडांवर बहिष्कार टाकण्याच्या महात्मा गांधी यांनी दिलेल्या आदेशानुसार कामगारांची जोरदार निदर्शने चालू होती. बाबू गेनू हा त्यांच्यातला एक. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ ह्या गावच्या एका शेतकऱ्याचा मुलगा. मुंबईतील एका कापड गिरणीत काम करणारा. विदेशी कापडांनी भरलेला एक ट्रक मार्केटमधून बाहेर पडला व रस्त्यावर आला. तो रोखून धरण्यासाठी बाबू गेनू त्या ट्रकसमोर सरळ आडवा पडला. ट्रक ड्रायव्हरने ट्रक थांबवला. शेजारीच बसलेल्या एका गोऱ्या सोजिराने ट्रक तसाच सरळ पुढे रेटून नेण्याचा आदेश दिला. पण त्या देशी ड्रायव्हरने तसे करायला नकार दिला. चिडलेल्या सोजिराने त्याला खाली उतरवले व स्वतःच ट्रक सुरू करून त्याने सरळ बाबू गेनूच्या अंगावरून ट्रक नेला. स्वातंत्र्यआंदोलनातील हा मुंबईतला पहिला हुतात्मा. १९८५मध्ये त्याच्या स्मृतिदिनी शेतकरी संघटनेने मुंबईतील शिवाजी पार्कवर एक विशाल शेतकरी-कामगार मेळावा आयोजित केला. ह्या ऐतिहासिक मैदानावरचा संघटनेचा हा पहिला मेळावा. डॉ दत्ता सामंत ह्यांच्या कामगार आघाडीसमवेत हा मेळावा आयोजित केला गेला होता.

या मेळाव्यात शिवसेनेनेही सामील व्हावे अशी जोशींची फार इच्छा होती व त्यासाठी त्यांनी स्वतः बाळासाहेब ठाकरे यांच्या घरी जाऊन त्यांना आमंत्रण दिले होते. पण 'ज्या व्यासपीठावर दत्ता सामंत असतील, त्या व्यासपीठावर मी येणार नाही' असे म्हणत ठाकरे यांनी नकार दिला. शिवसेना आणि दत्ता सामंत यांची कामगार आघाडी यांच्यात त्यावेळी वेगवेगळ्या कारखान्यांतील कामगारांचे नेतृत्व कोणी करायचे या मुद्द्यावरून सतत मारामाऱ्या होत असत. त्यावेळी मुंबई महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता होती व छगन भुजबळ महापौर होते. ठाकरे येणार नाहीत म्हटल्यावर त्यांचीही यायची आधी तयारी नव्हती; पण शेतकरीनेत्यांनी 'एवढे सगळे शेतकरी मुंबईत येणार व मुंबईचे पहिले नागरिक म्हणून त्यांचे स्वागत करणे हे तुमचे कर्तव्य आहे' असे म्हणत त्यांची मनधरणी केली. त्यामुळे ते यायला तयार झाले. मैदान पूर्ण भरले होते व त्यात शेतकऱ्यांची संख्याच खूप अधिक होती. पण सामंतांनी आपल्या चार-पाचशे महिला कामगार व्यासपीठाच्या समोरच आणून बसवल्या होत्या. या महिलांनी सतत शिवसेनाविरोधात जोरदार घोषणा द्यायला सुरुवात केली. इतर सर्व शेतकरी श्रोत्यांना शिवसेना व कामगार आघाडी ह्यांच्यातील ह्या वैराची काही माहितीही नव्हती

व हे काय घडते आहे याची त्यांना काहीच कल्पना येईना. संघटनेच्या सर्व सभा नेहमी विलक्षण शिस्तीत पार पडत. महिला कामगारांनी या घोषणा थांबवाव्यात अशी सूचना जोशींनी सामंत यांना अनेकदा केली, सामंत यांनी वरवर आपल्या कार्यकर्त्यांना दटावण्याचे नाटकही केले, पण प्रत्यक्षात ह्या घोषणा चालूच राहिल्या.

मुळात भुजबळ यांना बोलवायलाच सामंत यांचा विरोध होता, पण जोशींनी आग्रह धरल्यामुळे त्यांनी नाराजीने होकार दिला होता. त्याकाळी भुजबळ यांची शिवसेनेत घुसमट व्हायला सुरुवात झाली होती; पण अधिकृतरीत्या ते शिवसेनेतच होते. कदाचित बाळासाहेबांच्या मनाविरुद्ध ह्या मेळाव्याला हजर राहून त्यांना आपली नाराजी व स्वतंत्र बाणा बाळासाहेबांना दाखवायचा होता.

त्यांच्या येण्यामुळे एक फायदा नक्की झाला – शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याला हार घालण्यासाठी जी शिडी लागायची, ती त्यावेळी फक्त मुंबई महानगरपालिकेकडे होती व तिचे एका दिवसाचे भाडे तीस हजार रुपये होते. भुजबळ आल्यामुळे ती फुकटात मिळाली! त्या मेळाव्याचा इतर सर्व खर्च संघटनेने फक्त तीस हजार रुपयांतच बसवला होता! 'मुर्दाबाद'च्या घोषणांनी वैतागलेल्या भुजबळांनी आपले स्वागतपर भाषण झाल्यावर ताबडतोब व्यासपीठ सोडले, पुढील भाषणांसाठी ते थांबले नाहीत.

या मेळाव्याच्या आदल्या दिवशी हुतात्मा बाबू गेनूच्या महाळुंगे-पडवळ या गावापासून एक स्मृतिज्योत यात्रा मुंबईत आणली गेली होती. त्या यात्रेत इतरांबरोबर बाबू गेनूच्या थोरल्या वहिनी श्रीमती कासाबाई कुशाबा सैद यांचाही समावेश होता. त्यांच्याच हस्ते या मेळाव्यात त्यांनी बरोबर आणलेल्या स्मृतिज्योतीने राजीवस्त्रांची होळी पेटवण्यात आली होती. अशा वेगवेगळ्या कल्पक कृती हे शेतकरी संघटनेच्या सगळ्याच कार्यक्रमांचे एक वैशिष्ट्य होते.

भुजबळ निघून गेल्यावर या सभेत प्रकाश आंबेडकर, दत्ता सामंत व शरद जोशी यांची भाषणे झाली. शरद जोशी यांची मुंबईतील ती पहिली मोठी सभा. नंतरही कधी त्यांच्या मुंबईत अशा मोठ्या सभा झाल्या नाहीत. त्यावेळचे जोशी यांचे एक खंदे सहकारी धुळ्याचे अनिल गोटे यांचा ह्या आंदोलनात मोलाचा वाटा होता. या मेळाव्यातील त्यांच्या संदर्भातील एक गमतीदार आठवण जोशींनी नोंदवली आहे. ते लिहितात :

> स्टेज उभारायचे आणि लाऊड स्पीकरचे काम कामगार आघाडीच्या कुणी चारपाच लाख किंवा अशाच काही रकमेला ठरवले होते. गोटेंनी तीस हजारात हे काम करायचा प्रस्ताव आणला, तेव्हा डॉक्टरसाहेब (दत्ता सामंत) त्यांच्या सहकाऱ्यांवर एकदम घसरले. डॉक्टरसाहेबांना राग आला म्हणजे त्यांच्या तोंडी शिव्यांच्या फैरीच्या फैरींची खैरात चाले. 'एवढे समोरासमोर XXXX मला गंडवता? या गोटेमुळे समजलं. गेली इतकी वर्षं तुम्ही कितीला लुटलं कुणास ठाऊक!' डॉक्टर सामंतांचा अनिल गोटेंवर मोठा लोभ जडला. 'एवढा तुमचा कार्यकर्ता आम्हांला देऊन टाका', असा त्यांचा आग्रह कायम असे. माझ्याशी भेटणे, बोलणे त्यांना

अवघड वाटे; गोटेंचे त्यांचे चांगले जमे. एका कोणा कामगारनेत्याने काहीतरी सूचना आणली आणि वर पुरवणी जोडली, 'शरद जोशींच्या लक्षातसुद्धा यायचे नाही, तो आपला साधा सरळ माणूस!' डॉक्टर कडाडले, 'तुम्हांला काही अकला आहेत का रे? गोटेसारखी माणसं जो जवळ बाळगतो, तो काय असला साधा माणूस असणार?' गुंडगिरीच्या मोजमापात माझा भाव फुकटमफाकटच वधारून गेला!

(एका कामगार चळवळीचा अस्त, *अंगारमळा,* पृष्ठ १०१)

पुढच्या वर्षी, म्हणजे १९८६ साली, राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी एकाधिकार योजनेंतर्गत कापसाचा भाव एकदम क्विंटलमागे ६१४ वरून ५४० वर आणला. त्यामुळे कापूस उत्पादकांमधे प्रचंड असंतोष पसरला. एकूण परिस्थितीचा विचार करण्यासाठी अकोला येथे २ ऑक्टोबर १९८६ रोजी कपास किसान संमेलन भरवण्यात आले. महाराष्ट्रातील जवळजवळ दीड लाख कापूस शेतकरी ह्या मेळाव्याला हजर होते. त्याशिवाय गुजरात, मध्यप्रदेश, आंध्र व हरयाणा येथील कापूस उत्पादकांचे प्रतिनिधीही हजर होते. नवीन वस्त्रोद्योग धोरणामुळे कापसाचा कमी कमी होत जाणारा वापर, आधारभूत किंमत शेतकऱ्याच्या हाती पडावी ह्यासाठी असलेली अगदी अपुरी यंत्रणा, महाराष्ट्रातील एकाधिकार कापूस खरेदी योजनेमध्ये कमी करण्यात आलेले कापसाचे भाव आणि निर्यातीवर अथवा अन्य प्रांतांत कापूस पाठवण्यावर घातलेले जाचक निर्बंध हे चार मुख्य मुद्दे ह्या सभेत पुढे आले. त्यातील कापसाच्या भावाचा मुद्दा त्यावेळी अगदी ऐरणीवर आला होता. कापूस शेतकऱ्यांमधे संतापाचा आगडोंब उसळला होता. कापूस आंदोलनाचे सेनापती म्हणून आमदार मोरेश्वर टेमुर्डे यांची नियुक्ती करण्यात आली.

६ डिसेंबरनंतर राजीवस्त्रविरोधी आंदोलन अधिक प्रखर करण्याच्या दृष्टीने बाबू गेनू स्मृती सप्ताह साजरा करायचा, त्याची सुरुवात २३ नोव्हेंबरला एक दिवसाचा रास्ता रोको करून करायची, नंतर ६ डिसेंबरपासून राजीवस्त्र घालणाऱ्यांना रास्ता रोको करायचा, नंतर १२ डिसेंबरला सेवाग्रामला रेल रोको करायचा व शेवटी १२ डिसेंबरनंतर पुढाऱ्यांना गावबंदी करायची असे ठरले. त्यानुसार अनेक ठिकाणी चक्का जाम (रास्ता रोको) केला गेला.

तशा पहिल्याच प्रसंगी, ६ डिसेंबरलाच, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पोलिसांनी गावोगावी प्रमुख कार्यकर्त्यांना अटक केली. स्वतः शरद जोशी यांना व त्यांच्याबरोबरच्या विजय जावंधिया वगैरे बारा शेतकरी कार्यकर्त्यांना त्याच दिवशी हिंगणघाटवरून वर्धा येथे येत असताना अटक केली गेली.

भाऊसाहेब बोबडे यांच्यासारखे नामांकित वकील याप्रसंगी जोशींच्या मदतीसाठी उभे राहिले. सध्या सुप्रीम कोर्टात न्यायाधीश असलेल्या शरद बोबडे यांचे हे वडील. त्यांनी हायकोर्टात अर्ज दाखल करून दोन दिवसांतच जोशी यांची सुटका करवली. पण मग सरकारने लगेच त्यांना पुन्हा पकडले. तेही स्मगलर्स व समाजकंटक यांच्यासाठी वापरल्या जाणाऱ्या राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली!

१० डिसेंबर १९८६ला, त्यावेळी परभणी जिल्ह्यात असलेल्या, हिंगोलीजवळच्या सुरेगाव येथे गोळीबार होऊन त्यात तीन शेतकरी हुतात्मा झाले.

सुरेगाव येथे प्रस्तुत लेखक गेला असताना त्याला शेतकरी संघटनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार सकाळी नऊच्या सुमारास रास्ता रोको करण्यासाठी सत्याग्रही रस्त्यावर जमा होऊ लागले होते. शासनाने कापसाला निदान गेल्या वर्षीइतका तरी भाव द्यावा ही त्यांची मुख्य मागणी होती. त्या परिसरात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते व साहजिकच हा विषय सर्वांच्या जिव्हाळ्याचा होता. सुरुवातीला कार्यकर्त्यांनी एक-दोन गाणी म्हटली. नंतर स्थानिक शेतकरी कार्यकर्त्या अंजली पातुरकर यांनी भाषण केले. त्यानंतरचे वक्ते बळीरामजी कऱ्हाळे बोलायला उभे राहिले, तोच पोलिसांनी त्यांच्या हातातला माइक हिसकावून घेतला व त्यांना धक्के मारत अटक केलेल्या सत्याग्रहींना तुरुंगात नेण्यासाठी रस्त्याच्या कडेलाच उभ्या केलेल्या एका बसकडे न्यायला सुरुवात केली. प्रत्यक्ष सत्याग्रह त्यावेळी सुरूही झाला नव्हता. लोक त्यामुळे संतापले व पोलीसही ऐकेनात. त्यातून मग धक्काबुक्की सुरू झाली. त्यातूनच पुढे गोळीबार झाला.

ह्या आंदोलनात प्रत्यक्ष सामील झालेल्या दोन महिलांची निवेदने महत्त्वाची आहेत. (पूर्वप्रसिद्धी : शेतकरी संघटक, अमरावती महिला अधिवेशन विशेषांक, १० नोव्हेंबर १९८९. पृष्ठ ५०-१, ५५-६, संपादित अंश.)

हिंगोली तालुक्यातील माथा या गावी राहणाऱ्या गोदाबाई शंकरराव पोले म्हणतात :

> सुरेगावच्या आंदोलनाला आम्ही पंचवीस बाया गेलो होतो. तिथे पातुरकरबाईंनी भाषण केलं. खूप बायका, माणसं, पोरं जमली होती. सगळी मुकाट्यानं बसली होती. आणखी माणसंही चारी बाजूंनी येत होती. पोलिसांची मात्र चुळबुळ सुरू होती. ते अटक करू लागले. काही माणसांना धक्के देऊन त्यांनी जुलमानेच गाडीत नेऊन बसवलं. आता मात्र काही सोय नव्हती. वाट फुटेल तिथे सगळे गडी अन् बाया पळू लागले. पोलीस माणसांना ढोरासारखे बडवत होते. आमच्या अंगाचं पाणी होत होतं. अंग थरथर कापत होतं. कुठे जावं कळत नव्हतं. गोळीबार सुरू झाला होता. कोणाच्या पायावर, कोणाच्या मानेत गोळ्या लागत होत्या. धडाधड माणसं भुईवर पडत होती. मोठ्या कष्टानं मी चालत होते. मागे कसलातरी आवाज व्हायला लागला म्हणून मी वळून पाहिले, तो काही पोलीस एका शेतकऱ्याला मारपीट करताना दिसले. घाबरून मी पुढे सरकले. एवढ्यात माझ्या पाठीत एका पोलिसाने झाडलेली एक गोळी लागली. मी चक्कर येऊन खाली बसले. अंधारी येत होती. पुढं काहीच दिसत नव्हतं. बसत उठत, बसत उठत मी पुढं गेले.
>
> काही माणसं मला भेटली व म्हणाली, 'गोदाबाई, तू सरकारी दवाखान्यात जा. डॉक्टर तुझ्या पाठीतली गोळी काढतील अन् औषधपाणी देतील.' त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी सरकारी दवाखान्यात गेले. तिथे डॉक्टर नव्हता. मी तशीच

बसले. तिथे असणारा एक कंपाउंडर मला म्हणाला, 'बाई, तुम्ही जा, इथे बसू नका. आम्ही काही तुमचे नोकर नाही गोळी काढायला.'

तो असं म्हणाल्यावर मी उठले. गावच्या माणसांना म्हणाले, 'डॉक्टर गोळी काढायला तयार नाही, मी काय करू?' ती माणसं म्हणाली, 'गोदाबाई, गावाकडं जाऊ. एखाद्या खासगी डॉक्टरला बोलावून आणू अन् गोळी काढू.' मग मी त्यांच्याबरोबर पायी अडीच कोस चालत आले. घरी आल्यावर दम वर निघून जात होता. मग गावातल्याच डॉक्टरनं गोळी काढली. आजही त्या दिवसाची आठवण झाली, की गिरकी आल्यासारखं होतं अन् अंग आपोआपच थरथरायला होतं.

दुसरे निवेदन आहे हिंगोली गावच्या अंजली अरुण पातुरकर यांचे. त्या म्हणतात :

२३ नोव्हेंबर, ७ डिसेंबर आणि १० डिसेंबर १९८६ रोजी सुरेगाव येथे कापूस आंदोलने झाली. ह्या तिन्ही आंदोलनांत मी भाग घेतला होता. २३ नोव्हेंबर आणि ७ डिसेंबरच्या आंदोलनात जास्तीत जास्त संख्येने स्त्रिया रस्त्यावर आल्या होत्या. छोट्या पोराबाळांनासुद्धा घेऊन. एका घरात एक बाई असेल, तर त्या घरातील नवरा, बायको व मुले हे सर्वच रस्त्यावर आले होते. ज्या घरात सासू व सुना किंवा मुली आहेत, अशा घरातील किमान दोन स्त्रिया तरी रस्त्यावर आल्या होत्या. त्यांचा उत्साह दांडगा. त्या म्हणाल्या, की दहा तारखेला घराला कुलूप लावून घरातील सर्व व्यक्ती रस्त्यावर येऊ.

अशा उत्साही वातावरणात दहा तारखेला सकाळी नऊ वाजता आम्ही रस्त्यावर आलो. सर्व शेतकरी जमायला बारा वाजले असते, कारण खेड्यापाड्यातून तिथे शेतकरी जमणार होते. दहा वाजेपर्यंत पाचशेच्या आसपास स्त्रिया व पुरुष तिथे जमले. पोलीस फार मोठ्या संख्येने तिथे जमले होते. लोक जमेपर्यंत काय करायचे, म्हणून श्रीयुत मिसाळ यांनी शेतकरी संघटनेचे एक गाणे म्हटले. तेथील सर्व स्त्रियांनी मला बोलावयास लावले. मी पाच मिनिटेच बोलले. माझ्यानंतर बळीरामजी कऱ्हाळे यांनी बोलावयास सुरुवात केली. परंतु तोपर्यंत पोलिसांत काहीतरी कुजबुज झाली आणि त्यांनी लगेचच शेतकऱ्यांची धरपकड करून लाठ्या मारण्यास सुरुवात केली. शेतकरी घाबरून इकडेतिकडे पळू लागले, तर त्यांनी गोळीबार सुरू केला. सर्व आंदोलन चिरडून टाकले. त्या आंदोलनात तीन शेतकऱ्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. पोलिसांनी अगदी धुमाकूळ घातला. महिलांनासुद्धा गोळ्या लागल्या. मला दहा-पंधरा लाठ्यांचा प्रसाद मिळाला.

विधानसभेच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सुरेगाव येथील पोलिसांच्या अत्याचाराबद्दल दोन तास बरीच चर्चा झाली. शेवटी तिच्यात हस्तक्षेप करून मुख्यमंत्र्यांना न्यायालयीन चौकशी जाहीर करावी लागली. मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती मालवणकर यांनी

ती चौकशी केली. पण त्या चौकशीतून शेतकरीनेत्यांना समाधानकारक वाटावे असे फारसे काहीच निष्पन्न झाले नाही.

या घटनेपूर्वी ७ डिसेंबर १९८६ रोजी तुरुंगातूनच जोशींनी जाहीर केले होते, की ह्या सप्ताहाचा शेवट रेल रोकोने करायचे आपले पूर्वीच ठरले आहे व त्यानुसार १२ डिसेंबर रोजी सेवाग्राम येथे तीन तासांचे रेल रोको होईल. वर्ध्याजवळचे सेवाग्राम हे स्टेशन तसे देशाच्या मध्यावर आहे व अनेक महत्त्वाच्या गाड्या ह्याच मार्गावरून जातात.

पोलिसांनी जागोजागी नाकाबंदी करून शेतकऱ्यांना अटक करायचा कसोशीने प्रयत्न केला, पण तरीही आपला गनिमी कावा लढवून, इतर प्रमुख नेते तुरुंगात असूनही वीस-पंचवीस हजार शेतकरी वेगवेगळ्या छुप्या मार्गांनी रेल रोकोसाठी निवडलेल्या वेगवेगळ्या जागी हजर झाले व त्यांनी तीन तास रेल्वे अडवून धरली. पोलीस बंदोबस्त प्रचंड होता. एक गट पोलिसांनी ताब्यात घेतला व पोलीस गाडीत वा बसमध्ये बसवून तुरुंगाकडे रवाना केला, की लगेच दुसरा गट कुठूनतरी रेल्वे रुळांवर उगवत होता व पोलीस लगेच त्या गटामागे धावत होते. सत्याग्रहींनी भरलेल्या बसेसच्या रांगाच्या रांगा अशा उभ्या होत्या. शेतांत लपून, छुप्या वाटा शोधत हे शेतकरी आंदोलनस्थळी कसे दाखल झाले याचे खुद्द पोलिसांना अतिशय आश्चर्य वाटले. 'भुईतून उगवावेत तसे हे शेतकऱ्यांचे लोंढेच्या लोंढे आंदोलनस्थळी प्रकट होत होते' असे वर्णन खुद्द पोलिसांनी कोर्टासमोर केले आहे.

वर्ध्यापासून जेमतेम आठ किलोमीटरवर सेवाग्राम आहे. गांधीजींच्या आश्रमामुळे जगप्रसिद्ध झालेले. १९३० साली अहमदाबादच्या साबरमती आश्रमातून गांधीजींनी दांडीयात्रा सुरू केली. 'भारत स्वतंत्र झाल्याशिवाय आता मी पुन्हा साबरमतीला येणार नाही' अशी प्रतिज्ञा करून. नंतरची दोन वर्षे ते तुरुंगातच होते. बाहेर आल्यावर मध्य भारतात कुठेतरी आपण कायमचे वास्तव्य करावे असे त्यांनी ठरवले. १९३६ साली सुप्रसिद्ध उद्योगपती आणि ज्यांना गांधीजी आपला पाचवा पुत्र मानत, त्या जमनालाल बजाज यांनी गांधीजींना वर्धा येथील आपल्या बजाजवाडी ह्या निवासस्थानी यायचे आमंत्रण दिले. हे स्थळ भारताच्या जवळजवळ मध्यावर आहे हे गांधीजींच्या लक्षात आले. त्यावेळी गांधीजी ६७ वर्षांचे होते. इथेच आपला एक नवा आश्रम सुरू करायचे त्यांनी ठरवले. सेवाग्राम या नावाने. कस्तुरबाही त्यांच्यासमवेत होत्या. इतरही अनेक कार्यकर्ते होते. या सर्वांना तिथे नीट राहता यावे म्हणून जमनालाल यांनी गांधीजींना आपली ३०० एकर जमीन दिली. ती ज्या गावी होती त्याचे नाव होते सेगाव. त्याच्याशी नामसादृश्य असलेले शेगाव हे तीर्थक्षेत्र विदर्भात अतिशय प्रसिद्ध आहे. श्री गजानन महाराज यांच्या वास्तव्याने पावन झालेले. गांधीजींना 'सेगाव'च्या पत्त्यावर देशभरातून येणारी असंख्य पत्रे चुकून 'शेगाव'ला जात. म्हणून मग १९४० साली 'सेगाव'चे नाव बदलून 'सेवाग्राम' हेच ठेवले गेले. १९३६ ते १९४८ साली निधन होईस्तोवर गांधीजींचे कायमस्वरूपी 'घर' हेच होते. पुढे विनोबा यांचेही वास्तव्य इथे झाले. १९५१ साली त्यांची भूदान यात्रा इथूनच सुरू झाली. नंतर विनोबांनी पवनार येथेही काही वर्षे वास्तव्य केले.

सेगावच्या रेल्वे स्टेशनला पूर्वी वर्धा (पूर्व) असे म्हणत. त्याचेही नाव पुढे सेवाग्राम ठेवले गेले. वर्धा ते सेवाग्राम ह्या टप्प्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे भारतीय रेल्वेवरील सर्वांत अधिक अवघड वळणे (sharpest turns) ह्या आठ किलोमीटरच्या टप्प्यात आहेत.

रेल्वे लाइनीच्या दोन्ही बाजूंना मुख्यतः कापसाची शेते आहेत, पूर्वीही होती. १२ डिसेंबरला रास्ता रोको होणार, पण त्याच्या आदल्याच आठवड्यात हजारो शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. खुद्द वर्ध्यात जिल्हा कचेरीच्या बाजूला असलेल्या विस्तीर्ण पटांगणात बांबूचे कठडे उभारून एक खुला तुरुंग केला गेला होता व ह्या आंदोलकांना जनावरांप्रमाणे त्यात नुसते सोडून देण्यात येत होते. त्यांचा नाव-पत्ता नोंदवून घेऊन.

सेवाग्राम येथे हे जे रेल रोको आंदोलन झाले ती जागा प्रत्यक्ष बघण्याचा योग प्रस्तुत लेखकाला २८ मार्च २०१६ रोजी आला. प्रत्यक्ष रेल रोकोत भाग घेतलेल्या काही जणांशी त्यासंदर्भात त्यावेळी चर्चाही करता आली. रेल रोको जिथे झाले तिथून अगदी जवळच ज्यांचे शेत व राहण्याचे घर आहे आणि ज्यांचा आंदोलनात उत्साही सहभाग होता त्या सुमनताई अगरवाल यांनाही भेटता आले.

सुमनताई अगरवाल ह्या मूळ कर्नाटकच्या. विनोबाजींच्या ब्रह्मविद्या आश्रमातील राधेश्यामजी यांच्याशी त्यांनी लग्न केले. दोघेही आश्रमातच राहू लागले. पुढे दोघांनी आश्रमाबाहेर स्वतःच्या घरात राहायचा निर्णय घेतला आणि १९७३च्या मार्चमध्ये स्वतःची शेती करायला सुरुवात केली. खूप खर्च केला. दोघेही खूप मेहनत घ्यायचे. पण काहीच पैसा सुटत नसे. आपले अनुभव सांगताना त्या लिहितात,

> शेतीत आपण कुठे कमी पडतो तेच कळायचं नाही. त्यावरून आमच्यात भांडणंही व्हायची. पावलापावलावर टंचाई. घरातील शांती बिघडत चालली होती. दोघांमध्ये शाब्दिक संघर्षाला सुरुवात झाली होती. शरीर एवढं थकायचं, की जेवण झाल्यावर आवराआवर करणंसुद्धा नकोसं व्हायचं. १९८४च्या सुमारास शेतकरी संघटनेच्या परभणी अधिवेशनासाठी वर्ध्याहून एक बस जाणार होती. 'बसमध्ये एक जागा रिकामी आहे, तुम्ही येता का?' असं विचारायला शेजारचा शेतकरी घरी आला. संत्र्याचा ट्रक भरण्याच्या कामासाठी राधेश्यामजी घरीच होते. ते तर जाऊ शकत नव्हते. 'तू जाऊन ये' असं ते मला म्हणाले. मी गेले. तोवर मला संघटनेविषयी काहीच माहिती नव्हती.
>
> परभणीतील शेतकरी नेत्यांची भाषणं मला आवडली. पुढे चांदवडच्या महिला अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी आंबेठाणला भरलेल्या एक आठवड्याच्या महिला शिबिरालाही मी हजर होते. संघटनेने मांडलेले विचार मला नवीनच होते. आम्ही शेतीमध्ये मूर्खासारखं काम करत होतो, आज ना उद्या चांगलं होईल अशी आशा वाटत होती; पण ज्या सरकारवर आम्ही विसंबून होतो, ते शेतकऱ्यांना केवढा मोठा

धोका देत होतं! घरात नवऱ्याबरोबर बाचाबाची करण्यात काही अर्थ नव्हता; आम्ही दोघंही फसलो होतो. आम्हीच काय, सर्व शेतकरी फसले होते.

मला कळलेलं हे सत्य गावागावात शेतकऱ्यांपर्यंत पोचवलं पाहिजे, म्हणून बरोबर दोन बायांना घेऊन विदर्भातील चार जिल्ह्यांची पदयात्रा काढली. त्यावेळी मी ग्रामीण दारिद्र्य जवळून पाहिलं. त्यानंतर मी घरी बसूच शकले नाही. अनेक गावी पायी फिरले. त्या अनुभवांची शिदोरी आयुष्यभर पुरेल.

(चतुरंग प्रतिष्ठान, दैनंदिनी २०१२, पृष्ठ १३५-६-७)

आश्रमवासी असल्याने सुमनताई स्वतः राजीवस्त्र वापरतच नव्हत्या; खादीचेच कपडे घालायच्या. आमच्याबरोबर आंदोलनस्थळ दाखवायला त्या आल्या. रेल्वे लाइन एका लांबलचक उंचवट्यावरून जाते. तिथवर जायची वाट त्यांच्याच शेतातून जाते. त्या दिवसाच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या,

''सगळीकडे पोलीस पहारा जबरदस्त होता, कोणालाही रेल्वे लाइनपर्यंत सोडत नव्हते. जरा जवळ जायचा प्रयत्न केला की पकडून नेत होते. आधीही अनेक आंदोलनांत भाग घेतलेला असल्याने मला पोलिसांची भीती अशी फारशी नव्हती. रेल रोकोच्या आदल्याच आठवड्यात मलाही पोलिसांनी पकडलं होतं. त्यांच्या व्हॅनमध्ये बसवलं. मला बाहेर पडायचं होतं, पण पोलीस दार उघडेनात. शेवटी जोरजोरात लाथा मारून मी स्वतःच ते दार तोडलं व बाहेर आले. बघते तो काय, समोर एका कार्यकर्त्याला पोलीस लाठ्यांनी बेदम मारत होते. मला ते बघवेना. त्याला सोडवायला मी मध्ये पडले, तर मलाही दोन लाठ्या खाव्या लागल्या. आमच्या रेल रोको आंदोलनात पोलिसांनी केलेला बेछूट लाठीमार आठवला, की आजही माझ्या अंगावर शहारे उठतात.

''पोलिसांच्या तावडीतून निसटून मी धूम पळाले. कारण आमच्यापैकी काही जणींनी तरी बाहेर राहणे आवश्यक होते. त्याशिवाय बाहेरगावाहून येणाऱ्या आंदोलकांना आम्ही कुठल्या कुठल्या जागी जमायचं व रेल्वे अडवायची ह्याचे निरोप देऊ शकलो नसतो. मोबाइल नसतानाचे हे दिवस होते. आमच्या बऱ्याच महिला कार्यकर्त्या चलाख होत्या. थोडे थोडे पुढे सरकत त्या रेल्वे लाइनच्या अगदी जवळ जाऊन पोचल्या. मध्ये दोन-तीनदा पोलिसांनी हटकलं तेव्हा, 'आम्ही कापूस वेचायला आलो आहोत' असं म्हणत त्यांनी शेतातला कापूस वेचण्याचं नाटक सुरू केलं.

''एका शेतकऱ्याचं पाच-सहा एकराचं कोबीचं शेत रेल्वे रूळ व रस्ता ह्याच्यामध्ये होतं. शेताला वळसा घालून गेलं, तर पोलिसांना दिसणार आणि ते नक्की पकडणार हे उघड होतं. अशावेळी तो शेतकरी आपणहूनच पुढे आला आणि त्या उभ्या शेतातूनच रेल्वेपर्यंत जायची त्याने आंदोलकांना परवानगी दिली. असं करण्यात त्याच्या कोबीचं नुकसान होणार होतं, पण त्याला त्याची पर्वा नव्हती. सर्वच शेतकऱ्यांची आणि गावकऱ्यांची सगळी सहानुभूती आम्हालाच होती. त्यामुळेच गनिमी काव्याने हालचाली करणं आम्हाला शक्य होतं.

''अशा प्रकारे आंदोलक पुढे पुढे जायचे आणि मग सरळ रेल्वे लाइनवर जाऊन आडवे पडायचे. ती सगळी बॅच पोलिसांनी पकडली, की रेल्वे ट्रॅकवर आणखी कुठेतरी कुठूनतरी दुसरी बॅच आडवी पडायची. आश्रमात माझ्याबरोबर राहणाऱ्या अनेक जणांनी मला नंतर सांगितलं, की गांधीजींच्या वेळेलाही इतक्या मोठ्या प्रमाणावर लोक आंदोलनात सामील झाले नव्हते.''

''तुमच्यासारख्या घरंदाज कुटुंबातील व विशेषतः ग्रामीण भागातील स्त्रियांनी असं रस्त्यावर उतरणं खूपच अवघड व दुर्मिळ आहे. ह्यावेळी तुम्ही सगळे असे इतके पेटून कसे उठलात? गांधीजींच्या त्या आंदोलनात आणि ह्या आंदोलनात असा काय फरक होता?'' असा प्रश्न मी सुमनताईंना विचारला.

त्याचे त्यावेळी त्यांनी काही उत्तर दिले नाही, पण दुसऱ्या दिवशी मी नागपूरला परत जात असताना त्यांचा फोन आला. त्या म्हणाल्या,

''एक फार मोठा फरक म्हणजे त्यावेळी लोक देशसेवा म्हणून आंदोलनात सामील होत असत. पुढे जेपी आंदोलनातदेखील आम्ही सामील होतो व तेव्हाही आमची प्रेरणा देशसेवा हीच होती. किंवा समाजसेवा म्हणा हवं तर. पण ह्या शेतकरी आंदोलनात आम्ही दुसऱ्या कोणाची सेवा करायची म्हणून रस्त्यावर उतरलो नव्हतो. इथे प्रश्न होता तो आमच्या स्वतःचाच. आम्ही स्वतः जे शेतीत कष्ट घेत होतो, त्याचं फळ आम्हाला मिळत नव्हतं व ते मिळावं म्हणून आमचं आंदोलन होतं. ह्यावेळी प्रश्न आमच्या स्वतःचा होता, स्वहिताचा होता. त्यामुळे आम्ही जिवाची पर्वा न करता इतके पेटून उठलो.''

त्यांचे हे उत्तर माणसाला कार्यप्रवण करणारी मूलभूत प्रेरणा कोणती हे स्पष्ट करणारे होते व म्हणूनच विचार करायला भाग पाडणारे होते.

ह्या रेल रोकोत थेट व महत्त्वाचा सहभाग असलेल्या सरोजताई काशीकर याही या वर्धाभेटीत आमच्याबरोबर होत्या. शरद जोशी व शेतकरी आंदोलन यांच्याशी त्यांचा व त्यांच्या सर्व कुटुंबाचाच खूप जिव्हाळ्याचा संबंध राहिला आहे.

सरोज काशीकर मूळच्या मध्यप्रदेशातल्या. पुढे त्यांचे घराणे नागपुरात स्थायिक झाले. त्यांचे आजोबा गौरीशंकर शुक्ला संतपुरुष म्हणून प्रसिद्ध होते. सरोजताई अर्थशास्त्राच्या पदवीधर. माहेरचा विरोध पत्करूनही वर्ध्याच्या रवी काशीकर यांच्याशी त्यांनी विवाह केला. १९८१ साली जोशी प्रथम वर्ध्याला आले होते. त्यांच्यासोबत पत्नी लीलाताईदेखील होत्या. त्यांची मुक्कामाची सोय कुठे करायची, यावर स्थानिक कार्यकर्त्यांत चर्चा झाली व सर्वानुमते त्यांना काशीकरांच्या घरी ठेवायचे ठरले. त्यावेळी घर तसे साधे होते. त्यात एकत्र कुटुंबपद्धती. घरात माणसे बरीच. तरीही शेवटी वरच्या पत्र्याचे छप्पर असलेल्या खोलीत पाहुण्यांची सोय केली गेली.

जोशींच्या साध्या सवयी लौकरच सरोजताईंच्या लक्षात आल्या आणि त्यांना घरी ठेवायचे म्हटल्यावर आधी आलेला तणाव कुठच्या कुठे पळून गेला. त्यानंतर अनेक वेळा

जोशींनी या घरात मुक्काम केला, पण ते अगदी कुटुंबाचा एक हिस्सा असल्यासारखेच राहिले. सरोजताईंच्या म्हणण्यानुसार सकाळी नास्त्याचा त्यांचा आवडता प्रकार म्हणजे शिपोतु – शिळ्या पोळीचे तुकडे! तिखटमीठ लावून तेलाची फोडणी दिलेले! घरच्या सगळ्यांशी जोशी खेळीमेळीने वागायचे. सरोजताईंच्या सासूबाई, म्हणजे अक्का, जोशींना आपला मोठा मुलगाच मानू लागल्या.

पुढे सरोजताई शेतकरी संघटनेच्या तिकिटावर काँग्रेसच्या प्रभा राव यांच्यासारख्या मातब्बर उमेदवाराचा पराभव करून विधानसभेवर निवडूनही गेल्या. महिलांचा व शेतकऱ्यांचा आवाज विधानसभेत उठवण्याची एकही संधी त्यांनी तिथे सोडली नाही. संघटनेच्या त्या पहिल्या महिला अध्यक्ष.

त्यांचे यजमान रवी काशीकर गरिबीतून वर आलेले. स्वतः शेती पदवीधर. घरची शेतीही होतीच, पण हे इतर मित्रांच्या भागीदारीत बियाणांच्या व्यवसायात पडले. व्यवसायाची घडी चांगली बसत होती, त्याचवेळी ते शेतकरी आंदोलनाच्या संपर्कात आले व आपल्या व्यवसायातून वेळ काढत त्यांनी संघटनेचे काम केले. त्यांचे व्यवसायातील सहकारी माधव शेंबेकर हेदेखील प्रत्यक्ष आंदोलनात सहभाग नसला, तरी संघटनेच्या कामाचे महत्त्व जाणणारे. अंकुर सीड्स ही त्यांची कंपनी बीजनिर्मिती व वितरणाच्या क्षेत्रात एक आघाडीची कंपनी मानली जाते. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते या घराला खूपदा 'आमचं वर्ध्यातील राजभवन' असे म्हणतात. तीस-चाळीस कार्यकर्त्यांच्या पंगती ह्या घराला नवख्या नाहीत.

''माझ्या जाऊबाई – शालूताई – घरची सगळी जबाबदारी घेत होत्या, म्हणूनच मला संघटनेचं इतकं काम करता आलं. त्यामुळे त्यांचंही योगदान माझ्याइतकंच आहे. मी कुठेही दौऱ्यावर गेले, तुरुंगात गेले तरी मला कधी माझ्या मुलांची, घराची काळजी करावी लागली नाही.'' – इति सरोजताई.

ह्या शालूताईंचा भाऊ अरुण ह्याच्याबरोबर, मागे ज्यांचा उल्लेख झाला आहे त्या, सुरेगावच्या अंजली पातुरकर यांचे लग्न झाले आहे.

आपल्या ह्या रेल रोकोतील अनुभवाबद्दल सरोजताई म्हणाल्या,

''हे रेल रोको म्हणजे एका मोठ्या कापूस आंदोलनाचाच एक भाग होता. ते आंदोलन त्यापूर्वीच सुरू झालं होतं. १९८६ साली कापसाचा भाव कमी न करता निदान मागील वर्षाएवढा तरी ठेवावा या मागणीसाठी जिल्ह्याजिल्ह्यात कलेक्टरच्या कार्यालयावर मोर्चे काढायचं ठरलं. आमचा वर्धा जिल्हा म्हणजे शेतकरी संघटनेचा बालेकिल्ला. महिला आघाडीचं कामही इथे भरपूर झालं होतं. त्यामुळे इथला मोर्चा हा फक्त महिलांचा असावा व तो बैलगाड्यांतून निघावा असं ठरलं. पूर्वी असं कधीच घडलं नव्हतं.

''आम्ही मोर्च्याचा भरपूर प्रचार केला. तिगाव, आमला, रोठा, दहेगाव, म्हसाला अशा आठ-दहा किलोमीटर अंतरावरील गावांतूनही लोक यायला तयार झाले. एका पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने प्रश्न विचारला, 'महिलांचा मोर्चा म्हणता व तो बैलगाडीतून निघणार म्हणता. पण मग बायका बैलगाडीत मागे बसणार आणि बैलगाड्या हाकणारे पुरुषच असणार, असं

ना? मग हा मोर्चा महिलांचा कसा म्हणता येईल?'

''आम्हाला हा प्रश्न म्हणजे एक आव्हान वाटलं. आम्ही त्याच क्षणी जाहीर केलं, की महिलाच ह्या बैलगाड्या चालवतील. २७ ऑक्टोबर १९८६ हा मोर्च्याचा दिवस होता. आदल्या दिवशी ही घटना घडलेली. मी इतर महिलांना जेव्हा हे सांगितलं, तेव्हा त्या सगळ्या काळजीत पडल्या. कारण बैलगाडी हाकणं तसं अवघड होतं. त्यांना प्रेरणा मिळावी म्हणून मी म्हटलं, 'पहिली बैलगाडी माझी असेल व ती मीच हाकणार आहे.'

''माझा निश्चय बघून पाचतरी महिला बैलगाड्या हाकत येतील असं मला वाटलं. प्रत्यक्षात दुसऱ्या दिवशी २५० बैलगाड्या मोर्च्यात आल्या! हाकणाऱ्या सगळ्या महिलाच होत्या. कलेक्टर कचेरीसमोरचा सगळा रस्ता जाम झाला. तासभर तरी आम्ही तिथे होतो. सगळं गाव आश्चर्यचकित होऊन ते दृश्य पाहत राहिलं. त्यात ते पत्रकार बंधूही होते! हातात बैलांचे कासरे धरून सगळ्या बायका जोरजोरात घोषणा देत होत्या!

''ह्या सगळ्यातून आंदोलनाला पूरक अशी जागृती होत होती. पुढचा सगळा पंधरवडा आम्ही रेल रोकोचा प्रचार करण्यात व कोणकोण कुठूनकुठून येणार याचं नियोजन करण्यात घालवला. आम्हाला पकडायला पोलीस टपलेच होते आणि आम्ही गनिमी काव्याने त्यांची नजर चुकवून प्रचार करत फिरत होतो. आंदोलक आणि पोलीस ह्यांच्यात जणू पाठशिवणीचा खेळच सुरू होता. १० आणि ११ डिसेंबर ह्या शेवटच्या दोन दिवसांत आम्ही निदान १५ गावांमधून फिरलो.

''शेवटी एकदाची बारा तारखेची सकाळ उगवली. सकाळी सहा वाजल्यापासूनच बाहेरगावांहून शेतकऱ्यांचे लोंढेच्या लोंढे वर्ध्यात शिरत होते. एवढी गर्दी वर्ध्याने कधीच पहिली नव्हती. जास्तीत जास्त लोकांना पोलीस पकडत होते; पण बाहेरून येणाऱ्या माणसांची संख्याच एवढी मोठी होती, की कितीही जणांना पकडलं तरी नवे नवे आंदोलक रेल्वे लाइनीच्या दिशेने पुढे सरकतच होते. रेल्वे रोकोची वेळ दुपारी ११ ते २ अशी ठरली होती. त्यानुसार ते तीन तास आम्ही ती सगळी रेल्वे लाइन अडवून धरली होती.

''दोननंतर मात्र साहेबांनी पूर्वीच देऊन ठेवलेल्या आदेशानुसार रेल रोको थांबलं. संध्याकाळी पाचनंतर पकडलेल्या सगळ्यांना पोलिसांनीही सोडून दिलं. एवढ्या सगळ्या पंधरा-वीस हजार आंदोलकांना अटकेत ठेवण्याची काहीच सोय वर्ध्यात नव्हती. आमच्या मागण्यांकडे समाजाचं व सरकारचं लक्ष वेधून घेणं हा अशा कुठल्याही आंदोलनामागचा मुख्य हेतू असतो व तो ह्यावेळेपर्यंत सफळ झाला होता. रेल रोकोची ती यशस्वी सांगता होती.''

बहुतेक सारे कार्यकर्ते त्यावेळी तुरुंगात असल्याने ह्या रेल रोकोची बरीचशी जबाबदारी महिला कार्यकर्त्यांवर पडली. आदल्याच महिन्यात चांदवड येथे संघटनेचे ऐतिहासिक असे महिला अधिवेशन झाले होते. त्यावेळी असंख्य शेतकरी महिला पेटून उठल्या होत्या व पुरुषांच्या बरोबरीने आंदोलनात सहभागी होण्याचा निश्चय त्यांनी केला होता. हे रेल रोको म्हणजे त्या निश्चयाची एक कसोटीच होती आणि त्या कसोटीत ह्या शेतकरी भगिनी पूर्ण यशस्वी झाल्या.

१२ डिसेंबर १९८६चे हे रेल रोको म्हणजे शेतकरी आंदोलनातील एक महत्त्वाचा मानबिंदू आहे. ६ ते १२ डिसेंबर ह्या बाबू गेनू स्मृती सप्ताहातल्या राजीवस्त्रविरोधी आंदोलनात जवळजवळ सहा लाख शेतकरी स्त्री-पुरुष वेगवेगळ्या ठिकाणी रस्त्यावर आले. त्या सगळ्यांचीच पोलिसांकडून अटक करून घ्यायची तयारी होती, पण तेवढ्या साऱ्यांना अटक करायची काहीच यंत्रणा नव्हती. तरीही विदर्भात सुमारे साठ हजार शेतकऱ्यांना अटक झाली. शाळा-कॉलेजेसना सुट्टी देऊन त्या आवारांत 'खुले तुरुंग' तयार केले गेले. पूर्वी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष असलेले व नंतर राष्ट्रवादी पक्षात गेल्यावर आमदार झालेले शंकरअण्णा धोंडगे नांदेड येथे भेटले असताना प्रस्तुत लेखकाला म्हणाले होते,

"आमच्या मराठवाड्यातही ६ ते १२ डिसेंबर ह्या काळात तीस हजार शेतकरी तुरुंगात होते. खरं तर तुरुंग सगळे पूर्ण भरलेलेच होते व तरीही उरलेल्या मोठमोठ्या शेतकरी समुदायांना वेगवेगळ्या मैदानांत डांबून ठेवलं होतं. कागदोपत्री त्यांची अटक पोलिसांनी दाखवलीच नव्हती, पण प्रत्यक्षात ती अटकच होती."

नव्वद हजार आंदोलकांना एकाच आठवड्यात अटक होणे ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एक अभूतपूर्व घटना मानावी लागेल. आजवरच्या इतर कुठल्याही आंदोलनात एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणावर लोकांना अटक झाल्याचे ऐकिवात नाही.

पुढे २६ डिसेंबर रोजी नागपूर हायकोर्टाने जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांची जामिनावर सुटका केली व नंतर चाललेल्या खटल्यात राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली करण्यात आलेली ही अटक बेकायदेशीरही ठरवली गेली. ह्याप्रसंगी मुंबईचे राम जेठमलानी व नागपूरचे बोबडे पितापुत्र हे जोशींच्या बाजूने हायकोर्टात उभे राहिले. रासुकाखाली अटक झालेल्यांना जामीन मिळणे हे अतिदुर्मिळ होते, पण बिनतोड वकिली युक्तिवादामुळे ते शक्य झाले. शिवाय, तसे पाहिले तर हा कायदा जोशींसारख्या तत्त्वनिष्ठ आंदोलकाला लावणे हा मूर्खपणाच होता. "We refuse to accept that Sharad Joshi is a threat to national security." ("शरद जोशी म्हणजे राष्ट्रीय सुरक्षेला धोका आहे हे म्हणणे आम्हाला मान्य नाही") असे कोर्टानेही पुढे नमूद केले. पण जास्तीत जास्त कठोर कायद्याखाली शेतकरीनेत्यांना डांबून ठेवायचे आणि कायदेशीर अडचणींशी झुंजण्यात त्यांचा शक्तिपात करून टाकायचा हे शेतकरी संघटनेच्या बाबतीत सरकारचे धोरणच होते.

पण आपली लढाई कोर्टातदेखील लढवावी लागेल याची पूर्ण जाणीव जोशींना नाशिक आंदोलनापासूनच होती व त्यामुळे सरकारवर दबाव आणण्यासाठी तेही अनेक प्रकरणांत न्यायालयाचा दरवाजा ठोठावत. कोर्टाचे निर्णय कधी कधी आंदोलनाला मदत करणारेदेखील असत. या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे "शेतकऱ्यांना एकाधिकार योजनेत प्रत्यक्षात दिली जाणारी कापूस खरेदीची किंमत जर हमी भावापेक्षा कमी असेल आणि त्यातून शेतकऱ्याचा उत्पादनखर्चसुद्धा भरून निघणार नसेल, तर एकाधिकार योजनेलाच कापूस विकायची सक्ती शेतकऱ्यांवर कशी करता येईल?" असा एक प्रश्न संघटनेने दाखल केलेल्या

एका खटल्यात कोर्टाने उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना, ''उत्पादनखर्चावर आधारित किफायतशीर भाव देणे हा एकाधिकार योजनेचा हेतू नाही'' अशी कबुली सरकारी पक्षातर्फे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात दिलेली होती.

कापूस आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणून शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर बेमुदत ठिय्या मारून बसायचे असा कार्यक्रम निश्चित झाला. त्यानुसार महाराष्ट्रभरातून लाखावर शेतकरी मुंबईकडे निघाले. पण त्यांनी मुंबईपर्यंत पोचूच नये म्हणून पोलिसांनी आटोकाट प्रयत्न केले. नागपूर, वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, मनमाड, औरंगाबाद, नांदेड या रेल्वे स्टेशनांवर शेतकऱ्यांना गाडीतून उतरवले तरी जात होते किंवा चढू तरी दिले जात नव्हते. तरीही ठरलेल्या दिवशी, म्हणजे १५ फेब्रुवारी १९८७ रोजी, वीस ते पंचवीस हजार शेतकरी मुंबईत गिरगाव चौपाटीवर पोचले. त्याच दुपारी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी महसूल राज्यमंत्री रोहिदास पाटील यांना आपले खास दूत म्हणून चौपाटीवर पाठवले व शेतकरीनेत्यांना आपल्या वर्षा बंगल्यावर वाटाघाटींसाठी बोलावून घेतले. शरद जोशी, भास्करराव बोरावके, अनिल गोटे व रामचंद्रबापू पाटील यांचे शिष्टमंडळ त्यासाठी गेले. रात्री उशिरापर्यंत वाटाघाटी चालल्या. त्यानुसार कापसाची अंतिम किंमत मागील वर्षापेक्षा अधिक ठेवणे, राज्यशासन व शेतकरी संघटना यांनी निर्यातवाढीसाठी व इतर बाबींसाठी केंद्र शासनाकडे संयुक्त प्रयत्न करणे आणि एकाधिकार खरेदी योजनेच्या विक्री व्यवस्थेवर संघटनेचे प्रतिनिधी देखरेख करण्यासाठी घेणे या तीन मुद्द्यांवर संघटना व राज्यशासन यांच्यात करार झाला व त्या रात्रीच ठिय्या आंदोलनाची व १८ ऑक्टोबर १९८४पासून सुरू असलेल्या कापूस आंदोलनाची तात्पुरती सांगता झाली.

अर्थात शेतकरी आंदोलनाचे कुठलेच पर्व कधीच तसे संपत नसते, कारण सतत नवे नवे प्रश्न किंवा जुन्याच प्रश्नांच्या नव्या नव्या बाजू पुढे येतच असतात.

पुढल्याच वर्षी राजीवस्त्रविरोधी आंदोलनाचा एक भाग म्हणून शेतकरी संघटनेने रायगड जिल्ह्यातील, पण मुंबईपासून फार दूर नसलेल्या, पाताळगंगा येथे १२ डिसेंबर १९८८ रोजी, म्हणजे हुतात्मा बाबू गेनू यांच्या स्मृतिदिनी, एक सत्याग्रह केला जाईल असे जाहीर केले. पाताळगंगा परिसरात दहाहून अधिक कारखाने कृत्रिम कापड धंद्याशी संलग्न आहेत; त्यात धीरूभाई अंबानी यांची रिलायन्स व नसली वाडिया यांची बॉंबे डाइंग या दोन कंपन्या प्रमुख आहेत. त्या परिसराला शेतकरी सत्याग्रही वेढा घालतील व आत तयार झालेला माल बाहेर पडू देणार नाहीत असे ठरले होते. पण आयत्यावेळी हे आंदोलन मागे घेण्यात आले. या प्रकरणावरून जोशींवर संशय व्यक्त करणारी काही उलटसुलट चर्चा एक-दोन वृत्तपत्रांमधून झाली होती. त्यावेळी नेमके काय घडले होते याविषयी खुलासा करताना जोशी म्हणाले,

''अंबानींचं नाव असलं म्हणजे काहीतरी काळंबेरं नक्की असणार असं उगाचच काही लोकांना वाटतं! आणि सुतावरून स्वर्ग गाठण्यात हे लोक हुशार असतात. प्रत्यक्षात इथे कुठलाही गैरव्यवहार झाला नव्हता. शेतकरी संघटनेच्या संपूर्ण इतिहासात कोणाकडून आम्ही

पैसे खाल्ले व त्या कारणामुळे आंदोलन सुरू केलं किंवा मागे घेतलं, असं एकदाही घडलेलं नाही. आम्हाला जवळून ओळखणाऱ्या एकानेही असा आरोपही पूर्वी कधी केलेला नाही. शेवटी एखाददुसऱ्या माणसाने अशी काही कुजबुज केलीच, तर आपण काही त्याचं तोंड धरू शकत नाही. पण आमचा एकही शेतकरी अशा कुठल्या आरोपावर क्षणभरही विश्वास ठेवणं शक्य नाही. एवढा मला आमच्या शेतकऱ्यांबद्दल नक्की विश्वास आहे. वस्तुस्थिती अशी होती, की कापूस शेतकऱ्यांच्या दृष्टीने आंदोलनाची वेळ गैरसोयीची ठरली; आमच्या एकदोन सहकाऱ्यांनी हे आंदोलन ठरवण्यात थोडीशी घाई व थोडीशी चूकच केली. मुळात पाताळगंगा परिसरात शेतकरी संघटनेचा फारसा जोर नव्हता; बाहेरून शेतकरी निदर्शक मोठ्या प्रमाणावर सत्याग्रहासाठी येऊ शकतील अशी खात्री नव्हती. अशा परिस्थितीत आंदोलन हमखास अयशस्वी ठरलं असतं. दुसरं एक कारण म्हणजे त्याच वेळी कापसाची किंमत सरकारने वाढवून दिली होती. त्यामुळे खोट्या प्रतिष्ठेला बळी न पडता मी सत्याग्रह रद्द केला. आंदोलनात असं कधी कधी होतं.''

पण कुठेतरी आपल्या जाहीर स्पष्टीकरणात या संदर्भात जोशी कमी पडले असावेत व काहीच कारण नसताना त्यांच्या विरोधात एका छोट्या वर्तुळात तरी गैरसमज प्रसृत झाले होते.

यानंतर सात वर्षांनी, म्हणजे १४ डिसेंबर १९९५पासून जोशींनी कापसाच्या झोनबंदीविरुद्ध आंदोलन छेडले. उसाप्रमाणेच कापूसविक्रीवरही झोनबंदीचे बंधन होते. सरकारच्या कापूस धोरणातील हा एक अतिशय जाचक भाग होता. ठरवून दिलेल्या हद्दीबाहेर जाऊन आपला कापूस विकण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला नव्हते. प्रत्यक्षात ही झोनबंदी सगळे शेतकरी पाळत असत असे नाही. दोन राज्यांतील सीमेवर जे पोलीस तैनात केलेले असत त्यांना कापसाच्या प्रत्येक ट्रकमागे ठरलेली रक्कम लाच म्हणून दिली, की ते तो ट्रक खुशाल पलीकडे सोडत असत. हा त्यांच्या कमाईचा एक मोठाच मार्ग बनला होता व त्यातील हिस्सा अगदी वरपर्यंत पोचत होता हेही उघड होते. पण अशा प्रकारच्या भ्रष्टाचारात शेतकरी संघटनेचे पाईक सहसा कधी सामील होत नसत. भ्रष्टाचाराला विरोध हे संघटनेचे नेहमीच एक वैशिष्ट्य राहिले आहे. सरळमार्गी शेतकऱ्यासाठी त्यामुळे ही झोनबंदी खूप क्लेशदायक होती. मध्यप्रदेशातील बऱ्हाणपूरच्या बाजारात जेव्हा कापसाला अडीच हजार रुपये क्विंटल भाव मिळत होता, तेव्हा महाराष्ट्रात मात्र त्याला फक्त ९६० रुपये भावाने कापूस विकावा लागत होता. आपण इतक्या कष्टाने कापूस पिकवला आहे, त्याला हद्दीपलीकडे इतका भाव मिळतो आहे, पण आपल्याला मात्र तो इथेच इतक्या स्वस्तात विकायला लागतो आहे, ही वस्तुस्थिती शेतकऱ्याच्या काळजाला डागण्या देणारी होती.

या झोनबंदीविरुद्धच्या आंदोलनाची सुरुवात करताना त्यांनी लिहिले आहे,

> १२ डिसेंबर रोजी नागपूर जिल्ह्यातील नरखेड येथे महाराष्ट्रातील लक्षावधी कापूसउत्पादक शेतकरी मोर्च्याने जमणार आहेत. तेथून मध्यप्रदेशाची सरहद्द ओलांडून

पांढुर्णा येथील बाजारपेठेत ते पिशवी-पिशवी कापूस घेऊन जाणार आहेत. त्यांची मागणी कापसाला अधिक भाव मिळावा अशी नाही. उलट, सध्याच्या महाराष्ट्र शासनाने जुन्या सत्ताधाऱ्यांची दुष्ट नीती सोडून, महाराष्ट्रातील कापसास आधारभूत किमतीच्या तुलनेत वाढीव भाव देऊ केला आहे. याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मी कौतुकही केले आहे. पण एकाधिकार योजनेस एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आणि ती योजना पुढे चालू ठेवण्याचा याही सरकारचा इरादा आहे. गेली पंचवीस वर्षे एकाधिकार या गोंडस नावाखाली पुढारी, अधिकारी आणि गिरणी मालक यांनी एकत्र येऊन शेतकऱ्यांना अब्जावधी रुपयांना बुडवले. आणि असेच बुडवत राहण्याचा त्यांचा इरादा आहे. या एकाधिकाराला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांचा हा स्वातंत्र्यमोर्चा आहे. विरोध सरकारी खरेदीला नाही; सरकारी मक्तेदारीला आहे. कास्तकारांनी पिकवलेला कापूस त्यांना मर्जीप्रमाणे कोणत्याही देशी किवा विदेशी बाजारपेठेत विकण्याचे, त्यावर प्रक्रिया करण्याचे किंवा त्याची वासलात लावण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, ही स्वातंत्र्यमोर्च्यामागची धारणा आहे.

(*शेतकरी संघटक,* ६ डिसेंबर १९९५)

प्रदीर्घ काळ चाललेल्या या कापूस आंदोलनात अशी आंदोलने वेळोवेळी होतच राहिली.

शेतकऱ्यांसमोरील प्रश्नांचे स्वरूप किती गुंतागुंतीचे आहे व म्हणूनच कुठल्याही आंदोलनानंतर तो विशिष्ट प्रश्न मिटला असे होत नाही हे स्पष्ट करण्यासाठी जोशी यांनी अलीकडे लिहिलेला (*लोकसत्ता,* बुधवार, ९ जानेवारी २०१३ अंकातील) एक लेख वाचण्यासारखा आहे. बाजारपेठेतील व्यापाऱ्याकडून शेतकऱ्याचा माल विकला गेल्याबद्दल त्याला पैसे मिळण्याऐवजी, त्याच्याकडेच उलट पैसे मागणारे पत्र आले, की त्याला शेतकरी 'उलटी पट्टी' म्हणत. सरकारनेदेखील शेतकऱ्यांना अनुदान, कर्जमाफी वगैरे स्वरूपात जी रक्कम आजवर दिली, त्याच्या अनेकपट रक्कम शेतकऱ्याकडून सरकारने त्याच्या शेतीमालाला सातत्याने उत्पादनखर्चापेक्षा कमी किंमत देऊन लुबाडली, असे जोशी सतत म्हणत आले. सरकारकडून शेतकऱ्याला मिळणारी ही 'उलटी पट्टीच' आहे असे ते म्हणत. त्यावेळी ते कोणालाच पटत नसे; पण अनेक वर्षांनी त्यातील सत्याची साक्ष पटवणारा एक प्रसंग ह्या मजकुरात त्यांनी नोंदवला आहे. तो असा :

१९८९ साली एक रोचक दस्तावेज जोशींच्या हाती पडला. शेतकरी नेते भूपिंदरसिंग मान राज्यसभेचे सदस्य होते. राज्यसभेसमोर ठेवला गेलेला, ज्यातील आकडेमोड समजणे कठीण होते, असा एक तक्ता, त्यांनी जोशींकडे अभ्यासाकरिता पाठवून दिला. त्या तक्त्यामध्ये सध्याचे राष्ट्रपती आणि त्यावेळचे व्यापारमंत्री डॉ. प्रणव मुखर्जी यांनी आकड्यांत आणि शब्दांत स्पष्ट केले होते, की शेतकऱ्यांना त्यांचा उत्पादनखर्च भरून निघावा इतकाही भाव भारतात मिळत नाही. त्या तक्त्यात दिलेल्या सगळ्या मालाच्या किमती प्रत्यक्ष उत्पादनखर्चापेक्षा १० ते ९० टक्क्यांनी कमीच होत्या; केवळ उसाला मात्र

उत्पादनखर्चाएवढा भाव मिळतो अशी नोंद होती. याउलट कापसाला जागतिक बाजारपेठेमध्ये जर २१० रुपये भाव असेल, तर त्या वेळी देशात कापूस खरेदी महासंघ (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) शेतकऱ्याला १०० रुपये भाव देऊ करतो.

थोडक्यात, सरासरीने भारतात कापसाला ११० रुपयांची उलटी पट्टी आहे, हा निष्कर्ष निघाला. महाराष्ट्रातील विदर्भासारख्या प्रदेशात तर एकाधिकाराखाली शेतकऱ्याना प्रती क्विंटल ६० रुपयेसुद्धा मिळत नाहीत असेही त्या तक्त्यात स्पष्ट म्हटले होते. पुढे एकदा ह्या निगेटिव्ह सबसिडीची, म्हणजे उलट्या पट्टीची, दाहकता जोशींनी एका कार्यक्रमात भेट झाली असताना, मुखर्जीसाहेबांच्या लक्षात आणून दिली. ते हसत हसत म्हणाले, ''आणि तरीही आमचे विरोधी पक्ष म्हणतात, की जागतिक व्यापार संस्थेच्या दबावाखाली आमच्याकडील शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सबसिड्या सरकार कमी करेल!''

म्हणजेच, जागतिक दडपणाखाली शेतकऱ्यांच्या सबसिड्या कमी करू नका, अशी जेव्हा काही नेते व विचारवंत मागणी करत होते, तेव्हा प्रत्यक्षात अशा कुठल्या सबसिड्या नव्हत्याच, तो केवळ एक आभास होता, याचीही जाणीव त्या मंडळींना नव्हती. प्रत्यक्षात सरकार शेतकऱ्यांकडूनच पैसे ओरबाडून घेत आले आहे, हे आमच्या विरोधी पक्षांच्यासुद्धा कधी लक्षात आले नव्हते!

कापूस आंदोलनाविषयी लिहिताना शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी लिहिणे आवश्यक वाटते, कारण या आत्महत्यांचे प्रमाण कापूस शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक आहे. खरेतर हा एखाद्या स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे आणि त्यावर इथे थोडक्यात काही लिहिणे विषयाला न्याय देणारे असणार नाही. तरीही शेतकरी आत्महत्या हा अलीकडे वरचेवर चर्चेत येणारा विषय असल्याने शरद जोशी ह्या विषयाकडे कसे पाहत होते, याचे कुतूहल वाचकाला वाटणे स्वाभाविक आहे.

अनेक शहरी वाचकांत शेतकरी आत्महत्यांबद्दल बरेच गैरसमज प्रचलित असतात. उदाहरणार्थ, 'सरकारकडून लाख-दोन लाख रुपये नुकसानभरपाई मिळावी म्हणून काही जण मुद्दाम आत्महत्या करतात.' किंवा 'आता आपल्या कुटुंबाला मदत म्हणून आपण काहीच करू शकत नाही; तेव्हा निदान आत्महत्या करून तरी त्यांना चार पैसे मिळवून द्यावे असाही विचार ह्या आत्महत्यांमागे आहे' असे काही जणांना वाटते. हे म्हणणे सत्याचा विपर्यास करणारे आहेच, पण ते अतिशय क्रूरदेखील आहे.

आत्महत्या करणाऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत म्हणून जी रक्कम जाहीर होते तिच्यातले किती पैसे प्रत्यक्षात त्या कुटुंबीयांपर्यंत पोचतात व किती पैसे मधल्यामध्ये हितसंबंधी हडप करतात हा एक संशोधनाचाच विषय आहे. पण अधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जगण्याची प्रेरणा ही माणसाची सर्वांत प्रबळ प्रेरणा आहे व कोणी कितीही पैसे दिले म्हणून एखादा माणूस आत्महत्या करेल हे अशक्य कोटीतले वाटते. मुळात आत्महत्या करणे एवढे सोपेही नाही.

जोशींनी ह्या आत्महत्यांचा खूप खोलात जाऊन विचार केला होता व ह्या समस्येची काही कारणे आणि काही मूलगामी उपाय त्यांनी सुचवले आहेत. (*बळीचे राज्य येणार आहे!*, पृष्ठ ३५४ ते ३७४)

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधी जोशींनी केलेली मीमांसा थोडक्यात पुढीलप्रमाणे होती :

१) देशभरात आजवर घडलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांत सर्वाधिक आत्महत्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या आहेत. शेजारच्या आंध्रातील शेतकरी आत्महत्या नकली कीटकनाशके अथवा बियाणे यांच्यामुळे झालेल्या नुकसानीतून प्रेरित झाल्या होत्या. पण महाराष्ट्रात अशा भेसळीचे प्रमाण नगण्य आहे व म्हणून ते महाराष्ट्रातील आत्महत्यांमागचे प्रमुख कारण मानता येणार नाही. इथले प्रमुख कारण हे कापूस उत्पादनात वर्षानुवर्षे येत गेलेल्या तोट्यात आहे.

२) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांपैकी बहुतेक सर्वजण जमीनमालक शेतकरी आहेत; भूमिहीन मजूर नाहीत. तेव्हा 'आम आदमी'च्या नावाखाली 'जमीन सुधारणांचा अभाव' वगैरे 'पुरोगामी' कारणे देऊन बरेच विद्वान करतात तशी या आत्महत्यांची कारणमीमांसा करणे बाष्कळपणाचे होईल.

३) बहुतेक आत्महत्याग्रस्त शेतकरी सहकारी बँकांच्या पठाणी वसुलीने त्रस्त झालेले होते. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याने बहुतेकदा सहकारी सोसायट्यांकडून कर्ज घेतलेले असते व त्याच सर्वाधिक क्रूरपणे कर्जवसुली करतात. ग्रामीण भागात व्यापारी बँका कर्जवसुलीसाठी फारशी दांडगाई करत नाहीत; लोकांचा फार रोष ओढवून घेण्याची त्यांची मानसिकताही नसते. खासगी सावकारदेखील फारशी पठाणी वसुली करण्याची हिंमत करत नाहीत; त्यांना गावात राहायचे असते आणि पाण्यात राहून माशांशी वैर घेण्याची त्यांची हिंमत होत नाही. त्यामुळे खासगी सावकारीच्या विरोधात पुनःपुन्हा आळवले जाणारे आणि आता खूप जुने गुळगुळीत झालेले समाजवादी अवडंबर निरर्थक आहे. किंबहुना, 'सावकारांची सालटी काढू' अशी भाषा महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी केल्यामुळे अनेक गावांमधून कर्ज द्यायचा व्यवसाय करणाऱ्या सावकारांनी शेतकऱ्यांना कुठलेही कर्ज देणे बंद केले; एवढेच नव्हे, तर अशा गावांतून दुकानदारदेखील शेतकऱ्यांना उधारीवर माल देईनासे झाले. ह्यात सर्वाधिक हाल गरजू शेतकऱ्याचेच होत असतात. कर्जवसुलीकरिता मालमत्तेवर जप्ती आणणे, शेतकऱ्याला धमकावणे अशी दांडगाई प्रत्यक्षात फक्त सहकारी संस्थांच्या वसुली अधिकाऱ्यांकडून होते. आपल्या मागे राजसत्ता उभी आहे अशा खात्रीने ही सहकारी संस्थांची पदाधिकारी मंडळी कर्ज थकलेल्या शेतकऱ्यावर अनन्वित जुलूम करतात. शेतकऱ्याला सर्वाधिक जाच ह्या मंडळींकडून होत असतो.

४) कर्जबाजारी झालेला शेतकरी वर्षानुवर्षे निसर्गाशी आणि शासनाशी झगडा देत हरल्यानंतर

हताश होतो. वर्षानुवर्षे साठलेले कर्ज आणि त्यावरील व्याज यांच्या वसुलीकरिता सावकारी पद्धतीने सहकारी बँकांचे अधिकारी आले म्हणजे सर्वदूर अप्रतिष्ठा होते; हे पाहण्यापेक्षा डोळे मिटलेले बरे, या भावनेने शेतकरी शेवटी जवळच्या विषाच्या कुपीकडे वळतो. गावात होणारी स्वतःची बदनामी शेतकरी सहन करू शकत नाही.

५) कुठलाही अडचणीत सापडलेला मनुष्य त्या अडचणीतून बाहेर कसे पडता येईल याचा विचार करतो. त्याच्या मनात मरणालाच कवटाळावे असा विचार एकदम कधी येत नाही. परंतु आसपासच्या प्रदेशात समांतर परिस्थितीत सापडलेल्या कोणीतरी आपली जीवनयात्रा संपविण्याचा निर्णय घेतला असे दिसले, की मग त्यानंतर तशा परिस्थितीत सापडलेल्या सर्वांच्या मनात, निराशेच्या टोकाला गेल्यानंतर, आत्महत्येचा विचार येतो. म्हणूनच सामान्यतः आत्महत्या एकट्यादुकट्या होत नाहीत; आत्महत्यांची त्या परिसरात जणू एक साथ असते. विदर्भातील शेतकऱ्यांमध्ये ही आत्महत्येची अशीच साथ सध्या पसरलेली दिसते.

६) सर्वच शेतीमालाच्या बाबतीत उणे सबसिडी हा प्रकार आढळतो; पण कापसाच्या बाबतीत तो सर्वाधिक जाचक होता व आजही आहे. विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्याची परिस्थिती इतकी गंभीर झाली ती महाराष्ट्र शासनाने १९७१पासून राबवलेल्या एकाधिकार कापूस खरेदी योजनेमुळे. या योजनेखाली शेतकऱ्यांना मिळालेल्या किमती शेजारील मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश व गुजरात या राज्यांतील कापसाच्या किमतीपेक्षा कितीतरी कमी होत्या. त्यामुळे विदर्भातील कापूस उत्पादक दरवर्षी कर्जात अधिकाधिक बुडत गेला. या योजनेच्या काळात महाराष्ट्रातील कापूस शेतकऱ्यांचे नुकसान किती झाले याचा एक अंदाज रुपये तीस हजार कोटी रुपये इतका जातो. या योजनेने जखमी झालेल्या शेतकऱ्यांची जखम चाळीस वर्षे सडत आहे; तिथे गँगरिन झाले आहे. या आत्महत्यांचे कारण तात्कालिक संकट हे नाही; एक-दोन वर्षे पाऊस पडला नाही किंवा पीकबूड झाली म्हणून आत्महत्या करण्याइतका विदर्भातील शेतकरी घायकुता नाही. अशा संकटांची त्याला सवयच असते. सध्याच्या आत्महत्यांची लाट प्रामुख्याने कापूस एकाधिकार खरेदी योजनेने शेतकऱ्यांवर वर्षानुवर्षे घातलेले घाव चिघळल्याने आली आहे. महाराष्ट्रातील कापूस उत्पादकांच्या आत्महत्यांना कारणीभूत म्हणून एकच खलनायक शोधायचा असेल, तर महाराष्ट्र राज्य एकाधिकार कापूस खरेदी योजनेकडेच बोट दाखवावे लागेल.

ह्या परिस्थितीवर काही दीर्घकालीन व काही अगदी तातडीच्या अशा उपाययोजनादेखील जोशी सुचवतात. थोडक्यात त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे :

१) शेतकऱ्यांची सर्व थकित कर्जे बेकायदेशीर आणि अनैतिक आहेत, कारण ती मुख्यतः त्याच्या मालाला जाणूनबुजून कमी भाव दिल्यामुळे थकलेली आहेत. त्यांच्या वसुलीसाठी त्याची जमीन जप्त करणे, त्याची शेतीकामाची अवजारे, दुभती जनावरे व

मालमत्ता जप्त करणे हे सर्वथा गैर आहे. तशी कर्जवसुली बेकायदेशीर ठरवली जावी. चक्रवाढ दराने व्याज आकारणे हाही दखलपात्र गुन्हा ठरवण्यात यावा. खरे तर या सर्व जुन्या कर्जापासून त्याला मुक्त करायला हवे.

२) ज्याला शेतीव्यवसाय सोडायचा आहे त्याला आपली शेतजमीन विकता येईल आणि ज्याला शेतीव्यवसाय नव्याने सुरू करण्याची इच्छा व आर्थिक कुवत आहे त्याला तशी शेतजमीन विकत घेता येईल, अशी व्यवस्था करायला हवी. कोणीही शहरी उद्योजक एक व्यवसाय म्हणून आज शेतीकडे वळणार नाही. त्यासाठी काही कायदेही बदलावे लागतील. आज शेतजमिनीची विक्री वा खरेदी खूप किचकट बनली आहे. केवळ वाडवडलांपासून चालत आलेली घरची शेती आहे म्हणून नाइलाजाने शेती करणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. अन्य व्यवसायांप्रमाणे शेतीतही बाहेर पडायचा मार्ग (Exit Route) ठेवला तर शेतकरी आजच्याइतका अगतिक राहणार नाही. प्रचंड वाढलेला औषधोपचारांचा खर्च किंवा मुलांच्या शिक्षणाचा खर्च किंवा मुलांना टेम्पो वा रिक्षा टाकणे यांसारखा एखादा पर्यायी व्यवसाय करता यावा किंवा नोकरी करता यावी, यासाठी करायचा खर्च वगैरेंचे आकडे आज फार मोठे आहेत. मुख्यतः त्यासाठी कर्ज काढावे लागते आणि ते फेडणे अशक्य होऊन बसते. त्याच्या अगतिकपणाच्या भावनेतूनच आत्महत्येचा पर्याय पुढे येतो. ती अगतिकता दूर करायची असेल, तर त्याच्यापुढे अर्थार्जनाचे शक्य कोटीतले व त्याला झेपणारे पर्यायही उपलब्ध व्हायला हवेत. आज शेतकऱ्यांपुढे ते पर्याय आढळत नाहीत. 'या नरकातून आपण सुटूच शकत नाही' या भावनेने तो अधिकच खचून जातो.

३) मरणाच्या सीमेवर पोचलेल्या शेतकऱ्याचा आक्रोश ऐकला जाण्याची काहीतरी व्यवस्था केली पाहिजे. उदाहरणार्थ, प्रत्येक तालुक्यात हेल्पलाइन सुरू करावी. वेगवेगळ्या मानसशास्त्रज्ञांनी आत्महत्या ह्या प्रकाराचा भरपूर अभ्यास केला आहे. त्यांनी काढलेला एक निष्कर्ष असा आहे, की आत्महत्या करण्याची ऊर्मी ही क्षणिक असते. माणसाला क्षणभर आलेल्या विफलतेच्या भरात तो काय वाटेल ते करून जातो. पण तो विशिष्ट क्षण जर का कोणत्याही कारणाने आणि कोणत्याही पद्धतीने टाळता आला, तर आत्महत्या टळू शकते.

४) शेतकऱ्याचा आत्मसन्मान जागृत करणे हा आत्महत्या थांबवण्याचा सर्वांत महत्वाचा उपाय आहे. त्यासाठी त्याला सबसिडीच्या बेड्यांत जखडून टाकणे हा उपाय नाही; त्याच्या मालाला वाजवी भाव मिळेल अशी यंत्रणा उभी करणे हे सर्वांत महत्त्वाचे आहे. तो शेतीत खचत गेला ह्याला इतर कोणत्याही कारणापेक्षा सातत्याने दिला गेलेला कमी भाव व त्याद्वारे पिढ्यानुपिढ्या झालेली सरकारी पिळवणूक हे सर्वाधिक मोठे कारण आहे. ती पिळवणूक थांबवावी म्हणून लढा उभारण्यासाठी त्याचे आत्मबळ वाढवायला हवे. सगळ्या शेतकऱ्यांनी मिळून जर अशी प्रतिज्ञा केली की, 'आम्ही बुडालो ते

आमच्या चुकीमुळे नव्हे आणि या आक्रमणाला आम्ही सर्व मिळून एकत्र तोंड देऊ, खचून जाणार नाही' तर शेतकऱ्यांना याही प्रसंगातून तगून जाण्याकरिता जे सामर्थ्य हवे ते मिळू शकेल असे मला वाटते.

जोशींच्या मते तसे सगळ्याच शेतीमालाचे शोषण होते, पण कापसाचे शोषण त्या सर्वांत विशेष क्रूर आहे. मनुष्याच्या अन्नपाण्याची एकदा सोय लागली, की त्याची सर्वांत मोठी गरज अंगभर वस्त्राची असते. साहजिकच पहिली कारखानदारी उभी राहिली ती कापड गिरण्यांची आणि सर्वांत जास्त शोषण झाले ते कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याचे. इंग्रजांच्या साम्राज्याचे मूळ उद्दिष्ट कापसाच्या शोषणाचे होते. गांधीजींनी त्याविरुद्ध लढा उभा केला तो चरख्याची निशाणी घेऊन आणि खादीचा कार्यक्रम घेऊन. या एकाच गोष्टीत सगळे कापसाचे राजकारण आणि तत्त्वज्ञान सामावलेले आहे. १९४७ साली गोरा इंग्रज गेला, पण त्या जागी काळा इंग्रज आला; शेतकऱ्यांचे शोषण चालूच राहिले.

कापसाचा भाव बुडवण्यासाठी सरकारने काय काय नाही केले? निर्यातीवर जवळजवळ कायम बंदी ठेवली. जरा काही शेतकऱ्यांना बरा भाव मिळेल असे दिसले, की बाहेरून कापूस आणायची मात्र तत्परतेने व्यवस्था केली व देशांतर्गत कापसाचे भाव पाडले; शेतकऱ्यांच्या तोंडचा घास पळवला. हे सगळे करताना त्यांनी आपण हातमागधारकांचे हितरक्षण करतो आहोत असा आव आणला. हातमागधारकांची एकूण सगळी गरजच मुळी केवळ चार लाख गाठींची होती. त्यांना तेवढा कापूस स्वस्त मिळावा, याकरिता कितीतरी अधिक सुटसुटीत व्यवस्था करता आली असती; पण त्यांना त्यांची चार लाख गाठी रुई स्वस्त द्यायचा बहाणा करत, त्याच्या पंचवीसपट असलेला १०० लाख गाठींचा बाजार शासनाने वर्षानुवर्षे उद्ध्वस्त केला.

जोशी म्हणतात, ''जखमांमधून वाहणारे रक्त थांबावे म्हणून कापूस लावला जातो, पण शेतीच्या कापसातून वर्षानुवर्षे रक्त वाहतच राहिले आहे.''

शेतकरी संघटनेचे काम सर्व महाराष्ट्रभर पसरले ते कापूस आंदोलनामुळे. कांदा, ऊस, तंबाखू ही त्यामानाने छोटी पिके; कापसाचे क्षेत्र मात्र खूप विशाल. जवळ जवळ सगळा विदर्भ आणि बराचसा मराठवाडा व्यापणारे. कापसावर अवलंबून असणाऱ्या शेतकरी कुटुंबांची संख्याही खूप मोठी. शेतकरी संघटनेच्या सभांना होणारी सर्वाधिक गर्दी कापूस शेतकऱ्यांची असे आणि संघटनेचे सर्वाधिक कार्यकर्तेदेखील कापूसक्षेत्रातून आले. शरद जोशींच्या आयुष्यातील आंदोलनपर्वाचा मोठा हिस्सा कापसाने व्यापलेला आहे.

■

# ९

# शेतकरी संघटना – तत्त्वज्ञान आणि उभारणी

चाकणचे कांदा आंदोलन व नंतर नाशिकचे ऊस आंदोलन यांचा अनुभव गाठीशी आल्यानंतर शेतकरी संघटना बळकट पायावर उभी करण्याची गरज जोशींना भासू लागली. त्या दृष्टीने निपाणीच्या तंबाखू आंदोलनापूर्वीच त्यांनी आपल्या निवडक कार्यकर्त्यांची तीन शिबिरे घेतली होती. पहिले शिबिर एप्रिल १९८० मध्ये आळंदीला झाले होते. ऊस आंदोलनाबद्दल लिहिताना मागे त्याचा उल्लेख झालाच आहे.

दुसरे शिबिर वर्धा येथे १ जानेवारी १९८१ रोजी झाले. त्याला १०० कार्यकर्ते हजर होते. ते शिबिर भरवण्यात विदर्भातील संघटनेचे नेते विजय जावंधिया आणि रवी काशीकर यांचा विशेष पुढाकार होता. अर्थशास्त्र, संघटना आणि आंदोलन ह्या तीन विषयांची इथे चर्चा झाली. चर्चेचे ध्वनिमुद्रण केले गेले होते व या कॅसेट्स सावकाश ऐकत त्यांचे शब्दांकन करायचे क्लिष्ट काम लीलाताई जोशी यांनी स्वतः सुरू केले होते. दुर्दैवाने ते पूर्ण होण्यापूर्वीच लीलाताई हे जग अकालीच सोडून गेल्या होत्या. पुढे अलिबागचे प्रा. सुरेश घाटे (अ. वा. कुळकर्णी आणि सुरेशचंद्र म्हात्रे यांचे एक सहकारी) यांनी ते पूर्ण केले व *भारतीय शेतीची पराधीनता* या शीर्षकाखालील एका ४०-पानी पुस्तिकेच्या स्वरूपात त्याचे मुद्रणही केले. ती पुस्तिका घाटे यांनी लीलाताईंच्या स्मृतीलाच अर्पण केली होती. या शिबिरातील चर्चा शिबिरार्थींना खूप उपयुक्त वाटली होती, पण त्याचवेळी काहीशी अपुरीही वाटली होती. मुख्य म्हणजे शिबिरासाठी एकूण वेळ खूप कमी पडला होता.

त्यामुळे मग निवडक ५० कार्यकर्त्यांसाठी तिसरे शिबिर बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे २६ व २७ फेब्रुवारी १९८१ रोजी घेतले गेले. विषयाची अधिक बारकाईने चर्चा करणे व त्यातून कार्यकर्त्यांची बौद्धिक पूर्वपीठिका तयार करणे हा त्यामागचा उद्देश होता. मोरेवाडीचे श्रीरंगनाना मोरे ह्यांच्या साहाय्याने हे तिसरे शिबीर घेतले गेले. श्रीरंगनाना हे शेतकरी चळवळीत खरेतर शरद जोशी यांच्या आगमनापूर्वीच सक्रिय होते. शेतकऱ्यांसाठी ते *भूमिसेवक* नावाचे एक पाक्षिकही चालवत असत. त्यांनीच ह्या शिबिरासाठी सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या. ह्या शिबिरातील सर्व चर्चेचेदेखील ध्वनिमुद्रण केले गेले होते, पण ते शब्दबद्ध करायचे काम मात्र कोणी केले नव्हते; त्या कॅसेट्स तशाच पडून होत्या.

२० सप्टेंबर १९८१ रोजी पिंपळगाव बसवंत येथे भरलेल्या विराट विजय मेळाव्यात

जोशी म्हणाले होते,

''तुमची शेतकरी संघटनेवरील भक्ती, मी तुम्हाला सांगेन ती युक्ती आणि मागच्या आंदोलनात प्रत्ययाला आलेली शेतकऱ्यांची शक्ती यांचा समन्वय येत्या तीन वर्षांत होऊ द्या आणि मग चमत्कार पाहा – भक्ती-युक्ती-शक्ती आणि तीन वर्षांत मुक्ती!''

या मेळाव्याचा पाठपुरावा म्हणून १० नोव्हेंबर १९८१ रोजी एक महाराष्ट्रव्यापी आंदोलन आयोजित केले गेले. त्याच सुमारास 'कृषी योगक्षेम संशोधन न्यास' स्थापन केला गेला. शरद जोशी, माधवराव खंडेराव मोरे व प्रल्हाद कराड पाटील ही नाशिक आंदोलनातील त्रिमूर्तीच ह्या न्यासाची विश्वस्त होती. त्यातून आपल्या कार्यकर्त्यांना दरमहा निदान ३०० रुपये मानधन द्यायचे ठरले. (प्रत्यक्षात ते अगदी थोड्या कार्यकर्त्यांना व तेही थोडेच महिने देता आले.)

१, २ व ३ जानेवारी १९८२ रोजी सटाणा इथे शेतकरी संघटनेचे पहिले अधिवेशन भरले होते. पिंपळगाव मेळाव्यातच अशा अधिवेशनाची घोषणा झाली होती व ते बागलाण तालुक्यातील मांगी तुंगी येथे २१-२२-२३ ऑक्टोबर १९८१ रोजी भरणार होते; पण नोव्हेंबरमधील आंदोलनाला वेळ मिळावा म्हणून अधिवेशन थोडे पुढे ढकलले गेले व जागाही मांगी तुंगीऐवजी अधिक सोयीची अशी सटाणा ही ठरली. या अधिवेशनाला प्रत्येकी पंधरा रुपये प्रतिनिधिशुल्क भरून साऱ्या महाराष्ट्रातून ३०,००० शेतकरी स्वतःच्या खर्चाने व आपापली शिदोरी बांधून आणून सामील झाले होते. मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, आंध्र प्रदेश, हरयाणा व पंजाब येथूनही काही वेगवेगळ्या शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी हजर होते. १ जानेवारीला सकाळी दहा वाजता सुरू झालेले हे अधिवेशन तीन तारखेला दुपारी एक वाजता संपले. शेवटच्या सत्रानंतर त्याच जागी खुले अधिवेशन झाले व त्याला तीन लाख शेतकरी स्त्री-पुरुष हजर होते.

ऊस आंदोलनातील यशामुळे ऊस शेतकऱ्यांना एका टनाला ३०० रुपये हा वाढीव भाव मिळाला होता. इतकी वर्षे मिळत असलेल्या भावाच्या हा दुप्पट होता. त्यामुळे बाजारपेठेतील उलाढाल एकदम खूप वाढली होती. बँकांची-सोसायट्यांची कर्जे फिटायला लागली होती, व्यापाऱ्यांनीही बुडीत खाती टाकलेली देणी शेतकऱ्यांनी आपणहून जाऊन फेडली. शेतमजुरांचे वेतनही जवळपास दुप्पट झाले होते. साहजिकच सगळे खूप आनंदात होते. एकजुटीचे महत्त्व त्यांना पटले होते. आपले भाग्य आपण आंदोलनातून पालटू शकतो हा आत्मविश्वास त्यांच्या ठायी प्रथमच निर्माण झाला होता. आंदोलनाला थोडेफार संघटनात्मक स्वरूप प्राप्त करून द्यायची गरज ह्या सटाणा अधिवेशनात प्रकर्षाने जाणवली.

वर्धा येथील प्रशिक्षण शिबिरात जोशी म्हणाले होते, ''आपलं आंदोलन नवीन आहे, नव्या पिढीने ते समजून घेतलं पाहिजे. प्रत्येक वेळी नवं आंदोलन सुरू झालं, की जुने सरदार, मनसबदार हे बाजूला पडतात. त्यांचा उपयोग राहत नाही. पहिल्या बाजीरावाच्या वेळी त्याला शिंदे-होळकर नवीन तयार करावे लागले. शिवाजीलाही जुन्या मनसबदार-देशमुखांनी मदत केली नाही; नवे सरदारच त्याला तयार करावे लागले. हे प्रत्येक वेळी घडतं आणि आज

आपले नवे सरदार सगळे या नव्या पिढीतून येणार आहेत.''

प्रशिक्षण शिबिरातील भाषणांच्या शब्दांकनाचे एखादे पुस्तक व्हावे असे म्हात्रे यांचे म्हणणे होते व 'आंदोलनासाठी नवे सरदार' घडवण्याच्या संदर्भात हे प्रस्तावित पुस्तक महत्त्वाचे ठरू शकेल हेही जोशींना जाणवले. फेब्रुवारी १९८२मध्ये, जोशी यांनी रायगड जिल्ह्यातील पेण व अलिबाग तालुक्यांचा दौरा केला त्यावेळी, अंबाजोगाईच्या त्या कॅसेट्स नकलून काढण्यासाठी त्यांनी एकदाच्या म्हात्रेंकडे दिल्या. पुढे म्हात्रेंनी निगुतीने पूर्णत्वाला नेलेले त्याचे मुद्रित रूप म्हणजेच *शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती* हे पुस्तक.

संघटनेमागचा विचार, तिचे उद्दिष्ट, तिचे स्वरूप, तिचा प्रसार, तिच्या उभारणीतील अडचणी व त्यावरील मार्ग, तिची आंदोलने, तिचे टीकाकार, काळाच्या संदर्भातील तिचे महत्त्व, तिच्या मर्यादा वगैरे अनेक महत्त्वाच्या पैलूंवरील शरद जोशींच्या विचारांचे हे शब्दरूप आहे. ह्या विचारांची समग्रतेने मांडणी करणारे दुसरे कुठलेही पुस्तक त्याकाळात उपलब्ध नव्हते व आजही नाही. ह्या पुस्तकात घालून दिलेली विचारांची बैठक आजही बहुतांशी कायम आहे. 'शेतकरी संघटनेची गीता' असेच ह्या पुस्तकाबद्दल म्हणता येईल.

पुस्तकात लिहिल्याप्रमाणे शिबिराच्या सुरुवातीलाच जोशी आपल्या पूर्वसुरींचे ऋण मनमोकळेपणे मान्य करतात. 'पहिल्या घावाने वृक्ष कोसळताना दिसत नाही, शंभराव्या घावाने तो कोसळतो; पण प्रत्यक्षात शंभरावा घाव जितका मारतो तितकाच पहिला घावही मारतो,' ह्या विनोबांच्या मताशी जोशी सहमत आहेत असे दिसते. कार्यकर्त्यांना ते सांगतात :

''महाराष्ट्रातलं जुन्यातलं जुनं शेतकरी आंदोलन म्हणजे तंट्या भिल्लाचं आंदोलन. त्याकाळी कुळांवरील अन्याय फार असह्य झाले होते. सावकारी पाश भयानक झाले होते. रयतेला काय करावं सुचेनासं झालं होतं. त्यावेळी खूप चिडलेल्या तंट्या भिल्लाने सावकार व व्यापारी यांच्या घरांवर दरोडे घालायला सुरुवात केली. शेतकऱ्यांच्या पिळवणुकीचा प्रश्न अशा तऱ्हेने मांडणारा हा दरोडेखोर जेव्हा हैद्राबाद राज्यात पकडला गेला, तेव्हा त्याला इतर दरोडेखोरांप्रमाणे फाशी दिलं गेलं नाही; एका खड्ड्यात चुन्याची कळी घालून, त्यात तंट्याला ठेवून, वरून पाणी ओतलं गेलं. कारण राज्यकर्त्यांनी ओळखलं होतं, की हा साधासुधा दरोडेखोर नसून शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न तो मांडतो आहे.

''१८५७च्या स्वातंत्र्यसमरानंतर चारपाच वर्षांत शेतकऱ्यांचं एक महत्त्वाचं आंदोलन इथे महाराष्ट्रात झालं. १८६१ साली, म्हणजे जवळजवळ सव्वाशे वर्षांपूर्वी, तीन हजार शेतकऱ्यांना अटक झाली होती. वासुदेव बळवंत फडके, जोतीबा फुले यांनीही शेतकऱ्यांच्या दारिद्र्यावर विचार मांडले. आपण तेच विचार नव्या भाषेत मांडत आहोत. स्वातंत्र्याआधी व नंतर कूळकायदे झाले त्याची चळवळ, स्वातंत्र्यानंतरची सहकारी चळवळ या सर्व चळवळींनी आपलं एकेक पाउल पुढे टाकलं. लहान मूल जसं सुरुवातीला पडतपडत चालायला शिकतं, तसंच शेतकऱ्यांनी जो आधार सापडला तो पकडत पकडत पुढे जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्हीच काय ते जागृती करणारे अशा तऱ्हेचा अहंकार कार्यकर्त्यांनी बाळगू नये.''

डॉक्टर दत्तप्रसाद दाभोळकर व डॉक्टर नरेन्द्र दाभोलकर यांचे मोठे बंधू चारुदत्त दाभोळकर ह्यांचा इथे आवर्जून उल्लेख करायला हवा. भारतात शेतीविषयात पदवी घेतल्यावर ते पशुसंवर्धन ह्या विषयाच्या उच्चशिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तिथे शिकत असताना १९५४ साली, म्हणजे वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी, त्यांनी 'महाराष्ट्रातील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना' हे पुस्तक लिहिले व वाईच्या प्राज्ञ पाठशाळेने ते सात वर्षांनंतर, म्हणजे १९६१ मध्ये प्रकाशित केले. महाराष्ट्राचे तत्कालीन अन्नमंत्री पी. के. सावंत यांची त्याला प्रस्तावना आहे. 'महाराष्ट्रातील शेतीत उतरत्या नफ्याचा नियम (Law of diminishing returns) थैमान घालतोय, इथला शेतकरी फक्त जिवंत राहाण्यापुरतीच शेती (survival farming) करतो, जास्त पीक काढले तर आपलाच तोटा अधिक वाढतो हे त्याच्या लक्षात आले आहे, पूर्वापार हेच चालत आल्याने ते त्याच्या अंगवळणी पडले आहे, शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव दिला तर तो नक्कीच अधिक धान्य पिकवेल आणि तसे झाले तर महाराष्ट्रातील दुष्काळ लगेच संपेल; मुळात दुष्काळाचा प्रश्न हा तांत्रिक नसून आर्थिक आहे,' हे त्यांनी पुस्तकात साधार दाखवून दिले आहे. जोशींनी हे पुस्तक पूर्वी वाचले नव्हते; दत्तप्रसाद दाभोळकरांनी ते त्यांच्याकडे पाठवले. ते वाचल्यावर भरलेल्या वर्ध्याच्या शिबिरात जोशींनी ह्या पुस्तकाचे कौतुकही केले होते. खूप नंतर, २००५ साली, जोशींनी दत्तप्रसाद दाभोळकरांना पत्र लिहून कळवले,

> शेतीमालाला रास्त भाव मिळायला हवा व तेच आपल्या दारिद्र्यावर एकमेव उत्तर आहे असे शेतकरी संघटना मानते. पण माझ्या आधी पंचवीस वर्षे तुमच्या भावाने हाच मुद्दा ह्या पुस्तकात अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडलेला आहे.

आपले कांदा आणि उसाचे आंदोलन यशस्वी झाले ह्यामागे आपल्या संघटनेच्या कर्तृत्वाप्रमाणेच आंदोलनाची सध्याची वेळ हेही एक महत्त्वाचे कारण आहे, ह्याची स्पष्ट जाणीव जोशींना आहे. ते म्हणतात,

''आपण १९८० साली आपलं आंदोलन चालू केलं हे भाग्य! कारण ८०ऐवजी ७५ साली आपण आंदोलन सुरू केलं असतं, तर इतकं यश मिळालं नसतं. ऐंशी साल दोन प्रमुख दृष्टींनी महत्त्वाचं आहे. एक म्हणजे १९७७ सालापर्यंत देशात सर्व धान्यं, कडधान्यं आणि इतर शेतीमाल यांचा तुटवडा होता. त्यावेळी जास्त पीक आलं, की जास्त पैसा हाती लागत असे. पण ७७ सालापर्यंत हरित क्रांतीची फळं लोकांपर्यंत पोचली होती. शेतकरी अधिक उत्पादन काढू लागले होते. त्यामुळे शेतीमालाची मुबलकता निर्माण झाली. मालाचा उठाव होईना. विकण्याची चिंता शेतकऱ्यांना भेडसावू लागली. भाव गडगडले. जास्त पीक आलं, तर पदरी तोटा अशी परिस्थिती ८० साली प्रथमच निर्माण झाली.

''आंदोलन इतकं यशस्वी व्हायचं दुसरं कारण म्हणजे राजकीय परिस्थिती. ७५ सालातील आणीबाणी, ७७ सालात निवडणुका, त्यानंतर पुन्हा निवडणुका, यामुळे एक पक्ष सत्तेवरून जाऊन दुसरा येणं आणि अल्पावधीत पुन्हा पहिलाच पक्ष सत्तेवर येणं, त्याचबरोबर

पुढाऱ्यांच्या पक्षोपपक्षातील कोलांट्या उड्या यामुळे सामान्य जनतेच्या मनात सर्व राजकीय पक्षांविषयी निराशा निर्माण झाली, घृणा निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर आज आपण 'स्वातंत्र्यानंतरची गेली ३३ वर्षं शासन शेतकऱ्यांना फसवत आलं आहे' हा आपला विचार ताठ मानेने, जोरजोराने शेतकऱ्यांपुढे मांडतो. ते ऐकतात आणि टाळ्या वाजवतात. पण ७५ साली अशी निराशा नव्हती. तेव्हा जर आपण असं बोललो असतो, तर कदाचित लोकांनी ऐकून घेतलं नसतं.''

शेकडो पुस्तके वाचून जे कधीच समजले नसते ते जोशींना अनुभव शिकवत गेला. शेती करता करता आणि येत असलेल्या अनुभवांची त्याचवेळी आपल्या मनात छाननी करता करता हळूहळू जोशींची खात्री पटली, की सरकारने विकासासाठी जे रशियन धाटणीचे समाजवादी प्रतिमान समोर ठेवले आहे त्या प्रतिमानात जाणूनबुजून शेतीमालाची किंमत अतिशय कमी ठेवली आहे; बियाणे-खते-औषधे-वीज-पाणी-वाहतूक-मजुरी असे अगणित आणि सतत वाढणारे खर्च भागवता भागवता शेतकरी कायम तोट्यातच राहतो; शेतीमालाच्या अपुऱ्या किमती हेच आपले खरे दुखणे आहे; शेतकऱ्याला त्याच्या श्रमांचे उचित दाम मिळाले तर त्याला अन्य कुठल्याही धर्मादायाची वा अनुदानाची भविष्यात गरज राहणार नाही; त्याचे आजचे लाचारीचे जिणे संपेल. त्यातूनच 'शेतीमालाला रास्त भाव' हा एक-कलमी कार्यक्रम त्यांच्या मनात तयार झाला.

ह्या कार्यक्रमाच्या समर्थनार्थ व्यापक वैचारिक अधिष्ठान तयार करता करता जोशींनी एकूणच मानवी इतिहासाची एक आगळी अशी मांडणी केली. ही मांडणी शेतकरी आंदोलनाच्या काळात पूर्णत्वाला गेली असली, तरी बीजरूपाने ती त्यांच्या मनात खूप पूर्वीपासूनच – अगदी कोल्हापूरमधल्या प्राध्यापकी दिवसांपासूनच – रुजली असावी. मुख्यतः त्यांच्याच शब्दांत ती साधारण पुढीलप्रमाणे आहे :

शेतीचा शोध ही एक फार मोठी क्रांती होती. पंचमहाभूतांच्या लक्षावधी वर्षांच्या साठलेल्या ऊर्जा माणसाच्या श्रमांचा स्पर्श होताच गुणाकार करीत फळाला येतात. एका दाण्यातून शंभर दाणे तयार होण्याचा चमत्कार शेतीतच होतो. उपभोग्य वस्तूंचा गुणाकार करणारा हा एकमेव व्यवसाय. व्यापार, वाहतूक, कारखानदारी यांसारख्या अन्य कुठल्याही व्यवसायात हे घडत नाही. तिथे फक्त वस्तूंची देवाणघेवाण होते, देवघेवीच्या मूल्याची (exchange valueची) वृद्धी होते. ज्या दिवशी हा गुणाकार माणसाच्या लक्षात आला, त्या दिवसापासून संस्कृतीची रुजवात व्हायला सुरुवात झाली.

जगातील पहिला व्यवसाय शेती हाच आहे. प्रकृती आणि माणूस एकत्र आल्यानंतर केव्हातरी दहा-बारा हजार वर्षांपूर्वी तो निर्माण झाला. हळूहळू अन्न शिजवायचा शोध लागला. खाण्यापिण्याची रेलचेल झाली. बायबलमध्ये वर्णन केलेल्या इडन गार्डनप्रमाणे स्वर्गसदृश परिस्थिती तयार झाली. मानवी समाजाला प्रथमतः स्थैर्य प्राप्त झाले; शिकार करण्यासाठी वा

झाडांवरची फळे गोळा करण्यासाठी रानोमाळ भटकण्याची त्याची गरज संपुष्टात आली. काही जण इतरही उद्योग करू शकतात हे हळूहळू जाणवू लागले. वेगवेगळी साधने निर्माण करण्यासाठी, त्यांचा वापर करून आपले राहणीमान सुधारण्यासाठी त्याला वेळ मिळू लागला. त्यातून अन्नाव्यतिरिक्त असलेल्या घर, वस्त्रे वगैरे गरजा भागतील असे संशोधन सुरू झाले, त्यातही यश येऊ लागले. अग्नीचा, चाकाचा शोध लागला, हत्यारे तयार होऊ लागली, लाकूडकाम व धातूकाम अवगत झाले.

एका जागी घर बांधून राहणे, जमिनीच्या विशिष्ट तुकड्याविषयी मनात आपलेपणा निर्माण होणे ह्या स्वाभाविक अशा पुढच्या पायऱ्या होत्या. निखळ आनंद मिळवण्यासाठीही अनेक गोष्टी करता येतात याची जाणीव झाली. निसर्गाचे निरीक्षण करणे, जीवनविषयक चिंतन करणे यांसाठीही निवांतपणा मिळू लागला. त्यातूनच पुढे कुटुंबव्यवस्था उदयाला आली. त्यातूनच पुढे साहित्य, संगीत, नृत्य, स्थापत्य, चित्रकला, निसर्गभान, कालगणना, विज्ञान, तंत्रज्ञान यांचा विकास होत गेला. आपल्या मेंदूचा अधिकाधिक उपयोग करून आपले जीवन अधिकाधिक विकसित करण्याचा तो प्रयास करू लागला.

आपले एकमेकांशी असलेले नाते, परस्परप्रेमाची भावना, सहकार्याचे लाभ वगैरेंचे त्याचे भान अधिकाधिक सजग होत गेले. त्याचा मानसिक विकासही होत गेला. हा विकास फक्त ऐहिक वा भावनिक बाबतीत घडला असे नव्हते; हे जग कसे बनले असेल, त्यामागे ईश्वरासारखी कोणी शक्ती असेल का, ह्या ईश्वराचे स्वरूप काय असेल, मृत्यू म्हणजे काय, माणूस मेल्यानंतर काय होते वगैरे असंख्य आध्यात्मिक विषयांचे चिंतनही करणे त्याला शेतीतून मिळालेल्या तुलनात्मक स्वास्थ्यानंतरच शक्य झाले. थोडक्यात म्हणजे, तो सुसंस्कृत बनायला सुरुवात झाली. विकासाचे एक स्वयंप्रेरित चक्र फिरू लागले. हा निसर्गक्रम असाच सुरू राहिला असता, तर सगळीकडे आबादीआबाद झाली असती.

दुर्दैवाने मनुष्यस्वभाव विचित्र आहे. स्वतः कष्ट करून शेती करण्यापेक्षा, दुसऱ्या कोणी कष्ट करून पिकवलेले धान्य दांडगाई करून पळवून नेणे अधिक सोपे आहे असा विचार काही जण करू लागले. शेतीतली लूट सुरू झाली. सुरुवातीला ही लूट करणारे म्हणजे भुरटे चोर होते. हळूहळू तेही आपल्या चोरीच्या कामात पारंगत होत गेले; भुरट्या चोरीपासून सशस्त्र दरोड्यापर्यंत त्यांनी प्रगती केली. धान्य पिकवणारे बैल वापरत होते, तर धान्य लुटणाऱ्यानी अधिक सक्षम असा घोडा वापरायला सुरुवात केली. मग तर काय, लुटारूंची चंगळच झाली. लांब लांब जाऊन लूट करणे शक्य झाले.

ही लूट करणाऱ्यांनी कधी धनुष्यबाण वापरले तर कधी तलवार, कधी बंदुका तर कधी तोफा. कधी ते घोड्यावरून आले तर कधी रणगाड्यातून. कधी जिरेटोप घालून आले, कधी मुकुट वा हॅट घालून तर कधी गांधी टोपी घालून. पण आले ते शेतकऱ्याला लुटण्याकरिताच.

काळाच्या ओघात या लुटणाऱ्यांच्या टोळ्या बनत गेल्या, त्या अधिकाधिक मोठ्या व ताकदवान होत गेल्या. त्यांतूनच काही टोळ्यांचे नायक सरदार बनले, काही त्याहून मोठे होत राजे बनले, काही त्याहूनही मोठे होत सम्राट बनले.

स्वतःच्या लूटमारीचे समर्थन करणारे तत्त्वज्ञान तयार होऊ लागले. सत्ताधाऱ्यांची सोय होईल अशी तात्त्विक मांडणी करणारे काही बुद्धिमान त्याकाळीही होतेच. त्यातूनच मग लूट केल्याने पाप लागत नाही, उलट देव खूष होतो, अशी मांडणी करणारी दर्शनेही तयार होत गेली. इतिहासात आपण वेगवेगळ्या मोहिमांविषयी वाचतो, सीमोल्लंघन करणे वगैरे शब्दप्रयोग करतो; पण प्रत्यक्षात त्या साऱ्याचा अर्थ लुटीसाठी बाहेर पडणे हाच असायचा.

पुढे मग सगळाच्या सगळा शेतीमाल लुटून नेण्याऐवजी खंडणी म्हणून काही रक्कम वसूल करायला सुरुवात झाली; आज जसे काही गुंड आपापल्या विभागातून हप्ते गोळा करतात त्याप्रमाणे!

पुढे लोकसंख्या वाढत गेली; इतक्या मोठ्या समुदायाकडून खंडणी गोळा करणे अवघड होत गेले. म्हणून मग शेतकऱ्यांनी स्वतःहून सत्ताधाऱ्यांकडे शेतसारा भरणे हा प्रकार सुरू झाला. सगळी वसुली स्वतः करणे अशक्य होते, म्हणून मग सम्राटांनी आपल्या मांडलिक राजांना आणि त्यांनी छोट्या-मोठ्या सरदारांना आपापल्या छोट्या-मोठ्या इलाख्यात सारावसुलीची मक्तेदारी दिली. 'लुटीचा आमचा ठरावीक हिस्सा आम्हांला पोचता करा; बाकी तुमच्याकडे ठेवा. त्या बदल्यात इतर कोणी तुमच्यावर आक्रमण केले, तर आम्ही तुमचे रक्षण करू,' हा प्रकार सुरू झाला! हाही एक प्रकारचा 'प्रोटेक्शन मनी' होता! त्या शेतसाऱ्यालाच मग सार्वत्रिक करआकारणीचे स्वरूप आले, अधिकाधिक खिशांतून अधिकाधिक पैसा सत्ताधाऱ्यांकडे जमा होऊ लागला.

लुटीचे मार्गही हळूहळू बदलत गेले. पूर्वीप्रमाणे रक्तपात करून लूट करायची आता गरज राहिली नाही; रक्तपातात स्वतःचेही नुकसान होतच असे; त्याऐवजी व्यापारातून लूट करायचे तंत्र निर्माण झाले – मान पिरगळून कोंबडी मारून टाकण्यापेक्षा रोजचे अंडे मिळवायचे. या तंत्रात कमीत कमी श्रमांत जास्तीत जास्त लूट करण्याची सोय होती. सत्ताधारी वर्गाला सर्वांत जास्त लूट करायची संधी होती. सत्तेवर आल्यामुळे त्यांच्या लुटीला सातत्य मिळाले. त्यातूनच राज्यसंस्था अधिकाधिक बळकट होत गेली.

अशाप्रकारे जोशींच्या मते आजपर्यंतच्या इतिहासाची खरी प्रेरणा ही शेतीमध्ये होणारा गुणाकार लुटण्याची आहे. वेगवेगळ्या कालखंडांत लुटण्याची वेगवेगळी साधने वापरली केली – दरोडेखोरी, सैन्याने केलेली लूट, राजेरजवाडे वसूल करत असलेला महसूल, गुलामगिरी, वेठबिगारी, वसाहतवाद, उद्योगक्षेत्र करत असलेले कच्च्या मालाचे शोषण इत्यादी; पण मुळात ती लूटच होती. सर्व समाजाचा इतिहास हा शेतीला लुटण्याच्या अशा साधनांचा इतिहास आहे.

भारतीय इतिहासाचीही एक अभिनव अशी, आपल्या उपरोक्त आकलनाला पुष्टी देणारी अशी, मांडणी जोशींनी केली. जनमानसात स्थिरावलेल्या अनेक कल्पनांना हादरवून सोडेल, अशीच ही मांडणी आहे. जोशी लिहितात :

एक फार मोठे कोडे इतिहास वाचताना मला पडते. देवगिरीचे एवढे बलाढ्य राज्य, पण मुसलमान फौजा अगदी बिनधास्त गडाच्या पायथ्यापर्यंत येऊन पोचल्या कशा? महाराष्ट्राच्या मध्यकेंद्रापर्यंत पोचण्याच्या आधी या परकी सैन्याला वाटेवरच्या शेतकऱ्यांनी, जनसामान्यांनी काहीच विरोध केला नाही? बरे, शत्रूच्या फौजा किल्ल्यापाशी येऊन पोहोचल्यानंतरही वेढ्याच्या बाहेरच्या लोकांनी वेढ्याची कुतरओढ का केली नाही?

इतिहासात जागोजागी वाचावे लागते, की रजपूत व मराठा सैन्य शिकस्तीने लढले, पण अखेरीस शत्रूच्या प्रचंड संख्याबळापुढे त्यांचे काही चालले नाही. मोगल हजारो मैलांवरून इथे आलेले; त्यांची संख्येची ताकद स्थानिक राजांच्या त्यांच्या स्वतःच्या प्रदेशातील ताकदीपेक्षा जास्त कशी राहिली?

हे कोडे अनेकांनी मांडले आहे, अगदी १८५३ साली मार्क्सने एंगल्सला लिहिलेल्या पत्रांतही ते मांडले आहे. भारतातील गावगाड्याबद्दल मार्क्स लिहितो, 'खेड्यात राहणाऱ्यांना राज्ये फुटली-मोडली याचे काहीच सुखदुःख नाही. खेड्याला धक्का लागला नाही, तर राज्य कोणत्या राजाकडे जाते, कोणत्या सुलतानाची त्याच्यावर सत्ता चालते, याची त्यांना काहीच चिंता नसते; गावगाडा अबाधित चालत राहतो.'

शूद्रातिशूद्रांचा राणा जोतीबा फुले यांनी मुसलमानी आक्रमणाला सरळ 'विमोचन' असा शब्द वापरून गावातील सर्वसामान्यांची भावना व्यक्त केली आहे. इंग्रजांची राजवट आल्यानंतरही, 'सामाजिक प्रगतीला नि क्रांतीला प्रतिकूल ठरलेल्या ब्राह्मणी राज्यापेक्षा इंग्रज राज्य परवडले. नानासाहेब पेशवे यशस्वी झाले असते, तर ब्राह्मणांचे जातिश्रेष्ठत्व मानणारे, अन्यायी नि प्रतिगामी ब्राह्मणी राज्य पुन्हा महाराष्ट्रात आले असते,' अशी त्यांना भीती वाटत होती.

जोतीबांची भावना हीच देवगिरीच्या आसपासच्या कुणब्या-शूद्रांची भावना असली पाहिजे. हीच भावना सर्वसाधारण प्रजेची त्यांच्या जवळच्या गढीत किंवा किल्ल्यावर राहणाऱ्या तथाकथित देशबांधव स्वधर्मीय सरदार-राजांबद्दल असली पाहिजे. रामदेवराय आणि अल्लाउद्दीन यांत फरक एवढाच, की पहिला दरवर्षी उभी पिके हक्काने काढून नेई, तर दुसरा कधी तरी एकदा येणार. रामदेवरायाच्या पराभवात प्रजेला थोडेतरी सुडाचे समाधान मिळत असले पाहिजे. रामदेवरायाकडून लुटले जायचे का अल्लाउद्दीनकडून, एवढाच विकल्प रयतेपुढे असेल, तर परकीय लुटारूच्या रूपाने मोचकच आला, अशी प्रजेची भावना का होऊ नये? शिवाय, दोन लुटारूंच्या लढाईत स्वतः मरण्यात तिला का स्वारस्य वाटावे? बंदा बहादुराच्या व त्यानंतरच्या पंजाबमधील लढायांसंबंधी खुशवंतसिंग म्हणतात, की

शिखांकडून किंवा मराठ्यांकडून लुटून घ्यायचे का अब्दालीकडून, एवढाच पर्याय पंजाबी शेतकऱ्यांसमोर असे आणि त्यांना त्यातल्यात्यात मुसलमानांकडून लुटले जाणे हा सौम्य पर्याय वाटे.

(*शेतकरी संघटक*, १५ सप्टेंबर १९८५)

सोळाव्या शतकामध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली. प्रथमतः इंग्लंडमध्ये कारखाने निघाले. त्यावेळीसुद्धा शेतीच्या वरकड उत्पादनातूनच त्या कारखानदारीसाठी अत्यावश्यक असे 'प्राथमिक भांडवल' (primitive capital accumulation) तयार झाले.

कच्च्या मालाचे हे शोषण कशा प्रकारे होत आले? प्रथमतः त्या देशात जो कच्चा माल उपलब्ध होता, तो वापरायचा प्रयत्न झाला. पण तो देश एवढासा आहे, त्यातल्या मालावर असे कितीसे कारखाने चालणार? तेव्हा बाहेरून माल मिळवण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यासाठी इंग्लंडने वेगवेगळ्या दूरदूरच्या देशांत जाऊन तेथून कच्चा माल मिळवायला सुरुवात केली. (अर्थात हे सारे इतरही अनेक युरोपियन देशांच्या बाबतीत खरे आहे.) पण तिथेही अडचणी येऊ लागल्या. शिवाय ह्या देशांत स्थानिक प्रशासन खूप दुबळे आहे, दुहीने पोखरलेले आहे हेही त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे मग तिथे जाऊन आपलेच राज्य प्रस्थापित करायचे, आणि राजकीय सत्तेच्या आधाराने मक्तेदारी पद्धतीने तिथला कच्चा माल स्वस्तात स्वस्त घेऊन, मायदेशातील आपल्या कारखान्यांना आणून द्यायचा, अशा प्रकारची वसाहतवादी पद्धत सुरू झाली. त्याच्याच जोडीने विज्ञानाचा व तंत्रज्ञानाचा विकासही होतच होता व ही सारी परिस्थिती परस्परपूरकच होती. त्यातून इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणावर कारखाने सुरू झाले. त्यातून जो पक्का माल तयार होऊ लागला, तो एकट्या इंग्लंडमध्ये खपणे शक्य नसल्यामुळे तो त्याच गुलाम देशांत खपवला जाऊ लागला – अर्थातच भरमसाट नफा घेऊन. म्हणजे हिंदुस्तानसारख्या देशाचा उपयोग दोन पद्धतींनी झाला – कच्चा माल स्वस्त मिळू लागला आणि पक्का माल जास्त भावाने विकण्यासाठी नवीन बाजारपेठ मिळाली. मुख्यतः अशा तऱ्हेच्या वसाहतवादी व्यवस्थेतून तेथील कारखानदारीची भरभराट झाली.

गांधीजींसारख्या द्रष्ट्या नेत्याने सामान्य माणसाला समजेल अशा शब्दांत हे सांगताना म्हटले होते,

''इंग्रज आपल्या देशातील कापूस स्वस्तात त्यांच्या देशात घेऊन जातात, त्याचे कापड बनवतात आणि त्याच्याच धोतरजोड्या आमच्याच देशात आणून आमच्याच शेतकऱ्यांना खूप नफा घेऊन विकतात. ह्या शोषणामुळे आपण गरीब होत जातो व ते श्रीमंत होत जातात.''

जोशी म्हणतात,

''म्हणूनच त्यांनी आपल्या चळवळीसाठी चरखा हे प्रतीक निवडलं. नाहीतर अशोकचक्र, कमळ अशा सुंदर गोष्टी त्यांना दिसल्या नसतील असं नाही! पारतंत्र्यात होणारं शोषण दूर करण्यासाठी प्रतीकात्मक साधन म्हणून ते चरख्याकडे बघत होते.''

परंतु पुढे दुसऱ्या महायुद्धानंतर भारत स्वतंत्र झाला. 'चले जाव' आंदोलनामुळे, काँग्रेस

पक्षामुळे वा अन्य कुठल्याही तत्सम कारणांमुळे हे स्वातंत्र्य मिळाले असे शरद जोशी मानत नाहीत. जिथे स्वातंत्र्यसंग्राम झालाच नव्हता, अशाही अनेक देशांना स्वातंत्र्य मिळून गेले व केवळ इंग्लंडनेच नव्हे, तर फ्रान्स, हॉलंड, स्पेन, पोर्तुगाल अशा इतरही वसाहतवादी देशांनी आपापल्या वसाहती सोडून दिल्या. इंग्लंडसारख्या देशांना त्यांच्या महायुद्धात झालेल्या अपरिमित हानीमुळे, स्वतःच्या सैन्यबळावर आपले साम्राज्य टिकवणे अशक्य झाले व म्हणून त्यांनी सर्व वसाहती मोकळ्या केल्या.

तरीसुद्धा निघता निघता या मंडळींनी अशी एक व्यवस्था या देशात तयार केली, की जरी राज्यसत्ता गेली तरीसुद्धा व्यापारात जो फायदा होता, तो जास्तीत जास्त प्रमाणात चालू राहावा. कारण त्यांचा इथे येण्याचा मुख्य हेतू व्यापारीच होता, राजकीय नव्हता. जोशींच्या मते एव्हाना पाश्चात्त्य राष्ट्रांतील कारखानदारांनाही प्राथमिक स्वरूपाच्या उद्योगधंद्यांत स्वारस्य राहिलेलेच नव्हते. कारखान्यांना लागणारा माल तयार करणाऱ्या जड व उच्च तंत्रज्ञानावर आधारलेल्या (हायटेक अशा) अधिक फायदेशीर उद्योगधंद्यांकडे ते वळले होते. तेव्हा जुन्या वसाहतींतील किरकोळ कारखानदारीला त्यांचा विरोध नव्हताच; उलट, त्यांच्या जड व अधिक फायदेशीर उद्योगधंद्यांच्या भरभराटीसाठी गरीब देशांतील छोट्या-मोठ्या कारखानदारीचा त्यांना गिऱ्हाईक म्हणून उपयोगच होता!

आपले कापड जास्त खपवून फायदा कमावण्यासाठी इंग्रजांनी एकेकाळी बंगालमधल्या वीणकरांचे अंगठे कापले होते; आज तो प्रकार करायची गरजच राहिलेली नाही. इथल्या कारखानदारीला लागणारे हायटेक तंत्रज्ञान विकून ते आज अधिक फायदा मिळवतात.

अधिक मोठे दुर्दैव म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर जे हे शोषण चालत होते, तो प्रकार स्वातंत्र्यानंतर देशांतर्गतही होऊ लागला. कारखान्याला जो कच्चा माल लागतो, तो स्वस्तात स्वस्त मिळवला पाहिजे व कारखान्यात तयार होणारा पक्का माल महागात महाग विकता आला पाहिजे; म्हणजेच कच्च्या मालाचे शोषण केले पाहिजे – राज्यकर्त्यांचे धोरण हे कायम असेच राहिले आहे. स्वातंत्र्यानंतर देशातील गोऱ्या साहेबाची जागा काळ्या साहेबाने घेतली, एवढाच काय तो फरक झाला; एकूण व्यवस्था (सिस्टिम) तीच राहिली.

मुळात शेतीतूनच निर्माण झालेल्या भांडवलावर आधारित उद्योगक्षेत्र निर्माण व्हायची प्रक्रिया पाश्चात्त्य देशांत दोन-तीनशे वर्षांच्या दीर्घ कालावधीत झाली व काही प्रमाणात सहजसुलभ अशी झाली. त्यामुळे साम्यवादी राज्यक्रांती ह्या पाश्चात्त्य देशांत कधीच झाली नाही. स्वतः कार्ल मार्क्सने आपल्या (नंतरच्या) वैचारिक मांडणीत कामगारवर्ग हाच साम्यवादी क्रांतीचा केंद्रबिंदू मानला. ज्या लंडन शहरात राहून त्याने आपला *कॅपिटल* हा ग्रंथ लिहिला, त्या परिसरात त्याला उद्योगक्षेत्राचे जे तत्कालीन रूप दिसले, त्यावरच त्याची मांडणी आधारलेली होती; ते उद्योगक्षेत्र पुढे आमूलाग्र बदलेल ह्याची त्याला बहुधा कल्पनाही नव्हती.

शिवाय, भांडवलदार व कामगार हे दोघेही प्रत्यक्षात एकमेकांचे शत्रू न राहता दोघांचेही हितसंबंध एकत्र जोडले जातील व दोघे मिळून आधी शेतीचे, मग वसाहतींचे व मग

स्वतःच्याच देशातील दुर्बल घटकांचे शोषण चालू ठेवतील याचा अंदाज त्याला आला नाही. ज्या पाश्चात्त्य समाजात औद्योगिक क्रांती खूप पूर्वीच सुरू झाली होती, तिथे हा कामगारवर्ग मोठा होता व तो शहरांत राहणारा होता. उलट शेतकरीवर्ग हा ग्रामीण भागात राहणारा होता. त्यातून 'शहर विरुद्ध गाव' ('Town versus County') हा वाद काही काळ तिथे निर्माण झाला, पण सुदैवाने पुढे तेथील उद्योगक्षेत्राचे स्वरूप खूपच सुधारत गेले व त्यामुळे त्या वादातून तिथे रक्तरंजित राज्यक्रांती कधी झाली नाही.

साम्यवादी राज्यक्रांती झाली ती मुख्यतः रशियात – जिथे उद्योगक्षेत्र अजून विकसितच झाले नव्हते व साहजिकच हा कामगारवर्ग अत्यल्प होता; सगळा समाज मुख्यतः शेतीप्रधानच होता. खरे तर रशियात जो सत्ताबदल १९१७ साली झाला, तो साम्यवादावर वा मार्क्सवादावर आधारित होता, हे जोशींना अजिबात मान्य नव्हते. पहिल्या महायुद्धात पराभूत होऊन रशियात परतणारे सैनिक, बंड करून उठलेल्या रशियन स्त्रिया व एकूण देशातील असंतोष यांमुळे झारशाही कोलमडून पडली व त्याचा फायदा घेऊन साम्यवादी सत्तेवर आले, असे ते मानत. त्यांच्या मते ह्या साऱ्या सत्तापालटाला काहीतरी तात्त्विक बैठक द्यायची म्हणून केवळ साम्यवादी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान पुरवले गेले; प्रत्यक्षात रशियात जे घडले त्याचा साम्यवादाशी तेवढाच संबंध होता, जेवढा एखाद्या गावातील सुभाष केशकर्तनालयाचा नेताजी सुभाषचंद्र बोसांशी संबंध असतो!

रशियात औद्योगिकीकरण हे सरकारी धोरणातून घडवून आणले गेले; शेतीप्रधान देशाचे एक-दोन पिढ्यांमध्ये औद्योगिक देशात परिवर्तन करण्यासाठी, शेतीतील भांडवल उद्योगक्षेत्रासाठी वळवण्यासाठी शेतीमालाला कमीत कमी भाव देणे क्रमप्राप्त ठरले. तो अधिकृत शासकीय धोरणाचाच भाग बनला. स्टालिनच्या राजवटीत तर शेतकऱ्यांना चिरडूनच टाकले गेले. 'आज हे शेतकरी गव्हाला वाढीव भाव मागताहेत, तो त्यांना दिला, तर उद्या ते सोन्याची घड्याळे मागू लागतील,' हे त्याचे उद्गार प्रसिद्ध आहेत. त्याने शेतीवरची स्वतंत्र मालकी काढून टाकली व त्या जागी सामुदायिक शेती देशभर राबवली. त्यात व्यक्तिगत लाभ काहीच होणार नसल्याने अधिक मेहनत करायला व अधिक धान्य पिकवायला तिथे शेतकऱ्याला काही उत्तेजनच राहिले नाही. जोशी म्हणतात,

''ह्या अत्यंत चुकीच्या धोरणामुळे एकेकाळी अन्नधान्य निर्यात करत असलेल्या रशियावर परदेशाहून अन्नधान्य आयात करायची वेळ आली आणि इतक्या वर्षांनंतर आजसुद्धा रशिया अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकलेला नाही. किंबहुना अन्नधान्याचा आत्यंतिक तुटवडा व त्यामुळे जनसामान्यांत खदखदत असलेला असंतोष हे पुढे नव्वदच्या दशकात रशियातील साम्यवादी राजवट कोसळून पडली ह्याचे एक मोठे कारण होते.''

परंतु हेही खरे आहे, की रशियाने एक-दोन पिढ्यांमध्ये मोठे औद्योगिकीकरण घडवून आणले व त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या जवळजवळ सर्वच देशांनी आपल्या विकासासाठी, म्हणजे मुख्यतः शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचे रूपांतर उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेत करण्यासाठी, रशियन प्रतिमान स्वीकारले. स्वतंत्र भारतातील सरकारनेही समाजवादी

विचारसरणीनुसार शेतीपेक्षा उद्योगक्षेत्रावर भर दिला. त्याची परिणती म्हणून शेतकऱ्याचे शोषण चालूच राहिले; किंबहुना, अधिकच वाढले. कदाचित तो त्या काळाचा युगधर्म होता; त्या साऱ्या चर्चेत जाण्याचे हे स्थळ नव्हे.

जोशींच्या म्हणण्यानुसार शेतीच्या हितासाठी म्हणून सरकारने काढलेल्या बहुतेक योजनांचा कागदोपत्री दाखवलेला उद्देश काहीही असला, तरी त्यांमुळे होणारा फायदा हा मुख्यतः शेतकऱ्यांपेक्षा कारखानदारांचाच होतो. ट्रॅक्टर्स, डिझेल इंजिने, विजेच्या मोटारी, पंप वगैरेंच्या खरेदीसाठी कर्ज वा अनुदान देण्याच्या ज्या योजना आहेत, त्यातून मुख्यतः तो पक्का माल बनवणाऱ्या कारखानदारांचाच फायदा होतो. शेतकऱ्याचा फायदा होईल अशा योजना शासनाने अमलात आणल्याच नाहीत. ह्याचे उदाहरण म्हणून जोशी प्लास्टिक पाइप्सचा उल्लेख करतात. ते म्हणतात, ज्या कच्च्या मालापासून नायलॉनचे धागे तयार होतात त्याच कच्च्या मालापासून ठिबक सिंचनासाठी लागणारे प्लास्टिकचे पाइप्सही तयार होतात. आपल्यासारख्या देशात, जिथे बहुतेक सगळी शेती कोरडवाहू आहे तिथे, ही ठिबक सिंचन पद्धत म्हणजे अगदी वरदान आहे. इस्राएलने ही ठिबक सिंचन पद्धत मोठ्या प्रमाणावर राबवली. त्यासाठी त्यांनी आवश्यक ती उपकरणे – मुख्यतः प्लास्टिकचे पाइप्स – जवळ जवळ फुकट वाटले. परिणामतः आज वाळवंटात वसलेले असूनही इस्राएल अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण तर आहेच, पण जगातल्या अनेक देशांना ते आपला उच्च दर्ज्याचा शेतीमाल पाठवते. हे आपल्याकडेही घडू शकले असते, पण त्यासाठी सरकारने काहीच उत्साह दाखवला नाही.

जोशी असेही म्हणतात, की अनुदानाच्या योजनांतून प्रत्यक्षात शेतकऱ्याला फारसे काही मिळतच नाही. त्याच्याकडे योजनांचा फायदा मिळवण्यासाठी लागणारा वशिला नसतो, अधिकाऱ्यांना खूष करण्यासाठी लाच देण्याची ताकद नसते, कुठलीही चांगली योजना आपल्या शेतीत राबवण्यासाठी कुशल असे व्यवस्थापन नसते, आहे ती शेती कशीबशी करण्यातच तो मेटाकुटीला आलेला असतो. त्यामुळे प्रत्यक्षात या सर्व योजनांचा फायदाही ज्यांच्या हाती राजकीय सत्ता वा ग्रामीण भागातील अर्थसत्ता आहे, असेच मूठभर शेतकरी घेऊ शकतात.

शासकीय योजनांचा बहुतेक सगळा मलिदा नोकरशाहीच खाते. दिल्लीपासून गल्लीपर्यंत एखादी योजना येईपर्यंत पगार, महागाईभत्ता, प्रवास-निवासभत्ता, जीपगाड्या, खादाडी आणि मुख्य म्हणजे लाभार्थींना पैसा देण्यापूर्वीच होत असलेला तऱ्हेतऱ्हेचा भ्रष्टाचार यांतच त्या योजनेची बहुतेक रक्कम संपून जाते. गरिबांसाठी सरकार खर्च करत असलेल्या दर एक रुपयापैकी जेमतेम पंधरा पैसे खऱ्या गरजूंपर्यंत पोचतात असे राजीव गांधी यांचेही ते पंतप्रधानपदी असतानाचे निरीक्षण होते. अनुदानाची कोणतीही योजना म्हणजे मुख्यतः नोकरशाहीला पैसे कमवायची पर्वणी!

ह्या सनदी नोकरांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी काहीच आस्था नसते ह्याचे एक उदाहरण अंबाजोगाईच्या प्रशिक्षण शिबिरात जोशींनी दिले होते. ते म्हणाले,

''जेव्हा बाजारपेठेत १३२ रुपये क्विंटल ह्या दराने ज्वारी खरीदण्यासाठी महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशनची माणसं आली नाहीत, आणि त्यामुळे शेतकऱ्याला आपली ज्वारी ६५ ते ७५ रुपये दराने विकावी लागली, त्या वेळेस मी मुंबईला फेडरेशनच्या गोपालकृष्णन ह्यांना भेटायला गेलो. मी त्यांच्यासमोर बसलेलो असतानाच ते टेलिफोनवरून मोठमोठ्या मंडळींना व अधिकाऱ्यांना आमंत्रण देत होते की, 'मुंबईच्या ओबेरॉय शेरेटन हॉटेलमध्ये आम्ही मेजवानी ठेवली आहे, तिथे या. ज्वारीच्या खरेदीच्या प्रश्नाची चर्चा तिथे होणार आहे.' इकडे शेतकरी ज्वारीच्या खरेदीकरिता अडकून पडला आहे, कुणी ज्वारी ६५ रुपयांनी विकून राहिलाय आणि या ज्वारी खरेदीवाल्या अधिकारी मंडळींची चर्चा ओबेरॉय शेरेटनसारख्या शाही हॉटेलमध्ये होणार! त्यांची ह्याबाबत वृत्ती काय आहे हे आपल्याला ह्यावरून कळून येते.''

शेतकरी संघटनेच्या तत्त्वज्ञानानुसार या देशातील एकूण सगळी यंत्रणाच ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करून शहरांना झुकते माप देणारी आहे. प्रसारमाध्यमे बहुतांशी बड्या शहरांमध्येच एकवटलेली आहेत. शहरात चार तास वीज गेली, चार गाड्या रद्द झाल्या किंवा एक दिवस पाणी आले नाही, की लोक आंदोलन करतात. त्यावेळी ग्रामीण भागात मात्र नेहमीच दिवसाचे बारा-बारा तास वीज नसते, एक एसटी बस चुकली तर गावात पुढचे सहा तास कुठचीच एसटी नसते आणि तिथे चार-चार दिवसांतून एकदाच पाण्याचा पुरवठा होतो हे कोणाच्या गावीही नसते. शहरातले कामगार सातत्याने पगारवाढीसाठी आंदोलने करतात. पगार चांगला असेल तर बोनससाठी आणि बोनस मिळत असेल तर अधिक रजा, अधिक सुखसोयी ह्यासाठी त्यांची आंदोलने असतात. त्यांच्या संघटना बळकट असतात व सरकारवर त्या दबाव आणू शकतात. उदाहरणार्थ, मुंबई महापालिकेचे सफाई कामगार त्यांना उत्तम पगार व सर्व सुखसोयी मिळत असूनही दर वर्षी साधारण ७ जूनपासून काही ना काही मागणी पुढे करून बेमुदत संपावर जातात. त्यांना ठाऊक असते, की ह्या सुमारास मुंबईत पाऊस सुरू होतो व आपल्या संपामुळे गटारे तुंबून राहिली तर शहरवासीयांची प्रचंड गैरसोय होते, दुर्गंधी पसरते, रोगराईचा धोका निर्माण होतो. म्हणून मुद्दामच ते ही वेळ निवडतात. त्यांनी संपाची नुसती नोटीस दिली, तरी लगेच शासन चर्चेसाठी पुढे येते व बहुतेक वेळा त्यांच्या मागण्या मान्य करते.

रिक्षावाल्यांची युनियन असते, हमालांची युनियन असते व त्या एकजुटीच्या बळावर आपल्या श्रमाचे पुरेपूर दाम वसूल करणे त्यांना शक्य होते. विमाने चालवणारे पायलट प्रचंड पगार घेतात, पण त्यांचीही युनियन असते व तेही अधूनमधून अधिक चांगल्या सुखसोयींसाठी संप करतच असतात. त्यांचेही सगळे लाड सरकार पुरवते. पण तेच सरकार शेतकऱ्यांच्या अगदी जुजबी अशा मागण्यांचीही दखल घेत नाही; त्यांच्याकडे ढुंकूनही बघत नाही. कारण शेतकऱ्यांची एकजूट नसते, ते एकत्रित उभे राहू शकत नाहीत, त्यांना उपद्रवमूल्य नसते.

शहरवासीयांच्या लांगूनचालनाच्या संदर्भात जोशींनी वैद्यकीय सेवेचाही विस्तृत उल्लेख केला होता. त्यांच्या मते देशातल्या नव्वद टक्के लोकांना हगवण, खरूज असे साधे रोग होत असतात, पण त्यांवर आपण प्रभावी उपाययोजना करत नाही. ह्या रोगांवर उपचार करणारी गावोगावी पुरेशी माणसेही नाहीत आणि औषधेही उपलब्ध होत नाहीत. उलट शहरांमध्ये

मोठमोठे दवाखाने बांधले जातात आणि तिथे सरकारतर्फे प्रचंड खर्च करून अशी यंत्रसामग्री आणली जाते, जिचा उपयोग फारतर लाखात एखाद्याला होणारा आजार बरा करण्यासाठी होऊ शकेल. गावातील लोकांकरिता मात्र काहीच रक्कम उपलब्ध होत नाही.

या सगळ्या परिस्थितीतच जोशींच्या 'इंडिया विरुद्ध भारत' या मांडणीचा उगम आहे. या चरित्रात तो भाग पूर्वी आलेलाच आहे.

ह्या समाजात 'इंडिया विरुद्ध भारत' ही एकमेव विभाजन रेषा नव्हती ह्याचे भान जोशी यांना अर्थातच होते. एका 'इंडियात' अनेक परस्परविरोधी घटक असतात व एका 'भारतातही' अनेक परस्परविरोधी घटक असतात – जात, धर्म, भाषा, प्रांत, वेगवेगळे राजकीय पक्ष, सुशिक्षित-अशिक्षित, कामगार-मालक, वेगवेगळे आर्थिक स्तर ह्या सर्व भेदांनुसार समाजाचे विभाजन करता येईल ह्याची त्यांना कल्पना होती. ही रेषा भौगोलिक नव्हती; विषमता शहरात आहे व गावातही आहे हेही त्यांना ठाऊक होते. 'इंडिया'मधेही 'भारत' आहे, आणि 'भारता'मधेही 'इंडिया' आहे, असे ते म्हणतच. पण कुठेतरी सुरुवात करायची म्हणून त्यांनी 'इंडिया विरुद्ध भारत' ही विभाजन-रेषा पकडली. 'शोषित' समाजाला ते 'भारत' म्हणतात तर 'शोषक' समाजाला ते 'इंडिया' म्हणतात, एवढे लक्षात घेतले, तर या संकल्पनेबद्दल काहीच वाद उरत नाही.

'इंडिया विरुद्ध भारत' ही संकल्पना मांडताना आपला लढा शहरातील गोरगरिबांविरुद्ध नाही ही गोष्टही जोशी आपल्या अनुयायांपुढे वरचेवर स्पष्ट करतात. ते म्हणतात,

"ह्या पिढीत किंवा मागच्या पिढीत ही सर्व शहरातली गरीब माणसं कोरडवाहू शेतकरीच होती. त्या कोरडवाहू शेतीत पोट भरता येईना म्हणून त्यांनी एक दिवस जी काय किंमत येईल त्या किमतीला जमीन फुंकून टाकलेली असते, बैल विकून टाकलेले असतात आणि जी काय गाडगी-मडकी उरतील ती घेऊन शहरात ती पोटाकरिता येऊन राहिलेली असतात."

त्यामुळेच शहरातील दारिद्र्यावरचा खरा उपाय गावातील दारिद्र्य दूर करणे, म्हणजेच कोरडवाहू शेतीत चांगला पैसा मिळेल अशी व्यवस्था करणे हा आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे.

शासन व एकूणच अभिजनवर्ग कशा प्रकारे शेतकऱ्यांचे शोषण करत आहे हे सारांशरूपात मांडताना जोशींनी ह्या शिबिरांत 'शोषणाचे पंचशील' असा शब्दप्रयोग केला आहे. त्या पंचशीलातील पाच तत्त्वे पुढीलप्रमाणे :

१. शेतकऱ्याचा खरा उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव त्याच्या शेतीमालाला द्यायचा नाही.

२. भाव न मिळाल्याने अधिकाधिक दरिद्री होत जाणाऱ्या शेतकऱ्याने चिडून उठू नये म्हणून त्याला काहीतरी खोट्या आशेची गाजरे दाखवायची किंवा त्याचे 'मन रमवण्यासाठी किंवा दुसरीकडे वळवण्यासाठी वापरायचा खुळखुळा' असे ज्याचे वर्णन करता येईल

अशा खोट्या फसव्या विकासयोजना आखायच्या. उदाहरणार्थ, शेतीमालासाठी बाजारसमित्या स्थापन करणे. त्यातून शेतकऱ्याचे शोषण किंवा अगतिकता जराही कमी झाली नाही, कारण व्यापारी जितका त्रास द्यायचे, तितकाच त्रास ह्या बाजारसमित्यांतील अधिकारीही देऊ लागले.

३. शेतकऱ्यांमध्ये एकी होऊ द्यायची नाही. छोटे शेतकरी विरुद्ध मोठे शेतकरी, शेतकरी विरुद्ध शेतमजूर, मराठी विरुद्ध कानडी असे वाद जागते ठेवून 'फोडा-झोडा' नीतीचा अवलंब करायचा.

४. शेतकऱ्याविरुद्ध प्रचार करून त्याची बदनामी होईल असे चित्र तयार करायचे; तो आळशी, बेजबाबदार, अंधश्रद्धाळू कसा आहे व त्यामुळेच तो गरीब आहे हेच सारखे मांडत राहायचे. शेतकऱ्याचे हे अभिजनवर्गातील चित्रण अतिशय विकृत आहे. 'पागोटेवाला आला की इंजेक्शनचे पाचऐवजी दहा रुपये घ्यायचे' ही भावना परदेशातून पुण्यात आल्यावर तेथील डॉक्टरांमध्ये जोशींना दिसायची ती त्यामुळेच.

५. तरीही जेव्हा जेव्हा शेतकरी आंदोलन करत उभे राहतील, तेव्हा तेव्हा कोणत्याही परिणामांची क्षिती न बाळगता ते आंदोलन क्रूरपणे चिरडून टाकायचे – जसे पोलिसांनी नाशिकला व निपाणीला केले.

शेतीकडे शेतकरीधर्म, भूमिपुत्राचे कर्तव्य, काळ्या आईची सेवा, बळीराजाची सेवा वगैरे भावुक दृष्टींनी न बघता, शेती हा इतर कुठल्याही व्यवसायांप्रमाणे एक व्यवसाय आहे व पूर्णतः व्यावसायिक तत्त्वांवरच तो करायला हवा, असे जोशी ठासून सांगत आणि त्या दृष्टीने त्यांनी शेतीचे अर्थशास्त्र मांडले. बहुसंख्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अगदी नवा विचार होता; शेतीकडे ह्या भूमिकेतून त्यांनी पूर्वी कधीच पाहिले नव्हते.

शेतीमालाचा उत्पादनखर्च कसा काढायचा ही ह्या अर्थशास्त्राची पहिली पायरी होती. त्याविषयी बऱ्याच तपशिलात जाऊन जोशींनी ऊहापोह केला.

सुरुवात जमिनीपासून व्हायची. बापजाद्यांपासून वारसाहक्काने मिळत आलेली जमीन हाही खर्चाचा एक घटक मानला गेला पाहिजे, ही गोष्ट बहुसंख्य शेतकऱ्यांच्या गावीही नसायची. जोशी सांगत, जमिनीची आजची जी किंमत असेल त्याच्या १० टक्के रक्कम आपण दरसाल खर्च म्हणून पकडली पाहिजे. कारण आपण जर ती जमीन आज विकली, व ते पैसे बँकेत ठेवले, तर त्यावर आपल्याला १० टक्के व्याज सहज मिळेल. आपण शेती करतो, म्हणजेच त्या व्याजावर पाणी सोडतो. तेव्हा ती रक्कम शेतीखर्चातच पकडली पाहिजे. कारखानदार आपल्या जागेचा विशिष्ट घसारा (डेप्रिसिएशन) खर्चात पकडतो व मगच त्याचा नफा काढला जातो. ही सवलत शेतकऱ्याला मात्र दिली जात नाही.

आपण शेतीची नांगर-खुरपणीपासून ते पहार-विळ्यापर्यंत असंख्य अवजारे, तसेच

विहीर, चर, बैल, गोठा, मांडव, कुंपण, मोट, इंजिन, मोटार, पंप, स्टार्टर, पाइप्स इत्यादीवर जो खर्च केला असेल, तो भांडवली खर्च पकडून, त्याच्या १० टक्के रक्कम ही वार्षिक खर्चापोटी धरली पाहिजे. ह्यातील काही गोष्टी पाच वर्षे टिकतात, काही वर्षभर टिकतात तर काही दर हंगामात घ्याव्या लागतात. त्यांच्या देखभालीवर व पुनःखरेदीवर होणारा खर्चही त्या-त्या प्रमाणात वार्षिक खर्चात धरला पाहिजे.

शेतावर मजूर नेमताना जी मजुरी दिली जाते तो खर्च तर धरलाच पाहिजे, पण शिवाय आपल्या घरची जी माणसे शेतावर राबतात त्यांचीही मजुरी खर्चात धरली पाहिजे. ही मजुरी पकडताना मुलांचे शिक्षण, औषधपाणी, लग्नकार्य वगैरेंवर होणारा खर्चही विचारात घेतला पाहिजे. नाहीतर वरकरणी शेती नफ्यात दिसली, तरीही लग्नकार्य करताना प्रत्येक वेळी जमीन गहाण ठेवावी लागेल!

शेती चार महिने चालते; पण त्या उत्पन्नावर बारा महिने आपल्याला जगायचे असते; म्हणून संपूर्ण बारा महिन्यांचा सर्व कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा खर्च शेतीखर्चातच पकडला पाहिजे.

खते, बियाणे, औषधे, फवारणी, वीज, पाणी, वाहतूक यांचाही खर्च हिशेबात धरला पाहिजे. त्याचबरोबर आपल्या देशातील भ्रष्ट यंत्रणेमुळे शासनाकडचे प्रत्येक काम करून घेताना शेतकऱ्याला प्रचंड त्रास होत असतो. तलाठ्याकडून सात बाराचे उतारे आणणे, गाव नमुना क्रमांक आठचे उतारे आणणे, भावाचा अंदाज घेण्यासाठी बाजारसमितीत जात राहणे, चालू असलेल्या अनेक खटल्यांत कोर्टात हजेरी लावणे आणि संध्याकाळी निराश मनाने पुढची तारीख घेऊन परत येणे, कर्जासाठी सोसायटीकडे वा बँकेत चकरा मारणे, इतके सारे करूनही जेव्हा कर्ज फेडता येत नाही, व्याजही भरता येत नाही आणि घराची जप्ती होणार अशी नोटीस येते, तेव्हा काहीतरी पळवाट काढण्यासाठी थोरामोठ्यांचे पाय धरायला धावाधाव करणे ह्या साऱ्यात शेतकऱ्याचा पैसा व वेळ जातोच, पण शिवाय जीव अक्षरशः मेटाकुटीला येत असतो. भविष्यात अधिक शेती घ्यायची असेल, घर बांधायचे असेल, इतर काही मोठा खर्च करायचा असेल, तर त्याची तजवीजही करून ठेवायला हवी. ह्या साऱ्यासाठी लागणारा पैसा हा शेतीमालाच्या विक्रीतूनच येणार असल्याने त्याचाही हिशेब शेतीमालाचा रास्त भाव काढताना करायला हवा असे जोशी सांगत.

कारखानदार आपला उत्पादनखर्च कसा काढतात हे जोशी समजावून सांगत. केवळ कामगारांचा पगार वा कच्च्या मालाची किंमत खर्चात धरणे पुरेसे नाही. इमारती, वीज, पाणी, सरकारी कर, सुपरवायझर, हिशेबनीस, सुरक्षा व्यवस्था, इतर व्यवस्थापन, कामगारकल्याण, स्टेशनरी, गोदामे, जाहिराती, विक्रेते, त्यांनी विक्रीसाठी केलेले दौरे, प्रदर्शने, प्रवासखर्च, विक्री वाढावी म्हणून दिलेल्या मेजवान्या, अधिकाऱ्यांना द्यावी लागणारी लाच, भांडवलावरील व्याज, कर्ज मिळवण्यासाठी करावा लागणारा खर्च, वकील व इतर मदतनिसांचा खर्च, इमारतींचा घसारा, विम्याचे हप्ते, काही टक्के उत्पादन रिजेक्ट होणार हे गृहीत धरून त्याचा पकडलेला खर्च, बाजारपेठेतील चढउतारांमुळे तोटा आला, तर तो सहन करण्यासाठी जी

तरतूद करावी लागते तो खर्च, सल्लागार, तंत्रज्ञान खरेदी करण्यासाठी व भावी वाढीसाठी गुंतवणूक, नव्या मशिनरीचा खर्च, देखभालीचा खर्च, समाजात आपल्याविषयी 'गुडविल' (सद्भावना) राहावी म्हणून केल्या जाणाऱ्या दानधर्माचा खर्च इत्यादी असंख्य बाबी कारखानदार आपला उत्पादनखर्च काढताना पकडत असतो. कधी कधी तोटा आला, तर तो भरून काढता यावा, एका प्रकारचे उत्पादन बंद करून दुसऱ्याच प्रकारचे उत्पादन सुरू करायचे असेल तर त्यासाठीची तजवीज वगैरे सगळे घटकही कारखानदार विचारात घेत असतो.

मग त्यावर स्वतःचा नफा किती ते धरून कारखानदार आपल्या मालाच्या विक्रीची किंमत ठरवत असतो. जगातले सर्वच उत्पादक आपल्या उत्पादनाची किंमत आपण ठरवतात; आपण शेतकऱ्यांनीदेखील हेच केले पाहिजे असे जोशी म्हणत.

कृषिमूल्य आयोग शेतीमालाचा भाव निश्चित करत असे व त्याच्या कार्यपद्धतीत जोशींनी अनेक त्रुटी दाखवून दिल्या. उदाहरणार्थ, शेतकऱ्याला आपला माल बाजारपेठेत नेण्यासाठी जो खर्च करावा लागतो, तो आयोगाने सुरुवातीची पंधरा वर्षे विचारातच घेतला नव्हता व जेव्हा जोशींनी त्यांच्याशी चर्चा करताना ही त्रुटी निदर्शनास आणली, तेव्हाच त्यांनी ती चूक कबूल केली होती. हाच प्रकार औत-अवजारांच्या दुरुस्तीखर्चाच्या बाबतीत घडला होता. तीही चूक नंतर त्यांनी कबूल केली होती.

खर्च काढताना देशातले सहाएक हजार शेतकरी निवडून, त्यांच्या खर्चाची सरासरी काढण्याची पद्धत कृषिमूल्य आयोग वापरतो. त्या पद्धतीत साडेपाच हजार शेतकरी अतिशय लहान असतात व औषधफवारणीसाठी त्यांचा खर्चही जवळपास काही नसतो. त्यामुळे कृषिमूल्य आयोगाने काढलेला औषधफवारणीचा सरासरी खर्च हा एका हेक्टरला फक्त रुपये १०.७३ असतो! प्रत्यक्षात तेवढ्या पैशात पाणीफवारणीदेखील करता येत नाही! शिवाय, दुर्दैवाने जे बहुसंख्य शेतकरी अत्यंत दरिद्री आहेत, त्यांचेच खर्चाचे आकडे सरासरी खर्च काढताना व त्यावर आधारित भाव ठरवताना अधिक प्रमाणात आधारभूत धरले गेले, तर त्या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती भविष्यातदेखील कधी सुधारण्याची काहीही शक्यता राहत नाही. कारण त्यांना मिळणारे भाव अत्यंत अपुरे असतात.

सामान्य शेतकरी जास्त खर्च करत नाही म्हणून त्याला जास्त भाव मिळत नाही, व त्याला जास्त भाव मिळत नाही म्हणून तो जास्त खर्च करू शकत नाही, अशा दुष्टचक्रात शेतकरी सापडला आहे.

हे दोष टाळण्यासाठी उत्पादनखर्च काढताना एक शास्त्रीय उपाययोजना जोशींनी मांडली होती. त्यांच्यातील संख्याशास्त्रज्ञ व अर्थशास्त्री ह्या कामात दिसून आला होता. शेतीमालाचा उत्पादनखर्च कृत्रिम नमुना पद्धतीने (Synthetic Model Method) काढला पाहिजे असा त्यांचा प्रस्ताव होता. तो नेहमीच्या सरासरी काढण्याच्या पद्धतीने कधीच काढता येणार नाही असे ते म्हणत. ती पद्धत संख्याशास्त्रीयदृष्ट्या किती चुकीची आहे हे जोशींनी दाखवून दिले.

उदाहरणार्थ, ''मध्यावर वीस फूट खोल असलेल्या नदीची सरासरी खोली जरी फक्त चार फूट असली, तरी ती नदी घोड्यावर बसून कशी पार करता येईल?'' असाही प्रश्न जोशी विचारत!

शेतीच्या तांत्रिक तसेच, व्यवस्थापकीय कार्यक्षमतेची एक पातळी गृहीत धरावी लागेल. खरे तर दर वर्षी ही पातळी थोडी थोडी उंचावत जायला हवी. गृहीत धरलेल्या ह्या कार्यक्षमतेच्या पातळीवर कृत्रिम नमुना पद्धतीने शेतीचा उत्पादनखर्च काढला पाहिजे व त्यावर आधारित दर नक्की केले पाहिजेत. या पातळीच्या वर कार्यक्षमता असलेल्या शेतकऱ्यांना अधिक फायदा मिळेल व तिच्यापेक्षा कमी कार्यक्षमता असलेल्या शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागेल. त्यामुळे आपापली कार्यक्षमता वाढवायलाही अधिक उत्तेजन मिळत राहील व त्यातून एकूणच शेतीचा विकास होत राहील.

जोशींनी शेतीमालाच्या रास्त किमतीचा मुद्दा अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला. त्यासाठी त्यांनी प्रचंड पूर्वतयारी केली होती, आकडेवारी गोळा केली होती. त्यांच्या प्रतिपादनानुसार १९७९ साली भुईमुगाचा उत्पादनखर्च किलोला चार रुपये तीस पैसे होता, तर बाजारातील सरासरी भाव फक्त दोन रुपये साठ पैसे होता. उसाचा उत्पादनखर्च एका टनाला २८८ रुपये होता, तर कारखान्यांकडून मिळणारा सरासरी भाव १४२ रुपये होता. कांद्याचा उत्पादनखर्च एका क्विंटलला ५० रुपये होता, तर मिळणारा भाव सरासरी फक्त २० रुपये होता. भाताचा उत्पादनखर्च किलोला सव्वा तीन रुपये होता, तर मिळणारा बाजारभाव फक्त सव्वा रुपया होता. दुधाचा उत्पादनखर्च लिटरला तीन रुपये ऐंशी पैसे होता, तर मिळणारा भाव दोन रुपये दहा पैसे होता. कपाशीचा उत्पादनखर्च क्विंटलला ६८७ रुपये होता, तर सरकारी खरेदी फक्त क्विंटलला ५०० रुपये दराने होत होती. (हे आकडे १९७९ सालचे आहेत.) ही सर्व आकडेवारी शेतकऱ्यांचे डोळे उघडणारी होती.

उत्पादनखर्चापेक्षा कमी भाव जर शेतीमालाला मिळतो, तर मग तरीही शेतकरी जगतो कसा?

याचे उत्तर आहे, शेतकरी स्वतःचे भांडवल खाऊनच जगत असतो. आपली जमीन, आपली कार्यशक्ती, आपली जनावरे तो कणाकणाने खात असतो. गोठा पडला, बैल मेला, घरात कोणी आजारी पडले, लग्नकार्य निघाले, की त्याला कर्ज काढण्याशिवाय दुसरा काही पर्यायच नसतो व शेतीत उत्पादनखर्चच भरून निघत नसल्याने काही फायदा व्हायची व त्यातून ते कर्ज फिटायची काही शक्यताच नसते; ते वाढतच जाते. शेतकरी कर्जातच जगतो व कर्जातच मरतो. त्याची गरिबी ही अंगात मुरत गेलेल्या तापाप्रमाणे असते; असा ताप रोग्याला एकदम मारत नाही, पण कणाकणाने तो रोगी मरतच असतो. शेतकऱ्याच्या गरिबीचे असेच आहे.

एकदा उत्पादनखर्च नेमका काढला, की तो भरून निघेल एवढ्या किमान भावाची मागणी करणे ही स्वाभाविक अशी दुसरी पायरी होती. ह्या मागणीला अभ्यासाचा पूर्ण आधार असल्याने ती पूर्ण आत्मविश्वासाने करणे शक्य होते. म्हणूनच त्यांनी 'शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव' हा आपला एक-कलमी कार्यक्रम निश्चित केला. आपण

जो भाव आज कांदा, ऊस, तंबाखू, भुईमूग, कपाशी अशा पिकांना मागितला आहे व आपल्या आंदोलनामुळे जो सध्या तरी मिळालेला आहे, तोही खरेतर वाजवी भाव नाही, तो खूप अपुराच आहे; पण आपल्या आंदोलनापूर्वी मिळणारा भाव हा इतका कमी होता, की त्यात थोडीफार तरी सुधारणा आता पदरात पडून घेऊ व नंतर पुढच्या वेळी अधिक उचित दाम मागू, हेही जोशी यांनी सर्व कार्यकर्त्यांना सांगितले होते.

शेतकऱ्याचा उत्पादनखर्च कसा भरून निघेल याची चर्चा करण्यासाठी संघटनेने पुढे १६ नोव्हेंबर १९८३ रोजी पंढरपूर येथे एक विशेष मेळावा भरवला होता. शेतीमालाला रास्त भाव मिळावा यासाठी 'विठोबाला साकडे' घातले होते. या अभिनव उपक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला. लाखाहून अधिक शेतकरी पंढरपुरात जमा झाले. नेहमी इथे वारीसाठी जमणाऱ्या समुदायापेक्षा हा मेळावा अगदी वेगळा होता. त्याचे स्वरूप जराही धार्मिक असे नव्हते. 'भीक नको, हवे घामाचे दाम' या घोषणेने अवघे पंढरपूर दुमदुमून गेले. याच मेळाव्यात 'कृषिमूल्य आयोग बरखास्त करा' ही मागणी केली केली. पुढे राजीव गांधी यांनी त्याची थोडीफार दखल घेतली असे म्हणता येईल; 'कृषिउत्पादनखर्च व मूल्य आयोग' (Commission for Agricultural Costs & Prices) असे त्यांनी ह्या आयोगाचे नामकरण केले.

या पंढरपूर मेळाव्याच्या संदर्भात एक लक्षणीय बाब नोंदवायला हवी. शेतकरी संघटनेच्या कामाला जिथे सुरुवात झाली व जिथे शरद जोशींची शेती होती तो चाकण परिसर हे वारकऱ्यांचे सर्वांत मोठे प्रभावक्षेत्र होते. असे असूनही जोशींनी त्या सुरुवातीच्या काळात वारकऱ्यांवर बरीच टीका केली होती. त्यामागे अर्थातच त्यांचा स्वतःचा अनुभव होता. ते लिहितात,

> मी शेती चालू केली, तेव्हा पहिल्यांदा बटाटे लावले. खूप तण झालं होतं; डोंगराच्या उताराचा भाग असल्यामुळे. तण काढायला माणसं लावायला पाहिजेत, नाहीतर बटाट्याचं पीक जाणार अशी परिस्थिती उभी राहिली. माणसं शोधायला गेलो तर गावातल्या लोकांनी सांगितलं, की आता तण काढायला कुणी मजूर मिळणार नाहीत; बाया नाहीत आणि पुरुषही नाहीत. का? तर म्हणे, आषाढी एकादशी जवळ आली होती आणि लोक मोठ्या संख्येने पंढरपूरच्या वारीला चालले आहेत. मला मोठं आश्चर्य वाटलं. ज्या काळात शेतकऱ्याच्या शेतामध्ये प्रचंड कामं असतात, अशा वेळेला लाखो लोकांना उठवून पंढरपूरला घेऊन जाणारी ही भक्तिमार्गाची परंपरा टिकलीच कशी? केवळ विठोबाच्या दर्शनाकरिता ही मंडळी जातात, हे काही मला पटेना. मग मी सरळ देहूला गेलो, यात्रेमध्ये सामील झालो आणि एक भयानक विदारक सत्य माझ्यासमोर आलं.
>
> आमच्या कोरडवाहू भागातील शेतकरी, बियाण्यासाठी कशीबशी बाजूला ठेवलेली ज्वारी शेतामध्ये फुंकून टाकली, की घरी खायलासुद्धा काही राहत नाही म्हणून

वारीमध्ये जातो आणि वारीच्या पहिल्या दिवसापासून कुठे फुटाणे वाटताहेत, कुठे चुरमुरे वाटताहेत, कुठे केळी वाटताहेत त्याच्या आशेवर पुढे पुढे जात राहतो. देहूपासून पंढरपूरपर्यंत जाणाऱ्या या यात्रेचा भक्तिसंप्रदायाशी काहीही संबंध नाही. कोरडवाहू भागातल्या उपाशी शेतकऱ्यांची पंढरपूरपर्यंतच्या रस्त्यावरील, पाण्याची सोय असलेल्या भागातून जाणारी ती भीकदिंडी असते.

(अंगारमळा, पृष्ठ १२०)

शेतकरी संघटनेच्या अनेक शिबिरांत जोशी ही भूमिका मांडत असत व शेतकऱ्यांना ती पटतही असे. अर्थात यामागे शेतीतले दारिद्र्य अधोरेखित करणे व त्यासाठी काय उपाययोजना करायची त्याकडे लक्ष वेधणे हाच प्रमुख हेतू असायचा. पुढे जोशींनी वारीकडे अगदी वेगळ्या दृष्टीने बघितले व त्याबद्दल त्यांनी लिहिलेही आहे. पुढे सोळाव्या प्रकरणात ते येणार आहे.

शेतकऱ्यांच्या समोरील अडचणींचे दोन भाग जोशी करतात – अस्मानी संकट आणि सुलतानी शोषण.

पहिले अस्मानी संकट म्हणजे अनियमित पाऊस.

एखाद्या वेळी पडला तर तो प्रचंड पडतो आणि नाही म्हणजे अजिबात पडत नाही. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ. दोन्हींमुळे शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान होते. भारतातील पावसाचा दुसरा तोटा म्हणजे त्याचा हंगामीपणा. पावसाळ्याच्या चार महिन्यांतच वर्षभराचा सगळा पाऊस पडून जाणार. कोरडवाहू शेतीत त्या चार महिन्यांच्या आसपासच सर्वांची पेरणी आणि कापणी होते. त्यामुळे मग सगळ्यांची पिके एकाच हंगामात विक्रीला येतात. मालाचा पुरवठा वाढला, की भाव पडणार हा अर्थशास्त्राचा नियमच आहे. त्यामुळे मग शेतकऱ्याला अत्यल्प भाव मिळतो. ह्यावर उपाय म्हणजे मालाच्या साठवणीची व प्रक्रियाउद्योगाची मोठ्या प्रमाणावर उभारणी. पण सध्यातरी ते केवळ एक स्वप्नच आहे.

याशिवाय रोगराई, कीड, टोळधाडी, वादळे, खराब बियाणे वगैरे अनेक अडचणी निसर्ग त्याच्यापुढे निर्माण करत असतो. ह्याबाबतीत एक अगदी अनपेक्षित असे उदाहरण सांगण्यासारखे आहे – मोरांसारख्या पक्ष्यांमुळे होणारे नुकसान. मोर हा आपला राष्ट्रीय पक्षी. त्याच्या सौंदर्याचे सर्वांना कोण कौतुक! पण तेच मोर रात्रीच्या वेळी शेतात घुसतात आणि सगळे पीक फस्त करून टाकतात! त्यावर काही इलाजही शेतकरी करू शकत नाही. सश्यापासून डुकरापर्यंत इतरही अनेक प्राण्यांच्या बाबतीत हे तेवढेच खरे आहे. कायद्याने ह्या वन्य जीवांची हत्या करणे अवैध आहे; वनखात्याची परवानगी असल्याशिवाय शेतकरी तशी हत्या करूच शकत नाही. पुन्हा तालुक्याच्या अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी जायचे, योग्य त्या अधिकाऱ्याला गाठायचे, त्याच्याकडे विनंती अर्ज द्यायचा आणि मग पाठपुरावा करून ती परवानगी मिळवायची हेही अतिशय वेळकाढू व किचकट काम असते. सर्वसामान्य शेतकरी ते सगळे उपद्व्याप करू शकत नाही. शिवाय, तोपर्यंत हे वन्य जीव त्याच्या शेताची पुरती

नासाडी करून दुसऱ्या कुठल्यातरी शेतात गेलेले असतात! परवानगी मिळवण्यासाठीची शेतकऱ्याची सारी मेहनत पाण्यात जाणार असते. निसर्गाचे, वन्य प्राण्यांचे संवर्धन करायला हवे, ह्याबद्दल वाद नाही, पण त्यात शेतकऱ्याला काय काय अडचणी येतात ह्याचाही कायदे करणाऱ्या शासनाने विचार करायला हवा. हाच प्रकार गोवंशहत्याबंदीच्या संदर्भातही होतो. पण शेतकऱ्यांची दुःखे राजधानीत पोचतच नाहीत व त्यामुळे त्याच्या हिताचा विचार होतच नाही.

सुलतानी संकट म्हणजे शासनाची धोरणे व त्यातून येणाऱ्या अडचणी.

जेव्हा शेतीमालाचा तुटवडा असतो, तेव्हा नागरिकांना अन्नधान्य पुरवता यावे म्हणून सरकार शेतकऱ्यांकडून लेव्ही वसूल करते – म्हणजेच अतिशय कमी दरात धान्य ताब्यात घेते. औरंगझेबाने जिझिया कर वसूल करावा तसाच हा क्रूर प्रकार. सरकारने ठरवलेली लेव्ही प्रत्येक शेतकऱ्याने घालायची आणि तीही सरकारने ठरवलेल्या भावात!

हा मुद्दा स्पष्ट करताना जोशी ज्वारीचे उदाहरण देतात. १९७५ साली ज्वारीची खुल्या बाजारातील किंमत एक रुपया पन्नास पैसे किलो होती. पण चाकणला शेतकऱ्याकडून सरकार फक्त ८३ पैसे किलो दराने, म्हणजेच बाजारभावापेक्षा ६७ पैसे कमी दराने, लेव्ही वसूल करत होते. असेही खूपदा झालेले आहे, की पुरेशी लेव्ही शेतात पिकली नाही, तर त्या शेतकऱ्याला खुल्या बाजारातून, म्हणजेच १ रु. ५० पैसे किलो दराने, लेव्हीसाठी कमी पडणारी ज्वारी खरेदी करावी लागे. त्यासाठी भुईमूग, मिरची वा इतर कुठले उत्पादन येईल त्या भावाने विकावे लागे, प्रसंगी घरातला एखाददुसरा दागदागिनाही विकावा लागे; पण कुठल्याही परिस्थितीत त्याला लेव्ही भरावीच लागे. नाहीतर सरळ त्याच्या घरावर जप्ती येत असे.

साखरेचे उदाहरणही जोशींनी दिले होते. उसाचा उत्पादनखर्च एका टनाला २८८ रुपये असताना शेतकऱ्याला सहकारी साखर कारखाने फक्त १४२ रुपये भाव देत होते. पण पुन्हा बहुसंख्य सहकारी साखर कारखानेदेखील अडचणीतच होते. कारण साखरेचा उत्पादनखर्च एका किलोला चार रुपये असूनही सरकार मात्र त्यांच्याकडून लेव्हीच्या स्वरूपात ६५ टक्के साखर फक्त किलोला दोन रुपये बारा पैसे या दराने खरेदी करत असे.

हे सगळे का? तर गरिबांना साखर स्वस्तात मिळावी म्हणून. पण जोशींच्या मते या देशात जे खरे गरीब आहेत ते स्वस्तात मिळत असली तरी साखर खात नाहीत – खाऊच शकत नाहीत. आठवड्यातून एखाद दिवशी कुठे गूळ दिसला तर नशीब! मग गरीब कोण, की ज्यांच्याकरिता सरकारला साखर लागते? शहरातले झोपडपट्टीत राहणारे गरीबसुद्धा साखरेचा भाव १५-१६ रुपये किलो झाला तेव्हा खूष होते; कारण रेशनकार्डावर त्यांना २ रुपये ८८ पैसे दराने मिळालेली साखर घेऊन ते ती खुल्या बाजारात बारा रुपये किलो भावाने विकू शकत होते व मधल्यामध्ये स्वतःसाठी किलोमागे आठ-नऊ रुपये फायदाही मिळवू शकत होते. विशेष म्हणजे, गिऱ्हाइकालासुद्धा ती खुल्या बाजारापेक्षा ३-४ रुपये कमी दरातच मिळत

होती. त्यामुळे तोही अशी स्वस्तात साखर मिळाली तर खूष असायचा! नुकसान व्हायचे ते अंतिमतः शेतकऱ्याचे; कारण स्वतःलाही सरकारकडून पुरेसा भाव मिळत नाही, असे सांगून कारखाने शेतकऱ्याला त्याचा उत्पादनखर्च भरून निघेल इतकाही भाव देत नसत. जोशी विचारतात,

''मग सरकार नेमक्या कुठल्या गरिबांकरिता ही स्वस्तातली साखर लेव्ही म्हणून वसूल करते?''

यामागे शहरातील लोकांना खूष ठेवायचे आणि शेतकऱ्याचे मात्र नुकसान करायचे, हेच सरकारी धोरण आहे असे जोशी म्हणतात. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते औषधांचे उदाहरण देतात. ते म्हणतात,

''गरिबांना साखर स्वस्त मिळावी म्हणून तुम्ही जर साखर कारखान्यांवर लेव्ही लावता, तर औषधांच्या कारखान्यांवर लेव्ही का लावत नाही? औषधांपेक्षा साखर अधिक जरुरीची गोष्ट आहे काय? साखर खायला मिळाली नाही म्हणून कोणी मेल्याचं उदाहरण नाही. पण ज्या औषधांमुळे जीव वाचतो, अशा औषधांवरसुद्धा लेव्ही नाही. पण साखरेवर लेव्ही आहे!''

शेतीमालाची तूट असते तेव्हाचा हा प्रकार. आणि जेव्हा शेतीमाल मुबलक तयार होतो, तेव्हा मात्र सरकार बांधीव दराने खरेदी करत नाही, तर बाजारातल्या लिलावात जो भाव ठरेल त्याच भावाने खरेदी करते.

उदाहरणार्थ, ऐंशी साली ज्वारीचे पीक मुबलक आले व भाव पडले. पण त्यावेळी मात्र सरकारने जुन्या, स्वतःच ठरवून दिलेल्या लेव्हीच्या ६८ पैसे किलो भावाने ज्वारी खरेदी केली नाही, तर बाजारात त्यावेळी जो ६५ पैसे किलो भाव होता, त्याच कमी भावाने ही लेव्हीची ज्वारीही खरेदी केली.

साखरेच्या बाबतीतही हेच घडले. १९७९ साली साखरेचे उत्पादन मुबलक झाले आणि ताबडतोब सरकारने लेव्हीच्या (रुपये २.१६ किलोला) दराने साखर खरेदी करणे थांबवले आणि कोसळलेल्या बाजारभावातच साखर खरेदी केली. त्यामुळे सरकारने साखरेचे भाव किलोला एक रुपया साठ पैशांवर आणून ठेवले. अनेक शेतकऱ्यांना ऊस चक्क जाळावा लागला. कारण तो तोडून कारखान्यात भरण्याची मजुरीही त्यांना परवडणार नव्हती.

'तूट असेल तर लूट आणि मुबलकता असेल तर लिलाव' ह्या सरकारी धोरणाचे प्रत्यंतर निर्यातधोरण ठरवताना हमखास यायचे. उदाहरणार्थ, भुईमुगाचा भारतातील भाव किलोला रुपये २.६० असताना युरोपात त्याला रुपये आठने गिऱ्हाइके होती. किंवा भारतात ज्वारीचा भाव रुपये १.१३ असताना मध्यपूर्वेत ती रुपये २.३०ला जाऊ शकत होती. कांद्याच्या बाबतीत तर हे फारच होते. चाकणला २० पैसे किलो भाव असताना परदेशात तो नऊपट भावाने, म्हणजे किलोला रुपये १.८० भावाने जाऊ शकत होता. पण ह्या बाबतीत सरकारी धोरण अतिशय लहरी व मुख्यतः शहरी ग्राहकाची सोय पाहूनच ठरायचे.

अर्थात ह्याचे मूळ कारण शेतकऱ्याला उचित दाम मिळू नये हाच शासकीय धोरणाचा

अधिकृत भाग होता हेही नंतर जोशींनी दाखवून दिले. ऊस आंदोलनाविषयी लिहिताना तो सारा भाग विस्ताराने आलाच आहे.

म्हणूनच शेतकरी गरीब आहे ह्याबद्दल जोशी मुख्यतः चुकीच्या सरकारी धोरणांना जबाबदार धरतात; गावोगावच्या सावकारांना वा जमीनदारांना ते त्याबद्दल दोषी धरत नाहीत. जोशींच्या मते त्यांच्याविरुद्ध द्वेष पसरवण्याचे काम अनेक विचारवंतांनी व विशेषतः साम्यवादी नेत्यांनी वर्षानुवर्षे केले आहे. जणू काही त्यांच्या शोषणामुळेच शेतकरी दरिद्री राहिला आहे! काही आंदोलनांत त्यांचे प्राणही घेतले गेले. जोशी म्हणतात,

''शेतकऱ्यांच्या दुःखाचं खरं मूळ दीडदमडीच्या सावकार, जमीनदारांत नाही. वाघाने शिकार मारल्यानंतर त्यावर हात मारणाऱ्या खोकडांपलीकडे त्यांना काही महत्त्व नाही. पण आजवर शेतकरी आंदोलनांना आर्थिक विचार, ऐतिहासिक तत्त्वज्ञान नसल्यामुळे त्यांची दिशा चुकली. कुत्र्याला कोणी दगड फेकून मारला, की ते कुत्रं धावत जाऊन चेवाचेवाने दगडालाच चावतं, तसं ह्या शेतकरी आंदोलनांचं झालं. जेव्हा जेव्हा ग्रामीण भागात उद्रेक उभे राहू लागले, तेव्हा तेव्हा ते ग्रामीण भागातीलच एखाद्या घटकाविरुद्ध – सावकार, जमीनदार, एखादी जात, एखादी पात, एखादा धर्म यांच्याविरुद्ध वळवून देण्यात आले. प्रचंड ताकदीच्या पहिलवानास लहान पोराने जणू चलाखीने फसवलं!''

'शेतकरी तितुका एक एक' हे जोशींचे एक महत्त्वाचे सूत्र होते. आपल्या कार्यकर्त्यांच्या मनावर ते पक्के बिंबवायचा जोशींनी प्रयत्न केला. धर्म, जात, भाषा, राज्य ह्यांवर उभे राहणारे कुठलेही तत्त्वज्ञान हा क्षुद्रवाद आहे; आपले आंदोलन हे पूर्णतः अर्थवादी आहे; साचलेल्या पाण्यात किडे साठतात, तसे विकास खुंटलेल्या समाजात हे सगळे क्षुद्रवाद निर्माण होतात; आपण त्यांपासून नेहमीच दूर राहायचे, असे ते म्हणत.

छोटा शेतकरी-मोठा शेतकरी हा भेदही त्यांना अमान्य होता. त्यांच्यामते एखाद्याची शेती ६० एकर असली व त्याला तीन मुले असतील तर प्रत्येकाच्या वाट्याला २० एकरच उरतात आणि त्यांना पुन्हा प्रत्येकी दोन मुले झाली, की प्रत्येकाचा वाटा फक्त १० एकराचा उरतो, पुढच्या पिढीत तोही कमीच होतो. आजोबा बागाइतदार, बाप मोठा शेतकरी, मुलगा छोटा शेतकरी आणि नातू शेतमजूर असाच (जर ह्यांपैकी कुणी शेतीतून बाहेर पडून दुसरा काही व्यवसाय करू लागले नाही तर) बहुतेकदा प्रकार असतो. त्यामुळे जवळ जवळ सगळे भारतीय शेतकरी हे अल्पभूधारकच आहेत असे ते म्हणतात.

शेतकरी व शेतमजूर हा भेदही ते स्वानुभवाच्या आधारावर अमान्य करतात. मुळात छोटा शेतकरी हाच केव्हातरी आपली शेती गमावून बसतो व शेतमजूर बनतो; त्यामुळे त्यांच्यात मूलगामी असा काही भेद नसतोच. शेतकरी व शेतमजूर ह्यांच्यात त्यामुळेच सामंजस्याचे नाते असते, स्वतः शेतकरी व त्याचे कुटुंबही ह्या शेतमजुराबरोबर शेतावर राबत असते, बांधावर बसून सगळे एकत्रच भाकरी खात असतात. आंबेठाणच्या शेतीत त्यांनी हे अनुभवलेच होते. स्वतःच्या फायद्यासाठी काही विचारवंत हा कृत्रिम भेद निर्माण करतात. जोशी म्हणतात,

''शेतकरी विरुद्ध शेतमजूर हा भेद निर्माण करायचा आणि आपण शेतमजुराच्या बाजूला आहोत असं दाखवायचं, हा विचारवंतांचा भंपकपणाच असतो. त्या तथाकथित शेतमजुराविषयीदेखील त्यांना खरंतर काहीच जिव्हाळा नसतो. स्वतःच्या घरात हेच विचारवंत आपल्या मोलकरणीशी कसं वागतात ते एकदा बघा! तिला चहा देतानादेखील ते तो कुठल्यातरी जुन्या, कानतुटक्या कपातून देतात आणि जिन्याखालच्या एखाद्या कोपऱ्यात बसून प्यायला लावतात! अशा लोकांनी उगाच शेतकरी विरुद्ध शेतमजूर असा खोटा वाद पेटवू नये!''

'शेतकरी तितुका एक एक' असे म्हणताना आपले आंदोलन ग्राहकविरोधी नाही हेही जोशी ठासून सांगतात. शेतीमालाचे भाव वाढले म्हणजे पर्यायाने महागाई वाढत जाईल, असे शहरी मध्यमवर्गीयांना वाटत असते. शेतकरी आणि ग्राहक यांच्यात भांडणे लावून द्यायचा प्रयत्न काही राजकारण्यांकडून वरचेवर होत असतो. अशा वेळी उत्पादक शेतकरी हाही एक ग्राहकच आहे, आपल्या शेतात काढलेली दोन-चार पिके सोडली तर बाकी सगळ्या गोष्टी तोही इतर सर्वांप्रमाणे बाजारातूनच खरेदी करत असतो ह्या मुद्द्यावर ते भर देतात.

या संदर्भात आणखी एका गोष्टीकडे जोशी लक्ष वेधून घेतात. ती म्हणजे बहुतेक ग्राहकोपयोगी वस्तूंच्या एकूण विक्रीमूल्यात कच्च्या मालाचा खर्च हा अगदी नगण्य घटक असतो. उदाहरणार्थ, दीडशे रुपयांच्या कपड्यामागे कापसावरचा खर्च फक्त पंधरा रुपये असतो अथवा एकशे दहा रुपयांच्या विड्यांमागे तंबाखूवरचा खर्च फक्त पाच रुपये असतो. त्यामुळे कच्च्या मालाची किंमत वाढली तरी एकूण तयार वस्तूंच्या किमतीत फारशी वाढ व्हायचे काहीच कारण नाही. मुळातच ह्या तयार वस्तूंची विक्रीची किंमत इतकी भरमसाट आहे, की कच्चा माल खरीदण्यासाठी थोडे अधिक पैसे मोजावे लागले, तरी एकूण विक्रीच्या किमतीत अगदी नगण्य फरक पडेल.

शेतीमालाला रास्त दाम हवा ही आपली मागणी चलनवाढीला (व पर्यायाने भाववाढीला) कारणीभूत ठरेल हे काही अर्थशास्त्र्यांचे म्हणणे जोशी खोडून काढतात. त्यांच्या मते ही चलनवाढ फक्त शेतीमालाचे भाव वाढल्यामुळे होते असे नसून, कर्मचाऱ्यांचे व कामगारांचे पगार सतत वाढत असल्यामुळेही ती होत असते. शिवाय त्यांना महागाईनुसार वाढणाऱ्या महागाईभत्त्याचे कवच असते, जे शेतकऱ्यांना नसते. ते म्हणतात,

''चलनवाढीच्या पुराचे पाणी वाढतच आहे. शेतकरी सोडून बाकी सगळे पाण्याच्या पातळीबरोबर तरंगत वर चढू शकतात. शेतकऱ्याचे पाय मात्र खाली बांधून ठेवले आहेत. त्याच्या खांद्यावर उभे राहून इतर सर्व आपली डोकी पाण्याच्या वर ठेवत आहेत आणि तोही वर आला तर आपण बुडू, म्हणून ओरडा करत आहेत.''

ह्या शिबिरांत आपल्या आंदोलनतंत्राची विस्तृत चर्चा जोशींनी केली. सरकारची शक्ती किती प्रचंड आहे ह्याची पूर्ण कल्पना त्यांना होती. ते म्हणतात,

''दोन लाख माणसं रस्त्यातून काढणं पोलिसांना अजिबात कठीण नाही. त्यांना त्याचं शिक्षण मिळालेलं असतं. ११ नोव्हेंबरच्या रात्री पोलिसांनी आग्रा रोडवरची दोन लाख माणसं अत्यंत कार्यक्षमतेनं रस्त्यातून बाजूला केली. त्यांनी दहा गाड्या हमालांच्या आणि दहा एसआरपींच्या रस्त्यातून फिरवल्या. दहा गाड्यांतून अडीचशे हमाल उतरायचे आणि रस्त्यावरचे दगड, झाडं जे काय असेल ते भराभर बाजूला करायचे. दुसऱ्या दहा गाड्यांतून तितकीच एसआरपींची माणसं खाली उतरायची आणि सत्याग्रहींच्यामधून फिरत, त्यांच्या डोक्यात काठी घालून त्यांना बाजूला करत. त्यांनी झोपलेल्या सत्याग्रहींनाही झोडपलं. सायकलींची, मोटारसायकलींची त्यांच्यावर मोठमोठे दगड घालून मोडतोड केली. अशा पद्धतीने ते सबंध रस्त्यात झोडपत झोडपत गेले. तेव्हा आपण रस्ता कायमचा अडवून ठेवू शकू ही कल्पना चुकीची आहे.''

म्हणूनच कुठल्याही प्रकारच्या हिंसेच्याविरुद्ध ते आपल्या कार्यकर्त्यांना सतत सावध करतात. ते म्हणतात,

''चौरीचौराचं आंदोलन महात्मा गांधींनी मागे घेतलं होतं ते ह्याच भूमिकेतून. आपल्याला रजपूत राजांसारखं 'जय एकलिंगजी' म्हणत सगळं सैन्य खलास करायचं नाही, तर आपली ताकद सांभाळत गनिमी काव्याने लढायचं आहे. लोकांना उगाच भडकवून द्यायचं, दगड फेकायचे आणि त्याला आंदोलन म्हणायचं यावर माझा विश्वास नाही. सतत कुठल्या ना कुठल्या मुद्द्यावर आंदोलन चालूच ठेवायचे, यालाही काही अर्थ नाही. आमचं आंदोलन म्हणजे काही सर्कस नाही, की दररोज चार वाजता तिचा खेळ झालाच पाहिजे!

''आंदोलनात प्रत्येक वेळी अगदी जीव ओवाळून टाकायची आवश्यकता नसते. आंदोलन हे आपलं उद्दिष्ट नाही, ते आपलं साधन आहे. त्यामुळे आंदोलन चालू करण्यापूर्वी वाटाघाटी करण्याच्या सर्व शक्यता अजमावून पाहिल्या पाहिजेत. आपल्या आंदोलनतंत्राबद्दल स्वतः शेतकऱ्याची काहीच तक्रार नाही; पण त्या आंदोलनाचा फायदा घेऊन आग भडकवायला व तिच्यावर स्वतःची पोळी भाजून घ्यायला जे टपलेले असतात, त्यांचाच थयथयाट चालू असतो! आपलं आंदोलन हे आर्थिक आंदोलन आहे, ते पोटाच्या खळीतून निर्माण झालेलं आंदोलन आहे. आंदोलनात बळी पडलेल्या माणसांच्या घरी जाण्याचा ज्यांच्यावर प्रसंग आला आहे, त्यांच्यापैकी कुणीही कधीच म्हणणं शक्य नाही, की काय वाटेल ते झालं तरी चालेल, पण आंदोलन चालूच राहिलं पाहिजे. असं म्हणणं बेजबाबदारपणाचं होईल.''

म्हणूनच योग्य वेळी आंदोलन स्थगित करायला जोशींनी कधीच मागेपुढे पाहिले नाही. उदाहरणार्थ, २८ जून १९८२ रोजी सुरू झालेले दूध आंदोलन. नाशिक, पुणे, सातारा, सांगली, धुळे, जळगाव या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. निदान पन्नास टक्के शेतकऱ्यांनी सोसायट्यांना दूध घातले नाही. गावातच लोकांनी दुधाचा वापर केला; खवा, तूप वगैरे पदार्थ बनवले. मुंबईत जेव्हा दूध पुरवठा कमी पडू लागला, तेव्हा शासनाने परदेशातून मागवलेली दूध भुकटी आणि फॅट वापरून ती तूट भरून काढली.

गुजरातमधूनही जास्त दूध मागवले गेले. शेवटी आपला पराभव मान्य करून संघटनेने चौथ्या दिवशी दूध आंदोलन मागे घेतले. दूध-भात आंदोलनही असेच मागे घ्यावे लागले होते. स्वतःच्या प्रतिष्ठेपोटी शेतकऱ्यांना अडचणीत टाकण्याचा प्रकार जोशींनी कधीही केला नाही.

शेतकरी संघटना उभी राहिली हा खरे तर एक चमत्कारच होता. कामगारांची संघटना उभारणे तुलनेने सोपे असते. कंपनीच्या मेन गेटवर उभे राहिले की सगळ्यांशीच संपर्क साधता येतो. सगळ्यांच्या यायच्या आणि जायच्या वेळा ठरलेल्या. कामाची जागा एकत्र, परस्परसंपर्क कायमच. कामाचे स्वरूपच असे की एकत्र येणे, संघटित होणे सोपे. सर्वांचा शत्रू समान – तो म्हणजे मालक आणि त्याचे व्यवस्थापन. शिक्षणाचे व समृद्धीचे प्रमाणही अधिक. कामगार संघटनांना इतिहासही मोठा, परंपराही रुळलेल्या.

यांतला कुठलाच घटक शेतकऱ्यांना लागू पडणारा नव्हता. सगळेच अल्पशिक्षित, गरीब, विखुरलेले, एकमेकांपासून स्वभावतःच दुरावलेले. कुठल्याही गावात जा – हद्दीवरून दोन शेजाऱ्यांमध्ये भांडण नाही असे गाव सापडणे अवघड. जमिनीवरून अगदी सख्खे भाऊही एकमेकांच्या जिवावर उठलेले. सगळ्यांच्याच कोर्टात तारखा पडलेल्या. गावात अनेक गट, तट. जाती-धर्म यांचे भेद पूर्वापार चालत आलेले. कामाचे स्वरूपही एकत्र यायला पूरक नाही. प्रत्येक जण स्वतंत्र काम करणारा, स्वतंत्र शेती करणारा. अशा शेतकऱ्यांची कधी इतकी व्यापक अशी संघटना उभारता येईल हे कोणालाच शक्य कोटीतले वाटले नव्हते. एकवेळ कुत्र्याचे शेपूट सरळ होईल किंवा तळहातावर केस उगवतील, पण शेतकरी एकत्र येणार नाहीत असे अनेक राजकीय नेते व विचारवंत म्हणत. 'शेतकरी म्हणजे बटाट्याचे पोते – कितीही एकत्र आणले तरी जरा भोक पडताच सगळे बटाटे इकडेतिकडे विखरून जाणार,' हे कार्ल मार्क्सचे उद्गार अनुभवसिद्धच होते. अशाही परिस्थितीत एका विचारावर जोशींनी लाखो शेतकरी एकत्र आणले हे यश अभूतपूर्व आहे.

आपल्या प्रयोगाच्या अनन्यसाधारणत्वाची जोशींनाही जाणीव होती आणि म्हणूनच कदाचित त्यांनी शेतकरी संघटनेला बांधीव असे घटनाबद्ध रूप द्यायचा कधी प्रयत्न केला नाही. संघटनेची पहिली कार्यकारिणीदेखील नाशिक येथे २७ मे १९८४ रोजी तयार झाली – म्हणजे संघटना स्थापन झाल्यावर पाच वर्षांनी. 'खिशात हात घालील तो खजिनदार, लाठी खाईल तो कार्यकर्ता' हीच संघटनेची भूमिका होती. संघटनेची अधिवेशनेदेखील दर वर्षी भरत नसत; आंदोलनाच्या गरजेनुसार ती भरत. कुठल्याही प्रकारच्या घटनात्मक औपचारिकतेत जोशींना अडकून पडायचे नव्हते.

संघटनेचे एकूण स्वरूप हे असे कायमच लवचीक होते. आपला हा विचार कालातीत नाही, उद्या शेतकरी स्वतःच्या पायावर उभे राहिले तर शेतकरी संघटनेची गरजही उरणार नाही असेही जोशी म्हणत. संघटनेची काहीही मालमत्ता कधीही नव्हती – इमारती नव्हत्या, मोटारी नव्हत्या, पगारी कर्मचारी नव्हते. आंबेठाणचा अंगारमळा आणि पुण्यातील जोशींचे राहते घर इथूनच संघटनेचा सगळा कारभार चालायचा. कुठल्याही कार्यक्रमाचा खर्च कमीत कमी कसा

राहील ह्याची दक्षता घेतली जायची. अगदी लाखालाखाची सभा असली, तरी व्यासपीठ म्हणून एखादा उंचवटा बघायचा व त्यावर तात्पुरते स्टेज उभारायचे; बाकी शामियाना, सुसज्ज मांडव वगैरे प्रकार फारसा नसायचा. शेतकरी नेहमीच आपली भाकरी स्वतः बांधून आणायचे किंवा ज्या ठिकाणी कार्यक्रम असायचा तिथले स्थानिक लोक ती जबाबदारी घ्यायचे. त्यातूनही जो काही थोडाफार खर्च व्हायचा, तो कार्यकर्ते त्या-त्या वेळी आपापसांत पैसे गोळा करून भागवायचे.

नेता बनण्यासाठी जोशींनी कधी पारंपरिक उपायांचाही अवलंब केला नाही. अन्य नेत्यांप्रमाणे त्यांनी कधीच खादीचा कुर्ता-पायजमा घातला नाही; आपली जीन आणि पांढरा मनिला किंवा टी-शर्ट हाच पोशाख कायम ठेवला. आपण खूप कार्यमग्न आहोत असा आभास निर्माण केला नाही; प्रतिमानिर्मिती केली नाही. त्यांच्या अवतीभवती पीए, शिपाई वगैरेंचे जाळे कधीच नसे. सर्व पत्रव्यवहार ते स्वहस्तेच करत; फोन स्वतःच करत व कोणाचा आला तरी स्वतःच रिसिव्हर उचलत. कुठल्याही कार्यकर्त्याला अगदी सहज भेटत. त्यामागे कुठचाही नाटकी आविर्भाव नसे. एवढेच नव्हे तर आपल्या कार्यकर्त्यांच्या घरच्या कार्याला वा मयताला आवर्जून हजर राहावे असा अट्टहासही त्यांनी कधी ठेवला नाही. अगदी आंदोलनात जखमी झालेल्या एखाद्या कार्यकर्त्यालाही बघायला ते ताबडतोब जातीलच असे नसायचे. म्हणजे शक्य तेव्हा ते जायचे, नाही असे नाही, पण इतर काही महत्त्वाचे काम निघाले, तर आज जनसंपर्कासाठी अत्यावश्यक मानल्या गेलेल्या असल्या औपचारिकतेला त्यांनी खूपदा फाटाही दिला. पण त्यांची शेतकरीहिताची कळकळ इतकी उघड असे, की त्यांच्याविषयी कोणाही कार्यकर्त्याचे गैरसमज होत नसत.

त्यांचे भाषणही कृत्रिम चढउतारांनी, घोषणाबाजीने रंगवलेले नसे. ते उगाचच ग्रामीण ढंग बोलण्यात आणत नसत; प्रमाणभाषाच वापरत. संथ, गंभीर आवाजात बोलत. ते नेहमीच उत्स्फूर्त बोलत. मुद्दे लिहिलेल्या कागदाचा किंवा अन्य कुठला आधार घेऊन त्यांनी कधीही भाषण केले नाही. पण त्यांचे बोलणे इतके मनापासूनचे असे, की ते शेतकऱ्यांच्या अंतःकरणाला थेट भिडत असे. विचारच इतके स्पष्ट, प्रभावी असत, की अन्य सजावटीची वा वक्तृत्वतंत्राची गरज भासत नसे. त्यांच्यावर जितके प्रेम शेतकऱ्यांनी केले तितके क्वचितच कधी कोणाला लाभले असेल.

इथे एक गोष्ट स्पष्ट करायला हवी. शेतकऱ्याच्या व पर्यायाने एकूणच भारताच्या दारिद्र्याचे मूळ हे कोरडवाहू शेतीत आहे ह्याची जाणीव खरे तर स्वित्झर्लंडमध्ये असतानाच जोशींना झाली होती. मग भारतात येऊन तीन वर्षे प्रत्यक्ष शेती केल्यामुळे नेमके काय साध्य झाले?

त्यातून बहुधा दोन महत्त्वाच्या गोष्टी साध्य झाल्या असाव्यात –

पहिली म्हणजे, शेतीत भरपूर भांडवल गुंतवले, खते-औषधे वापरली, जिवापाड मेहनत घेतली तरीही भारतातली शेती किफायतशीर होत नाही हे त्यांना कळून चुकले. वैचारिक

पातळीवर त्यांना जे आकलन झाले होते, ते त्यांच्या स्वतःच्या मनात स्वानुभवातून अधिक खात्रीपूर्वक सिद्ध झाले. आपल्या विचारांवरची त्यांची निष्ठा त्यामुळे कमालीची दृढ झाली. कुठलाही विचारवंत, कुठलीही अन्य मांडणी आता त्यांच्या ह्या वैचारिक निष्ठेला धक्का पोचवू शकणार नव्हती. पुढील आयुष्यात त्यांना भेटणाऱ्या अनेकांना त्यांचा हा विचारांचा ठामपणा – जो काही जणांना अहंकार वाटत असे तो – प्रकर्षाने जाणवत असे.

दुसरी गोष्ट म्हणजे, प्रत्यक्ष शेतकऱ्याशी आता ते पूर्णतः समरस होऊ शकत होते; कारण अनुभवाच्या ह्या समान धाग्याने आता त्यांना शेतकऱ्यांशी जोडले होते. अन्य अर्थतज्ज्ञ आणि शरद जोशी ह्यांच्यातील हा एक फार महत्त्वाचा फरक होता. त्यांचे आकलन आता केवळ मेंदूच्या पातळीवर नव्हते; शेतात स्वतः गाळलेला घाम, चिखलात स्वतः बरबटून घेतलेले हात, आकाशाकडे डोळे लावून स्वतः केलेली पावसाची प्रतीक्षा, बाजारपेठेत आपल्या मालाला किती भाव मिळेल ह्याची रात्रंदिवस स्वतः वाहिलेली काळजी ह्या सगळ्याची आता ह्या आकलनाला जोड मिळाली होती. शेतकऱ्याबरोबर साधलेल्या ह्या भावनिक ऐक्यामुळेच हा ऐषारामात जगलेला विचारवंत एकाएकी तापलेल्या रस्त्यावर बसून रस्ता रोको करू शकला, शेतकऱ्यांना अधिक भाव मिळावा म्हणून उपोषण करू शकला, असंख्य अडचणी सहन करत खेडोपाडी भाषणे देत फिरू शकला. मानसन्मान, प्रसिद्धी, कीर्ती, पैसा लाभेल की नाही ह्या सगळ्याचा विचारही त्या रणरणत्या उन्हात पायपीट करताना, रस्त्यावर मांडी ठोकून बसताना त्यांच्या मनाला शिवला नाही. त्यामुळेच जन्माने ब्राह्मण असलेला, शिक्षणाने अर्थतज्ज्ञ असलेला, कर्माने उच्च नोकरशहा असलेला, वृत्तीने विचारवंत असलेला आणि घराण्यात शेतीची काहीही पार्श्वभूमी नसलेला हा माणूस लक्षावधी शेतकऱ्यांचे पंचप्राण बनू शकला.

शेतकरी संघटनेने आपला कार्यक्रम फक्त एक-कलमी ठेवला – शेतीमालाला उत्पादनखर्च भरून निघेल असा रास्त भाव मिळवणे. शासनाकडे ते रास्त भावाची मागणी करतात तीदेखील आज तो शेतकरी अगदी खचला आहे, शक्तिहीन झाला आहे, पराधीन बनला आहे म्हणून; आणि मुख्य म्हणजे त्याचा सर्व शेतीव्यवसाय सरकारच्याच नियंत्रणाखाली आहे म्हणून. मरणोन्मुख रुग्णाला सलाइनवर ठेवावे तसाच हमीभाव हा तात्पुरता उपाय आहे. अंतिमतः त्यांना हवे आहे ते घामाचे रास्त दाम. अनुदान, करुणा यांवर त्यांचा विश्वास नाही. त्यांची खात्री आहे की एकदा हा शेतकरी स्वतःच्या पायावर उभा राहिला, की मग त्याला कुठल्याही कुबड्यांची गरज पडणार नाही. आपला हा मुद्दा जोशींनी अनेकदा मांडला आहे.

समाजापुढे तसे असंख्य प्रश्न असतात – बेरोजगारी, प्रदूषण, निरक्षरता, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार इत्यादी; पण आपण सध्या ह्या एकाच मुद्द्यावर लक्ष केंद्रित करायला हवे, कारण एकदा आपण तो भाव मिळवला, की मग त्यातून येणाऱ्या समृद्धीमुळे आपले अनेक इतर प्रश्न सुटणार आहेत, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. ते म्हणतात,

"हे शेतीतले दारिद्र्य जोपर्यंत हटत नाही, तोपर्यंत इतर समस्यांबद्दल तुम्ही ओरडत राहिलात, तर तुम्ही तुमची ताकद फुकट दवडता. देशाच्या शरीरातलं सगळं रक्त बिघडलं आहे. त्यामुळे अंगभर फोड आलेत. एकेका फोडाला मलमपट्टी करत बसून उपयोग नाही. त्यानं जरा बरं वाटेल, पण एक फोड बरा होतो असं वाटतं, तोवर नवीन पाच फोड निर्माण होतात. तेव्हा तात्पुरत्या मलमपट्ट्यांऐवजी रक्तदोषान्तकच घ्यायला हवं. त्याचप्रमाणे अन्याय, दुःख यांचं निवारण करायचं असेल, तर त्याचं मूळ कारण दारिद्र्य आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. आणि ते हटवायचं असेल, तर इतर कोणतेतरी उपाय योजण्याऐवजी शेतीमालाचा उत्पादनखर्च शास्त्रशुद्ध पद्धतीने काढून त्याप्रमाणे शेतीमालाला रास्त भाव दिले गेले पाहिजेत."

शेतीमालाला उचित दाम मिळाला, की शेतकऱ्याचे दारिद्र्य दूर होईल व देशातील ७० टक्के जनता शेतीवर अवलंबून असल्याने, त्याचे दारिद्र्य दूर होणे म्हणजेच एकूण देशाचे दारिद्र्य दूर होणे, हा त्यांचा ठाम विश्वास आहे. हा मुद्दा त्यांनी वेळोवेळी विस्ताराने मांडला आहे.

शेतकऱ्याच्या हातात थोडाफार पैसा येऊ लागला, की तो आपली शेती सुधारू शकेल, विहीर खणू शकेल, बांधबंदिस्ती सुधारू शकेल. अधिक चांगले बियाणे वापरून अधिक विक्रीयोग्य उत्पन्न काढू शकेल. ट्रॅक्टर, ड्रिप, जर्सी गाई, अधिक मोठी शेती खरेदी करू शकेल. अतिरिक्त पैसे भांडवल म्हणून गुंतवून त्याला किंवा त्याच्या मुलाला शेतीव्यतिरिक्त असा काही ना काही उद्योग सुरू करता येईल. कोणी पिठाची गिरणी काढेल, कोणी खारवलेले शेंगदाणे बनवेल, कोणी मिरच्यांची भुकटी करून विकेल; एक ना दोन, अक्षरशः हजारो छोटे छोटे उद्योग सुरू होऊ शकतील. त्यातून ग्रामीण भागात रोजगार निर्माण होतील, दुकानदारी वाढेल. शहरांवरचे ताण कमी होतील, कारण पोटासाठी स्थलांतर करायची तितकी आवश्यकता राहणार नाही. शेतकऱ्यांना ऐपत आली, की आपोआपच गावातही चांगल्या शाळा, चांगले दवाखाने, चांगली करमणुकीची साधने निघतील. ग्रामपंचायतींचे उत्पन्न वाढले, तर गावातले रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज वगैरे सगळे सुधारता येईल.

ग्रामीण भागात वाढती क्रयशक्ती आली, की एकूण बाजारपेठेचा विस्तार झाल्याने कारखान्यांत बनलेल्या मालाचा खपही वाढेल. 'इकॉनॉमी ऑफ स्केल'मुळे वस्तूंची किंमतही आपोआप कमी होईल. देशातील सध्याच्या दुय्यम प्रतीच्या हाय-कॉस्ट अर्थव्यवस्थेऐवजी उच्च प्रतीची लो-कॉस्ट अर्थव्यवस्था आकाराला येईल. आपली स्पर्धात्मकता वाढल्याने आपला आंतरराष्ट्रीय व्यापारही वाढेल. एकूणच साऱ्या ग्राहकांना कमी दरात अधिक चांगला व अधिक नावीन्यपूर्ण, वैविध्यपूर्ण माल मिळू शकेल.

स्वित्झर्लंडमध्ये असताना ग्रामीण उद्योगधंदे कसे उभे राहिले आणि त्यातून एकूण देशाच्या विकासाला कशी चालना मिळाली, हे त्यांनी बघितले होते. जपानसारख्या अनेक देशांतही हे घडल्याचे त्यांना ठाऊक होते. म्हणूनच हे भारतातही होऊ शकते ह्याची त्यांना खात्री होती.

मुख्य म्हणजे शेतीतील समृद्धीतून शेतकऱ्याच्या श्रमाला मोल प्राप्त होईल. जोशी म्हणतात,

''आज शेतकऱ्याचा सहा वर्षांचा मुलगा सकाळी उठून शेण गोळा करायला जातो, पण त्याच्या श्रमाचे काही मूल्य धरले जात नाही. शेतकऱ्याच्या घरातील पोक आलेली सत्तर-ऐंशी वर्षांची म्हातारी खुरपे घेऊन शेतात काम करते. कारण तिच्या मनामध्ये धाक आहे, की आपला पोरगा इतका काही परिस्थितीने गांजून गेलाय, की कदाचित चिडून एक दिवस म्हणायचा, 'म्हातारे, तू मरतसुद्धा नाहीस – फुकट खात्येस!' पण तिच्या शेतातल्या त्या कष्टाला आज काहीच मोबदला नाही.''

ही सारी परिस्थिती शेतीमालाला उचित भाव मिळू लागला की पालटेल. शेतकऱ्याच्या श्रमाला किंमत व प्रतिष्ठा प्राप्त होईल. येणारी समृद्धी म्हणजे एक प्रचंड आर्थिक व सामाजिक क्रांतीच असेल.

शेतकरी संघटनेचे तत्त्वज्ञान म्हणजे इतर बहुसंख्य संघटनांप्रमाणे इकडून तिकडून गोळा केलेल्या विविध मुद्द्यांची गोळाबेरीज नव्हती, अनेक चिंध्या एकत्र करून बांधलेले ते गाठोडे नव्हते. हा विचार म्हणजे एका धाग्याने विणलेले एकजिनसी महावस्त्र आहे, असे जोशी म्हणत. तो एक धागा होता 'शेतीमालाला रास्त भाव' हा एक-कलमी कार्यक्रम. अंतिमतः हा कार्यक्रम सर्वच जीवनक्षेत्रांना व्यापणारा आहे ह्याची पूर्ण खात्री असल्यामुळेच जोशी त्या काळात अन्य कुठल्याच उपक्रमात इच्छा असूनही सहभागी झाले नाहीत. अंधश्रद्धानिर्मूलन व विज्ञानप्रसार यांसाठी एक यात्रा महाराष्ट्रात काढली गेली होती व त्यात जोशींनी सामील व्हावे अशी विनंती त्यांना भोसरी तेथील विज्ञान यात्रा समितीने केली होती. त्यांना नकार कळवणाऱ्या आपल्या १ ऑक्टोबर १९८२च्या पत्रात ती भूमिका नेमकी प्रकट झाली आहे. त्यात जोशी लिहितात –

> शेतकऱ्यांविषयी बोलायचे झाले, तर त्यांच्या सर्व श्रद्धा शेतीच्या परिस्थितीवर अवलंबून आहेत. पावसाच्या अनिश्चिततेमुळे विज्ञाननिष्ठा अंगी बाणूच शकत नाही. शेतातील पीक आणि परिणामी कच्च्याबच्च्यांचे जीवन पावसाच्या पडण्या न पडण्यावर अवलंबून आहे, या जाणिवेने शेतीचा जुगार सतत खेळणारा शेतकरी विज्ञाननिष्ठा बुद्धीला पटली, तरी मनाला पटू देणार नाही. आधुनिक औषधोपचार जवळपास उपलब्ध नाही, असला तरी परवडत नाही. म्हणून जवळ असेल त्या वैदू-भोंदूंचे औषधपाणी करावे लागते. आपल्या प्रियजनांना उत्तमातील उत्तम औषधपाणी करणे आपल्याला जमले नाही, ही मनाला घरे पाडणारी जाणीव विसरण्यासाठी वैदू-भोंदूंच्या प्रभावाच्या कथा रचाव्या लागतात आणि स्वतःही त्यावर विश्वास ठेवावा लागतो. निसर्गाच्या लहरीपणामुळे होणाऱ्या पीकबुडीपासून शेतकऱ्याला संरक्षण मिळेल, म्हणजे वास्तविक उत्पादनखर्च भरून निघण्याची शाश्वती मिळेल, त्या दिवशी या प्रचंड ताकदीला विज्ञाननिष्ठा शिकण्याची गरजच राहणार नाही. लोकभ्रम, अंधश्रद्धा, वैदू-भोंदू तर दूर होतीलच; पण आजच्या सुशिक्षितांच्या शहरी मनाला प्रिय

असलेले योग, कुंडलिनी, साक्षात्कार, गीता, अनेक नामवंत तत्त्वज्ञ आणि संत यांनाही त्याचा झटका बसल्याशिवाय राहणार नाही.

देशापुढील समस्या मूलतः नैतिक आहेत, असेही जोशींना अजिबात वाटत नाही. किंबहुना, तशा भूमिकेचा त्यांनी प्रथमपासून उपहासच केला आहे. सामाजिक क्षेत्रातील अन्य व्यक्तींपेक्षा जोशींचे ते एक वेगळेपण आहे. शेतकरी संघटनेच्या तत्त्वज्ञानामध्ये 'शेतकरी संघटनेचे नैतिक दर्शन' यावर सुरुवातीपासूनच जोशींनी भर दिला आहे. अन्य कुठल्या संघटनेने नैतिकतेच्या मुद्द्यावर इतका भर दिल्याचे व मुख्य म्हणजे त्याचवेळी नैतिकतेचे महत्त्व कमी लेखल्याचे सहसा आढळणार नाही. ह्यात एक मोठाच अंतर्विरोध आहे हेही जाणवते. जोशींची भूमिका साधारण पुढीलप्रमाणे आहे :

> स्वार्थाचा त्याग करून दुसऱ्याचे भले करण्यात काही एक मोठेपण आहे असे बहुतेक काळात मानले गेले आहे. स्वार्थ ही सहजप्रवृत्ती आहे, तर स्वार्थ सोडून देण्याकडे सर्व महापुरुषांची शिकवण. जे दुर्लभ त्याची किंमत जास्त, या मागणी-पुरवठ्याच्या अर्थशास्त्रीय सिद्धांतानुसार परहितरत वर्तणुकीला अलोट महत्त्व मिळाले असावे.
>
> एकेकाळी मुंबईतील माणसे बसच्या रांगेची शिस्त कटाक्षाने पाळत. एका बसमध्ये जागा मिळाली नाही तर शांतपणे दुसरी बस येण्याची वाट पाहत थांबत. त्या काळी दिल्लीकर बस पकडताना पराकोटीची बेशिस्त आणि हुल्लड दाखवत असे. याचा अर्थ दिल्लीवाले कमी नीतिमान आहेत असा नाही. मुंबईच्या व्यवस्थेत एक बस गेली तरी दुसरी, ती नाही तरी त्या पुढची बस मिळण्याची जवळजवळ खात्री वाटत असे. दिल्लीत तर तशी आशाही नसे. यामुळे दोघांच्या वर्तणुकीत फरक पडतो.
>
> प्रचंड दुःख आणि यातना सोसून केवळ दुसऱ्याच्या भल्याकरिता मी हे दिव्य करीत आहे असे कोणी म्हटले, की माझ्या मनात भीतीच्या घंटा वाजू लागतात. असे वाटते, की या बोकेसंन्याशाच्या मनात काही क्षुद्र स्वार्थ आहे, ते तो धूर्तपणे लपवत आहे. मी हे माझ्या आनंदाकरिता करतो आहे, स्वार्थाकरिता करतो आहे, हे सांगण्यात कोणाला शरम का वाटावी? परार्थाची साखर पेरणारा क्षुद्र स्वार्थ साधतो. त्यापेक्षा स्वार्थी बना. जितक्या व्यापक अर्थांनी, जितक्या मार्गांनी आयुष्य परिपूर्ण करता येईल तितके करा. दुसऱ्याचे हक्क लाथाडू नका, परार्थ म्हणून नव्हे, निव्वळ स्वतःच्या आयुष्याची परिपूर्णता कमी होऊ नये म्हणून, अशी शिकवण ठीक. हीच खरीखुरी नैतिकता होईल.
>
> शेतकरी संघटना भविष्यातील आदर्श समाजाचे काहीच स्वप्न देत नाही; स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणे हा मार्ग सांगते, पण या कक्षा रुंदावत पोचायचे कुठे हेही सांगत नाही. नैतिकता ही कोणत्याही एका विवक्षित व्यवस्थेत नाही, ती

मार्गक्रमणात आहे, असे मानल्यानंतर आदर्शभूत समाज ही कल्पनाच अर्थहीन होते.

प्रत्येक छायाचित्राचा एक केंद्रबिंदू असतो. त्या बिंदूत प्रतिमा स्वच्छ आणि स्पष्ट असते. त्या बिंदूपासून जितके दूर जावे, तितकी प्रतिमेची गुणवत्ता कमी होत जाते. प्रत्येक छोट्या-मोठ्या विचारवंताच्या विचारपद्धतीचेही असेच असते. काही केंद्रबिंदूत त्यांना त्यांच्या काळाला व परिस्थितीला अनुरूप असा साक्षात्कार होतो. बुद्धिनिष्ठ सचोटी राखून आपला विचार तेवढयापुरताच मर्यादित ठेवावा हे आजपर्यंत थोराथोरांना जमलेले नाही. आपल्याला गवसलेल्या सत्यकणांच्या आधारे विश्वव्यापी पसाऱ्याला गवसणी घालण्याच्या मोहाला मोठे-मोठे बळी पडले आहेत. विश्वाला गवसणी घालण्याच्या प्रयत्नात त्यांनी स्वतःच्या पराभवाचा पाया घातला.

शेतकरी संघटनेची विचारपद्धती ही बुद्धिवादी, तर्ककठोर आहे. औद्योगिक व्यवस्थेच्या आर्थिक, सामाजिक समस्यांमुळे विकासाच्या, स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचा मार्ग कुंठित झाला किंवा कसे, आता पुन्हा एकदा तोंड फिरवून उलटी वाटचाल करणे अपरिहार्य आहे किंवा कसे, या चिंतेने त्रासलेल्या मनुष्यजातीला निदान आर्थिक अडथळ्यातून सोडवण्याचा मार्ग संघटनेने दाखवला आहे. ऊर्जा, नैसर्गिक साधनसंपत्ती यांच्या तुटवड्याचे प्रश्न मनुष्य आपल्या दुर्दम्य बुद्धिसामर्थ्यावर यथावकाश सोडवेल. अगदी सूर्य कोसळायला आला तर त्याच्या जागी मनुष्यनिर्मित सूर्य ठेवण्याचीही त्याची झेप आहे.

(*प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश* – भाग दुसरा, पृष्ठ ४१-८)

ह्याच विचारसरणीत जोशींचा सामाजिक कार्याला असलेला विरोधही बीजरूपात दिसतो. त्यामुळेच सामाजिक कार्यावर त्यांनी प्रखर टीका केली आहे. ते लिहितात –

आजवरच्या सामाजिक इतिहासाचा आढावा घेतला तर आपल्या लक्षात येईल, की ज्या प्रकारचा विकास या कार्यातून घडायला हवा, त्या प्रकारचा विकास या कार्यातून कधीही साधला जाणे शक्य नाही. विकासामागच्या प्रेरणा या अगदी वेगळ्या असतात. या देशातील जे स्वयंस्फूर्त कार्य गेल्या वीस-पंचवीस वर्षांत मी बघितले, त्यावरून माझे अशा कार्याविषयीचे मत प्रतिकूल बनले आहे. कार्यकर्त्यांचा छुपा पण प्रखर अहंकार, त्यांची ढोंगबाजी, त्यांची नाटके, सेवेच्या बुरख्याखाली स्वतःची सोय पाहत राहणे, त्यांच्यातील हेवेदावे, त्यांच्यातील व्यासंगाचा अभाव, मूळ प्रश्न टाळून उगाचच काहीतरी छोटेसे पॅचवर्क स्वरूपाचे काम करीत राहण्याची आत्ममग्न प्रवृत्ती, हे सगळे विचारात घेता अशा स्वरूपाच्या कामाची समाजाला काहीही आवश्यकता नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. मी एक पराकोटीचा व्यक्तिवादी, individualistic माणूस आहे. व्यक्ती हेच विचाराचे

केंद्र आहे, समाजाचे केंद्र आहे, निर्मितीचे केंद्र आहे. व्यक्तीची काळजी घेतली तर समाजाची काळजी घ्यायची काहीही आवश्यकता नाही.

(*समाजसेवेची दुकानदारी नको!*, अंतर्नाद, फेब्रुवारी २००७)

'भीक नको, हवे घामाचे दाम' हा संदेश जोशी आपल्या कार्यकर्त्यांना देतात. त्यांना विचार कसा करायचा ते शिकवतात. हिंसक बनू नका म्हणतानाच निर्भय बनायला सांगतात. स्वातंत्र्य हेच आपले अंतिम उद्दिष्ट आहे व दारिद्र्य दूर करायचे आहे, ते ह्या दारिद्र्यामुळे स्वातंत्र्याचा अतिशय संकोच होतो म्हणून, ह्याविषयी त्यांच्या मनात जराही संदेह नाही. स्वाभिमान, स्वातंत्र्य, बुद्धिनिष्ठा हे त्यांचे परवलीचे शब्द आहेत. हे त्यांचे विचार शेतकऱ्यांना सहजगत्या समजले, त्याच्या अंतःकरणाला भिडले. दबलेला, पिचलेला शेतकरी ताठ मानेने उभा राहिला तो त्यामुळेच.

निपाणीला एका तंबाखू शेतकऱ्यांच्या सभेत ते म्हणाले होते,

''तुमची भाकरीची अडचण आम्ही कुठूनही ज्वारी आणून भागवू शकतो; पण एक गोष्ट आम्ही देऊ शकत नाही. ती म्हणजे हिंमत. ती तुमची तुम्हालाच कमवायला पाहिजे. हिंमत असल्याखेरीज तुम्हाला किंमत मिळणार नाही. तंबाखूचं पीक काढताना त्याबरोबर एकेक हिमतीचं झाड लावता येत नाही. ती आपली आपणच तयार करायला हवी.''

आपल्या कार्यकर्त्यांमध्ये असे हिमतीचे झाड लावणारी शिबिरे वर्धा आणि अंबाजोगाईनंतरही अनेक ठिकाणी शेतकरी संघटनेने घेतली. आंबेठाण येथे ज्या जागी पूर्वी लीलाताईंची पोल्ट्री होती, त्याच जागी पुढे ही प्रशिक्षण शिबिरे भरू लागली. खरे म्हणजे, आंदोलने करताकरताच कार्यकर्ते शिकतही होते; शेतकरी संघटना हे जणू एक विद्यापीठच होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांनी अगदी सुरुवातीला केलेली वैचारिक मांडणी इतकी मूलगामी होती, की पुढली अनेक वर्षे तिच्यात फारसा काही बदल करायची आवश्यकताच जाणवली नाही. आपले विचार कालातीत नाहीत, असे जोशी म्हणाले असले, तरीही ते विचार काळाच्या कसोटीवर प्रदीर्घ काळासाठी महत्त्वाचे ठरले. त्यातून पक्की झालेली कार्यकर्त्यांची मूलभूत वैचारिक बैठक हे संघटनेचे मोठे सामर्थ्य बनले.

काळाच्या ओघात अनेक कार्यकर्ते वेगवेगळ्या व्यक्तिगत कारणांसाठी जोशींची साथ सोडून अन्यत्र कुठे-कुठे गेले, पण तरीही ती मूळची वैचारिक बैठक सोडायची आवश्यकता त्यांना कधी भासली नाही. त्या काळातील किंवा नंतरच्या इतर अनेक आंदोलनांत सामील झालेल्या कार्यकर्त्यांना अशी दीर्घ काळासाठीची वैचारिक बैठक लाभली नाही.

आंदोलनात उतरणारे लक्षावधी शेतकरी हे शेतकरी संघटनेचे दृश्य वैभव होते; भक्कम विचार हा तिचा पाया होता.

■

# १०

# अटकेपार

२५ नोव्हेंबर २०१४. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व भारताचे पाचवे उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांची तिसावी पुण्यतिथी. संध्याकाळी सहाची वेळ.

मुंबईतल्या नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानाचे सभागृह श्रोत्यांनी तुडुंब भरले होते. त्या समारंभात शरद जोशी यांना शरद पवार यांच्या हस्ते मानाचा यशवंतराव चव्हाण पुरस्कार दिला गेला. श्री. पवार मे २००४ ते मे २०१४ अशी सलग दहा वर्षे केंद्रात कृषिमंत्री होते. त्या पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतरची एक आठवण सांगताना ते म्हणाले,

> कृषिमंत्री म्हणून पंजाबमध्ये गेल्यानंतर ठिकठिकाणी माझं स्वागत व्हायचं. आणि मला आठवतंय, की अनेक ठिकाणी शेतकरी मेळाव्यात गेल्यानंतर स्वागत करणारा वक्ता 'आज के मेहमान शरद जोशी' असं म्हणूनच माझं स्वागत करायचा! नंतर स्वतःची चूक त्याच्या लक्षात आल्यानंतर, 'नही, नही, शरद पवार' असं तो म्हणायचा! याचा अर्थ पंजाबमधल्या त्या कष्टकरी शेतकऱ्यांमध्ये ज्यांनी महत्त्वाची कामगिरी केली, त्या शरद जोशींचं नाव तिथल्या घराघरामध्ये पोचलं होतं. हे मी पंजाबात अनेकदा पाहिलंय.
>
> (*राष्ट्रवादी,* डिसेंबर २०१४, पृष्ठ ५३)

त्या कार्यक्रमात प्रस्तुत लेखक मंचावर हजर होता व पवार यांचे हे उद्गार ऐकल्यावर सर्व श्रोत्यांप्रमाणे जोशी यांच्याही चेहऱ्यावर विलसणारे हास्य आणि आनंद यांचे मिश्रण बघताना 'आज इतक्या वर्षांनी का होईना, पण जोशींच्या पंजाबमधील महत्त्वाच्या कार्याची महाराष्ट्रात दखल घेतली जात आहे' हे जाणवून डोळे पाणावत होते. अर्थात जोशींचा हा जवळजवळ शेवटचाच मोठा असा जाहीर कार्यक्रम असेल याची त्यावेळी कोणालाच कल्पनाही नव्हती.

अखंड पंजाबचे भारतातील ऐतिहासिक स्थान एकमेवाद्वितीय असेच आहे. सीमेवरचा प्रांत असल्याने परकीयांची आक्रमणे पंजाबने सततच झेलली आहेत. 'मार्शल रेस' म्हणता येईल तसे इथले लोक. शरीराने भरभक्कम आणि वृत्तीनेही आक्रमक. बहुतेक शीख कुटुंबांत एक मुलगा शेतीत तर दुसरा लष्करात ही परंपरा. 'जय जवान, जय किसान' घोषणा देताना

तत्कालीन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री ह्यांच्या डोळ्यांपुढे कदाचित पंजाबच असू शकेल. इथली माणसे कष्टाळू, स्वतःच्या पायावर उभी राहणारी. गुरुबाणी ऐकण्याइतकीच भांगडा करण्यातही रमणारी. 'माझ्या रक्ताने ही सगळी भूमी न्हाऊन निघू दे' असा आशय व्यक्त करणारे 'मेरा रंग दे बसंती चोला' हे भगतसिंगांचे गीत इथले सर्वाधिक लोकप्रिय गीत.

आपल्या महाराष्ट्राशी शिखांचे नाते विशेष सौहार्दाचे आहे. त्यांचे दहावे व शेवटचे गुरू गोबिंदसिंग ह्यांच्या समाधीमुळे नांदेडला शीख तीर्थक्षेत्रच मानतात. अमृतसरहून येणारी सचखंड एक्स्प्रेस नांदेडला पोचते किंवा तिथून सुटते, तेव्हा गाडीतील व प्लॅटफॉर्मवरील सगळ्यांनाच रुचकर असा तुपाळ मुगाच्या हलव्याचा प्रसाद आवर्जून दिला जातो; कधीकधी संपूर्ण जेवणही दिले जाते.

इथली शेतीही खूप महत्त्वाची. दुथडी भरून वाहणाऱ्या झेलम, सतलज, रावी, चिनाब आणि बियास ह्या पाच नद्यांवरून ह्या प्रांताला पंजाब हे नाव पडले. त्यांच्या वर्षानुवर्षे वाहून आलेल्या गाळामुळे सुपीक बनलेली इथली भूमी. हवामान अनुकूल, पाणीही भरपूर. डोंगराळ भाग जवळपास नाहीच, सगळी भूमी सपाट व शेतीयोग्य. ट्रॅक्टरसारख्या अनेक आधुनिक अवजारांचा शेतीत सर्रास वापर. त्यामुळे सुजल सुफल बनलेला हा प्रदेश. 'भारताचे धान्याचे कोठार' हा लौकिक सार्थ ठरवणारी इथली शेती.

दुर्दैवाने फाळणी झाली त्यावेळी बहुतेक कालवे पश्चिम पंजाबात होते व ते पाकिस्तानात समाविष्ट झाले. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात इथे बरीचशी शेती पाण्याअभावी उजाड झाली होती. पण पुढे भाक्रा-नांगल धरणाने इथली शेती पुन्हा एकदा बहरली. जमिनीत झिरपणाऱ्या मुबलक पाण्यामुळे कूपनलिका कोपऱ्याकोपऱ्यात खणल्या गेल्या. सत्तर टक्के शेतजमीन पाण्याखाली आली. इथल्या शेतकऱ्याने नवे तंत्रज्ञान अहमहमिकेने स्वीकारले. गव्हाप्रमाणे इथला बासमती तांदूळही जगभर जाऊन पोचला. सर्वच शेतकरी वर्षातून दोन पिके घेत – एक गव्हाचे, दुसरे भाताचे. साठ व सत्तरच्या दशकात झालेल्या हरितक्रांतीची फळे देशात सर्वाधिक इथेच पाहायला मिळत. आजदेखील संपूर्ण देशातून केंद्र सरकारच्या कोठारात जेवढा गहू जमा होतो, त्यापैकी सत्तर टक्के गहू हा एकट्या पंजाबातून जमा होतो. शेतीतील समृद्धीतूनच जालंदर, लुधियाना यांसारख्या शहरांत असंख्य छोटे-मोठे उद्योगधंदे उभे राहिले. बघता बघता पंजाब पुन्हा एकदा समृद्ध बनला. ज्याला शेतीच्या संदर्भात भारतात काही काम करायचे आहे, तो पंजाबकडे दुर्लक्ष करूच शकणार नाही.

पण पंजाब अखंड होता त्या काळापासूनच इथल्या शेतकऱ्यांना नेहमीच कर्ज काढावे लागे; पिके चांगली आली तरीही. अशी विचित्र परिस्थिती नेमकी कशामुळे येते त्याची शास्त्रशुद्ध कारणमीमांसा त्यावेळी फारशी कोणाला करता आली नाही तरी तिची झळ मात्र सर्वच शेतकऱ्यांना पोचत असे.

शेतकऱ्यांची स्थिती सुधारली पाहिजे, ह्याची मागील शतकात पहिली जाणीव अखंड पंजाब प्रांतातील सर छोटूराम ह्या जाट नेत्यांना झाली. ते स्वतः मोठे शेतकरी होते. शासनदरबारी त्यांना फार मान होता. 'अजगर' ह्या काहीशा विचित्र नावाची एक संघटना त्यांनी

स्थापन केली. अहिर, जाट, गुजर आणि रजपूत ह्या शेती करणाऱ्या तत्कालीन अखंड पंजाबातील चार जमाती त्यांच्या डोळ्यांपुढे होत्या व त्यांची आद्याक्षरे एकत्र करून 'अजगर' नाव बनले होते. त्या मूळ संघटनेचा अधिक विस्तार करत पुढे त्यांनी 'जमीनदारा खेतीबाडी युनियन' स्थापन केली. ही घटना साधारण १९२५ सालची. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा थोडा सुसह्य व्हावा म्हणून छोटूरामनी त्यावेळी पंजाब विधिमंडळात एक बिल आणले होते. ते असे होते, 'शेती उत्तम पिकत असूनही शेतकरी कर्जात बुडतो आहे. त्यामुळे सावकार जप्ती आणून त्यांच्या जमिनी काढून घेत आहेत. अशा प्रकारे सावकारांनी जमिनीवर जप्ती आणू नये म्हणून त्याविरुद्ध सरकारने कायदा करावा.' तत्कालीन काँग्रेस सरकारने ह्या बिलाला कडाडून विरोध केला होता. काँग्रेसचे म्हणणे असे होते, की 'सावकारांनी जमिनी जप्त केल्या नाहीत, तर त्यांना धंदा बंद करावा लागेल व तसे झाले तर अडचणीच्या वेळी शेतकऱ्यांना कर्ज कसे मिळणार?' गव्हाला अधिक भाव मिळावा म्हणूनही छोटूराम सतत प्रयत्न करत असत. 'इतकाइतका भाव दिल्याशिवाय आम्ही गहू विकणार नाही' असे त्यांनी एकदा ब्रिटिश गव्हर्नरलादेखील सुनावले होते. हिंदू, मुसलमान व शीख ह्या तिन्ही धर्मांचे शेतकरी छोटूरामना अगदी देवासमान मानत. सर छोटूराम १९४६ साली वारले; पण त्यांची युनियन इतकी ताकदवान होती, की १९४६ सालापर्यंत मुस्लिम लीगचे प्रमुख महमद अली जिनांना त्या प्रांतात पाऊलसुद्धा ठेवता आले नाही. धार्मिक भेदांच्या पलीकडे जाऊन निखळ आर्थिक प्रश्नावर शेतकऱ्यांना एका राजकारणविरहित झेंड्याखाली एकत्र आणणारा नेता म्हणून सर छोटूराम ह्यांच्याविषयी जोशींना खूप आदर होता.

शरद जोशी यांचे पंजाबमधील सर्वांत जवळचे सहकारी सरदार भूपिंदर सिंग मान यांच्याविषयी इथे लिहायला हवे. भारती किसान युनियन (बीकेयु) या पंजाबातील सर्वांत मोठ्या शेतकरी संघटनेचे १९८० सालापासून ते सदस्यांनी निवडून दिलेले अध्यक्ष आहेत. यातील 'भारती' शब्द पंजाबी नावात आहे; अन्यत्र बऱ्याचदा त्याऐवजी 'भारतीय' हा शब्द वापरला आहे. मान यांची व प्रस्तुत लेखकाची पहिली भेट ३० जुलै २०१२ रोजी बुंदेलखंडातील बांदा ह्या गावी किसान को-ऑर्डिनेशन कमिटी (केसीसी)च्या एका बैठकीच्या वेळी झाली होती. जोशींच्या आमंत्रणावरून तिथे त्यांच्याबरोबर गेलो होतो. त्यावेळी मान यांच्याबरोबर थोड्याफार गप्पा झाल्या होत्या, पण त्या पुरेशा नव्हत्या. तो योग आमच्या पुढील भेटीत आला. ८ मार्च २०१६ रोजी चंडीगढ येथील त्यांच्या घरात. शरद जोशींच्या चळवळीतील पंजाबपर्व समजून घेण्यासाठी तिथे गेलो असताना. पुढे त्यांच्याबरोबर केलेल्या मुक्कामात व बटाला, अमृतसर, वाघा इथे त्यांच्यासमवेत केलेल्या प्रवासात.

मान यांचा जन्म १५ सप्टेंबर १९३९चा. उंच शिडशिडीत शरीरयष्टी व झपाझप चालणे यामुळे त्यांच्या वयाचा पटकन अंदाज येत नाही. ते सांगत होते,

''माझं जन्मगाव आता पाकिस्तानात आहे. घरची खूप मोठी शेतीवाडी होती, संपन्न घरदार होतं. वडील अकालीच वारले. मी एकुलता एक मुलगा. दोन बहिणी. फाळणीनंतर

आम्ही निर्वासित म्हणून इथे आलो. अगदी नेसत्या कपड्यानिशी. तेव्हाच्या जखमा भरून निघायला बरीच वर्षं लागली.''

पंजाबातील शेतकरी चळवळीच्या पार्श्वभूमीबद्दल पुढे मान म्हणाले,

''छोटूराम ह्यांची जमीनदारा युनियन हेच आमच्या आजच्या बीकेयुचे मूळ रूप आहे. पंजाबात शेतकरी छोटा असला तरी त्याला 'जमीनदार' (म्हणजे जमीन असणारा) म्हणत. पुढे काळाच्या ओघात 'जमीनदार' ह्या शब्दाला एक वेगळा, तिरस्करणीय असा अर्थ प्राप्त झाला व संघटनेच्या नावातील 'जमीनदार' शब्द गळून १९७२ साली 'खेतीबाडी युनियन' अस्तित्वात आली.''

आणीबाणीच्या काळात कित्येक महिने मान व त्यांचे अनेक शेतकरी कार्यकर्ते तुरुंगात होते. पण तेव्हा आणि नंतरची अनेक वर्षे ते तसे कुठल्याही राजकीय पक्षाशी जोडलेले नव्हते. अकाली दल हा खरे तर पंजाबातील शेतकऱ्यांचा व म्हणून बहुसंख्य शिखांचा पारंपरिक पक्ष. पण मान ह्यांच्या मते तो खूप भ्रष्ट आहे व म्हणून २००२पासून त्यांनी अधिकृतरीत्या काँग्रेसला पाठिंबा द्यायला सुरुवात केली. पंजाबचे तत्कालीन मुख्यमंत्री व पतियाळाचे माजी महाराज कॅप्टन अमरिंदर सिंग ह्यांनाही अनेक शेतकरी आंदोलनांत त्यांनी सामील करून घेतले. त्यांचे चिरंजीव गुरपरतापसिंग मान उच्चशिक्षित इंजिनिअर व एमबीए आहेत. Punjab Infrastructure Development Limited ह्या महत्त्वाच्या शासकीय आस्थापनेचे ते प्रमुख होते. पण विशिष्ट कंत्राटदारांनाच कामे दिली जावीत ह्यासाठी सत्तेवर असलेल्या अकाली नेत्यांकडून जो दबाव येत होता, त्याला वैतागून त्यांनी त्या पदाचा राजीनामा दिला. सध्या ते पंजाब प्रदेश काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी आहेत. ते सहकुटुंब चंडीगढमध्ये राहतात. त्यांच्या पत्नी दंतवैद्य (dentist) असून पुण्यातील दंत महाविद्यालयात शिकलेल्या आहेत.

''सगळ्या देशाला तुम्ही धान्य पुरवता; मग तुमच्या शेतकऱ्यांसमोर अडचण कसली असू शकते?'' असा प्रश्न मी मान यांचे चिरंजीव गुरपरतापसिंग यांना आमच्या चंडीगढमधील पहिल्याच जेवणाच्या वेळी विचारला.

''तीच तर खरी अडचण आहे! सगळ्या देशाला आम्ही धान्य पुरवतो हेच आमच्या समस्येचं मूळ आहे!'' काहीशा कोड्यात बोलल्याप्रमाणे ते म्हणाले. मग पुढल्या अर्ध्या-एक तासात त्यांनी त्यांचा मुद्दा स्पष्ट केला. ''शेती ही तोट्यातच असल्यामुळे जेवढी शेती अधिक, तेवढा तोटा अधिक, असं हे साधं गणित आहे. जास्त उत्पादन म्हणजेच जास्त तोटा. आमचं उत्पादन अधिक, म्हणून आमचा कर्जबाजारीपणाही अधिक,'' ते म्हणाले.

हरितक्रांती झाली त्यावेळी मुख्यतः सुधारित बियाणे व खतांचा भरपूर वापर ह्यांमुळे भरघोस पिके निघू लागली. सुरुवातीला सगळे खूश होते. पण नंतर इतके पीक काढूनही आपले कर्जबाजारीपण कमी होत नाही, ही गोष्ट पंजाबातील सर्वच शेतकऱ्यांच्या लक्षात येऊ लागली. बियाणे, खते, डिझेल, वीज, शेतमजुरी वगैरे सर्व खर्च सतत वाढत गेले व त्याप्रमाणात शेतीमालाच्या किमती मात्र फारशा वाढल्या नाहीत. वर्षानुवर्षे त्या किमती केंद्र सरकारच ठरवत आले आहे. परिणामतः खर्च आणि आमदनी ह्याचा मेळ बसेना. खतांच्या अतिरिक्त

वापरामुळे झालेली जमिनीची हानी, कूपनलिका अधिकाधिक खोल जात राहिल्याने खालचे क्षार वर यायचे प्रचंड प्रमाण, पाण्याचा अनिर्बंध वापर व ह्या सगळ्यातून होणारी एकूणच पर्यावरणाची हानी हाही प्रकार लोकांच्या लक्षात येत गेला. शेतकऱ्यांमधला असंतोष वाढतच गेला. ह्या असंतोषातूनच पुढे खलिस्तानवाद्यांना उत्तेजन मिळत गेले. शीख शेतकरी तो ग्रामीण, हिंदू व्यापारी तो शहरी; शीख तो शोषित, हिंदू तो शोषक अशा प्रकारे एकूण आर्थिक वास्तवाचे विकृत असे सुलभीकरण केले गेले. मतांच्या राजकारणासाठी काही नेत्यांनी आगीत तेल ओतायचे काम केले. शेती किफायतशीर राहिली नाही, ह्या मूळ आर्थिक प्रश्नाला हिंदू-शीख धार्मिक तेढीचे स्वरूप प्राप्त झाले.

१९९० ते १९९६ भूपिंदरसिंग मान राज्यसभेचे सदस्य होते. तिथे मान यांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव यांनी एक महत्त्वाची कबुली दिली होती. पंतप्रधान म्हणाले होते, ''भारतातील शेतकऱ्याला शेतीमालाचा भाव देताना ७२% उणे सबसिडी दिली जाते.'' म्हणजेच त्याला सरकारतर्फे अनुदान स्वरूपात खरेतर काहीच दिले जात नाही, उलट त्याचे उत्पन्न १०० रुपये असले, तर सरकारने त्याच्याकडून शेतीमालाच्या वाजवी भावापेक्षा कमी भाव देऊन ७२ रुपये मिळवलेले असतात.

सरकार शेतकऱ्यांच्या विकासाला कशी बाधा घालते ह्याचे एक उदाहरण मान यांनी दिले. भात भरडून तांदूळ करण्याचे एक छोटेसे मशीन (हलर) परदेशात जेमतेम तीन-चार हजार रुपयांत उपलब्ध होते. ते भारतात आणायचे व तशीच यंत्रे इथे बनवून ती विकायची योजना एका कल्पक शीख तरुणाने मांडली. मान म्हणाले, ''पण लायसन्स-परमिटराजच्या त्या जमान्यात सरकारने त्याला परवानगी नाकारली. खूप इच्छा असूनही शेवटी ती योजना त्याला गुंडाळून ठेवावी लागली. पावलोपावली होणारा सरकारी हस्तक्षेप शेतकरीहिताची कायमच अशी गळचेपी करतो. शेतकऱ्यांना स्वातंत्र्य दिलं असतं तर इतर देशांत घडलं ते इथेही घडलं असतं; शेतकऱ्यांनी स्वतःच कितीतरी उपयुक्त यंत्रं शोधून काढली असती. कारण पंजाबी शेतकरी तसा खूप हिकमती आहे, टेक-सॅव्ही म्हणतात तसा आहे.''

सुदैवाने आज मान यांची सांपत्तिक स्थिती चांगली आहे, दोन्ही मुले सुस्थित आहेत. एक अमेरिकेत, दुसरा चंडीगढला. तरीही सकाळपासून रात्रीपर्यंत मान सतत कामात असतात. शेतीचे बरेचसे काम त्यांच्या पत्नी – ज्यांना सगळे भाभीजी म्हणतात – सांभाळतात. त्यामुळे आपल्या सामाजिक कामासाठी मान यांना पुरेसा वेळ मिळतो. देशभरच्या शेतकरीनेत्यांच्या ते संपर्कात असतात; खूप प्रवास करतात. महाराष्ट्रातही ते पंधरा-वीस वेळा सहज आले असतील. शेतकऱ्यांच्या अखिल भारतीय किसान समन्वय समितीचे ते तीन वेळा अध्यक्ष होते. त्यांचा व्यासंगही दांडगा आहे. शेतकरी आंदोलनाबाबतची सर्व कात्रणे त्यांनी आपल्या बटाला येथील घरातील कार्यालयात, चार गोदरेजच्या कपाटांत व्यवस्थित विभागणी करून, फायलींमध्ये लावून ठेवली आहेत.

मान यांच्याशी मैत्री व्हायच्या पूर्वीच जोशी मनानेतरी पंजाबशी जोडले गेले होते. नाशिक येथील १९८० सालच्या ऊस आंदोलनाच्या वेळीच. 'एक दिवस तुम्ही पंजाबातदेखील या, कारण असाच अन्याय आमच्यावरही होतोय' असे अनेक शीख ड्रायव्हर्स त्यावेळी म्हणाले होते. तो भाग पूर्वी आलेलाच आहे. साधारण दोन वर्षांनी तोही योग आला.

२३ एप्रिल १९८२ रोजी धुळे येथे शेतकरी संघटनेने दूध उत्पादक मेळावा घेतला. त्याला इतरही राज्यांतले काही शेतकरी नेते आवर्जून उपस्थित होते. त्यांच्यापैकीच एक होते बलबीरसिंग राजेवाल. मेळाव्यात त्यांनी जोशींना सांगितले,

''पंजाबमधील खन्ना ह्या गावी आम्ही २८, २९ व ३० मे १९८२ रोजी एक बैठक आयोजित केली आहे. अखिल भारतीय किसान युनियनची लिखित घटना निश्चित करण्यासाठी. त्या बैठकीला तुम्ही व तुमच्या काही निकटच्या सहकाऱ्यांनी अवश्य यायला हवं. बैठकीनंतर पंजाबात इतर चार ठिकाणी शेतकरी मेळावेही आयोजित केले आहेत. ३१ मेला मानसा (जिल्हा भटिंडा), १ जूनला नवा शहर (जिल्हा जालंदर), २ जूनला फिरोजपूर व ३ जूनला गोविंदबालसाहिबा (जिल्हा लुधियाना) इथे. ह्या सर्व मेळाव्यांनाही तुम्ही आमचे पाहुणे म्हणून हजर राहावं.''

जोशींना ती कल्पना खूप आवडली. एकतर निपाणीनंतर इतरही राज्यांत प्रवेश करण्याची ही एक सुवर्णसंधी होती. सर्व आयोजन पंजाबचे शेतकरीनेते करणार होते व तो काहीच त्रास नव्हता. शिवाय सर्व मेळावे ग्रामीण भागात भरणार असल्याने आपोआपच पंजाबातील शेतकऱ्यांशी अगदी थेट असा परिचय होणार होता. लगेचच त्यांनी आमंत्रणाचा स्वीकार केला. त्यानुसार २६ मे रोजी झेलम एक्स्प्रेसने जोशींनी पुण्याहून प्रस्थान केले. भास्करराव बोरावके हे सहकारी पुढे मनमाडला त्यांच्याच डब्यात चढले. विजय जावंधिया आणि श्रीकांत तराळ हे दोन सहकारी आदल्याच दिवशी नागपूरहून दिल्लीला जाऊन पोचले होते.

अलिबागचे प्रा. अरविंद वामन कुळकर्णी हे मात्र पुण्यापासूनच जोशींबरोबर होते. नाशिक आंदोलनावर त्यांनी 'सोबत'मध्ये लिहिलेला लेख जोशींना आवडला होता व त्यानंतर त्यांनी आपणहूनच कुळकर्णींशी तारेने संपर्क साधला होता. पुढे निपाणीला दोघांची पहिली भेट झाली होती व त्यानंतर निपाणी आंदोलनावर त्यांनी 'सोबत'मध्ये लिहिलेले चार लेखही जोशींनी वाचले होते. शेतकरी संघटनेने प्रकाशन विभाग सुरू करावा असे कुळकर्णींचे मत होते व त्याबद्दल जोशींशी चर्चा करण्यासाठी ते व त्यांचे प्राध्यापक सहकारी सुरेशचंद्र म्हात्रे पुण्याला २१ मे रोजी आले होते. जोशींना त्यांची योजना पटली व आंदोलनाच्या धामधुमीत जमेल तसे काम यथावकाश सुरूही झाले. 'आता आलाच आहात तर माझ्याबरोबर पंजाबातही चला,' असा जोशींचा खूप आग्रह होता. कुळकर्णी तयार नव्हते, कारण तसा हा दहा दिवसांचा लांबचा प्रवास होता आणि त्यांनी ना घरी काही त्याबद्दल कळवले होते ना त्यांच्याकडे पुरेसे सामान होते. 'सामानाची वगैरे काही काळजी करू नका, अगदी नेसत्या कपड्यांनिशी चला,' जोशी सांगत होते. शेवटी जोशींच्या या अगदी अनपेक्षित आग्रहापुढे त्यांनी मान तुकवली.



सेलू
(जिल्हा वर्धा)
येथून चंडीगढ
येथे सायकलवरून
गेलेला उत्साही
‘परभणी पागल’
तरुणांचा चमू,
१२ मार्च १९८४



चंडीगढ येथे
राजभवनाला वेढा
घालण्यासाठी
तिथे मोर्चा नेताना
शरद जोशी.
शेजारी
भूपिंदर सिंग मान
व अन्य शेतकरी नेते,
१२ मार्च १९८४



शेतकऱ्यांचे
प्रश्न सोडवण्यासाठी
‘जेल भरो’ :
चंडीगढ
राजभवनजवळ
अटक करून घेणारे
वेगवेगळ्या राज्यांतून
आलेले शेतकरी,
१५ मे १९९१




चांदवड येथील पहिले शेतकरी महिला अधिवेशन :
तीन लाख स्त्रियांचा विराट मेळावा, १० नोव्हेंबर १९८६



''आता घरात बसून चालायचं न्हाई.'' बैलगाडीतून सभेसाठी जाणाऱ्या शेतकरी महिला,
सुरेगाव, जिल्हा परभणी. जानेवारी १९८७.



शेतकरी संघटनेच्या सभेतील महिलांचा अभूतपूर्व सहभाग, चंद्रपूर अधिवेशन, २०१३.



शेतकरी

महिला आघाडी

प्रमाणपत्र

श्री. ....................................................

गाव. ................ ता. ................ जिल्हा. ................

यांनी आपल्या घरची लक्ष्मी

सौ. ....................................................

हिच्या कष्टांची
आणि त्यागाची जाणीव ठेवून
तिला स्वखुषीने मालमत्तेच्या -
मिळकतीच्या मालकीत सहभागी
करून घेतले.

शेतकरी संघटना

लक्ष्मीमुक्ती अभियान, प्रमाणपत्र नमुना



राजीवस्त्रविरोधी आंदोलन : हुतात्मा बाबू गेनू यांच्या महाळुंगे-पडवळ ह्या पुणे जिल्ह्यातील जन्मगावी भावजय कासाबाई सैद मुंबईला मिरवणुकीने नेण्यासाठी क्रांती ज्योती प्रज्वलित करताना, सोबत शंकरराव वाघ. डावीकडे घोषणा देणारे भास्करराव बोरावके व उजवीकडे स्वेटर घातलेले बाबूलाल परदेशी.
१२ डिसेंबर १९८५.
(सौजन्य : सरोजा परुळकर)




शिवाजी पार्क, मुंबई, येथील सभेत कामगारनेते दत्ता सामंत यांच्या सोबत.
१२ डिसेंबर १९८५. (सौजन्य : सरोजा परुळकर)



राहुरी ऊस परिषद, ६ ऑक्टोबर १९८५.
माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंग, प्रमोद महाजन, शरद पवार इत्यादी नेत्यांनी ह्या सभेत भाषण केले.



'न्याय नही, हिसाब दो' अशी घोषणा देत दिल्ली येथे बोट क्लबवर शेतकऱ्यांनी काढलेला
विराट आर्थिक मुक्ती मोर्चा'. ३१ मार्च १९९३. मागे इंडिया गेट दिसत आहे.


॥ जाऊ भीमातीरी पंढरी
विठू आमुचा कैवारी ॥
शेतकऱ्याचे विठोबाला साकडे
शेतकरी संघटना
कार्तिकी एकादशी,
दुपारी १ वाजता
१६ नोव्हेंबर ८३, पंढरपूर
"भीक नको, हवे घामाचे दाम" - शरद जोशी


कर्जाचा तराजू दीड-दांडीचा
शेतकऱ्यांची दरवर्षी लूट १०,००० कोटी रुपये
शेतकऱ्याचे कर्ज एकूण ८००० कोटी रुपये
न्याय कसला ?
हिशोब द्या !
शेतकरी संघटना
कर्जमुक्ती आंदोलन


शेतकरी संघटना
२१ व २२ जानेवारी ८५
अधिवेशन ३ रे
धुळे
खुले अधिवेशन
२२ जानेवारी १९८५ दुपारी २ वा.
आगामी
आंदोलनाची दिशा
व
येत्या विधानसभा
निवडणुकीत
संघटनेची भूमिका
यासाठी
अत्यंत तातडीचे
ठिकाण:
गरुड हायस्कूलचे मैदान
साक्री रोड, धुळे
प्रकाशक : शेतकरी संघटना, पुणे

... संघटनेचे एक कायम वैशिष्ट्य होते













वीजदरवाढीविरुद्ध आंदोलन,
गुजरात,
१४ ऑगस्ट २००३ :
पोलिसांचा अघोरी लाठीमार



तहानलेल्याला पाणी देणे हा गुन्हा असेल तर...'
नर्मदा जनआंदोलन, केवाडिया कॉलोनी येथे
सरदार सरोवर धरणापाशी. डोक्यावर कळशीभर
पाणी घेतलेले शरद जोशी.
शेजारी चालणारे बद्रीनाथ देवकर.



२००२मधील तीन महिन्यांची नर्मदा परिक्रमा :
ओळखू न येणारे दाढी वाढवलेले शरद जोशी

कुळकर्णींसारखे विचारवंत आपल्यात असावेत असे जोशींना वाटत असावे. २६ मे ते ५ जून १९८२ या कालावधीतील ह्या दौऱ्यात आलेल्या अनुभवांवर कुलकर्णी यांनी पुढे लौकरच 'शरद जोशींबरोबर... पंजाबात' ह्या शीर्षकाखाली *माणूस* साप्ताहिकात एक लेखमालाही लिहिली व पुढे एप्रिल १९८३मध्ये 'शेतकरी प्रकाशन', अलिबाग, यांच्यातर्फे ती पुस्तकरूपाने प्रकाशितही झाली. एक गमतीचा भाग म्हणजे पंजाबात पोचल्यावर प्रत्येक प्रसंगी जोशी त्यांची ओळख 'प्राध्यापक' म्हणून करून देत व तेव्हा सर्वच उपस्थित पंजाबी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर मोठे आश्चर्य उमटायचे. नंतर केव्हातरी त्याचा खुलासा झाला – पंजाबीत 'प्राध्यापक' हा शब्द 'कुंभार' ह्या अर्थाने वापरला जातो!

'माणूस'चे संपादक श्री. ग. माजगावकर यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत लिहिले होते,

> एक महाराष्ट्रीय नेता परप्रांतात जाऊन, आपल्या विचारांचा, चळवळीचा तेथे प्रसार करतो, ही घटनाच नवीन होती. आज सगळी क्षितिजे लहान होत आहेत, संकुचितपणा वाढतो आहे. जो तो आपल्या प्रांतापुरता, पक्षापुरता होतो आहे. शरद जोशींची कृती नेमकी ह्याविरुद्ध होती. क्षितिजे विस्तारण्यासाठी ते पंजाबला चालले होते.

खन्ना गावाला पंजाबातील शेतीजीवनात महत्त्वाचे स्थान आहे व खरेदी-विक्री संघाच्या आवारात पाऊल टाकताच त्याचे कारणही स्पष्ट होत होते. पंजाबातील हा सर्वांत मोठा खरेदी-विक्री संघ. प्रत्यक्ष बाजारपेठ एका मोठ्या एक मजली इमारतीत आहे व तिच्या चारी बाजूंना मोकळे मैदान आहे. मैदानाच्या त्या प्रचंड आवारात नजर पोचेल तिथपर्यंत शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या गव्हाच्या पोत्यांचे अवाढव्य ढीगच्या ढीग पसरले होते. सगळीकडे असंख्य ट्रॅक्टर्स उभे होते व तेही गव्हाच्या पोत्यांनी शिगोशीग भरलेले होते. पंजाबात खरेदी होणाऱ्या एकूण गव्हापैकी एक तृतीयांश गहू ह्या एकाच मंडीत खरेदी केला जातो. ह्याच जागी अखिल भारतीय किसान युनियनची बैठक बोलावण्यात मोठेच औचित्य होते.

बैठकीत सर्वांत जास्त उपस्थिती साहजिकच पंजाबमधील शेतकरीनेत्यांची होती. त्याशिवाय हरयाणा, दिल्ली, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि बिहार येथून प्रतिनिधी आले होते. युनियनच्या घटनेचा लिखित मसुदा तयार करणे हा बैठकीचा मुख्य अजेंडा होता. त्यानंतरचा वेळ युनियनचे नाव, झेंडा, वर्गणी, निधिसंचय, पदाधिकारी, अंतर्गत निवडणुका वगैरे संघटनात्मक बाबींवरील चर्चेत आणि शासनाकडे कुठल्या मागण्या मागायच्या ते निश्चित करण्यात जाणार होता, हे पहिल्याच सत्रात स्पष्ट झाले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी युनियनच्या हरयाणा शाखेचे अध्यक्ष मांगीराम मलिक हे होते. युनियनचे अखिल भारतीय सरचिटणीस राजेवाल यांनी सर्वांचे स्वागत केले, तर पंजाब शाखेचे अध्यक्ष भूपिंदरसिंग मान यांनी युनियनची जन्मकथा सांगणारे प्रास्ताविक केले.

पहिल्या सत्रात हरयाणाचे ॲडव्होकेट करमसिंग, पंजाबचे अजमेरसिंग लोखोवाल, उत्तरप्रदेशातील मीरतचे सुखबीरसिंग आर्य, झाशीचे गांधीवादी प्राध्यापक डॉक्टर रामनाथन

कृष्ण गांधी व मध्यप्रदेशचे विनयचंद्र मुनीमजी यांची भाषणे झाली. महाराष्ट्रातर्फे विजय जावंधिया बोलले. नागपूरचे असल्याने त्यांचे हिंदी उत्तम होते. स्वतः जोशी मात्र ह्या पहिल्या सत्रात काहीच बोलले नाहीत. बैठकीतील इतरांच्या मनात, बैठकीचा मुख्य विषय असलेल्या घटनानिश्चितीविषयी जोशींची भूमिका काय असेल ह्याविषयी बरीच शंका होती. जोशींचे नाव जरी सर्वांनी ऐकले असले, तरी उपस्थितांपैकी एक राजेवाल सोडले तर इतर कोणीही जोशींना पूर्वी कधीच भेटलेलेही नव्हते. स्वतः जोशींनाही ह्या बैठकीत इतरांपेक्षा आपण वेगळे पडत चाललो आहोत ह्याची पहिल्याच सत्रात कल्पना आली होती. कदाचित त्यामुळेच तेही तसे गप्पगप्पच होते.

हैदराबाद येथे १९८० मध्ये अखिल भारतीय किसान युनियनची स्थापना झाली, त्याच वेळी 'पुढच्या बैठकीत घटना निश्चित करायची' असे ठरले होते. पण अनेक कारणांनी ही पुढली बैठक मधली दीड-दोन वर्षे होऊ शकली नव्हती. शेवटी खन्ना येथे त्या बैठकीचा योग आला होता व घटनानिश्चिती हा तिचा अजेंडा पूर्वीच ठरला होता. दुसऱ्या सत्रात सर्वांनी घटनेची मुख्य कलमे काय असावी ह्यावर मते मांडली. त्याचबरोबर शासनाकडे सादर करण्यासाठी आपापल्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा मागण्या मांडल्या गेल्या. मेडिकल व इंजिनिअरिंग कॉलेजांत शेतकऱ्यांच्या मुलांसाठी राखीव जागा ठेवाव्यात इथपासून ते सरकारने कीटकनाशकांचा पुरवठा स्वस्त दरात करावा इथपर्यंत अनेक मागण्या पुढे आल्या. सगळ्यांचे बोलणे बराच वेळ शांतपणे ऐकून घेतल्यानंतर जोशी बोलण्यासाठी उभे राहिले. अतिशय नम्रपणे त्यांनी भाषणाला सुरुवात केली.

''घटनेचा मसुदा निश्चित करण्यासाठी बोलावलेली ही बैठक आहे व तिला आम्ही आपले अतिथी म्हणून हजर राहिलो आहोत. अशावेळी आम्ही काही मूलभूत मुद्दे उपस्थित करणं गैर वाटेल. लग्नाला आलेल्या पाहुण्यांनी वधूवर बदलायची सूचना करावी असंच काहीसं ते वाटेल! पण अशा अखिल भारतीय युनियनची उद्दिष्टं नक्की करताना अधिक मूलगामी विचार व्हायला हवा व तो झाल्यावर मगच घटनेचा मुद्दा विचारात घेता येईल. आधी उद्दिष्टं स्पष्ट असावीत व मग ती साध्य करण्यासाठी कुठली घटना उपयुक्त ठरेल, ते बघता येईल. त्या दृष्टीने माझे विचार मांडण्यासाठी मला जरा अधिक वेळ लागेल व तो अध्यक्षांनी द्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.''

तसा वेळ सुदैवाने अध्यक्षांनी दिला व त्यानंतर स्वतःची पार्श्वभूमी, शेतकरी प्रश्नाची ऐतिहासिक मीमांसा, शेतीमालाच्या जाणीवपूर्वक कमी राखलेल्या किंमती, गोऱ्या इंग्रजाचेच धोरण चालू ठेवणारे काळे इंग्रज, स्वतःचे आंबेठाणमधील शेतीचे अनुभव हे सारे जोशींनी विस्ताराने मांडले. ''शेतीमालाला रास्त भाव हाच एक-कलमी कार्यक्रम आपण समोर ठेवावा व तसा भाव मिळाला, तर अन्य कुठल्याही अनुदानाची वा सवलतीची आपल्याला गरजच राहणार नाही; त्या एका मागणीमागे देशभरातील शेतकरी उभा करता येईल, त्यासाठी लिखित घटना वगैरे बाबींची गरज नाही; अगदी अत्यावश्यक असेल तेवढेच बांधीव रूप आपण

स्वीकारावे व बाकी बाबतीत लवचीक धोरण ठेवावे,'' असे ते म्हणाले.

त्यांच्या ह्या विस्तृत भाषणानंतर चमत्कार घडावा, तसे बैठकीतील वातावरण बदलले. 'स्वतः जोशींच्या तोंडून हे सारं ऐकणं हा एक अविस्मरणीय असा अनुभव होता,' असे मत नंतर बोलणाऱ्या जवळजवळ प्रत्येकाने व्यक्त केले. 'साधी जीन्स आणि बुशशर्ट घालणारा, शेतकरी अजिबात न दिसणारा हा माणूस जे म्हणाला, ते आम्हाला पूर्वी कधीच कोणी सांगितलं नव्हतं', 'तुम्ही महाराष्ट्रातले शेतकरी भाग्यवान आहात, म्हणून तुम्हाला असा नेता मिळाला', 'अनेक शेतकरी नेते आजवर बघितले, पण इतका अभ्यासू नेता नव्हता बघितला' अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात होत्या.

पुढील सर्वच सत्रांवर आता जोशींची निर्विवाद पकड बसली. युनियनचे आता जणू ते अलिखित अध्यक्षच बनले. बैठकीच्या तिसऱ्या दिवशी, म्हणजे रविवार ३० मे रोजी, संमत झालेल्या ठरावांवरही जोशींच्या अर्थमूलक विचारसरणीची छाप उघड होती. 'शेतकऱ्याला रास्त भाव न देण्याच्या शासनाच्या धोरणाचा ही युनियन निषेध करते' हा पहिलाच ठराव होता. आणखीही एक महत्त्वाचा ठराव होता, 'शेतीमालाचा साठा, प्रक्रिया, व्यापार व निर्यात यांसंबंधीचे सर्व निर्बंध शासनाने दूर करावेत. यांसंबंधी परदेशात झालेल्या तांत्रिक सुधारणांच्या स्वीकाराबद्दल शेतकऱ्यावर कुठलीही बंधने असू नयेत. त्यासाठी आवश्यक अशी यंत्रसामग्री परदेशातून आयात करण्याची शेतकऱ्याला मुक्त परवानगी असावी.'

बैठकीच्या औपचारिक सांगतेनंतर किसान युनियनने खन्ना गावातून एक मोठी शोभायात्रा काढली. आर्य हायस्कूलच्या मैदानावर भरलेल्या एका मोठ्या सभेत शोभायात्रेचे स्वागत केले गेले. साधारण तीसेक हजार शेतकरी हजर होते. जोशी व्यासपीठावर पोचताच त्यावेळी चालू असलेले भाषण थांबवून जोशींचे आगमन माइकवरून जाहीर केले गेले व 'किसान युनियन झिंदाबाद'च्या घोषणांनी सगळा परिसर दुमदुमून गेला. जाहीर सभेतील आपले पहिले हिंदी भाषण जोशींनी याच खन्नातील सभेत केले. सुरुवातीलाच जोशींनी शहीद भगतसिंगांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले, ''माझी शेती जिथे आहे तिथून जवळच राजगुरूनगर आहे. ह्याच राजगुरूने क्रांतिकार्यात भगतसिंगाला मृत्यूच्या घटकेपर्यंत साथ दिली होती. तेव्हा पंजाब आम्हाला किंवा आम्ही पंजाबला नवखे नाही. आमचा रिश्ता पुराना आहे व त्याला उजाळा देण्यासाठीच आम्ही इथे आलो आहोत. पंजाब म्हणजे आमचा वडील बंधू आहे.'' आपल्या पस्तीस मिनिटांच्या भाषणाच्या या भावस्पर्शी सुरुवातीपासूनच जोशींनी सभेतील प्रत्येकाला भारावून टाकले.

यानंतरच्या मानसा, नवा शहर, फिरोजपूर व गोविंदबालसाहिबा येथील चार सभाही अशाच गाजल्या. स्थानिक पंजाबी वृत्तपत्रांतील बातम्यांमध्येही जोशींनाच सर्वाधिक प्राधान्य दिले गेले. मानसा आणि नवा शहर ह्यांच्या दरम्यान लुधियाना शहराजवळ सुप्रसिद्ध पंजाब कृषी विद्यापीठ आहे. संपूर्ण आशिया खंडात ते नामांकित आहे; विशेषतः तेथील ग्रंथालय.

तिथे जायची जोशींची खूप जुनी इच्छा ह्या दौऱ्यात पूर्ण झाली. योगायोग म्हणजे, ते ह्या ग्रंथालयात असतानाच त्या दिवशीचा 'इंडियन एक्स्प्रेस'चा अंक (चंडीगढ आवृत्ती) कोणीतरी त्यांना आणून दाखवला व त्यात पहिल्याच पानावर त्यांचा मोठा फोटो व खन्ना येथील भाषणाची बातमी छापली होती. महाराष्ट्रातील त्यांच्या कुठल्याच भाषणाला अशी प्रसिद्धी पूर्वी मिळाली नव्हती.

दुसऱ्या दिवशी इंडियन एक्स्प्रेसचे चंडीगढ येथील प्रमुख वार्ताहर विनोद मिश्रा यांनी जोशींची विस्तृत मुलाखत घेतली व ती पुढल्या दिवशी पेपरात छापूनही आली. मिश्रा हे जेमतेम तिशीतले, परदेशात शिकून आलेले, खूप हुशार असे पत्रकार होते व त्यांचे प्रश्न मोठे मार्मिक होते. ''शहरातील दारिद्र्य हाही नुकसानीतील शेतीचाच एक परिणाम आहे व ग्रामीण भागातील भांडवलसंचय हाच देशातील दारिद्र्यावरचा एकमेव उपाय आहे,'' असे जोशी यांनी मुलाखतीत म्हणताच, ''पण उद्या हाच शेतकरी इतरांचे शोषण करू लागला तर?'' असा प्रतिप्रश्न मिश्रांनी विचारला. उत्तरादाखल जोशी म्हणाले, ''तर मग शेतकऱ्यांशीही लढावं लागेल आणि संघटना तशी मोर्चेबंदी करायला कचरणार नाही. कारण मुळात हा लढा शेतकऱ्यांसाठी नसून दारिद्र्याविरुद्ध व शोषणाविरुद्ध आहे.''

उपरोक्त पुस्तकातील कुळकर्णी यांची अनेक निरीक्षणे वेधक आहेत. अगदी सुरुवातीला पुणे स्टेशनात गाडी लागली, तेव्हा दोन हातांत दोन बॅगा घेऊन, धक्काबुक्की करत, कसेबसे डब्यात शिरणारे शरद जोशी पाहूनच कुळकर्णी काहीसे चमकले. नेता म्हटल्यावर तो नेहमी झोकातच राहतो, आपल्या व्यक्तिगत सुखसोयींकडे कधीच दुर्लक्ष होऊ देत नाही, ह्या रूढ अनुभवाला छेद देणारे ते दृश्य होते. कुळकर्णी म्हणतात, ''ज्याची प्रतिमा महाराष्ट्रात 'श्रीमंत शेतकऱ्यांचा कैवारी' म्हणून जाणीवपूर्वक मलिन केली जात होती, असा हा शरद जोशी दोन्ही हात सामानात गुंतवून, रेल्वे स्टेशनचे दादर चढून-उतरून, दुसऱ्या वर्गाच्या डब्यात शिरत होता!''

शेतकरीनेता म्हणून जोशींनी केलेला हा पंजाबचा पहिलाच दौरा. पंजाबबरोबर तेव्हा जडलेले नाते पुढे काळाच्या ओघात अधिकाधिक दृढ होत गेले.

१९८२ मधील ह्या दौऱ्यानंतर १७, १८ व १९ फेब्रुवारी १९८४ रोजी मराठवाड्यात परभणी येथे भरलेल्या शेतकरी संघटनेच्या दुसऱ्या अधिवेशनात पुन्हा एकदा पंजाबचा विषय निघाला. तिथे पंजाबातून आलेले प्रतिनिधीही होते. त्यांनी चंडीगढ येथे पुढील महिन्यात ते वीजमंडळाविरुद्ध करणार असलेल्या आंदोलनाविषयी माहिती दिली. जोशींनी त्यांना लगेचच जोरदार पाठिंबा दिला. 'शेतकरी तितुका एक एक' ही घोषणा मूर्त स्वरूपात आणण्यासाठी 'पंजाबमधील शेतकऱ्यांच्या ह्या आंदोलनात महाराष्ट्रातील शेतकरी बांधवदेखील त्यांना साथ देतील व त्यासाठी महाराष्ट्रातील निदान १००० शेतकरी चंडीगढला जातील' असे जोशींनी जाहीर केले.

'जाना है, जाना है, चंडीगढ जाना है' अशा घोषणाही तेव्हा दिल्या गेल्या. कार्ल मार्क्सने ज्याप्रमाणे 'जगातल्या कामगारांनो, एक व्हा' असा नारा दिला होता व त्याद्वारे वर्गजाणीव (class consciousness) निर्माण करायचा प्रयत्न केला होता, तसाच काहीसा हा जोशींचा प्रयास होता. शेतकरी, मग तो महाराष्ट्रातील असो की पंजाबातील, हा शेवटी एकाच आर्थिक-सामाजिक वर्गातला आहे, आपली सुखदुःखे परस्परांशी जोडली गेलेली आहेत, ही जाणीव संघटनेच्या कार्यकर्त्यांत निर्माण होणे गरजेचे होते. त्यातून त्यांचे स्वतःचे क्षितिज खूप रुंदावणार होते.

१२ मार्च १९८४पासून चंडीगढ येथे सुरू झालेले हे आंदोलन म्हणजे केवळ पंजाबमधील शेती आंदोलनातीलच नव्हे, तर एकूणच शेतकरी संघटनेच्या आंदोलनातील एक मानबिंदू आहे. पुढचे सलग सहा दिवस चंडीगढ येथील पंजाबच्या राजभवनला जवळजवळ एक लाख शेतकऱ्यांनी घेराव घातला होता. त्यात हिंदू आणि शीख आपले सगळे मतभेद विसरून सामील झाले होते. त्यावेळी पंजाबात उफाळलेल्या धार्मिक हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर ह्या आंदोलनाचे अनन्यसाधारणत्व अधिकच उठून दिसते.

मुख्यतः हे आंदोलन विजेच्या दरवाढीविरुद्ध होते. अर्थात विजेव्यतिरिक्त इतरही मागण्या होत्याच. शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव मिळावा, शेतीमालाच्या विक्रीवरची झोनबंदीसारखी बंधने उठवावीत, आपल्या विकासाला योग्य असे आधुनिक बियाणे, यंत्रे, तंत्रज्ञान वापरण्याचे किंवा आयात करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य शेतकऱ्याला असावे वगैरे.

पंजाबी शेतकऱ्याच्या दृष्टीने वीजपुरवठा ही एक कायमची डोकेदुखी बनून राहिली होती. शेतीतील कूपनलिका, पंप, मोटारी, थ्रेशरसारखी इतर उपकरणे यांचा वापर तिथे भरपूर. त्यासाठी वीज ही अत्यावश्यक. पण वीजपुरवठा मात्र कमालीचा अनियमित. त्यातून ग्रामीण भागातील वीज ही बहुतेकदा रात्री पुरवली जायची. कधीही ती खंडित व्हायची. काळोखात शेतात काम करणे अशक्य होई. साप, अन्य जीवाणू चावायची भीती असे. याउलट शहरी भागात वीज दिवसा पुरवली जाई; ते शहरवासीयांना व मुख्यतः कारखान्यांना सोयीचे असे. पण त्यांची सोय पाहणारे सरकार ग्रामीण भागात राहणाऱ्या शेतकऱ्यांची सोय मात्र पाहत नाही याचाही राग शेतकऱ्यांच्या मनात होता. विजेचे दरही कमी करावेत म्हणून आदले दीड वर्ष शेतकरी मागणी करत होते, पण पंजाब शासन दाद देत नव्हते; उलट सरकारने ते दर वाढवायचा निर्णय घेतला होता. त्या विरोधात शेवटी राजभवनला घेराव घालायचे ठरले होते.

पंजाबात ह्या घडामोडी चालू असताना इकडे महाराष्ट्रात परभणीतील आवाहनाला साद म्हणून झपाट्याने शेतकरी पुढे येऊ लागले. 'पंजाबात सगळीकडे आग पेटली आहे, तिथे जाऊन उगाच कशाला जीव धोक्यात घालता?' असा सल्ला देणारेही बरेच होते, पण त्यांना न जुमानता, स्वखर्चाने, जाणाऱ्यांची संख्या बघता बघता अकराशेवर जाऊन पोचली.

शेवटी एकदाचा दीर्घकाळ प्रतीक्षा असलेला १२ मार्चचा दिवस उजाडला. सकाळी नऊच्या सुमारास सारे मराठी शेतकरी चंडीगढला परेड ग्राउंडवर जाऊन पोचले. तोवर इतरही शेतकरी मोठ्या प्रमाणावर येऊन पोचले होते. सकाळी सहा वाजल्यापासूनच तिथे शेतकऱ्यांचे लोंढेच्या लोंढे दाखल होऊ लागले होते.

चंडीगढला पोचल्यावर मराठी शेतकऱ्यांना संगरूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या गटात समाविष्ट केले गेले. ह्या गटाचे नेतृत्व महाराष्ट्राशी बऱ्यापैकी परिचित असलेले बलबीरसिंग राजेवाल ह्यांच्याकडे होते. त्यांच्यासोबत भास्करराव बोरावके, रामचंद्रबापू पाटील, शेषराव मोहिते, नरेंद्र अहिरे, भाऊसाहेब इंगळे, बद्रीनाथ देवकर, चंद्रकांत वानखेडे व विजय जावंधिया हे होते. त्याशिवाय ताराबाई तानाजी पवार (पिंपळगाव दबडे), पार्वतीबाई यादव नाईकवाडे (येवला) व प्रभावतीबाई महादेव केळकर (पाथर्डी) या महिला कार्यकर्त्याही होत्या. विशेष म्हणजे सतत १३ दिवस सायकलने प्रवास करीत वर्धा जिल्ह्यातील नऊ तरुणही ह्या आंदोलनासाठी जवळपास दीड हजार किलोमीटर्सचा प्रवास करून आले होते. जमलेल्या सर्वच आंदोलकांनी त्यांचे भरपूर कौतुक केले. 'पंजाब का बुलावा है, महाराष्ट्र आज आया है' असे लिहिलेले स्वागतपर फलक रस्त्यावर जागोजागी लावले होते. महाराष्ट्रातून आलेल्या जवळजवळ सर्वच शेतकऱ्यांचा पंजाबात यायचा, किंबहुना महाराष्ट्राबाहेर पाय ठेवायचा हा पहिलाच प्रसंग होता. साहजिकच सगळ्यांचा उत्साह दांडगा होता. चंडीगढच्या दर्शनाने सगळे अगदी भारावून गेले होते.

चंडीगढ आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग असलेले शेतकरी संघटनेचे विदर्भातील एक नेते चंद्रकांत वानखडे यांनी शेतकरी संघटक(६ एप्रिल १९८४)मध्ये चक्षुर्वैसत्यम हकीकत नोंदवलेली आहे. त्यानुसार राजभवनापर्यंत शेतकऱ्यांना पोचताच येऊ नये म्हणून लांबलांबून येणाऱ्या शेतकऱ्यांना चंडीगढच्या वेशीवरच रोखण्याचा पोलिसांनी आधी प्रयत्न केला. पण शेतकऱ्यांची संख्या प्रचंड होती, त्यांच्या लाटाच्या लाटा चंडीगढमध्ये शिरत होत्या व एवढ्या मोठ्या संख्येने येणाऱ्या शेतकऱ्यांना अडवणे अशक्य आहे हे लक्षात आल्यावर पोलिसांनी तो प्रयत्न सोडून दिला. वेगवेगळ्या मोर्च्यांनी शेतकरी राजभवनसमोरच सेक्टर सतरामध्ये असलेल्या विशाल परेड ग्राउंडवर जमू लागले. त्यांची संख्या दुपारी दोनपर्यंत जवळपास एक लाखावर गेली होती. बहुसंख्य शेतकरी अर्थातच पंजाबमधील होते; पण हरयाणा, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान येथील शेतकऱ्यांची संख्याही लक्षणीय होती. त्यांच्यासोबत आलेले जवळजवळ दोन हजार ट्रॅक्टर्स व ट्रेलर्स परेड ग्राउंडच्या भोवताली पसरले होते. अधूनमधून माइकवरून पंजाबी गीते सादर केली जात होती. काही जण रेडियो ऐकत होते. काहींजवळ टेपरेकॉर्डर होते; त्यांवरून गुरुबाणी ऐकवली जात होती. खाण्यासाठी आंदोलकांनी बरोबर कायकाय आणले होते! त्याचाही समाचार घेणे सुरू होते. वेगवेगळे गटनेते आपापल्या अनुयायांसमोर छोटी-छोटी भाषणेही करत होते.

१० ऑक्टोबर १९८३ ते २९ सप्टेंबर १९८५ या कालावधीत पंजाबात अस्थिरतेमुळे राष्ट्रपतींची राजवट होती. राज्यपाल बी. डी. पांडे हेच सर्व निर्णय घेत होते. त्या दिवशी दुपारी

तीनच्या सुमारास ते फिल्लूरमधील आपला पूर्वनियोजित कार्यक्रम आटोपून खास विमानाने चंडीगढमध्ये दाखल झाले व मोटारने थेट राजभवनमध्ये जाऊन पोचले. एकूण परिस्थिती त्यांच्या लक्षात आली होती. काही उच्च अधिकाऱ्यांची तातडीची बैठकही त्यांनी लगेचच बोलावली. नंतर मान व जोशींसह प्रमुख शेतकरीनेत्यांनाही त्या बैठकीत बोलावले व वाटाघाटींनी प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न स्वतःच्या पुढाकारातून केला. पण आंदोलन मागे घ्यायला शेतकरीनेत्यांनी नकार दिला. संध्याकाळपासून राजभवनाला वेढा पडणार हे आता नक्की झाले. 'वेढ्याच्या कालावधीत आपण राजभवन सोडून कुठेही बाहेर जाणार नाही' असे आश्वासन राज्यपालांनी त्यावेळी शेतकरीनेत्यांना दिले.

सगळे नेते घाईघाईने पुन्हा परेड ग्राउंडवर आले. शेतकऱ्यांच्या घोषणांनी सगळा परिसर दुमदुमून गेला होता. लोकांचा उत्साह आता अगदी शिगेला पोचला होता. इतक्या लोकांना दीर्घकाळ शांत ठेवणे अवघड होते; काही ना काही घडत राहणे आवश्यक होते. काही मिनिटांतच सभेला सुरुवात झाली. सभेत पंजाबमधील नेते अजमेरसिंग लोखोवाल, बलबिरसिंग राजेवाल, भूपेंद्रसिंग मान, हरयाणाचे नेते मांगीराम मलिक, मध्यप्रदेशचे विनयचंद्र मुनीमजी, उत्तरप्रदेशचे डॉ. रघुवंशमणि पांडे व समन्वय समितीचे संयोजक विजय जावंधिया यांची भाषणे आधी झाली. सर्वांत शेवटी जोशी बोलले. ''आम्ही आपल्या मदतीसाठी आलेलो नाही. लहान भाऊ मोठ्या भावाला काय मदत करणार? पण आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी करायला आम्ही इथे आलो आहोत. ज्यांच्या हाती सेनेकडे असलेल्या हत्यारांपेक्षाही प्रभावी असं गव्हासारखं हत्यार आहे, त्यांना कोणाच्याही मदतीची गरज नाही.'' त्यांचा शब्दन्‌शब्द सगळे श्रोते विलक्षण शांततेत ऐकत होते. प्रत्येकाच्या काळजाला भिडणारे ते भाषण होते.

परेड मैदानावरची सभा संपल्यावर साधारण सहाच्या सुमारास सर्व शेतकरी सहा वेगवेगळ्या गटांत विभागले गेले व शिस्तबद्ध रांगा करून अर्ध्या किलोमीटरवर असलेल्या राजभवनकडे घोषणा देत चालू लागले. पूर्वी ठरल्याप्रमाणे राजभवनकडे जाणाऱ्या सहाही रस्त्यांवर जाऊन नियोजित जागी त्यांनी धरणे धरले. पहिला गट सेक्टर सात आणि आठ यांच्यामधून राजभवनवर गेला. सगळ्यात मोठा गट गोल्फ क्लबच्या समोरून राजभवनवर गेला. ह्या गटात जोशी व मान होते. शेवटचा गट लेक क्लबच्या समोरून राजभवनवर गेला. चारी बाजूंनी आता राजभवनाला शेतकऱ्यांचा वेढा पडला होता. तोवर संध्याकाळचे सात वाजले होते. तसे हे सहाही रस्ते सकाळी नऊपासूनच पंजाब पोलिसांनी लोखंडी खांब व जाळ्या लावून बंद केले होते. त्या अडथळ्यांच्या अलीकडे शेतकऱ्यांनी रस्त्यांवरच मांडी ठोकली होती आणि अडथळ्यांच्या पलीकडे, राजभवनाच्या भिंतीपर्यंत हजारोंच्या संख्येने पोलीस हजर होते. चंडीगढ प्रशासनाने पंजाब व हरयाणा सरकारव्यतिरिक्त केंद्राकडूनही सुरक्षारक्षकांची कुमक मागवली होती. सुमारे १५,००० पोलीस, एसआरपी व बॉर्डर सिक्युरिटी फोर्सचे जवान राजभवन परिसरात सुसज्ज उभे होते. चंडीगढ ही पंजाब व हरयाणा ह्या दोन्ही राज्यांची राजधानी. ती केंद्रशासित आहे. दोन्ही राज्यांची स्वतंत्र राजभवने आहेत. हा वेढा पंजाबच्या राजभवनला होता.

तेरा मार्च. वेढ्याचा दुसरा दिवस. राजभवनासमोरच एक मोक्याची जागा शोधून दुपारी तिथे सभा झाली व त्या सभेत महाराष्ट्रातून आलेल्या शेतकऱ्यांना निरोप देण्यात आला. त्यांना पुन्हा लांबचा प्रवास करून आपापल्या घरी परतायचे असल्याने दुसऱ्या दिवशी त्यांना परतायची परवानगी द्यायची हे पूर्वीच ठरले होते. काही कार्यकर्ते मात्र तिथेच राहणार होते. ह्या लढ्यातला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सहभाग खूप वाखाणला गेला. मुळात त्यांचा सहभाग हाच पंजाबच्या शेतकऱ्यांना फार मोठा आधार वाटला. 'देशातील शेतकरी सारे एक आहेत' ही भावना त्यातून अधोरेखित होत होती व तेच त्यांच्या सहभागाचे मुख्य कारण होते. 'महाराष्ट्रात जेव्हा असे आंदोलन होईल, तेव्हा आम्हीही तुमच्यामागे असेच उभे राहू' असे आश्वासन जवळजवळ प्रत्येक वक्त्याने मंचावरून दिले.

चौदा मार्च. वेढ्याचा तिसरा दिवस. वातावरणातील चुळबुळ आता वाढली होती. पण पंजाब शासन दाद देईना; शेतकरीनेत्यांशी बोलणी करण्यासाठी पुढे येईना. सरकारला कदाचित वाटले असावे, की आपण दोन-तीन दिवस दुर्लक्ष केले, तर कंटाळून शेतकरी आपोआपच वेढा उठवून आपापल्या गावी परततील. पण मागण्या मान्य झाल्याखेरीज वेढा उठवायचा नाही हा शेतकऱ्यांचा निर्धार कायम होता. त्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरू झाली. आसपासच्या गावांतून शिदोरी जमवायला सुरुवात झाली. दूध येऊ लागले. फळे येऊ लागली. ट्रॅक्टर्स भरभरून खाद्यपदार्थ येऊ लागले. शेतकऱ्यांनी मिळतील त्या लाकडी फळकुटांचा व कार्डबोर्डांचा वापर करत आपापल्या कच्च्या झोपड्या उभ्या केल्या. एक किसाननगरच तिथे उभे राहिले.

पंधरा मार्च. वेढ्याचा चौथा दिवस. आज सकाळपासूनच वातावरण एकदम तंग झाले. वेढ्याच्या कालावधीत राजभवन न सोडण्याचे आश्वासन राज्यपालांनी पाळले नाही. त्या पहाटे अचानक ते गुपचूप बाहेर पडले. लुधियानामधील एका कार्यक्रमासाठी ते गेले होते. रेडियोवरील बातम्या ऐकताना ही बातमी आंदोलकांना कळली. ते खूपच चिडले. तीन-चार तासांनी राज्यपाल परत आले. त्या दोन्ही वेळी राज्यपालांच्या अनुपस्थितीत राजभवनावरील ध्वज उतरवून ठेवणे, त्यांच्या मोटारीवर राष्ट्रध्वज व लाल दिवा लावणे, पुढ्यात सायरन वाजवत जाणारी गाडी असणे, राजभवनाच्या मुख्य प्रवेशदारावर राज्यपाल आत नाहीत हे सूचित करणारी नेहमीची पाटी लावणे वगैरे सोपस्कार पाळले गेले नव्हते. दरम्यानच्या काळातील तणाव तोवर खूप वाढला होता. पण जोशी व इतर नेत्यांनी शेतकऱ्यांची समजूत काढली. आपल्या भाषणात जोशी म्हणाले,

''राज्यपाल उंदरासारखे बिळातून बाहेर आले असले आणि परत बिळात घुसले असले तरी आपण काही मांजर नाही. आपल्याला उंदीर-मांजराचा खेळ खेळायचा नाही, त्यांचा पाठलाग करायचा नाही. आपले आश्वासन त्यांनी पाळले नाही, उंदरासारखे पळून गेले, तरी आपण आपली पायरी सोडायची नाही. शेवटी राज्यपाल हा थेट राष्ट्रपतींचा प्रतिनिधी आहे ह्याची जाणीव ठेवून आपण संयम पाळू या.''

अतिशय कौशल्याने जोशींनी ती परिस्थिती हाताळली व शांतता कायम राखली.

सोळा मार्च. वेढ्याचा पाचवा दिवस. आता रोज आसपासच्या गावांतून नवे नवे शेतकरी मोर्च्यांने येऊन वेढ्यात सामील होऊ लागले. स्त्रियाही मोठ्या संख्येने येऊ लागल्या. शेजारच्या हरयाणातील पंधरा-वीस हजार शेतकरी लवकरच तिथे येऊन दाखल होत आहेत अशीही बातमी होती. सरकारचे हेलिकॉप्टर रोज सकाळी किसाननगराची हवाई पाहणी करायचे. त्यांनीही शेतकऱ्यांचा उत्साह वाढता आहे हे सरकारपर्यंत पोचवले असणार. वृत्तपत्रे तर रोजच पानभर बातम्या छापत होती.

ही सारी परिस्थिती विचारात घेऊन शेवटी पंजाब सरकारने सतरा तारखेला, म्हणजे सहाव्या दिवशी, शेतकरीनेत्यांशी बोलणी सुरू केली. उभय बाजूंच्या संमतीने लुधियाना येथील सुप्रसिद्ध पंजाब कृषी विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. एस. एस. जोल ह्यांच्या अध्यक्षतेखाली पुढील पंधरा दिवसांत एक तज्ज्ञ समिती नेमायचा निर्णय सरकारने घेतला. डॉ. जोल हे आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेले एक कृषिशास्त्रज्ञ होते. पुढे त्यांना पद्मभूषण पुरस्कारही दिला गेला. त्यांना मदत करण्यासाठी म्हणून समितीचे इतरही तीन सदस्य असणार होते; ते तिघे वरिष्ठ सरकारी अधिकारी होते. समितीने आपला अहवाल तीन महिन्यांत द्यायचा असेही ठरले. या तज्ज्ञ समितीने वीजदर ठरवताना वीज उत्पादनाचा खर्च विचारात घ्यायचा, पण त्याचबरोबर शेतीमालाची किंमत ठरवतानाही तोच वाढीव वीजदर विचारात घ्यायचा व त्या आधारावर शेतीमालाची किंमत ठरवायची असे ठरले. शेतीमालाची किंमत ठरवण्याची ही पद्धत अधिक शास्त्रशुद्ध होती व तीच देशभर सर्वत्र लागू झाली तर शेतकऱ्यांचा फार मोठा फायदा त्यात होणार होता. किंबहुना, शेतीमालाची रास्त किंमत ठरवण्याची योग्य यंत्रणा उभारणे ह्या मागणीवर जोशींचा प्रथमपासूनच खूप भर होता व त्या दिशेनेच टाकलेले हे पाऊल होते. आधी आंदोलनाकडे पूर्ण दुर्लक्ष करणाऱ्या सरकारने एवढी तयारी दर्शवली हाही मोठा विजय होता.

त्यानंतर शेतकऱ्यांनी वेढा उठवायचे ठरवले. ज्या परेड ग्राउंडवरून आंदोलनाला सुरुवात झाली त्याच परेड ग्राउंडवर १८ मार्चला प्रचंड जल्लोषात विजयोत्सव साजरा झाला.

ह्या सहा दिवसांत जे कार्यकर्ते तिथे प्रत्यक्ष हजर होते, त्यांच्या दृष्टीने हा आयुष्यातील एक अविस्मरणीय असा अनुभव होता. त्यांच्या निरीक्षणांतून व आठवणींतून आंदोलनाच्या वेगवेगळ्या पैलूंवर प्रकाश पडतो. किसाननगरमध्ये पहिल्या दोन दिवसांतच शेतकऱ्यांनी आपापल्या कामचलाऊ झोपड्या उभारल्या याचा उल्लेख मागे झालाच आहे. त्या घटनेला चंद्रकांत वानखडे यांनी आपल्या उपरोक्त लेखात लिहिल्याप्रमाणे विनोदाची झालरही होती. प्रत्येक झोपडीसमोर एक पुठ्ठ्याचा बोर्ड लटकत होता. त्यावर त्या झोपडीचे नाव, घर क्रमांक व टेलिफोन क्रमांक गुरुमुखीत लिहिलेले असायचे. वर एक शोभेचा टीव्ही अँटेनादेखील लटकत होता! चंडीगढमधील इतर उच्चभ्रू बंगल्यांची ही नक्कल होती! 'हा टेलिफोन नंबर कुठला? इथे तर टेलीफोनच नाहीये,' असे विचारले, तर उत्तर यायचे, 'टेलिफोनसाठी अर्ज

केला आहे, नंबरदेखील मिळाला आहे. टेलिफोन मात्र अजून मिळालेला नाही. सरकारी कामांना किती उशीर लागतो हे माहिती आहे ना तुम्हाला!'

सत्याग्रहींमध्ये सहभागी असलेले कोपरगावचे भास्करराव बोरावके म्हणतात,

''त्या काळात खलिस्तानचा प्रश्न अगदी पेटून उठलेला. पण या आंदोलनात तथाकथित हिंदू-शीख वैर किती फसवं आहे, धर्मभेद हा खोटा वाद कसा आहे, हे कोणालाही दिसेल इतकं स्पष्ट झालं. आणखी एक गोष्ट – जोशीसाहेबांनी कधीही शिखांचं लांगूलचालन केलं नाही. तिथल्या शिखांमध्ये दारू प्यायचं प्रमाण प्रचंड. पहिल्याच दिवशी बरेच शीख बांधव दारू पिऊन आले होते. साहेबांनी त्यांना अगदी स्पष्ट शब्दांत त्याच दिवशी व्यासपीठावरून जाहीर तंबी दिली. म्हणाले, 'ज्यांना दारू प्यायची असेल, त्यांनी इथून ताबडतोब चालतं व्हावं.' आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुसऱ्या दिवसापासून एकही शीख बांधव घेराओत दारू पिऊन आला नाही! इतका स्पष्टवक्तेपणा दाखवूनही लोकांवर इतका जबरदस्त होल्ड असलेला दुसरा कोणीही नेता आम्ही आजपर्यंत कधी पाहिलेला नाही.''

कोपरगावचेच दुसरे एक शेतकरी बद्रीनाथ देवकर जोशींच्या खास विश्वासातले, त्यांचा भरपूर व्यक्तिगत सहवास लाभलेले. तरुणपणापासूनच संघटनेचे पूर्णवेळ काम करू लागलेले. ते म्हणतात,

''किसाननगरातून फेरफटका मारताना मला जाणवत होतं, की पंजाबी शेतकरी किती हरहुन्नरी आहे. त्याने तीन दगड गोळा करून त्यांची चूल बनवली. शेजारच्या झाडाझुडपांतून वाळलेला लाकूडफाटा गोळा केला. काही पन्हाळी पत्र्यांचे तुकडे मिळवले, ते दगडांनी ठेचून सरळ केले आणि त्यांचे तवे आणि पोळपाट बनवले. मोठ्या बाटल्यांचं केलं लाटणं! कुठेही हा शेतकरी अडला नाही. शिवाय आल्यागेल्याला अगदी आग्रहाने बोलावून जेवायला द्यायचे. तिसऱ्या दिवसापासून जवळच्या खेड्यांमधून इतके ट्रॅक्टर यायला लागले की मोजणं मुश्किल! प्रत्येक ट्रॅक्टरवर एक चालक पुरुष व बाकी सर्व स्त्रिया. त्यांनी वेढ्यात बसलेल्या सर्व पुरुषांना सांगितलं, 'तुम्ही घराची चिंता करू नका. आंदोलनात राहा. आम्ही सर्व पुरवठ्याची जबाबदारी घेतो.' दुधाचे कॅन, भाजीपाला, पीठ, फळफळावळ, खाण्याचे तयार पदार्थ ट्रॅक्टर भरभरून आले व दररोज येतच राहिले. खाण्याची अगदी रेलचेल झाली. आंदोलन संपल्यावर हे आलेलं धान्य, पीठ, शिधा वगैरे मोठ्या प्रमाणावर उरलं होतं. ते सगळं मंडईत नेऊन त्याचा लिलाव केला गेला व त्याचे लाख, दीड लाख रुपये जमा झाले!''

चंडीगढच्या प्रशासनाचेही शेतकरीनेत्यांनी जाहीर कौतुक केले. खरेतर शेतकऱ्यांचे भांडण हे पंजाब सरकारशी होते, चंडीगढ प्रशासनाशी नव्हे. चंडीगढ प्रशासनाच्या दृष्टीने तो केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा मुद्दा होता. आवश्यकता भासल्यास पोलिसांचे बळ वापरून वेढा उधळून टाकायची प्रशासनाची तयारी होती; पण प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे आंदोलन अगदी शांततापूर्ण चालले आहे हे लक्षात आल्यावर प्रशासनानेही बळाचा वापर टाळला. शेतकरीनेत्यांबरोबर चर्चा करून शेतकरी कुठल्या कुठल्या रस्त्यांवर धरणे धरतील हे निश्चित

केले. त्या ठिकाणी स्वच्छता, दिवे, पाणीपुरवठा यांचीही चांगली व्यवस्था केली. सरकारशी बोलणी सुरू व्हावी म्हणूनही पुढाकार घेतला. शेतकऱ्यांनी शांतता पाळली आणि प्रशासनानेही संयम राखला. आंदोलन कसे हाताळावे ह्याचा हा एक आदर्शच होता.

चंडीगढमधून प्रसिद्ध होणाऱ्या सर्वच इंग्रजी, हिंदी व पंजाबी वृत्तपत्रांनी ह्या आंदोलनाला भरपूर प्रसिद्धी दिली. जवळजवळ रोजच पहिल्या पानावर सचित्र बातमी येत होती. शरद जोशींचा सभेत भाषण करतानाचा तीन कॉलमी फोटो पहिल्याच दिवशी सगळ्या वृत्तपत्रांनी छापला होता. सगळ्यांनी संपादकीय लिहूनही आंदोलनाची दखल घेतली. ह्या पत्रकारांकडून त्यावेळी अनेक महत्त्वाचे मुद्दे पुढे आले; त्यांतले काहीतर असे होते, की जे स्वतः शेतकरीनेत्यांनीही नोंदवलेले नव्हते किंवा 'शेतकरी संघटक'सारख्या संघटनेच्या मुखपत्रातही कुठे लिहिले गेलेले नाहीत.

उदाहरणार्थ, १३ मार्च १९८४च्या 'दि ट्रिब्यून'मधील एक बातमी. राजभवनसमोरचा गोल्फ क्लब हा पंजाबातील सर्वांत उच्चभ्रू क्लब. एरव्ही तिथे पाय ठेवायला मिळणेही सर्वसामान्यांना अवघड. पण ह्या आंदोलनात असंख्य शेतकऱ्यांनी रात्री झोपताना आपापल्या पथारी खुशाल तिथल्या खास राखलेल्या विस्तीर्ण हिरवळीवर पसरून दिल्या होत्या. सुखना लेकमध्ये बोटिंग करणे किंवा सेक्टर १७मधील श्रीमंती शॉपिंग सेंटरमध्ये भटकणे हाही अप्राप्य असा आनंद शेतकऱ्यांनी घेतला. चंडीगढमधील राजेशाही हवेल्याही अनेक शेतकरी बाहेरून न्याहाळत असत. ग्रामीण भागातून आलेल्या शेतकऱ्यांना शहरी चंडीगढमध्ये आल्यावर काय काय वाटत असेल ह्याची ह्यावरून काहीशी कल्पना येते. 'दि ट्रिब्यून'ने याची आवर्जून नोंद केली आहे.

ह्याच पेपराचे १५ मार्चचे 'The March on Chandigarh' हे संपादकीय या आंदोलनाचा 'unprecedented in numbers and also qualitatively different from other demonstrations' ('संख्येचा विचार करता अभूतपूर्व आणि शिवाय इतर निदर्शनांपेक्षा वेगळ्याच गुणवत्तेचे') म्हणून गौरव करते व शेवटी म्हटते,

> Half a century ago Sir Chhotu Ram aroused the farmers of the Punjab of that time to a sense of wrong at the hands of the moneylender and the consumer of agricultural products. This resulted in a major revolution in thought and a re-evaluation of roles. Mr. Sharad Joshi is using a much bigger platform to propagate his philosophy of social equality and economic justice. His campaign could well become an important determining factor in shaping the country's political scenario, especially on the eve of the general elections for Parliament and several State Assemblies.

(अर्धशतकापूर्वी सर छोटू राम यांनी तत्कालीन पंजाबातील शेतकऱ्यांना त्यांच्यावर सावकार व शेतीमालाच्या ग्राहकाकडून होत असलेल्या अन्यायाविरुद्ध जागृत केले. त्याचा परिणाम म्हणून एक मोठी वैचारिक क्रांती घडून आली व आपापल्या भूमिकांचे पुनर्मूल्यांकन केले गेले. सामाजिक समता व आर्थिक न्याय यांबाबतच्या आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी आज श्री शरद जोशी त्यापेक्षा अधिक मोठे व्यासपीठ वापरत आहेत. त्यांचे हे आंदोलन देशातील राजकीय परिस्थितीला आकार देण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णायक घटक ठरू शकेल – विशेषतः लोकसभेच्या व अनेक राज्यांतील आगामी निवडणुकांच्या पूर्वसंध्येला.)

आपल्या २० मार्चच्या अंकात या आंदोलनाचे राजकीय महत्त्व विशद करताना 'इंडियन एक्स्प्रेस'चे एक पत्रकार देविंदर शर्मा यांनी आपल्या लेखात म्हटले,

That the Bharatiya Kisan Union has emerged as a major force to reckon with in Punjab becomes evident from the manner in which the Akali Dal felt perturbed over the massive show of strength. Since the BKU had politely turned down Akali Dal's offer of support, the Dal had to issue a statement supporting the farmers' movement 'unilaterally'. Whether the farmers' movement has eroded the Akali rural base is still not clear but it is certain that the state's peasantry is more concerned about their own economic problems than the political and religious demands. The farmers' leaders, unlike politicians, stayed along with the farmers during the picketing of Raj Bhavan. This itself is enough to seek mass support from the ruralites. Most of those who camped at Chandigarh were young farmers and not the old generation which participated in the Akali morcha. 'The Akalis are fighting a *dharam yudh* and we are waging a *karam yudh*,' said a young farmer aptly summing up the difference in approach.

(भारतीय किसान युनियन ही पंजाबमधील एक मोठी दखलपात्र शक्ती म्हणून उदयाला आली आहे. युनियनने केलेल्या शक्तिप्रदर्शनामुळे ज्याप्रकारे अकाली दल हा पक्ष अस्वस्थ झाल्याचे दिसते, त्यावरून ही बाब अगदी स्पष्ट आहे. अकाली दलाने देऊ केलेला पाठिंबा बीकेयुने नम्रपणे नाकारला होता व त्यामुळे अकाली दलाला आंदोलनासाठी आपला 'एकतर्फी' पाठिंबा जाहीर करावा लागला. शेतकरी आंदोलनामुळे अकाली दलाचा ग्रामीण भागातील पाया पोखरला गेला आहे का, हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, राज्यातील शेतकऱ्यांना धार्मिक अथवा राजकीय मागण्यांपेक्षा स्वतःचे आर्थिक प्रश्न अधिक जवळचे वाटतात हे नक्की झाले आहे. राजभवनवरील निदर्शनांच्या वेळी शेतकरीनेते स्वतःही शेतकऱ्यांबरोबरच मुक्काम

> ठोकून होते; जे राजकीय नेते कधीच करत नाहीत. ग्रामीण जनतेचा पाठिंबा मिळवण्यासाठी ही एक कृतीदेखील पुरेशी आहे. चंडीगढ आंदोलनात भाग घेणारे बहुसंख्य हे तरुण शेतकरी होते; अकालींच्या मोर्च्यात सामील झालेल्या शेतकऱ्यांप्रमाणे वृद्ध नव्हते. एका तरुण शेतकऱ्याने मार्मिक शब्दांत म्हटल्याप्रमाणे, 'अकाली हे *धर्मयुद्ध* लढत आहेत, तर आम्ही *कर्मयुद्ध* लढत आहोत.' अकाली दल व शेतकरीनेते यांच्या भूमिकांतील फरक यातून स्पष्ट होतो.)

हे आंदोलन किती शांतिपूर्ण होते, हिंसेचा एकही प्रकार कसा घडला नाही याचेही याच लेखात शेवटी शर्मा यांनी खूप कौतुक केले आहे. ते म्हणतात,

> नेत्यांची इच्छा असेल तर लोक शांतता पाळतात हे यातून सिद्ध होते. अनेकांनी चिथावणी देऊनही शेतकऱ्यांनी कायम संयम पाळला. किंबहुना शेतकरी संघटनेच्या स्वयंसेवकांनी – जे स्वतःला किसान रिझर्व्ह पोलीस (KRP) म्हणवतात त्यांनी – स्वतःच जवळजवळ शंभरएक गुंडांना पोलिसांच्या ताब्यात दिले.

इथे एक मुद्दा नमूद करायला हवा. इतर शेतकरीनेत्यांचे मत कदाचित वेगळे असू शकेल, पण व्यक्तिशः जोशींचा वीजदर वाढवायला काहीच विरोध नव्हता; सरकारने तोट्यात वीज विकावी हे त्यांना अमान्यच होते. त्यांचे म्हणणे एवढेच होते, की विजेचा जो काही खर्च प्रत्यक्षात येतो तेवढा सगळा खर्च तुम्ही शेतीमालाची किंमत काढतानाही हिशेबात धरा; म्हणजे मग तो वाढीव वीजदर शेतकरी आनंदाने देईल. कुठल्याही प्रकारची सवलत (सबसिडी) त्यांना तत्त्वशः अमान्य होती. पण प्रत्यक्षात विजेचा खर्च हेक्टरी १५३ रुपये येत असताना सरकार मात्र धान्याची किंमत ठरवताना तो वीजखर्च फक्त हेक्टरी ७८ रुपये पकडत असे. इतरही सर्व इनपुट्स असेच खूप कमी खर्चाचे दाखवले जात व त्यामुळे शेतीमालाचा उत्पादनखर्च आपोआपच कमी धरला जाई व पर्यायाने शेतीमालाची किंमतही कमीच पकडली जाई. नेमका हाच अन्याय जोशी दूर करू पाहत होते.

सोमवार, १६ एप्रिल, १९८४च्या 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये स्वामिनाथन एस. अय्यर यांचा 'Harvesting Hindu-Sikh amity' ह्या शीर्षकाचा एक विस्तृत लेख संपादकीयालगतच प्रसिद्ध झाला आहे. तोही काही वेगळे विचार मांडणारा आहे. साररूपाने त्यांचे विचार असे आहेत :

पंजाबमधील शीख असंतोषाचा विचार करताना शिखांनीही काही तथ्ये विचारात घ्यायला हवीत. पंजाबमधील दोन तृतीयांश शेतकरी हे शीख आहेत व ते भरपूर पिके काढतात हे खरे असले, तरी त्यामागे बिहारसारख्या राज्यातून येणाऱ्या लक्षावधी हिंदू शेतमजुरांचाही मोठा वाटा आहे. किंबहुना ह्या शेतमजुरांशिवाय पंजाबातील शेती होऊच शकणार नाही. इतरही

अनेक बाबतीत शिखांना इतर राज्यांवर अवलंबून राहावे लागते. पंजाबमधील नद्या आणि कालवे यांतील पाणी मुख्यतः हिमाचल प्रदेशातून येते व तिथल्या विजेसाठी लागणारा कोळसा मध्यप्रदेशातून येतो. बाहेरून येणाऱ्या या वीज व पाण्याअभावी पंजाबची अर्थव्यवस्था कोसळून पडेल. जवळजवळ २० लाख शीख पंजाबबाहेर राहतात व त्यांनाही आपापल्या व्यवसायासाठी तेथील बव्हंशी हिंदूंवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शीख व हिंदू ह्यांच्यातील ऐक्यातच पंजाबचे व तेथील शिखांचे कल्याण सामावलेले आहे. दुर्दैवाने भावनेच्या भरात शीख हे परस्परावलंबित्व विसरतात. हिंदू-शीख ऐक्य वाढवण्याची म्हणूनच आज सर्वाधिक गरज आहे.

हाच धागा घेऊन चंडीगढ आंदोलनाच्या संदर्भात अय्यर पुढे लिहितात,

> There is reason to be optimistic on this score because of the close co-operation between Sikhs and Hindus in the recent farmers' agitation in Punjab. The president of the Kisan Union, Mr. Bhupinder Singh Mann, and many other office-bearers are Sikhs. But they speak for Hindu as well as Sikh farmers and inducted the services of Mr. Sharad Joshi, a Hindu from Maharashtra, for pressing their demands. They gheraoed Raj Bhavan in Chandigarh and given the trouble in Punjab, the predominantly Hindu population of Chandigarh was initially alarmed by the invasion of the city by farmers, who pitched camps on public places. But it rapidly became clear that the farmers were a highly disciplined lot who took great precaution to ensure that the agitation was non-violent, thanks in part to Mr. Sharad Joshi's organizational abilities. They were soon playing with the children of the Hindu parents and there were warm hugs and embraces between members of the two communities. It was an education for both sides to chat and learn of each other's problems. Not even Holi revelry with all its unpredictability, affected the show of comraderie. The farmers, used to informal ways of dropping in on neighbours, soon won the hearts of Chandigarh urbanites.

(पंजाबमधील अलीकडच्या शेतकरी आंदोलनात हिंदू व शीख ह्यांच्यात जे निकटचे सहकार्य दिसले, त्यामुळे ह्या आघाडीवर आशावादी राहणे सयुक्तिक ठरेल. किसान युनियनचे अध्यक्ष श्री. भूपिंदरसिंग मान व इतर अनेक पदाधिकारी शीख आहेत. पण ते शिखांप्रमाणेच हिंदूंच्याही वतीने बोलत आहेत व आपल्या मागण्या पुढे रेटण्यासाठी त्यांनी श्री. शरद जोशी यांच्यासारख्या महाराष्ट्रातील एका हिंदूचे सहकार्यही घेतले आहे. त्यांनी चंडीगढमधील राजभवनला घेराव घातला, तेथील

मोकळ्या सार्वजनिक जागांवर आपले तंबू ठोकले, त्यावेळी चंडीगढमधील बव्हंशी हिंदू नागरिक आपल्या शहरावर झालेल्या ह्या शेतकऱ्यांच्या आक्रमणाने सुरुवातीला घाबरून गेले. पंजाबमधील सध्याची परिस्थिती पाहता हे स्वाभाविकच होते. पण हे शेतकरी अतिशय शिस्तबद्ध आहेत व आपले आंदोलन त्यांनी अतिशय दक्षतापूर्वक अहिंसक ठेवले आहे ही गोष्ट लौकरच स्पष्ट झाली. ह्याचे काही श्रेय शरद जोशी यांच्या संघटनकौशल्याला द्यायला हवे. लौकरच हे शेतकरी हिंदू आई-बापांच्या मुलांशी खेळू लागले आणि दोन्ही समाजाच्या लोकांनी लौकरच एकमेकांची गळाभेट घ्यायला सुरुवात केली. एकमेकांशी गप्पा मारणे आणि त्यातून एकमेकांच्या अडचणी समजून घेणे हे दोन्ही समुदायांसाठी एक प्रबोधनच होते. होळीचा सण जल्लोषाने साजरा करताना खूपदा अवचित काहीतरी घडू शकते, पण इथल्या परस्परप्रेमाच्या त्या वातावरणात होळीमुळेही काही बाधा आली नाही. शेजाऱ्यांच्या घरात अगदी सहज, अनौपचारिकपणे जायची सवय असलेल्या ह्या शेतकऱ्यांनी लौकरच शहरी चंडीगढवासीयांची अंतःकरणे काबीज केली.)

हा ग्रामीण शीख शेतकरी व शहरी पांढरपेशा हिंदू यांच्यातील फरक बद्रीनाथ देवकर यांच्या निरीक्षणातही आला होता. ते म्हणतात,

''सुरुवातीला जेव्हा शेतकऱ्यांचे हे लोंढेच्या लोंढे चंडीगढमध्ये येऊ लागले, तेव्हा स्थानिक नागरिक काहीसे घाबरूनच गेले. हे शेतकरी मुख्यतः शीख होते, बऱ्यापैकी राकट होते व चंडीगढसारख्या पॉश शहरातील सोफिस्टिकेटेड लोकांपेक्षा ते अगदी वेगळे आहेत हे लगेचच कळत होतं. आंदोलनाच्या पहिल्या दिवशी सर्व शहरवासीयांनी आपापल्या बायकामुलांना आत घेऊन घरांची दारं-खिडक्या घट्ट लावूनच घेतली. काहीशा भेदरलेल्या नजरेनेच ते ह्या शेतकऱ्यांकडे बघत होते. अगदी पाणी मागण्यासाठी कोणी शेतकऱ्याने दार ठोठावलं तरी दार उघडत नव्हते. न जाणो, हे कोणी अतिरेकी असले तर, अशी भीती त्यांना वाटत होती. पंजाबातील त्यावेळची परिस्थितीच तशी होती. पण हळूहळू त्यांची भीड चेपली. दुपारी ह्या शेतकऱ्यांनी बरोबर बांधून आणलेल्या भाकऱ्या खाल्ल्या व नंतर ती सगळी जागा पुन्हा व्यवस्थित साफ केली हे शहरी माणसांनी बघितलं. त्यानंतर मात्र त्यांनी ह्या शेतकऱ्यांना पाणी द्यायला सुरुवात केली. रात्री शेतकऱ्यांनी आपापल्या घोळक्यात करमणुकीचे कार्यक्रम करायला सुरुवात केली. तेव्हातर बंगल्यातली मंडळी बिनधास्त बाहेर येऊन त्या कार्यक्रमात, नाच-गाण्यात भाग घेऊ लागली. हे कोणी अतिरेकी वगैरे नसून ही आपल्यासारखीच सरळमार्गी माणसं आहेत, हा विश्वास त्यांना वाटू लागला. पुढल्या पाच-सहा दिवसांत तर ह्या शेतकऱ्यांची व शहरी मंडळींची चांगलीच दोस्ती झाली.''

ऐतिहासिक अशा या चंडीगढ वेढ्यानंतर जे घडत गेले ते मात्र शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडणारेच होते. पंजाब शासनाने स्थापन केलेल्या जोल समितीने आपला अहवाल

ठरलेल्या तीन महिन्यांपूर्वीच सादर केला, पण शासनाने तो स्वीकारला नाही. वाढीव वीजदर देणे शेतकऱ्यांना परवडावे म्हणून १९० रुपये प्रती क्विंटल असा भाव गव्हासाठी द्यावा असे समितीने सांगितल्याचे कानावर आले, पण प्रत्यक्षात शासनाने तो अहवाल जाहीरच केला नाही. खरेतर भारतीय किसान युनियन ही संघर्षातील एक संबंधित घटकसंस्था होती व तिला त्या अहवालाची प्रत देणे शासनाचे कर्तव्य होते, पण शासनाने ते केले नाही. उलट वीजबिलांची थकबाकी धाकदपटशा दाखवून वसूल करायला सुरुवात केली, अनेकांचे वीजप्रवाह खंडितही केले.

त्यामुळे आंदोलनाची पुढची पायरी म्हणून शेतकऱ्यांनी १ मे ८४पासून आपापला गहू विक्रीसाठी बाजारात आणायचाच नाही असे ठरवले. चंडीगढमधील आपल्या भाषणात जोशी म्हणाले होते, ''देशात विक्रीसाठी येणाऱ्या गव्हाच्या एकूण पिकापैकी ७० टक्के गहू एकट्या पंजाबात पिकतो. गव्हाच्या त्या प्रचंड ढिगावर तुम्ही बसून आहात. एखाद्या ॲटमबॉम्बपेक्षा अधिक प्रभावी असे ते शस्त्र आहे. तुम्ही ते वापरायचे ठरवले, आपला गहू बाजारात आणायचाच नाही असे ठरवले, तर कुठल्याही सरकारला तुमच्या मागण्या मान्य कराव्याच लागतील.''

त्याचाच आधार घेऊन पंजाबी शेतकऱ्यांनी ते 'कनकबंद आंदोलन' जाहीर केले. सलग एक आठवडा, म्हणजे ८ मेपर्यंत, गव्हाचा एक दाणाही बाजारात विक्रीसाठी आला नाही. नेहमी गव्हाने ओसंडून वाहणाऱ्या खन्नासारख्या बाजारपेठा अक्षरशः ओस पडल्या. दुर्दैवाने त्यानंतर मात्र शेतकऱ्यांचा धीर सुटला; त्याहून जास्त थांबायची त्यांच्यात क्षमताच नव्हती. त्यामुळे मग ते आंदोलन मागे घ्यावे लागले.

अर्थात शेतकऱ्यांच्या मनात संताप धुमसतच राहिला. त्याचाच एक आविष्कार म्हणजे, २० जुलैला चंडीगढला एक मोठा शेतकरी मेळावा भरवायचे ठरले. याही वेळी महाराष्ट्रातून काही जणांनी जावे असे ठरले. पण ह्या वेळेला संख्या मर्यादित, फक्त दहा, ठेवायची होती. मागच्या राजभवनच्या घेरावसारखाच प्रकार ह्या वेळेलाही होईल, त्यामुळे शेतकरी संघटनेला अधिकच प्रसिद्धी मिळेल अशी बहुधा पंजाब सरकारला भीती होती. अराजकीय अशा शेतकरी संघटनेची ताकद वाढणे म्हणजे राजकीय पक्षांची ताकद कमी होण्यासारखेच होते. त्यामुळे ह्यावेळी सरकारने असा मेळावा होऊच द्यायचा नाही असा निश्चय केला होता. शक्यतो आंदोलकांनी चंडीगढला पोचूच नये ह्या दृष्टीने बहुतेक गाड्या दिल्लीलाच अडवण्यात येत होत्या. जोशींची गाडीही दिल्लीतच थांबवली गेली. बसने कशीतरी मजल दरमजल करत जोशी व त्यांचे सहकारी चंडीगढला पोचले. तोही प्रवास त्यांना तीन-चार गटांमध्ये व लपतछपतच करावा लागला होता. सरकारच्या असल्या दडपशाहीमुळे ह्या होऊ घातलेल्या मेळाव्याला अतोनात प्रसिद्धी मात्र आपोआपच मिळत गेली! जे घडू द्यायचे नाही असा चंग पंजाब सरकारने बांधला होता, तेच नेमके घडत गेले! चंडीगढमधील पंचायतभवनपासून शेतकऱ्यांचा

मोर्चा सुरू झाला. भूपिंदरसिंग मान, विजय जावंधिया, शरद जोशी हे मोर्च्याच्या अग्रभागी होते. पण राजभवनपर्यंत पोचायच्या आतच पोलिसांनी त्यांना पकडले व सरळ कोर्टात हजर केले. न्यायाधीशांनी एकदम १६ दिवसांचा रिमांड दिला.

जोशींबरोबर महाराष्ट्रातून गेलेल्या दहा जणांमध्ये परभणीचे एक प्रसिद्ध वकील अनंत उमरीकर हेही होते. शेतकरी संघटनेचे ते हितचिंतक होते, शिवाय सामाजिक व सांस्कृतिक कार्यात रमणारे होते. अशा एखाद्या आंदोलनात सामील व्हायचा त्यांचा हा पहिलाच अनुभव होता. पंजाबभेटीतील आपल्या या अनुभवांवर त्यांनी 'आंदोलन' नावाचे एक ८८ पानांचे पुस्तकच लिहिले आहे. परभणीच्या रेणुका प्रकाशनाने ऑगस्ट १९९२ मध्ये ते प्रकाशित केले आहे. 'वेडेपीर' या आपल्या २२३ पानांच्या पुस्तकात त्यांनी शेतकरी संघटनेच्या चौदा कार्यकर्त्यांची रसाळ अशी व्यक्तिचित्रेही रेखाटली आहेत. इतरही बरीच पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.

दुर्दैवाने त्या कारावासात असतानाच एक ऑगस्ट रोजी शरद जोशी यांच्या छातीत एकाएकी जोरात दुखायला लागले. तुरुंगात एकच धावपळ सुरू झाली. त्यांना रुग्णालयात हलवावे लागले. तो अंजायनाचा त्रास होता असे निदान झाले. सुदैवाने वेळीच चांगली वैद्यकसेवा मिळाली म्हणून बरे झाले; नाहीतर गंभीर प्रसंग ओढवू शकला असता. हृदयविकाराचा जोशींना झालेला तो आयुष्यातील पहिलाच त्रास. उर्वरित आयुष्यात ह्या दुखण्याने त्यांचा बराच पाठपुरावा केला.

एक व्यक्तिगत आठवण इथे नमूद करायला हवी. बटाला इथे मान यांच्या घरी गेलो असताना त्यांच्या पत्नी, भाभीजी, यांनी ती सांगितली. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी शीख सुरक्षारक्षकांकडून इंदिराहत्या झाली त्यावेळी त्यांचे यजमान व इतरही काही शीख शेतकरीनेते महाराष्ट्रात होते; टेहेरे येथे त्याचवेळी चालू असलेल्या शेतकरी संघटनेच्या विशाल सभेत हजर होते. देशभर शीखविरोधी भयानक दंगली सुरू झाल्या होत्या; तशा बातम्या कानावर येत होत्या. त्या दिवसांचे वर्णन करताना भाभीजी गहिवरलेल्या आवाजात म्हणाल्या,

''बद्रीनाथ देवकर आणि भास्करराव बोरावके अशा वेळी मोठ्या धाडसाने पुढे झाले व शीख बांधवांच्या सुरक्षिततेची सगळी जबाबदारी त्यांनी घेतली. माझे पती त्यांच्यातच होते. सर्व शिखांना तीन-चार मोटारींमध्ये बसवून ते कोपरगावला स्वतःच्या घरी घेऊन गेले. तिथे त्यांनी शिखांना लपवून ठेवलं. आजूबाजूच्या काही विघ्नसंतोषी लोकांना ह्याची कुणकुण लागली असावी. ते सारखे दाराशी येऊन 'इथे कोणी शीख लपलेले आहेत का,' ते बघत होते. पण बद्रींनी व भाऊंनी कोणाला दाद लागू दिली नाही. देशभर शिखांची हत्या सुरू होती व अशा वातावरणात ट्रेनने पंजाबात परत जाणं अशक्यच होतं. दहाबारा दिवस सगळ्यांनी तिथेच लपून काढले. मग वातावरण जरा निवळलं असं बघून त्यांनी शिख बांधवांना परत पंजाबात पाठवलं. सगळे आपापल्या घरी सुरक्षित पोचले, तेव्हाच त्यांनी व आम्हीही सुटकेचा निःश्वास

टाकला. त्याप्रसंगी खरोखरच ह्या दोन कुटुंबांनी आमचे प्राण वाचवले. नाहीतर काय झालं असतं ह्या विचारानेही अंगावर काटा उभा राहतो. पुढे सगळं शांत झाल्यावर मी व माझे यजमान मुद्दाम कोपरगावला जाऊन बद्रीनाथ व भाऊ बोरावके यांच्या घरच्यांना भेटलो व त्यांचे आभार मानले. त्यांच्याविषयीची कृतज्ञता आजही आमच्या मनात कायम आहे. शेवटी त्यांनीच तर माझ्या पतीला दुसरी जिंदगी दिली.''

पंजाबातील शेतकऱ्यांच्या हृदयात जोशींना एक खास जिव्हाळ्याचे असे स्थान प्राप्त झाले ह्याचे एक कारण त्यांचे हृदयाला हात घालणारे वक्तृत्व हेही आहे. उदाहरणार्थ, भारत-पाक सीमेलगत असलेल्या भगतसिंग, सुखदेव व राजगुरू ह्यांच्या स्मारकापाशी झालेली एक सभा. नेहमी गुन्हेगारांना सूर्योदयाच्या वेळी फाशी द्यायची पद्धत. पण आदले काही दिवस लाहोरमध्ये धुमसत असलेला असंतोष विचारात घेऊन इंग्रज शासनाने फाशीसाठी सूर्यास्ताची वेळ निवडली होती. त्यावेळी घडलेल्या एका प्रसंगाच्या ऐकीव माहितीचा उपयोग करत जोशी सभेत म्हणाले होते,

''हे तिघेही क्रांतिकारक फाशीच्या क्षणाची वाट पाहत, टाचा उंचावलेल्या व हात मागे बांधलेल्या अवस्थेत उभे होते. भगतसिंग त्या तिघांत उंच. त्यांना राजगुरूंनी विचारलं, 'समोर तुला काय दिसतं आहे?' भगतसिंग उत्तरले, 'मला ब्रिटिश साम्राज्यावरचा सूर्य अस्ताला जाताना दिसतो आहे!' ज्या साम्राज्यावरचा सूर्य कधीही मावळत नाही अशी ख्याती होती, त्या साम्राज्यावरचा सूर्य अस्ताला जाताना त्या द्रष्ट्या क्रांतिकारकाला दिसत होता. मलासुद्धा आज इथे 'भारता'वरील 'इंडिया'चा सूर्य अस्ताला जाताना दिसत आहे!''

ह्यावर समोरच्या विराट सभेतील हजारो श्रोत्यांची मने उचंबळून आली नसती तरच नवल. खरेतर जोशींचे हिंदी फारसे चांगले नव्हते; पण तरीही पंजाबात त्यांची हिंदी भाषणे अधिकाधिक उत्तम होत गेली. विचार सुस्पष्ट असले व बोलणे अंतःकरणपूर्वक असले, तर भाषा आड येत नाही ह्याचे ते ज्वलंत उदाहरण होते.

जोशींप्रमाणे इतर सर्वच कार्यकर्ते पंजाबात रमले. इथले आदरातिथ्य खूपदा महाराष्ट्रातील पाहुण्यांना काहीसे लाजवणारे असे. 'आप हमारे मेहमान है,' म्हणत इथले यजमान महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना कधीही खिशात हात घालू देत नसत. इथला नाश्ता म्हणजे अगदी जेवणाच्या वरताण! भरपूर मख्खन चोपडलेले परोठे, दाट लस्सी वगैरे! त्यात पुन्हा आग्रह करकरून खाऊ घालणे. साधी सकाळची अंघोळ, पण तीही इथल्या अंगणामध्ये संस्मरणीय असे. अंघोळीपूर्वी शरीराला रगडून मोहरीच्या तेलाचे मालिश करून देणारा कोणीतरी असायचा. बटन दाबले, की तीन इंच व्यासाच्या लोखंडी पाइपातून पाण्याचा भलामोठा लोट अंगावर कोसळू लागे! 'पाच हॉर्सपॉवरची अंघोळ' हा शब्दप्रयोग महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय झाला होता. पंजाबातील भारतीय किसान युनियन एक बळकट संघटना होती, तिचे नोंदणीकृत असे लाखाच्यावर सदस्य होते व साहजिकच सर्व कार्यक्रम उत्तमप्रकारे पार

पाडण्यासाठी आवश्यक ते आर्थिक व कार्यकर्त्यांचे बळ युनियनकडे होते.

शरद जोशींसारखा एकही मोठा नेता त्यांच्याकडे नव्हता, पण सामूहिक नेतृत्वाचा एक आदर्श यांनी प्रस्थापित केला होता. ह्या संदर्भात परभणी अधिवेशनातला एक प्रसंग बोलका होता. 'शरद जोशी झिंदाबाद' ह्या अधूनमधून दिल्या जाणाऱ्या घोषणेला पंजाबहून आलेले बलबीरसिंग राजेवाल ह्यांनी विरोध केला होता. स्वतः शरद जोशी यांनी 'माझ्या नावाच्या घोषणा देऊ नयेत' असे व्यासपीठावरून सांगितले. पण तरीही कार्यकर्त्यांना ते पटले नाही व त्या घोषणा चालूच राहिल्या. 'हा कदाचित तुमच्या आमच्या धर्मातला फरक आहे. तुमच्याकडे कुठल्याच एका देवाची पूजा अशी होत नाही. तुमच्याकडे मूर्तीपूजाही नाही. गुरूही दहा आहेत व त्यानंतर तुम्ही कोणाला गुरू म्हणून स्वीकारलेच नाही. आमच्याकडे मात्र असंख्य देव आहेत व असंख्य संतपुरुषही आहेत, ज्यांना देवासारखा मान दिला जातो. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचा जयजयकार हा आम्हाला खटकत नाही, उलट आवश्यक वाटतो. कारण मूर्ती जसे देवाचे प्रतीक बनते तशीच ती व्यक्ती एक विचारांचे प्रतीक बनते व इतरांना एकत्र यायला कारणीभूत ठरते.' – असे स्पष्टीकरण त्यावेळी महाराष्ट्रातील काही शेतकरीनेत्यांनी राजेवाल ह्यांना दिले होते. राजेवाल ह्यांना काही ते पटले नव्हते, पण मग त्याकडे त्यांनी शेतकरी एकजुटीचे व्यापक महत्त्व विचारात घेऊन दुर्लक्ष केले.

हिंदू-शीख तेढ हा एक महत्त्वाचा मुद्दा पंजाबच्या संदर्भात नेहमी पुढे येतो; निदान त्या काळात तरी यायचा. साताऱ्याचे डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी लिहिलेल्या एका लेखात ह्या संदर्भात काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. *देशान्तरवास* या आपल्या एका लेखात ते लिहितात,

> सरदारांचा प्रश्न उग्र होणार हे १९८२ साली एशियाड झाले त्याच वेळी नक्की झाले होते. एशियाडच्या वेळी मी खूप भटकलो होतो. प्रचंड किंमत मोजून जगमोहन यांनी एशियाड फत्ते करून दाखवले. त्यावेळी अतिरेकी नव्हते असे नाही, सरदार आपल्यावर अन्याय होतो म्हणून चिडलेले नव्हते असेही नव्हे; पण काट्याचा नायटा झालेला नव्हता. जगमोहन यांनी ते सहजपणे करून दाखवले. सरदार मुळातच खेळप्रेमी आणि उत्सवप्रेमी. ट्रॅक्स आणि बसेस भरभरून खेळ पाहण्यासाठी खेड्यापाड्यांतून सरदार येत होते आणि हरियाणाच्या सीमेवरून, ते फक्त सरदार आहेत म्हणून, त्यांना परत पाठवले जात होते. प्रत्येक स्टेडीयमवर कडक तपासणी होत होती. चुकूनसुद्धा एकही सरदार ह्या तपासणीतून सुटत नव्हता. तो केवळ सरदार आहे म्हणून पागोट्यापासून सारे काही सोडून तपासले जात होते! प्रत्येक सरदार फक्त सरदार आहे म्हणून स्वतःच्या देशात गुन्हेगार ठरत होता! पूर्वी गावात रामोशी ठरत असत, तसा! सरदारांना ह्यावेळी काय यातना झाल्या असतील, हे दलितांनासुद्धा समजणार नाही. दलित आपल्या तोंडावर आपण दलित आहोत,

असा शिक्का मारून फिरत नाहीत. मी महाराष्ट्रीयन आहे; पण मी बसमधून हिंडताना मी मराठी आहे, हे काही बाकीच्यांना ओळखता येत नाही. समजा, उद्या शिवसेनेने मुंबईत काही गडबड केली आणि दिल्लीत मराठी माणसांवर लोक चिडले, तरी मी मराठीच आहे ह्याची जाहिरात नेहमी माझ्याबरोबर नसते. मी दिल्लीमधून त्यावेळीसुद्धा निर्धास्तपणे हिंडू शकतो. शिखांबाबत हे संभवत नाही. बाकी समाजाच्या नजरा आपणाकडे संशयाने पाहताहेत असे त्यांना दरक्षणी जाणवत राहते. अधिक अगतिक आणि म्हणून अधिक अतिरेकी बनत ते इतरांच्यापासून दूरदूर जातात आणि एकमेकांच्या अधिक जवळ येतात. सरदारांचे आजचे आक्रस्ताळी, आततायी वागणे हे असहायतेतून, अगतिकतेतून निर्माण झालेले आहे.

खेड्यापाड्यांतून सारे शीख संतापलेले आहेत हे तर खरेच. पण त्यांचे प्रश्न साधे आहेत. हा मुख्यत्वेकरून शेतीचा प्रश्न आहे. पाण्याचा प्रश्न आहे. त्यांना लागणाऱ्या विजेचा प्रश्न आहे. शेतीमालाला मिळणाऱ्या कमी किंमतीचा प्रश्न आहे. शहरातील माणूस कमी कष्टांत अधिक आरामात राहतो हे त्यांना दरक्षणी जाणवते. त्यातून त्यांच्या ज्या मागण्या आहेत, त्यांत शहरातील माणसांना, म्हणजे पर्यायाने हिंदूंना, फारसा रस नसल्याने पंजाबमधील आणि भारतातील सारे हिंदू त्यांच्या पिळवणूकीत सामील आहेत असे त्यांना वाटते.

हा प्रश्न या देशातील साध्या-भोळ्या, पिळवणूक होणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. त्यामुळेच पंजाबमध्ये आग पेटलेली असताना, मानाचे मुजरे घेत शरद जोशी आणि त्यांचे साथीदार पंजाबमधून हिंडलेत. शेतकरी आंदोलनाच्या नेत्यांविरुद्ध काही करायची हिंमत अकाली दलाचीच काय, पण भिंद्रनवालेचीसुद्धा नव्हती!

(*माणूस* दिवाळी अंक १९८४)

शरद जोशी यांनी मांडलेला 'इंडिया विरुद्ध भारत' हा सिद्धांत पंजाबच्या संदर्भात लागू करून पाहिले, तर ह्या तेढीचे स्वरूप बऱ्यापैकी स्पष्ट होते. पंजाबी म्हटले, की बहुतेकदा आपल्यापुढे शीख उभे राहतात, पण पंजाबात शिखांचे प्रमाण सुमारे ६० टक्के आहे तर हिंदू व इतर मिळून ४० टक्के असतील. शीख हे मुख्यतः शेतकरी आहेत, तर हिंदू समाज व्यापारउदीम करणारा व नोकरीपेशातला आहे. एकूण शेतकऱ्यांमध्ये ७० टक्के शीख आहेत व ते ग्रामीण भागात राहतात. ते सामान्यतः राकट, अल्पशिक्षित समजले जातात. आपल्याला वाटते त्याप्रमाणे सगळेच शीख श्रीमंत नसतात. हिंदू बव्हंशी शहरांमधून राहतात. कायम नुकसानीत राहिलेल्या शेतीमुळे 'भारत'वासी शीख शेतकरी गरीब राहिले, तर 'इंडिया'वासी हिंदू नागर समाज तुलनेने समृद्ध झाला. मुळात चंडीगढ हे एक खूप आधुनिक शहर. रस्ते, फुटपाथ, चौक, उद्याने, दुकाने, घरे सगळेच अगदी चकाचक. पुण्या-मुंबईसारख्या शहरांतून

आलेलाही इथे काहीसा दबून जातो, मग ग्रामीण पंजाबातून आलेल्या शेतकऱ्याला हे शहर म्हणजे परदेशासारखेच वाटले तर नवल नाही. चंडीगढमध्ये आंदोलक शेतकरी आल्यावर ही तेढ लगेचच त्यांच्या नजरेत ठसठसू लागली होती.

पंजाबमधील परिस्थिती इतकी स्फोटक बनली ह्याबद्दल अनेक जण इंदिरा गांधींना दोषी ठरवतात. त्यांनीच अकाली दलात फूट पडावी म्हणून जर्नेलसिंग भिंद्रनवालेसारख्या अतिरेक्यांना उभे केले; असेही म्हटले जायचे. जोशी हे अमान्य करतात. ते म्हणतात,

> या म्हणण्याइतके सत्यापासून ढळणारे काही असू शकत नाही. मलातर पंतप्रधानांच्या जागी, स्वतंत्र व्यक्तिमत्व नसलेल्या निर्बुद्धांच्या गराड्यात सापडलेली, आपल्या नेतृत्वाखालील देश भयानक वेगाने विनाशाकडे वाहत आहे हे पाहणारी आणि ते थांबवण्यास आपण असमर्थ आहोत या जाणिवेने भयग्रस्त झालेली एक एकाकी, असहाय स्त्री दिसते. इतका उत्पात घडवण्याइतकी अफाट शक्ती एका व्यक्तीच्या हाती बहाल करून सर्व दोष पंतप्रधानांच्या माथी मारणे म्हणजे केवळ राजकीय डावपेच आहे.
>
> परीकथा ऐकण्यात रमणाऱ्या बालकाप्रमाणेच कोणत्याही प्रश्नामागे एखादे खलनायकी व्यक्तिमत्त्व कारणीभूत आहे असा विश्वास ठेवणे आपल्याला पसंत पडते – मग तो खलनायक कधी एखादा रावण, कंस, जीना, इंदिरा, झैलसिंग तर कधी भिंद्रनवाले यांच्या रूपाने जन्मलेला असतो! गोष्टीत खलनायक दूर झाला, की तो प्रश्न दूर होऊन सगळीकडे आनंदीआनंद होतो. किती सुटसुटीत आणि सोयीस्कर! मग किचकट आर्थिक व सामाजिक कारणांचा विचार करण्याची गरजच उरत नाही.
>
> नोव्हेंबर ८२पर्यंत पंजाबमध्ये कुठेही जातीय स्वरूपात ध्रुवीकरण झालेले नव्हते हे मी अनुभवले आहे. हे मी ठामपणे म्हणू शकतो. तेथे जातीजातीत अजिबात तणाव नव्हते. बहुधा शहरातच वास्तव्य करून असणारे हिंदू हे ओबडधोबड, अर्धवट शीख शेतकऱ्यांना उपकार केल्यासारखे वागवीत आणि शीख शेतकऱ्यांनाही या शहरी व्यापाऱ्यांच्या खोटेपणाबद्दल व कपटीपणाबद्दल स्वाभाविक तिरस्कार होता. हरियानातील जाट-लाला संबंध किंवा महाराष्ट्रातील मराठे-ब्राह्मण संबंध यासारखेच पंजाबमधील शीख-हिंदू संबंधांचे स्वरूप होते. संपूर्ण देशभर ग्रामीण शेतकरी आणि शहरी नागरिक यांचे संबंध याच प्रकारचे राहिले आहेत. त्यांचे परस्पर आर्थिक हितसंबंध तत्त्वतः संघर्षात्मकच राहिले आहेत.
>
> उद्योगधंद्यासाठी लागणारे भांडवल जमा करण्यासाठी मुख्यत्वे शेतीमालाच्या किमती कमी ठेवून वरकड उत्पन्न निर्माण करणारे शासनाचे जे धोरण आहे, तेच

पंजाबमधील असंतोषाचे मूळ कारण आहे. पंजाबमधील असंतोष हे केवळ इंडिया-भारत दरीचे पूर्ण प्रतिबिंब आहे.

(*शेतकरी संघटक,* २७ जुलै १९८४)

भविष्यातही पंजाबातील शेतकरी आंदोलनात शरद जोशींचा नेहमीच सहभाग राहिला. उदाहरणार्थ, अन्नधान्याचा व्यापार खुला असावा यासाठी वाघा येथील भारत-पाकिस्तान सीमेवरील सत्याग्रह किंवा भारतीय शेतकऱ्यांची कर्जे अनैतिक आहेत व म्हणून त्यांतून शेतकऱ्यांना मुक्त करायला हवे यासाठी ॲड. राम जेठमलानी यांच्या सहकार्याने त्यांनी पंजाबमधील हायकोर्टात दिलेला प्रदीर्घ लढा. याविषयी नंतर विस्ताराने लिहिलेलेच आहे. या साऱ्यांतून जोशींचा पंजाबमधील शेतकऱ्यांशी असलेला स्नेह वृद्धिंगत होत गेला.

बाबा आमटे यांनी काही वर्षांनंतर पंजाबात शांतियात्रा काढली होती; अगदी अलीकडे २०१५ साली पंजाबात घुमान येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते; आणि ह्या दोन्ही प्रसंगी पंजाबच्या आतिथ्यशीलतेचा उत्तम अनुभव आला होता. पण जोशी यांना पंजाबात मिळालेला प्रतिसाद हा खूपच अधिक व्यापक होता; अक्षरशः लक्षावधी शेतकरी त्यांचे भक्त बनले होते. पंजाबात त्यांना जे स्थान मिळाले ते अन्य कुठल्याही मराठी माणसाला त्या पूर्वी वा नंतर कधीच मिळालेले नाही; संत नामदेव हा अपवाद मानावा लागेल, कारण त्यांचे माहात्म्य मुख्यतः धार्मिक स्वरूपाचे आहे.

महाराष्ट्राबाहेर आंदोलन पसरणे ही शरद जोशींची ज्या काळात नितांत गरज होती, त्याच काळात सुदैवाने हे पंजाब प्रकरण घडले. बाजीरावाने ज्याप्रमाणे थेट अटकेपार झेंडा रोवला, तशीच जोशींनी ही एक महाराष्ट्राबाहेर मोठीच उडी घेतली. शेतकरी संघटनेच्या विस्तारालाही एक नवीच दिशा त्यामुळे मिळाली. त्यांचे आंदोलन आता स्थानिक राहिले नव्हते. दिल्लीपासून, आणि म्हणून राष्ट्रीय मंचापासून, ते अगदी जवळ जाऊन पोचले होते. अर्थात नियतीच्या मनात काही वेगळेच होते.

पंजाबसारख्या शेतीप्रधान प्रांतात शेतकरी संघटनेचे आंदोलन पसरणे हा भाग महत्त्वाचा आहेच, पण व्यक्तिशःदेखील पंजाबमधले अनेक शेतकरी आजही जोशींना खूप मानतात. स्वतः भूपिंदर सिंग यांची तर जोशींवर श्रद्धाच आहे. त्यांच्या बटाला येथील घरात डायनिंग टेबलाच्या बाजूच्या भिंतीवर दोनच फोटो आहेत – एक फोटो आहे अमृतसर येथील पवित्र सुवर्णमंदिराचा, आणि त्याला जोडूनच असलेला दुसरा फोटो आहे शरद जोशी यांचा. ■

# ११

# किसानांच्या बाया आम्ही...

शेतकरी संघटनेची उभारणी हा एक चमत्कार मानला, तर शेतकरी महिला आघाडीची उभारणी हा त्याहूनही मोठा चमत्कार मानावा लागेल.

महिला आघाडीची औपचारिक स्थापना नोव्हेंबर १९८६मध्ये झाली असली, तरी शेतकरी आंदोलनात महिलांचा सहभाग हा तसा जवळजवळ प्रथमपासूनच होता. आंदोलनाच्या अगदी सुरुवातीला, जानेवारी १९८०मध्ये वांद्रे ते चाकण असा ६४ किलोमीटरचा रस्ता पक्का व्हावा, ह्या मागणीसाठी शरद जोशींनी जो एक मोठा आठ हजार शेतकऱ्यांचा मोर्चा नेला होता, त्यात सुमारे दोन हजार महिलांचाही समावेश होता. या महिला एरव्ही फक्त बाजारापुरत्या कधीमधी चाकणला येत, पण या मोर्च्यात मात्र त्या सर्व संकोच बाजूला सारून 'किसानांच्या बाया आम्ही शेतकरी बाया, नाही आम्ही राहणार आता दीनवाण्या गाया' अशी गाणी म्हणत मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. कांदा आणि ऊस आंदोलनातही महिला होत्याच. त्यानंतर पुढल्याच वर्षी, म्हणजे मार्च-एप्रिल १९८१मध्ये निपाणी येथे झालेल्या तंबाखू आंदोलनात महिलांचा सहभाग साहजिकच अधिक लक्षणीय होता; कारण तंबाखू व विडी व्यवसायात काम करणाऱ्यांमध्ये स्त्रिया बहुसंख्य होत्या. दिवसभरातील कारखान्यातील काम सांभाळून या स्त्रिया सलग २३ दिवस सत्याग्रहाच्या ठिकाणी येऊन जात होत्या. रास्ता रोको करणाऱ्या सुमारे चाळीस हजार सत्याग्रहींना २३ दिवस रोज दूध-पिठले-भाकऱ्या पुरवणाऱ्या या महिलाच होत्या. अक्काबाई कांबळे यांसारख्या महिलानेत्यांनी त्यावेळी व्यासपीठावरून जहाल अशी भाषणेही केली होती.

'अंगारमळा'मधील एका लेखात जोशींनी एक हृदयस्पर्शी प्रसंग नोंदवला आहे. निपाणी आंदोलनाच्या वेळी रास्ता रोको चालू असताना आंदोलन नगरीतील प्रत्येक गावच्या मांडवाला भेट देत जोशी चालले होते. सकाळची वेळ होती. एक म्हातारी धावतच त्यांच्यापाशी आली. आपल्या आगळ्या शब्दकळेत तिचे वर्णन करताना जोशी लिहितात, ''उंच, शिडशिडीत बांधा. जन्मभरचे कष्ट चेहऱ्यावरच्या रेषारेषांच्या जाळ्यांत खोदलेले.'' ती म्हणाली, ''साहेब, तुम्ही गावातल्या माय-बहिणींना सत्याग्रहाला यायला सांगितलं म्हणून आले. नेसूचं धड नव्हतं, म्हणून शेजारणीकडून लुगडं घेऊन आले बघा.'' जोशींना ती आपल्या आईसारखीच वाटली. तिच्या आग्रहास्तव ते तिच्या घरी गेले. त्यांना द्यायला तिच्या घरी काही नव्हते, म्हणून तिने शेजारणीकडून दूध आणून त्यांना दिले. त्यांना ते पिताना पाहिले, तेव्हाच तिचे समाधान झाले.

जिची दोन मुले निपाणी गोळीबारात मारली गेली होती, तिच्या सांत्वनासाठी एकदा जोशी गेले असताना ती बहादूर शेतकरी महिला त्यांना निर्धाराने म्हणाली होती, ''माझा तिसरा मुलगा असता तर तोही मी आंदोलनासाठी दिला असता.''

शेतकरी संघटनेचे एक नेते रामचंद्रबापू पाटील यांच्या बागलाण येथील घरी एकदा जोशी गेले होते. आदले एक वर्ष रामचंद्रबापूंनी संघटनेचे अध्यक्षपद भूषवले होते. त्याचा संदर्भ देत त्यांच्या पत्नींना जोशी म्हणाले, ''वर्षभर तुम्ही संघटनेच्या कामासाठी बापूंना मोकळे सोडले ह्याबद्दल तुमचे आभार कसे मानू?'' यावर त्या उत्तरल्या, ''साहेब, मुलं लहान आहेत म्हणून, नाहीतर आम्हीपण संघटनेकरता बाहेर पडलो असतो.'' ही भावना इतरही अनेक महिलांची असायची.

ज्या महिला काही ना काही घरगुती कारणांनी आंदोलनात सामील होऊ शकत नसत, त्याही अनेकदा म्हणत, ''आमचे मालक तुमच्याबरोबर दिवसदिवस काम करतात, घरी आल्यावर त्या सगळ्याचं वर्णन करतात, पण ह्या कामात आमचा सहभाग काही नाही ह्याचं आम्हाला वाईट वाटतं. या कामात आमचं नेमकं स्थान काय?'' एकीने तर आपली अशा प्रकारची घुसमट व्यक्त करणाऱ्या आपल्या पत्राच्या शेवटी एक धमकीच दिली होती – ''तुम्ही जर का ह्या प्रश्नाला योग्य उत्तर शोधलं नाही, तर मी या जगात फार दिवस राहू शकणार नाही, इतका माझ्या जीवाचा कोंडमारा होत आहे.''

कार्यकर्त्यांच्या पत्नीची आस समजण्यासारखी होती व म्हणून शक्यतो सर्वच कार्यकर्त्यांनी आपापल्या पत्नीलाही सभेसाठी सोबत आणावे असे जोशी सांगू लागले. सटाणा येथे १९८२मध्ये भरलेल्या शेतकरी संघटनेच्या पहिल्याच अधिवेशनात शेतकरी स्त्रियांच्या प्रश्नांची स्वतंत्र चर्चा ठेवली होती. दिवस होता २ जानेवारी.

पुढे एकदा सगळ्या श्रोत्यांना हेलावून टाकणाऱ्या आपल्या भाषणात जोशी म्हणाले होते,

> शेतकऱ्याच्या घरी मुलगी म्हणून जन्माला येण्यासारखं पाप नाही. पायावर उभी राहायला लागते न लागते, तो एखादं धाकटं भावंडं सांभाळायची जबाबदारी. त्या कोवळ्या वयातही आईनं सांगितलं नाही तरी, तिला मदत करायची जरूर असल्याची जाणीव पोरींना कशी होते, कोणास ठाऊक!
>
> पाच, सहा वर्षांची झाली – ज्या वयात शहरातली मुलं थंडीच्या दिवसांत ऊबदार पांघरुणात उशिरापर्यंत शांतपणे झोपून राहतात आणि त्यांना झोपलेलं पाहून त्यांचे आई-बाप बाजूला जोडीनं उभं राहून त्यांचं कौतुक करतात – त्या वयात ही शेतकऱ्याची पोर आईनं नाहीतर बापानं गोधडी उचकटून टाकल्यामुळे डोळे चोळीत चोळीत शेण गोळा करायला धावते. दिवसभर गुरांच्या मागे धाव धाव धावून, संध्याकाळी अंग धुळीने भरलेलं, केस धुळीने माखलेले आणि हातापायावर काट्याफांद्यांचे ओरखडे अशा अवस्थेत पोटाशी पाय घेऊन झोपी जाते.

चौदा-पंधरा वर्षांची व्हायच्या आत लग्न, सासर. लग्नाच्या दिवशी अंगावर फुलं चढतील तीच. त्यानंतर चढायची ती सरणावर ठेवतानाच. सासरी सगळं गोड असलं, तरी कधी हौस नाही, मौज नाही. बाजारात गेली तर दुकानात एखाद्या कपाटात बरी कापडं दिसली, तरी तिथं नजर टिकवायची नाही – उगाच मनात कधी पुरी होऊ न शकणारी इच्छा उभी राहील ह्या भीतीनं. पण आई म्हणून लहानग्याला अंगडं, टोपडं चढवावं, तीट लावावी, काजळ घालावं, बाळाचं आपण कौतुक करावं, त्याच्या बापानंही करावं एवढी साधी इच्छासुद्धा कधी पुरी व्हायची नाही.

आणि जर का सासरचं दूध फाटलं व भावाकडे येऊन तुकडे मोडायला लागले तर मग सगळा आनंदच!

(*स्त्रियांचा प्रश्न : चांदवडची शिदोरी,* पृष्ठ ३-४)

शेतकरी लेकी-सुनांचे जे चित्रण आपण पुस्तकांतून वाचले असते, सिनेमातून पाहिले असते त्याच्यापेक्षा अगदी वेगळे चित्र इथे जोशी चितारतात. 'लेक लाडकी ह्या घरची, होणार सून मी त्या घरची' किंवा 'मै तुलसी तेरे आंगन की' अशा गोंडस व बहुप्रचलित भावनेचा इथे मागमूसही नव्हता.

त्यानंतर ३१ जुलै, १ व २ ऑगस्ट १९८२ रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबादच्या बैठकीला सर्व कार्यकर्ते सहकुटुंब हजर होते; जोशींनी तशी अटच घातली होती. शेतकरी संघटनेची जोडीदारासहची अशी ही पहिलीच बैठक.

वीस वर्षे शेतकरी संघटनेचे पूर्ण वेळ काम केलेले जोशींचे एक जुने सहकारी व विद्यमान आमदार लातूरचे पाशा पटेल लिहितात,

जोशी यांनी सर्व कार्यकर्त्यांना एक पत्र लिहिलं होतं. बायकोला घेतल्याशिवाय बैठकीला यायचं नाही, असं त्यात स्पष्टपणे कळवलं होतं. माझी बायको तर बुरखा घालायची. लग्न झाल्यावर पहिल्यांदा एवढ्या लांब नेलं. बुरखा घातला, बसमध्ये बसवलं आणि दोन-चार किलोमीटर गेल्यावर बुरखा काढून पिशवीत ठेवला. बैठकीला जेवढी संख्या पुरुषांची, तेवढीच स्त्रियांची. आंदोलन असो, कार्यक्रम असो, सभा असो की मेळावा असो, महिला गोळा कशा करणार? स्वतःची बायको असल्याशिवाय दुसऱ्या कशा येणार? शेतकरी स्त्रियांना घराच्या बाहेर काढून आंदोलनात त्यांनी बरोबरीचा हिस्सा दिला. पहिल्यांदाच कोणी असा चमत्कार केला असेल.

(*सकाळ,* रविवार, २० डिसेंबर २०१५)

२२ ऑगस्ट १९८५ रोजी दाभाडी येथे फक्त महिलांचा म्हणून एक मेळावा भरवण्यात आला होता. मेळाव्याचा प्रचार करण्यासाठी संघटनेच्या महिला विभाग प्रमुख मंगला अहिरे,

मृणालिनी खैरनार, सुमनताई देवरे व बागलाण तालुक्यातील ४० महिलांनी सलग अकरा दिवस यात्रा केली. शुभांगी बद्रीनाथ देवकर अध्यक्षस्थानी होत्या. संघटनेच्या इतिहासात ह्या दाभाडी मेळाव्याला महत्त्वाचे स्थान आहे, कारण त्याला तब्बल १५,००० महिला हजर होत्या. ही भरघोस उपस्थिती अनपेक्षित व सर्वांचा उत्साह वाढवणारी होती. ह्या मेळाव्याचे आणखी एक महत्त्व म्हणजे ह्याच मेळाव्यात बनावट धाग्यांच्या कपड्यांवर (पुढे यांनाच 'राजीवस्त्र' म्हटले गेले) २ ऑक्टोबर १९८५ पासून बहिष्कार घालण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

संघटनेच्या कामातील महिलांचा सहभाग हा असा बराच व्यापक असला, तरी तो एक शेतकरी महिला म्हणून अधिक व निव्वळ एक महिला म्हणून कमी असा होता. सर्व चर्चा त्या आंदोलनाच्या अनुषंगानेच होई, त्यात व्यक्तिगत असे फारसे काही नसे. पण एका बैठकीत ही कोंडी अचानक फुटली. एका सहभागी स्त्रीने प्रश्न विचारला, ''शेतीमालाला रास्त भाव मिळालाच पाहिजे; पण तो मिळाला म्हणून आमच्या पाठीवरचं गाढवओझं हलकं होणार आहे का? निदान पोरांना सुखाचे चार घास घालता येणार आहे का?'' दुसरी एक महिला म्हणाली, ''तुमच्या उसाच्या आंदोलनामुळे घरधन्याकडे चार पैसे जास्त आले; पण म्हणून काही माझ्या पोराची फाटकी चड्डी गेली नाही किंवा माझ्या अंगावर धड लुगडं आलं नाही. फक्त घरात बाटलीबाई आली आणि दररोज चार दणके मात्र बसायला लागले.'' त्या हे सांगत असताना इतर महिलांच्या चेहऱ्यावरही 'हे खरंच आहे' अशी भावना होती.

ह्या स्पष्टोक्तीतील तथ्य उघड होते. पंजाब-हरयाणामधला अनुभव तसा संघटनेच्या नेत्यांना परिचयाचा होता. तिथे हरितक्रांतीनंतर उत्पादन वाढले. कर्जही वाढले असले तरी शेतकऱ्याच्या हातात अधिक पैसे खेळू लागले. पण स्वतःच्या शेतात काम करायचे व त्यानिमित्ताने घराबाहेर पडायचे स्वातंत्र्य तेथील महिला गमावून बसल्या. ते शेतकाम बिहार आणि ओरिसातील मजुरांकडे गेले. डोक्यावर भाजीपाला घेऊन बाजारात जायचीही आता महिलांना गरज उरली नाही; ट्रॅक्टरवर शेतीमाल भरून शेतकरी बाजारात तो नेऊ लागला. महिला घरात कोंडली गेली व शेतावरील मजुरांसाठी व घरच्यांसाठी रोट्या भाजायचे काम तेवढे तिच्याकडे आले.

चळवळीतील सहभागाव्यातिरिक्त एक महिला म्हणून महिलांची काय सुखदुःखे आहेत, हे जाणून घ्यायची आस स्वतः जोशींना लागली होती. त्या दृष्टीने त्यांनी लातूर जिल्ह्यातील हळीहंडरगुळी ह्या गावी १६-१७ डिसेंबर १९८५ला महिलांची एक अनौपचारिक बैठक बोलावली. सकाळी दहाच्या सुमारास एका तात्पुरत्या उभारलेल्या मांडवाखाली सतरंजी घालून त्यावर सगळ्या जणी बसल्या. सगळ्याच शेतकऱ्यांच्या बाया. दिवसभर घराशेतात राबणाऱ्या. नेसत्या वस्त्रानिशी आलेल्या. इथे येण्यासाठीही बऱ्याच जणींनी मैलोन्मैल पायपीट केलेली. जोशींच्यासोबत 'योद्धा शेतकरी'चे लेखक विजय परुळकर व त्यांच्या पत्नी सरोजा

हे दोघे होते. विषयाला सुरुवात करताना जोशी म्हणाले,

''शेतीमालाच्या प्रश्नावर आपण अनेक वर्षं आंदोलन करतो आहोत व पुढेही करू, पण संघटना आता स्त्रियांचे स्त्री म्हणून काय प्रश्न आहेत तेही समजून घेऊ इच्छिते. आजची आपली भेट ही त्यासाठी आहे. तुम्ही अगदी मोकळ्या होऊन बोला. इथे दुसरं कोणी ते ऐकणारं नाही; सगळं आपल्यातच राहील.''

पण कोणी एक शब्दही बोलेना. सगळ्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची धास्ती. हा एवढा मोठा नेता, पण आपल्यासोबत अशी मांडी घालून बसलाय, आपल्याशी गप्पा मारतोय, हा काय प्रकार आहे! खरे सांगायचे तर त्यांना पुरुषांसमोर गप्पा मारायची कधी सवयच नव्हती; अगदी नवऱ्याबरोबरदेखील कामाव्यतिरिक्त संभाषण असे घरात फारसे होत नसे.

हा असा अनुभव जोशींना पूर्वीही आला होता; आंबेठाणला आपल्या शेतमजुरांची दुःखे जाणून घेण्यासाठी ते त्यांच्याशी गप्पा मारायला बसत त्यावेळी. मग तेव्हाचीच युक्ती त्यांनी आता पुन्हा केली. भजने म्हणायची कल्पना मांडली. सुरुवात त्यांनी स्वतःच केली. 'जाऊ देवाचिया गावा, देव देईल विसावा, देवा सांगू सुखदुःखं, देव निवारील भूक' हा आपला स्वतःचा आवडता अभंग त्यांनी शक्य तितक्या तालासुरात म्हटला. ''आता तुम्हीही तुम्हाला आवडेल ती भजनं म्हणा,'' नंतर ते म्हणाले.

आता मात्र वातावरण बरेचसे निवळले, हलकेफुलके झाले. एकेकीने किंवा दोघी-तिघींनी मिळून मग आपापली आवडती भजने म्हणायला सुरुवात केली. हळूहळू कंठ सुटत गेले, धास्ती व परकेपणा दूर होत गेला. त्या संधीचा फायदा घेत जोशींनी मग एक सूचक प्रश्न विचारला. ते म्हणाले, ''तुम्ही सगळ्यांनी इतकी आर्जवून भजनं म्हटलीत, की देव अगदी नक्की प्रसन्न होईल! समजा तो आत्ता तुमच्यापुढे उभा ठाकला आणि म्हणाला, की तुला हवा तो एक वर माग' तर तुम्ही काय वर मागाल?''

पुन्हा साऱ्या सावध. देवादिकांची भजनांतून आराधना करणे सोपे, व्यक्तिगत बोलणे अवघड! 'देवा, माझं कुंकू तेवढं शाबूत ठेव', 'देवा, माझ्या लेकीचं लग्न लौकर होऊ दे', 'देवा, माझ्या पोराला मास्तर म्हणून नोकरी लागू दे' अशी साचेबद्ध, अपेक्षित उत्तरे येऊ लागली. ह्या सगळ्या इच्छा परंपरेने स्त्रीसुलभ ठरवलेल्या. कुठल्याही बाईने कोणासमोरही सहजगत्या व्यक्त कराव्यात अशा. मग जोशींना एक भारूड आठवले – 'सत्वर पाव गे मला, भवानी आई, रोडगा वाहीन तुला, सासू माझी गावी गेली, तिथंच खपू दे तिला!' या परखड, प्रसिद्ध भारुडाच्या पाच-सहा ओळी जोशींनी हसत हसत म्हटल्या. तेव्हा मग सगळ्याच बायकाही मोकळेपणे हसू लागल्या. जरा धाडस करून मग जोशींनी विचारले, ''जन्मल्यापासून आजपर्यंत आपण बाईच्या जन्माला आलो, ह्याचा आनंद कधी झाला होता का?''

एक उत्तर लगेचच आले, ''झाला व्हता ना, पहिला मुलगा झाला तेव्हा असाच लई आनंद झाला व्हता.'' इतरही चार-पाच उत्तरे पाठोपाठ आली; साचेबद्ध आणि अपेक्षित अशी.

मग अचानक एका बाईच्या तोंडून एक ओळ उमटली, ''अस्तुरी जल्मा नको घालू

शिरीहारी, रात न दिस परायाची ताबेदारी.''

हे मात्र नक्की अगदी मनापासून होते – 'स्त्री जन्म नको देऊस श्रीहरी, रात्रंदिवस दुसऱ्याची गुलामी.'

स्वातंत्र्याची आस हा शेतकरी संघटनेच्या तत्त्वज्ञानाचा मूलकंद होता आणि नेमकी तीच आस आता अचानक पुढे आली होती. हे उत्तर ऐकून जोशींना आता या खऱ्या बोलक्या झाल्या ह्याचे समाधान वाटले. आत्तापर्यंतचा सगळा प्रसंग अलिप्तपणे पण बारकाईने न्याहाळणाऱ्या विजय परुळकरांना ते लगेच जाणवले. बसल्या बसल्या त्यांनी एक चिठ्ठी खरडली आणि जोशींच्या हाती सोपवली. तिच्यात लिहिले होते – 'मी स्वतःला कम्युनिकेशन एक्सपर्ट समजतो, पण तुम्हाला माझा साक्षात दंडवत!' (पुढे अनेक वर्षे जोशींनी ती चिठ्ठी जपून ठेवली होती.)

दुसऱ्या दिवशी मात्र महिलांची भीड पुरती चेपली होती. बैठक सुरू होताहोताच एक बाई सांगू लागली,

''भाऊ, तुम्ही कालपासून आम्हाला बोलायला सांगताहात. कोणाची हिंमत होत नाही. पण मी ठरवलं आहे. पूर्वी माझं माहेर होतं तेव्हा माहेरी गेलं, की हातचं राखून न ठेवता सगळं काही भावाला सांगायची. आता तुम्हीच माझे भाऊ, तुमच्यापासून काय लपवून ठेवायचं? मी आज आता सगळं काही सांगणार आहे.''

मग तिने तिची कहाणी ऐकवली. दारुडा नवरा, नशिबी येणारी मारपीट वगैरे. ते सारे वास्तव महत्त्वाचे होतेच, पण आणखी एक विशेष म्हणजे ती जोशींना 'भाऊ' म्हणाली होती. शेतकरी महिला आघाडीच्या स्त्रिया आणि जोशी यांच्यात एक नवेच नाते त्याक्षणी जन्माला आले. बैठकीतल्या इतरही बायांनी मग त्यांना 'भाऊ' म्हणून संबोधायला सुरुवात केली. शेतकरी पुरुष त्यांना 'साहेब' म्हणायचे आणि शेवटपर्यंत 'साहेब'च म्हणत राहिले, पण शेतकरी महिला मात्र त्यांना त्यानंतर 'भाऊ'च म्हणत राहिल्या.

अशा आणखी चार बैठका मग त्याच महिन्यात जोशींनी वेगवेगळ्या गावांतून घेतल्या – परभणी जिल्ह्यात सेलू येथे (१८-१९ डिसेंबर), अकोला जिल्ह्यात वाशीम येथे (२१-२२ डिसेंबर), नागपूर जिल्ह्यात काटोल येथे (२३-२४ डिसेंबर) आणि अहमदनगर जिल्ह्यात कोपरगाव येथे (२६-२७ डिसेंबर). त्यांना अपेक्षित होता तो अनौपचारिक मोकळेपणा हळूहळू गप्पांमधून वाढत गेला.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे केवळ शेतकरी महिलांचे असे एक स्वतंत्र अधिवेशन घ्यावे, अशी कल्पना ह्याच गप्पांतून पुढे आली. आधी ते फेब्रुवारी १९८६ मध्ये घ्यायचे ठरले होते, पण त्यापूर्वी थोडेच दिवस, २३ जानेवारी १९८६ रोजी, जोशींना हृदयविकाराचा पहिला झटका आला व त्यामुळे ते पुढे ढकलले गेले. डॉक्टरांनी सांगितलेली नंतरची सक्तीची विश्रांती म्हणजे एक इष्टापत्तीच ठरली; स्त्रीप्रश्नाची अधिक चर्चा करायला, वाचन करायला व त्यावर विचार करायला जोशींना पुरेसा अवधी मिळाला. यापूर्वी डॉ. रावसाहेब कसबे आंबेठाणला त्यांना भेटायला आले होते. ते शिकवत त्या संगमनेरच्या महाविद्यालयात १७

जानेवारी १९८६ रोजी जोशींनी व्याख्यान द्यावे अशी त्यांची इच्छा होती. एक आव्हान म्हणून जोशींनी ते आमंत्रण स्वीकारले. त्यानिमित्ताने त्यांचा ह्या प्रश्नाचा अधिक शास्त्रशुद्ध अभ्यास होणार होता व दुसरे म्हणजे त्यांचे स्त्रियांमधले काम आणि शेतकऱ्यांमधले काम यांच्यातला समान असा जैविक धागा नीट स्पष्ट करायची संधी त्यांना मिळणार होती. संगमनेरचे ते व्याख्यान उत्तम झालेच, पण त्यातूनच पुढे जोशींची महिलाप्रश्न म्हणजे नेमके काय ह्याची मांडणी तयार झाली.

समाजाच्या सर्वच स्तरांत, विशेषतः ग्रामीण भागात, स्त्रिया या कनिष्ठ व पुरुष हा जात्याच अधिक श्रेष्ठ असा एक गैरसमज स्त्रियांमध्येही आढळतो; तीस-एक वर्षांपूर्वी तो अधिकच मोठ्या प्रमाणावर आढळत असे. तो खोडून काढण्यासाठी व स्त्रिया या पुरुषांपेक्षा कुठल्याही प्रकारे कमी नाहीत हे स्पष्ट करण्यासाठी स्त्रीप्रश्नाची आपली मांडणी स्पष्ट करताना जोशी अगदी मनुष्यजन्मापासून सुरुवात करतात. लिंगनिश्चितीचे जीवशास्त्रीय सूत्र ते समजावून देतात. गर्भाच्या बांधणीकरिता जी ४६ गुणसूत्रे एकत्र येतात, त्यांपैकी लिंग ठरवण्यासाठी केवळ एकच गुणसूत्र कामाला येते. म्हणजेच स्त्री-पुरुषांमधील फरक हा जास्तीत जास्त दोन-अडीच टक्क्यांचा आहे. त्यामुळे स्त्रियांनी स्वतःला कनिष्ठ समजायची काहीच गरज नाही.

'पुरुष हा अधिक बलवान असल्यामुळे स्त्रियांवर सत्ता गाजवतो' हे अलीकडच्या पाश्चात्त्य स्त्रीवाद्यांचे म्हणणेही जोशींच्या मते चुकीचे आहे. त्यांच्या मते खरे तर पुरुष हे स्त्रियांपेक्षा अधिक कमजोर आहेत. स्त्रियांना भावी आयुष्यात ज्या विविध भूमिका बजावाव्या लागतात, त्यांची पूर्वतयारी म्हणून निसर्गानेच त्यांना जैविक स्वातंत्र्याच्या अधिक व्यापक अशा कक्षा दिल्या आहेत. शारीरिक ताकदीलाच सामर्थ्य मानणारे जुने तंत्रज्ञान मागे पडून इलेक्ट्रॉनिक्सच्या युगात स्नायूंचे बळ आवश्यक नसणारे तंत्रज्ञान पुढे आले आहे. उदाहरणार्थ, हातगाडी ओढताना शारीरिक बळ अत्यावश्यक होते, पण मोटार चालवताना ते लागत नाही; आणि आताच्या अत्याधुनिक गिअररहित मोटारी चालवताना तर नक्कीच लागत नाही. याउलट स्त्रियांकडे सामान्यतः आढळणारे गुण अधिक कालोचित ठरत आहेत. गुलामगिरीच्या काळात स्त्रियांनी अंगी बाणवून घेतलेले ऋजुता, सौम्यपणा, सोशिकता, नीटनेटकेपणा, टापटीप, चिकाटी, एकाच वेळी अनेक गोष्टींचे भान ठेवण्याचे कसब हेच गुण नव्या युगात पुरुषी दंडेलीपेक्षा अधिक उपयुक्त ठरणारे आहेत.

स्त्री-पुरुष श्रेष्ठत्वाचा विचार करताना जोशी हे मान्य करतात, की स्त्रीपेक्षा पुरुषाचे हृदय व फुप्फुसे ही आकाराने मोठी असतात व त्यामुळे सामान्यतः पुरुषाची कार्यशक्ती ही स्त्रीपेक्षा तुलनेने अधिक असते; पण याउलट, भूक सहन करणे, सोशिकता, चिकाटी, रोगाबाबत प्रतिकारशक्ती, शांतपणा या अनेक गुणांत स्त्रिया पुरुषांपेक्षा सरस असतात. हालचालीतील चपळता, कार्यशक्ती, आक्रमकता आणि एक प्रकारची बेफिकिरी यामुळे लढाईत व हिंसाचारात पुरुष पुढे असतात; स्त्रिया मात्र या बाबतीत मागे पडतात – विशेषतः प्रजननाची जबाबदारी पार पडताना. मासिक पाळी, गर्भारपण, बाळंतपण, मुलांची जोपासना या अवस्थांत

स्त्रीची हालचाल मंदावते आणि स्वसंरक्षणाची तिची शक्ती कमी होते. साहजिकच त्या काळात तिला निवारा आणि संरक्षण यांची अधिक जरुरी पडते. पण त्या बदल्यात ती जे योगदान देते ते केवळ अमूल्य असेच आहे. कारण हे करत असतानाच मातृत्वाची निसर्गाने दिलेली जबाबदारी स्त्री पार पाडत असते. मुलांचे संगोपन करण्यातही स्त्रीची भूमिका पुरुषापेक्षा अधिक मोलाची आहे. एकवेळ बापाशिवाय आई जन्मजात अर्भक वाढवू शकेल, पण आईशिवाय जन्मजात अर्भक वाढवणे बापाला फारच अवघड आहे. स्त्रीशिवाय वंशसातत्य अशक्य आहे. किंबहुना, म्हणूनच स्त्री ही पुरुषापेक्षा कुठल्याही प्रकारे कनिष्ठ नाही, आणि तशी दोघांची तुलना करायचीच झाली, तर कदाचित ती अधिक श्रेष्ठ मानावी लागेल असेही जोशी म्हणतात. महात्मा फुले यांनीही पुरुषापेक्षा स्त्री अधिक श्रेष्ठ मानली होती ह्याचीही जोशी आठवण करून देतात.

निसर्गाने स्त्री-पुरुषांची योजना ही एकमेकांशी संघर्ष करण्यासाठी किंवा एकमेकांवर मात करण्यासाठी केली असावी असे जोशी अजिबात मानत नाहीत. निसर्गाच्या कुठल्याही योनीत असा संघर्ष दिसत नाही, याकडे ते लक्ष वेधतात. स्त्री-पुरुष तत्त्वे एकत्र यावीत आणि त्यातून निर्मिती व्हावी यासाठी अद्‌भुत वाटावा असा खटाटोप निसर्ग सातत्याने चालवत असतो.

मार्क्स आणि एंगल्सने केलेल्या मांडणीपेक्षा जोशींची ह्या प्रश्नाची मांडणी मूलतःच वेगळी आहे. मुळात शेतीचा शोध हा स्त्रियांनीच लावला हे ते प्रथमतःच स्पष्ट करतात.

तरीही स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान प्राप्त झाले, ह्याचे आदिकारण शोधताना जोशी पुन्हा शेतीतील पहिल्या बचतीची लुटालूट सुरू झाली, त्या कालखंडाकडे जातात. या काळात जो समाज तयार झाला, तो या बचतीतून तयार झालेल्या मालमत्तेचा वारसा कोणाकडे जाईल, याची चिंता वाहणारा समाज नव्हता; तर प्रामुख्याने या हिंसक कालखंडात तगून कसे राहायचे याचीच काळजी वाहणारा समाज होता. शेतकरी गाई-म्हशींच्या जिवावर जगत होता, त्याचप्रमाणे हे लुटारू शेतकरी समाजाच्या जिवावर जगत होते. शेतीतील धान्य लुटून न्यावे, गुरेढोरे ताब्यात घ्यावीत, स्त्रियांनाही उचलून न्यावे असा एकच हैदोस सुरू झाला. शेतकरी समाजात लुटारूंच्या दृष्टीने अनुपयुक्त गोष्ट एकच – ती म्हणजे पुरुष. गाई-म्हशींच्या गोठ्यात जशा कालवडी तेवढ्या राखल्या जातात आणि गोऱ्हे-रेडे निरुपयोगी म्हणून काढून टाकले जातात, त्याचप्रमाणे गावावर धाड पडली, की पुरुषांची सरसकट कत्तल होत असे. स्वसंरक्षणासाठी हाती हत्यार घेऊन लढाई करण्याचे काम याच कारणाने पुरुषांकडे आले. अशा परिस्थितीत समाजात एक नवीन समाजव्यवस्था तयार झाली. या व्यवस्थेत लढाई करू शकणाऱ्या पुरुषांची उत्पत्ती जास्तीत जास्त व्हावी हे प्रमुख उद्दिष्ट बनले. पुरुषांची संख्या वाढावी, त्यांच्यातील लढाऊ गुणांना उत्तेजन मिळावे, तसेच युद्धकाळातही स्त्रियांनी पुरुषांनाच साथ द्यावी, अशी रचना तयार झाली. स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचा हा उगम आहे.

आजच्या काळाशी ह्याचा संबंध जोडताना जोशी म्हणतात, की आजही ती लुटीची व्यवस्था कायम आहे; आज लूट होते ती हत्यारांचा वापर फारसा न करता. पण त्याकाळी होती, तशीच असुरक्षितता आजही गावोगावी आहे. घराबाहेरची असुरक्षितता ही आजही

स्त्रीच्या मार्गातील सर्वांत मोठी अडचण आहे. बाहेरच्या अत्याचारापेक्षा घरचा अत्याचार परवडला, या जाणिवेने स्त्री घरातले दुय्यमत्व चालवून घेते, इतकेच नव्हे तर गोडही मानून घेते.

पराभूत समाजाप्रमाणे जेत्या समाजातही स्त्रियांवर गुलामगिरी लादली गेली. हल्ला करणाऱ्या जेत्यांनाही त्यांच्या समाजाची रचना युद्धपातळीवरच करावी लागली; म्हणजे पर्यायाने स्त्रीकडे दुय्यमत्व आलेच. स्त्रियांची परिस्थिती जेत्या समाजात वाईट असायचे आणखी एक कारण होते. लुटून आणलेल्या मालमत्तेची मालकी वारसाहक्काने कोणाकडे जायची ह्या चिंतेतून जेत्या समाजात स्त्रियांवर विशेष कडक बंधने लादली गेली. परपुरुषांशी त्यांचा दूरान्वयानेही संबंध येऊ नये, चार भिंतींच्या बाहेर त्यांनी शक्यतो पडूच नये याची खबरदारी घेतली जाऊ लागली. जेत्या समाजातील स्त्रियांच्या अंगावर भारीवाली भरजरीची वस्त्रे, दागदागिने, हिरेमोती आढळत असतील, पण ते केवळ वरवरचे नटवणे होते; दरवेशाने आपण पाळलेल्या माकडाला मखमलीचे रंगीत कपडे घालून नाचवावे असाच काहीसा तो प्रकार. प्रत्यक्षात 'इंडियातील' स्त्रीही दुःखी होती व 'भारतातील' स्त्रीही दुःखी होती. 'इंडिया' 'भारता'चे शोषण करतो असे शेतकरी संघटना म्हणते, पण स्त्रियांचा विचार केला तर 'इंडियातील' स्त्रिया फारशा सुखी बनल्या असेही दिसत नाही हे जोशी कबूल करतात. एकूणच शेतीतील लुटीच्या व्यवस्थेमुळे सगळाच समाज नासला. लुटीत कोणीही जिंकले, कोणीही हरले, तरी प्रत्येक लढाईत पराभव झाला तो दोन्हीकडच्या स्त्रियांचा; त्यांच्या स्वातंत्र्याच्या कक्षा अधिकाधिक आक्रसत गेल्या.

म्हणूनच जोशी म्हणतात की स्त्रियांचा प्रश्न हा मूलतः शेतीतील वरकड उत्पन्नाच्या लुटीतून सुरू झालेल्या शोषणयुगाचाच एक अवशेष आहे. वेगवेगळ्या स्वरूपांत आजही सुरू असलेली ती लूट थांबेस्तोवर हा प्रश्न मिटणार नाही. मार्क्सप्रणीत समाजवादी पद्धतीने मुलांसाठी पाळणाघरे काढणे व त्यातून अपत्यसंगोपनाच्या जबाबदारीतून स्त्रियांना मोकळे करणे अथवा सर्वांना जिथे जेवता येईल असे सामुदायिक रसोडे सुरू करणे व त्यातून स्वैपाकाच्या जबाबदारीतून स्त्रियांना मोकळे करणे यातून स्त्रीप्रश्न कधीच मिटणे शक्य नाही.

लुटालुटीच्या ह्या व्यवस्थेने समाजजीवनाप्रमाणे कुटुंबजीवनही नासले. समाजात आणि कुटुंबात कामाची ठोकळेबाज वाटणी झाली. मुलांचे आदर्श वेगळे, मुलींचे वेगळे; मुलांनी असेच वागावे व मुलींनी तसेच वागावे असे आडाखे तयार झाले. खरे तर स्त्री व पुरुष या दोघांनाही ममता, प्रेम, ऋजुता, सौंदर्य, बुद्धी, धाडस, शौर्य या सर्व गुणांचा समुच्चय कमीअधिक प्रमाणात मिळालेला आहे; कारण मागे सांगितल्याप्रमाणे त्यांच्यात जनुकीय साम्य हे जनुकीय फरकांपेक्षा खूपच जास्त आहे. पण लुटीच्या व्यवस्थेत या गुणांची चुकीची विभागणी झाली. त्यातून स्त्रीकडे विकृत मृदुतेची भूमिका आली, तर पुरुषांकडे विपरीत क्रौर्याची. ममता, प्रेम, ऋजुता, सौंदर्य इत्यादी गुणांचे अतिशयोक्त रूप स्त्रीवर लादण्यात आले; तर बुद्धी, धाडस, शौर्य इत्यादी गुणांचे राक्षसी विडंबन पुरुषांवर लादण्यात आले.

नाजूक हालचाली करणाऱ्या पुरुषाला अकारण 'बायल्या' म्हणून हिणवले जाऊ लागले, तर धडाडी दाखवणाऱ्या स्त्रीवर अकारण 'पुरुषी' असल्याचा शिक्का मारण्यात आला. स्त्रीची गुलामगिरी ही पुरुषांनाही बाधक ठरली, कारण त्यांच्यावरही काही अपेक्षित गुणांचे प्रदर्शन करत राहण्याची सक्ती निर्माण झाली. स्त्रियांवर लादलेल्या दुर्बलतेमुळे त्यांच्यावर तर अन्याय झालाच, पण त्याचबरोबर अवास्तव व न झेपणाऱ्या कठोरतेचे सोंग घेणे भाग पडलेल्या पुरुषावरही तसाच अन्याय झाला. शेतकरी संघटनेच्या स्त्रीआंदोलनाचे एक उद्दिष्ट ही ठोकळेबाज श्रमविभागणी रद्द करून प्रत्येक व्यक्तीला, मग ती स्त्री असो वा पुरुष असो, तिच्या वैयक्तिक गुणधर्माप्रमाणे आयुष्याचा आराखडा ठरवण्याचे स्वातंत्र्य मिळावे हे होते.

जोशी यांच्या मते पुरुषाचे मानले गेलेले गुण स्त्रियांमध्ये दिसायचे आणि स्त्रियांचे म्हणून मानले गेलेले गुण पुरुषांमध्ये दिसायचे प्रमाण काळाच्या ओघात वाढू शकेल. काही प्रगत देशांमध्ये 'बाळंतपणासाठी' म्हणून स्त्रियांना रजा देतातच, पण शिवाय त्याचवेळी 'शिशुसंगोपनासाठी' म्हणून नवऱ्यांनाही भरपगारी सुट्टी दिली जाते. 'चूल आणि मूल' यातच अडकून न पडणाऱ्या महिला आता सर्रास दिसतात. नवऱ्यापेक्षा जास्त कमावणारी पत्नी किंवा घरकाम करण्यात पत्नीपेक्षा जास्त वाटा उचलणारा नवरा आढळणे आधुनिक शहरी समाजाततरी तितकेसे दुर्मिळ राहिलेले नाही. किंबहुना मानववंशाचा इतिहास हा स्त्रियांच्या वाढत्या पुरुषीकरणाचा आणि पुरुषांच्या वाढत्या स्त्रीकरणाचा इतिहास आहे असेही काही जण मानतात.

या अनुषंगाने जोशींनी आणखी एक विचार मांडला आहे. ते म्हणतात,

''शोषणाच्या अनेकविध लढायांत बायकांकडे आपल्या पुरुषांचे पौरुष जागते ठेवण्याची भूमिका आली आणि त्यामुळे त्यांनी आपल्या सामाजिक भूमिकेत तडजोड म्हणून योग्य ते बदल करून घेतले.''

ह्या विचाराचा अधिक विस्तार मात्र जोशींनी कुठेच कधी केलेला नाही. आपण पुरुषाच्या नजरेला अधिकाधिक सुंदर व आकर्षक दिसावे ही भावना यातूनच स्त्रियांच्या मनात निर्माण झाली का, अशा प्रकारचे अनेक प्रश्न ह्या विधानातून वाचकाच्या मनात निर्माण होतात.

मध्ययुगातील आणि सरंजामशाहीतील लुटालुटीचा कालखंड हा शेतीतील उत्पादनाच्या लुटीशी निगडित आहे व स्त्रियांची गुलामगिरी ही ह्या लुटालुटीच्या व्यवस्थेला तोंड देण्यासाठी उभी केलेली आपत्कालीन व्यवस्था होती. तात्पुरता वाटणारा आपत्काळ हा हजारो वर्षे टिकला. स्त्रियांनी अनपेक्षित संकटाला तोंड देण्यासाठी एक ओझे स्वीकारले, पण सिंदबादच्या सफरीच्या गोष्टीतील म्हाताऱ्याप्रमाणे ते ओझे हजारो वर्षे झाली, तरी खाली उतरायलाच तयार नाही!

देवाने स्त्रीपुरुष वेगळे निर्माण केले, पण त्या वेगळेपणात श्रेष्ठता-कनिष्ठता नाही. बायकांनी चूलमूल सांभाळावे व पुरुषांनी घराबाहेरील कामे करावीत ही आज सर्वत्र दिसणारी पद्धत काही कोण्या परमेश्वराने घालून दिलेली नाही. स्त्रियांनी शिकारीचे, लढाईचे काम करावे आणि पुरुषांनी घरकाम सांभाळावे अशी रचना असणारे समाजही असू शकतात, किंबहुना इतिहासात

होतेच. आजही ईशान्य भारतात अनेक ठिकाणी आपल्याला मातृसत्ताक कुटुंबे आढळतात. तेथील स्त्री अनेकदृष्ट्या स्वतंत्र आहे. काही स्त्री-मुक्तीवाल्या नेत्या मानतात, तसा काही हा स्त्री विरुद्ध पुरुष झगडा नाही, किंवा काही मार्क्सवादी मानतात तसा काही हा स्त्री-पुरुष वर्गसंघर्ष अथवा मालमत्तेच्या मालकीसाठीही झालेला झगडा नाही.

आज सुदैवाने परिस्थिती बदलते आहे, हेही जोशी आवर्जून मांडतात. अंतराळयान चालवण्यापासून ते शस्त्रक्रिया करण्यापर्यंत आणि संगणक वापरण्यापासून वाहतूक नियंत्रणापर्यंत कुठलेही काम आपण करू शकतो, हे महिलांनी सिद्ध केलेले आहे. विज्ञानामुळे एका नव्या युगाची पहाट होत आहे. आधुनिक पदार्थविज्ञान समजण्यासाठी पुरुषांना उपलब्ध असणाऱ्या मितिज्ञानापेक्षा स्त्रियांना सहजसुलभ असलेल्या प्रतिभेची अधिक गरज आहे. या संधीचा स्त्रियांनी आत्ताच फायदा करून घेतला पाहिजे; उद्या पुन्हा आपल्याभोवती गुलामगिरीच्या बेड्या पडू नयेत, म्हणून आताच जागृत व्हायला पाहिजे. चांदवडचे अधिवेशन हे त्यासाठीच होते.

जोशी यांची स्त्रीप्रश्नाची एकूण मांडणी ही संक्षेपाने मांडायची, तर साधारण उपरोक्त स्वरूपाची आहे. त्यांनी ती *स्त्रियांचा प्रश्न : चांदवडची शिदोरी* या पुस्तिकेत अधिक विस्ताराने केली आहे. या अवघ्या ५४ पानी पुस्तिकेत जोशी यांनी स्त्री-प्रश्नाचे जे मूलगामी आणि तरीही अगदी सुलभ शब्दांत असे विश्लेषण केले आहे, ते अपूर्व असे आहे. पहिल्या महिला अधिवेशनाच्या निमित्ताने लिहिल्या गेलेल्या ह्या पुस्तिकेचे लोकार्पण त्या अधिवेशनातच झाले. आजही ही पुस्तिका म्हणजे स्त्रीप्रश्न मोजक्या पण नेमक्या शब्दांत आणि सर्व आवश्यक पार्श्वभूमीसह समजावून सांगणारा एक महत्त्वाचा दस्तावेज आहे.

या साऱ्या मंथनातूनच पुढे चांदवड येथे ९ व १० नोव्हेंबर १९८६ रोजी शेतकरी संघटनेचे पहिले महिला अधिवेशन भरवले गेले. हे अधिवेशन म्हणजे जोशी आपल्या आंदोलनाचा एक मोठा मानबिंदू मानत असत.

सर्वार्थांनी भव्य असे हे चांदवडचे अधिवेशन होते. नेमिनाथ जैन विद्यालयाच्या प्रांगणाबाहेर प्रचंड प्रवेशद्वार उभारलेले होते. नऊ नोव्हेंबरचा कार्यक्रम प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिलेल्या २५,००० महिलांसाठी होता. त्यांना बसता येईल एवढा मोठा मांडव आत घातला गेला होता. तीन लाख महिला हजर असलेले दहा तारखेचे खुले अधिवेशन बाहेर भरले होते. चांदवडशी असलेले अहिल्याबाई होळकर यांचे नाते स्मरणात ठेवून अधिवेशन परिसराला 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर नगर' असे नाव दिले गेले होते. एका बाजूला उंचच उंच अशा पर्वतरांगा व दुसऱ्या बाजूला विस्तीर्ण असे मोकळे माळरान होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच बिहार, मध्यप्रदेश, पंजाब, हरयाणा, गुजरात, आंध्र व कर्नाटक या राज्यांतूनही महिला प्रतिनिधी हजर होत्या. नऊ तारखेला गाड्यांना खूप गर्दी असणार, म्हणून बऱ्याच महिला, विशेषतः लांबून येणाऱ्या, सहा-सात तारखेलाच आपापल्या

चटणी-भाकऱ्या बांधून घेऊन चांदवडला हजर झाल्या होत्या. मोकळ्या माळरानावरच त्यांनी आपापली निवासव्यवस्था केली होती. तसे ते कडाक्याच्या थंडीचे दिवस. उघड्या माळरानावर तर त्याची तीव्रता अधिकच झोंबणारी. पण त्याची ह्या महिलांना काहीही तमा नव्हती. 'स्त्रीशक्तीच्या जागरणात स्त्री-पुरुष मुक्ती' हे अधिवेशनाचे घोषवाक्य होते.

निझामाच्या राजवटीत रझाकारांविरुद्ध लढा देणाऱ्या आणि त्यासाठी घराबाहेर पडायचे धाडस दाखवणाऱ्या वीर महिला दगडाबाईंच्या हस्ते दीपप्रज्वलन करून नऊ तारखेला अधिवेशनाला सुरुवात झाली. रामचंद्रबापू पाटील स्वागताध्यक्ष होते. एकूण व्यावहारिक नियोजनात त्यांचा सिंहाचा वाटा होता. आपल्या स्वागतपर भाषणानंतर त्यांनी अधिवेशनाची सर्व सूत्रे महिला आघाडीच्या हाती सुपूर्द केली. शेतकरी संघटनेच्या कामात महिलांचा सहभाग आजवर कसकसा वाढत गेला, महिला आघाडीच्या कामाचे आजचे स्वरूप कसे आहे वगैरेची माहिती सुरुवातीलाच महिला आघाडी प्रमुख मंगला अहिरे यांनी दिली. दिवसभर वेगवेगळी चर्चासत्रे झाली. रोजगार हमी योजना, पाणीप्रश्न, शिक्षण, हुंडा, पोटगी, समान नागरी कायदा आणि समाजातील असुरक्षितता ह्या विषयांवर चर्चा झाल्या.

दुसरा दिवस उजाडला. १० नोव्हेंबर हा शेतकरी हुतात्म्यांचा स्मरणदिन. त्यांच्या स्मृतीला वंदन करून अधिवेशनाच्या कामकाजाला सुरुवात झाली. अगदी सकाळीसकाळीच दीड हजार आदिवासी महिला एका मोर्च्याने मंडपात हजर झाल्या. आपल्या पारंपरिक पोशाखात. त्यांचे उत्साहाने स्वागत केले गेले. 'आदिवासी स्त्रिया या आमच्या बहिणी आहेत आणि त्यांना हिंदू कायद्याखाली वागवण्यात यावे' असा एक ठराव याच वेळी संमत केला गेला. बरोबर अकरा वाजता नाशिक जिल्ह्यातून आलेल्या ३०,००० महिला एका मोर्च्याने जवळच असलेल्या मंगरूळ फाट्यावर येऊन पोचल्या. रामचंद्रबापू पाटील आणि माधवराव मोरे यांनी तिथे जाऊन त्यांचे स्वागत केले. पुढे त्या खुल्या अधिवेशनात येऊन दाखल झाल्या.

ठीक दोन वाजता खुले अधिवेशन सुरू झाले. समोर आता महिलांचा अथांग समुद्र जमला होता. संघटनेच्या प्रथेप्रमाणे मंचाची उभारणी अगदी साधी पण खूप कल्पक होती. एका बाजूला 'शेतकरी संघटना' असे मोठ्या अक्षरांत लिहिले होते, तर दुसऱ्या बाजूला एका शेतकरी मायेचे चित्र. तिच्या पाठीवर एक लहान मुलगी बसलेली, डोक्यावर जड अशी पाटी, हातात कापणी करायचे खुरपे. समोरच्या टोपलीवर 'आम्ही मरावं किती?' अशी अर्थपूर्ण ओळ लिहिलेली. अधिवेशनात कर्नाटक रयत संघाचे बसवराज तंबाखे, गेल ऑमवेट, विमलताई पाटील, सुमन बढे, मृणालिनी खैरनार वगैरेंची भाषणे झाली.

नंतर सर्व उपस्थित स्त्रियांनी 'किसानांच्या बाया आम्ही शेतकरी बाया' हे सानेगुरुजींचे गीत व 'डोंगरी शेत माझं ग, मी बेनू किती, आलं वरीस राबून, मी मरावं किती' हे नारायण सुर्वे यांचे गीत ही दोन्ही गीते मोठ्याने एकत्र म्हटली. तो एक अविस्मरणीय असा क्षण होता.

सुर्वे स्वतः मार्क्सवादी म्हणून प्रसिद्ध व जोशींचा मार्क्सवादाला असलेला विरोध जगजाहीर. तरीही या प्रकाराने ते पुरते भारावून गेले होते. नंतर त्या कवितेविषयी लिहिलेल्या

एका लेखात आणि एका मुलाखतीतही एका प्रश्नाला उत्तर देताना सुर्वे म्हणाले होते, ''चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनात लाखभर महिलांनी एका तालासुरात हे गाणं म्हटलं, हा कवी म्हणून माझ्या आयुष्यातला सर्वोच्च आनंदाचा क्षण होता.''

शेवटी जोशी यांचे भाषण झाले.

ग्रामीण भागातील वाढती गुंडगिरी आणि ग्रामपंचायतींच्या व जिल्हा परिषदांच्या आगामी निवडणुकांचा त्यांनी उल्लेख केला. या गुंडगिरीचा सर्वाधिक त्रास ग्रामीण महिलांनाच होतो. राजकीय सत्तेचे पाठबळ असल्यानेच ह्या स्थानिक गुंडांचे फावते व त्यातून निर्माण होणाऱ्या असुरक्षिततेच्या वातावरणात महिलांना दिवस कंठावे लागतात. इंग्रजांच्या काळात हिंमत करून पोलिसांकडे गेले तर संरक्षणाची काही प्रमाणात तरी शाश्वती असे; अलीकडे मात्र गुंड व पोलीस यांची हातमिळवणी झाली आहे असे वाटते. गुंड पोलिसांच्या थाटात फिरतात आणि पोलीस गुंडांसारखे वागतात. बाईवर अत्याचार झाला, तरी गुपचूप बसणे श्रेयस्कर; पोलिसांकडे गेले तर आणखी काय धिंडवडे निघतील सांगता येत नाही, असा विचार करून सगळे सहन करावे लागते. ही परिस्थिती शहरापेक्षा ग्रामीण भागात अधिक असते. स्थानिक पातळीवर ती बदलायला हवी व त्यासाठी ह्या स्थानिक पातळीवरची सत्ता महिलांच्या हाती असायला हवी. ते उद्दिष्ट समोर ठेवून आगामी निवडणुकांत शेतकरी संघटना फक्त महिला उमेदवार उभ्या करेल व स्वतःचे उमेदवार नसतील तेव्हा अन्य महिला उमेदवारालाच संघटनेचा पाठिंबा असेल असे ते म्हणाले.

एक मुद्दा संघटनेच्या अर्थकारणाबद्दल होता. मागे ऊस आंदोलनानंतर ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी दर टन उसामागे काही रक्कम संघटनेसाठी द्यावी व त्यांना देय असलेल्या रकमेतून कापून साखर कारखान्यांनी ती रक्कम संघटनेकडे द्यावी असे ठरले होते. पण प्रत्यक्षात त्यानुसार रक्कम जमा करण्यात बरेच साखर कारखाने चालढकल करत होते. ''इतर पक्षांप्रमाणे संघटनेकडे पैसा नसल्याने अनेक अडचणी येत आहेत. ताबडतोब निदान एक कोटी रुपये जमवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करा, नाहीतर संघटना चालवणे अशक्य आहे. नपेक्षा मला संघटनेतून मुक्त करा,'' असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

या आवाहनाच्या संदर्भात अधिवेशनाचा वृत्तान्त लिहिताना (*शेतकरी संघटक*, २८ नोव्हेंबर १९८६) नाशिकच्या मृणालिनी मुरलीधर खैरनार यांनी शेवटी नोंदवलेला हा एक हृद्य प्रसंग.

अमरावती जिल्ह्यातील लाखनवाडीचे एक कार्यकर्ते राजाभाऊ देशमुख यांच्या मातोश्री सभा संपल्यानंतर जोशींकडे आल्या व हातातला एक दागिना त्यांच्याकडे देत म्हणाल्या, ''भाऊ, गेल्या कित्येक पिढ्यांत आमच्या दुःखांना वाचा फोडणारा कोणी भेटला नाही, तुम्ही पहिलेच. आम्ही तुमच्या बहिणी अजून संकटात आहोत. असं असताना तुम्ही मुक्ततेची भाषा करू नका. लग्नाच्या वेळी माझ्याकडे ३५ तोळे सोनं होतं. त्यातले २९ तोळे कर्जात गेलं. आता फक्त सहा तोळे शिल्लक आहे. तरीपण हा दागिना घ्या, पण संघटना चालू ठेवा, ही

कळकळीची विनंती.'' एवढे बोलून त्या वृद्ध महिला ढसाढसा रडू लागल्या. त्यांचा दागिना परत करत जोशी म्हणाले, ''मी स्त्रीधनाला हात लावणार नाही.''

अशा प्रकारच्या त्यागातून दिल्या गेलेल्या रकमा आत्मबळ वाढवणाऱ्या होत्या, पण त्यातून जोशींना अपेक्षित असलेला एक कोटीचा निधी संघटना तेव्हा किंवा नंतरही कधी उभारू शकली नाही.

पंचवीस हजार महिला या निवासी मेळाव्याला पूर्णवेळ हजर होत्या व त्याहून कितीतरी अधिक खुल्या अधिवेशनाला हजर होत्या. नेमक्या किती महिला खुल्या अधिवेशनाला उपस्थित होत्या ह्याबद्दल तीन लाखांपासून पाच लाखांपर्यंत वेगवेगळे अंदाज व्यक्तवले गेले आहेत; इतक्या मोठ्या प्रमाणावर पूर्वी कधी महिला एखाद्या मेळाव्याला उपस्थित राहिल्या असतील असे वाटत नाही.

अधिवेशनात संमत केले गेलेले महत्त्वाचे ठराव पुढीलप्रमाणे होते :

१. दुष्काळ पडला तर शेतकऱ्याचे हाल सर्वांत जास्त होतात. कारखाना एक वर्ष बंद झाला, तरी कारखानदार खडी फोडायला जात नाही. नोकरदार म्हातारा झाला, तरी त्याला पेन्शनचा आधार असतो. पाऊस पडला नाही तर ती नैसर्गिक आपत्ती आहे, त्यात शेतकऱ्याचा काहीच दोष नसतो; पण तरीही पाऊस पडला नाही आणि त्यामुळे दुष्काळ पडला तर शेतकरी व त्याच्या कुटुंबाला दुष्काळी कामावर जाणे भाग पडते. पण रोजगार हमी योजनेंतर्गत चालणाऱ्या कामांमध्ये यापुढे आयाबहिणी खडी-माती वाहणे, खड्डे खणणे असली कामे करणार नाहीत. खडी फोडण्याचे काम म्हणजे जणू काही सक्तमजुरीची शिक्षा. महिलांवर ते लादू नये. त्याऐवजी शासनाने सूत कातण्याचे चरखे, कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे छोटे छोटे उद्योग रोजगार हमी योजनेंतर्गत सुरू करावे.

२. ज्या ज्या भागात पाणी भरण्याची जागा दोनशे मीटरपेक्षा जास्त अंतरावर असेल, तेथे अनुदानाची वाट न पाहता गावकऱ्यांनी तातडीने नळ-व्यवस्था करावी, लांबचे पाणी नळाने गावात आणावे व महिलांचा पाण्याचा प्रश्न सोडवावा.

३. स्त्रिया शेतावर राबतात त्याच्या दुप्पट काम त्यांना घरात करावे लागते. शेतीवर जगणाऱ्या कुटुंबात घरकाम आणि शेतीकाम अशी निश्चित विभागणी करणे अवघड आहे, कारण ही दोन्ही कामे तशी परस्परपूरकच असतात. रोज साधारण १५ ते १६ तास या महिला काम करत असतात. इतर कामगारांना मिळतात त्याप्रमाणे बाळंतपणाची रजा, पाळणाघरे, आजारपणाची रजा, जेवणाची सोय, निवृत्तिवेतन अशा कुठल्याच सुविधांचा त्यांच्या जीवनाला स्पर्शही होत नाही. या सर्व स्त्रियांना शेतीवरील कामाचा व शेतीबाहेरील कामाचाही योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे.

४. सर्व महिलांनी राजीवस्त्रांचा वापर बंद करावा. अगदी लग्नकार्यातसुद्धा राजीवस्त्राचे बस्ते बांधू नयेत. राजीवस्त्रे विक्रीकरिता ठेवलेल्या दुकानांतून कपड्यांची खरेदी करू नये व

जागोजागी होणाऱ्या राजीवस्त्रांच्या होळीच्या कार्यक्रमात मनापासून सहभागी व्हावे.

५. सर्व महिला संघटनांनी जिल्हा परिषदा व ग्रामपंचायतीच्या निवडणुकांत फक्त महिला उमेदवारांनाच उभे करावे.

६. घटनेप्रमाणे भारतीय गणराज्य निधर्मी (सेक्युलर) राज्य आहे. याचा अर्थ ते सर्व धर्मांविषयी सारखेच उदासीन असलेले गणराज्य आहे. निधर्मी याचा अर्थ सर्वधर्मसमावेशक असा नाही. गणराज्यातील कोणाही नागरिकास किंवा त्याच्या पालकास नागरी कायद्याऐवजी प्रस्थापित धर्मपैकी कोणत्याही एका धर्माची नागरी व्यवस्था आपणास लागू व्हावी असे जाहीर करता येईल. धार्मिक व्यवस्था मानणाऱ्या नागरिकांमधील नागरी तंट्यांची दखल न्यायालयाने घेऊ नये.

चांदवड अधिवेशनाला मृणाल गोरे व प्रमिला दंडवते यांच्यासारख्या नामवंत स्त्रीनेत्याही हजर होत्या. ग्रामीण भागातील स्त्रियांचा तो अफाट जनसागर बघून त्याही थक्क झाल्या होत्या. अधिवेशन चालू असताना जोशींनी ह्या स्त्रीनेत्यांना विचारले, ''तुम्ही एवढी स्त्रियांची चळवळ चालवता, लाटणंमोर्चा काढता, स्वतःला 'पाणीवाली बाई' म्हणवता, पण तुमच्या सभांमध्ये कधी एवढा जनसमुदाय आला होता का?'' दोघींचा प्रतिसाद फक्त मंदसे हसणे एवढाच होता, पण जोशींच्या प्रश्नातील उपहास कोणालाही कळेल असाच होता. सुरुवातीला प्रभावित झालेले काही मान्यवर नेते पुढे त्यांच्यापासून दुरावले, यामागे असली काही कारणे असतील का?

अधिवेशनाचा समारोप सर्व उपस्थितांनी सामुदायिकरीत्या मोठ्या आवाजात उच्चारलेल्या एका धीरगंभीर प्रतिज्ञेने झाला. एका अर्थाने या प्रतिज्ञेत अधिवेशनातील सर्व चर्चेचा सारांशच आला होता. अगदी आज २०१६ सालातही ती सार्थ आहे. ती प्रतिज्ञा अशी होती :

''आम्ही प्रतिज्ञा घेतो की –

- आम्ही यापुढे स्त्रियांना कधीही कनिष्ठ समजणार नाही. विशेषतः गर्भ स्त्री-बालकाचा आहे यास्तव त्याला जन्माचा हक्क नाकारणार नाही;
- मुलगी आहे म्हणून लालनपालन, वात्सल्य, शुश्रूषा आणि शिक्षण यांत कमी करणार नाही;
- स्त्रियांना मालमत्तेमधील त्यांची वाटणी, गुणविकासाला वाव आणि स्वातंत्र्य मिळण्याआड येणार नाही;
- तसेच मुलींचे शिक्षण आणि विवाह यांबद्दलच्या कायद्यांचे पूर्णपणे परिपालन करू;
- सासुरवाशिणींना घरच्या लेकींप्रमाणे वागवू आणि माहेरवाशिणींना आमचा आधार कायम वाटेल अशा वागू. विधवा, घटस्फोटिता व परित्यक्ता आणि विशेषतः अत्याचारांना बळी पडलेल्या स्त्रियांना कमी लेखणार नाही;
- स्त्रियांचे शृंगार-ललित रूपच प्रकाशात आणून त्यांची नटवी, उपभोग्य वस्तू म्हणून हिडीस प्रतिमा मांडणार नाही आणि मांडू देणार नाही.''

चांदवड अधिवेशनानंतर साधारण तीन वर्षांनी अमरावती येथे शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीचे अधिवेशन ८, ९ व १० नोव्हेंबर १९८९ मध्ये भरले. या अधिवेशनाच्या स्वागताध्यक्षा विमलताई पाटील होत्या. चांदवडमधील चर्चेच्या अनुषंगाने आता प्रत्यक्ष काय कार्यक्रम राबवता येईल याची मुख्यतः ह्या अधिवेशनात चर्चा झाली. चांदवड अधिवेशनात महिला आघाडी उभी राहिली; अमरावती अधिवेशनात तिला प्रत्यक्ष राबवण्यासाठी निश्चित कार्यक्रम मिळाला व त्यासाठी लागणारी आयुधेही मिळाली. चांदवडने आराखडा दिला, अमरावतीने प्रत्यक्ष इमारतीच्या बांधकामाला सुरुवात झाली, असेही म्हणता येईल.

घराबाहेर कधीही न पडणाऱ्या महिला चांदवडच्या निमित्ताने बाहेर पडल्या. हा अनुभव त्यांच्यासाठी अविस्मरणीय असाच होता. चांदवड अधिवेशनामुळे शेतकरी संघटना ही शेतकरी कुटुंबाची संघटना बनली. शेतकरी महिलांना त्या अधिवेशनाने प्रचंड आत्मविश्वास दिला. जोशी म्हणतात,

''या तीन वर्षांत महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात एक मोठा अद्भुत बदल घडून आला. शेतीमालाला रास्त भाव या एक-कलमी कार्यक्रमाने आणि संघटनेच्या आंदोलनाने महाराष्ट्रात जेवढा क्रांतिकारक बदल घडून आला, त्याहीपेक्षा चांदवड आणि अमरावती येथील महिला अधिवेशनांच्या दरम्यान घडून आलेला बदल मोठा आहे.''

महिला जागृतीचा एक आविष्कार म्हणजे त्यानंतर महिला आघाडीने राबवलेले दारूदुकानबंदी आंदोलन. शेतीमालाचे भाव वाढवून मिळाले तरी त्यातून महिलांचे दुःख काही फारसे कमी होत नाही, कारण बहुतेक वाढीव पैसा घरातला कर्ता पुरुष दारूत उडवतो, हा अनुभव आपल्या गावोगावच्या प्रवासात जोशींना सर्रास येत गेला. गावोगावी महिला सांगत, ''भाऊ, एकवेळ शेतीमालाला भाव कमी मिळाला तरी चालेल, पण मालकांची दारू बंद होईल असं काहीतरी करा, कारण त्याशिवाय आम्हाला कधी सुख मिळणार नाही.'' अनेक महिला दारूमुळे आपल्या संसाराची कशी धूळधाण उडाली, हे जोशींना अगदी डोळ्यात पाणी आणून सांगत. अनेकदा दारूची दुकाने चालू ठेवण्यात स्थानिक पोलिसांचाही फायदा होता, कारण अशा दुकानांकडून त्यांना नियमित व भरपूर हप्ते मिळत असत. ह्या हप्त्यांचा वाटा अगदी वरपर्यंत जात असे. गावातील बरीचशी गुंडगिरी दारूभोवती गुंफलेली असायची. खरे तर अशा प्रकारची कुठलीही 'बंदी' जोशींना तत्त्वशः मान्य नसायची; त्यांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेवर अशा 'बंदी'मुळे घाला येत होता. व्यक्तिगत पातळीवर तसा त्यांचा दारूला फारसा विरोधही नव्हता; ते स्वतःही अधूनमधून मद्याचा आस्वाद घेत असत. पण तरीही महिलांकडून होणाऱ्या ह्या दारूबंदीच्या एकूण मागणीचा रेटाच इतका जबरदस्त होता, की जोशींना आपली भूमिका काहीशी बदलावी लागली. पण त्यातही त्यांनी एक सावधगिरी बाळगली; आपल्या आंदोलनाला 'दारूविरोधी' आंदोलन न म्हणता त्यांना 'दारूदुकानविरोधी' आंदोलन म्हटले.

ह्या आंदोलनात महिला आघाडीच्या सदस्यांनी प्रचंड उत्साहाने सहभाग घेतला. गावोगावी दारू विकणारी दुकाने त्यांनी मोर्चे काढून बंद करवली. अशा प्रकारे महिलांनी

निदर्शने करून बंद करवलेले पहिले दुकान अमरावती जिल्ह्यातील खल्लार ह्या गावातले. एका खूप मोठ्या राजकीय नेत्याच्या भावाच्या मालकीचे हे दुकान होते, पण महिलांच्या एकजुटीपुढे त्यांचे काही चालले नाही, दुकान बंदच करावे लागले. पुढे सरकारलाही असा कायदा करावा लागला, की ८० टक्क्यांहून अधिक पंचायत सदस्यांचा दारू विक्रीला विरोध असेल तर त्या गावात दारूवर बंदी असावी.

महिला जागृतीचा दुसरा आविष्कार म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका. १९८६च्या चांदवड अधिवेशनातील एक महत्त्वाचा ठराव होता, महिलांनी जिल्हा परिषदेच्या व तालुका पंचायत समितीच्या निवडणुका लढवण्याचा. ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर बोकाळलेल्या गुंडगिरीचे एक कारण म्हणजे स्थानिक पातळीवरील राजकीय नेतृत्व खूपदा या गुंडांना आश्रय देणारे असते; कधी कधी तर हे गुंडच राजकीय नेते म्हणून मिरवत असतात. ग्रामीण भागातील शासकीय यंत्रणा मोठ्या प्रमाणावर ह्या स्थानिक नेतृत्वाची पाठराखण करणारी असते. स्थानिक पत्रकारही ह्याच नेतृत्वाच्या वरदहस्ताखाली असतात. तीस वर्षांपूर्वी ह्या सगळ्याची दाहकता अधिकच प्रखर होती. ह्याची सर्वांत जास्त झळ ही महिलांना पोचते. आपल्यावर कोणी अत्याचार केला, तर आपण त्याविरुद्ध कोणाकडे न्याय मागू शकू, असा विश्वास ग्रामीण महिलांना वाटत नाही. भीतीच्या आणि असुरक्षिततेच्या प्रचंड दडपणाखाली या महिला वावरत असतात.

त्याचबरोबर विकासाचे म्हणून जे कार्यक्रम ठरवले जातात ते ठरवण्यात व पार पाडण्यात महिलांचा काहीच समावेश नसतो. खरे तर गावातील समस्यांची सर्वाधिक झळ महिलांनाच लागत असते. चूल त्याच पेटवतात व सरपणाचा प्रश्न किती गंभीर आहे हे त्यांनाच रोज जाणवत असते. तीच गोष्ट पाण्याची. दोन-दोन किलोमीटरवरून पाणी आणावे लागते ते त्यांनाच. म्हणूनच ग्रामपंचायतीच्या पातळीवरील समस्या महिलाच अधिक चांगल्या प्रकारे हाताळू शकतील आणि म्हणून जिल्हा परिषदेच्या व तालुका पातळीवरील पंचायतीच्या निवडणुकीत १००% जागांसाठी फक्त महिला उमेदवारांनीच उभे राहावे असे चांदवडला ठरले.

जिल्हा परिषदेसाठी पाचशे आणि तालुका पंचायत समित्यांसाठी आपल्या एक हजार स्त्रिया निवडणूक लढवतील असा महिला आघाडीचा अंदाज होता. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आंबेठाण येथे २७ ते ३० जून १९८७ ह्या कालावधीत एक शिबिर घेण्यात आले. ह्या शिबिराला ४५ स्त्रिया हजर होत्या. Training the Trainers (प्रशिक्षण देणाऱ्यांना प्रशिक्षित करणे) अशा स्वरूपाचे हे शिबिर होते. संघटनेच्या बाहेरील तज्ज्ञांनाही ह्या शिबिरात वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. राम बापट, प्रा. राजेंद्र व्होरा, प्रा. सुहास पळशीकर, डॉ. नीलम गोऱ्हे, प्रा. अरुणा मुधोळकर वगैरेंचा वक्त्यांत समावेश होता. त्या निमित्ताने 'पंचायत राज्य व्यवस्था आणि त्यातील स्त्रियांचा सहभाग' ह्या विषयावर एक पुस्तिकाही तयार करण्यात आली. (संपादन : डॉ. विद्युत भागवत) पंचायत राज्य व्यवस्था

सरकारने का स्वीकारली; जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यांचे कार्य कसे चालते; तिथे काम करताना काय काय अडचणी येतात व त्यांवर कशी मात करता येईल वगैरे अनेक बाबींचे ह्या पुस्तिकेत अगदी सोप्या शब्दांत विवेचन केले आहे. समग्र महिला आघाडीने ह्या पुस्तिकेचा अनेक जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर वापर केला व त्यातून शेकडो स्त्रियांना उत्तम प्रशिक्षण मिळाले. पुढे येनोरा (जिल्हा वर्धा), मेटीखेडा (जिल्हा यवतमाळ), विटनेर (जिल्हा जळगाव) येथील ग्रामपंचायती महिला आघाडीने जिंकल्या व पुढे पाच वर्षे तिथे यशस्वी कामकाजदेखील केले. ग्रामीण स्त्रीच्या दृष्टीने विकासाकडे पाहिले तर धोरणांमध्ये काय काय फरक पडू शकतो, याची अनेक व्यावहारिक उदाहरणे समग्र महिला आघाडीने प्रसृत केलेल्या जिल्हापरिषद निवडणूक जाहीरनाम्यात दिली होती.

महिलांनी निवडणुका लढवायच्या या ठरावामुळे सगळ्याच राजकीय पक्षांना तसे अडचणीत आणले. जिल्हा परिषदांच्या निवडणुका चांदवड अधिवेशनानंतर लगेचच होणार होत्या; पण शेतकरी महिला आघाडीच्या उमेदवारच त्यात बाजी मारतील ह्या भीतीने त्या सलग तीन वर्षे पुढे ढकलण्यात आल्या. त्यावेळी संघटनेने 'जिल्हा परिषद कब्जा' आंदोलन केले. जिल्हा परिषदेवर मोर्चा न्यायचा, तेथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला हाकलून लावायचे व स्वतःच सर्व कारभार हाती घ्यायचा असे या आंदोलनाचे स्वरूप होते. त्यानुसार स्थानिक महिलांनी जिल्हा परिषदेच्या कार्यालयांवर मोर्चे नेले, सभा घेतल्या. तसे या आंदोलनाचे स्वरूप प्रतीकात्मकच होते; कारण अशा प्रकारे कोणी जिल्हा परिषद ताब्यात घ्यायची काहीच शक्यता नव्हती. पण त्या निमित्ताने गावोगावच्या महिला घराबाहेर पडल्या, त्यांनी मोर्चे काढले, घोषणा दिल्या. त्यांच्या मनातील पोलिसांची पूर्वापार चालत आलेली दहशत बरीचशी कमी झाली व त्यातून एकूण चळवळ अधिक भक्कम झाली हे निर्विवाद. अशा कुठल्याही कार्यक्रमामागे त्यातील लोकसहभागातून संघटना अधिक बळकट व्हावी ही एक दृष्टी जोशींची असायचीच.

या आंदोलनाचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे त्यातूनच पुढे १९९६ साली स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारने केला. तसे पाहिले तर कुठल्याही आरक्षणाला संघटनेचा विरोध असे, पण ह्या आरक्षणाला संघटनेने पाठिंबा दिला. किंबहुना ह्या आरक्षणाचे जनकत्वच शेतकरी संघटनेकडे जाते. पंचायत राज्य संस्थांत स्त्रियांना महत्त्वाचा वाटा मिळायला हवा हे पुढे केंद्र सरकारनेही मान्य केले. आपल्या नव्या पंचायत राज बिलात स्त्रियांसाठी तीस टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद केंद्र सरकारने केली. एवढेच नव्हे तर शेतकरी महिला आघाडीच्या जिल्हा परिषद निवडणूक जाहीरनाम्यातील बहुतेक भाग या बिलात समाविष्ट करण्यात आला. ग्रामीण सत्ताकारणावरचा महिला आघाडीचा हा प्रभाव महत्त्वाचा होता.

इथून पुढे शेतकरी आंदोलनात पुरुषांबरोबर स्त्रियाही पूर्वीपेक्षा अधिक जास्त हिरीरीने भाग घेऊ लागल्या. महिलांचा हा सहभाग विदर्भातील आंदोलनांत अधिक जाणवत होता. अनेकदा इतक्या महिला सत्याग्रहात तुरुंगात जाण्यासाठी स्वतःला अटक करून घेत, की त्यांना

ठेवण्यासाठी पुरेसे तुरुंगही जवळपास नसत. अनेक ग्रामपंचायतींच्या निवडणुकांत महिला आघाडीच्या कार्यकर्त्या पंच म्हणून निवडून आल्या, काही ठिकाणी त्या सरपंचही झाल्या.

शेतकरी महिला आघाडीच्या वाटचालीतला पुढचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे लक्ष्मीमुक्ती अभियान. खरे तर केवळ महिला आघाडीच्या नव्हे तर एकूणच शेतकरी संघटनेच्या वाटचालीतला हा एक महत्त्वाचा मैलाचा दगड आहे.

शेतकऱ्याने आपल्या पत्नीच्या नावावर जमिनीचा एक हिस्सा करणे, त्यासाठी सात-बाराच्या उताऱ्यावर तिचे नाव मालक म्हणून लावून घेणे, म्हणजे लक्ष्मीमुक्ती. पण इथे लक्ष्मीमुक्ती शब्दाचा अर्थ घरच्या लक्ष्मीची मुक्ती एवढाच नसून, तिच्या वर्षानुवर्षांच्या ऋणातून तिच्या शेतकरी पतीचीही मुक्ती हा आहे, हे नमूद करायला हवे.

जोशींच्या मते लक्ष्मीमुक्ती अभियान म्हणजे एकूण शेतकरी आंदोलनाचाच एक भाग होता. आपल्या अनेक भाषणांमध्ये ते हा मुद्दा स्पष्ट करून सांगत. त्यांच्या मते, 'शेतकरी तितुका एक एक' आणि 'भीक नको, हवे घामाचे दाम' या शेतकरी संघटनेच्या महत्त्वाच्या दोन घोषणा. या दोन घोषणांच्या संदर्भात विचार केला, तर लक्ष्मीमुक्ती अभियान हे एकूण शेतकरी आंदोलनाचाच एक भाग कसे आहे ते स्पष्ट होते. त्याबाबतीत जोशींची भूमिका साधारण पुढीलप्रमाणे होती :

शेतकरी मायबहिणी ह्या सर्वार्थाने शेतकरीच आहेत; त्यांना 'शेतकरीण' म्हणणे चूक आहे. कारण, डॉक्टरच्या बायकोला औषधांतले काहीही कळत नसले तरी सर्रास 'डॉक्टरीण' म्हटले जाते, किंवा वकिलाच्या बायकोला कायद्याचे काहीही ज्ञान नसले तरी 'वकिलीण' म्हटले जाते, त्या अर्थाने जर शेतकऱ्याच्या बायकोला 'शेतकरीण' म्हटले तर तो त्यांच्यावर केलेला मोठा अन्याय होईल. कारण त्या केवळ नावापुरत्या शेतकरी नसतात, आपल्या नवऱ्याबरोबर त्या दिवसरात्र शेतात राबत असतात. त्यांची ओळख केवळ 'शेतकऱ्याची बायको' ही नसते, तर त्या स्वतःही एक 'शेतकरी' असतात व 'शेतकरी तितुका एक एक' या घोषणेनुसार आपापल्या नवऱ्याबरोबर त्याही शेतकरी संघटनेचा अविभाज्य भाग असतात.

दुसरे म्हणजे, मशागतीची व इतर काही अपवादात्मक जड कामे सोडली, तर पेरणीपासून तयार शेतीमालाची पोती भरण्यापर्यंत असंख्य कष्टाची कामे त्या करत असतात. पुन्हा हे सारे घरसंसार सांभाळून. शेतात काळ्या आईच्या अंगावर घामाचे १०० थेंब पडले, तर त्यांतले साठ-सत्तर थेंब तरी या मायबहिणींच्या घामाचे असतात. 'भीक नको, हवे घामाचे दाम' ह्या घोषणेनुसार त्या घामाचे मोल त्यांना मिळायला हवे. पण प्रत्यक्षात काय दिसते?

त्या शेतकरी आहेत, पण शेतमालक आहेत का? तर नाहीत. कारण त्यांच्या नावावर जमिनीचा तुकडा नसतो; सात-बाराच्या उताऱ्यावर त्यांचे नाव कधीच नसते.

त्यांना शेतमजूरही म्हणता येत नाही. कारण त्यांना कुठलीच मजुरी दिली जात नाही; त्यांच्या श्रमांचे काहीच मोल कुठेच पकडले जात नाही.

याचाच अर्थ त्या गाळत असलेल्या घामाचे दाम त्यांना कुठल्याच स्वरूपात मिळत

नाही. शेतकऱ्याला ते दाम मिळत नाही, म्हणून आपल्यावर अन्याय होतो अशी त्याची तक्रार असते; आणि ती खरीच असते; पण त्याचवेळी तोच शेतकरी स्वतःच्या बायकोला मात्र तिच्या घामाचे काहीच दाम न देऊन तिच्यावर अन्यायच करत असतो. म्हणजे एका पातळीवर शेतकरी अन्यायाचा बळी असतो तर दुसऱ्या घरगुती पातळीवर तो अन्याय करणाराही असतो.

ही विसंगती आपल्या भाषणांमधून सगळीकडे मांडायला जोशींनी सुरुवात केली. उपस्थित शेतकरी बांधवांना उद्देशून ते म्हणत,

'एक दिवस भल्या पहाटे उठा; म्हणजे घरची लक्ष्मी उठायच्या आधी उठा. पेन्सिल घ्या आणि ती जे जे काम करताना दिसेल ते कागदावर टिपायला सुरुवात करा. चुलीचं, पोतेऱ्याचं, पोरांचं, जनावरांचं, रांधायचं, वाढायचं, उष्टी काढायचं, धुणी धुवायचं, भांडी घासायचं, अंगणातलं, शेतातलं, सरपणाचं, गोवऱ्यांचं, जे जे काम ती करेल ते टिपून ठेवा. रात्री सगळी निजानीज होईपर्यंतची सगळी कामं अशी टिपून ठेवा. पोरांना सकाळी पावशेर दूध जास्त मिळावं म्हणून अर्ध्या रात्री उठून गुरांना ती चारा घालते तेही टिपून ठेवा.

'आणि मग सांगा, तुमच्या घरच्या लक्ष्मीच्या दररोजच्या कामाचे तास किती होतात? पंधरा तासांपेक्षा कमी नक्कीच नाही. आता या सगळ्या श्रमाचं मोल काय? सगळी कामं ती ज्या प्रेमाने, ममतेने करते, त्याची किंमत एकवेळ शून्य धरा. तुमची, पोराबाळांची, वडीलधाऱ्यांची आजारपणात ती जी सेवा करते, त्याचीही किंमत एकवेळ शून्य धरा. पण रोजगार हमी योजनेत मातीच्या पाट्या टाकणाऱ्या बाईची किमान रोजी तरी तुमच्या घरच्या लक्ष्मीच्या नावाने लावाल की नाही?

'एका दिवसाचा हिशेब झाला रुपये ३०. तिला सुट्टी कुठली? उलट, जगाचा सण म्हणजे तिला दुप्पट उस्तवार. समजा, तुमची लक्ष्मी हळदीच्या पावलांनी तुमच्या घरी आली, त्याला आता २० वर्षं झाली. प्रत्येक भावाने आपापल्या घरचा हिशेब मनाशी करून पाहावा. वर्षाचे निदान दहा हजार रुपये होतात. म्हणजे २० वर्षांच्या कामाची फक्त रोजीच झाली रुपये दोन लाख. तिला मिळालं काय? अंगावर कापड आणि पोटातली भाकर! सोसायटीचं देणं एवढं थकलं असतं, तर वीस वर्षांनी आज थकबाकी किती निघाली असती? रुपये आठ लाखाच्यावर! हे तुम्ही तिचं देणं लागता.

'हिंदू समाजात दोन प्रकारच्या देव-देवता मानतात – मंगल देवता आणि ओंगळ देवता. मंगल देव म्हणजे विष्णू, कृष्णासारखे. त्यांना प्रसन्न केलं तर ते भलं करतात. पण पूजाअर्चा काही केली नाही, तरी त्यांची काही तक्रार नसते. याउलट गावोगावचे म्हसोबा-खंडोबा या ओंगळ देवता. त्यांना जत्रेच्या दिवशी बैल दाखवला नाही, की आटोपलाच कारभार! सगळी माणसं ओंगळ देवतांची मर्जी संपादायला धावतात; मंगल देवतांकडे कोणी लक्ष देत नाही.

'सोसायट्या, बँका हे सगळे ओंगळ सावकार. ते तगादे लावतात, जीप पाठवून भांडी उचलतात, कोर्टात जातात, जप्ती करवतात. त्यांची कर्जं फेडण्याकरता आपण जिवाचा आकांत करतो. घरची लक्ष्मी सावकार खरी, थोड्याथोडक्या रकमेची नव्हे, चांगली आठ-दहा

लाखाच्या कर्जाची; पण ती काहीच तगादा लावत नाही. उलट इतर सावकारांचीच कर्जं भागवण्याकरिता अंगावरचे दागिनेसुद्धा प्रसंगी उतरून देते. या मंगल सावकाराचं कर्ज फेडण्याचा विचार तुम्ही कधी करणार? या कर्जातून मुक्त होणं महत्त्वाचं आहे. हे काम अगदी निकडीचं आहे.

'आपण घामाचं दाम मागतो, पण घरच्या लक्ष्मीच्या घामाची किंमत करत नाही. शेतकऱ्यांना इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने जगायला मिळालं पाहिजे असं म्हणतो, पण घरातल्या लक्ष्मीला गुलामासारखे वागवतो. अशा खोटेपणाला यश कसं लाभेल? घरच्या लक्ष्मीचा मान राखला नाही, तर बाहेरची लक्ष्मी घरात यायची कशी? आणि आली तरी टिकायची कशी?

'लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम म्हणजे काय हे आता स्पष्ट होऊ लागलं असेल. घरच्या लक्ष्मीच्या कर्जातून मुक्त होण्याचा हा कार्यक्रम आहे. पण या एवढ्या कर्जातून मुक्त व्हायचं कसं?

'देवाच्या देण्यातून आपण कसं मोकळं होतो? तोंडात घास टाकण्याआधी आपण त्याला नैवेद्य दाखवतो. म्हणतो, बाबा, हे सगळं तुझ्यामुळे आहे. झटकन देवाचं देणं फिटतं.

'लक्ष्मीमुक्ती हा कार्यक्रम असा नैवेद्याचा आहे. शेतकरी त्याच्या लक्ष्मीला म्हणतो, 'बाई, माझ्या गरिबाच्या संसारात तू हळदीच्या पावलांनी आलीस. तुझी काहीच हौसमौज घरात झाली नाही. मी तुला वेडंवाकडं बोललो. काही वेळा हातही उगारला. तुझ्या सगळ्या कष्टांची आणि त्यागाची आज मी कृतज्ञतापूर्वक आठवण करतो आणि या एवढ्याशा जमिनीच्या तुकड्याचा तुला नैवेद्य दाखवतो.'

असंख्य सभांमधून जोशींनी ह्या आशयाचे हृदयस्पर्शी भाषण केले. सगळ्या उपस्थित शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी उभे राहायचे. अनेक जण चक्क हुंदके देत रडायचे. घरी गेल्यावर अहमहमिकेने शेतकरी आपल्या पत्नीचे नाव आपल्या मालकीच्या जमिनीवर लावू लागले. ही एक मोठी क्रांतीच होती.

लक्ष्मीमुक्ती अभियानाचा एक भाग म्हणून ज्या गावातील किमान १०० जमीनधारक आपल्या घरच्या लक्ष्मीचे नाव जमिनीची मालकी प्रस्थापित करणाऱ्या सात-बाराच्या उताऱ्यावर स्वतःबरोबर लावतील, त्या गावाला स्वतः शरद जोशी भेट देतील असे जाहीर करण्यात आले. एखाद्या गावात १०० जमीनधारकच नसतील, तर मग त्या गावातील ८० टक्के शेतकऱ्यांनी असे केले, तरी त्या गावांनाही जोशी भेट देणार असे ठरले. ही घटना २ ऑक्टोबर १९९०ची आहे. लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाची ही औपचारिक सुरुवात म्हणता येईल.

त्यावेळी जोशींना असे वाटले होते, की आपल्याला फार तर पाचपंचवीस गावांमध्ये जावे लागेल; दिलेले वचन पुरे करणे फारसे अवघड जाणार नाही. मोठमोठ्या विद्वानांनी, पुढाऱ्यांनी त्यावेळी सांगितले होते, की हा कार्यक्रम अगदी अव्यवहार्य आहे, जमिनीच्या तुकड्यावरून शेतकरी भावाभावांत वैर माजते, डोकी फुटतात; शेतकरी बायकोचे नाव आपल्या बरोबरीने

कागदोपत्री लावणे केवळ अशक्य आहे.

पण लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम एखाद्या वणव्यासारखा पसरला. जोशींना आपल्या वचनपूर्तीसाठी दीड हजारहून अधिक गावांना भेट द्यावी लागली. प्रत्येक गावात सगळ्या नवऱ्यांनी आपापल्या बायकोला दानपत्र द्यायचा कार्यक्रम सार्वजनिकरीत्या, ढोल-लेझीमच्या गजरात मिरवणुका काढून, गावभर रांगोळ्या घालून, रोषणाई करून थाटामाटात साजरा केला जात असे. स्त्रियांमध्ये तर अफाट उत्साह असायचाच, पण पुरुषांचा उत्साहदेखील तेवढाच असायचा. आपण योग्य ते केले, काहीतरी चांगले केले, इतक्या वर्षांच्या ऋणातून मोकळे झालो याचा आनंद त्यांच्याही चेहऱ्यावरून ओसंडून वाहत असे. नंतर तिथे होणाऱ्या सभेत जोशी स्वतः भाषण करत. आसपासच्या गावांतील शेतकरीही अशा सभांना हजर असत व त्यांनाही असे करायची प्रेरणा मिळे.

जोशी लक्ष्मीमुक्ती उपक्रमाचा संबंध अतिशय प्रभावीपणे रामायणातील सीतेच्या कथेशी जोडत व लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाच्या यशाचे एक कारण कदाचित तेही होते. इथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे समकालीन सामाजिक स्थितीचा परिणाम. त्या दिवसांत अयोध्येत राममंदिर उभारावे म्हणून मोठे आंदोलन देशात चालू होते. लक्ष्मीमुक्तीबद्दल बोलताना रामायणातीलच एका उपकथेचा संदर्भ जोशी देत व तो अतिशय समयोचित असे. निराधार झाल्यानंतर आयुष्यात सीतेला किती अडचणींना सामोरे जावे लागले, तिची किती दैना झाली हे ते सांगत. आपल्या घरच्या लक्ष्मीवर रामायणातल्या सीतेसारखी अशी अवस्था येऊ देऊ नका, तिच्या नावाने मालमत्तेचा योग्य तो वाटा आत्ताच द्या, हा त्यामागचा संदेश असायचा. शिवाय हे तुम्ही तिच्यावर केलेले उपकार नसून, उलट तिच्या अनेक वर्षे थकलेल्या कर्जाची आंशिक परतफेड आहे, हा तुमच्या स्वतःच्या ऋणमुक्तीचा क्षण आहे, हेही ते बजावून सांगत.

अनेक अर्थांनी सीतेच्या जीवनातील कारुण्य हृदयस्पर्शी आहे. मुळात ती भूमिकन्या. तिचा जन्मही जमिनीतला आणि शेवटी जगाचा निरोप घेतानाही तिला धरतीमातेनेच पोटात घेतले. जनक राजाला जमीन नांगरताना लहानगी सीता सापडली होती. जनकाने तिला वाढवले, तिचे रामाबरोबर लग्न लावून दिले. पण राजसुखाऐवजी तिच्या नशिबी वनवास होता. तिने वनवासाला जावे असा दशरथाचा किंवा अन्य कोणाचाच आग्रह नव्हता, अयोध्येला राजवाड्यात ती राहू शकली असती. पण 'सहते चरामी'चे व्रत गांभीर्याने घेत आणि 'जिथे राम, तिथे सीता' म्हणत तीही रामाबरोबर चौदा वर्षे वनवासात गेली, रामाशी कमालीची एकनिष्ठ राहिली. पण वनवास संपल्यावरही तिला स्वतःचे पावित्र्य सिद्ध करण्यासाठी अग्निदिव्य करावेच लागले. दुर्दैव म्हणजे तथाकथित रामराज्य सुरू झाल्यानंतरही शेवटी रामाने तिचा त्यागच केला. तिला पुन्हा वनवासात पाठवले. ती गर्भवती असतानाही. तिची अन्य कुठली सोय करणे खरे तर रामाला सहज शक्य होते, पण तेही त्याने केले नाही. आपल्या पत्नीला न्याय देणे प्रत्यक्ष रामालाही जमले नाही. ह्या सगळ्यामागे रामाचीदेखील काही बाजू

नक्कीच असणार, कोण बरोबर कोण चूक हा वाद खूप वाढवता येईल; पण लक्ष्मीमुक्ती अभियानाच्या संदर्भात मुद्दा एवढाच असायचा, की एवढी मोठी राणी असूनही स्वतःच्या नावावर जेमतेम आधारापुरतीही काही संपत्ती नसल्यामुळे शेवटी तिला पुन्हा एकदा वनवास भोगावा लागला.

ज्या गावाने लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम अमलात आणला असेल, त्या गावातील आपल्या भाषणाच्या शेवटी जोशी म्हणत, ''रामाला जे धनुष्य पेललं नाही, ते या बहाद्दरांनी उचलून दाखवलं आहे, म्हणून मी तुमच्या या गावात आलो. भूमिकन्या सीतेला जे भाग्य लाभलं नाही, ते लक्ष्मीमुक्तीच्या प्रत्येक गावातील शंभरेक मायाबहिणींना लाभलं, त्याचा आनंदसोहळा पाहण्यासाठी मी गावागावांत फिरतो आहे.''

लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाला मिळत गेलेल्या ह्या प्रतिसादाने स्वतः जोशी विलक्षण भारावून जात असत. आपल्या एका लेखात ते लिहितात,

> शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या गेल्या बारा वर्षांत कितीक दुःखाचे प्रसंग कोसळले. घर उजाड झाले. कधी यश मिळाले, कधी अपयशाचा सामना करावा लागला. आपण हाती घेतलेले हे सतीचे वाण कसे निभावते या चिंतेने कितीकदा व्याकूळ झालो. पण लक्ष्मीमुक्तीच्या या लोकविलक्षण यशाने सगळा शीण आणि सगळे दुःख दूर होऊन जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटते आहे.
>
> (*शेतकरी संघटक*, २१ फेब्रुवारी १९९२)

लक्ष्मीमुक्तीबद्दल लिहिताना मधु किश्वर यांच्याविषयी लिहिणे आवश्यक वाटते. दिल्लीतील ह्या एक नामवंत प्राध्यापिका, विचारवंत, लढवय्या समाजकार्यकर्त्या, 'मानुषी' या महिलाप्रश्नांना वाहिलेल्या नियतकालिकाच्या संस्थापक-संपादिका. १९८६ साली जोशींनी त्यांना नुकत्याच स्थापन झालेल्या शेतकरी महिला आघाडीच्या कामात सहभागी व्हायचे आमंत्रण दिले. किश्वर यांचे मत असे होते, की शेतीमालाला वाजवी भाव मिळाल्याने ज्याप्रमाणे शेतकरी अधिक स्वतंत्र होईल, त्याचप्रमाणे त्याच्या पत्नीला आर्थिक स्वातंत्र्य मिळाले, तर ती अधिक स्वतंत्र होईल आणि त्यासाठी सरकारने कायदा करायची वाट पाहत बसायचे कारण नाही; त्यासाठी संघटनेनेच शेतकऱ्यांना पत्नीच्या नावे जमीन करून द्यायला व त्यातून त्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून द्यायला प्रवृत्त करावे. त्यासाठी कायदा पुरेसा नाही असे त्यांचे म्हणणे होते व जोशींना ते पटले. जवळजवळ तीन वर्षे किश्वर महाराष्ट्रातील अनेक गावांमधून जोशींबरोबर फिरल्या, त्यांनी भाषणेही दिली. 'मानुषी'मधील एका लेखात (अंक क्रमांक १३६, २००६) किश्वर यांनी या आंदोलनाविषयी विस्ताराने लिहिले आहे.

किश्वर यांच्या मते आंदोलनाला इतका प्रतिसाद मिळाला ह्याची सर्वांत महत्त्वाची कारणे म्हणजे, शेतकरी समाजात जोशी यांच्या शब्दाला असलेला मान, त्यांच्या निष्कलंक चारित्र्याबद्दल शेतकऱ्यांना असलेला विश्वास व हा माणूस आपल्याला फसवणार नाही ही त्यांची श्रद्धा.

संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी स्वतःही आपापल्या पत्नीच्या नावे शेतजमीन केली व त्याचाही परिणाम इतर सर्वसामान्य शेतकऱ्यांवर होत असे असेही त्या म्हणतात. पुराणकथांचा व पौराणिक प्रतिमांचा जोशींनी केलेला प्रभावी वापर व श्रोत्यांच्या हृदयाला हात घालणारे त्यांचे वक्तृत्व यांचाही उल्लेख त्यांनी केला आहे. स्वतः जोशी यांनी किश्वर यांच्या या अभियानातील योगदानाची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. ते म्हणतात,

''अशा अनेक सभांमधून किश्वर स्वतःही रडू लागत. एखादा पुरुष स्त्रियांची बाजू इतक्या प्रभावीपणे मांडू शकतो, हे त्यांना पूर्वी कधीच खरे वाटले नव्हते असेही त्या म्हणत.''

दिल्लीत मधु किश्वर यांची त्यांच्या घरी १८ मार्च २०१६ रोजी भेट झाली, तेव्हा या उपक्रमातील आपल्या सहभागाबद्दल त्या भरभरून सांगत होत्या. पंचवीसएक वर्षे उलटून गेली तरीही त्या वेळच्या त्यांच्या आठवणी अजूनही सुस्पष्ट आहेत.

अशाच एका गावभेटीत घडलेला हा एक प्रसंग. यवतमाळ जिल्ह्याच्या राळेगाव तालुक्यातील रावेरी हे छोटे गाव. जोशी जेव्हा तिथे गेले तेव्हा इतरत्र व्हायची तशी इथेही एक मोठी सभा झाली. त्यानंतर नेहमीप्रमाणे गावकऱ्यांशी गप्पा रंगल्या. रामाने सोडून दिल्यानंतर सीता वनवासात गेली, दंडकारण्यातच ती प्रसूत झाली व लवकुशांचा जन्म झाला, इथवरची कहाणी तशी सर्वपरिचित आहे. रावेरी गावात त्या कहाणीचा पुढचा विलक्षण भाग जोशींना ऐकायला मिळाला.

त्या कहाणीनुसार लवकुश जन्मले ते याच परिसरात. प्रसूतिश्रमांनी थकलेल्या सीतेने थोडी लापशी करून प्यावी म्हणून इथल्या गावकऱ्यांकडे मूठभर गहू मागितले. पण कोणीही ते तिला दिले नाहीत. आपल्या नवजात मुलांना आपण आता आपले दूधही देऊ शकणार नाही ह्या कल्पनेने संतापलेल्या सीतेने गावाला शाप दिला की 'या परिसरात गहू कधीच उगवणार नाही.' अनेक शतके इथे गहू खरोखरच कधी पिकला नाही. खूप शतकांनी संकरित वाण आल्यानंतर गावात गहू पिकायला लागला.

जवळच एक हनुमानाचे मंदिरही आहे. इथला नऊ फुटी भव्य हनुमान दोरीने बांधलेल्या अवस्थेत आहे. असा हतवीर्य हनुमान अन्य कुठेही बघायला मिळत नाही. त्यामागेही गावकरी एक कथा सांगतात. रामाने अश्वमेध यज्ञ केला असताना त्याचा घोडा लवकुशांनी इथे अडवला. घोड्याबरोबर आलेल्या हनुमानाला त्यांनी हरवले व बांधून ठेवले. त्याचेच प्रतीक म्हणजे ही मूर्ती.

अशा प्रकारच्या पौराणिक कथांची सत्यासत्यता जोखणे हे तसे अशक्यप्राय. दंडकारण्य नेमके कुठे होते, लवकुश नेमके कुठे जन्मले, हे कोण आणि कसे सिद्ध करणार? पण साधारणतः लोककथा ह्या गावाचा गौरव सांगणाऱ्या असतात व ही कथा तर गावाविषयी वाईट सांगणारीच होती; आणि तरीही ती सांगितली जाते, हा ती खरी असण्याचा एक अल्पसा पुरावा आहे असे जोशींना वाटले.

देशात राममंदिरे जागोजागी आहेत, पण सीतेचे मंदिर हे एकमेव; ह्या मंदिराचा जीर्णोद्धार

करायला हवा, तिच्यासारख्या परित्यक्त स्त्रियांना आसरा मिळेल, घराचा उंबरठा ओलांडणाऱ्या प्रत्येक स्त्रीला स्वतःच्या पायावर ती उभी राहू शकेल असेही काही प्रशिक्षण देता येईल असे एखादे आश्रयस्थानवजा स्मारकही तिथे असायला हवे असेही जोशींना वाटले. तेव्हापासून शेतकरी महिला आघाडी व गावकरी प्रयत्नशील होते, पण आवश्यक तो निधी जमेना. अनेक वर्षे ते मंदिर भग्नावस्थेतच होते; सीता वनवासीच राहिली होती. पुढे जोशी राज्यसभेचे खासदार असताना आपल्या खासदार निधीतून त्यांनी दहा लाख रुपये सीता स्मारकासाठी दिले; मंदिरासाठी मात्र तो निधी वापरता येत नाही. त्यासाठी त्यांनी स्वतःची वेगळी तेरा लाखाची देणगी दिली, इतरही काही जणांनी मदत केली व शेवटी २ ऑक्टोबर २०१० रोजी पुनर्निर्मित मंदिराचा लोकार्पण समारंभ पार पडला.

रावेरी गावचे एक मोठे शेतकरी बाळासाहेब देशमुख. एमएसईबीमध्ये ते एक्झेक्युटिव्ह इंजिनिअर होते. खरे म्हणजे ते नोकरी करत होते ती आस्थापना भ्रष्टाचारासाठी प्रसिद्ध आहे, पण अशा ठिकाणी नोकरी करूनही त्यांनी आपला प्रामाणिकपणा कायम राखला. आता ते सेवानिवृत्त आहेत. शेतकरी संघटनेचे काम आपली नोकरी सांभाळून ते जवळजवळ तीस वर्षे करत आले आहेत. त्यांच्याच सहकार्याने प्रस्तुत लेखकाला ते सीतामंदिर बघता आले. तो सगळा परिसर त्यांनी स्वच्छ करून घेतला आहे. जिल्ह्याच्या पर्यटक नकाशावर सीतामंदिराची नोंद व्हावी व त्याद्वारे लांबलांबचे पर्यटकही इथे यावेत असा त्यांचा प्रयत्न आहे. सुदैवाने काही स्थानिक कार्यकर्ते या कामात त्यांना साथ देत आहेत. स्मारकाची उभारणी शक्य तितक्या लौकर पूर्ण करायचा व पुढे त्याचा योग्य तसा वापर करायचा त्यांचा निर्धार आहे.

लक्ष्मीमुक्ती हे नावही मोठे प्रतीकात्मक आणि सीतामंदिर हेही मोठे प्रतीकात्मक. पौराणिक प्रतीकांचा विधायक वापर केला तर तो चळवळीसाठी किती प्रभावी ठरतो याचेही लक्ष्मीमुक्ती ते सीतामंदिर हा प्रवास म्हणजे एक प्रतीक आहे.

पारंपरिक संकल्पनांचा प्रभावी वापर हे एक शेतकरी संघटनेचे मोठेच वैशिष्ट्य होते. ओंगळ देवता आणि मंगल देवता, विठोबाला साकडे, सीताशेती ही अशीच काही त्यांनी आधुनिक काळाचा योग्य तो संदर्भ देत वापरलेली पौराणिक प्रतीके.

दुर्दैवाने या अभूतपूर्व अशा लक्ष्मीमुक्ती अभियानाचे नेमके स्वरूप काय आहे हे समजून घेण्याचा शेतकरी संघटनेबाहेरच्या विचारवंतांनी वा कार्यकर्त्यांनी फारसा प्रयत्नही केला नाही. ज्या थोड्यांनी तो केला त्यांच्यातल्या काहींना सोबत घेऊन गेल ऑमवेट (Ombvet) आणि चेतना गाला यांनी २ ते ५ फेब्रुवारी १९९२ या काळात मेटीखेडा व रावेरी या दोन गावांची पाहणी केली. त्यांच्यासोबत असलेल्यांमध्ये त्यावेळी पुण्यात आलेल्या राज्यशास्त्राच्या अमेरिकन प्राध्यापिका डॉ. आयरिन डायमंड व त्यांचे पती, 'ग्रीन पार्टी'चे कार्यकर्ते जेफ लौंड, वंदना शिवा व इतर आठ-दहा मंडळी होती.

त्याबद्दल शेतकरी संघटकमध्ये लिहिलेल्या आपल्या दोन लेखांत (२१ जून व ६ जुलै १९९२) जन्माने अमेरिकन असलेल्या पण भारतातील परिवर्तनाच्या कार्यात स्वतःला

आयुष्यभरासाठी झोकून दिलेल्या गेल ऑमवेट यांनी काही रोचक निरीक्षणे नोंदवली आहेत. लेखांत त्या लिहितात, की हजारो, लाखो गरीब, मध्यम शेतकरी पुरुष 'घरच्या लक्ष्मी'च्या नावावर जमीन देतील असे दोन वर्षांपूर्वी कोणी सांगितले असते, तर त्यावर विश्वास बसला नसता, पण आज ते प्रत्यक्षात घडते आहे. याचे त्यांना खूप कौतुक आहे. शिवाय १९९०-९१ हे वर्ष म्हणजे महात्मा फुले यांच्या शंभराव्या पुण्यतिथीचे व बाबासाहेब आंबेडकर यांच्या शंभराव्या जन्मतिथीचे वर्ष. पण तरी त्या वर्षीही त्यांचा वारसा सांगणाऱ्या आपल्या समाजात लक्ष्मीमुक्तीची माध्यमांनी जवळजवळ काहीच दखल घेतली नाही याचे त्यांना आश्चर्य वाटते. याबाबत गेल ऑमवेट यांचा निष्कर्ष असा आहे, ''सर्व प्रसारमाध्यमे काही शहरी उच्च मध्यमवर्गीय कार्यकर्त्यांच्या हातात आहेत आणि त्यांना शेतकरी महिला आघाडीकडे बघण्याची इच्छा नाही. उलट, संधी मिळताच त्या आघाडीबद्दल मुद्दाम गैरसमज पसरवतात. एकूणच शेतकरी संघटनेच्याविरुद्ध वातावरण मध्यमवर्गामध्ये आहे.''

महिला आंदोलनात शरद जोशी यांना अनेक प्रामाणिक महिला कार्यकर्त्यांची साथ होती. आंदोलनाच्या यशात त्यांचा मोठा वाटा होता व त्यामुळे त्यांच्याविषयी न लिहिणे हे काहीसे अन्यायाचे होईल. गेल ऑमवेट, मधु किश्वर यांचा उल्लेख पूर्वी झालाच आहे. शेतकरी आंदोलनात ज्यांनी स्वतःला वेळोवेळी झोकून दिले अशा महिलांची संख्या बरीच मोठी आहे. त्यांतील काही जणींबद्दल पूर्वी लिहिलेच आहे; सगळ्यांविषयी लिहिणे स्थलाभावी अशक्य आहे. तरीही केवळ वानगीदाखल, ज्यांच्याशी व्यक्तिशः चर्चा करायची संधी प्रस्तुत लेखकाला मिळाली व त्यामुळे ज्यांचे अनुभव अधिक विस्ताराने कळले अशा शैलजा देशपांडे व चेतना गाला सिन्हा याच्याविषयी इथे लिहित आहे.

शैलजा देशपांडे या वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातल्या. पण त्यांचे माहेर हिंगणघाटचे. वडील शं. ना. वखरे तेथील नगरपरिषदेचे उपाध्यक्ष होते. आर्थिक परिस्थिती चांगली होती. स्वतःचा छापखाना होता आणि 'झंझावात' नावाच्या साप्ताहिकाचे ते संपादनही करत. शेतीशी काहीच संबंध नव्हता. वाचनाची, कवितांची शैलाताईंना फार आवड. शेतीविषयी मात्र त्यांचे मत वाईटच होते. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते! आर्वी गावी राहणाऱ्या आपल्या काकांकडे त्या आल्या असताना शेजारीच राहणाऱ्या शेतकरी कुटुंबातील मिलिंद देशपांडे यांच्याशी त्यांचे लग्न ठरले. सासरी आल्यावर आयुष्यात प्रथमच त्यांचा शेतीशी थेट असा संबंध आला.

१९८६ साली चांदवड अधिवेशनाच्या वेळी त्यांची व जोशींची प्रथम गाठ पडली. त्यानंतर लगेचच सुरू झालेल्या कापूस आंदोलनात त्यांनी भाग घेतला. आर्वी तालुक्यातील तळेगाव येथे महिलांच्या पुढाकाराने झालेल्या रेल रोकोत त्या रुळावर आडव्या झाल्या होत्या. तिथेच त्या पकडल्या गेल्या. नागपूर तुरुंगात त्यांना डांबण्यात आले. योगायोगाने जोशी व त्यांचे अनेक सहकारी त्यावेळी त्याच तुरुंगात होते. त्या महिलांच्या बाबतीत हा आयुष्यातील

पहिलाच तुरुंगवास. त्यांचे मनोधैर्य कायम राहावे म्हणून रोज एकदातरी जोशी प्रत्येकीशी बोलत, तिची चौकशी करत, तिला धीर देत. त्यावेळी शैलाताईंचा अगदी दुपट्यात असलेला लहान मुलगाही त्यांच्याबरोबर होता. जोशी त्याच्याशीही बोलायचे, त्याला तुरुंगात उपलब्ध होऊ शकेल असा काही छोटा खाऊ द्यायचे. सामान्य कार्यकर्त्याचीही ते किती काळजी घेतात ते पाहून शैलाताईंचे मन भरून यायचे. तुरुंगातून बाहेर आल्यावर शैलाताई चळवळीत सक्रिय सहभाग घेऊ लागल्या. एकूण तीन वेळा त्यांनी तुरुंगवास भोगला. पुढे जेव्हा जेव्हा जोशी विदर्भात आर्वीमार्गे कुठे जात असतील, तेव्हा आवर्जून शैलाताईंच्या घरी थोडावेळतरी थांबत.

शैलाताईंनी आंदोलनात अनेक दिव्यांना तोंड दिले. आयुष्यात प्रथमच पंजाबी ड्रेस घालून रेल्वे रुळांवर स्वतःला झोकून देण्यापासून ते तुरुंगात जाताना नियमाप्रमाणे गळ्यातले मंगळसूत्र काढून ठेवण्यापर्यंत. पुढे त्या शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षही झाल्या. ८, ९ व १० नोव्हेंबर २००१ रोजी भरलेल्या रावेरी अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांच्याकडेच होते. अधिवेशनाच्या प्रचारासाठी सतत तीन महिने त्या घराबाहेर होत्या. अधिवेशनानंतर सर्व उपस्थित वर्ध्याला गेले व तेथे त्यांनी रेल रोको केले.

त्यानंतर १ ते ७ डिसेंबर २००१ या दरम्यान सर्वजण वर्ध्याहून नागपूरला पदयात्रेने गेले 'धडक मोर्चा' म्हणून. विशेष म्हणजे त्या वयातही हे सर्व अंतर शरद जोशी इतर सर्वांबरोबर पायी चालले. शेतकरी आंदोलनातील ती एक संस्मरणीय घटना होती. रावेरी येथील सीतामंदिराच्या उभारणीतही शैलाताईंचा मोठा सहभाग होता. मंदिराचे बांधकाम नांदेडचे रमेश पाटील हंगरगेकर यांनी पार पाडले. मंदिरामागचा विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी शैलाताई सगळा विदर्भ फिरल्या. मंदिराचे लोकार्पण होणार त्या २ ऑक्टोबर २०१० रोजी अयोध्याप्रकरणीच्या सुप्रीम कोर्टाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर सगळीकडे प्रचंड तणाव होता; स्वतः सोनिया गांधी यांची सेवाग्राम येथे ठरलेली सभाही रद्द करावी लागली होती. लोकार्पणालातरी किती लोक येतील याविषयी शेवटच्या क्षणापर्यंत सगळ्यांच्या मनात चांगलीच धाकधूक होती. पण प्रत्यक्षात समारंभाला रावेरीसारख्या आडबाजूला असलेल्या छोट्या गावीही २५,००० लोक जमले होते. शैलाताईंनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांचे हे फळ होते.

चेतना गाला सिन्हा यांनी इकॉनॉमिक्स विषय घेऊन मुंबई विद्यापीठातून एमकॉम केले. एकेकाळी त्या मुंबईत छात्र युवा संघर्ष वाहिनीत होत्या. संघर्ष वाहिनीच्या बऱ्याच कार्यकर्त्यांचा त्यावेळी प्रस्तुत लेखकाशी संबंध आला होता. लेखनाच्या निमित्ताने इतक्या वर्षांनी त्यांना पुन्हा भेटणे हा आनंददायी अनुभव होता. त्यांच्या काही आठवणी पुढीलप्रमाणे :

''संघर्ष वाहिनीतील एक कार्यकर्ता विजय सिन्हा यांच्याशी माझे लग्न झाले व मी आमच्या गावी जाऊन घरची शेती करायला लागले. सातारा जिल्ह्याच्या माण तालुक्यातील म्हसवड हे आमचे गाव. आम्ही प्रथम कांदा लावला होता व कांद्याचे बी खरेदी करण्यापासूनच्या सगळ्या खर्चाची मी काळजीपूर्वक नोंद ठेवत होते. कांदा विकायलाही मीच

गेले होते. म्हसवडहून लोणंदच्या बाजारात आम्ही एक ट्रक कांदा नेला. बाजारात कांद्याला फक्त तीन पैसे किलो भाव मिळाला! ह्या भावात तर ट्रकचे भाडेही निघत नव्हते! एवढ्या कमी किमतीत हा कांदा विकण्यापेक्षा तो परत घरी घेऊन जायचे आम्ही ठरवले. तो अक्षरशः उकिरड्यात टाकून दिला. म्हटले, निदान त्याचे खत तरी तयार होईल. खरे तर, माहेरची मी व्यापारी कुटुंबातली; पण शेतीचा हिशेब मला चक्रावून टाकणारा होता. शेती कायम तोट्यात का असते याचे शरद जोशींचे विश्लेषण मला तेव्हा पटले.

''त्यानंतर मी चांदवडच्या महिला अधिवेशनाला हजर राहिले. तिथे मी जे पाहिले ते पूर्वी कुठे बघितले नव्हते. शरद जोशींच्या केवळ हाकेवर लाखोंच्या संख्येने तिथे महिला आल्या होत्या. त्यातूनच पुढे लक्ष्मीमुक्ती अभियान सुरू झाले. त्यातही मी सहभागी झाले. जोशींची ती कल्पनाच अगदी विलक्षण होती. जोशींची सीताशेतीची व माजघरशेतीची कल्पनाही आगळीवेगळी होती. ते म्हणत, 'विमानात मिळणाऱ्या पोटॅटो चिप्सपेक्षा आणि स्नॅक्सपेक्षा शेतकरी महिलांचे सांडगे आणि खारवडे खूप सरस आहेत. शेतीमालावर प्रक्रिया करून त्यात नावीन्य आणि वैविध्य आणायचे काम शेतकरी महिलाच करू शकतील. विपरीत परिस्थितीतदेखील शेतकरी टिकू शकला याचे श्रेयही शेतकरी महिलेच्या चिकाटीला आहे.'

''सीताशेती ही खरी प्रयोगशेती होती व त्या संकल्पनेपासून मीही खूप प्रेरणा घेतली. वेगवेगळे प्रयोग करू लागले. आमचा सगळा दुष्काळी तालुका. इथे शेळ्या पाळायचे प्रयोग मी केले. पण कुठले पीकच येत नाही, तर शेळ्या खाणार काय? जोशी म्हणाले, 'शेळ्या आपला मार्ग स्वतःच शोधतात.' मग माझ्या लक्षात आले, की शेळ्या निवडुंग खातात व तो आमच्या भागात येऊ शकतो. मग मी निवडुंगाची शेती करू लागले व त्यात मला खूप आनंद वाटायचा. जोशींमधील ही प्रयोगशीलता मला खूप भावायची.

''दुर्दैवाची गोष्ट ही, की शरद जोशी यांना समाजातल्या अभिजनवर्गाकडून अपेक्षित ती मान्यता कधी मिळालीच नाही व ह्यात शेतकऱ्यांबरोबर देशाचेही नुकसान झाले. मिडिया हँडल करणे हीदेखील एक कला आहे आणि त्यात जोशी कुठेतरी कमी पडले की काय, असा प्रश्न मनाला शिवल्याशिवाय राहत नाही. कारण त्यांनी जेवढे मोठे कार्य केले, त्या प्रमाणात त्यांचा प्रचार आणि प्रसार कधीच झाला नाही.''

आज म्हसवड येथे चेतना गाला सिन्हा यांनी स्वतःचे मोठे कार्य उभे केले आहे. अल्पबचत गटापासून माण देशी महिला सहकारी बँकेपर्यंत त्याचा मोठा पसारा आहे. ग्रामीण महिलांच्या सबलीकरणासाठी, त्यांच्यात उद्योजकता वाढावी म्हणून त्या करत असलेले काम कोणालाही प्रेरणा मिळावी असेच आहे.

शेतकरी संघटनेच्या लक्ष्मीमुक्ती अभियानातून अवघ्या दोन-तीन वर्षांत खेड्यापाड्यातील दोन लाख स्त्रियांची नावे आयुष्यात प्रथमच सात बाराच्या उताऱ्यावर जमिनीचे सहमालक म्हणून लावली गेली. स्वतः शेतकऱ्याचा आत्मसन्मानही त्यामुळे बळावला; आपण पत्नीच्या कर्जातून मोकळे झालो, तिला न्याय दिला ही भावना त्याला खूप

सुखावणारी होती. कुटुंबाच्या मालमत्तेत स्त्रियांना वाटा मिळायला हवा ह्यावर चर्चासत्रे अनेक झाली, परिसंवाद असंख्य भरवले गेले; पण प्रत्यक्षात सात-बाराच्या उताऱ्यावर स्त्रियांची नावे आली ती शेतकरी महिला आघाडीच्या कामामुळेच. शेतकरी आंदोलनाचे हे एक फलित, जवळपास पूर्णतः दुर्लक्षित राहिलेले, पण खूप महत्त्वाचे असे आहे.

प्रस्थापित स्त्रीमुक्ती चळवळीशी मात्र जोशींचे कधीच फारसे जमले नाही. अशा स्त्रीमुक्तिवाद्यांवर जोशींनी जळजळीत टीका केली आहे. ते लिहितात,

> जागोजागी स्त्री-संघर्ष समित्या उगवतात आणि स्त्री-साहाय्याची काही जुजबी कामे करीत राहतात. स्त्रीपुरुष संमिश्र समाजात आपल्या कर्तबगारीला पुरेसा वाव नाही अशी जाणीव झाली, की स्त्रिया महिला चळवळीकडे वळतात; मोठमोठ्या मान्यवर महिला संघटनांत लब्धप्रतिष्ठित स्त्रियांनी महत्त्वाची सारी पदे अडवलेली असतात. कोणत्याही कार्यक्रमात मिरवायला त्यांनाच मिळते. नाव त्यांचेच होते. त्यामुळे अशा संस्थांत नव्या उमेदीच्या कार्यकर्त्यांना आत शिरायला फारसा वाव नसतो. तेव्हा, जी ती स्त्री एक नवी पाटी लावून आपली एक संस्था उभी करू पाहते.
>
> स्त्रियांचा प्रश्न हा अनेक संस्थांत, विश्वविद्यालयांत अभ्यासाचा स्वतंत्र विषय म्हणून मान्यताप्राप्त झाला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या परिषदा भरवणे, परिसंवाद घडवून आणणे हे काम गल्लीपासून दिल्लीपर्यंत जोमाने चालू आहे. महिला कार्यकर्त्या राज्यपातळीवरील परिसंवादांत आधी मान्यता पावतात, मग हळूहळू राष्ट्रीय पातळीवर त्या परिसंवाद करू लागतात आणि शेवटची पायरी म्हणजे, वर्षातून दोन-चार वेळा वेगवेगळ्या देशांत घडणाऱ्या परिसंवादातील जागाही भूषवू लागतात. महिला चळवळीतील कार्यकर्त्यांचे या दृष्टीने तीन संच बनतात : आगगाडी संच, विमान संच आणि जेट संच! या सगळ्यातून स्त्रीप्रश्नाविषयीची खरी कळकळ ओसरू लागली, ती एक 'करिअर' बनली.
>
> वेगवेगळ्या क्षेत्रांत आपापली कर्तबगारी दाखविणाऱ्या स्त्रिया होत्या. कोणी वकील होत्या, कोणी डॉक्टर; कोणी लष्करात जात होत्या तर कोणी वैमानिक बनत होत्या; कोणी साहसाची कामे करीत होत्या तर कोणी कलाक्षेत्रात चमकत होत्या. त्यांनी आपल्या स्त्रीपणाचा काहीही आधार न घेता, मोठी कामगिरी करून दाखवली. साऱ्या स्त्रीजातीस ललामभूत असलेल्या या दुर्गा स्त्री-चळवळीपासून दूर राहिल्या आणि स्त्री-चळवळ वावदूक मुखंडींच्या हाती गेली.
>
> (*चांदवडची शिदोरी : स्त्रियांचा प्रश्न*, पृष्ठ १४०-५)

मार्क्सवादात कामगार आणि मालक किंवा 'आहेरे' आणि 'नाहीरे' असे दोन परस्परविरोधी वर्ग मानले गेले, त्यांच्यात वर्गसंघर्ष (classwar) अटळ आहे असे मानले

गेले, तसाच काहीसा प्रकार अनेक स्त्रीमुक्ती चळवळीतील नेत्यांनी केला. पुरुष आणि स्त्री हे जणू दोन वर्गच आहेत, त्यांचे हितसंबंध परस्परविरोधीच आहेत, अशी संघर्षमूलक भूमिका त्यांनी घेतली. शेतकरी महिला आघाडीला असा वर्गविग्रह पूर्णतः अमान्य होता. जोशी म्हणतात,

''एका बाजूला पुरुष आणि दुसऱ्या बाजूला स्त्रिया असा लिंगभेदावर आधारित संघर्ष जगाच्या इतिहासात कधीच कुठे झालेला नाही. जर्मनी व इंग्लंड यांच्यात युद्ध झाले, तेव्हा जर्मन बायका इंग्लंडमधील बायकांच्या बाजूने लढल्या किंवा इंग्लंडमधील पुरुष जर्मन पुरुषांच्या बाजूने लढले असे कधीच झालेले नाही. उलट इंग्लंडमधील स्त्री-पुरुष एकत्र व त्याविरुद्ध लढणारे जर्मनीमधील स्त्री-पुरुष एकत्र असेच इतिहासात दिसते. यामध्ये एक जैविक सत्य आहे; जे वर्ग ह्या संकल्पनेत कधीच विचारात घेतले गेले नाही. समानांमध्ये समुदायनिर्मिती होत नाही, ती असमानांमध्येच होते. तसे नसते, तर सर्व लग्ने समलिंगीच झाली असती. पण प्रत्यक्षात लग्ने विषमलिंगीच होतात. याचाच अर्थ समुदायनिर्मितीसाठी समानता हा निकष नसून असमानता हा निकष आहे.''

महिला कार्यकर्त्या घडवण्याच्या दृष्टीने सर्वप्रथम काही बोलू शकणाऱ्या महिलांचे आंबेठाण इथे एक दहा दिवसाचे निवासी शिबिर घेण्यात आले. त्या शिबिरात स्त्रीप्रश्न समजून घेणे, त्याची मांडणी कशी करायची याचा अभ्यास करणे यावर कसून मेहनत घेतली गेली. त्यानंतर या सर्व महिला कार्यकर्त्या आपापल्या भागात जाऊन, शक्य तितक्या महिला गोळा करून, शिबिरे घेऊ लागल्या. फेब्रुवारी १९९२ मध्ये झालेल्या महाराष्ट्रातील पंचायत राज निवडणुकीत महिला आघाडीच्या ४०० उमेदवार उभ्या होत्या व त्यांतील १०० निवडून आल्या होत्या. या सर्व महिला अशा शिबिरांचा परिणाम म्हणूनच प्रथम घराबाहेर पडलेल्या होत्या; नवऱ्याच्या नावावर निवडून आलेल्या नव्हत्या! त्यांच्यातील या नव्यानेच प्रकट झालेल्या नेतृत्वगुणांचे त्यांना व त्यांच्या घरच्या माणसांनीही अप्रूप वाटायला लागले होते.

आपल्या सर्व कार्यकर्त्यांनी स्वतःच्या घरच्या महिलांनाही सन्मानाने वागवावे यावर जोशी यांचा कटाक्ष होता. त्याचा परिणाम कार्यकर्त्यांच्या वागण्यात लौकरच दिसू लागला. शेतकरी संघटनेच्या बैठकीतले वातावरण त्यामुळे इतर संघटनांच्या बैठकीतील वातावरणापेक्षा खूप वेगळे असे. बाहेरून जी माणसे अशा बैठकींना हजर असतात त्यांच्या लक्षात तो फरक पटकन येत असे.

भारतातील कामगार चळवळीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आंदोलनाचे हे एक वेगळेपण पटकन उठून दिसणारे आहे. साम्यवाद्यांची मुंबई गिरणी कामगार युनियन, इंटकचा राष्ट्रीय मिल मजदूर संघ, समाजवाद्यांची हिंद मजदूर सभा, शिवसेनेची भारतीय कामगार सेना, एस. आर. कुलकर्णी यांची ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियन, दत्ता सामंत यांची असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्स, जॉर्ज फर्नांडिस यांची हिंद मजदूर किसान पंचायत, गुलाब जोशी यांची कामगार उत्कर्ष सभा या सर्व समकालीन कामगार युनियन्स खूपच बलाढ्य होत्या, दीर्घ काळ

प्रस्थापित होत्या, त्यांचे सदस्य तुलनेने अधिक शिक्षित अशा नागर मुंबईकर समाजातील होते, पण तरीही या युनियन्सच्या कार्यकर्त्यांत महिलांचा समावेश तसा नगण्यच होता. याउलट, बहुतांशी अशिक्षित आणि परंपरानिष्ठ अशा ग्रामीण महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या शेतकरी संघटनेतील महिलांचा सहभाग हा तुलनेने, आश्चर्यकारक वाटावा इतका अधिक होता.

आंदोलनातील महिलांच्या या व्यापक सहभागामुळे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये एक प्रकारचे कौटुंबिक वातावरण सतत जाणवत असे. एकमेकांच्या घरी जाणे-येणे, प्रसंगी राहणेसुद्धा वरचेवर असायचे. असे असूनही आपल्या समाजात स्त्री-पुरुष जेव्हा एकत्र काम करतात, तेव्हा ज्या प्रकारची 'कुजबुज' खूपदा कानावर पडते, तसे शेतकरी संघटनेच्या संदर्भात कधी घडल्याचे एखाददुसरा अपवाद वगळता प्रस्तुत लेखकाच्यातरी ऐकिवात नाही.

शरद जोशी व त्यांच्या काही सहकाऱ्यांबरोबर एकदा बुंदेलखंडात जायचा योग आला होता. लांबचा व रात्रीचा प्रवासही अपरिहार्यपणे करावा लागला. त्यावेळी इतर सर्व पुरुष होते व फक्त शैलाताई देशपांडे या एकमेव महिला आमच्याबरोबर होत्या. ''तुम्हाला या प्रवासात एकट्या महिला म्हणून कधी अवघडल्यासारखं नाही का वाटलं?'' असे मी विचारले असताना त्या म्हणाल्या होत्या, ''अजिबात नाही. किंबहुना संघटनेच्या कुठल्याच कार्यक्रमात सहभागी होताना मला कधीच काही वावगं वाटलेलं नाही. माझ्या यजमानांनीही कधी माझ्या अशा प्रवासाला हरकत घेतलेली नाही. संघटनेतील पुरुष मला भावासारखेच वाटतात.''

हाच विश्वास संघटनेतील इतरही काही महिलांशी बोलताना प्रस्तुत लेखकाला आढळून आला व संघटनेच्या दृष्टीने ही एक अभिमानाचीच बाब आहे.

देशातील प्रचलित स्त्री चळवळ आणि शेतकरी संघटनेची महिला आघाडी यांच्यातील मूलभूत फरक ४ ते १५ सप्टेंबर १९९५ मध्ये चीनची राजधानी बीजिंग येथील चवथ्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेच्या वेळी स्पष्ट झाला. युनायटेड नेशन्सतर्फे अशा परिषदा भरवण्यात येतात. ही आजवरची सर्वांत मोठी जागतिक महिला परिषद मानली जाते. तिला जगभरातून १८९ देशांमधील ३६०० महिला हजर होत्या. भारतातूनही स्त्रीजागृती क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे तीनशे महिला बीजिंगला गेल्या होत्या. ह्या परिषदेत संमत केल्या गेलेल्या अनेक ठरावांना शेतकरी महिला आघाडीने जोराचा विरोध केला.

बीजिंग येथील परिषदेच्या जाहीरनाम्यात स्त्रियांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सबलीकरणासाठी सरकारी छत्राखालील योजनांचा पुरस्कार करण्यात आला आणि या योजना स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून राबवाव्या असे ठरले. स्त्रियांची काळजी करण्याचे काम राष्ट्रीय महिला आयोग, स्त्रियांची स्वतंत्र न्यायालये, स्त्रियांची स्वतंत्र पोलीस यंत्रणा यांच्याकडे सोपवावी अशीही शिफारस करण्यात आली. म्हणजेच सरकारकडे किंवा सरकारनियंत्रित यंत्रणांकडे ही सारी जबाबदारी जाणार होती. म्हणजेच यातून एकतर सरकारचे सगळीकडे हस्तक्षेप करण्याचे अधिकार वाढणार होते व दुसरे म्हणजे, एनजीओंना मिळणाऱ्या कंत्राटांत प्रचंड वाढ होणार होती. ह्या दोन्ही बाबींना जोशींचा अगदी मूलभूत असा विरोध होता.

एकतर देशाचे संरक्षण आणि प्रशासन ह्यांव्यतिरिक्त कुठल्याही बाबींत सरकारने हस्तक्षेप करू नये, सरकार जितके कमी तितके अधिक चांगले अशीच त्यांची भूमिका होती. सरकारने हाती घेतलेल्या कापूस खरेदी योजनेपासून बाजार समित्यांपर्यंत असंख्य उपक्रम कसे भ्रष्ट झाले व डबघाईला आले ह्याचे अनेक पूर्वानुभव समोर दिसत होते. 'सरकार समस्या क्या सुलझाए, सरकार यही समस्या है' ही त्यांची कायम धारणा होती.

दुसरी बाब म्हणजे स्वयंसेवी संस्थांमार्फत समाजाचे भले होण्यापेक्षा या संस्थांचेच भले होण्याची शक्यता जोशींना अधिक दिसत होती. साहजिकच बीजिंग परिषदेतील ठरावांना त्यांचा विरोध होता.

बीजिंग परिषदेमध्ये आणखी एक विचित्र प्रकार घडला व त्याची अन्यत्र कोणी काहीच चर्चा केली नाही, तरी जोशींनी त्याबद्दल आवर्जून लिहिले आहे, कारण अशा आंतरराष्ट्रीय परिषदांची एक फार जाचक अशी मर्यादा त्यातून अधोरेखित होते. तो प्रकार म्हणजे ह्या परिषदेतील जवळजवळ सर्वच कॅथॉलिक आणि मुस्लिम देशांच्या महिलांनी घेतलेली अगदी वेगळी भूमिका.

उदाहरणार्थ, अनेक प्रॉटेस्टंट व पाश्चात्त्य देशांच्या महिला प्रतिनिधींना आपण कुठला वेष परिधान करायचा, संमिश्र समाजात कसे वावरायचे हे ठरवायचा अधिकार फक्त स्वतःलाच हवा होता; त्यावर समाजाची बंधने त्यांना नको होती. कॅथॉलिक आणि मुस्लिम देशांच्या महिलांची भूमिका मात्र तशी नव्हती. घटस्फोट, गर्भपात, समलिंगीसंबंध अशा अनेक बाबींवरही हे मतभेद पराकोटीचे होते. गंमत म्हणजे कॅथॉलिक आणि मुस्लिम देशांच्या महिलांची मते त्यांच्या देशांतील पुरुषांच्या मतांशी तंतोतंत जुळणारी होती. मुसलमान स्त्रियांनी शरियतची तरफदारी केली, कॅथॉलिक स्त्रियांची मते त्यांच्या पोपने व्यक्त केलेल्या धोरणांना पाठिंबा देणारी होती. आपापल्या धर्माच्या परंपरा आणि तत्त्वज्ञान कसे श्रेष्ठ आहे हेच त्या सांगत बसल्या. त्यात कुठलाही मूलभूत बदल करावा अशी त्यांची मागणी नव्हती, उलट तशा बदलाला त्यांचा संपूर्ण विरोधच होता. आफ्रिकन देशांतील महिलांचे प्रश्न पुन्हा अगदी वेगळे होते. तिथली उपासमार, मागासलेपण, वेगवेगळ्या टोळ्यांमध्ये सतत चालू असलेला हिंसाचार वगैरे मुद्दे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. आपल्या देशातील पुरुष किंवा धर्म किंवा सरकार यांच्या विरोधात एकही वाक्य यांपैकी कुणाही प्रतिनिधीने उच्चारले नाही. या सगळ्यातून महिलांच्या प्रश्नांचे स्वरूप हे वेगवेगळ्या देशांत वेगवेगळे आहे व त्यावर सरसकट लागू पडेल अशी कुठलीही आंतरराष्ट्रीय नीती असू शकत नाही, हेच सिद्ध होत होते. त्यामुळे जगातील सर्व महिला म्हणजे जणू एक वर्ग आहे, त्यांचे स्वतःचे असे एक धोरण आहे, वगैरे सगळा 'आंतरराष्ट्रीयपणा' हा एक भ्रमच होता, असे जोशींचे म्हणणे होते.

या परिषदेतील भारतीय प्रतिनिधींच्या मांडणीत स्त्री व पुरुष हे जणू एकमेकांच्या विरोधात उभे ठाकलेले दोन वर्ग आहेत, त्यांच्यात कायम संघर्षच असतो अशा गृहीतकावर भर होता व हे गृहीतक मूलतः जोशींना अमान्य होते. त्यांच्या मते स्त्री व पुरुष हे परस्परपूरक भूमिकाच बजावत असतात.

ही परिस्थिती समाजासमोर यावी, म्हणून मुंबईत रविवार, २४ मार्च १९९६ रोजी शेतकरी संघटनेने एक बीजिंगविरोधी महिला परिषदही घेतली. सकाळी शिवाजी पार्कलगतच्या वनिता समाजाच्या सभागृहात नोंदणीकृत सातशे महिला प्रतिनिधींची सभा झाली. तेथील चर्चासत्राचे उद्घाटन शेतकरी महिला आघाडीच्या तत्कालीन अध्यक्षा इंदिरा पाटील यांनी केले. त्यांच्यानंतर माजी आमदार सरोज काशीकर आणि सुमन अगरवाल यांची भाषणे झाली. उत्तरार्धातील चर्चासत्रात वसुंधरा शिंदे, शैलजा देशपांडे, चेतना सिन्हा-गाला, अंजली पातुरकर, कमल देसाई, माया टेमुर्डे, रत्ना अष्टेकर, अरुणा नेवले, रेखा ठाकरे, निर्मला गावंडे वगैरेंनी भाग घेतला. परप्रांतातील महिलांच्या वतीने गुजरातमधील इला पटेल यांनी आपली मते मांडली. बीजिंग येथे घेण्यात आलेल्या निर्णयांना विरोध करणारे चार ठराव प्रतिनिधी सभेने संमत केले. जनता पक्षाचे डॉ. सुब्रमण्यम स्वामी सत्राच्या अध्यक्षस्थानी होते व जोशींच्या भाषणाने खुल्या सत्राची समाप्ती झाली. खुल्या सत्राला सुमारे ३०,००० शेतकरी महिला व पुरुष स्वखर्चाने उपस्थित होते. अधिवेशनासाठी गुजरातमधून पाचशे, मध्यप्रदेशातून शंभर तर उत्तर प्रदेशातून पन्नास महिला हजर होत्या. आश्चर्य म्हणजे आमंत्रण देऊनही महाराष्ट्रातील इतर महिला संघटनांच्या वतीने एकही प्रतिनिधी चर्चासत्रास किंवा नंतरच्या खुल्या सत्राला उपस्थित नव्हता. 'नही दासी सरकारी, नारी है चिंगारी' अशा घोषणा देत सर्वांनी मैदान सोडले.

शेतकरी आंदोलनातील महिलांचा सहभाग हा नेहमीच खूप आगळावेगळा राहिला आहे. उदाहरणार्थ, डिसेंबर १९८६च्या सेवाग्राम येथील रेल रोको आंदोलनात पोलिसांना चुकवून रेल्वे रुळांपर्यंत कसे पोचायचे हा एक प्रश्नच होता. मार्गदर्शन करायला कोणीच मोठे नेते उपलब्ध नव्हते; सगळ्यांनाच पोलिसांनी पूर्वीच पकडले होते. अशावेळी शैलजा देशपांडे, अश्विनी सबाने, सुनंदा तुपकर, सरोज काशीकर अशा काही महिला पुढे झाल्या. इतर अनेक महिलांना त्यांनी तयार केले. एरव्ही कधीच साडीशिवाय दुसरा पोशाख न केलेल्या या महिला त्यावेळी चक्क पंजाबी ड्रेस घालून घराबाहेर पडल्या, पोलिसांना गुंगारा देऊन रेल्वे रुळांपर्यंत पोचल्या. रेल्वे रुळांच्या आजूबाजूला किती घाण असते हे सर्वश्रुत आहे. पण त्याची काहीही तमा न बाळगता या महिलांनी स्वतःला रेल्वे रुळांवर झोकून दिले आणि पुढचे तीन तास तसेच आडवे पडून रेल्वे रोको यशस्वी केले. गांधीजींच्या १९३० सालच्या दांडीयात्रेत व नंतरच्या आंदोलनात अनेक सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग होता. जी मंडळी कधीच कुठल्या आंदोलनात सामील झाली नव्हती, तीही रस्त्यावर उतरली. आपल्या आत्मचरित्रात त्याचे वर्णन करताना पंडित नेहरूंनी म्हटले होते – "Feet of clay caught the spark of life." ("मातीचे पाय असलेल्या सर्वसामान्य माणसांनाही चैतन्याची ठिणगी स्पर्शून गेली.") शेतकरी संघटनेच्या आंदोलनात उत्स्फूर्तपणे सामील झालेल्या अनेक सामान्य शेतकरी स्त्रीपुरुषांना नेहरूंचे हे शब्द चपखल लागू पडतात.

भारतात स्त्रीमुक्ती चळवळ अनेकांनी केली व त्यांचे योगदान आपापल्यापरीने महत्त्वाचे आहेच, पण ही चळवळ मुख्यतः शहरी भागापुरती व त्यातही सुशिक्षित, मध्यमवर्गीय

महिलांपुरती सीमित राहिली होती. शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीत गावोगावच्या अक्षरशः लाखो महिला सामील झाल्या, त्यांनी दारूदुकानबंदीसारखी वेगवेगळी आंदोलने लढवली, अधिवेशने भरवली, त्यातून स्वतःचे आत्मभान वाढवले, आपल्या कुटुंबापासून सुरुवात करून सगळ्या समाजातच स्त्रियांना न्याय मिळावा म्हणून जागृती आणली व ह्या सगळ्यातून एकूणच स्त्रीमुक्तीचा परीघ अनेक पटींनी विस्तारित झाला. एवढेच नव्हे तर स्त्रीमुक्तीलाच 'स्त्री-पुरुष मुक्ती'चा आयाम जोडला.

पुढे महाराष्ट्रात व एकूणच देशात शासकीय पातळीवर घेतल्या गेलेल्या अनेक निर्णयांवर या शेतकरी महिला आंदोलनाची छाप स्पष्ट जाणवते. 'पंचायतराज'मध्ये महिलांना ३० टक्के जागा देण्याच्या सरकारी निर्णयात चांदवड जाहीरनाम्यातील बराचसा भाग समाविष्ट झाला आहे. जिल्हा परिषदेतील कामकाजाबद्दल महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी संघटनेने जागोजागी जी शिबिरे घेतली, त्यातून तयार झालेल्या महिलांचा पुढे सर्वच राजकीय पक्षांनी उपयोग करून घेतला; महिला आघाडी ही सर्वच राजकीय पक्षांसाठी कार्यकर्त्यांची एक खाणच ठरली. लक्ष्मीमुक्ती अभियानात पत्नीच्या नावाने जमिनीचा काही भाग हस्तांतरित करण्यासाठी जेव्हा शेतकरी सरकारी कार्यालयात जाई, तेव्हा सातबाऱ्यावर तशी नोंदणी करताना तेथील नोकरदार मुद्दामच दिरंगाई करू लागले; कारण तसे करण्यात त्यांना त्यांची नेहमीची 'टक्केवारी' मिळत नव्हती! त्यामुळे खूप वादंग माजू लागले. शेतकरी संघटनेच्या आमदारांनी हा प्रश्न विधानसभेत व नंतर सरकारदरबारी धसास लावला. शेवटी मग सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असताना त्यासाठी स्वतंत्र कायदाच केला गेला. महाराष्ट्र सरकारने १९९४ साली केलेला, सात-बाराच्या उताऱ्यावर शेतकरी पत्नीचे नाव लावणारा, तो 'लक्ष्मीमुक्ती' कायदा हे तर सरळसरळ महिला आघाडीच्या आंदोलनाचे फळ आहे; अन्य कुठल्याच राजकीय पक्षाने अशी कुठली चळवळ अगदी लहान प्रमाणावरदेखील चालवली नव्हती.

एकूणच शेतकरी महिला आघाडीचे काम हा शेतकरी संघटनेच्या इतिहासातील व जोशी यांच्या कार्यातील एक महत्त्वाचा मानबिंदू आहे.

■

# १२

# राजकारणाच्या पटावर

१९७९ मध्ये जेव्हा शेतकरी संघटनेच्या कामाला सुरुवात झाली, तेव्हा राजकारणापासून दूर राहण्याचा शरद जोशींचा निर्धार होता व तो त्यांनी सुरुवातीच्या सभांमध्ये स्पष्ट शब्दांत मांडलाही होता. सरकार कुठल्याही पक्षाचे आले तरी एकूण आर्थिक धोरण कायमच राहते, कारण ते बदलणे व त्यासाठी अपरिहार्यपणे अर्थव्यवस्थेची संपूर्ण रचना बदलणे, हे त्या रचनेत हितसंबंध गुंतलेले असल्याने अभिजनवर्गातील कोणालाच परवडणारे नाही, ह्याची कल्पना असल्यामुळे 'सर्वच पक्ष चोर' ही भूमिका जोशी सतत मांडत असत. त्या काळात ते शेतकऱ्यांना पटतही होते.

शेतकऱ्यांच्या गरिबीचे, आणि म्हणून एकूण देशाच्या गरिबीचे, सर्वांत महत्त्वाचे कारण शेतीमालाला रास्त भाव मिळत नाही हे आहे, ह्याविषयी त्यांची जेवढी खात्री होती, तेवढीच हा रास्त भाव न मिळण्याचे कारण सरकारने स्वीकारलेले विकासाचे विशिष्ट धोरण हे आहे ह्याविषयीदेखील त्यांची खात्री होती. हे धोरण समाजवादाच्या रशियन प्रयोगावर बेतलेले होते व उद्योगक्षेत्राला केंद्रीभूत मानणे व त्यासाठी शेतीमालाच्या किमती मुद्दाम कमी ठेवणे, जेणेकरून शहरी कामगारवर्ग व मध्यमवर्ग संतुष्ट राहील, हा त्या धोरणाचा पायाभूत भाग होता. ह्या रशियन प्रयोगात रशियन शेतीची किती अपरिमित हानी झाली, शेतकऱ्यांवर किती अनन्वित अत्याचार केले गेले, ही सारी माहिती त्यावेळी भारतातील बहुसंख्य विचारवंतांपर्यंत नीटशी पोचली नव्हती.

अर्थात हा अपघात नव्हता; समाजवाद हा साधारण १९४५ ते १९७५ ह्या काळात जवळपास जगभर जणू युगधर्मच बनला होता. पुढे ब्रिटनमध्ये मार्गरेट थॅचर यांनी, अमेरिकेत रोनाल्ड रेगन यांनी व चीनमध्ये डेंग झियाओ पिंग यांनी जे मूलभूत आर्थिक बदल केले, त्यामुळे ही परिस्थिती पालटली, पण भारतात मात्र तसे कुठलेच बदल त्या काळात घडले नाहीत; इथले धोरण आणि धोरणकर्ते हे सोव्हिएत प्रतिमानाच्या प्रभावाखालीच राहिले. त्याच प्रभावाखाली आखल्या गेलेल्या शासकीय धोरणात शेतकऱ्यांवरील अन्याय हा त्यामुळे तसा अनुस्यूतच होता.

त्या वेळची देशातील एकूण राजकीय परिस्थिती तशी निराशाजनकच होती. आणीबाणीनंतर मार्च १९७७मध्ये दिल्लीत सत्तेवर आलेले जनता पार्टीचे सरकार अंतर्गत दुफळीमुळे लौकरच कोसळले. नंतर इंदिरा गांधी यांच्या पाठिंब्यावर आलेले चौधरी चरणसिंग

यांचे सरकारदेखील इंदिराजींनी पाठिंबा काढून घेताच कोसळले व पुन्हा इंदिराजीच पंतप्रधान बनल्या.

महाराष्ट्रातील परिस्थितीही फारशी वेगळी नव्हती. १९७८ साली पाचवी विधानसभा अस्तित्वात आली. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री बनले. पण त्यांचेच एक सहकारी शरद पवार यांनी बंडखोरी केली, पक्ष फोडला. पुरोगामी लोकशाही आघाडी (Progressive Democratic Front अथवा पीडीएफ) ह्या नावाखाली पुढे पवार मुख्यमंत्री बनले. पण त्यांचेही सरकार औटघटकेचे ठरले. नंतर राष्ट्रपती राजवट आली. १९८० सालच्या निवडणुकांनंतर सहावी विधानसभा अस्तित्वात आली. ह्या विधानसभेने अब्दुल रेहमान अंतुले, बाबासाहेब भोसले व वसंतदादा पाटील हे तीन मुख्यमंत्री बघितले. पण ह्या साऱ्या नेत्यांच्या मांदियाळीत जनतेवर प्रभाव पडेल असे नेतृत्व कोणीच दिले नाही. किंबहुना ह्यांतला प्रत्येक मुख्यमंत्री हा केवळ दिल्लीपतींच्या कृपेमुळे मुख्यमंत्री बनला आहे ह्याची पूर्ण कल्पना सामान्य जनतेला होती. ह्या सगळ्यातून एकूण राजकीय प्रक्रियेविषयी लोक निराश झाले होते व त्यामुळेही जोशींची राजकारण दूर ठेवायची भूमिका शेतकऱ्यांना पटणारी होती.

सुरुवातीच्या दिवसांत सर्वच राजकारण्यांनीदेखील एकतर शेतकरी संघटनेकडे दुर्लक्ष केले किंवा तिला विरोध तरी केला. आपले विचार अगदी स्वच्छ आहेत व त्यांच्या जोरावर आपण शेतकऱ्याशी थेट नाते जोडू शकतो याची खात्री असल्याने स्वतः जोशी यांनीही कधी राजकारण्यांची फारशी पत्रास बाळगली नाही. किंबहुना, त्यांना कटाक्षाने दूर ठेवण्याचाच प्रयत्न केला.

इतर कुठल्याही राजकीय पक्षापेक्षा महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाविषयी त्यांना आदर होता. या पक्षाचे कार्यकर्ते तळमळीचे आहेत असेही त्यांचे मत होते. या पक्षावर त्यांनी एक तेहतीस पानांची पुस्तिकाही लिहिली. असे विस्तृत लेखन जोशींनी अन्य कुठल्याच पक्षाबद्दल केलेले नाही. जोशींच्या विश्लेषणानुसार फुलेवादापेक्षा त्या पक्षाने मार्क्सवाद अधिक जवळचा मानला. शेतकऱ्यांपेक्षा कामगारांशी अधिक जवळीक साधायचा प्रयत्न केला व ती त्यांची घोडचूक ठरली, कारण त्यातूनच त्यांना दुभंगलेले व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले; पुढे त्यांचे अनेक मोहरे यशवंतराव चव्हाणांनी काँग्रेसमध्ये खेचल्यामुळे, पण मुख्यतः वैचारिक परभृततेमुळे, तो पक्ष प्रभावहीन झाला.

शेतकरी संघटनेला राजकीय नेत्यांनी केलेल्या विरोधाची कारणमीमांसा करताना जोशी म्हणतात,

''शेतकरी संघटनेचं यश हे अनेक राजकारणी पुढाऱ्यांच्या आयुष्याचं अपयश आहे. शेतकऱ्यांमध्ये जागृती व्हावी असं म्हणत त्यांनी वर्षानुवर्षं घालवली, परंतु त्यांना ते जमलं नाही. पण आमचं शेतकरी आंदोलन केवळ दहा महिन्यांत उभं राहतं, सर्व शेतकरी जात-पात-धर्म-पक्ष कशाचाही विचार न करता एकत्र येतात, मोठा शेतकरी-छोटा शेतकरी, शेतकरी-शेतमजूर असे तथाकथित भेदसुद्धा विसरून एकत्र येतात, ह्यातच त्यांचं अपयश आहे. ते

डाचत असल्यामुळेच संघटनेला विरोध करण्याची प्रवृत्ती आहे.''

'मी कधी तुमच्याकडे मत मागायला येणार नाही; आलो तर मला जोड्याने मारा' असे ते सुरुवातीच्या सभांमधून म्हणाले होते. त्यांच्या लेखनात मात्र हे विधान त्यांनी कधीही केलेले नाही. पण एकूण राजकारणविरहितता हे शेतकरी संघटनेचे एक खूप मोठे आकर्षण होते.

परंतु ह्या भूमिकेत हळूहळू फरक पडत गेला. तो एकाएकी पडला असे नसून आंदोलनाच्या ओघात घडत गेलेली ती एक प्रक्रिया होती. जोशींनी केवळ स्वतःच्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी शेतकरी संघटनेला राजकारणात ओढले असे म्हणणे, हे जोशींवर अन्याय करणारे ठरेल. बदलत्या परिस्थितीत राजकारणापासून दीर्घ काळ अलिप्त राहणे त्यांना शक्य नव्हते व तसेच ते बहुसंख्य शेतकऱ्यांनाही शक्य नव्हते. ''आपला शेतकरी बाकी सगळं करेल, पण दोन गोष्टी तो करू शकणार नाही – पहिली म्हणजे उपोषण करणं आणि दुसरी म्हणजे निवडणुकांपासून दूर राहणं!'' असे जोशी खूपदा म्हणत.

त्याचे एक कारण म्हणजे, ग्रामीण जनमानस मोठ्या प्रमाणात निवडणुकांत गुंतलेले असते. ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, पतसंस्था, बाजारसमित्या, दूधसंघ, साखर कारखाने, इतर अनेक स्थानिक सहकारी संस्था ह्या साऱ्यांशी शेतकऱ्याचे दैनंदिन जीवन जोडलेले असते, तेथील निवडणुकांपासून तो फार काळ अलिप्त राहूच शकत नाही.

राजकारणप्रवेशाचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे शेतकरीहिताचे निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार शेवटी केंद्र शासनाच्या हातीच होता. कारण शेतमालाचा हमी भाव, आयातीला वा निर्यातीला परवानगी देणे, कर्जविषयक धोरण वगैरे सर्व शेवटी केंद्र शासनच ठरवणार होते आणि हे शासन नियंत्रित करण्याची सत्ता ही राजकीय प्रक्रियेतूनच हाती येण्यासारखी होती. उदाहरणार्थ, एखादा कारखाना तुम्ही कितीही उत्तम प्रकारे चालवला, तरी तुम्ही किती साखर तयार करायची व ती कधी आणि कोणत्या दराने विकायची हे शेवटी सरकारच ठरवत असे. अजिबात न परवडणाऱ्या व अत्यल्प भावात ६५ टक्के साखर लेव्ही म्हणून सरकारलाच द्यावी लागे व पुन्हा उरलेली ३५ टक्के साखरदेखील उत्तम भावाने विकणे या कारखान्यांना शक्य नव्हते, कारण तिथेही सरकार सांगेल त्या वेळेला, सांगेल तितकीच साखर, सांगेल त्या दरात बाजारात आणणे या कारखान्यांना बंधनकारक होते. त्यात जराही गफलत झाली, तरी त्या साखर कारखान्याच्या चेअरमनला तुरुंगात टाकायचे अधिकार प्रशासनाला होते. म्हणजे शासन ठरवेल त्या दरात ऊस तयार करायची जबाबदारी शेतकऱ्यावर आणि त्यातून तयार होणाऱ्या साखरेचा दर पुन्हा सरकार ठरवेल तेवढाच! जोशी म्हणतात,

''सहकारी साखर कारखाने जरी शेतकऱ्याचे झाले, तरी त्यात तयार होणारी साखर मात्र सरकारचीच राहिली – शेतकऱ्याची नव्हे. कारण ती किती किमतीला विकायची तेही सरकारच ठरवत होते. म्हणजे गाय शेतकऱ्याची म्हणून शेतकऱ्यानं गायीचं तोंड सांभाळायचं, पण गायीची कास मात्र सरकारच्याच हाती!''

राजकारणात शिरण्याचे काही व्यावहारिक फायदे स्पष्टच होते. उदाहरणार्थ,

कोर्टकचेऱ्यांचा जाच कमी होणे. जोशींवर व इतरही अनेक कार्यकर्त्यांवर एकाच वेळी अनेक खटले चालू असत. एका जिल्हा न्यायालयातून जामीन मिळाला, तरी लगेच पोलीस पुन्हा त्यांना ताब्यात घेत व दुसऱ्या जिल्ह्यातील न्यायालयात हजर केले जाई. तेथून जामीन मिळाला, तरी पुन्हा तिसऱ्या जिल्ह्यातील न्यायालयात हजर केले जाई. खडबडीत रस्त्यांवरून, मोडक्यातोडक्या पोलीस गाड्यांमधून; तेही एखाद्या कैद्याप्रमाणे. जोशींच्या शब्दांत 'टॉर्चर बाय ट्रान्सपोर्ट'. हा प्रकार सहनशीलतेचा अंत पाहणारा होता. कोर्टकेसेसचे हे झेंगट कमी होणे आणि तुरुंगात गेलेल्या सहकाऱ्यांची लवकरात लवकर व कमीत कमी छळ होऊन सुटका होणे यासाठीही राजकीय प्रक्रियेचा आधार उपयुक्त ठरणारा होता. पुढे राम जेठमलानी यांनी याविरुद्ध हायकोर्टात अपील करून बरेच वेगवेगळे खटले एकत्रितरीत्या चालवायची सोय करून घेतली व त्याचा मोठा फायदा झाला; पण तरीही कोर्टाची दगदग चालूच राहिली. सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळे येथील कोर्टात आणि भुसावळ येथील कोर्टात अगदी २०१४ सालातही विकलांग अवस्थेत असलेल्या जोशींना जुन्या प्रलंबित केसेसच्या संदर्भात स्वत: हजर राहावे लागले होते.

सटाणा येथील शेतकरी संघटनेच्या पहिल्या अधिवेशनात संमत झालेल्या सातव्या व शेवटच्या ठरावातील शेवटची दोन वाक्ये अशी होती :

'संघटनेला शेतकऱ्यांमध्ये जो प्रचंड पाठिंबा आहे, तिचा निवडणुकीवर परिणाम होत नाही व याचा गैरफायदा राजकीय पक्ष उठवू पाहत आहेत. शेतकरी आंदोलनाची ताकद वाढवण्यासाठी निवडणुकांविषयीचे धोरण ठरवण्याचा अधिकार संघटनेचे कार्यकर्ते शरद जोशी, माधवराव खंडेराव मोरे व प्रल्हाद कराड पाटील यांना देण्यात येत आहे.

याचाच अर्थ राजकारणाचा पर्याय त्यावेळीही तसा खुला होता. 'शेतकरी आंदोलनाची ताकद वाढवण्यासाठी निवडणुकांचा वापर करणे' आणि 'निवडणुका जिंकण्यासाठी शेतकरी आंदोलनाची ताकद वापरणे' यांच्यातील सीमारेषा तशी पुसटच होती. कामगार संघटनांचे अनेक नेते पुढे राजकारणात उतरले तेव्हाही हाच प्रकार घडला होता – कामगार संघटनांचा वापर राजकारणासाठी झाला होता व त्याच जोडीने राजकीय सत्तेचा वापरही कामगार संघटनांनी करून घेतला होता.

राजकारणात शिरावे की नाही ह्या प्रश्नावर 'शेतकरी संघटक'मधून बरीच चर्चाही झाली होती. काही जणांनी राजकारणप्रवेशाला स्पष्ट विरोध केला होता, तर निपाणीच्या सुभाष जोशींसारख्या काही जणांनी 'राजकारणात शिरावे' असे आवर्जून लिहिले होते. ६ ऑगस्ट १९८३च्या संघटकमध्ये त्यांनी तसा एक मोठा लेखही लिहिला होता. निपाणीच्या तंबाखू आंदोलनानंतर तिथे झालेल्या कर्नाटक विधानसभेच्या पोटनिवडणुकीत सुभाष जोशी स्वतः उभेही राहिले होते व शरद जोशींनी मुद्दाम तिथे जाऊन त्यांच्या काही प्रचारसभांत भाषणेही केली होती. दुर्दैवाने तरीही सुभाष जोशी ती निवडणूक हरले होते; त्यांच्याविरुद्ध उभा असलेला महाराष्ट्र एकीकरण समितीचा उमेदवार निवडून आला होता. निपाणीतील व्यापारी वर्गाचा

त्यालाच पाठिंबा होता व मधु दंडवते, पन्नालाल सुराणा वगैरे समाजवादी नेत्यांनीदेखील एकीकरण समितीच्या त्या उमेदवाराचाच प्रचार केला होता. तंबाखू आंदोलनाला ज्यांनी इतका पाठिंबा दिला होता त्याच निपाणीच्या परिसरातील लोकांनी निवडणुकीत मात्र सुभाष जोशींच्या विरोधात मत दिले होते. निवडणुकीच्या वेळी आर्थिक प्रश्नांपेक्षा अस्मितेचे प्रश्न लोकांना अधिक भिडतात याचे हे एक प्रत्यंतर होते. अर्थात विडी कामगारांचे नेते म्हणून सुभाष जोशींनी निपाणी परिसरात केलेले काम मोठेच होते व त्यानंतरच्या निवडणुकीत ते आमदार म्हणून निवडून आलेदेखील हा भाग वेगळा.

ह्या संदर्भात हेही नमूद करायला हवे, की इतरही अनेक संघटनांनी सुरुवातीच्या काळात राजकारणापासून अलिप्त राहायचे जाहीर केले होते, पण नंतर त्या राजकारणात शिरल्या. उदाहरणार्थ, एकेकाळी शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे अनेक सभांमधून सांगत, की 'राजकारण हे गजकरण आहे व त्यापासून आम्ही दूरच राहू.' पण पुढे त्यांनी राजकारणप्रवेश तर केलाच, शिवाय सत्ताही उपभोगली. लांबच्या आसाम गणतंत्र परिषदेपासून जवळच्या कामगार आघाडीपर्यंत अशी अनेक उदाहरणे देता येतील. भाजप हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून तर समाजवादी पक्षाचे अनेक अवतार हे राष्ट्र सेवा दलातून पुढे आले. खुद्द काँग्रेस पक्ष हीदेखील राजकारणविरहित काम करणारी एक संघटना म्हणूनच ब्रिटिश सनदी अधिकारी अलेक डग्लस ह्यूम यांनी १८८५ साली स्थापन केली होती. पण पुढे काळाच्या ओघात त्यांनाही राजकारणप्रवेश करावाच लागला. त्यामुळे शेतकरी संघटना राजकारणात शिरली म्हणजे काहीतरी फार मोठे अघटित झाले असेही मानायचे कारण नाही. तसा आरोप जोशींवर वरचेवर केला गेला व त्याचा जोशींना रागही येत असे. एकदा ते म्हणाले,

''एखाद्या पंचविशीतल्या मुलीने लग्नाची तयारी दर्शवल्यावर तिचा बाप जर असं म्हणू लागला की, पंधराव्या वर्षी तर तू 'मी कधीच लग्न करणार नाही' असं म्हणत होतीस, मग आता का तुझी भूमिका बदललीस? तर ते म्हणणं मूर्खपणाचं होईल. विशिष्ट वेळी आपली एक भूमिका असते, नंतर ती बदलत्या परिस्थितीनुसार बदलू शकते. यात इतकं गैर ते काय आहे? इतर असंख्य नेत्यांनी हे केलेलं आहे, पण बोट फक्त माझ्यावर ठेवलं जातं!''

''मूल वाढू लागलं की जुनं झबलं टाकून देऊन त्याला नवं झबलं शिवावं लागतं. जशी संघटना वाढत गेली, आत्मविश्वास वाढत गेला, आपण देशपातळीवरदेखील पुढे येऊ शकतो हे जाणवत गेलं, तसं शेतकरी संघटनेचं झबलं मला अपुरं पडू लागलं.'' – असेही एकदा जोशींनी प्रस्तुत लेखकाला सांगितले होते.

शेतकरी संघटनेच्या फेब्रुवारी १९८४मध्ये भरलेल्या परभणी येथील दुसऱ्या अधिवेशनात ते वर्ष 'शेतकऱ्यांचे स्वातंत्र्यवर्ष' म्हणून जाहीर केले गेले. कर्जमुक्ती, बाजारपेठेचे स्वातंत्र्य, शेतीमालाची किंमत ठरवण्याचे स्वातंत्र्य, तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य वगैरेंचे स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत होते. त्यासाठी मोठा धडाकेबाज लढा उभारायची त्यांची इच्छा होती. यानंतर लगेचच ते पंजाबात गेले. मार्च ८४मधल्या चंडीगढ वेढ्यानंतर राष्ट्रीय पातळीवर

जोशींचे नाव झळकू लागले होते. 'भक्ती, युक्ती आणि शक्ती – तीन वर्षांत मुक्ती' ह्या त्यांच्या पिंपळगाव बसवंतला २० सप्टेंबर १९८१ रोजी भरलेल्या विराट मेळाव्यातील घोषणेलाही त्याचवेळी तीन वर्षे पूर्ण होत होती. त्यामुळेही संकल्पपूर्तीचा क्षण आता अगदी जवळ येऊन ठेपला होता अशी त्यांची भावना होती.

या संकल्पित देशव्यापी आंदोलनाची पूर्वतयारी म्हणून १९८४च्या २ ऑक्टोबरला, म्हणजे गांधी जयंतीच्या दिवशी, गुजरातमधील सरदार पटेल यांच्या बारडोली गावापासून दोन मोठ्या प्रचारयात्रा सुरू झाल्या. बारडोली हे सरदार पटेल यांचे गाव. ब्रिटिश काळात त्यांनी तिथे केलेल्या साराबंदी सत्याग्रहामुळेच त्यांना 'सरदार' हा किताब प्राप्त झाला होता. बारडोली ते सुरत या दोन्ही यात्रा एकत्र होत्या. सुरतमध्ये त्या पोहोचल्या तेव्हा त्यांची संयुक्त लांबी तेरा किलोमीटर होती, ह्यावरून त्यांच्या भव्यतेची कल्पना येते.

सुरतपासून त्या दोन यात्रा स्वतंत्र झाल्या; एक यात्रा गुजरातमध्ये गेली, तर दुसरी महाराष्ट्रात. जोशी स्वतः दोन्ही यात्रांबरोबर थोडे थोडे दिवस होते; सुरुवातीला ते गुजरातमधील यात्रेबरोबर निघाले. ती यात्रा साबरमती येथे समाप्त झाली. तिथे एक विशाल सभा झाली व त्यानंतर जोशी महाराष्ट्रातील यात्रेत दाखल झाले.

महाराष्ट्रातली प्रचारयात्रा धुळे, जळगाव, अकोला, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, नांदेड, परभणी, जालना, औरंगाबाद या मार्गे गेली. प्रत्येक ठिकाणी त्यावेळी शेतकरी संघटनेतर्फे चालू असलेल्या कर्जमुक्ती, काही नेत्यांना गावबंदी, सुती कापडाचा वापर, भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई या कार्यक्रमांचा दणकून प्रचार केला गेला. महाराष्ट्रात जागोजागी छोट्यामोठ्या प्रचारयात्रा निघाल्या व पुढे मुख्य यात्रेला मिळाल्या. प्रत्येक जिल्ह्यात यात्रेबरोबर उत्साहाची लाट उसळत होती. तसे ते दिवस ऐन दिवाळीचे; पण शेतकऱ्यांना दिवाळीचे काय! वामनाने त्यांच्या बळीराजाला पाताळात गाडल्यानंतरचा तो जल्लोष!

यात्रेचा समारोप नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील टेहरे या गावी झाला. तेथे एक मोठी सभा आयोजित केली होती. ही सभा म्हणजे पूर्वतयारीचा कळसाध्याय व्हायचा होता. 'तुफान आले आहे' असे शीर्षक जोशींनी तिच्याविषयी लिहिलेल्या आपल्या लेखाला दिले होते व त्यावरून त्यांची त्यावेळची आशादायी मनःस्थिती लक्षात येते. सुमारे चार लाख शेतकरी ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी भरलेल्या त्या सभेला हजर होते. संघटनेच्या आजवरच्या इतिहासातली ही सर्वांत भव्य सभा होती.

पूर्वीप्रमाणे कांदा, ऊस, तंबाखू अशा एकेका पिकासाठी स्वतंत्र लढे न उभारता सगळा शेतकरी समाजच त्यांना आता उभा करायचा होता; सगळी शेतकरीविरोधी व्यवस्थाच बदलून टाकायची होती. महाराष्ट्रात सुरू झाले तरी लवकरच हे आंदोलन देशभर पसरेल असा त्यांचा कयास होता. देशातल्या १४ राज्यांतील जवळजवळ ४० लाख शेतकरी सत्याग्रह करून तुरुंगात जातील इतकी जय्यत तयारी झाली होती. ३१ ऑक्टोबरच्या त्या सभेत तो देशव्यापी

आंदोलनाचा कार्यक्रम जोशी जाहीर करणार होते. म्हणूनच देशभरातील प्रमुख शेतकरी संघटनांचे कार्यकर्ते या सभेला हजर राहतील यासाठी त्यांनी खास प्रयत्नही केले होते. सार्वत्रिक निवडणुका जवळ आल्या होत्या व आता राष्ट्रव्यापी आंदोलन सुरू केले तर निवडणुकीच्या खिंडीत सरकार बरोबर सापडेल असा त्यांचा कयास होता.

दुर्दैवाने दुपारी दोनच्या सुमारास टेहेरे गावी ती बातमी पोचली – पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर त्यांच्याच शीख सुरक्षारक्षकांनी गोळ्या झाडल्याची. त्यांच्या निधनाचे वृत्त मात्र त्यावेळी जाहीर करण्यात आले नव्हते; बातमी फक्त 'गोळ्या झाडल्या' एवढीच होती. ठरल्याप्रमाणे अडीच वाजता सभेला सुरुवात झाली. संघटनेचे अध्यक्ष रामचंद्रबापू पाटील यांनी प्रास्ताविक केले. आपल्या भाषणात त्यांनी ह्या हल्ल्याचा तीव्र निषेध केला व पंतप्रधानांच्या प्रकृतीस लौकर आराम पडो अशी प्रार्थनाही केली. वेगवेगळ्या राज्यांतील प्रतिनिधींची भाषणे झाली. शेवटी जोशी स्वतः आपल्या भाषणासाठी उठणार तेवढ्यात इंदिराजींचे निधन झाल्याचे पोलिसांकडून अधिकृतरीत्या कळले. सगळे अगदी सुन्न झाले. आगामी आंदोलनाची घोषणा करण्यात आता काही अर्थच उरणार नव्हता. सगळ्या उपक्रमातील हवाच एकाएकी काढून घेतल्यासारखे झाले. कसेबसे जोशींनी आपले भाषण आटोपते घेतले व सभा संपली.

शिवाय आता एक तातडीचा गंभीर प्रश्न शेतकरीनेत्यांपुढे उभा राहिला. ह्या सभेला पंजाबमधूनही बारा शीख शेतकरीनेते आले होते. देशभर शिखांविरुद्ध संतापाचे वातावरण तयार झाले असून अनेक ठिकाणी शिखांच्या कत्तलीही सुरू झाल्या आहेत अशाही बातम्या येत होत्या. गेल्या दोन-तीन वर्षांत ह्या शीख नेत्यांनी महाराष्ट्रातील शेतकरीनेत्यांचे अतिशय प्रेमाने आगतस्वागत केले होते. त्यांना आता कसे सांभाळायचे हा प्रश्न होता. 'अटकेपार' या प्रकरणात लिहिल्याप्रमाणे देवकर व बोरावके यांनी त्यांची सगळी देखभाल केली व तो भाग व्यवस्थित पार पडला. पण अपेक्षित ते देशव्यापी आंदोलन जाहीर करायची संधी मात्र हातची निसटली होती.

पुढल्या तीन आठवड्यांत देशभर राजीव गांधी यांच्याविषयी सहानुभूतीची प्रचंड लाट उसळली. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात देशभर शिखांचे जे शिरकाण झाले त्यानेही ह्या राजीवलाटेला अडथळा निर्माण झाला नाही. राजीवविरोधातले काहीही लोकांना सहन होण्यासारखे नव्हते. आंदोलनाच्या विस्तारात एकाएकी अकल्पित अशी बाधा निर्माण झाली होती. नव्याने कुठले व्यापक आंदोलन छेडण्यात सध्याच्या परिस्थितीत काहीच अर्थ नव्हता. साहजिकच जोशी खूप अस्वस्थ होते.

लगेचच सार्वत्रिक निवडणुकाही जाहीर झाल्या. राजीव गांधी प्रचंड बहुमताने निवडून येणार ह्यात कोणालाच शंका नव्हती. परंतु प्रचंड बहुमत मिळवून राजीव सत्तेवर आले, की अगदी शिगेला येऊन ठेपलेले शेतकरी आंदोलन मागे पडणार असे जोशींना वाटत होते.

अशावेळी इतर काही नेत्यांच्यासमवेत राष्ट्रीय पर्याय म्हणून एखादी अ-राजकीय आघाडी

उभारण्याची धडपडही त्यांनी केली. जेपींचे एक निकटचे समाजवादी सहकारी सुरेंद्र मोहन ह्यात त्यांच्याबरोबर होते व दिल्लीत त्यांच्या बैठका होत असत. त्यावेळी दिल्लीत असलेल्या अनंत बागाईतकर यांनी लिहिलेल्या एका आठवणीनुसार (*साप्ताहिक सकाळ*, २६ डिसेंबर २०१५) त्याच दरम्यान एकदा सुरेंद्र मोहन त्यांना मधु लिमये यांच्या घरी घेऊन गेले होते. सोबत बागाईतकरदेखील होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत कोणतीही चळवळ ही कायम स्वरूपात चळवळ म्हणून किंवा आंदोलन म्हणून टिकू शकत नाही; केव्हा ना केव्हा तिला राजकीय रूप द्यावेच लागते, संसदेत यावेच लागते; तुम्हीही केवळ 'चळवळ एके चळवळ' असे करत बसू नका, असा सल्ला लिमयेंनी त्यांना दिला. लिमये हे एक अतिशय व्यासंगी खासदार म्हणून प्रख्यात होते. सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांना त्यांच्या विद्वत्तेबद्दल आदर होता. जोशी यांनाही. केवळ त्यांच्या सल्ल्याचा परिणाम म्हणून जोशींनी आपली भूमिका बदलली व राजकारणात शिरायचा निर्णय घेतला असे म्हणणे धाष्ट्याचे होईल, त्यासाठी मागे लिहिल्याप्रमाणे इतरही कारणे होतीच; स्वतःला जे पटेल तेच करायचे हाही जोशींचा स्वभाव होताच; पण लिमयेंच्या सल्ल्यानंतर ही नवी वाट त्यांना अधिकच स्वीकारार्ह वाटू लागली असेल असे म्हणता येईल.

कोणीतरी राजीव यांच्या विरोधात उभे राहायलाच हवे, नाहीतर त्यांचा एकछत्री अंमल सुरू होईल आणि पुढची पाच वर्षे तो कायम राहील ह्याची जोशींना भीती होती. सरकार जर प्रचंड बहुमताने निवडून आलेले असेल, तर अशा सरकारविरुद्ध शेतकरी आंदोलनच काय, कुठलेच अन्य आंदोलन उभे करणे फारच अवघड होणार होते. देशातील लोकशाही टिकावी म्हणूनही सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष यांच्यात एक राजकीय समतोल राखला जाणे आवश्यक आहे असेही त्यांना वाटत होते. पण राजीवलाटेविरुद्ध उभे राहायची कुठल्याच राजकीय पक्षाची त्यावेळी तयारी नव्हती. अशा परिस्थितीत आपण हे आव्हान स्वीकारले पाहिजे असे त्यांनी ठरवले.

गुरुवार, २२ नोव्हेंबर १९८४ रोजी पुणे येथील पुणे विद्यार्थी गृहाच्या सभागृहात शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची एक विशेष तातडीची बैठक झाली. संघटनेच्या राजकारणप्रवेशावर ह्याच बैठकीत शिक्कामोर्तब झाले व त्यामुळे ही बैठक ऐतिहासिक महत्त्वाची ठरली. बैठकीला कार्यकारिणीचे सोळापैकी चौदा सदस्य व सर्व जिल्हासंपर्क कार्यकर्ते आपापल्या सहकारी तालुका कार्यकर्त्यांसह हजर होते. रामचंद्रबापू पाटील अध्यक्षस्थानी होते. 'येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत आपण निश्चित राजकीय भूमिका घ्यावी व काँग्रेस(आय)ला प्रखर विरोध करावा' अशी भूमिका जोशींनी सुरुवातीला मांडली. त्यानंतर चर्चा सुरू झाली. उपस्थित असलेल्या सुमारे तीनशे कार्यकर्त्यांपैकी बहुतेकांचा अशा उघड राजकीय भूमिकेला विरोध होता. या भूमिकेमुळे आपली राजकारणविरहितता संपुष्टात येईल, शेतकऱ्यांच्या आपल्यावर असलेल्या विश्वासाला तडा जाईल व म्हणून तशी राजकीय भूमिका घेण्याऐवजी आपण एखादे प्रखर शेतकरी आंदोलन उभारावे असे मत अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. आठ

डिसेंबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी रास्ता रोको आंदोलन करावे असा त्यांचा प्रस्ताव होता. त्यावर जोशी म्हणाले,

''जर आंदोलनच करायचे असेल, तर केवळ रास्ता रोको चालणार नाही. शासन निवडणुकीत व्यत्यय येतो म्हणून तुम्हाला झोडपून काढेल आणि विरोधी पक्षही तुमच्या बाजूने उभे राहणार नाहीत. त्यासाठी मग अधिक भावनात्मक कार्यक्रम हवा. तेव्हा मी स्वतः ११ डिसेंबरपासून २१ दिवसांच्या उपोषणाला बसतो.''

पन्नाशीला येऊन ठेपलेल्या आपल्या या नेत्याने आता पुन्हा एकदा उपोषणाला बसावे ह्या कल्पनेला सर्वांचाच विरोध होता. त्यावर जोशी म्हणाले,

''माझा जीव धोक्यात घालायला जर परवानगी नसेल, तर आजच्या बिकट परिस्थितीत कोणतेही अन्य आंदोलन छेडून इतर कार्यकर्त्यांचे हकनाक बळी द्यायला मी परवानगी देणार नाही.''

जोशींच्या ह्या काहीशा निर्वाणीच्या विधानानंतर सर्वच उपस्थित क्षणभर स्तंभित झाले. आपला प्राणप्रिय नेता अशाप्रकारे उपोषण करून स्वतःचा जीव धोक्यात घालणार, ह्या शक्यतेचे सर्वांवर खूपच दडपण आले आणि शेवटी सर्वांनी जोशी यांचा प्रस्ताव थोड्याफार नाराजीनेच मान्य केला. सभेत संमत झालेला ठराव पुढीलप्रमाणे होता :

> शेतकरी संघटना सर्व कार्यकर्त्यांना आदेश देत आहे, की आगामी निवडणुकीत शेतकऱ्यांनी काँग्रेस(आय) पक्षास एकही मत देऊ नये. शेतकऱ्यांच्या १९८४च्या स्वातंत्र्यआंदोलनाचा हा महत्त्वाचा कार्यक्रम आहे. विरोधी पक्षातील दुहीचा फायदा शेतकऱ्यांच्या प्रमुख शत्रुपक्षास मिळू नये यासाठी लोकसभेच्या प्रत्येक मतदारसंघातील एका विरोधी उमेदवाराची निवड संघटना करेल. सर्व शेतकऱ्यांनी व लोकशाही जिवंत राहावी अशी इच्छा असणाऱ्या नागरिकांनी आपापला पक्षाभिमान, जातीचा, नात्यागोत्याचा क्षुद्र विचार बाजूला ठेवून देशाला वाचविण्यासाठी संघटनेने घोषित केलेल्या विरोधी उमेदवारास निवडून आणावे.

ह्या निर्णयामुळे संघटनेत प्रचंड खळबळ माजली व काही सहकाऱ्यांनी त्यानंतर संघटनेपासून फारकतही घेतली. आजही ह्याबाबत अनेक मतभेद आहेतच. '१९८४नंतरचे शरद जोशी आम्हाला मान्य नाहीत' असे त्यांचे एकेकाळचे काही समर्थक आजही म्हणतात.

कुठल्याही परिस्थितीत इंदिरा काँग्रेस सत्तेवर येऊ नये हे जोशींचे ठाम मत होते. कारण स्वातंत्र्योत्तर काळात देशाने जी तथाकथित समाजवादी धोरणे स्वीकारली, त्यातूनच देशाची संभाव्य प्रगती खुंटली असे ते मानत. असे असूनही आपला अभिजनवर्ग आजही नेहरूवादाचे भूत आपल्या मानेवरून उतरवून ठेवायला तयार नाही ह्याचे त्यांना वैषम्य वाटे. जोशी अगदी प्रथमपासूनच खुल्या अर्थव्यवस्थेचे जोरदार समर्थक होते व ही खुली अर्थव्यवस्था देशात येऊ शकत नाही ह्याला त्यांच्या मते दोन कारणे होती. एक, नेहरूघराणेशाही आणि दुसरे, नोकरशाही; त्यातही पहिले कारण अधिक महत्त्वाचे. नेहरूवादावर त्यांनी अतिशय कडवट

शब्दांत अनेकवेळा टीका केली आहे. नेहरूंचे पुतळे उखडून टाकावेत असेही त्यांनी म्हटले होते. प्रत्यक्षात कोणी तसे केले नाही हा भाग वेगळा. राजीव गांधींना ते करत असलेला कडवा विरोध त्यांच्या अनेक सहकाऱ्यांनाही पसंत नव्हता. 'आत्ताच बिचाऱ्याची आई गेली आहे. आपण त्याची अशी टिंगल करणे बरोबर नाही,' असे माई बोरावके, भास्कररावांच्या पत्नी एकदा म्हणाल्याही. पण जोशींनी आपली भूमिका बदलली नाही. इंदिरा काँग्रेसला त्यांनी 'शत्रू क्रमांक एक' मानले याला ही पार्श्वभूमी होती.

राज्यातील सर्व ४८ मतदारसंघांतील सर्वांत प्रभावी इंदिरा काँग्रेसविरोधी उमेदवारांची एक यादी संघटनेने प्रसिद्ध केली व सर्व अनुयायांनी त्यांनाच मते द्यावी असे आवाहन केले.

परंतु मतदारांवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. शरद पवार, दत्ता सामंत व मधु दंडवते हे एरवीही खूप प्रबळ असलेले तीन उमेदवार वगळता संघटनेने पुरस्कृत केलेला एकही उमेदवार निवडून आला नाही. उर्वरित सर्व जागा इंदिरा काँग्रेसने जिंकल्या.

लोकसभेच्या एकूण ५१४ जागांसाठी निवडणुका झाल्या होत्या व त्यातील ७९ टक्के, म्हणजे ४०४, जागा मिळवून राजीव गांधी पंतप्रधान बनले. आंध्रात ३० जागा मिळवणाऱ्या तेलुगु देशमचा अपवाद वगळता सर्व विरोधी पक्षांचा त्यांनी अक्षरशः धुव्वा उडवला. 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' म्हणतात तसे संघटनेला राजकारणात पदार्पण केल्यानंतर अगदी पहिल्याच निवडणुकीत असे दारुण अपयश मिळाले. अपयशांची अशी मालिका पुढे चालूच राहिली.

या निराशाजनक निकालानंतर आपली राजकीय भूमिका काय असावी याचा जोशी विचार करू लागले. आपली संघटना म्हणजे काही देशव्यापी पक्ष नाही, तसेच महाराष्ट्रातही स्वतःच्या बळावर सत्तेवर येण्याइतकी ती प्रबळ नाही याची जोशींना कल्पना होती. पण विचारान्ती त्यांनी काही संख्याशास्त्रीय आडाखे बांधले. आपल्या देशातील निवडणूक प्रक्रियेत जेमतेम ५० टक्के मतदान होते व ती मतेही तीन-चार उमेदवारांत विभागली जातात; त्यामुळे एकूण पडलेल्या मतांपैकी जेमतेम २० टक्के मते मिळवणारादेखील विजयी ठरतो; प्रत्यक्षात एकूण मतदारसंख्येच्या १० टक्के किंवा त्याहूनही कमी मतेच त्याला पडलेली असतात. उमेदवाराचे मताधिक्यही खूपदा जेमतेमच असते. अशा परिस्थितीत एखाद्या मतदारसंघातील पाच-दहा टक्के मते जरी आपण नियंत्रित करू शकलो, तरी राजकीय पक्षांवर आपला प्रभाव राहील, असा संख्याशास्त्राचा अभ्यास केलेल्या जोशींचा कयास होता. आपल्या सभांना होणारी गर्दी पाहता तेवढी मते आपण नक्कीच आपल्या मुठीत ठेवू शकतो; आणि त्यांच्या मते भविष्यात या देशात येऊ घातलेल्या, आघाडीचेच सरकार सत्तेवर येण्याच्या कालखंडात, तेवढ्या मतांच्या जोरावर आपण सरकारच्या निर्णयप्रक्रियेवर प्रभाव पाडू शकू असा विश्वासही त्यांना वाटला. स्वत: राज्य करण्यापेक्षा 'किंगमेकर' बनणे त्यांना अधिक श्रेयस्कर वाटले.

इंदिरा काँग्रेसला शत्रू क्रमांक एक मानले, तरी निवडणुकीच्या वेळी दुसऱ्या कोणाला मत द्यायचे हे ठरवणे आवश्यक होते. त्यासाठी ठरले असे, की जो विरोधी पक्ष सत्तेवर येऊ शकेल

अशा पक्षाला पाठिंबा द्यायचा आणि नंतर त्या पक्षाने शेतकरीहिताची धोरणे आखावीत यासाठी त्या पक्षावर दडपण आणत राहायचे. इंदिरा काँग्रेस आता स्वबळावर व मोठ्या बहुमताने सत्तेवर आल्यामुळे त्या पक्षावर बाहेरून फारसा दबाव आणणे शक्य नव्हते, म्हणून मग भविष्यात दुसऱ्या कुठल्यातरी पक्षाला सत्तेवर आणायचे; जो अल्पमतातील पक्ष असल्याने आपल्या दबावाखाली योग्य धोरणे आखू शकेल. तसे सगळेच पक्ष शेतकरीविरोधात आहेत. पण इंदिरा काँग्रेस हा पक्ष अगदी आपल्या छाताडावरच बसलेला आहे; त्यामुळे दुसऱ्या कुठल्यातरी छोट्या पक्षाला हाताशी धरून इंदिरा काँग्रेसला आधी दूर करायचे; आणि मग त्या दुसऱ्या पक्षावर दबाव आणत राहायचे. म्हणजेच, मोठ्या चोराला दूर करण्यासाठी आधी छोट्या चोराची मदत घ्यायची व मग त्या छोट्या चोरालाही सरळ करायचे; अशी काहीशी जोशींची रणनीती होती. त्यांनी तिला 'दुहेरी कोलांटी उडी' असेही म्हटले होते.

पुढल्या एक-दोन वर्षांत ही रणनीती अधिकाधिक स्पष्ट होत गेली व त्यातून शेतकरी संघटनेची एकूण राजकारणविषयक भूमिकाही पक्की होत गेली. बऱ्याच वर्षांनी जोशींनी ती भूमिका पुढील पाच सूत्रांमध्ये मांडली होती :

१. संघटनेचा हेतू राज्यसत्ता मिळवणे हा नाही; कारण राज्यसत्तेवर गेलेली शेतकऱ्यांची मुलेसुद्धा शेतकऱ्यांची राहत नाहीत.

२. शेतकऱ्यांचे शोषण हे आजच्या व्यवस्थेचे सूत्र आहे. कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी हे सूत्र बदलणार नाही. थोडक्यात, शेतकऱ्यांच्या दृष्टीने सगळेच पक्ष सारखेच चोर आहेत.

३. शेतकऱ्यांना शेतीमालाचा भाव हा संघटित ताकदीच्या आधारानेच मिळू शकेल, निवडणुकांनी नाही. परंतु, निवडणुकांचा उपयोग आंदोलनाची ताकद वाढवण्याकरिता केला पाहिजे. हा उपयोग कसा करता येईल यासंबंधी वेगवेगळे धोरण प्रत्येक निवडणुकीच्या आधी स्वतंत्रपणे ठरवावे लागेल.

४. गुणवत्तेच्या आधाराने कोणत्याही पक्षाविषयी फार काळ मैत्रीची भावना असणे संभवतच नाही. पण अंकगणिती हिशेबाने परिस्थितीनुरूप संघटनेस वेगवेगळ्या पक्षांशी 'छोटा चोर, मोठा चोर' या हिशेबाने संबंध ठेवावे लागतील आणि शेतकरीविरोधी पक्षांमध्ये कोणी एक फार बळजोर होत नाही याची काळजी घ्यावी लागेल.

५. स्वातंत्र्यानंतर जवळजवळ पूर्ण वेळ सत्तेवर असलेला इंदिरा काँग्रेस पक्ष हा शत्रू क्रमांक एक खरा, पण जातीयवादी पक्ष – मग ते भगवे, हिरवे, निळे, पिवळे, कोणत्याही रंगाचे असोत – हे केवळ महाराक्षस आहेत.

(*शेतकरी संघटक*, ६ नोव्हेंबर, १९९४)

राजकीय प्रवास म्हणजे जोशींनी घेतलेला एका नव्या हत्याराचा शोध होता. त्यांच्या एकूण विचारांची दिशा कायम होती, पण त्या दिशेने जाण्यासाठी आता वेगळा कुठला रस्ता घेता येईल, हे ते शोधत होते.

त्यांच्या एकूण प्रकृतीशी हे अगदी सुसंगत असेच होते. ''मी सतत नव्याच्या शोधात असतो, शाडूच्या एकासारख्या एक मूर्ती घडवत बसावे, तसे एकच काहीतरी पुनःपुन्हा करत बसावे, ह्यात माझा जीव रमत नाही. प्रत्येक वेळी आपले विचार तपासून घ्यायचे, अनुभवाशी पडताळून बघायचे, पुनर्विचार करायचा आणि आवश्यक वाटल्यास त्यांचा त्याग करून पुन्हा नवा रस्ता पकडायचा, नव्याने शोध सुरू करायचा, हाच माझा स्वभाव आहे,'' ते एकदा सांगत होते.

भारतात यावे व शेती सुरू करावी हाही त्यांनी स्वीकारलेला अगदी पूर्णतः नवा असा रस्ता होता. त्यानंतर शेती करता करता आंबेठाण-चाकण परिसरात सामाजिक कामात घेतलेला सहभाग हाही असाच एक नवा रस्ता होता. त्यानंतर शेती आंदोलनाला केलेली सुरुवात हाही एक नवा रस्ता होता. आणि त्यानंतर राजकारणात शिरणे हाही तसाच नवा रस्ता होता.

ह्यात पूर्वनियोजित असे काही असावे असे प्रस्तुत लेखकाला वाटत नाही. एक रस्ता चोखाळत असतानाच पुढचा रस्ता त्यांच्या डोळ्यापुढे स्पष्ट होता असेही दिसत नाही. कांदा आंदोलनात, ऊस आंदोलनात किंवा नंतरच्या तंबाखू आंदोलनात त्यांच्या मनात राजकारणात शिरावे असा विचार प्रकर्षाने नव्हता; म्हणजे तो विचार त्यांच्या मनात अजिबात येऊन गेला नसेल असे नाही, पण आपले शेतकरी आंदोलन राजकारणमुक्त ठेवावे ही त्यांची तत्कालीन भावना प्रामाणिक होती.

आपले बहुतेक सारे अनुयायी कुठल्या ना कुठल्या राजकीय पक्षाशी संबंधित आहेत, त्यातले काही आणीबाणीच्या विरोधी आंदोलनात तुरुंगातही होते, त्यात उजवे आहेत तसेच डावेही आहेत, त्यामुळे संघटनेने कुठल्याही एका पक्षाची बाजू घेतली तर अन्य पक्षाचे अनुयायी सोडून जातील, हे त्यांना समजत होते. म्हणूनच 'संघटनेच्या मंदिरात येताना आपापले राजकारणाचे जोडे बाहेर काढून ठेवा' असे जे ते म्हणाले होते ते मनापासूनचेच होते. राजकारणाचा विचार हा नंतरचाच आहे.

'प्रथमपासूनच त्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा होती व तिच्या पूर्तीसाठी त्यांनी संसदेचा वापर केला' ह्या काही जणांनी केलेल्या टीकेशी सहमत होणे कठीण आहे.

लोकसभा निवडणुकांनंतर लगेचच २१ व २२ जानेवारी १९८५ रोजी महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या निवडणुका आल्या. त्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेचे धुळे येथे अधिवेशन भरले. या अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणजे शेतकरी संघटनेच्या व्यासपीठावर प्रथमच सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना आमंत्रित केले गेले. सत्तारूढ इंदिरा काँग्रेससोडून अन्य सर्व पक्षांनी आपापले प्रतिनिधी पाठवले. शेतकरी कामगार पक्षाचे एन. डी. पाटील, जनता पक्षाचे पी. के. पाटील, काँग्रेस(शरद पवार गट)चे पद्मसिंह पाटील, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे

कुमार शिराळकर, शिवसेनेचे मनोहर जोशी, बहुजन समाज पार्टीचे अशोक जगताप, भारतीय जनता पक्षाचे प्रमोद महाजन इत्यादी नेते आवर्जून हजर होते व त्यांची भाषणेही झाली. दिल्लीहून स्वामी अग्निवेश हेही खास आमंत्रित म्हणून हजर होते. शेतीमालाला रास्त दाम मिळावा व कृषिमूल्य आयोग बरखास्त करावा ह्या शेतकऱ्यांच्या दोन प्रमुख मागण्यांसाठी ३ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रभर एकाच वेळी एक तासाचा रास्ता रोको करायचा आणि इंदिरा काँग्रेस विरुद्ध सर्व विरोधी पक्ष एक होत असतील, तर त्यांच्या आघाडीला पाठिंबा द्यायचा असे अधिवेशनात ठरले.

त्यानंतर लगेचच झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत आगामी विधानसभा निवडणुकांत काँग्रेस(आय)च्या विरोधात शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या पुरोगामी लोकशाही दलाला पाठिंबा द्यायचे ठरले. जोशींच्या मते त्यातल्या त्यात बळकट व म्हणून निवडून यायची शक्यता असलेला तोच पक्ष होता.

धुळे अधिवेशनात केलेल्या आपल्या भाषणात पवारांच्या नेतृत्वाखालील पुलोदची भलावण करताना जोशी म्हणाले होते, ''शेतकरी संघटनेने विरोधी पक्षांना एक आघाडी, एक नेता व एक कार्यक्रम अशा धर्तीवर युती करण्याचं आवाहन केलं आणि अभिनंदनीय गोष्ट अशी, की विरोधी पक्षांना जे गेल्या पाच वर्षांत जमलं नव्हतं ते यांनी आठ दिवसांत घडवून आणलं! एक आघाडी – पुरोगामी लोकशाही दल, एक नेता – शरद पवार, एक कार्यक्रम – पंधरा-कलमी कार्यक्रम! त्यातले पहिले कलम आहे, शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव. आणि म्हणून महाराष्ट्रात या आघाडीच्या मागे शेतकरी हातात रूमणं घेऊन उभा राहिला आहे.''

तसा शरद पवार यांच्याबरोबर शेतकरी संघटनेचा सुरुवातीपासून अधूनमधून संबंध येत राहिला होता. आंबेठाणला जोशींनी शेती सुरू केली तेव्हा पवार महाराष्ट्रात वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळात शेतीमंत्री होते. पुढे वसंतदादांविरुद्ध बंड पुकारून १९७८मध्ये ते मुख्यमंत्री बनले. वयाच्या अवघ्या अडतिसाव्या वर्षी. राज्याचे तोवरचे सर्वांत तरुण मुख्यमंत्री. नंतरच्या शेतकरी संघटनेच्या उदयाच्या काळात तेच मुख्यमंत्री होते. पण १९८० साली इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या, देशातील व महाराष्ट्रातील निवडणुकांत त्यांनी विरोधी पक्षांचे पानिपत केले व लगेचच पवार मंत्रिमंडळ बरखास्त करून टाकले. नंतरच्या निवडणुकीतही पवारांच्या गटाला फारसे यश मिळाले नाही. साखर कारखानदारी हे त्यांचे मोठे प्रभावक्षेत्र होते व साहजिकच शेतकरी आंदोलनाकडे त्यांचे बारकाईने लक्ष होते. ते स्वतःला शेतकरीनेता समजत असत. एकाएकी राज्यात उभे राहिलेले शरद जोशींचे आव्हान हा इतर सर्वच राजकीय नेत्यांप्रमाणे त्यांच्याही दृष्टीने चिंतेचा विषय होता. पण सगळ्यांशी संबंध जोडून ठेवण्याच्या स्वभावामुळे त्यांनी कधीच जोशींच्या विरोधात अशी उघड भूमिका घेतली नव्हती.

ते स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्याने शेतकऱ्यांचे प्रश्न ते समजून घेतील व सोडवतील अशी जोशींना आशा होती. साहजिकच राजकारणप्रवेशाचा निर्णय घेतल्यानंतर जोशींनी सर्वप्रथम साथ घेतली ती पवारांची.

शेतकरी संघटनेचे एक पदाधिकारी सोपान कांचन यांचे काका दत्तोबा कांचन हे पवारांचे जवळचे मित्र होते व धुळे अधिवेशनात ठरल्याप्रमाणे ३ फेब्रुवारी १९८५ रोजी संघटनेच्या एक तासाच्या महाराष्ट्रव्यापी रास्ता रोको आंदोलनात उरळी-कांचन येथे कांचन यांच्याबरोबर पवारांनीही भाग घेतला. त्यापूर्वीही संघटनेच्या राहुरी येथील ऊसपरिषदेला अगदी छातीवर संघटनेचा लाल बिल्ला लावून ते हजर राहिले होते.

पुलोदच्या प्रचारार्थ जोशींनी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा केला; पुलोदच्या स्थानिक उमेदवारासमवेत जागोजागी भाषणेही केली. चंद्रपूरहून मोरेश्वर टेमुर्डे व हिंगणघाटहून डॉ. वसंतराव बोंडे हे संघटनेचे दोन उमेदवार या निवडणुकीत प्रथमच निवडून आले. निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला बहुमत मिळाले व त्यांचे सरकार गादीवर आले; पण तरीही पुलोदचे ५४ आमदार ह्या निवडणुकीत निवडून आले; खास करून नाशिक जिल्ह्यात सर्वच्या सर्व १४ आमदार पुलोदचे निवडून आले व त्या यशात शेतकरी संघटनेचा मोठा वाटा निश्चितच होता.

पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या इंदिरा काँग्रेसच्या विरोधात पवारांनी बंड पुकारले होते व स्वतःचा वेगळा पक्ष काढला होता, तेच शरद पवार जेमतेम एका वर्षात, १९८६ साली, सर्व मतभेद बाजूला सारून पुन्हा एकदा इंदिरा काँग्रेसला जाऊन मिळाले व स्वतःच जून १९८८ मध्ये पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनले! ज्या इंदिरा काँग्रेसला संघटनेने 'शत्रू क्रमांक एक' मानले होते, त्याच इंदिरा काँग्रेसला आता संघटनेने पुरस्कृत केलेला नेता जाऊन मिळाला होता! पुलोदच्या प्रचारार्थ राबलेल्या शेतकरी संघटनेच्या सर्वच कार्यकर्त्यांचा हा विश्वासघात होता. इतके होऊनही पुढे एकदा जोशींनी पुन्हा शरद पवारांची 'भारताचे गोर्बाचेव्ह' म्हणून स्तुती केली होती व त्यांच्याबरोबर निवडणुकीत युतीही केली होती. प्रचलित राजकारणातील डावपेच समजण्यात जोशी कसे कमी पडत होते ह्याचे हे एक उदाहरण. लोकसभा निवडणुकीनंतरची ही राजकारणातील त्यांची दुसरी खेळीही चुकीची ठरली होती.

जोशींचे राजकारणातील नंतरचे साथी डॉ. दत्ता सामंत ठरले. पवारांप्रमाणे सामंतांशीही त्यांचा संबंध खूप पूर्वीच आला होता. चाकण येथील रास्ता रोकोच्या वेळी. त्याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे.

सामंतांची कामगार आघाडी ही मूळची मुंबईतील कामगार संघटना. मुंबईत घाटकोपरला राहणाऱ्या डॉक्टर सामंत यांनी जवळच्या चांदिवलीच्या दगडांच्या खाणीतील कामगारांची दुःखे एक डॉक्टर म्हणून काम करत असताना जवळून बघितली होती व त्यांच्यासाठी ते बरीच कामे करत असत; त्यांना यथाशक्ति मदतही करत असत. त्यांच्यातीलच काहींनी सामंतांची ओळख जवळच असलेल्या प्रीमिअर ऑटोमोबाइल, गोदरेज, क्रॉम्प्टन, मुकुंद आयर्न अशा मोठ्या कारखान्यांतील कामगारांशी एकेक करत करून दिली आणि एक दिवस सामंत कामगारनेते बनले. कारखानदार खोटे हिशेब तयार करतात, त्या हिशेबांकडे ढुंकूनही न बघता खूप मोठ्या पगारवाढीची मागणी करायची, संप पुकारायचा, आवश्यक वाटल्यास हिंसेचाही वापर करायचा अशी त्यांची 'दे दणादण' कार्यशैली होती. जोशी जसे बघता बघता

शेतकऱ्यांच्या गळ्यातील ताईत बनले, तसेच काहीसे सामंत मुंबईतील कामगारांच्या गळ्यातील ताईत बनले. त्यांच्यामुळे अनेक कारखान्यांतील कामगारांचे पगार दुप्पट झाले. एखाद्या धूमकेतूप्रमाणे सामंत कामगारक्षेत्रात आले आणि दोन-चार वर्षांतच अन्य सगळ्या प्रस्थापित कामगारनेत्यांना निष्प्रभ करून त्यांनी मुंबईतील कामगारक्षेत्र काबीज केले. मुंबई-ठाण्याबाहेर नाशिक, औरंगाबाद वगैरे ठिकाणीही पुढे त्यांचे हातपाय पसरले. त्यांची असोसिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्स ही एक बलाढ्य कामगारसंघटना बनली. पुढे गिरणी कामगारही त्यांच्याकडे आले. नंतर त्यांनी कामगार आघाडी हा पक्ष स्थापन केला व ते राजकारणातही शिरले. मुंबईत त्यांचा बराच जोर होता. त्यांचे अनेक नगरसेवक व आमदारही निवडून आले होते. ह्या सगळ्या घडामोडी जोशी लांबून पण बारकाईने पाहत होते.

सामंतांशी जुळवून घ्यायचा प्रयत्न जोशींनी सुरू केला. १६ नोव्हेंबर १९८३ रोजी, कार्तिकी एकादशीच्या दिवशी, पंढरपूर येथे 'विठोबाला साकडे' घालायचा एक अभिनव कार्यक्रम करायचे शेतकरी संघटनेने ठरवले. सध्याचा कृषिमूल्य आयोग बरखास्त करावा व त्याऐवजी शेतीतील नेमका उत्पादनखर्च काढणारा वेगळा आयोग नेमावा अशी शेतकऱ्यांची मागणी होती व ती विठोबाने पूर्ण करावी म्हणून त्याला 'साकडे' घालायचा. नवव्या प्रकरणात याचा उल्लेख झालाच आहे. हा कार्यक्रम शेतकरी संघटना आणि कामगार आघाडी यांनी संयुक्तरीत्या करावा, दोघांचेही नेते व्यासपीठावर एकत्र असावेत अशी जोशींची इच्छा होती. सुरुवातीला सामंत तयार झाले पण नंतर त्यांनी 'दोन्ही संघटनांचा एक अधिकृत पक्ष वा आघाडी आधी तयार झाली पाहिजे,' अशी भूमिका घेतली. अशा बांधीव स्वरूपाच्या कुठल्याही आघाडीचे अथवा पक्षाचे जोशींना वावडे होते. त्याऐवजी आपण एकत्र कामाला सुरुवात करू, एकत्र काम करता करता एकमेकांचा अधिक परिचय होईल, मने जुळतात की नाही हे स्पष्ट होईल आणि त्यानंतर मग संयुक्त आघाडीचा वा पक्षाचा विचार करता येईल अशी जोशींची भूमिका होती. बरीच चर्चा होऊनही मार्ग निघेना.

एक दिवस डॉ. सामंत संघटनेच्या पुण्यातल्या कार्यालयात आपल्या सहकाऱ्यांसह आले. 'आपल्या एकत्रीकरणाचा तपशील आधी कागदावर उतरवू या, त्यानंतरच आम्ही पंढरपूर मेळाव्यात सामील व्हायला तयार होऊ,' अशी काहीशी टोकाची भूमिका त्यांनी घेतली. जोशींना ती मंजूर नव्हती, शेतकरी संघटनेचे स्वतंत्र अस्तित्व त्यांना कायम ठेवायचे होते. बोलण्यासारखे आता काही उरलेच नाही; एक दार बंद झाले.

पुढे तो मेळावा उत्तम पार पडला, लाखएक माणसे पंढपुरात जमली, पण त्यांत कामगारबांधव नव्हते. जोशींच्या मते सामंतांनी अंग काढून घ्यायचे खरे कारण होते, त्यांची फारशी माणसे पंढरपूरला यायची नाहीत व त्यामुळे शेतकऱ्यांपुढे कामगारांची बाजू तोकडी पडेल ही भीती.

त्यानंतर पुन्हा एकदा दोघांचा संबंध आला होता राजीवस्त्रविरोधी आंदोलनाचा एक भाग म्हणून. १२ डिसेंबर १९८५ रोजी त्यांच्याबरोबर मुंबईतील शिवाजीपार्क येथे जोशींनी एक संयुक्त मेळावा घेतला त्यावेळी. त्याचे सविस्तर वर्णन मागे आलेच आहे.

जोशी सामंत यांना काही शेतकरी मेळाव्यांना घेऊन गेले होते. सामंत तसे पूर्णतः मुंबईकर होते व इतर शहरी मंडळींचे असतात तसेच त्यांचेही शेतकऱ्यांबद्दल अनेक गैरसमज होते. जोशींबरोबर ग्रामीण भागातून फिरताना त्यांनी खऱ्या अर्थाने शेतकरी जवळून पाहिले. ''खरंच असे असतात शेतकरी? फाटके कपडे घालणारे, बिनचपलांचे? इतके दरिद्री?'' आपले आश्चर्य व्यक्त करताना सामंत म्हणाले होते, ''यांच्यापुढे आमचे कंपनी कामगार म्हणजे भांडवलदारच म्हणायचे!'' आपण आजवर श्रीमंत कामगारांना अधिक श्रीमंत करण्यासाठी झटलो, पण त्यांच्यापेक्षा अधिक शोषित असे शेतकऱ्यांसारखे इतरही समाजघटक आहेत व त्यांच्यासाठीही आपण काहीतरी करायला हवे अशी त्यांची त्यावेळी तरी प्रामाणिक भावना झाली होती.

त्यानंतर चार-पाच वर्षांनी घडलेला एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान असताना शिवाजीपार्कवर त्यांची एक सभा झाली होती. भावी पंतप्रधान चंद्रशेखर हेही त्या मंचावर होते, जॉर्ज फर्नांडिस होते, तसेच जोशी व सामंतदेखील होते. सभेला गर्दी मात्र अगदी कमी होती. शिवाजीपार्कवरची सभा म्हणजे त्यावेळी शिवसेनेची मक्तेदारीच होती. दुसरे नेते इतरत्र कितीही मोठे असले तरी शिवसेनेच्या तत्कालीन प्रभावापुढे इथे निष्प्रभ ठरायचे. बरेच श्रोते भाषणे चालू असतानाच निघूनही गेले; अगदी मूठभरच माणसे शेवटपर्यंत थांबली होती. सामंतांचे हुकमी समजले जाणारे कामगारही गैरहजर होते. त्या सभेबद्दल जोशींनी नंतर लिहिले आहे. 'एका कामगार चळवळीचा अस्त' या आपल्या शेतकरी संघटक'मधील लेखात. ६ फेब्रुवारी १९९७ रोजी लिहिलेला तो लेख पुढे जोशींच्या *अंगारमळा* या पुस्तकात समाविष्ट केलेला आहे. त्यात जोशी लिहितात,

> मंचावर डॉक्टरसाहेब माझ्या बाजूलाच बसले होते. ते सारखे चडफडत होते. 'या XXX कामगारांना मी दोनदोन, तीनतीन हजार रुपये पगारवाढ मिळवून दिली. XXX संपाच्या वेळी माझ्यामागे आणि मिटींगांना शिवसेनेच्या! यांचेच संप आम्ही चालवत राहिलो हीच मोठी चूक झाली. कामगार चळवळीचा फायदा या XXXनी घेतला. स्वतःची घरं भरली. बिचारा खराखुरा कामगार असाच असंघटित राहिला. आमचा सारा हिशेबच चुकला.'

कुठल्याही समकालीन मोठ्या नेत्याविषयी जोशींनी संपूर्ण लेख असा कधी लिहिल्याचे माझ्यातरी वाचनात नाही; प्रस्तुत लेख म्हणजे एक अपवाद म्हणायला हवा. कुठेतरी त्यांच्या मनात सामंत यांना एक विशेष स्थान असावे असे यावरूनतरी वाटते. असो. कामगार-शेतकरी यांची एक आघाडी व्हावी व ती एक मोठी राजकीय शक्ती बनू शकेल ही अपेक्षा म्हणजे मात्र केवळ मृगजळ ठरले.

शिवसेनेशीदेखील जुळवून घ्यायचा शेतकरी संघटनेने प्रयत्न केला होता. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना आंबेठाणला आले होते, शेतकरी आंदोलनाबद्दल त्यांना आदर होता. पण

सेनेत सर्व निर्णय बाळासाहेब ठाकरेच घेत. स्वतः ठाकरेंनीही आंबेठाणला जाऊन शरद जोशींशी चर्चा केली होती. पण दर्यापूर येथील पोटनिवडणुकीत शेतकरी संघटनेने शिवसेनेला पाठिंबा दिला नाही म्हणून आणि मुंबईतले आपले शत्रू दत्ता सामंत यांच्याशी संबंध ठेवायचा नाही ही अट शेतकरी संघटनेने पाळली नाही म्हणून दोघांचे फिसकटले. एकदा 'मातोश्री'वरील बैठकीत 'हे सगळे ढवळे बगळे (बाळासाहेबांच्या शब्दांत कॉंग्रेसवाले) फक्त दोघांनाच भितात – तुम्हाला आणि आम्हाला. तुम्ही गावं सांभाळा, आम्ही शहरं सांभाळतो. आपण मिळून निवडणूक जिंकू,' असे बाळासाहेब जोशींना म्हणाले होते आणि शरद जोशींना त्यांनी मुख्यमंत्री बनवायचीही 'ऑफर' दिली होती, असे त्यावेळी तिथे हजर असणाऱ्या एका व्यक्तीने प्रस्तुत लेखकाला सांगितले. अर्थात अशा विधानांची शहानिशा करणे अशक्यच असते; पण ते म्हणणे अशक्य कोटीतले नक्कीच वाटत नाही. प्रत्यक्षात त्यांची तशी युती कधीच होऊ शकली नाही हे मात्र खरे.

हाच प्रकार भाजपच्या बाबतीतही झाला. खूप नंतर जोशी यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा एक घटक म्हणून भाजपशी जुळवून घेतले, भाजपच्या व शिवसेनेच्या पाठबळावरच ते राज्यसभेचे सदस्यही बनले; पण त्यावेळी त्यांनी थेट वाजपेयी व अडवाणी यांच्याशीच संबंध ठेवला होता. वाजपेयींच्या उदारमतवादी विचारांविषयी, सगळ्यांना बरोबर घेऊन पुढे जायच्या कौशल्याविषयी त्यांना आदर होता. स्थानिक भाजपनेत्यांपैकी प्रमोद महाजन, प्रकाश जावडेकर वगैरे मंडळी जोशींच्या अनेक भाषणांना हजर असायची पण त्यांच्यासमवेत राजकीय पातळीवर युती व्हावी या दिशेने कधी बोलणी झाली नव्हती.

निवडणुकीच्या राजकारणातील संघटनेचे पुढचे पाऊल म्हणजे मार्च १९८७ सालची नांदेड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक. ८४ साली ही जागा तेव्हा केंद्रात मंत्री असलेल्या शंकरराव चव्हाण यांनी जिंकली होती, पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून नेमणूक झाल्याने त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला व ही पोटनिवडणूक घ्यावी लागली. या निवडणुकीत भारतीय रिपब्लिकन पक्षाचे प्रकाश आंबेडकर यांना शेतकरी संघटनेने पाठिंबा दिला. केवळ पाठिंबा दिला असे नव्हे, तर सर्वशक्तीनिशी संघटनेने त्यांचा प्रचारही केला. स्वतः जोशी यांनी नारळ फोडून निवडणूक प्रचाराचा शुभारंभ केला. आपल्या भाषणात ते म्हणाले,

''प्रकाश आंबेडकर ऊर्फ बाळासाहेब भारतीय रिपब्लिकन पक्षाचे नेते म्हणून किंवा केवळ दलितांचे नेते म्हणून ही निवडणूक लढवत नसून आमच्या सर्वांचे नेते म्हणून ते ही निवडणूक लढवत आहेत. ज्या दिवशी निवडणुकीची भूमिका आम्ही ठरवली, त्याच दिवशी आम्ही निवडणूक जिंकलो आहोत. या प्रचाराच्या निमित्ताने राजवाड्यात आणि गावठाणात कोंडले गेलेले हजारो कार्यकर्ते एकत्र आले आहेत. निवडणुकीच्या या निमित्ताने त्या भिंती तोडून ते एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून महिनाभर फिरले, तरी मला पुरे. हजारो वर्षांच्या या भिंती आम्ही दूर करू शकलो, राजवाडा आणि गावठाण एकत्र आले, तर आमचा विजय निश्चित आहे. गरिबांची लढाई प्रभावी करण्यासाठी आज एकाच घोषणेची आवश्यकता आहे

– आज या दिवशी आमच्या जाती जाती जळून गेल्या, राख झाल्या.''

हीच घोषणा शीर्षस्थानी असलेला जोशी यांचा शेतकरी संघटकमधील लेख (६ नोव्हेंबर १९९४ च्या अंकात प्रकाशित) त्यावेळी खूप गाजला होता. पण सर्वस्व पणाला लावून प्रचार केल्यावरही निवडणुकीचा निकाल त्यांच्या विरोधातच लागला. प्रकाश आंबेडकरांना हरवून इंदिरा काँग्रेसचे उमेदवार आणि मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे सुपुत्र अशोक चव्हाण हे दणदणीत विजयी झाले.

पुढे राजकारणात जोशींना त्यांच्यापेक्षा चार वर्षांनी मोठे असलेले विश्वनाथ प्रताप सिंग भेटले. पहिल्या काही भेटींनंतर दोघांनाही एकमेकांविषयी आदर निर्माण झाला. खूप वर्षांनी योग्य तो साथीदार आपल्याला राजकारणात मिळाला व याच्या साह्याने आपल्याला खूप काही करता येईल असा विश्वास जोशींना वाटू लागला. व्ही. पी. सिंग यांनाही महाराष्ट्रात कोणीतरी व्यापक जनाधार असलेला साथी हवा होता व शरद जोशी ती भूमिका पार पडू शकतील असे त्यांना वाटले. पुढे दोघांनी अनेक वेळा एकत्र प्रवास केला, सभांमधून भाषणे केली व दोघांमध्ये व्यक्तिगत पातळीवरही खूप जवळीक निर्माण झाली. जोशींनी सिंग यांना दिलेल्या पाठिंब्यामागे तो एक भाग होताच, पण त्याशिवाय राजीव गांधींना राजकीय पर्याय उभा करण्याची गरज हा दुसरा धोरणात्मक भागही होताच. त्यावेळी तरी तसा पर्याय म्हणून सिंग सोडल्यास दुसरे कोणीच नव्हते.

व्ही. पी. सिंग यांची एकूण पार्श्वभूमी इथे विचारात घ्यायला हवी. मूळचे ते उत्तर प्रदेशातील एका राजघराण्यातले. त्यांच्या वागण्यातही एक राजस वृत्ती जाणवत असे. ते कविमनाचे होते, त्यांना चित्रकलेचीही आवड होती. त्याचबरोबर अत्यंत प्रामाणिक व कर्तव्यकठोर शासक म्हणूनही त्यांची प्रतिमा होती. इंदिरा गांधींचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. आधी ते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होते; पुढे इंदिराजींनी त्यांना दिल्लीत आणून केंद्रीय व्यापारमंत्री बनवले. पुढे राजीव गांधी सत्तेवर आल्यावर यांचे ते एक निकटचे सहकारी बनले. ३१ डिसेंबर १९८४ ते २३ जानेवारी १९८७ अशी सुमारे दोन वर्षे ते राजीव मंत्रिमंडळात अर्थमंत्री होते. त्या काळात त्यांनी अनेक बड्या उद्योगसमूहांवर धाडी घालून भ्रष्टाचाराची काही प्रकरणे उघडकीला आणली होती. भुरेलाल या विश्वासू व प्रामाणिक सचिवांची ह्यात त्यांना मोलाची साथ होती. पण त्यामुळे काही उद्योगपती त्यांच्यावर नाराज झाले होते. त्याचा परिणाम म्हणून असेल कदाचित, पण राजीवजींनी त्यांची संरक्षणमंत्री म्हणून बदली केली. इथे ते २४ जानेवारी १९८७ ते १२ एप्रिल १९८७ असे जेमतेम साडेतीन महिने होते. पण ह्या अल्प काळातही त्यांनी बोफोर्स प्रकरण बाहेर काढले. स्वीडनमधील बोफोर्स या कंपनीकडून भारतीय सेनेसाठी तोफा खरेदी केल्या गेल्या होत्या व त्या प्रकरणी ६४ कोटी रुपये लाच दिली गेली होती. संशयाची सुई थेट राजीव गांधी यांच्याकडे होती. पुढे वर्षानुवर्षे तपास करूनही सत्य काही उघडकीला आले नाही, पण भ्रष्टाचाराचा हा मुद्दा पुढे करत व्ही. पी. सिंग राजीव मंत्रीमंडळातून बाहेर पडले. काँग्रेस पक्षाचाही त्यांनी राजीनामा दिला.

सुरुवातीला अरुण नेहरू व आरिफ मोहमद खान या आपल्या सहकाऱ्यांसह त्यांनी जन मोर्चा हा पक्ष स्थापन केला; पण पुढच्याच वर्षी ११ ऑक्टोबर १९८८ ह्या जयप्रकाश नारायण यांच्या जन्मदिनी त्यांनी स्वतःचा जन मोर्चा, जनता पार्टी, लोक दल, आणि काँग्रेस (एस) ह्या चार पक्षांचे विलीनीकरण करून जनता दल ह्या नव्या पक्षाची स्थापना केली. तिचेच रूपांतर पुढे राष्ट्रीय आघाडी(National Front)मध्ये झाले.

उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर येथील एका जाहीर सभेत व्ही. पी. सिंग यांनी आपले बंडाचे शिंग फुंकले, तेव्हा त्यांच्या त्या सभेला शरद जोशी खास आमंत्रणावरुन हजर होते. दिल्लीपासून निघालेल्या मोटारींच्या ताफ्यात जोशींना घेऊन जाणारी मोटारही होती. 'व्ही पी सिंग की आयी आंधी, गद्दी छोडो राजीव गांधी', 'राजा नही, फकीर है, देश की तकदीर है' अशा घोषणांनी सगळा परिसर दुमदुमून गेला होता. जोशींना व्यासपीठावर मानाचे स्थान दिले गेले होते व त्यांचे भाषणही झाले. हिंदीतही ते खूप प्रभावी बोलले. 'व्ही. पी. सिंग यांनी दुसरे महात्मा गांधी व्हावे आणि भारतातील कच्चा माल स्वस्तात स्वस्त भावात इंडियात नेणारी सध्याची अन्याय्य व्यवस्था बदलावी' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सिंग यांचे हात बळकट करण्याचा आटोकाट प्रयत्न शेतकरी संघटनेने केला. जोशी यांनी एके ठिकाणी लिहिले होते,

> व्ही. पी. सिंग केवळ भ्रष्टाचार दूर करण्यासाठी बाहेर पडलेले नाहीत, तर त्यापेक्षाही व्यापक भूमिका घेऊन ते आपल्यासोबत निघाले आहेत. दिल्लीने आजपर्यंत अनेक राजे पाहिले आहेत. व्ही. पी. सिंगही राजे आहेत. परंतु शेतकऱ्यांना शेकडो वर्षांपूर्वी हरवलेला त्यांचा बळीराजा हवा आहे. व्ही. पी. सिंग यांच्या रूपाने शेतकऱ्यांना हा बळीराजा मिळेल अशी आशा मी बाळगून आहे.
>
> (*आठवड्याचा ग्यानबा,* २ ते ९ नोव्हेंबर १९८७)

हीच भावना नंतर जोशींनी आपल्या अनेक सभांमधून व्यक्त केली. सिंग यांच्याकडे जोशी केवढ्या अपेक्षेने बघत होते हे ह्यावरून लक्षात येते.

५ सप्टेंबर १९८७ रोजी सटाणा येथे शेतकरी संघटनेने सिंग यांच्याबरोबरची आपली पहिली जाहीर सभा आयोजित केली. पाठोपाठ धुळे, सांगली, कोल्हापूर, लातूर, नागपूर वगैरे अनेक शहरांत लाखालाखांच्या सभा आयोजित केल्या. आपल्या गुजरातमधील मित्रांच्या मदतीने अहमदाबादमधेही जोशींनी सिंग यांच्यासाठी अशीच एक जंगी सभा आयोजित केली होती. सिंग हे सत्तेत उच्च पदी राहिले असले तरी ते लोकनेता असे कधी नव्हते व त्यामुळे या सभांना होणारी प्रचंड गर्दी आणि जोशींची शेतकऱ्यांवरील जबरदस्त पकड बघून सिंग स्तंभितच झाले होते. आगामी निवडणुकीत महाराष्ट्रातील जनता दलाचे उमेदवार ठरवायचे सगळे अधिकार सिंग यांनी जोशींना दिले. जोशी यांची सिंग यांच्याशी असलेली ही जवळीक जनता दलाच्या इतर नेत्यांना, विशेषतः स्थानिक नेत्यांना, खूप सलत असे व त्यांनी पुढे जोशींना बराच त्रासही दिला.

शेतकऱ्यांना उत्पादनखर्चापेक्षा खूप कमी भाव देऊन सरकारने आजवर त्यांची हजारो कोटी रुपयांची लूट केली आहे व त्या तुलनेत बोफोर्सप्रकरणी झालेला ६४ कोटींचा भ्रष्टाचार हा क्षुल्लक आहे; सर्वसामान्य सरकारी अंमलदारसुद्धा रोज हजारो रुपयांची लाच खुलेआम घरी आणत असेल, तर ते माहीत असलेल्या जनतेला भ्रष्टाचाराचा मुद्दा महत्त्वाचा वाटणार नाही; कर्जमाफी हा शब्दच चुकीचा आहे, कर्जमुक्ती हा योग्य शब्द होईल वगैरे जोशींची मते सिंग यांना ठाऊक होती.

पण तरीही आपला प्रामाणिकपणा ही सर्वांत मोठी जमेची बाजू असलेल्या सिंग यांनी आपली भ्रष्टाचारावरची टीका कमी केली नाही व भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरच निवडणूक लढवून लौकरच ही राष्ट्रीय आघाडी सत्तेवर आली. २ डिसेंबर ८९ रोजी व्ही. पी. सिंग यांनी देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

३१ डिसेंबर १९८९ रोजी दिल्लीत किसान समन्वय समितीची बैठक भरली होती. त्या बैठकीला नवनिर्वाचित पंतप्रधान सिंग आणि उपपंतप्रधान व कृषिमंत्री देवी लाल हे दोघेही जातीने उपस्थित राहिले. शेतकऱ्यांना नियोजनात प्राधान्य द्यायच्या आपल्या वचनाचा त्यांनी पुनरुच्चार केला. किसान समन्वय समितीच्या बैठकीला पंतप्रधान व उपपंतप्रधान हजर राहणे ही अभिमान वाटावा अशीच बाब होती. पूर्वी कधीच असे घडले नव्हते; किसान समन्वय समितीची कुठलीच दखल अगदी एखाद्या राज्यमंत्र्यानेही घेतली नव्हती. जोशींच्या सिंग यांच्यापासूनच्या अपेक्षा यामुळे अधिकच उंचावल्या.

दुसऱ्याच दिवशी, म्हणजे १ जानेवारी १९९० रोजी, जोशी महाराष्ट्रात परतले व संघटनेच्या पूर्वनियोजित विचारयात्रा कार्यक्रमात त्यांनी स्वतःला झोकून दिले. खरे तर त्यावेळी ते नुकतेच हृदयविकाराच्या दुखण्यातून सावरत होते, डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला होता, पण स्वतःच्या तब्येतीची जराही तमा न बाळगता अठरा-अठरा तास ते काम करत राहिले. आता आपल्या वयाची पंचावन वर्षे उलटली, आयुष्यात जे काही साधायचे त्यासाठी थोडाच अवधी शिल्लक उरला आहे, ही भावनाही कदाचित त्या असीम उत्साहामागे असावी. शेतकरी आंदोलनाचे एक पर्व संपले, आता हे दुसरे पर्व सुरू होत आहे असेही त्यांना वाटत असावे.

२ जानेवारी ते २६ जानेवारी १९९० या काळात शेतकरी संघटनेतर्फे महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यांमधून फुले-आंबेडकर विचारयात्रा आयोजित करण्यात आली. हे वर्ष म्हणजे महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीच्या शताब्दीची सांगता, तर डॉ आंबेडकर यांच्या जन्मतिथी शताब्दीचा प्रारंभ, हा उल्लेख मागे झालाच आहे. यात्रेची सुरुवात फुले यांचे जन्मगाव कटगुण येथून झाली. या २६ दिवसांत जोशी यांनी शंभराहून अधिक जाहीर सभांमधून भाषणे केली आणि त्याहून अधिक छोट्या छोट्या गटांतून आपले विचार मांडले. एक कार्यक्रम संपला की लगेच दुसरा असा प्रकार महिनाभर चालू होता. या विचारयात्रेचा समारोप २८ जानेवारी रोजी डॉ आंबेडकर यांच्या नागपूर येथील दीक्षाभूमीवर झाला. त्या सांगतासभेला तीन लाख शेतकरी

उपस्थित होते. स्वतः पंतप्रधान सिंग त्यासाठी खास दिल्लीहून आले. आपले सरकार शेतकरीहितालाच प्राधान्य देणार असल्याचे सिंग यांनी पुन्हा एकदा जाहीर सभेत घोषित केले. शेतीमालाला वाजवी भाव आणि शेतकऱ्यांची कर्जमुक्ती हे शेतकरी संघटनेचे दोन्ही मुद्दे सिंग यांना व्यक्तिशःदेखील पूर्ण पटले होते व त्यासाठी स्वतःही आंदोलनात उतरायची त्यांनी तयारी दाखवली. पुढे १५ ऑगस्ट १९९० रोजी लाल किल्ल्यावरून पंतप्रधान म्हणून केलेल्या आपल्या पहिल्याच भाषणात 'आगामी दशक हे आम्ही किसान दशक म्हणून राबवणार आहोत' असे त्यांनी जाहीरही केले.

साधारण याच सुमारास १९९०मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका झाल्या. महाराष्ट्रातील या निवडणुकीत जनता दलाच्या चिन्हावर शेतकरी संघटनेचे ३७ उमेदवार उभे होते आणि त्यांव्यतिरिक्त जनता दलाचे अधिकृत उमेदवार म्हणूनही संघटनेचे इतर १३ कार्यकर्ते उभे होते. त्यावेळी शेतकरी संघटनेचे पुढील पाच उमेदवार विजयी झाले : ॲडव्होकेट मोरेश्वर टेमुर्डे (मतदारसंघ भद्रावती, जिल्हा चंद्रपूर) ॲडव्होकेट वामनराव चटप (मतदारसंघ राजुरा, जिल्हा चंद्रपूर), डॉ. वसंतराव बोंडे (मतदारसंघ हिंगणघाट, जिल्हा वर्धा), सौ. सरोजताई काशीकर (मतदारसंघ पुलगाव, जिल्हा वर्धा) आणि श्री. शिवराज तोंडचिरकर (मतदारसंघ हेर, जिल्हा लातूर). आपल्या राजकारणातील संपूर्ण प्रवासात शेतकरी संघटनेला निवडणुकीत मिळालेले हे सर्वांत मोठे यश.

पुढे विश्वनाथ प्रताप सिंग यांच्याशी जोशी यांची जवळीक होती त्या काळात, म्हणजे १९९० साली 'राज्यसभेच्या सदस्यत्वासाठी तुमची दोन नावे द्या,' असे सिंग यांनी त्यांना सांगितले होते. त्यावेळी जोशींनी भूपिंदर सिंग मान व प्रकाश आंबेडकर ही दोन नावे पुढे केली होती; राजकीय महत्त्वाकांक्षा असलेले जोशींचे काही निकटचे सहकारी त्यामुळे खूप दुखावले गेले; पण जोशींनी खासदारकीसाठी स्वतःचे नाव मात्र पुढे केले नव्हते हे लक्षात घ्यायला हवे.

सुरुवातीला सिंग यांनी शेतकऱ्यांना संपूर्णतः कर्जमुक्त करायची तयारीही जाहीररीत्या दर्शवली होती. पण अशा कर्जमुक्तीला त्यांचे अर्थमंत्री मधु दंडवते यांचा जोरदार विरोध होता. दंडवते व जोशी यांचे पूर्वीही कधी सख्य नव्हतेच. निपाणीत सुभाष जोशी यांच्या प्रचाराच्या वेळी हे दोघेही एकमेकांच्या विरोधातच होते. कर्जमाफीला दंडवते यांनी विरोध केल्याचा निषेध म्हणून दंडवते यांचे पुतळे जाळण्याचा कार्यक्रमही संघटनेला हाती घ्यावा लागला. पण आपले अर्थमंत्री स्वतः ह्या कर्जमाफीच्या इतके विरोधात आहेत हे लक्षात आल्यावर पुढे सिंग यांचाही उत्साह कमी झाला असावा.

कर्जमुक्तीची शेतकरी संघटनेची संकल्पना बाजूला सारून सिंग यांनी देवी लालपुरस्कृत शेतकऱ्यांसाठीची एक योजना स्वीकारली. शेतकऱ्यांना पंचतारांकित हॉटेलांत फक्त १०० रुपयांत पोटभर जेवण दिले जाईल अशा अनेक उथळ तरतुदी त्यात होत्या. पण देवी लालना खूष ठेवणे ही सिंग यांची सत्ता टिकवण्यासाठीची गरज होती. दुर्दैवाने सिंग यांना स्वतःला फारसा व्यापक असा जनाधार नव्हता; उपपंतप्रधान चौधरी देवी लाल यांचे पाठबळ त्यामुळे त्यांना अत्यावश्यक होते.

याच सुमारास राजकीय मंचावर अनेक बदल झपाट्याने होत होते. चौधरी देवी लाल महत्त्वाकांक्षी होते व त्यांची नाराजी वाढत गेली. लौकरच ते मंत्रिमंडळातून बाहेर पडले, जनता दलातूनही बाहेर पडले. ९ ऑगस्ट १९९० रोजी आपण दिल्लीत एक भव्य किसान मेळावा घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. हा अर्थातच आपले सामर्थ्य सिद्ध करायचा प्रयत्न होता.

त्याचवेळी इकडे भाजपाने अयोध्या येथे राममंदिर बांधायचा कार्यक्रम जाहीर केला. सिंग यांच्या नवोदित सरकारपुढे हे मोठेच आव्हान होते. त्यामुळे सिंग एकदम गडबडून गेले. स्वतःचे आसन बळकट करण्यासाठी त्यांनी त्यांचे एक सहकारी मंत्री राम विलास पासवान यांच्या सांगण्यावरून सरकारदप्तरी दहा वर्षे धूळ खात पडलेला मंडल आयोग अहवाल स्वीकारल्याचे जाहीर केले व आपण सामाजिक न्यायाच्या बाजूचे आहोत अशी प्रतिमा निर्माण करायचा प्रयत्न केला.

हा मंडल आयोग अहवाल म्हणजे खूप वादग्रस्त विषय होता. १९७९ साली जनता सरकारची सत्ता असताना तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी नोकऱ्यांतील आरक्षणाचा विचार करण्यासाठी खासदार बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला होता. ह्या आयोगाने दोन वर्षांतच आपला अहवाल सरकारला सादर केला होता. त्यात आयोगाने मागासवर्गीयांसाठी नोकऱ्यांमध्ये राखून ठेवलेल्या जागांची टक्केवारी २२.५ वरून एकदम ४९.५ वर नेली होती व या जागा कोणाला देता येतील यांच्या यादीत पूर्वी नसलेल्या इतरही अनेक जातींचा समावेश केला होता. दरम्यान केंद्रात अनेकदा सत्तापालट झाला व हा अहवाल तसाच मागे पडून राहिला. सिंग यांनी तो आपण स्वीकारत असल्याचे ७ ऑगस्ट १९९० मध्ये, म्हणजे देवीलाल यांच्या किसान मेळाव्याच्या दोन दिवस आधी, अचानक जाहीर केले.

त्यामुळे देशभर प्रचंड गोंधळ उडाला. अनेक तरुणांनी स्वतःला जाळूनही घेतले. देशभर त्याची तीव्र प्रतिक्रिया उलटली. हे असे काही होईल याची कल्पना असल्यानेच बहुधा मागील दहा वर्षांत सत्तेवर आलेल्या वेगवेगळ्या सरकारांनी ह्या अहवालाला हात लावला नव्हता. भाजपला शह म्हणून सिंग यांनी हा धोका पत्करला. अशा प्रकारचे कुठलेही आरक्षण जोशींना तत्त्वशः अमान्य होते; दोघांमधला दुरावा त्यामुळे आणखी वाढला.

अशा साऱ्या घडामोडींमुळे दिल्लीतील व्ही. पी. सिंग यांचे सरकार तसे अल्पजीवी ठरले. १० नोव्हेंबर ९० रोजी, म्हणजे जेमतेम वर्षभराने, त्यांना राजीनामा द्यावा लागला.

त्यानंतरचे चंद्रशेखर यांचे अल्पमतातील सरकारही अल्पजीवीच ठरले व १९९१मध्ये लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका झाल्या. पुन्हा काँग्रेसचे सरकार गादीवर आले, नरसिंहराव पंतप्रधान बनले.

यानंतर आल्या १९९१ सालच्या मध्यावधी लोकसभा निवडणुका. चंद्रशेखर यांचे सरकार कोसळल्यानंतरच्या. या निवडणुकांत शेतकरी संघटनेने कुठल्याही पक्षाचा प्रचार केला नाही, पण जनता दलाला पाठिंबा मात्र दिला. पण इथेही जोशींची भूमिका सर्वसामान्य

कार्यकर्त्याला गोंधळात पाडणारी होती. काँग्रेसच्या विरोधात जनता दलाचा वा अन्य कुठल्या डाव्या पक्षाचा उमेदवार नसेल, व त्याऐवजी एखाद्या 'जातीयवादी' पक्षाचा उमेदवार असेल, तर तो उमेदवार निवडून येऊ नये म्हणून त्या मतदारसंघात मात्र काँग्रेसला पाठिंबा द्यायचे त्यांनी जाहीर केले. आजवर ते इंदिरा काँग्रेसला आपला शत्रू क्रमांक १ मानत आले, पण या वेळी मात्र भाजप हा पक्ष त्यांनी जातीयवादी म्हणून आपला सर्वांत मोठा शत्रू ठरवला. त्यामुळे ज्या नाशिकमध्ये शेतकरी संघटनेने दिलेल्या जोरदार पाठिंब्यामुळे पुलोदने सर्व काँग्रेस उमेदवारांचा पराभव केला होता, त्याच नाशिकमध्ये या निवडणुकीत मात्र शरद जोशींनी काँग्रेस उमेदवाराला आपला पाठिंबा जाहीर केला. यामुळे जनतेच्या मनातील जोशींची प्रतिमा डागाळली; त्यांच्या नेमक्या भूमिकेविषयी संभ्रम निर्माण झाला व एकूणच संघटनेची मतदारांमधील विश्वासार्हता ढासळली. यानंतरच्या कुठल्याच निवडणुकीत जनतेने शेतकरी संघटनेचा एक राजकीय पर्याय म्हणून विचारच केला नाही.

जनता दलाच्या महाराष्ट्रातील बहुसंख्य नेत्यांच्या मनातील शेतकरी संघटनेविषयी राग होता. केवळ सिंग यांच्याकडे पाहून शेतकरी संघटनेने जनता दलाशी असलेले संबंध, लहान-मोठ्या नेत्यांकडून होत असलेले अनेक अपमान पचवूनही, कायम राखले होते. पण मधल्या काळात आपले रस्ते आता वेगळे झाले आहेत हे सिंग आणि जोशी दोघांनाही कळून चुकले होते. अशा परिस्थितीत जनता दल आणि संघटना यांच्यातील फारकतीला सुरुवात झाली. ३० डिसेंबर १९९३ रोजी ही फारकत पूर्ण झाली. त्या दिवशी महाराष्ट्र विधानसभेचे सभापती मधुकरराव चौधरी यांनी एक पत्र सभागृहात वाचून दाखवले. जनता दलाच्या चिन्हावर निवडून आलेल्या शेतकरी संघटनेच्या पाच आमदारांनी सभागृहात एक स्वतंत्र गट म्हणून बसण्याचा आपला निर्णय त्या पत्राद्वारे कळवला होता. जनता दलाचे एकूण १४ आमदार होते व त्यांतील पाच म्हणजे एक तृतीयांशहून अधिक होते. साहजिकच पक्षांतरबंदी कायद्यानुसार सभापतींनी त्यांना तसे करण्यास आडकाठी आणली नाही. शेतकरी आंदोलनाच्या इतिहासातील राजकीय आघाडीच्या एका कालखंडावर अशा प्रकारे पडदा पडला.

यानंतर सुमारे दीड वर्षांनी, फेब्रुवारी १९९५ मध्ये स्वतंत्र भारत पक्ष व समविचारी पक्षांच्या २०२ उमेदवारांसमवेत स्वतः शरद जोशी यांनी स्वतंत्र भारत पक्षाचे उमेदवार म्हणून हिंगणघाट (वर्धा) व बिलोली (नांदेड) या दोन मतदारसंघांतून विधानसभेची निवडणूक लढवली. दुर्दैवाने या दोन्ही निवडणुकांत ते पराभूत झाले. हिंगणघाट मतदारसंघात त्यांना ३९,९७१ मते पडली, तर विजयी उमेदवार शिवसेनेचे अशोक शामरावजी शिंदे यांना ४३,९६४ मते पडली. बिलोली मतदारसंघात जोशींना ५३,०६६ मते पडली, तर विजयी उमेदवार काँग्रेसचे भास्करराव बापूराव पाटील यांना ६१,४१२ मते पडली.

त्यानंतर वर्षभरातच १९९६ साली जोशींनी नांदेड मतदारसंघातून लोकसभेची निवडणूकही लढवली. त्यावेळीही ते पराभूत झाले. काँग्रेसचे गंगाधरराव मोहनराव कुंटूरकर

१,८५,३०२ मते मिळवून विजयी झाले. दुसऱ्या क्रमांकाची म्हणजे १,१५,८८७ मते भाजपच्या धनाजी वेंकटराव देशमुख यांना पडली. शरद जोशी तिसऱ्या क्रमांकावर होते; त्यांना फक्त ७१,४६० मते पडली.

स्वतः शरद जोशी निवडणुकीत कधीच निवडून येऊ शकले नाहीत; पण त्यांचे मोरेश्वर टेमुर्डे, वामनराव चटप, वसंतराव बोंडे, शिवराज तोंडचिरकर व सरोजताई काशीकर हे मागे लिहिल्याप्रमाणे संघटनेच्या तिकिटावर निवडून आले. त्यातले मोरेश्वर टेमुर्डे विधानसभेचे उपसभापतीही झाले. त्याशिवाय त्यांचे एकेकाळचे काही निकटचे सहकारी पुढे वेगवेगळ्या पक्षांत गेले व आमदार म्हणून निवडूनही आले. उदाहरणार्थ, पाशा पटेल (भाजप), अनिल गोटे (भाजप), शंकर धोंडगे (राष्ट्रवादी काँग्रेस) किंवा राजू शेट्टी व सदाशिव खोत (स्वाभिमानी शेतकरी संघटना). ते वेगळ्या पक्षात गेले म्हणून जोशींनी त्यांच्यावर राग धरला नाही; त्यांना थांबवायचा प्रयत्नही केला नाही. आपापल्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी, स्वतःचा विकास करून घेण्यासाठी त्यांनी केले ते योग्यच आहे असे ते म्हणत. त्यांतील एक पाशा पटेल यांनी आपल्या 'सकाळ'मधील एका लेखात म्हटले आहे, ''मला भाजपमध्ये पाठवावं अशी मागणी गोपीनाथ मुंडे व प्रमोद महाजन यांनी शरद जोशी यांच्याकडे केली. त्यांनी ती मान्य करून मला भाजपमध्ये पाठवलं.'' आपापल्या परीने या सर्वांनीच चांगले कामही केले; राजू शेट्टी हे तर स्वतःच स्थापन केलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटना या पक्षाच्या तिकिटावर पुढे खासदार म्हणूनही निवडून आले.

राजकारण्यांना जोशींविषयी कायम दुरावाच कसा वाटत आला याचे एक उदाहरण म्हणजे चाकण शिक्षण मंडळाचा अनुभव. १९८७ साली जोशींनी ती संस्था सुरू केली व तिच्यातर्फे एक कॉलेज काढले. खरेतर अशा स्वरूपाचे विधायक समजले जाणारे उपक्रम करण्यात त्यांना फारसे स्वारस्य नव्हते, पण जिथे आपल्या कामाची सुरुवात झाली त्या भागातील जुन्या सहकाऱ्यांचा आग्रह त्यांना मोडवेना. त्या परिसरात तशी उच्च शिक्षणाची आबाळच होत होती; नाही म्हटले तरी कॉलेजमुळे या स्थानिक माणसांची एक मोठी गरज भागली जाणार होती. नाव जोशींचे असले तरी संस्थेची बहुतेक व्यावहारिक जबाबदारी होती डॉ. अविनाश अरगडे आणि एक स्थानिक व्यापारी मोतीलाल सांकला यांच्याकडे. जोशींचा पुढाकार म्हटल्यानंतर पहिली दोन वर्षे व पुढे १९९२ ते १९९८ ही सहा वर्षे अशी एकूण आठ वर्षे म्हात्रे यांनी कॉलेजच्या प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळली. एक दानशूर बांधकाम व्यावसायिक शांतिलाल मुथा यांनी कॉलेजसाठी इमारतही विनामूल्य बांधून दिली. संस्था भ्रष्टाचारापासून पूर्णतः मुक्त होती, संघटनेच्या वेगवेगळ्या क्षेत्रांतील संपर्कांमुळे ती चांगली वाढलीही असती. पण तरीही जोशींचे नाव जोडलेले असल्यामुळेच स्थानिक राजकारण्यांनी संस्थेला खूप विरोध केला. कॉलेजचे उद्घाटन करण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी कबूल केले होते व ते कार्यक्रमाला आलेही; पण स्थानिक विरोधकांच्या कारवायांमुळे महाविद्यालयाला

अजून मान्यताच मिळालेली नाही, असे लक्षात येताच ‘उद्घाटनासाठी नव्हे, तर आपली ही सदिच्छाभेट आहे’ असे ते म्हणाले. कॉलेजयुवकांच्या एनएसएस कँपसाठी जागा द्यायलाही स्थानिक माणसे तयार नव्हती. शेवटी प्रथमपासून शेतकरी आंदोलनात सहभागी राहिलेल्या निघोजे गावच्या रहिवाशांनी आपल्या गावाच्या शिवारात या कँपसाठी जागा दिली. अशा अनेक अडचणी संस्थेपुढे येत गेल्या. सध्या मात्र कॉलेजला शासकीय अनुदान वगैरे रीतसर मिळते व ती संस्था व्यवस्थित चालू आहे.

शेतकरी संघटनेने कधी शरद पवारांशी जवळीक साधली, कधी विश्वनाथ प्रताप सिंग यांच्याशी, तर कधी भारतीय जनता पक्षाशी; पण कुठल्याच सोयरिकीतून हाती फारसे काही पडले नाही. ना राजकारण्यांनी त्यांना आपले मानले, ना मतदारांना जोशींची राजकीय भूमिका पटली. एकूणच, राजकारण जोशींना भावले नाही हे खरे.

दरम्यान शरद जोशींनी अडगळीत पडलेल्या एके काळच्या स्वतंत्र पक्षाचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला व त्याविषयी पुढे येणारच आहे. पण मतदारांनी तो कधीच गंभीरपणे घेतला नाही. एकूण राजकारणाचा रस्ता आता खुंटल्यात जमा होता. जोशीपुढचे पर्याय अशा प्रकारे एकेक करत कमी होत गेले.

शेतकरी संघटनेच्या एका महत्त्वाच्या राजकीय प्रभावाची इथे नोंद घ्यायला हवी, कारण राजकीय विश्लेषक सहसा त्याचा उल्लेख करत नाहीत. १९८० ते १९९५ या पंधरा वर्षांत शेतकरी संघटनेने ग्रामीण महाराष्ट्रात उग्र चळवळ उभारली. रास्ता रोको, मोर्चे, मंत्र्यांना गावबंदी वगैरे अनेक उपक्रम राबवले. महिलांना रस्त्यावर उतरवले. तरुण कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर संघटनेकडे वळले. त्या काळात विदर्भ व मराठवाड्यात काँग्रेसचा पारंपरिक प्रभाव कमी झाला ह्याचे सर्वाधिक श्रेय शेतकरी संघटनेला द्यावे लागेल.

मागे लिहिल्याप्रमाणे विदर्भात शेतकरी संघटनेच्या कामाला प्रथमपासून खूप जोर होता व त्याचा परिणाम तेथील राजकीय परिस्थितीवर नक्कीच होत होता. १९८५ साली संघटनेचे जे पाच आमदार प्रथमतःच निवडून आले त्यांतील चार विदर्भातील होते. कापूस आंदोलन आणि स्वतंत्र विदर्भाची मागणी हे दोन मुद्दे याबाबत महत्त्वाचे ठरले. त्यातील कापूस आंदोलनाबद्दल पूर्वी लिहिलेच आहे. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला शेतकरी संघटनेने कायम पाठिंबा दिला; विशेषतः नव्वदच्या दशकात. अर्थात यामागे संकुचित असा स्थानिक अभिनिवेश नव्हता. संघटनेची त्यामागची व्यापक वैचारिक भूमिका स्पष्ट होती. त्यानुसार एकतर, कापसाचे भाव सरकारने कायम पाडल्यामुळे मुंबईतील कापडगिरणी मालकांचा सतत फायदा होत गेला, पण विदर्भातील शेतकरी मात्र खचत गेला. दुसरे म्हणजे, तेथील मुबलक नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर विदर्भाच्या समृद्धीसाठी झाला नाही; तसे झाले असते तर पूर्वीप्रमाणेच आजही विदर्भ अन्य महाराष्ट्रापेक्षा अधिक समृद्ध राहिला असता. तिसरे म्हणजे, छोटी राज्ये प्रशासनाच्या दृष्टीने अधिक योग्य ठरतील असे संघटनेचे मत होते. म्हणून स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला पाठिंबा. विदर्भातील संघटनेच्या आंदोलनावर आधारित एक चित्रपट

बनवायचे काम जोशींनी पुण्याचे नितीन भोसले यांच्यावर सोपवले होते व त्यानुसार त्यांनी 'जय विदर्भ' हा सुमारे ३५ मिनिटांचा चित्रपट बनवला. त्यात शरद जोशी, प्रकाश आंबेडकर वगैरेंच्या मुलाखतीही होत्या. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्याच्या पाच-सहाशे प्रती काढल्या आणि विदर्भात जागोजागी तो चित्रपट दाखवला गेला. जनमतावर त्याचाही बराच प्रभाव पडला. एरव्ही विदर्भ हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो, पण त्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत विदर्भातील अकरा जागांपैकी दहा जागांवर काँग्रेस उमेदवार पराभूत झाले होते. यामागे शेतकरी संघटनेने केलेला प्रचार मुख्यतः कारणीभूत होता.

वामनराव चटप यांचा इथे विशेष उल्लेख करायला हवा. १९९०प्रमाणे १९९५मधेही ते आमदार म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा मतदारसंघातून निवडून गेले होते. २१ एप्रिल १९९८ रोजी महाराष्ट्राच्या विधानभवनात त्या वर्षीचे 'सर्वोत्कृष्ट आमदार' म्हणून मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या हस्ते खास पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला होता. त्यांचा स्वतंत्र भारत पक्ष इतका छोटा असूनही त्यांना असे गौरवण्यात आले हे विशेष आहे. व्यवसायाने वामनराव एक वकील, शेरोशायरीची प्रचंड आवड, ओजस्वी वक्ते. सामाजिक कामाचा प्रथमपासून ध्यास. शेवटपर्यंत त्यांनी जोशींना साथ दिली. संघटनेच्या कामासाठी सतत प्रवास करावा लागत असूनही त्यांनी आपला मतदारसंघ कष्टपूर्वक जोपासला. आज संघटनेच्या इतर कुठल्याही नेत्यापेक्षा त्यांना अधिक जनाधार आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. आजही स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी ते अहोरात्र प्रचार करत असतात. अर्थात तसे करताना ते शेतकरी संघटनेचेच विचार लोकांपुढे मांडत असतात.

परंतु निवडणुकींच्या संदर्भात विचार करताना त्या साऱ्या आंदोलनाचा सर्वाधिक फायदा मात्र शिवसेनेला मिळाला असे दिसते. १९८० पूर्वी शिवसेना मुख्यतः मुंबई व ठाणे या भागात सीमित होती व 'स्थानिक मराठी माणसांच्या हितासाठी लढणारी संघटना' हीच तिची प्रतिमा होती. त्यानंतर तिचे क्षेत्र विदर्भ व मराठवाड्यात विस्तारत गेले. पश्चिम महाराष्ट्रात शरद पवार यांच्यामुळे व सहकारी साखर कारखानदारीमुळे काँग्रेसचा पगडा कायम राहिला होता, पण विदर्भ व मराठवाड्यात काँग्रेसचा प्रभाव ओसरल्यामुळे एक राजकीय पोकळी निर्माण झाली होती व तिचा फायदा शिवसेनेच्या विस्ताराला झाला. शिवसेनेने सगळीकडेच स्थानिक अस्मितेचे राजकारण केले; मराठवाड्यात तिने सवर्णांची अस्मिता जोपासली तर विदर्भात मराठीपणाची. मुख्यतः आर्थिक मुद्द्यांवर उभ्या असलेल्या शेतकरी संघटनेपेक्षा हे अस्मितेचे मुद्दे मतदारांना अधिक आकर्षक वाटले. 'गोरगरिबांचे प्रश्न सोडवण्यासाठी रस्त्यावर येणारी लढाऊ संघटना' ही सेनेची प्रतिमा तरुणांना भावली. शेतकरी संघटनेने तयार केलेली कार्यकर्त्यांची फळी बाळासाहेबांनी आपल्याकडे खेचून घेतली. त्यातूनच राजकीय यश शिवसेनेच्या पदरात पडत गेले. 'राजकीय शेतीची सगळी मशागत शेतकरी संघटनेने केली आणि पीक मात्र शिवसेनेने कापले' हे एका निरीक्षकाचे विधान सार्थ वाटते.

काही आकडे पुरेसे बोलके आहेत. राज्य विधानसभेच्या निवडणुकांत १९८५ मध्ये

शिवसेनेचा एक आमदार निवडून आला, १९९० मध्ये ५२ आमदार निवडून आले, तर १९९५ मध्ये ७३ आमदार निवडून आले आणि त्याच वर्षी सेना सत्तेवर आली. ही वाढ मुख्यतः विदर्भ व मराठवाड्यात झालेली आहे.

शरद जोशींच्या राजकारणातील सहभागासंदर्भात एक गोष्ट नमूद करायला हवी. राजकीय सोय पाहून त्यांनी आपल्या वैचारिक भूमिकेला मुरड घातली किंवा आपल्याला न पटणाऱ्या भूमिकेचा पुरस्कार केला असे घडल्याचे दिसत नाही.

उदाहरणार्थ, आरक्षण अधिष्ठित मंडल आयोग स्वीकारणारे व्ही. पी. सिंग यांच्याशी खरेतर जोशींची राजकीय जवळीक होती; पण तरीही मूलतः स्वतंत्रतावादी असलेल्या जोशींनी सतत राखीव जागांना विरोधच केला. आपली ही मते राजकीय सोय पाहायची म्हणून जोशींनी कधीच लपवलीही नाहीत. २८ फेब्रुवारी १९८७ रोजी नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांच्या प्रचारार्थ केलेल्या भाषणात जोशी म्हणतात,

> राखीव जागांचा प्रश्न हा गरिबी हटवण्याशीही संबंधित नाही आणि बेकारी दूर करण्याशी तर नाहीच नाही. बहुजनसमाजातील बेकारांच्या पोटातील भूक ही काही दलित समाजाच्या पोटातील भुकेपेक्षा वेगळी नसते. हिंदूच्या पोटातील भूक मुसलमानाच्या पोटातील भुकेपेक्षा वेगळी नसते. भुकेला जात नाही, भाषा नाही आणि धर्मही नाही. देशात शंभर तरुण दरवर्षी नोकरीला तयार होत असले, तर सरकारी धोरणाप्रमाणे दहाच नोकऱ्या तयार होतात. त्या दहा नोकऱ्यांचे वाटप कशाही पद्धतीने झाले तरी नव्वद तरुण, मग ते कोणत्याही जातीचे असोत, बेकार उरणारच आहेत. मग त्या वादावर गरिबांनी एकमेकांची डोकी का फोडावीत?''
> (*शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख,* पृष्ठ १८६-७)

याच प्रश्नावर आपल्या दुसऱ्या एका परखड लेखात जोशी लिहितात,

> दिल्लीला मंत्रालयामध्ये राहून आपल्या हाती सत्ता येईल असे जर दलितांना, मागासवर्गीयांना वाटत असेल, तर तो त्यांचा भ्रम आहे. हीच गोष्ट महिला आणि शेतकऱ्यांनाही लागू आहे. आर्थिक प्रश्नाला हात न घालता, कुणाचीही परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला तर सुधारणेचा फक्त भास तयार होतो. त्याचा फायदा एकाच वर्गाला मिळतो. काही वेळा तर ते विपर्यस्त होते. वर गेलेले शेतकरी बाकीच्या शेतकऱ्यांना योग्य भाव मिळू नये म्हणून प्रयत्न करतात. नोकरीत गेलेले दलित खालच्या वर्गाला मदत करण्याऐवजी त्यांचे धंदे सुधारू नयेत म्हणून प्रयत्न करतात.
>
> काँग्रेसची स्थापना पहिल्यांदा कुणी केली? हिंदुस्तानातील शहरांमध्ये उद्योगधंदे करणाऱ्या एतद्देशीय लोकांनी पहिल्यांदा अशी मागणी केली, की आयसीएसमध्ये

आमच्या जास्त लोकांची सोय असली पाहिजे; तुम्ही कार्यक्षम असला, तरी शेवटी तुम्हांला राज्य आमचे चालवायचे आहे आणि त्यासाठी तुम्ही आमच्या काही लोकांना घेतले पाहिजे. या एतद्देशीय लोकांचा हेतू काही राज्य चांगले चालवावे आणि देशाचे भले व्हावे, असा नव्हता; आपल्यातल्या काही लोकांना उड्या मारून, सत्ताधाऱ्यांच्या बरोबरीने बसता यावे एवढाच हेतू त्यामागे होता. आजसुद्धा राखीव जागांचे भांडवल करून, आरडाओरडा करणाऱ्यांचा हेतू यापेक्षा काही वेगळा असू शकत नाही.

(*पोशिंद्यांची लोकशाही*, पृष्ठ १६८-९)

उजव्या पक्षांना राग येईल असे लेख त्यांनी अनेकदा लिहिले. *जातीयवादाचा भस्मासुर* हे त्यांचे छोटे पुस्तक कुठच्याही प्रकारच्या संकुचिततेच्या विरोधात उदारमतवादी भूमिका मांडणारे आहे. पुढे भाजपचे समर्थन मिळवून जोशी राज्यसभेवर गेले, पण तरी त्यानंतरही कडव्या हिंदुत्वनिष्ठांना त्यांनी सतत विरोधच केला. उदाहरणार्थ, भाजपच्या समर्थकांनी उठवलेल्या गोवंशहत्याबंदीच्या मुद्द्यावर जोशींनी सातत्याने धारदार टीका केली. 'भाकड गाय पोसत राहणे कोणाही शेतकऱ्याला परवडणारे नाही; गायीला अखेरपर्यंत खाऊ घालायची जबाबदारी त्या शेतकऱ्यालाच खाऊन टाकेल. अशा अव्यवहार्य कायद्यामुळे शेतकरी गोपालन करणेच बंद करतील; एका अर्थाने ही गोवंशहत्याच ठरेल,' असे त्यांचे मत होते. त्याचबरोबर 'वशिंड असलेल्या तथाकथित देशी गाईंचे दूध विविध गुणांनी परिपूर्ण, पण परदेशी हायब्रीड गाईंचे दूध मात्र प्रकृतीला हानिकारक' ह्या मतालाही त्यांनी कायम विरोध केला. 'अशा वशिंड असलेल्या गाई फक्त दक्षिण आशियात व एकेकाळी दक्षिण आशियाला जोडून असलेल्या पूर्व आफ्रिकेत आढळतात, तर जर्सी गाई युरोपात आढळतात आणि त्या जर्सी गाईंचे दूध पिणारे समाज अधिक विकसित आहेत, तर देशी गाईंचे दूध पिणारे भारतीय वा बांगलादेशी वा पूर्व आफ्रिकेतील समाज अविकसित आहेत' ह्या वास्तवाकडेही ते लक्ष वेधतात.

उजव्या पक्षांप्रमाणे डाव्या पक्षांनाही न आवडणारी पावले त्यांनी अनेकदा उचलली. उदाहरणार्थ, बँक संपाला त्यांनी एका आगळ्या प्रकारे केलेला विरोध.

संघटित नोकरदार आपल्या प्रबळ संघटनांच्या जोरावर समाजाला वेठीला धरतात आणि आपल्या मागण्या मंजूर करून घेतात आणि तरीही शेतकऱ्यांना चिरडणारे सरकार त्यांच्यापुढे मात्र नेहमीच नांगी टाकते याची जोशींना चीड होती. ११ मे १९९४ रोजी देशभरातील बँक कर्मचाऱ्यांनी संप पुकारला. जोशींचे खाते चाकणच्या बँक ऑफ इंडियामध्ये होते. त्या दिवशी १०,००० रुपये काढायला जोशी बँकेत गेले. पण 'बँक कर्मचारी हजर नसल्याने आपण पैसे देऊ शकत नाही,' असे शाखाप्रमुखांनी सांगितले. जोशींनी ते त्यांच्याकडून लिहून घेतले व पुणे जिल्हा ग्राहक मंचाकडे आपल्या झालेल्या गैरसोयीपोटी एक लाख रुपये नुकसानभरपाईचा दावा दाखल केला. पुढे ग्राहक मंचाने जोशींच्या बाजूने निकाल दिला व त्यांना नुकसानभरपाई

म्हणून रुपये पाच हजार का अशीच काहीतरी रक्कम मिळाली.

अर्थात प्रश्न पैशाचा नव्हता; अन्यायाचा प्रतिकार करण्याचा होता. संघटित नोकरदारांकडून होत असलेल्या गळचेपीविरुद्ध सर्वसामान्य नागरिकांनी धैर्याने आवाज उठवला पाहिजे असे जोशी नेहमीच म्हणत. ह्या प्रकरणी कामगार संघटना जोशींच्या विरोधात गेल्या व राजकीयदृष्ट्या त्यांनी असे काही करणे अगदी अव्यवहार्य होते यात शंका नाही. पण अशा बाबतीत जोशींनी अनेकदा अप्रिय असली तरी आपल्या विवेकबुद्धीला पटतील अशीच पावले उचलली. राजकीय व्यूहाचा भाग म्हणून वेगवेगळ्या पक्षांना वेळोवेळी पाठिंबा दिला तरी विचारांच्या बाबतीत त्यांनी कधीच तडजोड केली नाही.

ज्याला राजकारणात सौदेबाजी म्हणतात, किंवा भरपूर पैसे वा अन्य लाभ घेऊन राजकीय भूमिका बदलणे म्हणतात, तसा प्रकारही जोशींनी कधीच केलेला नाही; तसा आरोपही कोणी त्यांच्यावर केलेला नाही. त्यांचे जे अनुयायी पुढे आमदार वगैरे झाले तेही प्रामाणिकच राहिले; मोरेश्वर टेमुर्डे किंवा वामनराव चटप यांच्यासारखे त्यांचे सहकारी आमदार बनल्यावरही कायम लाल एसटीतून किंवा साध्या स्कूटरवरून प्रवास करत राहिले. राजकारणात अनेकदा असे कसोटीचे क्षण येतात, जेव्हा केवळ एक-दोन मतांवर सत्तेवर कोण येणार हे ठरते. कधी अविश्वासाचा ठराव असतो, कधी पक्षांतर्गत बंडाळी असतात. आपल्या मताची किंमत करोडोंच्या हिशेबात घेतली जाते व दिलीही जाते. अशा कुठल्याच प्रसंगी शेतकरी संघटनेचे उमेदवार मोहाला बळी पडले नाहीत.

लक्षावधी शेतकऱ्यांना पेटवणाऱ्या आपल्या आंदोलनांचा अपेक्षित फायदा शेतकरी संघटनेला निवडणुकांमध्ये का उठवता आला नाही?

या अपयशाची मीमांसा करायचा प्रयत्न अनेकांनी केला आहे व वेगवेगळी कारणे पुढे आणली आहेत. पुनरुक्ती टाळण्यासाठी फक्त एकाची कारणमीमांसा ती बऱ्यापैकी प्रातिनिधिक वाटल्याने इथे उदधृत करत आहे.

६ मार्च १९९५च्या शेतकरी संघटकमध्ये 'स्वतंत्र भारत पक्षाला मतदारांनी का नाकारले?' या विषयावर आपापली मते कळवण्याचे आवाहन करण्यात आले होते. प्रतिसाद म्हणून वाचकांची सुमारे शंभरेक पत्रे आली. त्यातील मोरेश्वर टेमुर्डे (पाटील) यांचे एक पत्र २१ एप्रिलच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आले होते. ते स्वतंत्र भारत पक्षाच्या महाराष्ट्र राज्य शाखेचे संयोजक होते. त्यांची मीमांसा त्यावेळी नुकत्याच पार पडलेल्या १९९४च्या सार्वत्रिक निवडणुकींच्या संदर्भात केलेली असली, तरी शेतकरी संघटनेच्या एकूणच राजकीय अपयशाला ती लागू पडू शकते. मुख्य म्हणजे संघटनेच्या मुखपत्रात तिला स्थान मिळालेले आहे. 'निवडणुकीचे तंत्रच वेगळे असते' या शीर्षकाखाली प्रकाशित झालेल्या आपल्या त्या अभ्यासपूर्ण पत्रात टेमुर्डे यांनी दिलेली काही कारणे संक्षेपाने पुढीलप्रमाणे आहेत :

१. आपल्या उमेदवारांकडे साधने व पैसे यांची आत्यंतिक उणीव होती.

२. निवडणुकीचे तंत्र त्यांना अवगत नव्हते व ते तंत्र वापरणे साधनशुचितेच्या मर्यादेत बसणारे नव्हते.

३. भ्रष्टाचार-गुंडगिरी करणारी काँग्रेस व जातिधर्माचा प्रचार करणारी शिवसेना-भाजप युती यांना स्वतंत्र भारत पक्ष हा समर्थ पर्याय आहे असे लोकांना वाटले नाही.

४. आपल्या पक्षाचा कार्यक्रम पूर्णपणे आर्थिक होता. या कार्यक्रमाचे महत्त्व लोकांना पटले नाही. त्यात मतदारांना ताबडतोबीने मिळण्याजोगा काही लाभ दिसला नाही.

५. आपल्या पक्षाच्या तीस-कलमी कार्यक्रमाला नोकरशाहीचा प्रचंड विरोध झाला. नवा पक्ष संरक्षणाची हमी काढून घेणार ही धास्ती वाटली.

६. आपल्या उमेदवारांनी स्थानिक व लोकजिव्हाळ्याच्या प्रश्नांना प्रचारात स्थान दिले नव्हते.

७. शरद जोशी यांच्या निवडणूकविषयक भूमिकेबाबत जनतेच्या मनात असलेला अविश्वास. 'मत मागायला येणार नाही' असे सांगत स्वीकारलेली उमेदवारी व त्यामुळे निर्माण झालेला गैरसमज.

८. पक्षाचा कार्यक्रम हा फक्त शेतकऱ्यांचा आहे असा झालेला समज व त्यामुळे शहरी भागातून झालेली पीछेहाट.

९. आपल्या धोरणामुळे धान्य महाग होईल हा झालेला प्रचार व त्यातून भूमिहीन मजुरांत निर्माण झालेला दुरावा.

१०. नेहरू घराण्याचे पुतळे पाडण्याची केलेली घोषणा ही अनेकांना न आवडलेली बाब.

११. आपला पक्ष तरुणवर्गाला आकर्षित करू शकला नाही. तरुणांना नोकरीचा प्रश्न विशेष महत्त्वाचा वाटत होता.

स्वतः जोशी यांनी ह्याबद्दल एक लेख १३ सप्टेंबर २००४ रोजी लिहिला होता. *पोशिंद्यांची लोकशाही* या पुस्तकात तो समाविष्ट आहे. त्यात ते लिहितात :

> लाखालाखांनी शेतकरी माझ्या सभेला जमतात; माझ्या शब्दाखातर हजारोंनी शेतकरी तुरुंगात गेले; पण लोक माझे म्हणणे ऐकतात, समजावून घेतात, या भावनेपोटी उमेदीने जेव्हा मी शेतकऱ्यांच्या प्रेमाचे मतांमध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा प्रत्येक वेळी मला हार पत्करावी लागली. सत्य परिस्थिती समोर असलीच पाहिजे. शेतकऱ्यांच्या संख्येच्या ताकदीचे मतांमध्ये परिवर्तन करायला आपल्याला जमले नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न असले, दुःख असले, की शरद जोशी म्हणजे तारणहार; पण निवडणूक आली म्हणजे 'शरद' नाव चालते, पण 'जोशी'

> आपल्या जातीचा नाही याचा प्रभाव परिणामकारक ठरतो... प्रत्येक निवडणुकीत आपण मार खाल्ला. एका निवडणुकीत आपण असे म्हटले, की या निवडणुकीत एकच उमेदवार आहे – तो म्हणजे कर्जमुक्ती. तेव्हाही कर्जमुक्ती या उमेदवाराला मते मिळाली नाहीत.
>
> (पृष्ठ २८३-४)

यानंतर लगेचच ६ डिसेंबर २००४ मध्ये लिहिलेल्या 'राजकीय भूमिकेचे चक्रव्यूह' या आपल्या लेखात जोशी प्रांजळपणे म्हणतात,

> निवडणुकीच्या प्रचारासाठी तुम्ही मला प्रेमाने बोलावता. पण ज्यांनी माझी पूर्वीची शेतकरी संघटनेच्या व्यासपीठावरील भाषणे ऐकली आहेत, त्यांच्या लक्षात आले असेल, की माझी ती भाषणे आणि या निवडणूक प्रचारातील भाषणे यांत जमीनअस्मानाचे अंतर होते. मी पूर्वी काय भाषणे करत होतो आणि आता निवडणुकीत मला काय भाषणे करावी लागत आहेत, याची मला त्याक्षणी लाज वाटत असे. हा सरळसरळ वैचारिक वेठबिगाराचा किंवा वैचारिक व्यभिचाराचाच प्रकार झाला. ही वेठबिगारी अशीच राहणार असेल, तर शेतकरी चळवळीला माझा जो उपयोग आहे, तोच संपून जाईल. माझ्या चष्म्याची काच तडकून जाईल. त्यामुळे 'सध्या चालवून घ्यावे' या विचारामागे राजकीय संधिसाधूपणा आहे. ज्यांच्या महत्त्वाकांक्षा राजकीय आहेत, ते आपल्याला फरफटत नेतात अशी माझी भावना होत आहे.
>
> (*पोशिंद्यांची लोकशाही*, पृष्ठ २९८-९)

राजकीय अपयशाची टोचणी स्वतः जोशींना किती लागली होती व ते काहीसे अगतिक कसे झाले होते हे ह्यावरून जाणवते.

पण राजकीय अपयश मिळाले तरी त्यामुळे जनमानसातील जोशींबद्दलचा आदर कमी झाला असे मात्र म्हणता येत नाही. जोशींचे एकेकाळचे सहकारी नागपूरचे प्रा. शरद पाटील यांचा 'शरद जोशी संपले काय?' या शीर्षकाचा एक लेख 'लोकमत'च्या ९ जून २०००च्या अंकात प्रकाशित झाला आहे. त्यात त्यांनी राजकारणात उतरण्याचा जोशींचा निर्णय हा शंभर टक्के त्यांचा स्वतःचा होता असे म्हणतानाच असेही लिहिले आहे की, ''या निर्णयाच्या मुळाशी त्यांचा व्यक्तिगत स्वार्थ मुळीच नव्हता याचीसुद्धा मला एकशेएक टक्के खात्री आहे. त्यांची राहणी अत्यंत साधी आहे. अन्न-वस्त्र-निवारा यापलीकडे त्यांच्या गरजा नाहीत. मान-सन्मानांची त्यांना हाव नाही. व्यवस्था बदलण्याचे एक प्रभावी साधन म्हणून त्यांना सत्ता हवी होती.''

जोशींच्या जवळजवळ सर्वच कार्यकर्त्यांची भावना साधारण अशीच आहे. राजकारणात उतरण्याचा निर्णय त्यांनी स्वार्थापोटी घेतला असे कोणीच समजत नाही, पण तो चुकला कारण

राजकारणातील डावपेच त्यांना जमले नाहीत, त्यातील छक्केपंजे समजले नाहीत, आणि मुळात त्यांचे ते क्षेत्रच नसल्याने त्यात ते पराभूत झाले; अशीच बहुतेकांची भावना आहे. पाटील यांनी उपरोक्त लेखात म्हटल्याप्रमाणे, ''सचिन तेंडुलकर कबड्डी खेळायला उतरावा तसे ते राजकारणात उतरले आणि पहिल्या फटक्यात बाद झाले.'' जोशींचे बहुतेक कार्यकर्ते ह्या विधानाशी सहमत होतील.

अशी अनेक चांगली माणसे आपल्या अवतीभवती दिसतात जी तशी बुद्धिमान असतात, प्रामाणिक असतात, समाजाला देण्यासारखे असे त्यांच्याजवळ खूप काही असते; पण आपल्याकडची निवडणूकप्रक्रियाच अशी आहे, की त्यांचा निवडणुकीत प्रभाव पडत नाही. महात्मा फुले किंवा बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान नेत्यांनाही निवडणुकीतील दारुण अपयश चाखावे लागले होते. आचार्य अत्रेंपासून एसेम जोशींपर्यंत इतरही अनेकांना हे अपयश पचवावे लागले आहे. लोकांचे प्रेम त्यांच्या वाट्याला येते, पण मते मात्र मिळत नाहीत; निवडणुकांचे गणित काही वेगळेच असते. अर्थात ह्यात खरे तर त्यांच्यापेक्षा एकूण समाजाचाच तोटा अधिक असतो.

निवडणूक ही एक अजब घटना असते; तिला तार्किक कार्यकारणभाव लागू पडतोच असे नाही; त्याबाबत कुठलेही सिद्धांत किंवा नियम मांडता येत नाहीत. अनेक तथाकथित तज्ज्ञांनी, मान्यवर विचारवंतांनी केलेली निवडणूकपूर्व भाकिते मतदारांनी सपशेल चुकीची ठरवली आहेत. प्रत्यक्ष मतदान होते त्या काळात प्रत्येक ठिकाणची परिस्थिती वेगळी असते व तिचा प्रभाव मतदारांवर पडत असतो; तिच्याविषयी नेमके काही सांगणे अशक्यच असते.

त्या त्या वेळी जी जी पावले उचलणे योग्य वाटले, ती ती पावले जोशींनी उचलली, एवढेच आता मागे वळून पाहताना म्हणता येईल. त्यांनी स्वतः एकदा ह्या प्रक्रियेचे वर्णन करताना एक सुरेख दृष्टांत दिला होता. डोंगर चढणारा माणूस ज्याप्रमाणे आधी एक हात किंवा एक पाय एखाद्या फटीत घट्ट रोवून ठेवतो, मग इतर तीन अवयवांच्या साहाय्याने वर सरकायला दुसरा कुठला आधार चाचपडून शोधतो व मग त्या आधारावर आणखी एक अवयव स्थिर करून आणखी वर सरकायला पुन्हा कुठलातरी आधार शोधतो; तशीच काहीशी त्यांची ही राजकारणातील वाटचाल होती. स्वतःजवळ एखाद्या मोठ्या पक्षाचे पाठबळ, घराण्याचा लौकिक, पैशाचा भरभक्कम आधार, धर्म वा जातीची शिडी, लोकांना भडकवता येईल असे काही धार्मिक वा स्थानिक अस्मितांचे प्रश्न वगैरेपैकी काहीच नसताना आणि त्यातही पुन्हा पारंपरिक व बहुमान्य समाजवाद नाकारत खुल्या अर्थव्यवस्थेचा उद्घोष करणाऱ्या, आपल्या अनुयायांच्या व काळाच्याही खूप पुढे असणाऱ्या द्रष्ट्या नेत्याला भारतातील निवडणुकांत फारसे यश मिळणे हे तसे अवघडच होते.

''मी राजकारणात पडलो ह्यात सर्वांत जास्त नुकसान माझे स्वतःचेच होते, कारण केवळ एक शेतकरीनेता म्हणून राहिलो असतो तर मी महात्मापदी पोचायची बरीच शक्यता होती!'' असे एकदा जोशी काहीशा विनोदाने, काहीशा गांभीर्याने म्हणाले होते.

जोशी यांना राजकारणात अपेक्षित यश का मिळाले नाही याचे विश्लेषण अनेक विचारवंत आपापल्या परीने करतीलच; पण सरतेशेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, की जोशींचे राजकारण हा सकृत्दर्शनी जरी त्यांच्या एकूण कारकिर्दीतील सर्वांत असमाधानकारक भाग वाटला, तरी त्याचे प्रमुख कारण ते आपल्या काळाच्या खूप पुढे होते हे असावे. ते मांडत असलेले स्वतंत्रतावादी विचार आजही आपल्या समाजात स्वीकृत झालेले नाहीत. त्यांनी राजकारणात पडायचा क्षण अजून पन्नास वर्षांनी आला असता, तर त्यावेळच्या बदललेल्या समाजाने कदाचित त्यांना अधिक यश दिले असते.

■

## १३

# राष्ट्रीय मंचावर जाताना

आपले काम महाराष्ट्रापुरते सीमित असावे असे जोशींना कधीच वाटले नव्हते. संघटना अगदी नवी असतानाही वेगवेगळ्या निमित्तांनी ते इतर राज्यांत जात असत. आपल्याला देशातील एकूण व्यवस्था बदलायची आहे आणि तसे करणे केंद्रीय पातळीवरच शक्य होईल; राज्यातील काम ही केवळ त्या व्यापक स्तरावर पोचण्यासाठीची पूर्वतयारी आहे याची त्यांना जाणीव होती.

त्यावेळी देशात, विशेषतः महाराष्ट्रात, स्वयंसेवी संस्था मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्या होत्या. जेपी आंदोलनातील व नंतरच्या जनता दल राजवटीच्या कटू अनुभवानंतर अनेक कार्यकर्त्यांना ती एक नवी वाट सापडली होती. त्यांच्यातील अनेकांशी संपर्क साधून एखादे देशव्यापी व्यासपीठ उभारण्याच्या उद्देशाने एकदा जोशींनी दोन दिवसांची एक निवासी बैठकही घेतली होती. पण त्यातून फारसे काही निष्पन्न झाले नाही. महत्प्रयासाने गवसलेले आपले छोटे पण हक्काचे क्षेत्र सोडून एखाद्या व्यापक लढ्यात पुन्हा एकदा स्वतःला झोकून द्यायची अशा संस्थाप्रमुखांची त्यावेळी तरी मनःस्थिती नव्हती.

पुढे राजीव गांधींच्या सत्ताकाळात जोशींनी १९८५ साली दिल्लीत काही बैठका घेतल्या होत्या. त्यांचा उल्लेख मागे झालेलाच आहे. अशाच एका बैठकीबद्दल तिच्यात सहभागी असलेले त्यांचे त्यावेळचे एक कार्यकर्ते डॉ. राजीव बसर्गेकर लिहितात,

> खासदार गुरुपादस्वामींच्या बंगल्यात ही बैठक झाली. बैठकीला भूपिंदरसिंग मान यांच्यासारखे पंजाबच्या भारती किसान युनियनचे नेते होते. 'बंधुआ मुक्ती मोर्चा'चे नेते स्वामी अग्निवेश, छत्तीसगड मुक्ती मोर्चाचे नेते शंकर गुहा नियोगी, ऑल आसाम स्टुडंट्स युनियन ऊर्फ आसूचे कार्यकर्ते, तसेच पत्रकार अरुण शौरी हे होते. कुलदीप नायरही काही काळ येऊन गेले. शरद जोशींनी प्रस्ताव ठेवला, की इंदिराजींच्या हौतात्म्याच्या सहानुभूतीवर निवडून आलेली ही संसद खरी संसद नव्हेच; देशभरच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील कृतिशील जाणकारांची एक समांतर संसद आपण भरवावी. देशप्रश्नांची खरी चर्चा आपण तिथे करू आणि योग्य दिशा लोकांसमोर आणू. देशभरच्या शेतकरी संघटना त्यासाठी काम करतील, अर्थसाहाय्य करतील. अरुण शौरींना तर त्यांनी आवाहन केले होते की, 'आपण

या संसदेचे पंतप्रधान व्हा. You are the Prime Minister material!'

ह्या बैठकीला मनासारखा प्रतिसाद मिळाला नाही. शंकर गुहा नियोगींसारख्या झुंजार नेत्याने छत्तीसगडाबाहेर पडण्याबाबत असमर्थता व्यक्त केली. पंजाबचे नेते दिल्लीतील शीखविरोधी दंग्यांच्या पार्श्वभूमीवर सूर्यास्ताआधी तासभर दिल्ली सोडायच्या मागे असायचे. एकूणच प्रचंड बहुमत मिळालेल्या राजीव गांधी सरकारविरुद्ध उठवलेला कोणताही आवाज लोकांना आज आवडणार नाही, ही भावना प्रबळ होती.

(*शेतकरी संघटना आणि मी : १९८४ ते १९८८*,
अंतर्नाद, ऑक्टोबर २००९, पृष्ठ ४१)

वेगवेगळ्या क्षेत्रांतील कर्तृत्ववान व उजळ प्रतिमा असलेल्या लोकांची एक यादी तयार करायची, त्यांना निवडणुकीला उभे राहण्यासाठी तयार करायचे व सर्वतोपरी पाठिंबा देऊन निवडून आणायचे असाही जोशींचा प्रयत्न करून झाला. दिल्लीतील पत्रकार व लेखक कुलदीप नायर यांच्या घरी अशी यादी तयार करण्यासाठी अनेक बैठका झाल्या. पत्रकार मृणाल पांडे, सुरेंद्र मोहन, स्वामी अग्निवेश, 'मानुषी'च्या संस्थापक-संपादिका मधु किश्वर अशी सात-आठ जणांची एक अनौपचारिक समिती त्यासाठी कार्यरत होती. सुमारे चारशेच्या आसपास नावे त्यांनी जमाही केली होती; त्यांच्याशी प्राथमिक स्वरूपात संपर्कही साधला होता. पण त्यातूनही फारसे काही निघाले नाही.

या सर्व कालखंडात शेतकरी संघटनेचे कामही चालूच होते. उदाहरणार्थ, भ्रष्टाचाराविरुद्ध उभारलेले 'Q' आंदोलन, वीज महामंडळाविरुद्ध आंदोलन, हातोडा मोर्चा, ज्वारी परिषद इत्यादी. पण ते आता स्वतंत्र काम उरले नव्हते, तर राजकीय हालचालींशी ते जोडले गेले होते. राजकारण हा जोशींच्या दृष्टीने आंदोलनांच्या पलीकडचा असा पुढचा टप्पा होता. या टप्प्यात आपला लढा देशव्यापी करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने अखिल भारतीय पातळीवर शेतकऱ्यांचे संघटन उभारायचा प्रयत्न ते सतत करत राहिले.

खरे पाहता तामिळनाडूच्या नारायणस्वामी नायडू यांना अशी अखिल भारतीय पातळीवरील किसान संघटना सर्वप्रथम निर्माण करायचे श्रेय दिले पाहिजे. आधुनिक भारतातील शेतकरी चळवळीचे त्यांना भीष्माचार्य म्हणता येईल. जोशी परदेशात होते त्याचवेळी, १९७० सालच्या सुमारास, त्यांनी आपल्या शेतकऱ्यांमधील कामाला सुरुवात केली. 'व्यावसायीगल संघम' हे त्यांच्या तामिळनाडूमधील संघटनेचे नाव. पुढे त्यांनीच पुढाकार घेऊन १४ डिसेंबर १९८० रोजी हैद्राबाद इथे वेगवेगळ्या प्रांतांतील शेतकरीनेत्यांना एका बैठकीसाठी यायचे आमंत्रण दिले. बरीच मेहनत घेऊन त्यांनी अशा शेतकरीनेत्यांची माहिती गोळा केली, त्यांच्याशी संपर्क साधला. जोशी त्या बैठकीला हजर नव्हते. त्या पहिल्या

बैठकीत 'अखिल भारतीय किसान युनियन' अशी एक अनौपचारिक संस्था स्थापन झाली व तिचे पहिले अध्यक्ष म्हणून नारायणस्वामींची अविरोध निवड झाली. आपली संस्था राजकारणापासून पूर्णतः अलिप्त ठेवायची असे ठरले, पण तिचे नेमके स्वरूप काय असावे ह्यावर एकमत झाले नव्हते.

अधिक चर्चा करण्यासाठी पुन्हा एकदा एकत्र भेटायचे ठरले. पण काही ना कारणांनी तो योग येत नव्हता. शेवटी २८, २९ व ३० मे १९८२ रोजी पंजाबात खन्ना या गावी ती बैठक ठरली. त्या बैठकीला शरद जोशी हजर होते. मागे पंजाबबद्दल लिहिताना ह्याविषयी आलेच आहे. देशातील अन्य किसाननेत्यांबरोबर आलेला त्यांचा तो पहिलाच संपर्क.

पंजाबातील शेतकरी चळवळीत जोशींचा सहभाग पुढेही चालूच राहिला. वेळात वेळ काढून ते पंजाबात जात राहिले. काही प्रश्न सगळ्याच प्रांतांना सामाईक असे होते. उदाहरणार्थ, झोनबंदीचा प्रश्न.

एका राज्यातील शेतीमाल सरकारी कायद्यानुसार दुसऱ्या राज्यात नेऊन विकता येत नसे. खूपदा ही बंदी एका जिल्ह्यातून वा विशिष्ट विभागातून दुसऱ्या जिल्ह्यात वा विभागात माल नेण्यावरही असे. थोडेफार शिथिलीकरण झाले असले तरी आजही अशी बंधने आहेतच. ह्यालाच झोनबंदी असेही म्हणतात. अशा झोनबंदीला शरद जोशी यांनी नेहमीच कडाडून विरोध केला. त्यांच्या मते जिथे आपल्या मालाला अधिक किंमत येईल, तिथे तो विकायचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला असले पाहिजे. आपल्या पंजाबातील वेगवेगळ्या भाषणांत जोशींनी या अन्याय्य कायद्याविरुद्ध आवाज उठवला होता.

जोशींचा महत्त्वाचा सहभाग असलेले एक विशेष आंदोलन अमृतसरजवळच्या भारत व पाकिस्तान यांच्यातील वाघा सीमेवर १९९८ साली झाले. धान्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारदेखील खुला असावा असे जोशींचे प्रथमपासून म्हणणे होते. केंद्र शासनाने मात्र गव्हाच्या निर्यातीवर बंदी घातली होती. अशा वेळी महाराष्ट्र, पंजाब, हरयाणा, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश येथील काही हजार शेतकरी एक मोठा मोर्चा घेऊन भारत व पाकिस्तान यांच्यातील वाघा सीमेवर गेले. सोबत ट्रॅक्टरमधून त्यांनी गव्हाची काही पोती आणली होती. ती त्यांनी सीमेवर नेऊन ठेवली. तसे हे प्रतीकात्मकच पाऊल होते, पण त्यावेळी भारतात गव्हाचा भाव ३०० रुपये क्विंटल होता, तर पाकिस्तानात तोच भाव ८०० रुपये होता, हे विचारात घेतले तर दोन देशांमधला व्यापार खुला होण्याचे अर्थशास्त्रीय महत्त्व कोणाच्याही लक्षात येण्यासारखे होते.

१९९८ मध्ये पंजाबात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण खूप वाढल्याची चर्चा सुरू झाली. वाढता कर्जबाजारीपणा हे त्यामागचे मुख्य कारण होते. इतरही काही राज्यांत अशीच परिस्थिती होती. त्यावेळी भारती किसान युनियनने हजारो शेतकऱ्यांना अमृतसरच्या सुवर्णमंदिरात नेले व तिथे त्यांना शपथ घ्यायला लावली की, 'सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे माझ्यावर आज ही परिस्थिती आली आहे. ती दूर व्हावी म्हणून मी शासनाविरुद्ध आंदोलन करीन, पण कुठल्याही परिस्थितीत स्वतःच जीव मात्र देणार नाही.' ही घटना १५

ऑगस्ट १९९८ची. आज महात्मा गांधी असते तर त्यांनी शेतकऱ्यांना 'मारा पण मरू नका' असे सांगितले असते, हे जोशीही अनेकदा म्हणत.

भूपिंदरसिंग मान यांच्या बटाल्यातील कार्यालयात जुने कागदपत्र चाळताना त्यांनी २० ऑक्टोबर १९७८ रोजी छापून घेतलेले एक किसान युनियनचे प्रचारपत्रक मिळाले. त्यात हिंदीत नोंदवलेली दुसऱ्या क्रमांकाची मागणी होती : 'नोकऱ्यांमधील आरक्षण हे जाती-पातीच्या निकषावर नाही तर आर्थिक मागासलेपणाच्या निकषावर दिले जावे. तसेच नोकऱ्यांमधील बढती ही केवळ त्या व्यक्तीच्या योग्यतेच्या निकषावर दिली जावी, कुठल्याही जाती-पातीच्या निकषावर नव्हे.' पंजाबातील किसान युनियनची एकूण वैचारिक बैठक प्रथमपासून कशी होती याचा ह्यावरून अंदाज येतो. जोशींची भूमिकाही हीच होती.

खन्नामधील त्या उपरोक्त बैठकीला युनियनचे अखिल भारतीय अध्यक्ष व बैठकीचे निमंत्रक नारायणस्वामी नायडू स्वतः मात्र हजर नव्हते. त्यांच्या अनुपस्थितीचे कारण त्यावेळी बैठकीत जाहीरपणे सांगितले गेले नसले, तरी स्वतःचाच राजकीय पक्ष स्थापन करून त्यांनी दोन-तीन दिवसांपूर्वीच राजकारणप्रवेश केला असल्याचे त्यादिवशी सकाळच्या वृत्तपत्रांवरून सर्वांनाच कळले होते. राजकारणापासून अलिप्त राहायचे धोरण हैदराबाद येथे एकमताने संमत केले गेले असताना, अचानक अध्यक्ष नारायणस्वामी यांनी स्वतःच राजकारणप्रवेश करावा, व तोही युनियनच्या अन्य कुठल्याही पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता, हे तसे धक्कादायकच होते. त्यामुळे खन्नामधील त्या बैठकीत सुरुवातीला तरी वातावरणात एक प्रकारचा तणाव जाणवत होता; पण पुढे तो निवळला.

त्यामागे नारायणस्वामींची एक विशिष्ट गरज होती. तामिळनाडूमधील सरकार शेतकऱ्यांवर अनन्वित अत्याचार करून त्यांची चळवळ दडपून टाकायचा प्रयत्न करत होते व त्याचा ठोस प्रतिकार करता यावा, म्हणूनच नारायणस्वामींनी २४ मे १९८२ रोजी Peasants and Tillers Party of India या नावाच्या आपल्या नव्या पक्षाची स्थापना केली होती. प्रत्यक्षात सरकारी दडपशाही चालूच राहिली. दुर्दैवाने तामिळनाडूतील सर्वच राजकारण गेली अनेक दशके डीएमके व अण्णा डीएमके ह्या दोन पक्षांनीच भारून टाकलेले आहे. करुणानिधी व जयललिता यांच्याकडेच या दोन्ही पक्षांची जवळजवळ सर्व सूत्रे आहेत व आलटूनपालटून तेच राज्य करत असतात. दुसऱ्या कुठल्या राजकीय पक्षाला स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे व टिकवणे तेव्हा अशक्यच होते व आजही अशक्यच आहे. नारायणस्वामींनाही आपले राजकीय अस्तित्व टिकवता आले नाही, त्यांची ससेहोलपटच झाली; अर्थात शेतकरीनेता म्हणून मात्र त्यांना राज्यात सर्वत्र मानाचे स्थान होते. पुढे त्यांचे जावई डॉ. शिवस्वामी हे त्यांच्या जागी आले, पण एक राजकीय पक्ष म्हणून त्यांची शेतकरी संघटना तमिळनाडूत कधीच स्थिरावली नाही.

कर्नाटकातही स्थानिक शेतकरीनेत्यांनी एक मोठी प्रभावी शेतकरी संघटना उभारली होती.

बंगलोरमधील एक तरुण शेतकरीनेते हेमंत कुमार पांचाल यांच्याशी अनेकवार चर्चा करायचा योग प्रस्तुत लेखकाला आला. आयआयटी, मद्रास येथे मिळालेला प्रवेश नाकारून हे ध्येयवादी युवक शेतकरी, शेतकरी आंदोलनात पडले. त्यांनी तब्बल बावीस वेळा तुरुंगवास भोगला आहे. त्यांचा व्यासंग व जनसंपर्कही दांडगा आहे. Agrarian movement in Karnataka: 1980 to 2000 या नावाने कर्नाटकातील शेतकरी आंदोलनाविषयी त्यांनी एक प्रबंधही लिहिला आहे. २१ जुलै १९८० रोजी कर्नाटकात नवलगुंद, नरगुंद, सावदत्ती आणि रामदुर्ग या चार तालुक्यांत शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन झाले होते. तेव्हापासून स्वतः धारवाड येथे शेती करत असलेल्या हेमंत कुमार यांचा शेतकरी आंदोलनाशी संबंध जुळून आला, तो आजवर कायम आहे. त्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. गुंडू राव हे तेव्हा कर्नाटकाचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या कडक आदेशावरून पोलिसांनी केलेल्या गोळीबारात बरेच शेतकरी हुतात्मा झाले. निपाणी येथे शरद जोशींच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनाच्या पूर्वीची ही घटना आहे. कर्नाटका राज्य रयत संघ ही राज्यातील सर्वांत मोठी शेतकरी संघटना. एच. एस. रुद्रप्पा, सुंदरेश आणि प्रा. नंजुंडस्वामी ह्यांनी रयत संघाला नेतृत्व दिले. नंजुंडस्वामी पुढे रयत संघाचे सर्वेसर्वा झाले. ते एकेकाळचे कट्टर लोहियावादी. एकीकडे नेहरू घराण्याला कडवा विरोध आणि त्याचवेळी उजव्या विचारसरणीलाही कडवा विरोध, असा हा संमिश्र वारसा होता. पुढे राजकारणप्रवेशाच्या मुद्द्यावरून या रयत संघातही फूट पडली. तिच्या सात जिल्ह्यांतील शाखांनी स्वतःचा एक राजकीय पक्ष स्थापन केला व ते मूळ रयत संघापासून वेगळे झाले. परिणामतः मूळ संघटना खूपच दुर्बळ झाली.

केरळमधील किसाननेते प्रा. बाबू जोसेफ व आंध्रातील रयतू संघमचे प्रमुख एस. पी. शंकर रेड्डी यांच्याशीही अनेक वर्षे जोशींनी संपर्क ठेवला; पण त्यांच्यामागे व्यापक अशा संघटना नव्हत्या. पंजाबात भूपिंदर सिंग मान यांच्या नेतृत्वाखाली प्रबळ शेतकरी संघटना आहे व ती अकाली दलाच्या विरोधात व काँग्रेसच्या बाजूने उभी असली तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सातत्याने तोंड फोडत असते. पंजाबवरील प्रकरणात तिच्याविषयी बरेच लिहिले गेले आहे. पण अन्य प्रांतांचा विचार केला तर उत्तर प्रदेश, हरयाणा व गुजरात वगळता कुठेच स्थानिक शेतकरी संघटना राज्यव्यापी प्रभाव टाकू शकल्या नाहीत व स्वतःही फारशा टिकल्या नाहीत.

खरे तर सगळ्याच किसाननेत्यांचा सुरुवातीला आग्रह असायचा, की आपली संघटना अराजकीय असावी; कदाचित राजकीय नेते आपल्यापेक्षा खूप ताकदवान आहेत व ते आपली संघटना गिळंकृत करून टाकतील, आणि मग एक दिवस आपल्यालाच तिथे काही स्थान उरणार नाही अशी त्यांना भीती वाटत असावी. तसे ते स्वाभाविकही होते; पण पुढे काळाच्या ओघात राजकारणात शिरण्याचे अनेक फायदे स्पष्ट होत गेले, राजकारणनिरपेक्षतेचा तो आग्रह मावळू लागला. स्वतः नारायणस्वामी नायडू यांनीच तसा पायंडा पाडून दिला होता.

अखिल भारतीय किसान युनियनचे काम फारसे पुढे जात नाहीये हे लक्षात आल्यावर, त्या संदर्भात काम करण्यासाठी जोशींनी Interstate Coordination Committee (ICC, ऊर्फ आंतरराज्य समन्वय समिती) स्थापन केली. या औपचारिक समन्वय समितीची

स्थापना त्यांनीच पुढाकार घेऊन ३१ ऑक्टोबर रोजी वर्धा येथे झालेल्या वेगवेगळ्या १४ प्रांतांतील किसाननेत्यांच्या एका बैठकीत केली होती. हिचेच रूपांतर पुढे Kisan Coordination Committee (KCC, ऊर्फ किसान समन्वय समिती) मध्ये झाले.

अन्य प्रांतांतील आंदोलनविस्ताराचा विचार करताना उत्तर प्रदेशातील किसाननेते चौधरी महेंद्रसिंग टिकैत यांचे नाव प्रामुख्याने पुढे येते. महेंद्रसिंग टिकैत हे एक लोकप्रिय, प्रामाणिक, रांगडे व काहीसे चमत्कारिक व्यक्तिमत्त्व. जाट कसे असतात ह्याविषयी असलेल्या प्रचलित कल्पनेत नेमके बसणारे. सिसौली हे त्यांचे मूळ गाव. तिथे त्यांची सात एकर वडिलोपार्जित शेती आहे. पण छोटी शेती असूनही त्यांना गावात व एकूणच त्या परिसरात खूप मान आहे. त्या भागात गेली सातआठशे वर्षे चालत आलेला खाप हा एक समाजरचनेचा प्रकार आहे. अनेक गावे मिळून एक खाप बनतो. टिकैत हे बालीयाना नावाच्या खापचे प्रमुख. त्यांच्या खापात आसपासची ८४ खेडी येतात. खापच्या प्रमुखाला चौधरी म्हणतात. माजी पंतप्रधान चरणसिंग हेही त्यांच्या खापचे प्रमुख होते. हे पद एवढ्या प्रतिष्ठेचे आहे, की चरणसिंग पंतप्रधान बनल्यानंतरसुद्धा आपल्या नावामागे आग्रहाने 'चौधरी' हे संबोधन लावून घेत. तिथले हे सर्वेसर्वा. नवरा-बायकोमधले भांडण असो की जमिनीवरूनचा तंटा असो, खापप्रमुख ठरवेल ते मान्य केले जाते. हे प्रमुखत्व वंशपरंपरेने येते. महेंद्रसिंग दुसरीत असतानाच त्यांचे वडील वारले व लगेचच ते त्यांच्या खापचे प्रमुख बनले. त्यांचे शालेय शिक्षण फक्त सहावीपर्यंत झाले आहे. पण त्यामुळे त्यांच्या समाजातील स्थानात काहीही उणेपणा आलेला नाही. ते जिथे जातील तिथे त्यांच्यासोबत त्यांचा एक भलामोठा हुक्का असे व कुठलीही चर्चा चालू असतानाही अधूनमधून ते तो ओढत असत. त्यांच्याबरोबर नेहमी चार-पाच बंदूकधारी पहारेकरीही असत. एक किसाननेता म्हणून साधारण १९८५च्या सुमारास ते पुढे आले.

पूर्वी एकदोनदा ते आंबेठाणला येऊन जोशींना भेटून गेले होते. जोशीही त्यांच्या गावी जाऊन आले होते. त्यावेळी टिकैतांचा महिलांकडे पाहण्याचा अगदी जुनाट असा दृष्टिकोन अनेकांना खटकला होता. शेतकरी संघटनेत स्त्री-पुरुष असा भेद फारसा कधीच मानला गेला नाही; किंबहुना कामातील स्त्रियांच्या सहभागाला उत्तेजनच दिले जाई. त्यामुळे साहजिकच आंबेठाणला ते आले तेव्हा काही महिला कार्यकर्त्याही तिथे होत्या. टिकैतना ते आवडले नव्हते; जसे जोशींनी जीन्स व टी-शर्ट घालणेही त्यांना पसंत नसे. ''असला पोशाख केलेल्या कोणाला मी कधी भेटतही नाही,'' असे तेच दोघांच्या पहिल्याच भेटीत म्हणाले होते. शरद जोशींच्या अगदी विरुद्ध असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

टिकैत यांचा शेतीप्रश्नाचा व्यासंग वगैरे अजिबात नव्हता; तसा एकूणच त्यांचा वैचारिक आवाका सीमित होता. पण त्यांच्यामागे जाट शेतकरी खूप मोठ्या प्रमाणात होते; त्यांनी केवळ तुतारी फुंकली तरी हजारो शेतकरी त्यांच्याभोवती जमा होत. दिल्ली जवळ असल्याने दिल्लीतही त्यांचा दबदबा होता. शिवाय त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी कोणालाही शंका नव्हती. त्यामुळे

जोशींनी त्यांच्याशी जुळवून घ्यायला सुरुवात केली. अनेकदा त्यांच्या गाठीभेटी होऊ लागल्या. शेतकरी संघटनेच्या महाराष्ट्रातील अनेक कार्यकर्त्यांना टिकैत मनातून आवडत नसत, पण जोशी त्यांना प्रत्येक वेळी सांभाळून घेत. आपल्याला जर अखिल भारतीय पातळीवर शेतकऱ्यांमध्ये काम करायचे असेल, तर सध्यातरी टिकैतना पर्याय नाही हे जोशी ओळखून होते. टिकैत यांचा ते गौरवाने उल्लेख करत व आपले सर्वच सहकारी त्यांना योग्य तो मान देतील याची काळजी घेत. टिकैत यांच्या कार्यकर्त्यांसाठी म्हणून जोशींनी हिंदीतून एक खास प्रशिक्षण शिबिर घेतले होते व त्याने टिकैत स्वत:ही खूप प्रभावित झाले होते.

किसान समन्वय समितीच्या पाच-सहा बैठकांमध्ये जोशींनी त्यांना सामील करून घेतले होते. 'कुठल्याही परिस्थितीत राजकीय नेत्यांना किसान आंदोलनापासून दूर ठेवायचे' हा टिकैत यांचा आग्रह होता. या मुद्द्यावरून ते खूपदा जोशींशी फटकून वागत. दोघांची भेट झाली त्या काळात राजकारणात प्रवेश करायची अपरिहार्यता जोशींना पटली होती; पण तो विवादास्पद मुद्दा नजरेआड करून त्यांनी टिकैत यांच्याशी कायम संपर्क ठेवला होता.

१२ फेब्रुवारी १९८८ रोजी टिकैत यांनी मीरत येथे शेतकऱ्यांचा एक मोठा मेळावा घेतला होता. त्याला लेखक व पत्रकार आणि त्यावेळी 'ग्यानबा'चे मुद्रक व प्रकाशक असलेले नाशिकचे प्रा. मिलिंद मुरुगकर हजर होते आणि त्यांनी 'ग्यानबा'मध्ये त्यावर मुखपृष्ठकथाही लिहिली होती. (*शेतकरी उभा आहे – हिंमत असेल तर गोळ्या घाला,* 'आठवड्याचा ग्यानबा', २२ फेब्रुवारी ते १ मार्च १९८८)

टिकैत यांचे व्यक्तिमत्त्व दाखवून देणारा एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. १९८७ साली २३ सप्टेंबरला हरयाणातील सुरज कुंड येथे विरोधी पक्ष नेत्यांची एक बैठक भरली होती. व्ही. पी. सिंग यांनी राजीव गांधींविरुद्ध बंद पुकारल्यानंतर लगेचच घडलेली ही घटना. तिला सिंग यांच्याप्रमाणेच देवी लाल, अरुण नेहरू, आरिफ मोहमद खान, हेमवती नंदन बहुगुणा, अटल बिहारी वाजपेयी वगैरे बडे नेते हजर होते. टिकैतनाही आमंत्रण होते. आपल्या मळक्याकळक्या खादीच्या कपड्यांत ते हजर होते. इतरांपेक्षा अगदी वेगळे दिसत होते. सगळ्यांचे त्यांच्याकडे सतत लक्ष लागलेले होते. अधूनमधून ते बोलत होते, पण त्यांची ग्रामीण बोली अनेकांना समजत नव्हती. शेवटी न राहवून वाजपेयी त्यांना म्हणाले, ''चौधरी साहब, आपकी बात समझ मे नही आ रही है.'' टिकैत सटकन म्हणाले, ''हम गाव वालों की बात ना समझने के कारण ही देश का ये हाल हुवा है!'' सगळ्यांना हसू आवरेना. बैठकीचा पूर्वार्ध संपल्यावर जेवायची वेळ झाली. बुफे मांडला होता. सगळे नेते हातात प्लेट घेऊन नेहमीप्रमाणे उभ्याने जेवू लागले. टिकैत यांनी मात्र चक्क जमिनीवर मांड ठोकली व ते हाताने जेवू लागले. इतरांकडे बघून ते मोठ्याने म्हणाले, ''अरे बेइमानों, देश को खडे खडे क्यों चबा रहे हो? इसे बैठकर ही खा लो!''

त्यांचा हा फटकळपणा लोकांना आवडत असे. पत्रकारांशीही ते तसे उद्धटपणे बोलत. म्हणत, ''तुम आज कल के पढे लिखे लोक समझते बहुत कम हो!'' त्यांचे असले बोलणे पत्रकारही मनाला लावून घेत नसत. टिकैत मोठमोठ्या नेत्यांना नावानिशी आपल्या ग्रामीण

बोलीत अस्सल शिव्याही हाणत असत. हा त्यांचा विक्षिप्तपणाही माध्यमांना आवडत असे! थोडक्यात म्हणजे, टिकैतना उत्तम 'न्यूज व्हॅल्यू' होती.

टिकैत यांचा भाग म्हणजे पश्चिम उत्तर प्रदेशातील मीरतपासून ते मुझफ्फरनगरपर्यंतचा. हा भाग तसा खूप सुपीक आहे. शिवाय दिल्लीपासून तो तुलनेने बराच जवळ आहे. तिथे बारीकशी काही घटना घडली तरी लगेच दिल्लीत तिचे पडसाद उमटतात. बहुतेक मुख्य माध्यमसमूह व पत्रकार दिल्लीत असल्याने ती बातमी लगेच देशभर पसरते. टिकैत यांच्या अनुयायांनी अनेकदा दिल्लीत निदर्शने केली, वेढे घातले व त्याच्या बातम्या सर्वदूर पसरल्या. त्यामुळे आपोआपच किसाननेता ही टिकैत यांची प्रतिमा देशभर सहजगत्या पसरली. हा फायदा जोशींना (पंजाब आंदोलनाचा अपवाद सोडला तर) किंवा दिल्लीपासून दूर असलेल्या अन्य कुठल्याच शेतकरीनेत्याला मिळाला नाही.

एकदा टिकैत आणि जोशी या दोघांमध्ये उघड उघड फूट पडल्याचे दिसून आले. ही घटना दिल्लीची. ११ व १२ सप्टेंबर १९८८ रोजी दिल्लीला किसान समन्वय समितीची बैठक भरली होती. ''तुम्ही व्ही. पी. सिंग यांना सामील आहात, मी तुमच्याबरोबर काम करू शकणार नाही'' असे जोशींना म्हणत टिकैत यांनी त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसह सभात्याग केला. आपली भूमिका जोशींनी पुनःपुन्हा सांगूनही टिकैतना काही पटत नव्हती. त्यांना अशी शंका येत होती, की शरद जोशी ह्यांना व्यक्तिगत राजकीय महत्त्वाकांक्षा आहे व त्यासाठी ते आपला वापर करून घेतील. पत्रकारांनीही ह्या फुटीला जास्तच प्रसिद्धी देऊन आगीत तेल ओतायचेच काम केले. खूप मनधरणी करून शेवटी जोशींना त्यांच्याशी पुन्हा जुळवून घ्यावे लागले. पुढे २००३ साली स्वतः टिकैत यांनीही काँग्रेसमध्ये व पुढे भाजपामध्ये प्रवेश केला; खरेतर शरद जोशींच्या राजकारणप्रवेशाला पूर्वी विरोध करणाऱ्या अनेकांनी स्वतःही पुढे तेच केले; पण तो बऱ्याच नंतरचा भाग झाला.

राष्ट्रीय पातळीवर सगळ्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी दोघांनी मिळून दिल्लीच्या बोट क्लबवर शेतकऱ्यांचा एक विशाल मेळावा घ्यायचे ठरवले. त्याच्या पूर्वतयारीसाठी ३ जून ८९ रोजी टिकैत त्यांच्या साथीदारांसह आंबेठाणला आले व दोन दिवस राहिलेसुद्धा. त्यांचे बंदूकधारी शरीररक्षक बैठकीत हजर असता कामा नयेत, हे जोशींचे म्हणणे बराच वाद घातल्यानंतर एकदाचे त्यांनी मान्य केले; हे शरीररक्षक अंगारमळ्याच्या प्रवेशद्वारापाशी थांबले. चर्चा आपापसातले मतभेद कायम ठेवूनही तशी विधायक झाली. मेळाव्यात निवृत्त जवानांनादेखील सामील करायचे ठरले. अनेक जवान काही वर्षे नोकरी केल्यानंतर पुन्हा आपल्या वडिलोपार्जित शेतावर काम करू लागत. देशाच्या बहुतेक सर्वच भागांत ही परिस्थिती होती. लष्करातले अधिकारी जरी शहरातील असले, तरी जवान मात्र खेड्यापाड्यांतीलच असतात, हे जोशींचे एक जुनेच निरीक्षण होते. या निवृत्त जवानांचे काही प्रलंबित प्रश्न होते. एक हुद्दा, एक निवृत्ती वेतन (One Rank, One Pension) ही त्यांची एक प्रमुख मागणी होती. कारण एकाच हुद्द्यावरून निवृत्त झालेल्या जवानांच्या निवृत्ती

वेतनात किती वर्षे नोकरी केली यानुसार फारच फरक पडत असे. ही मागणी अगदी अलीकडे नरेंद्र मोदी सरकारने मान्य केली. किसान व जवान यांच्यात तसे भावनिक ऐक्य होतेच. 'जय जवान, जय किसान' या माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेल्या प्रसिद्ध घोषणेत ते प्रतिबिंबित झाले आहे.

या मेळाव्याची जय्यत तयारी केली गेली. १३ व १४ जुलै १९८९ रोजी दिल्लीतील मंदिर मार्गावरील एका सभागृहात किसान समन्वय समितीची बैठक झाली. इंडियन एक्स्प्रेसच्या वार्ताहर नीरजा चौधरी यांनी दिलेल्या बातमीनुसार, देशभरातील ३४ शेतकरी संघटनांचे १७५ प्रतिनिधी बैठकीला हजर होते. हे बहुतेक प्रतिनिधी अगदी गरीब परिस्थितीतील होते, अनेक जण स्वतःच शेतकरीही होते. दिल्लीला यायचा काहींचा हा पहिलाच प्रसंग होता. अनेकांकडे जेमतेम दुसऱ्या वर्गाच्या ट्रेन प्रवासापुरते पैसे होते. हे सारे बघून दिल्लीतील पत्रकारही भारावून गेले होते.

'एक नेता, एक झेंडा, एक नाव' हा आपला नेहमीचा मुद्दा टिकैत यांनी इथेही रेटून धरला. आपणच देशभरातील शेतकऱ्यांचे नेते बनावे ही महत्त्वाकांक्षा आता त्यांच्या मनात उघड उघड निर्माण झाली होती. जोशींनी नेहमीप्रमाणे आपली समिती एक स्वतंत्र संस्था नसून ती इतर अनेक स्वतंत्र संस्थांमध्ये समन्वय असावा म्हणून निर्माण झाली आहे व त्यामुळे तिचे नेतृत्व हे सामूहिकच असावे; तसेच सध्या एक झेंडा, एक नाव यांचा आग्रह न धरता काही काळ तरी असेच अनौपचारिकपणे एकत्र काम करावे ही आपली बाजू मांडली. अन्य सर्व सदस्यांचा जोशींच्या म्हणण्याला पाठिंबा दिसल्याने टिकैतनी मग आपला आग्रह तात्पुरतातरी बाजूला ठेवला. बैठकीत मेळाव्यासाठी २ ऑक्टोबर १९८९ ही तारीख ठरली. बोट क्लब ही जागाही नक्की झाली.

मेळावा यशस्वी व्हावा म्हणून जोशींनी आपले सगळे सामर्थ्य पणाला लावले. एका अर्थाने दिल्लीत होणारे ते शक्तिप्रदर्शनच होते. 'चलो दिल्ली' अशी घोषणा देत महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने अनेक सभा घेतल्या, प्रचार केला. प्रत्यक्षात मेळाव्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. जागोजागीचे शेतकरी (सोबत बऱ्यापैकी संख्येने जवानही होते) आदल्या दिवशीच दिल्लीत येऊन दाखल झाले. पुन्हा हा मेळावा म्हणजे शासनपुरस्कृत शेतकरी मेळावा नव्हता; इथे ना कोणाला फुकट खायला दिले गेले, ना दारूची बाटली दिली गेली, ना काही पैसे दिले गेले, ना त्यांच्या जाण्यायेण्याची व राहण्याची काही सोय केली गेली. सर्व जण स्वतःच्या खर्चाने आले होते. दिल्लीकरांनी एवढा विशाल मेळावा व तोही अशा प्रकारे आयोजित केलेला, पूर्वी कधी पाहिला नव्हता. महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर शेतकरी दिल्लीत दाखल झाले होते. इतरही प्रांतांतून शेतकरी जमले होते. पंजाब-हरयाणातून अनेक जण ट्रॅक्टर घेऊन आले होते. आजूबाजूचे रस्ते त्या ट्रॅक्टर्सनी भरून गेले होते. सगळी दिल्लीच शेतकरीमय झाली होती. दोन ऑक्टोबरच्या सकाळपासून दिल्लीत सगळ्यांच्या तोंडी हाच विषय होता. सर्व वृत्तपत्रांनी मेळाव्याला भरपूर प्रसिद्धी दिली होती. दिल्लीतील राजकीय नेतेही ह्या मेळाव्याने हादरले होते. दिल्लीतील सत्तेपुढे हे शेतकऱ्यांचे आव्हान इतक्या मोठ्या प्रमाणावर

प्रथमच उभे राहत होते.

सभास्थानी साधारण चार ते पाच लाख शेतकरी जमले होते; सभा सुरू व्हायची आतुरतेने वाट पाहत होते. दुर्दैवाने सभा सुरू होणार त्याचवेळी टिकैत व त्यांच्या सहकाऱ्यांनी तो मेळावा उधळून लावला. खरे तर सगळे काही टिकैत यांच्या कलाने घेतले गेले होते; अगदी व्यासपीठावर त्यांचा तो प्रसिद्ध हुक्काही विराजमान झाला होता. पण हा मेळावा होऊच द्यायचा नाही, सभा उधळून लावायची असा जणू काही टिकैत यांनी कटच रचला होता. बोटक्लबवरील या सभेच्या पूर्वी सकाळीसकाळीच शरद जोशी राजीव गांधी यांना त्यांच्या घरी जाऊन भेटले होते व त्यांच्यात काही गुप्त खलबते झाली होती, असे कोणीतरी टिकैतना सांगितले होते. देवी लाल यांनी त्यांचे कान फुंकले असावेत, असेही काही जणांचे म्हणणे होते. कदाचित टिकैतना जोशी यांचा मत्सरदेखील वाटला असेल. कारण मेळाव्याचे वैचारिक नेतृत्व जोशींकडे जाणार, त्यांच्याच भाषणाला वृत्तपत्रे प्रसिद्धी देणार हे स्पष्ट होत गेले होते. नेमके काय घडले, ते सांगणे अवघड आहे; पण एवढे खरे, की टिकैत यांच्या सहकाऱ्यांनी सरळ स्टेज उखडून टाकायला सुरुवात केली. एकेक करत ते व्यासपीठाचे खांब काढून बाजूला फेकून देऊ लागले. मंचावर धक्काबुक्की सुरू झाली. सगळीकडे एकच गोंधळ माजला. काय होते आहे, कोणालाच कळेना. एकूण रागरंग ओळखून व ह्यात आपल्या नेत्याच्या जिवाचे काही बरेवाईट होऊ शकेल ह्याची जाणीव होऊन, जोशी यांच्या सहकाऱ्यांनी त्यांची कशीबशी मागच्या बाजूने स्टेजवरून सुटका केली. खाली मैदानावर बद्रीनाथ देवकर व इतर काही निष्ठावान सहकारी उभे होते. त्यांनी हातांची झोळी करून जोशींना सुखरूप व्यासपीठापासून दूर नेले. त्यामुळे खरे तर ते बचावले. पण छातीत दुखू लागल्याने त्यांना थेट रुग्णालयातच न्यावे लागले; पुढचे दोन दिवस तिथेच काढावे लागले.

हा मेळावा म्हणजे गेली दहा वर्षे जोशी लढवत असलेल्या शेतकरी आंदोलनाचा कळसबिंदू होता. माध्यमेही यावेळी त्यांना बऱ्यापैकी जागा देत होती; विशेषतः इंग्रजी माध्यमे. दिल्लीत पदार्पण करणे त्यादृष्टीने उपयुक्त ठरले होते.

तसे पहिले तर मराठी पत्रकारांपेक्षा इंग्रजी व हिंदी पत्रकारांनीच ह्यावेळेपावेतो जोशींची जास्त दखल घेतली होती. सुरुवातीच्या काळात आंदोलनाचा झपाटाच इतका तीव्र होता, की कितीही म्हटले तरी जोशींना पूर्णतः डावलणे मिडीयाला (त्या काळाच्या संदर्भात वृत्तपत्रकारांना) अवघड होते. अगदी प्रथम, म्हणजे ऑगस्ट १९८१ मध्ये, *डेबोनेर* या उच्चभ्रू वर्गात वाचल्या जाणाऱ्या इंग्रजी मासिकात सुधीर सोनाळकर यांनी घेतलेली त्यांची पाच-पानी मुलाखत प्रसिद्ध झाली होती. *बिझिनेस वर्ल्ड* या कलकत्यातील आनंद बझार ग्रुपच्या इंग्रजी पाक्षिकाने त्यांच्यावर 'Why Bharat has declared war on India' या शीर्षकाची मुखपृष्ठकथा केली होती (जुलै १६ ते २९, १९८४चा अंक). स्वतः संपादक दिलीप ठाकोर यांनी त्यात त्यांच्यावर तब्बल आठ पानांचा उत्तम लेखही लिहिला होता. त्याच वर्षी *सोसायटी* मासिकाच्या वार्षिक विशेषांकात 'भारतातील ५० सर्वांत प्रभावशाली' व्यक्तींमध्ये जोशींचा

समावेश केला गेला होता. शोभा डे यांनी कौतुकाने त्यांचा उल्लेख 'जीन्सधारी गांधी' ('Gandhi in Denim') असा केला आहे. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे निपाणी आंदोलनात मुंबईच्या ओल्गा टेलिस हिरीरीने सहभागी झाल्या होत्या, त्याविषयी त्यांनी मुंबईतील इंग्रजी वृत्तपत्रांत लिहिलेही होते. *इलस्ट्रेटेड विकली ऑफ इंडिया* या त्याकाळी देशात सर्वाधिक खप असलेल्या साप्ताहिकानेही त्यांच्या १ ते ७ जानेवारी १९८९ अंकात 'Watch Out! People capable of making it to the big, big league' या शीर्षकाखाली केलेल्या पन्नास भारतीयांच्या सचित्र यादीत जोशींचे नाव घेतले होते. चंडीगढ आंदोलनाची दखलही पंजाबातील व दिल्लीतील वृत्तपत्रांनी बऱ्यापैकी घेतली होती. दिल्लीच्या बोट क्लबवर भरवलेला हा प्रचंड शेतकरी मेळावा ही राष्ट्रीय मंचावर प्रकाशझोतात यायची एक मोठीच संधी होती. तसे झाले असते, तर महाराष्ट्रातील पत्रकारांनी आपल्याला न्याय दिला नाही ही त्यांची खंत दूर झाली असती व एकदा दिल्लीत तुम्ही चमकू लागलात, की मग राज्यातील माध्यमे तुम्हांला टाळूही शकली नसती. पण त्याहून खूप अधिक महत्त्वाचे म्हणजे कदाचित शरद जोशी हे देशाचे भावी पंतप्रधान असतील, अशीही चर्चा तेव्हा सुरू झाली होती.

दुर्दैवाने अगदी हातातोंडाशी आलेली ही संधी हुकली. त्यानंतर जोशींचे नाव राजकीय वर्तुळात आणि मिडीयाच्या दृष्टीने मागे पडले ते कायमचेच. शेतकरी संघटनेनेदेखील राष्ट्रीय पातळीवर एवढी उंची नंतर कधीच गाठली नाही.

पंजाबचा अपवाद सोडला तर अन्य कुठल्याही प्रांतापेक्षा शरद जोशींनी गुजरातमध्ये सर्वाधिक काम केले. २ ऑक्टोबर १९८४ रोजी गुजरातेतील बारडोली येथून ज्या दोन प्रचारयात्रा निघाल्या; त्यांतील एक गुजरातेत गेली व एक महाराष्ट्रात आली, याचा उल्लेख पूर्वी झालाच आहे. जोशी स्वतः गुजरातेतील यात्रेत सामील झाले होते. गुजरातमधील यात्रेचा समारोप ९ ऑक्टोबर रोजी अहमदाबादजवळ साबरमती आश्रमात एका प्रचंड सभेने झाला.

व्ही. पी. सिंग यांच्याबरोबर त्यांनी महाराष्ट्राप्रमाणे गुजरातचा दौराही केला होता व त्या दरम्यान अहमदाबादमध्ये मोठी जाहीर सभाही घेतली होती. अहमदाबादला झालेल्या प्रचंड सभेनंतर तेथे किसान समन्वय समितीची राष्ट्रीय बैठक भरली होती व तिलाही सिंग हजर होते. एका भावी पंतप्रधानाला शेतकऱ्यांच्या बाजूने वळवायचा जोशींचा तो प्रयत्न होता.

शरद जोशी यांचे शेतकरी आंदोलनातले दोन अतिशय जवळचे मित्र म्हणजे सुरतचे बिपीनभाई देसाई व गुणवंतभाई देसाई. दोघेही स्वत: शेतकरी व शेतकरी आंदोलनात सक्रिय. दोघेही हाडाचे गांधीवादी. गांधीविचारानुसार आयुष्यातील प्रत्येक पाऊल टाकणारे. बिपीनभाई गुजरात खेडूत समाजाचे वर्षानुवर्षे अध्यक्ष होते. (गुजरातीत खेडूत म्हणजे शेतकरी.) एका विद्यापीठाचे उपकुलगुरूही होते. दोघांमध्ये रक्ताचे नाते असे काहीच नाही; पण सख्ख्या भावांहून अधिक प्रेम. दोघांची आयुष्ये एकात एक मिसळून गेलेली. दोघांची शेतीही एकत्र. त्यांची मैत्री म्हणजे एक जगावेगळा प्रयोग होता. त्यांच्या गुजरातीतील एकत्रित चरित्राचे नाव 'अमीट ऐक्य' आहे. सुरत-भरूच-बारडोली-नवसारी परिसरात घरोघरी दोघांच्या मैत्रीची चर्चा

असे. दोघांचा बँक अकौंटदेखील एकत्रच. आयुष्यभर दोघे एकत्र राहिले. एकाच घरात. दोघांचीही कुटुंबेही एकाच घरात राहिली. आज दोघेही हयात नाहीत.

गुणवंतभाईंचे एकुलते एक चिरंजीव परिमलभाई. ते सिव्हिल इंजिनिअर असून व्यवसायाने बिल्डर आहेत, पण सामाजिक कामात आस्था ठेवून वडलांचा वारसा पुढे चालवतात. या चरित्रलेखनासंदर्भात काही माहिती गोळा करण्याच्या निमित्ताने त्यांना भेटायचा व प्रत्यक्ष जाऊन नर्मदा धरण (सरदार सरोवर प्रकल्प) बघण्याचा योग आला. परिमलभाई सांगत होते,

''बिपीनभाई व गुणवंतभाई या दोघांनाही शरद जोशींबद्दल फार प्रेम. १९८० सालच्या नाशिक ऊस आंदोलनाबद्दल ऐकल्यानंतर दोघेही मुद्दाम आंबेठाणला जाऊन जोशींना भेटले. पहिल्या भेटीतच मनं जुळली. शेतकरी संघटनेच्या नंतरच्या सगळ्या प्रमुख आंदोलनांत गुजरातचे काही प्रतिनिधी घेऊन दोघे आवर्जून सामील होत. जमेल तेवढी आर्थिक व सर्व प्रकारची मदतही करत. १९८४मध्ये चंडीगढ आंदोलनात जोशींना जेव्हा अटक झाली, तेव्हा त्यांच्याबरोबर हे दोघेही होतेच.''

पुढे परिमलभाई सांगू लागले,

''१९९९मध्ये जोशींना हृदयविकाराचा झटका आला, तेव्हा महाराष्ट्रात त्यांना विश्रांती मिळेना. गुणवंतभाईंनी त्यांना आंबेठाणला फोन केला, 'सरळ आमच्या घरी या, इथेच तुम्हाला खरी विश्रांती मिळेल.' जोशी आनंदाने आले. आठ दिवसांनी दोघांनी स्वतःबरोबर त्यांना बडोद्याला एका निसर्गोपचार केंद्रात नेलं. तिथल्या उपचारांवर त्या दोघांचा पूर्ण विश्वास. तेथील मुक्कामात जोशींना आणखीच बरं वाटलं.''

अधूनमधून ते भेटीगाठींसाठी जवळपास मोटारने जात असत. ते पावसाळ्याचे दिवस होते व एकदा तिघे बडोद्यावरून सुरतच्या दिशेने येत होते. वाटेत तुफान पाऊस झाला व त्याचवेळी नर्मदेला आलेल्या पुरामुळे रस्त्यांवरून पाणी वाहू लागले. जागोजागी गुडघाभर पाणी. एक दिवस त्यांना वाटेतच मुक्काम करावा लागला. आश्चर्य म्हणजे त्याचवेळी उत्तर व पश्चिम गुजरातमध्ये, विशेषतः कच्छ व सौराष्ट्रात, टिपूसभरसुद्धा पाउस नव्हता. पाण्याअभावी तडफडणाऱ्या गाईगुरांची छायाचित्रे, अहमदाबादेत गृहिणींनी पाण्यासाठी काढलेले मोर्चे यांनी वृत्तपत्रांची पाने भरली होती. त्याचवेळी शेजारी दक्षिणेतील या भयानक दुष्काळाच्या बातम्याही छापलेल्या होत्या. महाराष्ट्रात जसा एकेकाळी दुर्गादेवीचा दुष्काळ पडला होता, तसाच एक भीषण दुष्काळ पूर्वी गुजरातेत पडला होता, ज्याला 'छप्पनिया' दुष्काळ म्हणतात. १९९९ सालच्या दुष्काळातही त्या 'छप्पनिया' दुष्काळाची शेतकऱ्यांना आठवण होत होती. अतिशय विचित्र परिस्थिती होती – एकीकडे महापूर तर दुसरीकडे अवर्षण. बिपीनभाई आणि गुणवंतभाईंशी जोशींची तीच चर्चा सतत सुरू होती.

इतर अनेक गांधीवाद्यांप्रमाणे त्या दोघांचाही एकेकाळी 'नर्मदा बचाव' आंदोलनाला पाठिंबा होता. चर्चेत तो मुद्दा पुनःपुन्हा येत होता. दक्षिणेतील ह्या महापुराला अतिपाऊस हे कारण होतेच; पण आणखीही एक कारण म्हणजे नर्मदा बचाव आंदोलनाने अगदी आंतरराष्ट्रीय

पातळीवर धरणाला केलेला विरोध, त्याला माध्यमांनी दिलेली अमाप प्रसिद्धी व पुढे प्रकरण कोर्टात गेल्यावर कोर्टाने आणलेली धरणाच्या बांधकामावरील व धरणाचे पाणी तयार असलेल्या कालव्यांत सोडण्यावर घातलेली बंदी. अतिवृष्टीमुळे नर्मदेचे पाणी दुथडी भरून वाहत धरणापर्यंत पोचत होते, पण धरणाच्या भिंतींची उंची फक्त ८० मीटर, म्हणजे नियोजित उंचीपेक्षा फक्त निम्मीच असल्याने नदीचे बरेचसे पाणी धरणात थांबत नव्हते आणि त्याचवेळी धरणातले पाणी धरणाला लागूनच तयार असलेल्या मुख्य कालव्यात सोडायला बंदी असल्याने, हे पाणी सरळ आसपासच्या परिसरात वाट फुटेल तसे पसरत होते. पुराचे एक मोठे कारण हेही होते. मुख्य कालव्यात ते पाणी सोडले असते, तर तिथून पुढे तयार असलेल्या सगळ्या कालव्यांच्या जाळ्यात ते आपोआप गेले असते व गुजरातच्या कानाकोपऱ्यात पोचले असते. उत्तर गुजरातच्या सुकलेल्या शेतजमिनीला तर ते अमृतच ठरले असते. पण धरणातले पाणी मुख्य कालव्यात सोडायलाच बंदी असल्याने असे काहीच चांगले घडू शकत नव्हते; उलट ते अतिरिक्त पाणी अस्ताव्यस्त इकडेतिकडे जाऊन महापुराचा धुमाकूळ घालत होते. शेतकऱ्यांची उभी पिके वाहून गेली होती.

आंदोलनात ह्या शेतकऱ्यांची बाजू कोणीच समजून घेत नव्हते. ह्याचा निषेध म्हणून जोशींनी धरणातले साठवलेले पाणी शेजारीच तयार असलेल्या मुख्य कालव्यात कळशी-कळशीने सोडायचा निर्धार केला. धरणविरोधाला शेतकऱ्यांच्या असलेल्या विरोधाचे एक प्रतीक म्हणून हे नर्मदा जनआंदोलन करायचे ठरले. आंदोलनाची तारीख ठरली ४ डिसेंबर १९९९. तसे करताना पोलीस आपल्याला पकडणार ह्याची त्यांना खात्री होती पण तरीही हे एक पवित्र काम समजून त्यांनी हा निर्णय घेतला होता. ह्या आंदोलनाला त्यांनी 'कारसेवा' असेच म्हटले होते व त्याची माहिती शेतकरी बांधवांपर्यंत पोचवण्यासाठी २१ नोव्हेंबर १९९९च्या 'शेतकरी संघटक'मध्ये लिहिलेल्या लेखाचे शीर्षक त्यांनी दिले होते, 'तहानलेल्याला पाणी देणे हा गुन्हा असेल तर...'

आंदोलनाचा निर्णय झाल्यावर आदले काही आठवडे जोशींनी कसलीच तमा न बाळगता गुजरातभर हिरिरीने प्रचार केला. बिपीनभाई देसाई व गुणवंतभाई देसाई अर्थातच त्यांच्याबरोबर होते. धरणाला असलेला त्यांचा आधीचा विरोध आता पूर्ण मावळला होता व शेतकऱ्यांच्या दृष्टीने ते धरण होणे अत्यावश्यक आहे हे त्यांना पटले होते. ते वर्ष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १२५व्या जयंतीचे वर्ष होते. त्या जयंती महोत्सवाचा प्रारंभ ३१ ऑक्टोबर रोजी अहमदाबादमध्ये एका कार्यक्रमाने झाला. जोशी त्या कार्यक्रमात एक वक्ते होते. 'सरदार सरोवर प्रकल्प' हाच जोशींच्या भाषणाचा विषय होता.

खरे तर नर्मदा धरणाला जोशींचा फार पाठिंबा होता अशातला भाग नव्हता; मोठ्या धरणांमुळे शेतकऱ्यांचा फारसा फायदा होत नाही, सत्ताधारी व नोकरशहा यांचाच त्यात खरा फायदा असतो, याची कॉलेजात शिकत असल्यापासून जोशींना जाणीव होती. किंबहुना हा त्यांच्या एक विशेष अभ्यासाचा विषय होता. पण यावेळी त्यांचा आग्रह हा होता, की जर

कालवे बांधून तयार असतील, तर त्यांचा वापर करून पाण्यासाठी तहानलेल्या जमिनीला व लोकांना पाणी पुरवले पाहिजे.

आपल्या भाषणात जोशी म्हणाले,

''काही लोक म्हणतात, की ह्या धरणाचं पाणी सौराष्ट्र व कच्छच्या गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोचणारच नाही. मी म्हणेन, की मदर तेरेसा रस्त्यावर पडलेल्या जखमी माणसाला उचलून इस्पितळात घेऊन जात, तेव्हा त्या असा विचार करत नसत, की हा मनुष्य वाचेल की न वाचेल. तो वाचेल वा न वाचेल, पण त्याला निदान इस्पितळात नेणं हे आपलं कर्तव्य आहे. तसंच इथे आहे. समोर पाण्याचा दुष्काळ उघड दिसत असेल, तर शक्य तितकं पाणी त्या प्रदेशाच्या शक्य तितकं जवळ नेणं हा एक मानवीय कार्यक्रम आहे. एकीकडे पाणी आहे, दुसरीकडे तहान आहे. तेव्हा ते पाणी तहानेकडे नेण्याचा आमचा कार्यक्रम आहे.''

श्रोत्यांमध्ये भाजपचे मोठे नेते व गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री केशुभाई पटेल तसेच गुजरातचे राज्यपालही होते. दुर्दैवाने त्या आंदोलनात गुजरात सरकारने जोशींना काहीही सहकार्य दिले नाही; उलट कडवा विरोधच केला. जोशींचा भाजपविरोध त्याला कारणीभूत असावा. किंवा कदाचित ह्या कारसेवेचे सगळे श्रेय गुजरात खेडूत समाज ह्या संघटनेला मिळू नये, भारतीय किसान संघ ह्या संघप्रणीत संस्थेचाही त्यात समावेश असावा, आपल्यालाही ह्याचे श्रेय मिळावे असाही काही विचार त्यांनी केला असणे शक्य आहे. धरणाचे काम बंद असतानाही तिथे जे कंत्राटदार होते, त्यांचे रोजचे जवळपास एक कोटीचे पेमेंट चालूच होते. ह्या फुकटच्या पैशाचा काही हिस्सा वरपर्यंत पोचत असणेही अशक्य नाही. नेमके काय कारण असेल ते सांगणे अवघड आहे, पण ह्या उपक्रमाला गुजरात सरकारने विरोध केला हे नक्की. याउलट लोकांचा मात्र त्याला पाठिंबा होता. किंबहुना, महाराष्ट्रातील एखादा शेतकरीनेता इथे येऊन धरणाच्या बाजूने बोलतो आहे याचेच जनतेला अप्रूप होते.

त्या डिसेंबरमध्ये जवळजवळ पाच हजार शेतकरी ह्या जनआंदोलनात भाग घेण्यासाठी केवाडिया कॉलोनीकडे, जिथे मुख्य धरणप्रकल्प आहे त्या गावी, निघाले. पोलीस बंदोबस्त कडेकोट होता व बहुतेक आंदोलकांना वाटेतच अडवले गेले. एक लांबचलांब मानवी साखळी तयार करायची व धरणातले कळशीभर पाणी उपसून ते एकाच्या हातातून दुसऱ्याच्या हातात असे करत नर्मदेच्या मुख्य कालव्यात ते पाणी सोडायचे, अशी जोशींची आधी कल्पना होती. धरणातले पाणी कालव्यात सोडणे हे तसे सामान्य माणसाला अशक्यच असते, पण ही केवळ प्रतीकात्मक कृती होती. पर्यावरणवादी, लेखक, समाजकार्यकर्ते, राजकारणी, अर्थतज्ज्ञ, अर्थपुरवठादार, न्यायालये अशा सगळ्यांची मते तुम्ही धरणाबद्दलचे धोरण ठरवताना विचारात घेता, मग त्यांच्याप्रमाणे धरणाच्या पाण्यावर जे अन्न पिकवणार, त्या शेतकऱ्यांचाही या संदर्भात विचार करा असे समाजाला सांगण्यासाठी. सगळेच नर्मदा धरणाच्या विरोधात नाहीत, काही जण त्या धरणाच्या बाजूनेही आहेत हे माध्यमांना समजावे म्हणून. पण प्रचंड पोलीस बंदोबस्तामुळे तशी प्रतीकात्मक कृती करणेही अशक्य बनले होते.

ह्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आदल्या रात्री जोशी आपल्या दहा-बारा निवडक सहकाऱ्यांसमवेत केवाडिया कॉलोनीच्या मागच्या बाजूने डोंगराळ भागातून गुपचूप निघाले. जवळजवळ बारा किलोमीटर अंतर त्यांनी पायी कापले. नंतर थोडा वेळ ते घोड्यावरून गेले. नंतर शेवटचे दोन-तीन किलोमीटर पुन्हा पायी गेले. त्यावेळी त्यांचे वय ६४ होते व ते नुकतेच हृदयविकाराच्या झटक्यातून उठले होते हे विचारात घेता हे धाडस अविश्वसनीय वाटावे असेच होते. पहाटेच्या अंधारात पोलिसांची नजर चुकवत चुकवत ही मंडळी कशीबशी आंदोलनस्थळापाशी पोचली. कळशीभर पाणी जोशींनी धरणातून काढले व कालव्यात ओतले. एक अतिशय अवघड अशी, किंबहुना अशक्य वाटणारी कृती, प्रतीकात्मक स्वरूपात का होईना पण, केली.

ह्या धरणामुळे आज सौराष्ट्र व कच्छ ह्या कायम दुष्काळी भागासह जवळजवळ सर्व गुजरातला पाणी मिळत आहे व गुजरातच्या खूप मोठ्या भागातील शेती आज हिरवीगार झालेली दिसते हा धरणाचा मोठाच फायदा आहे, पण मध्यप्रदेश व महाराष्ट्र ह्या राज्यांनाही धरणामुळे वीज व पाणी ह्या दोन्हीचा कमी-अधिक प्रमाणात लाभ मिळत आहे. ह्या साऱ्या प्रकल्पात महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांचेदेखील आपल्याला प्रतीकात्मकतरी पाठबळ होते ह्याची जाण परिमल देसाईंसारखे काही जण तरी नक्की ठेवून आहेत.

अन्य प्रांतांतील शेतकरी आंदोलनांशी जोडून घेऊन एक भारतव्यापी शक्तिस्थान निर्माण करायचा प्रयत्न बोट क्लबवरच्या उपरोक्त फसलेल्या मेळाव्यानंतर जोशींनी सोडून दिला. किसान समन्वय समितीच्या बैठका तशा होत राहिल्या, जोशी त्यांना हजरही राहत होते, पण त्यांतले चैतन्य आता आटले होते. 'शेतकरी तितुका एक एक' असे आपण कितीही म्हटले, तरी शेतकऱ्यांना देशव्यापी पातळीवर एकत्र आणणे जवळजवळ अशक्य आहे हे त्यांना मनोमन पटले होते.

याची कारणेही तशी उघड होती. स्थानिक हवामान, जमिनीचा कस, पाण्याची उपलब्धता, शेतातील विशिष्ट मालाला उपलब्ध असणारी बाजारपेठ व मिळू शकणारा भाव, त्या त्या ठिकाणचे एकूण राजकारण, विकासाची तेथील समाजाने गाठलेली पातळी वगैरे अनेक घटक शेतकऱ्यांच्या परिस्थितीत फरक पाडत असत. एकाच राज्यातील, किंबहुना एकाच गावातील शेतकऱ्यांनाही एकत्र आणणे जिथे अवघड होते, तिथे वेगवेगळ्या प्रांतांतील शेतकऱ्यांना एकत्र आणणे त्याहून अनेक पट अवघड असणे साहजिक होते. भाषा, जात, धर्म, प्रांत वगैरेमुळे निर्माण होणारे भेदही होतेच. कृष्णेच्या पाण्यावरून आंध्र व महाराष्ट्र यांच्यात वाद होते, कावेरीच्या पाण्यावरून तामिळनाडू व कर्नाटकात वाद होते, सतलजच्या पाण्यावरून पंजाब व हरयाणात वाद होते. असे प्रकार सगळीकडेच होते.

शेतकरीनेत्यांनाही एकत्र आणणे अवघड व्हायचे. सगळ्यांना सोयीचे दिवस निवडणे एक दिव्य होते. एकत्र बसल्यावर परस्परांमध्ये कुठल्या भाषेत संभाषण करायचे हाही प्रश्नच होता. हिंदी किंवा इंग्रजी यांतली कुठलीच एक भाषा सर्वांना येणारी नव्हती. अनेक नेते फक्त

आपल्या स्थानिक भाषेतच आपले विचार नेमकेपणे मांडू शकत. या सगळ्यामुळे एकूण चर्चेचा स्तर खालचाच राहायचा. समन्वय समितीला किंवा देशव्यापी आघाडीला नाव कुठले द्यायचे हा प्रश्नही कधीच समाधानकारकरीत्या सुटला नाही, याचे कारण भाषिकच होते. शेवटी भारतीय किसान युनियन हे नाव सर्वानुमते ठरले, पण तेही फारसे रूढ झाले नाही.

शेतकरीनेत्यांमधेही साम्यापेक्षा फरकच अधिक होता. पुढे डंकेल प्रस्तावाच्या वेळी तो सर्वांपुढे ठसठशीतरीत्या स्पष्ट झाला. सगळ्यांचा बौद्धिक स्तर, राजकीय पार्श्वभूमी, आर्थिक परिस्थिती, जीवनविषयक एकूण दृष्टिकोन हे सगळेच खूप भिन्न होते. उदाहरणार्थ, जोशी कायमच खुल्या अर्थव्यवस्थेचे समर्थक होते व त्यामुळे डंकेल प्रस्तावाला त्यांनी जोरदार पाठिंबा दिला. हा पाठिंबा जाहीर करण्यासाठी त्यांनी ३१ मार्च १९९३ रोजी दिल्लीत बोट क्लबवर शेतकऱ्यांचा अखिल भारतीय मेळावा घ्यायचे जाहीर केले. नेमक्या याच वेळी डंकेल प्रस्तावाला विरोध करणारा शेतकरीनेत्यांचा जो मोठा गट होता त्यांनी आपली बाजू मांडण्यासाठी दिल्लीत डंकेलविरोधी मेळावा घ्यायचे जाहीर केले. त्या विरोधी मेळाव्याचे आयोजन महेंद्रसिंग टिकैत, कर्नाटक रयत संघाचे प्रा. नंजुंडस्वामी व पर्यावरणतज्ज्ञ वंदना शिवा यांनी केले होते. असेच मतभेद तंत्रज्ञानाचा वापर, बाजारपेठेचे स्वातंत्र्य, शेतीतील सरकारची भूमिका, सबसिडीचा प्रश्न अशा अनेक मुद्द्यांवर होते.

अखिल भारतीय किसान युनियनची घटना निश्चित करण्यासाठी भरलेल्या खन्ना येथील पहिल्या बैठकीच्या वेळीच खरे तर जोशींचे विचार इतर सर्वांपेक्षा खूप वेगळे होते हे जाणवले होते. त्या बैठकीत इतर अनेक मागण्या शेतकरीनेते मांडत होते. त्यावेळी जोशी म्हणाले होते त्याप्रमाणे, त्यांच्या मते 'आपल्या चळवळीची ही सुरुवात आहे व सध्यातरी शेतीमालाला रास्त भाव मिळवणे हाच आपला एक-कलमी कार्यक्रम असावा. महाभारतातल्या त्या प्रसिद्ध कथेत ज्याप्रमाणे अर्जुनाला आसपासची झाडे, फांद्या, पक्षी वगैरे न दिसता, ज्याचा वेध घ्यायचा तो पोपटाचा डोळाच फक्त दिसत होता, त्याचप्रमाणे आपले सगळे लक्ष त्या एक-कलमी कार्यक्रमावरच केंद्रित केले पाहिजे. तसे नसेल तर आमदारकी, खासदारकी, मंत्रिपद, सहकारी कारखान्याचे अध्यक्षपद, वेगवेगळ्या बड्या शासकीय समित्यांचे सदस्यत्व अशा इतरच अनेक गोष्टी धनुर्धाऱ्याला दिसू लागतात! मग नेम हमखास चुकतोच! एकदा आपल्याला रास्त भाव मिळायला लागले, की स्वबळावरच आपण बाकी सारे प्रश्न सोडवू शकू. त्यामुळे त्या एकमेव उद्दिष्टासाठी लढणारे शेतकरी संघटन उभे करणे हेच आपले ध्येय असावे. त्यासाठी आपली संघटना अगदी लवचीक असावी. परंतु काटेकोर आणि पक्की अशी घटना संमत केली की, कार्यकारिणी, पावती पुस्तके, हिशेब ठेवणे, सभासदांची यादी, निवडणुका वगैरे सोपस्कार आपोआपच येतात. सामान्य सभासद ते अध्यक्ष अशी पदाधिकाऱ्यांची उतरंड येते. अशा साचेबद्ध संघटना आपल्या अवतीभवती अनेक असतात व ती साचेबद्धताच संघटनेला निर्जीव बनवून टाकते. मूळ ध्येय बाजूला पडते व संघटना चालू ठेवणे हेच ध्येय होऊन बसते. त्या सगळ्यात आपण अडकून पडू नये. आजवरच्या आंदोलनात अशा लिखित घटनेच्या ढाच्याविना आपले काही अडलेले नाही; पुढे योग्य वेळ

आली की मग बघू,' साधारण अशी काहीशी जोशींची धारणा होती.

''आपला शेतकरी संघ अजून बाल्यावस्थेत आहे. ताठर अशा घटनेचं बंधन तिच्या गळ्यात आत्ताच अडकवू नका. आज आपल्यात जी ज्येष्ठ मंडळी आहेत त्यांनी आई बालकाशी वागते तसं इतर कार्यकर्त्यांशी वागावं. यामुळे प्रारंभी हुकूमशाहीचा आरोपही होईल; पण बालक जाणतं होईस्तोवर आईदेखील त्याच्याशी वागताना हुकूमशहाच असते हे लक्षात घ्या,'' असेही त्यांनी सांगितले होते.

विचारांची झेप, व्यासंग, वक्तृत्व वगैरे बाबी विचारात घेतल्या, तर त्यांना तुल्यबळ असे अन्य शेतकरीनेत्यांत फारसे कोणी नव्हते. परंतु इतर शेतकरीनेते तसे काही मान्य करणे केवळ अशक्य होते. मूलतः जोशी स्वतंत्रतावादी होते आणि ते व इतर यांच्यातला तो फरक सहजासहजी पुसला जाणे अशक्यच होते. या मूलभूत फरकातून इतर अनेक मतभेद उद्भवत राहिले.

शरद जोशींनी केलेले खुल्या अर्थव्यवस्थेचे हिरिरीचे समर्थन अन्य किसाननेत्यांना अजिबात पसंत नव्हते. बहुसंख्य किसाननेते हे डाव्या विचारसरणीचे होते; त्यांचा अमेरिकेला व मुक्त अर्थव्यवस्थेला कायम विरोध असायचा आणि सरकारी नियंत्रणे व समाजवाद यांना कायम पाठिंबा. अत्याधुनिक तंत्रज्ञानही त्यांना नको होते. त्यांच्यातील अनेकांना नैसर्गिक शेती, फक्त स्थानिक बियाणांचा वापर, सर्व शेतीमालाचा व्यापार सरकारनेच ताब्यात घेणे अशा गोष्टींचे आकर्षण होते. जोशींची भूमिका ही नेमकी उलट होती. शेतकरी संघटना हा जोशींच्या व्यक्तित्वाचाच जणू वाढीव भाग (एक्स्टेन्शन) होता. भूपिंदर सिंग मान यांच्यासारखे अपवाद वगळता, इतर सर्व किसाननेत्यांचा भर शेतकऱ्याला आपल्या शेतीमालाची वाढीव किंमत मिळण्यापेक्षा खते, बियाणे, कीटकनाशके, डिझेल, वीज इत्यादी गोष्टींची किंमत कमी करण्यावर होता. पण तसे करण्यासाठी सरकारी सबसिडीशिवाय पर्याय नव्हता व कुठल्याही सबसिडीला जोशी अनुकूल नव्हते. शेतीमालाला वाजवी भाव हेच त्यांच्या मते एकमेव उत्तर होते. असे अनेक मूलभूत फरक महाराष्ट्रातील शेतकरी संघटना व अन्य किसान संघटना यांच्यात होते. देशातील अन्य राजकीय नेते व शरद जोशी यांच्यातील फरकाप्रमाणेच हाही प्रकार होता.

साहजिकच अखिल भारतीय पातळीवर शेतकऱ्यांची एक आघाडी उभारण्याचे जेव्हा जेव्हा प्रयत्न झाले, तेव्हा तेव्हा ते एका वरवरच्या पातळीवरच राहिले, खोलात गेल्यावर हे असले फरक उफाळून येत.

या सगळ्या एकूण परिस्थितीत शेतकरीनेत्यांची देशव्यापी अशी शक्ती उभारण्याचे आपले प्रयत्न व्यर्थ होत आहेत, हे जोशींच्या लक्षात आले. व्यवस्थेमधील मूलभूत व व्यापक परिवर्तनासाठी उपयुक्त ठरू शकेल असा तो एक मार्ग आता बंद झाला होता.

दरम्यान शेतकरी आंदोलन राष्ट्रीय मंचावर नेण्यासाठी राजकीय आघाडीवरील जोशींचे प्रयत्न चालूच होते.

डिसेंबर १९८९ मध्ये लोकसभा निवडणुकांनंतर लगेचच विश्वनाथ प्रताप सिंग पंतप्रधान

बनले व त्यानंतर तीनच महिन्यांनी, १४ मार्च १९९० रोजी त्यांनी 'Standing Advisory Committee on Agriculture to form National Agriculture Policy' ऊर्फ 'राष्ट्रीय कृषी धोरण निश्चितीसाठीची स्थायी सल्लागार समिती' (किंवा थोडक्यात 'कृषी सल्लागार समिती') ही एक सहा जणांची समिती स्थापन केली व तिचे अध्यक्ष म्हणून जोशी यांची त्यांनी नेमणूक केली. ही घोषणा सिंग यांनी चंडीगढमध्ये भारतीय किसान युनियनने आयोजित केलेल्या एका भव्य किसान मेळाव्यात केली. त्याबाबतचे औपचारिक निवेदन त्यांनी दुसऱ्या दिवशी लोकसभेतील आपल्या भाषणात केले. भानु प्रताप सिंग, कृष्ण कानुंगो, वीरेंद्र शर्मा, शोभंदीश्वर राव आणि कुंभ राम आर्य हे या समितीचे अन्य पाच सदस्य होते. हे कॅबिनेट दर्ज्याचे पद होते व सरकारी नोकरी सोडल्यानंतर प्रथमच बाबू संस्कृतीशी या नियुक्तीमुळे जोशींचा थेट संबंध येऊ लागला.

हे पद स्वीकारल्याबद्दल 'राजकीय सौदेबाजी' या शब्दांत काहींनी जोशींवर टीकाही केली. पण इथे एक सांगायला हवे, की ह्या पदावर असताना जोशी सरकारी वाहन वापरत नव्हते, सरकारी निवासस्थानात राहत नव्हते किंवा कुठला पगारही घेत नव्हते. आपण गेली अनेक वर्षे ज्या उद्दिष्टांसाठी संघर्ष करत राहिलो, ती उद्दिष्टे पूर्ण होतील असा एखादा धोरणात्मक आराखडा आखायची एक संधी म्हणूनच जोशी या जबाबदारीकडे बघत होते.

कृषी सल्लागार समितीचे प्रमुख या नात्याने भरपूर कष्ट घेऊन शरद जोशींनी राष्ट्रीय कृषी धोरणाचा एक आराखडा तयार केला. त्यांची एकूण शेतीविषयक भूमिका त्यात साहजिकच उतरली होती. थोडक्यात सांगायचे तर, शेतीतील बचत शेतकऱ्यांकडेच राहिली तर शेतीतील गुंतवणूक वाढते, उत्पादन वाढते, ग्रामीण भागात बिगरशेती उद्योगधंदे सुरू होतात, सगळ्यांनी शहराकडे धाव घ्यायची गरज राहात नाही, शेतीवरील लोकसंख्येचा बोजा कमी होतो. शेतीमालाला रास्त भाव हा अशा प्रकारे एकूणच देशाच्या विकासाचा एकसूत्री कार्यक्रम आहे. तो नीट अमलात यावा यासाठी नेहरूप्रणीत लायसन्स-परमिट-कोटा-इन्स्पेक्टर राज संपवावे, सूट-सबसिडीची व्यवस्था बंद करून उद्योजकतेला वाव देणारी कार्यक्षम अर्थव्यवस्था तयार व्हावी. त्यासाठी शेतकऱ्याची कर्जमुक्ती तत्काळ व्हायला हवी. त्याशिवाय शेतीला पतपुरवठा, पीकविमा, बाजारपेठ, आयातनिर्यात, शेतीमालावरील प्रक्रिया व त्यासाठी योग्य ते तंत्रज्ञान वापरायचे स्वातंत्र्य या मुद्द्यांचा जोशींच्या मसुद्यामध्ये समावेश होता. 'राष्ट्रीय कृषिनीती' ह्या एका पुस्तिकेत हा मसुदा प्रसिद्ध झालेला आहे.

दुर्दैवाने सिंग यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. राजकीयदृष्ट्या त्यांना तो अडचणीचा वाटला व तसे त्यांनी एकदा जोशींना बोलूनही दाखवले. त्यांना निवांतपणे भेटणेही अवघड होऊन बसले. त्यांना भेटायला रोजच माणसांची रीघ लागलेली असे. अगदी मुलाला एखाद्या कॉलेजात प्रवेश मिळावा यासाठीदेखील लोक त्यांना भेटत. ऑगस्ट १९९०मध्ये जोशींचा आराखडा पंतप्रधानांना सादर केला गेला, पण नोव्हेंबर ९०मध्ये पंतप्रधानपद जाईपर्यंत त्यांना त्याकडे बघायलाही वेळ झाला नव्हता. अखेरच्या काही दिवसांत त्यांनी उच्च शासकीय अधिकाऱ्यांची एक समिती नेमली व तिच्याकडे हा अहवाल पाठवून दिला. हे तेच अधिकारी

होते ज्यांनी वर्षानुवर्षे जुनी प्रस्थापित कृषी नीती राबवली होती; त्यांच्याकडून काही बदलाची अपेक्षा करणे हेच चूक होते. सिंग यांना याची कल्पना नव्हती अशातला भाग नव्हता, पण त्यांच्या दृष्टीने ती केवळ एक वेळ काढण्याची युक्ती होती.

नंतर ही कृषी सल्लागार समिती गुंडाळली गेली, जोशी यांचा अहवाल कुठेतरी जुन्या सरकारी कागदपत्रांच्या समुद्रात गडप झाला. आज मागे वळून बघताना त्यावेळची जोशींची सगळी मेहनत पाण्यात गेली असे काही नाही म्हणता येणार. कारण शेतीमालाचा उत्पादनखर्च काढण्याच्या पद्धतीत जोशींनी सुचवलेले काही बदल अमलात आणले गेले व त्यामुळे शेतीमालाला मिळणाऱ्या भावांच्या वाढीची गती बिगरशेती मालाला मिळणाऱ्या भावाच्या वाढीपेक्षा १९९१ नंतर प्रथमच वाढली. त्याआधी कापसाचा भाव क्विंटलमागे फारतर पाच किंवा दहा रुपयांनी वाढायचा, तो १९९१ साली प्रथमच एकदम क्विंटलमागे ९० रुपयांनी वाढला. हे जरी असले तरी, देशाच्या एकूण धोरणात शेतीला प्राधान्य देण्याच्या दृष्टीने ज्या प्रकारचे मूलभूत व्यवस्था परिवर्तन जोशींना अभिप्रेत होते, ते मात्र झाले नाही. त्यामुळे जोशींनी दिल्लीतील मुक्काम आटोपता घेतला व पुन्हा ते आंबेठाणला आले त्यावेळची त्यांची भावना काहीशी संमिश्र होती.

वेगवेगळ्या पिकांना वाजवी दर मिळावा म्हणून शेतकरी संघटनेने केलेली पूर्वीची आंदोलने ही तशी त्या त्या प्रदेशापुरती सीमित होती; पण देशातील सर्वच शेतकऱ्यांना जिव्हाळ्याचे वाटेल असे एक आंदोलन म्हणजे कर्जमुक्तीचे आंदोलन. ते मात्र राष्ट्रीय मंचावर कार्यरत असतानाही जोशींनी अधूनमधून चालूच ठेवले होते. ज्याला अजिबात कर्ज नाही, असा शेतकरी देशभरात कुठे शोधूनही सापडणे अवघड होते. किंबहुना कर्जाशिवाय भारतात शेती होऊच शकत नव्हती.

या बाबतीत भारत सरकारपेक्षा ब्रिटिश सरकारचे धोरण अधिक न्याय्य होते असे जोशींचे मत होते. ब्रिटिश सरकारने भारतात १९१८ साली युझुरिअस लोन्स ॲक्ट (Usurious Loans Act) नावाचा एक कायदा पास केला होता. युझुरिअस म्हणजे कायद्याने ठरवून दिलेल्या व्याजदरापेक्षा अधिक व्याजाने दिलेले कर्ज. या कायद्यात पहिली तरतूद अशी होती, की शेतकऱ्यांना दरसाल दरशेकडा साडेपाचपेक्षा अधिक दराने व्याज लावता कामा नये. आमच्या अगदी शेतकऱ्यांच्या स्वतःच्या मानल्या गेलेल्या सहकारी बँकासुद्धा बारा, चौदा, सोळा टक्के व्याजदर आजही लावतात.

इंग्रजांनी केलेल्या त्या कायद्यात पुढची तरतूद अशी होती, की शेतकऱ्यांच्या कर्जावर चक्रवाढ व्याज आकारता येणार नाही. हा केंद्रातील इंग्रज सरकारचा तत्कालीन कायदा. मद्रास व म्हैसूर या इलाख्यांच्या सरकारने तर याच्याही पुढे जाऊन शेतकऱ्यांवरील व्याजआकारणी कधीही कर्जाच्या मूळ रकमेपेक्षा जास्त होणार नाही; म्हणजेच व्याजाची रक्कम मुद्दलाएवढी झाली, की व्याजआकारणी बंद होईल अशीही तरतूद आपापल्या इलाख्यासाठी केली होती. याउलट, आज सहकारी बँका अत्यंत अन्यायाने हे चक्रवाढ व्याज लावतात, दर तीन महिन्यांनी

ते मुद्दलात जमा होऊन कर्ज वाढतच जाते, खूपदा ते मूळ रकमेच्या अनेक पट होऊन जाते.

दुसरा मुद्दा म्हणजे, कर्जाचा व्यवहार हा एक करार आहे आणि कराराला Contract Act लागू होतो. ह्या कायद्यानुसार करारातील कुठल्याही एका बाजूने, दुसऱ्या बाजूला तो करार पाळताच येणार नाही, असे काही कृत्य केले, तर तो करार रद्दबातल होतो. शेतकऱ्यांच्या बाबतीत हाच करारभंग सरकारने केला आहे. सरकारी बँकांनी किंवा सरकारमान्य वित्तसंस्थांनी शेतकऱ्यांना कर्ज दिले, पण सरकारनेच स्वतःच्या धोरणांमुळे अशी व्यवस्था केली, की ते कर्ज शेतकरी कधीच फेडू शकणार नाही. त्यामुळे ते सर्व कर्ज बेकायदेशीरच आहे.

'शेतकऱ्यांना आम्ही इतक्या इतक्या कोटी रुपयांची कर्जमाफी देत आहोत,' अशा प्रकारची विधाने सरकार अधूनमधून मोठ्या औदार्याचा आव आणून गेली अनेक वर्षे करत आले आहे. जोशींच्या मते सरकारने वर्षानुवर्षे जाणूनबुजून शेतीमालाचे भाव उत्पादनखर्चापेक्षा कमी ठेवले व त्यामुळेच हा कर्जाचा डोंगर शेतकऱ्यांवर चढला; साहजिकच हे कर्ज अनैतिक आहे व म्हणून ते फेडायला शेतकरी बांधलेला नाही. सरकारने अशा प्रकारे शेतकऱ्यांचे बुडवलेले पैसे काही लाख कोटी रुपये होतात व शेतकऱ्यांचे देशातील एकूण कर्ज फक्त तेहेतीस हजार कोटी रुपये आहे. त्या सगळ्या कर्जातून सरकारने शेतकऱ्याला मुक्त करावे व पाटी कोरी करावी. त्याऐवजी भीक घातल्यासारखे तुम्ही अधूनमधून जे शे-दीडशे कोटी रुपयांचे कर्ज माफ करता, तो प्रकार म्हणजे अगदी जखमेवर मीठ चोळल्यासारखेच आहे. माफी गुन्हेगारांना केली जाते; आम्ही काय गुन्हेगार आहोत का? तुम्ही आमची इतकी वर्षे लुबाडणूक केल्यामुळेच आज आमच्यावर ही परिस्थिती ओढवली आहे. त्यामुळे कर्जमाफी नव्हे तर कर्जमुक्ती हा शब्द सरकारने वापरावा, असे जोशी म्हणत.

१८ एप्रिल १९८८ रोजी जळगाव येथे भरलेल्या मेळाव्यात जोशींनी कर्जमुक्ती आंदोलनाची घोषणा केली. स्वतःला नादार म्हणून घोषित करण्याचे आवाहन शेतकऱ्यांना केले. त्यासाठी त्यांच्याकडून विशिष्ट फॉर्म भरून घेतले व ते वेगवेगळ्या कोर्टांत दाखलही केले. या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. अनेक कोर्टांत हे कागदपत्र ठेवायलाही जागा नाही अशी अवस्था झाली होती. पण त्यातूनही पुढे काहीच निष्पन्न झाले नव्हते.

त्यासाठीचा लढा महाराष्ट्राबाहेरही जोशींनी लढवला होता. उदाहरणार्थ,२२ ऑगस्ट १९८९ रोजी चंडीगढमध्ये परेड ग्राउंडवर याच मुद्द्यावर त्यांनी एक विराट सभा घेतली होती. 'द ट्रिब्यून'मधील वृत्तानुसार ''सभेला सुमारे पन्नास हजार शेतकरी हजर होते. 'शेतकऱ्यांची सर्व कर्जे बेकायदेशीर असल्याने ती कर्जे आम्ही फेडणार नाही' असेही सभेत जाहीर करण्यात आले. शरद जोशी यांनी शेवटी कर्जमुक्तीचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार पंजाबमधून किमान ५०,००० शेतकरी चंडीगढ हायकोर्टात 'दिवाळखोरी अर्ज' ('insolvency petition') दाखल करतील असेही सांगण्यात आले.''

विख्यात विधिज्ञ राम जेठमलानी हेदेखील ह्या सभेला हजर होते. ते म्हणाले,

''कोर्टात दिवाळखोरी अर्ज दाखल केल्या दिवसापासून कर्जवसुली कायद्याने थांबते.

अर्जाचा निकाल लागेपर्यंत नवे व्याज पकडले जात नाही. उद्योगक्षेत्र ह्या तरतुदीचा सतत लाभ उठवत असते. शेतकऱ्यांनीही तो लाभ घ्यायला हवा. त्याचप्रमाणे दरवर्षी शेतकऱ्यांचे नैसर्गिक आपत्तीमुळे निदान दहा हजार कोटींचे नुकसान होते. तसे नुकसान जर उद्योगक्षेत्राचे झाले, तर त्यातील बराचसा भाग सरकार वा विमा कंपनी भरून देते. शेतकऱ्यांच्या बाबतीतही हे घडायला हवे. त्याचप्रमाणे कुठल्याही करारनाम्यात करार करणाऱ्यांना 'नैसर्गिक वा ईश्वरप्रणीत संकटामुळे' ('natural calamity or an act of God') कराराचे पालन करता आले नाही, तर ते त्यांना क्षम्य असते व तशी तरतूद प्रत्येक करारनाम्यात केलेलीच असते. शेतकऱ्यांनाही ही सवलत मिळायला हवी.''

२३ ऑगस्ट १९८९ तारखेच्या 'इंडियन एक्स्प्रेस'मधल्या बातमीनुसार राम जेठमलानी व शरद जोशी यांची त्याच दिवशी पंजाब व हरयाणा हायकोर्ट बार असोसिएशनसमोर भाषणे झाली. त्यात जेठमलानी यांनी कायद्याने दिवाळखोर शेतकऱ्याला काय काय संरक्षण मिळते, ह्याची यादीच वाचून दाखवली. ते म्हणाले,

''सरकार अशा शेतकऱ्याच्या शेतावर, शेतीत वापरायच्या उपकरणांवर, त्याच्याकडील जनावरांवर जप्ती आणू शकत नाही. त्याच्या शेतीच्या कामात अडथळा येईल असे कुठलेही कृत्य सरकारने केले, तर ते बेकायदेशीर होईल. महाराष्ट्रातील २०,००० शेतकऱ्यांनी शासनाकडे अशा प्रकारची दिवाळखोरी जाहीर करणारा मेमोरंडम सादर केला आहे व तो जर शासनाने मंजूर केला नाही, तर ते सर्व शेतकरी कोर्टात जातील. अशा केसेस मी स्वतः कुठलीही फी न घेता लढवणार आहे आणि पंजाब व हरयाणामधील वकिलांनीदेखील अशा केसेस विनामोबदला लढवाव्यात.''

हा लढा अनेक वर्षे चालला. व्ही. पी. सिंग यांनी ते पंतप्रधान असताना शेतकऱ्यांचे प्रत्येकी दहा हजार रुपयापर्यंतचे कर्ज माफ केले होते. खरेतर सर्व शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याची त्यांची तयारी होती, पण अर्थमंत्री मधु दंडवते यांनी विरोध केल्यामुळे शेवटी तडजोड म्हणून दहा हजाराची मर्यादा सिंगना मान्य करावी लागली. हा भाग मागील प्रकरणात आलाच आहे.

या आंदोलनाला असा प्रदीर्घ पूर्वेतिहास असल्यामुळे प्रकृतीची व वयाची साथ नसतानाही ५ एप्रिल २००६ रोजी महाराष्ट्रात येडे मच्छिंद्र येथे झालेल्या कर्जमुक्ती अभियानात जोशींनी भाग घेतला होता. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे हे जन्मगाव. त्या दिवशी तिथे शेतकऱ्यांचा एक विराट मेळावा भरला होता व त्याचेच पुढे कर्जमुक्ती प्रचारयात्रेत रूपांतर झाले.

त्याच्या पुढच्या वर्षी भारताचे शेवटचे टोक रामेश्वरम येथे झालेल्या एका आगळ्या कर्जमुक्ती आंदोलनातही त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता. देशभरातले काही हजार शेतकरी ३१ डिसेंबर २००७ रोजी रामेश्वरम येथे दुपारी एकत्र जमले, मिरवणुकीने समुद्रावर गेले, आपापल्या कर्जाचे सर्व कागदपत्र त्यांनी समुद्रात बुडवले आणि 'आम्ही आता कर्जमुक्त झालो आहोत' असे जाहीर केले. (अर्थात त्यामुळे तुम्ही कायद्याने कर्जमुक्त होत नाही; ते कर्ज व वसुलीसाठीचे आनुषंगिक खटले चालूच राहतात.)

आजही हा प्रश्न तसा कायम आहे व शेतकऱ्यापुढच्या सर्व अडचणी दूर होत नाहीत तोपर्यंत तो सुटायची काहीच चिन्हे दिसत नाहीत. आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सर्वांत मोठे कारण त्यांचा कर्जबाजारीपणा हेच आहे, पण त्यावर मूलभूत असा तोडगा काढायचा कोणीही विचार केलेला नाही.

शेतकऱ्यांवरील व्याजआकारणी हा जोशींच्या मते भारतातील सर्वांत मोठा भ्रष्टाचार आहे; बोफोर्स किंवा तेलगी यांसारखी प्रकरणे ही त्याच्यापुढे अगदीच छोटी आहेत.

अत्यंत विलासी राहणी असलेले उद्योगपतीदेखील कंपन्यांसाठी म्हणून घेतलेले कर्ज सर्रास बुडवत असतात, आणि त्याचवेळी स्वतः मात्र ऐषारामात जगत असतात. पैशाच्या जोरावर अत्यंत बुद्धिमान वकीलही आपल्या दिमतीला ते उभे करतात. त्या कर्जाचे एकत्रित आकडे हे शेतकऱ्यांच्या कर्जापेक्षा अनेक पट अधिक असतात. आज अनेक बड्या राष्ट्रीयीकृत बँकासुद्धा ह्या थकलेल्या कर्जांमुळे डबघाईला आल्या आहेत. पण ना त्या उद्योगपतीच्या घरावर कधी जप्ती येते, ना ते कर्ज देणारे बँकेचे उच्चाधिकारी कधी गोत्यात येतात! प्रकरणे वर्षानुवर्षे तशीच रेंगाळत राहतात. शेतकऱ्याच्या कर्जाच्या वसुलीसाठी मात्र ताबडतोब कारवाई होते, सोसायटीची नोटीस तत्परतेने बजावली जाते, त्याची बदनामी होते, त्याचे सामानसुमान जप्त होते, तो रस्त्यावर येतो आणि त्यातलेच काही पुढे आत्महत्याही करतात. पण तरीही त्याविरुद्ध समाज पेटून उठत नाही; सरकारही काही कारवाई करत नाही.

'भारतातील शेतकरी कर्जमुक्त झालेला मला पाहायचा आहे,' ही जोशी यांच्या तोंडून मी ऐकलेली त्यांची शेवटची इच्छा होती.

राष्ट्रीय मंचावर जाऊन एखादा प्रश्न हाती घ्यायचा नंतरचा प्रसंग आला अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना. जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization – WTO) या आंतरराष्ट्रीय संस्थेशी त्यांच्या डंकेल प्रस्तावासंदर्भात वाटाघाटी करण्याच्या दृष्टीने सरकारने एक कार्यगट स्थापन केला. त्याचे नाव होते कृषी कार्यबल (Task Force for Agriculture) (बल हा शब्द फोर्स या अर्थी). वाजपेयींनी ह्या कार्यबलाचे प्रमुख म्हणून शरद जोशींची नेमणूक केली. ही घोषणा झाली १२ सप्टेंबर २००० रोजी.

वाजपेयी यांचा जोशींशी पूर्वी अनेकदा संबंध आला होता व शेतकरी संघटनेच्या नागपूर येथील एका सभेमध्ये वाजपेयी यांनी भाषणही केले होते. डंकेल प्रस्तावाचा बराचसा भाग शेतीमालाच्या व्यापाराशी संबंधित होता व तोच त्या प्रस्तावाचा सर्वाधिक वादग्रस्त भाग होता. या प्रश्नांचा जोशींनी किती बारकाईने अभ्यास केला आहे याची वाजपेयींना कल्पना होती व म्हणूनच त्यांनी ही नेमणूक केली होती.

त्यापूर्वी मे १९९६मध्ये वाजपेयी प्रथम पंतप्रधान झाले होते. दुर्दैवाने केवळ १३ दिवसांनी त्यांचे सरकार कोसळले. त्यानंतर १९९८मध्ये ते पुन्हा पंतप्रधान बनले. तेही सरकार १३ महिनेच चालले. त्यानंतरच्या निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवून भाजप सत्तेवर आला व वाजपेयी तिसऱ्यांदा पंतप्रधान बनले. यावेळी मात्र ऑक्टोबर १९९९ ते २००४

अशी सलग पाच वर्षे ते पंतप्रधान राहिले. काँग्रेससोडून अन्य कुठल्या पक्षाच्या पंतप्रधानाने आपला पाच वर्षांचा कालावधी पूर्ण करण्याचा हा देशातील पहिलाच प्रसंग. या कालावधीत त्यांनी उदारीकरणाच्या धोरणाला चालना द्यायचा निश्चय केला होता. त्यांचे पहिले अंदाजपत्रक शेतीला सर्वाधिक प्राधान्य देणारे होते. त्यावेळी शेतीमध्येही उदारीकरण आणण्याची गरज त्यांना जाणवत होती व त्यासाठीच त्यांनी हे कृषी कार्यबल तयार केले होते.

ह्या बलाची दोन स्पष्ट उद्दिष्टे होती. एक म्हणजे, WTO बरोबर झालेल्या करारांचा भारतीय शेतीवर काय परिणाम होईल त्याचा अभ्यास करणे व त्यासाठी आपल्या हितसंबंधांचे रक्षण होईल अशा तरतुदी सुचवणे. आणि दुसरे म्हणजे WTO बरोबरच्या करारांमुळे भारतीय शेतीच्या प्रगतीसाठी कुठल्या प्रकारच्या संधी निर्माण होत आहेत त्याचा अभ्यास करणे व त्या संधींचा फायदा कसा करून घेता येईल ते सुचवणे. अध्यक्ष शरद जोशी यांच्या व्यतिरिक्त पुढील तीन व्यक्ती सरकारने बलाचे सदस्य म्हणून नेमल्या होत्या : श्री. पी. पी. प्रभू, माजी केंद्रीय व्यापार मंत्रालय सचिव, प्रा. अभिजित सेन, माजी प्रमुख, कृषी उत्पादन खर्च व मूल्य आयोग आणि श्री. आर. सी. ए. जैन, सचिव, केंद्रीय कृषी मंत्रालय. पुढे आपल्या मदतीसाठी म्हणून जोशी यांनी आपले एक सहकारी पुण्याचे मदन दिवाण यांनाही सदस्य म्हणून समाविष्ट केले.

दुर्दैवाने दहा वर्षांपूर्वी व्ही. पी. सिंग यांनी नेमलेल्या कृषी सल्लागार समितीच्या वेळी आला होता, तसाच कटू अनुभव यावेळीही जोशींना आला. २३ सप्टेंबर रोजी बलाची पहिली बैठक भरली. ३० सप्टेंबर रोजी जोशी यांना कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा दिला असल्याचे जाहीर झाले. पण त्यानंतर काही हालचालच होईना. ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २००० आणि जानेवारी २००१ हे चार महिने बलाचे कार्यालय स्थापित करण्यातच गेले. त्यानंतर लगेचच कृषी मंत्रालयाकडून बलाला असे सांगितले गेले, की ३० एप्रिलच्या आत आपला प्राथमिक अहवाल व ३१ जुलैच्या आत आपला अंतिम अहवाल सादर करावा. माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांचे पुत्र अजितसिंग त्यावेळी केंद्रात कृषी मंत्री होते. त्यांच्याशी जोशींचे कधीच फारसे सख्य नव्हते; दोघांमध्ये एकदोनदा खटकेही उडाले होते. साहजिकच जोशींना त्यांच्याकडून अथवा कृषी मंत्रालयाकडून कुठलेच सहकार्य मिळत नव्हते. सर्व राज्य सरकारांकडे जोशींनी एक विस्तृत प्रश्नावली पाठवली होती. परंतु फक्त गोवा, आंध्र प्रदेश आणि राजस्थान या तीन राज्यांनी उत्तरे पाठवली.

नाइलाजाने जोशींनी ३१ ऑगस्टपर्यंत अवधी मागितला. कृषी मंत्रालयाने ती मुदतवाढ दिली नाही. कृषी मंत्रालयाकडून ३१ जुलैलाच बलाचे अस्तित्व संपवण्यात आले. त्याच दिवशी जोशींनी या संदर्भातील शेतकरी संघटनेच्या विचारांच्या आधारे आपला स्वतःचा सुमारे सत्तर पानांचा अहवाल सादर केला; अन्य कुठल्याच सदस्याचा अहवाल तोवर तयारच झाला नव्हता. खरे तर बलाचे प्रभू, सेन व जैन हे इतर तीन सदस्य जुन्या व्यवस्थेचेच कट्टर समर्थक होते; जोशींशी त्यांचे कधी पटणे शक्यच नव्हते. त्यांनी आपापले अहवाल सादर केलेच नाहीत, फक्त आपली विरोधी मते नोंदवणारे पत्र तेवढे दिले. त्यामुळे सगळ्यांनी एकत्र बसून एकमेकांच्या अहवालांवर चर्चा करणे व नंतर एक एकत्रित अहवाल सादर करणे हा अपेक्षित

असलेला प्रकार झालाच नाही. बलाचे गठनच असे केले गेले होते, की ते बल जोशींना अपेक्षित होते ते काम करणारच नाही, हे एक उघड गुपीत होते.

जोशींच्या विनंतीवरून १० ऑगस्ट २००१ रोजी पंतप्रधानांनी जोशींना भेटीसाठी वेळ दिली. जोशींनी आपल्या अडचणी कथन केल्या. WTOचे स्वतःचे संबंधित कामही नोव्हेंबर २००१ पर्यंत सुरूच होणार नव्हते; ज्यासाठी बलाची खरी गरज लागणार होती; पण त्या आधीच बलाचे काम कृषी मंत्रालयाकडून एकाएकी थांबवले गेले होते. बलाच्या मूळ उद्देशालाच सुरुंग लावणारा हा कृषी मंत्री अजित सिंग यांचा निर्णय होता. परंतु जोशींनी हे सगळे सांगूनसुद्धा काही उपयोग झाला नाही; त्यांच्या कैफियतीला पंतप्रधान किंवा त्याचे कार्यालय यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही.

काही राजकारणी व उच्च सरकारी अधिकारी एकत्र येऊन आपल्याला गैरसोयीच्या गोष्टी कशा टाळू शकतात आणि देशाचा पंतप्रधानही त्याबाबत फारसे काही कसे करू शकत नाही याचा हा एक नमुनाच होता.

आता यानंतर दिल्लीत थांबण्यात अर्थच नव्हता. बलाचे कार्यालयच बंद करण्यात आले होते. नाइलाजाने जोशी पुण्याला परतले. हा सगळाच अनुभव त्यांना निराशाजनक वाटला होता.

ह्यानंतर पुन्हा जोशी दिल्लीला परतले ते जुलै २००४ मध्ये राज्यसभेचे सदस्य म्हणून. भाजप-शिवसेनेच्या पाठबळावर. ज्या पक्षांवर त्यांनी पूर्वी 'जातीयवादी' म्हणून खूप टीका केली होती, त्याच पक्षाच्या पाठबळावर. स्वतंत्र भारत पक्षाने निवडणुकीत भाजपला पाठिंबा दिला व त्या बदल्यात हे पद त्यांना मिळाले, अशा टीकेला जोशींना तोंड द्यावे लागले. या संदर्भात ते म्हणाले,

''आपल्या देशातील सगळ्याच राजकारण्यांनी वेळोवेळी आपल्या भूमिका अगदी सर्रास बदलल्या आहेत. मला असा एकतरी नेता दाखवा, ज्याने असा भूमिकेत बदल केलेला नाही. पण माझ्यावरच सगळे तुटून का पडतात कळत नाही! बहुधा एरव्ही माझ्याविरुद्ध बोलण्यासाठी त्यांना दुसरा काही मुद्दा सापडत नसावा व म्हणून ही संधी ते सोडत नसावेत! पण खरं सांगायचं तर, वाजपेयी व्यक्तिशः उदारमतवादी आहेत, हिंदुत्ववाद्यांची काही प्रश्नांवरची कट्टर मते हुशारीने टाळून इतर कुठल्याही पंतप्रधानापेक्षा अधिक समर्थपणे त्यांनी उदारमतवादी धोरण राबवलं आहे, असं माझं स्वच्छ मत होतं आणि म्हणून आमच्या पक्षाने त्यांना पाठिंबा दिला. यामागे कुठलंही साटंलोटं वगैरे नव्हतं. मला राज्यसभा सदस्यत्वाचा मोह होता असंही अजिबात नाही. त्यासाठी मी त्यांना पाठिंबा दिला असं म्हणणं, म्हणजे माझी किंमत खूपच कमी लेखल्यासारखं होईल! तसं पाहिलं तर दहा वर्षांपूर्वी व्ही. पी. सिंगनीदेखील मला हे सदस्यत्व देऊ केलंच होतं की! पण तेव्हा मी नकार दिला होता; दुसऱ्या दोघांची नावं सुचवली होती. यावेळी मी होकार दिला, कारण या पदावर काम करण्यासाठी आता माझ्याकडे पुरेसा वेळ होता.''

राज्यसभेचे सदस्य म्हणून ७ जुलै २००४ ते ७ जुलै २०१० अशी नियत सहा वर्षे

जोशींनी काम केले. सुरुवातीला १२, मीना बाग ह्या बंगल्यात व नंतर ४०, मीना बाग ह्या थोड्या अधिक मोठ्या बंगल्यात त्यांचे वास्तव्य होते. त्याच बंगल्याच्या आउटहाउसमध्ये स्वतंत्र भारत पक्षाचे अधिकृत कार्यालयही होते व तिथे पक्षाच्या एखाद्या पदाधिकाऱ्याची राहायचीही सोय होती. पक्षाचे एक सचिव म्हणून विनय हर्डीकर यांनी काही काळ काम केले व त्या काळात काही महिने त्यांचे वास्तव्य याच कार्यालयात होते. पुढे काही कारणाने हर्डीकर यांनी ते काम सोडले व ते पुण्याला परतले.

राज्यसभेचे काम करताना येणाऱ्या अडचणींविषयी जोशींनी मोकळेपणे लिहिले आहे. उदाहरणार्थ, संसदेचे सत्र सुरू असते त्या कालावधीत रोज कागदपत्रांचे प्रचंड गट्ठे सकाळ-संध्याकाळ खासदाराकडे येऊन पडतात. आदल्या व येणाऱ्या दिवसातील संसदेतील कामकाजाबद्दल. हे अक्षरशः हजारपाचशे पानांचे गट्ठे असतात. ते चाळणेही अशक्य असते. सकाळी अकरा वाजता सभागृहाचे कामकाज सुरू झाले, की तर ह्याकडे बघणेही अशक्य असते. इतक्या मर्यादित तयारीनंतर तुम्ही महत्त्वाचे असे काय सभागृहात बोलणार?

कागदपत्रांचे हे प्रचंड ओझे म्हणजे संसदेतील कामकाजाचा दर्जा घसरण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. अर्थात इतरही कारणे आहेतच. दुर्दैवाने हे सारे बदलावे, म्हणून कोणीच फारसा प्रयत्नही करताना दिसत नाही. खासदार म्हणून काम करताना हे सारे त्यांना प्रत्यक्ष अनुभवताही आले. संसदेतील वातावरणाबद्दल ते लिहितात,

> संसद याचा अर्थ जेथे लोक एकत्र जमतात, चर्चा करतात. संसद हा काही आखाडा नाही, की जेथे दोन्ही बाजूंच्या पहिलवानांची कुस्ती व्हावी! आज राज्यसभा आणि लोकसभा म्हणजे जबरदस्त नरड्यांच्या पहिलवानांच्या कुस्त्यांचे आखाडे बनले आहेत. ही माणसे फार ताकदीचीही नाहीत, अगदी किरकोळ आहेत; फक्त जबरदस्त नरड्यांची आहेत. तिथे माझ्यासारख्या, काही वैचारिक मांडणी करणाऱ्या लोकांचा आवाज फार तोकडा पडतो.
>
> (*पोशिंद्यांची लोकशाही,* पृष्ठ २७८)

जोशींचा पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा एक घटक पक्ष होता, पण तरीही आघाडीच्या बैठकांचे आमंत्रणही त्यांना मिळत नसे. हा एकप्रकारे अपमानच होता. त्याबद्दल शेवटी त्यांनी अडवाणी यांच्याकडे तक्रार केल्यावर अडवाणी यांनी दिलगिरी व्यक्त केली व त्यानंतर मात्र जोशींना सर्व बैठकांची आमंत्रणे येऊ लागली. दुर्दैवाने आपल्याकडे सभागृहातील नेत्यांची किंमत संख्याबळावर ठरते व त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेतही खूपदा वामनराव चटप यांच्यासारख्या प्रामाणिक आमदारालाही अनेकदा असले अपमान गिळायला लागले. जोशींचा पक्ष अगदी छोटा; त्यात पक्षाचे ते एकमेव खासदार. त्यामुळे चर्चेच्या वेळी त्यांच्या वाट्याला जेमतेम तीन-चार मिनिटे येत. पण इतक्या कमी वेळातही दोन-तीन महत्त्वाचे मुद्दे मांडायचे कसब त्यांनी अवगत केले. त्यामुळे ते बोलायला उठले, की बाकीचे सदस्य लक्षपूर्वक ऐकत असत.

जोशींच्या राज्यसभेतील एकूण कामगिरीबद्दल लिहिताना त्यांचे एक सहकारी व आर्थिक

बाबींचे सल्लागार संजय पानसे लिहितात,

> ३२१ चर्चांमध्ये त्यांनी भाग घेतला होता. १०५ प्रश्न विचारले होते. सरकारकडून १७ संसदीय आश्वासने मिळवली होती. दोन खासगी विधेयके मांडली होती. त्यांतले पहिले म्हणजे Representation of People Actच्या कलम '२९ अ'मध्ये बदल करावेत. या कलमाद्वारे कोणत्याही राजकीय पक्षाला नोंदणी करण्याअगोदर शपथ घ्यावी लागते, की त्या पक्षाला 'समाजवादी' तत्त्वे मान्य आहेत. त्यांची मांडणी होती की ज्या लोकांचा समाजवादावर विश्वास नाही, त्यांनी एकत्र येण्यावर जाचक बंधन घालणे, म्हणजे संविधानाने दिलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आहे. काँग्रेस पक्षाला आवाहन करताना जोशी म्हणाले, 'तुम्ही धर्म, पंथ, धर्मनिरपेक्षता इत्यादीबद्दल जे सर्वसमावेशकतेचे (pluralistic) धोरण राबवता, ते धोरण आर्थिक नीतीमध्ये का राबवत नाही?' हे विधेयक मांडताना त्यांनी केलेले भाषण इतके मुद्देसूद व सर्वंकष होते, की त्यांच्या भाषणानंतर प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ राम जेठमलानी यांनी सांगितले, 'शरद जोशींच्या भाषणाचे पुस्तक प्रसिद्ध करून भारतातील राजनीतीच्या प्रत्येक अभ्यासकासाठी ते उपलब्ध केले पाहिजे.' अर्थातच त्यांचे विधेयक युपीए सरकारला मान्य झाले नाही. जेव्हा अध्यक्षांनी विधेयक मागे घेण्यास सांगितले, तेव्हा त्याला जोशींनी नकार दिला व बहुमताने विधेयक फेटाळणे भाग पाडले.
>
> (*चतुरंग,* दैनंदिनी २०१२, पृष्ठ ८३)

अप्रिय असेल तेही बोलायला कधी कचरायचे नाही, या आपल्या स्वभावानुसार राज्यसभेतही अनेक प्रसंगी त्यांनी इतरांच्या मताला छेद देणारी आपले मते निर्भयपणे मांडली.

महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणारे ते एकमेव खासदार होते. महिलांच्या सबलीकरणाला जोशींचा अजिबात विरोध नव्हता, किंबहुना ग्रामपंचायतीच्या निवडणुकांत १०० टक्के महिलांचे पॅनेल उभे करायचे हा निर्णय शेतकरी महिला आघाडीने अगदी १९८६ सालीच घेतला होता; जोशींचा विरोध हे विधेयक ज्या पद्धतीने अंमलात आणले जाणार होते त्या पद्धतीला होता. महिलांसाठी आरक्षित ठेवायचे एक तृतीयांश मतदारसंघ कुठले, हे चिठ्या टाकून निवडायचे आणि प्रत्येक निवडणुकीच्या वेळी वेगळे एकतृतीयांश मतदारसंघ निवडायचे, अशी ती पद्धत होती. जोशींच्या मते या पद्धतीत अनेक मूलभूत चुका होत्या. ज्या ठिकाणी लायक महिला आहेत, ते मतदारसंघ राखीव नाहीत, असे होऊ शकते; आणि जे मतदारसंघ राखीव आहेत, तिथे लायक महिला नाहीत असेही होऊ शकते. दुसरा मुद्दा म्हणजे, समजा एका राखीव मतदारसंघातून एक महिला निवडून आली, तर तिला हे माहीत असेल, की आपला मतदारसंघ पुढच्या वेळी राखीव असणार नाही. मग कशाला लोकांची कामे करायची, कशीतरी पाच वर्षे काढायची आणि त्या अवधीत काही कमाई करता आली तर करायची, असाच तिचा दृष्टिकोन असणार. असाच दृष्टिकोन बिनराखीव मतदारसंघातील

लोकप्रतिनिधींचा राहणार – स्त्री असो वा पुरुष. जोशींच्या मते ह्यावर उपाय म्हणजे तीन मतदारसंघांचा एकत्रित विचार करायचा व प्रत्येक वेळी त्यांतील एक निर्वाचित सदस्य महिलाच असेल अशी तजवीज करायची. ह्या विधेयकाबाबत जेव्हा जोशींनी इतर नेत्यांशी चर्चा केली तेव्हा त्यांच्या लक्षात आले, की ह्या विधेयकाच्या अंमलबजावणीत ज्या अडचणी होत्या, त्यांची या नेत्यांना अंधुकशीही कल्पना नव्हती. अनेक सरकारी धोरणे ही अशी अत्यंत कमी अभ्यासावर बेतलेली असतात हे अस्वस्थ करणारे वास्तव होते.

आपल्या देशात बहुतेकदा धोरणविषयक निर्णय घेताना किंवा कायदे करताना पुरेसा व वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून विचारच होत नाही असे जोशी यांचे राज्यसभेत असतानाचे एक निरीक्षण आहे. पुढे त्या कायद्यांतून जी गुंतागुंत निर्माण होते, पळवाटा निघतात, भ्रष्टाचाराला वाव मिळतो आणि अपेक्षित ते फायदे कधीच मिळत नाहीत ते यामुळेच, असे त्यांनी म्हटले आहे. जेव्हा जेव्हा शक्य होते, तेव्हा तेव्हा त्यांनी अशा घाईघाईने व नीट दूरगामी विचार न करता घेतलेल्या धोरणविषयक निर्णयांना विरोधच केला.

उदाहरणार्थ, राज्यसभेत जोशींनी असाच विरोध शाळांतील परीक्षा रद्द करायच्या विधेयकाला केला होता. इतर सर्व सदस्य त्या विधेयकाच्या बाजूचे आहेत हे दिसत असूनही. जोशींच्या मते शालान्त परीक्षेपर्यंत जेमतेम १२ टक्के विद्यार्थी पोचतात व बाकीचे ड्रॉप आउट होतात हे खूप वाईट आहेच, पण प्रत्येकाने अंतिम बिंदूपर्यंत पोचले पाहिजे हा अट्टहासही चुकीचा आहे. ज्यांचा अभ्यास पुरेसा झालेला नाही, त्यांना पुढच्या वर्गात जाणाऱ्या मुलांतून वगळण्याची प्रक्रिया ही हवीच. नापास होणे हाही शिक्षणप्रक्रियेचाच एक भाग आहे. आपण नेमके कुठे आहोत हे त्यामुळे त्या विद्यार्थ्याला व त्याच्या पालकांनाही कळते, त्यानुसार ते अधिक मेहनत घेऊ शकतात. त्या वगळण्याच्या प्रक्रियेमुळेच शेवटच्या टोकाला पोहोचण्याला काही अर्थ प्राप्त होतो; प्रत्येक जण जर शेवटच्या टोकापर्यंत जात राहिला, तर त्याला काही अर्थच राहणार नाही. परीक्षा रद्द केल्यास अजून पन्नास वर्षांनंतरसुद्धा अर्धा भारत खऱ्या अर्थाने अशिक्षितच राहील. याही वेळी जोशींचे मत सभागृहात मांडले गेले, पण त्याचा मतदानावर काहीच परिणाम झाला नाही; विधेयक एक विरुद्ध इतर सर्व असे मंजूर झाले.

राज्यसभेच्या सदस्यत्वाचे काही व्यावहारिक फायदे जोशींना मिळाले, नाही असे नाही. उदाहरणार्थ, विमान व रेल्वेप्रवासाची सोय, वैद्यकीय खर्चाची परतफेड इत्यादी. पण त्यांच्या एकूण योगदानात राज्यसभेच्या सदस्यत्वामुळे खूप काही भर पडली असे म्हणता येणार नाही.

दिल्लीतील वास्तव्य एका अर्थाने त्यांना आवडले आणि एका अर्थाने तिथे ते एकटेही पडले. जमेची बाजू म्हणायची तर राष्ट्रीय मंचावर जाऊन काही काम करायची, राज्यसभेतील कामाचा एकदा अनुभव घ्यायची त्यांची इच्छा पूर्ण झाली. त्या कामाचा अपेक्षित असा परिणाम झाला नाही हे उघड आहे, पण ह्या सहा वर्षांत दिल्लीतील मतप्रवर्तक अशा वर्गाशी त्यांचा थोडाफार तरी संबंध आला. अर्थात अशा ओळखींचा (नेटवर्किंगचा) आपल्या

कामासाठी फायदा करून घेण्याचे दिवस आता संपले होते.

काही अखिल भारतीय स्वरूपाची कामे दिल्लीत राहून करणे त्यांना अधिक सुलभ गेले. ह्या कालावधीत किसान समन्वय समितीच्या कामासाठी त्यांना अधिक वेळ देता आला. वेगवेगळ्या राज्यांतील किसाननेते काही ना काही कारणांनी दिल्लीत येत असत; त्यांच्याशी असलेला जोशींचा संबंध अधिक घनिष्ठ झाला. World Agriculture Forum (जागतिक कृषी मंच) ह्या आंतरराष्ट्रीय शेतकरी संघटनेचे कामही दिल्लीत राहून त्यांना बरेच करता आले. शेतीविषयक चर्चा करणारा हा एक आंतरराष्ट्रीय मंच असून त्याची स्थापना १९९७मध्ये झाली. युनायटेड स्टेट्समधल्या मिसूरी ह्या शेतीप्रधान राज्यातील सेंट लुईस शहरात त्याचे मुख्यालय आहे. दर दोन वर्षांनी भरणाऱ्या त्याच्या परिषदेस जोशी दोन वेळा गेले होते. जागतिक स्तरावर शेतीसंदर्भात काय काय घडत आहे ह्याची माहिती त्यातून त्यांना मिळत असे. मंचाच्या सल्लागार समितीचे ते एक सदस्यही होते. त्याची एक शाखा भारतातही काढायचा त्यांनी प्रयत्न केला होता, पण त्याला फारसे यश आले नाही. दिल्लीतील वास्तव्याचे असे काही फायदे झाले.

पण त्याचबरोबर या कालावधीत महाराष्ट्रातील जुन्या सहकाऱ्यांपासून ते काहीसे दूर गेले. पूर्वी ते अनेकांच्या घरी जात, खूपदा मुक्कामही करत, हास्यविनोदात, चर्चेत आनंदात वेळ जाई. दिल्लीत कोणाशीच त्यांची तशी जवळीक प्रस्थापित झाली नाही. दिल्लीतील एकूण संस्कृतीही खूप वेगळी होती. जवळ जाऊनही दिल्ली त्यांच्यापासून तशी दूरच राहिली. शेतकरी संघटना हेच त्यांचे कुटुंब होते. त्यांच्यासमवेत होणारी विचारांची व सुखदुःखांची देवाणघेवाण लांब गेल्यावर काहीशी खंडित झाली. 'साहेब सहा वर्षे दिल्लीत राहिले व आमच्याशी असलेला त्यांचा संबंध खूपच कमी झाला,' याची खंत शेतकरी संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी प्रस्तुत लेखकाशी बोलताना व्यक्त केली होती.

■

# १४

# सहकारी आणि टीकाकार

एखादी व्यक्ती कितीही कर्तृत्ववान असली तरी तिच्या कार्यात अनेकांचा हातभार हा असतोच; त्याशिवाय मोठी कार्ये उभीच राहू शकत नाहीत. शेतकरी संघटना हा एकखांबी तंबू होता असे अनेक जण म्हणाले आहेत, पण प्रत्यक्षात अनेकांची जिवाभावाची साथ शरद जोशींना वेळोवेळी मिळत गेली हेही खरे आहे. अशा अनेक सहकाऱ्यांचा ह्या पुस्तकात वेळोवेळी उल्लेख झालाच आहे; तसा तो सर्वांचाच करणे स्थलाभावी अशक्यच आहे, पण तरीही आणखी काही सहकाऱ्यांविषयी इथे थोडेफार लिहिणे आवश्यक आहे; किंबहुना त्याशिवाय जोशींचे चरित्र अपुरेच राहील.

मांडववाले गोपाळशेट ऊर्फ गोपाळ मारुती जगनाडे, ऑइल इंजिन दुरुस्त करणारे मधुकर रघुनाथ शेटे, फिटर अप्पासाहेब देशमुख वगैरे त्यांचे अगदी सुरुवातीचे चाकणमधले व्यवसायातून ओळख झालेले सहकारी. चाकणमधलेच पण सामाजिक कामातून जोडले गेलेले सहकारी. मोहनलाल परदेशी ऊर्फ बाबूलाल, शंकरराव वाघ, डॉ. अविनाश अरगडे, श्याम पवार आणि 'चाकणचे साने गुरुजी' मामा शिंदे. बाबूलाल परदेशी व शंकरराव वाघ यांची 'अंगारमळा'मध्ये जोशींनी चितारलेली व्यक्तिचित्रे जिव्हाळ्याने ओथंबलेली आहेत. 'शेतकरी संघटक'चे मालक म्हणून मोहन बिहारीलाल परदेशी हे नाव कायम छापले जात होते. शंकरराव आपल्या थट्टेखोर, दिलखुलास बोलण्यामुळे परप्रांतातील शेतकरीनेत्यांतही परिचित होते. श्याम पवार यांनी पुढे आपल्या म्हाळुंगे ह्या गावी एक हॉटेल काढले. जोशी तिथे खूपदा जात असत. आंबेठाणला मुक्काम असला, की खूपदा जोशी गप्पा मारायला अरगडेंकडे येऊन बसत; त्या छोट्या गावात त्यावेळी सुशिक्षित मंडळी थोडीच असत.

या साऱ्यांशी संपर्क आला तेव्हा जोशी कोणी शेतकरीनेते वगैरे बनलेले नव्हते. खरे म्हणजे तेव्हा, आपल्या आयुष्यात असे काही पुढे घडेल ह्याची त्यांना स्वतःलाही अजिबात कल्पना नव्हती; इतरांना ती असायचे काहीच कारण नव्हते. 'माणूस तसा भला दिसतोय, शेतकऱ्यांसाठी काहीतरी चांगलं करू पाहतोय,' अशीच इतरांची भावना होती. कांदा आंदोलन सुरू झाल्यावर मग हळूहळू जोशींच्या विचारांची झेप त्यांच्या लक्षात येत गेली. पण सुरुवातीलाच नात्यात निर्माण झालेली एक प्रकारची अनौपचारिकता व सहजता कायम टिकली. पुढे आंदोलनातही ही मंडळी भाग घेत असत, पण पहिल्या रांगेत बसायचा त्यांनी

कोणीच कधी प्रयत्न केला नाही. या साध्याभोळ्या माणसांत जोशीही रमत असत.

माधवराव मोरे, प्रल्हाद कराड पाटील, माधवराव बोरास्ते, बागलाणचे रामचंद्रबापू पाटील हे सारे ऊस आंदोलनातील सहकारी. बोरास्ते तसे अकालीच वारले, पण माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील व जोशी यांची एक त्रिमूर्तीच बनली होती. चाकणच्या संघापेक्षा हा संघ वेगळा होता. ही सर्व मंडळी तशी पूर्वीपासूनच आपापल्या परीने नेतृत्वगुण असलेली होती; शेतकरी संघटनेलाही त्यांनी नेतृत्व दिलेच.

विजय व सरोजा परुळकर, निपाणीचे प्रा. सुभाष जोशी हेही निकटचे सहकारी. काळाच्या ओघात पुढे जोशींपासून दूर राहूनही मनातील आदर जपून ठेवलेले.

या साऱ्यांविषयी पूर्वी लिहिलेच आहे.

पुण्यापुरता विचार केला तर शशिकांत बोरावके हे जोशींचे तसे पहिले सहकारी म्हणता येतील. 'सकाळ' दैनिकात ते सामाजिक व शेती प्रश्नांबाबत पत्रे लिहीत व ती वाचून जोशींनी स्वतःहूनच त्यांच्याशी संपर्क साधला होता. कोपरगावच्या प्रसिद्ध बागाईतदार बोरावके कुटुंबातील असूनही हे स्वतः अन्य व्यवसाय करत होते. पुण्यात फोटोकॉपीचे दुकान काढण्यापासून वाचनालय चालवण्यापर्यंत अनेक व्यवसाय त्यांनी केले. शेतीतून बाहेर पडायची गरज त्या काळातच त्यांना जाणवली. पुढे त्यांचे काका, भास्करराव बोरावके शेतकरी आंदोलनात मोठे नेते बनले, पण शशिकांत बोरावकेंचा संपर्क हा त्यापूर्वीचा.

पुण्याला जंगली महाराज रोडवर बालगंधर्व रंगमंदिरासमोर (११८७/६६ शिवाजीनगर) शशिकांत बोरावके यांची जागा होती. त्यांचे वाचनालय चालायचे, त्याच छोट्या खोलीत पुढे शेतकरी संघटनेचे कार्यालय सुरू झाले. ती खोली अवघी आठ बाय सहा फूट होती; पुढे शेजारच्याच १५ बाय २० फुटाच्या मोठ्या खोलीत कार्यालय हलवले गेले. जागा मोक्याची, बाहेरगावाहून येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी सोयीची अशी होती. सिंध सोसायटीतील बंगला जोशींनी पत्नी वारल्यानंतर कुठल्यातरी कंपनीला भाड्याने दिला होता; त्यामुळे शेतकरी संघटनेला पुण्यात काहीच आसरा उरला नव्हता. अशा परिस्थितीत शशिकांत बोरावके यांनी ती जागा संघटनेला भाडे वगैरे न घेता वापरायला दिली होती ही मोठीच मदत होती.

पुण्यातील आपल्या अवतीभवतीच्या बहुतेक पांढरपेश्यांना शेतकऱ्यांविषयी फारसे प्रेम नव्हते, ही गोष्ट लौकरच जोशींच्या लक्षात आली. शेतकरी म्हणजे बागाईतदार ऊस शेतकरी; माजलेला आणि धनदांडगा, असाच बहुतेकांचा समज असायचा. एका कोणातरी पुढारी बागाईतदराने आपल्या मुलीच्या लग्नात लक्षभोजन घातले आणि प्यायच्या पाण्याच्या विहिरीत बर्फाच्या लाद्या टाकल्या, ह्या ऐकीव कथेमुळे मध्यमवर्गीय पांढरपेशांच्या लेखी शेतकरी जणू बदनाम झाले होते. प्रत्यक्ष त्या बागाईतदाराची काय बाजू होती, ते जाणून घ्यायचा बहुतेकांनी प्रयत्नच केला नव्हता. स्वतः शेती करायला लागल्यावर जेव्हा तिथल्या विदारक परिस्थितीचे

वर्णन जोशी आपल्या घरात करत होते, त्यावेळी सामाजिक कामात बऱ्यापैकी सक्रिय असलेल्या त्यांच्या उच्चशिक्षित मेहुणीची प्रतिक्रिया होती, ''अहो, ह्या गोष्टींचा तुम्हांला जितका त्रास वाटतो, तितका त्यांना नाही वाटत. त्यांना अशा सगळ्या अडचणींची सवयच असते!'' मध्यमवर्गीयांची ही तशी प्रातिनिधिक प्रतिक्रिया होती.

पुण्यातल्या काही जणांशी जोशींचे व्यावसायिक संबंध आले. उदाहरणार्थ, त्यावेळी सी-डॅकमध्ये असलेले व पुढे एमकेसीएल कंपनीमुळे ख्यातकीर्त झालेले विवेक सावंत. जोशींचा त्यांनी स्वित्झर्लंडहून आणलेला प्रिंटर बिघडला होता व तो फक्त सावंत दुरुस्त करू शकतील असे त्यांना कोणीतरी सांगितले. त्यानुसार तो दुरुस्त करून घेण्यासाठी जोशी सावंत यांच्याकडे गेले होते. सावंतांनी तो दुरुस्त करून दिलाही! जोशींना तांत्रिक गोष्टींत बराच रस असल्याने दोघांच्या गप्पाही खूप होत, पण पुढे दोघांच्या कार्यबाहुल्यामुळे फारसा संबंध राहिला नाही.

आणखी एक व्यावसायिक संपर्क म्हणजे गोपाळ परांजपे. मुंबई-पुणे रस्त्यावर फुगेवाडीत, अल्फा लव्हाल कंपनीसमोर त्यांचे शारदा मोटर वर्क्स नावाचे गॅरेज होते. योगायोगाने गॅरेजसमोरच एकदा जोशींची जुनी अँबॅसडर गाडी बंद पडली. गाडीत ते एकटेच होते. कशीबशी ढकलत त्यांनी ती गॅरेजमध्ये आणली. दुरुस्तीला एक-दोन तास लागणार होते व तो सगळा वेळ जोशी गॅरेजमध्येच थांबले. एकीकडे कामगार दुरुस्तीचे काम करत होते व दुसरीकडे जोशी व परांजपे गप्पा मारू लागले. शरद जोशींच्या थोरल्या भगिनी सिंधुताई यांचे यजमान वसंतराव व परांजपे हे मुंबईच्या व्हीजेटीआयमधले वर्गमित्र असल्याचे गप्पांच्या ओघात कळले! परांजपे सांगत होते,

''पहिल्याच भेटीत मी जोशीसाहेबांकडे आकृष्ट झालो. खरं तर वयाने मी त्यांच्याहून मोठा, पण मी त्यांना कायम 'जोशीसाहेब' म्हणत आलो. संघटनेच्या अनेक सभांना नंतर मी हजर राहू लागलो. तीन वेळा रास्ता रोकोत भाग घेतला. २ ऑक्टोबर १९८९च्या बोटक्लबवरच्या मेळाव्यातही मी होतो. आंबेठाणच्या प्रशिक्षण वर्गांत मी इतिहास विषय शिकवायचो. संघटना उभारण्यासाठी जोशीसाहेबांनी जे कष्ट घेतले त्याला खरोखरच तोड नाही.''

पण त्याचबरोबर परांजपे स्पष्टवक्तेदेखील होते. शेतकरी संघटनेवर खरपूस टीका करणारे त्यांचे एक विस्तृत पत्र शेतकरी संघटकच्या ६ जुलै २००९ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे.

पुण्यातले एक तरुण स्नेही नितीन भोसले म्हणजे *बळीराजा* हे शेतीला वाहिलेले मासिक चालवणाऱ्या प्र. बा. भोसले यांचे चिरंजीव. फर्गसन कॉलेजात ते शिकत होते. वयात खूप अंतर असूनही जोशींशी त्यांची चांगली गट्टी झाली. खूपदा डेक्कनवर कॅफे डिलाइटमध्ये कॉफी पिता पिता त्यांच्या गप्पा रंगत. बहुतेकदा लीलाताईदेखील सोबत असत. फर्गसनमध्ये एकदा त्यांनी जोशींचे भाषणही ठेवले होते; भाषणाला चांगले पाच-सहाशे विद्यार्थी हजर होते. २५ नोव्हेंबर १९९४ रोजी जोशींनी पुण्यात कृषिअर्थतज्ज्ञांची एक परिषद भरवली होती. तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग तिला संबंध दिवस हजर होते. परिषदेत 'न बोलण्याच्या अटीवर' हजर राहण्याची अनुमती नितीननी मिळवली होती. नितीन म्हणतात, ''तो दिवस माझा वाढदिवस असल्याचे कोणीतरी शरद जोशींना सांगितले. त्यांनी लगेच माझ्यासाठी केक

मागवला व माझा तो वाढदिवस डॉ. मनमोहन सिंग आणि शरद जोशी यांच्यासोबत साजरा झाला!'' पुढे शेतकरी संघटनेच्या एका अधिवेशनात नितीनने एक कृषिप्रदर्शनदेखील भरवले होते व त्यातून संघटनेला पाच लाख रुपये मिळवूनही दिले होते. अखेरपर्यंत दोघांचा स्नेह कायम राहिला.

पुण्यातील ज्ञानेश्वर विद्यापीठाचे मनोहर आपटे हे तर त्यांचे खूप जवळचे मित्र बनले. ते वारल्यानंतर त्यांच्यावर जोशींनी एक उत्तम लेखही लिहिला होता.

काळाच्या ओघात इतरही काही पुणेकरांशी जोशींचा स्नेह जुळला. उदाहरणार्थ, आकाशवाणीवरील प्रसिद्ध वृत्तनिवेदक अरुण बेलसरे, रॅलीज इंडियामधील एक अधिकारी प्रतापराव बोर्डे, फडतरे चौकातील अेबीसी ड्रायक्लिनिंग वर्क्सचे मालक बाबा व्यापारी.

आणखीही काही पुणेकरांचा इथे उल्लेख करायला हवा. उदाहरणार्थ, ल. स. तथा अण्णा केळकर. 'मॅट्रिक मॅगेझिन'ची कल्पना त्यांचीच. ते वाचूनच अनेक प्राथमिक शिक्षकांनी बाहेरून परीक्षा दिली व शैक्षणिक गुणवत्ता सुधारली. एक मुद्रण व्यावसायिक, ग्रंथसंग्राहक व कौटुंबिक मित्र म्हणूनही ते जोशींच्या जवळिकीतले बनले. श्रेया जोशी व सुनील शहाणे यांचा साखरपुडा केळकरांच्या घरीच झाला. दत्तवाडीचे स. वा. भिडे हे दूध व्यावसायिक म्हणून संपर्कात आले. त्यांच्या अनुभवाचा बराच उपयोग दूध आंदोलनाच्या वेळी दुधाचा उत्पादनखर्च काढताना जोशींना झाला. अ. पु. तथा नाना आठवले हे असेच एक जवळचे मित्र. ते कॅलेंडर्सचा व्यवसाय करत. जोशींच्या काही पुस्तकांची व 'शेतकरी संघटक'ची सुरुवातीच्या चार वर्षांतली छपाई त्यांनीच करून दिली.

शेतकरी चळवळ वणव्यासारखी पसरली, याचे मोठे कारण म्हणजे तत्कालीन तरुण शेतकरी समाजात शरद जोशींचे जबरदस्त आकर्षण निर्माण झाले होते. त्याची दोन कारणे असावीत.

पहिले कारण म्हणजे, ते अतिशय तळमळीने करीत असलेले शेतीतील गरिबीचे मर्मभेदी विश्लेषण व त्यावर सुचवत असलेला उपाय. सगळा शेतकरी समाज त्या मांडणीसाठी जणू भुकेलेला होता; शिवाय जोशी जो विचार देत होते तो विचार इतर कोणीच देत नव्हते. 'आपण इतकी वर्षं इतकी मेहनत करूनही आपली स्थिती का सुधारत नाही?' या शेतकरी तरुणाला कायम छळणाऱ्या प्रश्नाला जोशींचा विचार हे अचूक व मनाला भिडणारे उत्तर होते. या विचाराच्या ताकदीमुळेच हा 'बाहेरचा' माणूस शेतकऱ्यांना इतका भावला. शरद जोशी ही त्या समाजाची त्यावेळची गरज होती. पंकज उदासने त्याच्या एका गजलेत म्हटले आहे,

'कितने दिनों के प्यासे होंगे यारो सोचो तो,
शबनम का कतरा भी जिनको दरिया लगता है!'

दवाचा एक थेंबदेखील समुद्रासारखा भासावा, इतकी ह्या समाजाची तहान तीव्र होती. मुळातली तहानच इतकी तीव्र असल्याने हे भारावलेपणही तितकेच उत्कट होते.

'नांगरून पडलेली जमीन...' या आपल्या एका लेखात (*शेतकरी संघटक*, २० एप्रिल १९८४) परभणी कृषी विद्यापीठातील एक विद्यार्थी व आता लातुरात असलेले प्राध्यापक शेषराव मोहिते लिहितात,

> बऱ्याच दिवसांनंतर परवा गावाकडे गेलो होतो. तो बोडका माळ पार रया गेलेल्या म्हाताऱ्या माणसासारखा दिसत होता. नांगरून पडलेली जमीन पावसाची वाट पाहत, आसुसलेल्या नजरेनं आकाशाकडे पाहत सुस्त पडून होती. आक्रसलेल्या चेहऱ्याची माणसं भवितव्य नसल्यासारखी, अंधारात चाचपडल्यासारखी सारी जमवाजमव करण्याच्या मागे लागली होती. पण सहज बोलता बोलता शेतकरी आंदोलन, शरद जोशी, शेतकरी संघटना, शेतीमालाला भाव असले काही शब्द ऐकले, की युगानुयुगापासून पावसाची वाट पाहत नांगरून पडलेल्या जमिनीवर पावसाची सर बरसावी अन् ढगात वीज चमकून जावी, तशा त्यांच्या डोळ्यांच्या बाहुल्या चमकत होत्या. हा 'काळ' आता आपली फार दिवस सोबत करणार नाही असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

शेषराव मोहिते यांचा हा भावपूर्ण उतारा त्याकाळी शेतकरी समाज जोशींकडे किती असोशीने पाहत होता याची साक्ष पटवणारा आहे. अशा माणसाकडे समर्पणोत्सुक तरुण मने आपोआपच आकृष्ट होतात.

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर म्हणतात,

> शेतकरी संघटनेचे अधिवेशन हा एक थरारक, भारावून टाकणारा अनुभव असतो. तीनचार वर्षांपूर्वी मी एक अधिवेशन पाहण्यासाठी गेलो होतो. खेड्यापाड्यातून पुरुष, बायका, मुलं झुंडीने येत असतात. मोटारसायकलीने, सायकलीने, बैलगाडीने वा पायी. बहुसंख्य बायका व मुलांच्या पायात चपला नसतात. हे आंदोलन धनदांडग्या शेतकऱ्यांचे नाही. सारेच शेतकरी गरीब असतात, पिळलेले असतात. त्यांच्यात धनदांडगा नसतो. धनदांडगा शेतकरी ही शहरी माणसाची कविकल्पना आहे, हे जाणवत राहते. साऱ्या जागेला एखाद्या वसाहतीचे स्वरूप आलेले असते. बायका, मुले काट्याकुट्या गोळा करून कोरड्यास भाकरी बनवत असतात. शरद जोशींना खडी तालीम देऊन त्यांचे होणारे स्वागत चित्तथरारक असते.

आणि या तीव्र आकर्षणाचे दुसरे कारण म्हणजे जोशींचे व्यक्तिमत्त्व.

जोशींनी आंदोलनाला सुरुवात केली, तेव्हा त्या ग्रामीण परिसरात ते साहजिकच उठून दिसत असत. शहरी, सुशिक्षित, ब्राह्मण, परदेशातली भारी पगाराची नोकरी सोडून इथे आलेला हा माणूस. याउलट ग्रामीण भागातली बहुतेक मंडळी गरीब, अल्पशिक्षित होती; पण तरीही त्यांच्याशी जोशी बरोबरीच्या नात्याने वागत असत. उच्चनीचतेच्या कल्पना हाडीमाशी रुजलेल्या तत्कालीन ग्रामीण समाजात जोशींच्या व्यक्तिमत्त्वाचे हे अंग ह्या तरुणांना पहिल्या

भेटीतच आकर्षून घेणारे होते. जोशींच्या स्वभावात, वागण्याबोलण्यात एक कमालीची अनौपचारिकता होती. हा कदाचित पाश्चात्त्य संस्कारही असेल. ह्यामुळेही अनेक तरुण त्यांच्या संपर्कात आल्यावर भारावून जात. ह्या प्रथमदर्शनीच पडणाऱ्या प्रभावाची काही उदाहरणे लक्षात घेण्यासारखी आहेत.

अंबाजोगाईचे अमर हबीब छात्र युवा संघर्ष वाहिनीतून आलेले. त्यांनी स्वतः उत्तम लेखन केलेच व शिवाय थोडा काळ 'शेतकरी संघटक'चे संपादक म्हणूनही काम पाहिले. आपल्या 'आकलन' या लेखसंग्रहात त्यांनी शरद जोशींबरोबर झालेल्या आपल्या पहिल्या भेटीचे वर्णन केले आहे. जोशींना भेटण्यासाठी पुण्याच्या शिवाजीनगर बसस्टँडवरील एका टेलिफोन बूथवरून त्यांनी फोन केला. त्यांच्याकडे कधी आणि कसे यावे ते विचारायला. ''तुम्ही तिथेच थांबा. मी तिकडेच निघालो आहे.'' म्हणत जोशी स्वतःच तिथे आले. कधी एकमेकाला पाहिलेले नाही; आपण त्यांना ओळखणार कसे, याची चिंता करीत हबीब थांबले होते. एवढ्यात तिथे पोचलेल्या जोशींनी त्यांच्या खांद्यावर हात ठेवीत विचारले, ''तुम्ही अमर हबीब ना?'' त्यांनी आपल्याला कसे ओळखले हा हबीबना पडलेला प्रश्न! जोशींना एसटी बसने नाशिकला जायचे होते. ''चला, आपण त्या रिझर्वेशनच्या रांगेत उभे राहू. मला नाशिकचे रिझर्वेशन करायचे आहे.'' असे सांगून ते झपाझप पुढे चालू लागले. हबीब लिहितात,

> शरद जोशी रिझर्वेशनच्या रांगेत उभे राहिले. आम्ही त्यांच्या आंदोलनाविषयी प्रश्न विचारले व त्यांनी उत्तरे दिली. जोशी म्हणाले, 'सगळ्या प्रश्नांची उत्तरं माझ्याकडे आहेत असा माझा दावा नाही. आपण मिळून काम करू. त्यातून आपल्याला उत्तरं सापडतील.' जोशींचे हे उत्तर माझ्या मनाला भावले. मी आतापर्यंत अनेक लोकांना भेटलो. जो तो आपल्याला सगळी उत्तरे माहीत आहेत अशा आविर्भावात बोलायचा. 'चला, आपण मिळून उत्तरं शोधू' असे कोणी म्हटले नव्हते. तसे फक्त शरद जोशी पहिल्यांदा म्हणाले. अशा माणसासोबत जायला भीती वाटत नाही.
>
> (*आकलन*, पृष्ठ ८४)

त्या काळात जोशी कसा एसटीने प्रवास करायचे; एवढेच नाही, तर स्वतः जाऊन रिझर्वेशनही कसे करायचे हे सगळे लक्षणीय आहेच, पण शिवाय पूर्णतः अपरिचित अशा एखाद्या तरुणाला त्यांनी इतक्या सहजगत्या भेटावे हेही दुर्मिळ आहे. अतिशय अकृत्रिम असा संवाद जोशी पहिल्या भेटीतच साधत आणि समोरच्याला जिंकून घेत. पुढे वर्षानुवर्षे हबीब यांनी जोशींबरोबर काम केले. जोशींचा मराठवाड्यातला पहिला दौरा त्यांनीच शेषराव मोहिते व सुधाकर जाधव यांच्या मदतीने आयोजित केला.

पिंपळगाव बसवंतचे एक तरुण शेतकरी तुकाराम निरगुडे पाटील यांनाही जोशींनी असेच पहिल्या भेटीतच जिंकले होते. आपल्या कुटुंबासोबत एकत्र जेवायला बसवून आणि स्वतःच्या घरीच त्यांची रात्रीच्या मुक्कामाची सोय करून. मागे त्याबद्दल लिहिलेच आहे. त्या एका कृत्याने जोशींनी एक सहकारी जोडला; असा सहकारी की जो त्यांना प्रथम नाशिक

जिल्ह्यात घेऊन गेला. पुढे निरगुडे संघटनेचे अध्यक्षही बनले.

अलिबागचे सुरेशचंद्र म्हात्रे आणि अरविंद वामन कुळकर्णी जोशींना प्रथम भेटले निपाणी आंदोलनात; ती पहिली भेटही अशीच संस्मरणीय झाली होती. ''मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघातले आहात; आम्हाला वाटलं हेलिकॉप्टरने याल!'' अशा नर्मविनोदी शब्दांत जोशींनी केलेल्या सहजस्फूर्त स्वागतात वातावरणातला प्रचंड तणाव दूर करण्याचे आणि त्याचबरोबर दोन उत्तम लेखक-कार्यकर्ते कायमचे जोडण्याचे सामर्थ्य होते.

मराठी विचारवंतांनी व साहित्यिकांनी जोशी यांची योग्य ती कदर केली नाही याची कुळकर्णींना कायम खंत असायची. 'माणूस'मधल्या एका लेखात (१४ मार्च १९८१) ते लिहितात,

> नेहमीच्या मराठी पद्धतीला जागून शरद जोशी यांची खिल्ली उडविण्याचे कर्म जवळजवळ सर्व मराठी पत्रकारितेने केले. भारतात सत्तर टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यांची आर्थिक गळचेपी चव्हाट्यावर मांडावी, त्यांच्यासाठी न्याय मागावा हे अर्थशास्त्राला आजवर सुचले नाही. हे सारे छातीठोकपणे सांगणारा आणि नुसते आपल्या केबिनमध्ये बसून न सांगता त्यासाठी आवश्यक ती जागृती करणारा, संघटना उभारणारा, या क्षेत्रातील प्रस्थापितांची झोप उडवील असे रान उठवणारा शरद जोशी हा पहिला नि खराखुरा शेतकरी नेता आहे. आज कदाचित अतिशयोक्तीचा आरोप होईल; पण तो पत्करूनही असे म्हणावेसे वाटते, की दलितांना डॉ. आंबेडकरांच्या रूपाने जसा पहिल्यांदा सर्वार्थाने समर्थ नेता लाभला, तसाच या शरद जोशींच्या रूपाने आज शेतकऱ्यांना नेता लाभला आहे.

दुर्दैवाने पुढे २९ ऑक्टोबर २००३ रोजी वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने कुळकर्णींचा बळी घेतला.

शिरोळचे झुंजार आणि लोकप्रिय शेतकरीनेते राजू शेट्टी यांच्याविषयीही पहिल्या भेटीच्या संदर्भात इथे लिहायला हवे. जोशींपासून पुढे त्यांची वाट वेगळी झाली; त्यांनी वेगळी संघटना काढली आणि पक्षही. निवडणुकीत ते खासदार म्हणून निवडून आले. अत्यंत कमी आर्थिक बळ असताना. पुढच्या गावी जाण्यासाठी गाडीत पेट्रोल भरायला मागच्या गावचे शेतकरी पैसे गोळा करत. निवडणुकीत लागणाऱ्या अमाप पैशाबद्दल सगळे बोलतात; पण त्यालाही काही अपवाद असतात हे राजू शेट्टी यांनी सिद्ध केले. त्यांनी लिहिले आहे,

> माझे वडील लहानपणीच वारले. त्यानंतर आई सोडून मी कोणाच्या कधी पाया पडलो नाही; अपवाद फक्त शरद जोशींचा. औरंगाबादला ते एकदा उपोषणाला बसले होते. सरकार लक्ष देत नव्हतं, म्हणून मी मोर्चा काढला. त्यांना ती बातमी कळल्यावर पंधरा दिवसांनी ते कोल्हापूरला आले. मोरेश्वर टेमुर्डेंनी मला साहेबांच्या पुढे नेलं. 'हाच तो मुलगा' म्हणत भेट घालून दिली. 'एवढं धाडस करत जाऊ

नकोस. लहान आहेस तू.' हे त्यांचे शब्द होते. त्यावेळी मी कॉलेजमध्ये शिकत होतो. त्यांनी स्वतःच्या हातांनी मला बिल्ला लावला. त्यावेळी त्यांनी पाठीवरून फिरवलेला हात मला जसाच्या तसा आठवतो. ही आमची पहिली भेट.

आपल्या पहिल्या भेटीतच जोशींनी जोडलेल्या अशा कार्यकर्त्यांची यादी बरीच लांब होईल. राजीव बसर्गेकरांपासून मधु किश्वरपर्यंत अनेकांचा तो अनुभव होता. जोशींच्या व्यक्तिमत्त्वात एक अहंकार जाणवायचा, अशी टीका काही जणांनी केली आहे. ही यादी म्हणजे त्या टीकेला दिलेले एक उत्तर असेल. किंबहुना जोशींचे व्यक्तिमत्त्व हे दुसऱ्याला खिळवून घेणारे होते असे दिसते.

कार्यकर्त्यांबद्दल लिहिताना कोपरगावचे भास्करराव बोरावके यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. एकेकाळी सव्वा लाख मोसंबीची झाडे असलेली, नऊशे एकरांची त्यांच्या कुटुंबीयांची शंकरबाग ही आशिया खंडातील सर्वांत मोठी मोसंब्याची बाग मानली जाई. पंडित नेहरूंपासून सर विश्वेश्वरय्या अय्यरांपर्यंत अनेक नामवंत मंडळी तिथे येऊन गेली होती. लहानपणापासून ते राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते होते. गर्भश्रीमंती असूनही सेवादलाच्या संस्कारामुळे त्यांचे पाय कायम जमिनीवर राहिले. आणीबाणीत अनेक भूमिगत नेत्यांनी शंकरबागेत आसरा घेतला होता. पुढे राष्ट्र सेवा दलाचे ते विश्वस्तही झाले. पण 'शेतकरी संघटनेचे काम सोडा, असे सेवा दलाने सांगितले, तर मी सेवा दल सोडेन' हे त्यांचे उद्गार होते. पुढे शेतकरी संघटनेचे ते अध्यक्षही बनले. मितभाषी, मृदू, मनमिळाऊ भास्कररावांच्या शब्दाला संघटनेत सगळे फार मानतात.

भास्कररावांना सगळे भाऊ म्हणतात. कोपरगाव परिसरात त्यांना मोठा मान आहे. सेवा दलाप्रमाणे शिर्डी येथील प्रसिद्ध साई संस्थानाचेही ते एक विश्वस्त होते. 'वारकरी' साप्ताहिक वाचून त्यांना जोशींविषयी प्रथम माहिती मिळाली. 'लिखित साहित्याचा आपल्याला शेतकरी आंदोलनासाठी फारसा उपयोग होणार नाही' हे जोशींचे पूर्वीचे मत कसे चुकीचे होते हेही ह्यावरून दिसते. कोपरगावला झालेल्या ऊस आंदोलनात भाऊ सामील झाले. त्यांच्यासारखा प्रतिष्ठित शेतकरी त्यात पडल्यामुळे साहजिकच आंदोलनाला मोठीच चालना मिळाली. आंदोलनात अटक झाल्यावर त्यांची रवानगी इसापूर तुरुंगात झाली. त्यावेळी इतरही सात हजार आंदोलक त्याच तुरुंगात अटकेत होते. योगायोग म्हणजे त्यांत बावीस वकीलही होते! आंदोलनाची व्याप्ती किती वाढली होती याची त्यावरून कल्पना येते. तुरुंगात असतानाच सर्व सत्याग्रहींनी आपला नेता म्हणून त्यांची निवड केली होती. पुढे ते शेतकरी संघटनेचे अध्यक्ष बनलेच.

जोशींपेक्षा भाऊ पाच वर्षांनी मोठे. पुढे ते प्रत्यक्षातही जोशींचे जणू मोठे भाऊच बनले. लीलाताईदेखील त्यांना खूप मानत. पुण्यात भाऊंचे एक घर होतेच. पुण्यात आले की ते तिघेही नाटक-सिनेमा बघायला जात. भाऊंच्या पत्नी माईदेखील खूपदा सोबत असत. दोन्ही कुटुंबांत घरोबा होता. लीलाताई गेल्यावर जोशींनी भाऊंच्या खांद्यावर डोके ठेवूनच अश्रूंना वाट

मोकळी करून दिली. पुढे श्रेयाचे कन्यादानही भाऊंनीच केले.

विनय हर्डीकर हे शेतकरी संघटनेचे एक वेगळेच कार्यकर्ते. वेगळे अशा अर्थाने, की अन्य कार्यकर्त्यांप्रमाणे ते शेतकरी कुटुंबातील वा ग्रामीण भागातील नव्हते. मूळचे ते मुंबईकर, पुढे उच्चशिक्षणाच्या निमित्ताने पुणेकर. इंग्रजीत एमए. व्यवसायाने पत्रकार. वृत्तीने विचारवंत. उत्तम लेखक. तेवढेच उत्तम टीकाकारही. शेक्सपीअरपासून शास्त्रीय संगीतापर्यंत अनेक क्षेत्रांत रुची आणि गती. आणीबाणीत तीन महिने कारावास भोगलेला. ज्ञानप्रबोधिनीपासून ग्रामायनपर्यंत अनेक संस्थांशी संबंध. पण एका जागी फारसे कुठे स्थिरावले नाहीत. सप्टेंबर १९८१मध्ये पिंपळगाव बसवंत येथे त्यांची व जोशींची पहिली भेट झाली. इंडियन एक्स्प्रेसमधील नोकरी सोडून ते १९८६च्या जानेवारीपासून जोशींबरोबर पूर्ण वेळ काम करू लागले. 'अन्य संघटना संपर्क' हे खाते त्यांच्यावर सोपवलेले.

आणखी एक कार्यकर्ते परभणी जिल्ह्यातील सेलू गावचे गोविंदभाऊ जोशी. एक सधन शेतकरी. १९७० सालचे परभणी कृषी महाविद्यालयाचे प्रथम वर्गातले पदवीधर. शेतीप्रमाणेच संगीताचीही खूप आवड. वसंतराव देशपांडे हे त्यांचे मित्र. त्यावेळच्या सरकारी धोरणानुसार आधुनिक शेतीचा शेतकऱ्यांमध्ये प्रसार व्हावा म्हणून त्यांनी १९७४च्या सुमारास कृषी सेवा केंद्र सुरू केले. गूळ गाळण्याची मोठी यंत्रणा उभारली. देना बँकेकडून कर्ज काढले. त्यात स्वतःचीही बरीच गुंतवणूक केली. दुर्दैवाने त्याच परिसरात पुढे गोदावरी-दुधना सहकारी साखर कारखाना निघाला. शासकीय नियमांप्रमाणे उसावर प्रक्रिया करणारी दुसरी कुठलीच यंत्रणा कारखान्याच्या परिसरात उभारता येत नाही. कारखान्याचे चेअरमन काँग्रेसचे आमदार होते. त्यांच्या दडपणामुळे गोविंदभाऊंना युनिट बंद करावे लागले. पोलिसांच्या साहाय्याने युनिटची वीजच बंद केली गेली! कर्जाचा बोजा मात्र डोक्यावर कायम राहिला. पुढे त्यांनी उत्तम प्रकारची ज्वारी विकसित केली. तिला बाजारात सुमारे दीडशे रुपये क्विंटल असा भावही मिळत होता. पण दुर्दैवाने ती ज्वारी लेव्हीपोटी सरकारकडे जमा करावी लागली. तीही फक्त पन्नास रुपये क्विंटल दराने! सरकारी धोरणांमुळे शेतकऱ्यांची पावलोपावली कशी कोंडी होते ह्याचा त्यांना आलेला हा दुसरा व्यक्तिगत अनुभव. पुढे १९८४ सालच्या परभणी अधिवेशनापासून ते शरद जोशींच्या सहवासात आले आणि मग ती साथ कायमचीच ठरली.

गोविंद जोशी हे शेतीसोबतच शेतीसामानाचे एक दुकानही चालवतात. जोशींवर कुठलेही संकट आले, अडचण आली तर तत्काळ धावून जाणारी ही व्यक्ती. आम्ही ट्रेनने एकदा नांदेडला चाललो असताना न्याहारीचा डबा घेऊन ते मुद्दाम चार तास खर्च करून सेलूहून आले होते. जोशीवरच्या प्रेमापोटी.

तसेच परभणीचे वकील व लेखक अनंतराव उमरीकर व त्यांचे प्रकाशक-लेखक चिरंजीव श्रीकांत उमरीकर. पुढे श्रीकांत उमरीकरांनी जोशींचे समग्र साहित्य प्रकाशित करून मोठेच काम केले. म्हात्रे यांच्यानंतर काही काळ 'शेतकरी संघटक'ची धुराही त्यांनी वाहिली; अंकाला आकर्षक, आधुनिक रूप द्यायचा प्रयत्न केला. पण पुरेशा जाहिराती मिळवता न आल्याने वा अन्य काही अडचणींमुळे 'संघटक' बंद पडले. अनेकांना त्याची आजही हळहळ वाटते.

आजही जे आंबेठाणला अंगारमळ्यात राहतात आणि जे जोशींचे केवळ सारथी नव्हते तर जिवाचे साथी होते, ते बबन शेलार. तोंडाने फटकळ पण मनाने प्रेमळ. यांचे हस्ताक्षरही सुरेख. जोशींचे लेखनिक म्हणूनही ते काही वर्षे काम करत. धुळ्याचे रवी देवांग, शिक्षणाने सिव्हिल इंजिनिअर. शेतकरी संघटनेचे ते अध्यक्ष होते आणि त्याचवेळी विपश्यना या मौनाभोवती गुंफलेल्या तिबेटी अध्यात्मसाधनेचे प्रचारकही. नाशिकचे डॉ. गिरीधर पाटील, जे स्वतंत्र भारत पक्षाचे महासचिव होते व ज्यांना आपला बराचसा ग्रंथसंग्रह जोशींनी भेट दिला. हिंगणघाट तालुक्यातील आर्वी छोटी या गावचे कवी गंगाधर मुटे; शेतकरी संघटनेची वेबसाइट ते सांभाळतात. नाशिकचेच डॉ. श्याम अष्टेकर आणि त्यांच्या डॉक्टर पत्नी रत्ना पाटणकर, ज्या अगदी पहिल्यापासून जोशींबरोबर चाकण परिसरात खेडोपाडी रुग्णसेवा द्यायला फिरत असत. जोशींशी अगदी प्रथमपासून जोडले गेलेले हे एक ध्येयवादी जोडपे. इस्लामपूरचे उच्चशिक्षित व झुंजार शेतकरीनेते रघुनाथदादा पाटील, ज्यांनी पुढे स्वतःही वेगळी शेतकरी संघटना काढली. रावेरीच्या सीता मंदिराची जबाबदारी सांभाळणारे इंजिनिअर-शेतकरी बाळासाहेब देशमुख. नागपूरचे विजय जावंधिया; 'शरद जोशींचे वारसदार म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहायचो' असे मी काही जणांकडून ऐकले आहे. नागपूरचेच राम नेवले. जोशींच्या हातात घरखर्चासाठी म्हणून काही रक्कम देणारे सांगलीचे जयपालअण्णा फराटे. पुण्याचे मदन दिवाण आणि त्यांच्या पत्नी अलका. दिल्लीतील वास्तव्यात जोशींच्या निकट वावरणारी फारच थोडी कार्यकर्ता मंडळी होती; त्यांतले दिवाण एक प्रमुख. 'अंकुर सीड्स' कंपनीचे रवी काशीकर. यांचे घर म्हणजे संघटनेचे वर्ध्यातील कार्यालयच होते; आणि परिवार म्हणजे संघटनेचे हक्काचे पाईक. संघटनेला आर्थिक मदत करण्यात त्यांना मनापासून आनंद मिळत असे.

नांदेडचे शंकरअण्णा धोंडगे आणि उत्साही अभियंते गुणवंत पाटील हंगर्गेकर, राजुऱ्याचे वामनराव चटप, वरोऱ्याचे मोरेश्वर टेमुर्डे (जे दोन वेळा आमदार झाले, महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापतीही झाले), लातूरचे पाशा पटेल, धुळ्याचे अनिल गोटे हे सारे अगदी बिनीचे शिलेदार. या साऱ्यांचा विशेषतः राजकीय प्रवासात पुढाकार होता. यांतल्या काहींनी पुढे अन्य पक्षात जाऊन नाव कमावले, पण आपली सुरुवात शेतकरी संघटनेपासून झाली ह्याची जाणीव कायम ठेवली.

पुणे येथील 'माणूस' साप्ताहिकाचे संपादक श्री. ग. माजगावकर, पुण्यातल्याच 'सोबत' साप्ताहिकाचे ग. वा. बेहेरे, नाशिकचे प्रसिद्ध उद्योगपती व 'देशदूत' वृत्तपत्रसमूहाचे मालक देवकिसन सारडा, अकोल्याच्या 'देशोन्नती' दैनिकाचे प्रकाश पोहरे ही पत्रकारितेतील मोजकी मंडळी, ज्यांना जोशींच्या कार्याचे महत्त्व जाणवले व ज्यांनी त्या काळात आपापल्या नियतकालिकांतून संघटनेच्या कार्याविषयी लिहिले.

संघटनेच्या प्रसारात ज्यांचा मोठा वाटा आहे असे देवकिसन सारडा प्रस्तुत लेखकाला म्हणाले,

"नाशिकच्या ऊस आंदोलनाला सुरुवात झाली, त्याच सुमारास एक दिवस मी शरद जोशींना मुद्दाम भेटलो. चांगले तीन-चार तास आमची चर्चा झाली. त्यांचे एकूण विचार मला

पटले. म्हटले, माणूस प्रामाणिक आहे; देशाच्या भल्याचेच बोलतो आहे. आमचे संपादक शशिकांत टेंभे यांना मी नंतर बोलावून घेतले आणि माझे मत सांगितले. त्यांनाही ते पटले. देशदूत आणि सार्वमत अशी आमची दोन वृत्तपत्रे आहेत. आवृत्त्या अनेक आहेत. ह्या विचारांची पाठराखण करायचे आम्ही ठरवले. टेंभे यांचे सहकारी सुरेश अवधूत (जे पुढे संपादकही झाले) हे जिल्ह्यात जिथे जिथे संघटनेचा कार्यक्रम असेल, तिथे तिथे हजर राहत आणि सविस्तर वृत्तान्त लिहीत. नाशिक, सटाणा, श्रीरामपूर, शिर्डी, अहमदनगर वगैरे सगळ्या साखरउत्पादक परिसरात आमचे वाचक मोठ्या संख्येने आहेत. पुढची पंधरा-वीस वर्षे आम्ही सातत्याने शरद जोशींच्या आंदोलनाला भरपूर प्रसिद्धी दिली.''

दुर्दैवाने शेतकरी आंदोलनाची अशी पाठराखण मुंबई-पुण्याच्या कुठल्या वृत्तपत्राने केली नाही.

मुंबईचे राजीव बसर्गेकर, नाशिकचे मिलिंद मुरुगकर, पुण्याचे विनय हर्डीकर, औरंगाबादचे मानवेंद्र काचोळे, यवतमाळचे सुधाकर जाधव, कोल्हापूरचे अजित नरदे, नागपूरचे शरद पाटील, मेटाखेड्याचे चंद्रकांत वानखडे ही विचारवंत मानली गेलेली मंडळी. म्हणजे शेतकरी संघटनेचे थिंक टँक. आपल्या लेखनातून त्यांनी संघटनेचे विचार सर्वदूर पोचवले.

घरंदाज मराठा घराण्यातल्या असूनही घराबाहेर पडून दारूदुकान बंदी आंदोलनात नेतृत्व देणाऱ्या व पुढे महिला आघाडीच्या अध्यक्ष बनलेल्या अमरावतीच्या विमल पाटील, वर्ध्याच्या सरोज काशीकर व सुमन अगरवाल, आर्वीच्या शैला देशपांडे, मुंबईच्या पत्रकार ओल्गा टेलीस, अमेरिकन असून ग्रामीण महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या गेल ऑमवेट, मुंबईच्या लेखिका व लघुपटनिर्मात्या अंजली कीर्तने, दिल्लीच्या मधु किश्वर, पुण्याच्या विद्युत भागवत, म्हसवडच्या चेतना गाला सिन्हा ह्या सर्व महिला सहकाऱ्यांचे योगदानही मोठे आहे. क्वचितच कुठल्या पक्षाला वा संघटनेला इतका कर्तृत्ववान व गुणसंपन्न महिला विभाग लाभला असेल.

अनंतराव देशपांडे, बद्रीनाथ देवकर, सुरेशचंद्र म्हात्रे व दर्शिनी भट्ट हे चार कार्यकर्ते अखेरच्या काही वर्षांत जोशींच्या सर्वाधिक निकट राहिले. त्यांच्या निष्ठेविषयी व सेवावृत्तीविषयी लिहावे तेवढे थोडेच आहे.

अनंतराव देशपांडे मूळचे लातूरचे. परभणी अधिवेशनापासून ते शेतकरी आंदोलनात सामील झाले. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांची एक सभा उधळून लावण्याइतके 'धाडस' संघटनेत आल्यावर त्यांच्यात निर्माण झाले. शिवार योजनेत त्यांनीही एक शाखा लातूरला उघडली होती; पण ती सगळी योजनाच पुढे फसली. त्यांची उसाची शेती होती. तशी मोठी होती, पण पूर्ण तोट्यात. सामान्यतः शेतमजुरावर होणाऱ्या अत्याचाराच्या कहाण्या आपण ऐकतो. अनंतरावांची कहाणी वास्तवाच्या अगदी वेगळ्या अंगावर प्रकाश पाडते. त्यांचा पूर्ण तयार झालेला ऊस तोडायला ऊसतोडणी कामगारांनी नकार दिला. कितीही मनधरणी केली, कितीही मजुरी देऊ केली, अगदी हातापाया पडून विनवणी केली, तरी कोणी यायला तयार होईना. शेवटी तो सगळा तयार झालेला ऊस अनंतरावांना चक्क जाळून टाकायला लागला. शेतकरी किती मोठ्या




आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा जोशींनी सातत्याने पुरस्कार केला : १४ नोव्हेंबर २०००,
जळगाव येथे ठिबक सिंचन यंत्रणेचे निर्माते भंवरलाल जैन यांच्यासमवेत



शेतकरी संघटनेच्या नोव्हेंबर २००३ मधील चंद्रपूर अधिवेशनात विक्रीसाठी
ठेवलेली पुस्तके न्याहाळताना. सोबत सुरेशचंद्र म्हात्रे, सरोज काशीकर व शैलजा देशपांडे



एप्रिल १९९९. बायपास सर्जरीनंतर पुन्हा एकदा संगणक हाताळून स्वतःच्या क्षमता
विलक्षण जिद्दीने व एकाग्रतेने पुनरुज्जीवित करताना आंबेठाण येथील आपल्या खोलीत




कुठलेही आधुनिक तंत्रज्ञान स्वतः हाताळण्यात जोशी नेहमीच आघाडीवर असत —
नोव्हेंबर २००३ मधल्या चंद्रपूर अधिवेशनात भरवलेल्या कृषी प्रदर्शनात ट्रॅक्टर चालवताना



ख्यातकीर्त कृषिशास्त्रज्ञ एम. एस. स्वामीनाथन यांच्यासमवेत एका परिषदेत



ॲड. राम जेठमलानी यांनी कायदेशीर प्रकरणात नेहमीच मोलाची साथ दिली.
२८ मे १९९४, मुंबई, स्वतंत्र भारत पक्षाच्या एका बैठकीत.

जागतिक व्यापार परिषदेचे (WTOचे) तिसरे महासंचालक माईक मूर यांची दिल्लीतील एका हॉटेलात घेतलेली भेट, १० जानेवारी २०००.





शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, भामा उद्योग नगरी, भूमिपूजन समारंभ, आंबेठाण, १२ मार्च १९९९

ॲड. दौलतराव घुमरे पत्नी लीलावती यांच्या समवेत. ऊस आंदोलनात ३१,००० शेतकऱ्यांना अटक झाली होती. घुमरे यांनी संपूर्ण नाशिक बार कौन्सिल शेतकऱ्यांच्या बचावार्थ विनामूल्य उभे केले.







विश्वनाथ प्रताप सिंग, चंद्रशेखर व अटल बिहारी वाजपेयी यांच्यासमवेत शरद जोशी.
नागपूर येथे १२ डिसेंबर १९८७ रोजी भरलेल्या संघटनेच्या सभेत.
यांतील तिघांच्या नशिबात भविष्यात पंतप्रधानपदाचा योग होता.



पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची नवी दिल्ली येथे किसान समन्वय समितीच्या सदस्यांसह भेट घेताना
(डावीकडून भूपिंदर सिंग मान, हरयाणाचे किसान नेते प्रेमसिंह दहिया व शरद जोशी), १९ जानेवारी २०००



मुंबई येथे लेस्ली सोनी फाउंडेशनने आयोजित केलेल्या 'Outline of the Second Republic' ह्या विषयावरील जोशींच्या एका व्याख्यानानंतर जेआरडी टाटा व मिनू मसानी यांच्यासमवेत, १५ मे १९८७



(डावीकडून) भूपिंदर सिंग मान, बिपीनभाई देसाई, शरद जोशी व मिनू मसानी
२८ मे १९९४, मुंबई, स्वतंत्र भारत पक्षाच्या एका बैठकीत.



५ एप्रिल १९९४, शेतकरी संघटनेच्या पाच आमदारांसह. महाराष्ट्र विधानसभेतील तत्कालीन उपाध्यक्ष मोरेश्वर टेमुर्डे यांच्या मुंबईतील निवासस्थानी.
(डावीकडून) ॲड. वामनराव चटप, शिवराज तोंडचिरकर, ॲड. मोरेश्वर टेमुर्डे, शरद जोशी, डॉ. वसंतराव बोंडे व सरोजताई काशीकर.



शेवटचा ठळक असा जाहीर कार्यक्रम. यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते स्वीकारताना.
सोबत अनंतराव देशपांडे व भानू काळे, २५ नोव्हेंबर २०१४, मुंबई.



भंडारदरा, ८ ऑगस्ट २०१५. दर्शिनी भट्टजी आणि अनंतराव देशपांडे यांच्यासह.
शरद जोशी यांचे अगदी शेवटच्या कालखंडातील छायाचित्र.

प्रमाणावर मजुरांवर अवलंबून असतो, आणि मजूरही शेतकऱ्याचे कसे शोषण करू शकतात, याचे हे एक बोलके उदाहरण आहे. ह्या सगळ्याचा मानसिक ताण अनंतरावांना सहन होईना; त्यांना औदासीन्याने घेरले. एकदा तर त्यांनी आत्महत्या करायचा विचार केला.

पुढे त्यांनी शेती बंद करायचा निर्णय घेतला. जमीन विकून टाकली. पुण्यात भोसरीला फ्लॅट घेतला. मुलांना शिकवले. एक मुलगा नोकरीनिमित्त कोरियाला गेला, दुसऱ्याला पुण्यातच चांगली नोकरी मिळाली.

शेवटची काही वर्षे अनंतराव दिवसभर जोशींबरोबर राहत. औषधे जोशी नेहमीच आपली आपण घेत, त्याबाबतीत ते खूप दक्ष होते. पण अंघोळ करताना, कपडे बदलताना, उठताना, बसताना पुढे पुढे जोशींना सतत आधार लागे. व्हीलचेअरवरून कुठे जायचे म्हटले तरी कोणीतरी लागे. अनंतराव ही सारी कामे विनातक्रार, आपुलकीने व शांतपणे करत असत. जोशींना काही त्रास होत असेल तर रात्रीचा ते तिथेच मुक्कामही करत. 'साहेबांची सेवा करणे हे आपले कर्तव्य आहे, त्यांनी आम्हाला जे दिले त्या तुलनेत हे काहीच नाही,' ह्या अत्यंत निरलस भावनेने अनंतरावांनी अखेरच्या श्वासापर्यंत जोशींची सेवा केली.

कोपरगावजवळच्या टाकळी गावचे बद्रीनाथ देवकर ऊस आंदोलनापासून जोशींच्या संपर्कात आले. तीनशेचा भाव मिळेस्तोवर कारखान्याला ऊस घालायचा नाही हा संघटनेचा आदेश होता. कारखान्याची माणसे ऊस तोडायला आली तेव्हा बद्रीनाथांनी बांधावर उभे राहून त्यांना कडवा विरोध केला. त्यावेळी बरीच मारामारीदेखील झाली होती, पण उंचेपुरे बद्रीनाथ डगमगले नाहीत. त्याकाळात कितीही कष्ट केले तरी खर्च भरून निघण्याइतकेही पैसे शेतीत सुटायचे नाहीत; कमाई दूरच. भावंडांचे शिक्षण, बहिणींची लग्ने वगैरे घरची सगळी जबाबदारी त्यांच्यावरच. नशिबाला दोष देत दिवस कंठत असताना उसाच्या आंदोलनात त्यांना आशेचा पहिला किरण दिसला आणि सगळे कौटुंबिक पाश तोडून त्यांनी आंदोलनात उडी घेतली. पूर्णवेळ संघटनेचे काम करू लागले. खूपदा असे व्हायचे, की घरची एखादी गाय विकून किंवा असेल नसेल ते दुसरे काही विकून ते अधिवेशनाला जात. ते एकदा मला म्हणाले होते, ''वयाच्या चाळिसाव्या वर्षापर्यंत फिक्स्ड डिपॉझिट म्हणजे काय, हेही मला ठाऊक नव्हते.''

संघटनेत बद्रीनाथ यांनी कधीच कुठले पद भूषवले नाही, कधी भाषणही केले नाही, कधी व्यासपीठावर दिसले नाहीत. त्यांचा तो पिंडच नव्हता. पण स्वतः पार्श्वभूमीवर राहून सगळे नियोजन करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या पत्नी शुभांगी म्हणजे श्रीरामपूरच्या प्रसिद्ध शिंदे कुटुंबातल्या. रावसाहेब आणि त्यांचे मोठे बंधू अण्णासाहेब शिंदे ही अगदी जुळ्या भावांप्रमाणे दिसणारी जोडगोळी सगळ्या नगर जिल्ह्यात प्रसिद्ध. दोघेही पूर्वी बेचाळीसच्या आंदोलनात व नंतर साम्यवादी आंदोलनात सामील झाले होते. पुढे दोघेही वकील झाले, रावसाहेब कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सहवासात आले. आशिया खंडात सगळ्यांत मोठ्या मानल्या गेलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या कामाला त्यांनी स्वतःला वाहून घेतले. संस्थेचे चेअरमन बनले. अण्णासाहेब पुढे यशवंतरावांच्या सल्ल्याने राजकारणात शिरले.

सलग चौदा वर्षे ते कृषिमंत्री होते. शेतकरी संघटनेचा आंदोलनाचा मार्ग दोघा भावांना तितकासा मान्य नव्हता, पण दोघांनाही जोशींबद्दल खूप आदर होता. रावसाहेबांच्या ज्येष्ठ कन्या म्हणजे शुभांगी; बद्रीनाथांच्या पत्नी. आपले जावई पूर्णवेळ शेतकरी संघटनेचे काम करतात याचा रावसाहेबांना अभिमान होता.

शेतीतील एकूण दुर्दशा आयुष्यभर अनुभवल्यानंतर बद्रीनाथांनी एक निश्चय केला; कसेही करून निदान आपल्या मुलांना शेतीतून बाहेर काढायचे. तेच उद्दिष्ट समोर ठेवून ते पुण्याला राहायला आले. अनंत कष्ट उपसले, तब्येतीच्या व इतर प्रापंचिक अडचणी झेलल्या, संसाराचा गाडा चालवण्यासाठी बरीचशी शेती देवकरांना थोडी थोडी करत विकावीही लागली. जेमतेम तीनेक एकर शेती आणि राहते घर तेवढे राहिले. पण तिन्ही मुले आता परदेशात सुस्थितीत आहेत. कधी कधी महिना महिना बद्रीनाथ संघटनेच्या कामासाठी घराबाहेर असत, पण शुभाताईंनी सर्व भार विनातक्रार वाहिला. जोशींचा बद्रीनाथांवर पूर्ण विश्वास. आपली अनेक व्यक्तिगत कामेही जोशी त्यांच्यावर निःशंकपणे सोपवत. पुण्यात जेव्हा जोशींचा स्वतःचा फ्लॅट नव्हता, तेव्हा पुण्यात आले, की खूपदा त्यांचा मुक्काम देवकरांच्या पुण्यातल्या घरीच असायचा. पुण्यातील देवकरांचे सध्याचे घर आमच्या शेजारच्याच इमारतीत आहे. त्यांच्याकडे गेल्यावर जोशींना भेटायचा, त्यांच्याबरोबर जेवायचा योग मलाही आला आहे.

सुरेशचंद्र म्हात्रे मूळचे अलिबागचे. गणिताचे प्राध्यापक. पण पिंड समाजसेवकाचा. त्यांचे एक सहकारी प्राध्यापक अरविंद वामन कुळकर्णी यांच्यासोबत ते जोशींना निपाणी येथे प्रथम भेटले. पहिल्या भेटीतच जोशी व त्यांचे विचार यांनी म्हात्रेंच्या मनाची पुरती पकड घेतली. अलिबागची उत्तम नोकरी सोडून त्यांनी स्वतःहूनच पूर्णवेळ विनावेतन शेतकरी संघटनेचे काम करायचा निर्णय घेतला. जोशींना खरे तर ते तितकेसे पसंत नव्हते; पूर्णवेळ कार्यकर्त्यांची आर्थिक जबाबदारी अप्रत्यक्षपणे तरी आपल्यावर पडते व आजवर त्याबाबतीत आपल्याला फारसे यश मिळालेले नाही याच्या जाणिवेमुळे. ‘माझा कुठचाही भार तुमच्यावर कधीच पडणार नाही’ असे आश्वासन म्हात्रेंनी दिले तेव्हाच जोशींचा विरोध मावळला. शेवटपर्यंत म्हात्रेंनी ते आश्वासन पाळले. शरद जोशींनी चाकण येथे सुरु केलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्यपद त्यांनी काही काळ नाइलाजाने सांभाळले. खादीचे, घरी धुतलेले, बिनइस्त्रीचे साधे कपडे घालणारे, किरकोळ चणीचे, चष्मा लावणारे म्हात्रे नेहमी गंभीर असतात, पण साहित्य व कलांचे ते भोक्ते आहेत; स्वतः उत्तम हार्मोनियम वाजवतात. आधुनिक तंत्रज्ञानाची त्यांना नितांत आवड आहे व त्यातले बरेच काही त्यांना जमतेही.

‘शेतकरी संघटक’ची धुरा त्यांनी सव्वीस वर्षे वाहिली; मधला अमर हबीब यांनी सांभाळलेला व नंतर श्रीकांत उमरीकर यांनी सांभाळलेला कार्यभार सोडला तर जवळजवळ सर्वच काळ. अंकाची अक्षरजुळणी (डीटीपी) करायला अमोघ आर्ट्सच्या हरीश घाटपांडे यांच्याकडे ते येत व त्यांच्याकडेच अंतर्नाद मासिकाच्या अक्षरजुळणीचे कामही होई. चाळीस

किलोमीटरवरच्या आंबेठाणहून सकाळी अगदी लौकर ते आपल्या मोटर सायकलवरून निघत व शनिवारपेठेत घाटपांडेकडे मजकूर घेऊन येत. संगणकावर ते उत्तम अक्षरलेखन करतात व बहुतेकदा जवळच्या सीडीवर ते पूर्वीच तयार केलेला मजकूर आणून देत. सर्व चुका सुधारून अंकाला अंतिम मुद्रणपूर्व रूप लाभेपर्यंत दिवसभर तिथेच थांबत. साहजिकच आमच्या तिथे कधीकधी भेटी होत, कामादरम्यानच्या वेळेत थोड्याफार गप्पाही. आपल्या संपादनाच्या व मुद्रितशोधनाच्या कामात म्हात्रे वाकबगार होते. काकदृष्टीने बघणाऱ्यालाही संघटकमध्ये सहसा चुका सापडत नसत. शेतकरी संघटकची जबाबदारी पार पाडताना म्हात्रेंना अक्षरजुळणी करणारे हरिश घाटपांडे, मुद्रक गणेश ऑफसेटचे गिरीश दात्ये व बांधणीकार (कै.) मामा व जयंत भोसले यांची मोलाची मदत झाली; केवळ 'धंदा' म्हणून त्यांनी हे काम केले नाही. शरद जोशींचे बरेचसे मराठी व इंग्रजी लेखन म्हात्रे लिहून घेत व नंतर जोशींच्या सल्ल्याने त्याचे संपादनही करत.

संघटनेत सर्व जण त्यांना म्हात्रेसर म्हणत व आजही म्हणतात. त्यावेळी आजच्यासारखी सरसकट सर्वांना 'सर' म्हणायची पद्धत नव्हती. पण एकेकाळी केलेल्या प्राध्यापकीमुळे व एकूणच वडिलकीच्या भावात ते वावरत असल्यामुळे सगळ्यांचे ते 'सर' बनले. हे संबोधन संघटनेत फक्त त्यांच्याकरिताच राखून ठेवलेले होते. इथे एक नमूद करायला हवे. जोशींना संघटनेत सगळे जण 'जोशीसाहेब' म्हणत; महिलांचे मात्र ते 'शरदभाऊ' असत. त्यांना फक्त 'शरद जोशी' म्हणणारे संघटनेत म्हात्रे एकटेच. म्हात्रे अविवाहित आहेत, कडक आणि शिस्तप्रिय म्हणून प्रसिद्ध आहेत, पण संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांच्या कुटुंबाशी त्यांचे घरच्यासारखेच संबंध आहेत. स्मरणशक्ती दांडगी, सगळी माहिती तोंडावर. संघटनेबद्दल काहीही विचारा; म्हात्रेंना ते ठाऊक असते. आणि लगेच नाही सांगता आले तरी ती माहिती नेमकी कुठे असेल हेही त्यांना ठाऊक असते. त्यामुळे काही मिनिटांतच तुमच्यापुढे ती माहिती येते.

शेतकरी संघटनेच्या माहितीपत्रकांत 'मध्यवर्ती कार्यालय' (Central Office) म्हणून आंबेठाणचा भारदस्त वाटेल असा पत्ता असतो; पण हे 'मध्यवर्ती कार्यालय' म्हणजे म्हात्रे एकटेच! संघटनेच्या कार्यक्रमात किंवा बैठकीत किंवा जोशी कोणाशी कसली चर्चा करत असताना ते आडबाजूला कुठेतरी बसतील; पण जोशींना कुठचीही माहिती हवी असेल तर ते मागायच्या आधीच त्यांची गरज ओळखून म्हात्रे ती पुरवायला सामोरे येतील. शेवटच्या काही वर्षांत जोशींनी केलेल्या जवळजवळ सर्वच लेखनाचे शब्दांकन म्हात्रेंनी केलेले आहे. जोशींचे त्यांच्यावाचून चालणे अवघडच होते, असे मलातरी वाटायचे. इतरही अनेकांचे बहुधा तेच मत होते. कदाचित त्यामुळेच अधूनमधून होणाऱ्या स्वभावसुलभ मतभेदांकडे दुर्लक्ष करत जोशींनी म्हात्रे यांच्याशी कायम जुळवून घेतले होते.

नर्मदा नदीचे पाणी दुष्काळात होरपळणाऱ्या शेतीला मिळावे म्हणून जोशींनी केलेल्या जनआंदोलनात त्यांच्या हाती लागलेले रत्न म्हणजे दर्शिनी भट्टजी ऊर्फ दीदी. त्यांचे वडील जोशींना खूप मानत. 'हे धरण होऊ नये म्हणून मेधा पाटकर जर नर्मदेत जलसमाधी घेणार

असतील, तर हे धरण व्हावे म्हणून मी जलसमाधी घ्यायला तयार आहे,' असे उद्‌गार या तरुण सामाजिक कार्यकर्तीने काढले होते. 'बालमूर्ती' नावाचे मुलांसाठीचे एक मासिक त्या चालवत. मॉंटेसरी शिक्षणाचे भारतातील खंदे पुरस्कर्ते गिजुभाई बधेका आणि ताराबाई मोडक यांच्या प्रेरणेतून सुरू झालेले हे मासिक. संस्थापकांच्या निधनानंतर एका न्यासातर्फे ते चालवले जाई. कुठच्याही ध्येयवादी मासिकाप्रमाणे बालमूर्तीचा संसारही भागवाभागवीचाच होता. त्याची व्यावहारिक जबाबदारी दर्शिनी यांनी घेतली होती. बडोद्याला जोशी हृदयविकाराच्या दुखण्यानंतर विश्रांतीसाठी आले असताना, त्यांना एखाद्या स्वीय सहायकाची गरज होती. त्यासाठी स्वयंस्फूर्तीने दर्शिनी पुढे झाल्या. आपले घरातले व जोशींना सांभाळण्याचे काम त्या इतक्या निगुतीने करत, की जोशींनी नंतर त्यांना पुण्याला येऊन त्यांच्या घरची जबाबदारी घ्यायची विनंती केली. बालमूर्तीच्या विश्वस्तांची व आपल्या कुटुंबाची परवानगी घेऊन त्या आल्या आणि मग २००० ते २०१६ अशी पुढची सोळा वर्षे जोशींबरोबरच राहिल्या. जोशी त्यांना आपली मुलगीच मानत. त्यांच्यातला धाडसीपणा थक्क करणारा होता. जोशी दौऱ्यांवर असताना खूपदा आंबेठाणला त्या एकट्या राहत. कधीकधी अगदी बिछान्याजवळून मोठाला साप जाई. पण त्या कधीही घाबरल्या नाहीत. किंवा जोशींशी पटले नाही म्हणून गुजरातेत आपल्या घरी परत जावे असे त्यांच्या मनातही आले नाही. कितीही त्रास झाला तरी त्यांनी आपल्या कामात कधी कुचराई केली नाही. जोशींच्या फ्लॅटला घरपण लाभले ते त्यांच्यामुळे. शेतकरी संघटनेतले सगळे कार्यकर्ते त्यांना 'दीदी' म्हणत. जोशींची शेवटच्या दिवसापर्यंत त्यांनी जी प्रेमाने आणि निरलस सेवा केली ती केवळ अजोड अशीच आहे.

काही जण व्यावसयिक रूढार्थाने संघटनेचे कार्यकर्ते नव्हते; पण जोशींविषयी त्यांना जिव्हाळा होता व वेळोवेळी त्यांनी संघटनेच्या कामात सहभागदेखील दिला. नाशिकचे वकील दौलतराव घुमरे, मुंबईचे वकील राम जेठमलानी व नितीन प्रधान, संघटनेच्या हिशेबाची जबाबदारी घेणारे मुंबईचे अर्थसल्लागार व चार्टर्ड अकाउंटंट संजय पानसे, पुण्याचे जाहिरात व्यावसायिक शरद देशपांडे इत्यादी. यांच्याशी जोशींचा संबंध केवळ व्यावहारिक कामापुरता राहिला नाही; या सर्वांनी जोशींना आपापल्या कार्यक्षेत्राबाहेर जाऊनही मनःपूर्वक सहकार्य दिले.

मुंबईचे एस. व्ही. राजू, दिल्लीच्या लिबरल ग्रुपचे वरुण मित्र व पार्थ शहा, किसान समन्वय समितीचे भूपिंदर सिंग मान, बंगलोरचे हेमंतकुमार पांचाल, केरळचे प्रा. बाबू जोसेफ, आंध्रातील शंकर रेड्डी, बुंदेलखंडातले डॉ. साहेब लाल शुक्ला, 'शेतकरी संघटक'मधील निवडक लेखांचा हिंदीत अनुवाद करून ते लेख उत्तर भारतात प्रसृत करणारे झाशीचे प्रा. रामनाथन कृष्ण गांधी, सुरतचे बिपीन देसाई व गुणवंत देसाई, लेखक इंद्रजित भालेराव व शेषराव मोहिते, नागपूरचे विधिज्ञ शरदराव बोबडे हीदेखील त्यांच्या स्नेहपाशात अडकलेली मंडळी.

ही यादी खरे तर अजून खूप वाढवता येईल; पण कुठेतरी थांबायलाच हवे. ह्यांतील बहुतेक सर्वांबद्दल ह्या पुस्तकात वेगवेगळ्या ठिकाणी प्रसंगोपात्त लिहिले गेलेच आहे; ज्यांचा उल्लेख अनावधानाने राहून गेला असेल, त्यांची क्षमा मागतो.

आपल्या कार्यकर्त्यांना उत्तम प्रशिक्षण मिळावे म्हणून जोशींनी वेळोवेळी प्रशिक्षण शिबिरे घेतली. त्यासाठी आपली इतर कामे बाजूला ठेवून भरपूर वेळ काढला. प्रवासात व एरवीही त्या कार्यकर्त्यांची बौद्धिक वाढ कशी होईल याकडे लक्ष पुरवले. त्यांचे क्षितिज अधिक विस्तृत व्हावे म्हणून त्यांच्यातील काहींना किसान समन्वय समितीच्या देशपातळीवरील कामात सहभागी करून घेतले व स्वतःबरोबर वेगवेगळ्या प्रांतांत नेले. मे १९९९मध्ये संघटनेच्या दहा कार्यकर्त्यांसाठी त्यांनी युरोपचा दोन आठवड्यांचा दौराही बेल्जियममधील 'युरोपा बायो' या संस्थेमार्फत आयोजित केला होता. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी आयोजित केला गेलेला हा पहिला आणि शेवटचा विदेश दौरा.

शेतकरी संघटना उभारण्यासाठी अनेक कार्यकर्ते उभे करावे लागतील याची जोशींना पूर्ण जाणीव होती व म्हणूनच त्यांनी असे कार्यकर्ते उभे करण्यासाठी जीव तोडून प्रयत्न केले. खन्ना येथील किसाननेत्यांच्या बैठकीत ते म्हणाले होते त्याप्रमाणे ते आणि कार्यकर्ते यांच्यातील नाते त्यांनी आई आणि मूल यांच्यातील नात्याप्रमाणेच मानले व तसे ते जपलेही. प्रत्येक कार्यकर्त्याबद्दल त्याच्या त्याच्या वृत्तीप्रमाणे ते पावले उचलत गेले. उदाहरणार्थ, नरेन्द्र अहिरेसारख्या त्यांच्या एका खंद्या कार्यकर्त्याला त्यांनी गिरणा सहकारी साखर कारखान्याचा चेअरमन म्हणून निवडून यायची प्रेरणा दिली तर अंजली कीर्तनेंसारख्या लेखिका-विचारवंत मुंबईकर महिलेला स्वतंत्र भारत पक्षाचे चिटणीस बनवले.

जोशींकडे आकृष्ट झालेले कार्यकर्ते वेगवेगळ्या पार्श्वभूमीचे होते. काही जण खरे तर स्वतःच मान्यवर नेते होते. उदाहरणार्थ, अंबाजोगाईजवळच्या मोरेवाडीचे श्रीरंगनाना मोरे. जोशींपेक्षा ते चार वर्षांनी मोठे. जोशी भारतात यायच्यापूर्वीच त्यांनी कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंध नसलेली अशी 'शेतकरी संघटना, मोरेवाडी' स्थापन केली होती. शेतकऱ्यांमध्ये काम करणाऱ्या इतर सर्व संस्था कुठल्या ना कुठल्या राजकीय पक्षाशी संबंधित होत्या. त्या काळात खरे तर, मराठा समाजातील बहुतेक सुशिक्षित तरुण यशवंतराव चव्हाणांमुळे काँग्रेसकडे आकृष्ट होत होते. त्यांना सत्ताही सहजतः मिळत होती. पण श्रीरंगनानांनी तो मोह टाळला. शेतकरीहित हेच आपले कार्यक्षेत्र ठरवले. आपले विचार श्रीरंगनाना मोठ्या धाडसाने मांडत. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी तब्बल ६४ दिवस संप पुकारला होता. त्या संपाच्या विरोधात नानांनी 'भ्रष्टाचारी नोकरशाहीचा धिःकार असो' अशी घोषणा देत शेतकऱ्यांचा मोठा मोर्चा काढला होता. याचा धागा पुढे शेतकरी संघटनेने भ्रष्टाचाराच्या विरोधात जे 'Q' आंदोलन छेडले त्याच्याशी जुळतो. १९८० ते १९८४ अशी चार वर्षे नानांनी 'भूमिसेवक' नावाचे एक पाक्षिकही चालवले. मुख्यतः त्यात त्यांचेच लेख असत; पण एक वेगळेपण म्हणजे पाक्षिकाच्या प्रत्येक अंकात प्रसिद्ध कवी विठ्ठल वाघ यांची एखादी कविता प्रसिद्ध होत असे. पुढे नानांनी मुद्दाम नाशिकला जाऊन जोशींची भेट घेतली व ते जोशींच्या विचारांनी इतके भारावून गेले, की आपली संघटना त्यांनी जोशींच्या संघटनेत विलीन करून टाकली.

श्रीरंगनाना हे एक टोक पकडले तर वसमत तालुक्यातील जवळाबाजारचे पुरुषोत्तम

लाहोटी हे दुसरे टोक म्हणावे लागेल. एकेकाळी त्यांना 'वाया गेलेला मुलगा' असेच सगळे म्हणत. शाळा लहानपणीच सोडलेली. मटक्याचे व्यसन. पण जोशींच्या सहवासात आल्यावर ह्या 'वाल्याचा वाल्मीकी' झाला. संघटनेच्या कामात त्यांनी स्वतःला इतके वाहून घेतले, की स्वतःच्या आजोबा-भाऊ-पुतण्या यांच्या अंत्यविधीलाही ते त्यापायी हजर राहिले नाहीत. वाघा बॉर्डरपासून सरदार सरोवरापर्यंत जिथे जिथे जोशी जात, तिथे तिथे एखाद्या सुरक्षारक्षकाप्रमाणे लाहोटीही जात; सतत सावलीसारखे जोशींच्या मागे राहत. लाहोटींसारख्यांनाही जोशींनी आपले प्रेम दिले.

कार्यकर्त्यांनी केवळ पुस्तकी अभ्यास न करता माणसांत रमावे असा जोशींचा आग्रह असे. अमरावतीचे दिनेश शर्मा यांची एक आठवण बोलकी आहे. व्यवसायाने शर्मा एक वकील. हिंदीभाषक. फर्डे वक्ते आणि तितकेच चांगले लेखक. आपली वाणी आणि लेखणी त्यांनी संघटनेच्या प्रसारासाठी कायम वापरली. शर्मा लिहितात, ''माझ्या हातात नेहमी कुठले ना कुठले नवे पुस्तक असते हे लक्षात आल्यावर ते मला एकदा म्हणाले, 'माणसे म्हणजे जीवन. जीवनातील सत्य माणसांमध्ये शोधा, पुस्तकांत नाही.' त्यानंतर माझे पुस्तकांवर अवलंबून राहणे कमी झाले आणि जीवनाबद्दलचे प्रेम वाढू लागले.'' (अंगारमळा – फेब्रुवारी २०१६ अंक, संपादन : गंगाधर मुटे, पृष्ठ १३३)

सध्या राज्यमंत्री असलेले सदाभाऊ खोत यांची एक आठवण सांगण्यासारखी आहे. एकेकाळी ते शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते होते; पुढे राजू शेट्टी यांच्या संघटनेत ते गेले. एकदा शरद जोशींबरोबर ते सोलापुरात होते. तेथील एका सराफी दुकानात कोणाबरोबर तरी भेट ठरली होती. दुकानातच उभ्या राहून सदाभाऊंच्या पत्नी काचेच्या कपाटातील सोन्याचे मंगळसूत्र न्याहाळत होत्या. जोशींच्या ते लक्षात आले होते. गप्पा संपल्यावर जोशी त्यांना म्हणाले, ''वहिनी, हा सदा तुम्हाला दोन वाट्या आणि काळे मणी यापलीकडे काही देऊ शकणार नाही.'' मग त्यांनी दोन-अडीच तोळ्यांचे ते मंगळसूत्र स्वतःच्या खिशातून पैसे काढून विकत घेतले आणि वहिनींना भेट दिले.

कार्यकर्ते आयुष्यभरासाठी जोडले जातात ते अशा हृदयस्पर्शी क्षणांनी. जोशी अशा क्षणांची कायम उधळण करत राहिले. शेतकरी संघटना उभी राहिली ती अशा असंख्य क्षणांच्या गुंफणीतून.

एखाद्या कार्यकर्त्याने आपल्या वागण्यात काही चूक असल्याचे दाखवून दिले, तर ती चूक सुधारून घ्यायचा खिलाडूपणाही जोशींमध्ये होता. त्याचे एक उदाहरण. चेतना गाला सिन्हा ह्यापूर्वी छात्र युवा संघर्ष वाहिनीत होत्या. जोशींशी नुकताच परिचय झालेला. खुलताबादला कार्यकारिणीची सपत्निक बैठक जोशींनी बोलावली होती व तिला त्याही हजर होत्या. त्यावेळी जोशी सिगरेट ओढत; त्या बैठकीतदेखील ते अधूनमधून सिगरेट ओढत होते. चेतना गालांना ते खटकत होते. पण दुसरे कोणीच काही बोलत नव्हते. शेवटी धीर करून त्या एकदम म्हणाल्या, ''मला वाटतं, या मीटिंगमध्ये कोणीही स्मोकिंग करू नये. ही शिस्त आपण पाळायला हवी.''

सगळे एकदम चमकले, अचंबित नजरेने सिन्हांकडे बघू लागले. क्षणात खोलीत तणाव जाणवू लागला. त्याही काहीशा वरमल्या. पण नंतर लगेच जोशी स्वतः म्हणाले, ''चेतना म्हणते, ते खरं आहे. मीटिंगमध्ये बसलेल्या कोणाही एका व्यक्तीला जर माझ्या स्मोकिंगचा त्रास होत असेल, तर मी मीटिंगमध्ये स्मोकिंग करणे गैर आहे.'' त्यानंतर त्यांनीही संघटनेच्या सभांमध्ये सिगरेट ओढणे थांबवले. बऱ्याच जणांना हा प्रसंग ठाऊक नसेल, पण जोशी एखाद्या अगदी नव्या कार्यकर्त्याचेही म्हणणे पटले, तर ऐकत असत हे यावरून जाणवते.

कवी इंद्रजित भालेराव यांनी त्यांच्याबरोबर आंबेठाण येथे घालवलेल्या दोन दिवसांबद्दल लिहिले आहे. त्यावेळी जोशी त्यांच्याशी टेबल टेनिस खेळण्यात रंगले होते आणि दोनदा हृदयविकाराचा झटका येऊन गेला असतानाही जिद्दीने भामचंद्रचा डोंगर चढून गेले होते.

प्रत्येक वेळी कार्यकर्त्याने कार्यकर्ता याच भूमिकेत राहिले पाहिजे, जीवनातील आनंदापासून स्वतःला दूर ठेवले पाहिजे असे जोशींना अजिबात वाटत नसे. खूपदा आपल्या मनमोकळ्या वागण्याने जोशी वयातले अंतरही सहजगत्या मिटवून टाकत. एकदा ते आगगाडीने अहमदाबादला जात असताना चेतना सिन्हा त्यांच्यासोबत होत्या. प्लॅटफॉर्मवर उभे असताना हातातले कोल्ड ड्रिंक कोण लौकर संपवतो यावर त्यांच्यात पैज लागली होती! ती अर्थातच सिन्हा जिंकल्या होत्या!

प्रत्येक वेळी इतर मंडळीच जोशींकडे आकृष्ट होत असे नव्हते, कधी कधी जोशी स्वतःहूनही काही जणांशी संपर्क साधत. शिवाय, प्रत्येकाने सामाजिक कार्यकर्ताच बनले पाहिजे असे जोशींना अजिबात वाटत नसे. त्यापेक्षा वेगवेगळ्या जीवनक्षेत्रांत त्यांनी कर्तृत्व गाजवावे असे जोशींना वाटे.

उदाहरणार्थ, पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीशी संबंधित अशोक निरफराके. एसएससीच्या परीक्षेत ते संपूर्ण महाराष्ट्रात पहिले आलेले. त्यांची एक कविता एका मासिकाच्या 'युवा' विशेषांकात प्रकाशित झाली होती. तिचे 'ततः किम्?' हे संस्कृत शीर्षक आकर्षक वाटल्याने जोशींनी ती दोन-तीनदा वाचली. 'ठीक आहे, आलो पहिला, गाजवले कर्तृत्व, पण म्हणून काय झाले? आता पुढे काय?' असा काहीसा तिचा सूर होता. त्यांना २१ फेब्रुवारी १९९७ रोजी जोशींनी आपणहूनच एक मोठे, सहा पानी पत्र पाठवले होते. त्यात जोशी लिहितात,

> राष्ट्रसेवा घडली पाहिजे अशी आपली दुर्दम्य आकांक्षा आहे. राष्ट्रसेवा म्हणजे आपण काय करू इच्छिता, हे मात्र लक्षात येईना. या देशातील कोट्यानुकोटी लोक दैन्यात आहेत; ते दैन्य दूर करण्यासाठी काही पौरुषाची प्रतिज्ञा आपण करू इच्छिता? जगभरात आज संशोधनाचा रथ प्रचंड वेगाने चालला आहे. इलेक्ट्रॉनिक्स, जेनेटिक्स या क्षेत्रांत तर अद्‌भुत अवतरत आहे. तुम्ही राष्ट्रसेवा, राष्ट्रसेवा जी म्हणता, ती अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत काही ज्ञानकण जोडून दिल्याने होणार नाही का?

गेल्या ऑलिंपिकमध्ये भारताची दुर्दशा झालेली आपण पाहिली. एरवीही भारतीय पुरुषांचे उच्चांक जागतिक महिलांच्या उच्चांकाच्या खालचे असतात. विद्या, कला, क्रीडा, नेतृत्व, वक्तृत्व या सगळ्याच क्षेत्रांत परिस्थिती अशी आहे, की आमची राष्ट्रीय शिखरे जगाच्या तुलनेत खुजी वारुळे दिसू लागावीत. मागासलेल्या देशात सारीच चणचण असली तरी महात्म्यांची वाण नसते. जन जितके अधःपतित, तितके त्यांचा उद्धार करण्याचा डौल मिरवणारे 'थोर' लोक अधिक संख्येने उपलब्ध. त्यांचा मानही मोठा. सारा देश दैन्यावस्थेतला, पण दैवी गुणांच्या महात्म्यांचा उदो उदो प्रचंड! मग कुवतीची तरुण मुले आइनस्टाइन होऊ पाहत नाहीत, आयफेल होण्याची धडपड करत नाहीत, व्हॅन गॉग होऊ पाहत नाहीत, बिल गेट्स किंवा पीट सँप्रस होण्याचे स्वप्न बाळगत नाहीत. उलट असल्या सगळ्या कर्तबगारीचा 'ततः किम' म्हणून उपहास करतात. आणि काही शाब्दिक वाचाळपणा करण्याच्या कामाला राष्ट्रसेवा म्हणतात. आपणही तसेच करणार काय?

पत्राला निरफराके यांनी उत्तरही दिले होते, पण मग हा पत्रव्यवहार जोशींनी पुढे वाढवला नाही. हा सारा पत्रसंवाद पुण्याच्या वंचित विकास संस्थेचे विलास चाफेकर यांनी प्रसिद्धही केला आहे व तो जोशींच्या एकूण विचारसरणीची, त्यांच्या वर्ल्डव्ह्यूची ओळख पटवणारा आहे.

साधारण अशाच स्वरूपाची मते जोशींनी हेरंब कुलकर्णी हे शिक्षक-कार्यकर्ते त्यांना भेटायला आंबेठाण येथे गेले होते, त्यावेळी मांडले होते. त्यांच्या अमृतमहोत्सव स्मरणिकेत एका लेखात ते प्रकाशित झालेले आहेत (पृष्ठ ४१ ते ४५). कुलकर्णी यांनी त्या भेटीच्या साधारण बारा वर्षांपूर्वी, १९९७ मध्ये, पाचव्या वेतन आयोगाने दिलेल्या वेतनवाढीला विरोध केला होता व एक शिक्षक म्हणून स्वतःला मिळालेली ही पगारवाढ गैर समजून नाकारली होती. जोशींना त्याचे खूप कौतुक वाटले होते व आपणहून नगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातील कुलकर्णींच्या शाळेत खास जाऊन त्यांनी कुलकर्णी यांचा जाहीर सत्कारही केला होता. शिक्षणक्षेत्रातले एक कार्यकर्ते म्हणून आणि त्याविषयी लेखन करणारे म्हणून कुलकर्णी प्रसिद्ध आहेत. मेधा पाटकरांपासून बाबा आमटेंपर्यंत अनेक सामाजिक कार्यकर्त्यांविषयी त्यांना उत्कट आदरभाव आहे. आंबेठाणच्या भेटीत जोशी त्यांना म्हणाले होते,

''तुम्हां तरुणांना समाजसेवेचे इतके वेड का? त्यापेक्षा उद्योजक होऊन पैसा कमवा व गरिबांना वाटा. गरिबांसाठी रोजगार निर्माण करावा, असे तुम्हाला का वाटत नाही? तात्त्विक वटवट करण्यात रस का वाटतो?''

सगळ्यांनीच सामाजिक कार्यकर्ता बनायला हवे असे जोशींना कधीच वाटत नसे.

बहुतेक सर्व जुन्या कार्यकर्त्यांबरोबर जोशींचे कौटुंबिक स्वरूपाचे संबंध होते. त्या अर्थाने शेतकरी संघटना हे एक कुटुंबच होते. शेतकरी आंदोलन ही एका अर्थाने जोशींच्या दृष्टीने 'सेकंड इनिंग' होती; एकूणऐंशी साली संघटनेला सुरुवात करताना ते स्वतःही ४४

वर्षांचे होते – बरेच कार्यकर्ते यांच्या निम्म्या वयाचे होते. त्यांच्या दृष्टीने जोशी म्हणजे घरातली एखादी वडीलधारी व्यक्ती बनली.

आयुष्यातल्या वेगवेगळ्या संकटांशी झगडताना हेच शेतकरी संघटनेचे कुटुंब जोशींच्या पाठीशी सतत उभे राहिले. याचे एक उदाहरण म्हणजे लीलाताईंनी स्वतःचा विषप्राशन करून दुर्दैवी शेवट करून घेतला तो क्षण. त्यादिवशी कोजागिरी पौर्णिमा होती. बरीच शोधाशोध केल्यावर घराच्या गच्चीवरच लीलाताईंचा देह सापडला होता. घाईघाईने त्यांना आधी पुण्याच्या ससून हॉस्पिटलमधे नेले गेले. दैवदुर्विलास म्हणजे नेमकी त्यावेळी आंतरराज्य समन्वय समितीची (Interstate Coordination Committee) वर्ध्याला बैठक ठरली होती. ऑक्टोबर १९८२चा तो शेवटचा आठवडा होता. पुण्यात लीलाताईंची तब्येत तेव्हाही बरी नव्हती; पण ती बैठक हा जोशींचाच पुढाकार होता आणि शिवाय १४ राज्यांतील शेतकरीनेते हजर राहणार होते. त्यामुळे मग जोशी शेवटी वर्ध्याला गेले होते.

ती घटना आठवताना सरोजताई काशीकर लिहितात,

> ३० व ३१ ऑक्टोबर १९८२ रोजी वर्ध्याला आंतरराज्यीय किसाननेत्यांची परिषद होती. देशभरातून प्रमुख लोक आले होते. परिषद सुरू झाली. नंतर चार वाजता खुली सभा होती. पण ११ वाजताच लीलाताई गेल्याची बातमी आली. साहेबांना ती कळल्यावर परिषदेची ती बैठक पूर्ण करूनच साहेब म्हात्रेसर व प्रल्हाद पाटील कराड यांच्यासोबत गाडी घेऊन १२०-१४०च्या वेगाने पुण्याला निघाले.

या कठीण काळात जोशींना त्यांच्या संघटनेच्या सहकाऱ्यांनी मोठा आधार दिला. त्या काळातील आपल्या आठवणीही सरोजताई सांगतात. त्या लिहितात,

> गौरी व श्रेया या लीलाताईंच्यासोबत वर्ध्याला येऊन गेल्या होत्या. लीलाताई गेल्यावर त्यांच्यासोबत राहायला जावं म्हणून विजय व वृषाली काटकर, त्यांची दोन मुलं व आमचे वैभव व अश्विन ह्यांच्यासह आम्ही आंबेठाणला गेलो. मुलांमध्ये श्रेया, गौरी व साहेब छान मिसळले. काटकरांच्या मुलींना ते पिपाण्या म्हणत; कारण दोघी एकाच वेळी रडत असत! तिथल्या मुक्कामात आम्ही श्रेया, गौरी व साहेबांसोबत जवळचा भामचंद्र डोंगर चढायला शिकलो. आपण डोंगर चढू शकतो हा आत्मविश्वास आम्हा दोघा नवराबायकोंत निर्माण झाला. मुलांची तर मज्जाच होती. अश्विन तर साहेबांच्या पाठीवर बसूनच डोंगरावर यायचा.
>
> साहेब विदर्भात आले, की वर्ध्याच्या मुक्कामी सर्व कार्यकर्ते जमायचे. घरी रात्री जेवणं आटोपली, की वरच्या गच्चीत गाण्याच्या भेंड्यांचा कार्यक्रम व्हायचा. यात आम्ही सर्व सहभागी होत असू. भाऊ व माई बोरावके, बद्रीनाथ व शुभांगी देवकर या सगळ्यांची मैफल असायची. एकमेकांवर भेंड्या चढवण्यात आम्ही तत्पर असायचो. तेव्हा साहेब आमचे नेते हा भावच कोणाच्या मनात नसायचा. त्यामुळे

> कार्यकर्ता व नेता ही दरीच आमच्यात कधी निर्माण झाली नाही. साहेबांनी प्रेषित, महात्मा किंवा उद्धारक म्हणून आपली प्रतिमा कधीही होऊ दिली नाही.
>
> (शरद जोशी अमृत महोत्सव स्मरणिका, २०१०, पृष्ठ २३७-८-९)

आपल्या पत्नीविषयी जोशींनी फारसे लिहिलेले नाही. पण एकूण कार्यात लीलाताईंची साथ खूप मोलाची होती यात शंका नाही. जोशींनी स्वतः पत्नीला, किंवा नात्यातील कुठल्याच अन्य व्यक्तीला, शेतकरी आंदोलनात सहभागी करून घेतले नाही. सुरुवातीच्या काळात लीलाताई पतीबरोबर कार्यक्रमांना उपस्थित असत, पण मागे कुठेतरी श्रोत्यांमधे बसत. संघटनेत कुठलेही पद त्यांनी कधीच भूषवले नाही. जोशींनीही त्यांना पुढे आणायचा कधी प्रयत्न केला नाही. पण तरीही कांदा आंदोलनात ते उपोषण करत असताना लीलाताई स्वयंस्फूर्तीने चाकणला गेल्या आणि काहीशा गांगरून गेलेल्या शेतकऱ्यांसमोर त्यांनी परखड भाषण केले तो आंदोलनातील उत्कर्षबिंदू होता. त्याविषयी पाचव्या प्रकरणात लिहिलेच आहे.

खूप नंतर, चांदवड येथील महिला अधिवेशनाबद्दलच्या आपल्या एका लेखात पत्नीपासून आपल्याला कशी प्रेरणा मिळाली याविषयी जोशी लिहितात,

> ह्या अधिवेशनात त्यावेळी हयात असलेल्या माझ्या पत्नीने, लीलाने, पहिले भाषण केले होते आणि त्या भाषणात शेतकऱ्यांच्या संघटनेबरोबर शेतकरी महिलांचीही संघटना असायला पाहिजे, अशी बाजू मोठ्या परिणामकारकरीत्या मांडली होती. लीला गेल्यानंतर माझ्या मनात एका अपराधी भावनेपोटी, महिलांचे काहीतरी काम घडावे अशी तीव्र इच्छा निर्माण झाली.
>
> (*लोकसत्ता,* ६ फेब्रुवारी २०१३)

आपल्या दोन मुलींविषयी अगदी क्वचित प्रसंगी जोशींनी काही लिहिले आहे. ई-टीव्हीवरील *संवाद* ह्या कार्यक्रमात प्रसिद्ध पत्रकार राजू परुळेकर यांना दिलेल्या मुलाखतीत एक आठवण आहे. जोशी म्हणतात,

"१९८६मध्ये जेव्हा मी कापूस आंदोलन सुरू केलं – राजीवस्त्रांच्या होळ्या करण्याचं – त्यावेळी माझी धाकटी मुलगी वर्ध्याला मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस करत होती. काही पत्रकार त्या दिवशी तिच्याकडे गेले आणि या दिवशी योगायोगाने तिने ती खूपदा घालायची तसले सिंथेटिक म्हणजे राजीवस्त्राचे कपडे घातलेले होते. एका पत्रकाराने तिला विचारले की, 'तुझे वडील तिकडे राजीवस्त्राच्या होळ्या करतात आणि तू कसे टेरिलिनचे कपडे घालतेस?' त्यावर ती म्हणाली, 'माझ्या वडलांनी मला कधीही मी कसं वागावं, काय वापरावं हे सांगितलं नाही आणि ते मला कधी सांगणारही नाहीत. मला काय चांगलं वाटतं, हा माझ्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा प्रश्न आहे.' स्वातंत्र्य हाच माझा मुख्य संदेश आहे, हे तिने बरोबर जाणलं होतं."

पुढे मोठ्या श्रेयाचे लग्न ६ जून १९८६ रोजी झाले. पुण्यातील एक इंजिनिअर सुनील शहाणे ह्यांच्याशी. वधूवरांनी स्वतःच्या हस्ताक्षरातील सहीने प्रसृत केलेले संध्याकाळच्या स्वागत

समारंभाचे व नंतरच्या जेवणाचे साधे, अनौपचारिक पण आकर्षक आमंत्रणपत्र उपलब्ध आहे. श्रेया व्यवसायाने आर्किटेक्ट झाली व आता ती दोघे कॅनडात ओटावा येथे स्थायिक आहेत.

धाकट्या गौरीने वर्ध्याला एमबीबीएस केल्यानंतर एमडी फ्रान्समधून केले. पण नेत्रतज्ज्ञ असून युएसमध्ये तिचे वैद्यकीय प्रशिक्षण प्रमाणित धरले गेले नाही. ती आता युएसमध्ये न्यू जर्सी येथे राहते. शेतकरी संघटकच्या एका जुन्या अंकात (२१ जून १९९५) ३ व ४ जून रोजी आंबेठाण येथे भरलेल्या संघटनेच्या विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीचे वृत्त आहे. त्या वृत्ताच्या शेवटच्या परिच्छेदात लिहिले आहे,

''बैठकीच्या शेवटी शरद जोशींनी आपल्या या सर्व स्नेही मंडळींना स्नेहभोजन दिले. प्रयोजन होते, त्यांची धाकटी लेक गौरी हिचे लग्न. गौरीचे लग्न १९ फेब्रुवारी ९५ रोजी अमेरिकेत झाले, त्यावेळी शरद जोशी गुजरातमध्ये निवडणूक प्रचार दौऱ्यावर होते; ते स्वतः लग्नाला जाऊ शकले नाहीत.''

जानेवारी २००९ मध्ये परभणी येथे संघटना कार्यकारिणीच्या एका बैठकीत भाषण करताना जोशींनी एक हृदयद्रावक कथन केले होते. प्रकाशित झालेले जोशींचे ते शेवटचे भाषण. त्यात ते म्हणाले होते,

> आणखी एक आठवण, जी मी फारशी कोणाला सांगत नाही, माझ्या मनाला नेहमी डाचत असणारी आहे. शेतकरी संघटनेने महाराष्ट्रात सुरू केलेली शेतकरी चळवळ देशभरात उभी राहिली, तरच शेतकऱ्यांच्या दुःस्थितीत काही फरक पडेल, फक्त महाराष्ट्रातले प्रयत्न पुरे पडणार नाहीत, हे लक्षात घेऊन १९८१च्या ऑक्टोबरमध्ये देशभरातील समविचारी शेतकऱ्यांच्या नेत्यांची आम्ही एक बैठक वर्ध्याला बोलावली होती. मी तिकडे जाण्याची तयारी करीत असताना माझ्या पत्नीने, लीलाने, माझ्याकडे हट्ट धरला, की मी वर्ध्याच्या या कार्यक्रमाला जाऊ नये. पण माझा वर्ध्याला जाण्याचा निश्चय पक्का आहे, हे लक्षात आल्यानंतर ती माउली मला मोठ्या तळतळाटाने म्हणाली, 'नको म्हणत असतानासुद्धा तुम्ही मला आणि मुलींना सोडून जात आहात; हे शेतकरीसुद्धा तुम्हाला एक वेळ सोडून जातील हे लक्षात ठेवा.' शेतकरी संघटनेच्या कुटुंबात आजवर वेळोवेळी जे काही घडले आहे, आणि घडते आहे, ते पाहिले, की वाटते की माझ्या पत्नीचा शाप खरा ठरला आहे.
>
> (*माझ्या शेतकरी भावांनो मायबहिणीनो...* पृष्ठ ३११)

जोशी वर्ध्याला असतानाच लीलाताई हे जग सोडून गेल्या व अखेरच्या क्षणी ते त्यामुळे पत्नीसोबत नव्हते हे लक्षात घेतले की ह्या घटनेतील कारुण्य मनाला अधिकच भिडते.

अर्थात ही जखम तशी कधीच पूर्णतः भरून येणारी नसली तरी, काळाच्या ओघात शेतकऱ्यांनी आपल्या या एकाकी नेत्याला कायम प्रेम दिले हे जाणवते. 'संघटनेच्या कार्यात माझं कुटुंब उद्ध्वस्त झालं, पण आजही महाराष्ट्रातल्या शेकडो कुटुंबांत वावरताना ती माझीच कुटुंबं आहेत असं मला वाटतं,' अशी भावना जोशींनीही अनेकदा कृतज्ञतापूर्वक व्यक्त केली आहे.

त्याची साक्ष पटवणारा एक प्रसंग सांगण्यासारखा आहे. १९९८च्या डिसेंबर महिन्यात दिल्लीला जाताना जोशींना अर्धांगवायूचा झटका आला. विमानतळावरून थेट रुग्णालयातच दाखल केले गेले. दाखल होऊन ४८ तास व्हायच्या आत नागपूरहून सरोज काशीकर, सुमन अगरवाल, शैलजा देशपांडे या रुग्णालयात येऊन त्यांच्याभोवती हजर झाल्या. पुण्याचे बद्रीनाथ देवकर व औरंगाबादचे हेमंत देशमुख हे दोघे त्यापूर्वीच हजर झाले होते. त्या दोघांनी तर येताना एक लाख रुपयेही बरोबर आणले होते. हॉस्पिटलमध्ये काही कमी पडायला नको म्हणून. दोघेही त्यावेळी तरी अगदी ओढगस्तीचा संसार करणारे; त्यांनी ऐनवेळी पैशाची जमवाजमव कशी केली त्यांचे त्यांना ठाऊक. नाशिकहून डॉ. श्याम अष्टेकरही पोचले. लातूरहून पाशा पटेल आले. या सगळ्यांना बातमी कशी पोचली आणि तडकाफडकी ते आपापले व्याप सोडून कसे निघू शकले कोण जाणे! जोशींचे थोरले बंधू बाळासाहेब दिल्लीलगतच फरीदाबाद येथे राहत असत; पण त्यांना बातमी लागून ते हॉस्पिटलमध्ये येईस्तोवर जोशींच्याभोवती लाल बिल्ला लावलेल्या संघटनेच्या कार्यकर्त्यांचा गराडाच पडला होता. बाळासाहेब हे कार्यकर्त्यांचे प्रेम बघून अगदी थक्कच झाले. आपल्या भावाला ते म्हणाले, ''हे तुझं खरं कुटुंब. आम्ही रक्ताच्या नात्याचे; पण आम्हीसुद्धा इतक्या त्वरेने धावून आलो नाही.''

हीच भावना व्यक्त करताना त्यांच्या मोठ्या भगिनी सिंधूताई यांनी लिहिले आहे,

> आम्हा भावाबहिणींपलीकडे शरदच्या कुटुंबाचा परीघ आता विस्तारला आहे. त्यात सर्व शेतकरी स्त्रिया व त्यांचे कुटुंबीय येतात. माझ्या परिचयात सरोजताई, शैलाताई, मायाताई, शोभाताई अशा अनेक आहेत. माझ्यापेक्षा अधिक तत्परतेने त्या बहिणीची भूमिका पार पाडतात.
>
> (चतुरंग, दैनंदिनी, २०१२, पृष्ठ ७६)

जोशींना शेतकऱ्यांचे प्रचंड प्रेम मिळाले, पण त्यांना प्रथमपासून टीकाकारही खूप भेटले. त्याची त्यांना खंतही नव्हती. किंबहुना, 'आपल्यावर कोणी टीका करणारा भेटला नाही, तर आपल्या मांडणीत काहीतरी चूक झाली आहे असं खुशाल समजावं!' असे ते म्हणत. डावे विचारवंत, अर्थतज्ज्ञ, पत्रकार वगैरेंकडून होणाऱ्या टीकेबद्दल त्यांनी विस्ताराने लिहिले आहे. ते कितपत बरोबर होते हे जो तो आपापल्या विशिष्ट भूमिकेनुसार ठरवेल.

प्रथमपासून त्यांच्यावर सर्वाधिक टीका करणारे होते डावे विचारवंत. त्यांच्याविषयी शेतकरी आंदोलनाला सुरुवात झाली त्याच दरम्यान जोशींनी लिहिले होते :

> डाव्या कार्यकर्त्यांची परिस्थिती मोठी विचित्र झाली आहे. शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे नाव घ्यावे, पण काम करावे कामगारांचे, पांढरपेशांचे. त्यांची मजुरी वाढवून द्यावी, बोनस मागावे, नोकरीतल्या इतर अटी सुधारून घ्याव्यात, महागाईला विरोध करावा हे कार्यक्रम त्यांनी वर्षानुवर्षे राबविले आणि गरिबांचे कैवारी म्हणून ते मिरवले.

संघटनेच्या ताकदीवर त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील कामगारांची परिस्थिती भाग्यवंतांच्या पातळीवर आणली. आता राजकीय सत्तेला हात घालावा अशा प्रयत्नात डावे असतानाच, मळकी धोतरे नेसलेले लक्षावधी शेतकरी रस्त्यावर उतरले आणि त्यांनी डाव्यांची सर्व समीकरणे विस्कटून टाकली. गरिबांचे कैवारी म्हणून ओळखले जाण्याची डाव्यांची मक्तेदारी संपली. आर्थिकदृष्ट्या त्या कामगारापेक्षाही हीन अवस्थेत असलेला एक समाज प्रचंड संख्येने उठतो आहे, 'भाववाढ कमी करा' अशा कानाला सवय पडलेल्या घोषणेऐवजी भाववाढ मागतो आहे, ही अनपेक्षित घटना होती. संघटित कामगार आणि त्यांचे नेते यांना आपण 'डावे' राहिलो नसून 'उजवे' झालो आहोत, हा पालट पेलण्यासारखा नव्हता. अशा परिस्थितीत प्रस्थापितांची जी सहज प्रतिक्रिया असते तीच डाव्यांची झाली. उपहास, शिवीगाळ, इतिहासाने खोट्या ठरवलेल्या आपल्या श्रद्धांची वारंवार पुनरुक्ती, आरोपांच्या फैरी यांची झोड उठवण्यात आली. अशा आशेने, की ही नवी चळवळ मुळात खुडून टाकली, तर आपल्या डावेपणाला आव्हान निर्माण होणार नाही.

(*प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश – भाग दुसरा,* शेतकरी प्रकाशन, अलिबाग, पहिली आवृत्ती, डिसेंबर १९८५, पृष्ठ २८)

जोशी स्वतः पूर्णतः अर्थवादी होते. सुरुवातीच्या काळात सर्व शेतकरी आंदोलनच 'शेतीमालाला रास्त भाव' या एकमेव आर्थिक मागणीवर आधारित होते. पण तरी अर्थतज्ज्ञानी त्यांची कधी दखल घेतली नाही. अर्थतज्ज्ञांच्या बैठकींत वक्ता म्हणून तर सोडाच, पण केवळ एक सहभागी म्हणून यायचेही आमंत्रण जोशींना कधीच नसे. खरे म्हणजे शेतीचे अर्थशास्त्र सर्वप्रथम शेतकऱ्यांना समजेल अशा भाषेत मांडले ते जोशीनीच. पण विद्यापीठीय वर्तुळात, तेथील चर्चा-परिसंवादांत, अर्थशास्त्राशी संबंधित परिषदांत जोशींना काहीही स्थान कधी दिले गेले नाही.

या साऱ्याची जाणीव जोशींनाही नक्कीच होती. ते एकदा सांगत होते, ''आज इथले अर्थशास्त्रातले तथाकथित विद्वान प्राध्यापक मला अर्थशास्त्रज्ञ मानायलाही तयार नसतात! ते मला एक 'चळवळ्या' (activist) मानतात! जणू माझी मांडणी त्यांच्या विद्यार्थ्यांनी फारशी गांभीर्याने घ्यायचं कारण नाही! पण मी स्वित्झर्लंडला असताना हेच प्राध्यापक माझ्याशी संपर्क साधायचे आणि युएनची एखादी असाइनमेंट मी त्यांना मिळवून द्यावी म्हणून मस्का लावायचे!''

टीकाकारांच्या संदर्भात सुरुवातीच्या काळातला एक प्रसंग नोंदवायला हवा. पुण्यातील टिळक स्मारक मंदिराच्या प्रेक्षागृहातला. दिवस होता रविवार, २० फेब्रुवारी १९८३. जोशींच्या *भारतीय शेतीची पराधीनता* (पृष्ठे ४०), *शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती* (पृष्ठे १७०) आणि *प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश* (पृष्ठे ७५) या तीन संकलित पुस्तकांचे प्रकाशन त्यादिवशी प्रख्यात अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांच्या हस्ते झाले. जोशींची ही पहिलीच तीन पुस्तके. प्रकाशक होते शेतकरी प्रकाशन, अलिबाग.

माधवराव मोरे अध्यक्षस्थानी होते. दांडेकर व जोशी ह्यांच्याप्रमाणे मोरे व दुसरे एक वक्ते प्रल्हाद कराड पाटील यांचीही भाषणे झाली व त्या चारी भाषणांचे संकलन ३० एप्रिल १९८३ रोजी *शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र – खंडनमंडन* या शीर्षकाखाली प्रकाशित झाले. पुढे या प्रसंगी केलेली दांडेकर व जोशी यांची भाषणे 'केसरी'च्या एका विशेषांकातही (कृषी वार्षिक १९८३) प्रकाशित झाली होती.

सगळे सभागृह श्रोत्यांनी तुडुंब भरले होते आणि दुपारी चार वाजता सुरू झालेली ही भाषणे रात्री सव्वा आठला संपली; पण शेवटपर्यंत सर्व श्रोते अगदी तल्लीन होऊन ती ऐकत होते. जोशींच्या पुस्तकांचे असे जाहीर प्रकाशन समारंभ नंतर कधी झाले नाहीत.

आपल्या भाषणात दांडेकर यांनी काही चांगले मुद्दे मांडले होते. उदाहरणार्थ, ग्राहकांच्या क्रयशक्तीवरही शेतीमालाचा भाव आधारित असतो, केवळ उत्पादनखर्चावर नव्हे. 'इंडिया' विरुद्ध 'भारत' ऐवजी 'शेतीवर अवलंबून असलेली जनता' विरुद्ध 'बिगरशेती व्यवसायावर अवलंबून असलेली जनता' असे विभाजन त्यांच्या मते अधिक योग्य होते. त्यांच्यातील दरी मिटवण्यासाठी बिगरशेती भागातील श्रीमंत वर्गाचे थोडे कमी करून शेती भागाच्या तळातील घटकास ते मिळावे, असे ते म्हणाले. ''शरद जोशी यांच्या कोत्या, एकांगी व एकार्थी विचारसरणीमुळे शेतकरी संघटनेतील तरुण कार्यकर्त्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व वैचारिक प्रगतीला तर मर्यादा पडतीलच, परंतु विधायक कार्यक्रमाच्या अभावी, नाकर्तेपणामुळे त्यांच्यात विद्ध्वंसकता घर करू लागेल. समाजाच्या उन्नतीस हे हितकारक नाही,'' असा गंभीर इशारा देऊन त्यांनी आपल्या भाषणाचा शेवट केला. पुस्तकांचे प्रकाशन करतानाच त्यांनी ही टीकाही केलीच. पण जोशींनी शेवटी आपल्या भाषणात टीकेचे स्वागतच केले व टीकेला समर्पक उत्तरेही दिली.

जिथे दोन्ही बाजू मांडल्या जातील अशा प्रकारचा असला जाहीर कार्यक्रम शेतकरी संघटनेच्या संदर्भात नंतर कोणीच कधी आयोजित केला नाही.

जाहीररीत्या टीका करणे टाळणारी, पण मनात जोशींविषयी दुरावा बाळगणारी माणसेही साहजिकच होती. प्रत्येकाची दुराव्यामागची कारणे अर्थातच वेगवेगळी असणार; कधी वैचारिक, कधी व्यक्तिगत तर कधी संमिश्र. अशा टीकेबद्दल काही लिहिणे अवघड आहे. पण त्यांच्यावरील प्रकाशित लेखनात केल्या गेलेल्या काही टीकेची इथे नोंदतरी घेणे अप्रस्तुत ठरू नये, कारण त्यातलेही काही वाचकाच्या लक्षात येणे उपयुक्त ठरू शकेल.

चंद्रकांत वानखडे पत्रकार व लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. अनेक वर्षे ते जोशींबरोबर कार्यरत होते. त्यांच्या *आपुला चि वाद आपणांसी* या पुस्तकातील एक संपूर्ण प्रकरण (पृष्ठ १३२ ते १४३) शरद जोशी व शेतकरी आंदोलन यांविषयी लिहिलेले आहे. ''नेत्याच्या व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेने आंदोलनाचा बळी घेतला.'' हा त्या लेखाचा समारोप आहे.

विद्युत भागवत या पुणे विद्यापीठातील स्त्रीअभ्यास केंद्राच्या भूतपूर्व प्रमुख. सुरुवातीच्या काळात शेतकरी महिला आघाडीच्या कामात त्यांनी बराच पुढाकार घेतला. पुढे मात्र त्यांनी

शेतकरी संघटनेपासून फारकत घेतली. 'शेतकरी संघटना आणि स्त्री-प्रश्ना'चे आकलन या आपल्या लेखात (*अंतर्नाद,* ऑक्टोबर २००९) शेतकरी महिला आघाडीबरोबर काम करतानाच्या आपल्या अनुभवांवर आधारित मांडणी केली आहे. ''ब्रिटिश राज्यकर्त्याप्रमाणेच शरद जोशीही 'झिरपण्याच्या सिद्धांता'वरच भर देत होते, असे नाइलाजाने म्हणावे लागेल. इतिहास नाकारून उभे राहिलेले हे आंदोलन कुंठित झाले तर नवल नाही.'' हा त्या लेखाचा शेवट आहे.

डॉ. द. ना. धनागरे यांच्या Populism and Power – Farmers' movement in Western India: 1980-2014 (Routledge प्रकाशन) या इंग्रजी पुस्तकाचा विषयच शेतकरी संघटनेचे आंदोलन हा आहे; शीर्षकात सूचित केलेली आहे तशी जोशींवरची बरीच टीका या पुस्तकात आढळते.

इतरही काही टीकाकार होते. उदाहरणार्थ, *शेतकरी चळवळ* ही श्रीकांत सोळुंके यांची कादंबरी व तिला डॉ. भा. ल. भोळे यांनी लिहिलेली प्रस्तावना. वृत्तपत्रांतूनही जोशींवर टीका करणारे अनेक लेख वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहेत. उदाहरणार्थ, *शरद जोशींना खुले पत्र* हा प्रा. शरद पाटील यांनी लिहिलेला लेख (दै. लोकसत्ता, ९ नोव्हेंबर २००३). अशा लेखांची संख्या तर बरीच भरेल.

या साऱ्याची दखल घेणे, किंवा केवळ नोंद करणे, हेही स्थलाभावी इथे अशक्य आहे. पण या साऱ्यातील जेवढे शक्य होते तेवढे मिळवायचा आणि वाचायचा, प्रस्तुत लेखकाने प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे माधवराव मोरे यांच्यापासून विनय हर्डीकरांपर्यंत आणि चंद्रकांत वानखडेंपासून विजय साळुंखेपर्यंत ज्यांच्यापाशी जोशींबाबत काही कटू आठवणी असणे शक्य होते अशा जास्तीत जास्त लोकांना भेटायचा, त्यांची बाजू समजून घेण्याचाही प्रयत्न केलेला आहे. शेवटी जसे बघावे, तसे दिसते, ह्यात बरेच तथ्य आहे.

जोशी यांना स्वतःला अशा टीकाकारांबद्दल काही म्हणायचे होते का? संभाषणात हा विषय अधूनमधून निघायचा. त्यांच्या म्हणण्याचा गोषवारा सांगायचा, तर तो पुढीलप्रमाणे सांगता येईल :

'माझं नेतृत्व अनुयायांनी तसं सहजतःच स्वीकारलं होतं; मी काही ते कोणावर लादलं असं नव्हतं. मला आठवतं, एकदा एक तरुण कार्यकर्ता मला बरंच काय काय सुनावत होता; मी फक्त ऐकत होतो. जरा वेळाने एक दुसरा वरिष्ठ व अत्यंत कर्तबगार सहकारी, जो पुढे मोठा आमदारही झाला, तो त्याला माझ्यासमोरच म्हणाला; 'हे पाहा, मातीने कुंभाराला अक्कल शिकवायची नसते!' म्हणजे जणू मी कुंभार व तो माती याचा तिथे सहजस्वीकार होता!

'पण हळूहळू त्यांच्यातील काहींना आपल्यामुळेच संघटना चालते असं वाटू लागलं. येणारे पाहुणे मलाच भेटायचे, मी काय म्हणतो तेच पत्रकार छापायचे. हे काही मी जाणीवपूर्वक करत नव्हतो, पण तसं होत होतं. आपण डावलले जात आहोत अशी भावना त्यामुळे त्यांच्या मनात निर्माण होत असावी. व्यक्तिगत मत्सराची भावनाही त्यामागे असू शकेल.

'काळाच्या ओघात अशी काही माणसं दुरावली. काहींना मुळातच मोठी महत्त्वाकांक्षा होती. ही मंडळी तशी कर्तबगारही होती. शेतकरी संघटनेत मात्र त्यांना देण्यासाठी माझ्याकडे कुठलंही पद नव्हतं. इतर राजकीय पक्षांनी थोडंफार आमिष दाखवल्यावर ही मंडळी तिकडे गेली. शंकर धोंडगे, पाशा पटेल, अनिल गोटे वगैरे. आज विचार करताना वाटतं, की ही माणसं दुसरीकडे गेली, आमदार वगैरे झाली हे चांगलंच झालं. विचार तर ते संघटनेचाच मांडतात की. काही जणांनी व्यक्तिगत आर्थिक गरजांमुळे वेगळा रस्ता धरला. उदाहरणार्थ, आमच्यातल्या अशोक गायकवाडने चळवळ सोडली, पण स्वतःची उत्तम शेती विकसित केली. बद्री देवकरने शेती सोडून ट्रॅव्हल एजन्सी सुरू केली. प्रकाश पाटील जळगावहून औरंगाबादला आला आणि चांगला सरकारी वकील बनला. अशी मंडळी चळवळीतून बाहेर पडली, पण स्वतः चांगली प्रस्थापित झाली व याचा मला आनंदच आहे.

'आणखी एक काहीशा प्रस्थापित नेत्यांचा वर्ग होता, ज्यांना माझ्याबरोबर काम करायची इच्छा होती. तसं ते माझ्याशी बोललेही होते. पण काही दिवसांनी त्यांच्याच लक्षात आलं असावं, की त्यांना साजेसं, किंवा महत्त्वाचं असं काही काम मी त्यांना देऊ शकत नाही. संघटनेत तसा वावही नव्हता. आणि नुसतं कार्यकर्ता बनण्यात साहजिकच त्यांना स्वारस्य नव्हतं. नाशिकचे विनायकराव पाटील किंवा नगरचे गोविंदराव आदिक यांचा समावेश मी अशा मंडळींमध्ये करेन.

'दुर्दैवाने काही मंडळी मात्र व्यक्तिशः माझ्याबद्दल कटुता बाळगून वेगळी झाली. त्याबद्दल मात्र मला खरंच खूप दुःख होतं. माझ्या हातून कदाचित काही चुकलं असेल. मी स्वतः त्यांच्यातल्या अनेकांच्या घरी जाऊन, त्यांना भेटून त्यांची क्षमा मागितली आहे आणि त्यांनी पुन्हा संघटनेत यावं असं जाहीर सभांमधूनही सांगितलं आहे.'

श्रीरंगनाना मोरे यांच्या अमृतमहोत्सव सत्कारसमारंभातील जोशींचे भाषण त्या दृष्टीने पुरेसे बोलके आहे. त्यावेळी जोशी म्हणाले होते,

> तुमच्यापैकी कोणाच्या मनात असं असेल, की शेतकरी संघटनेत तुम्हाला योग्य तो मान मिळाला नाही, किंवा तुम्हाला सावत्रपणाची वागणूक दिली गेली, तर श्रीरंगनानांच्या साक्षीने मी कुटुंबप्रमुख म्हणून ती माझी चूक मानतो, तुमची माफी मागतो आणि 'परत या' अशी हाक देतो.... श्रीरंगनानांनी कोणत्याही प्रकारचा अहंकार न बाळगता त्यांची 'शेतकरी-शेतमजूर संघटना' पिंपळगाव-बसवंतच्या १९८०च्या सभेत शेतकरी संघटनेत मिसळून टाकली, आपलं नाव ठेवण्याचाही आग्रह त्यांनी धरला नाही. त्यांच्या साक्षीने मी तुम्हाला सांगू इच्छितो, की तुमच्या मनात प्रामाणिकपणे शेतकऱ्यांविषयी तळमळ असेल, तर केवळ काही रुसवेफुगवे झाले म्हणून दूर राहू नका. शेतकऱ्यांमध्ये वेगळ्या चुली करू नका.
>
> (६ जानेवारी २००९, *बळीचे राज्य येणार आहे!*, पृष्ठ २५४)

*लिप्टन ते स्वातंत्र्यवाद : शरद जोशींचे ऐतिहासिक योगदान व मर्यादा* या आपल्या लेखात (मोहन गुंजाळ स्मृतिग्रंथ, नोव्हेंबर २०११) मिलिंद मुरुगकर यांनी 'शरद जोशींची

मांडणी मुळात मायकेल लिप्टन याने केलेली आहे व ती स्वतःचीच आहे असे चित्र जोशींनी जाणूनबुजूनच प्रसृत केले' असे म्हटले आहे. अन्य कोणीही त्यापूर्वी किंवा त्यानंतरही हा मुद्दा मांडलेला नाही; त्यावर कधी काही चर्चा झाल्याचे माझ्यातरी ऐकिवात नाही. त्याबद्दल काय म्हणता येईल?

प्रस्तुत लेखकाला तो मुद्दा ग्राह्य वाटत नाही. याचे एक कारण म्हणजे अशी कुठलीही व्यापक विचारसरणी ही अनेकांच्या चिंतनातून जन्म घेत असते; जग फार मोठे आहे आणि आपण करतो तसा विचार करणारी दुसरी कुठलीही व्यक्ती भूतकाळात नव्हती वा आज नाही, असे समजणेच अवास्तव आहे.

लिप्टन यांचे उपरोक्त पुस्तक १९७७मधले आहे, पण त्याच्याही खूप पूर्वी कार्ल मार्क्सपासून इतर अनेकांनी 'टाउन आणि कंट्री' यांच्यातील विषमतेचा मुद्दा मांडला आहे आणि 'अर्बन बायस' वगैरे पारिभाषिक शब्द त्यांनी लिप्टनसारखे वापरले नसतील, पण राज्यकर्त्यांच्या धोरणाचा एक परिपाक म्हणून ती विषमता निर्माण झाली असणार हे उघड आहे. राजवाडा आणि झोपडी किंवा 'हिरवीगार शेती' आणि 'धुराड्यांतून प्रदूषण ओकत चाललेल्या गिरण्या' यांच्यातील अंतर्विरोध हा साहित्यिकांच्या प्रतिभेला तर कायम आव्हान देत आला आहे. *The Grapes of Wrath* किंवा *How Green was my valley* यांसारख्या अगदी १९४०च्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या, गाजलेल्या, चित्रपटांत रूपांतरित झालेल्या कादंबऱ्यांत हेच ग्रामीण भागाचे उजाडीकरण चित्रित झाले आहे व तोही विशिष्ट धोरणाचाच भाग आहे हे उघड आहे.

हा विरोध तसा खूप जुनाच, अगदी औद्योगिकीकरणाला सुरुवात झाली तेव्हापासूनच चर्चेचा विषय आहे. इंग्लंडच्या संदर्भात हाच भेद 'टाउन आणि काउंटी' या स्वरूपात मांडला गेला आहे. (काउंटी म्हणजे परगणा व टाउन म्हणजे प्रशासनाच्या दृष्टीने प्रमुख असलेले त्यातले गाव, या अर्थाने.) औद्योगिकीकरणासाठी आवश्यक ते भांडवल हे शेतीतूनच घ्यायला हवे, म्हणजेच खेड्यांतील पैसा शहरांकडे वळवायला हवा, हे जुन्या काळातील साम्यवादी विचारवंत प्रिओब्रेझन्स्की आणि रोझा लुक्झेम्बर्ग यांनीही यासंदर्भात लिहिले आहे व 'जग बदलणारी पुस्तके' या आपल्या पुस्तकात जोशींनी त्याचा विस्तृत आढावाही घेतला आहे. (प्रश्न रशियातील विकासाचा प्रचंड अनुशेष अल्पावधीत भरून काढण्यासाठी कशाला प्राधान्य द्यायचे हा होता आणि त्या काळानुरूप व स्थानिक परिस्थितीनुरूप स्टालिनने शेतीपेक्षा उद्योगांना प्राधान्य दिले – ते चूक किंवा बरोबर हे विशिष्ट स्थळ-काळाच्या संदर्भचौकटीतच तपासावे लागेल. असो.) रॉबर्ट बेट्स (Robert Bates) यांनीही या 'अर्बन बायस'बद्दल विस्ताराने लिहिले आहे. नोबेल लॉरेट व जगप्रसिद्ध स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ गुणार म्युरडाल (Gunnar Myrdal) यांनीही अशा स्वरूपाची मांडणी *Asian Drama – an enquiry into the poverty of nations* या आपल्या पुस्तकात केली आहे व जगदीश भगवती यांनीही 'गुणार म्युरडाल व अर्बन बायस' या विषयावर लिहिले आहे. इंटरनेटवर हे सारे उपलब्ध आहे. प्रत्येकाची शब्दरचना वेगळी असेल, पण आशयसूत्रातील समान धागा

देशांतर्गत आर्थिक विषमतेचे स्पष्टीकरण हाच आहे.

अगदी आपल्या मराठीपुरता विचार केला तरी चारुदत्त दाभोळकर यांनी आपल्या पुस्तकात ही भूमिका अगदी १९५४ सालीच (म्हणजे जोशींच्याच नव्हे, तर लिप्टनच्याही खूप पूर्वीच) मांडली होती, ते पुस्तक दत्तप्रसाद दाभोळकरांनी जोशींना दाखवल्यानंतर या मांडणीचे श्रेय जोशींनी चारुदत्त यांना मोकळ्या मनाने दिलेही होते व त्याचा उल्लेख या चरित्रात पूर्वी विस्ताराने झालाच आहे. पुन्हा दाभोळकरांची मांडणीदेखील युरोपात ते शिकत असताना तेथील शेतकऱ्यांकडून त्यांनी जे ऐकले होते, त्यावर आधारित होती; म्हणजे त्यांच्यावेळीही ही मांडणी अगदी 'ओरिजिनल' होती असे म्हणायला वाव नाही – पुन्हा केवळ कोणा एकाचेच नव्हे तर अनेकांचे ते म्हणणे होते; म्हणजेच ती मांडणी बऱ्यापैकी प्रचलित होती.

प्रस्तुत लेखकाच्या मते भारतीय संदर्भात तरी शरद जोशी यांनीच 'इंडिया' विरुद्ध 'भारत' ही मांडणी प्रथम लोकांसमोर आणली आणि त्यात कारणस्थानी असलेला शेतीमालाच्या शोषणाचा मुद्दा त्यांनीच प्रथम ऐरणीवर आणला; ह्याचे श्रेय त्यांना द्यावेच लागेल.

जोशींनी माणसांचा वापर केला आणि गरज संपल्यावर त्यांना दूर फेकून दिले असा एक आरोप त्यांच्यावर केला गेला आहे. डॉ. धनागरे यांच्या उपरोक्त पुस्तकातही (पृष्ठ २५२ वर) तसे म्हटले आहे. त्यात कितपत तथ्य आहे?

इथे लक्षात घ्यायला हवे, की शेतकरी संघटना, तिच्या आंदोलनात लाखो शेतकरी सहभागी होत असले तरी, एक संघटना म्हणून छोटीच होती. अनेक राज्यांमध्ये तिच्या अनेक शाखा आहेत, शेकडोंचा कर्मचारीवर्ग आहे, ज्याचे तपशिलात व्यवस्थापन करावे लागेल असे अनेक प्रकल्प तिथे चालू आहेत, अशातला काही भाग नव्हता. त्यामुळे इतरांना तिथे तसा मर्यादितच वाव होता. ज्यांना स्वतःची अशी वेगळी प्रतिभा होती, तिला अन्यत्र अधिक वाव मिळेल अशी खात्री होती ते कार्यकर्ते दीर्घकाळ त्यांच्याबरोबर राहणे अवघडच होते. जोशींबरोबर त्यांचे काहीच बिनसले नसते, तरीही ते वेगळे झाले असते. जोशींनी त्यांना वापरून फेकून दिले असे म्हणणे चुकीचे ठरेल.

स्वतः जोशींचा कार्यकर्त्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन काय होता?

जोशींनी याचे उत्तर देताना दोन दृष्टान्त दिले.

एक होता चित्रकाराचा. एखादा चित्रकार कुंचल्याने चित्र रंगवत जातो, त्याला सुचेल त्याप्रमाणे वेगवेगळे रंग घेऊन त्यांचे फराटे कॅनव्हॉसवर मारत जातो, त्याच्या मनातील कल्पना साकार करत जातो; त्याने मारलेल्या रंगाच्या प्रत्येक फटक्याला (स्ट्रोकला) स्वतःचे असे काही रूप वा महत्त्व असतेच असे नाही; पण त्यांचे एकत्रित रूप जेव्हा चित्रात अवतरते, तेव्हा त्यांना स्वतंत्र असा अर्थ, महत्त्व व रूप लाभत जाते. तसे काहीसे जोशींचे होत गेले. जी जी मंडळी जवळ येत गेली, त्यांना मदतीला घेऊन मनातली संकल्पना ते साकार करत गेले. काय करायचे आहे ह्याची ब्ल्यू प्रिंट त्यांच्यासमोरही तयार नव्हती; अशी कुठली ब्ल्यू प्रिंट समोर ठेवून शेतकरी आंदोलन सुरू झाले नव्हते.

दुसरा दृष्टान्त होता उपलब्ध साधनसामग्रीतून भिंत उभारणाऱ्या गवंड्याचा. त्यांच्या हातात वेळोवेळी ज्या ज्या तुटक्याफुटक्या विटा येत गेल्या, त्या त्या योग्य तिथे बसवून ते भिंत उभारत गेले. या विटा तशा तुटक्याफुटक्याच होत्या, अन्यथा त्या त्यांच्याकडे आल्याच नसत्या. तरीही त्यांचा वापर ते कुठे ना कुठे करत गेले. कुठे ना कुठे हात पोळलेले, भ्रमनिरास झालेले, असेही अनेक कार्यकर्ते खूपदा संघटनेकडे येत गेले. त्यांच्या बाबतीत हा दृष्टान्त जोशींच्या मते लागू पडतो. ह्यात कोणाही कार्यकर्त्यावर कुठल्याही प्रकारे अन्याय करण्याची भूमिका नव्हती; त्यांची इच्छा असती तर तिथे वापरले जायला ते नकार देऊ शकले असते आणि जोशी कधीच त्यांच्यावर जबरदस्ती करू शकले नसते.

शेतकरी संघटना हा एकखांबी तंबू होता; तिथे लोकशाहीप्रक्रियेतून निर्णय घेतले जात नव्हते, असा आणखी एक आरोप त्यांच्यावर केला गेला आहे.

शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीत प्रत्येक प्रश्नावर आधी जोशी काहीतरी निवेदन करीत, नंतर त्यावर सगळे आपापली मते मांडत व त्यानुसार मग शेवटी जोशी निर्णय जाहीर करत. खूपदा इतरांच्या म्हणण्यानुसार ते आपल्या मूळ भूमिकेत फरकही करत. शेतकरी संघटकमध्ये जोशींवर व संघटनेवर टीका करणारे लेखही अनेकदा छापले गेले आहेत व त्यांच्या प्रकाशनाला जोशींनी कधीही आडकाठी घेतलेली नाही. ''तुम्ही सगळे इतक्या मोकळेपणे साहेबांना भेटू शकता, त्यांच्यासमोर आपली मते बिनधास्त मांडू शकता याचा आम्हाला हेवा वाटतो. आमच्या साहेबांसमोर तर काहीही बोलायची आमची हिंमतच नसते. ते सांगतात आणि आम्ही ऐकतो असेच चालते,'' असे एक मोठ्या संघटनेतील पूर्णवेळ कार्यकर्त्याने शेतकरी संघटनेच्या एका कार्यकर्त्याला सांगितल्याचे प्रस्तुत लेखकाने ऐकलेले आहे.

अंतिम निर्णय बहुतेकदा जोशी स्वतःच घेत हे खरे आहे, पण त्यातील अपरिहार्यताही समजून घ्यायला अवघड नव्हती. 'डोकी मोजून निर्णय घेणे' हे जोशींना तत्त्वशःच अमान्य होते. स्वतंत्रतावादाचा सारा सिद्धांतच सामूहिक निर्णयप्रक्रियेच्या विरोधात जाणारा आहे. व्यक्ती हेच त्यांच्या दृष्टीने समाजाचे एकक होते, तिलाच फक्त पावित्र्य होते. निर्णयक्षमता व्यक्तीतच असू शकते अशी मांडणी करणारा 'ॲरोचा सिद्धांत' ते अनेकदा उद्‌धृत करत. त्यामुळे संघटनेतील निर्णयही अंतिमतः ते स्वतःच घेणार हे क्रमप्राप्तच होते. संघटनेत येणाऱ्या प्रत्येकाला हे पूर्वीच ठाऊक होते; नंतर केव्हातरी झालेला व एकाएकी भ्रमनिरास करणारा असा काही तो साक्षात्कार नव्हता.

आणि तसे बघितले, तर देशात अन्यत्र काय वेगळे चित्र होते? उदाहरणार्थ, जे सहकारी साखर कारखाने आजही उत्तम चालले आहेत त्यांच्यावर एकवार नजर टाकली तर सहज दिसेल, की त्या सगळ्या नावाला सहकारी असल्या, तरी प्रत्यक्षात कुठल्यातरी एका व्यक्तीच्या अथवा तिच्या कुटुंबीयांच्या व्यवस्थापनाखाली आहेत. इतर संस्थांमध्ये किंवा संघटनांमध्ये किंवा पक्षांमध्ये वेगळे काय घडते? अंतर्गत लोकशाही कुठल्या आस्थापनेत दिसते? शिवसेनेत बाळासाहेब ठाकरे यांचा शब्द कायम प्रमाण मानला गेला. लालू यादव

किंवा मुलायमसिंग यादव, शरद पवार किंवा करुणानिधी, मायावती किंवा ममता, जयललिता किंवा सोनिया यांच्या सर्वांच्याच पक्षात त्यांचाच शब्द पाळला जातो असे दिसेल. स्वयंसेवी संस्थांतही काही वेगळी परिस्थिती दिसत नाही. अंतर्गत लोकशाही हा संस्थात्मक जीवनाचा एक आदर्श आहे, पण ते वास्तव नव्हे – निदान भारतात तरी. मुळात शेतकरी संघटना छोटीच राहिली व त्यामुळे एककेंद्री राहू शकली; तिचा जर अनेकांगी विस्तार झाला असता तर कदाचित विकेंद्रीकरण अपरिहार्य ठरले असते, निदान अधिक शक्य झाले असते.

'शरद जोशींना संघटना चालवायची नव्हती, तर त्यांनी स्वतः बाजूला व्हायचे होते व आम्हाला संघटना चालवायला द्यायला हवी होती,' असाही एक आरोप केला गेला आहे. वस्तुस्थिती काय होती?

मुळात शेतकरी संघटना ही जोशींचीच निर्मिती होती; तिचा वैचारिक पाया म्हणजे त्यांची स्वतःचीच जीवनधारणा होती. तिच्याबरोबरचे त्यांचे तादात्म्य संपूर्ण होते. ती संस्था मुख्यतः वस्तुरूप नसून विचाररूप होती. अशी संस्था त्या संस्थापकाने दुसऱ्या कोणाच्या हाती सोपवणे हे बोलायला सोपे वाटले, तरी प्रत्यक्षात तितके सोपे नाही. ती आपल्या अपत्याकडे जावी (तेही आपल्या पश्चात, आपल्या हयातीत नाही!) अशी तजवीज करता येते, केलीही जाते; पण अन्य कोणावर ती स्वनिर्मित संस्था सोपवणे अवघड असते. आपल्याकडे संघटनेचे नेतृत्व सोपवावे अशी ज्यांची इच्छा होती आणि ती आपण चांगल्या प्रकारे चालवू शकू अशी ज्यांना खात्री होती, त्यांच्या निष्ठेबद्दल आणि कुवतीबद्दल तेवढा विश्वास जोशींना होता का? तसा असल्याशिवाय संघटनेची सूत्रे जोशी त्यांच्या हाती कशी सुपूर्द करू शकले असते? नेतृत्व हे मागून मिळत नाही; कर्तृत्वाने मिळवावे लागते; किंवा मग स्वतःची स्वतंत्र संघटना काढून ते नव्याने प्रस्थापित करावे लागते.

शेतकरी संघटनेच्या संदर्भात अगदी सुरुवातीचा विचार केला, तरी काही बाबतीत जोशींची भूमिका स्पष्ट होती हे जाणवते. एक म्हणजे ते स्वतःला स्वतंत्रतेच्या मार्गावरील एक यात्रिक समजत असत; या यात्रेला शेवट नाही, कारण स्वतंत्रता ही एक दिशा आहे, ते काही गंतव्य स्थान नाही असे ते मानत. 'योद्धा शेतकरी'मध्ये जोशींनी म्हटले आहे,

''मी आज जो शेतकरी संघटनेचा विचार मांडतोय त्याला फक्त पंधरा-वीस वर्षं इतकंच महत्त्व आहे. कुणी जर म्हटलं, की हा विचार कालातीत आहे, त्याचा एक धर्म झाला पाहिजे, तर तो शुद्ध मूर्खपणा आहे! आज जर संघटना तयार झाली, यशस्वी ठरली तर पंधरा वर्षांनी ह्या संघटनेला करण्यासारखं कार्यच उरणार नाही! त्यामुळे संघटनेला अस्तित्वात असण्याचा अधिकारच असणार नाही!'' (पृष्ठ ४९)

हे ऊस आंदोलनाच्या वेळचे, म्हणजे साधारण १९८० सालातले उद्गार आहेत. आपण हाती घेतलेले हे शेतीमालाच्या भावाचे उद्दिष्ट आयुष्यभरासाठी आहे, असे त्यावेळी त्यांना नक्कीच वाटत नव्हते.

अ. वा. कुळकर्णी यांनी एक आठवण लिहिली आहे. ३० मे १९८२ रोजी इंडियन

एक्स्प्रेसचे चंडीगढ येथील प्रमुख वार्ताहर विनोद मिश्रा यांनी जोशींची विस्तृत मुलाखत घेतली व ती दुसऱ्या दिवशी पेपरात छापूनही आली. या मुलाखतीदरम्यान मिश्रांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना जोशींनी एक अतिशय महत्त्वाचे व काहीसे धक्कादायक असे विधान केले होते. ते म्हणाले होते, ''शेतीमालाच्या रास्त भावाची आणि योग्य मार्गाने उत्पादनखर्च काढायची कल्पना जर शासनाने कायदा म्हणून मान्य केली तर ही संघटना व चळवळ विसर्जित करायचा मी सल्ला देईन.''

यावेळी तिथे उपस्थित असलेले कुळकर्णी लिहितात (*शरद जोशींबरोबर ... पंजाबात,* पृष्ठ ५९-६०) :

> जोशींच्या ह्या बोलण्याने मिश्रांसह सर्व जण एकदम चमकले. जोशींना आपल्या अशा बोलण्याच्या संभवनीय परिणामांची कल्पना असावी. कुणाकडेही न बघता त्यांनी शांतपणे सिगरेट पेटवली आणि एक झुरका घेतला. थोड्या वेळाने त्यांनी माझ्याकडे रोखून पाहिले. त्यावेळी किंवा त्यानंतरच्या प्रवासात मी प्रकट न केलेली वस्तुस्थिती मला इथे सांगायलाच हवी. जोशींचे ते उत्तर ऐकून मी पुरा हबकून गेलो होतो. अशी विसर्जनाची भाषा करायची म्हणजे मग उभ्या केल्या जाणाऱ्या संघटनेचे, तिच्यासाठी राबणाऱ्या कार्यकर्त्यांचे काय? पण थोड्या विचारान्ती लक्षात आले, की हे वाटणे योग्य नाही. कारण जोशी संघटित करीत असलेल्या चळवळीचा जीवित हेतू केवळ आर्थिक आहे नि एक-कलमी आहे. शेतीमालाचा उत्पादनखर्च ठरविण्यासाठी यथायोग्य आराखड्यास मान्यता आणि त्यानुसार शेतीमालास रास्त भाव देण्यास मान्यता या गोष्टी शासकीय पातळ्यांवर मान्य झाल्यानंतर या चळवळीचे निर्मितिकार्य पूर्ण होणार आहे. तिच्या जीवितहेतूची पूर्तताच अशा मान्यतेत सामावलेली आहे. मग या चळवळीला वेगळे असे कोणते कार्य शिल्लक राहते? मग जे काही प्रसंगोपात्त प्रश्न उभे राहतील त्यांचे स्वरूप मामुली असेल; त्यांची सोडवणूक इतर मार्गांनी करताही येईल. हे असे जाणवून गेले नि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 'काँग्रेस विसर्जित करा' असा सल्ला देणारे महात्मा गांधीजी माझ्या नजरेसमोर उभे राहिले!

'शेतकरी संघटनेची आज आवश्यकता आहे का?' असा प्रश्न 'शेतकरी संघटक' या मुखपत्रात जोशींनी स्वतःच अनेकदा उपस्थित केला होता. त्यावर भरपूर चर्चाही झाली होती. त्यासाठी ३ ऑगस्ट १९८८ रोजी त्यांनी अंगारमळा येथे आपल्या जवळच्या सहकाऱ्यांची एक बैठकही बोलावली होती. या बैठकीबद्दल डॉ धनागरे यांनी आपल्या उपरोक्त इंग्रजी पुस्तकात विस्ताराने लिहिले आहे. आपल्या संघटनेचे कार्य आता संपले आहे, अशी भूमिका जोशींनी प्रास्ताविकात मांडली; पण त्या बैठकीत प्रस्तावित विसर्जनाला कार्यकर्त्यांपैकी निदान काहींचा प्रखर विरोध आहे हे त्यांच्या लक्षात आले. 'शरद जोशी मुर्दाबाद' अशी घोषणा भास्करराव बोरावके यांच्या पुतण्याने, शशिकांतने, याच बैठकीत दिली. जोशींनी मग हा मुद्दा

पुढे रेटला नाही. त्यानंतरही आता संघटना विसर्जित करावी असे त्यांना कधीकधी वाटायचे, पण प्रत्यक्षात मात्र ते तसे करू शकले नाहीत.

त्यांच्या दोन निकटच्या सहकाऱ्यांची याबद्दलची मते इथे उदधृत करण्याजोगी आहेत. भास्करराव बोरावके लिहितात,

> शरद जोशींनी हाक दिली, की घरचे खाऊन स्वखर्चाने कोठेही सहकुटुंब येणारे लाखो कार्यकर्ते कालांतराने शारीरिक, मानसिक व आर्थिकदृष्ट्या थकून गेले. खरे तर इतकी दीर्घ काळ – तीस वर्षे – संघटना टिकून राहिली हेच आश्चर्य. शरद जोशी सतत नवनवीन कार्यक्रम देऊन सर्वांना इतका प्रदीर्घ काळ कार्यमग्न ठेवण्यामध्ये निश्चितच यशस्वी झाले. इतर संघटना पाहिल्या, तर त्या साधारण दहा ते बारा वर्षांचा काळ टिकून राहतात. त्या मानाने ही तर खूप काळ टिकून राहिली.
>
> (मोहन गुंजाळ स्मृतिग्रंथ, प्रकाशन १० नोव्हेंबर, २०११, पृष्ठ २१९)

संघटनेला करण्याजोगे आता काही राहिलेले नाही असे संघटनेच्या ह्या माजी अध्यक्षांचेही मत झाले होते हेच ह्यावरून ध्वनित होते.

ह्याच ग्रंथात पृष्ठ २५७वर संघटनेच्या जन्मापूर्वीपासून, १९७८पासून, जोशींशी संबंध असलेले डॉ. श्याम अष्टेकर लिहितात,

> शेतकरी संघटनेची चळवळ आता बहुतांशी ओसरली आहे. कार्यकर्ते वयस्कर झाले, थकले. राजकारणाच्या खडकावर आपटून चळवळी संपतात असे शरद जोशींचेच म्हणणे असते. एरवीही कोणत्याही चळवळीचे आयुष्य एक-दोन दशकांचेच असते. ती पिढी मागे गेली की चळवळी निःशेष होतात. चळवळीचा पक्ष होणे हाही एक प्रकारचा अंतच असतो. अनेक चळवळी पक्षाघाताने संपून जातात किंवा मूळ मागण्या व लढे विसरून जातात.

एक नक्की, जोशींनी आपल्या एकाही नातेवाइकाला शेतकरी संघटनेच्या जवळपासही आणलेले नसल्याने, संघटनेवर निदान घराणेशाहीचातरी आरोप नक्की करता येणार नाही!

संघटना दीर्घकाळ उत्तम चालावी या दृष्टीने संघटनेची व्यक्तिनिरपेक्ष व व्यावसायिक उभारणी जोशींनी केली नाही ही परिस्थिती आदर्श होती, असे प्रस्तुत लेखकाला अजिबात सुचवायचे नाही; पण भारतातील संस्थाजीवनाची एकूण परिस्थिती विचारात घेता ती अपरिहार्य अशी वास्तविकता होती असे वाटते.

जोशींच्या उपरोक्त टीकाकारांच्या संदर्भात तीन गोष्टी मान्य कराव्या लागतील.

एक म्हणजे ज्यांनी ज्यांनी त्यांची साथ सोडली, त्यांनीही कधी शरद जोशींच्या मूलभूत मांडणीला छेद देणारी अशी स्वतःची वेगळी मांडणी केलेली नाही. याचा एक अर्थ असाही होतो, की वेगळे होण्यामागे मतभेदापेक्षा मनभेद हेच खरे कारण होते; वेगळे होण्यामागे

वैचारिक मतभेद असल्याचे वरकरणी दाखवले गेले, तरी प्रत्यक्षात वैचारिक भेद फारसे नव्हते; असते, तर त्यांच्या वेगळ्या मांडणीच्या स्वरूपात ते समोर आले असते.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे अनेक सहकारी सोडून गेले तरीही शेतकरी संघटना कधी दुभंगली नाही. राजू शेट्टी किंवा रघुनाथ पाटील यांनी स्वतःच्या वेगळ्या शेतकरी संघटना अवश्य काढल्या, पण त्यामुळे मूळ संघटनेत उभी फूट अशी कधी पडली नाही.

तिसरी गोष्ट म्हणजे कोणीही शरद जोशी ह्यांच्या वैयक्तिक चारित्र्याबद्दल, त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल, त्यांच्या आर्थिक व्यवहारांबद्दल शंका उपस्थित केली नाही. फार थोड्या भारतीय नेत्यांच्या बाबतीत हे घडताना दिसते. 'आम्हाला फसवून ह्यांनी स्वतः मात्र प्रॉपर्टी केली, मजा मारली' असा आरोप त्यांच्यावर त्यांच्या शत्रूंनीही केलेला नाही. इतकी वर्षे सार्वजनिक क्षेत्रात वावरूनही एखाद्याचे चारित्र्य इतके स्वच्छ राहावे हेही विशेष मानावे लागेल.

शरद जोशींबरोबर अनेक कार्यकर्ते वर्षानुवर्षे राबले. खूप नावे सांगता येतील. यांतल्या काहींना मी कधीच भेटू शकलेलो नाही; पण ऐकले आहे ते असे, की यांतल्या बहुतेकांच्या मनातील जोशींबद्दलचे प्रेम आजही आटलेले नाही.

'योद्धा शेतकरी'च्या माधवराव मोरे यांना अर्पण केलेल्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत ''हरामखोर शेतकरी' असं एक जळजळीत पुस्तक लिहिण्याच्या मनःस्थितीत मी तेव्हा होतो'' असे विजय परुळकरांनी लिहिले आहे; पण त्याच अर्पणपत्रिकेतील शेवटचे वाक्य आहे : ''शेवटी एकच. शरद जोशींवर मी आणि सरोजा प्रेम करतो – ते अबाधित आहे.''

कोल्हापूर जिल्ह्यातून लोकसभेवर निवडून गेलेले झुंजार शेतकरीनेते राजू शेट्टी यांच्या तोंडून आमच्या भेटीत मी स्वतः ऐकलेले वाक्य होते, ''आम्ही साहेबांचे अर्जुन होऊ शकलो नाही, पण आम्ही स्वतःला त्यांचे एकलव्य जरूर मानतो.'' हे उद्‌गार या दृष्टीने खूप बोलके आहेत.

■

# १५

# अंगाराकडून ज्योतीकडे : शोध नव्या दिशांचा

२४ जुलै १९९१ रोजी देशाचे तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी लोकसभेत दोन महत्त्वाची निवेदने केली. स्वातंत्र्योत्तर काळात जवळजवळ सलगपणे राबवल्या गेलेल्या मुख्यतः समाजवादी पठडीतील आर्थिक धोरणात मूलगामी बदल सुचवणारी ती निवेदने होती. राजीव गांधी यांच्या काळापासूनच अशा स्वरूपाच्या बदलांना थोडीफार सुरुवात झाली होती; पण त्यांना देशांतर्गत विरोध मोठा असल्याने त्यांचा वेग अगदीच कमी होता. आता मात्र अगदी गंभीर आर्थिक संकट देशापुढे उभे ठाकले होते. त्याला प्रतिसाद म्हणून अर्थमंत्र्यांनी एक धोरणमसुदा तयार केला होता. आदला निदान एक महिना पंतप्रधान आणि अर्थमंत्री त्याविषयी एकमेकांशी व आपल्या निकटवर्तीयांशी सतत चर्चा करत होते. शेवटी ज्यांनी आपले बहुमत लोकसभेत तोवर सिद्धही केले नव्हते, अशा पंतप्रधानांनी ह्या नव्या धोरणाला होकार दिला. अर्थमंत्र्यांनी त्यानुसार प्रस्तावित बदलांना मूर्त रूप देऊन लगेचच ते जाहीर केले होते.

देशाला अडचणीत आणणाऱ्या आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीवर घेतलेला हा निर्णय होता. सोव्हिएत अर्थव्यवस्था कोसळल्यामुळे व इतरही अनेक कारणांचा परिपाक म्हणून देशाचा परकीय चलनाचा साठा जवळपास संपुष्टात आला होता. अत्यावश्यक अशी आयातदेखील पुढचे जेमतेम पंधरा दिवस करता आली असती; अगदी पेट्रोलची आयातही थांबवावी लागणार होती. तसे झाले असते तर देशभर हाहाकार उडाला असता. जुन्या कर्जाचे हप्ते फेडणे अशक्य झाले असल्याने नवे कर्ज द्यायला कुठलीही वित्तसंस्था तयार नव्हती. आंतरराष्ट्रीय बाजारात भारताला दिवाळखोर राष्ट्र म्हणून घोषित केले जाईल की काय अशी भीती वाटू लागली. त्यातून कसेतरी सुटण्यासाठी रिझर्व बँकेकडे सोन्याचा जो साठा राखून ठेवलेला होता, त्यातले शक्य होते तेवढे सोने आदल्याच आठवड्यात युरोपात पाठवण्यात आले होते. त्यातले २० टन सोने युनियन बँक ऑफ स्वित्झर्लंडकडे व ४७ टन सोने बँक ऑफ इंग्लंडकडे गहाण ठेवले गेले व त्यानंतरच वित्तसंस्थांनी थोडेफार पैसे दिले होते; पण अधिक मदत हवी असेल तर त्या बदल्यात देशाच्या अर्थव्यवस्थेत काही मूलभूत बदल घडवावे लागतील, अशी त्यांची कडक अट होती. म्हणूनच या भीषण परिस्थितीला सामोरे जाताना, जागतिक बँकेच्या दडपणाखाली, तत्कालीन सरकारला आर्थिक उदारीकरण नाइलाजाने का होईना, पण स्वीकारावे लागले. उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरण (ज्याला 'उखाजा' म्हटले जाते) यांचा अधिकृत

धोरणात समावेश करण्याची ही सुरुवात होती.

सर्वप्रथम रुपयाचे २५ टक्क्यांनी अवमूल्यन करण्यात आले. अर्थव्यवस्थेवरील सरकारी नियंत्रणे कमी करायला सुरुवात झाली. आयात-निर्यात व्यापारावरील बंधने शिथिल केली गेली. लायसेन्स-परमिट-कोटा-कंट्रोल-इन्स्पेक्टर राज बऱ्यापैकी कमी करावे म्हणून अनेक उद्योगांना शासकीय परवानग्या घ्यायच्या अटीपासून मुक्त केले गेले. वेगवेगळ्या कारणांनी दिली जाणारी आर्थिक सवलत (सबसिडी) कमी करायला सुरुवात झाली. खासगी क्षेत्राकडे बघायच्या दृष्टिकोनात फरक पडला; ते जणू आपले दुश्मन आहेत असे न मानता त्यांच्याबरोबर विकासयोजना आखता येतील असा विचार सुरू झाला.

त्यादृष्टीने आत्मविश्वासपूर्वक आवश्यक ती सगळी पावले उचलली गेली अशातला अजिबात भाग नव्हता, सरकारीकरणाचे वर्षानुवर्षे आवळत राहिलेले पाश एकाएकी तुटणे अवघड होते, तशी देशाच्या नेतृत्वाची मानसिक तयारीही नव्हती; पण निदान त्या दिशेने पावले टाकायला सुरुवात तरी झाली. मुळात सरकारातील (खरेतर विरोधी पक्षातीलही) कोणाचीच तशी विचारधारा नव्हती; किंबहुना गेली चाळीस वर्षे सतत चालत आलेली, सर्व क्षेत्रे मुख्यतः सरकारी नियंत्रणाखाली ठेवणारी, तथाकथित समाजवादी यंत्रणाच या नेतृत्वाला मानवणारी होती; या यंत्रणेतच राजकीय नेते, नोकरशहा व बडे उद्योजक यांचे हितसंबंध सुरक्षित होते. पण आंतरराष्ट्रीय दडपणापुढे सरकारला मान तुकवावी लागली होती. देशातील जनतेपुढे मात्र हे आपणच काहीतरी क्रांतिकारक पाऊल उचलले आहे असा त्यांचा आविर्भाव होता. पण काँग्रेसनेत्यांच्या वागण्यातली विसंगती उघड असली, तरीही आदली अनेक वर्षे जोशी जी खुलीकरणाची दिशा दाखवत होते, त्याच दिशेने सुरू झालेला हा प्रवास होता.

देशातील खुलीकरणाचा हा प्रवाह म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या खुलीकरणाच्या प्रवाहाचाच एक भाग होता. खुलीकरणाचा हा प्रवाह म्हणजे आता जणू युगधर्म बनत होता. इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडांत अशा वेगवेगळ्या विचारधारा प्रभावी ठरत जातात असे दिसते. दुसऱ्या महायुद्धानंतर समाजवाद हा युगधर्म बनला होता व परिस्थिती खूप पालटेस्तोवर आणि सत्तरच्या दशकात मार्गारेट थॅचर, रोनाल्ड रेगन व डेंग झियाओ पिंग यांनी धाडसाने मूलभूत बदल घडवून आणेस्तोवर जवळजवळ तीस वर्षे त्याचा प्रभाव कायम राहिला होता. तसाच बहुधा आताचा हा बदल होता; खुलीकरणाकडे नेणारा.

या प्रवाहाला वेग देणारी एक घटना याच १९९१ साली जागतिक पातळीवर घडत होती. खुल्या अर्थव्यवस्थेला पायाभूत मानला गेलेला डंकेल प्रस्ताव त्यावर्षी चर्चेसाठी प्रसृत केला गेला. या प्रस्तावाचे महत्त्व समजून घेण्यासाठी त्याची पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी.

दुसऱ्या महायुद्धानंतर बाकीचे बरेचसे जग विद्ध्वंसाच्या आगीत होरपळून गेले असले तरी अमेरिकेची अर्थव्यवस्था तुलनेने सुदृढ होती. महायुद्धामागची तात्कालिक कारणे वेगवेगळी असली, तरी मुख्यतः आर्थिक कारणांतूनच ती उद्भवतात, याची जाणीव असल्याने अमेरिकेने जगातील प्रमुख देशांची एक बैठक अमेरिकेतील ब्रेटन वुड्स या शहरात बोलावली.

जागतिक अर्थव्यवस्थेत स्थैर्य निर्माण व्हावे म्हणून इंटरनॅशनल मॉनेटरी फंड, वर्ल्ड बँक आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (आयटीओ) अशा तीन संस्था स्थापन करायचे ठरले. त्यातील मुख्यतः वित्तपुरवठा करणाऱ्या पहिल्या दोन लगेचच अस्तित्वात आल्या आणि अमेरिकन प्रभावाखाली असल्या तरीही चांगल्या प्रकारे कार्यरत झाल्या. तिसरी व्यापारविषयक संस्था ITO ही मात्र अस्तित्वात येऊ शकली नाही. कारण तिच्यामुळे आपले स्वतःचेच सार्वभौमत्त्व धोक्यात येईल व आपल्या महासत्ता म्हणून असलेल्या स्थानाला धक्का बसेल अशी भीती अमेरिकेला वाटली. त्याऐवजी मग वेगवेगळ्या पाश्चात्त्य राष्ट्रांनी एकमेकांत करार केले व त्यातूनच जनरल ॲग्रीमेंट ऑन टॅरिफ्स अँड ट्रेड (GATT) हा आंतरराष्ट्रीय व्यापारासाठीचा चर्चामंच ३० ऑक्टोबर १९४७ रोजी जिनिव्हा येथे अस्तित्वात आला. जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये परस्परव्यापारावर जी बंधने आहेत, ती कमीत कमी करत आणणे हे मंचाचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात अनेक वर्षे त्या दिशेने फारशी काही प्रगती झाली नव्हती; शिवाय मुख्य म्हणजे, तिचे कार्य फक्त वेगवेगळ्या औद्योगिक वस्तूंच्या व्यापारापुरते सीमित राहिले; शेतीमालाचा व्यापार ह्या संस्थेच्या कार्यकक्षेच्या बाहेरच राहिला.

ह्यात क्रांतिकारक बदल घडायला सुरुवात झाली ती १९८६ साली. त्यावर्षी लॅटिन अमेरिकेतील उरुग्वे देशात भरलेली GATT परिषद ही अगदी वेगळी ठरली. १२३ देश त्या परिषदेत सामील झाले होते. त्या परिषदेत असे ठरले, की उदारीकरणासाठी एक नेमका व सर्वांना सगळे मुद्दे स्पष्ट होतील असा आराखडा तयार करावा, वेगवेगळ्या देशांना तो मान्य होईल, ह्यादृष्टीने त्यांच्याशी चर्चा करावी आणि मग त्याला धोरणाचे अंतिम रूप द्यावे. हे अत्यंत अवघड काम, आर्थर डंकेल या स्विस प्रशासकावर सोपवण्यात आले. डंकेल हे GATT चे १९८० ते १९९३ अशी सलग तेरा वर्षे महासंचालक (Director General) होते व त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी मान्यता होती.

त्यांनी अविश्रांत मेहनत घेऊन एक आराखडा तयार केला; त्यात शेतीमालाचाही त्यांनी समावेश केला. डंकेल प्रस्ताव (Dunkel Draft) म्हणतात तो हाच आराखडा. पूर्वी जे वेगवेगळे करार हजारो पानांवर शब्दबद्ध झाले होते, ज्यांच्यात अनेक ठिकाणी परस्परविरोध होता, ज्यांतील वेगवेगळ्या कलमांना वेगवेगळ्या देशांची मान्यता नव्हती, अशा अगणित कागदपत्रांचे अध्ययन करून, सगळ्यांशी सल्लामसलत करून, त्यांतील नेमक्या व सर्वांना न्याय देणाऱ्या बाबींचा समावेश डंकेल यांनी आपल्या फक्त ५०० पानी मसुद्यात केला होता. ही कामगिरी अभूतपूर्व अशीच मानली गेली.

१९९१मध्ये त्यांनी तो मसुदा चर्चेसाठी जगभर प्रसृत केला व अत्यंत चिकाटीने त्याचा पाठपुरावा सुरू केला. चर्चेच्या अनेक फेऱ्या होऊन शेवटी १९९४मध्ये तो मसुदा संमत झाला व त्यातूनच GATTची जागा घेणारी जागतिक व्यापार संघटना (WTO) ही संस्था अस्तित्वात आली. तो दिवस होता १ जानेवारी १९९५. आंतरराष्ट्रीय व्यापार हा जागतिकीकरणाचा गाभा होता व जागतिकीकरणाला नेमके स्वरूप मिळाले, ते ह्या डंकेल प्रस्तावामुळे; त्यातून निर्माण झालेल्या WTOमुळे. ह्या प्रस्तावाला चर्चेच्या काळात

जगातल्या अनेक देशांतून – विशेषतः डाव्या विचारवंतांकडून – प्रचंड विरोध झाला. पण तो नंतर मावळला. भारतासहित जगातील बहुतेक सर्वच देशांनी ह्या डंकेल प्रस्तावाला मान्यता दिली व आज ते WTOचे सदस्यही बनले आहेत. उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण (उखाजा) म्हणून ज्या धोरणाचा उल्लेख होतो, त्याचा पाया म्हणजे डंकेल प्रस्ताव.

डंकेल प्रस्तावाचे चार विभाग होते. एक, वस्तूंचा शक्य तितका खुला व्यापार. दोन, सेवांची (services) शक्य तितकी खुली देवघेव. तीन, भांडवली गुंतवणुकीवर कमीत कमी बंधने. आणि चार, आंतरराष्ट्रीय बौद्धिक संपदेचा हक्क (इंटरनॅशनल इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट्स).

शेतीच्या संदर्भात प्रस्तावातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे होते :

शेतकऱ्यांकडून कमी भावात लेव्ही स्वरूपाची सक्तीची वसुली करू नये – जर सरकारला रेशन व्यवस्था चालवण्यासाठी धान्य हवे असेल, तर सरकारने ते शेतकऱ्यांकडून बाजारभाव देऊनच खरेदी करावे. दुसरा मुद्दा असा होता, की शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी होत जाईल व अन्य अर्थकारणात अतिरिक्त शेतकरी सामावले जाऊ शकतील अशी अर्थव्यवस्था असावी. तिसरा मुद्दा होता, शेतीमालाच्या निर्यातीवरील बंधने उठवली जाणे. चौथा मुद्दा होता, शेतीवरील सरकारी सबसिडी कमी करणे. पाचवा (शेतीसह सर्वच नव्या संशोधनाला लागू होणारा) मुद्दा होता, ज्याचे पेटंट काढले आहे अशा बौद्धिक संपदेची चोरी न करता त्याची पूर्ण किंमत देऊनच ती दुसऱ्या देशाने विकत घेणे.

ह्या शेवटच्या कलमामुळेच देशातील औषध कंपन्यांनी ह्या प्रस्तावाला सर्वाधिक विरोध केला, कारण त्यांचा बराचसा व्यवसाय हा परदेशी औषध कंपन्यांनी प्रचंड खर्च करून विकसित केलेले ज्ञान वापरायचे, मूळ घटक कायम ठेवून केवळ उत्पादनप्रक्रियेमध्ये किरकोळ फेरफार करायचे व तीच औषधे स्वतःची म्हणून विकायची यावर आधारित होता.

डंकेल प्रस्तावाचे चारही विभाग हे भारताच्या फायद्याचे आहेत अशी ठाम भूमिका जोशी यांनी घेतली. WTOसारखे व्यासपीठ तयार झाले तर आपण त्याचा वापर करून विकसित देश स्वत:च्या शेतकऱ्यांना जी प्रचंड सबसिडी देतात, स्वत:चा न खपलेला माल आपल्या देशात आणून कमी किमतीत विकतात (डंपिंग करतात) व त्यातून भारतासारख्या देशातील शेतीमालाच्या किंमती पाडून येथील शेतकऱ्यांचे नुकसान करतात, त्याविरुद्ध आपण दाद मागू शकू. आपला शेतकरी त्याचा माल परदेशात विनानिर्बंध निर्यात करू शकेल व त्याचा त्याला खूप फायदा होईल असेही ते म्हणत होते. नव्या संशोधनाला उत्तेजन द्यायचे असेल, तर पेटंटचा कायदा नैतिकदृष्ट्याही अत्यावश्यक आहे असे त्यांचे म्हणणे होते. प्रस्तावातील सबसिडी कमी करायच्या मुद्द्यावरही खूप टीका होत होती, पण जोशी यांनी हे दाखवून दिले, की मुळातच भारतात शेतीला उणे अनुदान (negative subsidy) असल्याने ती कमी व्हायचा काही प्रश्नच उद्भवत नाही. याउलट इतर देश आपल्या शेतीमालाला जी प्रचंड

सबसिडी देतात ती त्यांना कमी करावी लागेल व त्यामुळे भारतीय शेतकरी आपला माल परदेशात उत्तम किमतीला विकू शकेल. डंकेल प्रस्तावात अमेरिकेसारख्या जागतिक बाजारपेठेवर आत्ताही खूप प्रभुत्व असलेल्या विकसित देशांपेक्षा भारतासारख्या जागतिक व्यापारात आज नगण्य स्थान असलेल्या अविकसित देशाचे अधिक हित साधले जाणार आहे असा त्यांचा निष्कर्ष होता.

ज्यावेळी देशात सगळेच राजकीय नेते, विचारवंत, पत्रकार ह्या डंकेल प्रस्तावाच्या बाजूने बोलायला घाबरत होते त्यावेळी जोशींनी या प्रस्तावाचे हिरीरीने स्वागत केले. त्यांच्या मते WTOमुळे ॲडम स्मिथचे श्रमविभागणीचे तत्त्व आंतरराष्ट्रीय व्यापाराला लागू होईल. म्हणजे ज्या देशाला जे उत्पादन जास्तीत जास्त चांगले व स्वस्तात करणे परवडेल, ते तो करायला लागेल व जे उत्पादन बाहेरून विकत घेणे तुलनेने फायदेशीर ठरेल, ते तो बाहेरून घेऊ शकेल. अशा प्रकारची श्रमविभागणी हा खुल्या अर्थव्यवस्थेचा गाभाच होता. जोशी म्हणतात,

''जागतिकीकरणाच्या जमान्यात खुली अर्थव्यवस्था अपरिहार्य आहे, आणि ती सर्वसामान्य ग्राहकाच्या भल्याचीच आहे. त्याच्या गरजा जो देश सर्वांत स्वस्तात भागवू शकेल, त्या देशातून त्या वस्तूंचा त्याला पुरवठा व्हायला हवा. उदाहरणार्थ, जर का आम्हांला हरभऱ्याची डाळ बनवायला किलोला १२ रुपये खर्च येत असेल आणि ऑस्ट्रेलियाचे शेतकरी जर का ती डाळ सात-आठ रुपयांमध्ये आम्हांला पुरवत असतील, तर त्या डाळीची ऑस्ट्रेलियाहून आयात झाली पाहिजे, कारण त्यात भारतातल्या ग्राहकांचं कल्याण आहे. खुल्या बाजारपेठेचा अर्थच मुळी तसा आहे. आयातीला विरोध करताना आपण डाळीच्या आयातीविषयी काही बोलत नाही, त्याचं कारण असं आहे, की आम्ही भाकरीपिठलं खाणारे, डाळरोटी खाणारे; पण आमच्याकरिता डाळ पिकविण्याचं काम प्रामुख्यानं ऑस्ट्रेलियामध्येच होतं! हेडले हा प्रसिद्ध क्रिकेटिअर होऊन गेला. त्याच्या नावाने, एक हरभऱ्याची जात त्यांनी हिंदुस्थानाकरिता मुद्दाम तयार केली. तुम्ही, आम्ही जे पिठलं खातो ते प्रामुख्याने ऑस्ट्रेलियातल्या डाळीचंच आहे!''

अर्थात दोन देशांमधील व्यापारावर WTO नियंत्रण ठेवू शकते, पण देशांतर्गत घडामोडी शेवटी त्या त्या देशातील सरकारच ठरवत असते व अमलात आणत असते. आणि दुर्दैवाने भारतीय सरकारचे धोरण आजही शेतकरीविरोधीच राहिले आहे. जयसिंगपूर येथील एक विचारवंत व शेतकरी संघटनेचे पाईक अजित नरदे लिहितात,

> उदारीकरण झाले तरी आजही भारतीय शेतकरी मुक्त झालेला नाही. जीवनावश्यक वस्तू कायदा आजही लागू आहे. कोणत्याही शेतीमालाच्या व्यापारात सरकार हवे तेव्हा निर्बंध घालू शकते. निर्यातबंदी, जादा भावाने आयात, देशातील शेतकऱ्यांवर डंपिंग अद्यापही सुरू आहे. शेतीमालाच्या वायदे बाजारावर केव्हाही बंदी येते. शेतीमालाची साठवणूक आणि विक्री यांवरही बंदी येते. केव्हाही लेव्ही लादून कमी

दराने सरकार शेतीमाल खरेदी करू शकते. यामुळे भारतीय शेतकऱ्याची लूट पूर्वीसारखी सुरूच आहे.''

(मोहन गुंजाळ स्मृतिग्रंथ, नोव्हेंबर २०११, पृष्ठ ५४)

ही परिस्थिती शेवटी आपल्यालाच प्रयत्नपूर्वक बदलावी लागेल, WTOवर ती जबाबदारी टाकता येणार नाही. पण WTOमुळे देशाचा अनेकपरींनी फायदा झाला आहे यात शंकाच नाही व म्हणूनच भारतात एकेकाळी ह्याला कडाडून विरोध करणारेही स्वतः सत्तेवर आल्यावर मात्र ह्याच धोरणाचा अवलंब करत आले आहेत. गेल्या पंचवीस वर्षांत अनेक सरकारे आली आणि गेली, पण हे धोरण कायमच राहिले आहे. ज्यांनी डंकेल प्रस्तावाला विरोध केला, पण नंतर आपली बाजू बदलली, त्यांनी कधीच 'आपली ती पूर्वीची भूमिका चुकीची होती' अशी जाहीर कबुली दिलेली नाही.

भारतात एक वेळ अशी होती, की डंकेल प्रस्तावाच्या बाजूने बोलणारे शरद जोशी सोडून दुसरे जवळजवळ कोणीच नव्हते. अशा वेळी जोशी यांनी अत्यंत ठामपणे डंकेल प्रस्तावाला पाठिंबा दिला. १९९१ साली जेव्हा डंकेल प्रस्ताव प्रथम चर्चेत आला, त्यावेळी डंकेल प्रस्तावाला विरोध करण्यात भारतातले उजवे-डावे असे जवळजवळ सगळेच पक्ष आणि गांधीवाद्यांपासून हिंदुत्ववाद्यांपर्यंत सगळ्यांच्या मोठ्या संघटना सहभागी होत्या. त्यात समाजवादी होते, राष्ट्रवादी होते, कामगार संघटना होत्या, स्वयंसेवी संस्था होत्या, अगदी उद्योगपतींच्या संघटनाही होत्या. देशातील जवळजवळ सर्व शेतकरीनेतेही ह्या प्रस्तावाच्या विरोधात होते. एखाद्या मुद्द्यावर अशी एकजूट क्वचितच कधी बघायला मिळाली असेल. यांच्यापैकी कोणालाही खुलीकरण नको होते. भाजपप्रणीत भारतीय मजदूर संघाचे व भारतीय किसान संघाचे अध्यक्ष दत्तोपंत ठेंगडी यांनीतर त्याविरुद्ध देशव्यापी अशी संघर्षयात्रा काढली होती. मधु दंडवते यांच्यासारखे सगळेच समाजवादी नेतेही ह्या प्रस्तावाला कडाडून विरोध करत होते. 'ह्या देशात आज डंकेल प्रस्तावाला तुम्ही देत असलेला पाठिंबा म्हणजे राजकीय आत्महत्या आहे,' असे जोशी यांच्या दिल्लीतील एक हितचिंतक महिलानेत्या त्यांना म्हणाल्या होत्या. 'ह्यातल्या एकानेही मुळात हा डंकेल प्रस्ताव कधी वाचला असेल असे मला वाटत नाही,' असे यावर जोशींचे म्हणणे होते. अशा परिस्थितीत जोशींनी ज्या प्रकारे ह्या प्रस्तावाला समर्थन दिले ते अभूतपूर्व होते. ते करताना त्यांनी फार मोठा धोका पत्करला होता. ते सीआयएचे एजंट आहेत, देशद्रोही आहेत असे आरोप सर्रास केले गेले. तरीही जोशींनी आपली भूमिका बदलली नाही; देशभर फिरून त्यांनी असंख्य सभांमधून डंकेल प्रस्ताव आणि एकूणच खुलीकरणाची प्रक्रिया या गोष्टी भारताच्या कशा हिताच्या आहेत हे जनतेला पटवून द्यायचा प्रयत्न केला.

बऱ्याच नंतर, १० जानेवारी २००० रोजी, मायकेल मूर हे WTOचे तिसरे महासंचालक (डायरेक्टर जनरल) भारतदौऱ्यावर असताना दिल्लीत त्यांची व जोशींची भेट झाली होती व त्यावेळी मूर यांनी जोशींनी सातत्याने घेतलेल्या भूमिकेचे कौतुकही केले होते.

अमेरिकेतील सिॲटल शहरात भरलेल्या WTOच्या परिषदेत खुलीकरणाविरुद्ध स्वयंसेवी संस्थांनी जोरदार निदर्शने केली होती व त्यात भारतातीलही अनेक संस्था सहभागी झाल्याचे मूर यांनी बघितले होते. त्या पार्श्वभूमीवर जोशींसारख्या एका शेतकरीनेत्याने डंकेल प्रस्ताव, जनुकीय तंत्रज्ञान आणि एकूणच खुलीकरणाची प्रक्रिया यांना इतके समर्थन द्यावे हे अधिकच उठून दिसणारे होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन जेव्हा मार्च २००० मध्ये भारताच्या पाच दिवसांच्या दौऱ्यावर आले होते, त्यावेळी त्यांच्यासोबत डॉ. इस्लाम ए. सिद्दिकी हे त्यांचे सल्लागारही होते. त्यांचा अधिकृत हुद्दा त्यावेळी Senior Trade Advisor, US Department of Agriculture हा होता. WTO बरोबर होत असलेल्या सर्व चर्चांमध्ये त्यांचा महत्त्वाचा सहभाग असे. त्यांच्या सन्मानार्थ जोशी यांनी जागतिक कृषी मंचाच्या भारत शाखेतर्फे दिल्लीच्या अशोका हॉटेलात एक जेवण ठेवले होते व त्याला १६ देशांचे राजदूतही हजर होते. त्यांनीही जोशींच्या भूमिकेचा गौरव केला होता. WTO संबंधित बाबींचा जोशींचा अभ्यास दांडगा होता व त्यामुळे अशा आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चांत जोशींची चांगलीच छाप पडत असे. पुण्याचे मदन दिवाण हे साधारण १९९५ ते २००४ ह्या काळात जोशींच्या निकटच्या सहवासात होते. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार जोशींच्या ह्या भूमिकेचे आंतरराष्ट्रीय पातळीवर खूप स्वागत झाले होते, भारतातही मनमोहन सिंग यांच्यासारख्यांना जोशींबद्दल कृतज्ञता होती आणि याचे एक द्योतक म्हणजे, २२ मे २००४ रोजी मनमोहन सिंग यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली, त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांनी जोशींना आपल्या घरी ब्रेकफास्टसाठी आमंत्रित केले होते. दिवाण हेही त्या प्रसंगी उपस्थित होते.

इथे एक गोष्ट नमूद करायला हवी. पाश्चात्त्य देशांत शेतकऱ्यांना प्रचंड सबसिडी दिली जाते व त्याविरुद्ध भारताने आवाज उठवलाच पाहिजे, ह्याबद्दल जोशींच्या मनात शंका नव्हती व त्यांनी स्वतःही त्यावर जागतिक शेती मंचावरून टीकाही केली होती. पण असा विरोध परिणामकारकरीत्या करता यावा ह्यासाठीही भारताने WTOचे सदस्य बनणे आवश्यक होते. पुढे त्यांची ती भूमिका सगळ्यांनीच स्वीकारली, पण जोशी यांनी दिलेल्या अविरत समर्थनाचा कधीच गौरवपूर्ण उल्लेख होत नाही.

आर्थिक उदारीकरणाचा जागतिक प्रवाह व त्यामुळे देशात होऊ घातलेले निदान धोरणात्मक पातळीवरचे बदल विचारात घेऊन अशा परिस्थितीत आपली व पर्यायाने शेतकरी संघटनेची वाटचाल काय असावी याचा जोशी पुन्हा एकदा विचार करू लागले. जुन्या प्रकारचे आंदोलन आणि प्रचलित निवडणुकांचे राजकारण या दोन्ही वाटा आता काहीशा खुंटल्यासारख्या झाल्या होत्या.

जोशी स्वतः शेतकरी आंदोलनात पडले होते ते वयाची चाळीशी उलटल्यावर. आंदोलन करण्याचे अनेक फायदे असतात; ज्यांच्यावर अन्याय होत असतो त्यांच्यात आंदोलनातून एकजूट निर्माण होते, आंदोलनामुळे सरकारचे व समाजाचे लक्ष त्या अन्यायाकडे वेधले जाते, त्यातून संघटना बळकट होते, कार्यकर्त्यांना प्रशिक्षण मिळते, योग्य त्या जागी दडपण आणून

आपल्या काही मागण्याही पदरात पाडून घेता येतात हे सारे उघड होते. किंबहुना, शेतकऱ्यांची संघटना बांधणे अशक्य आहे, असे सगळे म्हणत असताना शेतकरी संघटना इतक्या झपाट्याने उभी राहिली हेच फार मोठे यश होते. पण त्याचवेळी आंदोलनाच्या मर्यादाही स्पष्ट होत गेल्या.

उदाहरणार्थ, 'शेतकरी तितुका एक एक' असे कितीही म्हटले तरी कांदा आंदोलनातले शेतकरी ऊस आंदोलनात सामील नव्हते, ऊस आंदोलनातले शेतकरी निपाणीला गेले नव्हते आणि निपाणी आंदोलनातले शेतकरी कापूस आंदोलनात नव्हते. शेतकरी त्याच्या शेतीशी कायम बांधलेला असतो, तो सहजासहजी 'रजा टाकून' कुठे जाऊ शकत नाही. पिकांकडे किंवा गुरांकडे रोजच लक्ष द्यावे लागते. आंदोलनासाठी कितीही इच्छा असली तरी इकडेतिकडे सतत फिरणे काही कार्यकर्त्यांना जमले तरी सर्वसामान्य शेतकऱ्याला फारच अवघड असते.

शिवाय एखाद्या आंदोलनानंतर त्या विशिष्ट शेतीमालाला जास्त भाव मिळाला, म्हणजे तो प्रश्न कायमचा मिटला असे नसायचे; पुढच्या वर्षी पुन्हा तोच प्रश्न उभा राहायचा. त्यासाठी सतत जागरूक राहणे, सतत संघर्षाच्या तयारीत असणे ही पूर्वअट होती. 'सतत जागरूक राहणे ही स्वातंत्र्याची किंमत आहे,' हे जोशींचे आवडते उद्धृत होते. ('Eternal vigilance is the price of freedom.') पण केवळ संघटनेच्या बळावर अशी जागरूकता दाखवणे अशक्य होते. कारण भावावर परिणाम करणारे अनेक घटक होते व ते कोणाच्याच नियंत्रणाखाली नव्हते. कायमस्वरूपी रास्त भाव मिळावा यासाठी व्यवस्थाबदल हाच मार्ग होता.

'आपल्या संघटनेला वर्गणी अशी काहीही नाही. पाठीवरचा पोलिसांच्या लाठीचा एकतरी वळ संघटनेची वर्गणी म्हणून मला दाखवा,' असे एकेकाळी जोशी व माधवराव मोरेंसारखे त्यांचे लढवय्ये साथी म्हणत असत. पण पोलिसांची लाठी चालायची ती एका तडाख्यावर कधीच थांबत नसे. लॉकअपमधला छळही अनेकांच्या नशिबी आला होता. एकदा पाशवी असा पोलिसी मार खाल्लेला शेतकरी इतका पिचून जायचा, की पुन्हा आंदोलनात उतरायची हिंमत तो सहसा करत नसे. सर्वसामान्य शेतकरी हा तसा पापभीरू असायचा; तो काही सराईत गुंड किंवा अतिरेकी नव्हता, आणि पोलीस कस्टडीत बंद होणे हे त्याच्या दृष्टीने महादिव्य होते.

सत्याग्रही स्वरूपाच्या आंदोलनाला यश मिळायची शक्यता तेव्हाच असते जेव्हा सरकार संवेदनाक्षम असते; गेल्या पंधरा-वीस वर्षांत एकूण समाजच बदलत गेला होता व त्या प्रमाणात सरकारची संवेदनक्षमतादेखील झपाट्याने कमी होत गेली होती. पूर्वी आंदोलनात दोन-चार जण हुतात्मा झाले तरी त्याचे सरकारवर दडपण यायचे; आता कितीही माणसे मेली तरी शासन ढिम्म हलत नव्हते. सगळे जणू रोजचेच झाले होते; मुर्दाड बनलेल्या सरकारवर त्याचा काहीच परिणाम होत नसे.

शेतकरी आंदोलनात रास्ता रोको, रेल रोको हे एक महत्त्वाचे हत्यार होते. अशा कामात अर्थातच गनिमी काव्याचा भाग खूप होता. पोलिसांपासून स्वतःचे संरक्षण करणे, अनपेक्षित

हालचाली, गुप्तेतेने निरोप पाठवणे, प्रसंगी वेष पालटून आंदोलनाच्या ठरलेल्या जागी वेगवेगळ्या ठिकाणांहून सत्याग्रहींनी जमा होणे वगैरे गोष्टी अपरिहार्य असायच्या. 'शेतकऱ्यांचे रॉबिन हूड' असे काही जण त्याकाळात जोशींना म्हणत ते त्याचमुळे. पण हे प्रकार प्रदीर्घ काळ करत राहणे अवघडच होते. त्यांचे अनेक कार्यकर्तेही आता मध्यमवयीन होत चालले होते. शारीरिक धावपळीला मर्यादा होत्या.

इतरही काही मर्यादा स्पष्ट होत गेल्या. आंदोलनाला शेतकऱ्यांकडून कितीही मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळाला, तरी सरकार मनात आणले तर किती क्रूरपणे कुठलेही आंदोलन दडपू शकते याचाही पुरेपूर अनुभव त्यांना आला होता. एव्हाना त्यांनी स्वतः निदान वीस-बावीस वेळा तुरुंगवास भोगला होता आणि त्यांच्याविरुद्ध वेळोवेळी निदान शे-सव्वाशे खटले दाखल केले गेले होते. आंदोलनात त्यांची व त्याहून अधिक म्हणजे सर्वच कार्यकर्त्यांची पुरती दमछाक झाली होती. पुन्हा बलदंड सरकारविरुद्ध केलेले कुठलेही संघर्षपूर्ण आंदोलन हे अंतिमतः यशस्वी होणार तरी कसे? २२ फेब्रुवारी १९८५ रोजी 'शेतकरी संघटक'मध्ये जोशींनी लिहिले होते,

> फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी शेतकऱ्याच्या हातातील शस्त्रे आणि सैन्याच्या हातातील शस्त्रे जवळजवळ सारखी होती; पण आज सैन्याच्या हातातील शस्त्रे आणि सामान्य माणसाच्या हातातला शस्त्रसामग्रीचा अभाव हे पाहिले, तर केवळ आंदोलनाच्या ताकदीवर सशस्त्र सैन्य हाती असलेल्या शासनाशी मुकाबला करून जिंकता येईल अशी परिस्थिती नाही.

गेल्या दहा-पंधरा वर्षांत परिस्थिती खूपच पालटली होती. आता संगणक-इंटरनेट आले होते, टीव्हीमुळे माध्यमक्रांती झाली होती. ग्रामीण भागातही शिक्षणाचा प्रसार झाला होता. उदारीकरण, खासगीकरण व जागतिकीकरण यांच्या एकत्रित परिणामांमुळे जग पूर्वीपेक्षा खूप अधिक जवळ आले होते. समृद्धीची फळे, कितीही नाही म्हटले तरी, ग्रामीण भागातही झिरपू लागली होती. अहमदाबादच्या एका नामांकित संस्थेने केलेल्या पाहणीनुसार टूथपेस्ट, साबण, शांपू, रेडियो, टेलेव्हिजन, तयार कपडे, पादत्राणे, सौंदर्यप्रसाधने, शीतपेये वगैरेंच्या देशातील एकूण मागणीपैकी सुमारे ४० टक्के मागणी ही ग्रामीण भागातून होती; पूर्वी ती २० टक्केही नव्हती. ग्रामीण भागातील अनेक जण आता शेअर खरेदी-विक्रीतही नियमित भाग घेऊ लागले होते. परिस्थिती फार सुधारली होती अशातला भाग नव्हता, पोटाला चिमटा बसतच होता; पण अगदी कळवळून उठावे असा चिमटा बसेनासा झाला होता. शेतकरी आंदोलनामुळे शेतीमालाच्या किमतीत जी वाढ झाली व त्यामुळे ज्यांचा आर्थिक फायदा झाला, अशा अनेकांनी आंदोलनात रस घेणे पुढे कमी केले. कोणाची मुले नोकरीला लागली होती, कोणी कुठला जोड-व्यवसाय सुरू केला होता. बेकार तरुण जितक्या बेदरकारपणे दगड फेकेल, तितक्या बेदरकारपणे संसारात स्थिरावलेला माणूस ते करणार नाही. हा शेतकऱ्यांचा दोष नव्हता, ही एक स्वाभाविक मानवी प्रवृत्ती होती.

सैद्धांतिक पातळीवर विचार केला तरी, आज आपण सरकारकडून किमान भाव मागत आहोत, पण ते आपल्या एकूण खुल्या अर्थव्यवस्थेच्या विचारसरणीत कायमस्वरूपी बसत नाही, ह्याचीही जोशींना पुरती जाणीव होती. आज गलितगात्र होऊन पडलेला शेतकरी एकदा का स्वतःच्या पायावर उभा राहिला, की मग त्याला अशा हमी भावाच्या कुबड्यांची गरजच पडणार नाही. लगेचच मिळेल त्या किमतीला माल विकण्याची त्याची गरज संपली, त्याच्याकडे माल साठवण्याचे, विक्रीसाठी अधिक धीर धरायचे सामर्थ्य आले, की तोच आपल्याला वाजवी दाम मिळेस्तोवर ताणून धरू शकेल. आज सरकारकडून आपण हमी भावाची जी अपेक्षा करत आहोत, ती आणीबाणीच्या स्थितीत आगीचा बंब बोलावण्यासारखी आहे; अजून काही वर्षांनी आपल्याला अशा सरकारी हस्तक्षेपाची गरजच राहणार नाही. आज सगळी बाजारपेठ व्यापारी व दलाल यांच्या नियंत्रणाखाली आहे आणि त्यांच्याशी बरोबरीच्या नात्याने देवाणघेवाण करण्याची वर्षानुवर्षे पिळून निघालेल्या शेतकऱ्यात आज ताकद नाही. पण एकदा ती आली, की तो स्वतःच्या हितसंबंधांचे रक्षण स्वतःच करू शकेल; त्यातूनच इंडिया व भारत यांच्या संतुलनाकडे वाटचाल होऊ शकेल.

याशिवाय आपल्या विचाराला आज मोठे पाठबळ मिळत असले तरी तो विचारही कालातीत नाही; त्याचे आयुष्य फारतर अजून पंधरा-वीस वर्षे आहे, काळाच्या ओघात समाजाच्या गरजा बदलत जातात आणि उद्याच्या समाजासाठी वेगळी कुठलीतरी विचारसरणी अधिक उपयुक्त ठरू शकेल, हेही त्यांनी स्वतःच अनेकदा स्पष्ट केले होते. खरे तर शेतकरी संघटनेचा राजकीय प्रवास हादेखील केवळ 'आंदोलन एके आंदोलन' हे कायमस्वरूपी चालू शकणारे धोरण नाही, ध्येयप्राप्तीसाठी राजकीय पर्याय शोधायला हवा आणि त्यातूनच व्यवस्थात्मक बदल घडू शकतील, या जाणिवेतूनच सुरू झाला होता. दुर्दैवाने पुढे तोही मार्ग खुंटला. अशा अनेक कारणांमुळे १९९१ सालच्या देशातील उदारीकरणाच्या पर्वानंतर आपण काहीतरी नवी, कालानुरूप मांडणी करायला हवी हे जोशींना अधिकच प्रकर्षाने जाणवू लागले.

२२ सप्टेंबर १९९१ रोजी वर्धा येथील कार्यकारणीच्या बैठकीत, नंतर १० नोव्हेंबर १९९१ रोजी शेगाव येथील शेतकरी मेळाव्यात आणि त्यानंतर २८ फेब्रुवारी १९९३ रोजी मुंबईतील कार्यकारिणीच्या बैठकीत जोशींनी ही नवी गरज कार्यकर्त्यांसमोर मांडली, काही उपाय सुचवले. दरम्यानच्या काळातही संधी मिळेल तेव्हा ते काहीतरी नवी मांडणी करतच होते. म्हणजे लढाई तीच होती; पण हत्यारे नवी होती, व्यूहरचना नवी होती. या व्यूहरचनेचे स्वरूप साधारण पुढीलप्रमाणे होते :

शेतकरी संघटनेने गेली दहा-बारा वर्षे केलेला संघर्ष हा आवश्यकच होता; पहिली ठिणगी पडायची असेल तर गारगोटी घासावीच लागते. पण गारगोटीच्या घासण्यातून प्रत्येक वेळी ठिणगीच पडत राहील, त्यातून ज्योत तयार होणार नाही. ज्योतीसाठी वात लागते, तेल लागते. त्यासाठी आपल्याला वेगळा दिवा शोधावा लागेल. ठिणगीने तिचे काम केलेले आहे, आता गरज आहे ती ज्योतीची. आपण सरकारला सादर केलेल्या राष्ट्रीय कृषी नीतीचा मसुदा

सरकारने बासनात बांधून ठेवून दिला आहे; आता नवे सरकार ह्या मसुद्याकडे वळून बघायची शक्यता नाही. या परिस्थितीत आपण आपल्याच मर्यादित बळावर काही करू शकतो का, ह्याचा विचार करायला हवा.

अगदी लगेच टाकता येईल असे पहिले पाऊल म्हणून त्यांनी चतुरंग शेतीची संकल्पना मांडली. या संकल्पनेला सीता शेती, माजघर शेती, व्यापारी शेती आणि निर्यात शेती असे चार आयाम होते.

सीता शेती म्हणजे प्रयोग शेती. शेतकरी महिलेने आपल्या स्वतःच्या शेतात, स्थानिक पातळीवर सहजगत्या उपलब्ध असणाऱ्या साधनांच्या साहाय्याने, कुठल्याही खर्चीक यंत्रसामग्रीच्या किंवा खतांच्या मागे न लागता, स्वतःला जमतील असे वेगवेगळे प्रयोग करत शेती करायची. मुळात शेतीचा शोध स्त्रियांनीच लावला आहे व त्याच आपली कल्पकता वापरून नवी नवी तंत्रे शोधून काढतील यावर जोशींचा पूर्ण विश्वास होता. त्यावेळच्या लक्ष्मीमुक्ती अभियानात ज्या दीड-दोन लाख स्त्रियांच्या नावावर जमिनीचा एखादा छोटा तुकडा तरी झाला होता, अशा स्त्रिया सीता शेतीची संकल्पना मांडताना त्यांच्या डोळ्यांपुढे प्रामुख्याने होत्या.

माजघर शेती म्हणजे प्रक्रिया शेती. जो शेतीमाल आपण पिकवला असेल, तो तसाच्या तसा पोत्यात भरून बाजारात न नेता, त्यावर घरच्या घरी काही ना काही प्रक्रिया करून मगच तो बाजारात नेणे. ह्या प्रक्रियेतही कुठलाही मोठा कारखाना, यंत्रसामग्री वगैरे पसारा जोशींच्या डोळ्यापुढे नव्हता. स्वतः शेतकरी महिला करू शकेल असेच काहीतरी त्यांच्या मनात होते. उदाहरणार्थ, शेतातला माल घरीच स्वच्छ करायचा, निवडायचा, त्याच्या दोन-दोन किंवा पाच-पाच किलोच्या पिशव्या करायच्या आणि मग तो बाजारात न्यायचा. एवढ्यानेदेखील शेतकरी महिलेच्या हाती चार पैसे अधिक येणार होते. पुन्हा यासाठी सरकारवर अथवा अन्य कोणावर अवलंबून राहण्याची काहीच गरज नव्हती. कुठल्याही शेतकरी महिलेला घरच्या घरी सहज जमणारे असे हे मूल्यवर्धन होते.

तिसरा आयाम होता व्यापारी शेती. म्हणजे अशी पिके घेणे ज्यांना बाजारात मागणी आहे आणि स्वतः बाजाराशी संधान बांधणे; त्या मालासाठी बाजारपेठ तयार करणे, महिलांनी थोडीफार प्रक्रिया करून तयार केलेला माल बाजारात पोचवणे आणि खपवणे. याला ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळेल असे जोशींचे मत होते, कारण त्याला थेट शेतकऱ्याकडून ताजा, स्वच्छ व बिनभेसळीचा माल मिळणार होता. यासाठी मात्र एखादी व्यापक यंत्रणा उभारावी लागणार होती. त्या दृष्टीने पाच हजार दुकानांची 'शिवार'सारखी एक साखळी उभारायची योजना त्यांनी मांडली होती.

निर्यात शेती हा चौथा आयाम होता. आपल्या शेतीमालाला उत्तम भाव मिळेल अशी परदेशातील बाजारपेठ त्यासाठी शोधणे व तसा पुरवठा नियमित सुरू करणे. त्यासाठीदेखील एखादी यंत्रणा उभारणे आवश्यक होते. पण आपण जर दर्जा चांगला ठेवला तर एकूण उत्पादित मालापैकी १० टक्के माल तरी आपण निर्यात करू शकू असा जोशींचा विश्वास होता.

ह्या चतुरंग शेतीतून नेमके काय जोशींना साधायचे होते? एकतर ह्यातून प्रत्येक शेतकरी कुटुंबाला स्वतःच्या हातांनी करण्यासाठी काहीतरी काम मिळणार होते. गांधीजींच्या सूतकताईच्या कार्यक्रमाशी ह्या उपक्रमाचे थोडेफार साम्य होते. यातून संपत्तिनिर्माण होणारच होते, पण विशेष म्हणजे असंख्य शेतकरी बांधवांना एका विधायक कामात सहभागी व्हायची संधी मिळणार होती. संघटना टिकवण्यासाठी हे उपयुक्त होते. आंदोलनासाठी इतकी वर्षे आपण एकत्र येत गेलो, आता अशा विधायक कार्यक्रमासाठी एकत्र यायला काय हरकत आहे, असा त्यांचा विचार होता. सरकारी हस्तक्षेपाशिवाय आपण शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी काही करू शकतो का, याचीही ही चाचपणी होती.

ह्या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी त्यांनी तासगावची द्राक्षक्रांती ज्यांच्यामुळे यशस्वी झाली, त्या साताऱ्याच्या श्री. अ. दाभोळकर यांची व त्यांच्या प्रयोगपरिवाराची मदत घेतली. शेतकरी भगिनींसाठी दाभोळकरांची खास प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली. एरव्ही आपल्या प्रत्येक व्याख्यानासाठी तिकिट लावणारे व 'माझे विचार ऐकायचे असतील, तर त्यासाठी तुम्ही पैसे मोजलेच पाहिजेत' असा एक तत्त्व म्हणून आग्रह धरणारे दाभोळकर शेतकरी संघटनेच्या शिबिरांसाठी आनंदाने विनामोबदला वेळ देऊ लागले. काडीकचरा, सांडपाणी आणि भारतात मुबलक व फुकट उपलब्ध असणारा सूर्यप्रकाश ह्यांचा वापर करून आपल्याच आवारात आपण उत्तमप्रकारे काय काय पिकवू शकतो ह्याबाबत दाभोलकरांनी मार्गदर्शन केले. पुढे महिला आघाडीने गावोगावी फिरून महिलांना स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष मदत करण्यासाठी अनेक प्रशिक्षकदेखील तयार केले. नेहमी रास्ता रोको अन् रेल रोको अशा आंदोलनासाठी प्रसिद्ध असलेल्या शेतकरी संघटनेचे हे एक अगदी निराळे असे रूप यातून लोकांपुढे येऊ लागले.

त्या व्यतिरिक्त संस्थात्मक पातळीवरही जोशींनी तीन व्यावसायिक उपक्रमांच्या कल्पना मांडल्या व त्यांच्या काही सहकाऱ्यांच्या पुढाकारातून त्या उपक्रमांना आकार द्यायला सुरुवातही झाली.

त्यांतला पहिला उपक्रम होता 'शेतकरी सॉल्व्हंट' या नावाची एक कंपनी. सोयाबीनची माहिती त्यावेळेस्तोवर अनेक शेतकऱ्यांना झाली होती व सोयाबीनची लागवडही अनेक शेतकरी करत असत. सोयापासून तेल निघायचे. सोयाबीनमध्ये प्रोटिन्स भरपूर असतात व त्यामुळे त्याला ग्राहकांकडून मागणीही चांगली होती. सोयामिल्कसारखी काही नवी उत्पादनेही त्यातून तयार होत होती. परदेशांतूनही ह्या पिकाला चांगली मागणी होती. उसाप्रमाणेच हा एक शेतकऱ्याला चार पैसे मिळवून देणारा नवा असा पर्याय होता. 'शेतकरी सॉल्व्हंट'च्या नियोजित प्लँटमध्ये आधी विक्रीसाठी सोया ऑइल काढायचे व ते काढल्यानंतर उरलेला सोया केकदेखील त्याचे बारीकबारीक तुकडे (चंक्स) करून विकायचा, अशी योजना होती. अशा सोया उत्पादनांना नुसत्या सोयाबीनपेक्षा निर्यातीसाठी अधिक मागणी होती. हिंगणघाट येथे प्रायोगिक तत्त्वावर कंपनीचा एक प्लॅन्ट उभारण्यातही आला. दुर्दैवाने हा उपक्रम स्थिर

व्हायच्या आतच बारगळला.

'शिवार ॲग्रो' हा दुसरा उपक्रम. ५००० किरकोळ (रिटेल) विक्री करणारी केंद्रे स्थापन करायची आणि त्या जाळ्यामार्फत शेतकऱ्यांनी पिकवलेला व प्रक्रिया केलेला धान्य, फळे, भाजीपाला इत्यादी माल घरोघर पोचवायचा हे तिचे खूप महत्त्वाकांक्षी प्रस्तावित रूप. 'शेतापासून तुमच्या स्वयंपाकघरापर्यंत' अशी आजच्या 'रिलायन्स फ्रेश'सारखी काहीशी ही कल्पना. अशा प्रकारच्या रिटेल चेन्स जोशींनी स्वित्झर्लंडमध्ये जवळून बघितल्या होत्या व तोच नमुना त्यांच्या डोळ्यांपुढे होता. हा सुपर मार्केट चेनचा उपक्रम 'चतुरंग शेती'शी स्वाभाविकपणे जोडला जाणाराही होता. शिवार ॲग्रो ही एक लिमिटेड कंपनी होती. कमलप्रभा, धंतोली, नागपूर ४४००१२ हे तिचे रजिस्टर्ड ऑफिस. दहा रुपयांचा एक शेअर होता व प्रत्येक इच्छुकाने किमान शंभर (म्हणजे हजार रुपयांचे) शेअर्स विकत घेणे अपेक्षित होते. शंभर रुपये आगाऊ भरून त्यांच्या बुकिंगसाठी शेतकरी संघटनेच्या औरंगाबाद येथे ऑक्टोबर १९९३ मध्ये भरलेल्या पाचव्या अधिवेशनात सुरुवातही झाली होती; उर्वरित रक्कम ३१ डिसेंबरपूर्वी जमा करायची होती. हा एकूण तीन कोटी रुपये भागभांडवलाचा प्रकल्प होता, पण प्रत्यक्षात भागभांडवल म्हणून सुमारे ३० लाखच जमा झाले. अपुऱ्या भांडवलामुळे व इतरही काही कारणांनी हा प्रकल्प अयशस्वी ठरला.

जोशींनी कल्पना मांडलेला भामा कन्स्ट्रक्शन कंपनी हा तिसरा व्यावसायिक उपक्रम. औद्योगिक विस्तारासाठी MIDC (महाराष्ट्र इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) ही शासकीय संस्था राज्यात, विशेषतः अविकसित भागात जागोजागी जमिनी संपादन करत असते व ती सारखी करून, प्लॉट पाडून, वीज-पाण्याची सोय करून आणि इतर काही थोड्याफार सुधारणा करून उद्योजकांना विकत असते. सार्वजनिक कामासाठी अशी शेतजमीन घ्यायचा सरकारला हक्कच असतो व तसे त्यात काही गैरही नाही; पण जमीन संपादन करायच्या कामात शेतकऱ्यावर खूप आर्थिक अन्याय होत असे. कारण सरकार ठरवेल त्याच दराने नुकसानभरपाई स्वीकारून जमिनीचा ताबा सोडणे त्याला बंधनकारक होते.

जोशींच्या माहितीतले असे एक उदाहरण म्हणजे पुणे जिल्ह्यातील चिखली या गावचे. ह्या गावातील १००० एकर जमीन संपादित करण्यासाठी सरकारकडून अधिसूचना निघाली होती. बऱ्याच पूर्वी, अगदी १९७० मध्ये. त्यावेळी शेतकऱ्याला जमिनीची भरपाई म्हणून प्रती एकर ४००० रुपये द्यायचे ठरले होते. नेहमीप्रमाणे प्रत्यक्ष कामात उशीर होत गेला व शेवटी १९८९ साली व्याज वगैरे पकडून शेतकऱ्याला एका एकरामागे १९,००० रुपये MIDCने देऊ केले. परंतु अवघ्या चार वर्षांनी, म्हणजे १९९३ साली, सार्वजनिक कामासाठी म्हणून संपादन केलेली ती जमीन, सरकार स्वतःच खासगी उद्योजकांना ११ लाख रुपये प्रती एकर ह्या दराने विकत होते! शेतकऱ्याला मिळणार एकरामागे फक्त १९,००० रुपये आणि सरकार मात्र मिळवणार एकरामागे ११ लाख रुपये! चार वर्षांत ५७ पट नफा!

ह्यात MIDCने जमिनीवर केलेला खर्च विचारात घेऊनही प्रचंड नफेखोरी होती. MIDCचे गलथान व खर्चीक व्यवस्थापन, सुस्त नोकरशाही, राजकारणी, भ्रष्टाचार ह्या साऱ्यांचा ह्यात वाटा नक्कीच होता. ह्याऐवजी शेतकऱ्यांनीच एकत्र यावे, स्वतःचीच जमीन विकसित करावी व त्या जमिनीवर उभारलेल्या प्रकल्पात मूळ जमीनमालक म्हणून स्वतःही वाटेकरी व्हावे, अशी एक कल्पना जोशींनी मांडली.

ज्यांना शेतीतून बाहेर पडायचे आहे त्यांच्यासाठी हा एक आदर्श पर्याय होता आणि त्यात शेतकऱ्यांना जमिनीचे उत्तम मूल्यही मिळणार होते. चाकणजवळ एक इंडस्ट्रियल इस्टेट काढायची योजना MIDCने आखली होती. त्यावेळी आंबेठाण-म्हाळुंगे परिसरातील आठ खेड्यांतील शेतकरी जोशींच्या सल्ल्यानुसार एकत्र आले व त्यांनी स्वतःची भामा कन्स्ट्रक्शन नावाची एक कंपनी सुरू केली. MIDCच्या धर्तीवर या कंपनीला उद्योगनगरी उभारण्याची परवानगी द्यावी म्हणून शेतकऱ्यांच्या वतीने राज्यशासनाकडे अर्ज केला. आपणच ती विकसित करायची, आवश्यक त्या सुविधा तयार करायच्या आणि मग त्याचे प्लॉट पाडून ते उद्योजकांना विकायचे अशी त्यांची योजना होती. थोडक्यात म्हणजे, MIDC जे काम करते, ते आपण शेतकऱ्यांनीच एकत्र येऊन करायचे, म्हणजे या व्यवहारात जो प्रचंड फायदा MIDCला होतो, तो आपल्याला मिळेल व आपल्या शेतजमिनीची उत्तम किंमतही आपल्याला मिळेल, असा त्यांचा प्रयत्न होता.

बऱ्याच चर्चेनंतर ह्या शेतकऱ्यांच्या कंपनीला प्रस्तावित प्रकल्पातील निम्मी जमीन द्यायला तत्कालीन शिवसेना-भाजपा युतीचे सरकार तयार झाले. त्यातील २५० एकरांचा पहिला सेक्टर विकसित करण्याची सर्व तयारी कंपनीने केली. प्रकल्पाचे भूमिपूजन बाळासाहेब ठाकरे यांच्याच हस्ते १२ मार्च १९९९ रोजी आंबेठाणला झाले. समारंभाला शिवसेनेचे तत्कालीन मुख्यमंत्री नारायण राणे व माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी हेही हजर होते. दुर्दैवाने पुढे प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या प्रक्रियेत अनेक अडचणी येऊ लागल्या. ही सारी जमीन वेगवेगळ्या मालकांची होती व त्यांच्यातील काही शेतकऱ्यांनी कोणा ना कोणाच्या सांगण्यावरून पूर्वी कबूल केलेला आपला जमिनीचा तुकडा विकायला ऐन वेळी नकार दिला. त्यामुळे कारखान्यांना उपयुक्त असे सलग प्लॉट पुरेसे मिळेनात. राजकारणी आणि सरकारी अधिकारी यांनीही जागोजागी कोंडी करायला सुरुवात केली आणि साम-दाम-दंड-भेद वापरून त्यांची मदत मिळवण्यात 'भामा' चालवणारे शेतकरी कमी पडू लागले. अंतिमतः ही योजना बारगळली.

काही वर्षांनी साधारण ह्याच आराखड्यावर पुण्यानजीकच मगरपट्टा प्रकल्प उभा राहिला व अतिशय यशस्वीही ठरला. सलग पंधरा वर्षे राज्यात सत्तेवर असलेल्या राष्ट्रवादी पक्षाच्या काही बड्या नेत्यांनी त्याला सर्वतोपरी सहकार्य केले. त्यानंतर इतरही अनेक असेच प्रकल्प उभे राहिले, त्यांतून शेतकऱ्यांना आपल्या जमिनीचा उत्तम मोबदलाही मिळाला. भामा कन्स्ट्रक्शन कंपनी ही ह्या सगळ्या योजनांची पूर्वज म्हणता येईल, पण दुर्दैवाने शेतकऱ्यांसाठी एका चांगल्या वाटेचा शुभारंभ केल्याचे भाग्य कंपनीच्या ललाटी नव्हते.

जोशी स्वतःला महात्मा जोतीराव फुलेंचे पाईक समजायचे. त्यांच्या *शेतकऱ्याचा असूड* या पुस्तकाला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पुस्तकाचा गुणगौरव करणारे *शतकाचा मुजरा* नावाचे एक छोटे पुस्तकही जोशींनी शेतकरी संघटनेच्या अगदी सुरुवातीच्या काळात लिहिले होते. महात्मा फुले यांनी फक्त समाजसेवा केली असे नसून ते उत्तम उद्योजकही होते. 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें; उदास विचारें वेच करी' ही तुकारामउक्ती जणू त्यांचा आदर्श होती. त्यांची हडपसर-मांजरी परिसरात सुमारे ७५ एकरांची बागायती शेती होती; तिच्यात २५ एकरांवर ऊस होता. त्यांचे उसाचे उत्तम चालणारे गुऱ्हाळ होते व त्याकाळी त्यातून हजारो रुपये दरसाल उत्पन्न मिळत असे. बांधकामाची अनेक कंत्राटे त्यांनी घेतली होती व पारही पाडली होती. येरवडा येथील पुलाचे कंत्राट त्यांनी घेतले होते. खडकवासला येथे तलाव बांधला गेला त्यासाठी दगड पुरवायचे कंत्राटही त्यांचेच होते. तसेच कात्रजच्या बोगद्याचेही. अशा अनेक उपक्रमांतून जोतिबांनी चांगला पैसा मिळवला आणि चांगल्या समाजोपयोगी कामासाठी खर्चही केला. त्यांच्यातला हा यशस्वी उद्योजक लोकांना फारसा माहितीच नसतो.

पण आपल्याला गुरुस्थानी असलेल्या या महात्म्याला त्याच्या व्यावसायिक उपक्रमांत जे यश मिळाले, तसे यश जोशींना मात्र मिळू शकले नाही. ज्या प्रकारच्या उपक्रमांत नंतर इतर अनेकांनी घवघवीत यश मिळवले त्याच प्रकारचे हे तिन्ही उपक्रम होते पण जोशी किंवा शेतकरी संघटनेशी संबंधित मंडळी मात्र ते चालवू शकली नाही; खरे तर पुरते उभारूही शकली नाही. खोलात जाऊन तपास केला तर ह्याची नेमकी कारणे कदाचित सापडतीलही, पण तो ह्या चरित्राचा विषय नाही.

एकंदर विचार करता, व्यावसायिक संस्था उभारण्यात जोशींना कायम अपयश येत गेले असे दिसते.

''खुलेपणाच्या विचाराचा प्रचार मी शेतकरी संघटनेमार्फत करत राहिलो; स्वतंत्र भारत पक्षाच्या माध्यमातूनही मी तो केला; पण खुल्या व्यवस्थेतील एखादी शासननिरपेक्ष संस्था उभी करणे आणि चालवून दाखवणे मला जमले नाही.'' असे जोशी यांनी एके ठिकाणी कबूलही केले आहे. (*अंगारमळा,* पृष्ठ ९२)

*वारकरी, आठवड्याचा ग्यानबा* ही शेतकरी संघटनेची जोशींनी स्वतः पुढाकार घेऊन सुरू केलेली मुखपत्रेही अशीच अल्पायुषी ठरली होती व *शेतकरी संघटक* केवळ सुरेश म्हात्रे यांनी सर्व जबाबदारी स्वीकारल्यामुळे बरीच वर्षे चालले, पण पुढे तेही बंद पडले याचीही या ठिकाणी आठवण होते.

आंदोलनाचा आणि राजकीय कामाचा बहर ओसरल्यानंतरच्या काळात शरीर थकले असले तरी जोशी यांचे विचारचक्र चालूच असायचे, नव्या दिशांचा शोध चालूच असायचा. शेतीबाबतच्या जगभरातल्या ताज्या घडामोडींचा ते सतत वेध घेत असत आणि आपले विचार वेगवेगळ्या लेखांतून मांडत असत. आंदोलन एके आंदोलन न करता अधिक विधायक काय

करता येईल, हा अलीकडे त्यांच्या सततच्या चिंतनाचा विषय असे.

उदाहरणार्थ, एकीकडे सगळे जग एक बाजारपेठ बनावे म्हणून प्रयत्न चालू आहेत आणि त्याचवेळी आपल्या देशात देशापुरतीसुद्धा शेतीमालाची एक बाजारपेठ नाही ह्याची त्यांना खंत असे. इथला ऊस तिथल्या कारखान्याला देता येणार नाही आणि इथले धान्य त्या प्रांतात विकता येणार नाही अशा तरतुदी आजही आहेत. करआकारणी खूप क्लिष्ट असल्यामुळे, साठवणुकीची व वाहतुकीची सोय नीट नसल्याने शेतकरी बाजारपेठेचे स्वातंत्र्य उपभोगू शकतच नाही. शासनाने उभारलेल्या ह्या देशांतर्गत कृत्रिम भिंती पाडून टाकाव्यात आणि निदान आपल्या देशापुरती तरी एकच एक मोठी बाजारपेठ तयार करावी अशी त्यांची मागणी असे.

वायदे बाजार (Futures Market) आणि त्यानंतरचे डेरिव्हेटिव्ह्ज मार्केट (Derivatives Market) यांच्यात त्यांना रस होता व शेतकऱ्याच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने ह्या क्रांतिकारक घडामोडी आहेत असे त्यांचे मत होते. घरच्या घरी आपल्या संगणकासमोर बसून, जागतिक बाजारपेठेतील चढउतारांचा फायदा त्यामुळे आपला शेतकरी मिळवू शकतो. ना त्याला कृषी उत्पन्न बाजार समितीची गरज, ना कोणा अडत्याची. शेतकऱ्यांच्या पुढच्या पिढीसाठी हे एक वरदान ठरणार होते. त्यासाठी आवश्यक ते संगणकाचे व इंटरनेटचे कार्यक्षम जाळे देशभर शक्य तितक्या लौकर उभारायला हवे असे ते म्हणत.

'भीक नको, *हवे* घामाचे दाम' ही शेतकरी संघटनेची मूळ घोषणा. आता जोशींची नवी घोषणा होती, 'भीक नको, *घेऊ* घामाचे दाम'. 'हवे'ऐवजी 'घेऊ' शब्द आला. आता हमीभाव नको, स्वतःच्या प्रयत्नांने आम्ही हवे ते मिळवू. केवळ एका शब्दाच्या बदलातून जोशींची नवी भूमिका सुस्पष्ट होते.

भविष्याच्या अशा चिंतनातूनच त्यांनी इथेनॉलचा उत्साहाने पाठपुरावा केला. निपाणीच्या तंबाखू आंदोलनातील एक बिनीचे सैनिक व शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीचे एक सदस्य श्यामराव देसाई यांनी इथेनॉल प्रश्नाचा खोलात जाऊन अभ्यास केला होता. 'लढा इथेनॉलचा' नावाचे एक ६८ पानांचे पुस्तकही देसाई यांनी लिहिले आहे. ते त्यांनी शरद जोशींनाच अर्पण केले आहे. श्यामराव देसाई यांचे विचार जोशींना पटले होते. भारताचा मोठा खर्च हा पेट्रोलच्या आयातीचा आहे व ही आयात दिवसेंदिवस अधिकच वाढते आहे. ह्याला इथेनॉल हे एक चांगले उत्तर आहे असे ते म्हणत. उसापासून अल्कोहोल तयार करणे हे आता सर्रास होते. ह्या अल्कोहोलमधला पाण्याचा थोडासा उरलेला अंश काढून टाकला, की जे रसायन तयार होते ते म्हणजे इथेनॉल. जोशींनी त्याला 'शेततेल' असे नाव दिले होते.

उसाच्या रसापासून ७५% इथेनॉल तयार होते, साखर कारखान्यातील मळीपासून ४०% इथेनॉल तयार होते. सडकी फळे, भाज्या, अगदी पालापाचोळा आणि गवत यांपासूनही इथेनॉल तयार होऊ शकते. आपल्या देशात पेट्रोलमध्ये ५% इथेनॉल मिसळता येते; ब्राझिलसारख्या देशात हे प्रमाणे ४०% आहे. जेव्हा पेट्रोलची किंमत ५५ रुपये प्रतिलिटर होती तेव्हा इथेनॉलला सरकार २१ रुपये प्रतिलिटर देत होते. जोशी यांच्या मते सरकारने ३०

रुपये प्रतिलिटर द्यायला काहीच हरकत नव्हती. इथेनॉलमुळे उसाचा भावही लगेच दुप्पट होणार होता. पेट्रोलमध्ये किती टक्के इथेनॉल मिसळायचे हा निर्णयदेखील लोकांवर सोडा असे जोशी म्हणत. नाहीतरी भारतात पेट्रोलमध्ये केरोसीन मिसळणे सर्रास चालते, त्यापेक्षा इथेनॉल केव्हाही सुरक्षित. ह्या सगळ्यात काही अडचणी नक्कीच होत्या, पण प्रयत्नान्ती त्या सोडवता येणार होत्या.

शेततेलाचा प्रसार करण्यासाठी शेतकरी संघटनेने २ व ३ जुलै २००८ रोजी कोल्हापूर येथे 'इथेनॉल शिबिर' आयोजित केले होते. त्याच्या पुढल्याच दिवशी सांगली येथे भरलेल्या शेतकरी मेळाव्यातही त्यांनी या विषयावर भाषण केले होते. त्यावेळी ते म्हणाले होते,

> कारखान्यांना इथेनॉल करण्याची परवानगी मिळाली आणि त्या इथेनॉलला फक्त २१ रुपये ५० पैसे भाव मिळाला, तरीसुद्धा उसाला टनामागे १९०० रुपये भाव मिळू शकतो. तेव्हा आता उसासाठी ७००-८०० रुपये भावाकरिताचे भांडण सोडून द्या. वैधानिक किमान किमतीचा वादही सोडून द्या. हे वाद आता कालबाह्य झाले आहेत. शेतकऱ्यांना आता नवीन युगामध्ये घेऊन जायचे असेल, तर त्याकरिता वेगळ्या तऱ्हेची आंदोलने, वेगळ्या तऱ्हेची रणनीती वापरून, वेगळ्या तऱ्हेच्या मागण्या कराव्या लागतील.
>
> (*शेतकरी संघटक*, २१ जुलै २००८)

भविष्यात ऊसदराचा लढा हा इथेनॉलचा लढा व्हायला हवा. भारतात साखरेचा रोजचा खप माणशी चाळीस ग्रॅम आहे, तर पेट्रोल व डिझेलचा खप माणशी दोन लिटर आहे; म्हणजेच तो साखरेच्या खपाच्या ५० पट आहे. त्यामुळे इतक्या कमी खपाच्या साखरेच्या क्षेत्रात राहण्यापेक्षा इथेनॉलच्या क्षेत्रात आपण लक्ष द्यायला हवे; या शेततेलामुळे शेतकऱ्याच्या जीवनात भविष्यात खूप मोठी क्रांती होऊ शकेल, असे जोशी म्हणत.

उसाला अधिक भाव मिळू लागल्यानंतर शेतकऱ्याकडे अधिक पैसा आला व त्याचा उपयोग करून नाशिक जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर द्राक्षांकडे वळले. पुढे त्यातलेच काही वाइन तयार करू लागले. जोशींच्या मते अशा प्रकारे अधिकाधिक फायदा मिळू शकणाऱ्या उत्पादनाकडे शेतकऱ्याने वळणे हे एक चांगले चिन्ह होते. अशा मूल्यवर्धनाचा (व्हॅल्यू ॲडिशन) त्यांनी कायमच पुरस्कार केला.

आंदोलने करण्यापलीकडे आपल्या कामाला काही नवे आयाम द्यायचे असे जे प्रयत्न शरद जोशी अनेक वर्षे सातत्याने करत आले, त्याचे एक परिपक्व रूप म्हणजे ८, ९ व १० नोव्हेंबर २००८मध्ये ऐन दिवाळीत 'नारा उत्तम शेतीचा' अशी घोषणा देत औरंगाबाद येथे झालेले शेतकरी संघटनेचे अकरावे अधिवेशन. साठच्या दशकातील हरित क्रांतीचे असंख्य फायदे शेतीला झाले, पण त्यातून अनेक प्रश्नही निर्माण होत गेले. ही कुठल्याही विकासाची एक स्वाभाविक प्रक्रियाच असते. या अधिवेशनात शेतकऱ्यांनी उपयोग करून घ्याव्या अशा

तंत्रज्ञानातील अनेक नवीनतम गोष्टींचा जोशींनी ऊहापोह केला होता. जीएम बियाणांच्या पलीकडे जाणाऱ्या एरोपॉनिक्ससारख्या तंत्रज्ञानाची महती त्यांनी सांगितली होती. 'लक्ष्मी प्रकटते आहे आपल्या शेतात...' हे या अधिवेशनाचे घोषवाक्य होते.

ह्या बदलत्या परिस्थितीत एकीकडे राजकीय घडामोडी घडतच होत्या. जोशींचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी आसपास काय चालले आहे ते कळतच होते. त्याच सुमारास काही व्याख्यानांच्या निमित्ताने जोशी यांचा इंडियन लिबरल ग्रुपशी व त्याच्याशी संबंधित असलेल्या स्वतंत्र पक्षाशी संबंध आला होता. भारतातल्या इतर कुठल्याही राजकीय पक्षापेक्षा आपल्या विचारांशी सर्वांत जास्त जुळणारा हाच पक्ष आहे, हे त्यांना जाणवले. त्यावेळी जवळपास मृतप्राय झालेल्या त्या पक्षाचे पुनरुज्जीवन करायचे त्यांनी ठरवले. ही साधारण १९९३ सालची घटना. ह्या पक्षाची थोडी पार्श्वभूमी इथे सांगायला हवी.

ह्या पक्षाचे संस्थापक म्हणजे थोर स्वातंत्र्यसेनानी, स्वातंत्र्यपूर्व काळातील काँग्रेस पक्षाचे दक्षिण भारतातील सर्वांत मोठे नेते, स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल, प्रथितयश लेखक व विचारवंत, महात्मा गांधी यांचे व्याही आणि निकटचे सहकारी, भारतरत्न पुरस्काराने गौरवले गेलेले पहिले भारतीय अशा अनेक नात्यांनी इतिहासात नोंद झालेले चक्रवर्ती राजगोपालाचारी ऊर्फ राजाजी. गांधीजी त्यांना 'माझ्या विवेकबुद्धीचे राखणदार' ('my conscience-keeper') असे म्हणत. समाजवादाला आणि पंडित नेहरू पंतप्रधान म्हणून राबवत असलेल्या धोरणांना राजाजींनीच देशात सर्वप्रथम जाहीर विरोध केला. त्यासाठीच त्यांनी ४ जून १९५९ रोजी मद्रास येथे एका जाहीर सभेत स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. त्यावेळी त्यांचे वय ८१ होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.

नेहरूंची समाजवादी धोरणे भारताला अतिशय हानीकारक आहेत, परंतु त्यांच्या व्यक्तित्वाने भारून गेलेला देश त्यांना पुरेसा विरोधही करत नाहीये, परिणामतः देश दिवाळखोरीच्या दिशेने चालला आहे, चुकीच्या आणि गोंधळात पाडणाऱ्या कायद्यांमुळे आणि मोकाट सुटलेल्या नोकरशाहीमुळे सर्वसामान्य व्यक्तीला प्रामाणिकपणे व सन्मानाने जगणे अशक्य होऊन बसले आहे, देशातील गरिबी हटवायची असेल तर त्यासाठी उद्योजकतेला उत्तेजन व वाव मिळायला हवा व त्यासाठी मुक्त अर्थव्यवस्थेचा देशाने स्वीकार करावा, अशी राजाजींची भूमिका होती. लायसन्स-परमिट राज ही त्यांचीच प्रसिद्ध शब्दरचना. अनेकदृष्ट्या राजाजींची भूमिका भविष्यासाठी तंतोतंत खरी ठरली आहे.

राजाजींच्या देशातील उच्च स्थानामुळे पक्षस्थापनेनंतर मिनू मसानी, एन. जी. रंगा, कन्हैयालाल मुन्शी, जनरल करिअप्पा, एच. एम. पटेल, नारायण दांडेकर यांसारखे अनेक कर्तृत्ववान व प्रतिष्ठित भारतीय त्यांच्यासोबत होते. 'हा भांडवलदारांचा आणि संस्थानिकांचा पक्ष आहे' असा खोटा प्रचार त्यांच्याविरुद्ध काँग्रेसतर्फे सतत करण्यात आला. तरीही १९६७ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पहिल्या पदार्पणातच स्वतंत्र पक्षाने लोकसभेच्या ४५

जागा काबीज केल्या व तो देशातील सर्वांत मोठा विरोधी पक्ष बनला. या ४५ खासदारांपैकी आठ माजी संस्थानिक होते, तीन निवृत्त सनदी अधिकारी होते व तब्बल ३४ हे स्वतः ग्रामीण भागात राहणारे शेतकरी होते, हे नमूद करायला हवे. त्यांच्याविरुद्ध केला गेलेला प्रचार किती खोटा होता हे ह्यावरून सिद्ध होते.

दुर्दैवाने त्यानंतर पाचच वर्षांनी, २५ डिसेंबर १९७२ रोजी, वयाच्या ९४व्या वर्षी राजाजींचे निधन झाले. पुढे त्या पक्षाला उतरती कळा लागली व मिनू मसानी स्वतःही नव्वदीच्या घरात गेल्यावर आजारपणामुळे सक्रिय राहू शकले नाहीत व त्यामुळे तो पक्ष १९९०नंतर जवळजवळ नामशेषच झाला होता. त्या पक्षाची सद्यःस्थिती काय आहे याची चौकशी करायची जोशींनी आपले एक सहकारी आमदार मोरेश्वर टेमुर्डे यांना विनंती केली.

*Freedom First* या मिनू मसानी यांनी सुरू केलेल्या साप्ताहिकाचे त्यांच्या पश्चातचे संपादक एस. व्ही. राजू यांनी जोशींवरील एका लेखात म्हटले आहे,

> १९९३ साली, एका रविवारी सकाळी, शेतकरी संघटनेचे एक तत्कालीन आमदार व विधानसभेचे उपसभापती मोरेश्वर टेमुर्डे मुंबईत मला भेटायला आले. स्वतंत्र पक्ष अजून अस्तित्वात आहे का, याची ते चौकशी करत होते. 'आहे, पण अगदी नाममात्र' असे मी त्यांना सांगितले.
>
> त्यानंतर आठवड्याभराने मी स्वतःच पुढाकार घेऊन आंबेठाणला जाऊन शरद जोशींना भेटलो. तसा पूर्वी एकदा मी त्यांना भेटलो होतो. आमच्या लेस्ली सॉनी प्रोग्रॅम फॉर ट्रेनिंग इन डेमोक्रसी ह्या संस्थेच्या एका कार्यक्रमात. १५ मार्च १९८७ रोजी. त्यावेळच्या त्यांच्या भाषणाने मी खूप प्रभावित झालो होतो. त्यानंतरही मी त्यांच्याविषयी ऐकत असे, पण भेटीचा योग असा दरम्यानच्या काळात आला नव्हता. पुढे अर्थात आम्ही अनेकदा भेटलो आणि त्यांचे विचार मला अतिशय मोलाचे असे वाटले.
>
> आमच्या पक्षाची म्हणून जी मूल्ये आहेत ती सगळी त्यांच्यात आहेत. त्यांच्यात आणखी एक खासियत आहे. उदारमतवादी (लिबरल) नेत्यांमध्ये मास अपील हा गुण अत्यंत दुर्मिळ आहे. आमच्या पक्षात अनेक नामांकित भारतीय होते, पण ज्याला मास अपील आहे, असे कोणीच नव्हते. अगदी राजाजी किंवा मसानी हेदेखील बहुजनसमाजात तसे लोकप्रिय नव्हते. त्यांच्यापैकी कोणाच्याच सभांना लाखालाखांनी माणसे कधीच जमत नसत.
>
> (*चतुरंग* स्मरणिका, २०१२, पृष्ठ ८०-१)

२८ मे १९९४ रोजी मुंबईतील भारतीय विद्या भवनात झालेल्या एका कार्यकर्त्यांच्या सभेत जोशींनी स्वतंत्र भारत पक्षाविषयीची आपली भूमिका मांडताना केलेल्या भाषणात त्यांच्या स्वतःच्या एकूण जीवनविषयक चिंतनाचे उत्तम प्रतिबिंब उमटले आहे. 'शेतकरी

संघटक'च्या २१ मे २००३च्या अंकात त्या भाषणाच्या शब्दांकनाचे पुनर्मुद्रण करण्यात आले आहे. त्याचा संपादित सारांश असा :

**१. व्यक्तीची अनन्यसाधारणता**

अब्राहम लिंकनच्या काळापासून 'सर्व मानवप्राणी समान जन्माला आला आहे' या फ्रेंच राज्यक्रांतीतील तत्त्वाला मान्यता मिळाली. विषमतानिर्मूलनाच्या कार्यक्रमात 'माणसे समान आहेत म्हणजे, ती एकसारखीच आहेत' असे मानले गेले आणि माणसाकडे व्यक्ती म्हणून पाहण्याऐवजी समाजाच्या अनेक घटकांपैकी एक, हे स्थान त्याला मिळाले. व्यक्ती हरपली, गर्दीत दडपली गेली. समानतेचे तत्त्व फ्रेंच राज्यक्रांतीतील पहिल्या तत्त्वाचे शत्रू बनले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या फ्रेंच राज्यक्रांतीच्या तत्त्वत्रयीतील स्वातंत्र्य आणि समता यांच्या क्रमाची उलटापालट झाली, स्वातंत्र्यापेक्षा समता महत्त्वाची ठरली. ही ऐतिहासिक चूक आता सुधारली जाणार आहे. 'माणसे समान आहेत' हे खरे, पण त्याचा अर्थ ती एका मुशीतील, एकसारखी बाहुली आहेत असे नव्हे. एका माणसासारखा हुबेहूब दुसरा कोणी असतच नाही; अगदी जुळाभाऊसुद्धा नाही. प्रत्येक मनुष्य त्याच्या स्थलकालात अनन्यसाधारण असतो. प्रत्येक व्यक्ती अनन्यसाधारण असते व म्हणूनच मनुष्यप्राणी समान असतो. व्यक्तीची अनन्यसाधारणता हाच समानतेचा पाया आहे.

**२. माणसाचा शोध स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचा**

प्रत्येक अनन्यसाधारण व्यक्ती त्याच्या त्याच्या प्रकृतीप्रमाणे आपले जाणिवांचे आणि अनुभवांचे विश्व व्यापक करण्याच्या धडपडीत असते. आयुष्य विविधतेने संपन्न व्हावे, निवड करण्याची संधी क्षणाक्षणाला मिळावी, प्रत्येक निवडीच्या वेळी जास्तीत जास्त विकल्प हात जोडून हजर असावेत आणि ते विकल्पही विविध पठडीतील असावेत यासाठी मनुष्यप्राण्याची धडपड चालू असते. माणसाचा शोध स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावण्याचा आहे; सुखाचा नाही, शांतीचा नाही, समाधानाचा नाही, सत्याचा नाही, शिवाचा नाही, सुंदराचा नाही, संपत्तीचा नाही, सत्तेचा नाही, दुःखी जनांच्या सेवेचा नाही आणि मोक्षाचाही नाही.

**३. स्वार्थ हेच उद्दिष्ट**

कोणाला स्वार्थ पैशात दिसेल, कोणाला विद्येत, कोणाला शुद्ध आळशीपणे पडून राहण्यात. या व्यापक अर्थाने प्रत्येक व्यक्ती आपापला स्वार्थ साधण्यासाठी धडपडते. लक्षावधी, कोट्यवधी स्वार्थी व्यक्तींच्या धडपडीतून नकळत परमार्थ संपादिला जातो. शरीरातील एकेक पेशी तिच्या तिच्या स्वभावाप्रमाणे धडपडत असते. अशा धडपडीतूनच सबंध शरीराची एकात्मता बनते.

## ४. समाजव्यवस्थेचे फोल प्रयत्न

व्यक्ती कितीही अनन्यसाधारण असली तरी तिला समाजात राहावे लागते, वस्तूंची आणि सेवांची देवघेव करावी लागते. त्यासाठी विविध प्रकारची सत्तास्थाने आवश्यक असतात. पण सत्ता आली की भ्रष्टाचार आला. कारण, सत्ता निसर्गविपरीत आहे. सत्तेशिवाय चालत नाही आणि सत्तेने सगळे काही बिघडते हा मनुष्यजातीला पुरातन काळापासून पडलेला पेच आहे. भ्रष्टाचार आणि सत्तास्पर्धा टाळण्यासाठी इतिहासात अनेक प्रयोग झाले. माणसाची कामे जन्माच्या आधारानेच ठरावीत आणि त्यात प्रत्येकाने संतोष मानावा, अशी व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न झाला. समाजाला स्वतःच्या सामर्थ्याप्रमाणे देणारा आणि केवळ आपल्या गरजेपुरतेच घेणारा उदात्त समाजवादी माणूस तयार करण्याचेही प्रयत्न झाले. हातातील सत्ता-संपत्ती विश्वस्ताच्या निरिच्छेने हाताळली जावी अशी गांधीवादी नैतिकतेची कल्पना पुढे मांडण्यात आली. पण, हे सगळे प्रयत्न फसले. माणसाची गुणवत्ता सुधारण्याचे महात्म्यांनी सांगितलेले मार्ग निसर्गाला रुचत नाहीत असे दिसते. श्रेष्ठत्व आणि गुणवत्ता म्हणजे काही एक ठरावीक प्रकारची भूमिका हे निसर्गाला मान्य नाही. ठोकळेबाज पुरुषार्थाच्या कल्पना निसर्गाला मान्य नाहीत. सत्तेची दुष्टता संपवण्याचा एकच मार्ग म्हणजे सत्ताकेंद्रांची विविधता आणि त्यांच्यातील स्पर्धा. सत्ताकेंद्र म्हणजे काही फक्त राजधानीतील केंद्र नाही. प्रत्येक माणूस आपापल्या जागी काही प्रमाणात तरी सत्ता गाजवतच असतो. कोणाचीही सत्ता निरंकुश नको, त्याला स्पर्धा पाहिजे; तरच दुष्टता आटोक्यात राहण्याची काही आशा असते.

## ५. स्पर्धा

स्पर्धा हे जगातील चैतन्याचे रहस्य आहे. स्पर्धा हा प्रशिक्षणाचा सगळ्यात प्रभावी आराखडा आहे. स्पर्धेत उतरल्याने स्पर्धा करण्याची शक्ती वाढते; जसे, पाण्यात उतरल्यानेच पोहोता येते, मूल पडतापडताच चालायला शिकते.

## ६. जोपासना दुर्बलांची

या उलट संरक्षणाने, देणाऱ्याचे भले होत नाही, ना घेणाऱ्याचे. व्यक्तींच्या विविधतेत काही दुर्बल घटक असणारच. लहान मुले, मतिमंद, अपंग हेदेखील समाजाचे घटकच आहेत. स्पर्धेबरोबरच दुर्बलांच्या जोपासनेचे सूत्र महत्त्वाचे आहे; पण जोपासना अपंगत्व वाढवणारी, विकासाची इच्छा खुंटवणारी नको. हातपाय नसलेल्यांना जागतिक खेळांच्या स्पर्धेत भाग घेता येणार नाही, पण त्यांची-त्यांची स्वतंत्र खेळांची स्पर्धा असू शकते. अपंग आणि सुदृढ यांचे सगळ्यांचे मिळून एकत्रच खेळ झाले पाहिजेत असा कोणी आग्रह धरला, तर ते कोणाच्याच भल्याचे नाही; ना सुदृढांच्या ना अपंगांच्या.

## ७. व्यक्तिविकास हाच समाजविकास

व्यक्तीच्या विकासाच्या धडपडीतून समाजाचा, राष्ट्राचा विकास होतो. विकास निसर्गसिद्ध आहे, गरिबी निसर्गविपरीत आहे.

## ८. शासन – विकासातील आडकाठी

शासन जितके अधिक, तितका विकास कमी. फार फार तर कायदा, सुव्यवस्था इत्यादी गोष्टी शासनाने पाहाव्या. अर्थकारण, शिक्षण, अध्यात्म, न्याय, प्रसारमाध्यमे या क्षेत्रांतील सत्तास्थाने स्वतंत्र आणि सार्वभौम असली पाहिजेत.

सगळ्या जगात आज जे खुलेपणाचे वारे वाहत आहे, त्याचा अर्थ हा असा आहे. स्वराज्याची तहान सुराज्याने भागत नाही, असे लोकमान्य टिळक म्हणाले होते. वर्तमान घटकांचा निष्कर्ष असा, की खरे स्वराज्य आपोआपच सुराज्य असते. 'सुराज्य' नाही, तेथे 'स्वराज्य' नाही असे निःशंकपणे समजावे.

६ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूरच्या कस्तुरचंद पार्कवरील शेतकरी संघटनेच्या एका अधिवेशनात 'स्वतंत्र भारत पक्ष' स्थापन करून जोशींनी राजाजी यांच्या स्वतंत्र पक्षाचे पुनरुज्जीवन केले; शेतकरी संघटनेचे सर्व बळ त्या पक्षामागे उभे केले. स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जोशीच होते. मोरेश्वर टेमुर्डे, वामनराव चटप, नाशिकचे डॉ गिरिधर पाटील अशा अनेकांनी पक्षासाठी बरेच कष्ट घेतले.

सुप्रसिद्ध लेखिका व लघुपटनिर्मात्या अंजली कीर्तने याही स्वतंत्र भारत पक्षाशी काही वर्षे संबंधित होत्या. मार्च १९९७ मध्ये देवळाली येथील लेस्ली सॉनी संस्थेत झालेल्या एका दोन दिवसांच्या चर्चासत्रात त्यांची व जोशींची प्रथम भेट झाली. आयन रँडच्या व खुल्या अर्थव्यवस्थेच्या त्या प्रथमपासूनच पक्क्या समर्थक. त्यामुळे जोशींशी त्यांचे चांगले जुळले. पक्षाच्या त्या चिटणीस बनल्या. जोशी त्यांचा उल्लेख 'आमच्या पक्षाच्या रोझा लुक्झेम्बर्ग' म्हणून करत. पुढे पक्षाच्या मुंबई अधिवेशनात त्यांचा विशेष सहभाग होता, काही सभांत त्यांनी भाषणेही केली. जोशींच्याच सांगण्यावरून त्यांनी पक्षाच्या जाहीरनाम्याचा एक मसुदाही तयार केला होता. पुढे काही गैरसमज निर्माण झाले व त्यांनी वेगळी वाट स्वीकारली; पण जोशींबद्दलचा आदरभाव त्यांच्या मनात कायम आहे.

स्वतंत्र भारत पक्षापुढे जन्मापासूनच अनेक अडचणी होत्या. निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी प्रत्येक पक्षाला आपली ज्या मूल्यांशी बांधिलकी आहे असे शपथपत्र द्यावे लागते, त्या मूल्यांत समाजवाद हेही एक मूल्य म्हणून इंदिराजींच्या राजवटीत केलेल्या एका घटनादुरुस्तीमुळे समाविष्ट केले गेले आहे. जोशींचा अशा शपथेला विरोध होता, कारण समाजवाद हा त्यांना मान्यच नव्हता. त्यामुळे ह्या पक्षाला निवडणूक आयोगाची मान्यता मिळत नव्हती. त्यामुळे नंतर या स्वतंत्र भारत पक्षातर्फे ज्यांनी निवडणुका लढवल्या, त्यांनी त्या 'स्वतंत्र' उमेदवार म्हणून लढवल्या, त्यांना समान चिन्हाची सवलत नव्हती. त्यामुळे त्या उमेदवारांत मतदारांच्या दृष्टीने एक राजकीय पक्ष म्हणून अपेक्षित असलेली एकसंधता निर्माण झाली नाही. पक्षापुढे आर्थिक चणचण तर कायमच होती.

तरीही फेब्रुवारी १९९५मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत ह्या नव्या पक्षाने स्वतःचे २०२ उमेदवार उभे केले. या २०२पैकी फक्त दोन उमेदवार यावेळी आमदार म्हणून निवडून आले – राजुऱ्याहून वामनराव चटप व सटाण्याहून दिलीप बोरसे. यांपैकी चटप हे १९९०मधेही निवडून आले होते, आमदार बनण्याची त्यांची ही दुसरी वेळ.

१९९६मध्ये लोकसभा निवडणुका झाल्या. त्यावेळीही पक्षाने आपले उमेदवार चक्र-हलधर या चिन्हावर १७ मतदारसंघांतून उभे केले होते. ते सर्वच्या सर्व हरले.

त्यानंतर सप्टेंबर १९९९मध्ये लोकसभेच्या व महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. ह्यावेळी पक्षाने नव्याने स्थापन झालेल्या शरद पवार यांच्या 'राष्ट्रवादी काँग्रेस'शी हातमिळवणी केली होती. पक्षाचे लोकसभेसाठी दोन तर विधानसभेसाठी पाच उमेदवार उभे होते. ते सर्वच पराभूत झाले. 'नेता-तस्कर, गुंडा-अफसर, दाये-बाये, मध्यममार्गी, मंडल-मंदिर-मस्जिद वादी, देश के दुश्मन' अशी काहीशी लांबलचक घोषणा तयार केली होती. कार्यकर्त्यांनी प्रचार भरपूर केला; पण नेहमीप्रमाणे अपयशच पदरी पडले.

ह्या पक्षाचा जाहीरनामा तयार करण्यासाठी जोशींनी प्रचंड मेहनत घेतली. केवळ त्यासाठी सहकाऱ्यांची तीन-तीन दिवसांची शिबिरेही घेतली. पक्षाच्या जाहीरनाम्यासाठी एवढी मेहनत दुसऱ्या कुठल्या पक्षाने कधी घेतल्याचे ऐकिवात नाही. उद्याच्या भारतासाठी हा एक महत्त्वाचा दस्तावेज ठरेल; ह्या जाहीरनाम्यात मांडलेली धोरणे भारताने स्वीकारली, तर देशाचे भवितव्य उज्ज्वल असेल अशी त्यांची खात्री होती. आपल्या एकूण राजकीय व सामाजिक भूमिकेची मांडणी करण्यासाठी एक माध्यम म्हणून त्यांनी पक्षाच्या जाहीरनाम्याचा उपयोग केलेला दिसतो. ह्या जाहीरनाम्यात त्यांनी केवळ शेतकरी नव्हे तर संपूर्ण देश डोळ्यापुढे ठेवून आपली वैचारिक भूमिका मांडली आहे हे ह्या जाहीरनाम्याचे वैशिष्ट्य आहे.

दुर्दैवाने ह्या पक्षाला निवडणुकीत कधीच यश मिळाले नाही व यामुळे पक्षाच्या या किंवा अन्य निवडणुकांच्या वेळीही प्रकाशित करण्यात आलेल्या जाहीरनाम्यांकडे कधीच कोणी गांभीर्याने पाहिलेले नाही. पण हा जाहीरनामा म्हणजे भविष्यातील एका उत्कृष्ट राजकीय व्यवस्थेचा आराखडा आहे. गुन्हेगारांना कडक शासन करून गुंडगिरीचा बंदोबस्त करणे, कायद्यांच्या जंगलाची छाटणी करून आवश्यक तेवढेच कायदे ठेवणे, न्याययंत्रणेत व पोलीसयंत्रणेत सुधारणा करणे, अनावश्यक महामंडळे बरखास्त करणे, सरकारी नोकरांची संख्या कमी करणे, ग्रामपंचायतींना दंडाधिकार देणे, शेतकऱ्यांसाठी संपूर्ण कर्जमुक्ती करणे, शेतीसाठी निर्गम धोरण (Exit policy) आखणे, शेतीउत्पादनांवरील निर्बंध रद्द करणे, शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी कृषिपालकाची नियुक्ती करणे, शिकारबंदीऐवजी वन्यजीवांच्या संवर्धनाला प्रोत्साहन देणे, शेतीमालाचा देशव्यापी व संगणकीकृत वायदेबाजार सुरू करणे, दारूदुकानबंदी लागू करणे, शिक्षणसंस्थांना अनुदान देण्याऐवजी थेट विद्यार्थ्यांना कुपनद्वारे मदत करणे, शिक्षणसंस्थांना स्वायत्तता देणे, रोजगार हमी योजनेऐवजी स्वयंरोजगारासाठी भांडवल पुरवणे, सर्व आरक्षण व्यवस्थेची समीक्षा करणे, ऊर्जाक्षेत्रातील एकाधिकार संपवणे, खासगी प्रवासी वाहतुकीला मान्यता देणे, छोट्या राज्यांची निर्मिती करणे

वगैरे अनेक मुद्द्यांवर प्रचलित विचारांपेक्षा अगदी वेगळे विचार या जाहीरनाम्यात मांडले आहेत आणि त्यांचा अभ्यास व्हायला हवा.

राजकीयदृष्ट्या या पुनरुज्जीवित स्वतंत्र भारत पक्षाला फारसे भवितव्य असणार नाही हे जोशींना व सर्वच संबंधितांना ठाऊक होते. पक्षाच्या उमेदवारांना मिळालेल्या अत्यल्प मतांवरून मतदारांनीही त्यांना फारशा गांभीर्याने घेतले नाही हे स्पष्ट होते.

आपल्या पक्षाच्या भूमिकेबद्दल जोशींनी एके ठिकाणी म्हटले आहे,

''आमची वैचारिक भूमिका ही पॉलिटिकली इंपॉसिबल आहे हे आम्हांला माहीत आहे. 'मी तुला झुणका-भाकर केंद्र काढून देतो' किंवा 'मी तुम्हाला दोन रुपये किलो दराने तांदूळ देतो' असं म्हणणाऱ्याला आपल्याकडे मतं मिळतात. पण 'तुमच्यात हिंमत असेल आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर तुमच्या कष्टाचे उचित फळ तुम्हाला मिळेल अशी व्यवस्था आम्ही उभी करतो' असं म्हणणाऱ्याला मात्र आपल्याकडे मतं मिळत नाहीत. पण तरीही आमची भूमिका आम्ही मांडत राहिली पाहिजे. स्वतंत्र भारत पक्षाचं काम म्हणजे 'to keep the flag flying until what is politically impossible today, becomes economically inevitable.''

स्वतंत्र भारत पक्ष हादेखील जोशींनी राजकीय क्षेत्रात घेतलेला एका नव्या दिशेचाच शोध होता. हा फक्त शेतकऱ्यांचा पक्ष नव्हता, तो शेतकरी संघटनेचा विस्तारित भागही नव्हता; तो सगळ्या देशासाठीचा पक्ष होता. देशातील प्रचलित राजकारणात त्याचे फारसे महत्त्व नव्हते हे उघडच आहे; त्याचे महत्त्व या पक्षाच्या जाहीरनाम्याच्या निमित्ताने जोशींनी वैचारिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाच्या स्वरूपात आहे. भविष्यकाळात कदाचित एक दिवस असा येईल, जेव्हा हेच विचार समयोचित व अपरिहार्य ठरतील.

शेवटी एक नमूद करायला हवे. जोशी यांना राजाजी हे नेहमीच आदर्शवत वाटत. त्यांच्या आंबेठाण येथील घरातल्या बेडरूममध्ये मला फक्त एकच फोटो आढळला – राजाजी यांचा. ■

# १६

# साहित्य आणि विचार

शरद जोशींना लहानपणापासून वाचनाची प्रचंड आवड होती आणि त्यांची वैचरिक बैठक घडवण्यात वाचनाचे योगदान मोठे आहे.

नाशिकला रुंगठा हायस्कूलमध्ये असताना जोशींनी पुस्तकांच्या जगात प्रवेश केला व त्यानंतर तीन-चार वर्षांतच त्यावेळच्या उपलब्ध होऊ शकलेल्या बहुतेक प्रमुख मराठी पुस्तकांचा त्यांनी फडशा पाडला. बालसाहित्यात ते रमले नाहीत कारण वयाच्या मानाने त्यांची वैचारिक वाढ खूपच जास्त झालेली होती. साहजिकच त्यांचे वाचनही बरेच प्रौढ होते. खांडेकरांच्या ध्येयवादी नायकांचा पगडा कुमारवयात त्यांच्यावर बराच होता. समाजातील अन्याय आणि शोषण, सामान्य माणसांची होणारी फरफट, अनेक व्यक्तिगत अडचणींवर मात करून समाजसेवेसाठी स्वतःला झोकून देणारे ध्येयवादी तरुण वगैरे चित्रण या कादंबऱ्यांत असे. आपणही आयुष्यात समाजासाठी असेच काहीतरी केले पाहिजे असे त्यांना फार वाटे. शरच्चंद्र चटर्जींच्या अनुवादित कादंबऱ्याही त्यांनी लहानपणीच वाचल्या होत्या. त्यांतली *पाथेर दाबी* ही त्यांना विशेष आवडलेली कादंबरी. या कादंबरीचा नायक डॉ. सब्यसाची नावाचा एक क्रांतिकारक डॉक्टर आहे; जतींद्रनाथ ऊर्फ बाबा जतीन या बंगाली क्रांतिकारकाच्या जीवनावर बेतलेला. एका सशस्त्र बंडखोर संघटनेचा तो प्रमुख आहे. अत्यंत धाडसी, बुद्धिमान, प्रतिभावंत, अफाट ताकदीचे आणि बरेचसे गूढ असे हे व्यक्तिमत्त्व आहे. या डॉ. सब्यसाचीच्या जागी आपल्या भावविश्वात त्यांनी अनेकदा स्वतःला कल्पिले होते.

जे वाचले, ते जोशी वाचून सोडून देत नसत, तर त्यावर मनन करत; त्याचे संस्कार साहजिकच मनावर व म्हणून वागण्यावरही होत. त्या संस्कारांचा प्रभाव दर्शवणारा त्यांनीच सांगितलेला हा एक शाळकरी वयातला अनुभव –

ओगलेवाडीला असलेल्या त्यांच्या मामाकडे सुट्टीत ते खूपदा जात. तिकडे भटकणे, आसपासच्या मुलांबरोबर खेळणे, टिवल्याबावल्या करणे यांतच सुट्टी संपायची. एकदा सुट्टीत कोणी काय काय केले ह्याची चर्चा वर्गातल्या मुलांमध्ये सुरू होती. ते तेव्हा सातवी-आठवीत असतील. त्यावेळी आपण इतर सर्वांपेक्षा अगदी वेगळे असे काहीतरी केले असे दाखवण्याचा जोशींना फार मोह झाला व कल्पनेनेच एक चित्र त्यांनी मित्रांसमोर रंगवले. ओगलेवाडी काच कारखान्याच्या बाजूला मोठी झोपडपट्टी होती. बहुतेक औद्योगिक वसाहतींच्या आसपास असते तशी. कारखान्यात रोजंदारीवर काम करणारे किंवा एखाद्या कंत्राटदाराकडे काम करणारे

वगैरे अगदी गरीब कामगार किंवा अनेक बेकार माणसेही तिथे राहत. सुट्टीत आपण त्या झोपडपट्टीत जात असू असे भासवणारे वर्णन जोशींनी त्यावेळी इतर मुलांसमोर केले. उदाहरणार्थ, एक दारुडा नवरा आपल्या बिचाऱ्या बायकोला कसा बेदम मारत होता याचे वर्णन. तसे हे कुठल्याही झोपडपट्टीत नेहमीच दिसणारे दृश्य आहे व ते बघण्यासाठी सुट्टीत तिथे जाणे काही आवश्यक नव्हते. पण जोशींनी ते अगदी रंगवून रंगवून सांगितले; जणू त्यांच्या डोळ्यांसमोरच ते घडत होते! दुसरे एक दृश्य होते खूप भाजलेल्या व त्यामुळे ओगलेवाडीच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केलेल्या एका लहान मुलीचे. ती हॉस्पिटलमध्ये असताना एकसारखी वेदनेने किंचाळत होती; तिथले डॉक्टर तिला म्हणत होते, 'असं किंचाळायचं होतं, तर मग भाजून कशाला घेतलंस?' जणू काही तिने मुद्दाम स्वतःला भाजून घेतले होते! हे सर्व वर्णन काल्पनिकच होते; पण आपण इतर सर्वांपेक्षा किती वेगळे आहोत, अगदी वेगळे असे काहीतरी आपण या सुट्टीत कसे केले हे मित्रांना दाखवण्यासाठी जोशी ते सारे खुलवून सांगत होते. त्यांच्यातल्या लेखकीय प्रतिभेचे हे एक उदाहरण; त्यांच्या व्यक्तित्वाच्या एका अंगावर प्रकाश टाकणारेही.

'स्वतःसाठी जगलास तर मेलास, दुसऱ्यांसाठी जगलास तरच जगलास' अशा वाक्यांचा त्यांच्यावर बराच प्रभाव होता आणि तशा प्रकारच्या भूमिकेतून एक दांभिकपणा कसा आपोआप तयार होत जातो, ते स्पष्ट करण्यासाठी जोशींनी ओगलेवाडीचे उदाहरण दिले होते.

पुढे याच संदर्भात मॉमची एक गमतीदार छोटी गोष्ट ते नेहमी सांगायचे. दुसऱ्या कोणाचातरी उद्धार करायचा मोह किती जबरदस्त असतो हे दाखवण्यासाठी. एकदा येशू ख्रिस्ताला सैतान भेटतो. ख्रिस्ताने मोहाला बळी पडावे, यासाठी तो अनेक प्रलोभने दाखवतो. सोने-नाणे, पैसा-अडका, जमीन-जुमला इत्यादी. पण येशू कशालाच बळी पडत नाही. शेवटी सैतान त्याला म्हणतो, की पृथ्वीवर जाऊन सर्व मानवजातीच्या उद्धारासाठी बलिदान करण्याची संधी मी तुला आता देतो. आणि ते प्रलोभन काही ख्रिस्ताला टाळता येत नाही! 'परोपकार ही एक चटकन चढणारी दारू आहे,' असा जोशी यांनी यातून काढलेला निष्कर्ष आहे.

कॉलेजमध्ये गेल्यावर जोशींचे मराठी वाचन मंदावले; मराठी ललित साहित्याचे वाचन तर फारच कमी झाले. त्यांचा भर नंतरच्या काळात इंग्रजी वाचनावर होता. इंग्रजी ललितसाहित्यात पी. जी. वुडहाउस आणि सॉमरसेट मॉम हे त्यांचे आवडते लेखक. आयन रँड हिच्या कादंबऱ्यांचाही त्यांच्या विचारांवर खूप मोठा पगडा आहे. कॉलेजच्या ग्रंथालयात त्यांनी मुख्यतः आर्थिक विषयांवरील इंग्रजी पुस्तकांचे वाचन केले. या वाचनामुळे त्यांना अर्थशास्त्राची गोडी लागली आणि एकूण मानवी व्यवहारातील अर्थकारणाचे महत्त्वही लक्षात आले. त्यांच्या अर्थवादी विचारसरणीचे मूळ काही प्रमाणात तत्कालीन वाचनातही असू शकेल.

आपण केलेल्या वाचनाच्या प्रकाशात भोवतालच्या जगाचे निरीक्षण करायची त्यांची सवय होती. उदाहरणार्थ, डॉन क्विहोती (Don Quixote; क्विझोटी हाही उच्चार आपल्याकडे प्रचलित आहे) ही *सर्वान्तीस* (Cervantes) या जगप्रसिद्ध स्पॅनिश लेखकाची

प्रख्यात कादंबरी त्यांनी शाळेत असतानाच वाचली होती. १६०५ साली लिहिली गेलेली ही कादंबरी स्पॅनिश भाषेतील सर्वश्रेष्ठ आणि एकूणच जगातील सर्वश्रेष्ठ अशा दहा कादंबऱ्यांपैकी एक मानली जाते. डॉन क्विझोटी हा या कादंबरीतील नायक. अत्यंत जुलमी, पण काल्पनिक, अशा अतिप्रबळ शत्रूंशी हे पात्र सतत झगडत असते. आपण कोणीतरी महान शक्तिशाली आहोत आणि जगातल्या सर्वांवरील अन्याय आपण दूर करणार आहोत अशी त्याची स्वतःविषयी खात्री असते. जोशींची आई कधी कधी त्यांना डॉन क्विझोटी म्हणायची!

या वाचनाचा प्रत्यक्ष जीवनाशी संदर्भ जोशी कसा लावतात ते बघण्यासारखे आहे. एके ठिकाणी ते लिहितात,

> सर्व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये एक डॉन क्विझोटी लपलेला असतो, एक स्वप्नरंजन असते, प्रत्यक्षात न जमलेले भव्यदिव्य असे काहीतरी आपण करत असतो अशी छुपी आत्मवंचना असते. वेळोवेळी असे अनेक डॉन क्विझोटी माझ्या स्वतःच्या मनामध्येही निर्माण झालेले आहेत. कधी कधी मी स्वतःला सॉमरसेट मॉमच्या *The Moon and Six Pence* या कादंबरीतील स्टॉकब्रोकर नायकाच्या जागी कल्पिलेले आहे, तर कधी कधी मी स्वतःला एखाद्या आध्यात्मिक प्रेषिताच्या जागी कल्पिलेले आहे. या सगळ्या अनुभवांतून मी स्वतः गेलेलो असल्याकारणाने स्वयंस्फूर्त क्षेत्रातील कार्यकर्त्यांमधील डॉन क्विझोटी मला लगेच ओळखू येतो.
>
> (*बस करा हे समाजसेवेचे ढोंग!*, अंतर्नाद, दिवाळी १९९९)

आपण केलेल्या वाचनाच्या प्रकाशात भोवतालच्या वास्तवाचे अधिक खोलात जाऊन विश्लेषण करायची ही विशिष्ट दृष्टी हे त्यांच्या प्रगल्भ अशा विचारशक्तीचे द्योतक आहे.

ज्याला वाचनाची आवड आहे आणि ज्याच्यापाशी थोडेफार भाषाप्रभुत्व आहे, त्याला केव्हा ना केव्हा स्वतःही लिहावेसे वाटणे तसे स्वाभाविक असते. जोशींनीही कुमारवयातच कथालेखन करायला थोडीफार सुरुवात केली होती व त्यांच्या एका कथेबद्दल पहिल्या प्रकरणात लिहिलेच आहे. पण पुढील आयुष्यात ते मराठी साहित्यापासून काहीसे दूर गेले. विशेषतः शेतकरी आंदोलन सुरू झाल्यावर. म्हणजे एकीकडे त्यांनी साहित्यावर खूप प्रेमही केले व दुसरीकडे त्यांनी वेळोवेळी साहित्य हे तसे अनुपयुक्त आहे, असेही म्हटले आहे.

जोशींनी आपले विचार एखाद्या पुस्तकाच्या स्वरूपात मांडले पाहिजेत असा अरविंद वामन कुळकर्णी व सुरेशचंद्र म्हात्रे या दोघांचा खूप आग्रह होता. स्वतः जोशी मात्र अशा लेखनाबद्दल उदासीन होते. शेतकरी आंदोलनाला जेव्हा सुरुवात झाली त्यावेळी जोशींचा भर त्यांच्या भाषणांवरच होता. 'वारकरी' होते; पण केवळ संघटनेच्या बातम्या इतरांना कळाव्यात म्हणून. 'शेतकरीवर्ग हा काही वाचणारा वर्ग नाही व त्यामुळे आपल्या विचारांचा प्रसार लेखनातून फारसा होणार नाही, भाषणे हेच खरे आपले हत्यार' असे त्यांना वाटत असे.

परुळकरांच्या 'योद्धा शेतकरी'मुळे आंदोलनाचा खूप प्रसार झाला हे त्यांनी नंतर मान्य केले असले, तरी मुळात ती लेखमाला लिहायची व नंतर त्याचे पुस्तक काढायची कल्पना 'माणूस'चे संपादक श्री. ग. माजगावकर व स्वतः लेखक विजय परुळकर यांचीच होती; त्यात जोशींनी त्यांना फार काही उत्तेजन दिले अशातला भाग नव्हता.

*शेतकरी संघटना विचार आणि कार्यपद्धती* हे सुरेशचंद्र म्हात्रे यांनी शब्दांकित केलेले पुस्तक अतिशय महत्त्वाचे ठरले हे खरे, पण त्या पुस्तकाचे कामही प्रशिक्षण शिबिराच्या टेप्स नकलून झाल्यानंतर मागेच पडले होते. म्हात्रेंनी खूप कष्ट घेऊन ते शब्दांकन पूर्ण केले. पण अशा स्वरूपाच्या शब्दांकनामध्ये नेमकेपणाचा व अचूकतेचा स्वाभाविक अभाव असतो. यासाठी म्हात्रे तयार झालेला मजकूर जोशींकडे तपासण्यासाठी पाठवत, पण कामाच्या रगाड्यात बरेच दिवस त्यासाठी जोशींना वेळ मिळत नसे व त्यामुळे पुस्तकाचे काम अडून राहायचे. खरे सांगायचे तर हे पुस्तक प्रकाशित करण्याबद्दल जोशींचे मन द्विधा होते. ''माझे विचार अजून पक्के झालेले नाहीत. अशातच ते छापील स्वरूपात प्रकाशित झाले, तर नंतर मला ते बदलता येणार नाहीत.'' असे ते म्हणत. पण म्हात्रेंनी पाठपुरावा करणे थांबवले नाही.

शेवटी एकदाचे २३ नोव्हेंबर १९८२ रोजी पुस्तक प्रकाशित झाले. तरीही पहिल्या आवृत्तीवर लेखक म्हणून 'शरद जोशी' असे नाव छापलेले नाही; 'शब्दांकन : सुरेशचंद्र म्हात्रे' एवढेच छापलेले आहे! जोशी या पुस्तकाविषयी शेवटपर्यंत किती साशंक होते हे यावरून दिसते. 'शेतकरी आंदोलनात बळी पडलेल्या हुतात्म्यांना' हे पुस्तक अर्पण केलेले आहे. वर्धा व अंबाजोगाई येथील दोन्ही प्रशिक्षण शिबिरांतील विचारांचे शब्दरूप असलेल्या ह्या पुस्तकात एकूण २१४ पाने (अंबाजोगाई १७४ + वर्धा ४०) असून त्याची किंमत अवघी दहा रुपये, म्हणजे त्या काळाचा विचार करताही खूपच कमी आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांमधेही त्याचा प्रसार व्हावा ही भूमिका त्यामागे होती. ह्या प्रकाशनाद्वारे शेतकरी संघटनेचा प्रकाशन विभाग सुरू झाला व पुढे अनेक वर्षे म्हात्रे यांनीच त्या विभागाची धुरा वाहिली.

कांदा आंदोलनाच्या वेळी १९७९ साली सुरू केलेले *वारकरी* हा जोशींच्या नियतकालिकांच्या जगातील प्रवेश. एक-दीड वर्षातच आंदोलनाच्या वाढत्या व्यापामुळे ते चालवणे अशक्य झाले. त्याच्याविषयीही पूर्वी विस्ताराने लिहिलेच आहे.

नंतरचे पाऊल म्हणजे *शेतकरी संघटक.* हे पाक्षिक संघटनेचे मुखपत्र म्हणून ६ एप्रिल १९८३ रोजी सुरू झाले. सर्वसामान्य मासिकाच्या आकाराची, साध्या न्यूजप्रिंटवर लेटरप्रेसने छापलेली, घडी घातलेली, एकरंगी, चार किंवा जास्तीत जास्त आठ पाने त्यात असत. सलग चार वर्षे ते प्रकाशित झाल्यानंतर ते स्थगित करून ६ एप्रिल १९८७ पासून *आठवड्याचा ग्यानबा* हे बहुरंगी मुखपृष्ठ व अधिक चटपटीत रूप असलेले, ऑफसेटने छापलेले पाक्षिक सुरू केले गेले. ते नाशिकहून प्रकाशित होत होते. संपादक होते मुरलीधर खैरनार व प्रकाशक मिलिंद मुरुगकर. पण तेही तसे अल्पजीवी ठरले व आधीच्या स्वरूपातील *शेतकरी संघटक* पुन्हा सुरू केले गेले; ते बरीच वर्षे चालले, पण पुढे काळाच्या ओघात तेही बंद पडले.

सुरुवातीला *वारकरी,* नंतर *आठवड्याचा ग्यानबा* व नंतरची सर्वाधिक वर्षे *शेतकरी*

*संघटक* ह्या संघटनेच्या मुखपत्रांतून जोशींनी आपले बहुतेक सर्व लेखन केले. मुख्यतः ते चळवळीशी संबंधित अशा विषयांवर होते; त्या लेखनातून ते आपल्या विखुरलेल्या कार्यकर्त्यांना भेटत असत, आपली मते त्यांच्यापर्यंत पोचवत असत.

शेतकरी संघटनेचा पुस्तक प्रकाशन विभाग असायला हवा, हादेखील कुळकर्णी-म्हात्रे या द्वयीचाच आग्रह होता व त्यांनीच तो विभाग सुरूही केला. *शेतकऱ्याचा असूड – शतकाचा मुजरा, चांदवडची शिदोरी : स्त्रियांचा प्रश्न, प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश* (दोन भागांत), *शेतकऱ्यांचा राजा शिवाजी, जातीयवादाचा भस्मासुर, खुल्या अर्थव्यवस्थेकडे खुल्या मनाने, स्वातंत्र्य का नासले?* ही त्यांची जुनी पुस्तकेदेखील वाचनीय आहेत. त्यांतली काही बरीच छोटी आहेत, पण जोशींची वैचारिक मांडणी समजून घेण्याच्या दृष्टीने तीही महत्त्वाची वाटतात. ही पुस्तके म्हणजेही बव्हंशी पूर्वप्रकाशित लेखांचे संकलनच आहे.

'साहित्यिक व्हावे असे एकेकाळी आपल्याला वाटत होते,' असे त्यांनी एका भाषणात म्हटले होते. संस्कृत व मराठी साहित्याची त्यांची जाण सूक्ष्म होती; पण एकूण साहित्यविश्वाविषयी त्यांचे मत तसे कटूच होते.

पहिली गोष्ट म्हणजे, ज्या शेतकऱ्यांबरोबर काम करण्यात त्यांनी स्वतःला पूर्णतः झोकून दिले त्या शेतकऱ्यांच्या करुण जीवनाचे खरेखुरे चित्रण त्यांना मराठी साहित्यात कुठेच आढळेना. ते लिहितात,

> दरवर्षी पावसाळा यायच्या आधी बी-बियाण्याची जमवाजमव, खर्चीसाठी सावकाराची मिनतवारी, सोसायटीतील कारस्थाने आणि भानगडी, पाऊस येतो किंवा नाही याची चिंता, आल्याचा आनंद व येत नसला तर पोटात उठणारा भीतीचा गोळा, पिकावर येणाऱ्या तणांच्या आणि रोगांच्या धाडी, पीक उभे राहिल्यानंतर होणारा आनंद व बाजारात गेल्यावरची शोकांतिका, वाढते कर्ज, पुढाऱ्यांची मग्रुरी, आग लागलेल्या घरातून निसटताना व्हावी तशी गावच्या आयुष्यातून सुटण्याची ज्याची-त्याची स्वतःपुरती धडपड या किड्यांसारख्या जीवनात लिहिण्यासारखी प्रचंड साधनसामग्री आहे. पण या सत्तर टक्के लोकांच्या आयुष्याचे प्रतिबिंब साहित्यात कधीच पडले नाही.
>
> खुरपताना, गवत कापताना, पिके काढताना, जात्यावर शेतकरी स्त्रियांनी उत्स्फूर्तपणे म्हटलेली गाणी माळरानातच विरून गेली. मोटेवर, नांगरावर बैलांच्या साक्षीने शेतकऱ्यांनी ढाळलेले दुःखाचे कढ तापलेल्या जमिनीतच जिरून गेले.
>
> शेतकऱ्याची पिके लुटून नेलेल्या दरोडेखोर लुटारूंच्या तळावर गायली गेलेली उत्तान, उन्मत्त गाणी साहित्यात आली. मोठ्या लुटारूंनी दरबार भरवायला सुरुवात केल्यावर त्यांचे कौतुक करणाऱ्या भाट-शाहिरांची प्रतिभा गाजली. त्यांचे मनोरंजन

करणाऱ्या कलावंतिणींच्या लावण्यांचा पूर आला, संगीताच्या मैफिली झडू लागल्या. पिके लुटून पेठा, शहरे वसवणाऱ्या व्यापाऱ्यांच्या, कारकुनांच्या समाजाचे साहित्य तयार झाले. साहित्य असो, संगीत असो, कला असो, त्यात शेतकऱ्याचे असे काहीच नाही.

(*आम्ही लटिके ना बोलू,* प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश, भाग दोन, पृष्ठ १०६, २६ जुलै १९८५)

साहित्याप्रमाणेच प्रत्यक्ष साहित्यिकांविषयीदेखील जोशींचे मत कटूच असल्याचे जाणवते. उपरोक्त लेखातच त्यांनी लिहिले आहे,

शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरे शहरात रमली. त्यात लिहिण्याचे कसब असणाऱ्यांनी गावाविषयी लिहिले; पण शहराला काय पटेल, काय आवडेल याचा विचार करीत लिहिले. 'हरामखोरांनो, तुम्ही माझे गाव लुटले. या पापाचा तुम्हाला झाडा द्यावा लागेल.' असा टाहो कोणी फोडला नाही. उलट आपल्या ग्रामीण जन्मामुळे साहित्यात आपल्याला काही राखीव जागा असावी असा आक्रोश करणारी एक साहित्य आघाडी उभी झाली. शेतकऱ्यांच्या दुःखाचे भांडवल करून त्यावर साहित्यात स्थानाचा जोगवा मंडळी मागू लागली.

याच संदर्भात पुढे काही वर्षांनी जोशींनी लिहिले आहे,

डाव्यांच्या चळवळीमध्ये, त्यांच्यामागे शेपाचशे माणसेसुद्धा नसली तरी, त्यांची कवने गाणाऱ्यांचा सुंदर ताफा त्यांच्यापुढे असतो. ज्यांच्या आंदोलनात आंदोलकांची संख्या कमी, पोलिसांची जास्त, त्या आंदोलनात प्रतिभेचा हा झरा खळाळून वाहताना दिसतो आणि प्रचंड आंदोलने करणाऱ्या शेतकरी संघटनेत, काही अपवाद वगळल्यास साहित्य, कला, संगीत, शाहिरी, पोवाडे अशा मार्गांनी प्रतिभा दाखविणारे निपजले नाहीत. असे का झाले?

एकदा एका कार्यकर्त्याने नानासाहेब गोऱ्यांना प्रश्न विचारला, 'शेतकरी संघटना ही अशी रुक्ष, काव्य नसलेली का झाली?' ते म्हणाले, 'शरद जोशी हा माणूसच गद्य आहे. त्यांनी जो अर्थशास्त्रीय विषय मांडला, तोच रुक्ष आणि गद्य आहे. आंदोलनाचे साहित्य हे कधी अशा गद्य भाषेत तयार होत नाही. आंदोलनात काहीतरी डोक्यात मस्ती चढवणारी, झिंग आणणारी गोष्ट असावी लागते. रामाच्या देवळाचं नाव घ्यावं लागतं, नसलेल्या गोष्टी तयार कराव्या लागतात, सामान्य माणसांचेसुद्धा पुतळे जागोजागी उभे करून त्यांना देवता बनवावं लागतं. समाजाच्या हितसंबंधांबरोबरच काही एक पागलपणा केल्याखेरीज आजकाल खरं आंदोलन बनतच नाही. आणि शरद जोशींना पागलपणा दाखवता येत नाही.'

एकेक दिवस, बी पेरल्यानंतर हाती पीक येईपर्यंत, किंवा न येईपर्यंत, सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतकऱ्यांच्या मनाला ज्या सहस्र इंगळ्या डसतात त्याचे चित्र साहित्यात मला कुठेही दिसत नाही. मी शेतकरी जीवनाचे उदात्तीकरण करण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. काय ते जीवन, काय ती हिरवी हिरवी झाडे, काय ती स्वच्छ हवा, कसे झुळझुळ पाणी; शेतीवर असणे म्हणजे परमेश्वराच्या सान्निध्यात असणे! असे म्हणण्याचा वाह्यातपणा मी केला नाही. शेती ही एक जीवनपद्धती आहे; इतिहासाच्या एका ठरावीक काळामध्ये तिचे महत्त्व होते; पण पुढे जितकी माणसे शेतीतून निघून बिगरशेती व्यवसायाकडे वळतील, तितका त्या समाजाचा विकास आहे.

(*समाजसेवेची दुकानदारी नको!* अंतर्नाद, फेब्रुवारी २००७)

जोशींच्या मते, दूरचित्रवाणीवर असंख्य मालिका अहोरात्र चालू असतात; पण त्यात शेतकरी जीवनाचे प्रामाणिक चित्रण कुठेच दिसत नाही. पाच टक्क्यांच्या आयुष्याच्या चित्रणाने दूरचित्रवाणीचा पडदा नव्याण्णव टक्के भरलेला आहे. पण याची कोणालाच खंत वाटत नाही; खुद्द शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांनाही तशी खंत वाटत नाही. गावागावात तेही सगळे तेच रंगीबेरंगी स्वप्नरंजन जिभल्या चाटत बघत राहतात! ह्या भयानक विसंगतीविरुद्ध कोणीही बोलताना दिसत नाही. शहरी लोकांना ज्याप्रकारचे ग्रामीण जीवनाचे खोटे-खोटे चित्रण आवडते, तशाच प्रकारचे ग्रामीण जीवन हे तथाकथित ग्रामीण साहित्यिक रंगवत बसतात; केवळ स्वतःसाठी नाव मिळवण्यासाठी. शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष वेदनेशी त्यांना काहीच देणेघेणे नसते. साहित्य आणि साहित्यिक यांच्यापासून जोशी दूर होत गेले ते अशा मतांमुळे.

*मी 'साहित्यिक' नाही* हे जवळाबाजार येथे १९९५ साली भरलेल्या चौथ्या परभणी जिल्हा मराठी साहित्य संमेलनातील त्यांचे भाषण (शे.स. २१.१०.१९९६) सर्व मराठी साहित्यिकांनी अभ्यासावे असे आहे. पण एरव्ही साहित्य संमेलनाबद्दल भरपूर चर्चा करणाऱ्या वृत्तपत्रांनी व एकूणच साहित्यविश्वाने ह्या भाषणाकडे पूर्ण दुर्लक्ष केले. *महाविद्यालयातील विद्यार्थ्यास पत्र* ह्या त्यांच्या एका पत्ररूपी लेखाबद्दल दुसऱ्या प्रकरणात लिहिले आहे. गावातून शहरात शिकायला आलेल्या असंख्य युवकांना त्या काळात या पत्राने भारावून टाकले होते. जोशींची लेखणी किती विलक्षण प्रभाव टाकू शकत असे याचे हा लेख म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे.

सुप्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव यांचा जोशींशी चांगला संबंध आला होता. फेब्रुवारी १९८४मध्ये परभणीला झालेल्या शेतकरी संघटनेच्या दुसऱ्या अधिवेशनाला भालेराव गेले होते. तेथील केवळ भाषणेच त्यांना आवडली असे नव्हते; त्यांच्या साहित्यिक नजरेने इतरही अनेक आगळ्या गोष्टी टिपल्या होत्या. उदाहरणार्थ, एके ठिकाणी ते लिहितात,

शेतकरी संघटनेने वेळोवेळी काढलेली पोस्टर्स काळजाचा ठाव घेणारी होती.

> म्हाताऱ्या, दाढी वाढवलेल्या, रापलेल्या, पण तरीही करारी अशा शेतकऱ्याचे चेहरे पाहताच ती पोस्टर्स आपली वाटत. त्यांच्या मांडणीत कल्पकता असे. प्रथमच उभ्या राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या चळवळीची असलेली ही कलात्मक आणि काव्यात्मक बाजू स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकते.
>
> (*शरद जोशी, शेतकरी संघटना आणि माझी कविता,* अंतर्नाद, ऑक्टोबर २००९)

नेत्याची प्रतिभा ही प्रत्येक वेळी फक्त त्याच्या भाषणातून आणि लेखातूनच व्यक्त होते असे नाही. त्याने प्रचारासाठी जी साधने निवडली असतात, त्यांतूनही ही प्रतिभा दिसते. बळीराज्य, सीताशेती, लक्ष्मीमुक्ती वगैरे पारंपरिक शब्दांचा जोशींनी केलेला वापर खूप कल्पक आहे.

जालना येथील शेतकरी संघटनेच्या अधिवेशनात इंद्रजित भालेराव यांनी आपली 'शिक बाबा शिक, लढायला शिक, कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' ही गाजलेली कविता लाखाहून अधिक शेतकऱ्यांसमोर म्हटली होती. तो प्रसंग सांगताना उपरोक्त लेखात भालेराव लिहितात,

> टाळ्यांच्या रपरप आवाजात मी कविता म्हणत होतो. लोक इतक्या तालात टाळ्या कसे काय वाजवताहेत, म्हणून सहज मागे फिरून बघितलं, तर जोशीसाहेब स्वतः एखाद्या संगीतकाराच्या आविर्भावात तालाचं संचलन करत होते आणि त्या तालावर लोक टाळ्या वाजवत होते. मला माझं आयुष्यच धन्य झाल्यासारखं वाटलं. कविता म्हणून झाल्यावर लोकांनी प्रचंड जल्लोष केला. भारावलेल्या अवस्थेत मी माझ्या जागेवर येऊन बसलो. सभेत चैतन्याचा संचार झाला होता.

मराठी साहित्यविश्वाने जोशींकडे केलेल्या दुर्लक्षाच्या पार्श्वभूमीवर एका मोठ्या बंगाली कादंबरीकाराने त्यांचा केलेला एक उल्लेख विशेष लक्षणीय आहे. उपरोक्त लेखातच भालेराव त्याविषयी लिहितात,

> देबेश रॉय हे फार मोठे बंगाली कादंबरीकार आहेत. बंगालच्या ग्रामीण भागाचं आणि कृषी जीवनाचं चित्रण करणाऱ्या हजारो पानांच्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. 'तिस्ता पारेर वृत्तान्त' ही त्यांची कादंबरी माझ्या वाचनात आलेली आहे. 'तिस्तेकाठचा वृत्तान्त' असं त्या कादंबरीचं मराठी भाषांतर नगरच्या विलास गीते यांनी केलेलं आहे. तिला साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळालेला आहे. साहित्य अकादमीनेच ती मराठीमध्ये प्रकाशित केलेली आहे. आठशे पानांच्या या कादंबरीत तिस्ता नदीच्या काठावर जीवन जगणाऱ्या शेतकऱ्यांचं भेदक चित्रण आलेलं आहे. शेवटी या कादंबरीत देबेश रॉय यांनी लिहिलं आहे, 'शेतकऱ्यांच्या या समस्येवर बंगाल सरकारनं काही उपाय शोधून काढला नाही, तर हे शेतकरी महाराष्ट्रातल्या

> शरद जोशी यांच्या शेतकरी चळवळीच्या मार्गाने जातील.' देबेश रॉय यांच्या लेखनातलं हे द्रष्टेपण मराठीतल्या एकाही कादंबरीकाराने आपल्या लेखनातून अजून तरी दाखवलेलं नाही.

इंद्रजित भालेराव, शेषराव मोहिते, अरविंद वामन कुळकर्णी व श्रीकांत उमरीकर यांनी जोशींच्या साहित्याबद्दल लिहिलेले थोडेफार माझ्या वाचनात आले आहे, पण अन्य कोणी प्रस्थापित समीक्षकांनी त्यांची लेखक म्हणून घेतलेली दखल माझ्यातरी वाचनात आलेली नाही. 'इतकी पुस्तके लिहूनही मला कोणी साहित्यिक मानत नाही' ही खंत जोशींनी एका जाहीर भाषणात व्यक्तही केली होती. ते लिहितात,

> मी आत्तापर्यंत अठरा-वीस पुस्तके लिहिली आहेत. मराठीबरोबर इंग्रजीतही लिहिली आहेत. माझ्या काही पुस्तकांची इतर भाषांतही भाषांतरे झाली आहेत. आमच्या शेतकरी संघटनेच्या कामामध्ये अक्षरशः लाखो शेतकरी रस्त्यावर उतरतात. शेतकरी आंदोलनात जितकी माणसे तुरुंगात गेली, तितकी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यआंदोलनातही गेली नव्हती. असे असूनही मराठी साहित्यामध्ये शेतकरी आंदोलनाला काहीही स्थान मिळालेले नाही.
>
> (*समाजसेवेची दुकानदारी नको!*, अंतर्नाद, फेब्रुवारी २००७)

चळवळ ऐन भरात असताना जोशींनी संघटनेच्या मुखपत्रापलीकडे फारसे कुठे लेखन केलेच नाही. पुढे उतारवयात त्यांनी लेखनाकडे फार नाही, पण निदान पूर्वीपेक्षा जरा अधिक गांभीर्याने बघायला सुरुवात केली. पण तेव्हाही कुठल्या संपादकाने आपणहून मागितले, तरच लिहायचे अशी त्यांची वृत्ती होती.

लेखनाला बऱ्याच उशिरा, उमेदीचे वय ओसरल्यावर सुरुवात केल्यामुळेही हे झाले असेल. स्वतःहून काही लिहिणे, त्यासाठी चांगला प्रकाशक शोधणे, आपल्या पुस्तकांची विस्तृत परीक्षणे योग्य त्या ठिकाणी छापून आणणे, त्यांना पुरस्कार मिळावेत व ते लेखन चांगल्या वाचकांपर्यंत पोचावे म्हणून स्वतः काही प्रयत्न करणे वगैरे गोष्टी दुर्दैवाने आपल्याकडे स्वतः लेखकाला कराव्या लागतात. विशिष्ट वयानंतर स्वतःला 'प्रोजेक्ट' करण्यासाठी हे सारे करणे कोणालाही अवघडच जाणार. शिवाय तसले काही करणे हा जोशींचा पिंडच नव्हता. संपादकांच्या मागणीनुसार थोडेफार इंग्रजी वृत्तपत्रीय लेखनदेखील त्यांनी केले, पण अगदी कमी. चेन्नई येथून प्रकाशित होणाऱ्या 'हिंदू'च्या *बिझिनेस लाइन* ह्या आर्थिक वृत्तपत्रात त्यांनी पंधरा दिवसांनी एक असे सदरलेखन काही काळ केले. त्याचे *Down to Earth* हे संकलन दिल्लीच्या एका प्रकाशनसंस्थेने प्रकाशित केले आहे; पण त्याचीही फारशी दाखल घेतली गेलेली नाही. *लोकसत्ता* व *लोकमत* ह्या मराठी वृत्तपत्रांतून त्यांनी अधूनमधून सदरलेखन केले; पण एकूण मराठी किंवा इंग्रजी साहित्यक्षेत्रात त्यांचा लेखक म्हणून फारसा कुठे उल्लेख झालेला नाही.

मराठी साहित्यातील कोणती पुस्तके त्यांना विशेष आवडली होती किंवा कोणते लेखक त्यांना महत्त्वाचे वाटतात, ह्याविषयी जोशींनी कुठे लिहिल्याचे माझ्यातरी वाचनात आलेले नाही. कुठल्या लेखकाची त्यांनी कधी भलावण केल्याचेही मी ऐकलेले नाही. भालेराव किंवा आणखी एखाददुसऱ्यांचे त्यांनी केलेले कौतुक हा अपवाद म्हणता येईल. इतर कुठल्या मराठी पुस्तकांविषयी किंवा लेखकांविषयी त्यांनी कधीच का लिहिले नाही हा एक प्रश्नच आहे. एकूणच मराठी साहित्य व साहित्याविषयी त्यांचे मत फारसे चांगले नसावे.

याउलट इंग्रजी साहित्याविषयी त्यांनी बरेच लिहिले आहे. सॉमरसेट मॉम हा त्यांचा अतिशय आवडता लेखक. त्याचा तुच्छतावाद (सिनिसिझम) त्यांच्या स्वतःच्या वृत्तीशी मिळताजुळता होता, हे त्याचे एक कारण असू शकेल. त्याच्या अनेक कथांचे संदर्भ त्यांच्या लेखनातून आढळतात. ‘ज्याला कोणाला लेखक बनायचे आहे, त्याने मॉमच्या निदान सहातरी कथा आधी वाचाव्यात अशी मी शिफारस करेन’ असे त्यांनी लिहिले आहे. मॉमच्या साहित्यातील संदर्भ जोशींच्या भाषणांत आणि लेखनात अनेकदा आले आहेत. ‘त्याचा सिनिसिझम (तुच्छतावाद) मला खूप आवडतो,’ असेही ते म्हणाले होते. इतरांवरील जोशींच्या टीकेतही कधीकधी हा सिनिसिझम जाणवतो.

पण मॉमचा तो सुप्रसिद्ध सिनिसिझम आपल्याला लोकप्रियता मिळाली, पण आपल्याला समीक्षकांनी कधीच श्रेष्ठ मानले नाही, या डंखातून तर आला नव्हता? आणि कुठल्याही निर्मितीसाठी स्वप्ने आवश्यक नाहीत का? केवळ सिनिसिझममधून कधी निर्मिती होऊ शकेल का? असले विचार जोशींच्या मनात कधी आले होते का हा प्रश्न पडतो.

पी. जी. वुडहाउस हा विनोदी लेखकही त्यांना फार आवडायचा. त्यांच्या पलंगाशेजारी वुडहाउसचे एखादे पुस्तक कायम ठेवलेले असे. ‘वुडहाउसमुळे माझे ब्लडप्रेशर नॉर्मल राहते,’ असे ते एकदा म्हणाले होते. त्याशिवाय त्यांना अनेक वैचारिक पुस्तकेदेखील प्रिय होती व तीही ते पुनःपुन्हा वाचत असत. रोज झोपण्यापूर्वी काही ना काही वाचायचा त्यांचा प्रघात होता व त्यांच्या उशाशी नेहमीच काही पुस्तके ठेवलेली असत.

*जग बदलणारी पुस्तके* या त्यांच्या पुस्तकात त्यांना खूप महत्त्वाच्या वाटणाऱ्या अशा वीसेक इंग्रजी पुस्तकांचा त्यांनी अल्पपरिचय करून दिला आहे. त्यात लायोनेल रॉबिन्सचे विद्यापीठांतून वर्षानुवर्षे पाठ्यपुस्तक म्हणून अभ्यासले जाणारे *The Nature and Significance of Economic Science* आणि जॉन मेनार्ड केन्सचे *Economic Consequences of Peace*, तसेच महात्मा फुलेंना प्रभावित करणाऱ्या थॉमस पेनचे *Common Sense*, चार्ल्स डार्विनचे उत्क्रांतिवादाची मांडणी करणारे *On the Origin of Species* यांचा परिचय आहे. ॲडम स्मिथच्या *वेल्थ ऑफ नेशन्स* ह्या विख्यात पुस्तकाचे त्यांना खूप अप्रूप होते व मुक्त अर्थव्यवस्थेचा पाया म्हणता येईल अशी त्यातील विचारसरणी त्यांना पूर्ण पटणारी होती; पण त्याचबरोबर *The theory of moral sentiments* हे त्याचे तुलनेने कमी परिचित असलेले पुस्तकही त्यांना महत्त्वाचे वाटे व त्या

दोन्हींचाही त्यांनी परिचय करून दिला आहे. या दुसऱ्या पुस्तकात 'मनुष्यप्रकृती एकसूत्री नाही. त्यात अर्थप्रवृत्ती आहे तितकीच निसर्गसिद्ध करुणेची भावना आहे.' अशी मांडणी आहे.

*Road to Serfdom* या एफ. ए. हायेक याच्या १९४४ सालच्या पुस्तकाचा परिचय इथे वाचायला मिळतो. सुरुवातीला एकही प्रकाशक ते छापायला तयार नव्हता, कारण सर्व तत्कालीन विचारवंतांचा त्यातील भूमिकेला प्रचंड विरोध होता. पण पुढे त्याची महती समाजाला पटली. १९७४चा अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार त्याला मिळाला होता. 'कोणत्याही मिषाने का होईना, पण एकदा सरकारी नियोजन आले, की नागरिक बाहुली बनतात आणि सरकार हुकूमशहा' हे त्याचे मुख्य प्रतिपादन. सरकारीकरणाला विरोध करणारे आणि खुल्या अर्थव्यवस्थेचा विचार मांडणारे हे सर्वांत महत्त्वाचे पुस्तक मानले जाते.

बर्नार्ड मांदेविल ह्या १६७० साली जन्मलेल्या डच-इंग्लिश मानसोपचार तज्ज्ञाने लिहिलेल्या *फेबल ऑफ द बीझ (मधमाश्यांची परीकथा)* या एका आगळ्या पुस्तकाचा परिचय विशेष वेधक आहे. मुळात हे पुस्तक म्हणजे एक विनोदी ढंगाने लिहिलेली दीर्घ कविता होती. 'माणसाचे मैत्री, प्रेमभावना इत्यादी निसर्गसिद्ध गुण किंवा विवेक आणि संयम यांसारखे त्याने संपादिलेले गुण यांतून मोठ्या संस्कृती उगम पावत नाहीत; उलट, ज्याला आपण वाईट बुद्धी समजतो, अनैतिकता मानतो त्यातूनच सर्व समाजप्रिय प्राण्यांत मजबूत नाती तयार होतात. त्यातूनच जीवन, व्यापारउदीम आणि वैभव उद्भवतात.' हे त्याचे सूत्र होते. जोशींच्या मते ॲडम स्मिथ आणि आयन रँड यांच्यावर ह्या पुस्तकाचा बराच प्रभाव होता. ह्या लेखकाचा काळ म्हणजे साधारण शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील उत्तरार्ध व त्यानंतरच्या काही वर्षांचा काळ; पण त्या काळात पाश्चात्त्य जग आपल्यापेक्षा किती पुढे गेले होते आणि किती वेगवेगळे विचार तेथील विचारवंत मांडत होते ह्याकडे जोशी वाचकाचे लक्ष वेधतात.

किंबहुना या सगळ्या पुस्तकात त्या-त्या पुस्तकाच्या काळात आपल्या देशात काय घडत होते याची तुलनाही ते करतात व त्यातून आपण जगाच्या किती मागे होतो हेही दाखवून देतात.

डॉ. ज्युलियन सायमन या अर्थतज्ज्ञाच्या *The Ultimate Resources* आणि *The State of Humanity* या दोन पुस्तकांचा जोशींनी एकत्रित करून दिलेला परिचय अतिशय रोचक आहे. विशेष म्हणजे हे लेखक १९९७ साली शेतकरी संघटनेचा सहभाग असलेल्या देवळाली येथील एका परिसंवादाला हजर राहिले होते. त्यांची ओळख 'आशावादी अर्थतज्ज्ञ' अशी आहे. त्यांच्या मते, धर्माचा आणि राजसत्तेचा पगडा जसजसा कमी होत गेला, तसतशी माणसाची प्रगती झाली, जीवनमान सुधारत गेले; स्वातंत्र्य आणि प्रगती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत; व्यापक परिप्रेक्ष्यात बघितले तर चिंतातुर विचारवंतांनी काहीही म्हटले तरी माणसाची सतत प्रगतीच होत गेली आहे, तथाकथित प्रदूषणदेखील प्रत्यक्षात कमी-कमी होत गेले आहे, जगातील खनिजे वगैरे संपायची अजिबात शक्यता नाही, तशा प्रकारची वेळोवेळी मांडली जाणारी भिती अगदी अवाजवी आहे अशी त्यांची मांडणी आहे. एकेकाळी जमीन हीच सर्वांत मोठी साधनसंपत्ती होती; पण पुढे जमिनीपेक्षा भांडवल, त्यानंतर भांडवलापेक्षा तंत्रज्ञान आणि आता तंत्रज्ञानापेक्षा 'योजक' म्हणून माणूस हाच उत्पादनाचा सर्वाधिक महत्त्वाचा घटक

आहे असे ते म्हणतात.

रासायानिक कीटकनाशकांमुळे निसर्गावर किती विपरीत परिणाम होत आहे, याकडे जगाचे लक्ष वेधून घेणाऱ्या *Silent Spring* ह्या राशेल कार्सन या अमेरिकन महिलेच्या पुस्तकाचाही परिचय जोशी करून देतात. जगभरच्या पर्यावरणवाद्यांचे हे अतिशय लाडके पुस्तक. रसायनांच्या वापरामुळे उत्पादन वाढले, पण त्याचबरोबर डीडीटी अथवा एंड्रिनसारख्या रसायनांमुळे कोट्यवधी मासेही मरतात, पर्यावरणाची अपरिमित हानी होते, याकडे लक्ष वेधून घेण्याचे काम या पुस्तकाने केले. तिचे म्हणणे चुकीचे आहे असे जोशी म्हणत नाहीत, पण अशा औषधांचे फायदेही त्यांना दिसतात. ते म्हणतात,

> या औषधांचा वापर झाला नसता तर साथीचे रोग आटोक्यात आले नसते, त्यामुळे लाखो लोक मृत्युमुखी पडले असते; कीटकनाशकामुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढले, अन्यथा लक्षावधी माणसे भुकेने तडफडून मेली असती; रसायनांच्या वापराचे दुष्परिणाम आहेत हे खरे, पण रसायने वापरलीच नसती तर निसर्ग मोठा स्वच्छ, सुंदर राहिला असता हेही खरे नाही. मनुष्यप्राणी पर्यावरणाच्या नवनव्या समस्या उभ्या करीत जाईल आणि हळूहळू त्यांचे निराकरणही करीत जाईल.

पुस्तकातला शेवटचा लेख रोझा लुक्झेम्बर्ग या पोलंडमधील साम्यवादी महिलानेत्यावर आहे; तिने मार्क्सवादातील एक महत्त्वाची त्रुटी दाखवून देणारा तिसऱ्या जगाच्या शोषणाचा सिद्धांत मांडला होता. विकसित जगातले कामगार आणि व्यवस्थापन हे दोघेही खरे तर पुढे एकत्रच येतात, वर्गयुद्ध वगैरे त्यांच्यात प्रत्यक्षात काहीच होत नाही; कारण दोघे मिळून गरीब वसाहतींचे शोषण करत असतात व त्यावर दोघेही समृद्ध होत असतात! इंपिरिॲलिझम (साम्राज्यवाद) हा शब्दही तिनेच प्रथम वापरला. १५ जानेवारी १९१९ रोजी सरकारनेच तिच्यावर मारेकरी घातले, तिच्याच घरातून तिला फरफटत बाहेर काढले, लाठ्यांनी झोडपले आणि नंतर बंदुकीची गोळी झाडून तिचे प्रेत जवळच्या एका कालव्यात फेकून दिले. तब्बल पाच महिन्यांनी पूर्ण सडलेल्या अवस्थेत ते सापडले. तिची क्रांतिकारक मांडणी आणि ज्या धाडसाने तिने ती केली त्याचे जोशींना विलक्षण कौतुक आहे. लेखाच्या, व या पुस्तकाच्या, शेवटी जोशी लिहितात,

> शेतकरी संघटनेने भारतीय शेतीच्या पराधीनतेचे विश्लेषण करताना 'इंडिया' विरुद्ध 'भारत' असा संघर्षाचा सिद्धांत मांडला. त्या मांडणीचा मूळ प्रेरणास्रोत रोझा लुक्झेम्बर्गच आहे.

आश्चर्य म्हणजे जोशींवर ज्या लेखिकेचा सर्वाधिक प्रभाव आहे, त्या मूळच्या रशियन पण तरुणपणीच अमेरिकेत स्थायिक झालेल्या आयन रँड हिच्या *We the Living, The Fountainhead, Atlas Shrugged* किंवा *The Virtue of Selfishness* यांसारख्या एखाद्या पुस्तकाचा मात्र त्यात परिचय नाही. तिने प्रसृत केलेल्या *Objectivism* या

विचारपद्धतीचा आधुनिक पाश्चात्त्य जगावर जोरदार ठसा आहे. अर्थात प्रस्तावनेत ह्या त्रुटीचा जोशींनी स्वतः उल्लेख केला आहे व पुढील आवृत्तीत ती उणीव भरून काढायचे वाचकाला आश्वासनही दिले आहे. ती पुढची आवृत्ती कधी निघाली नाही हा भाग सोडा. आयन रँड ही अमेरिकन लेखिका व्यक्तिशः त्यांच्या सर्वांत आवडीची. 'मला कधीही उदास वाटू लागलं, की मी तिचं एखादं पुस्तक वाचायला घेतो,' असं ते म्हणाले होते.

*जग बदलणारी पुस्तके* हे शरद जोशींचे पुस्तक तसे छोटेखानी आहे; फक्त १२७ पानांचे. पण तरीही त्याच्याविषयी इथे काहीसे विस्ताराने लिहिले आहे, कारण जोशींनी जी पुस्तके इथे निवडली आहेत त्यांवरून त्यांच्या स्वतःच्या विचारसरणीबद्दलही बरेच काही स्पष्ट होते. पुस्तकाचे शीर्षक 'जग बदलणारी पुस्तके' असले तरी 'मला घडवणारी पुस्तके' हे शीर्षकही या पुस्तकाला चालले असते.

*अंगारमळा* हे त्यांचे साहित्यिक मापदंडावर विचार करता मला खूप आवडलेले पुस्तक. त्यातील *अंगारमळा* हा पहिला लेख 'साप्ताहिक ग्यानबा'मध्ये २६ सप्टेंबर १९८८ रोजी प्रकाशित झाला होता. ह्यात त्यांनी स्वित्झर्लंडहून भारतात परत आल्यानंतरच्या काही दिवसांचे हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. या लेखाचे त्यांच्या स्वतःच्या अक्षरातील हस्तलिखितही सुदैवाने उपलब्ध आहे व त्याच्या पहिल्या पानावर उजव्या कोपऱ्यात 'स्वातंत्र्याच्या कक्षा या आगामी आत्मचरित्रात्मक निवेदनातील काही भाग' असे लिहिले आहे. यावरून त्यांना आत्मचरित्र लिहायचे होते व त्याचे शीर्षकही त्यांनी त्यावेळी ठरवले होते हे जाणवते. पण प्रत्यक्षात ह्या पुस्तकात 'स्वातंत्र्याच्या कक्षा' या विषयावर काहीच नाही. निव्वळ आत्मचरित्र असेही या पुस्तकाला म्हणता येणार नाही. या पुस्तकातील एकूण चौदा लेखांपैकी स्वतःविषयी फक्त चार लेख आहेत. ते उत्कृष्ट आहेत, पण त्यांतून त्यांचे सलग असे चरित्र उभे राहत नाही. पुस्तकातील सहा लेख म्हणजे व्यक्तिचित्रे आहेत; त्यांच्या मातोश्री इंदिराबाई, शंकरराव वाघ, बाबूलाल परदेशी, शेवाळेगुरुजी, दत्ता सामंत, दुर्गा भागवत व मनोहर आपटे (शेवटच्या दोघांची एकत्रित) यांची. पुस्तकातले दोन साहित्यविषयक लेख म्हणजे त्यांनी केलेल्या दोन भाषणांचे शब्दांकन आहे. पुस्तकातील सर्वांत मोठा तीस पानांचा लेख आहे, *बस करा हे समाजसेवेचे ढोंग!* हा त्यांनी अंतर्नाद मासिकाच्या १९९९च्या दिवाळी अंकासाठी लिहिला होता.

जोशींचे शब्दवैभव कोणाही प्रस्थापित लेखकाने हेवा करावा असे आहे. 'म्हातारीच्या चेहऱ्यावरील सुरकुत्यांमध्ये कोरून ठेवलेले पिढ्यानुपिढ्यांचे दारिद्र्य' ह्यासारखे शब्दप्रयोग ते सहज करून जातात. याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा त्या वर्षीचा 'आत्मचरित्र' या गटासाठी असलेला प्रथम पुरस्कारदेखील मिळाला होता. साहित्यासाठी त्यांना मिळालेला हा बहुधा एकमेव पुरस्कार असावा. ''स्पर्धेसाठी मी कधीच पुस्तक पाठवणार नाही व तसे ते पाठवायचे नाही अशी ताकीद मी प्रकाशकांना दिलेली आहे,'' असे ते पूर्वी एका भाषणात म्हणाले होते, पण बहुधा त्यांच्या प्रकाशकाकडून हे पुस्तक परस्पर पाठवले गेले असावे व

त्याबद्दल जाहीर झालेला पुरस्कार त्यांनी सुदैवाने प्रत्यक्षात स्वीकारलादेखील.

त्यांच्या एकूण लेखनाचे वेगळेपण म्हणजे अतिशय गुंतागुंतीचा विषयदेखील ते खूप सोप्या शब्दांत मांडतात, ते लेखन कुठेही बोजड होणार नाही ह्याची दक्षता घेतात. पण त्यांच्या लेखनातील या प्रासादिकतेचे एक मोठे कारण म्हणजे मुळातच त्यांनी लेखविषयाचे सखोल चिंतन केलेले असते व त्यांचे विचार त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या मनात सुस्पष्ट झालेले असतात. खूपदा लेखकाला स्वतःलाच त्याला नेमके काय म्हणायचे आहे ते नीट उमगले नसते व बऱ्याच साहित्यातील संदिग्धता व विसंगती त्या अपरिपक्व विचारांतून येत असते. जोशींच्या विचारांचे वेगळेपण आणि ते मांडण्यातील भाषाप्रभुत्व, संदर्भबाहुल्य आणि शब्दलाघव वाचकाला खिळवून ठेवतात. लक्षावधींचा जमाव खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाणीत होते; प्रस्तुत चरित्रात वेळोवेळी त्याचा उल्लेख झालेलाच आहे; त्यांच्या या अमोघ वक्तृत्वाचा काही अंश त्यांच्या लेखनातही उतरला आहे.

बऱ्याच वर्षांनंतर औरंगाबाद येथील जनशक्ती वाचक चळवळ ह्या श्रीकांत उमरीकर यांच्या प्रकाशनसंस्थेने जोशींच्या पंच्याहत्तरीनिमित्त त्यांचे समग्र साहित्य प्रकाशित करायचा संकल्प सोडला व पुढच्या काही वर्षांत एकूण पंधरा पुस्तके प्रसिद्ध केली. (त्यांची यादी शेवटी परिशिष्टात आहे.) श्रीकांत उमरीकर यांचा परिवार शेतकरी संघटनेशी खूप पूर्वीपासून जोडला गेलेला आहे. श्रीकांत औरंगाबाद येथे येऊन प्रकाशन व्यवसायात शिरले. जोशींची अकरा नवी पुस्तके व चार पुनर्मुद्रित पुस्तके ओळीने प्रकाशित करून त्यांनी महत्त्वाचे काम केले आहे.

पण एक नमूद करायला हवे; जोशींची बहुतेक पुस्तके म्हणजे मुख्यतः त्यांनी वेळोवेळी केलेल्या भाषणांचा व लेखांचा संग्रह आहे. हे लेखही बव्हंशी 'शेतकरी संघटक'मध्ये प्रकाशित झालेले आहेत. एक लेखक म्हणून ती पुस्तके वाचताना, स्वतंत्र पुस्तक म्हणूनच त्यांचे लेखन झाले असते, तर ती अधिक चांगली झाली असती असे मला खूपदा वाटले आहे. पुस्तकासाठी लेख निवडताना विशिष्ट आशयसूत्र उमरीकरांनी डोळ्यासमोर ठेवले आहे, पण तरीही एखादे विशिष्ट पुस्तक लिहायचे असा संकल्प सोडून, बैठक मारून जोशींनी हे लेखन केलेले नाही. चळवळीच्या धबडग्यात त्यांना ते जमले नसेल किंवा कदाचित एकूणच मराठी साहित्याविषयीची अप्रीती त्यामागे असेल; पण जर त्यांनी तशी मुळापासूनच 'पुस्तक' या स्वरूपात साहित्यनिर्मिती केली असती, तर त्यातून मराठी साहित्य अधिकच समृद्ध झाले असते.

'लिखित शब्द मेला आहे' ('The written word is dead') असे संयुक्त राष्ट्रसंघाचे एकेकाळचे अवर महासचिव फिलिप द सेन यांचे वाक्य जोशींनी एक-दोनदा उद्धृत केले आहे. साहित्याला आता भवितव्य नाही, असे बहुधा त्यातून त्यांना सूचित करायचे असे. त्यांनी स्वतः पुस्तकलेखनाकडे फारशा गांभीर्याने का बघितले नाही याचे कदाचित ते एक समर्थनही असू शकेल. 'डंकेल आणि लेखी शब्दाचा मृत्युलेख' या शीर्षकाचा एक लेख त्यांनी 'शेतकरी संघटक'मध्ये लिहिला होता (१७ जून १९९३). प्रत्यक्षात डंकेल प्रस्ताव फारच थोड्या विद्वानांनी वाचला होता, पण ज्यांनी डंकेल प्रस्ताव कधी वाचलाच नव्हता, असेही

अनेक तज्ज्ञ केवळ आपण पुरोगामी आहोत हे सिद्ध करण्यासाठी त्या प्रस्तावाला डोळे मिटून कसा विरोध करत आहेत, याविषयी त्या लेखात जोशींनी लिहिले होते.

त्या लेखाच्या शेवटी जोशींनी लिखित शब्द मेला असे त्यांना का वाटते, हे दाखवणारा एक प्रसंग सांगितला होता. ते लिहितात,

> माझ्या नात्यागोत्यातील कुटुंबांत माझ्या कामासंबंधी कौतुक तर सोडाच, पण जिज्ञासाही नाही. माझ्या उपस्थितीत शेती, शेतकरी आणि तत्संबंधी विषय कटाक्षाने टाळण्याचा शिष्टाचार सगळे जण पाळतात. कुटुंबातील एक दुःखद घटना म्हणून माझ्याकडे सगळे पाहतात. पण परवा एकदम बदल झाला. महाविद्यालयात जाणारी माझी एक भाची थोड्या दिवसांपूर्वी मला पाहिल्याबरोबर तिच्या शाळेत जाणाऱ्या भावाला म्हणाली, 'परवा (टीव्हीवर) 'परख'मध्ये पाहिले ना, ते हे अंकल! त्यांचा ऑटोग्राफ घे!' लिखित शब्दाचा यापेक्षा अधिक निश्चयात्मक मृत्युलेख काय असू शकेल?

नात्यागोत्यातला हा अनुभव खरे तर अनेक लेखकांना आला असण्याची शक्यता नाकारता येत नाही!

पण ह्या अनुभवावरून जोशींनी काढलेला निष्कर्ष मात्र नक्कीच नाकारायला हवा! कारण लिखित शब्दाला भवितव्य नसते, तर जगातील सर्वांत कार्यमग्न माणूस ज्यांना म्हणता येईल, त्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी पाच पुस्तके लिहिण्यासाठी आपल्या अत्यधिक व्यग्र दिनक्रमातून वेळ काढलाच नसता.

किशोरवयातच जोशींना असे वाटे, की या सर्व अनंत जगामध्ये एक काहीतरी असे सूत्र असले पाहिजे, की ज्या सूत्रामुळे जगातील सारे बदल घडून येतात, साऱ्या क्रांत्या घडतात आणि अशा त्या सूत्राचा वेध घेणारे एक पुस्तक लिहावे, अशी त्यांची तीव्र महत्त्वाकांक्षा होती. सगळ्या विश्वाचे रहस्य उलगडून दाखवणारे असे काहीतरी त्यांना लिहायचे होते.

ते एकदा म्हणाले होते,

''एखादा मोठा डोलारा उभा असावा पण त्याचा मूलाधार असलेली एखादी छोटीशी काडी हलवताच तो कोसळावा, या कल्पनेचं मला नेहमीच आकर्षण वाटत आलं आहे. मला लहानपणापासूनच असं वाटत आलं आहे, की जगातल्या सगळ्या घटनांना आधारभूत असा एखादा सिद्धांत आपण शोधला पाहिजे; असा सिद्धांत की ज्याद्वारे जगातील सगळ्या घटनांची संगती लावता येईल. मी एक मोठं पुस्तक लिहायला सुरुवात केली होती. त्याचं शीर्षक होतं, Theory of Revolutions.''

पोस्टखात्यात नोकरीला असताना १९६७ मध्ये ते सात महिन्यांसाठी पॅरिसला प्रशिक्षणार्थ गेले होते व त्यावेळी त्यांनी लिहिलेल्या इंग्रजीतील १६ हस्तलिखित पानांचा उल्लेख दुसऱ्या प्रकरणात आहे. ती पाने या संभाव्य पुस्तकाशी संबंधित असावीत असे वाटते,

पण ते लेखन त्यांनी अर्धवटच सोडून दिलेले असल्याने त्याबद्दल निश्चित काही सांगता येणार नाही.

त्यांची स्वतःविषयीची अपेक्षा किती उच्च होती, त्यांच्या स्वप्नांचा आवाका केवढा विशाल होता हे मात्र या पुस्तकाच्या एकूण संकल्पनेतून जाणवते. एक गमतीचा भाग म्हणजे ते ह्या उपरोक्त संकल्पित पुस्तकाबद्दल असेही म्हणाले होते, ''या पुस्तकाची अर्पणपत्रिका मी आधीच लिहिली होती व ती खूप वैशिष्ट्यपूर्ण होती – to the one who inspired writing of this book.''

अर्थात ती व्यक्ती कोण होती हे मात्र त्यांनी स्पष्ट केले नाही!

जगावेगळे असे काहीतरी आपण लिहावे, जे वाचल्यावर 'अरे, इतके सगळे सोपे आहे? मग आपल्याला हे कसे नाही सुचले?' असे वाटून सगळे थक्क होतील अशी काहीतरी सैद्धांतिक मांडणी आपण करावी ही भावना त्यांच्या मनात अगदी पूर्वीपासून असल्याचे जाणवते व ती उतारवयातही कायम असावी. 'इंडिया' विरुद्ध 'भारत' ही त्यांची मांडणी किंवा 'शेतीमालाला रास्त दाम' ह्या एक-कलमी मागणीवरचा त्यांचा भर किंवा 'माणसाचा निरंतर शोध हा इतर कशाहीपेक्षा स्वातंत्र्याच्या कक्षा वाढवण्याचा आहे' हा त्यांचा विचार, हे सारे त्या दृष्टीने सैद्धांतिक व मूलभूत स्वरूपाचेच आहे. आपल्या त्या मतांशी असलेली त्यांची बांधिलकी शेवटपर्यंत होती आणि अशी सूत्रबद्ध वैचारिक मांडणी आपण करू शकलो, याचा त्यांना खूप अभिमानही होता.

त्यांच्या एका कादंबरीची सुरुवातीची वीस अप्रकाशित हस्तलिखित पाने अनपेक्षितपणे त्यांच्या कागदपत्रांत आढळली. मजकूर इंग्रजीत होता. हा काय प्रकार आहे, म्हणून कुतूहलाने वाचायला लागलो, तो पुरता रंगून गेलो. मराठीप्रमाणे जोशींचे इंग्रजीवरही प्रभुत्व होते. कागद पिवळट आहेत; अनेक वर्षांपूर्वी, नक्की केव्हा ते सांगता येणार नाही, त्यांनी ही कादंबरी लिहायला घेतली असावी.

कादंबरीच्या पहिल्याच वाक्यात पुढे येते ते फुलो मुदोशी (Phulo Mudoshi) हे एक जगातल्या अनेक देशांत दबदबा असलेले व्यक्तिमत्त्व. Universal Newspapers Distributors Union (UNDU) ह्या एका आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे ते असिस्टंट डायरेक्टर जनरल आहेत. पुढच्याच परिच्छेदात फ्लॅशबॅकने फुलो नावाचा एक गरीब मुलगा आपल्यापुढे येतो. कथानक परदेशात कुठेतरी, एका नवस्वतंत्र देशात, घडणारे आहे.

पहाटेची वेळ आहे. फुलो गाढ झोपला आहे आणि त्याची आई, 'ऊठ बाळ, कामावर जायची वेळ झाली तुझी' म्हणत त्याला उठवत आहे. शाळेत जायच्या आधी घरोघर पेपर टाकायचे काम तो करत असतो. पुढे त्यांच्या देशात सशस्त्र क्रांती होते, लष्कर सगळी सत्ता आपल्या ताब्यात घेते.

लष्कराविरुद्ध भूमिगत राहून लढणारा एक क्रांतिकारक फुलोला भेटतो, काही गुप्त पत्रकांचे वाटप करायची जबाबदारी त्याच्यावर सोपवतो. सगळीकडे त्यावेळी संचारबंदी

असते. पहाटेच्या अंधारात ती पत्रके घेऊन फुलो चालला असताना काही सैनिक त्याला बघतात. घाबरून फुलो पळत सुटतो. पण कुठे लपावे हे त्याला कळत नाही. एका मोठ्या बंगल्याच्या दाराशी येऊन तो थबकतो. ते घर एखाद्या युरोपियन माणसाचे वाटत असते. इथे आपल्याला आसरा मिळणार नाही हे त्याला लगेचच जाणवते. दुसरीकडे कुठे पळावे याचा विचार करत तो उभा असतानाच मागून हळूच बंगल्याचे दार उघडते, आतून एक हात बाहेर येतो, फुलोला आत खेचतो आणि अस्फुट आवाजात कोचाखाली लपायला सांगतो. विसावे पान इथे संपते!

पुढे हाच फुलो स्वतःच्या हिमतीवर, जगभरातील वेगवेगळ्या देशांत घरोघर पेपर टाकणाऱ्या मुलांच्या एका आंतरराष्ट्रीय संघटनेत उच्चपदी पोचतो, असे लक्षात येते. मुळात ह्या मुलांची अशी एखादी आंतरराष्ट्रीय युनियन असू शकते ही कल्पनाच खूप वेधक वाटते. अशा युनियनच्या हाती किती मोठी ताकद असू शकेल तेही जाणवते; कारण हा व्यवसाय करणारे नसतील, तर जगभरातील वृत्तपत्रे वाचकांपर्यंत कधीच पोचणार नाहीत.

हे टीव्ही किंवा संगणक यांच्या आधीच्या कालखंडातील कथानक आहे. सगळ्या बड्या वृत्तपत्रांच्या नाड्या ह्याच युनियनच्या हाती असतील, ही कल्पना थरारक वाटते. जोशींच्या अक्षरातील निळ्या शाईने लिहिलेली, जागोजागी सुधारणा केलेली, ए फोर आकाराची ही फक्त वीस पाने आहेत; पुढचा मजकूर उपलब्ध नाही. तो त्यांनी लिहिला की नाही, हेही कळायला मार्ग नाही. मला स्वतःला ती अर्धवट सोडून दिलेली कादंबरी पूर्ण झाली असती तर खूप आवडली असती; तिची भाषा व निवेदनशैली तर सुरेख वाटलीच, पण तिचा एकूण आवाकाही प्रचंड वाटला.

त्यांना दोन इंग्रजी पुस्तके लिहायची होती. *Metaphysics of Market* (बाजारपेठेचे अध्यात्म) आणि *Metaphysics of Leadership* (नेतृत्वाचे अध्यात्म).

पहिल्या पुस्तकात बाजारपेठेत सर्व संबंधितांचे हित आपोआप कसे साधले जाते याचे विवरण त्यांना अपेक्षित होते. मुक्त अर्थव्यवस्थेचा मुख्य प्रणेता मानला गेलेल्या ॲडम स्मिथने आपल्या 'वेल्थ ऑफ नेशन्स'मध्ये असे म्हटले आहे, की मांस विकणारा (बुचर), ताडी गाळणारा (ब्रुअर) आणि भट्टीत पाव भाजणारा (बेकर) हे काही परोपकारासाठी आपापली कामे करत नाहीत, स्वतःचे पोट भरण्यासाठीच ते आपापला व्यवसाय करत असतात; पण त्यांच्या कामातून आपल्याही गरजा भागतात, आपल्यालाही आपले जेवण मिळते. ("It is not from the benevolence of the butcher, the brewer, or the baker, that we can expect our dinner, but from their regard to their own interest.") हे घडते कारण एक कुठलातरी 'अदृश्य हात' ("an invisible hand") असतो, ज्याच्यामुळे स्वार्थ साधता साधताच आपोआपच परमार्थही साधला जातो; व्यक्तिगत गरजा भागवतानाच सामूहिक गरजाही भागतात.

सामूहिक हित साधणाऱ्या या 'अदृश्य हाताचे' स्पष्टीकरण करणारे पुस्तक लिहायची

जोशींची इच्छा होती. बाजारपेठेत जेव्हा माल विकणारा व विकत घेणारा समोरासमोर येतात तेव्हा असेच काहीतरी त्यांच्यात घडते. मग तो प्रसंग अगदी आपण भाजीवाल्याकडून रोजची भाजी खरेदी करतानाचाही असू शकतो. किती किमतीच्या खाली वस्तू विकायची नाही, ह्याचा विचार विकणारा करत असतो आणि किती किमतीच्यावर ती खरेदी करायची नाही, याचा विचार खरेदी करणारा करत असतो. दोघेही समोरच्याला किती ताणणे शक्य आहे याचा मनातल्या मनात अंदाज घेत असतात. मग घासाघीस करता करता एक क्षण असा येतो, की आपण अती स्वस्तात वस्तू विकली असे दुकानदारालाही वाटत नाही व आपण वस्तूसाठी अवाच्या सवा किंमत मोजली असे खरेदी करणाऱ्यालाही वाटत नाही. दोघांचे असे समाधान होऊन जेव्हा व्यवहार होतो तेव्हा तो उत्तम व्यवहार असतो; तेव्हाची किंमत ही योग्य किंमतच असते. दिल्लीत बसून नियोजन मंडळाचे अधिकारी बाजारपेठेतील एखाद्या वस्तूची जी किंमत आपल्या हिशेबासाठी गृहीत धरतात, तो अंदाज नेहमीच चुकतो आणि या उलट बाजारातील अडत्यांचा किंमतीचा अंदाज अधिक बरोबर ठरतो. म्हणूनच सामूहिक निर्णयापेक्षा, संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयापेक्षा, पंचायतीने घेतलेल्या निर्णयापेक्षा एखाद्या व्यक्तीने घेतलेले निर्णय बरोबर असायची शक्यता अधिक असते. कारण निर्णय घेण्याची क्षमता एका व्यक्तीकडेच असते, समूहाकडे नसते. एखाद्या व्यक्तीकडेच विशिष्ट असे संवेदनापटल असते. त्यानुसार एखाद्या विशिष्ट आनंदासाठी किती किंमत चुकवणे योग्य होईल, तो कसा मिळवता येईल याचाही निर्णय ती व्यक्ती स्वतःपुरता घेत असते. दुसरी कुठली यंत्रणा तो निर्णय त्या व्यक्तीसाठी घेऊ शकत नाही (Arrow's Theorem).

दोन व्यक्तींमधील संवादही ह्या संवेदनपटलामार्फत अचूक होतो. वुडहाउसच्या कादंबरीत एका इंग्लिश उमरावाच्या हवेलीत लग्नाप्रीत्यर्थ जमलेल्या प्रचंड गर्दीत आणि आसपासच्या गलबल्यातही दोन प्रेमिक केवळ नेत्रपल्लवीने आपल्या भेटीचे स्थळ व वेळ अचूक ठरवतात, त्याप्रमाणे! बाजारातील व्यवहाराबद्दल अशी काहीतरी जोशींची एकूण धारणा होती व ह्या कल्पनेचा त्यांना वेगवेगळ्या अंगांनी बराच विस्तार करायचा होता.

एकदा हृदयविकाराच्या झटक्यानंतर प्रकृती सुधारण्यासाठी ते दोन महिने गुजरातमध्ये विश्रांती घेत होते. त्यावेळी रोज संध्याकाळी ते फिरायला बाहेर पडत व एका विशिष्ट जागी जमलेल्या श्रोत्यांसमोर 'बाजारपेठेचे अध्यात्म' ह्या विषयावर व्याख्यान देत. ही सारी मांडणी त्यांच्या मनातही तशी धूसरच होती, पण ती नीट तयार व्हावी म्हणूनच त्यांनी हा व्याख्यानांचा घाट घातला होता. एखाद्या विषयावरील आपले विचार पक्के व्हावेत यासाठी ते खूपदा त्या विषयावर व्याख्याने द्यायचा मार्ग अवलंबत. त्या व्याख्यानांचे ध्वनिमुद्रणही झाले होते; पण त्यांचे शब्दांकन उपलब्ध नाही. 'बाजारपेठेचे अध्यात्म' हे पुस्तक शेवटपर्यंत त्यांच्या हातून लिहून झाले नाही.

'नेतृत्वाचे अध्यात्म' या दुसऱ्या संकल्पित पुस्तकात नेत्याला समाजच स्वतःच्या कालसापेक्ष गरजांनुसार पुढे आणत असतो, नेत्याच्या कर्तृत्वामुळे वा काही अंगभूत गुणांमुळे

तो नेता बनतो असे नाही, असे काहीतरी त्यांना सांगायचे होते. ते एकदा मला सांगत होते,

"मी फार चांगले विचार मांडतो म्हणून शेतकरी माझ्याकडे आकर्षित होतात, असे जर कोणी म्हणत असेल, तर ते सपशेल चुकीचे आहे. कारण ज्याने कधीच कुठली वैचारिक मांडणी केलेली नाही, अशा टिकैतसारख्या नेत्याकडेही तेवढ्याच मोठ्या संख्येने शेतकरी आकृष्ट होताना दिसतात. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत समाजच आपल्याला हवा तो नेता निवडतो. आपल्याला हव्या असलेल्या गुणांचे आरोपण तो त्या नेत्यावर करत असतो व त्यातून त्या नेत्याची समाजाला प्रिय अशी प्रतिमा घडत जाते. प्रेमात पडल्यावर समोरची व्यक्ती आपोआपच सुंदर दिसू लागते, तसा हा प्रकार असावा."

अनेक मोठ्या व्यक्तींमध्ये काहीतरी उणिवा असतात, रोग असतात, आणि त्यांचा उपयोग नेतेपदाकडे वाटचाल करताना त्यांना आपल्या गुणांपेक्षाही अधिक होतो, असेही ते अनेक उदाहरणे देऊन सांगत. महात्म्यांना आपण उगाचच फार महत्त्व देतो, समाजाचे कल्याण महात्म्यांपेक्षा तथाकथित दुरात्म्यांनीच अधिक केले आहे, लुटालूट करणाऱ्या चेंगीज खान आणि नादिर शहा यांनीही देशादेशांतील भिंती उद्ध्वस्त करायचे फार मोठे काम केले आहे व त्यातून जग जवळ आणायला प्रेरणाही दिली आहे असेही ते म्हणाले होते.

एखाद्याला किती यश मिळणार हे त्याच्या त्याच्या नशिबावर सर्वाधिक अवलंबून असते असेही ते मानत. आपण नेहमी अपयशाचेच धनी होणार, आपल्या कामाचे उचित श्रेय आपल्याला कधीच मिळणार नाही, ही लहानपणापासूनचीच त्यांची भावना होती. त्यांना असलेल्या या श्रेयविहीनतेच्या जाणिवेबद्दल मागे लिहिलेलेच आहे.

याही कल्पनेचा पुरेसा विस्तार त्यांच्या मनात झाला नसावा. स्वतःच्या जीवनाचे सिंहावलोकन करताना जाणवणाऱ्या काही गोष्टी त्यांना या दुसऱ्या पुस्तकात मांडायच्या होत्या असे वाटते; नेमके सांगणे अवघड आहे, पण हे पुस्तक लिहायचे राहून गेले एवढे मात्र खरे.

त्यांचे लेखन वाचताना आणखी एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे अनेकदा अगदी आगळ्यावेगळ्या पण मौलिक अशा मुद्द्यांना ते स्पर्श करतात, त्यातून सजग वाचकाचे कुतूहल जागृत होते, पण मग त्या मुद्द्यांचा पुरेसा विस्तार न करता, ते अर्धवटच सोडून जोशींचे निवेदन पुढे सरकते. उदाहरणार्थ, मुसलमान आक्रमकांनी देवळे का लुटली याची त्यांची कारणमीमांसा, किंवा रशियन क्रांती ही कम्युनिस्टांपेक्षा पहिल्या महायुद्धात पराभूत होऊन मॉस्कोला परतणाऱ्या बेधुंद रशियन सैनिकांनी केली हे त्यांचे मत, किंवा इतिहासावर महापुरुषांचा फारसा परिणाम होत नाही हा त्यांचा मुद्दा, अधिकाधिक उत्पादन हे उपभोग वाढवण्यासाठी नसून निवडीसाठी पर्याय वाढावेत म्हणून असते ही त्यांची भूमिका. वाचकांची जिज्ञासा चाळवणाऱ्या, पण पुरती न शमवणाऱ्या, अशा वेधक उल्लेखांची ही यादी पुष्कळ वाढवता येईल.

या व अशा इतरही अनेक विषयांवर त्यांनी विस्ताराने लिहायला हवे होते. पुरेसा वेळ देऊन व पुरेशा गांभीर्याने लिहायला हवे होते. ते चांगल्याप्रकारे वाचकांपुढे यायला हवे होते.

त्यांतले निदान काही इंग्रजीतही असायला हवे होते. मराठी भाषेच्या सीमा ओलांडून जागतिक स्तरावर वाचले जावे असे त्यांच्याजवळ खूप काही होते.

चळवळीच्या धामधुमीत त्यांच्या हातून फारसे लेखन झाले नाही हे समजण्यासारखे आहे. कारण शेवटी लेखकाला लेखन करतानातरी स्वतःला इतरांपासून तोडून घ्यावे लागते, बाकी सारे विसरून तासन्‌तास लेखनसमाधीत रंगून जावे लागते, तरच त्या लेखनाला उत्कटता, एकतानता लाभते. त्यांच्या लेखनात जाणवणारा एकाग्रतेचा अभाव, आणि एक प्रकारचा विस्कळीतपणा हा त्या धकाधकीच्या जीवनातूनच आलेला असावा. आयुष्यातील शेवटची काही वर्षे जरी त्यांनी पूर्णवेळ लेखनाला दिली असती, तर काही उत्तम पुस्तके वाचकांना मिळाली असती. पण आवश्यक ते प्राधान्य जोशी लेखनाला देऊ शकले नाही. 'भारतातला शेतकरी कर्जमुक्त झालेला मला पाहायचा आहे' हाच ध्यास त्यांना शेवटपर्यंत होता, शेवटच्या काही वर्षांतही शेतकरी संघटनेचीच काळजी होती. प्रकृतीचीही फारशी साथ नव्हती हेही खरेच आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यनिर्मितीच्या अनेक शक्यता अमूर्तच राहिल्या.

१९९१नंतर जेव्हा त्यांनी शेतकरीलढ्याचे पुढचे पाऊल म्हणून नव्या दिशांचा शोध घ्यायला सुरुवात केली, त्यावेळी आपले विचार फक्त शेतकरीवर्गापुरते न राहता सर्व समाजापुढे येणे आवश्यक आहे ही जाणीव त्यांना झाली. नव्वदच्या दशकात बदलत्या परिस्थितीचा वेध घेताना त्यांनी वेगवेगळ्या प्रश्नांवर बरेच लेखन केले. या साऱ्यातून त्यांनी महत्त्वाचा असा वैचारिक वारसा भावी पिढ्यांसाठी मागे ठेवला आहे. त्या समृद्ध वारशातील काही घटक इथे नोंदवणे आवश्यक वाटते.

एक तर पहिले संपत्तिनिर्माण हे शेतीतच झाले आणि त्यानंतरचा सगळा इतिहास हा शेतीतील ह्या संपत्तीची जी लूट होत गेली त्या लुटीचा इतिहास आहे हे त्यांचे प्रतिपादन. शेतकरी आंदोलनाचा ती मांडणी हा पायाच होता व त्याबद्दल नवव्या प्रकरणात विस्ताराने लिहिलेले आहे.

प्रस्थापित कल्पनांना धक्का देणारे इतरही अनेक विचार जोशींनी मांडले. उदाहरणार्थ, ते म्हणतात की आर्थिक विकास ही गर्भाच्या वाढीप्रमाणे सहजतः होणारी बाब आहे; त्यात घिसाडघाई करता उपयोगी नाही. जीवशास्त्रीय विकासाप्रमाणेच आर्थिक विकास ही निसर्गतः होणारी गोष्ट आहे. त्यासाठी कोणालाही काहीही वेगळे करण्याची गरज नाही; जो तो त्याचा त्याचा विकास करतच असतो. आर्थिक विकास ही माणसाची निसर्गसिद्ध प्रेरणा आहे. लहान मुलाला मोठे करण्याकरिता त्याला आडवे-उभे असे काही ताणावे लागत नाही! गरिबी दूर करण्याच्या नावाखाली ती वाढवणारे तुमचे नियोजन बंद करा, लोक आपोआपच आपापला विकास साधतील. "गरिबाच्या छाताडावरून तुम्ही उठा, म्हणजे मग तो स्वतःच उभा राहील आणि आपली प्रगती करून घेईल," हे गांधीजींचे उद्‌गार जोशी अनेकदा उद्धृत करत.

सरकारने काय करावे आणि काय करू नये याविषयी जोशींची मते ठाम होती. त्यानुसार सरकारने मुख्यतः कायदा व सुव्यवस्था (law and order) प्रस्थापित करावी, कारण तेच

खरे सरकारचे सर्वाधिक महत्त्वाचे काम आहे. ब्रिटिशांनीही आधी ठग व पेंढाऱ्यांचा पक्का बंदोबस्त केला, 'काठीला सोने बांधून खुशाल काशीस जावे' इतका विश्वास जनतेमध्ये निर्माण केला व मगच रस्ते-रेल्वे-टपालसेवा-महसूल यंत्रणा वगैरेंची उभारणी सुरू केली ह्याकडे ते लक्ष वेधत. बाकी गरिबी हटवण्याचे वगैरे प्रयत्न सरकारने लोकांवरच सोपवावे; फक्त त्यात अडथळे निर्माण करू नयेत, असे ते म्हणत.

क्रांती कोणापासून सुरू होते याविषयीदेखील जोशींचे विचार प्रचलित धारणांपेक्षा अगदी वेगळे आहेत. आजपर्यंत असे सांगण्यात आले, की जो सर्वांत जास्त शोषित आहे, तो उठून क्रांती करतो. प्रत्यक्षात सर्वाधिक शोषण ज्याचे होते त्याच्यात उभे राहायचेही बळ उरलेले नसते. त्याची प्रतिकार करण्याची सगळीच शक्ती कुपोषणामुळे व मानसिक दुबळेपणामुळे निघून गेलेली असते. अत्यंत हलाखीत जगणारी माणसे आपण पाहिली तर ती क्रांतीच्या तयारीत असल्याचे अजिबात दिसत नाही. उलट शोषकांकडे ती दयेची भीक मागताना दिसतात. ज्याला क्रांती करायची आहे त्याच्याजवळ काही किमान स्वास्थ्य लागते, काही किमान साधनसामग्री लागते. भाकरी न मिळाल्यामुळे माणसाला होणाऱ्या वेदना ह्या लोणी न मिळालेल्यांपेक्षा जास्त असतात, असे चुकीचे गृहीत धरून 'शोषितांच्या क्रांतीचा' फसवा व प्रचारकी सिद्धांत मांडला गेला. पण इतिहासात शिरल्यावर कळते, की आजपर्यंत घडवून आणलेल्या क्रांत्या ह्या प्रामुख्याने ज्यांना लोणी मिळाले नाही त्यांनी घडवून आणल्या होत्या! ज्यांना भाकरी मिळाली नाही ते तसेच अन्याय व उपासमार सहन करत दिवस रेटत राहिले. बंगालच्या दुष्काळात ज्यांना भाकरीही मिळाली नाही असे हजारो शोषित शेतकरी धान्याच्या सरकारी गोदामासमोर जाऊन उपाशी मेले; पण त्यांनी गोदाम फोडायचा प्रयत्न केल्याची कुठेही नोंद नाही. क्रांतीचा अग्रदूत म्हणजे शोषित, हा समाजमनात स्थिर झालेला गैरसमज जोशींनी दूर केला.

१५ ऑगस्ट १९९७ रोजी भारतीय स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली. पण पन्नास वर्षांपूर्वी देश स्वतंत्र झाला त्यावेळी देशात जे प्रचंड उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण होते त्याचा मागमूसही या सुवर्णमहोत्सवी क्षणी नव्हता. या पन्नास वर्षांत आपण जी काही समृद्धी मिळवली, ती रुपयाच्या घसरलेल्या मूल्यामुळे आणि लोकसंख्या चौपट झाल्यामुळे नगण्य ठरली; सत्तेचाळीसच्या तुलनेत रुपयाचे मूल्य अवघे तीन पैसे एवढे उरले होते, तर लोकसंख्या पस्तीस कोटीहून शंभर कोटीच्या पुढे गेली होती. त्यामुळे उत्पादनातील वाढीचे सरकारी कागदपत्रांतील दावे अतिशयोक्त किंवा फसवे होते. पन्नास वर्षांपूर्वी भारताच्या तुलनेत मागासलेले असलेले इंडोनेशिया, मलेशिया यांसारखे कितीतरी देश या काळात आपल्या खूप पुढे निघून गेले. याची जाणीव सामान्य जनतेला आणि राज्यकर्त्यांनाही होती. म्हणूनच यावेळी त्यांच्यात जरासुद्धा उत्साह नव्हता; सगळा सोहळा मारूनमुटकून जमवून आणलेला. संसदेच्या खास भरवलेल्या सुवर्णमहोत्सवी अधिवेशनाला जेमतेम शंभर खासदार सभागृहात हजर होते, त्यावेळी कॅन्टीनमध्ये गप्पा मारत बसलेल्या खासदारांची संख्या त्याहून

अधिक होती! त्यावेळी सभागृहात झालेल्या चर्चेबद्दल जोशी म्हणतात,

"शाळकरी मुलांना स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांविषयी निबंध लिहून आणायला सांगितले असते, तरी ते खासदारांच्या वक्तव्यापेक्षा उजवे झाले असते. भारताच्या अर्थव्यवस्थेवरील कोणत्याही क्रमिक पुस्तकात सहज उपलब्ध होणारी, शेकडो वेळा वापरून गुळगुळीत झालेली आकडेवारी आणि माहिती, आणि आपण काही भलेमोठे सांगत आहोत असा आवेश आणि दंभ!"

या सगळ्या पार्श्वभूमीवर १०,११,१२ डिसेंबर १९९८ या काळात अमरावती येथे शेतकरी संघटनेने एक जनसंसद भरवली होती. आत्मचिंतन हा त्यामागचा उद्देश. त्या निमित्ताने *स्वातंत्र्य का नासले?* हे एक ११०-पानी पुस्तक जोशींनी प्रकाशित केले. त्यातील त्यांचे विश्लेषण विचारप्रवर्तक आहे. गेल्या पन्नास वर्षांत जे काही अभद्र घडत गेले त्याची मुळे स्वातंत्र्यपूर्व काळातच कशी दिसतात हे त्यांनी दाखवले आहे.

शरद जोशींचे अनेक विचार त्यांच्या कार्यातही प्रकर्षाने प्रतिबिंबित झाले आहेत; त्यातून त्यांच्या कार्याला एक वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण आपोआपच लाभते. त्यांच्या कार्यातील व आनुषंगिक मांडणीतील पाच वैशिष्ट्ये कायम प्रेरणादायी ठरतील अशी आहेत. ही पाच वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या वैचारिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे.

पहिले वैशिष्ट्य म्हणजे, त्यांची निर्विवाद जातिधर्मप्रांतभाषानिरपेक्षता. अन्य नेत्यांपासूनचे त्यांचे हे एक प्रमुख वेगळेपण.

मिशनच्या शाळेत शिकलेले वडील आणि पंढरपूरची असून बडव्यांची चीड असलेली आई ह्यांच्या पार्श्वभूमीमुळे जोशी कुटुंबात ब्राह्मणी कर्मठपणा किंवा ब्राह्मण्याचा अहंकार असा कधीच नव्हता. स्पृश्यास्पृश्यतातर अजिबात नव्हती. जोशी म्हणतात, "गायकवाड नावाचा एक हरिजन वर्गमित्र पाणी प्यायचं झालं, तर फक्त आमच्या घरी येत असे." त्या काळाचा विचार केला तर त्यांचे आईवडील तसे पुरोगामीच होते; त्यांचे संस्कार या जातिधर्मनिरपेक्षतेला कारणीभूत होतेच; पण शिवाय त्यांच्या सखोल विचारांचाही हा एक परिपाक होता.

दरवर्षी आपण धर्म बदलायचा आणि वेगवेगळ्या धर्मांचा अनुभव घ्यायचा असाही त्यांचा लहानपणी इरादा होता; अर्थात प्रत्यक्षात तो आणणे शक्य नव्हते, पण मुळात असा विचार त्यांनी करावा याचेही नवल वाटते. पुढे मुंबईसारख्या कॉस्मोपॉलिटन शहरात शिक्षणासाठी गेल्यावर व मुख्य म्हणजे तिथल्या सिडनमसारख्या परप्रांतीयांचा भरणा असलेल्या कॉलेजात सहा वर्षे काढल्यावर जातिधर्माचा कुठलाच विचार त्यांच्या मनात राहिला नाही. हे त्यांचे व्यक्तिवैशिष्ट्य पुढे शेतकरी संघटनेतही उतरले.

पण त्याचबरोबर ब्राह्मण घरात जन्मल्याचे काही फायदे आपल्याला निश्चित मिळाले हे ते मानत. ब्राह्मण्याचे म्हणून काही विशिष्ट जीन्स आपल्यात आले असे नाही, पण ब्राह्मण्याचे म्हणून काही विशिष्ट संस्कार आपल्यावर झाले हे ते कबूल करतात. उदाहरणार्थ, घरी रोज संध्याकाळी सगळ्यांनी जमिनीवर मांडी घालून बसायचे व मोठ्याने रामरक्षा म्हणायची अशी

पद्धत होती. आई दर सोमवारी किंवा एकादशीच्या दिवशी शिवलीलामृताचा एखादा पाठ वाचायची. यातून पाठांतर वाढले, उच्चार शुद्ध झाले, वाचनाची गोडी निर्माण झाली. एखादी गोष्ट नेमाने, नियमितपणे करण्याचे महत्त्व अंगी बाणले. ते म्हणतात,

''अभ्यास, वाचन, पाठांतर करणे यात काहीतरी फायद्याचे आहे, अशी जाणीव एक ब्राह्मण मुलगा म्हणून माझ्या मनामध्ये तयार झाली. त्याचा मला जो फायदा मिळाला, तो मागासवर्गातल्या एखाद्या श्रीमंत विद्यार्थ्यालासुद्धा मिळणे शक्य नव्हते.''

ह्या जाणिवेमुळे जातिधर्मनिरपेक्ष राहूनही अन्य काही पुरोगाम्यांप्रमाणे त्यांनी धार्मिक परंपरांची कुचेष्टादेखील कधी केली नाही; ह्या परंपरेतूनही आपल्याला काहीतरी उपयुक्त मिळाले आहे व इतरांनाही तसे मिळू शकते याची त्यांना जाणीव होती.

स्थानिक अस्मिता कुरवाळण्याच्या या काळातही त्यांनी कुठल्याही प्रकारचा जातीय, धार्मिक, प्रांतिक वा भाषिक अभिनिवेश बाळगला नाही. अशा अभिनिवेशांतून भारतीय जनतेत नेहमीच पद्धतशीररीत्या फूट पाडली गेली आहे. जोशी म्हणतात,

> जाती, भाषा, धर्माचे क्षुद्र वाद हे देशाची विकासाची गती खुंटल्यामुळे निर्माण होतात. ओढ्याला तुंबारा पडला, की शेवाळे माजते, किड्यांची वळवळ, हाणामारी सुरू होते. किड्याकिड्यांतील वाद सोडवू म्हटल्यास सुटणार नाहीत. किंबहुना ते वाद वाढवण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न होतो. विकासाचा खुंटलेला मार्ग खुला करणे, तुंबारा काढणे हा क्षुद्रवाद संपवण्याचा एकच रस्ता आहे.
>
> देशातली गरिबी हटली, देशातील सर्व घटकांचा विकास होत राहिला तर यांपैकी एकही भांडण होणार नाही. आपल्या देशातले एखादे राज्य म्हणते, की आम्हांला फुटून जायचे आहे. अमेरिकेतले एखादे संस्थान असे म्हणते का? मुळीच नाही. तिथेसुद्धा अनेक धर्मांची, पंथांची माणसे आहेत; अनेक राष्ट्रांतून आलेली आहेत, पण तिथे असे कुणी म्हणत नाही. उलट, अमेरिकेतील संस्थान असणे ही प्रतिष्ठेची, सन्मानाची गोष्ट समजली जाते. अशी भावना आपल्याकडे निर्माणच होऊ शकली नाही, कारण आम्ही गरिबी हटवू शकलो नाही.
>
> (*समाजसेवेची दुकानदारी नको!* अंतर्नाद, फेब्रुवारी २००७)

स्थानिक अस्मितेशी निगडित कुठलाच अभिनिवेश जोशींमध्ये अजिबात नव्हता. पुण्यातील ज्ञानेश्वर विद्यापीठाचे संस्थापक मनोहर आपटे यांच्यावर 'अंगारमळा'मध्ये लिहिलेल्या लेखात ते शेवटी म्हणतात,

> असल्या लोकविलक्षण प्रज्ञावंताच्या मनात स्वदेश, महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठी संत यांच्याबद्दल अतिरेकी म्हणावा इतका जिव्हाळा होता. या कोणत्याच गोष्टीबद्दल मला फारशी कदर नाही. ज्ञानेश्वर विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात पसायदान म्हटले जाते आणि त्यावेळी सर्व सभा उठून उभी राहते हे मला हास्यास्पद वाटते.

असेच दुसरे एक उदाहरण. कृष्णा खोरे पाणी वाटपात महाराष्ट्रावर अन्याय झाला आहे व आंध्र प्रदेशचा जास्त फायदा करून दिला गेला आहे अशी एक भावना महाराष्ट्रात होती. अशा प्रश्नांवर सर्व पक्षभेद विसरून आपल्याकडे राज्यातील सर्व लोक एक होतात असा अनुभव आहे. या प्रश्नावर महाराष्ट्राची बाजू केंद्रापुढे जोरकसपणे कशी मांडता येईल याचा विचार करण्यासाठी १९८५च्या सुमारास तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी एक बैठक बोलावली होती. या बैठकीत या विषयाचे एक तज्ज्ञ आणि महाराष्ट्र सरकारचे एक प्रमुख अभियंता जांभळे आपली अभ्यासपूर्ण मांडणी करू लागले. नंतर त्यावर आपले मत व्यक्त करताना जोशी म्हणाले होते, ''या चर्चेत वा मांडणीत मला रस नाही. भारतातील कोणत्याही शेतकऱ्याला ते पाणी मिळाले तरी त्यात माझ्या मते काही फरक पडत नाही.'' त्यावेळची जोशी यांची ही प्रतिक्रिया जांभळे यांना धक्कादायक वाटली होती; पण जोशींची एकूण वैचारिक बैठक पाहता ही प्रतिक्रिया अगदी स्वाभाविक अशीच होती.

शरद जोशींचे दुसरे वैचारिक वेगळेपण म्हणजे त्यांची ठाम अर्थवादी भूमिका. या भूमिकेमुळेच त्यांनी शेतकऱ्यांना शेतीकडे एक व्यवसाय म्हणून बघायला शिकवले. शेतीच्या संदर्भात हा निखळ अर्थवादी विचार जोशींनीच प्रथम मांडला. उगाचच 'काळी आई', 'शेतकरीधर्म' असले भावुक शब्दप्रयोग करून ते शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळले नाहीत, किंवा त्यांनी शेतकऱ्यांचा बुद्धिभेद केला नाही. 'शेती हा एक व्यवसाय माना, ह्याच्यातून तुम्हाला पुरेशी आर्थिक प्राप्ती व्हायलाच हवी; ती होत नसेल तर ह्यातून बाहेर पडून तुम्ही दुसरा कुठलातरी व्यवसाय करायला हवा,' असे ते म्हणत.

ही दृष्टी म्हणजे जोशींच्या एकूण अर्थवादाचा आणि त्यांच्या स्वतंत्रतावादाचाच एक आविष्कार होता आणि ह्याच भूमिकेतून त्यांनी खुल्या अर्थव्यवस्थेचाही सतत पाठपुरावा केला.

बंदिस्त अर्थव्यवस्थाच ज्यांच्या अंगवळणी पडली आहे त्यांना हे खुलीकरण सुरुवातीला अवघड जाईल याची जोशींना पूर्ण कल्पना होती. चीनमधल्या एका प्रथेचे उदाहरण ते या संदर्भात देत. एकेकाळी चीनमध्ये मुलींची पावले लहान असणे हे सौंदर्याचे लक्षण मानले जाई. त्यामुळे मुलगी जन्मताच तिचे पाय पट्ट्यांनी बांधून ठेवले जात. साम्यवादी क्रांतीनंतर ह्या प्रथेवर बंदी घालण्यात आली. इतकी वर्षे ज्यांचे पाय बांधून ठेवले होते, त्या साऱ्यांच्या पायाच्या पट्ट्या सोडल्या गेल्या. त्यावेळी त्या बदलाला त्या महिलांचाच जोरदार विरोध झाला. कारण प्रथमच त्यांच्या पायांतून जेव्हा रक्त मोकळेपणे वाहू लागले, आखडलेल्या रक्तवाहिन्या मोकळ्या झाल्या, तेव्हा त्या वेदना महिलांना सहन होईनात; कारण त्या नसांना वाहत्या रक्ताची सवयच नव्हती. पुढे अर्थातच त्या वेदना नाहीशा झाल्या व मग पट्ट्या सोडल्याचे व पाय मोकळे झाल्याचे अवर्णनीय सुख आयुष्यात प्रथमच जाणवू लागले. जोशींच्या मते खुलीकरणाच्या ह्या सुरुवातीच्या काळात भारतीयांची स्थिती त्या चिनी महिलांसारखीच आहे. 'नको ते खुलीकरण, नको तो जगभरातून येणारा माल, नको ती स्पर्धा,

त्यापेक्षा आपले जुने लायसन्स-परमिट राज्यच बरे होते' असे आपल्याला वाटते. पण हळूहळू आपल्याला ह्या खुलीकरणाची सवय होईल, त्याचे असंख्य फायदे दिसू लागतील, कारण मुळात व्यापार बंदिस्त करणाऱ्या ह्या भिंतीच कृत्रिम आहेत, त्या पाडून टाकणे हेच नैसर्गिक आहे, खऱ्याखुऱ्या खुलीकरणातूनच समृद्धी येईल ह्याविषयी त्यांची खात्री होती. ह्यात आपला आर्थिक फायदा आहे हे जेव्हा लोकांना दिसू लागेल तेव्हा आपोआपच ते खुलीकरणाचे समर्थन करू लागतील, कारण शेवटी आपला आर्थिक फायदा ज्या व्यवस्थेत होतो तीच व्यवस्था माणसाला हवीशी वाटायला लागते.

हा अर्थवादी दृष्टिकोन ते जीवनाच्या इतरही अनेक क्षेत्रांना लागू करतात. उदाहरणार्थ, माणसाच्या वागण्याच्या संदर्भात ते म्हणतात,

''आपण अर्थशास्त्रीय विचार करताना पहिल्यांदा एक गोष्ट गृहीत धरायची आहे, की प्रत्येक गोष्टीचं कारण हे आर्थिक असतं. अर्थकारणानं स्वभाव ठरतात, स्वभावानं अर्थकारण ठरत नाही. अगदी पुण्यामध्ये ब्राह्मण घरात जन्मलेले आणि लहानपणी स्नानसंध्या केलेले लोक अमेरिकेत गेल्यावर पहिल्याच आठवड्यात गोमांसभक्षण कसं करू लागतात, हे मी पाहिलेलं आहे. ज्यांच्या आयुष्यात कधीही काही विशेष घडलेलं नाही, तेही कसे बदलतात हेही पाहिलेलं आहे. याला कारण त्यांचं अर्थकारण बदललेलं असतं. अमुक एका माणसाचा स्वभाव असा का, हे समजून घ्यायचं असेल, तर त्याचा स्वभाव तसा असल्याने किंवा तसा नसण्याने त्याचा काय फायदा किंवा काय तोटा होणार आहे, हे समजून घ्यावं लागेल. जसं वागल्याने आपला अधिक फायदा होणार असतो, तसं वागणं ही माणसाची सहजप्रवृत्ती आहे. माणसाचं विचार करण्याचं इंद्रिय मेंदू हे नसून खिसा हे आहे.''

शरद जोशींचे तिसरे वैचारिक वेगळेपण म्हणजे त्यांनी शेतीप्रश्न हा फक्त शेतकऱ्यांचा प्रश्न आहे अशा प्रकारे त्याच्याकडे न पाहता, हा एकूण देशाचे दारिद्र्य दूर करण्याचा प्रश्न आहे अशी मांडणी केली. एकूण देशाच्या व्यापक परिप्रेक्ष्यात शेतकऱ्याचा प्रश्न पूर्वी कधी मांडला गेला नव्हता.

त्यांच्या मते शेतीमालाला वाजवी भाव मिळाला, की शेतकऱ्याच्या हातात अधिक पैसा येईल. हाती पैसा आला, की शेतकऱ्याला अधिक चांगले जगावेसे वाटेल. आजच्यापेक्षा अधिक चांगले खाणे, पिणे, कपडे घालणे, घर बांधणे, ते विविध वस्तू आणून सजवणे, प्रवास करणे, शिक्षण घेणे, साहित्य-कलांचा आस्वाद घेणे व एकूणच चांगल्या प्रकारे जगणे त्याला जमेल. पुन्हा हे समृद्धीचे चक्र फक्त त्याच्या व्यक्तिगत जीवनापुरते सीमित राहत नाही. आपली बचत तो गावातच छोटे-मोठे उद्योग सुरू करण्यात गुंतवू शकेल. गावातील सर्व तरुणांनी रोजगारासाठी शहराकडे धाव घ्यायची आणि तिथल्या बेसुमार गर्दीत आणखी भर घालायची हा प्रकार संपेल. गावातच त्या तरुणाच्या कर्तृत्वाला वाव मिळेल. यातूनच गाव समृद्ध होईल आणि अंतिमतः देश समृद्ध होईल. शेतकरी समृद्ध होणे म्हणजेच देश समृद्ध होणे.

शेतीतून व्यापक आर्थिक विकास कसा होतो याचे उदाहरण म्हणून त्यांनी कोल्हापूरच्या म्हादबा मिस्त्री यांचा उल्लेख केला आहे. उसाचे गुऱ्हाळ चालवून आणि गुळाची विक्री करून जो पैसा आला, त्यातूनच म्हादबा मिस्त्री उभे राहिले; जोशींना अभिप्रेत असलेल्या ग्रामीण औद्योगिकीकरणाचे ते उत्तम प्रतीक आहे.

पंजाबमध्येही हेच घडले. तेथील उद्योगांत सरकारी गुंतवणूक अशी जवळजवळ अजिबात नाही. शेतीतले पैसे गुंतवून शेतकऱ्यांच्या मुलांनी आपापल्या गावात छोटे-छोटे कारखाने उभारले, साधी स्वस्तातली लेथ मशीन्स बसवून उत्पादन सुरू केले. वाहतुकीचा, वाहनदुरुस्तीचा व इतरही असेच बारीकसारीक व्यवसाय सुरू केले. अशा असंख्य व्यक्तींनी घेतलेल्या स्थानिक पुढाकारांतूनच तेथील ग्रामीण भागाचे आर्थिक चित्र पालटायला सुरुवात झाली.

ह्या संदर्भात त्यांनी दिलेले जपानचे उदाहरण लक्षणीय आहे. *खुल्या अर्थव्यवस्थेकडे खुल्या मनाने* ह्या आपल्या पुस्तकात ते म्हणतात, की जपानी सरकार १९२१ सालापासून सातत्याने त्यांच्या शेतकऱ्याला भाताची जी आंतरराष्ट्रीय किंमत असते, तिच्या तिप्पट भाव देत आले आहे. त्याशिवाय, तांदळाचा एक दाणाही आयात होणार नाही असे त्यांचे धोरण आहे. त्यामुळे जपानी शेतकरी भातशेती करूनही चांगल्या प्रकारे जगू शकतो.

हाच प्रकार चीनमधेही अलीकडच्या काळात घडून आला आहे. आज चिनी वस्तूंनी सगळ्या जगाची बाजारपेठ जणू काबीज केली आहे; इतके त्यांचे उत्पादनक्षेत्र (manufacturing) प्रबळ आहे. पण चीनने खुली अर्थव्यवस्था स्वीकारल्यावर सर्वांत आधी शेतीमालाला अधिक किंमत द्यायला सुरुवात केली. त्यातून निर्माण झालेल्या ग्रामीण समृद्धीतूनच त्यांची विकासदौड सुरू झाली. देशातील बहुसंख्य लोकांची क्रयशक्ती शेतीविकासातूनच वाढू शकते व ही क्रयशक्ती वाढल्याशिवाय औद्योगिक किंवा इतर वाढीला बाजारपेठच उपलब्ध होत नाही, तीही वाढ मग खुंटते. आधी शेतीचा विकास, त्यातून स्थानिक बाजारपेठेतील वाढणारी मागणी व मग औद्योगिक विकास हाच क्रम जगभर राहिलेला दिसतो. म्हणूनच शेतीमालाला वाजवी भाव मिळायला हवा, ही शेतकरी संघटनेची मागणी केवळ शेतकऱ्यांच्या भल्यासाठी नसून सगळ्या देशाचाच विकास त्यात सामावलेला आहे असे जोशी म्हणतात.

शरद जोशी यांचे चौथे प्रमुख वैचारिक योगदान म्हणजे त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा हिरिरीने आणि निःसंदिग्धपणे केलेला पुरस्कार.

शेतकऱ्याच्या जीवनात असलेले तंत्रज्ञानाचे महत्त्व जोशींनी प्रथमपासून अधोरेखित केले आहे व त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा तो अगदी पहिल्या शिबिरापासून एक महत्त्वाचा भाग होता. *शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती* (नोव्हेंबर १९८२) या पुस्तकात ते म्हणतात,

गेल्या फेब्रुवारीत चाकणच्या बाजारपेठेत शेतकऱ्यांना आपला टोमॅटो अवघ्या तीन पैसे किलो भावाने विकावा लागला. अनेकांनी तर तोही भाव येत नाही म्हणून आपल्या टोमॅटोचे ढीगच्या ढीग रस्त्यावर फेकून दिले. नंतर फक्त चार महिन्यांनी तोच टोमॅटो दोन रुपये किलो झाला. पण नाशवंत पीक असल्याने शेतकरी चार महिने थांबू शकत नव्हता. इथे तंत्रज्ञान आपल्या उपयोगी पडू शकते. बाजारात चांगला भाव मिळेस्तोवर टोमॅटो शीतगृहांत साठवता आला पाहिजे. म्हणजे मग योग्य वेळी तो बाजारात आणून आपल्याला उत्तम भाव मिळू शकेल. तसेच त्याच्यावर प्रक्रिया करून त्याचा रस, सॉस, सूप, चटणी करता आली पाहिजे. ते तयार खाद्यपदार्थ मग आपल्याला जगभर कुठेही विकता येतील.

हा केवळ तंत्रज्ञानाचा एक छोटासा भाग झाला. त्याचे खरे तर अनंत उपयोग शेतकरी करू शकतो. नैसर्गिक आपत्तीवरही तंत्रज्ञान मार्ग काढू शकते. आज मनुष्य चंद्रावर जाऊ शकतो किंवा जिथे दहा-दहा, बारा-बारा फूट बर्फ वर्षभर असते अशा सैबेरियासारख्या ठिकाणीसुद्धा चांगली शेती होऊ शकते. तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त उपयोग आपण करायला हवा.

भारतातील साठाव्या दशकातील हरितक्रांती ही मुख्यत: मेक्सिकोमध्ये तयार केलेल्या गव्हाच्या-तांदळाच्या सुधारित बियाणांमुळे आणि खतांच्या सढळ वापरामुळेच शक्य झाली याविषयी त्यांच्या मनात तिळमात्र संदेह नव्हता. जनुकीय क्रांतीमुळे (जेनेटिकली मॉडिफाइड बियाणांमुळे) भारताचा तसाच फायदा होईल, असे ते म्हणतात. पण त्या बियाणामुळे रासायनिक खतांचा व केमिकल्सचा वापर अनावश्यक ठरतो, म्हणून अशा खतांचे व केमिकल्सचे निर्माते व व्यापारी काही मूठभर भारतीयांना हाताशी धरून आदळआपट करत आहेत, असे त्यांना वाटते. एका व्याख्यानात जोशी म्हणतात,

गेल्या वर्षी आंध्र प्रदेशात १,५०० हून अधिक कापूस शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एका लहानशा अळीने – बोंडअळीने – त्यांना आत्महत्या करायला लावली. बोंडअळीचा इतका प्रचंड हल्ला झाला, की कापसाचे पीक नाहीसे झाले आणि त्यांना आत्महत्या करणे भाग पडले. आता कापसाचे एक नवीन बियाणे असे निघाले आहे, की त्या बियाण्यातून उगवलेल्या रोपांवर बोंडअळी येतच नाही. कपाशीच्या बियाण्याच्या विशिष्ट जनुकात काही बदल करून शास्त्रज्ञांनी हे बोंडअळीला प्रतिबंध करण्याची अंगची ताकद असलेले बियाणे तयार केले आहे. आज हे बियाणे अमेरिकेतील ३५ टक्के शेतकरी वापरतात. त्याचा परिणाम असा झाला, की तेथील कापसाचे उत्पादन वाढले आणि औषधांचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे उत्पादनखर्चही कमी झाला. आणि त्यामुळे पहिल्यांदा अशी परिस्थिती तयार झाली आहे, की कापसाचा जागतिक बाजारपेठेतला भाव

> हिंदुस्थानातील कापसाच्या भावापेक्षा कमी आहे. हे घडले याचे कारण अमेरिकन शेतकऱ्यांनी हरित क्रांतीच्या पुढे पाऊल टाकून जनुक क्रांतीत भाग घेतला.
>
> आपल्याकडे मात्र आपण या नवीन तंत्रज्ञानाच्या क्रांतीच्या बाबतीत हरित क्रांतीच्या वेळेपेक्षाही अधिक बेसावध आहोत. आपल्याकडचे थोर थोर विचारवंत, थोर थोर साहित्यिक, थोर थोर पत्रकार हे नवीन तंत्रज्ञानाने येणारी प्रत्येक गोष्ट म्हणजे परमेश्वराविरुद्धचा कट आहे, ते पाप आहे, मनुष्यप्राण्याने असल्या गोष्टी करण्याच्या फंदात पडू नये अशी हाकाटी करतात. याच मंडळींनी, हिंदुस्थानात पहिल्यांदा आगगाडी आली तेव्हा विरोध केला. रासायनिक खते आणि औषधे यांनाही याच लोकांनी विरोध केला. नवीन कोणतीही गोष्ट आली, की त्याला विरोध करण्याची ही वृत्ती म्हणजे ज्ञानाला संकुचित करणारी वृत्ती आहे.
>
> (माजी केंद्रीय कृषी राज्यमंत्री कै. अण्णासाहेब शिंदे स्मृती व्याख्यान, श्रीरामपूर, १२ जानेवारी २०००)

तंत्रज्ञानातून अनेक समस्या निर्माण होतात याची अर्थातच त्यांना जाणीव होती, पण त्या समस्यांवर उत्तरेही अधिक प्रगत तंत्रज्ञानातूनच निघतील, इतिहासाची चक्रे उलटी फिरवणे वेडेपणा होईल यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. म्हणूनच निसर्गशेती हा आपल्यापुढचा पर्याय होऊ शकत नाही, त्यातून जगातील अब्जावधींचे पोट भरेल इतके उत्पादन होऊ शकत नाही व भोंगळपणे तसा आग्रह धरला तर जगात लाखो भूकबळी पडतील असे ते मानतात. तंत्रज्ञानाच्या उपयुक्ततेबद्दल इतरांचा आणि स्वत:चाही बुद्धिभेद होईल अशी भोंगळ मांडणी त्यांनी कधीही केली नाही.

शरद जोशींचा पाचवा महत्त्वाचा वैचारिक वारसा म्हणजे त्यांनी शेतकऱ्याला दिलेला स्वाभिमान.

त्यांनी आयुष्यभर पाठपुरावा केलेले स्वातंत्र्य व खुलेपण ह्या स्वभिमानाशीच जोडलेले आहे. 'मेंढरे म्हणून नव्हे, माणसे म्हणून जगा', हा त्यांचा कायम संदेश असायचा. शेतीमालाच्या भावाचा प्रश्न त्यांनी स्वातंत्र्याची गुरुकिल्ली म्हणून हाती घेतला; कारण स्वातंत्र्यावरचा सर्वांत मोठा घाला गरिबी हा आहे व ती गरिबी बहुसंख्य शेतकरी असलेल्या आपल्या देशात शेतीमालाला वाजवी भाव मिळत नाही म्हणून आहे, अशी त्यांची धारणा होती.

शेतकऱ्याच्या स्वाभिमानाची जपणूक जोशींनी अगदी प्रथमपासून जाणीवपूर्वक केली. *शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती* या पुस्तकात ते म्हणतात :

> आम्ही शेतकऱ्याला एकच सांगतो – हा माल पिकवण्यासाठी तू जितका खर्च करतोस, तितके पैसे जरी तुला मिळाले तरी तुला, तुझ्या पत्नीला किंवा मुलाबाळांना मोफत शाळा, मोफत दवाखाना, कर्जमाफी, निराधार अनुदान योजना असल्या

कुठल्याही धर्मादायावर जगण्याची गरज नाही. आम्हाला फक्त आमच्या शेतीमालाचा रास्त भाव द्या! शेतकऱ्याजवळ थोडा पैसा साठू द्या! तो स्वतःच्या गावात चांगली शाळा काढून, चांगला शिक्षक नेमून अभिमानानं आपली मुलं तिथं शिकायला पाठवेल! शेतकऱ्याजवळ पैसा आला तर एमबीबीएस झालेले डॉक्टर आपण होऊन गावोगाव दवाखाने काढतील!

शेतकऱ्यांना पोषक आहार पुरवणाऱ्या समाजसेवी उपक्रमांवरपण जोशी यांचा रोष आहे. ते म्हणतात,

सकस आहार वगैरे द्यायला आम्ही काय जनावरं आहोत का? आमच्या मालाला नीट भाव द्या, आम्ही आमचं काय ते विकत घेऊन खाऊ.

सामाजिक कार्याविषयीची त्यांची मते खूप बोचरी आहेत, हे खरे पण त्यामागेदेखील कुठेतरी या कार्यात ते कार्यकर्ते 'देणारे' व सामान्य माणसे 'घेणारे' अशी स्वाभिमानाला बोचणारी भूमिका असते असे त्यांना वाटते व ती त्यांना पूर्णतः अस्वीकृत आहे.

शेतकऱ्यांमध्ये जोशींनी जागवलेला हा स्वाभिमान केवळ अमोल असा होता. परभणी येथे भरलेल्या शेतकरी संघटनेच्या अधिवेशनाला जेव्हा कवी इंद्रजित भालेराव प्रथम गेले तेव्हाची त्यांची पहिली प्रतिक्रिया महत्त्वाची आहे. ते म्हणतात,

या अधिवेशनात मनात ठसलेली सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट होती ती म्हणजे, हातात नांगर धरलेला शेतकऱ्याचा प्रचंड मोठा कटआउट. तो आम्ही अजूनही विसरलेलो नाही. सार्वजनिक सभेच्या ठिकाणी शेतकऱ्याची एवढ्या मोठ्या सन्मानासह स्थापना झालेली आम्ही प्रथमच पाहत होतो. शेतकऱ्याची पोरं असणाऱ्या आम्हांला ती गोष्ट भावून गेली. शेतकरी संघटनेचा लाल बिल्लाही तेव्हापासूनच मनावर ठसलेला आहे. अजूनही हा बिल्ला कुणाच्या छातीवर पाहिला, की भावुक व्हायला होतं.

''छातीवर हा लाल बिल्ला लावला, की आम्हाला कुठल्याही सभेत, कुठल्याही नेत्याला, अवघड प्रश्न विचारायचं धाडस कुठूनतरी येतं,'' असे शेतकरी संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी प्रस्तुत लेखकाला सांगितले आहे. ह्या धाडसामागे केवळ लाल बिल्ला नव्हता, पुरती मशागत केलेली पक्की विचारसरणीही होती.

शेतीमालाला वाजवी भाव ही मागणी करण्यामागे त्यांचे अंतिम उद्दिष्ट हेच होते, की शेतकऱ्याच्या हातात चार पैसे यावेत. ते झाले तरच आजचे त्याचे लाचारीचे जिणे संपून तो खऱ्या अर्थाने स्वतंत्र होईल. तसे झाले तरच त्याचा स्वाभिमान वाढेल. जोशींच्या मते शेतीमालाच्या आंदोलनाचे सर्वांत मोठे फलित हेच आहे – शेतकऱ्याला अधिक स्वतंत्र करणे, त्याचा आत्मसन्मान वाढवणे. त्यासाठीच हवी कर्जमुक्ती, त्यासाठीच हवे बाजारपेठेचे आणि

तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य, त्यासाठीच हवा शेतीमालाला वाजवी दाम. शेतकऱ्याला त्याचा हा पिढ्यानुपिढ्या चिरडला गेलेला स्वाभिमान परत मिळवून देणे हे शरद जोशींचे फार मोठे योगदान आहे.

राजू शेट्टी यांनी काढलेल्या नव्या संघटनेचे नावही त्यांनी 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' ठेवले; नावातच हा स्वाभिमान समाविष्ट केला, हे लक्षणीय आहे.

आपल्या भाषणांतून आणि लेखांतून शरद जोशींनी जे विचारधन मागे ठेवले आहे, त्याचे खरे मूल्यमापन पुढच्या पिढीतच बहुधा होऊ शकेल. त्यांचा हा वैचारिक वारसा त्यांच्या आंदोलनाच्या वारशाइतकाच महत्त्वाचा आहे; त्यांनी भावी पिढ्यांसाठी मागे ठेवलेला मोठा खजिनाच आहे. भविष्यातही जेव्हा जेव्हा आपण नव्या दिशांचा शोध घेऊ, तेव्हा तेव्हा त्यांचे हे विचार आपल्याला उपयुक्त ठरणारे आहेत.

■

# १७

# सांजपर्व

शरद जोशींनी शेतीला सुरुवात केली तेव्हापासूनच्या त्यांच्या एकूण आयुष्याचे स्थूलमानाने तीन टप्पे दिसतात.

पहिला म्हणजे, १९७७ ते १९९० हा शेतीतील प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा, शेतकरी संघटना उभारण्याचा, वेगवेगळी आंदोलने करण्याचा, राजकारणात सहभाग घेण्याचा.

दुसरा टप्पा म्हणजे, उदारीकरणाचे धोरण सरकारने स्वीकारले, संघटनेच्या कामाला वेगळे आयाम द्यायची गरज निर्माण झाली, खुल्या अर्थव्यवस्थेचे त्यांनी हिरिरीने समर्थन केले, स्वतंत्र भारत पक्षाची निर्मिती केली तो सगळा १९९१ ते २००० पर्यंतचा.

आणि तिसरा टप्पा म्हणजे, २००१ ते २०१६ मध्ये हे जग सोडून जाईस्तोवरचा कालखंड; ज्या काळात आंदोलनाचा व एकूणच जीवनाचा वेग मंदावला होता, ज्याला आपण सांजपर्व म्हणू शकू असा टप्पा.

अर्थात कोणाच्याच आयुष्याचे हवाबंद कप्पे पाडता येत नाहीत; ही विभागणी केवळ मांडणीच्या सोयीसाठी केलेली आहे हे उघड आहे.

आयुष्याच्या या तिसऱ्या कालखंडात शेतकरीप्रश्नाशी संबंध नसलेला, पण जोशींनी जिद्दीने हाती घेतलेला एक व्यक्तिगत उपक्रम म्हणजे नर्मदा परिक्रमा. ही परिक्रमा करायचे तसे त्यांच्या खूप वर्षे मनात होते, पण चळवळीच्या व्यापामुळे सवड मिळत नव्हती. ती आत्ता मिळाली. १५ नोव्हेंबर २००२ रोजी जोशींनी प्रस्थान ठेवले. एकूण ३५०० किलोमीटरची ही यात्रा होती. तेव्हा जोशींचे वय ६७ होते. तशी ही परिक्रमा फार अवघड. तीन राज्यांतून जाणारी. रस्त्यात सोयीसुविधा काहीच नाहीत. सगळा ग्रामीण भाग. वाटेत वस्ती व दुकानेही तुरळक. औषधपाण्याची तर काहीच सोय नाही. परिक्रमेत त्यांच्याबरोबर प्रथमपासून शेवटपर्यंत दर्शिनी भट्टजी व बबन शेलार होते, तसेच त्यांचे बंधू ज्ञानेश्वर शेलारही ४ मार्चपासून २१ दिवस होते. कायम राहिलेली अशी आठ-दहाच मंडळी होती; पण इतरही काही जण वेळोवेळी येत. एका वेळी साधारण तीस-चाळीस यात्रेकरू असत. ज्ञानेश्वर शेलारांनी त्या दिवसांचा वाचनीय वृत्तान्त शरद जोशी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त प्रकाशित झालेल्या स्मरणिकेत लिहिला आहे. त्यावेळी रोज जोशी यात्रेकरूंसमोर एक व्याख्यानही देत; पण व्याख्यान न म्हणता त्याला प्रवचन म्हणत. स्थानिक लोकही प्रवचनासाठी येत. रोज पहाटे तीन वाजता जोशी उठत; इतर कोणी उठायच्या आत. नदीवर जात व कडाक्याची थंडी

असूनही गार पाण्याने अंघोळ करून मुक्कामी परत येत. रोजचे चालणे सरासरी तीस किलोमीटर होई. ह्या अनुभवाविषयी बोलताना नंतर एकदा जोशी म्हणाले,

''शरीर कष्टवणे ह्यालाही आपल्या संस्कृतीत एक आध्यात्मिक महत्त्व आहे. सर्वच साधक म्हणून शरीराला कष्ट देत असतात. हाही एक आयुष्यातला अनुभव आहे व तो मला घ्यायचा होता.''

२६ मार्च २००३पर्यंत, म्हणजे पुढच्या १३० दिवसांत, त्यांनी ३००० किलोमीटरची परिक्रमा पूर्ण केली; आता फक्त शेवटचा ५०० किलोमीटरचा टप्पा बाकी होता. दुर्दैवाने त्या दिवशी खलघाटनंतरच्या ठिकरी या मुक्कामी अचानक त्यांना श्वास घ्यायला त्रास होऊ लागला; बोलणेही अस्पष्ट होऊ लागले. घाईघाईने सहकाऱ्यांनी त्यांना इंदोरला हलवले व तेथील अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्वरित उपचार सुरू झाले. डॉक्टरांनी पुढे प्रवास करायला सक्त बंदी केली. पुढचे तीन आठवडे त्यांनी त्या हॉस्पिटलमध्येच काढले. तेथून शेवटी ४ एप्रिलला ट्रेनने पुण्याला परतले. तब्येतीने शेवटपर्यंत साथ दिली नाही याचे शल्य होते, पण जवळजवळ ऐंशी टक्क्यांहून अधिक परिक्रमा आपण पूर्ण केली ह्याचे समाधानही जोशींना होते. 'एका अर्थाने माझी ती स्ट्रेस टेस्ट झाली!' ते म्हणाले. ह्या प्रवासातला एक गमतीचा भाग म्हणजे जोशींसकट सर्वांनीच दाढी वाढवली होती! त्यावेळच्या फोटोंत जोशी ओळखताच येत नाहीत!

ह्या अखेरच्या काही वर्षांत जोशी अध्यात्माकडे वळले होते ह्याचा इथे उल्लेख करायला हरकत नाही. त्यांचे एक सहकारी धुळ्याचे रवी देवांग हे विपश्यना केंद्र चालवतात. दोन वेळा जोशी त्यांच्या शिबिरांना हजर राहिले. विपश्यनेत मौनाला खूप महत्त्व. जोशींना ते अवघड वाटले. २००० साली पहिल्या प्रयत्नात पाचच दिवसात त्यांनी साधना सोडली. दोन वर्षांनी पुन्हा प्रयत्न केला व दहा दिवसांची साधना पूर्ण केली. पण त्यात त्यांना विशेष लाभदायक असे काही जाणवले नाही. रोज दोनदा ते संध्या करत. उपनिषदे, गीता, योगसूत्रे तासन्तास वाचत. त्यांच्यासारख्या निरीश्वरवादी माणसाला ह्या सगळ्यातून नेमके काय साधायचे होते हे सांगणे अवघड आहे. त्यांचे एक स्नेही, नागपूरचे प्रसिद्ध विधिज्ञ व आता सर्वोच्च न्यायालयातील एक न्यायाधीश शरद बोबडे यांनी त्यांना ह्या मार्गाविषयी सांगितले, असे ते एकदा मला म्हणाले होते; पण त्यावर त्यांनी अधिक काही नेमके भाष्य केले नव्हते. अर्थात दुसऱ्या कोणीतरी सुचवले म्हणून काही करणाऱ्यांपैकी जोशी नव्हते; कुठेतरी त्यांनाही ह्या मार्गाने एकदा जाऊन पाहावे असे वाटत असणार. इतरांच्या मनात त्यांची जी प्रतिमा होती, तिच्याशी अगदी विसंगत असेच त्यांचे हे नवे अध्यात्मप्रेम होते. अनेक सहकाऱ्यांना ते खटकतही असे. पण एकदा एखादी गोष्ट करायची ठरवल्यावर, काहीही झाले तरी ती करायचीच, हा त्यांचा स्वभावच होता. नर्मदा परिक्रमेच्या वेळीही अनेकांनी त्यांना 'तुम्ही अलीकडेच मोठ्या दुखण्यातून उठले आहात. तरुणांनाही खूप दमवणारी अशी ही यात्रा आहे. कशाला उगाच हे करता?' असे पुनःपुन्हा सांगितले होते. त्याकडे दुर्लक्ष करत जोशी परिक्रमेला

गेलेच. ह्या अध्यात्माच्या बाबतीतही जोशींनी आपला मार्ग सोडला नाही; आपली साधना अगदी शेवटाशेवटापर्यंत ते करतच राहिले.

शेवटच्या काही दिवसांत जेव्हा जेव्हा ते आंबेठाणला जात, तेव्हा तेव्हा ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा वगैरेंचे अर्थासह वाचन करत. ह्यावेळी श्याम पवार व सुरेशचंद्र म्हात्रेदेखील त्यांच्याबरोबर असत. शंकराचार्य हा त्यांचा विद्यार्थिदशेपासूनच जिव्हाळ्याचा विषय होता. कुंडलिनी जागृती, योगसाधना यांविषयीदेखील ते वाचन करत. ३ सप्टेंबर २०१५ रोजी त्यांचा ऐंशीवा वाढदिवस त्यांनी श्याम पवार यांच्या आंबेठाणजवळच्या म्हाळुंगेमधील हॉटेलातच अगदी साधेपणे व काही मोजक्याच सहकाऱ्यांच्या उपस्थितीत साजरा केला. पवार लिहितात,

> संघटनेचे एक श्रद्धावान कार्यकर्ते, यवतमाळचे बापट यांची कन्या सानिका, आळंदीचे ह.भ.प. किसन महाराज साखरे यांची सून झाली आणि आळंदीला आली. त्या संबंधातून त्यांच्याशी भेटीचा योग जुळून आला. शरद जोशी आम्हाला समवेत घेऊन तीन वेळा साखरे महाराजांच्या भेटीला गेले. आपल्या मनातील आध्यात्मिक भूक यामुळे शमविता येईल असा त्यांचा प्रयत्न होता. तथापि, साखरे महाराजांनी विशेष चर्चा केली नाही असे मला जाणवले. कदाचित पंढरपूरची वारीची परंपरा आणि एकूणच वारकरी संप्रदायाच्या विषयाने सुरुवातीच्या दिवसांत शरद जोशी यांनी जी जाहीर मते व्यक्त केली होती, त्याचाही तो परिणाम असावा. त्यानंतर भेट झाली नाही. आजारानेही चांगलेच मूळ धरले होते.
>
> (*बळीराजा,* सप्टेंबर २०१६, पृष्ठ ३३-४)

हॉस्पिटलच्या वाऱ्या सांभाळूनही जोशी आपल्यापरीने आध्यात्मिक साधना करतच राहिले. पुढे अंथरुणाला खिळल्यावरच ते नाइलाजाने थांबले. ह्या अध्यात्मयात्रेत त्यांना काही प्रकाशकण गवसले होते का, हा प्रश्न आता कायम मूक राहणार आहे.

७ जुलै २०१०मध्ये राज्यसभेचा सहा वर्षांचा कालावधी संपल्यावर जोशी कायम वास्तव्यासाठी पुण्याला परतले. दिल्लीला असतानाच आंबेठाण येथील ज्या प्लॉटवर घर होते तो प्लॉट सोडून, आजूबाजूची शक्य तेवढी शेतजमीन विकायचा निर्णय त्यांनी घेतला होता. १९७७ साली घेतली, तेव्हा ती एकूण साडेतेवीस एकर होती व त्यातली १८ एकर, म्हणजे साधारण तीन चतुर्थांश जमीन, त्यांनी २००५ ते २००७ या कालावधीत दोन-तीन टप्प्यांत विकली. अर्थात आज त्याची किंमत बरीच जास्त मिळाली असती, पण तसा विचार करण्यात काहीच अर्थ नाही.

आदली पंचवीस-तीस वर्षे आर्थिकदृष्ट्या त्यांना फारच हलाखीची गेली होती; नोकरी सोडताना मिळालेले फंडाचे व इतर थोडेफार साठवलेले पैसे घर व शेती खरीदण्यात गेल्यावर नियमित उत्पन्न असे फारच थोडे होते. शेती कायम तोट्यातच होती. महागाईच्या दिवसांत

नवे काही उत्पन्न नसताना केवळ साठवलेल्या पुंजीवर दिवस काढणे तसेही अवघडच होते. लौकरच ती संपली. खूपदा महिन्याचा घरखर्च भागवण्याइतकेही पैसे हाती नसत. अधूनमधून घरातील वस्तू विकून दिवस काढायची पाळीही त्यांच्यावर आली होती. आईच्या मृत्यूनंतर ती राहत असलेला सदिच्छा बंगला विकायचा निर्णय सर्व भावंडांनी मिळून १९९२-९३च्या सुमारास घेतला. त्या वाट्याचे आलेले पैसेही थोडे थोडे करत संपलेच. दरम्यान स्वतःचा औंधच्या सिंध सोसायटीतील *मृद्‌गंध* बंगला त्यांनी भाड्याने दिला होता; घरखर्चासाठी काही नियमित उत्पन्न मिळावे म्हणून. पण लौकरच तो बंगला त्यांनी विकूनही टाकला व सेनापती बापट रोडवर बिना अपार्टमेंट येथे एक फ्लॅट खरेदी केला होता. या दोन्ही व्यवहारांतील फरकाची रक्कमही पुन्हा उदरनिर्वाहासाठी उपलब्ध झाली होती. जोशींची एकूण आर्थिक परिस्थिती किती बेताबाताची झाली होती याची यावरून कल्पना यावी.

आंदोलनासाठी अनेकदा जोशींनी स्वतःच्या बचत खात्यातून पैसे दिलेले आहेत. त्यांची दैनंदिन राहणी इतर सर्वसामान्य कार्यकर्त्यांसारखीच होती. तेही एसटी बसने व ट्रेनच्या तृतीय श्रेणीने प्रवास करत. 'तुम्हीसुद्धा या वयात, आजारी असताना वर्धा स्टेशन ते रवीच्या घरापर्यंत भल्या मोठ्या बॅग्स हातात घेऊन, मध्यरात्रीनंतर पायी जाण्याचा, पाच-पाच तास सलग बोलण्याचा रोमँटिसिझम धकवून नेता तो यापुढे बंद करावा,' असे मोहन गुंजाळ यांनी एका पत्रात त्यांना लिहिले होते. पंजाबला जाताना इतरांबरोबर तेही कसे रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर झोपले हे अनंत उमरीकर सांगतात. 'दोन हातात दोन बॅगा घेऊन रेल्वेच्या डब्यात शिरणाऱ्या' जोशींना बघून अ. वा. कुळकर्णी आश्चर्य व्यक्त करतात. भंडारदऱ्याहून पुण्याला परतताना दोन्ही मुलींना विनाआरक्षित एसटी बसमध्ये कसेबसे बसवून स्वतः ड्रायव्हरशेजारी बसणाऱ्या जोशींचे म्हात्रेंना अप्रूप वाटते. पुन्हा हे सारे जराही कुरकुर न करता किंवा कुठल्याही प्रकारचे अवडंबर न माजवता जोशी वर्षानुवर्षे करत गेले.

इथे हेही नमूद करायला हवे, की १९७६ मध्ये भारतात परतल्यानंतरच्या चाळीस वर्षांत स्वतः जोशीदेखील फक्त पाच-सहा वेळाच परदेशी गेले. केवळ काही महत्त्वाच्या परिषदांसाठी. तेही बहुतेकदा अगदी सात-आठ दिवसांसाठी. अनेक सेवानिवृत्त मध्यमवर्गीय नागरिकदेखील हल्ली वर्षातून एखादी परदेशवारी करताना दिसतात आणि अनेक सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते तर त्या बाबतीत अगदी कॉर्पोरेट अधिकाऱ्यांशी स्पर्धा करताना दिसतात. त्या पार्श्वभूमीवर स्वतः आठ वर्षे परदेशी वास्तव्य केलेले असून आणि स्वतःच्या दोन मुली परदेशी स्थायिक झालेल्या असूनही जोशींनी इतका कमी विदेश प्रवास करावा हे अधिकच उठून दिसणारे आहे.

आर्थिक चणचणीबद्दल त्यांनी चुकूनही कधी कोणापाशी तक्रार केली नव्हती, पण निकटचे कार्यकर्ते एकूण परिस्थिती ओळखून होते व खूपदा शक्य ती मदतही करत असत. उदाहरणार्थ, सांगलीचे जयपाल फराटे (पुढे जे संघटनेचे अध्यक्षही झाले) यांची एक जोशींनी स्वतःच सांगितलेली आठवण. ''जयपालअण्णा यांनी ते एकदा पुण्याला माझ्या घरी आले

असताना, माझ्या घरखर्चासाठी म्हणून, एक हजार रुपये गुपचूप हाती ठेवले होते आणि त्यावेळी ती रक्कम मला बरीच मोठी वाटली होती,'' असे जोशी एका भाषणात गहिवरलेल्या आवाजात म्हणाले होते. प्रस्तुत लेखकाला फराटे यांनी पाठवलेल्या १० मार्च २०१२ तारखेच्या एका पत्रातही या घटनेचा उल्लेख आहे. चाकणच्या कांदा आंदोलनाविषयी वाचून फराटे खास त्यांना भेटायला म्हणून पुण्याला गेले होते व हे हजार रुपये त्यांच्या गावातल्या शेतकऱ्यांनी जमा केले होते. त्या काळात त्यांचा प्रवासाचा व इतरही अनेक प्रकारचा खर्च कार्यकर्तेच काही न बोलता परस्पर भागवत.

अगदी सुरुवातीला भारतात परतल्यावर त्यांनी काही वर्षांच्या कालावधीत घेतलेली आधीची जीप व नंतरची अँबॅसडर ही दोन वाहने जुनी झाल्यावर रद्दबातल करावी लागली होती. त्यानंतरची काही वर्षे कार्यकर्त्यांनी पैसे गोळा करून त्यांच्यासाठी घेतलेली एक मोटार ते वापरत असत. अखेरच्या काही वर्षांत ते वापरत असलेली इनोव्हा मोटार वर्ध्याच्या रवी काशीकर यांनी वापरण्यासाठी दिली होती, तर ड्रायव्हर बबन शेलार हे कोपरगावचे भास्करभाऊ बोरावके यांनी दिले होते. पुढे त्यांचा प्रवास कमी होत गेल्यावर ते पुण्यातील जगताप नावाच्या भाड्याने ड्रायव्हर पुरवणाऱ्या गृहस्थांकडून कामानुसार कोणीतरी ड्रायव्हर मागवत असत. आंदोलनकाळात त्यांची अनेक गंभीर आजारपणेही झाली व बराच खर्च कार्यकर्त्यांनीच आपापसात पैसे गोळा करून भागवला होता.

त्यागाचे हे ज्वलंत उदाहरण समोर असल्याने मिळेल तिथे हात मारून घ्यायचा, हा इतर संस्थांत वा पक्षांत दिसणारा प्रकार शेतकरी संघटनेच्या बाबतीत सहसा कधी घडलेला नाही.

जमीन विकल्यामुळे उर्वरित आयुष्यात मात्र बऱ्यापैकी आर्थिक स्थैर्य जोशींच्या वाट्याला आले. पुण्याच्या बोपोडी भागात देवी ऑर्किड या इमारतीत दहाव्या मजल्यावर त्यांनी दोन सदनिका एकत्रित असलेली एक प्रशस्त सदनिका २००८ साली खरेदी केली. चारही बाजूंनी विहंगम दृश्य दिसायचे व ते बघायला त्यांना फार आवडे. त्यांची आयुष्याची शेवटची काही वर्षे तशी आर्थिकदृष्ट्या कसलीही ओढाताण न होता गेली.

आर्थिक सुस्थिती आल्यानंतर त्यांनी आवर्जून केलेल्या एका गोष्टीचा इथे उल्लेख करायला हवा. ती होती शिवार ॲग्रो प्रॉडक्ट्स लिमिटेड या कंपनीच्या संदर्भात. खुल्या अर्थव्यवस्थेचे स्वागत करताना युरोप-अमेरिकेतील सुपर मार्केटच्या धर्तीवर खरेदी-विक्री केंद्रांची एक साखळी उभी करायला हवी असे ते म्हणाले होते. 'खुली अर्थव्यवस्था कोणासाठी थांबत नाही; अशी यंत्रणा तुम्ही उभी केली नाही तर दुसरे कोणीतरी करतीलच' असेही त्यांनी शेतकऱ्यांना निक्षून सांगितले होते. कोणीतरी कार्यकर्ता याबाबतीत पुढाकार घेईल याची तब्बल दोन वर्षे त्यांनी वाट बघितली. पण काहीच घडले नाही. मग त्यांनी स्वतःच ३१ ऑक्टोबर १९९३ रोजी औरंगाबाद येथील अधिवेशनात उपरोक्त कंपनीच्या स्थापनेची घोषणा केली. प्रत्यक्षात अपेक्षित भांडवल जमा झालेच नाही म्हणून आणि इतरही काही कारणांमुळे ती कंपनी कधी उभीच राहिली नाही. याबद्दल पूर्वी लिहिलेलेच आहे. 'शेतकरी संघटक'च्या ६ जानेवारी

२००७च्या अंकात स्वतःच्या सहीनिशी प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात जोशी लिहितात,

> शेतकरी संघटनेवर आणि व्यक्तिशः माझ्यावर प्रेम करणाऱ्या पाइकांचे पैसे अडकून पडले याचे शल्य गेली पंधरा वर्षे माझ्या मनात डाचत आहे. माझ्या शब्दाखातर गुंतवलेली ही रक्कम परत करणे ही मी माझी व्यक्तिगत जबाबदारी समजत असून १ एप्रिल २००७च्या आत त्यातून मुक्त व्हायचे मी ठरविले आहे. त्यासाठी, आंबेठाण येथील माझ्या जमिनीतील काही हिस्सा विकून मी तरतूद केली आहे. कंपनी सुरूच न झाल्यामुळे आज कंपनीच्या भागांचे बाजारमूल्य काहीच नसले तरी शेतकरी संघटनेच्या पाइकांकडील भागांचे दर्शनी मूल्य त्यांना परत करण्याचा निर्णय मी घेतला आहे. ज्या भागधारकांना आपली रक्कम परत हवी आहे, त्यांनी आपले भाग खालील पत्त्यावर २० मार्च २००७च्या आत पाठवून द्यावेत; म्हणजे कंपनीच्या दस्तावेजांमध्ये पडताळणी करून त्यांची रक्कम पाठवणे शक्य होईल.

ज्यांनी 'शिवार'मध्ये पैसे गुंतवले होते त्यातले बरेच संघटनेच्या कुटुंबातलेच होते, त्यांच्या रकमाही तशा छोट्या होत्या व ते पैसे परत मिळावेत अशी त्यांची काही अपेक्षाही नव्हती. संघटनेशी फारसा संबंध नसलेले किंवा ज्यांना पैशाची खूप गरज होती अशा काही जणांनी आपले मूळ गुंतवणुकीचे पैसे परत मागितले व कबूल केल्याप्रमाणे ते जोशींनी लगेच पाठवूनही दिले. एकूण परत केलेली रक्कम १,७९,००० रुपये होती. खरे तर कायदेशीरदृष्ट्या अशा प्रकारची कुठलीच जबाबदारी जोशींवर नव्हती; ना ते कंपनीचे प्रवर्तक होते, ना संचालक. कंपनी उभी राहू शकली नाही ह्यात व्यक्तिशः त्यांचा काही दोषही नव्हता व कोणीही त्यांना तसा दोष कधी दिलाही नव्हता. पण तरीही स्वतःच्याच पुढाकारातून याची नैतिक जबाबदारी घेऊन त्यांनी हे पैसे परत केले.

या सांजपर्वात सुरुवातीच्या काळात ठणठणीत असलेली जोशींची प्रकृती हळूहळू त्रास देऊ लागली. २० डिसेंबर १९९८ रोजी पुण्याहून दिल्लीला जाताना विमानातच त्यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यानंतर दीड महिन्यानी, ४ फेब्रुवारी १९९९ रोजी, दिल्लीलाच इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर (दुसऱ्यांदा) अँजिओप्लास्टी करण्यात आली; मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या एका वाहिनीत स्टेंट बसवण्यात आला. दोनच महिन्यांनी, ५ एप्रिल १९९९ रोजी, मुंबईच्या बॉम्बे हॉस्पिटलमध्ये डॉ. सुबोध भट्टाचार्य यांनी त्यांच्यावर बायपास सर्जरी केली. जोशी स्वतःच्या तब्येतीची डॉक्टरांच्या सूचनांनुसार काळजी घेत; नियमित तपासण्या करून घेत. आदली काही वर्षे कमी कमी करत आणलेली सिगरेटही त्यांनी बायपासनंतर पूर्णतः वर्ज्य केली होती. मधुमेहाचा त्रास पूर्वीपासून होताच, पण औषधोपचारांनी सगळे नियंत्रणाखाली होते.

परंतु १० फेब्रुवारी २०११ रोजी डॉ. अशोक गुलाटी यांनी 'अन्नसुरक्षा' या विषयावर आयोजित केलेल्या एका आंतरराष्ट्रीय परिसंवादासाठी दिल्लीला गेले असताना हॉटेलच्या लॉबीतील जिन्यावरून ते पडले. पहिल्या पायरीपासून जमिनीपर्यंत गडगडत आले;

बेशुद्धावस्थेत खाली पडले. कधी नव्हे ते या प्रवासाला ते एकटेच गेले होते; दीदी त्यावेळी त्यांची स्वतःची आई वारल्यामुळे बडोद्याला गेल्या होत्या. कसेबसे त्यांना इंद्रप्रस्थ हॉस्पिटलमध्ये दाखल केले गेले. खरे तर खाली यायला समोरच लिफ्ट उपलब्ध होती, पण तरीही त्यांनी जिना उतरून जायचे का ठरवले, ते त्यांचे त्यांनाही नंतर सांगता आले नाही.

हा आघात त्यांना शेवटची तीन-चार वर्षे खूप त्रासदायक ठरला. मेंदूला मार लागल्याने स्मरणशक्तीवर तसेच विचार व्यक्त करायच्या क्षमतेवर परिणाम झाला व त्यांच्या जवळच्या व्यक्तींना ते जाणवत असे. खांद्याला मोठीच इजा पोचली होती व हाताचा वापर करणेही अवघड झाले. 'आता उर्वरित आयुष्य मला दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागणार,' अशी खंत त्यांनी म्हात्रेंपाशी व्यक्त केली होती. दुर्दैवाने ती खरी ठरली.

त्यांच्याबरोबर केलेल्या एका लांबच्या प्रवासाचा अनुभव सांगण्यासारखा आहे. ३० जुलै २०१२ला केसीसी (Kisan Coordination Committee)ची बांदा येथे बैठक होती. मीही सोबत चलावे अशी त्यांची इच्छा होती. बांदा हे उत्तर प्रदेशातील एक जिल्ह्याचे ठिकाण. ज्याला बुंदेलखंड म्हणतात तो हाच परिसर. राजा छत्रसाल आणि बाजीरावाची मस्तानी इथलीच. इतक्या लांबच्या ठिकाणी जोशी कसे जाणार याचीच त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांना काळजी; पण जोशींची फार इच्छा होती.

आम्हां दोघांशिवाय अनंतराव देशपांडे, बद्रीनाथ देवकर, वामनराव चटप व शैलजा देशपांडे हेही या प्रवासात बरोबर होते.

डॉ. साहेब लाल शुक्ला हे बुंदेलखंडातले शेतकरीनेते आमचे स्थानिक यजमान. केसीसीची बैठक बांद्याला एकदातरी व्हावी या त्यांच्या आग्रहामुळे ही बैठक इतक्या अडनडी गावी ठरली होती.

आमच्या आगेमागे इतरही प्रांतांतले काही शेतकरीनेते तिथे हजर झाले. कर्नाटकचे हेमंत कुमार पांचाल, आंध्रचे एस. पी. शंकरा रेड्डी, पंजाबचे भूपिंदर सिंग मान वगैरे. सकाळी दोन-अडीच तास बैठक झाली. मग संध्याकाळी जाहीर सभा. केसीसीची ती बैठक मला अगदीच अपेक्षाभंग करणारी वाटली. नंतरची संध्याकाळची जाहीर सभाही. दात काढलेल्या सिंहाप्रमाणे झालेली त्यांची अवस्था आम्हांला कोणालाच बघवत नव्हती. संघटनेत आता दम राहिला नव्हता, हे मला व बरोबरच्या अनेकांना पदोपदी जाणवत होते; पण हे जोशींना जाणवत होते का, हा प्रश्नच आहे.

हॉटेल सारंग इंटरकॉन्टिनेन्टलमध्ये सगळ्यांची राहायची सोय केली होती. नाव आणि वास्तव यांत जेवढा फरक आपण कल्पू शकतो, तो सगळा इथे होता. लिफ्ट एकदाही चालली नाही. दोन मजले पायीच चढायचे-उतरायचे. पहिल्याच रात्री जोशींना हॉटेलात खूप अस्वस्थ वाटू लागले, सॉर्बिट्रेटची गोळी द्यावी लागली. त्या आडगावी काही झाले तर काय करायचे, ह्या विचाराने त्यांच्या खोलीतच राहणाऱ्या अनंतराव देशपांडे यांचे व आम्हां सगळ्यांच्याच काळजाचे ठोके चुकत होते.

तरीही त्यांच्या इच्छेनुसार दुसऱ्या दिवशी आम्ही चित्रकूटलादेखील जाऊन आलो. पूर्वी तो परिसर म्हणजे बांदा जिल्ह्याचाच एक तालुका होता. आठ-दहा वर्षांपूर्वी चित्रकूटला एका स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा मिळाला. भाजपचे नानाजी देशमुख यांनी राजकारणातून निवृत्ती घेतल्यानंतर या अत्यंत मागासलेल्या भागात ग्रामविकासाचे मोठे काम उभे केले आहे. इथले रामदर्शन हे प्रदर्शनही प्रसिद्ध आहे. रामाच्या जीवनातील विविध प्रसंग तिथे चित्रित केले आहेत. मुंबईचे प्रसिद्ध चित्रकार सुहास बहुळकर यांचा ह्यात मोठा सहभाग होता. तिथेही जोशींनी दोन तास खर्च करून एक प्रदक्षिणादेखील घातली.

मुळात बांद्याला जाणे हाच मोठा द्राविडी प्राणायाम होता. आधी भल्या सकाळी पुण्याहून विमानाने नागपूरला जायचे. तेथून गोंडवाना एक्स्प्रेसने झांसी. रात्री बारा वाजता झांसीला उतरायचे आणि तिथून रात्री दोन वाजता संपर्क क्रांती एक्स्प्रेस पकडायची. ती बांद्याला जाते. प्रत्यक्षात ती दोन तास उशिरा आली. रात्रीचा तो सगळा वेळ आम्ही प्लॅटफॉर्मवरच काढला. परत येताना पुन्हा तोच प्रकार. एकूण सगळा फार जिकीरीचाच प्रवास. प्लॅटफॉर्म बदलण्यासाठी व्हीलचेअर शोधणे म्हणजेही मोठे दिव्य होते. आपल्याकडे कागदोपत्री सगळ्या सोयी असतात, पण प्रत्यक्षात प्रत्येक गोष्टीकरता धावपळच करावी लागते. जोशींना स्वतःलाही हे परावलंबित्व विलक्षण क्लेशदायकच असणार.

पण या सगळ्या प्रवासात दोन गोष्टी मला प्रकर्षाने जाणवल्या.

एक म्हणजे सर्व सहकाऱ्यांचे जोशींवर असलेले निरतिशय प्रेम. त्यांच्यापैकी कोणालाच आता जोशींकडून काहीही मिळवण्यासारखे असे नव्हते, पण तरीही एखाद्या आज्ञाधारक मुलाने स्वतःच्या वडलांची म्हातारपणी घ्यावी, तशीच सगळे त्यांची काळजी घेत होते. परतताना एक रात्र आमचा रवी काशीकर यांच्या नागपूरच्या घरी मुक्काम होता व त्यावेळीही जोशींना भेटायला माणसांची अगदी रीघ लागली होती. त्यात ज्योतिषी चंद्रशेखर शर्मांपासून पत्रकार सुरेश द्वादशीवारांपर्यंत सगळ्या प्रकारची माणसे होती आणि सगळेच जोशींविषयी अतिशय आदराने बोलत होते. त्यात चमचेगिरीचा भाग जराही दिसत नव्हता, कारण आता 'मधुघटची रिकामे पडती घरी' अशीच जोशींची स्थिती होती; जाणवत होती ती अकृत्रिम आपुलकी. वाटले, सहकाऱ्यांचे हे निरपेक्ष प्रेम ही जोशींची खूप मोठी कमाई आहे.

दुसरी मला प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे जोशींची ऐंशीच्या उंबरठ्यावरही टिकून असलेली कमालीची जिद्द आणि त्या जिद्दीपोटी कुठलीही शारीरिक गैरसोय सहन करायची अपरिमित क्षमता. ह्या वयात ही सगळी दगदग म्हणजे शरीराचे हालच, पण सगळ्या प्रवासात मी एकदाही त्यांच्या तोंडून तक्रारीचा एक शब्दही ऐकला नाही.

असाच अनुभव आम्ही ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात गुणवंत पाटील हंगरगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त नांदेडला गेलो होतो तेव्हा आला. गुणवंतभाऊंनी प्रचंड घाट घातला होता. भव्य शामियाना उभारला होता. त्यांचा जनसंपर्क दांडगा. लांबून लांबून लोक आले होते.

प्रकृती ठीक नसतानाही व्यासपीठावर चार तास एकाच प्लास्टिकच्या खुर्चीत जोशी बसून होते. अखंड चाललेली भाषणे, भोवतालची प्रचंड गजबज, असह्य उकाडा हे सारे तसे त्रासदायकच वाटत होते; पण जोशींच्या चेहऱ्यावर त्रासाची बारीकशी छटाही नव्हती. वाटले, ऐन उमेदीत ह्या माणसाचा झपाटा काय जबरदस्त असला पाहिजे! आणि दोन दिवस त्यांना भेटणाऱ्यांची अखंड रांग. आमदार शंकर धोंडगेंपासून लांबून लांबून आलेल्या अगदी सामान्य शेतकरी बंधू आणि भगिनींपर्यंत. पुन्हा तेच प्रेम. शेतकरी आंदोलनाचा बहर ओसरून अनेक वर्षे लोटल्यानंतरही टिकून राहिलेले! ऐन वसंतात त्या प्रेमाचा आविष्कार किती उत्कट असला पाहिजे! वाटले, 'शेतकऱ्यांचे पंचप्राण' असे जोशींचे वर्णन केले जायचे ते यथार्थच होते.

२५ नोव्हेंबर २०१४ ही यशवंतराव चव्हाण यांची तिसावी पुण्यतिथी. त्यानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा एक लाखाचा मानाचा पुरस्कार प्रतिष्ठानच्या मुंबईतील सभागृहात प्रतिष्ठानचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात जोशींना दिला गेला. कार्यक्रमाला जोशी अर्धा-एक तास उशिरा पोचले, पण आले हेच विशेष. त्यावेळी ते फारच थकलेले दिसले. जोशींचा हा जवळजवळ शेवटचाच मोठा असा कार्यक्रम. पंजाबबद्दलच्या प्रकरणात सुरुवातीलाच त्याचा उल्लेख झालेला आहे.

आयुष्यात भेटलेल्या व्यक्तींपैकी कोणाचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला या विषयावर आम्ही काही वेळा बोललो. एक लेखक म्हणून, संपादक म्हणून आणि माजी केंद्रीय मंत्री म्हणून अरुण शौरी प्रख्यात होते. साहजिकच त्यांचा विषय निघाला होता. ''मी आणि शौरी साधारण एकाच सुमारास भारतात परतलो,'' बऱ्याच वर्षांपूर्वी एकदा जोशी सांगत होते. ''तो वर्ल्ड बँकेतून आणि मी यूएनमधून. दिल्लीत आमची कधीकधी गाठ पडते. तेव्हा या तीस वर्षांत आपण काय कमावले ह्या विषयावर चर्चा होते.'' त्या चर्चेचा निष्कर्ष जोशींनी सांगितला नाही. विषय बदलला. या मुद्द्यावर खोलात जाऊन अधिक काही विचारणे मलाही अप्रशस्त वाटले. दिल्लीत राजीव गांधींच्या विरोधात एखादी आघाडी स्थापन करायच्या उद्देशाने त्यांनी बोलावलेल्या एका बैठकीत त्यांनी शौरींना 'तुम्ही देशाचे पंतप्रधान होऊ शकता' असे सुचवल्याचे आठवत होते. त्या बैठकीचा संदर्भ मागे आला आहे. संघटनेने आयोजित केलेल्या दोन-तीन परिसंवादांतही शौरींचा सहभाग होता. पुढे पुण्याजवळ लवासा येथेच ते राहायलाही आले होते.

शौरी हे केवळ एक उदाहरण म्हणून लिहिले; पण दिल्लीइतकी नसली तरी मुंबई-पुण्यातही राष्ट्रीय पातळीवर नाव असलेली बरीच मंडळी होती. परंतु पुण्यात आल्यावर व बऱ्यापैकी निवांत वेळ उपलब्ध असतानाही त्यांच्यापैकी कोणाशी मैत्री जोडायचा जोशींनी प्रयत्न केल्याचे जाणवत नाही. फारसे कोणी भेटायला आलेले त्यांना आवडतही नसे आणि तसे कोणी येतही नसत. भेटायला येणाऱ्यांमध्ये संघटनेतील जुने साथीदारच प्रामुख्याने असत. नाही म्हणायला लिबरल ग्रुपच्या लोकांशी त्यांचा संपर्क असायचा. *Down to Earth* हे त्यांचे हिंदूच्या 'बिझिनेस लाइन'मधील सदरलेखनाचे हार्ड बाउंड संकलन याच लोकांनी

दिल्लीहून प्रकाशित केले.

''तसा मी अनेकांना भेटलो, पण माझ्यावर खूप प्रभाव पडला आहे अशा कुठल्या व्यक्तीचं नाव मला नाही सांगता येणार. किंबहुना कोणामुळेच मी फार भारावून गेलो असं म्हणता येणार नाही. कॉलेजातले प्राचार्य मुरंजन, संस्कृतचे शिक्षक अभ्यंकर, पोस्टातले बॉस वेलणकर, ज्ञानेश्वर विद्यापीठाचे मनोहर आपटे, दुर्गाबाई भागवत, अहमदाबादच्या सेवा या संघटनेच्या इलाबेन भट अशी काही मोजक्या माणसांविषयी मला आदर वाटतो, पण त्या कोणाहीपेक्षा पुस्तकांचा आणि पुस्तकांपेक्षा मी स्वतः केलेल्या विचारांचा व घेतलेल्या अनुभवांचा माझ्यावर जास्त प्रभाव आहे.'' असे एकदा ते म्हणाले होते.

पुढे पुढे त्यांच्याबरोबर खोलात जाऊन चर्चा करणे अवघड होत गेले. लगेचच त्यांच्या मेंदूला शीण यायचा; त्यांना फार काळ बसवतही नसे. दोन वेळा आमच्या भेटीची वेळ व चर्चेचा विषय हे आदल्या दिवशी फोनवर ठरलेले असतानासुद्धा तब्येत नरम असल्याने त्यांना झोपूनच राहावे लागले. अर्थात बोलण्यासारखे बहुतेक सारे बोलून झालेही होते. आमच्या औपचारिक मुलाखतवजा भेटी त्यानंतर थांबल्या; त्यानंतरच्या भेटी केवळ त्यांची तब्येत कशी आहे एवढे पाहण्यापुरत्याच झाल्या; संभाषण व्हायचे ते काहीतरी जुजबी स्वरूपाचे.

कधी कधी आम्ही प्रश्नोत्तरे बाजूला सारून आणि कुठलीही गंभीर चर्चा करण्याऐवजी हलक्याफुलक्या विषयांवरही बोलायचो. एक दिवस अल्फ्रेड हिचकॉकच्या *The man who knew too much* या गाजलेल्या रहस्यपटातील डोरिस डे हिच्या 'Ke sera sera; Whatever will be, will be; Future's not ours to see; Ke sera sera; What will be, will be.' ह्या प्रसिद्ध गाण्याचे रेकॉर्डिंग मी त्यांना लागोपाठ दोनदा ऐकवले. त्यांना ते गाणे मनापासून आवडत होते. कदाचित त्यांचीही मनोभूमिका त्यावेळी तीच होती. 'के सेरा सेरा हे फ्रेंच आहे बरं का' असे ते दीदींना म्हणाले. 'हा आवाजही डोरिस डेचाच आहे, की आणखी कुणाचा?' याचे कुतूहल त्यांना होते. अमिताभ बच्चन आणि दीपिका पदुकोण यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या *पिकू* या चित्रपटाची कहाणी मी त्यांना एकदा ऐकवली होती. हा बहुधा मे २०१५ मधला प्रसंग असेल. त्यांना ती फारच आवडली. 'आपण सगळेच तो बघायला जाऊ या, तुम्ही तिकीटं बुक करून टाका' असे ते अनंतरावांना म्हणालेसुद्धा. दोन दिवस वाट बघून नंतर मी त्यांना आठवणही केली, ते 'हो, हो' म्हणाले; पण प्रत्यक्षात त्यांचा उत्साह काही तेवढा टिकला नाही. असे खूपदा व्हायचे.

घरी बसून बसून ते बेचैन होत, सारखे कुठेतरी लांब भटकायला जावे असे वाटे. मोटारीत बसूनच मग ते इकडेतिकडे फिरून यायचे; आंबेठाणलाही जायचे. पुण्याजवळ दिघी इथे एक टेकडीवरचे दत्तमंदिर आहे. चांगला अर्ध्या-पाऊण तासाचा चढ आहे. अनंतरावांचा हात धरून एकदा ते त्या देवळातही जाऊन आले; 'त्याशिवाय माझा आत्मविश्वास वाढणार नाही' ही त्यांची त्या धाडसामागची भूमिका. पावसाळ्यात महाबळेश्वर-पाचगणीच्या एखाद्या हॉटेलात जाऊन त्यांना आठ दिवस राहायचे होते, तेथील एखाद्या चांगल्या हॉटेलची चौकशी करायला त्यांनी मला सांगितले होते व ती करून मी त्यांना सगळी माहिती दिलीही होती. त्याना

ब्रह्मगिरीलाही जायचे होते. आपला २०१५ सालातला वाढदिवस तिथे त्यांना लोकांपासून दूर अशा एखाद्या निवांत जागी एकांतातच घालवायचा होता. अर्थात प्रत्यक्षात यातले काहीच कधी झाले नाही. शेवटी शेवटी असेच एकदा ते जिद्दीने सज्जनगडावरही जाऊन आले. भंडारदऱ्यालाही गेले होते. त्यांना नेणे-आणणे बरोबरच्यांनाही तसे अवघडच असायचे. अर्थात निरपेक्ष बुद्धीने आपल्या नेत्याची सेवा करायचा निर्धार असल्याने कोणी काही तक्रार करायचा प्रश्नच नव्हता.

९ ऑक्टोबर २०१५ रोजी त्यांनी आपले मृत्युपत्र तयार केले होते. मरणोत्तर जेव्हा ते जाहीर झाले तेव्हा कळले, की आपली पुण्यातील राहती सदनिका आपल्या दोन्ही कन्यांना त्यांनी दिली आहे व आंबेठाण येथील उर्वरित सुमारे सहा एकर जमीन तिच्यावरील अंगारमळा या घरासकट त्यांनी ३० सप्टेंबर २०१४ मध्ये नोंदणी झालेल्या 'शेतकरी संघटना' न्यासाला दिली आहे. न्यास स्थापन केला तेव्हा ते स्वतः मुख्य विश्वस्त होते. त्यांच्या पश्चात रवी काशीकर न्यासाचे प्रमुख असून बद्रीनाथ देवकर, सुरेशचंद्र म्हात्रे, अनंत देशपांडे, गोविंद जोशी, संजय पानसे, भास्करराव बोरावके, रामचंद्रबापू पाटील, वामनराव चटप, मानवेन्द्र काचोळे व अलका दिवाण हे न्यासाचे इतर विश्वस्त आहेत. ठेवीच्या स्वरूपात शिल्लक रक्कम होती तिच्यातून दर्शनी भट्ट, अनंत देशपांडे व सुरेशचंद्र म्हात्रे यांना प्रत्येकी वीस लाख रुपये द्यायची तजवीज त्यांनी केली. मृत्युपत्रातही त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे व शेतकरी संघटनेप्रती असलेल्या निष्ठेचे चांगले प्रतिबिंब उमटलेले आहे. शासनाने मरणोत्तर देऊ केलेली पद्मश्रीदेखील जोशी यांच्या कुटुंबियांनी नाकारली होती हे इथे नमूद करायला हरकत नाही.

सिंहावलोकन करताना केलेल्या विश्लेषणाला तसे मर्यादितच महत्त्व असते; माणूस त्या-त्या वेळी योग्य वाटेल तशी पावले उचलत जातो; असे झाले असते तर आणि तसे झाले असते तर, ही चर्चा व्यर्थच असते. पण तरीही जोशींच्या एकूण कार्याच्या संदर्भात मागे वळून पाहताना काय वाटते? स्वतः जोशींनी तसे काही सांगितले आहे का किंवा लिहिले आहे का?

त्यांचा तसा एक अप्रकाशित लेख वाचनात आला. २०१५ साली एका दिवाळी अंकाने 'आयुष्यात झालेल्या माझ्या चुका' ह्या विषयावर वेगवेगळ्या व्यक्तींकडून लेख मागवले होते. त्यात जोशींचाही लेख मागवला गेला होता. जोशींनी तो लिहिलाही होता, पण प्रकाशनासाठी पाठवला मात्र नाही. त्यांच्या त्या अप्रसिद्ध राहिलेल्या लेखात त्यांनी स्वतःला जाणवलेल्या आपल्या काही चुका नोंदवलेल्या आहेत.

आपली पहिली चूक म्हणून त्यांनी राजकारणात शिरायची वेळ चुकल्याचा उल्लेख केला आहे. ऊस आंदोलन जोरात असताना नाशिक जिल्ह्यात सर्वत्र काँग्रेसविरोधी वातावरण होते व शेतकरी संघटनेला प्रचंड जोर होता. त्यानंतर झालेल्या १९८५च्या निवडणुकीत शेतकरी संघटनेने आपले सगळे बळ शरद पवारांच्या पुरोगामी लोकशाही दलाच्या मागे उभे केले व मुख्यतः त्याचमुळे पुलोदने त्या निवडणुकीत नाशिक जिल्ह्यातील विधानसभेच्या सर्वच्या सर्व

बारा जागा जिंकल्या. मग पवारांना पाठिंबा देण्याऐवजी त्याचवेळी शेतकरी संघटना स्वतःच निवडणुकीच्या आखाड्यात उतरली असती तर? आपल्या उपरोक्त लेखात जोशी म्हणतात,

''पण त्या वेळी मी पक्षउभारणीचा कार्यक्रम करण्याऐवजी 'कधी तुमच्याकडे मते मागायला आलो तर मला जोड्याने मारा' अशा तऱ्हेचा आविर्भाव करून बसलो होतो! त्यातून बाहेर पडण्यासाठी मला बराच वेळ लागला.''

नंतर राजकारणात शिरायचा निर्णय घेतल्यावर त्यांनी तशाही अनेकांच्या शिव्या खाल्ल्याच; त्या जर आधीच खाल्ल्या असत्या व ८५ सालीच निवडणुकीत उडी घेतली असती, तर बरेच काही पदरात पडून गेले असते आणि मग एकूण परिस्थितीच खूप बदलली असती, असे त्यांना वाटते. जोशी म्हणतात,

''संघटनेने स्वतःच त्या निवडणुका लढवल्या असत्या तर नाशिक जिल्ह्यातल्या त्या सर्वच्या सर्व बारा जागा शेतकरी संघटनेला मिळाल्या असत्या आणि मग शेतकरी संघटनेचे राजकारणातील अपयश हे कोणालाही टोमणा मारायला शिल्लक राहिले नसते.''

दुसरी चूक ते अशी सांगतात –

''संघटनेचा सगळा भर शेतीमालाच्या विक्रीतून शेतकऱ्याला अधिक पैसे कसे मिळतील यावर होता. पण त्याबरोबर शेतजमिनीची उपलब्धता जसजशी कमी होते, तसतसा शेतजमिनीच्या विक्रीतूनही शेतकऱ्यांच्या हाती अफाट पैसा येतो – जे आज प्रत्यक्ष घडते आहे – हे शेतकरी संघटनेला अचूकपणे हेरता आले नाही. पुढे शेतीच्या विक्रीचा व्यवसाय करणारी 'गुंठामंत्र्यां'ची जमात तयार झाली. त्यांनी गावागावात जमिनीचे व्यवहार करून प्रचंड उत्पन्न मिळवले. शेतकऱ्यांनाही शेतीमालाऐवजी जमिनीच विकून जन्मात कधी पाहिला नव्हता इतका पैसा मिळाला. त्यांनी मग घरे बांधली, मोटारगाड्या घेतल्या, इतरत्र जमिनी घेतल्या. 'शेतीमालाच्या भावाइतकाच, किंबहुना त्याहून अधिकच पैसा शेतजमिनीच्या खरेदी-विक्रीतूनही मिळू शकतो' हे बदललेले वास्तव शेतकरी संघटनेच्या विचारात कुठेच चपखल बसत नव्हते.''

आपली आणखी एक चूक नोंदवताना जोशी म्हणतात,

''शेतकरी संघटना ही कायमच खेडेगावातील लोकांची संघटना राहिली. खरे तर अण्णा हजारेंच्या खूप आधी भ्रष्टाचाराचा मुद्दा संघटनेने उठवला होता. लातूर जिल्ह्यात 'उसने पैसे परत घेणे' असा भ्रष्टाचारविरोधी प्रयोगही केला होता. म्हणजे नाइलाजाने लाच म्हणून द्यावे लागलेले पैसे त्या-त्या अधिकाऱ्याविरुद्ध निदर्शने करून त्याच्याकडून परत घेणे. 'नेता-तस्कर, गुंडा-अफसर...' अशी घोषणाही आम्ही दिली होती. परंतु त्याकरिता आवश्यक तितके परिणामकारक व व्यापक आंदोलन शेतकरी संघटनेला उभे करता आले नाही. त्यामुळे 'खेडेगावातील लोकांचे आंदोलन' हे तिचे स्वरूप कायम राहिले. अण्णा हजारे वगैरेंच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाला आताच्या माध्यमयुगाचाही पाठिंबा मिळाल्यामुळे ते आंदोलन पुष्कळ यशस्वी झाले असे दिसते.''

अर्थात हा अप्रसिद्ध लेख त्यांनी आयुष्यात अगदी अखेरच्या काळात लिहिला व त्याचा

परिणाम म्हणून शेतकरी संघटनेच्या धोरणात काही बदल घडायची वेळ केव्हाच निघून गेली होती.

जोशींना लाखो शेतकऱ्यांनी अलोट प्रेम दिले, पण अभिजनवर्गातील अनेक जण मात्र कायम त्यांच्या विरोधात राहिले. संघटनेतून बाहेर पडलेले काही साथी, राजकारणी, डावे विचारवंत, अर्थशास्त्री वगैरेंच्या टीकेबद्दल चौदाव्या प्रकरणात लिहिलेच आहे; पण त्याव्यतिरिक्त असे काही समाजघटक होते का ज्यांचा विरोध काहीसा गैरसमजातून निर्माण झाला होता व थोडे प्रयत्न करून जोशी तो टाळू शकले असते?

असा एक महत्त्वाचा समाजघटक म्हणजे स्वयंसेवी संस्था किंवा ज्यांना एनजीओ म्हटले जाते अशा संस्था. पत्रकारांमध्ये व एकूणच समाजात या स्वयंसेवी संस्थांबद्दल बरीच सद्भावना होती. जोशींनी स्वयंसेवी संस्थांवर सतत तोफ डागल्यामुळे तो मोठा प्रभावशाली घटक त्यांच्या कायम विरोधात गेला.

समाजसेवी कार्यकर्त्यांवरील जोशींची टीका अत्यंत धारदार आहे; कार्यकर्त्यांच्या साऱ्या आयुष्यभराच्या श्रद्धा हलवून टाकणारी आहे.

त्यांनी जेव्हा शेतीला सुरुवात केली त्यावेळी महाराष्ट्रात व एकूणच भारतात एनजीओ मोठ्या प्रमाणावर सुरू होत होत्या. त्यांना अनेकदा विदेशी फंडिंग असायचे, तसेच युनायटेड नेशन्सचे जोरदार पाठबळही असायचे. विकासकामासाठी उपलब्ध केला जाणारा बराचसा सरकारी निधी त्यांच्यामार्फत वितरित व्हायचा. स्वतः युनायटेड नेशन्सचे काम करत असताना जोशींनी या साऱ्यातील भ्रष्टाचार अगदी जवळून पाहिला होता. त्याकाळात बऱ्याच स्वयंसेवी संस्थांत अपप्रवृत्ती शिरल्या होत्या, त्यांच्यावर टीका करणे गैर नव्हते; पण साऱ्याच स्वयंसेवी क्षेत्राला इतके मुळापासून तोडायचे जोशींना खरे तर काहीच कारण नव्हते.

रेड क्रॉससारख्या स्वयंसेवी संस्थांबद्दल जोशींना आदर होता; निपाणी आंदोलनानंतर त्यांनी रेड क्रॉसची मदतही मागितली होती.

शीख गुरुद्वारांमधील लंगरचे त्यांना कौतुक होते. लंगरमध्ये कोणाही गरजू व्यक्तीची जेवण्याची व राहण्याची सोय काही दिवसांकरितातरी नक्की होते. त्या कालावधीत त्याला स्वतःचा रस्ता शोधायची सवड मिळते. म्हणूनच पंजाबमध्ये भिकारी दिसत नाहीत; उलट छोटे छोटे व्यावसायिक मात्र खेडोपाडी दिसतात. 'दारिद्र्यनिर्मूलनाचा या देशातील यशस्वी झालेला एकमेव कार्यक्रम म्हणजे शिखांचे लंगर,' असे त्यांनी म्हटले आहे.

अनेक स्वयंसेवी कार्यकर्त्यांबद्दलही त्यांना व्यक्तिशः आदर होता. स्वतःचा उत्तम चालणारा इंजिनिअरींग व्यवसाय सोडून पाणीप्रश्नावर काम करणारे विलासराव साळुंखे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून बाहेर पडून म्हैसाळला स्वतःच्या बळावर ग्रामसुधार प्रकल्प उभारणारे मधुकर देवल. राजकारणात शिखरावर असतानाच त्यातून निवृत्त होऊन चित्रकूटला ग्रामोद्धाराचे काम उभारणारे नानाजी देशमुख. महिला कामगारांची आणि फेरीवाल्यांची Self-Employed Women's Association (SEWA) ही प्रबळ संघटना उभारणाऱ्या

इलाबेन भट. विद्यापीठाची मान्यता न घेता उत्तम तांत्रिक शिक्षण देऊन हजारोंना नोकऱ्या मिळवून देणाऱ्या ज्ञानेश्वर विद्यापीठाचे मनोहर आपटे. अशा अनेकांचे त्यांना कौतुक होते. तरीही एकूण सामाजिक कार्यावर त्यांनी खूपच टीका केली.

सामाजिक कार्यात सहभागी होणाऱ्यांची भारतातली संख्या एक-दोन टक्केसुद्धा नसताना आणि अन्य सारा समाज पूर्णत: स्वार्थाच्या मागेच लागलेला असताना जोशींनी पुन्हा स्वार्थाचा पुरस्कार करावा व सेवावृत्तीचा कठोर उपहास करत राहावे, याचे खूप आश्चर्य वाटते.

स्वार्थाचा आणि एकूणच मुक्त अर्थव्यवस्थेचा कायम गुणगौरव करणाऱ्या आयन रँडच्या युनायटेड स्टेट्समध्येसुद्धा स्वयंसेवी क्षेत्राला प्रचंड जनाधार होता व आहे. असंख्य अमेरिकन अशा सेवाकार्यात सहभागी होत असत व आजही होतात. किंबहुना अमेरिकेचा उल्लेख आजही 'अ नेशन ऑफ जॉइनर्स' असा केला जातो. या साऱ्या पार्श्वभूमीवर जोशींनी स्वयंस्फूर्त कार्याला केलेला प्रखर विरोध असमर्थनीय वाटतो. त्यातून विनाकारण अनेक जण दुरावले.

'मी केवळ माझ्या आनंदासाठी युएनमधली नोकरी सोडून भारतात परतलो, या कामात पडलो. यात त्याग वगैरे अजिबात नाही, समाजसेवा तर नाहीच नाही' असे त्यांनी वेळोवेळी कितीही ठासून सांगितले, तरी अन्य जगाच्या दृष्टीने त्यांनी जे केले तो त्यागच होता; समाजहितासाठी केलेले समर्पणच होते. पण मग तरीही 'हे मी इतरांसाठी नाही, स्वत:साठीच करतो आहे' ही भूमिका त्यांनी का घ्यावी?

कदाचित असे तर नसेल, की शेतकरी संघटनेच्या अगदी सुरुवातीच्याच काळात त्यांना काही कटू सत्ये जाणवली होती? ''तुम्ही मांजराला मिठाई खायला घालत असला, आणि एवढ्यात त्याला एखादा उंदीर दिसला, तर मिठाई सोडून ते मांजर उंदराच्याच मागे पळत जाईल,'' असे माधवराव मोरे आपल्याला म्हणाल्याचे त्यांनी एके ठिकाणी लिहिले आहे. तसे काही अनुभव त्यांना आले होते का? आणि मग त्यागी भावनेतून केलेल्या कार्यातूनही जर निराशाच हाती येणार असेल, तर मग आपले कार्य हा त्याग नव्हताच, त्यापासून कुठलेच श्रेय अपेक्षित नव्हते, ते करण्यातला आनंद मिळविणे एवढेच आपले ईप्सित होते, ही भूमिका त्यांना अधिक सुरक्षित वाटली असेल?

उघड उघड केलेल्या प्रचंड त्यागाचे श्रेय नाकारण्याचा त्याग ही त्यांनी अंतर्मनाच्या गाभ्याचे संरक्षण करण्यासाठी घेतलेली कवचकुंडले होती का?

काही गैरसमज शरद जोशींबद्दल उगाचच प्रचलित आहेत. एक म्हणजे अर्थवादाच्या मागे लागून त्यांनी चारित्र्यसंवर्धनाला दुय्यम लेखले हा. नैतिकतेला महत्त्व देणाऱ्यांचा त्यांनी केलेला उपहास हाही अनावश्यक होता. खरे तर नैतिकतेच्या गप्पा मारणाऱ्या इतर अनेकांपेक्षा जोशींचे वागणे अधिक नैतिक होते, व्यक्तिगत पातळीवर अधिक प्रामाणिक होते.

त्यांना वारकरी संप्रदायाचे वावडे होते हा असाच एक गैरसमज. त्यांनी सुरुवातीच्या

काळात वारकऱ्यांवर खूप टीका केली हे खरे आहे व प्रकरण नऊमध्ये तो भाग आलाच आहे. शेतीला सुरुवात केली त्यावेळच्या त्यांच्या अनुभवावर ती टीका आधारलेली होती. पण वारकरी संप्रदायाची चांगली बाजूही त्यांनी पुढे आठ-दहा वर्षांनी लिहिलेल्या आपल्या *शेतकऱ्यांचा राजा शिवाजी* (प्रकाशन १८ एप्रिल १९८८) या छोट्या पण महत्त्वाच्या पुस्तकात अतिशय प्रभावीपणे मांडली आहे. त्यांची त्या संदर्भातली काही काही विधाने इथे उदधृत करण्याजोगी आहेत.

"'जयजय रामकृष्ण हरी' आणि 'पुंडलिक वरदा'च्या घोषाने दुःखे संपली नाहीत तरी, या दुःखांपलीकडे पाहण्याची ताकद समाजाला मिळाली."

"ज्ञानेश्वरांपासून तुकाराम महाराजांपर्यंत सर्व संतांनी जातिव्यवस्थेतील उच्चनीचतेवर आपल्या लिखाणाने आणि वागणुकीने उघडपणे आघात केले. शूद्रातिशूद्रांना समाज पारखा झाला होता. संतांनी उपदेशिलेल्या भक्तिमार्गामुळे त्यांच्या मनात आसपासच्या समाजाशी आपले काहीतरी लागेबांधे आहेत अशी भावना तयार होणे शक्य झाले."

"संतांनी बजावलेली आणखी एक मोठी कामगिरी म्हणजे अध्यात्म व धर्म जनसामान्यांच्या मराठी भाषेत मांडणे. संतांनी जनसामान्यांना धर्मविचाराचे एक नवीन दालन उघडून दिले. धर्म म्हणजे निरर्थक वटवट नाही, धर्मविचार सामान्य जीवनातही महत्त्वाचा आहे याची जाणीव जनसामान्यांना पहिल्यांदी झाली. तुकडे तुकडे झालेल्या समाजाला एकत्र जोडण्याकरिता संतांनी केलेले हे काम अद्वितीय मानावे लागेल."

"पंढरपूरची वारी हा निराधारांचा आधार आहे. वारकरी पंथाने या चलनवलनातील लाचारीचे रूप काढून टाकले. पंढरपूरला जाणारे पोटार्थी भिकारी राहिले नाहीत; पंढरीनाथाचे पुण्यवान भक्त झाले. त्यांना भाकरतुकडा घालणारे श्रीमंत दाते राहिले नाहीत; विठोबाच्या भक्तांच्या सेवेचे मानकरी झाले. महाराष्ट्रातील भक्तिमार्ग हा एक अत्यंत बिकट दैन्यावस्थेत समाजाला तगवून ठेवणारा चमत्कार ठरला."

दुर्दैवाने जोशींची ही वारकरी संप्रदायाचा अत्यंत तार्किक व वस्तुनिष्ठ गौरव करणारी मांडणी फारच कमी लोकांपुढे पोचली.

जोशींबद्दल अगदी विनाकारण प्रचलित असलेला आणखी एक गैरसमज म्हणजे त्यांच्यामागे फक्त बडे बागाईतदार होते. मुळात 'कसेल त्याची जमीन' हे धोरण सरकारने अमलात आणल्यानंतर महाराष्ट्रात मोठी शेती अशी जवळजवळ नव्हतीच. जी काही होती तिच्याही पुढील पिढ्यांत वाटण्या होऊन प्रत्येक कुटुंबाचे उर्वरित क्षेत्र हे छोटेच होते. त्यातल्या त्यात जे शेतकरी धनिक होते, त्यांचा पैसा हा शेतीतून नव्हे तर अन्य उत्पन्नाच्या साधनांतून किंवा राजकारणातून आला होता. तशी मंडळी सहकारी साखर कारखाने किंवा पतपेढ्या किंवा दूधसंघ यांच्यामागे होती; शेतकरी आंदोलनात त्यांच्यापैकी क्वचितच कोणी आले असेल; किंबहुना त्या मंडळींचा जोशींना व शेतकरी संघटनेला कायम विरोध होता. ही मंडळी बहुतांशी काँग्रेससमर्थक होती.

आमची १९९९ साली पहिली भेट झाली तेव्हा ते 'बिना अपार्टमेंट्स'मध्ये राहत होते व तिथे त्यांच्याबरोबर मी दोनतीनदा तरी जेवलो; डायनिंग टेबलाभोवतीच आमचे बोलणे व्हायचे. त्यांची ती सुमार अशा इमारतीतील सदनिका, घरातले साधे फर्निचर, त्यांचे कपडे, त्यांचे जेवण हे सर्वच 'कुलक' ह्या प्रतिमेशी अगदी विसंगत होते. त्यानंतरही पुढच्या सतरा वर्षांत त्यांची जीवनशैली जवळून बघता आली. उच्चपदी काम केलेल्या कुठल्याही सरकारी नोकरापेक्षा अथवा एखाद्या प्राध्यापकापेक्षा त्यांची राहणी अधिक आरामदायी होती असे मला तरी कधीच जाणवले नाही. 'बड्या बागाईतदारांचे प्रतिनिधी' वगैरे आरोप त्यांच्यावर करणे म्हणजे उघडउघड दुष्टपणा होता.

जोशींनी खुल्या अर्थव्यवस्थेचे समर्थन केले म्हणजे ते 'बड्या भांडवलदारांचे बगलबच्चे' होते हाही असाच एक बिनबुडाचा गैरसमज! वस्तुस्थिती याच्या नेमकी उलट होती. सरकारच्या तथाकथित समाजवादी धोरणांचा सर्वाधिक फायदा भारतातील भांडवलदारवर्गाला होत होता. त्यांना मुळात खुली अर्थव्यवस्था व त्यातून येणारी स्पर्धा नकोच होती. लायसन्स-परमिट राज त्यांच्या पथ्यावरच पडणारे होते. एकदा एखादे उत्पादन करायचे लायसन्स मिळवले, की त्या मालाची परदेशाहून कधी आयात होणार नाही याची दक्षता घ्यायची, एवढेच त्यांचे काम होते. ते येन केन प्रकारेण जमवले, की आपले दुय्यम प्रतीचे उत्पादन भारतात अवाच्या सवा किमतीला विकणे त्यांना सहजशक्य होते. कारण एकदा स्पर्धा निर्माणच होऊ दिली नाही, की सगळे सेलर्स मार्केटच होते! माणसे विकत घ्यायची कला या भांडवलदारांना अवगत होती; केवळ राजकारणीच नव्हे तर कामगारनेते, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, सरकारी अधिकारी वगैरे सगळीच समाजातील सत्तास्थाने पैशाच्या जोरावर वश करता येत होती.

चेतना गाला यांनी मुंबईला इंडियन मर्चंट्स चेंबरमध्ये एकदा जोशींचे मुक्त अर्थव्यवस्थेवर भाषण ठेवले होते. नवल म्हणजे त्यावेळी उपस्थित उद्योगपतींनी व त्यांच्या प्रतिनिधींनी जोशींना समर्थन देणे सोडाच, उलट खूप विरोधच केला होता. बौद्धिक संपदेचे रक्षण करण्याच्या डंकेल अहवालातील कलमावरून तर जोशींच्या भूमिकेला सर्वाधिक विरोध उद्योगपतींनी केला – विशेषतः औषध कंपन्यांनी. शेतकरी संघटनेला किंवा स्वतंत्र भारत पक्षाला कुठल्या बड्या भांडवलदाराने किंवा देशी-विदेशी फंडिंग एजन्सीने कधी मोठी देणगी दिल्याचे माझ्यातरी ऐकिवात नाही किंवा संघटनेच्या कुणा टीकाकारानेही तसे कुठे लिहिलेले नाही. आजकाल अगदी प्रादेशिक, राजकीय पक्षही शेकडो कोटींची माया जमवत असतात. हेच कॉर्पोरेट जग खरेतर अनेक तथाकथित पुरोगामी पक्षांना, व्यक्तींना व त्यांच्या संस्थांना मात्र वेळोवेळी कुठल्या ना कुठल्या स्वरूपात भरीव आर्थिक मदत करत होते. आणि त्यांच्याकडून भक्कम फंडिंग घेऊनही काही माणसे कायम 'पुरोगामी' म्हणून मिरवत आली आणि ज्याने तसे फंडिंग कधीच घेतले नाही, त्याला मात्र त्यांनी 'भांडवलशाहीचा बगलबच्चा' ठरवून टाकले!

जोशींच्या कामाचे मूल्यमापन करताना अंजली कीर्तने लिहितात,

> समाजवादाला कडवा विरोध करणारा हा विचारवंत! तो समाजाच्या पचनी पडला नाही. अनुल्लेखानं मारणं, कार्याची दखल न घेणं हे एखाद्याला नेस्तनाबूत करायचं, अवमानित करायचं, अगदी सुलभ आणि प्रभावी शस्त्र असतं. जोशींना ज्यांचा वैचारिक विरोध होता त्यांनी हे धारदार शस्त्र त्यांच्यावर मुबलक चालवलं. जोशींच्या कार्याला विरोध केला असता, तर विरोधाला तेजस्वी प्रतिकार करून जोशींनी विरोध परतवला असता. त्यापेक्षा सोपा मार्ग म्हणजे कार्याची दखल न घेणं, दुर्लक्ष करणं. प्रसिद्धीचे मार्ग बंद झाल्यानं जोशी ग्रामीण भागाच्या वर्तुळाबाहेर, शहरी संस्कृतीत फारसे पोहोचले नाहीत. उलट कांद्याचे भाव उगाचच वाढवणारा माणूस म्हणून शहरी माणसानं त्यांचा रागच केला.

छात्र युवा संघर्ष वाहिनीचे एकेकाळचे पूर्णवेळ कार्यकर्ते व आपल्या मार्मिक विश्लेषणात्मक लेखनाकरिता प्रसिद्ध असलेले यवतमाळचे सुधाकर जाधव 'शांत वादळाचा अंत' या आपल्या मृत्युलेखात म्हणतात,

> शरद जोशींचे वेगळेपण कोणते असेल, तर ते म्हणजे त्यांनी समाजवादी विचाराच्या कैदेतून विचारकांची आणि सामान्य जनांची सुटका करण्याचा शतकातील सर्वांत मोठा प्रयत्न आणि प्रयोग केला.

जे व्यक्तिशः जोशींच्या संपर्कात आले त्यांना त्यांची वास्तविक बाजू कळली, पण बहुसंख्य विचारवंत केवळ माध्यमांतून त्यांच्याविषयी जे प्रसृत होत गेले त्यावरच विश्वास ठेवत गेले व अशा मंडळींच्या मनात जोशींबद्दलचे गैरसमज कायम राहिले.

यातले अनेक गैरसमज जोशींना प्रयत्नाने दूर करता आलेही असते; पण आश्चर्य म्हणजे त्यांनी त्यादृष्टीने फारसे काही प्रयत्न केल्याचे दिसत नाही; एकूणच प्रतिमानिर्मिती हा प्रकार त्यांनी कायम टाळला. हीदेखील 'प्रत्यक्षाहुनि प्रतिमा अद्‌भुत' असलेल्या आजच्या जगात चूकच म्हणावी लागेल. टीकेकडे दुर्लक्ष करत राहायचे धोरण त्यांना महाग पडले असेच मागे वळून पाहताना वाटते.

सिंहावलोकन करताना जोशींचे प्रसारमाध्यमांशी (मिडियाशी) जे नाते होते, त्याबद्दलचे काही विचारही मनात येतात.

पूर्वी जयप्रकाश नारायण व बाबा आमटे यांना किंवा अलीकडे अण्णा हजारे व अरविंद केजरीवाल यांना मिडियाने जसे उचलून धरले, तसे जोशींच्या बाबतीत कधीच घडले नाही. कारण कदाचित मिडिया हाही शेवटी 'इंडिया'चाच भाग होता, 'भारताचा' भाग नव्हता आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्यामुळे माध्यमांमध्ये फारसे स्थानच नव्हते; तसे ते आजही नाही आहे. पण आपली प्रतिमा व्यापक समाजमनावर ठसवायची असेल, तर त्यासाठी आजच्याप्रमाणे

तेव्हाही मिडियाला पर्याय नव्हता हेही तितकेच खरे आहे. मिडियाच तुमची larger than life प्रतिमा बनवू शकतो – मग तुम्ही नेता असा वा नट, उद्योगपती असा वा विचारवंत. सत्तेसाठी मिडिया 'सांभाळणे' आजच्याइतकेच तेव्हाही अपरिहार्य होते. इंदिरा गांधींपासून एखाद्या स्थानिक नगरसेवकापर्यंत बहुतेक सर्व नेते तेव्हाही ते करतच होते; पण ते जोशींना कधीच जमले नाही.

सुरुवातीपासून ज्यांनी शेतकरी आंदोलनात रुची दाखवली अशा पुण्यातील एका पत्रकाराने सांगितलेल्या आठवणीनुसार, ऐंशीच्या दरम्यान आपली निळी जीन्स घालून आणि मोटारसायकलवर बसून जोशी खूपदा त्यांच्या कचेरीत जात, संपादकीय विभागात समोर दिसणाऱ्या कुणाच्याही टेबलावर एखादे कार्यक्रमाचे पत्रक ठेवत आणि 'बघा, वेळ मिळाला तर वाचा; आणि वाटलं तर छापा' असे म्हणून लगेच आल्या पावली निघून जात; गप्पा मारणे नाही, छापण्याबद्दल विनंती करणे नाही, संपर्क वाढावा म्हणून कुठल्याही प्रकारचा प्रयत्न नाही.

पुढे पुढे तर जोशींनी वृत्तपत्रांच्या कार्यालयात जाणेही थांबवले. अनेकदा काही कार्यकर्ते एखाद्या खास सभेसाठी 'पत्रकारांना मुद्दाम जाऊन भेटावं, त्यांच्याशी चर्चा करावी व त्यांना आमंत्रण द्यावं' असे सुचवत. जोशी त्यांना उत्तेजन देत नसत. ते म्हणत,

''आपण असा जंगी बार उडवायचा की पत्रकार आपणहूनच आले पाहिजेत. आपण कशाला कोणाचं लांगूलचालन करायचं?''

याचा अर्थ त्यांना प्रसिद्धी नको होती असा नाही; पण आपले काम इतके महत्त्वाचे आहे, की त्याची दखल माध्यमांना घ्यावीच लागेल असा त्यांना प्रचंड आत्मविश्वास होता.

सुरुवातीच्या काळात शेतकरी आंदोलनाकडे अनेक वृत्तपत्रे, विशेषतः शहरी मराठी वृत्तपत्रे, दुर्लक्ष तरी करत वा टीका तरी करत व त्यामुळे आपले कार्यकर्ते खचून जायची किंवा चिडायची शक्यता आहे ह्याची जोशींना जाणीव होती. महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांचा मतदारसंघ शेतकरी हाच आहे व नेमका तोच वर्ग आपल्यामागे येत असल्याने सत्ताधारी आपल्या कायम विरोधात असणार, येन केन प्रकारेण सरकारी आश्रयावर अवलंबून असणारी वृत्तपत्रेही आपल्या विरोधातच राहणार; पण एक ना एक दिवस त्यांना आपले महत्त्व मान्य करावेच लागेल हे जोशींचे गृहीतक होते. वर्धा येथील १९८० सालच्या अगदी सुरुवातीच्या प्रशिक्षण शिबिरातील भाषणात ते म्हणाले होते :

> हल्लीचे संपादक क्रिकेटपासून शेतकरी आंदोलनापर्यंत सगळ्याच विषयांवर सारख्याच अधिकाराने सल्ले देत असतात. त्यांतल्या बहुतेकांची धोरणं ही परिस्थितीनुरूप बदलत असतात. युरोपमधील फ्रान्सचा बादशहा सम्राट नेपोलिअन याच्या राज्यात एकदा बंड झालं आणि त्याला पकडून दूरवरच्या एल्बा नावाच्या बेटावर तुरुंगात ठेवलं गेलं. नेपोलिअनने तिथून आपली सुटका करून घेतली. त्यावेळी पॅरीसच्या वर्तमानपत्रांनी 'दरोडेखोर नेपोलिअनचे तुरुंगातून पलायन' अशा मथळ्याखाली ही बातमी प्रसृत केली. पुढे नेपोलिअनने सैन्य गोळा करून

> प्रदेशामागून प्रदेश काबीज केले. जसजसा तो राजधानी पॅरिसच्या जवळ येऊ लागला, तसतसे वर्तमानपत्रांचे मथळे बदलू लागले! आणि नेपोलिअन जेव्हा पॅरिसच्या वेशीपाशी आपल्या सेनेसह आला, तेव्हा वर्तमानपत्रांनी 'सम्राट नेपोलिअनचे भव्य स्वागत' असे ठळक मथळे दिले!

त्यांनी नेपोलियनचा संदर्भ द्यावा यावरून जोशींना स्वतःच्या कामाविषयी सुरुवातीपासून किती प्रचंड आत्मविश्वास होता हे दिसते; पण त्यांना अपेक्षित होते त्याप्रमाणे वृत्तपत्रांनी त्यांची नंतरही कधी भलावण केली नाही. किंबहुना नेपोलियनच्या वाटचालीत आला तसा पुनर्मूल्यांकनाचा योगही कधी जोशींच्या आयुष्यात आला नाही.

माध्यमांनी शरद जोशींची पाठराखण केली नाही याचे कदाचित सर्वाधिक मोठे कारण म्हणजे शरद जोशींनी १९९०नंतर केलेला खुल्या अर्थव्यवस्थेचा उत्साही पुरस्कार.

केवळ पत्रकारच नव्हे तर देशातील बहुतेक विचारवंत, लेखक, राजकारणी, नोकरशहा, कामगारनेते, सामाजिक कार्यकर्ते हे सारेच निर्णायक घटक त्याकाळात समाजवाद आणि एकूणच डावी विचारसरणी यांच्या प्रचंड प्रभावाखाली होते. प्रत्यक्षात तुम्ही एस्टॅब्लिशमेंटचाच एक अविभाज्य भाग असलात, आणि एस्टॅब्लिशमेंटचे सारे फायदे तुम्ही घेत असलात, तरीही तुमची समाजातील प्रतिमा मात्र अँटी-एस्टॅब्लिशमेंट असणे आवश्यक होते. व्यक्तिगत जीवनात तुम्ही कितीही ऐश्वर्यात राहत असलात आणि भ्रष्ट असलात तरी जाहीर वक्तव्यांत मात्र तुम्ही डाव्या, तथाकथित पुरोगामी विचारांचे आहात असा देखावा निर्माण करणे आवश्यक होते.

खुद्द जोशींना याची जाणीव होती. ''लालूप्रसाद यादव गुपचूप रेल्वेत प्रायव्हेटायझेशन आणू शकले; पण लोकांपुढे मात्र त्यांनी 'कुल्हडमधून चहा देणारा' हीच स्वतःची 'खेडवळ' प्रतिमा माध्यमांतून दृढ केली. मला तसं करता आलं नाही,'' आमच्या एका मुलाखतीत जोशी म्हणाले होते.

पण मग हे सारे जाणवूनसुद्धा त्यांनी आपल्या माध्यमसंपर्क धोरणात काहीच फरक का केला नाही? स्वतःशी प्रामाणिक राहायच्या आग्रहामुळे? अंतिमतः आपलीच भूमिका खरी ठरेल व सगळ्यांना स्वीकारावी लागेल या आत्मविश्वासामुळे? अहंकारामुळे? नेमके सांगणे अवघड आहे.

पण यात नुकसान माध्यमांचे नाही झाले, तर जोशींचे व एकूण शेतकरी आंदोलनाचेच झाले. कारण परिणामतः जोशींच्या एक दशांशही माणसे ज्यांच्या मागे नव्हती अशा अनेकांनी वृत्तपत्रांतील ठळक मथळे काबीज केले आणि जोशी कुठेतरी मागच्या पानावरच अडकले. त्याकाळी सोशल मिडिया हा प्रकार अर्थातच नव्हता, आजच्याएवढ्या टीव्ही वाहिन्याही नव्हत्या. त्यातल्या त्यात ग्रामीण वृत्तपत्रांनी शेतकरी आंदोलनाला थोडीफार प्रसिद्धी दिली, पण मोठ्या शहरांतल्या वृत्तपत्रांनी त्या आंदोलनाकडे जवळजवळ दुर्लक्षच केले. बहुतेक अभिजनवर्ग शहरातच राहत असे व तोच मतप्रवर्तक वर्ग होता, देशाची धोरणे ठरवणारा किंवा

त्या प्रक्रियेवर प्रभाव टाकू शकणारा होता. ग्रामीण भागातील बातम्या नीट पोचवण्यासाठी त्याकाळी तरी बहुतेक वृत्तपत्रांकडे यंत्रणाही नव्हती. आजच्याप्रमाणे तेव्हा संगणकाचा, इंटरनेटचा, जलद छपाई यंत्रांचा, स्थानिक आवृत्त्यांचा व एकूणच तंत्रज्ञानाचा सर्वदूर प्रसार झाला नव्हता. त्यामुळे शेतकरी आंदोलनाला शहरी वर्गात योग्य ती प्रसिद्धी कधीच मिळाली नाही. उलट संघटनेच्या रास्ता रोको वगैरेंमुळे आपली गैरसोय होते हेच त्यांना प्रकर्षाने जाणवत राहिले.

पत्रकारांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन त्यांनी थोडा बदलायला हवा होता असे आज वाटते. जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन आणि नंतरचे आणीबाणीविरुद्धचे आंदोलन ह्यांत सक्रिय भाग घेतलेली अनेक ध्येयवादी आणि प्रामाणिक तरुण मंडळी ऐंशीच्या दशकात पत्रकारितेत शिरली होती. त्यांतील काहींशी जरी जोशींनी चांगले संबंध जोडले असते व टिकवले असते तरी त्याचा त्यांना खूप उपयोग झाला असता असे वाटते.

माध्यमांपासून अलिप्त राहिल्यामुळे म्हणा किंवा त्यांच्याशी जोडून घ्यायचा फारसा प्रयत्न न केल्यामुळे म्हणा, आपल्या आर्थिक लढ्यात आणि मुख्य म्हणजे आपल्या राजकारणात जोशींना माध्यमांचा उपयोग झाला नाही व त्यांच्या अपयशाचे ते एकमेव नसले तरी एक कारण नक्की होते.

राजकारणातील हे अपयश जोशींना जाणवत होते त्याहून खूप महाग पडले असे वाटते. राजकारणातील यशामुळे त्यांच्या अनेक समस्या सुटू शकल्या असत्या. उदाहरणार्थ, कार्यकर्त्यांची आर्थिक सोय लावणे. स्वतः कायम अर्थवादी मांडणी करत असताना, आर्थिक समृद्धीचे महत्त्व अधोरेखित करत असताना, जोशींना स्वतःच्या कार्यकर्त्यांची नीट आर्थिक सोय लावता आली नाही व हा त्यांच्या कामातला एक मोठाच अंतर्विरोध होता. 'शेतकरी संघटनेच्या तालुका अध्यक्षाला निदान मामलेदाराएवढेतरी मानधन आपण द्यायला हवे' असे ते अनेकदा म्हणाले होते. प्रत्यक्षात ते कधीच जमले नाही. सुरुवातीला कार्यकर्त्यांना दरमहा तीनशे रुपये मिळावेत म्हणून त्यांनी कृषि योगक्षेम संशोधन न्यासातर्फे प्रयत्न केले. निफाडच्या व इतर दोन-तीन साखर कारखान्यांनी उसापोटी शेतकऱ्यांना द्यायच्या रकमेतील काही विशिष्ट रक्कम शेतकरी संघटनेची वर्गणी म्हणून कापायची व संघटनेकडे एकरकमी जमा करायची असे ठरले. गेल्या तीस-चाळीस वर्षांत कामगार संघटना हे अगदी सर्रास करत आल्या आहेत व त्यामुळे त्यांच्याकडे सहसा कधी आर्थिक चणचण नसते. काही युनियन्स तर संपकरी कामगाराला आवश्यक तेवढे वेतनही देऊ शकत होत्या; इतकेच नव्हे तर कारखान्याच्या मालकांना जरूर पडली तर कर्जही देऊ शकत होत्या. शेतकरी संघटनेच्या बाबतीत मात्र हे प्रयत्न अगदीच अपुरे आणि अल्पजीवी ठरले; घरचे खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचाच प्रकार कायम असायचा. ह्या परिस्थितीला 'संन्याशाचे वैभव' वगैरे म्हणणे काही काळापुरते ठीक होते, पण ती दीर्घकालीन व्यवस्था नव्हती. त्यामुळे कौटुंबिक व अन्य

अडचणींमुळे अर्थार्जन करणे आवश्यक होते असे बहुसंख्य कार्यकर्ते हळूहळू आंदोलनातून काढता पाय घेऊ लागले. निवडणुकीतील यशातून हे सारे पालटले असते.

राजकीय सत्ता मिळाली असती तर इतरही अनेक फायदे झाले असते यात शंकाच नाही. राजकीय सत्तेबरोबर शेकडो लोकांना उपकृत करायची एक मोठी संधी प्राप्त होते. असंख्य समित्या असतात, महामंडळे असतात, पदे असतात, विदेश दौरे असतात; कोणाला साखर कारखाना दे, कोणाला कॉलेज काढू दे, कोणाला दूध महासंघ दे, अनुदाने दे, सदनिका वा भूखंड दे, सरकारी कंत्राटे दे; अशा अगणित मार्गांनी एक लाभार्थींचा गोतावळा (system of patronage) तयार करता येतो. प्रचंड आर्थिक बळ लाभते. पैशाकडे पैसा जातो या न्यायाने ते वाढतच जाते. सत्तेचा उपयोग करून माध्यमांशी चांगला संपर्क ठेवता येतो; आपली जनमानसातील प्रतिमाही जोपासता येते. सत्ताधीशांची उपद्रवक्षमतादेखील भरपूर असते. या साऱ्यातून सर्वोच्च नेत्याची सत्ता अधिकाधिक बळकट होतेच, पण इतरही अनेकांना नेता बनायची संधी मिळते. 'लोकांची सेवा करायची तर सत्ता ही हवीच,' असे स्वतः लोकनेता असलेले यशवंतराव चव्हाणही म्हणत.

ही राजकीय सत्ता, त्यातून तयार होणारी आर्थिक हितसंबंध जोपासणारी यंत्रणा, कार्यकर्त्यांना आत्मविकासासाठी व अधिकाधिक मोठे बनण्यासाठी मिळणारा वाव, त्यातून त्यांना लाभणारे बळ, अशा बलिष्ठ कार्यकर्त्यांची व नेत्यांची दुसऱ्या फळीतील साखळी आणि त्यांतून साधले जाणारे सर्वोच्च सत्तेचे सातत्य यांपासून शेतकरी संघटना कायम वंचित राहिली.

जेव्हा तुम्ही दुसऱ्याला काही देऊ शकता, तेव्हा तुम्हांला काहीतरी मिळायची शक्यताही दुणावते. एखादी मोठी संस्था किंवा व्यवसाय किंवा राजकीय सत्ता हाती असेल तर इतरांना देण्यासारखे बरेच काही तुमच्यापाशी असते; जे जोशींपाशी अजिबातच नव्हते.

शेतीमालाला वाजवी दाम ह्या एक-कलमी कार्यक्रमावर सर्व लक्ष केंद्रित केल्यामुळे इतर काही महत्त्वाच्या प्रश्नांकडे जोशींचे फारसे लक्ष गेले नाही अशी काहीशी टीका त्यांच्यावर केली गेलेली आहे.

उदाहरणार्थ, अगदी सुरुवातीला त्यांनी शेतीला सुरुवात केली तेव्हा त्या संपूर्ण परिसरात गुरांचा डॉक्टर एकही नव्हता. शेतीच्या दृष्टीने ती मोठी गंभीर समस्याच होती. कारण त्यामुळे औषधाविना गुरे मरायचे प्रमाण तिथे भरपूर होते. शिवाय त्या काळात देशात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सुरू झालेली संकरित गाईंची पैदास आंबेठाण परिसरात फारशी होत नव्हती. त्यामुळे दूधसंघ उभे राहणे वगैरे प्रकार दूरच होते. जेमतेम घरातील मुलांच्या वाट्याला येईल इतकेच दूध उपलब्ध असे. पुण्यापासून अगदी जवळ असलेल्या उरळीकांचन येथील मणिभाई देसाई व त्यांच्या सहकाऱ्यांचे या क्षेत्रातील काम देशभर वाखाणले जात होते. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती या जोडधंद्यामुळे सुधारत होती. ज्या देशी गाई सरासरी एक-दोन लिटरपेक्षा जास्त दूध कधीच देत नव्हत्या, त्या विदेशी वळूशी संकर केल्यावर सरासरी वीस-बावीस लिटर दूध सर्रास देत होत्या. ही सारी परिस्थिती जोशींना नक्कीच माहीत असली पाहिजे. अशी

श्वेतक्रांती त्यांनी स्वित्झर्लंडमधेही पाहिलीच होती. पण का कोण जाणे, आपल्या शेतीच्या प्रयोगांना जोशींनी ह्या श्वेतक्रांतीची जोड दिली नाही. आपल्या आंबेठाणच्या शेतावर सुरुवातीला त्यांनी गोठा बांधून घेतला होता, दोन-तीन म्हशी पाळल्याही होत्या; पण दोन-तीन वर्षांतच त्यांनी तो जोडधंदा बंद करून टाकला.

साताऱ्याचे रमेश आगाशे हायड्रोलॉजिस्ट म्हणून केंद्र सरकारच्या नोकरीत वरिष्ठ पदावर होते. शरद जोशींच्या पंजाब आंदोलनाच्या काळात ते चंडीगढलाच होते. धरण आणि कालवे यांद्वारे होणाऱ्या पाणी वाटपात नदी खोऱ्याच्या खालच्या भागातील शेतकऱ्यांवर किती मोठ्या प्रमाणात अन्याय होतो, पाण्याचे न्याय्य असे समवाटप होणे का गरजेचे आहे वगैरे प्रश्नांवर त्यांनी जोशींशी केलेला पत्रव्यवहार उपलब्ध आहे. त्यात 'पाणी प्रश्नाचे गांभीर्य आपण पुरेसे विचारात घेतले नाही' असे जोशींनी कबूल केले आहे.

इतरही अनेक शेतीविषयक प्रश्नांकडे जोशींचे दुर्लक्ष झाले असे आता मागे वळून बघताना म्हणता येईल. याबाबत जोशींचे स्वतःचे समर्थन असे होते :

''शेतीमालाला वाजवी दाम मिळायला हवा ह्याच मुद्द्यावर लढण्यात आमची सगळी ताकद लागली होती. त्यामुळे शेतीउत्पादन वाढावं म्हणून काही प्रयत्न करण्यात मला स्वारस्य वाटत नसे. कारण एकदा शेती व्यवसाय तोट्यात आहे म्हटल्यावर जेवढं उत्पादन अधिक, तेवढा तोटा अधिक असा माझा सरळ हिशेब होता. त्यामुळे सुरुवातीच्या आठ-दहा वर्षांत तरी इतर कुठल्या गोष्टींकडे मी लक्षच दिलं नाही. त्या वेळच्या परिस्थितीत ते बरोबरच होतं.''

सिंहावलोकन करताना इतरही काही प्रश्न मनात येतात.

उदाहरणार्थ, ते स्वत:ला एक यात्रिक म्हणवतात, पण या यात्रिकाची यात्रा 'शेतीमालाला रास्त भाव' या एकाच मुक्कामाशी जरा जास्तच तर रेंगाळली नाही ना?

'शेतीमालाला रास्त भाव' या एकाच सूत्रात आपला सर्व कार्यक्रम गुंफण्याचा जोशींनी प्रयत्न केला. सगळ्या जीवनाला सामावून घेईल अशा एखाद्या सूत्राचा, तत्त्वज्ञानाचा ध्यास त्यांना पूर्वीपासूनच होता. 'योद्धा शेतकरी'मध्ये त्यांनी म्हटले होते, ''मार्क्सच्या तत्त्वज्ञानातून एक गोष्ट शिकण्यासारखी आहे – 'विचारपद्धत' ही कल्पना! आपल्या विचारांची अशी एक पद्धत तयार करता आली पाहिजे, की जिच्यामधील सर्व घटक हे एकमेकांशी तर्कशुद्धरीत्या संबंधित असले पाहिजेत!'' हाच सूत्रबद्धतेचा ध्यास ते नंतर विकसित करत गेलेल्या, पण मुळात त्यांच्या विचारसरणीत प्रथमपासूनच अग्रस्थानी असलेल्या, स्वतंत्रतावादाच्या त्यांनी केलेल्या मांडणीतही आढळतो. स्वतःच्या या स्वतंत्रताप्रेमाची सांगड ते शेतकरी आंदोलनाशी घालतच, पण शिवाय थेट आपल्या डोंगर चढण्याच्या आवडीशी आणि अगदी क्लॉस्ट्रोफोबिक (बंदिस्त जागेत गुदमरणाऱ्या) शरीरप्रकृतीशीही घालत. पण मानवी जीवनाची एकूण व्यामिश्रता विचारात घेता सूत्रबद्धतेचा हा हव्यास अडचणीतच आणणारा नव्हता का? देशापुढील सर्वच समस्या सोडवण्यासाठी एकच एक गुरुकिल्ली अशी कधी असू शकते का?

अर्थात अशा प्रश्नांची उत्तरे सोपी किंवा एकमेव नक्कीच नसणार.

एखाद्याचे व्यक्तिगत जीवन आणि त्याचे व्यावसायिक जीवन हे दोन्ही कप्पे तसे स्वतंत्र असतात हे मान्य केले, तरी व्यक्तिगत आणि व्यावसायिक हे दोन्ही घटक तसे अपरिहार्यपणे एकमेकांवर परिणाम करतच असतात. शरद जोशींच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वात त्यांच्या व्यावसायिक कामात बाधा घालेल असे काही होते का?

विचारार्थ एक उदाहरण घेता येईल. आपल्या त्या वेळच्या अधिकृत राजकारणप्रवेशाचे समर्थन करताना जोशींनी १९८४ साली लिहिले होते,

> संघटनेच्या निर्णयात काहीही पक्षीय संबंध नाही. शेतकऱ्याच्या दृष्टीने सर्व राजकारणी सारखेच चोर आहेत. पण आज छातीवर बसलेल्या चोराला दुसऱ्या चोराच्या मदतीने दूर करण्याचा हा प्रयत्न आहे. दुसरा चोर छातीवर बसण्याआधी सावधपणे उठता येते का, ते पाहावयाचे आहे.
>
> (*शेतकरी संघटक*, १४ डिसेंबर १९८४)

पण ह्या समर्थनातही एक गोम आहे हे बारकाईने बघताना जाणवते – ज्यांना त्यांनी पाठिंबा दिला, त्यांनाही जोशींनी चोरच ठरवले होते; फार तर छोटा चोर ठरवले होते; आणि ज्यांना त्यांनी समर्थन दिले त्यांना ही भूमिका खूप खटकणारी असणार हे उघड आहे. 'बाकी सगळेच चोर, पण मी मात्र साव' हा या भूमिकेत अनुस्यूत असलेला अहंकारही तसा फारसा लपून राहणारा नाही. हा अहंकार कदाचित आत्मविश्वासापोटीही आला असेल; पण ते काहीही असले तरी एकूण सर्वच राजकारण्यांमध्ये जोशी अप्रिय ठरले याचे एक मोठे कारण इथे आपल्याला जाणवते.

यशवंतराव चव्हाण म्हणायचे ते बेरजेचे राजकारण जोशींना कधीच का खेळता आले नाही? चांगुलपणातूनही एक प्रकारचे औद्धत्य येत असेल का? संन्यस्ताचा अहंकार अधिकच दाहक असतो म्हणतात, तसे काही असेल का? तत्त्वांना मुरड घालणे मान्य नव्हते म्हणून असेल का?

काहीतरी भव्यदिव्य, आणि मुख्य म्हणजे इतरांपेक्षा अगदी वेगळे असे करून दाखवायची, तशी काहीतरी सैद्धांतिक मांडणी करायची त्यांची लहानपणापासूनची तीव्र महत्त्वाकांक्षा होती. याबद्दल मागे लिहिलेलेच आहे. एका अर्थाने स्वतःचे कर्तृत्व निर्विवादपणे सिद्ध करायचाही हा प्रकार असू शकतो. इतरांना जराही न आवडणाऱ्या संस्कृतात त्यांनी इतकी रुची घेणे, पुन्हा नंतर ते सोडून कॉमर्सला जाणे, त्यातही पोद्दारऐवजी सिडनम कॉलेज निवडणे, सकृत्दर्शनी कुठचेही व्यावहारिक कारण नसताना स्वित्झर्लंडमधले सगळे वैभव सोडून भारतात परतणे, पूर्वानुभवाचा विचार करून अन्य एखादी वाट निवडणे सहजशक्य असताना चक्क कोरडवाहू शेती सुरू करणे या सगळ्यामागेही ही वेगळेपणाची आस जाणवते. ही भावनाही कदाचित इतरांशी जुळवून घेण्याच्या आड येणारी असू शकेल.

एक लक्षणीय उदाहरण म्हणजे *विचारवंतांचे बुद्धिदारिद्र्य* हा त्यांचा लेख – ज्यात त्यांनी प्रथम 'नैतिक ऱ्हास हे आपल्या अवनतीचे मुख्य कारण नाही' ही भूमिका मांडली. लोणावळा

येथे प्रा. वि. म. दांडेकर यांच्या राजकीय अर्थशास्त्र संस्थेतर्फे २२ व २३ डिसेंबर १९७९ रोजी 'देशातील सध्याच्या राजकीय अस्थिरतेतून मार्ग कोणता?' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. दांडेकर यांच्याशिवाय लॉ कॉलेजचे प्राचार्य सत्यरंजन साठे, अल्पसंख्याक आयोगाच्या सदस्य अलू दस्तूर, उद्योगपती नवलमल फिरोदिया, रँग्लर महाजनी, पत्रकार प्रेमशंकर झा वगैरे अनेक नामवंत मंडळी हजर होती. त्या सर्वांनी ढासळत्या नैतिक मूल्यांना प्राप्त परिस्थितीबद्दल सर्वाधिक दोष दिला होता. आपल्या त्या चर्चासत्रातील भाषणात व त्यावर आधारित उपरोक्त लेखात त्यांची मांडणी जोशींनी अगदी शब्दशः खोडून काढली होती. जोशींनी लिहिले होते,

> या विद्वानांच्या विचारांत इतका गोंधळ पाहून हसावे का रडावे हे समजेनासे होते. विषय इतका गंभीर आणि देशाच्या भवितव्याशी निगडित नसता तर पोटभर हसून भागले असते. भारतातील अर्थशास्त्र्यांच्या व समाजशास्त्र्यांच्या विद्वत्तेबद्दल आदर बाळगण्यासारखी स्थिती कधीच नव्हती, पण त्यांची अवस्था इतकी दयनीय असेल, असे वाटले नव्हते.
>
> (*प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश,* पृष्ठ १९)

समोरच्याला पूर्ण नेस्तनाबूत करण्याइतकी कठोर टीका करण्याचे काही कारण होते का, हा प्रश्नच आहे. का इतर सर्वांपेक्षा अगदी वेगळे काहीतरी मांडण्याची जोशींची आंतरिक गरज त्यामागे होती? अगदी सुरुवातीच्या काळात जाहीरपणे घेतलेली ही नैतिकतेला दुय्यम महत्त्व देणारी भूमिका आपल्या विशिष्ट स्वभावामुळे नंतर ते बदलू शकले नाहीत असेही झाले नसेल ना? जसे एकेकाळी त्यांनी जाहीर केलेला निर्णय कायम ठेवण्यासाठी कॉमर्सला प्रवेश घेतला होता, तसे? त्यांनी सामाजिक कार्याला इतका विरोध करण्यामागे असेच काही कारण असेल का?

ओठात एक, मनात एक, असे व्यवहारी वागणे जोशींना कधीच जमले नाही. त्यांचा हा स्पष्टवक्तेपणा आणि शिवाय त्याजोडीला वागण्यात असलेला एक प्रकारचा उपजत कोरडेपणा ह्या गोष्टीही कदाचित व्यक्तिगत मैत्र जोडण्याच्या आड आल्या असतील.

कोणाला फार चिकटायचा त्यांचा स्वभाव नव्हता असे म्हणणे ही उनोक्ती ठरावी इतके कधीकधी ते वृत्तीने अलिप्त वाटत. 'त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला खोली होती, पण रुंदी नव्हती' असे त्यांचे एक जवळचे सहकारी मला म्हणाले होते. ''मी माणसे सांभाळणारा नाही असे बरेच लोक म्हणतात. कोणाशी फार सलगी दाखवणे मला कधीच जमले नाही,'' असे जोशींनी स्वतःही श्रीरंगनाना मोरे यांच्या सत्कारसमारंभात म्हटले होते.

स्वित्झर्लंडमधील त्यांचे सहकारी आणि शेजारी टोनी डेर होवसेपियां यांनी सांगितलेली ती आठवण यावर काही प्रकाश टाकते का – बुद्धिबळ खेळताना प्रथमच एकदा हरल्यानंतर पुन्हा कधीच जोशींनी त्यांच्याबरोबर बुद्धीबळाचा डाव मांडला नाही, ती आठवण? किंवा "He despised those who were intellectually mediocre" हे त्यांचे निरीक्षण?

आपल्या श्रेयविहीनतेचे भानही जोशींना कायम आहे. त्यांनी अनेकदा उद्धृत केलेल्या मॉमच्या त्या चार संतांच्या गोष्टीत प्रतिबिंबित झालेले. अगदी कॉलेजात असतानाही हातातोंडाशी आलेला यशाचा घास शेवटच्या क्षणी हिरावून घेतला गेला असे त्यांच्या बाबतीत दोन-तीनदा घडले होते. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील अगदी अपेक्षित असे यश तसे ओझरतेच हाती लागले होते. निवडणुकीत ते कधीच यशस्वी ठरले नाहीत; त्यांच्या सभांना गर्दी करणारेही त्यांना मत देत नव्हते. ''तुमचे आयुष्य खडतर आहे आणि तुमच्या नशिबात राजयोग नाही'' असे त्यांची पत्रिका पाहणाऱ्या एका धुळ्यातील ज्योतिषाने १९८५च्या सुमारासच त्यांना सांगितले होते. त्यांनी ती गोष्ट 'माझा असल्या ज्योतिष्यावर अजिबात विश्वास नाही' म्हणून झटकून टाकली नव्हती; अनेक वर्षांनी जोशींनी ते भविष्य मला ऐकवले होते; म्हणजेच त्यांच्या ते स्मरणात होते. ते भविष्य खरे निघाले असे म्हणता येईल का?

एखाद्याला आयुष्यात किती यश लाभावे हे बऱ्याच प्रमाणात नियतीवर अवलंबून असते असे काहीसे त्यांचे मत शेवटच्या काळात बनत गेले होते; पण त्याचबरोबर एकूणच महात्म्यांच्या मर्यादा त्यांना खूप पूर्वीच कळून चुकल्या होत्या – खरे तर पूर्वीच त्या मर्यादा त्यांना जाणवल्या होत्या. अगदी तीस वर्षांपूर्वीच्या एका लेखात ते लिहितात,

> भोवतालच्या वास्तविकतेशी संबंध नसलेला असा चैतन्यमय, प्रकाशमय विचार कोण्या थोर व्यक्तीच्या मनात तयार होतो आणि त्या विचाराप्रमाणे या व्यक्ती जगाचा इतिहास बदलतात, ही कल्पना दूर सारावयास हरकत नाही. विचाराने क्रांती होत नाही एवढेच नव्हे, तर विचाराने संघटनाही बनत नाही. प्रत्येक व्यक्तीचे आणि व्यक्तिसमूहाचे काही आर्थिक हितसंबंध असतात किंवा हितसंबंधांविषयी काही आडाखे असतात. या आडाख्यांच्या अनुरोधाने कृती करण्यासाठी संघटना उभी केली जाते आणि कार्यक्रमाच्या नियोजित दिशेला पूरक असा विचार, तत्त्वज्ञान प्रत्येक संघटना तयार करते. व्होल्टेअरच्या विचाराने फ्रेंच राज्यक्रांती झाली नाही; फ्रेंच राज्यक्रांतीच्या विचाराला व्होल्टेअरने शब्द दिला. थोडक्यात, विचार हा कारक नसतो; विचार ही एक सोय असते. सोईस्कर विचार आंदोलनाला वाचा देतो, प्रेरणा देतो, पण शेवटी अर्थकारण खरे. विचार हा अर्थकारणाचे प्रतिबिंब, हेच त्याचे खरे स्वरूप.''
>
> (*शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख,* पृष्ठ १५०-१)

नवव्या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे शेतकरी आंदोलनाला मिळालेल्या यशाचे श्रेयही त्यांनी स्वतःकडे कधीच घेतलेले नाही, तर ते त्या वेळच्या विशिष्ट परिस्थितीला दिले आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. ओढूनताणून प्रत्येक विजयाचे श्रेय स्वतःकडे घेण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या या जगात हा वैचारिक प्रामाणिकपणा अगदी क्वचितच कुठे पाहायला मिळतो.

तशी एकूणच जगात आज महात्म्यांची सद्दी संपली आहे असे त्यांना वाटे. दुसऱ्या एका जुन्याच लेखात ते लिहितात,

> अर्थशास्त्राच्या जगात समाजव्यवस्थाच नव्हे, तर अगदी राज्यव्यवस्थासुद्धा उलथवून टाकणारे ग्रंथ एकेकाळी झाले. सगळ्या आर्थिक चलनवलनाचा संदर्भच बदलून टाकणारे ग्रंथराज १९३० सालापर्यंत प्रकाशित होत. ॲडम स्मिथचा ग्रंथ या नमुन्याचे पहिला आणि लॉर्ड केन्सचा 'सर्वदूर सिद्धांत' हे बहुधा शेवटचे उदाहरण. त्यानंतर कितीएक महान अर्थशास्त्री झाले; महाकष्टाने जमा केलेली प्रचंड आकडेवारी आणि माहिती, गणकयंत्राच्या साहाय्याने विश्लेषण करून पुढे मांडणारी कित्येक पुस्तके झाली; अर्थशास्त्रज्ञांना दरवर्षी नोबेल पुरस्काराचा रतीब सुरू झाला; पण लोकांची डोकी साफ धुऊन काढून त्यांना एक नवी स्वच्छ समज देणारा 'सर्वदूर सिद्धांत' पुन्हा झाला नाही. आता न्यूटन होत नाहीत. डार्विन होत नाहीत. लुई पाश्चर होत नाहीत. मादाम क्युरी होत नाहीत. याचा अर्थ संशोधन होत नाही असा नाही; त्यापेक्षा प्रचंड संशोधने होत आहेत; पण 'क्वांटम थिअरी'चा जनक कोण, आणि गुणसूत्रांच्या क्षेत्रातील कोलंबस कोण याचे उत्तर फार थोड्यांना माहीत असेल.
>
> (अन्वयार्थ – एक, पृष्ठ ९४-५)

जोशींचे असे मूलगामी चिंतन वाचले, की विवेकानंदांनी स्वतःविषयी लिहिलेला व दत्तप्रसाद दाभोळकर यांनी उद्धृत केलेला एक मुद्दा आठवतो. ते लिहितात,

''मला आता एक गोष्ट समजली आहे. एकाच व्यक्तीने दार्शनिक, नेता, संघटक, कार्यकर्ता या भूमिका करणे शक्य नसते. त्यामुळे विचारांचे, संघटनेचे आणि आंदोलनाचे अपरंपार नुकसान होते.''

जोशींना काळाच्या ओघात ह्या साऱ्या भूमिका बजावाव्या लागल्या. त्यांनी केवळ एखादा सूत्रस्वरूपातील विचार मांडला नाही, त्यांनी त्या विचारातून एक संपूर्ण तत्त्वज्ञान उभे केले, एक संपूर्ण विचारधारा उभी केली; त्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी एक प्रबळ संघटना उभारली, कार्यकर्ते घडवले, अनेक आंदोलने लढवली. हे सारे त्यांनी विलक्षण ताकदीने केले यात शंकाच नाही; पण कधीकधी वाटते, जोशींचा खरा पिंड एकांड्या विचारवंताचाच असावा. आंदोलनाला मिळालेला लक्षावधींचा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांना स्वतःलाही अनपेक्षित होता. त्या यशाने ते त्यावेळी भारावून गेले असावेत; पण ते यश म्हणजेच त्यांच्यातील विचारवंतासाठी एक पिंजरा ठरला का?

कधी कधी असेही वाटते, की हा माणूस मूलतःच इतरांपासून खूप वेगळा होता. ''माझ्यासारखा माणूस कुठच्याच धर्मात, पंथात, पक्षात, गटात बसणारा नाही,'' असे ते एकदा म्हणाले होते. अन्य राजकारणी, समाजकारणी, नोकरशहा, अर्थतज्ज्ञ, लेखक, पत्रकार, डावे-उजवे, समाजवादी-हिंदुत्ववादी, काँग्रेस, शिवसेना, भाजप, शेकाप यांच्यापैकी कुणाशीच त्यांचे फार जमले नाही; आणि खरे म्हणजे भोवतालाशी जुळवून घ्यायची त्यांना कधी आवश्यकताही

भासली नाही; याचे कारण एक मूलभूत असे वेगळेपण हे असावे. 'योद्धा शेतकरी'मध्ये परुळकरांनी लिहिले आहे, की जाहीर सभेतही ते खूपदा व्यासपीठावर अगदी शांतपणे बसलेले असत, इतर सहकारी चर्चा करत असताना एकटेच शीळ घालत वा गाणे गुणगुणत असत; जणू आपण त्या गावचेच नाही. या अलिप्तपणामागेही ते मूलभूत वेगळेपण असू शकेल.

म्हणूनच ते आपली आरक्षणाला विरोध आणि डंकेलला पाठिंबा, गोहत्याबंदीला विरोध आणि जनुकीय बदल केलेल्या (जेनेटिकली मॉडिफाइड) बियाणांना पाठिंबा असली 'पॉलिटिकली इनकरेक्ट' मते बिनधास्त व्यक्त करत राहिले; पाश्चात्त्य पोषाखातील कोणालाही भेटायला महेंद्रसिंग टिकैतना आवडत नाही हे ठाऊक असूनही जोशींनी त्यांना भेटताना जीन्स-टीशर्ट हा आपला वेष बदलला नाही. सार्वजनिक जीवन जगतानाही त्यांच्या व्यक्तित्त्वाचा एक मोठा हिस्सा खोलवर कुठेतरी आत्ममग्नच राहिला, सामान्यांमध्ये वावरतानाही आपले डौलदार राजहंसी वेगळेपण जोशी जपत राहिले.

त्यांच्या  भाषणांत व लेखनात मागे वळून पाहताना होणाऱ्या अपेक्षाभंगाचा सूर कधीकधी व्यक्त झाला आहे. उदाहरणार्थ, श्रीरामपूर येथे १२ जानेवारी २००० रोजी त्यांनी दिलेले अण्णासाहेब शिंदे स्मृती व्याख्यान. *खुल्या अर्थव्यवस्थेकडे खुल्या मनाने* या त्यांच्या पुस्तकात 'प्रचलित अर्थव्यवस्था व शेतकऱ्यांचे भवितव्य' या शीर्षकाखाली ते प्रकाशित झाले आहे. त्या एकाच लेखात त्यांनी सहा वेळा स्वतःचा उल्लेख *स्पेंट फोर्स* (ज्याचे कार्य संपलेले आहे) असा केला आहे.

त्यानंतर पंच्याहत्तराव्या वर्षात पदार्पण करताना ३० ऑगस्ट २००९ रोजी प्रसिद्ध झालेल्या *आहुती सेनापतीची मंगल होवो तुला* ह्या लेखात त्यांनी म्हटले आहे,

> आयुष्याची गाडी बऱ्यापैकी उतरणीला लागल्यानंतर, उमेदीच्या वर्षांत काय घडले, काय झाले, काय केले, काय करायला हवे होते याचा विचार साहजिकच मनात डोकावून जातो. आजतरी मला येणाऱ्या उषःकालाची अंधूकही छटा पूर्वक्षितिजावर दिसत नाही. शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या काळात प्रेमाच्या माणसांना लाथाडून देशभर फिरलो. त्यांचे शाप आपल्याला लागले की काय, अशी शंकाही मनात येऊन जाते. रूढार्थाने माझ्यासारख्या नास्तिकाला ही भावना उचित नाही. मानसिक संतुलन पहिल्यासारखे खंबीर राहिलेले नाही, मन विचलित झाले आहे याचे हे लक्षण आहे, हे मलाही मान्य आहे.''
>
> (*बळीचे राज्य येणार आहे ...* पृष्ठ १३४-५)

पण एक मात्र स्पष्ट जाणवते; वेळोवेळी अपेक्षाभंग झाला तरीही, मनासारखे दान नियतीने कधीच पदरात टाकले नाही तरीही, त्यांचा अंतर्मनाच्या गाभाऱ्यात भरून राहिलेला आत्मविश्वास त्यांना कधीही सोडून गेला नाही. गुंजाळ यांच्याशी झालेल्या एका पत्रव्यवहारात

तो उत्तम प्रतीत होतो.

मोहन गुंजाळ हे शेतकरी संघटनेचे येवल्यातले एक तडफदार कार्यकर्ते. अकालीच त्यांचे निधन झाले. त्यांच्यावरती एक सुरेख स्मृतिग्रंथ त्यांचे शेजारी आणि *अनुष्टुभ* या मराठी वाङ्मयीन त्रैमासिकाचे संस्थापक प्रा. गो. तु. पाटील यांनी संपादित केला आहे. त्यात गुंजाळ यांनी जोशींना ३ जानेवारी १९८६ रोजी लिहिलेले एक मनमोकळे पत्र छापले आहे. जोशी हृदयविकाराच्या पहिल्या झटक्यानंतर पुण्याच्या जहांगीर नर्सिंग होममध्ये दाखल असल्याची बातमी ऐकून त्यांच्या तब्येतीविषयी वाटणारी काळजी या पत्रात गुंजाळ यांनी व्यक्त केली होती. त्याला जोशींनी दिलेले उत्तरही स्मृतिग्रंथात छापले आहे. त्या पत्रोत्तरात जोशी लिहितात,

> तुझे पत्र कालच सुरेशचंद्र म्हात्रे यांनी दाखवले. पत्रातील तुझी भावना पाहून दाटून आले. दहा वर्षांपूर्वी आल्प्समध्ये गिर्यारोहण करणारा, खरोखरच सणसणीत प्रकृतीचा मनुष्य पार संपायच्या आसपास येतो, हे कसे काय? तीन उपोषणे, सोळा तुरुंगवास, चार हजारावर सभा, रात्रीचा प्रवास, राहण्यासाहण्याच्या गैरसोयी, खाण्यापिण्यातला अनियमितपणा, एवढी दगदग लक्षात घेतली तरी प्रकृतीवर एवढा विपरीत परिणाम व्हायला नको होता असे वाटते. जनसामान्यांच्या बाजूने उठणाऱ्यांना हा काय शाप आहे?...
>
> इस्पितळात इथे पडल्या पडल्या या प्रश्नांची उत्तरे मीही शोधतो आहे. काही काही प्रकाशकिरण सापडतातही. संघटनेच्या कामाला काहींनी संन्याश्याचे वैभव म्हटले होते. त्या वर्णनात एकेकाळी मीही खूप सुखावलो होतो. आमच्या विचारांच्या मस्तीत आम्ही सर्वतोपरी तयारी केली, ती आपापले जीव उधळून देण्याची. मग परिणाम हाच निघाला, की आमचे जीवच उधळले जाऊ लागले...
>
> आम्ही वस्तुवादी रणनीती म्हणून केवळ सत्याग्रह, कायदेभंग स्वीकारला. पण ही साधने हाताळता हाताळता त्यातल्या अध्यात्माने आम्हालाच गिळून, पछाडून टाकले की काय? कळीकाळालाही नमवून मृत्युंजय होऊ या भावनेऐवजी पराभवातली काव्यमय रोमांचकता आम्हाला रुचू लागली आहे की काय?...
>
> गेल्या काही वर्षांत मी आयुष्याच्या उतरंडीला लागलो आहे अशा मनाच्या अवस्थेत गेलो होतो. उरलेल्या काळात हाती घेतलेले काम जितके पुढे नेता येईल तितके न्यायचे, या कल्पनेतच समाधान मानू लागलो होतो. आज मी ठरवतो आहे – या राखेतून मी उड्डाण घेणार आहे. अगदी वैयक्तिक पातळीवरसुद्धा मी उताराला लागलेलो नाही. नव्या टेकडीवर चढायला सुरुवात करतो आहे.

'राखेतूनही पुन्हा उड्डाण घ्यायचा' हा जबरदस्त आत्मविश्वास हे जोशींचे कायम टिकलेले वैशिष्ट्य होते. त्याचे रहस्य होते, आपला विचार बरोबरच आहे याची खात्री. ही अचल

वैचारिक निष्ठा त्यांना अवघड वाटेने जातानाही कायम आत्मबळ देत राहिली.

हाच आत्मविश्वास जोशींनी २१ फेब्रुवारी १९९८ मध्ये शेतकरी संघटकमध्ये लिहिलेल्या एका लेखातही दिसून येतो. मुळात स्वतंत्र भारत पक्षाच्या एका शिबिरात केलेले हे भाषण आहे. विशेष म्हणजे यात त्यांनी केलेले स्वतःचे मूल्यमापनही आपल्याला दिसते. जोशी लिहितात,

> आजकाल माणसाचे मोजमाप करण्याच्या अनेक फुटपट्ट्या आहेत – पैसा किती गोळा केला? पदे किती मिळवली? खासदारकी मिळवली का? वगैरे, वगैरे. या सर्व फुटपट्ट्यांपेक्षा एक चांगली, महत्त्वाची फुटपट्टी आहे. स्वतःचे मूल्यमापन करायचे झाले, तर फक्त एका प्रश्नाचे उत्तर शोधा. या आयुष्यामध्ये स्वतःशी जास्तीत जास्त निष्ठा तुम्ही बाळगली का आणि त्यातला आनंद तुम्ही मिळवला का? 'माझ्या व्यक्तित्वाचा परिपोष करणे' या यात्रेपरता दुसरा आनंद नाही आणि ही यात्रा करताना मी जरी खड्ड्यात पडलो, अत्यंत वेदनामय परिस्थितीत सापडलो, नरकात पडलो तरीसुद्धा त्याची जी काही वेदना असेल ती माझी स्वतःची आहे आणि ती सहन करण्यातही मला आनंदच वाटतो, असे म्हणण्याची हिंमत ठेवली पाहिजे.
>
> मी जिंकणार आहे; त्याबद्दल माझ्या मनात शंका नाही. आजची चकमक जिंकेन किंवा नाही याची मला खात्री नाही आणि त्याची मला पर्वाही नाही; पण मी युद्ध जिंकणार आहे याबद्दल माझ्या मनात तीळमात्रही शंका नाही. आज मोठे वाटणारे, आज सिंहासनावर बसणारे, आज हत्तीवर बसणारे उद्या पायउतार झाले, की त्यांचे इतिहासात नावसुद्धा राहत नाही. आज जी टीनपाट माणसे सत्तेच्या खुर्चीवर बसून, मोठी झालेली दिसतात, त्यांची नावे ज्या वेळी इतिहासाच्या पटलावरून पुसली गेलेली असतील, त्या दिवशी 'व्यक्तिस्वातंत्र्याच्या लढाई'करिता धडपडणारे लोक म्हणून तुमचे नाव त्या इतिहासात राहणार आहे.
>
> (*पोशिंद्यांची लोकशाही*, पृष्ठ १४६-७)

त्यांच्या दोन्ही मुली परदेशात स्थायिक झाल्या होत्या; मोठी कॅनडात व धाकटी युएसमध्ये. अनेक वर्षे ते घरी एकटेच राहत होते. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते त्यांना सर्व मदत करत, अगदी रक्ताच्या नात्याचे कुणी घेणार नाही एवढी काळजी घेत, पण शेवटी ते अनुयायी व जोशी नेते हे नाते कायमच होते. व्यक्तिगत जिव्हाळ्याचा असा, ज्याच्यापाशी मनातील सर्व दुःखे मोकळी करावीत असा, जवळचा कोणी मित्र नव्हता. आयुष्याच्या अखेरी अखेरीस असे एकटेपण अनेकांच्या वाट्याला येते; त्यात फार जगावेगळे असे काही नाही; पण जोशींच्या बाबतीत एकटेपणाचा हा कालखंड खूपच लांबलेला होता आणि कितीही नाही म्हटले तरी त्याचा परिणाम जाणवत असे.

शेवटच्या वर्षभरात त्यांची प्रकृती अधिकाधिक खालावत गेली होती. त्या अवस्थेतून ते कधी नीटसे उठलेच नाहीत. शेवटी त्यांना पुण्याच्या रुबी हॉलमध्ये दाखल केले गेले. गेल्या काही वर्षांत अनेकदा ते तिथे जाऊन-येऊन होते. सुप्रसिद्ध डॉ. दुराई राज यांच्या प्रमुख देखरेखीखाली. अगदी शेवटी प्रोस्टेट कॅन्सरचे निदान झाले. पण तोवर खूपच उशीर झाला होता.

या शेवटच्या खेपेला ते महिनाभर तिथे होते. 'आमच्या उपचारांमुळे आता फारसा काही फरक पडण्यासारखा नाही, तेव्हा तुम्ही त्यांना घरी नेलेत तरी चालेल,' असे तेथील डॉक्टरांनी सांगितल्यावर सारासार विचार करून त्यांच्या निकटवर्तीयांनी १ डिसेंबर रोजी त्यांना बोपोडीला घरीच आणायचा निर्णय घेतला. अखेरच्या आजारपणात दोन्ही कन्या भारतात येऊन गेल्या होत्या. अर्थात त्यांनाही त्यांचे-त्यांचे संसार होतेच. दैनंदिन सांभाळ मुख्यतः दीदी, अनंतराव देशपांडे व सुरेशचंद्र म्हात्रे ह्यांनीच केला. आपल्या नेत्याला त्यांनी दिलेली इमानी, प्रेमाची आणि पूर्णतः निरपेक्ष साथ ही खरोखरच थक्क करणारी होती.

९ डिसेंबरला, बुधवारी, सकाळी नऊ-साडेनऊच्या सुमारास मी व बद्रीनाथ देवकर त्यांना भेटायला गेलो. खोलीत प्रवेश करताच वातावरणातले गांभीर्य जाणवले होते. काही न बोलता आत बेडरूममध्ये गेलो. पलंगावर पडल्यापडल्या ते सारखे कण्हत होते, मधूनच 'झोंबतं आहे' असे बोलत होते. हा औषधांचा परिणाम असावा. त्यांच्या डोळ्यांत आम्हांला बघितल्यावर ओळख उमटली, पण संभाषण अर्थातच अशक्य होते. काही मिनिटे आम्ही पलंगाशेजारीच उभे राहिलो. पण त्यांच्या वेदना आम्हाला बघवेनात. डोळे पाणावले. गतकाळातले त्यांचे तेजस्वी रूप डोळ्यापुढे येऊन दुःखाचे कढ येत होते. डोळे पुसत आणि हुंदका आवरत आम्ही त्यांच्या बेडरूममधून बाहेर आलो. हॉलमध्ये येऊन बसलो. त्यांना सांभाळणारा आनंद नावाचा एक मुलगा तेवढा बेडरूममध्ये थांबला. जवळजवळ दोन तास आम्ही तिथेच होतो. दीदी, अनंतराव व म्हात्रेही तिथे होते. सगळे तसे गप्पगप्पच होतो. बोलण्यासारखे काही नव्हतेच उरलेले. क्वचित कधी होणाऱ्या संभाषणात 'कधी थांबणार हे सारं' हाच अव्यक्त सूर होता.

१२ डिसेंबरला, शनिवारी, सकाळी साडेनऊच्या सुमारास मला बद्रीनाथांचा फोन आला. "सकाळी नऊ वाजता साहेब गेले." काही क्षण काय बोलावे तेच सुचेना. सुन्न झालो. एका अर्थाने ते सुटले असे वाटत होते व त्याचवेळी एक खूप मोठा माणूस हे जग सोडून गेला ह्याची जाणीवही प्रकर्षाने होत होती. मुली अमेरिकेतून परत आल्यावर मंगळवारी अंत्यसंस्कार झाले. बातमी लागताच गावोगावाहून धावून आलेल्या १५,००० शेतकरी बांधवांच्या साक्षीने वैकुंठावर दहन झाले.

एक पिंड ब्रह्मांडात विलीन झाला.

शेतकरी संघटना हा आता विझलेला निखारा समजायचा का? भावी पिढ्यांसाठी शरद

जोशींचा वारसा काय असेल?

राजीव बसर्गेकर यांनी अंतर्नादमध्ये लिहिलेल्या लेखात शेवटी एक खंत व्यक्त केली होती :

> बायाबापड्या 'इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो' म्हणतात. पण बळीराजाला पाताळात गाडणाऱ्या वामनाला दशावतारात स्थान आहे; गणपती उत्सवात गायल्या जाणाऱ्या दशावताराच्या आरतीत बळीराजाला विसरून वामनाची आरती गायली जाते, हेही सत्यच आहे.

याचाच अर्थ शेतकरी संघटना जे करू पाहत होती, शेतकऱ्याला त्याचे स्वातंत्र्य आणि सन्मान पुन्हा प्राप्त करून द्यायचे कार्य करू पाहत होती, त्याची आजही जरूरी आहेच. दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिम युरोपात कधीच युद्ध झाले नाही, उलट युरोपियन युनियन निर्माण झाली, याचे एक कारण म्हणजे युद्धाचे मूळ कारण दूर करणारा अमेरिका-पुरस्कृत 'मार्शल प्लॅन'. शून्यातून सुरुवात करून त्यामुळे पश्चिम युरोपातील देश एका पिढीत वैभवशाली बनले. भारतातली शेतीसाठीदेखील बारीकसारीक कर्जमाफी, अनुदाने अशा छोट्या-छोट्या योजना न आखता एक सर्वस्पर्शी असा 'मार्शल प्लॅन' तयार केला पाहिजे असे जोशी म्हणत. शेतकरी समृद्ध होणे म्हणजेच दोन तृतीयांश देश समृद्ध होणे. हे ध्येय इतके विशाल आहे की त्याच्या पूर्तीसाठीच अजून कित्येक दशके लागू शकतील; एकाच आयुष्यात गाठता येईल असे ते मोजूनमापून ठरवलेले, आटोपशीर, सुरक्षित असे उद्दिष्ट नाहीच. त्यामुळे ध्येयपूर्तीच्या मापदंडावर त्यांच्या आयुष्याचे यशापयश कधीच मोजता येणार नाही.

शेतकऱ्यापुढे आज प्रचंड मोठ्या समस्या आहेत. शेतकऱ्याचा मुलगा आज शेती करू इच्छित नाही. जमिनीला उत्तम भाव आला तर या शेतीतून बाहेरच पडायची त्याची इच्छा आहे. शासनाने सर्वत्र कृषी विद्यापीठे काढली, कृषी महाविद्यालये सुरू केली त्यामागे अशी अपेक्षा होती, की इथले प्रशिक्षित विद्यार्थी इथे शिकलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान व व्यावसायिक कार्यपद्धती वापरून आपल्या शेतीचा विकास करतील. प्रत्यक्षात असे दिसते, की इथला जवळजवळ एकही विद्यार्थी परत स्वतःच्या शेतीकडे वळत नाही. एमपीएससी करून भरपूर पगार आणि त्याहून जास्त वरकमाई देणारी सरकारी नोकरी हेच त्याचे पहिले स्वप्न आहे. ते नाही जमले तर दरमहा पगार देणारी इतर कुठलीही नोकरी करायला तो तयार आहे; त्यासाठी काही लाख रुपये द्यायचीही त्याची तयारी आहे; पण त्याला आता शेती मात्र करायची नाही. हा खरे तर सगळ्या देशापुढेच मोठा गंभीर प्रश्न आहे. शेतीचे कमी कमी होत गेलेले क्षेत्र हेदेखील शेती किफायतशीर राहिलेले नाही याचे मोठे कारण आहे. त्यामुळे इच्छा असूनही आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे शेतकऱ्याला परवडत नाही. कमाल जमीनधारणा कायद्याऐवजी किमान जमीनधारणा कायदा व्हायला हवा असे म्हणता येईल.

शेतकऱ्यांना शेतीमालाचा वाजवी भाव मिळावा व त्यातून ते समृद्ध व्हावेत एवढ्यापुरता

जोशींचा विचार कधीच सीमित नव्हता. त्या मर्यादेत त्यांना बंदिस्त करणे हा त्यांच्यावरचा मोठा अन्याय होईल. स्वतंत्रतावादाची त्यांची मांडणी याच्या खूप पुढे जाणारी होती; किंबहुना सगळ्याच जगाला कवेत घेणारी होती. जोशींच्या विचारव्यूहात 'स्वातंत्र्याच्या वाढत्या कक्षा' ह्या संकल्पनेला सर्वाधिक महत्त्व होते. भारतीय शेतकरी त्यातील अगदी खालच्या पायरीवर होता. त्याचा सगळाच व्यवसाय सरकारी मगरमिठीत होता. आपल्या मालाची किंमत कुठलाही उत्पादक स्वतः ठरवतो, इथला शेतकरी याला अपवाद होता; आजही बऱ्याच प्रमाणात आहे. त्याची शेती म्हणजे कायमच त्याची गरिबी वाढवणारा, त्याला भांडवल खाऊन जगायला भाग पडणारा व्यवसाय होता; त्याला कायम लाचार ठेवणारा व्यवसाय होता. अशी कुठल्याही स्वरूपाची लाचारी जोशींना खूप क्लेशदायक वाटायची. म्हणूनच त्याचा निदान उत्पादनखर्च भरून निघावा, त्याला थोडेतरी स्वतःच्या पायावर उभे राहायचे बळ प्राप्त व्हावे, या उद्देशाने त्यांनी शेतीमालाला रास्त दाम ही एक-कलमी मागणी मांडली. पण लौकरच आपण याच्या पुढच्या पायरीवर जायला हवे, याची त्यांना जाणीव होती.

दुर्दैवाने वेगवेगळ्या सरकारांनी या देशात अनुदान संस्कृती इतकी खोलवर रुजवली, की त्या अनुदानाचे जणू व्यसनच समाजाला जडले. प्रत्येक गोष्टीकरिता सरकारकडेच बघायचे, जेवढे म्हणून फुकटात मिळेल तेवढे सरकारकडून उकळायचे अशी भीकमागी, हावरी, मिळेल ते मिळेल तिथून ओरबाडून घेणारी संस्कृती तयार झाली. मतांसाठी राजकीय पक्षांनी आणि सरकारने आणलेल्या आमआदमीवादाने तिला खतपाणीच घातले.

आंदोलक शरद जोशी जितके शेतकऱ्यांना भावले तितके नंतरचे खुल्या अर्थव्यवस्थेचे समर्थक जोशी त्यांना भावले नाही. शेतीमालाला अधिक भाव मिळावा म्हणून रास्ता रोको करायला लाखोंच्या संख्येने येणारे शेतकरी प्रयोगशेती आणि व्यापारशेती करायला उत्सुक नव्हते. योद्धा शेतकरी ही प्रतिमा व्यक्तिस्वातंत्र्याचा उद्घोष करणाऱ्या नेत्याच्या प्रतिमेपेक्षा शेतकऱ्यांना अधिक भावली. 'शेतीमालाच्या भावाचे राहू द्या, त्यापेक्षा आम्हाला शेतात मोबाइल टॉवर उभारायची परवानगी द्या; त्याचे भाडे आम्हाला घरबसल्या मिळत राहील' अशी मागणी जोशींच्या कानावर पडू लागली.

अशा सगळ्या परिस्थितीत शरद जोशींच्या अमूल्य वारशाचे संवर्धन कसे करता येईल याचा विचार आपण साऱ्यांनीच करायला हवा.

शरद जोशींनी आम्हांला काय दिले?

आपल्यापुढील बहुतेक प्रश्नांचे मूळ दारिद्र्यात आहे आणि या दारिद्र्याचे मूळ शेतकऱ्याच्या शोषणात आहे; शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित वाजवी दाम मिळेल अशी व्यवस्था केल्याशिवाय हे दारिद्र्य कधीही दूर होणार नाही, हे प्रथमतः त्यांनीच शास्त्रशुद्ध पद्धतीने आम्हांला पटवून दिले. शेतीचे खरेखुरे, केवळ पुस्तकी नसलेले, असे अर्थशास्त्र मांडणारे ते पहिलेच.

'इंडिया विरुद्ध भारत' या द्वंद्वाची मांडणी करून भारताचे मूलभूत दुभंगलेपण अधोरेखित

करणारेही ते पहिलेच. शोषणाच्या चरकात पिढ्यानुपिढ्या पिळून निघालेल्या; सर्वच राजकीय पक्षांकडून, सरकारी यंत्रणेकडून सदैव लाथाडल्या गेलेल्या शेतकऱ्याची वेदना त्यांनीच प्रथम 'इंडिया'च्या वेशीवर टांगली. उद्याच्या भारतासाठी छोटे-मोठे कुठलेही प्रयत्न करणारा कोणीही माणूस यापुढे त्या वेदनेकडे दुर्लक्ष करू शकणार नाही.

'इंडिया विरुद्ध भारत' हीच मांडणी 'संघटित विरुद्ध असंघटित' अशीही करता येते. समाजातील संघटित घटक आपापल्या मागण्या संघटनेच्या बळावर, कुठल्याही विरोधाला न जुमानता, पदरात पाडून घेऊ शकतात – मग ते विमानाचे पायलट असोत की प्राथमिक शिक्षक, सरकारी नोकर असोत की रिक्षावाले. जागतिकीकरणाच्या युगातही खऱ्या अर्थाने वंचित राहिले आहेत ते समाजातील असंघटित घटक. आणि शेतकरी हा देशातील सर्वांत मोठा असंघटित घटक पूर्वीही होता आणि आजही आहे. शहरातही आपल्या अवतीभवती दिसणारे अनेक सारे वंचित याच असंघटित घटकात मोडतात – कोरिअरवाली मुले, छोट्या दुकानांतील कामगार, कचरा गोळा करणारे आणि घरोघर दूध-पेपर टाकणारे. त्यांची यादी खूप मोठी होईल. खोलात जाऊन विचार केल्यावर लक्षात येते, की यांचेही पूर्वज एकेकाळी शेतकरीच होते. कधीच न परवडणारी शेती विकत विकत एक दिवस शेतमजूर आणि त्यातही भागेनासे झाल्यावर निर्वासित म्हणून शहरात हाच त्यांच्यापैकी बहुतेकांचा जीवनप्रवास असतो.

अशा शेतकऱ्यांची संघटना उभारणे महाकठीण काम. ते कोणी करू शकेल हेच पूर्वी शक्य कोटीतले वाटत नसे. पूर्णतः असंघटित आणि विखुरलेल्या अशा या सर्वांत मोठ्या समाजघटकाची प्रबळ अशी संघटना जोशींनीच प्रथम उभारून दाखवली.

दुबळा, पिचलेला, लाचार मानला गेलेला शेतकरीसुद्धा आपल्या न्याय्य हक्कांसाठी ताठ मानेने उभा राहू शकतो; कसल्याही आमिषाची अपेक्षा न ठेवता, आपली कांदा-भाकरी बरोबर बांधून घेऊन, लाखालाखाच्या संख्येने सभांना हजर राहू शकतो, रस्ते अडवू शकतो, लाठ्या झेलू शकतो, गोळ्या खाऊ शकतो हे त्यांनीच आम्हांला दाखवून दिले. इतक्या मोठ्या संख्येने हा शेतकरी पूर्वी कधीही – अगदी स्वातंत्र्यलढ्यातही – असा पेटला नव्हता. जोशींनी घडवून आणलेले शेतकरी आंदोलन हा एक चमत्कारच होता.

लक्ष्मीमुक्तीच्या अभूतपूर्व आंदोलनातून दोन लाख महिलांचे नाव सात बाराच्या उताऱ्यावर लावले गेले, आयुष्यात प्रथमच या भगिनींच्या नावे जमिनीचा एक तुकडा झाला; हाही एक चमत्कारच होता.

जनतेच्या खऱ्या प्रश्नांकडून तिचे लक्ष दूर वळवण्यासाठी, स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी नेतेमंडळी धर्मभेद, जातिभेद, प्रांतभेद, भाषाभेद हे सगळे क्षुद्र भेद उभे करतात; सर्वसामान्य जनतेच्या मनात ते नसतात, हे त्यांनी स्वतःच्या अनुभवांवरून सिद्ध करून दिले.

शेती प्रश्न त्यांनीच ऐरणीवर आणला. शेती प्रश्नाला आज सर्वच राजकीय पक्ष निदान आपल्या बोलण्याततरी प्राधान्य देतात हे त्यांचेच यश.

जवळजवळ सर्व नेते आणि विचारवंत उदारीकरणाला आणि जागतिकीकरणाला विरोध करत असताना, येऊ घातलेली मुक्त अर्थव्यवस्था देशाच्या फायद्याची आहे; सबसिडी,

कर्जमाफी, आरक्षण असल्या कुबड्यांची आपल्याला गरज नाही; स्वातंत्र्य हेच सर्वाधिक महत्त्वाचे मूल्य आहे यांसारखी अप्रिय मते त्यांनी निर्भयपणे लोकांपुढे मांडली. आपल्या अभिव्यक्तीच्या आड लोकेषणा कधी येऊ दिली नाही आणि जनतेचे लांगूलचालन न करताही जनतेचे प्रेम मिळवता येते, हे दाखवून दिले. विचार स्वच्छ व पक्का असेल आणि लोकमानसात ठसठसणाऱ्या वेदनेला नेमके उत्तर देणारा असेल, तर घराण्यात कुठलीही नेतृत्वाची पार्श्वभूमी नसताना, पाठीशी पैशाचे, जातीचे वा सत्तेचे बळ नसताना, एखादी व्यक्ती लोकशक्ती उभी करू शकते, जुलमी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध संघर्ष उभारू शकते, हा विश्वास त्यांनी समाजात निर्माण केला. शरद जोशी हे कालोचित विचाराच्या ताकदीचे एक जाज्वल्य प्रतीक आहे.

विशेष महत्त्वाचे म्हणजे त्यांनी शेतकऱ्याला, म्हणजेच देशाच्या सर्वांत मोठ्या समाजघटकाला आत्मसन्मान दिला, स्वाभिमान दिला. 'भीक नको, हवे घामाचे दाम' ही अभूतपूर्व घोषणा त्यांच्या शिकवणुकीचे सार आहे.

शरद जोशींनी आम्हांला काय दिले, याची यादी आणखीही वाढवता येईल.

आम्ही त्यांना काय दिले हा प्रश्न मात्र विचार करायला लावणारा आहे.

■

# शरद जोशी जीवनपट : शंभर प्रमुख घटना

| क्रमांक | दिनांक | घटना |
|---|---|---|
| १ | ३ सप्टेंबर १९३५ | सातारा येथे जन्म |
| २ | ६ जून १९५१ | पार्ले टिळक विद्यालय, मुंबई, येथून अकरावीची परीक्षा उत्तीर्ण |
| ३ | २८ जून १९५७ | सिडनम महाविद्यालय, मुंबई, येथून एम.कॉम. उत्तीर्ण |
| ४ | १ ऑगस्ट १९५८ | भारतीय टपाल खात्यातील नोकरी सुरू |
| ५ | २५ जून १९६१ | मुंबईच्या लीला कोनकर यांच्याशी विवाह |
| ६ | ७ एप्रिल १९६२ | ज्येष्ठ कन्या श्रेया यांचा जन्म |
| ७ | २३ नोव्हेंबर १९६३ | कनिष्ठ कन्या गौरी यांचा जन्म |
| ८ | २० ऑगस्ट १९६७ | फ्रान्समधील सात महिन्यांचे प्रशिक्षण सुरू |
| ९ | ३० एप्रिल १९६८ | भारतीय टपालखात्यातील नोकरीचा राजीनामा |
| १० | १ मे १९६८ | युनिव्हर्सल पोस्टल युनियन, स्वित्झर्लंड, येथे रूजू |
| ११ | १ मे १९७६ | स्वित्झर्लंडमधील नोकरी सोडून भारतात परत |
| १२ | १ जानेवारी १९७७ | आंबेठाण, तालुका खेड, येथे शेतीला सुरुवात |
| १३ | २५ मार्च १९७८ | चाकण येथील पहिले कांदा आंदोलन |
| १४ | ८ ऑगस्ट १९७९ | शेतकरी संघटना स्थापन |
| १५ | ३ नोव्हेंबर १९७९ | 'वारकरी' साप्ताहिक सुरू |
| १६ | २४ जानेवारी १९८० | वांद्रे-चाकण रस्त्यासाठी ६४ किलोमीटर महामोर्चा |
| १७ | १ मार्च १९८० | पुन्हा कांदा आंदोलन. पहिले रास्ता रोको. |
| १८ | ८ मार्च १९८० | पहिले बेमुदत उपोषण सुरू |
| १९ | १६ मार्च १९८० | वाढीव भावाने कांदा खरेदी सुरू. आंदोलनाची यशस्वी सांगता. उपोषण समाप्त. |
| २० | ६ एप्रिल १९८० | आळंदी येथे पहिले कार्यकर्ता शिबिर सुरू |
| २१ | ३ मे १९८० | पोलिसांकडून पहिली अटक. आत्महत्येचा आरोप. |
| २२ | १५ ऑगस्ट १९८० | निफाड येथे ऊस आंदोलनाला सुरुवात |

| | | |
|---|---|---|
| २३ | ९ ऑक्टोबर १९८० | निफाड सहकारी साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत उसाला ३०० रुपये टन हा भाव मिळायला हवा असा ठराव संमत |
| २४ | १० नोव्हेंबर १९८० | खेरवाडी येथील 'रेल रोको'मध्ये दोन शेतकरी पोलीस गोळीबारात हुतात्मा. संघटनेतर्फे हा दिवस हुतात्मा दिन म्हणून साजरा होतो. |
| २५ | ११ नोव्हेंबर १९८० | नाशिक कोर्टात शरद जोशी यांना हजर केले गेले. इतर ३१,००० शेतकरीही अटकेत. |
| २६ | २७ नोव्हेंबर १९८० | मुख्यमंत्री अंतुले यांच्याकडून टनाला रुपये ३०० हा भाव मंजूर |
| २७ | १४ डिसेंबर १९८० | पिंपळगाव बसवंत येथे विजय मेळावा |
| २८ | १ फेब्रुवारी १९८१ | निपाणीतील सुभाष जोशी यांच्यासमवेत पहिली सभा |
| २९ | २४ फेब्रुवारी १९८१ | तंबाखू शेतकरी व विडी कामगार यांची निपाणीत पहिली संयुक्त सभा. सात प्रमुख मागण्या सादर. |
| ३० | २६ फेब्रुवारी १९८१ | अंबाजोगाई येथे प्रशिक्षण शिबिर सुरू |
| ३१ | १४ मार्च १९८१ | निपाणी तंबाखू आंदोलन सुरू, १५,००० शेतकरी 'रास्ता रोको'त सामील. |
| ३२ | ६ एप्रिल १९८१ | पोलिस गोळीबारात १२ शेतकरी हुतात्मे. शरद जोशी बेल्लारी तुरुंगात. |
| ३३ | १ जानेवारी १९८२ | संघटनेचे सटाणा येथील पहिले अधिवेशन सुरू. खुल्या अधिवेशनाला तीन लाख शेतकरी हजर. |
| ३४ | २८ मे १९८२ | पंजाबातील 'भारती किसान युनियन'ची बैठक |
| ३५ | २८ जून १९८२ | महाराष्ट्रात दूध आंदोलन सुरू. चार दिवसांनी माघार. |
| ३६ | ३० ऑक्टोबर १९८२ | वर्धा येथे देशभरातील शेतकरी प्रतिनिधींचा मेळावा व 'आंतरराज्य समन्वय समिती'ची स्थापना |
| ३७ | ३१ ऑक्टोबर १९८२ | पत्नी लीला जोशी यांचे पुणे येथे निधन |
| ३८ | २० फेब्रुवारी १९८३ | 'शेतकरी संघटना – विचार आणि कार्यपद्धती', 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' व 'भारतीय शेतीची पराधीनता' ही पुस्तके प्रकाशित |
| ३९ | ६ एप्रिल १९८३ | 'शेतकरी संघटक' पाक्षिक सुरू |

| | | |
|---|---|---|
| ४० | १६ नोव्हेंबर १९८३ | पंढरपूर येथे 'विठोबाला साकडे' मेळाव्यात कृषिमूल्य आयोग बरखास्तीची मागणी |
| ४१ | १२ मार्च १९८४ | चंडीगढ येथील राजभवन वेढा सुरू. इतर राज्यांतील प्रतिनिधींसह एक लाख शेतकरी सहभागी. |
| ४२ | १८ मार्च १९८४ | चंडीगढच्या परेड ग्राउंडवर विजयोत्सव |
| ४३ | २७ मे १९८४ | संघटनेची पहिली कार्यकारिणी नाशिक येथे स्थापन |
| ४४ | २ ऑक्टोबर १९८४ | गुजरात व महाराष्ट्रभर प्रचारयात्रा सुरू |
| ४५ | ३१ ऑक्टोबर १९८४ | टेहेरे येथे यात्रासमारोप, तीन लाख शेतकऱ्यांचा मेळावा. |
| ४६ | २२ नोव्हेंबर १९८४ | पुणे येथील बैठकीत राजकीय भूमिकेवर निर्णय |
| ४७ | २१ जानेवारी १९८५ | धुळे अधिवेशन. सर्व राजकीय पक्षांना शेतीमाल भावाविषयी भूमिका मांडण्यासाठी निमंत्रण. |
| ४८ | २ ऑक्टोबर १९८५ | राजीवस्त्रविरोधी आंदोलन सुरू. महाराष्ट्रभर एकूण २५० ठिकाणी राजीवस्त्रांची होळी. |
| ४९ | ६ ऑक्टोबर १९८५ | राहुरी येथे उस परिषद. चरणसिंग, शरद पवार, प्रमोद महाजन इत्यादि राजकीय नेत्यांची हजेरी. |
| ५० | १२ डिसेंबर १९८५ | मुंबई येथे दत्ता सामंत यांच्यासमवेत पहिला शेतकरी-कामगार मेळावा. राजीवस्त्रांची जाहीर होळी. |
| ५१ | २३ जानेवारी १९८६ | आंबेठाण येथे असताना हृदयविकाराचा पहिला झटका |
| ५२ | २ ऑक्टोबर १९८६ | अकोला येथे कपास किसान संमेलन |
| ५३ | ९ नोव्हेंबर १९८६ | चांदवड येथील पहिले महिला अधिवेशन. खुल्या अधिवेशनात तीन लाख महिलांचा सहभाग. |
| ५४ | ७ डिसेंबर १९८६ | राजीवस्त्रांवर 'ठप्पा मारो' आंदोलन. हुतात्मा बाबू गेनू स्मृती सप्ताह सुरू. |
| ५५ | १० डिसेंबर १९८६ | कपाशी आंदोलनात सुरेगाव, जिल्हा हिंगोली, येथे पोलीस गोळीबारात तीन शेतकरी ठार |
| ५६ | १२ डिसेंबर १९८६ | वर्धा येथील रेल रोको. विदर्भात ६०,००० तर मराठवाड्यात ३०,००० शेतकरी तुरुंगात. |
| ५७ | १५ फेब्रुवारी १९८७ | २५,००० शेतकरी मुंबईतील चौपाटीवर दाखल. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी ठिय्या आंदोलन. |

| | | |
|---|---|---|
| ५८ | १६ जानेवारी १९८८ | सांगली येथे व्ही. पी. सिंग यांच्या उपस्थितीत मेळावा |
| ५९ | १८ एप्रिल १९८८ | जळगाव येथे शेतकऱ्यांचा राजा शिवाजी व दलितांचा कैवारी बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचा मेळावा. कर्जमुक्ती आंदोलनाची घोषणा. |
| ६० | १ मे १९८९ | दारू दुकान बंदी आंदोलन सुरू |
| ६१ | ३ जुलै १९८९ | महिला आघाडीचे जिल्हा परिषद कब्जा आंदोलन |
| ६२ | २ ऑक्टोबर १९८९ | बोट क्लब, नवी दिल्ली, येथे पाच लाखांचा किसान-जवान मेळावा. महेंद्रसिंग टिकैत यांनी उधळून दिलेला. |
| ६३ | ८ नोव्हेंबर १९८९ | अमरावती येथे महिला आघाडीचे दुसरे अधिवेशन. शेतकरी महिलांच्या संपत्ती अधिकारासाठी 'मंगल सावकाराचे देणे' फेडण्याचे आवाहन. जातीयवादी घटकांना गावबंदी करण्याचा निर्णय. |
| ६४ | ३१ डिसेंबर १९८९ | दिल्ली येथे किसान समन्वय समितीची बैठक. नवनिर्वाचित पंतप्रधान व्ही. पी. सिंग व उपपंतप्रधान देवी लाल उपस्थित. |
| ६५ | २ जानेवारी १९९० | महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यांमधून 'अर्थवादी चळवळीला क्षुद्रवादाचा धोका' समजावून सांगण्यासाठी फुले-आंबेडकर विचारयात्रा सुरू |
| ६६ | १४ मार्च १९९० | व्ही. पी. सिंग यांनी शरद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली कृषी सल्लागार समिती स्थापन केली |
| ६७ | २ ऑक्टोबर १९९० | लक्ष्मी मुक्ती अभियान सुरू. जमिनीची मालकी शेतकरी महिलांच्याही नावे व्हावी ह्यासाठी. |
| ६८ | १० नोव्हेंबर १९९१ | शेगाव येथील शेतकरी मेळाव्यात चतुरंग शेतीची योजना. खुल्या अर्थव्यवस्थेचे स्वागत. |
| ६९ | ३१ मार्च १९९३ | डंकेल प्रस्तावाच्या स्वागतासाठी दिल्ली येथे शेतकऱ्यांचा 'आर्थिक मुक्ती मोर्चा' |
| ७० | २९ ऑक्टोबर १९९३ | औरंगाबाद अधिवेशनात डंकेल प्रस्तावाला जाहीर पाठिंबा व 'चतुरंग शेती'च्या अंमलबजावणीसाठी 'शिवार ॲग्रो प्रा. लि.' कंपनीची घोषणा |
| ७१ | ६ नोव्हेंबर १९९४ | नागपूर येथे स्वतंत्र भारत पक्षाची स्थापना |

| | | |
|---|---|---|
| ७२ | १३ मार्च १९९५ | हिंगणघाट (वर्धा) व बिलोली (नांदेड) येथून विधानसभा निवडणुकीत पराभूत. |
| ७३ | ८ एप्रिल १९९५ | हैदराबाद येथे ॲन्जिओप्लास्टी |
| ७४ | १० डिसेंबर १९९५ | कापूस एकाधिकार खरेदीच्या विरोधात स्वातंत्र्य यात्रा. नरखेड येथे समारोप व तेथून मध्य प्रदेशातील पांढुर्णामार्गे कापूस सीमापार आंदोलन. |
| ७५ | १४ डिसेंबर १९९५ | औरंगाबाद येथे ऊस झोनबंदी विरोधात उपोषण सुरू. |
| ७६ | २७ एप्रिल १९९६ | नांदेड लोकसभा मतदार संघातून लोकसभेच्या निवडणुकीत उमेदवारी. पराभूत. |
| ७७ | ४ एप्रिल १९९७ | पंजाब व हरियाणामधील गव्हाच्या भावाचे आंदोलन. |
| ७८ | ९ ऑगस्ट १९९७ | 'Q' आंदोलन सुरू. 'नोकरदार चले जाव', 'भ्रष्टाचार चले जाव' |
| ७९ | ५ जून १९९८ | इस्लामपूर (सांगली) येथे शेतकरी संघटनेतर्फे आयोजित ग्रामीण साहित्य संमेलन |
| ८० | १० डिसेंबर १९९८ | स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त अमरावती येथे जनसंसद सुरू |
| ८१ | २० डिसेंबर १९९८ | पुण्याहून दिल्लीला जाताना विमानातच अर्धांगवायूचा झटका. शरीराची डावी बाजू कमकुवत झाली. |
| ८२ | १२ मार्च १९९९ | शेतकऱ्यांची कंपनी स्थापन करून औद्योगिकीकरणासाठी 'भामा उद्योगनगरी'चे बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते भूमिपूजन |
| ८३ | ५ एप्रिल १९९९ | मुंबईत बॉम्बे हॉस्पिटल येथे बायपास सर्जरी |
| ८४ | ४ डिसेंबर १९९९ | गुजरातमधील नर्मदा जन आंदोलन |
| ८५ | १० जानेवारी २००० | जागतिक व्यापार संघटनेचे (WTO) महानिदेशक माईक मूर यांची दिल्ली येथे भेट शेतकऱ्यांवर लादलेल्या उणे सबसिडीची माहिती दिली |
| ८६ | १२ सप्टेंबर २००० | जोशींच्या अध्यक्षतेखाली अटल बिहारी वाजपेयी यांच्यातर्फे कृषी कार्य बल स्थापन |
| ८७ | ६ एप्रिल २००१ | नवी दिल्ली येथील नेहरू स्टेडियमवर 'किसान कुंभ' भरवून शेतकरी स्वातंत्र्याचा जाहीरनामा घोषित |
| ८८ | १५ नोव्हेंबर २००२ | तीन महिन्यांच्या नर्मदा परिक्रमेला सुरुवात |

| | | |
|---|---|---|
| ८९ | २८ मे २००३ | शिवाजी पार्क, मुंबई येथे स्वतंत्र भारत पक्षाचे पहिले राष्ट्रीय अधिवेशन सुरू |
| ९० | ३० जानेवारी २००४ | स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी शेणगाव (अमरावती) ते कोराडी (नागपूर) पदयात्रा सुरू |
| ९१ | ७ जुलै २००४ | सहा वर्षांसाठीचे राज्यसभा सदस्यत्व सुरू |
| ९२ | ३१ डिसेंबर २००७ | रामेश्वरम येथे शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे ह्या मागणीसाठी मेळावा. सर्व कर्जाचे कागदपत्र समुद्रात बुडवण्यात आले. |
| ९३ | २ जुलै २००८ | कोल्हापूर येथे इथेनॉल शिबीर सुरू |
| ९४ | ९ मार्च २०१० | सरकारने मांडलेल्या 'महिला आरक्षण विधेयका'तील आरक्षित जागा ठरवण्याची आवर्तनी सोडतीची तरतूद लोकशाहीला घातक आहे म्हणून राज्यसभेत एकट्याचे विरोधी मतदान (१८६ विरुद्ध १) |
| ९५ | २ ऑक्टोबर २०१० | रावेरी, जिल्हा यवतमाळ, येथील पुनर्निर्मित सीतामंदिराचा लोकार्पण समारंभ |
| ९६ | १० फेब्रुवारी २०११ | दिल्ली येथे 'अन्नसुरक्षा' या विषयावरील आंतराष्ट्रीय परिसंवादासाठी गेले असताना हॉटेलच्या जिन्यावरून पडल्याने जखमी. हालचालींवर खूप मर्यादा. |
| ९७ | ३० जुलै २०१२ | बांदा, बुंदेलखंड, येथे किसान समन्वय समितीची बैठक. जोशी उपस्थित असलेली शेवटची. |
| ९८ | ८ नोव्हेंबर २०१३ | चंद्रपूर येथे शेतकरी संघटनेचे बारावे अधिवेशन. 'पुन्हा एकदा उत्तम शेती' ही घोषणा. जोशी उपस्थित असलेले शेवटचे अधिवेशन. |
| ९९ | २५ नोव्हेंबर २०१४ | मुंबई येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा पुरस्कार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली. शेवटचा जाहीर कार्यक्रम. |
| १०० | १२ डिसेंबर २०१५ | पुणे येथे निधन. |

# शेतकरी संघटनेची अधिवेशने व इतर ठळक कार्यक्रम

१) शे. सं. पहिले अधिवेशन १, २, ३ जानेवारी १९८२, सटाणा जि. नाशिक
अध्यक्ष : श्री. माधवराव खंडेराव मोरे, स्वागताध्यक्ष : श्री. रामचंद्रबापू पाटील

२) विठोबाला साकडे मेळावा १६ नोव्हेंबर १९८३, पंढरपूर
अध्यक्ष : श्री. माधवराव खंडेराव मोरे

३) शे. सं. दुसरे अधिवेशन १७, १८, १९ फेब्रुवारी १९८४, परभणी
अध्यक्ष : श्री. माधवराव खंडेराव मोरे, स्वागताध्यक्ष : श्री. श्रीरंगराव मोरे

४) शे. सं. तिसरे अधिवेशन २१, २२ जानेवारी १९८५, धुळे
अध्यक्ष : श्री. रामचंद्रबापू पाटील (रौंदळ), स्वागताध्यक्ष : श्री. अनिल गोटे

५) शेतकरी महिला अधिवेशन ९, १० नोव्हेंबर १९८६, चांदवड जि. नाशिक
अध्यक्ष : श्री. रामचंद्रबापू पाटील (रौंदळ), स्वागताध्यक्ष : सौ. मंगला नरेंद्र अहिरे

६) शे. सं. चौथे अधिवेशन १०, ११, १२ मार्च १९८९, नांदेड
अध्यक्ष : श्री. विजय जावंधिया, स्वागताध्यक्ष : श्री. शंकर धोंडगे

७) शेतकरी महिला आघाडी, दुसरे अधिवेशन ८, ९, १० नोव्हेंबर १९८९, अमरावती
अध्यक्ष : सौ. विमलताई वसंतराव पाटील (पुसदेकर)

८) शेतकरी मेळावा ९, १० नोव्हेंबर १९९१, शेगाव जि. बुलढाणा
अध्यक्ष : श्री. किशोर माथनकर

९) शे. सं. पाचवे अधिवेशन २९, ३०, ३१ ऑक्टोबर १९९३, औरंगाबाद
अध्यक्ष : श्री. पाशा पटेल, स्वागताध्यक्ष : श्री. हेमंत देशमुख

१०) शे. सं. सहावे अधिवेशन १२ नोव्हेंबर १९९४, नागपूर
अध्यक्ष : श्री. पाशा पटेल, स्वागताध्यक्ष : श्री. राम नेवले

११) शे. सं. (सातवे अधिवेशन) ९ ऑगस्ट, १९९९, नांदेड
अध्यक्ष : ॲड. वामनराव चटप, स्वागताध्यक्ष : शंकर धोंडगे

१२) शे.सं. जनसंसद १०, ११, १२ डिसेंबर १९९८, अमरावती
अध्यक्ष : ॲड. वामनराव चटप

१३) शे. सं. आठवे अधिवेशन ११,१२ नोव्हेंबर २०००, सांगली-मिरज
अध्यक्ष : श्री. मोहन गुंजाळ, स्वागताध्यक्ष : श्री. रघुनाथदादा पाटील

१४) शेतकरी महिला आघाडी सहावे अधिवेशन ८, ९, १० नोव्हेंबर २००१, रावेरी जि. यवतमाळ
अध्यक्ष : सौ. शैलजा देशपांडे

१५) शे. सं. युवा आघाडी अधिवेशन २, ३, ४ जानेवारी २००२, दौंड जि. पुणे
अध्यक्ष : श्री. लक्ष्मण वडले, स्वागताध्यक्ष : श्री. अनिल घनवट

१६) स्वभाप पहिले अधिवेशन २८, २९, ३० मे २००३, मुंबई
अध्यक्ष : श्री. रघुनाथदादा पाटील

१७) शे. सं. नववे अधिवेशन ९,१०,११ नोव्हेंबर २००३, चंद्रपूर
अध्यक्ष : श्री. लक्ष्मण वडले, स्वागताध्यक्ष : ॲड. वामनराव चटप

१८) शे. सं. दहावे अधिवेशन २७, २८, २९, ३० जानेवारी २००५, जालना
अध्यक्ष : सौ. सरोज काशीकर, स्वागताध्यक्ष : श्री. लक्ष्मण वडले

१९) शे. सं. रौप्य महोत्सव मेळावा १० नोव्हेंबर २००५, परभणी
अध्यक्ष : सौ. सरोज काशीकर, स्वागताध्यक्ष : श्री. गोविंद जोशी

२०) स्वभाप दुसरे अधिवेशन ९, १० डिसेंबर २००७, नांदेड
अध्यक्ष : ॲड. वामनराव चटप, स्वागताध्यक्ष : श्री. गुणवंत पाटील हंगरगेकर

२१) शे. सं. अकरावे अधिवेशन ८, ९, १० नोव्हेंबर २००८, औरंगाबाद
अध्यक्ष : श्री. तुकाराम निरगुडे, स्वागताध्यक्ष : श्री. कैलास तवार

२२) शे. सं. बारावे अधिवेशन (स्वभापसह संयुक्त) ८, ९, १० नोव्हेंबर २०१३, चंद्रपूर
अध्यक्ष : श्री. रवी देवांग, स्वागताध्यक्ष : श्री. प्रभाकर दिवे

# शरद जोशी यांची ग्रंथसंपदा

**प्रकाशक : शेतकरी प्रकाशन, अलिबाग (रायगड)**

१. शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती
२. प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश
३. भारतीय शेतीची पराधीनता
४. शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र : खंडन मंडन
५. शेतकऱ्याचा असूड : शतकाचा मुजरा
६. भीक नको, हवे घामाचे दाम
७. प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश – भाग दुसरा
८. चांदवडची शिदोरी – स्त्रियांचा प्रश्न
९. शेतकरी कामगार पक्ष : एक अवलोकन
१०. शेतकऱ्यांचा राजा शिवाजी (सहलेखक अनिल गोटे, राजीव बसर्गेकर)
११. कर्जमुक्ती आंदोलन
१२. जातीयवादाचा भस्मासुर
१३. राष्ट्रीय कृषिनीती
१४. समस्याएं भारत की (हिंदी लेखसंग्रह)

**प्रकाशक : जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद**

१. शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती ('भारतीय शेतीची पराधिनता'सह पुनर्मुद्रण)
२. प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश (भाग १ व २ एकत्र पुनर्मुद्रण)
३. चांदवडची शिदोरी – स्त्रियांचा प्रश्न (विस्तार व पुनर्मुद्रण)
४. शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख (शेतकऱ्याचा असूड : शतकाचा मुजरा व जातीयवादाचा भस्मासुर या पुस्तिकांसह पुनर्मुद्रण)
५. स्वातंत्र्य का नासले?
६. खुल्या व्यवस्थेकडे – खुल्या मनाने
७. अंगारमळा
८. जग बदलणारी पुस्तके
९. अन्वयार्थ – १
१०. अन्वयार्थ – २
११. माझ्या शेतकरी भावांनो आणि मायबहिणींनो
१२. बळीचे राज्य येणार आहे

१३. अर्थ तो सांगतो पुन्हा
१४. पोशिंद्यांची लोकशाही
१५. भारतासाठी

**इंग्रजी ग्रंथसंपदा**

1. Answering before God
2. The Women's Question
3. Bharat Eye view
4. Bharat Speaks Out
5. Down to Earth (selected articles from The Hindu Business Line)

**हिंदी ग्रंथसंपदा**

१. समस्याएं भारत की
२. स्वतंत्रता क्यों नाकाम हो गई? ('स्वातंत्र्य का नासले' या मराठी पुस्तकाचा अनुवाद)

**शरद जोशी व शेतकरी संघटनेसंबंधी अन्य काही पुस्तके**

१. योद्धा शेतकरी – विजय परुळकर
२. शरद जोशींबरोबर पंजाबात – अरविंद वामन कुळकर्णी
३. संगीत गरिबी हटाव (लोकनाट्य) – अरविंद वामन कुळकर्णी
४. शरद जोशी : भारतीय अर्थवादाचा क्रियाशील जनक – अरविंद वामन कुळकर्णी
५. पाण्यावरची रेघ – (पंतप्रधान राजीव गांधींचा दुष्काळ दौरा) – अनिल गोटे
६. शेतकरी महिला आणि पंचायत राज्य – संपादन : विद्युत भागवत
७. महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण : दळभद्री चिंधी – शेतकरी महिला आघाडी
८. शेतकरी संघटना : राजकीय भूमिका – अजित नरदे
९. आंदोलन – अनंत उमरीकर
१०. बँकेने लुटलं शेतकऱ्याला – अनंत उमरीकर
११. वेडेपीर – अनंत उमरीकर
१२. शेतीव्यवसायावरील अरिष्ट – शेषराव मोहिते
१३. मळ्यातील अंगार – इंद्रजित भालेराव
१४. जागतिक व्यापार संघटनेचा ओनामा – शेतकरी प्रकाशन
१५. Populism and Power – D. N. Dhanagare
१६. शरद जोशी : शोध अस्वस्थ कल्लोळाचा! – वसुंधरा काशीकर-भागवत

**टीप :** 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' या पुस्तकाचे हिंदी, गुजराती, तेलुगू आणि कानडी या भाषांमध्ये अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत.

# शेतकरी आंदोलनातील हुतात्मे

**पिंपळगाव बसवंत (नासिक) १९-३-८० कांदा आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| १. पांडुरंग शंकर निफाडे | शिरवाडे-वणी | (निफाड-नासिक) |
| २. आनंदा कचरू गवारे | पाचोरे-वणी | (निफाड-नासिक) |

**श्रीगोंदा (नगर) २७-१०-८० ऊस आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| ३. नाना दगडू चौधरी | शिरसगाव बो. | (श्रीगोंदा-नगर) |

**खेरवाडी (नासिक) १०-११-८० ऊस आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| ४. बाबुराव पांडुरंग रत्ने | खेरवाडी | (निफाड-नासिक) |
| ५. भास्कर धोंडीराम जाधव | म्हाळसाकोरे | (निफाड-नासिक) |

**निपाणी (बेळगाव) ६-४-८१ तंबाखू आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| ६. जानू सूर्यवंशी | रामपूर | (चिकोडी-बेळगाव) |
| ७. आबासाहेब अण्णासाहेब इंगळे | चिखलव्हाळ | (चिकोडी-बेळगाव) |
| ८. भाऊ लक्ष्मण कोंडीकर | गळतगा | (चिकोडी-बेळगाव) |
| ९. गोविंदा लक्ष्मण कोंडीकर | गळतगा | (चिकोडी-बेळगाव) |
| १०. ज्योती देऊ गावंड | भोज | (चिकोडी-बेळगाव) |
| ११. महादेव भीमराव तावडे | अकोळ | (चिकोडी-बेळगाव) |
| १२. ज्ञानदेव मल्लू पाटील | नांगनूर | (चिकोडी-बेळगाव) |
| १३. कृष्णा दादू पाटील | शिरपेवाडी | (चिकोडी-बेळगाव) |
| १४. दिनकर दाजी चव्हाण | ममदापूर | (चिकोडी-बेळगाव) |
| १५. शंकर रामा रेंदाळे | एकसंबा | (चिकोडी-बेळगाव) |
| १६. थळू भिवा कांबळे | जत्रट | (चिकोडी-बेळगाव) |
| १७. अनंत रामा कुऱ्हाडे | लिंगनूर | (कापशी-कोल्हापूर) |

**टेहरे (मालेगाव-नासिक) १०-११-८१ वर्धापनदिन आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| १८. भागूजी काळू बागूल | पिंगळवाडे | (बागलाण-नासिक) |
| १९. दगा चिंतामण अहिरे | आनंदपूर | (बागलाण-नासिक) |

**कजगाव (भडगाव-जळगाव) १०-११-८१ वर्धापनदिन आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| २०. हरिश्चंद्र रामदास बारी | कजगाव | (भडगाव-जळगाव) |

**पानगाव (अंबाजोगाई-बीड) १०-११-८१ वर्धापनदिन आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| २१. रमेश मुगे | पानगाव | (अंबाजोगाई-बीड) |

**सुरेगाव (हिंगोली-परभणी) १०-१२-८६ हुतात्मा बाबू गेनू स्मृतिसप्ताह 'राजीवस्त्र रोको' आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| २२. निवृत्ती गुणाजी कऱ्हाळे | मु.पो. डिग्रस-कऱ्हाळे | (हिंगोली, जि. परभणी) |
| २३. परसराम गणपत कऱ्हाळे | मु.पो. डिग्रस-कऱ्हाळे | (हिंगोली, जि. परभणी) |
| २४. ग्यानदेव रामजी टोंपे | मु. सुरवाडी | (हिंगोली, जि. परभणी) |

**राजना (चांदूर रेल्वे-अमरावती) १३-१२-९७ कापूस कैफियत आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| २५. प्रकाश नानाजी काळे | नेक नानपूर | (चांदूर रेल्वे-अमरावती) |

**देगाव-भातुकली १४-१२-९७ कापूस कैफियत आंदोलन**

| | | |
|---|---|---|
| २६. प्रमोद जवळकर | हिरपूर | (चांदूर रेल्वे-अमरावती) |
| २७. गणेश शिंदे | रेणुकापूर-भातुकली | (बाभुळगाव-यवतमाळ) |

**अंकलेश्वर (गुजरात) ४ डिसेंबर १९९९ सरदार सरोवर कारसेवा**

| | | |
|---|---|---|
| २८. सौ. ललिताबाई बाबुराव वरवटे | सोनाळ | ता. औराद, जि. बिदर (कर्नाटक) |

(संदर्भ : *शेतकरी संघटक*, ६ नोव्हेंबर २००८)

# शपथ

मी शपथ घेतो की,
शेतकऱ्याचे लाचारीचे जिणे संपवून
त्यांना देशातील इतर नागरिकांप्रमाणे
सन्मानाने व सुखाने जगता यावे
याकरिता
'शेतीमालाला रास्त भाव'
या एक-कलमी कार्यक्रमासाठी
संघटनेचा पाईक म्हणून
मी सर्व शक्तीने प्रयत्न करेन.
या प्रयत्नात पक्ष, धर्म, जात वा इतर कोणत्याही भेदाभेदांचा
अडथळा येऊ देणार नाही.

(शेतकरी संघटनेच्या प्रत्येक सभेत सर्वजण उभे राहून, वळलेली मूठ उंचावत, सामुदायिकरीत्या ही शपथ घेत.)

# लेखकपरिचय

भानू काळे, सी २, गार्डन इस्टेट, नागरस रस्ता, औंध, पुणे ४११ ००७.
स्थिरभाष : (०२०) २५८८३७२६ चलभाष : ९८५०८ १००९१
इमेल : bhanukale@gmail.com

**लेखन :**

- ***तिसरी चांदणी*** : राजकीय पार्श्वभूमीवरील कादंबरीलेखन स्पर्धेतील पारितोषिकविजेती कादंबरी, पहिली आवृत्ती : *मॅजेस्टिक प्रकाशन,* मार्च १९७९, दुसरी आवृत्ती, *मौज प्रकाशन,* नोव्हेंबर २०१३
- ***कॉम्रेड*** : कामगारचळवळीच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी, पहिली आवृत्ती : *ग्रंथाली प्रकाशन,* जून १९८९, दुसरी आवृत्ती : *मौज प्रकाशन,* नोव्हेंबर २०१३
- ***बदलता भारत*** : जागतिकीकरणाच्या लाटेत बदलणाऱ्या – तसेच न बदलणाऱ्या – भारताचा प्रवासवर्णनाच्या माध्यमातून घेतलेला शोध, *मौज प्रकाशन,* ऑगस्ट २००५ (सध्या पाचवी आवृत्ती) (पु. ल. देशपांडे स्मृती पुरस्कार, केशवराव कोठावळे स्मृती पुरस्कार, पुणे मराठी ग्रंथालयाचा न. चिं. केळकर पुरस्कार)
- ***अंतरीचे धावे...*** : विविध सामाजिक-सांस्कृतिक विषयांवरील लेखांचा संग्रह, (सध्या तिसरी आवृत्ती) *मौज प्रकाशन,* जून २००९ (पुणे नगर वाचन मंदिर पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट ललित ग्रंथासाठीचा पुरस्कार)
- ***रंग याचा वेगळा... दत्तप्रसाद दाभोळकर लेखन आणि जीवन*** : (संपादन व प्रस्तावना), *कॉन्टिनेन्टल प्रकाशन,* ऑगस्ट २०१४ (सध्या दुसरी आवृत्ती)
- ***अजुनी चालतोची वाट... रावसाहेब शिंदे जीवन आणि कार्य*** : *ऊर्मी प्रकाशन,* पहिली आवृत्ती डिसेंबर २०१४ (सध्या पाचवी आवृत्ती)

**संकीर्ण :**

- मुंबईतील *हिंमत* या इंग्रजी साप्ताहिकातून १९७३मध्ये पत्रकारिता सुरू. १९७८ ते १९९४ मुंबईला मुद्रणव्यवसायात. १९९५मध्ये पुण्याहून *अंतर्नाद* या वाङ्मयीन-वैचारिक मासिकाची सुरुवात. मराठीतील एक महत्त्वाचे मासिक म्हणून गेली बावीस वर्षे वाचक अंतर्नादकडे पाहत आहेत.
- शंकरराव किर्लोस्कर प्रतिष्ठान, प्रभाकर पाध्ये प्रतिष्ठान, पु. भा. भावे स्मृती समिती, भाऊसाहेब थोरात स्मृती समिती, मुंबई मराठी पत्रकार संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद व अन्य अनेक प्रतिष्ठित संस्थांच्या पुरस्कारांनी सन्मानित
- अध्यक्ष, समरसता साहित्य संमेलन, इचलकरंजी, २००८
- *Change for Better* या नामांकित इंग्रजी त्रैमासिकाचे संस्थापक-संपादक
- अनेक सामाजिक संस्थांशी निकटचा संबंध. विविध परिषदांमधील सहभागासाठी वीसहून अधिक देशांमधून प्रवास.



# अंगारवाटा...

## शोध शरद जोशींचा

भानू काळे

शेतीमालाला रास्त भाव दिल्याशिवाय शेतकऱ्यांचे व एकूणच देशाचे दारिद्र्य कधीही दूर होणार नाही हे प्रथमत: शरद जोशी यांनी मांडले. 'इंडिया' विरुद्ध 'भारत' हे भारताचे मूलभूत दुभंगलेपण अधोरेखित करणारेही ते पहिलेच.

शेतकरी आंदोलन हे स्वातंत्र्योत्तर भारतातील सर्वांत मोठे जनआंदोलन. केवळ स्वच्छ विचाराच्या बळावर, पाठीशी पैशाचे, घराण्याचे, जातीचे वा सत्तेचे कुठलेही बळ नसताना त्यांनी शेतकऱ्यांची संघटना उभारली. शरद जोशी हे विचाराच्या ताकदीचे जाज्वल्य प्रतीक आहे.

शरद जोशींचे संपूर्ण सहकार्य लाभलेले हे चरित्र म्हणजे त्यांचे व्यामिश्र व्यक्तिमत्त्व, कौटुंबिक जीवन, भारतीय टपाल सेवेतील दहा व स्वित्झर्लंडमधील आठ वर्षे, शेतकरी संघटनेची वाटचाल यांचा सखोल शोध आहे. अनेक घटना वाचकांपुढे प्रथमच आणणारा. चाकणपासून स्वित्झर्लंडपर्यंत शेकडो जणांना भेटून लिहिलेले हे चरित्र म्हणजे एका देदीप्यमान कालखंडाचे दस्तावेजीकरण आहे.

शेतकरी संघटना

किंमत ६०० रुपये